Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

ISSUE No- (CCCIII)303

July -2021

# Impact of Race, Caste, Class and Religion on Indian and International Society



**Prof. Virag S. Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Dr Nitin A. Mathankar**
Executive-Editor
Principal,
Late Vasantrao Kolhatkar
Arts College, Rohana

**Dr. Deoman S. Umbarkar**
Editor
Organizing Secretary
,Department of Sociology
Late Vasantrao Kolhatkar
Arts College, Rohana

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

# Aadhar Publication

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

**Impact Factor – 7.675** **ISSN – 2278-9308**

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refreed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

# July -2021

**ISSUE No- 303 (CCCIII)**

# Impact of Race, Caste, Class and Religion on Indian and International Society

**Prof. Virag.S.Gawande**
**Chief Editor :**
**Director**
**Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.**

**Dr Nitin A. Mathankar**
**Executive-Editor**
**Principal,**
**Late Vasantrao Kolhatkar Arts College, Rohana**

**Dr. Deoman S. Umbarkar**
**Editor**
**Organizing Secretary ,Department of Sociology**
**Late Vasantrao Kolhatkar Arts College, Rohana**

**Aadhar International Publication**
For Details Visit To : **www.aadharsocial.com**
**© All rights reserved with the authors & publisher**

**ISSN : 2278-9308**
**July, 2021**



MESSAGE

I am indeed glad to know that our college Late VasantraoKolhatkar Arts College,Rohana is organizing One Day Interdisciplinary International Conference on Impact of Race,Caste,Class and Religion on Indian and International Society on Friday,23rd July 2021.

I welcome the initiative of the college in organizing the International Conference and the delegates and wish the conference a grand success.



Adv.NitinV.Kolhatkar

President

Swami VivekanandBahuuddeshiya

VikasShikshanSanstha,Rohana.



From the Principal Desk

I am very pleased for the full throng response in the form of articles from the scholars and academicians who have shown eagerness for the research.TheInternational Conference will be useful for the researchers to exchange and share their views on the relevant topics and the research experiences about the various aspects of Impact of Race,Caste,Class and Religion on Indian and International Society.The publication of the research journal is online.

The deliberations of the conference will play a pivotal role in disseminating the information in various areas of society regarding the Race,Caste,Class and Religion.I acknowledge my gratitude to all authors of research papers and participants.

I extend my best wishes for successful organization of the conference.

Dr.NitinA.Mathankar
Principal
Late.VasantraoKolhatkar Arts
College,Rohana



संपादकीय मनोगत

स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय विकास शिक्षण संस्था द्वारा संचालित,स्व.वसंतराव कोल्हटकर कला महाविद्यालय रोहणा हे नागपूर विद्यापीठाशी कायम संलग्नीत आहे.महाविद्यालयाची स्थापना १९९९ मध्ये झाली असून आर्वी तालुका व रोहणा परिसरातील ग्रामीण तसेच आर्थिक,औद्योगिकदृष्ट्या अविकसित भागातील विद्यार्थ्यांना जीवनाभिमुख,दर्जेदार शिक्षण देण्याचे ध्येय उराशी बाळगून ज्ञानदानाचे कार्य करीत आहे.महाविद्यालयाचे नॅक बंगलोरकडून मुल्यांकन झाले असून त्यामध्ये महाविद्यालयाने 'ब' दर्जा प्राप्त केला आहे.

महाविद्यालय दरवर्षी आंतरमहाविद्यालयीन चर्चासत्र,परिसंवाद तसेच प्रश्नमंजुषा स्पर्धा,वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा,पर्यावरण,विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा,मुलींसाठी कायदेशीर जाणीव जागृती कार्यक्रम ,हेल्थ क्लब,वुमेन सेल,करिअर गाईडेन्स,स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन,दत्तक पालक योजना,शैक्षणिक साहित्य सहाय्यता योजना,व्हॅल्यु अॅडेड कोर्से,अॅड ऑन कोर्से,सर्टिफिकेट कोर्से,बेटी बचाओ बेटी पढाओ,स्वछता अभियान,वृक्ष लागवड अभियान,रस्ता सुरक्षा सप्ताह,खेळांच्या स्पर्धा,राष्ट्रीय सेवा योजना तसेच वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करीत असते.महिला सबलीकरणाच्या अनुषंगाने चर्चासत्र,रॅली,स्वयं सुरक्षा प्रशिक्षण वर्ग,महिला बचत गट मार्गदर्शन,महिला साक्षरता,योगा प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात येतात.शिवाय विद्यार्थिनींमध्ये आरोग्य,कायदा समुपदेशन,स्पर्धा परीक्षा या विषयी जागृती यावी यासाठी संबंधित क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची मार्गदर्शने,व्याख्याने आयोजित करण्यात येतात.समाजशास्त्र विभागद्वारे आयोजित या आंतरराष्ट्रीय परिषदेत वंश,जात,वर्ग व धर्माचा भारतीय व आंतरराष्ट्रीय समाजावर पडलेला प्रभाव या विषयावर चिंतन व्हावे हा हेतू डोळ्यासमोर ठेऊन प्राध्यापक,संशोधक व विचारवंतांचे संशोधन लेख मागविण्यात येऊन मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार आहे. वंश,जात,वर्ग व धर्म यामध्ये संपूर्ण समाज विभागला गेला आहे.यांचा समाजावर काय प्रभाव पडला याची जाणीव व्हावी म्हणून अभ्यासकांनी,संशोधकांनी यावर विचारमंथन करावे,लेख लिहून त्यांच्या जागृती प्रक्रियेचे ते साक्षीदार व्हावेत म्हणून आम्ही आयोजित केलेल्या या परिषेदेला चांगला प्रतिसाद मिळाला याचा मनस्वी आनंद वाटतो.

मागील वर्षी महाविद्यालयाने घरगुती हिंसाचाराचा भारतीय समाजावर झालेला परिणाम या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन १४ मार्च २०२० ला करण्यात आले होते परंतु कोरोनाच्या मुळे २८ एप्रिल २०२० ला ऑनलाईन कॉन्फरन्स घेण्यात आली.समाजशास्त्र ,राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या विषयांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आली.सदर परिषदेमध्ये ३५४ पेपर पब्लिश करण्यात आले.एप्रिल २०२१ मध्ये २ अंक प्रकाशित करण्यातआले. यावर्षी महाविद्यालयाने २३जुलै २०२१ ला जात,वंश,वर्ग आणि धर्माचा भारतीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेला परिणाम या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे भारतातील विविध भागातून सुमारे ३५५ पेपर प्राप्त झालेले आहेत.त्यामुळे खऱ्या अर्थाने ही आंतरराष्ट्रीय परिषद आहे.हे आपल्याला नाकारता येत नाही. सदर परिषदेमध्ये ११ महाविद्यालयांनी सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे व सहभागी झालेल्या आपल्या सर्वांचे आभार व्यक्त करतो..

आंतरराष्ट्रीय परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी संस्था अध्यक्ष अॅड.नितीन कोल्हटकर,संस्था सचिव श्री.प्रकाशदादा टाकळे,महाविद्यालयाचे प्राचार्य ,डॉ.नितीन माथनकर,विद्यापीठाचे प्रकुलगुरू उद्घाटक,डॉ.संजय दुधे, इंडियन सोसिओलोजिकल सोसायटी मेंबर व कार्यक्रमाचे प्रमुख डॉ.संजय तिवारी,कार्यक्रमाचे अध्यक्ष,समाजशास्त्र विभाग ,सेंट.पीटर्सबर्ग विद्यापीठ,रशिया,टेक्नीकल सेशन च्या मार्गदर्शक डॉ.सुलक्षणा चव्हाण,सांगली, टेक्नीकल सेशनच्या प्रमुख आझरा आबिदी जामिया मिलिया इस्लामिया सेन्ट्रल युनिवर्सिटी नवी दिल्ली यांचे अनमोल मार्गदर्शन व महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षेकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्याबद्दल आभार व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.आधार इंटरनॅशनल पब्लिकेशन ई-ऑनलाईन पब्लिकेशनची जबाबदारी श्री.विराग गावंडे यांनी स्वीकारली याबद्दल त्यांचे मी ऋण व्यक्त करतो व अपेक्षा करतो की या आंतरराष्ट्रीय परीषेदेतील शोधनिबंध संकलन रसिक-वाचक-अभ्यासक ,संशोधक व अखिल मानवजातीला उपयोगी व फायदेशीर ठरले म्हणून त्यांनाच विन्रमपणे समर्पित करतो.

धन्यवाद..!

डॉ.देवमन श्रीकृष्ण उंबरकर
आयोजक व सचिव
आंतरराष्ट्रीय परिषद

# Editorial Board

**Chief Editor -**
**Prof.Virag S.Gawande,**
**Director,**
Aadhar Social Research &,
Development Training Institute, Amravati. **[M.S.] INDIA**

**Executive-Editors -**

- **Dr.Dinesh W.Nichit** - Principal, Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, **Walgaon.Dist. Amravati.**
- **Dr.Sanjay J. Kothari** - Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati

**Advisory Board -**

- **Dr. Dhnyaneshwar Yawale** - Principal, Sarswati Kala Mahavidyalaya , Dahihanda, Tq-Akola.
- **Prof.Dr. Shabab Rizvi ,**Pillai's College of Arts, Comm. & Sci., New Panvel, Navi Mumbai
- **Dr. Udaysinh R. Manepatil** ,Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji,
- **Dr. Sou. Parvati Bhagwan Patil** , Principal, C.S. Shindure College Hupri, Dist Kolhapur
- **Dr.Usha Sinha** , Principal ,G.D.M. Mahavidyalay,Patna Magadh University.Bodhgay Bihar

**Review Committee -**

- **Dr. D. R. Panzade,** Assistant Pro. Yeshwantrao Chavan College, Sillod. Dist. Aurangabad (MS)
- **Dr.Suhas R.Patil** ,Principal ,Government College Of Education, Bhandara, Maharashtra
- Dr. **Kundan Ajabrao Alone** ,Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Tal-Daryapur, Dist-Amravati.
- **DR. Gajanan P. Wader** Principal , Pillai College of Arts, Commerce & Science, Panvel
- **Dr. Bhagyashree A. Deshpande**, Professor Dr. P. D. College of Law, Amravati]
- **Dr. Sandip B. Kale,** Head, Dept. of Pol. Sci., Yeshwant Mahavidyalaya, Seloo, Dist. Wardha.
- **Dr. Hrushikesh Dalai** , Asstt. Professor K.K. Sanskrit University, Ramtek

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responicible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

\- **Executive Editor**

**Published by -**
**Prof.Virag Gawande**
**Aadhar Publication ,**Aadhar Social Research & Development Training Institute, New Hanuman Nagar, In Front Of Pathyapustak Mandal, Behind V.M.V. College,Amravati
( M.S ) India Pin- 444604 **Email :** aadharpublication@gmail.com
**Website :** www.aadharsocial.com **Mobile :** 9595560278 /

## INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | भारतीय समाजातील सामाजिक संस्थांचे बदलते स्वरूप — डॉ.विनोदकुमार धोंडीराम कुंभार | 1 |
| 2 | जाती, वर्गाचा व धर्माचा गरीब लोकांवर होणारा परिणाम — प्रा. एस. के. इंगळे | 4 |
| 3 | भारतीय समाजावर जातीचा परिणाम — डॉ. हनुमंत हि. मिसाळ | 8 |
| 4 | अनुसूचित जाति की बालिकाओं पर शिक्षा के निजीकरण का प्रभाव — डॉ. भारती सागर | 15 |
| 5 | डॉ. आंबेडकरांचे जाती उच्छेदा विषयक विचार — प्रा. बाळकृष्ण कारू रामटेके | 20 |
| 6 | आदिवासी महिलांच्या दर्जावर आदिवासी जाती—जमातींचा होणारा परिणाम : एक अध्ययन — प्रा.डॉ.योगेश प्रल्हाद महाजन | 22 |
| 7 | भारतीय उद्योग व कामगार — डॉ.विनोदकुमार सुकराम चोपकर | 26 |
| 8 | आदिवासीं समोरील आव्हाने व सामाजिक विकास :एक अध्ययन — डॉ.विजया निळकंठ कन्नाके | 30 |
| 9 | दलित आत्मकथनांची वाटचाल — प्रा.डॉ.सुरेश व्यंकटराव कदम | 36 |
| 10 | प्रोफेसर रमणलाल मेहता द्वारा आगरा घराने की संकलित एवं स्वरांकित राग केदार की बंदिश का सांगितिक समिक्षण — Santosh Kisanrao Khandare | 38 |
| 11 | आधुनिक काळात निर्माण झालेल्या वृध्दांच्या समस्या एक अभ्यास — सहा.प्रा संदिप आर. उप्पोड | 43 |
| 12 | महात्मा ज्योतिबा फुले— महाराष्ट्रातील थोर समाज सुधारक — **Mr.Rajesh Sharadrao Chavhan** | 47 |
| 13 | भारतातील बांलकाची परिस्थिती — सहा.प्रा राहुल आर. लव्हाळे | 50 |
| 14 | सावित्रीबाई फुले आणि स्त्री शिक्षण — प्रा.राहुल जोंधळे | 53 |
| 15 | जाती, वर्ण आणी वर्ग (एस,एस टी, ओबीसी) व्यवस्थेतील गोंधळ! — डॉ. पुरोषत्तम गुणवंतराव पखाले | 57 |
| 16 | वेदों की द्रष्ट्रा ऋषिकाएँ — प्रा.डॉ.प्रिती मंगेश कुलकर्णी | 60 |
| 17 | १९०९ च्या मोर्ले — मिंटो कायद्याचे परीक्षण — प्रा.डॉ.प्रमिला डी. भोयर | 67 |
| 18 | महिला सक्षमीकरण आणि पंचायत राज — परमानंद उके | 71 |

ISSN : 2278-9308
July, 2021


| | | |
|---|---|---|
| 19 | माता बाल मृत्युदर निवारणात जननी सुरक्षा योजनेचे योगदान **प्रा. डॉ. पल्लवी शामसुंदर देशमुख** | 76 |
| 20 | महात्मा ज्योतिबा फुले– महाराष्ट्रातील थोर समाज सुधारक"लिंग, धर्म व जातींचा राजकारणावरील प्रभाव व परिणाम – एक अध्ययन" **निलेश माधव घोरपडे /प्रा.डॉ. आर.पी. निकम सर** | 79 |
| 21 | सामाजिक परिवर्तन की प्रक्रियांमे महिला आंदोलन की भुमिका **मनविंदर की भामरा** | 82 |
| 22 | भारतीय आदिवासी समाजाच्या आर्थिक समस्या **प्रा. मनिषा नि. अवगान** | 85 |
| 23 | आदिवासी स्त्रियांच्या जीवनावर सामाजिक परिवर्तनाचा प्रभाव **डॉ.मंगला अ.कडवे** | 90 |
| 25 | गरीब जनतेवर जात,वर्ग आणि धर्म यांचा परिणाम **प्रा. डॉ.एम.एफ.राऊतराहे** | 93 |
| 26 | ऐतिहासिक जीवनावर जाती, वर्ग आणि धर्म यांचा प्रभाव **प्रा.डॉ. किशोर शेषराव चौरे** | 96 |
| 27 | आदिवासी समुदायावर जाती, वर्ग आणि धर्म यांचा प्रभाव **कु.गोदावरी विठ्ठलबन बन** | 99 |
| 28 | भारतीय संस्कृती मध्ये देवळांचे महत्व.... हिंदु संस्कृतीच्या अनुशंगाने **डॉ. दिलीप चव्हान** | 105 |
| 29 | उत्तर भारतीय समान स्वर वाले रागों में स्वर–लगाव की तकनीक : एक अध्ययन **दयाशंकर** | 109 |
| 30 | महिला सक्षमीकरणात बचतगटाची भूमिका **प्रा. बाळासाहेब विठ्ठलराव तौर** | 112 |
| 31 | मनोरंजन माध्यमे आणि महिलांची स्थिती **सहा. प्रा. डॉ. अतुल पुंजाजी राउत** | 117 |
| 32 | अंधश्रद्धेवर स्वसंकल्पनेचा होणारा परिणाम : एक मानसशास्त्रीय अध्ययन **प्रा. डॉ. अनिल आय. थूल** | 121 |
| 33 | अश्विनी भिड़े देशपांडे द्वारा रचित राग छायानट के बंदिश का सांगीतिक अध्ययन **Amol Wasudeorao Gawande** | 124 |
| 34 | आदिवासी जमातीवर जाती धर्माचा प्रभाव **प्रा.यादवराव आर. गहाणे** | 130 |
| 35 | वैश्वीकरण और भारतीय कलाओं में संगीत **प्रा.वर्षा आगरकर** | 133 |
| 36 | डॉ. आंबेडकर आणि पत्रकारिता **प्रा. वंदना ह. तागडे** | 135 |
| 37 | स्त्रियांच्या कार्यकक्षेचा विस्तार व स्त्री सक्षमीकरण **डॉ.उज्वला तेजराम कापगते** | 138 |
| | | |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 CCCIII)

ISSN : 2278-9308

July, 2021


| | | |
|---|---|---|
| 38 | संस्कृति, शिक्षा एवं धर्म के संदर्भ में स्वामी विवेकानंद का दर्शन: एक दर्शन शास्त्रीय विवेचन प्रा.शिवचरण नामदेव धांडे | 142 |
| 39 | जातीचा भारतीय राजकारणावर प्रभाव प्रा.डॉ. सरला वसंतराव मेश्राम | 149 |
| 40 | सामाजिक एवं धार्मिक परिपेक्ष में संगीत की भूमिका डॉ. सारिका विवेक श्रावणे | 153 |
| 41 | मराठी लोकसाहित्य संशोधनाच्या नव्या दिशा प्रा.डॉ संतोष चंपती हंकारे | 157 |
| 42 | कोविड १९ च्या काळातील कामगारांचे स्थलांतर आणि उलट स्थलांतर प्रा डॉ. साधना डी. वाघाडे | 161 |
| 43 | रूपक—संख्या : एक अध्ययन डॉ. रोशन खंडू भगत | 167 |
| 44 | स्वतंत्र भारतातील तरुणांवर जातीव्यवस्थेचा झालेला परिणाम प्रा. रिता पी. खोब्रागडे | 171 |
| 45 | डॉ. आंबेडकर आणि शेडयुल्ड कास्ट फेडरेशन प्रा.डॉ. रमेश के. शेंडे | 175 |
| 46 | भारतीय लोकशाहीसमोरील एक आव्हाहन : भ्रष्टाचार डॉ. राजेंद्र ओ. बेलोकार / सहा. प्राध्या. मनोज के.सरोदे | 178 |
| 47 | जातीय व धर्म सलोखा राखण्यात ग्रामगीतेचे योगदान प्रा.डॉ. प्रशांत रा. देशमुख | 182 |
| 48 | कौटुंबिक हिंसा — एक सामाजीक समस्या प्रमोद चं. वानखेडे | 187 |
| 49 | भारतीय राजकारण आणि जातिचा प्रभाव : एक चिंतन डॉ.प्रकाश घ. कांबळे | 191 |
| 50 | जाती व वर्णव्यवस्थेचा भारतीय समाजावर झालेला परिणाम प्रा. डॉ. नागोराव के. सोरे | 194 |
| 51 | नगरपरिषद मधिल निर्वाचित महिला प्रतिनिधीची नगरविकासात भुमिका डॉ. मनोज श्रीकृष्णराव पवार | 197 |
| 52 | आदिवासींच्या जीवनावर सामुदायिक विकास योजनेचा झालेला परिणाम प्रो. मनोहर रामचंद्र चौधरी | 201 |
| 53 | भारतातील दारिद्र्य : कारणे, परिणाम व उपाय डॉ. महेन्द्र गावंडे | 207 |
| 54 | आधुनिक धर्मव्यवस्थेचा आदिवासींच्या जीवनावर झालेला परिणाम डॉ.माधुरी झाडे | 212 |
| 55 | भारतीय फिल्म संगीत की उत्पत्ति, विकास एवं नाट्य संगीत का विकसित स्वरूप किशोर चंद राठौड़ | 217 |
| 56 | भारतीय राजकारणावर जाती धर्माचा प्रभाव डॉ. किशोर बी. कुडे | 221 |
| 57 | समाजकब्याहामका रिती रिवाज : अन महत्व का घटक प्रा. डॉ. काशीनाथ मानमोडे/प्रा.डॉ. तिर्थनंदन बन्नगरे | 227 |

| | | |
|---|---|---|
| 58 | महाराष्ट्र राज्यातील लोकसंख्या घनतेचे भौगोलिक विश्लेषण<br>डॉ. जयदीप रामकृष्ण सोळुंके | 232 |
| 59 | डॉ. भा.ज. कविमंडन यांची सौंदर्यशास्त्रीय भूमिका<br>प्रा. जगजीवन विश्वनाथ कोटांगले | 236 |
| 60 | शहरीकरणाचा आदिवासींच्या जीवनावर झालेला परिणाम विशेष संदर्भ — मेळघाट, महाराष्ट्र प्रा. डॉ. एच.यु.पेटकर | 239 |
| 61 | संत तुकारामाच्या मनातील अंतर्बाहय संघर्ष प्रा.डॉ.गणेश भि. मोहोड | 244 |
| 62 | भगवानदास मोरवाल के उपन्यासोंमें धार्मिक प्रभाव<br>डॉ. डिंपल सुरेश पाटिल | 250 |
| 63 | गोंड आदिवासी जमातीच्या शैक्षणिक समस्याचे अध्ययन.<br>प्रा.चित्रा दिगंबर साळुंखे | 253 |
| 64 | जात, वर्ग, धर्म ह्यांचा समतावादी तत्त्वावर आधारित पडलेला प्रभाव व परिणाम प्रा. चंद्रशेखर सुधाकर देवघरे | 258 |
| 65 | साहित्यरत्न अण्णाभाऊसाठे : मार्क्सवादी विश्लेषण<br>डॉ. चंद्रकांत धनाजी कांबळे | 260 |
| 66 | भारतीय वर्ण,जातीव्यवस्था आणि आर्थिक परिस्थिती<br>प्रा.डॉ.भगवान सांगळे | 266 |
| 67 | भारतीय वर्ग, वंश आणिजातिव्यवस्थेच्या उत्पत्तीसंबंधी डॉ. जी. एस. घुर्ये यांचे विचार डॉ. भगवान सुरेश मनाळ | 270 |
| 68 | भारतातील वर्ण ,जातीव्यवस्था आणि धर्मनिरपेक्षता डॉ. अशोक डोळस | 274 |
| 69 | लोकसाहित्य और गढ़वाली लोकगाथाएं प्रा. अनिता शर्मा | 279 |
| 70 | जाती, वर्ण आणि धर्माचा भारतीय व्यक्तींच्या मानसिकतेवर झालेला परिणाम प्रा.अजय व्ही.निंबाळकर | 280 |
| 71 | जाती वर्गाचा आणि धर्माचा राजकारणावर होणार परिणाम<br>डॉ. अजय पी.बोरकर | 284 |
| 72 | बौध्द धर्माचा समाज जीवनावर पडलेला प्रभाव<br>प्रा.डॉ.विद्या श्रीकृष्ण भारंबे | 290 |
| 73 | जेरेमी बेंथॅमची सुखवादी संकल्पना प्रा.डॉ. सुनिलदत्त सोपान गवरे | 294 |
| 74 | भारतीय समाजातजात, वर्ग आणि धर्म यांचा प्रभाव प्रा.डॉ.संतोष मेंढेकर | 302 |
| 75 | स्त्री भ्रूण हत्या — कारणे व उपाय : एक अभ्यास<br>प्रा.डॉ.रोहिणी दि. मेश्राम | 308 |
| 76 | पोवारी साहित्याचे व्यासंगी—डॉ.ज्ञानेश्वर टेंभरे: व्यक्ती व वाड्मयय<br>प्रा.डॉ. रामलाल चौधरी | 313 |
| 77 | सामाजिक न्याय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर डॉ. राजेश जा. काळे | 319 |

| | | |
|---|---|---|
| **78** | आदिवासी कुमारी मातांचे समाजशास्त्रीय अध्ययन डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे | **322** |
| **79** | जाती और धर्म व्यवस्था का सामाजिक प्रभाव – एक अध्ययन डॉ प्रकाश धनसिंग पवार | **328** |
| **80** | गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींची आधुनिकतेकडे वाटचाल – एक सामाजिक अध्ययन प्रा. डॉ. पी. एन. वाघ | **331** |
| **81** | भारतीय शास्त्रीय संगीत परंपरागत शिक्षण पध्दति में परिवर्तन की आवश्यकता डॉ. मोनाली मसीह | **336** |
| **82** | खते व कीटकनाशकांचा वाढता वापर – यवतमाळ जिल्ह्याचे भौगोलिक अध्ययन. कु.मयुरी नंदकुमार ठाकरे (गावंडे) | **339** |
| **83** | डॉ. आंबेडकरांचे जातिव्यवस्था निर्मूलनातील योगदान डॉ. मधुरा प्रतापसिंह मोहिते | **344** |
| **84** | यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास प्रा.डॉ.लखन भि.इंगळे | **349** |
| **85** | स्वातंत्र्योत्तर भारतवर्ष मे जातीव्यवस्था का स्वरूप और प्रभाव – एक ऐतिहासिक दृष्टी **Dr.Dipak M.Chavan** | **353** |
| **86** | ग्रामीण व शहरी भागातील ग्राहकांच्या मूलभूत व चैनींच्या वस्तू खरेदी कलवर जात आणि धर्माच्या प्रभावाचे अध्ययन विशेष संदर्भ अकोला जिल्हा **Mr. Chandrakant B. Dhumale** | **356** |
| **87** | 'लोकशाहीर अण्णा भाऊंच्या कादंबरीतील नायक दृनायिका' प्रा. अजित जयराम जाधव | **363** |
| **88** | लॉकडाऊनमध्ये प्रवासी मजुरांचे स्थलांतरण, अपघात व मुत्यु डॉ. अजय कारूजी. मेश्राम | **367** |
| **89** | आदिवास्यांची वनआधारीत अर्थव्यवस्था : एक जिवनशैली आदित्य प्रकाशराव कनेर | **371** |
| **90** | जात या घटकाचा सामाजिक संबधावर पडलेला प्रभाव प्रा. विजय शामराव कांडलकर | **374** |
| **90** | संतुलीत आहार आणि आरोग्य प्रा.डॉ. सुषमा वा. बोंडे | **379** |
| **91** | जात, वर्ग व धर्माच्या पुढे महात्मा ज्योतीबा फुलेंचे कार्य प्रा. रमेश एम. भगत | **383** |
| **92** | महिला सुरक्षा व अधिकार –एक संवैधानिक अभ्यास प्रा.राजेंद्र घोरपडे | **386** |
| **93** | राष्ट्रीय,अंतर्राष्ट्रीयशिक्षा एवं सामाजिक समीकरण डा मीना कुमारी /अनंत कथूरिया | **390** |
| **94** | एड्स : महाविद्यालयीन विद्यार्थिनींमधील जागरूकता आणि उपाययोजना प्राची बा. भांबुरकर /डॉ. संगीता आ. जवंजाळ | **395** |

| | | |
|---|---|---|
| 95 | दलित साहित्य: चळवळ आणि विचार प्रा.एम.डी. झलके | 399 |
| 96 | भारतीय राजकारणावर जाती धर्माचा प्रभाव डॉ. किशोर बी. कुडे | 401 |
| 97 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीनिर्मुलन विषयक विचार **प्रा.डॉ. चंद्रकांत कांबळे** | 406 |
| 98 | जनजाती विकास की समस्यायें एवं संभावनायें डॉ.अर्चना बी.जैन | 410 |
| 99 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जातीच्या निर्मितीचा सिद्धांत डॉ. नलिनी ईश्वरदास बोरकर | 416 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# भारतीय समाजातील सामाजिक संस्थांचे बदलते स्वरूप

**डॉ.विनोदकुमार धोंडीराम कुंभार**
सहाय्यक प्राध्यापक,समाजशास्त्र विभाग,पी.डी .व्ही.पी.महाविद्यालय,तासगाव
मोब.—९९७५५६४६२२,vinodkumarkumbhar9@gmail.com

**प्रस्तावना:**

भारतीय समाजामध्ये जात, वर्ग आणि धर्म या तीनही संकल्पना परस्परावर अवलंबून आहेत. भारतीय समाजामध्ये प्रामुख्याने कुटुंबसंस्था, धर्मसंस्था, राज्यसंस्था, अर्थसंस्था, विवाहसंस्था प्रमाणेच सामाजिक संस्थांमध्ये जातीसंस्था ही एक मूलभूत सामाजिक संस्था म्हणून अस्तित्वात असल्याचे दिसून येते. भारतीय समाजामध्ये प्रत्येक व्यक्तीचे स्थान, तिचा दर्जा , समाजामध्ये राहण्याचे नियम, जीवन जगण्याची एकूण पद्धती, ही त्या व्यक्तीचीजात, वर्ग आणि धर्म यावर प्रामुख्याने अवलंबून होती. कारण समाजामधील सर्व नियमने, मुल्ये इत्यादी जात, वर्ग आणि धर्म यामुळे विशिष्ट रचनेमध्ये विभागलेली होती आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीला या नियमांचा पालन करावे लागत होते. तसेच ज्या व्यक्तीकडून या नियमांचे पालन होत नाही, त्या व्यक्तीला कोणती शिक्षा करावी हेसुद्धा जात, वर्ग आणि धर्म यानुसारच ठरत असे. समाजातील व्यक्तींच्या नावांची रचना सुद्धा जात, वर्ग आणि धर्म नुसारच ठरत असे. अशा या भारतीय समाजामध्ये मुख्य भूमिका बजाविणाऱ्या जात धर्म आणि वर्ग या संकल्पनांचाआणि सामाजिक संस्थांचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. तसेच यांचे स्वरूप स्वातंत्रप्राप्तीपूर्वी कसे होते आणि स्वातंर्त्यप्राप्तीनंतर यामध्ये कोणता बदल होत आहे याचाही अभ्यास करणे महत्त्वपूर्ण ठरते. मानवाच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी सामाजिक संस्था निर्माण झाल्या. प्रत्येक सामाजिक संस्थेचे एक मूलभूत कार्य असते.प्रस्तुत संशोधन लेखामध्ये संशोधकाने जात, वर्ग, धर्म, विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, शिक्षणसंस्था इत्यादींचे स्वातंज्यप्राप्तीपूर्वीचे स्वरूप आणि स्वातंर्त्यप्राप्तीनंतर या सामाजिक संस्थांमध्ये झालेले परिवर्तनाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**उद्दिष्टे:**

१.स्वातंज्यप्राप्तीपूर्वीचे सामाजिक संस्थांचे स्वरूप स्पष्ट करणे.
२.स्वातंज्यप्राप्तीनंतर सामाजिक संस्थांमध्ये झालेले परिवर्तनाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधन लेखासाठी संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. तसेच माहिती संकलनासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ, इंटरनेट इत्यादींचा वापर करण्यात आलेला आहे आणि त्यानुसार मिळालेल्या माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

**सामाजिक संस्थांचे स्वरूप आणि सामाजिक संस्थांमध्ये झालेले परिवर्तन**

- **जातीव्यवस्था:**

डॉ.मुजुमदार व मदन यांच्या मते, " जात हा एक बंद वर्ग आहे."

जातिव्यवस्थेचा अभ्यास प्रामुख्याने डॉ.जी.एस.घुर्ये, हर्बर्ट रीजले इत्यादी अनेक समाजशास्त्रज्ञांनी केलेला दिसून येतो. डॉ.जी.एस.घुर्ये यांनी जातिव्यवस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये सांगितलेली आहे. त्यामध्ये समाजाची खंडात्मक विभागणी, सोपान परंपरा, खाण्या—पिण्या संदर्भात व सामाजिक संबंधाविषयक निर्बंध, सामाजिक व धार्मिक अपात्रता व विशेष अधिकार, विवाहविषयक नियम, व्यवसाय स्वातंज्यविषयक नियम इत्यादी मुख्य वैशिष्ट्यसंदर्भात मांडणी दिसून येते. डॉ.जी.एस.घुर्ये यांनी जातीची वैशिष्ट्ये सांगितली आहेत त्यावरून भारतीय समाजातील जातीव्यवस्थेचे स्वरूप समजण्यास मदत होते.

स्वातंज्यप्राप्तीपूर्वी प्रामुख्याने भारतीय समाज चार वर्णामध्ये विभागला गेलेला होता. यामध्ये ब्राह्मण,क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि अतिशूद्र यानुसार समाजाचे विभाजन झालेले होते. तसेच प्रत्येक

जातीमध्ये अनेक पोटजाती निर्माण झालेल्या दिसून येतात आणि या प्रत्येक जाती आणि पोट जाती मध्ये उच्च आणि कनिष्ठ अशा प्रकारचे संबंध प्रस्थापित झालेले दिसून येतात. प्रत्येक जातीने कोणता व्यवसाय करावयाचा, विवाह करत असताना कोणत्या नियमांचे पालन करावयाचे, शिक्षण घेण्याचा अधिकार इत्यादी सर्व जाती, वर्ग आणि धर्म यानुसार निर्धारित होते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने ज्या राज्यघटनेचा स्वीकार केला. त्यानुसार राज्यघटनेपुढे सर्वांना समान मानले जाते. जात, वर्ग, धर्म, वंश, लिंग, भाषा इत्यादी कोणत्याही आधारावरती कोणत्याही व्यक्तीमध्ये भेदभाव केला जाणार नाही.

प्रामुख्याने भारतीय समाजामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बलुतेदारी पद्धतीचा त्रास होत असलेला दिसून येतो. कारण नवीन व्यवसायांची सर्वांना मिळालेली संधी किंवा उपलब्धता यामुळे पारंपरिक व्यवसाय सोडून इतर व्यवसाय करण्याकडे लोकांचा कल वाढला. तसेच शिक्षणामुळे आपला स्वत:चा दर्जा उंचावण्याची संधी प्रत्येकाला प्राप्त झाली. विविध कायदे, लोकशाही मूल्यांचा प्रसार, शासनाकडून मिळणाऱ्या सोयी—सुविधा इत्यादींमुळे जाती व्यवस्थेमध्ये परिवर्तन होत असलेले दिसून येते. यालाच अनुसरून डॉ. एम. एन. श्रीनिवास यांनी संस्कृतीकरण,पाश्चिमात्यीकरण आणि आधुनिकीकरण अशा संकल्पना मांडलेल्या दिसून येतात.

- **विवाहसंस्था:**

समनर आणि केल्लर यांच्या मते,

''विशिष्ट काळी समूहाने घालून दिलेल्या लोकनि तिच्या मर्यादा आणि पद्धती यांच्यानुसार जीवन जगण्यासाठी प्रयत्न करणे व प्रजोत्पादन करणे या सर्व काळी मानली गेलेली स्त्री—पुरुषांची विवाही ही एक संघटना आहे.''

विवाह हा दोन किंवा अधिक भिन्न लिंगी व्यक्तींचा एक संघ असतो. यावरून विवाहाचे विविध प्रकार पडलेले दिसून येतात. उदाहरणार्थ एकविवाह, बहुविवाह इत्यादी. समाजातील कोणत्याही विवाहाला त्या समाजाची मान्यता असणे अत्यंत आवश्यक असते. यासोबतच विवाहानुसार पती आणि पत्नी यांना एकमेकांविषयीचे विशिष्ट हक्क आणि कर्तव्य पार पाडावी लागतात. विवाह मध्ये काही औपचारिकता सुद्धा पार पाडाव्या लागतात आणि विवाहाचे स्वरूप हे टिकाऊ असते असे मानले जाते. भारतीय समाजामध्ये प्रामुख्याने विवाहामुळे वंशपरंपरा निश्चित करणे, आपल्या संपत्तीचा उत्तराधिकारी ठरविणे, मुलांचे संगोपन करणे, सामाजिक संबंध व्यापक करणे अशी काही कार्य ठरवून दिलेली दिसून येतात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५५ मध्ये हिंदू विवाह कायदा संमत झालेला दिसून येतो. त्यानुसार हिंदू विवाह कायदयाने घटस्फोटाला मान्यता प्राप्त झालेली दिसून येते. तसेच या कायद्यानुसार विवाहाची नोंदणी सुद्धा महत्त्वपूर्ण ठरली आहे. या संस्थेमध्ये पाश्चिमात्यीकरण तसेच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर झालेले शैक्षणिक बदल, सामाजिक परिस्थिती इत्यादी गोष्टींमुळे परिवर्तन होत आहे.उदाहरणार्थ— विवाह वयामध्ये वाढझालेली आहे तसेच जोडीदार निवडीवरील पूर्वीचे निर्बंध शिथिल होऊन आंतरजातीय विवाहांना हळूहळू मान्यता मिळत आहे.

- **कुटुंबसंस्था:**

भारतीय समाजातील कुटुंबसंस्थेचा प्रामुख्याने डॉ. आय.पी देसाई, डॉ. इरावती कर्वे, डॉ. कपाडिया, पंढरीनाथ प्रभू इत्यादी विविध समाजशास्त्रज्ञांनी अभ्यास केलेला दिसून येतो. कुटुंबसंस्था ही प्रत्येक समाजातील एक मूलभूत सामाजिक संस्था म्हणून ओळखली जाते. कुटुंबसंस्थेमध्ये व्यक्तीचे समाजीकरण केले जाते तसेच व्यक्तीच्या वर्तनाचे नियंत्रणही केले जाते. व्यक्तीला सामाजिक मानसिक सुरक्षितता देणे, स्थैर्य देणे अशी महत्त्वाची कार्ये कुटुंब संस्थेकडून केली जातात. म्हणून कुटुंबसंस्थेला भारतीय समाजामध्ये केंद्रस्थान असलेले दिसून येते. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी भारतीय समाजामध्ये प्रामुख्याने एकत्र कुटुंबपद्धतीने म्हणजेच संयुक्त कुटुंबपद्धती अस्तित्वात होती. यासंदर्भातील डॉ. इरावती कर्वे यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

भारतीय समाजामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर झालेल्या विकासामध्ये संयुक्त कुटुंबपद्धतीचे हळूहळू विभक्त कुटुंबपद्धतीमध्ये रूपांतर झालेले आपणास दिसून येते.

विभक्त कुटुंब पद्धतीमध्ये प्रामुख्याने कुटुंबाचा आकार लहान झालेला दिसून येतो. या कुटुंबांमध्ये पती—पत्नी आणि त्यांची अविवाहित मुले राहताना दिसून येतात. तसेच विभक्त कुटुंब

 ISSN : 2278-9308 July 2021

पद्धतीमध्ये व्यक्तिस्वातंर्त्याला वाव मिळत असलेला दिसून येतो. या कुटुंबातील स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान असलेले दिसून येते. तसेच कायद्यानुसार संपत्तीमध्ये समान वारसा हक्क स्त्रियांना सुद्धा मिळू लागले आहेत असे दिसून येते. परंतु विभक्त कुटुंब पद्धतीमध्ये कुटुंबातील अपंग, वृद्ध सदस्यांच्या संगोपनाच्या समस्येमुळे अनाथाश्रम आणि वृद्धाश्रमाची निर्मिती होत असल्याचे दिसून येते.

- **शिक्षणसंस्था :**

भारतीय समाजामध्ये स्वातंत्र्यप्राप्ती पूर्वी ठराविक जातीतील, उच्च वर्गातील आणि ठराविक धर्माच्या लोकांनाच शिक्षण घेण्याचा अधिकार होता. तसेच महिलांचा शिक्षण घेण्याचा अधिकार समाजाने नाकारलेला होता.परंतु प्रामुख्याने कनिष्ट जाती आणि स्त्रियांच्या शिक्षणासाठी विविध समाजसुधारकानी प्रयत्न केलेले दिसून येतात.

स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी भारतीय समाजामध्ये स्त्रियांचा आणि कनिष्ठ जातीतील लोकांच्या शिक्षणाबद्दल विविध समाज सुधारकांनी केलेल्या प्रयत्नांमुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अशा सर्वांना शिक्षण घेण्याचा अधिकार मिळाला व त्यासाठीची असणारी चळवळ अधिक गतिशील झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षणाच्या विकासासाठी विविध शैक्षणिक आयोगाची स्थापना करण्यात आली आणि त्यांच्या शिफारशीनुसार शैक्षणिक धोरण, शिक्षणाचे स्तर ठरविण्यात आले.यामध्ये प्रामुख्याने मुदलियार आयोग, डॉ.राधाकृष्णन आयोग, कोठारी आयोग इत्यादींचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

- **राज्यसंस्था:**

भारतीय समाजातील ७३ वी घटना दुरुस्ती ही राजकीय क्षेत्रामध्ये परिवर्तन घडवून आणण्यास महत्त्वपूर्ण ठरली. तसेच पंचायत राजच्या निर्मितीमुळे लोकशाहीचे विकेंद्रीकरण करणे शक्य होत आहे. स्वातंर्त्यप्राप्तीनंतर विधानसभा, लोकसभा सदस्यत्व पदावर स्त्रियांची संख्या सुद्धा वाढताना आपणास दिसून येते. विविध निवडणुकांमध्ये स्त्रिया अग्रेसर असलेल्या दिसून येतात.

भारतीय समाजातील धर्मसंस्था हीसुद्धा एक महत्त्वाची संस्था म्हणून मानली जाते. यामध्ये विविध सण, उत्सव, विधी, कर्मकांड इत्यादींना महत्त्वाचे स्थान असलेली दिसून येते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शैक्षणिक विकास, वैज्ञानिक दृष्टिकोन, बुद्धिप्रामाण्यवाद इत्यादींमुळे धर्मामधील अवास्तव संकल्पना, अनिष्ट परंपरा इत्यादींना सोडून लोक वैज्ञानिकतेचा आधार घेत आहेत.

थोडक्यात, परिवर्तन हा निसर्गनियम मानवी समाजालाही लागू होतो. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी भारतीय समाजातील सामाजिक संस्थांचे स्वरूप आणि स्वातंत्रप्राप्तीनंतर सामाजिक संस्था मध्ये झालेले बदल आपणास स्पष्ट करता येईल. भारतीय समाजामध्ये कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, धर्मसंस्था, अर्थसंस्था, राज्यसंस्था याप्रमाणेच जातीसंस्थाचेही अभ्यास करणे आवश्यक ठरते. तरच भारतीय समाजाचा समग्र अभ्यास होण्यास मदत होईल.

**संदर्भ :**

1.Ahuja Ram (2001) “Research Methods” Rawat Publications: Jaipur
2. Ahuja Ram (2002) “Indian Social System” Rawat Publications: New Delhi
3. Kothari C.R.(2007) “Research Methodology: Methods and Techniques” New Age International Pvt. Ltd. Publications:New Delhi
४.मारुलकर आणि मारुलकर, (२०१४) “भारतीय समाजाची संरचना” फडके प्रकाशन:कोल्हापूर
५.https//www-wikipedia-org

# जाती, वर्गाचा व धर्माचा गरीब लोकांवर होणारा परिणाम

प्रा. एस. के. इंगळे
ग्रंथपालनेहरू महाविद्यालय, नेरपरसोपंत जि. यवतमाळ
मो.नं. ८०८७६०२२८८,ई—मेल :—sureshingle666@gmail.com

**सारांश :—**

मानवी समाजात वेगवेगळ्या प्रकारची विषमता आढळून येते. भारतात सामाजिक आर्थिक धार्मिक सांस्कृतिक राजकीय इत्यादी सर्वच क्षेत्रात विषमता दिसून येते. त्याचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव या देशातील गरीब वर्गावर दिसून येतो. भारतात जातिव्यवस्था असून प्रत्येक जातीचा दर्जा वेगळा आहे. त्यामुळे जातीच्या आधारावर आपल्या देशात मोठ्या प्रमाणात सामाजिक विषमता दिसून येते. या सामाजिक विषमतेमुळे गरीब वर्गावर अनेक प्रकारचे परिणाम आपल्याला दिसून येतात. जाती व्यवस्थेवर आधारित विषमता नष्ट व्हावी म्हणून गौतम बुद्ध पासून तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत अनेक महापुरुषांनी प्रयत्न केलेत. आधुनिक काळात स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मानवतावादी मूल्यांचा स्वीकार करण्यात आला आहे. त्यामुळे भारतीय समाजातील सामाजिक विषमता आज काही प्रमाणात कमी होताना दिसते, पण या जातिव्यवस्थेमुळे या देशातील गरिबांना अनेक संकटांना सामोरे जावे लागत आहे. विषमता म्हणजे भेद किंवा फरक होय आणि ते भेद आणि फरक या देशातील उच्चभ्रू लोकांमुळे समाजात निर्माण झाले. भारतीय समाजव्यवस्था ही प्रामुख्याने वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था यावर आधारित आहे.

**प्रस्तावना :—**

भारतीय जाती व्यवस्था ही भारतीय समाजाची पायाभूत व्यवस्था आहे. प्राचीन भारतात ह्या व्यवस्थेचा विकास झाला आणि ती पुढे मध्ययुगीन काळात, आधुनिक पूर्व काळात आणि आधुनिक काळात बदलत गेली असे मानले जाते. ह्या व्यवस्थेतील मोठी संरचनात्मक स्थित्यंतरे मुघल साम्राज्याच्या काळात आणि ब्रिटिश साम्राज्याच्या काळात झाली आहेत असे मानले जाते. ह्या व्यवस्थेला मात देण्यासाठी आजच्या भारतीय समाजामध्ये राजकीय, शैक्षणिक आणि सामाजिक पातळयांवर आरक्षणाची व्यवस्था निर्माण करण्यात आली.जाती व्यवस्था दोन भिन्न संकल्पनांपासून बनलेली आहे, वर्ण व्यवस्था आणि जाती व्यवस्था वास्तविक पाहता ह्या सामाजिक स्तरीकरणाच्या विश्लेषणासाठी वापरण्यात येणाऱ्या दोन वेगवेगळया पद्धती आहेत.

जात हा मराठी शब्द जण या धातूपासून बनला आहे. त्याचा अर्थ जन्म असा होतो एक प्रकारे जन्माने प्राप्त होणारे समूह म्हणजे जात होय. जाती ला इंग्रजी मध्ये बेंजम म्हणतात. बेंजम इंग्रजी शब्द पोर्तुगीज बेंजं या शब्दावरून बनला आहे. जातीव्यवस्थेचे समाजशास्त्रीय विश्लेषण करताना समाजशास्त्रज्ञ डॉ.बी.आर.आंबेडकर नमूद करतात की जात हा शब्द समान दर्जाचा नाही. जातं समानतेवर आधारित नाही एक जात दुसऱ्या जातीच्या तुलनेत उच्च किंवा कनिष्ठ आहे आणि मधल्या जाती या उच्च जाती पेक्षा कनिष्ठ व मधल्या जाती या कनिष्ठ पेक्षा उच्च आहेत. जाती पद्धत ही श्रेणी पद्धत नसून त्यात उच्च जातीला अग्रक्रम आणि कनिष्ठ जातीला इतरांपेक्षा न्यूनक्रम मिळतो. अशा प्रकारे भारतीय समाजाचे वेगवेगळया जातीत विभाजन झाले आहे.

आर्थिक विकासाच्या प्रगतीमध्ये जातीव्यवस्था एक फार मोठी अडचण आहे. कारण जातीनुसार व्यवसायाची विभागणी केली जाते. व्यक्तीला आवड असो अथवा नसो जातीचा व्यवसाय करणे बंधनकारक मानले जाते तसेच श्रमाचे काम कनिष्ठ जातीच्या लोकांनीच केले पाहिजे अशी धार्मिक बंधन आहे म्हणून उच्च जातीचे लोक विशेष श्रमाचे काम करीत नाही श्रमाला महत्त्व दिले जात नाही म्हणून भारतात आर्थिक विकास होऊ शकला नाही.

भारतात अनेक सामाजिक रूढी आणि परंपरा आहेत त्यांचा विपरीत परिणाम देशाच्या आर्थिक विकासावर होतो. विवाह धार्मिक संस्कार इत्यादी अनुत्पादक गोष्टीवर लोक वायफळ खर्च

करतात. आजही अनेक लोक सामाजिक रूढी परंपरेनुसार वर्तन करतात वैज्ञानिक विचारांचा प्रचार व प्रसार होण्यामध्ये रुढी—परंपरांचा फार मोठा अडथळा निर्माण झाला आहे.

भारतात फार मोठ्या प्रमाणात निरक्षरता हे लोक शिक्षणाला विशेष महत्त्व देत नाही. भारतात अजूनही शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. त्याचप्रमाणे तांत्रिक शिक्षण आणि प्रशिक्षण लोक घेत नाही. म्हणूनच कारखान्यात काम करण्यासाठी कुशल लोकांची कमतरता भासते, औद्योगिक प्रशिक्षण घेणाऱ्या व्यक्तींची संख्या कमी असल्यामुळे आर्थिक विकासात विशेष वृद्धी दिसून येत नाही.

- **उद्दिष्टे :—**

१) जाती,वर्ग आणि धर्माचा गरीबी व मानवी मुल्यांवर होणारा परिणाम शोधणे.
२) जाती, वर्ग आणि धर्मामुळे सामाजिक विकास, गतीशिलता यामुळे गरीबीवर होणाऱ्या परिणामाचा शोध घेणे.
३) जातीभेद व्यक्ती विकासासाठी बाधक आहे अथवा नाही शोधणे.

- **संशोधन पध्दती :—**सदर शोध निबंधासाठी प्रामुख्याने 'द्वितीयक माहिती स्त्रोत' या संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आलेला आहे.

- **मानवी मूल्यांचा अभाव :—**

व्यक्तीच्या सर्वांगीण विकास होण्याकरिता मूलभूत मानवी अधिकार यांची आवश्यकता असते. व्यक्तीला विकास करण्यासाठी स्वातंत्र्य, समान संधी, न्याय या मानवी मूल्यांची गरज असते. जेव्हा समाजात ही मानवी मुल्ये असतात तेव्हा समाजातील प्रत्येक व्यक्तींना विकास करण्याची समान संधी मिळते आणि व्यक्तिगत विकासाबरोबर सामाजिक विकास देखील घडून येतो. परंतु जातीव्यवस्थेत मानवी मूल्यांचा अनादर होतो. आज संपूर्ण जगात मानवतावादाची जोपासना केली जाते. परंतु जातिभेदांमुळे भारतात मानवतावाद रुजू शकला नाही. मानवी मूल्यांचा अभाव असणे हा जातीचा सर्वात मोठा दोष असून जातिभेदांमुळे मानवी मूल्यांच्या अभावाची समस्या निर्माण झाली आहे.

- **समान सामाजिक आणि धार्मिक हक्कांचा अभाव :—**

जातिव्यवस्थेने उच्च जातींना सामाजिक आणि धार्मिक हक्क प्रदान केले. उच्च जातीला काही विशेष धार्मिक अधिकार सुद्धा आहेत परंतु बहुसंख्यांक असलेल्या कनिष्ठ जातीच्या लोकांना मात्र सामाजिक आणि विशेष धार्मिक अधिकारापासून वंचित ठेवले आहे. इतकेच नव्हे तर कनिष्ठ जातीवर अनेक सामाजिक आणि धार्मिक कुप्रथा लादण्याचा प्रयत्न केला. सर्व जाती एकच धर्म असतानादेखील कनिष्ठ जातींच्या लोकांना धार्मिक विधी वैदिक पद्धतीने करण्याचा सुद्धा अधिकार नाकारण्यात आला आहे. आपल्या धर्माच्या लोकांना समान सामाजिक आणि धार्मिक अधिकार नाकारणारा धर्म जगात कुठेही अस्तित्वात नाही परंतु हिंदु धर्माने मात्र जातीच्या आधारावर आपल्या अनुयायांना सामाजिक आणि धार्मिक अधिकार नाकारले आहेत. जातिभेदांमुळे सामाजिक आणि धार्मिक हक्क कनिष्ठ जाती आणि अस्पृश्यतामुळे नाकारण्यात आले.

- **सामाजिक विकासाला बाधक:—**

जातीभेद हा व्यक्तिगत विकासासाठी बाधक आहे त्याचप्रमाणे सामाजिक विकासासाठी देखील बाधक आहे. जाती नियमांचा व्यक्तीवर विशेष प्रभाव असतो. त्यामुळे परंपरा, रूढी, विश्वास आणि संकेताचे निमूटपणे पालन करतात. जाती नियमांच्या वेगळी गोष्ट करायला ते तयार नसतात एकांतर जातीचे संस्कार आणि दुसरी गोष्ट म्हणजे जाती बहिष्कृत करण्याची भीती त्यामुळे नवीन कोणती गोष्ट करण्यास ते तयार नसतात भारतात शक होऊन मुस्लीम आणि इंग्रज आले त्यांनी येथे सत्ता गाजविली पर्यंत जातिव्यवस्थेमुळे तेथील समाज जीवनात विशेष परिवर्तन घडून आले नाही आपल्या देशात नवीन संशोधन झाले नाही त्याचे कारण म्हणजे जातिव्यवस्था व थोडक्यात जातीव्यवस्था ही सामाजिक विकासाला बाधक आहे विशिष्ट कनिष्ठ जाती आणि अस्पृश्यता सामाजिक विकास जाती गेल्यामुळे होऊ शकला नाही.

- **सामाजिक गतिशीलतेचा अभाव :–**

जातीव्यवस्थेत सामाजिक गतिशीलता याचा पूर्णपणे अभाव आढळतो. व्यक्तीला जन्माच्या आधारावर जातीचे सदस्यत्व मिळते आणि जातीनुसार सामाजिक दर्जा मिळतो. कोणत्याही परिस्थितीत व्यक्तीला जात बदलता येत नाही त्यामुळे त्यांच्या सामाजिक दर्जा स्थिर असतो. आपला विकास व्हावा दर्जा बदलावा असे व्यक्तीला कितीही वाटले तरी जातीच्या कडक निर्बंधांमुळे हे शक्य होत नाही. व्यक्तीच्या आवडीनिवडी, विचार, व्यवसाय, स्वातंत्र्य याला जातीव्यवस्थेत कोणतेच महत्त्व नाही त्यामुळे व्यक्तीला आपला व्यवसाय बसविता येत नाही, कोणतीही प्रगती करता येत नाही. जातिभेदांमुळे कनिष्ठ जातीतील बुद्धिवान लोकांनासुद्धा उच्च जातीच्या सामाजिक दर्जा प्राप्त होत नाही. जातिभेदांमुळे कनिष्ठ जातीच्या लोकांच्या विकासाचे आणि गतिशीलतेचे सर्व मार्ग बंद केले आहेत. जात हीप्रगतीची दारे बंद करण्याची व्यवस्था आहे. म्हणून भारतीय समाजात सामाजिक गतिशीलता आढळून येत नाही.

- **आर्थिक विकासाला बाधक :–**

जातीमुळे समाजात श्रमविभाजन घडून आले असे सांगितले जाते. परंतु श्रमविभाजन पारंपारिक आहे कारण हे श्रमविभाजन व्यक्तीच्या गुण आणि कौशल्याच्या आधारावर झालेले नाहीत. काही महत्त्वाची व्यवसाय श्रेष्ठ जातीच्या लोकांना देण्यात आले तर कनिष्ठ व्यवसाय कनिष्ठ जातीवर लादण्यात आलेत. जातिभेदांमुळे कनिष्ठ जातीतील बुद्धिवान व्यक्तींना उच्च जातीचे चांगले व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य नाकारण्यात आले. व्यवसायाची निश्चिती जातीच्या आधारावर करण्यात आली. त्यामुळे समाजात धार्मिक स्पर्धेचा पूर्णता अभाव आहे आर्थिक विकास होऊ शकला नाही.

- **जातीवाद :–**

प्रत्येक व्यक्तीचे सामाजिकीकरण हे त्यांच्या जातीनुसार होत असते. उच्च जातीचे लोक स्वत:ला श्रेष्ठ समजतात आणि कनिष्ठ जातीच्या लोकांना तुच्छ मानतात. व्यक्तीच्या निष्ठा त्या त्यांच्या जातीपुरता मर्यादित असतात. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला आपल्या जातीचा अभिमान वाटतो. व्यक्ती आपल्या जातीच्या हिताचाच विचार करते. त्यातूनच जातिवाद निर्माण होतो. आज भारतीय शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय इत्यादी सर्व क्षेत्रात जातीयवाद बोकाळला आहे जातिभेदांमुळे जातीवादाची एक ज्वलंत समस्या निर्माण झाली आहे.

- **राष्ट्रीय एकतेस बाधक :–**

जातिव्यवस्थेमुळे देशातील लोकांचे शेकडो जाती मध्ये विभाजन झाले आहे. जातीमुळे व्यक्ती आपल्या जाती पुरताच मर्यादित होतो. व्यक्तीला आपल्या जातींचा समूह हाच महत्त्वाचा वाटतो. त्यामुळे उच्च जातीचे स्वतंत्र्य समूह निर्माण झाले व त्यांच्यापेक्षा कनिष्ठ जाती मर्यादित राहिल्या. जातिभेदांमुळे त्यांच्या राष्ट्रीय भावनेचा विकास होऊ शकला नाही म्हणून आपल्या देशात राष्ट्रीय एकतेचा अभाव दिसून येतो.

- **उच्च जातीची हुकूमशाही :–**

जातीव्यवस्थेची निर्मिती प्रामुख्याने उच्च जातीच्या हितांचे रक्षण करण्यासाठी झाली आहे. जातिव्यवस्था हे उच्च जातीच्या सुरक्षिततेची हमी आहे. म्हणूनच उच्च जातीच्या हिताचे अनेक नियम आहे तर कनिष्ठ जातीच्या लोकांनी कधीच प्रगती करू नये त्याची उच्च जातीचे गुलाम बनून राहावे म्हणूनच त्यांच्यावर अनेक निर्बंध केवळ जातिभेदांमुळे लादण्यात आले. तर उच्च जातीच्या लोकांचे गुलाम बनून राहावे तश्या प्रकारची कायम व्यवस्था जातीव्यवस्थे द्वारे निर्माण करण्यात आली त्यामुळे या देशात गरिबी निर्माण झाली.

- **जातीचा संघर्ष :–**

सर्व जातींचा दर्जा समान नाही ज्या जाती उच्च आहेत त्या जातींच्या लोकांना आपल्या उच्च जातीचा अभिमान असतो आणि कनिष्ठ जातीच्या लोकांविषयी वेगळी भावना असते. कनिष्ठ जातीच्या लोकांवर ते सतत अन्याय करतात त्याची वारंवार अवहेलना केली जाते. उच्च जातीचे लोक आपल्यावर अन्याय करतात हया भावनेमुळे कनिष्ठ जातींच्या लोकांमध्ये असंतोष निर्माण होतो. भारतात जाती संघर्ष शेकडो वर्षापासून आढळतो त्याचे उदाहरण सुद्धा आपल्याला दिसतात

म्हणूनच आपल्या देशात गरिबांवर होणारे अन्याय, गरीब म्हणजेच या देशातले कनिष्ठ जातीचे लोक कारण वरिष्ठ जातीच्या लोकांनी कनिष्ठ जातीच्या लोकांना कधीच वर येऊ दिले नाही म्हणून या देशात गरीब जातींच्या लोकांवर जातिभेदांमुळे, धर्मामुळे अन्याय होताना दिसून येते.

अशाप्रकारे जाती, वर्ग आणि धर्माचागरीबीवर मोठया प्रमाणात परिणाम दिसून येतो. अनेक सामाजिक प्रश्न जातिभेदांमुळे निर्माण झालेले दिसतात आणि यामुळेच अनेक सामाजिक,सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय आणि राष्ट्रीय समस्या निर्माण झाल्या आहेत. जातीव्यवस्था आणि त्या अनुषंगाने निर्माण झालेले जातिभेद हा अनेक सामाजिक समस्यांची जननी आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. शेकडो वर्षापासून हिंदू धर्माची जातीव्यवस्थेला असलेली मान्यतेमुळे या देशात गरिबांवर अनेक प्रकारचे परिणाम झालेले आपल्याला दिसून पडते.

**संदर्भ ग्रंथ :—**

१)आगलावे प्रदीप भारतीय समाज:प्रश्न आणि समस्या साईनाथ प्रकाशन,नागपूर.प्रथम आवृत्ती :—जुलै २००९
२) देवगावकर एस. जी. सामाजिक चळवळी : परंपरागत आणि नवीन साईनाथ प्रकाशन,नागपूर. प्रथमावृत्ती :— नोव्हेंबर २००९
३)शहा घनश्याम भारतीय सामाजिक चळवळी डायमंड पब्लिकेशन, पुणे.प्रथमावृत्ती :— २००८
४)भिडे जी. एल. /पाटील एन.डी. महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास फडके प्रकाशन, कोल्हापूर.प्रथमावृत्ती :— १९९५
५)मुणगेकर श्री.गं.परिवर्तनाचे प्रवाह महाराष्ट्र सकाळ, सुवर्णमहोत्सव प्रकाशन.प्रथमावृत्ती :— १९८२

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# भारतीय समाजावर जातीचा परिणाम
# (The Impact of Caste on Indian Society)

डॉ. हनुमंत हि. मिसाळ
प्राध्यापक, .समाजशास्त्र विभाग प्रमुख,मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर.

**गोषवारा :**

माणसाला माणूस म्हणून वागवण्याचे सांस्कृतिक मूल्य जात व्यवस्थेने रुजवले नाही. जाती व्यवस्थेने जे लोक सामाजिक, आध्यात्मिकदृष्ट्या सकारात्मक होते, त्यांना सांस्कृतिकदृष्ट्या मागास म्हणून हिणवण्यात आले, तर उलट जे लोक सांस्कृतिकदृष्ट्या नकारात्मक विचारसरणीचे होते, त्यांना मोठे विद्वान म्हणून मान्यता मिळाली. खरे तर जातव्यवस्था हा अध्यात्मिक फॅसिस्टझम आहे. जसे की या फॅसिस्टझमने गणपती तुटलेले मुंडके बसवले गेले, पण एकलव्याचा छोटासा तुटलेला अंगठा मात्र बसविण्यात आला नाही. म्हणजेच जात व्यवस्थेच्या या संरचनात्मक नकार प्रक्रियावादातून धर्म, विवाह, राजकारण, अर्थकारण, इतिहास, व्यवसाय, व्यक्ती आणि समाज, राष्ट्रीय एकात्मता, महिला, बालके, सामाजिक न्याय, आरक्षण, सामाजिक माध्यमे, शिक्षण, विज्ञान, आंतरराष्ट्रीय संबंध इत्यादी सर्व घटकांवर दूरगामी विघटनात्मक असे परिणाम झाले आहेत. त्यापैकी काही मोजक्या घटकांवर जातीव्यवस्थेने केलेल्या परिणामाचा संक्षिप्त आढावा या शोध निबंधातून घेण्यात आला आहे. सदर शोध निबंध दुय्यम तथ्यावर आधारित आहे.

**प्रस्तावना :**

कोणत्याच माणसा—माणसांमध्ये भेद—भाव, श्रेष्ठ—कनिष्ठत्व, उच्च—निच असे अंतर नसलेली समताधिष्ठित मानवगौरव असणारी समाजव्यवस्था असावी हे प्रत्येक समाजाचे स्वप्न असते. वास्तवात हे कधीही पूर्ण न होणारे दिवास्वप्नच ठरते. कारण समाजातील सर्व व्यक्ती वा समूह एकाच पातळीवर समान कधीच असत नाहीत. परिणामी 'विषमता' हे प्रत्येक समाजाचे वैशिष्ट्ये समजावे लागेल. या विषमतेला आधारभूत मानून प्रत्येक समाजात सामाजिक स्तरीकरण व्यवस्था निर्माण झालेली असते. या व्यवस्थेमुळे सामाजिक स्तरीकरण ही संकल्पना माणसा—माणसातील श्रेष्ठ—कनिष्ठ विभागणी दर्शवणारा भेद—दर्शक 'स्तर' बनली. अर्थातच हे भेदाचे स्तर कधी नैसर्गिक तर कधी मानवनिर्मित असतात. नैसर्गिक स्तराला फार तर विकेंद्रीकरण म्हटले जावू शकते, परंतु जेव्हा या विकेंद्रीकरणाला श्रेष्ठत्व आणि कनिष्ठत्वाची जोड दिली जाते, तेव्हाच खऱ्या अर्थाने 'स्तरीकरण' निर्माण होते. म्हणूनच रेमंड मूर यांनी ''उच्च व कनिष्ठ अशा सामाजिक घटकांमध्ये झालेली समाजाची समतल विभागणी म्हणजे स्तरीकरण म्हटले आहे. सदर स्तरीकरण बंद स्तरीकरण व मुक्त स्तरीकरण या दोन वर्गवारीत दिसून येते. त्यापैकी बंद स्तरीकरणाचे द्वार जाती व्यवस्थेत तर मुक्त स्तरीकरण हे वर्ग व्यवस्थेत उघडते. अर्थातच बंद स्तरीकरण उर्ध्वगामी गतिमत्त्वाला संधी नाकारते. परिणामी या आधारावर झालेली समाजाची विभागणी त्या समाजावर दूरगामी समस्यात्मक परिणाम करणारी ठरते.

भारतीय समाजाचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणून जातीचा उल्लेख केला जाते. भारतीय समाज वेगवेगळ्य जाती—उपजातीमध्ये विभागला गेला आहे. साधारणपणे २०३७८ जाती—उपजातींचे गट भारतीय समाजात आढळतात. जन्माच्या आधारावर ठरणारा दर्जा व त्या दर्जाची श्रेष्ठ — कनिष्ठ तत्त्वावर केलेली विभागणी याला जातीव्यवस्था म्हणतात. जातीद्वारे व्यक्तीला अर्पित दर्जा आपोआल म्हणजे जन्माद्वारे मिळतो व ती व्यक्ती मरेंपर्यंत कायम रहतो. थोडक्यात जातीव्यवस्था हे भारतीय समाजाचे अनन्यसाधारण वैशिष्ट्ये असल्याने व याच जाती वैशिष्ट्यने भारतीय समाजावर दूरगामी परिणाम केले आहेत. त्यासाठी भारतीय समाजाला समजून घेण्यासाठी जात आणि त्या आधारावर निर्धारित जातीव्यवस्था समजून घेणे अपरिहार्य आहे. हीच अपरिहार्यता लक्षात घेवून अनेक भारतीय समाजशास्त्रज्ञांनी जाती व्यवस्थेचा अभ्यास केला आहे. ज्यामध्ये फुले, डॉ. केतकर, डॉ. आंबेडकर, डॉ, धुर्ये, हअन, रिजले यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. या समाजशास्त्रज्ञांनी

जातीचा अभ्यास करुन जो जातीचा अर्थ प्रतिपादन केला आहे, त्यामध्ये प्रा. कुलेंनी म्हटले आहे की, ''जेव्हा वर्ग आनुवंशिकतेच्या तत्त्वावर आधारलेला असतो, तेव्हा त्याला आपण जात म्हणू शकू.'' तर मुजुमदार आणि मदन म्हणतात की, ''जाती म्हणजे एक बंद वर्ग आहे.'' तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर नमूद करतात की, ''बर्हिगत विवाहबंधनावर अंतर्गत विवाहबंधनाचे वर्चस्व प्रस्थापित होणे म्हणजे जात होय.'' जात हा एक बंद मार्ग आहे.'' यावरुन समाजाचे खंडात्मक विभाजन, सोपान परंपरा, रोटी व्यवहार व सामाजिक निर्बंध, विवाहावरील निर्बंध, व्यवसाय निवडीला प्रतिबंध, सामाजिक व धार्मिक हक्क— विन्मुखता व विशेषाधिकार ही जातींची वैशिष्टे प्रकर्षाने स्पष्ट होतात.

जातिनिष्ठा हे हिंदू समाजाचे जगावेगळे लक्षण आहे. जातीशिवाय हिंदू नाही आणि हिंदूशिवाय जात नाही. जात म्हणजे जीवन, जात म्हणजे सर्वस्व, जातीशिवाय स्वत्व नाही. जातीशिवाय पूर्णत्व नाही. ख्रिस्ती असाल तर बायबल वाचण्याची गरज, मुस्लिम असाल तर कुराण वाचण्याची गरज, परंतु हिंदू असाल तर कोणताही धर्मग्रंथ वाचण्याची गरज नाही. नुसता जातीधर्म पाळला की पुरे. जातिधर्म पाळला की तो झाला शंभर नंबरी हिंदू. जातिधर्म म्हणजे तरी काय? कुणाला स्पर्श करायचा आणि कुणाला स्पर्श करायचा नाही, कुणाच्या हातचे अन्न खायचे आणि कुणाच्या हातचे अन्न खायचे नाही, कुणाच्या हातचे पाणी प्यायचे व कुणाच्या हातचे पाणी प्यायचे नाही, कुणाबरोबर लग्न करायचे व कुणाबरोबर नाही, या संबंधीच्या नियमांची गोळाबेरीज म्हणजे जातिधर्म. हा जातीधर्म पाळला की सर्व काही मिळविले आणि तो पाळला नाही, तर सर्व काही बुडविले. जात बुडणे म्हणजे धर्म बुडणे, धर्म जगवायचा असेल तर जात जगविली पाहिजे, असा विचार तो हिंदू. जातिव्यवस्थेचे निर्माते आहेत ब्राह्मण. समाजामध्ये ज्यांना ज्येष्ठ स्थान लाभलेले असते, त्यांच्या कृतीचे अनुकरण कनिष्ठ वर्गाने करावे. मनुस्मृती धर्मग्रंथामध्ये या बाबत विस्तृत नियमावली व आचारसंहिता स्पष्ट केलेली आहे. ब्राह्मणांनी आपल्या अंगणात प्रथम जातीचे झाड लावले व नंतर ब्राह्मणेत्तरांनी त्याची एक एक फांदी आणून आप—आपल्या दारात लावली व पहाता—पाहता जातीचे एक प्रचंड जंगल उभा राहिले. म्हणूनच भारतीय समाजव्यवस्थेचा पाया जात असून जात ही एक हिंदू धर्म आणि हिंदू संस्कृतीची निपज आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे. जातीव्यवस्थेत चढत्या क्रमाचा द्वेष आणि उतरत्या क्रमाचा अवमान आहे. जात ही एखाद्या संपूर्ण राष्ट्रसारखी आहे. राष्ट्रामधल्या लोकांना जसा आपल्या राष्ट्राविषयी अभिमान वाटत असतो, तसा जातीमधल्या लोकांना आपल्या जातीविषयी अभिमान वाटत असतो. जातीचे एकत्रिकरण हे लहान—मोठ्या राष्ट्राच्या एकत्रिकरणासारखेच असते. काहीजन असा दावा करतात की, जात हे रक्त आणि वंश ठेवण्याचे साधन आहे. परंतु मानववंशशास्त्रज्ञांचे स्पष्ट मत आहे की, जगात एकही वंश शुद्ध राहिलेला नाही. कारण बदलत्या काळचक्रात सर्व वंशात भेसळ झाली आहे. डॉ. आंबेडकरांनी याबाबत डॉ. भांडारकर यांचे विधान संदर्भ मानला आहे. भांडारकर म्हणतात की, परकीय रक्ताचा शिरकाव झाला नाही अशी जात किंवा वंश भारतात शिल्लक नाही. क्षत्रिय रक्तामध्ये परकिय रक्त तर मिसळलेले आहेच, पण ब्राह्मण रक्तही शुद्ध राहिलेले नाही. त्यांच्यातही परकीय रक्ताचा प्रवेश झाला आहे. तरीही जातीचा मिथ्या अभिमान शिगेला आहे. विशेष म्हणजे बदलत्या काळात शिक्षणाचा प्रकार, विज्ञानाचा विकास व पुरोगामी चळवळी मोठ्या प्रमाणात विकसित झाल्या आहेत, परंतु या गोष्टीचा 'जाती' नष्ठ होण्याच्या दिशेने होत असलेला प्रवास तितकाच निराशाजनक आहे. उलट जातीमध्ये रोगाच्या विषाणूसारखी बदलत्या परिस्थितीमध्ये स्वत:मध्ये अनुकूल बदल करुन घेण्याची क्षमता निर्माण झाली आहे. ज्याचा परिणाम म्हणून समाजव्यवस्थेत जाती आपले अढळ आणि दृढ स्थान अबाधित ठेवण्यासाठी यशस्वी ठरत आहेत. या सर्व जाती वस्तूस्थितीचा दार्शनिक परिणाम म्हणजे जातीव्यवस्थेने हिंदू समाजाचे विघटन केले आहे, त्याला दुर्बल केले आहे. हिंदू धर्माच्या दृष्टीने हे कार्य निश्चितच विधायक नाही. कारण यामुळे भारतात 'हिंदू समाज' नावाची कोणतीही गोष्ट अस्तित्वात नाही. प्रत्यक्षात हिंदू समाज म्हणून इथे उरलेत फक्त जातीचे समूह व त्यांना केवळ स्वत:च्या अस्तित्वाचे भान उरले आहे. परिणामी एक जाती समूह दुसऱ्या जातीसमूहापासून सुरक्षित अंतर वा दुरावा राखण्याची दक्षता वा काळजी घेत आहे. अशा स्थितीत एक—दुसऱ्या जातीसमूहामध्ये परस्परात संयुक्ततेची, एकात्मतेची, विश्वासाची, स्नेहाची, प्रेमाची भावना लुप्त झाली आहे. कारण मनुष्य जेव्हा आपली माणसे,

ISSN : 2278-9308
July 2021

आपले लोक असा उल्लेख करतो तेव्हा त्याचा अर्थ आपल्या जातीतील लोक एवढाच असतो. याचा शुद्ध अर्थ असा की, 'लोक' या शब्दाची व्याप्ती 'आपल्या जातीतील लोक' एवढीच शिल्लक उरली. या जातीव्यवस्थेत पात्रता वा लायकीला किंमत नाही. गुणवंताना स्थान नाही. थोडीफार परोपकार बुद्धी आहे, पण तिलाही जाती मर्यादेची मजबूत चौकट आहेच. दुसऱ्या जातीचा पुढारी कितीही मोठा असू द्या, कितीही विवेकी व सद्‌गुणी असू द्या, परंतु त्याला किंमत नसते. कारण पुढारी आपल्याच जातीचा असला पाहिजे यावर सगळे दक्ष असतात. यासाठी प्रत्येकाची जातीसाठी माती खाण्याची मानसिकता दृढझालेली असते. त्यामुळे डोळे मिटून समर्थन की असमर्थन एवढाच पर्याय बाकी असतो. याचा अर्थ असा की आपल्यापुढील आदर्श योग्य की अयोग्य याची चिकित्सा केवळ त्याच्या परिणावरूनच करता येणे शक्य आहे. हा धागा पकडून डॉ. आंबेडकर म्हणतात की, ''चातुर्वर्ण्य व्यवस्था प्रशंसा करण्याजोगी व्यवस्था नाही. कारण या व्यवस्थेमध्ये आदर्श तत्त्व असते, तर हिंदू समाजाचे विघटन झालेच नसते.'' त्यामुळे संक्षिप्त स्वरूपात एखाद्या मनुष्य समूहाला वेगळे आणि एकटे पाडण्याचा रानटी प्रकार म्हणजे जातीव्यवस्था होय. (परिणामी या जाती व्यवस्थेचा भारतीय समाजावरील काही घटकावर कसा विपरीत परिणाम झाला आहे हे पाहणे तितकेच महत्त्वपूर्ण आहे. पुढील मुद्यांच्या अधोरेखित करून जातीचा भारतीय समाजव्यवस्थेवरील परिणाम स्पष्ट करता येईल.)

केवळ द्विजांनाच हिंदू असे संबोधणे आणि उरलेल्यांची शूद्र, चांडाळ, वनवासी हे सर्वजन 'इतर' (मात्र हिंदूत्वातच अंतर्भूत) म्हणून गणना करणे ही ऐतिहासिकदृष्ट्या एक विघातक प्रक्रिया आहे. जात व्यवस्थेने उच्चवर्णीय विचारसरणीच्या शब्दसंग्रहात परस्परविरोधी द्वैताची सकारात्मक आणि नकारात्मक, उच्च आणि नीच अशी मांडणी झाली आहे. 'उच्च—नीच' आणि 'दैवी—पाखंडी' अशा संकल्पनामुळे दलित—बहुजनांची माणूस म्हणून असणारी ओळख हिरावून घेतली जाते. सांस्कृतिक दरोड्याची ही पद्धत वस्तूंच्या अथवा मालाच्या लूटीपेक्षा अधिक धोकादायक आहे. उच्च—जातीय हिंदूच्या अशा नमुनेदार नकारात्मक, वृत्तीतून आदिम समूहांची देखिल 'वनवासी' आणि 'गिरीजन' अशी वर्गवारी करण्यात आलेली दिसून येते. खरे तर अशाप्रकारचे नकारात्मक नाव स्वीकारणे ही मूक सहनशीलता होय. त्यामुळे अशा प्रकारची सहनशीलता स्वीकारणे जातीव्यवस्थेचे मुख्य वैशिष्ट्ये बनले आहे. परिणामी सर्व हिंदू ग्रंथांमधून फक्त ब्राह्मणी शक्तीची अध्यात्मिक फॅसिस्ट प्रवृत्तीच प्रतिबिंबित होत असते. याचा अर्थ माणसाला माणूस म्हणून वागण्याचे सांस्कृतिक मूल्य हिंदूत्वाने आपल्या अनुयायामध्ये रूजवलेले दिसत नाही. जाती व्यवस्थेत जे लोक सामाजिक, आध्यात्मिकदृष्ट्या सकारात्मक होते, त्यांना सांस्कृतिकदृष्ट्या मागास म्हणून हिणवण्यात आले, तर उलट जे लोक सांस्कृतिकदृष्ट्या नकारात्मक विचारसरणीचे होते त्यांना मोठे विद्वान म्हणून मान्यता देण्यात आली, खरे तर हा आध्यात्मिक फॅसिस्टझम आहे. जो हिंदू धर्म ग्रंथात जातीव्यवस्थेच्या समर्थनाने प्रदर्शित होतो. जात व्यवस्थेच्या या संरचनात्मक प्रक्रियावादातून धर्म, विवाह, राजकारण, अर्थकारण, इतिहास, व्यवसाय, समाज, एकात्मता, राष्ट्रीय अखंडता, स्त्रिया, बालके, सामाजिक न्याय, आरक्षण, सामाजिक माध्यमे, शिक्षण, विज्ञान, आंतरराष्ट्रीय संबंध, व्यक्तींची जीवन पद्धती, सामाजिक संबंध व्यक्तीगत जीवन या सर्व घटकांवर दूरगामी परिणाम झाले आहेत.

**१ .जातीचा स्त्रियांवर परिणाम :**

तसे पाहता जगातील सर्व धर्मग्रंथात स्त्रियांचे स्थान दुय्यम आहे. परंतु हिंदू धर्मातील मनुस्मृतीने स्त्रियांच्या बाबतीत घेतलेली भूमिका कमालीच्या असंस्कृतपणाची आहे. जाती व्यवस्थेमध्ये स्त्रिला स्वातंत्र्याचा अधिकार नाही. परिणामी जातीमुळे स्त्रियांना कधीच न्याय मिळाला नाही, स्त्रियावर लादलेले निकृष्ठ जीवन हे भारतीय समाजाच्या जाती निकृष्टतेचे व त्यांच्या दुरावस्थेचे एक महत्त्वाचे कारण आहे. हिंदू धर्मामध्ये मुळात स्त्रीला देवता मानले आहे. पण नंतरच्या काळात तिला दासीचे स्थान दिले गेले. यामधील नेमके सत्य काय आहे हे नीट समजून घेतले पाहिजे. त्यासाठी संस्कृत धर्मग्रंथाचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. कारण आपल्या चालीरीती, रूढी आणि जातीप्रथा यांना हे धर्मग्रंथच आधारभूत आहेत. या सर्वांकडे 'संस्कृती जपणे' असे उदात्त नाव दिले आहे. वर्ग, जाती, वंश यांच्या जोडीला लिंगभेद, पुरूषी वर्चस्व हा या मूल्यव्यवस्थेचा अपरिहार्य भाग आहे. त्याचा फायदा घेवूनच स्त्रियांचे नियमितपणे शोषण होत

ISSN : 2278-9308
July 2021

राहिले व पुरूषांचा विकास होत राहिला. संपत्ती, शिक्षण, राजकारण अशी सर्वच साधने पुरूषांच्या हाती राहिली. कर्तव्य, नैसर्गिक धर्म, कौटुंबिक स्वास्थ्य, मातृत्व, प्रेम या गोंडस नावाखाली स्त्रीया स्वत:चे दुय्यम स्थान स्विकारू लागल्या व त्यातच आपणी सार्थकता मानत राहिल्या. यांतून स्त्रियांचे पंख पद्धतशीर कापले जावून त्यांना अबला बनविले गेले व तिची स्वत्वाची भावना नष्ट केली गेली. उच्च जातीतील महिलांना कौटुंबिक चौकटीमध्येच ठेवले गेले. कारण जातीची शुद्धता कायम ठेवण्यासाठी ही चौकट महत्त्वाची होती. अशा स्त्रीने लिंगाधारित कल्पनेतील विचारधारेमध्ये मानहानीकारक घटकांची भर घातली गेल्याने महिलांचे स्थान अधिकच खालावले. भारतातली समाजरचना मोठी विचित्रच आहे. जेथे जशी जातीची उतरंड आहे, तरी शोषणाचीही उतरंड आहे. ब्राह्मण, बनिया जातीत जन्माला आलेली स्त्री आपल्या जातीत शोषित असते यात शंका नाही. परंतु तिचा जातीय दर्जा वरचा असल्याने खालच्या जातीतील स्त्रीपुरूषांचे शोषण करण्यात तिच्या जातीतील पुरूषाइतकाच तिचाही सहभाग असतो. तेली, माळी, कुणबी, यासारख्या जातीतील स्त्री आपल्या जातीत पीडित असते. शिवाय ब्राह्मण, बनिया जातीतील स्त्री—पुरूषांच्या शोषणालाही ती बळी पडलेली असते. एकिकडे ही स्थिती असते, तर दुसरीकडे ती महार, मांग, चांभार यासारख्या जातीतील स्त्री—पुरूषांच्या शोषणात आपल्या जातीतील पुरूषांची बरोबरी करीत असते. महार, मांग, चांभार या अगदी तळाच्या जाती. कारण त्यांच्यापेक्षा कनिष्ठ कोणी नसल्यामुळे त्यांना शोषण करायला वाव नाही. वाव असता तर त्यांनीही खालच्या जातीतील स्त्री—पुरूषांच्या शोषणयंत्रणेची भली मोठी इमारत तिच्या डोक्यावर उभी असती. अशी गुंतागुंतीची समस्या या देशात जातीव्यवस्थेने निर्माण केली आहे.

भारतीय स्त्रीच्या माथी पुरूषी शोषण, अर्थव्यवस्थेतील आणि राज्यव्यवस्थेतील असमान संधी, एवढेच प्रश्न आले नाहीत, तर जगात कुठे नाहीत अशा अनेक प्रश्नांनी तिला चक्रावून सोडले आहे. जसे की सत्तीचे वैधव्य, बालविवाह, सतिप्रथा हे प्रश्न इतरत्र दिसत नाहीत. पुरूषी आणि जात व्यवस्थेने भारतामध्ये स्त्रीच्या शिक्षणाची हेळसांड केली एवढेच नव्हे तर स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकारच नाही असे नितीनियम आणि तेही धर्माच्या नावाखाली भारताशिवाय इतरत्र कुठेही जन्माला आले नाहीत. भारतीय स्त्रीला अशाप्रकारे धार्मिक, जातीय व्यवस्थेने पूर्ण जखडून टाकले आहे.

**२)जाती व्यवस्थेचा व्यक्ती व समाज यांच्यावर होणारा परिणाम :**

अलिकडे जातिविहीन समाजरचनेचा पुरस्कार करणारे तत्त्वज्ञान निर्माण होत आहे, व्यक्ती आणि समाज हे या तत्त्वज्ञानाचे जिव्हाळ्याचे विषय आहेत. कारण खऱ्या अर्थाने व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण ही लोकशाही आणि व्यक्तीस्वातंत्र्य याच पायावर भक्कमपणे उभी राहू शकते हे वास्तव आहे. त्यासाठी व्यक्तीला पुढे येण्याची पूर्ण संधी मिळाली पाहिजे. कारण व्यक्तीचा विकास झाला तरच राष्ट्राचा विकास शक्य आहे. त्याकरीता देशातल्या प्रत्येक व्यक्तीस राष्ट्रविकासाच्या कार्यात सहभागी होण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. देशातील प्रत्येक व्यक्ती ही राष्ट्राची शक्ती आहे. परिणामी तिला पुढे येण्यास कोणतेही धार्मिक अथवा सामाजिक बंधने यांचा गतिरोध असता कामा नये, यातूनच खऱ्या अर्थाने राष्ट्राची प्रगती होवू शकते. या विकास प्रक्रियेतूनच सामान्य मानसामधूनच मोठी माणसे निर्माण होत असतात. उदा. चांभाराचा धंदा करणारा स्टॅलीन, घिसाड्याचे काम करणारा लेनिन, कांदे—बटाटे विकणारा मॅक्डोनाल्ड, जगात कचरीत काम करणारा हिटलर यासारखे लोक सामान्यांमधूनच उदयास आले. प्रत्येक व्यक्तीला नागरिक म्हणून हक्क असले पाहिजेत असा डॉ. आंबेडकरांचा आग्रह होता. वैयक्तिक स्वातंत्र्य, वैयक्तिक संरक्षण, मालमत्ता बाळगण्याचा अधिकार, कायद्यापुढील समानता, सद्सद्विवेकबुद्धीला अनुसरून वागण्याची मोकळीक, भाषण स्वातंत्र्य, सभा भरविण्याचा अधिकार, देशाच्या राज्यकारभारात प्रतिनिधी पाठवण्याचा हक्क आणि सरकारी नोकरी मिळविण्याचा हक्क प्रत्येक व्यक्तीचा अधिकार असला पाहिजे. व्यक्तीचा शेवट व्यक्तीमध्येच झाला पाहिजे आणि व्यक्तीचा व व्यक्तिमत्त्वाचा विकास हेच समाजाचे उद्दिष्टे असायला हवे. कारण व्यक्ती ही केवळ भौतिक वस्तू नव्हे, तर बुद्धी आणि इच्छा धारण करणारी ही जैविक बाब आहे. ज्ञान आणि प्रेम यासारख्या अनमोल गोष्टी व्यक्तीत एकजीव झालेल्या असतात. व्यक्ती विश्वाबरोबर संबंधित असते. किंबहुना ती स्वत;ही एक संपूर्ण विश्व

असते. परंतु हिंदू समाजात व्यक्तीला 'व्यक्ती' म्हणून जातीप्रथेमध्ये असलेले महत्त्व शून्य आहे. कारण पात्रता—अपात्रता ही जातीव्यवस्थेने व्यक्तीवर लादलेली असते.

माणसे एका मनाची झाल्याशिवाय समाज निर्माण होत नाही आणि एकमेकाशी मोकळा व्यवहार केल्याशिवाय एका मनाची माणसे तयार होत नाहीत. अन्यथा वेगळेपणा जोपासल्याने माणसे दुभंगली जातात. भारतीय समाजात जातीव्यवस्थेने नेमका हाच माणसामाणसातील दुरावा निर्माण केला आहे. परिणामी जातीव्यवस्था समाजनिर्मितीच्या मार्गातील मोठी भिंत म्हणून उभी आहे. हिंदू समाजव्यवस्थेतील व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व पराभूत केले. अगदी शुल्लकही महत्त्व व्यक्तीला दिले गेले नाही, जातीव्यवस्थेजवळ भयंकर असे बहिष्काराचे अघोरी शस्त्र आहे. या शस्त्राचा वापर करून या व्यवस्थेने भल्याभल्यांना वठणीवर आणले. डॉ. आंबेडकर तर म्हणतात की, 'सरकार करू शकत नाही एवढा अत्याचार करण्याचे सामर्थ्य या बहिष्काराच्या हुकमात आहे. समाजाच्या अस्तित्वासाठी समाजबंधने आवश्यक असली तरी व्यक्तीच्या विकासाला ही बंधने बाधक ठरत नाहीत. जोपर्यंत समाजाचे मत आणि व्यक्तीचे मत यात समानता असते तोपर्यंत वाद उत्पन्न होत नाही. परंतु जेव्हा समाजाच्या मनात आणि व्यक्तीच्या मनात भिन्नता डोके वर काढू लागते तेव्हा मात्र गोंधळ सुरू होतो. भारतीय जातीप्रथेने अशा प्रकारचा व्यक्ती आणि समाज यांच्या भिन्नतेचा गुंता आणि प्रचंड गोंधळ माजवला आहे.

**३.जातीव्यवस्था आणि आरक्षण :**

जातीप्रधान समाजरचनेमध्ये जातीजातीत दुरावा आणि जातीजातीत द्वेषभाव ही अपरिहार्य गोष्ट आहे. जातीव्यवस्थेत वरची जात खालच्या जातीला मागे रेटण्याचा प्रयत्न करीत असते. त्यामुळे मागच्या जाती मागेच राहतात आणि पुढच्या जाती वेगाने पुढे निघून जातात. याच स्थितीमुळे भागीदारीचा लढा निर्माण झाला. त्यातूनच शासन—प्रशासनात जातीजातीला प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे या मागणीने जोर धरला. खरे तर हा लढा आजही संपलेला नाही कारण आजही ब्राह्मण जात मोठ्य प्रमाणात शासकीय नोकऱ्यातील जागा मिळवून पुढे आहे. गोलमेज परिषदेत बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, प्रशासनात कोणत्याही एका जातीची एकाधिकारशाही असणे ही गोष्ट अहितकारक आहे. तो एक फार मोठा धोका आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुढे म्हणाले की, प्रशासनात प्रत्येक वर्गाचे प्रतिनिधी असले पाहिजेत. त्याशिवाय प्रशासन नि:पक्षपाती होणार नाही.'' डॉ. बाबासाहेबांनी प्रशासनात अस्पृश्यांना भागीदारी मिळावी असा नेहमीच आग्रह धरला. एवढेच नव्हे तर पोलीस, सैन्यदल यांच्यामध्येही अस्पृश्यांना प्रवेश मिळावा अशी वेळोवेळी मागणी केली. बाबासाहेब आंबेडकरांची आरक्षणासंदर्भात जी भूमिका होती तिच भूमिका त्यांच्या अगोदर राजर्षी शाहू महाराजांनी घेतली होती. एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष त्याची अंमलबजावणीदेखील केली होती. जसे की कोल्हापूर संस्थानात सरकारी नोकऱ्यात ५० टक्के जागा मागासवर्गीयांसाठी राखून ठेवणारा हुकूमनामा छत्रपती शाहू महाराजांनी २६ जुलै १९०२ रोजी काढला आणि नव्या इतिहासाला सुरूवात केली. महाराजांनी आपल्या राज्यातील नोकऱ्यात हळूहळू मागासवर्गीयांची भरती सुरू केली आणि मागासवर्गीयांचे ठकळ अस्तित्व सरकार दरबारात निर्माण केले. खरे तर सामाजिकदृष्ट्य मागासलेल्या जातींसाठी शैक्षणिक, राजकीय व नोकऱ्या विषयक आरक्षणाची तरतूद आहे. ही तरतूद दुसरे तिसरे काही नसून सामाजिक न्यायाची तरतूद आहे. परंतु अलिकडे जाती आणि आरक्षण हा प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचा बनला आहे. कारण काही जाती प्रवर्ग हे आरक्षणाला दारिद्र्य निर्मूलनाचे साधन समजत आहेत. आरक्षण हा दारिद्र्य निर्मूलनाचा पर्याय असूच शकत नाही, परंतु काही जाती प्रवर्गांना याबाबत पूर्ण जाणीव असूनही ते आर्थिक मागासलेपणाचे कारण सांगून नव्याने स्वत:च्या जातीसाठी आरक्षणाची मागणी जोरदारपणे करत आहेत. त्यामुळे आरक्षण हा सामाजिक न्यायाचा मुद्दा भरकटवून तिसरीकडे वळत आहे. ज्यातून समाजात नवा पेचप्रसंग व सामाजिक दुही निर्माण झाली आहे. दुसरे म्हणजे ज्या मागास प्रवर्गांना घटनात्मक आरक्षण देवू केले आहे त्या त्या प्रवर्गामध्ये ज्या दभंग जाती होत्या त्यांनीच आरक्षण लाभ मिळविले आहेत. त्यांच्या तुलनेत ज्या जाती मागास होत्या त्यांच्यासाठी आरक्षण केवळ एक मृगजळ ठरले आहे. त्यातूनही समाजामध्ये 'आरक्षणातील आरक्षण' हा नवा वाद निर्माण होवून सामाजिक सुसंघटनाला छेद होत आहे. परिणामी जाती आणि आरक्षण हा मुद्दा नव्याने जटील बनून त्याचे विपरीत परिणाम समाजमनावर होत आहेत. दुसऱ्या बाजूला खाजगीकरणाच्या माध्यमातून

आरक्षण रद्द करून सामाजिक न्याय नाकारण्याचे कामही मोठ्या प्रमाणावर प्रस्थापित, उच्च व संघटीत जातीकडून होत आहे. त्यातून सामाजिक गुंतागुंत वाढली आहे.

**४)जाती आणि राज्यघटना :**

भारताची राज्यघटना ही जगातील उत्तम अशी राज्यघटना आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महान विधितज्ञाच्या वैचारिक संपन्नतेतून ती साकार झाली आहे. भारतीय समाज व्यवस्थेचे स्वरूप लक्षात घेवून ती अधिकाधिक दर्जेदार व न्यायी बनवण्याचा प्रयत्न झाला आहे. परंतु भारतीय समाजव्यवस्थेतील जात व्यवस्थेने राज्यघटनेबाबत नव्याने अनावश्यक प्रश्न निर्माण करून गोंधळाची परिस्थिती निर्माण केली जात आहे. उदा. डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे यांचे मत आहे की, ''सध्याची भारतीय राज्यघटना ही समतेचा निकष लावला तर मनुस्मृतीपेक्षाही ती हिणकस ठरते.'' अशा प्रकारच्या विचारसरणीचा प्रचार करण्यासाठी त्यांनी नुकताच भारतभर दौराही केला आहे. अशा रीतीने भारतीय घटनेला हिणकस ठरवण्याची भूमिका नव्याने पुढे येत आहे. खरे तर मनुस्मृती आता कालबाह्य झाली आहे हे सत्य ते पचवू शकत नाहीत. राजकीय सत्तेवर ताबा मिळवल्याने अशा उच्च जातीकडून राज्यघटनेला नाकारण्याचा उन्मतपणा येवू पाहत आहे. त्यातून एकूणच भारतीय समाजाच्या विघटनाची पार्श्वभूमी तयार होत आहे. यामागे केवळ जात व्यवस्था आहे.

**५)जातीव्यवस्था आणि धर्म :**

जातीव्यवस्था हे हिंदू धर्माचे वैशिष्ट्ये आहे. 'धर्म ही अफूची गोळी आहे' हे वास्तव लक्षात घेतले तरी मानसाच्या सामाजिक आणि वैयक्तिक जीवनात धर्माची भूमिका वरच्या स्थानावर असते. भारतामध्ये जे मूळनिवासी आहेत, त्यांचा धर्म हिंदू होता का? या प्रश्नाचे उत्तर डॉ. आंबेडकरांची शूद्र पूर्वी कोण होते' या पस्तुकातून दिले आहे. परंतु पुढे 'सांस्कृतिक पाश्चयान' सिद्धांतानुसार हिंदू धर्म आणि त्याबाबतची संस्कृती प्रसारण पावली व त्यातून हिंदू बहुसंख्यकांचा देश म्हणून ओळखला जावू लागला. परंतु हिंदू धर्मामध्ये असलेल्या जातीव्यवस्थेने येथील आदिम व मूळनिवासी लोकांना हीन ठरवून त्यांच्यासाठी सामाजिक न्यायाचे तत्त्व नाकारले गेले. हिंदू समाजामध्ये सामाजिक न्याय तत्त्व पाळले जावे यासाठी अनेक प्रगोधनाच्या चळवळी व जाणीव जागृतीचे प्रयत्न झाले. परंतु या व्यवस्थेमध्ये जे वरच्या स्थानी होते, त्यांनी अशा प्रबोधनाला आणि सामाजिक चळवळीला मोडीत काढण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. आंबेडकरांना उच्च वर्गाकडून झालेला विरोध सर्वश्रूत आहे. परिणामी पुढे डॉ. आंबेडकर आणि त्यांच्या लाखो अनुयायांनी हिंदू धर्मातून बौद्ध धर्मात प्रवेश केला व ही प्रक्रिया विविध मागास हिंदू प्रवर्गामध्ये अद्याप चालूच आहे व ती अशीच चालू राहणार हे स्पष्ट दिसते. त्यातूनच भारत हा 'बुद्धमय' होईल हे स्वप्न डॉ. आंबेडकरांनी पाहिले. या अगोदरही महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्मातून ही वहिवाट सुरू केलेली होतीच. याचा अर्थ जातीव्यवस्थेने भारतीय समाजाचे उच्चजातीय भारत आणि कनिष्ठ जातीय भारत अशी फाळणी केलेली दिसून येते. सदर बाब ही 'एकात्मिक भारत', 'एकसंघ भारत' या संकल्पनेला आव्हान देत आहे हे नाकारून चालणार नाही. हिंदू धर्म आणि त्यातील जातीव्यवस्थेने ही परिस्थिती निर्माण केली आहे हे अमान्य करता येणार नाही.

**६)जातीव्यवस्था आणि विवाह :**

जात हा आंतरविवाही समूह असल्याने विवाहाचे स्वरूप मर्यादीत होवून त्या त्या जाती मर्यादीत झाले. यातून विवाह जोडीदार निवड मर्यादित होवून विवाहाचे अनेक प्रश्न निर्माण झाले. शिवाय यातून जातीव्यवस्था अधिक बळकट झाली. हिंदू धर्मातील अनेक श्रद्धा व अंधश्रद्धा यातून बालविवाह, केशवपन, सतिप्रथा, घटस्पोट इत्यादी महिलाविषयक गंभीर प्रश्न निर्माण झाले. हिंदू स्त्रियांना न्याय देणारे 'हिंदू कोड बिल' डॉ. आंबेडकरांनी मांडले परंतु ते संसदेत स्विकारण्याइतकी संसदेची मानसिकता नसल्याने ते नाकारले गेले. जोपर्यंत विवाह जातीबाहेर पडत नाही तोपर्यंत भारतीय समाजातील विवाहाचे प्रश्न सुटणार नाहीत व जातीव्यवस्था संपणार नाही.

**७)जातीव्यवस्था आणि विज्ञान :**

विज्ञान हे शास्त्रशुद्ध ज्ञानावर आधारित असते. घटना आणि त्याचे परिणाम याचा निश्चित असा कार्यकारणभाव असतो. पुराव्याशिवाय निष्कर्ष नसतात. सदर वैज्ञानिक वृत्ती ही शिक्षणाच्या

ISSN : 2278-9308
July 2021

माध्यमातून जनमानसापर्यंत पोहचत असते. त्यासाठी सर्वांसाठी शिक्षण हे तत्त्व खूप महत्त्वाचे आहे. शिक्षणासाठीचे हे सकारात्मक वातावरण पाश्चिमात्य देशात असल्यामुळे विज्ञान व शोधासाठी हे देश भारतापेक्षा कितीतरी पुढे आहेत. कला, वाणिज्य, विज्ञान, साहित्य आणि संस्कृती, आरोग्य यांचा एक भला मोठा विकासाचा टप्पा सदर देशांनी पार केला आहे. भारतीय समाजामध्ये मात्र जातीव्यवस्थेने एकूणच समाजाला अज्ञान आणि अंधश्रद्धा यांच्या खाईत ढकलले. 'सर्वांसाठी शिक्षण' हे तत्त्व भारतातील जात व्यवस्थेने पूर्ण नाकारले गेल्याने ही जातव्यवस्था भारताच्या विकास आणि प्रगतीसाठी खूप मोठा गतिरोध बनली. एका अविद्येने किती अनर्थ केले आहेत हे महात्मा फुले यांनी सांगितले आहेच. परिणामी शिक्षण नाही, प्रगती नाही, विकास नाही, शिक्षण आणि विज्ञान याकडे जातीव्यवस्थेने पूर्ण दुर्लक्ष केल्याने अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, अनिष्ठ परंपरा यांचे माहेरघर अशी भारताची ओळख जातीव्यवस्थेमुळे निर्माण केली. एकूणच जात व्यवस्थेने भारतीय समाजातील सर्व घटकांवर अनिष्ठ परिणाम केल्याचे वास्तव दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ :**

१.डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शूद्र पूर्वी कोण होते, आनंद प्रकाशन, औरंगाबाद, २०१८
२.धनश्याम शाह, भारतातील सामाजिक चळवळी, साग प्रकाशन, नवी दिल्ली, २०१७
३.डॉ. प्रल्हाद लुलेकर, अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा, सायन प्रकाशन, पुणे,२०१२
४.डॉ गाठाळ एस.एस., आंबेडकरी चळवळीचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २०१०
५.कांचा अइलैय्या, हिंदूत्व मुक्त भारत, साग प्रकाशन, नवी दिल्ली, २००९
६.डॉ. साळुंखे आ.ह., सर्वोत्तम भूमिपूत्र : गौतम बुद्ध, लोकायत प्रकाशन, सातारा, २०१७
७.मनोहर पाटील, फुले आंबेडकरी चळवळीचे क्रांतीशास्त्र, सुगावा प्रकाशन, पुणे, २०१०
८.डॉ. हनुमंत मिसाळ, मूलभूत समाजशास्त्र, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०१६

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# अनुसूचित जाति की बालिकाओं पर शिक्षा के निजीकरण का प्रभाव

डॉ. भारती सागर
एसोसिएट प्रोफेसर एवं विभागाध्यक्ष, समाजशास्त्र आर.सी.ए. कन्या स्नातकोत्तर महाविद्यालय,मथुरा ,इ-मेल ; bharatisagar01@gmail.com,Contact no. 8218771680

किसी समाज व राष्ट्र की प्रगति उन्नति में शिक्षा की भूमिका हमेशा से महत्वपूर्ण है। चाहे वह औपचारिक शिक्षा या हो या अनौपचारिक शिक्षा यह किसी भी समाज की संस्कृति के कौशल और ज्ञान को हस्तांतरित करने के साथ व्यक्तित्व में उन दोनों को परिष्कृत करने और विवेकपूर्ण दृष्टिकोण विकसित करने में हमेशा से ही महत्वपूर्ण भूमिका निभाती रही है। आज शिक्षा प्रणाली किसी राष्ट्र की प्रगति के मापदंडों में से एक महत्वपूर्ण मापदंड के रूप में गिनी जाती है। गुणवत्तापरक शिक्षा की अधिक से अधिक नागरिकों तक उपलब्धता ना केवल व्यक्ति के लिए उत्थान का बल्कि एक सजग और सशक्त राष्ट्र के निर्माण का मार्ग भी प्रशस्त करती है। दुर्भाग्य से भारत में स्वतंत्रता से पूर्व शिक्षा उच्च वर्ग और वर्ण व्यवस्था केसंस्करण में उच्च स्थान प्रखने वाले समूहों तक सीमित थी तथा इस संस्करण में सबसे निचले पायदान पर स्थित अस्पृश्य जिन्हें आज अनुसूचित जातियां कहा जाता है सदियों तक शिक्षित होने के उपाय के अधिकार से वंचित रही, आज का पिछड़ा वर्ग और स्त्रियां भी शिक्षा के अधिकार से वंचित रहे परिणामस्वरूप देश की आबादी का बड़ा हिस्सा निरक्षरता के अंधकार में जीवन व्यतीत करता रहा।

स्वतंत्र भारत में नवीन संवैधानिक व्यवस्था मैं इन वंचित समूहो को शिक्षा के साथ आर्थिक, राजनैतिक, धार्मिक सभी क्षेत्रों में सामानअधिकार प्राप्त हुए। आजादी के बाद सरकार के प्रयासों से शिक्षा का लोकतंत्रकरण गांव शहरों में ज्यादा से ज्यादा शिक्षण संस्थाओं की स्थापना से किया गया। साक्षरता अभियान चलाए गए फलस्वरूप आजादी के बाद 1952 जहां साक्षरता दर 18.8 प्रतिशत थी, सन 2011 की जनगणना में यह बढ़कर 74.4 प्रतिशत हो गई। अब अनुसूचित जातियों के साथ समाज के अन्य वंचित समूहों तक भी शिक्षा के किरण पहुंची और सभी वर्गों के लिए शिक्षा का प्रबंध सरकार द्वारा राज्य के अधीन किया जाता रहा। निजी क्षेत्र की भूमिका इस समय तक (1990 से पूर्व तक) बहुत ही सीमित रही 1990 के बाद देश में उदारीकरण का दौर शुरू हुआ और देश की आर्थिक प्रगति को गति देने के उद्देश्य से एलपीजी (LPG) यानी उदारीकरण, निजीकरण और वैश्वीकरण की जो नीति अपनाई गई इसमें भारतीय शिक्षा प्रणाली की मुख्य समस्याएं जैसे शिक्षा की गुणवत्ता, उपलब्धता, सार्वभौमीकरण और आधुनिकीकरण आदि समस्याओं के समाधान के लिए निजीकरण का रास्ता सुझाया गया।

निजीकरण ने देश की शिक्षा प्रणाली को प्रभावित किया और देश के विभिन्न वर्गों और समूह को भी अलग-अलग तरह से प्रभावित किया। कुछ के लिए यह नए अवसरों को लेकर आई थी, तो कुछ के लिए के लिए यह अवसरों से वंचित कर रही थी। नतीजतन अपने अपने अनुभव, स्वार्थ, और है तुम के अनुरूप शिक्षा प्रणाली के निजीकरण पर मत सामने आए। कुछ पक्ष और विपक्ष मैं। दोनों के अपने-अपने तर्क है। प्रस्तुत शोध पत्र में शिक्षा के निजीकरण का अनुसूचित जाति बालिकाओं पर क्या प्रभाव पड़ा विशेष रूप से उच्च शिक्षा के क्षेत्र में यह निजीकरण की प्रक्रिया उन्हें कैसे प्रभावित कर रहे हैं और क्या परिणाम लेकर आ रही है इन पहलुओं को इस शोध पत्र में द्वितीयक सामग्री जैसे उपलब्ध रिपोर्ट, आलेख, अकादमिक शोधपत्र, के अंतर्वस्तु विश्लेषण द्वारा जाने का प्रयास किया गया है। शोध के उद्देश्यों को ध्यान में रखते हुए शोध आलेख को दो भागों में प्रस्तुत किया गया है, यह निम्नलिखित हैं।

- भारत में शिक्षा का निजीकरण
- उच्च शिक्षा में अनुसूचित जाति की बालिकाएं एवं निजीकरण।

**भारत में शिक्षा का निजीकरण**

शाब्दिक दृष्टि से निजीकरण शब्द सन 1960 में पीटर एफ. ड्रकर द्वारा सर्वप्रथम अपनी पुस्तक द एज ऑफ डिस्कंटीन्यूटी में प्रयुक्त किया ।जबकि निजीकरण से जुड़े सिद्धांत और दर्शन का आरंभ Smith(1776)की पुस्तक "वेल्थ ऑफ नेशन" से देखा जा सकता है। जिसमें स्वतंत्र बाजार और व्यापार व्यवस्था की पैरवी की गई, बाद में अमेरिकी अर्थशास्त्री फ्रीडमैन ने भी मुक्त समाज ( Liberal society) की स्थापना हेतु निजीकरण की विचारधारा का समर्थन किया जबकि अल्फ्रेड मार्शल, काल मार्क्स जैसे विद्वानों ने इस विचारधारा को कमजोर वर्ग के शोषण को पोषित करने वाली व्यवस्था के रूप में देखा और आदर्श समाज के लिए अनुपयुक्त पाया ।1

"निजीकरण से तात्पर्य व्यक्तिक निवेश के संबंध में राज्य की नियामकता कि समाप्ति से है।" साथ ही स्मरणीय रहे की निजीकरण एक राजनीतिक अवधारणा है यह व्यापार के स्वामित्व के सार्वजनिक क्षेत्र से निजी क्षेत्र को हस्तांतरण की प्रक्रियाको इंगित करती हैं। यूरोप और अमेरिका में 70 के दशक मैं और 80 के आसपास यह व्यवहार में लाई गई। 2 1979 में ग्रेट ब्रिटेन में श्रीमती थेचर के समय अनेक सरकारी उपक्रमों का निजीकरण किया गया, तत्पश्चात यह प्रक्रिया पश्चिमी जर्मनी फ्रांस, जापान, सिंगापुर मलेशिया, थाईलैंड तथा ब्राजील आदि देशों में प्रारंभ हुई। भारत में इसे सन 1990 के बाद अपनाया गया। निजीकरण के उपरांत उद्योग, व्यापार तथा शिक्षा के क्षेत्र में इस विचार को व्यवहारिक रूप प्रदान किया जाने लगा। 3निजीकरण को निम्नलिखित तरीकों से लागू किया जा सकता है। 4 अंशौ की सार्वजनिक बिक्री के द्वारा किसी सार्वजनिक कंपनी के सारे अंश या उनका हिस्सा जनता को बिक्री के लिए प्रस्तावित कर दिया जाए।

1. अंशौ की निजी बिक्री के द्वारा सार्वजनिक स्वामित्व के उद्यम को पूरा या आंशिक तौर पर व्यक्तियों या क्रेताओं को बेच दिया जाए।
2. सरकारी स्वामित्व के उद्यम में नया निजी निवेश या सार्वजनिक क्षेत्र द्वारा सब्सिडी देना।
3. सार्वजनिक क्षेत्र में निजी क्षेत्र का प्रवेश इसके तहत सार्वजनिक क्षेत्र के लिए आरक्षित क्षेत्रों में निजी क्षेत्रों को प्रवेश दिया जाता है जैसे भारत में बिजली दूरसंचार आदि के क्षेत्र।
4. स्वामित्व सरकार के पास रखते हुए जन उपयोगी सेवाओं को निजी संचालकों या ठेकेदारों को परिचालन या और रखरखाव के लिए अनुबंध पर देना ।
5. निजी बिक्री की तरह सरकारी उद्यम की परिसंपत्तियों की बिक्री कंपनी की सहायक इकाइयों का पुनर्गठन या विखंडन इत्यादि ।

भारत में 1991 में अर्थव्यवस्था को रफ्तार देने के उद्देश्य से आर्थिक सुधारों को अमल में लाया गया और उदारीकरण, निजीकरण, भूमंडलीकरण की नीति को लागू किया गया। यहीं से देश में निजीकरण का दौर शुरू हुआ वस्तुस्थिति यह रही कि वैश्वीकरण की प्रक्रिया ने भारत को एलपीजी की नीति अपनाने के लिए सरकार को बाध्य किया और प्रेरित भी किया ।

आज निजीकरण की प्रक्रिया अन्य क्षेत्रों के साथ शिक्षा के क्षेत्र में भी पांव पसार रही है । आजादी के बाद से ही भारत शिक्षा के क्षेत्र में दो गंभीर समस्याओं का सामना करता रहा, पहली देश में सभी को मुक्त रूप से आसानी से शिक्षा उपलब्ध नहीं हो पा रही थी दूसरा देश में शिक्षा व्यवस्था का पूरी तरह से आधुनिकीकरण नहीं हो पा रहा"।5 इस समस्या के समाधान में सरकार ने निजीकरण का रास्ता निकाला और अब तो सरकार द्वारा कई शिक्षण संस्थाओं और विदेशी शिक्षण संस्थाओं को भी शिक्षा के क्षेत्र में निवेश के छूट दे दी गई है । फलस्वरूप शिक्षा प्रणाली का स्वरूप प्रभावित हुआ है ।भारत में त्रिस्तरीय शिक्षा प्रणाली यानी प्राथमिक, माध्यमिक और उच्च शिक्षा में इसके मिश्रित प्रभाव विभिन्न वर्गों और समूह पर देखने को मिल रहे हैं ।

वस्तुस्थिति यह है कि निजीकरण ने राज्य की भूमिका को सीमित कर दिया है। कल्याणकारी राज्य में शिक्षा की उपलब्धता प्रत्येक समूह तथा वर्ग तक पहुंचाने की मुहिम से राज्य भटक गया है। यह कमजोर वर्ग के अधिकारों पर कुठाराघात है। संवैधानिक प्रावधानों के तहत 14 वर्ष तक अनिवार्य शिक्षा के कारण राज्य प्राथमिक एवं माध्यमिक शिक्षा का पूरी तरह से निजीकरण नहीं कर सकता। उच्च शिक्षा में ऐसी बातें ना होने से उच्च शिक्षा निजीकरण से अत्यधिक प्रभावित हुई है।भारत के उच्च शिक्षा प्रणाली अमेरिका के बाद दुनिया की दूसरी सबसे बड़ी प्रणाली है। भारतीय शिक्षा प्रणाली में उच्च शिक्षण संस्थानों को निजीकरण के दायरे में लाने से उच्च शिक्षा का महंगा होना सुनिश्चित है। जिसका सीधे तौर पर विशेष रूप से अनुसूचित जाति, अनुसूचित जनजातियों के हितों कोआघात पहुंचा है। इन परिस्थितियों में उच्च शिक्षा की उपलब्धता एक वर्ग के लिए कठिन हो गई है। विशेष रूप से अनुसूचित जाति के निर्धन वर्ग के छात्र-छात्राएं उच्च शिक्षा प्राप्त करने में असमर्थ रहेंगे। इनका उच्च शिक्षा से वंचित हो जाना भविष्य में अच्छे नौकरियों और पदों से भी इन्हें वंचित कर रहा है। निश्चय हीपरिणाम दूरगामी और असमानताकारी है। इस पूरी प्रक्रिया से शिक्षा के लोकतंत्रीकरण का लक्ष्य आजादी के बाद निर्धारित किया गया वह निजीकरण की चकाचौंध में गुम होता दिख रहा है और अंधकारमय भविष्य की चुनौती लेकर आई है जिससे निपटने की तत्काल आवश्यकता है। निजीकरण ने उच्च शिक्षा प्रणाली को जिस तरह प्रभावित किया है उससे वंचित वर्ग के लोगों का शिक्षा अर्जन में मिलने वाली सुविधाएं और सकारात्मक भेदभाव की नीति को भी हानि पहुंची है। आज स्थिति यह है कि शिक्षण संस्थाओं का निजीकरण कमजोर वर्ग के लिए उच्च शिक्षा की उपलब्धता एवं पहुंच हो कठिन करता जा रहा है। क्योंकि उच्च शिक्षा के प्रबंधन, वितरण में व्यापारी और पूंजीपतियों का के प्रभुत्व को यह बढ़ावा दे रहा है जिससे शिक्षा के व्यापारीकरण,एवं शिक्षा संस्थाओं में मुनाफाखोरी की सोच ने शिक्षकों और विद्यार्थियों के लिए आर्थिक शोषण की उर्वर भूमि तैयार कर दी है।इसका तात्पर्य यह बिल्कुल नहीं है कि निजी करण से देश को कोई लाभ नहीं हुआ है। निश्चय ही कुछ निजी संस्थान, विश्वविद्यालय, महाविद्यालय उच्च स्तर की गुणात्मक शिक्षा प्रदान कर रहे हैं और देश के दूरदराज इलाकों में भी अब महाविद्यालय और विश्वविद्यालय स्थापित हो गए हैं।जहां पर्याप्त सुविधाएं उपलब्ध है परंतु होने के कारण अभी तक ही सीमित रह गया है। सरकारी आंकड़ों के अनुसार भारत में 40% से अधिक जो गरीबी रेखा के नीचे लोग जीवन यापन कर रहे हैं सुविधा इनको इन शिक्षा सुविधाओं का लाभ नहीं मिल पा रहा है।

**उच्च शिक्षा में अनुसूचित जाति की बालिकाएं एवं निजीकरण**

लैंगिक परिपेक्ष में मुद्दे को देखें तो भारतीय समाज में पहले ही स्त्री को दोयम दर्जा प्राप्त है उस पर अनुसूचित जाति और निर्धनता के समीकरण अनुसूचित जाति की बालिकाओं के लिए निरंतर उच्च शिक्षा की प्राप्ति में चुनौतियों में बढ़ोतरी कर रहे हैं। इसकी उपलब्धता उनके लिए कठिन होती जा रही है। आर्थिक दृष्टि से कमजोर वर्ग अनुसूचित जाति की की बालिकाओं के लिए उनकी शिक्षा प्राप्ति के मार्ग में निजीकरण एक बाधा के रूप में आ चुका है। क्योंकिआर्थिक स्थिति कमजोर होने पर सामान्यतः भारतीय परिवारों में पुरुष की शिक्षा को पहले महत्व दिया जाता है और बाद में स्त्री की शिक्षा को। दोनों की शिक्षा का खर्च माता-पिता बहन करने में असमर्थ होते हैं तो सामान्यता बेटियों को ही शिक्षा से रोक दिया जाता है। निजीकरण से शिक्षा के खर्चे के बढ़ेंगे तो स्त्रियों के शिक्षा से वंचित होने की संभावनाएं ज्यादा बढ़ जाएंगे। राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान एवं प्रशिक्षण परिषद, नई दिल्ली के छठे सर्वेक्षण(1991) में यह तथ्य सामने आया कि ग्रामीण क्षेत्रों में अनुसूचित जाति की 60% बालिकाएं अपनी प्राथमिक शिक्षा पूरी नहीं कर पाती नगरों से तुलना करने पर यह अंतर और भी अधिक बढ़ जाता है जिसके अनुसार 38प्रतिशत ग्रामीण एवं 29 प्रतिशत नगरी बालकों की तुलना में 57 प्रतिशत एवं 36 प्रतिशत बालिकाएं अपनी स्कूली पढ़ाई अधूरी छोड़ देती है। 6 उच्च शिक्षा में आकर यह प्रतिशत और भी अधिक बढ़ जाता है।आज देश की लगभग 40% आबादी जो निर्धनता रेखा के नीचे जीवन यापन कर रहे हैं। ऐसे परिवारों के लिए बालिका या बालक

की शिक्षा का प्रश्न गौण हो जाता है और जीविकोपार्जन का मुद्दा की मुख्य बन जाता है पासवान एवं जयदेव की संपादित इनसाइक्लोपीडिया ऑफ दलित इन इंडिया में रातेरा और रानीपुर का अध्ययन दर्शाता है कि 42% दलित बालक गरीबी और दुर्बल आर्थिक स्थिति के कारण शिक्षा पूर्ण नहीं कर पाए। 7 इसमें अधिकतर अनुसूचित जाति और जनजाति के ही समूह है जिनके लिए निजी संस्थाओं या शिक्षण संस्थाओं के निजीकरण से उत्पन्नअन्य खर्चे बहन करना एक दुष्कर कार्य हो रहा है। कमजोर वर्ग में अनुसूचित जातियों के निर्धन वर्ग की स्त्रियां इस कारण उच्च शिक्षा के मामले में पिछड़ रही है ।तालिका में दिए गए आंकड़ों स्पष्ट रहे हैं कि दलित अनुसूचित जाति के पुरुषों की तुलना बालिकाओं की नामांकन दर कम है। दोनों की नामांकन दर् एक दूसरे के समकक्ष लाने के लिए निश्चय ही गंभीर प्रयासों की आवश्यकता यह आंकड़े दशा रहे हैं।

**अनुसूचित जातियों के बालक बालिकाओं का उच्च शिक्षा में नामांकन दर**

| शिक्षा का स्तर | बालक (%) | बालिका (%) |
|---|---|---|
| * प्राथमिक शिक्षा | 53.41 | 49.69 |
| **माध्यमिक शिक्षा | 60.5 (दसवीं तक)<br>62.32 (12वीं तक) | 39.49<br>37.79 |
| **उच्च शिक्षा | 62.5 यूजी तक<br>65.79 पीजी तक<br>72.28 पीएचडी तक | 37.51<br>34.21<br>27.02 |

*एन सी ई आर टी और इंडिया एजुकेशनल सर्वे 2002

** एम एच आर डी, सिलेक्टेड एजुकेशनल स्टैटिसटिक्स, 2004-05

उपरोक्त तालिका में दिए गए आंकड़ों में स्त्री -पुरुष की उच्च शिक्षा की नामांकन दर में यह जेंडर गैप क्यों है? क्या इसमें निजीकरण के कारण महंगी होती शिक्षा एवं सरकारी सुविधाओं का लुप्त होते जाना ही एक कारण है या भारतीय परिवारों में विशेष रूप से अनुसूचित जाति की निर्धन वर्ग की महिलाओं की शिक्षा को और उच्च शिक्षा को महत्व ही बहुत कम दिया जाना, दुर्बल आर्थिक स्थिति, शिक्षा का स्त्रियों के लिए अनुपयोगी समझा जाना, परंपराएं रूढ़ियां भी ऐसे कारक हैं जो स्त्रियों कि पुरुषों की तुलना में कम साक्षरता दर के लिए उत्तरदाई हाय गए हैं। यहां यह ध्यान देने योग्य है कि शिक्षा के निजीकरण से शिक्षा व्यवस्था में जो परिवर्तन आए हैं महिलाओं की शिक्षा विशेष रूप से अनुसूचित जाति की कन्याओं के लिए क्या परिस्थितियां उत्पन्न कर रहे हैं? यद्यपि सकारात्मक भेदभाव सी नीति के तहत छात्रवृत्ति फीस माफी एवं आरक्षण की सुविधाएं अनुसूचित जाति के विद्यार्थियों को दी गई है, फिर भी सामान्य वर्ग की तुलना में आज भी अनुसूचित जाति के विद्यार्थियों विशेष रूप से छात्राओं की उच्च शिक्षा में दर कम है। क्योंकि उपरोक्त वर्णित सुविधाओं के इस व्यवस्था में कंचन से और उस पर निजी संस्थानों की अतिरिक्त खर्चों ने निर्धन वर्ग की अनुसूचित जाति की छात्राओं के लिए उच्च शिक्षा की उपलब्धता पर प्रश्नचिन्ह लगा दिया है। किसी तरह यदि इन निजी शिक्षण संस्थानों में अनुसूचित जाति की छात्राएं प्रवेश ले लेती हैं तो उच्च शिक्षा को पूरा करना उनके लिए एक कठिन कार्य हो जाता है साथ ही इन संस्थानों में वह जातिगत भेदभाव को भी तीव्रता से अनुभव करती हैं ऐसा कई अध्ययनों में पाया गया है। यहां तक की पुरुष शिक्षक भीअनुसूचित जाति की छात्राओं से विश्वविद्यालय या महाविद्यालय के विभिन्न कार्यों में उनकी सहभागिता की उपेक्षा करते हैं।8

ISSN : 2278-9308
July 2021

निष्कर्ष रूप में कहा जा सकता है कि निश्चय ही स्वतंत्र भारत में अनुसूचित जाति की साक्षरता में वृद्धि हुई है तथापि देश के अन्य समूहों की तुलना में आज भी इनकी शैक्षणिक स्थिति निम्न है। इसमें जी अनुसूचित जाति की बालिकाओं की स्थिति निम्न है।निजी करण ने गणना दृष्टि से यद्यपि देश में विद्यालयों एवं विश्वविद्यालयों की संख्या में वृद्धि की है और गुणवत्ता में भी योगदान दिया है, लेकिन इसके सकारात्मक पक्ष अनुसूचित जाति की बालिकाओं तक पर्याप्तमात्रा में नहीं पहुंच पा रहे, जितनी मात्रा में पहुंचना चाहिए। शिक्षा का महंगा होना, मुनाफाखोरी। इस क्षेत्र मेंनिर्धन वर्ग की बालिकाओं के लिए चुनौतियां उत्पन्न की है। यह चुनौती उनकी कम नामांकन दर, अनुपस्थिति दर और शिक्षा अधूरा छोड़ देने की समस्याओं के रूप में सामने आ रहे हैं। यह शिक्षा के क्षेत्र में असंतुलित विकास के साथ विषमता को जन्म देकर नीति निर्धारकों के लिए नई चुनौतियां उत्पन्न कर रहे हैं जिसका की निजीकरण के पास भी समाधान नहीं है। बल्कि इससे इससे यह समस्याएं और चुनौतियां और भी जटिल होती है नजर आ रही है। अतः इस दिशा में एक विशेष ध्यान दिए जाने के साथ नवाचार युक्त संस्थानिक व्यवस्था की तत्काल आवश्यकता है।

**संदर्भ**

1. भोई. दानेश्वर, (2013)." एजुकेशनल प्राइवेटाइजेशन एंड एक्सेस तू हायर एजुकेशन एक्सपीरियंस ऑफ शेड्यूल कास्ट स्टूडेंट इन उड़ीसा", सोशल चेंज, Vol-43, No-5, p.341-363, reseaechgate.net से प्राप्त I

2. सिंह. शिवबहाल, (2010),विकास का समाजशास्त्र रावत पब्लिकेशन जयपुर पृ. 170

3. सागर अकैडमी (मार्च 02, 2020), शिक्षा का निजीकरण कारण अर्थ एवं लाभ एवं हानि,,sagaracademi.blog.com से प्राप्त I

4. शर्मा. जी. एल.,(2015)., सामाजिक मुद्दे , रावत पब्लिकेशन नई दिल्ली , पृ. 146

5. सिंह. शिवबहाल. (2010).,विकास का समाजशास्त्र रावत पब्लिकेशन ,जयपुर, पृ 209

6. www.unicef.org

7. पासवान एस. एवं जयदेव पी. (2003)., इनसाइक्लोपीडिया ऑफ द लिस्ट इन इंडिया एजुकेशन वॉल्यूम कलपास पब्लिकेशन, दिल्ली, P.109

8. भोई दानेश्वर. (2014)., "सर्चिंग जेंडर इक्वलिटी इन एजुकेशन में हायर एजुकेशन लेवल शेड्यूल कास्ट ऑफ उड़ीसा" चैप्टर पब्लिश्ड इन *प्रोस्पेक्ट एंड इश्यूज कंसर्निंग एजुकेशन सेकेंडरी लेवल* (एडिटर निकमें एस .सी., मोमिन जे.बी ,मधुसूदन) मानस पब्लिशर डिस्ट्रीब्यूटर, जयपुर, p. 399 - 425

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# डॉ. आंबेडकरांचे जाती उच्छेदा विषयक विचार

प्रा. बाळकृष्ण कारू रामटेके
समाजशास्त्र विभाग प्रमुख समर्थ महाविद्यालय, लाखनी
मोबाइल नं. 9923340772, Email Id- ramtekebk@gmail.com

---

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी 'जातीसंस्थेचे निर्मूलन' या विषयावर 1936 चाली लाहोर मधील हिंदू समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी जात-पात तोडकर मंडळाच्या आग्रहास्तव परिषदेचे निमत्रण त्यांनी स्वीकारले. त्या अधिवेशनात देण्यासाठी तयार केलेले अध्यक्षीय भाषण म्हणजे हा ग्रंथ भाषेतील प्रामाणिक विचार समाजाला पचणार नाही या भीतीने मंडळानेही परीषदच बरखास्त केली. मग हेच भाषण डॉक्टर आंबेडकर यांनी पुस्तक रूपात प्रकाशित केले. अनेक प्रदेश प्रादेशिक भाषांत त्यांची भाषांतरे झाली. भारतातील जातीसंस्थेचे सामाजिक, राजकीय ,सांस्कृतिक, आर्थिक, नैतिक बाजू उलगडून दाखविणारे हे पुस्तक म्हणजे अतिशय मौलिक स्वरूपाचे वैचारिक ठेवा आहे .डॉक्टर आंबेडकरांनी आपल्या आयुष्यात अनेक प्रकारच्या चळवळी केल्या, लढे उभारले, समाजाशी तीव्र संघर्ष केला. त्यामागील त्यांची वैचारिक भूमिका तर्कशुद्ध आणि विवेकशील होती. कुठलीही विकृती नाहीशी करण्यासाठी तिच्या मुळाशी जावे लागते. ते नेस्तबाबूत भूत करावे लागते. जातिसंस्थेचा वैचारिक पायाच त्यांनी नसतं केला. श्रमविभागणी करण्यासाठी समाजात जाती संस्था निर्माण करण्यात आली आहे .समाजातील एका गटाने समाजाला ज्ञान द्यावे, दुसऱ्याने शासन व्यवहार करावेत, तिसऱ्याने वापर करावा ,चौथ्या वर्गाने सर्व समाजाची सेवा करावी अशी डॉक्टर आंबेडकर यांच्या मते सुधारणा झालेल्या देशात श्रमविभागणी असते. परंतु ती जन्मावर आधारित नसते तर ती ऐच्छिक स्वरुपाची असते. कोणतीही व्यक्ती कोणताही व्यवसाय करू शकते. व्यक्तीवर जातींची बंधने नकोत. भारतीय माजात मात्र जातीनुसार म्हणजे जन्मानुसार व्यवसाय व कार्य निर्धारीत करण्यात आलेली आहेत. व्यक्तीला त्यांचे जन्मजात व पारंपारिक धंदा करावा लागतो. ही श्रमविभागणी उतरंडीच्या स्वरूपाची आहे. या समाजाची सेवा करणाऱ्या दलित वर्गाला अतिशय कनिष्ठमानण्यात आले आहे. या श्रमविभागणी वर आंबेडकर म्हणतात की ज्या कामाची व्यक्तीला आवड नसेल ते काम ती व्यक्ती कार्यक्षमतेने करू शकेल त्याचा इच्छेनुसार काम दिले नाही तर सुप्तगुणांना पासून ती व्यक्ती वंचित राहतो. जातीव्यवस्था ही व्यक्तींच्या नेसर्गिक विकास होऊ न देणारी व लोकशाहीविरोधी आतून संपूर्ण समाजाचा विकास खुरंतो .जाती संस्थेला शरीर शास्त्रीय आधार देऊन रक्तशुद्धी वंशीय शुद्धीसाठी जातीची उत्पत्ती झाली असेही सांगण्यात येते हा दावाही कसा चुकीचा आहे .हे पटवून देण्यासाठी डॉक्टर आंबेडकर डॉक्टर, डी आर भांडारकर यांच्या हिंदू जनतेतील पाश्चात्त्य रक्तघटक व प्रा वॅटसन यांच्या अनुवंशिकतेने संबंधी मॉडेलची सिद्धांत या ग्रंथाच्या पुरावा घेतला आहे. मानववंशशास्त्रज्ञ यांनी असे विचार व्यक्त केले की, वन शुद्धी ही जगाच्या पाठीवर कुठेही राहिलेली नाही. सर्वत्र वर्ष मिश्रण झालेले आहेत. भारतात अनेक वंशाचे मिश्रण झाल्यावरच बऱ्याच कालांतराने जाती निर्माण झाल्या .राजपूत आणि मराठा या जाती समूहाचे मिश्रण झालेले आहे .रक्तशुद्धी ची खोटे विचार मांडणाऱ्या ब्राह्मण जातीत देखील परके रक्ताचे मिश्रण झालेले आहे. शास्त्रीय आधारावर जातीची निर्मिती झाली असती तर हिंदु प्रजा सुदृढ निर्माण झाली असती. परंतु शारीरिक दृष्ट्या हिंदू समाज सर्वात कनिष्ठ प्रतीचा आहे. सुदृढ प्रजा वृद्धीसाठी जातीव्यवस्था नसुनही समाजातील उच्च समजल्या गेलेल्या विकृत मनोवृत्तीच्या वर्गाच्या स्वार्थाकरिता सोयीचे म्हणून निर्माण करण्यात आली. त्यांनी आपल्या सामाजिक वर्चस्वाच्या बळावर ती रुढ केली आज काही राजकीय पक्ष आणि संघटना आपल्या स्वार्थी राजकारणासाठी हिंदू समाजाचा सतत उद्घोष आणि गाजावाजा करतात हिंदू समाज हा एक भ्रम आहे .तसेच हिंदु हे नाव सुद्धा परकीयांनी दीलेले आहे. हे नाव मुस्लिमांनी स्थानिक लोकांना ओळखता यावे म्हणून दिले आहे .एका जातीला दुसऱ्या जातीशी बद्दल आपुलकी वाटत नाही ही आपुलकी आणि संघटितपणा फक्त हिंदू मुस्लिम दंगा च्या वेळेस निर्माण होतो. हा समाज उंदीर आणि घुशी प्रमाणे आपल्याच बिळात राहतो. बाह्य जगाशी काहीही संबंध ठेवत नाही त्यामुळे हिंदू राष्ट्र कधीच बनवू शकत नाही असे डॉक्टर आंबेडकर म्हणतात.आजही भारतात जास्तीत जास्त संख्येने दरिद्री निरक्षर अज्ञानी आणि अंधश्रद्धा या अवस्थेत जीवन जगत असलेले कोट्यावधी आदिवासी लोक आहेत आदिवासी लोक आजही रानटी अवस्थेत जीवन जगत आहेत त्यांना कधी सुसंस्कृत करण्याचा प्रयत्न झाला नाही. त्यांना कुणी वैद्यकीय मदत दिली नाही त्यांना चांगले नागरिक बनवण्याचा कोणीही प्रयत्न केला नाही. आदिवासींची सुधारणा म्हणजे त्यांना आपुलकीने जवळ करणे ,त्यांच्यात राहणे ,त्यांच्यात व आपल्यात बंधुभाव निर्माण करणे हे हिंदूंना शक्य नाही कारण हिंदुचे संपूर्ण आयुष्य आपली जात कशी टिकेल यातच गेलेले आहे.

पतीतांची किंवा दोन दलितांची सेवा हिंदूंना शिकविण्यात येत नाही असे नाही परंतु या सेवेने आपण जाती बहिष्कृत ठरण्याची भीती असल्यामुळे ती रंजल्या-गांजल्या यांची सेवा करू शकत नाही. हे आणि ती लोकांना रानटी अवस्थेत हिंदूंनी राहू दिली याचे कारण जात हे आहे .हिंदू धर्म हा एकेकाळी मिशनरी धर्म होता हे आंबेडकर ही आपल्या ग्रंथात मांडणी करतात. कारण या शिवाय त्याचा देशभर इतका प्रसार झाला नव्हता. जेव्हा हिंदू धर्मात जातीव्यवस्था निर्माण झाली तेव्हा त्याचे मिशनरी स्वरूप नष्ट झाले. त्यामुळे हिंदु धर्मा मधून बाहेर पडण्यासाठी धन मंत्र वाढले. पुन्हा हिंदू धर्मात येण्यासाठी त्यास कोणत्या जातीत प्रवेश घ्यावा असा प्रश्न निर्माण होतो डॉक्टर आंबेडकरांच्या मते, हिंदू धर्म म्हणजेच या अवजाची पाणी बाहेर जाण्याची चालू आहे पण पाणी आत येण्याची तोटी मात्र बंद आहे जातीय संस्थेमुळे हिंदूधर्म इतरांना समाविष्ट करूनघेतले जात नाही जोपर्यंत जाती संख्या आहे तोपर्यंत हिंदू धर्म हा मिशनरी होऊच शकत नाही असा स्पष्ट निर्वाळा आंबेडकर देतात. ज्या जातीमुळे सरसकट धर्मांतर शक्य झाले नाही, त्याच जातीमुळे हिंदू धर्माचे संघटनाही झालेले नाही मुस्लीम व शीख समाजाचा संबंधीची भीती नष्ट करावी यासाठी हिंदू संघटन आवश्यक आहे असे मानले जाते .परंतु मुस्लिम आणि शीख समाजाची संघटना मूर्ती आढळते. ती हिंदू धर्मात का नाही यासंबंधीचे समाज शास्त्रीय विश्लेषण डॉक्टर आंबेडकर यांनी केले आहे. संकट काळी सर्व शिक्षक व मुस्लीम समुदाय आपल्या मदतीला धावून येईल ही अंतकरणात असलेली भावना यांच्या तर नाही. आपले जातिबंधने आपल्या मदतीला धावून येतील याची मुळीच यांना खात्री वाटत नाही. शीख आणि मुस्लिमांची जीवनपद्धती यांच्यात बंधुभाव निर्माण करते. परंतु सिंधूची जीवनपद्धती बंधुभाव निर्माण करीत नाही हा भेदभाव जातीमुळे निर्माण झालेला आहे .हिंदू समाजात सुधारणा करण्याचा एखाद्या व्यक्तीने प्रयत्न केल्यास त्यास तात्काळ जाती मधून बाहेर वगळले जाते .बहिष्कारामुळे मनुष्याची सर्व सामाजिक सहजीवन नष्ट होते यापेक्षा मृत्यू बरा असे त्याला वाटू लागते अशा परिस्थितीत हिंदू समाजातील व्यक्ती जातीची बंधने तोडून स्वातंत्र्याची घोषणा करू शकत नाही. माणूस हा समाजाला तोडून राहू शकत नाही माणसाचा असहाय्य परिस्थितीचा फायदा जात घेत असते. जातीच्या रीवाजे प्रमाणे मनुष्याला वागावे लागते सनातनी मनोवृत्तीच्या लोकांसाठी ज्यात ही कोणतीही सुधारणा दडपून टाकण्याचे नसतं करण्याचे मोठे अस्त्र आहे. जातीच्या मानसिकतेचा हिंदू समाजाच्या नैतिक आजच्या आवरणावर कसा विपरीत परिणाम झाला याची विमान से डॉक्टर आंबेडकर आपल्या ग्रंथात करतात ज्योती येथे सामाजिक जाणीव मरून गेली आहे. दानधर्माची वृत्ती नष्ट झाली आहे. जातीमुळे लोकमत व्यक्त होत नाही हिंदू हा आपल्या जातीला जबाबदार असतो सद्गुण देखील जातीवरून ठरतात लायक व्यक्तीला कुठली सहानुभूती दाखवत नाही लोकांमध्ये दान करण्याची वृत्ती आहे. परंतु ती जाते पासून सुरू होते व जाती पुरतीच मर्यादित राहते मनात सहानुभूती नामक भावना आहे .पण इतर जातींसाठी नाही हिंदूंनी या जातीसाठी आपल्या देशाचा घात केल्याची अनेक उदाहरणे इतिहासात निदर्शनात येतातसारांश डॉक्टर आंबेडकर यांच्या मते भारतीय समाजाचा इतिहास हा सतत पराभवाचा इतिहास आहे. हिंदू मनुष्य जाती भावनेने भारावलेला आहे या प्रश्नाचे उत्तर शोधले पाहिजे त्यामागे कोणता धार्मिक आधार आहे याचा शोध आंबेडकर घेतात जाते एक माणसाची अवस्था आहे. ती एक वृत्ती आहे जाती निर्मूलन म्हणजे मनोवृत्तीत बदल होईल हिंदू जातीभेद पडतात. याचे कारण ते बुद्धिहीन अथवा मनुष्य आहेत म्हणून नव्हे तर ते अतिशय धर्मपरायण असल्यामुळे ते जाती-भेद काढतात त्यांच्या मनात जातीय वृत्ती विना धर्म हा त्यास जबाबदार आहे. धर्माला शास्त्राचा आधार आहे जातीभेद पाडणारे लोक हा भारतीय समाजाचा खरा शत्रू नसून त्यांनी ती पाडावयास लागणारी पुराने व शास्त्रीय खरी शत्रु आहेत. जातीय समाज ऐवजी आंबेडकरांनी कोणत्या प्रकारचा समाज अभिप्रेत आहे असा प्रश्न निर्माण होते त्यांना स्वातंत्र्य समता बंधुता आणि न्याय या लोकशाही मूल्यांवर आधारित समाज हवा आहे. स्वातंत्र्यानंतर भारतात असमानता शोषण हिंसा परस्पर द्वेष जातीय आणि धार्मिक दंगे भ्रष्टाचार भाषावाद प्रांतवाद काही जातीत ऑनर किलिंग सारख्या अमानुष प्रथांचे ची निर्मिती स्त्रीभ्रूणहत्या स्त्रियांवरील वाढते बलात्कार राखीव जागांना विरोध गुंडागिरी दरोगे हत्या कोण इत्यादी ज्या सामाजिक समस्या निर्माण झालेले आहेत. त्याच जातीच्या ही मानसिकतेतून म्हणूनच या प्रश्नाचा निराकरणासाठी जातीसंस्थेचे ची निर्मूलन करणे आवश्यक आहे.

संदर्भ ग्रंथ

डॉक्टर प्रदीप मूलभूत समाजशास्त्रीय विचार श्री साईनाथ प्रकाशन नागपूर 16 जून 2014

डॉक्टर कऱ्हाडे बी एम समाजशास्त्रीय विचार पिंपळापुरे अंड पब्लिशर्स नागपुर जून 2010

मासिके सत्याग्रही विचारधारा जानेवारी 2012

# आदिवासी महिलांच्या दर्जावर आदिवासी जाती—जमातींचा होणारा परिणाम : एक अध्ययन

प्रा.डॉ.योगेश प्रल्हाद महाजन
धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी संचलित
लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय,जळगाव
मो. ७२७६७५७६०८ ,ईमेल : yogeshm75@gmail.com

**गोषवारा :**

आदिवासी समाजातील स्त्रियांचा दर्जा लक्षात घेताना त्या समाजातील पुरुषांचा दर्जा कोणता आहे, स्त्री व पुरुष या दोघांच्या सामाजिक दर्जाचे तुलनात्मक अध्ययन केल्यानंतरच स्त्रीयांच्या दर्जाबाबत आपण काही निष्कर्ष मांडू शकतो. महिलांचा दर्जा ठरवताना पुढील चार निकषांनुसार निश्चित विधानापर्यंतपोहोचणे सोपे ठरु शकेल. १) स्त्रियांना मिळणारी प्रत्यक्ष वागणूक २) स्त्रियांचा कायदेशीर दर्जा ३) स्त्रियांना मिळणारी सामाजिक कार्याची संधी. ४) स्त्रियांच्या कामाचे स्वरुप आणि व्यक्ती. वरील चार आधारांवर स्त्रियांचा दर्जा अवलंबून असतो. हे चारही घटक एकदुसऱ्यापासून स्वतंत्र असतात. काही समाजात स्त्रियांना चांगली वागणूक मिळत असेल परंतु त्याच वेळी काही समाजात तिला कायदेशीर दर्जा असेलच असे नाही. दक्षीण भारतातील 'तोडा' ही आदिवासी जमात पशुपालन व दुग्ध व्यवसाय यावर अवलंबून असते. या जमातीत दुग्धालयांना अत्यंत महत्व दिले असते. दुग्धालयास मंदिराप्रमाणे ते पवित्र मानतात. ते गाई—म्हशींची पूजा करतात, म्हशीचे दूध काढणे आणि त्यापासून विविध पदार्थ बनविण्याचे कार्य पुरुषच करतात. महिलांना दूध काढण्यास सक्त मनाई असते. दुधापासून तयार करण्यात आलेल्या वस्तुंना स्पर्श करण्यासही त्यांना मनाई असते. स्त्री दुग्धालयात गेल्याने दुग्धालय अपवित्र होते असा त्यांचा विश्वास असतो. म्हणजे याावरुन आपण असे म्हणू शकतो की, तोडा समुदायात आदिवासी स्त्रियांना अतिशय गौण स्थान प्राप्त होते. मात्र कौटुंबिक जीवनात स्त्रीयांना पुरुषांकडून मानाची वागणूक मिळत असते. म्हणजेच प्रत्येक समुदायात स्त्रियांना विविध प्रसंगी विविध प्रकारचा दर्जा प्राप्त होत असतो. आदिवासी समाजातील स्त्रियांचा दर्जा ठरवित असताना प्रत्येक जमातीचा स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक ठरते. स्त्रियांचा दर्जा ठरविताना मातृसत्ताक पद्धती, पितृसत्ताक पद्धती, आर्थिक सहकार्य या सर्व बाबींमधील स्त्रियांचा सहभाग व त्यांना मिळणारी वागणूक अत्यंत महत्वाची ठरत असते.

**बीजशब्द** : आदिवासी महिला, महिला दर्जा, महिलांची भूमिका

**प्रस्तावना :**

जगातील जवळजवळ सर्वच देशात आदिवासी जमाती अस्तित्वात आहे. आशिया, अफ्रिका आणि अमेरिका खंडातील देशात आजही मोठ्या संख्येने आहेत अदिवासी समाजात स्त्रियांची स्थिती अन्य समाजातील स्थिती या पेक्षा वेगळी आहे. मातृसत्ताक व पितृसत्ताक कुटूंब पध्दती स्वीकारलेल्या अदिवासी समाजात स्त्रियांचा दर्जा श्रेष्ठ असल्याचा दावा काही तज्ञांकडून होतो. तर आदिवासी स्त्रियाचा दर्जा कनिष्ठ असून तिला समाज व कुटुंबात कोणतेही स्वतंत्र नाही असा दावा दुसऱ्या शास्त्रज्ञांकडून होतो.

अमेरिकेतील प्रसिध्द मानसशास्त्रज्ञ जी. पी. मरडॉक यांच्या मते निलगिरी पर्वतावरील तोडा जमातील स्त्रियांचा दर्जा पुरुषांच्या तुलनेत भिन्न आहे निवडक समारंभ वगळता स्त्रियांना दुभत्या म्हशी जवळ व दुग्धालया जवळ जाता यत नाही. त्या परिसराशी कुठलाही संबंध ठेवता येत नाही समाजीक, धार्मिक, राजकीय व जादुटोणा विषयक कामकाज स्त्रियांना वर्ज्य मानले जाते. मरडॉक यांनी केलेल्या अभ्यासानुसार पोलीनेशिया बेटावरील **'सॅमोआन'** मध्ये आशियातील **'कजक'** अमेरिकेतील **'इरोक्वोइस'** आणि अफ्रिकेतील **'हॉटेनटॉट'** जमातीत व भारतातील **'संथाल'**, **'गारो'**, **'खासी'** इ. जमातीत देखील स्त्रियांना श्रेष्ठ स्थान दिले जाते.

निर्सगत: समाजाची एकूण अर्धी लोकसंख्या महिलांची असली तरी सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात त्यांचे स्थान आजही दुय्यम राहिलेले आहे. प्राचीन कालखंडात महिलांचा इतिहास काहीसा गौरवशाली वाटत असला तरी त्यांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान कधीच नव्हते आणि आजही नाही. मध्ययुगीन कालखंडात तर महिलांची स्थिती अधिकच दयनीय झाली. एकोणिसाव्या शतकाताल सुधारणावादी चळवळीचा काहीसा प्रभाव महिलांच्या दर्जावर निश्चित झाला आहे. परंतु त्यामुळे महिलांचे प्रश्न संपले नाहीत. आदिवासी महिलाही सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली असली तरी आदिवासी महिला या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शारीरिक, मानसिक दृष्टीकोनातून समाज व्यवस्थेत दुर्लक्षित अपेक्षित व उपेक्षित राहिलेल्या आहेत. आपला दर्जा व राहणीमान सुधारण्यासाठी आर्थिक घटक ही महत्वाचा ठरत असतो व त्यावरच व्यक्तीच्या गरजा पूर्ण होत असतात.

**संशोधनातील उद्देश :**

१) भारतातील आदिवासी स्त्रीयांचा दर्जा जाणून घेणे.

२) आदिवासी महिलांचा दर्जा ठरवणाऱ्या घटकांचे विश्लेषण करणे.

**गृहीतकृत्य :**

आदिवासींमधील विविध जाती जमातींमध्ये त्यांच्या पारंपारिक जीवन पध्दती व भुमिंकानुसार महिलांचा दर्जा बदलत असतो.

**संशोधनपध्दती :**

प्रस्तुत अध्यनासाठी व्दितीय स्त्रोताचा वापर केला असून त्या विषयासाठी संबंधीत नियतकालके संदर्भ ग्रंथ, शोधनिंबध, वर्तमानपत्र व इतर प्रकाशीत साहित्याचा आधार घेवून आदिवासी समुदायाची माहिती संकलीत केली असुन त्यानुसार मांडणी केली आहे.

**आदिवासी महिलांचा दर्जा ठरविणारे विविध घटक :**

आदिवासी समाजात स्त्रियांच्या दर्जावर सर्वसाधरणपणे मातृ—पितृ वंशीय आणि आर्थिक सहकार्य या गोष्टींचा परिणाम होतो. वरमुल्य ठरवितांना अनेक गोष्टी ठरविल्या जातात. वधुपक्ष व वरपक्षयांचा समाजातील दर्जा आणि त्यांनी आर्थिक परिस्थिती यावर वधुमुल्याचे प्रमाण हे कमी किंवा जास्त असते. सौदर्य,प्रकृती, कलाकौशल्य इ. वधूच्या वैयक्तिक गुणाच्या आधारावर वधुमुल्य ठरविले जाते, इतकेच नव्हे तर वधुच्या आईसाठी किती वधुमुल्य देण्यात आले होते ही बाब देखील विचारात घेतली जाते. वधुमुल्यांच्या पध्दतीमध्ये आर्थिक बाजुपेक्षा सामाजिक बाजू विशेष महत्त्वाची आह.

प्रत्येक समाजात आर्थिक कार्यांना विशेष महत्व आहे. आर्थिक कार्यात स्त्रियांचे किती योगदान आहे यावर समाजातील स्त्रियांचा दर्जा अवलंबुन असतो. आदिवासी समाजामध्ये अर्थोत्पादनाच्या आधारावर महिलांचा दर्जा निश्चित होत असतो. भारतात आज देखील अन्नसंचय करणाऱ्या काही आदिवासी जमाती आहेत. आपला उदरनिर्वाह करण्यासाठी आदिवासी आजही कंदमुळे, डिंक, फळे,झाडपाला, मध, लाख, क्रुमी, किटक इत्यादी प्रकारचे अन्नपदार्थ गोळा करून आपले जीवन जगतात. यासाठी कोणत्याही कौशल्याची गरज नसते. त्यामुळे स्त्री व पुरुष दोघेही अन्नसंचय समान पध्दतीने गोळा करतात. त्यामुळे अशा जमातीत स्त्री—पुरुषांचा दर्जा समान आढळून येतो. काही आदिवासी जमातींमध्ये अर्थोत्पादनाचा प्रकार शिकार करणे आहे. यामध्ये शिकार करणे हे अतिशय धाडसी व कष्टाचे काम आहे. परंतु स्त्रियांना ही कामे करणे खूपच कठीण असल्यामुळे सदर आर्थिक क्रियेत सहभागी होऊ शकत नाही. त्यामुळे त्यांचा दर्जा हा कनिष्ठ स्वरुपाचा आहे असे आढळून येते. भारतात कृषी व्यवसाय करुन अर्थ उत्पादन करणाऱ्या आदिवासी जमाती आहेत. या व्यवसायात स्त्री—पुरुष हे दोघे मिळूनही कामे करतात. या प्रकारच्या व्यवसायात स्त्रियांना चांगली वागणूक दिली जाते. अशा स्त्रियांचा दर्जा उच्च असतो. मध्यभारतातील संथाल, गौंड, बिरहोर या आदिवासी जमाती औद्योगिक क्षेत्रात कुशल कामगार म्हणून स्त्री—पुरुष हे दोघे काम करतात. दोघेही काम करीत असल्यामुळे त्यांचा दर्जा पुरुषांच्या दर्जा समान असलेला दिसून येतो.

- **मातृसत्ताक पध्दत आणि आदिवासी स्त्रियांचा दर्जा :**

भारतातील खासी व गारो या दोन आदिवासी जमातीमध्ये मातृवंशीय पध्दत आहे.ही जमात आसामच्या डोंगराळ भागात आढळते. मालमत्तेचा अधिकार कुटुंब प्रमुख आणि अनुवांशिक या सारख्या पदांचा अधिकार हा स्त्रियांकडे असतो. हे सर्व अधिकार एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित केले जातात. विवाहनंतर पती पत्नाच्या घरी राहण्यासाठी जातो व आपली सर्व कमाई पत्नीच्या हातात देतो. कटुंबप्रमूख म्हणून स्त्रिला अधिकार असल्यामुळे तीचा दर्जा उच्च आढळून येतो.

- **पितृसत्ताक पध्दत आणि आदिवासी स्त्रियांचा दर्जा :**

पितृवंशीय आदिवासी जमातीत वंश परंपरा ही पित्याकडून मुलाकडे निश्चित होते. विवाहनंतर पत्नी पतीच्या घरी जाते आणि त्याचे अधिकार मुलाला मिळतात. त्यामुळे पुरुषांचा दर्जा हा उच्च असतो तर काही ठिकाणी कनिष्ठ दर्जा दिला जातो असे आढळून येते.'थाऊ' जमातीत पुरुष हे पत्नीच्या मुठीत असतात कारण अशा स्त्रिया जादू मध्ये तज्ञ असतात व या स्त्रीयांचा दर्जा श्रेष्ठ असतो.

- **कृषी क्षेत्रातील स्त्रियांचा दर्जा :**

आदिवासी समाजाची काहीशी प्रगत अवस्था म्हणून कृषी अवस्थेकडे पाहिले जाते. कृषी व्यवसायात आदिवासी स्त्रियांना आर्थिक कार्यात सामावून घेणे क्रमप्राप्त ठरले म्हणून समाजात समान स्थान मिळाले. आदिम जगातील स्त्रिया व पुरुष शेतीच्या कामात योगदान देतात पण त्यांच्या श्रमाची विभागणी झालेली असते. प्रामुख्याने शेत नांगरणे, पिक कापणी, पीकाची राखणदारी ही अवजड व मेहनतीची कामे पुरुषांकडे असतात तर तण काढणे, धान्य स्वच्छ करणे यासारख्या कमी कष्टाची कामे स्त्रियांकडे असतात. एकंदरीतच कृषी क्षेत्रातही स्त्री—पुरुषांचा दर्जा विभिन्न स्वरुपात आढळून येतो.

- **स्त्री औद्योगीक श्रमीकाचा दर्जा :**

औद्योगिकरणाच्या प्रभावाने जगभरातील आदिवासी समाज व्यवस्था प्रभावित झाल्याचे दिसून येते. जंगलाचा ऱ्हास, वन संपत्तीची दुर्मिळता, वनसंपत्तीवर आधारित उद्योगधंद्यांचा विकास आणि आदिवासी भागातील रोजगारांच्या अभावांमुळे आदिवासी व्यक्ती उदरनिर्वाहसाठी औद्योगिक श्रमिक म्हणून भूमिका पार पाडू लागला. मात्र उद्योगधंद्यामध्ये स्त्री—पुरुषंना मिळणारा असमान मोबदल्यामुळे आदिवासी समाजात स्त्री—पुरुषांच्या दर्जात असमानता दिसून येते. खाण उद्योगात मजूर म्हणून, कापड उद्योगात हमाल म्हणून, बांधकाम उद्योगात मजूर म्हणून किंवा औद्योगिक क्षेत्रात वेठबिगार कामगार म्हणून काम करणाऱ्या आदिवासी स्त्री—पुरुषांना रोजगारीने मिळणारा मोबदला कमी जास्त असतो. मात्र फक्त परुष काम करीत राहिला व स्त्री आपल्या कुटूंबाचा सांभाळ करीत असली तर स्त्रियांच्या सामाजिक व कौटुंबिक दर्जात अवनती झाल्याचे दिसून येते.

- **आदिवासी स्त्रीयांची शैक्षणिक स्थिती :**

भारतातील जमाती मध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. त्यात पुरूषांपेक्षा स्त्रियांमध्ये साक्षरतेचा दर भिन्न आहे. एकूण जमातीमध्ये स्त्रियांच्या शैक्षणिक दर्जा भिन्न आहे. शिक्षण ही संस्था मानवी जीवनात महत्वपूर्ण आहे. शिक्षणाचे मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. ज्ञान टिकवणे व त्यांचे संवर्धन करणे हे काम शिक्षणाव्दारे केले जाते.

आदिवासी भागात तर महिला शिक्षणाची अतिशय वाईट परिस्थिती आहे. आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामळे मुलींचे शिक्षण हे अर्धवट राहते त्यामुळे त्यांच्या न शिकण्यामुळे त्यांच्या समाजावर अनेक प्रकारचे परिणाम होताना दिसून येतात जसे, दारिद्रयात वाढ, अज्ञान, निरक्षरता ह्यामुळे पुरुषांना पूर्ण अधिकार प्राप्त असतात. त्यामुळे स्त्रिया सर्व बाबीं पासून वंचित राहतात. शिक्षणाच्या अभावामळे विवाहसाठी असलेले कायदेशीर अट पाळली जात नाही.त्यामुळे आजारी, रोगट, कुपोषित बालके जन्माला येतात व आदिवासी क्षेत्रात बालमृत्यूचे प्रमाण अधिक आढळून येते.

- **संशोधनातील निष्कर्ष :**

वरील गोष्टीवरुन असे स्पष्ट होते की आदिवासी जमातीत स्त्री व पुरुष यांच्यामध्ये श्रमविभाजन हे अतिशय योग्य प्रकारे केले जाते व बऱ्याच अभ्यासकांच्या मते पुरुष सर्वसाधारणपणे जड कामे करतात तर स्त्रीया या हलकी कामे करतात. ही स्थिती आर्थिक व सामाजिक दृष्टीकोनातून दिसून येते. यावरुन स्त्री व पुरुषांच्या आर्थिक क्रियांच्या आधारे महिलांचा दर्जा निश्चित करणे योग्य ठरत नाही.

आदिवासी स्त्रियांचा दर्जा आदिवासी समाजाचे एक महत्वपूर्ण असे लक्षण आहे आदिवासी जमातीत प्रथा रीतिरिवाजनुसार स्त्रियांचा दर्जा पुरुषांपेक्षा कनिष्ठ स्वरुपाचा आहे असे काही वेळा मत व्यक्त केले जाते. याउलट आदिवासी स्त्रियांचा दर्जा पुरुषांच्या बरोबरीचा आहे असेही मत काही वेळा व्यक्त केले जाते. आदिवासी स्त्री समाजीतील स्त्रीपेक्षा स्वंतत्र आहे असे मत काही मानव शास्त्रज्ञांनी मांडले म्हणजेच समाजात स्त्रियांना चांगली वागणूक मिळते तर काही समाजात स्त्रियांना समान वागणूक मिळते. समाजापरात्वे व जमातीपरत्वे आदिवासी स्त्रियांचा दर्जा कनिष्ठ व श्रेष्ठ अशा स्वरुपाचा आहे असे मत व्यक्त केले जाते.

**संदर्भ ग्रंथ सुची –**

आकारे बी. एन. आदिवासी आणि सामुदायिक विकास योजना, पिंपळापुरे डिस्ट्रीब्युटर्स नागपूर, प्रथम आवृत्ती
आदिवासी साहित्य सम्मेलन, अध्यक्षीय भाषणे (संकलन गारे गोविंद)
आगलावे प्रदिप – आदिवासी समाजाचे समाजशास्त्र श्री साईनाथ प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती
इंगळे जे. एस. आदिवासी बालकांच्या समस्या, हाकारा, म. मा. वि. परिषद, पुणे,
कुळकणी शौनक (२००९) महाराष्ट्रातील आदिवासी, पुणे : डायमंड पब्लिकेशन
काचोळे दा. धो. आदिवासी समाजशास्त्र, कैलास पब्लीकेशन औरंगाबाद प्रथम आवृत्ती
खडसे भा. कि. भारतीय समाज, जाती व वर्ग : भारतीय आदिवासी, य.च.म.मु.विद्यापीठ नाशिक
नाडगोंडे गुरुनाथ, भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे,
जोशी पंडित, शास्त्री महादेव, (१९७०). भरतीय संस्कृती कोश, खंड सहा., भारतीय संस्कृती कोश मंडळ पुणे.
लोटे रा. ज. (२०१०). आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, नागपूर : पिंपळापुरे पब्लिकेशन ॲण्ड कं. पब्लिशर्स.
संगवे विलास (१९७८). आदिवासींचे सामाजिक जीवन, मुंबई : पॉप्युलर प्रकाशन.
हाकारा – महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# भारतीय उद्योग व कामगार

डॉ. विनोदकुमार सुकराम चोपकर
सहाय्यक प्राध्यापक महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, यवतमाळ.
Email – vchopkar82@gmail.com,Mob. 9403066806

**प्रस्तावना :—**

भारताच्या औद्योगिक विकासात उद्योग व उद्योगात काम करणाऱ्या कामगारांचा मोलाचा वाटा आहे. वाढत्या औद्योगिकरणामुळे आणि शहरी करणामुळे मानव समाजात अनेक समस्या निर्माण होतात. उद्योगात उत्पादन प्रक्रियेतील संशोधन व विकास प्रयत्नामुळे नविन यंत्र व शक्तीचा वापर मोठया प्रमाणात सुरू झाला. यात धोकायुक्त यंत्रणाचा वापर कितीही काळजी पूर्वक करण्यात आला तरीही यातून लहान मोठया स्वरूपाचे अपघात घडून येतात व कारखान्याच्या उत्पादन प्रक्रीयेचा ऱ्हास होवू लागतो. अशा कारणामुळेच उद्योग बंद पडून कामगारांच्या समस्या निर्माण होतात किंवा उद्‌भवतात.

उद्योगाची निर्मिती कधी झाली असावी यावर चर्चा करतांना प्रा. पी. गिसर्बड असे म्हणतात की, उद्योग म्हणजे आपल्या भौतिक हेतुच्या पुर्ततेसाठी मानवाने विविध साधनांचा वापर करण्यासंबंधी लावलेला नविन शोध आहे. असे मानले तर मानवाच्या निर्मिती बरोरच उद्योगांचीही निर्मिती झाली असावी. दुसऱ्या शब्दात मनुष्य जाती इतकाच उद्योगही प्राचीन आहे. मनुष्य हा बुध्दीमान प्राणी असल्यामुळे आपल्या विविध गरजाच्या पूर्ततेसाठी त्याने निर्माण केलेली विविध अवजारे 'उद्योग' या संज्ञेत पात्र ठरतात. उदा. पाशान युगात शिकारीसाठी मानवाने दगडापासून हत्यारे बनविण्याची क्रिया 'उद्योग' म्हणून मानली जाईल.

**उद्देश :—**

**१) भारतीयप्राचिन व आधुनिक काळातील उद्योगांचा आढावा घेणे**

**२) भारतातील स्थायी कामगारांची वैशिष्टे अभ्यासणे**

**प्राचिन औद्योगिक उत्पादन व्यवस्था :**

प्राचिन मानवी समाज आणि प्राचिन मानवी संस्कृतीचा जेव्हा आपण अभ्यास करतो तेव्हा त्या काळात औद्योगिक उत्पादन प्रक्रियेत हाताने चालविल्या जाणाऱ्या यंत्राचा ज्याप्रमाणे वापर केल्या जात असे,त्याचप्रमाणे पशू शक्तीचा पण वापर केल्या जात असे. उदा. कापड विणण्यासाठी हातमाग, शेतीला पाणी देण्यासाठी चाकावर चालणारी मोट व जनावरांनी ओडवण्याचा नांगर इत्यादी या काळातही स्वत:च्या गरजेपेक्षा जास्त झालेल्या उत्पन्नाचा साठा केला जात असे व या साठा केला जात असलेल उत्पादीत मालाचा वापर वस्तु विनीमयासाठी आणि व्यापारासाठी केला जात असे. या काळातही कच्चा माल मिळविणे, त्याचे पक्या मालात रूपांतर करणे. पक्या मालाला बाजार पेट मिळविणे, बाजार पेठेपर्यंत कालाच्या वाहतुकीची व्यवस्था करणे इत्यादी गोष्टी प्राचीन औद्योगिक उत्पादन व्यवस्थेमध्ये कराव्या लागत.

**आधुनिक काळातील भारतीय उद्योग :**

इग्लंड मध्ये झालेल्या औद्योगिक क्रांती नंतर भारतीय उद्योग हा पूर्णपणे नष्ट झाला हे आपण पाहिले. यंत्रोत्पाउत्पादन पध्दतीपुढे हस्तोउद्योग टिकणे शक्य नव्हते. ब्रिटीशांचे भारतात आगमन झाल्यानंतर ब्रिटीश राज्यकर्त्यांनी त्याचया दृष्टिने कायद्याच्या यंत्रोत्पादनास प्रोत्साहन देण्याचे धोरण स्विकारले.त्यामुळे भारतात आधुनिक यंत्रोत्पादनाची मुहर्तमेढ रोवण्याची कार्ये ब्रिटीशांनी केले. याबद्दल वाद नाही. १८५० ते १८६० हे दशक भारतीय आधुनिक उद्योगाची सुरूवात करणारे दशक होय. याच काळात कलकत्यास तागाच्या गिरण्या ;श्रनजम उपससेद्ध सुरू झाल्यात. याच काळात भारतीय रेल्वेची सुरूवात झाली. बिहार मधील खानीची (शहरे) कलकत्ता शहराशी जोडली गेल्यामुळे कलकत्ता येथे तागाच्या गिरण्या पेपर उद्योग, अन्य व्यवसाय यांना आपला विस्तार करण्याची संधी मिळाली. याच काळात परदेशी व्यापारांनी मुंबईत आणि अहमदाबाद मध्ये कापड गीरण्या, पेपर उद्योग सुरू केल्यात. कानपूर येथे लोकर आणि कातडी

यांचे कारखाने सुरू करण्यात आले. हे सर्व कारखाने ब्रिटीश मालकांचे होते. परंतु सर्व प्रकारचा कच्चा माल व गिरण्यात काम करणारे कामगार मात्र भारतीय होते.

भारतीय मालकीचे उद्योग खऱ्या अर्थाने सुरू करण्याचे श्रेय श्री जमशेदजी टाटा यांच्याकडे जाते. त्यांनी इ.स. १९११ मध्ये पोलादाचा कारखाना स्थापन केला. परन्तु एकदंरीत भारतीय उद्योगाच्या विकासाकडे पाहण्याचा ब्रिटीशांचा दृष्टीकोन उदाशीन होता व ही परिस्थिती पहिल्या महायुध्दापर्यंत होती. पहील्या महायुध्दाच्या काळात ब्रिटीश राज्यकर्ताचा भारतातील विकशीत उद्योगामुळे अनेक प्रकारच्या गंभीर अडचणीला सामोरे जावे लागले. विशेषत:हा उद्धकाळात समुद्रमार्ग किंवा जलमार्ग पूर्ण बंद करण्यात आल्यामुळे पक्क्या मालाची आयात व कच्या मालाची निर्यात करणे अवघड झाले. त्यामुळे भारतातील ब्रिटीश लष्करांनी अनेक अवघड प्रश्नांना तोंड दयावे लागले. त्यामुळे पहिल्या महायुध्दानंतर भारतातच विविध उद्योग सुरू करण्याच्या धोरणाला प्रोत्साहन देण्याशिवाय गत्यंतर नव्हते.

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर खऱ्या अर्थाने भारतीय उद्योगाला प्रोत्साहन मिळाले. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर पंडीत जवाहरलाल नेहरूच्या मंत्रीमंडळाने औद्योगिक क्षेत्रात व पेपर उद्योगात भारत स्वयंपूर्ण व्हावा म्हणून औद्योगिक विकासाचा महत्वपूर्ण कार्यक्रम घेतला याचा परिणाम असा झाला की निस्तेज व भासणाऱ्या भारतीय उद्योगाने नेत्रदिपक प्रगती केली. इ.स. १९५१ नंतरच्या दोन दशकात औद्योगिक उत्पादन २४० टक्के वाढझाल्याचे दिसून येते. जरी औद्योगिक क्षेत्रातील वाढ सर्व प्रकारच्या उत्पादन गटामध्ये सली तरी ही वाढ पेपर उद्योग सुतगीरणी उद्योग, पेट्रोलीयम उत्पादने, अल्युमिनियमची उत्पादने, धातु उत्पादने, विजेची आणि अन्य यांत्रिक उत्पादने यात प्रामुख्याने होती.

पंचवार्षिक योजनामुळे भारतीय उद्योगाची सुयोग्य प्रगती झाली. इ.स. १९७० ते १९८४ या काळात औद्योगिक उत्पादनाचा वार्षीक दर सरासरी ५ टक्के होता. ही प्रगती सर्व प्रकारच्या औद्योगिक उत्पादनाच्या संदर्भात झाली होती.पंचवार्षिक योजनामुळे भारतातील औद्योगिक विकासात एक प्रकारीच सुत्र पध्दत आली. भारतीय उत्पादन वाढीचा विचार करता ही वाढ संख्येत्म जशी आहे तशी गुणात्मक आहे. वेगवेगळया औद्योगिक उत्पादनात लक्षणीय वाढझाली. इंधनासाठी उपयुक्त ठरणारी अनेक उपकरणे रेल्वे, बस, आणि दळणवळणासाठी उपयुक्त अशी यंत्रे किंवा उपकरणे निर्माण करण्याच्या क्षेत्रात भारताने आघाडी मारली असून पेपर उद्योग, सिमेंट उद्योग, साखर उद्योग इत्यादी क्षेत्रात भारताने स्वयंपूर्णता प्रापत केली आहे. औद्योगिक क्षेत्रात भारताने केलेली महत्वाची कामगिरी म्हणजे सरकारी क्षेत्रात सुरू केलेले काही महत्वपूर्ण उद्योग होय. .

**औद्योगिक कामगारांचा स्थायी वर्ग :**

देशाचा औद्योगिक विकास जलद गतीने घडवून आणण्याकरीता कामगारांचा एक स्थायी वर्ग निर्माण झाला. स्थायी कामगार वर्ग निर्माण होण्याकरीता कामगारांनी त्यांना मिळालेल्या कामाला चिकटून राहायला हवे. त्यांचे हित संबंध कोणत्याही प्रकारे जमिनिशी निगडीत नसावे तसेच उपजिविके साठी ते त्यांना मिळणाऱ्या मजुरीवरच अवलंबून असावे. किंवा कामगार चौकशी समितीने किंवा रेन्हे समीतीने आपला अहवाल सादर करेपर्यंत औद्योगिक कामगारांचा स्थायी वर्ग आपल्या देशात निर्माण झाला नव्हता हे यापूर्वी केलेल्या विवेचनावरून स्पष्ट झाले आहे. त्यानंतर राष्ट्रीय जिवनाच्या सर्व क्षेत्रामध्ये परिवर्तने घडून आली आहे. ह्या परिवर्तनाचा परिणाम म्हणून आपल्या देशात औद्योगिक कामगाराचा स्थायी वर्ग निर्माण झाला आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रीय जीवनाच्या सर्व क्षेत्रात घडून आलेल्या विभिन्न परिवर्तनामुळे औद्योगिक कामगाराचे स्थायी वर्ग निर्माण होण्याच्या प्रक्रियेचा व्रग बराच वाढला आहे. श्री के.एम. व्हेलू यांनी १९६४ मध्ये राजस्थान मधिल कोटा या शहरामधील उद्योगामध्ये राबणाऱ्या कामगारांची पाहणी केली. कोटा येथील औद्योगिक केंद्रामधील कामगारापैकी ५७ टक्के कामगार हे खेडयामधून रोजगार मिळविण्याकरीता आले होते. असे श्री. वेद यांना आढळून आले. श्री. बलदेव शर्मा यांनी १९६५ मध्ये मुंबई मध्ये मोटार उद्योगात काम करणाऱ्या कामगाराचा अभ्यास केला.फक्त ४७७ कामगारांना ग्रामीण पार्श्वभूमी होती.हा श्री. शर्मा यांच्या अध्ययनाचा महत्वपूर्ण निकर्ष आहे. १९६८ मध्ये श्री. आर.शी. गोयल यांनी गुजरात मधिल वस्त्रोउद्योग काम करणाऱ्या कामगारांचा अभ्यास केला.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

**भारतातील स्थायी कामगारांची वैशिष्टे :**

सर्व देशातील औद्योगिक कामगारांचे हीत संबंध तसचे ह्या वर्गाची रचना व स्वरूप समान आहे असा विचार प्रवाह आहे.औद्योगिक कामगाराचा वर्ग निर्माण होण्याच्या प्रक्रियेचे स्वरूप प्रत्येक देशात भिन्न राहत असल्यामुळे तसेच या विशिष्ट प्रक्रियेवर तेथिल आर्थिक, राजकिय व सामाजिक परिस्थितीचाही अपरिहातेने परिणाम होत असल्यामुळे प्रत्येक देशातील औद्योगिक कामगाराच्या वर्गात ;प्दकनेजतपंस चतवसनजंतपजमद्ध वेगळेपणा आढळूण येणे अगदी स्वाभाविक आहे. भारतातील प्रमुख वैशिष्टे पुढीलप्रमाणे आहे.

**अ)एकात्मतेचा अभाव :—**

भारतातील उद्योगामध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या एक महत्वपूर्ण लक्षण म्हणजे एकात्मतेचा अभाव हे मानायला हवे. कामगारामध्ये एकात्मतेचा अभाव आढळून येण्याला खालील कारणे कारणीभूत आहेत.

१)भारताच्या सामाजिक जीवनात धर्म व जात या दोन महत्वाच्या सत्य आहेत.दुदैवाने या शक्तीमुळे कामगाराचा वर्ग विभागण्यात आला.

२)मोठया औद्योगिकरणात काम करणाऱ्या कामगार हे निरनिराळया प्रातांमधून आलेले असतात. त्याची भाषा वेगळी वेगळी असते.भाषाची विभिन्नाता हे विकासाला औद्योगिक कामगारामध्ये एकात्मतेचा अभाव असण्याला कारणीभूत ठरते.

**ब)निरक्षरता :—**

निरक्षरता हे भारतीय कामगाराचे प्रमुख वैशिष्ट होय. १९८१ च्या जनगनणेनुसार भारतात साक्षरतेचे प्रमाण फक्त १७ टक्के होते.याचाच अर्थ असा की भारतातील ६३.८३ टक्के लोकसंख्या निरक्षर आहे. ज्या देशातील बहूसंख्य लोक अशिक्षित आहेत.त्या देशातील औद्योगिक क्षेत्रात बहूसंख्य निरक्षर असणे स्वाभाविक आहेत.मेहता समितीच्या अहवालानुसार चहाची मळे, कोळसा खानी, सुत उद्योग, कापड उद्योग, पेपर उद्योग आणि लोखंड व पोलाद उद्योग या उद्योगामध्ये काम करणाऱ्या कामगारापैकी ७२ टक्के कामगार निरक्षर होते. अलिकडे भारतीय श्रमीकांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण उत्तोरोत्तर कमी होत आहे.ही एक चांगली बाब आहे. श्रमिकांमध्ये निरक्षराचे प्रमाण कमी झाल्यामुळे श्रमिकांना प्रशिक्षणाचे महत्व समजेल. व्यसनाचे प्रमाण कमी होईल.गैर हजेरीचे प्रमाण कमी होईल.जबाबदारीच्या भावनेच्या विकास होईल. राजकिय जागरूकता वाढेल व त्यांच्या हित संबंधाची जोपासना करता येईल.

**क)अनियमित उपस्थिती :—**

भारतातील बहूसंख्य कामगार ग्रामीण भागातून आलेले असतात. खेडयात त्यांची शेती, घर, कुटुंब असतात. त्यामुळे मिळेल ती संधी कामगार घेतो. निम्य जीवनमान कारखान्यातील कोदंड वातावरण, गचिच्छ वस्तितील अतंत्य वाईट परिस्थिती व तिव्र जीवन संघर्ष अशा विविध कारणामुळे कामगारांचे आरोग्य ठासळते व त्यामुळे आपल्या कामावर नियमित हजर राहू शकत नाही. कारखान्यातील रात्रपाळी, कारखान्यात घडून येणाऱ्या अपघात, मालकाकडून दिली जाणार वागणूक, धार्मिक उत्सव, सामाजिक चालिरीती व कौटुंबिक अडचणी ह्या कारणामुळे कामगाराच्या उपस्थितीवर परिणाम होतो.

**ड)निम्न जीवनमान :—**

मजुरीचा अल्पदर अनियमित उपस्थिती, विभिन्न सामाजिक प्रथा व व्यसनाधिनता अशा विभिन्न कारणामुळे भारतातील बहूसंख्या कामगारांना निम्न प्रतिचे जीवन जगावे लागते. कामगाराचे जीवनमान आणि त्यांची कार्यक्षमता यामध्ये फार जवळचा संबंध आहे. निम्न जीवनमान असणाऱ्या औद्योबिक कामगाराची कार्यक्षमता वरच्या दर्जेचे राहू शकत नाही.

**इ)कामगाराची अकार्यक्षमता :—**

तुलनात्मक दृष्टीकोनातून विचार कला असता पाशात्य देशातील कामगाराच्या तुलनेत भारतातील कामगार कमी कार्यक्षम आहे असे म्हटले जाते. एका अंदाजानुसार कापड गीरणीत काम करणारा एक कामगार जपान मध्ये २४०, इंग्लड मध्ये ५४० ते ६०० व अमेरीकेत १,१२० पिडंल्सकडे लक्ष देवू शकतो. भारतीय कामगार मात्र १८० पिंडल्सकडे पाहतो. भारतातील एक

कामगार एका वेळेस फक्त दाने मागावर काम करू शकतो. तर इंग्लड, अमेरीकेतील कामगार अनुक्रमे ६ व ९ मागावर काम करू शकतो.

**फ)दैववादी प्रवृत्ती :—**

भारतीय शेती निसर्गाच्या कृपेवर अवलंबून असल्यामुळे भारतीय शेतकऱ्यांची प्रवृत्ती दैववादी झाली आहे. परंतु औद्योगिक क्षेत्रात तसे नसतांना देखील भारतातील औद्योगिक श्रमीक दैववादी असल्याचे आढळून येते. निरक्षरता, अज्ञान, जातीभेद, दारीद्रय, सामाजिक व आर्थिक विषमता इत्यादी कारणामुळे भारतातील कामगार दैववादी प्रवृत्तीचे झाले आहेत. अशा या प्रवृत्तीमुळे प्रगती किंवा विकासाकरीता लागणाऱ्या भावनेचा अभाव आढळून येतो.

**ग)श्रमिकांची निर्धनता :—**

भारतातील बहूसंख्य श्रमिक गरीब आहेत. श्रम आयोगाच्या अहवालानुसार भारतातील एकूण औद्योगिक श्रमिकांपैकी जवळपास दोन—तीन श्रमिक कर्जबाजारी आहेत. हे कर्ज त्याचया पगाराच कितीतरी पट आहेत. उपभोग्य वाढत्या किंमती व अपूरे उत्पन्न यामुळे कर्जाचा भार वाढतच जातो. प्रा. रॅगनर नर्क्स यांच्या मते, गरीबीचे हे सतत चक्र सुरू असतात. ते म्हणतात पैश्या अभावी पुरेसे अन्न मिळत नाही. शारीरिक दृष्टया दुर्बल णल्यामुळे त्यांची कार्यक्षमता कमी होते. तसेच निर्धन कामगार समस्यामुळे कामगार संघ सुध्दा प्रभावी ठरत नाही.

**ह)ग्रामीण पार्श्वभूमी :—**

उद्योगधंदयामध्ये बहूसंख्य कामगारांचा जन्म खेडयात झालेला असतो. त्यांचे तारूण्य हे तेथेच गेलेले असते. प्रतीकुल परिस्थितीमध्ये त्यांना खेडयात काम मिळत नसल्याने ते खेडयात येत असतात. कारखान्यात काम करण्याच्या कामगाराचे शरीर शहरात असले तरी मन मात्र खेडयात असते. त्यामुळे मिळेल ती संधी घेवून त्या संधीचा फायदा घेवून ते खेडयात जातात तेथे काही दिवस घालवतातव पुन्हा शहरात येतात. अशाप्रमाणे कामगारांची शहराकडून खेडयाकडे व खेडयाकडून शहराकडे ये—जा सुरू असते.

**निष्कर्ष :**

सारांश रूपाने बोलावयाचे झाल्यास स्वातंत्र्यप्राप्ती नंतर खऱ्या अर्थाने भारतात आधुतिनक उद्योगाचा विकास झाला. आज भारतात कारखाना उत्पादन पध्दती पूर्णपणे रूजल्याचे दिसून येते. आजही भारतातील श्रमिक वर्गाना अधिक कष्ट व श्रम करावे लागतात.पण त्यामानाने मोबदला मिळत नाहि सध्याच्या कोविड —१९ च्या काळात कामगाराच्या वास्तविक जीवनाचे दर्शन झालेले आहे. व यातून योग्य तो मध्यम मार्ग काढणे आवश्यक ठरते.

**संदर्भग्रंथ सूची :**

आगलावे प्रदीप.(१९९७). *आधुनिक भारतातील समस्या.*नागपूर : विद्या प्रकाशन.
बंसन एम.आर.*सेविवर्गीय प्रबन्ध व औद्योगिक संबंध.* मेरठ :.फ्रेंडस पब्लीकेशन.
देशपांडे सु.वा. (१९९४).*गुमास्ता कायदा १९४८.* ब्ठॅम् च्इसपबंजपवदण
गोखले शरदचंद्र. (१९७६).*कामगार कल्याण.* पुणे : विद्या प्रकाशन.
कर्णीक व.भ., *'कामगार संघ व औद्योगिक संबंध'*, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.
कुलकर्णी पी.के. *औद्योगिक श्रमशास्त्र.* नागपूर : मंगेश प्रकाशन

# आदिवासीं समोरील आव्हाने व सामाजिक विकास :एक अध्ययन

डॉ.विजया निळकंठ कन्नाके
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख जे.एम.पटेल कॉलेज भंडारा
मो.नं. ९७६५३३०१५३vijayawuike@gmail.com

**प्रस्तावना :**

वैज्ञानिकांच्या अध्ययनानुसार,वेदशास्त्र,शिलालेख,जीवाश्म,पृथ्वीच्या संरचनात्मक विज्ञान,जेनेटिक अध्ययन,डीएनएच्या संबंधाच्या अनुशंघाने मानव जातीची उत्पत्ती प्रथम गौंडवाना वर झाल्याचे सिध्द झाले.भारतात गोंड कोरकु समाज प्रथम अस्तित्वात असल्याचे पुरावे आहेत. भारतात काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत विविध रंगवर्णाचे लोक आहेत.रंगवर्ण हा उच्च किंवा निच असा भेद करीत नाही.डीएनएच्या चाचणी वरून आर्य व द्रविड एकच असल्याचे आढळले.भारतीय ग्रंथानुसार आर्य ही जात नसून विशेषण आहे.भारतीय लोकात अनुवंशिक गुणसुत्र सापडतात व हे डी.एनए गुणसुत्र कोणत्याही देशातील लोकांमधे आढळत नाही.जगात सर्वत्र आदिवासी जमात आढळते व विभिन्न नावाने संबोधल्या जाते.अमेरिकेत रेड इंडियन्स, ऑस्ट्रेलियातील एबोरेजिन्स, युरोपातील जिप्सी असून सर्वात जास्तसंख्या आफ्रिकेत असून त्यानतंर भारतात ही जमात जास्त आढळते. आदिवासी जमातीचा इसवीसनपूर्व काळातील ग्रीकनगरराज्यांशी संबंधीत ग्रंथात उल्लेख आढळतो.ए.व्ही.ठक्कर यांनी आदिवासींना मूळचे रहिवासी असे संबोधले.

**गिलिन आणि गिलिन यांच्या मते:**“एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिकजीवन जगणाऱ्या स्थानीय गटांच्या समुच्चयाला आदिवासी समाज असे म्हणतात.”

१९६२मधे शिलॉग येथिल आदिवासी समीतीच्या परीषद मधील व्याख्या :“आदिवासी समुदाय हा एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणारा असा एक सजातीय गट आहे की,ज्यातील सभासद एक भाषा किंवा बोली बोलतात.त्यांचे एका विशिष्ट भुप्रदेशात वास्तव्य असते.हे लोक विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या दृष्टिने मागासलेले असतात. अक्षरओळख नसलेल्या व रक्तसंबंधावर आधारित, सामाजिक व राजकीय रीतिरिवाजांचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला आदिवासी समुदाय असे म्हणतात.”

‘सामाजिक परीवर्तन म्हणजे दिर्घकाळ बदल असून समाजातील परस्पर संबंधात,वर्तन पध्दतीत,किंवा जीवनमुल्यात स्थायी स्वरूपाचा बदल होय.सामाजिक बदलांचा समाजरचनेशी संबंध असतो.

**स्वातंत्र्यपुर्व काळातील भारतीय समाज :**

रूढी,रीती,परंपरा यांच्यात गुरफटलेला समाज होता.धर्मावर आधारीत जातिव्यवस्थेला महत्व दिल्या जात असे. भारतीय समाजरचना विषमतेवर आधारीत असल्याने स्त्री कमी दर्जाची तर पुरूष उच्च दर्जाचे मानले जात होते.धर्मात संकुचितपणा,द्वेष व संघर्ष मोठया प्रमाणात असल्याने क्षुद्रांचा जास्त वापर करून घेण्यात आला.

**स्वातंत्र्यकाळातील भारतीय सामाजीक परीवर्तन आणि शिक्षणाची भुमिका :**

समाज दारीद्रय आर्थिक विषमता,वैचारीक गुलामगिरीने ग्रासला होता.अनेक वर्ष स्पृश्यांनी अस्पृश्यांना पशुंपेक्षाही वाईट वागणुक दिली जात होती.

**स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय समाज :**

इंग्रजांनी १५० वर्ष राज्य केल्याने पाश्चात्यीकरणांचा प्रभाव जाणवतो. त्यामुळे शहरीकरण व औद्योगीकरण झाल्याने भारतीय जीवनावर परीणाम झाल्याचे आढळले मात्र समाजवाद आणण्यात अपयश आले.समाजवाद म्हणजे शोषणापासुन मुक्तता,प्राथमिक गरजा पुर्ण होणे,प्रत्येकाला रोजगार मिळणे,शिक्षण मिळणे गरजेचे आहे.याकरीता समाज व सरकार यांनी जबाबदारीने कार्य करणे गरजेचे आहे.आपल्या घटनेत धर्मनिरपेक्षतेच्या अनुशंघाने धार्मिक विधी,धर्माचरण,धर्मप्रसार करण्याचे स्वातंत्र्य,नोकरीच्या समानसंधी,भेदभावापासुन संरक्षण मिळणे गरजेचे आहे.

**संशोधनाचा आढावा :**

**सर किथ जोसेफ** :"ज्या परिस्थितीमुळे सुप्त सामार्थ्याचा विकास होण्यास अडथळा निर्माण होतो ती अवस्था होय. "[१] व्यक्तिगत दोष,निराशा,दुर्बलता,दारिद्रय,मानसिक,आर्थिक,सामाजिक कुचंबणा,अन्यायाने अशी अवस्था निर्माण झाल्याचे मत मांडले.वर्णव्यवस्थेमुळे अस्पृश्यांना हिन वागणूक दिल्या जात व सामाजिक,राजकिय क्षेत्रात,मानवी हक्का पासूनतसेच सुधारणा,विकास,शिक्षण,प्रगती पासून देखिल वंचित ठेवण्यात आले.

सर्व घटकराज्यांच्या आदिवासी उपाययोजनातील येणाऱ्या भागातील एकुण आदिवासी संख्या ५१०.६७ लाख असून यांना मुख्या प्रवाहापासून दुर ठेवण्यात आल्याने स्वविकास न साधू शकल्याने सांस्कुतिक मागासलेपणामुळे आदिवासी संबोधण्यात आले.पाचशेपेक्षा अधिक जनजाती डोंगराळ भागात वास्तव्याला असल्याने त्यांचे जीवन मागासलेले आहे.शहरीकरणापासून दुर असल्याने व आदिवासी निसर्गप्रेमी असल्याने त्यांची शेती निर्सगावर अवलंबून असल्याकारणाने मागासलेपणा आढळतो.संस्कृतीचे जतन केल्या जाते.इतरांच्या तुलनेत आर्थिक,सामाजिक,शैक्षणिक दृष्टया मागासलेले आढळतात.मातृसत्ताक पध्दती अजुनही आढळते. संथाल,नागा,गोंड,खासी,भिल्ल,थारू : **बंगाल,ओरिसा,बिहार,आसाम या भागात**,भिल्ल: **मध्यप्रदेश,महाराष्ट्र,राजस्थान या भागात**,नागा : **आसाममधील डोंगराळ भागात**,गोंड: **मध्यप्रदेश,नागपूर,नर्मदा घाटी** या भागात,खासी : **शिलॉग,चेरापुंजी या भागात आढळतात.**

**मागासलेपणाची कारणे :**

आदिवासी हे निसर्गपुजक स्वच्छंदी जीवन जगत असल्याने आधुनिकतेचे बंधन त्यांना जाचक वाटतात ते नेहमी आधुनिकतेच्या दुर राहण्याचा प्रयत्न करत होते.दळणवळणाच्या अभावाने शहरीकरणापासुन दुर राहिल्याकारणाने आधुंनिकतेचा स्विकार करण्यास तयार नसल्याने शिक्षणापासून देखिल वंचित राहावे लागले.त्याकारणाने मागासलेपणा वाढत गेलेला आढळतो. दारिद्रय व अज्ञानामुळे त्यांची जास्त पिळवणुक करण्यात आली त्यामुळे असहय वेदना,दारिद्रयामुळे अधिकच मागास होत गेला.शासनाकडुन शिक्षणात पुढे आणण्यास फीची सवलत,राहणे व जेवणाची मोफत सोय,शालेय साधने,गणवेश,उच्च परीक्षांकरीता मोफत मार्गदर्शन अश्या विविध सोयी उपलब्ध करून दिल्या जात आहे.

**समस्या:**

**आर्थिक समस्या** : चातुवर्ण समाजव्यवस्थेमुळे दलितांना हिन दर्जाचे कामे करण्याची प्रथा पाडली होती.त्या कारणाने आर्थिक विकास होवू शकला नाही.परावलंबी जीवन त्यांना जगावे लागले. त्याकारणाने आर्थिक विकासाची दरी खोल निर्माण झाल्याने आताच्या परीस्थितीत देखिल त्यांचा पाहिजे त्याप्रमाणात विकास होवू शकला नाही.शिक्षणाअभावी शोषणाचे प्रमाण वाढलेले आढळले.

**सामाजिक दर्जात सुधारणा** :आज दलितांना घटनेने समान अधिकार दिल्याकारणाने सामाजिक विकास झाल्याचे आढळते.आजही समाजात पाहिजे त्या प्रमाणात समानता प्राप्त झाल्याचे आढळत नाही.परतुं व्यवसाय,शिक्षण,करमणुक या ठिकाणी काही प्रमाणात समानता प्राप्त झाल्याचे आढळते. समानतेचा विचार पुढे येत असल्याचे जाणिव निर्माण होत आहे.

**शिक्षणापासून अलिप्तता** :वर्ण व्यवस्थेमुळे दलितांना शिक्षणापासून वंचित ठेवल्या जात होते.प्रवेश मिळाला तरी हिनतेच्या भावनेने हीन दर्जाची वागणुक दिली जात होती.पंरतु घटनेने अधिकार प्राप्त झाल्याने शिक्षणात विकास होत आहे.

**आरोग्य विषयक समस्या:**विश्वदारिद्रयामुळे पोटभर अन्न प्राप्त होत नसल्याने आरोग्याबाबत बऱ्याचसमस्या कुपोषणाच्या आढळल्या.वाईट व्यसन,वैद्यकीय उपचार वेळेवर प्राप्त न होणे,अज्ञान,पैश्याचा अभाव या कारणाने आरोग्याच्या समस्या दुर करणे कठीन असल्याचे निदर्शनात आले.आता मात्र आशा वर्करच्या माध्यमातून स्वच्छतेबाबत प्रशिक्षण,फिरते दवाखाने,रोगनिवारण केंद्र,प्रसुतीगृह,बालसंगोपन केंद्र,प्राथमिक स्वास्थ गृह,आरोग्य सेवा केंद्र अश्या अनेक सेवा शासनाने उपलब्ध करूनदिल्या कारणाने बराच आरोग्याचा दर्जा सुधारत असल्याचे जाणवते.

**अंधश्रध्दा निमुर्लन** : या जमातीत अंधश्रध्दांचे प्रमाण जास्त असल्याने सामाजिक विकासात अडथळा निर्माण झाल्याचे आढळते. शिक्षणाचे प्रमाण वाढत असल्याकारणाने आता मात्र अंधविश्वासाचे

ISSN : 2278-9308
July 2021

प्रमाण कमी होवू लागले आहे.त्या कारणाने आरोग्य व इतर विकास योग्य होण्यास मदत होत आहे.

**परंपरा व रितीरीवाज** : या जमातीत परंपरा व रितीरिवाजाला अतिशय महत्वाचे स्थान प्राप्त झाल्याने कोणतेही कार्य करतांना विचार केला जातो. योग्य कार्य करण्याची वेळ निघुन गेल्याने पश्चाताप करावा लागत असल्याने निर्णयक्षमताअभावी विकासाच्या गतीत अडथळा निर्माण होवून विकास साधला जात नाही.

**विकास** : उच्च शिक्षणाच्या माध्यमातून विकास जलद गतीने होण्यास मदत होते.नविन पिढीतील बालकांच्या विकासाकरीता शिक्षकांनी त्यांची वैशिष्टये,गुणदोष जाणून घेवून त्यांचा विकास साधणे गरजेचे आहे.आर्थिक अनुकुल परीस्थितीचा अभाव,घरातील शैक्षणिक वातावरणाचा अभाव प्रेरक परीसराचाअभाव या कारणाने सामान्य विद्यार्थ्यांसोबत तुलना करणे अन्यायकारक ठरेल.त्यांची शिक्षकाने दखल घेणे अगत्याचे आहे.

**सांस्कृतिक परीसराचा लाभ** : साहित्य,कला,संगित,वाचन लेखन,श्रवणशक्ती कमी,संवादकौशल्य नसणे,न्युनगंड,अनुभव मर्यादित या कारणाने ते मागे राहतात. परंतु शिक्षकांनी त्या पध्दतीने वातावरण निर्मिती करून त्यांचा विकास साधणे गरजेचे आहे.

**मूलभूत क्षमतांचा विकास**:आरोग्यावरच सर्व विकास हा अंवलंबुन असल्याने सर्व प्रथम त्यांच्या आरोग्याची तपासणी करून त्यांच्या आरोग्याच्या समस्या सोडविणे गरजेचे आहे.शासनाच्या विविध योजनाअंतर्गत बालकांच्या कुपोषणाच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्याकरीता आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे.त्यांना सकस आहार उपलब्ध करून देणे गरजेचे आहे त्यामुळे विविध आजारावर उपचार करून समस्या सोडविता येईल.भाषिक कौशल्यासोबतच इतर साहित्य उपलब्ध करून दिल्यास विकास साधणे सोपे होवू शकेल.

**गरजांवर आधारीत शिक्षणविषयक उपक्रम** :बालकांचा योग्य शैक्षणिक विकास होण्याच्या दृष्टिकोणातुन त्यांचे जादा वर्ग,उपचारात्मक कार्यक्रमाचे आयोजन करणे गरजेचे आहे.विविध व्यावसायिक प्रशिक्षणाचे आयोजन करीयर मार्गदर्शनपर कार्यक्रमाच्या आयोजनामुळे वंचितांचा शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक दर्जा सुधारण्यास निश्चितच मदत होवू शकेल.व देशाच्या प्रगतीत देखिल फायदा होवू शकेल.

**आदिवासी समोरील आव्हाने**. :

**नकली आदिवासींची समस्या** : मानववंशशास्त्रज्ञांनी आदिवासी बद्दल निकष वैज्ञानीक पध्दतीने काढले आहेत परंतु त्यांचा प्रत्यक्ष जीवनात उपयोगात आणने कठिण जाते.

१.जमातीतील सांस्कृतिक व सामाजिक परीवर्तनामुळे जमातीतील काही लोकांमधे किंवा पोटजातीमधे आदिवासी जमातीतील परंपरागत वैशिष्टे व लक्षणे लोप पावल्याचे दिसते.

२.आधुनिकतेच्या प्रक्रियेमुळे विकासाची प्रथम गती मंद स्वरूपात होती परंतु स्वातंत्र्यानतंर मात्र जलद गतीने विकास झाल्याने व रोजगाराच्या संधी वाढल्याने आदिवासी दुरच्या प्रदेशात स्थलांतरीत झाली व परंपरागत चालीरीती,राहणीमाण,संस्कृतीत बदल झाल्याने त्यांची ओळख पटणे कठिण झाले.

३.विकासाची प्रक्रिया विकासाच्या विविध योजनांच्या माध्यमातून आदिवासी समाजाला परीवर्तन करण्यास प्रवृत्त केल्या जाते.त्याकारणाने स्वत:च्या संस्कृतीचे अधिपतन करणाऱ्या नियमांचे पालन करण्यात आल्याने खऱ्या संस्कृतीचे नामोनिशान मिटविल्या जाते.त्याकारणाने त्यांची खरी ओळख पटविण्यात अढथळा निर्माण होतांना आढळतो.

**हेतूकथन** : आदिवासी समाज हा निसर्ग पुजक आहे.परंतु त्यांच्यात मागासलेपणा का निर्माण झाला. त्यांच्या कोणकोणत्या समस्या आहेत.त्यांचा विकास कसा साधता येईल या उद्देशाने या विषयाची निवड करण्यात आली.

**उद्दिष्टे** : १.आदिवासी समाजावर जातीभेदामुळे येणाऱ्या सामाजिक समस्या जाणुन घेणे.

२.आदिवासींच्या आहाराबाबत समस्याा जाणून घेणे.

३. आदिवासींच्या शिक्षणाबाबत समस्या जाणुन घेणे.

**B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal**

**Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)**

ISSN : 2278-9308
July 2021

**गृहितके :**

१.आदिवासी जंगलात वास्तव्य करीत असल्याने शहरी भागाचा संपर्क नसल्याने काळानुसार त्यांच्यामधे परीवर्तन योग्यप्रकारे होवू शकले नाही.

२.आदिवासी पारंपारीक शेती व शिकारी करीत असल्याने पाहिजे त्या प्रमाणात पर्याप्त आहार प्राप्त होत नसल्याने कुपोषणाच्या समस्यांचे प्रमाण जास्त आढळते.

३.आदिवासी लोंकांच्या हालाखीच्या परीस्थितीमुळे,समाजाच्या हिनतेच्या वातावरणामुळे,भेदभाव करण्याच्या प्रवृत्तीमुळे शिक्षणापासुन वंचित राहण्याचे प्रमाण जास्त आढळते.

**संशोधन क्षेत्र** : नागपूर जिल्हयातील ७ ते १५ वर्षाच्या बालकांचा आहार व शिक्षणाबाबत अध्ययनाकरीता आदिवासी बालकांची निवड करण्यात आली.

**निरीक्षण:**

**सारणी क्र.: १** आदिवासी बालकांच्या कुटुंबातील आर्थिक स्तराबाबत माहिती

| एकुण वार्षिक उत्पन्न | टक्केवारी |
|---|---|
| १०,००० पेक्षा कमी | २५ |
| १०,००० ते २०,००० | २८ |
| २०,००० ते ३०,००० | ४७ |

वरील सर्वेक्षणातुन असे आढळले की,नागपुर जिल्हयात शिक्षणाच्या सोई,शासनाच्या मदतीमुळे आदिवासी समाजातील लोकांचा आर्थिक दर्जा वाढल्याचे आढळते.परंतु ठाणे जिल्हा,गडचिरोली जिल्हयात नागपुर जिल्हयाच्या तुलनेत पाहिजे त्या प्रमाणात विकास होवू शकला नाही. काही भागात अजुनही दारीद्र असल्याचे आढळते.रोजच्या जेवनाबाबत प्रश्न असणारे कुटुंब आढळते. बरीच लोक शिकारी,वनउपज गोळा करून त्या बदल्यात इतर साहित्य विकत घेणे किंवा नैसर्गिक शेतीवर उपजिवीका चालवित असल्याने पावसाळयात उपासमार जास्त होत असल्याचे आढळले.

**सारणी क्र.:** २स्वास्थ विषयक माहिती

| मुलांचे वय | सरासरी उंची | आदर्श उंची | प्रमाण विचलन | 'मुल्य |
|---|---|---|---|---|
| ८ वर्ष | ११२.५ | ११५.९५ | ३.८८ | १.९९' |
| १० वर्ष | १२१.२९ | १२५.४४ | ३.५९ | २.८३'' |
| ११ वर्ष | १३०.८६ | १३०.४ | २.७३ | ०.४१ |
| १२ वर्ष | १३६.७१ | १३५.६१ | ८ | ०.७१ |
| १३ वर्ष | १४३.६७ | १४०.९ | ७.३५ | ३.४३'' |
| १४ वर्ष | १.४८.४ | १४६.०२ | ९.६९ | २.१४' |
| १५ वर्ष | १४८.२३ | १५०.४७ | १०.७ | २.००' |

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की,नागपुर जिल्हयातील आदिवासी बालकांच्या उंचीची आयसीएमआर च्या आदर्श उंचीशी तुलना केली असता ८ वर्ष,१० वर्ष,१३वर्ष,१४ वर्ष,व १५ वर्ष वयोगटातील मुलांची उंची हि सांख्यकीय दृष्टया आदर्श उंचीपेक्षा कमी आढळली. शासनाच्या विविध योजनांच्या लाभामुळे बालकांमधे आरोग्याच्या समस्या काही प्रमाणात का होईना सुटलेल्या आढळतात. परंतु पुर्णपणे मुलांच्या आरोग्याच्या समस्या सुटलेल्या नाहीत हे आपणास निदर्शनात येते.

**सारणी क्र. : ३**.आदिवासी बालकांचे शिक्षणाबाबत माहितीदर्शक सारणी

| वर्ग | मुले टक्केवारी | मुली टक्केवारी |
|---|---|---|
| १ ते ७ वी | २० | २२ |
| ८ ते १० वी | ८० | ७८ |

वरील सारणी वरून असा निष्कर्ष निघतो की. आदिवासी बालकांचा शिक्षणाबाबत सर्वेक्षण केले असता आधीच्या तुलनेत आताच्या काळात शिक्षण घेण्याचे प्रमाण हे वाढलेले आढळले.तसेच मुले व मुली यांच्या शिक्षणात कोणताही भेद आढळला नाही.परंतु १० व्या वर्गानतंर पालक बालकांना शिक्षण देण्यास उदासीन असल्याचे आढळले. कारण दळणवळणाच्या अपुऱ्या सोई,शिक्षणामुळे नोकरी लागत नाही,आश्रमशाळेत शिक्षक बरोबर शिकवित नाहीत, आदिवासी लोकांना बुध्दिच नाही त्यांना शिकवून काय फायदा असे काही शिक्षकांचे मत दर्शविण्यात आले. आश्रम शाळेतील बराच स्टॉप हा इतर जाती वर्गाचा असल्याने त्यांच्या विकासाबाबत उदासिन असल्याचे आढळले. विद्यार्थ्यांच्या बाबत भेदभाव केल्याचे आढळले.पगारापुर्ते काम केल्याचे आढळले.आदिवासी बालकांच्या प्रगती होण्याच्या दृष्टिने तळमळीने प्रयत्न केला जात नाही.शिक्षक बदलत्या काळानुसार बालकांना शहरीकरणाबाबतकिंवा नविन ज्ञानाबाबत अवगत करून दिल्या नसल्याचे चित्र आढळले. त्यामुळे बालकांना शिक्षणाबाबत आवड निर्माण होवु शकली नसल्याचे आढळले.तसेच श्शासनाकडून सर्व साहित्य उपलब्ध होवूनही त्यांचा परीपुर्ण वापर होत नसल्याचे आढळले.मुलांना पुस्तक किंवा वहया फाडतील म्हणुन त्यांना पेन शासनाकडून प्राप्त होवूनही त्याचा उपयोग करण्यापासुन वंचित ठेवल्या जात असेल तर बालकांच्या शिक्षणाची पातळी कशी उंचावणार. त्यामुळे पाहिजे त्या प्रमाणात विकास होवू शकला नाही.

**निष्कर्ष** :आदिवासी बालकांचे सर्वेक्षण केले असता असे लक्षात आले की,शासनाने विविध योजनांद्वारे विकासाचा प्रयत्न करीत असुनही आदिवासी बालकांचा पाहिजे त्या प्रमाणात विकास का होत नाही हे जाणून घेण्याच्या उद्येशाने सर्वे करण्यात आले. बरेच पालक आपल्या पाल्यांना आश्रमशाळेत शिकवायला तयार नसल्याचे आढळले.कारण अस्वच्छ वातावरण,आहाराचा हिन दर्जा,शिक्षणाचा दर्जा खालावल्याने मध्यमवर्गीय पालक तयार होत नसल्याचे आढळले.इतर समाजाचे शिक्षक आदिवासींना हिन दर्जाचे समजत असल्याने मनापासून किंवा पोटतिडकीने त्यांच्या विकासासाठी प्रयत्न केले जात नाही. आदिवासींना बुध्दि नसल्याने शिकवून काही फायदा नाही हा दृष्टिकोण ठेवल्याचे आढळले.ज्यांची जीवन जगण्याचा प्रश्न आहे असेच पालक जेवनाचा प्रश्न सुटेल या भावनेतून आश्रमशाळेत घालत असल्याचे आढळले. काही आदिवासी विद्यार्थी उच्च शिक्षित झाले तरी त्यांच्या शिक्षणाबाबत इतर समाजाच्या लोकांचा बघण्याचा दृष्टिकोन साशंकीत स्वरूपाचा असल्याचे आढळले. आदिवासी म्हणजे बुध्दिहीन समाज अश्या दृष्टिकोनाने पाहिल्या जाते. नोकरीच्या ठिकाणी देखिल असे अनुभव आल्याचे आढळले.उच्च वर्गीयांकडून अस्पृश्यता भेदभाव होत असल्याचे जाणिव होते.तसेचजातीवाचक जाच होतांनाच्या देखिल घटना घडलेल्या आढळतात. तसेच जातीच्या उच्च पदावर आरक्षणामुळे खरे आदिवासी बाजुला ठेवले जातात व उच्चभ्रु समाजातील लोकांनी गैरप्रकारे घुसखोरी करून नोकरीच्या संधी हस्तगत करून खरे आदिवासी बांधवावर अन्याय होतांनाचे आढळले.त्यामुळे खऱ्या आदिवासी समाजाचा पाहिजे त्याप्रमाणात विकास होत नसल्याचे आढळते.

**सुचना** :आदिवासींना आधुनिकतेच्या प्रवाहात आणण्यास उच्च दर्ज्यांचे शिक्षण,वसतीगृहाची स्वच्छता,आत्मविश्वास वाढविण्यास प्रेरक कार्यक्रमाचे आयोजन,प्रशिक्षण,व्याख्याने आयोजन करणे गरजेचे आहे. तसेच खावटी कर्ज,लघुउद्योगास प्रवृत्त केले जाते परंतु योजनांचा गैरवापर होत असल्याने शासन यंत्रणेची कडक निगराणी असणे गरजेची आहे.आदिवासी समाजाकरीता लहान क्षेत्रापुरतेच मर्यादित न ठेवता मोठया पातळीवर विकास होण्याच्या दृष्टिने प्रयत्न होणे गरजेचे आहे. उच्च पदाच्या नोकरीसाठी नियुक्तीच्या वेळी खऱ्या आदिवासींना प्राप्त होवू शकेल अशी तरदुत करण्यात यावी. अन्याय होवू नये या दृष्टिने कायदयाचे पालन होणे गरजेचे आहे.जातीवाचक जाच करणाऱ्यावर कडक कारवाई होणे गरजेचे आहे.शासनानेयोग्य अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

**सारांश**: आदिवासी समाज हा भारताचा प्रथम रहिवासी असूनही उच्चवर्णियांच्या अस्पृश्यतेच्या भेदभावामुळे अतिशय मागासलेला राहिलेला आहे.नैसर्गिक संस्कृतीचा वारसदार असणारा त्याच्याच मातृभुमीत त्याला अन्यायाला सामोरे जावे लागले.राजघराण्याला उतरती कळा लागुन त्यांच्या मालकीच्या जंगलातून त्यांना बेघर करण्यात आले.गडचिरोली,ठाणे जिल्हयात आदिवासी मागासलेले राहिले. दळणवळणाचा अभाव प्राथमिक गरजांचा अभाव असल्याकारणाने आरोग्याच्या बाबतीत नेहमी समस्या असल्याचे आढळले.कुपोषणाच्या नेहमी भेडसावणारे प्रश्न,अपर्याप्त आहार

दारिद्रय,अशिक्षितपणा,वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून शोषण अश्या अनेक समस्यांमुळे आदिवासींचा विकास होवू शकला नाही.आता थोडया प्रमाणात शिक्षणात प्रगती सुरू झाली आहे तरी त्याच्या कडे संशयीत भावनेने बघितल्या जाते.नोकरीच्या ठिकाणी आजही उच्चवर्णियांकडून जाच सहन करावा लागत असल्याचे निदर्शनात आले आहे.जातीवाचक शिवीगाळ करून त्याला अपमानित केल्या जाते.

**संदर्भ:**

१. डॉ.करंदीकर,सुरेश,व मंगरूळकर,मीना,उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, पे.नं.३२२,फडके प्रकाशन,कोल्हापुर

२.प्रा.कराडे,जगन,जागतिकरण भारतासमोरील आव्हाने पे.नं.१४२,डायमंड प्रकाशन,पुणे

३.लोटे,रा.ज.,भारतीय समाज आव्हाने आणि समस्या,पे.नं.१७६,पिंपळापुरे प्रकाशन,नागपुर

४.दर्ज,जर्नल,व्हयाल्यु, नं. ०७.२०१५इश्यु नं २ एप्रिल.जुन २०१५

५.दलितांचे आणि आदिवासींचे समाजशास्त्र,पे.नं.२५ डायमंड प्रकाशन,पुणे

https://asiasociety.org/education/jati-caste-system-india

www.Icmr.nic.in

# दलित आत्मकथनांची वाटचाल

प्रा.डॉ.सुरेश व्यंकटराव कदम
राजर्षी शाहु महाविद्यालय, परभणी
मो.:९४२०५३१३१४

दलित विद्रोही भावना प्रथम काव्यातून अविस्कृत झाली. नाटकातून प्रचंड प्रमाणात ती प्रबोधनाचे रूप घेऊन प्रेक्षकासमोर आली नंतर आत्मकथनातून मांडली गेली. म्हणजेच दलित नाटकातील संवादांनी दलित आत्मकथन करतांना सरळच आत्मकथनांतून दु:ख कसे मांडावे याची वाट दाखवून दिलेली आहे. दलित आत्मकथना अगोदर दलित दु:खाचे, त्यांच्यावर होणाऱ्या आत्याचारांचे दर्शन घडविण्यात नाटकच प्रथम अगे्सर राहिले आहे. गायरान जमिनीवर राहण्यासाठी भटक्यांना जागा देऊनही, गावातील दोन पार्ट्यांचे राजकारण या भटक्या लोकांना या जमिनीतून उठवून लावून पुन्हा गावोगाव कसे भटकायला लावते, याचा प्रथम 'सर्वोदय' या दलित आत्मकथनातून आलेला आहे हा अनुभव एवढा विषादी स्वरूपाचा आहे की त्याने आजपर्यंतच्या सर्वच दलित आत्मकथनांतून येणाऱ्या दु:खापेक्षा कळस गाठलेला आहे.

बाबुराव बागूल यांची 'जेंव्हा मी जात चोरली होती' या कथेतून अनुभव लेखकाने स्व–कथातून नोंदविलेला असल्यामुळे दलित आत्मकथनकारांनी आपल्याला आलेले भयावह, भीषण, अत्याचारी अनुभव कसे व्यक्त करावेत याचा एक आकृतीबंधच या कथेमुळे निर्माण झालेला दिसतो. तर याच बाबीला अनुसरून डॉ.सदा कऱ्हाडे यांनी स्पपणे सांगितले की, ''दलित साहित्य हेच मुळी लाक्षणिक धार्म्याने दलित आत्मकथन आहे''

१९६४ साली दलित आत्मकथन लेखनाच्या वाटचालीत एक महत्त्वाचा भाग आहे. औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालयाच्या १९६४ च्या वार्षिक अंकात प्र.ई.सोनकांबळे यांचा 'वाटाड्या' या शिर्षकाचा लेख प्रकाशित झालेला असून या लेखातून प्र.ई.सोनकांबळे यांनी त्यांच्या गावाकडे त्यांना मिळणारी अस्पृश्यतेची वागणूक व त्यांच्या दारिद्र्यचे वर्णन केलेले आहे. प्र.ई. सोनकांबळे यांनी अशाच प्रकारचे काहीलेख पुन्हा लिहिले व त्यातून त्यांचे 'आठवणींचे पक्षी' हे आत्मकथनापर पुस्तक सिद्ध झाले.

१९७८ साली दया पवार यांचे 'बलुतं' प्रकाशित झाले. खऱ्या अर्थाने दलित आत्मकथाच्या वाढता लेखनाचा प्रवाह सुर झाला. १९८० मध्ये 'उपरा' लक्ष्मण याने यांनी गावकुसाबाहेरील जीणं अधोरेखित करण्याचे काम 'उपरा' या आत्मकथनातून केले. पदरी सतत भटकंती उपरेपण एका गावात चार दिवसांची ज्यास्त मुक्काम करता येत नसे. बापाची अब्ु वेशिवर टांगलेली उघड्यावरच आंघोळ राहाव लाग अठराविश्व दारिद्र्य, शोषित, पीडीत अस गावाबाहेरच जीण उपराकार लक्ष्मण माने यांनी आपल्या आत्मकथनाच्या माध्यमातून आधोरेखित केले.

शंकरराव खरात यांचे 'तराळ–अंतराळ' नावाचे आत्मकथन प्रकाशित झाले असून शंकरराव खरात यांना गरिबांचे भवावह चटके बसले सवर्ण लोकांनी त्यांच्या वडिलांना खूप त्रास दिला. हा अत्याचार एवढा भयावह होता की, कोणत्याही सहृदय रसिकाचा जीव त्यामुळे हादरून जावा अशी ही वस्तुस्थिती होती, तर अशा परिस्थितही येसकर बौद्धाचा पोरगा जिद्दीने शिकतो. कायद्याचा पदवीधर होतो आणि पुढे मराठवाडा विद्यापीठाचा कुलगुरू होतो, ही तृप्तीची भावनाही त्यांच्या लेखनातून आत्मकथनातून आली आहे. तराळ कडून अंतराळाकडे, म्हणजे गरिब पीडितांकडून उच्च पदावर विराजमान होणे म्हणजेच तराळाकडून अंतराळाकडे उत्तम बंडू तुपे यांचे 'काट्यावरची पोटं', दादासाहेब मोरे यांचे 'गबाळ', 'बरड', भीमराव गस्ती, अक्करमाशी शरणकुमार लिंबाळे, 'उचल्या' लक्ष्मण गायकवाड, घराण तमासगिराचं शशिकांत तासगावकर, मी एक अस्पृश्य भाऊराव सोमवंशी, 'भटक्या' मारोतराव जाधव. 'दे दान सुट्टे गिऱ्हाण' –आर के. त्रिभुवन, 'आमचा बाप अन् आम्ही' – नरेंद्र जाधव, 'कोल्हाट्याचं पोर' – किशोर शांताबाई काळे, 'फिरस्तू' –अजित मिणेकर, 'तीन दगडांची चुल' – बापुसाहेब चव्हाण. 'आत्मकथा काटेरी तारेच्या कुंपणाची' –भीमराव जाधव, 'दगडफोड्या' –भालचंद्र नलावडे, 'कोल्हाटउडी' –गोपीचंद पवार.

वरील विवेचनावरून असे दिसून येते की, दलित आत्मकथा या दलित जाणिवां, वेदना, विद्रोह, जातीव्यवस्थेविषयीची चिड, प्रस्थापित विरूद्ध गावनुसाबाहेरील संघर्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या मूलमंत्राप्रमाणे प्रेरित होऊन शिकुन, संघटित होऊन, प्रस्थापित मनुवादी वर्षव्यवस्थेविरूद्ध संघर्ष करताना दिसतो. कविता वाङ्मय प्रकार हा दलितांच्या व्यथा सोडण्यासाठी मर्यादित अपुरा वाङ्मय प्रकार होता म्हणून विस्तृत भावनाना व्यथा, वेदनांना वाट करून देणारा वाङ्मय प्रकार म्हणजे आत्मकथा होय. शंकरराव खरातांच्या आत्मकथनांविषयी म्हणायचे झाले तर शंकररावांनी

त्यांच्या वडिलांनी प्रस्थापित सवर्णांनी दिलेला त्रास त्यातून त्यांनी जिद्दीने शिक्षण पुर्ण करून मराठवाडा विद्यापीठ सार'या उच्चपदी म्हणजे कुलगुरूपदी विराजमान होतात. म्हणजेच तराळाकडून अंतराळाकडे झेत घेतात.

अशा दलित आत्मकथनातून दलितांचे भाव विश्व गावकसाबाहेरील जीणं, दलित आणि दलितेत्तर संघर्षाची कथा म्हणजे दलित आत्मकथा होय.

सुरूवातीच्या काळात काही लेखाच्या स्वरूपात आठवणीच्या स्वरूपात आवतरली नंतर मराठी भाषेला नवे वळण देणारा वाङमय प्रकार म्हणजे दलित आत्मकथने म्हणजे, दलित साहित्याचा आरसा होय, दलित आत्मकथनाशिवाय दलित साहित्याची संकल्पना पुर्ण होत नाही. दलित आत्मकथा ही त्या लेखकाची व्यथा नसून समाजाची व्यथा–वेदना आहेत. वेदनांचा प्रदेश म्हणजे दलित आत्मकथा होत. वरील प्रमाणे दलित आत्मकथनाची वाटचाल म्हणता येईल.

# प्रोफेसर रमणलाल मेहता द्वारा आगरा घराने की संकलित एवं स्वरांकित राग केदार की बंदिश का सांगितिक समिक्षण

**Santosh Kisanrao Khandare**
Research Scholar of J.J.T.U Under the Guidance of
Dr. Shobharani Kodesia & Dr. Shirish Kadu
Mob- 9921133612 ,Email-santoshkhandare76@gmail-com

**सारांश–**

भारतीय हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत संस्कृति के निर्माण एवं प्रचार–प्रसार में प्रोफेसर रमणलाल मेहताजी का स्थान ऊंचा है। रमणलाल मेहताजी का जन्म ३१ ऑगस्ट १९१८ में गुजरात राज्य के सुरत जिले में हुआ था। उन्होंने कंठसंगीत की शिक्षा कंचनालाल मनावाला से प्राप्त की और अपना संपूर्ण जीवन संगीत को समर्पित कर दिया।

९ साल की उम्र से ही उन्होंने संगीत के संपादन और शिक्षण का कार्य शुरू किया। संगीत जीवन में मेहताजी ने अपने अमूल्य कार्य के माध्यम से भारतीय हिंदुस्तानी संगीत की सेवा की है। वह सन १९४५ से १९५३ तक ऑल इंडिया रेडियो के साथ रहे। मेहताजी किराना घराना शैली के एक प्रतिष्ठित गायक थे, उन्होंने ख्याल और ठुमरी में अपनी शैली विकसित की थी और संगीत सम्मेलनों तथा संगीत मंडलों के माध्यम से ऑल इंडिया रेडियो में हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत के कई प्रमुख कार्यक्रम द्वारा संगीत देकर संगीत का प्रचार–प्रसार किया।

बडौदा विश्वविद्यालय संगीत विभाग के अध्यक्ष और भूतपूर्व प्राचार्य के रूप में मेहताजी का सांगितीक कार्य प्रशंसनीय एवं उल्लेखनीय दिखाई पडता है। मेहताजी का नाम एक उत्तम गायक तथा उत्कृष्ट लेखक, जिज्ञासु संकलक, चिंतनशील संपादक, नाटककार तथा अभ्यासू व्याख्याता के रूप में बडे सन्मान तथा प्रतिष्ठा के साथ लिया जाता है।मेहताजी ने हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत के विविध अंगों पर उपयुक्त ग्रंथों का लेखन किया है, तथा अनेक किताबों का प्रकाशन किया है। उन्हे संगीत के इस महान कार्य के लिएराज्य सरकार द्वारा तथा विभिन्न संगीत संस्थान द्वारा अनेक पुरस्कारों से सम्मानित किया गया है।

**प्रस्तावना–**

हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत में घरानों का बडा महत्वपूर्ण योगदान रहा है। इन घरानों की घरंदाज ख़ानदानी बंदीशे हमारी संस्कृतिक धरोहर है। इस संगीत धरोहर को प्रोफेसर रमणलाल मेहताने अपने सांगीतिक किताब **''आगरा घराना: परंपरा गायकी और चिजें''**में आगरा घराने की अप्रकाशित १२० घरंदाज चीजों का संकलन तथा स्वरांकन किया है।

संगीत में शब्द, स्वर, लय, के संयोग द्वारा गीत का निर्माण होता है और इसी को हम 'बंदिश' कहते हैं। हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत में पारंपारिक बंदिशों की राग संरक्षण के उद्देश्य में महत्वपूर्ण भूमिका रही है। क्योंकि राग का संपूर्ण शास्त्र एक खानदानी बंदिश के अंतर्गत संगृहित है। काव्य –स्वर– लय तथा सौंदर्यात्मक दृष्टिकोण के आधार पर हम प्रोफेसर रमनलाल मेहता जी द्वारा संकलित और स्वरांकित आगरा घराने राग केदार की इस बंदिश का सांगीतिक समीक्षण करेंगे।

**काव्य तत्व**

**स्थायी**

मानले भरन ना देत पनघट पे नीर इतनी बिनती मोरी।

**अंतरा**

हा हा खात तोरे पैयां परत हुँ ।
छांड दे प्रान मोरा शरीर इतनी बिनती मोरी।।

**राग केदार**

**चीज**

ताल—त्रिताल          स्वरांकन          मध्यलय

**स्थायी**

— प म प ध —— प मप धप म — रे सा — सा

ऽ मा ऽ न ले ऽ ऽ ऽ भऽ रऽ न ऽ ना दे ऽ त

३ x २ ०

सा सा म ग प म ध प ध नि सां रें सां नि ध नि

प न घ ट प नी ऽ र इ त नी बी न ती मो ऽ

३ x २ ०

ध, प म प

री, मा ऽ न

३

**अंतरा**

प — प सां सां सां सां सां ध नि सां रें सां नि ध प

हा ऽ हा खा ऽ त तो रे पैं ऽ या प र त हुँ ऽ

० ३ x २

गं मं रें सां नि रें सां सां ध नि सां सां ध नि सां रें

छॉं ड दे प्रा ऽ न मो रा श री ऽ र इ त नी बी

० ३ x २

सां नि ध नि ध, प म प

न ती मो ऽ री, मा ऽ न

**केदार**' कल्याण थाट जनित एक प्रचलित राग है। इस प्रचलित राग की त्रिताल मध्यलय बंदिश की रचना '**प्रान**' उपनाम से ''**विलायतहुसेन खाँ**'' ने की है।

**स्थायी भावतत्व** —प्रस्तुत साहित्य में नायिका अर्थात् राधा जो पानी भरने हेतु नदी के तट पर गयी है। वहाँ कृष्ण उन्हें पानी भरने के कार्य मे रुकावट डालते हुए उससे प्रेमभरी छेड़छाड़ करते हैं, जिससे राधा उनको मना रही है, उनको बिनती कर रही है की हे '**काना**' हमारी बात मान ले, हमें पनघट पे पानी भरने दे राधा अपनी नाराजगी दर्शाते हुए प्रेमभरे शब्दों में उनसे बिनती करती हुई प्रदर्शित की गयी है।

**अंतरा भावतत्व** —प्रस्तुत बंदिश के अंतरे की प्रथम पंक्ति में रचनाकार लिखते है—'**हा हा खात तोरे पैया परत हूँ**' अर्थात नायिका अब कृष्ण को समझा—समझाके थक चुकी है, उसके समझाने के बावजूद श्याम मानने को यहा तैयार नही दिख रहे है, इसलिए शायद नायिका थककर, निराश, हताश होकर दूसरी पंक्ति में कहती है—''**छांड दे प्राण मोरा शरीर इतनी बिनती मोरी**''अर्थात मेरे शरीर से मेरे प्राण निकले यही तुमसे बिनती है।

पारंपरिक गीतों में जोडाक्षर युक्त शब्द होगा, तो वह शब्द उच्चार—सुलभ करने की रीत है। लेकिन यहां एक भी शब्द उच्चार सुलभ करने की आवश्यकता नहीं दिखाई देती।

**तात्पर्य** — यह संपूर्ण रचना गायन के लिए उच्चार सुलभ है।

**स्थायी**—<u>मान</u> ले भ <u>रननादे</u> <u>त</u>

<u>पन</u> घ ट <u>पे</u> <u>नीर</u> इ <u>तनीबिनतीमोरी</u> ।

**अंतरा**—<u>हाहा</u> खा <u>ततोरेपै</u> यां <u>परतहुँ</u> ।

छां ड <u>देप्रानमोरा</u> श <u>रीर</u> इ <u>तनीबिनतीमोरी</u> ।।

उपर अधोरेखांकित किये हुए —**म, न, र, द, त, प, ह,** इन अक्षरों के पुनरावृत्ती से जो छोटे—छोटे अनुप्रास तैयार हुये है, उनकी गितो के नादमाधुर्य में महत्वपूर्ण भूमिका रही है।

**सारांश** — इस गीत की काव्यरचना करूणरस से अनुकूल और नादमधुर है। रचनाकारने इस बंदिश की रचना पदन्यास के प्रकार से की हुई दिखाई पड़ती है। '**मोऽरी**' शब्द पुनरावृत्ति से अनुप्रास का प्रयोग करके काव्य की शोभा बढ़ाई है।

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

**स्वरतत्व** —इस बंदिश की स्वररचना में 'केदार' के रागदर्शक स्वरसमुदाय निम्नलिखित है।

**राग स्वरूप** —१)गीत की प्रथम पंक्ति— मप ध पं म

२)गीत की द्वितीय पंक्ति— सा म

३) गीत की तृतीय पंक्ति—प प सां सां सां ध नि सां रें सां नि धप

४)गीत की चौथी पंक्ति—गंमंरेंसां निरेंसांसां ध नि सां रें सां नि धप

**बंदिश में प्रयुक्तस्वर मात्रा सुची**

| स्वर \ पंक्ति | I | II | III | IV | V | कुल |
|---|---|---|---|---|---|---|
| सा | ३ | ४ | ७ | ६ | १ | २१ |
| रे | १ | १ | १ | ३ | — | ६ |
| ग | — | १ | — | १ | — | २ |
| म | २ | १ | — | १ | — | ४ |
| मं | १ १/२ | १ | — | — | — | २ १/२ |
| प | ४ | २ | ४ | — | — | १० |
| ध | ३ १/२ | ३ | २ | २ | २ | १२१/२ |
| नि | — | १ | — | — | १ | २ |
| नि | — | २ | २ | ३ | १ | ८ |
| कुल | १५ | १७ | १६ | १६ | ५ | ६८ |

वादी संवादी स्वरों को ध्यान में रखते हुए इस बंदिश के अनुसार स्वरों का प्राधान्यक्रम इस प्रकार होगा।

| स्वर | मात्रावकाश | मूल्यांकन |
|---|---|---|
| • षड़ज | २१ | प्रधान स्वर |
| • धैवत | १२ १/२ | उपप्रधान स्वर |
| • पंचम | १० | साधारण प्रधान स्वर |
| • निषाद (शुद्ध) | ८ | साधारण प्रधान स्वर |
| • रिषभ | ६ | साधारण प्रधान स्वर |
| • मध्यम (शुद्ध) | ४ | साधारण प्रधान स्वर |
| • मध्यम (तीव्र) | २ १/२ | साधारण प्रधान स्वर |
| • गांधार | २ | अल्प स्वर |
| • निषाद (कोमल) | २ | अल्प स्वर |

शास्त्र नियम द्वारा इस राग का वादी स्वर मध्यम तथा संवादी स्वर षड्ज बताया गया है। किंतु उपरोक्त मात्रावकाश के तक्ते से इस बंदिश में षड्ज स्वर का बहुत्व बंदिश का वैशिष्ट्य दिखाता है। तथा उपप्रधान स्वरधैवतदिखाई पडताहै।लेकिन फिर भी इस बंदिश में कहीं भी राग हानी नही दिखाई पडती। यह बंदिश राग के सौंदर्य को अंत तक बनाये रखती है। यही इस की विशेषता है।

**अलंकारिता**—विविध अंगो से बंदिश गाते समय स्वररचना में जो अलंकारीक स्वर समुदाय है, ऐसे अंगभूत अलंकार बंदिश की स्वर रचना में कौनसे है, यह देखेंगे।

१) प्रथम पंक्ति — ध प म रे सा (अवरोही ढंग)

२) द्वितीय पंक्ति— सासा मग पमध प (आरोही ढंग)

३) तृतीय पंक्ति— पप सांसां धनि सारें (आरोही ढंग)

४) चौथी पंक्ति — गंमं रेंसां निरें सांसां धनि सांसां (अवरोही ढंग)

प्रस्तुत बंदिश की तृतीय पंक्ति में आरोही अंग की सुंदर तान तयार होती है।उदा. सासा मग पमध प इस तानसे बोलतान की उपज हो सकती है। इसप्रकार अलंकारिता की दृष्टि से अनेकानेक उपज इस बंदिश से उपलब्ध होने से यह बंदिश समृद्ध हुई है।

**लयतत्व** —

१)प्रस्तुत बंदिश के लिए ताल त्रिताल का चयन किया गया है, जो मध्यलय में बंदिश की गति को बनाए रखता है।

२)प्रस्तुत बंदिश में स्थायी का मात्राप्रवास १४ वी मात्रा से शुरू होकर १२ वी मात्रा तक१५ मात्राका तथा दुसरी पंक्ति का मात्राप्रवास १३ वी मात्रासे शुरू होकर पुन: १३ वी मात्रा १७ मात्रा तक दर्शाया गया है। तथा अंतरे का उठाव ताल की ९ वी मात्रा से अर्थात काल से हुआ है।

३)प्रस्तुत बंदिश की एक विशेषता यह भी है कि, स्थायी और अंतरे की दुसरी पंक्ति को एक साथ ही गाया जा सकता है अर्थात इन पंक्तियों को भिन्न रूपसे उसके स्वाभाविक या मूल स्थान से नहीं गाया जा सकता, क्योंकि **''इतनी बिनती मोऽरी''** इन शब्दों को स्थायी तथा अंतरे की दूसरी पंक्ति की ५ वी मात्रा से अंत तक यानी १३ वी मात्रा तक रचा गया है। शेष बंदिश को सीधा व सरल रूप से ताल—अंग से रचा हुआ दिखाई देता है।

**तात्पर्य** — पारंपरिक बंदिशों की श्रेणी से हटकर १४ वी मात्रासे उठाव होने वाली यह बंदीश है। स्वरांकनकर्ता मेहताजीने इस बंदिश को बडी कुशलतासे, बंदिश का वजन जानकर—समझकर बंदिश की खूबियों को स्वरोंमें बांधा है, जो निश्चित प्रशंसनीय कार्य है।

अब शब्द के मेल—मिलाप से इस गीत के प्रत्येक आवर्तन से तैयार हुए ताल त्रिताल के आकृतिबंध देखेंगे।

१) प्रथम पंक्ति — मा ऽ न ले ऽ ऽ ऽ भऽ रऽ न ऽ ना दे ऽ त ऽ
७ ४ ४ = १५

२) द्वितीय पंक्ति — प न घ ट पे नि ऽ र इ त नी बि न ती मो ऽ री
४ १ ३ ३ ३ ३= १७

३) तृतीय पंक्ती— हा ऽ हा खा ऽ त तो रे पै ऽ यां प र त हुँ ऽ
२ १ ३ २ ३ ३ २=१६

४) चौथी पंक्ति — छाॅ ऽ ड दे प्रा ऽ न मो रा श री ऽ र इ त नी बी
३ १ ३ २ ४ ३ १=१६

५) पांचवी पंक्ति — न ती मो ऽ री
२ ३= ५

**सौंदर्यात्मक निष्कर्ष**—

१) सांगीतिक दृष्टि से देखा जाये, तो इस बंदिश का काव्य उत्तम दर्जे का है। राग का भाव स्पष्ट रूप से प्रकट होता है, करुण रस परिपोषक, विषय अर्थवाही, सुगम और उच्चारण के लिए सहज—सुलभ शब्दयोजना उसी तरह गायनकुल स्वरव्यंजनों का ढंग इन सभी गुणों से परिपूर्ण ऐसी यह बंदीश है।

२) स्वर प्राधान्य की दृष्टि से — परंपरा से चले आये वादी—संवादी को इस बंदिश में फाटा दिया गया है, लेकिन राग के व्याकरण को सही तरीके से संभाला है।

३) पद की दृष्टि से — राग की प्रकृति और बंदिश की गति के अनुरूप भावपूर्ण, शुद्ध व सरल बोलों का चयन किया गया है।

४) स्वर की दृष्टि से— स्वर—राग का शुद्ध प्रयोग तथा मात्राओं की समुचित भरावट का ध्यान रखा गया है।

५) ताल की दृष्टि से — ताल त्रिताल का बंदिश की गति के अनुरूप चयन किया गया है, जिस कारण बंदिश का सौंदर्य खुलकर सुंदर प्रतीत होता है।

६) बंदिश का मध्यलय में चलना अद्वितीय और सुंदर लगता है।

७) बंदिश के बोल (काव्य) शुद्ध और सरल—सहज होने के कारण द्रुतलय में भी स्पष्ट रूप से उच्चारित किया जा सकता है।

८) उठाव की दृष्टी से — बंदिश की स्थायी की शुरुआत १४ वी मात्रा से और अंतरे की शुरुवात ९ वी मात्रासे वैशिष्ट्यपूर्ण दिखाई पडती है।

ISSN : 2278-9308
July 2021

इस बंदिश के अंतर्गत आनेवाले लयसौंदर्य चार प्रकार के लयसौंदर्य के विभिन्नता से प्रकट होते है। इस बंदिश की ४ १/४ पंक्तियों से प्रयुक्त होने वाले सभी आकृतिबंध रसिकगण को मंत्रमुग्ध करते है।

**तात्पर्य** –सौंदर्य की दृष्टि से अत्यंत तेजस्वी ऐसी यह बंदीश है। रचनाकारों का रचना कौशल्य, आगरा घराने की गायकी, संकलन और स्वरांकनकर्ता मेहताजी की जिद्द, कुशलता,और स्वराभ्यास की साक्ष देने वाली एक उच्च कोटि की बंदिश है।

**संदर्भ ग्रंथ सूची –**

१.''आगरा घराना : परंपरा गायकी और चिजें''– रमणलाल मेहता, संगीत कार्यालय हाथरस, प्रकाशन. पृ. १३–१४

२.''संगीतशास्त्र : परिचय''– प्रा.सौ. मोहना मार्डीकर, विजय प्रकाशन नागपुर, द्वितीय आवृत्ति २०१४.

३.''हिंदुस्तानी संगीत''– अशोक दा. रानडे, संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया नेहरू भवन, नई दिल्ली. प्रथम प्रकाशन २००६.

४.''रागाच्या परिघाकडून केंद्रबिंदूकडे''–किरण फाटक, संस्कार प्रकाशन मुंबई,द्वितीय आवृत्ती २००९.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# आधुनिक काळात निर्माण झालेल्या वृध्दांच्या समस्या एक अभ्यास

सहा.प्रा संदिप आर. उप्पोड
महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, यवतमाळ
Email Id.uppodsandip@gmail.com

सर्व प्राणिजातींप्रमाणे मानवी आयुष्याची मर्यादाही अनुवंशिकतेने पूर्वनिश्चित असते. अपघात, हत्या, प्राणघातक रोग इत्यादींमुळे मृत्यू न ओढवल्यास व्यक्ती शंभर वर्षे जगते, असे ज्ञात मानवी इतिहासकालापासून आढळले आहे. या आयुर्मानापैकी साठ ते पासष्ट वर्षानंतरच्या काळास वृद्धावस्था असे म्हणतात. एक ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन' म्हणून साजरा केला जातो. वृध्दांच्या देखील तीन प्रकार असतात. साधारण ५८ ते ६५ वयोगट ६५ ते ७५ वयोगट आणि ७५ आणि त्यापुढील वयोगट अशा तीन प्रकारांत ज्येष्ठांची विभागणी होते. आर्थिक सुबत्ता, वैज्ञानिक संशोधन, आधुनिक उपचार पद्धती यामुळे वयोमर्यादा वाढली आहे, त्यामुळे समाजात ज्येष्ठ नागरिकांची संख्यादेखील वाढली आहे. पण वाढत्या संख्येने वृध्दांच्या अनेक समस्यांनाही जन्म दिला आहे. या समस्यांचेही अनेक पैलू आहेत. आर्थिक, सामाजिक, शारीरिक आणि मानसिक अशा स्वरूपाच्या या समस्या असतात.

**उद्देश**

१. आधुनिक काळात निर्माण झालेल्या वृध्दांच्या समस्या जाणून घेणे.
२. आधुनिक काळात निर्माण झालेल्या वृध्दांच्या समस्यांच्या कारणांच्या शोध घेणे.

**वृध्दांच्या समस्या**

**१) शारीरिक समस्या**

फिलिप्स आणि हॅंडरसनच्या मते, "वृद्धावस्था ही व्याधी नाही पण वृध्दत्वाच्या अनुषंगाने अनेक व्याधी घर करून राहतात किंवा उद्भवलेल्या असतात. या अवस्थेत व्यक्तीच्या शारीरिक अवयवांची कार्यक्षमता पूर्णत: शिथिल होते. जसे शारीरिक शक्तीचा ऱ्हास, डोळयांना अंधुक दिसणे, श्रवणक्षमता कमी होणे, चेहऱ्यावर, अंगावर सुरकुत्या पडणे, मूत्रपिंड निकामी होणे, शरीरात साखरेचे प्रमाण वाढणे, हृदयाची कार्यक्षमता कमी होऊन उच्च रक्तदाब अथवा कमी रक्तदाब होणे, पचनसंस्था अकार्यक्षम होत असल्यामुळे अपचन, आम्लपित्त, बद्धकोष्ठता, जुलाब होणे, केस पांढरे होणे, सांधेदुखी, हाडांची झीज होणे, लैंगिक अवयव अकार्यक्षम होणे, फुप्फुस, किडनी यासारखे अवयव कमजोर बनणे, रोगप्रतिकार शक्ती कमी झाल्यामुळे कोणतेही नैसर्गिक परिवर्तन सहन न होणे. या सर्व शारीरिक त्रासामुळे दैनंदिन जीवन जगत असताना अडथळे निर्माण होतात. त्याचा अप्रत्यक्षरित्या सार्वजनिक जीवनातील सहभाग कमी होऊन अलिप्तता येते. कालांतराने व्यक्ती कौटुंबिक, सामाजिक कार्यातून व शेवटी जीवनातून कालवश होऊन जातो.

**२) सामाजिक समस्या**

समाजातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या व्यक्तीगत जीवनात वृद्धावस्थेला सामोरे जावे लागत असते. जेव्हा व्यक्ती निवृत्त होऊन घरी बसतो ती म्हणजे वृद्धावस्था होय. या अवस्थेत शारीरिकदृष्ट्या कमकुवतपणा येतो. त्यामुळे त्याला कोणतेही कार्य करणे कठीण जाते. म्हणून व्यक्तीच्या शरीररचनेत होणाऱ्या या बदलांचा प्रभाव सामाजिक जीवनावर पडतो. आणि त्याचे सामाजिक संबंध दुरावतात.

**३) कौटुंबिक समस्या**

वृध्दांच्यासमस्यांचे स्वरूप कौटुंबिक वातावरणाशी संबंधित असते. घरी जर वृध्द असतील तर त्यांनी काही ना काही उद्योग करावा अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. सासूने स्वयंपाक करावा, घरात झाडून काढावे तर सासऱ्याने मुलांना सांभाळावे व इतरही बाहेरील कामे करावीत. जसे की, बाजार करणे, दळण आणणे, किराणा आणणे इत्यादी. पण काही वेळेस त्यांचे शरीर साथ देत नसल्यामुळे त्यांना ती कामे जमत नाहीत. अशावेळेस सुनेकडून व मुलाकडून वृद्धांची अवहेलना केली जाते. त्यांना आई—वडील नकोसे वाटतात, अपमान, शिवीगाळ, मारहाण केली जाते, त्यांच्यावर विनोद केले जातात. अशा अनेक समस्या कुटुंबामध्ये निर्माण होतात.

**४) मानसिक समस्या**

वार्धक्यामुळे बुद्धिमत्ता, स्मरणशक्ती, संवेदन शक्ती कमी होते. नवीन विचारांचा, कल्पनांचा स्वीकार करणे वृध्दांना कठीण जाते. वृध्दत्वामुळे व्यक्तीची सत्ता, अधिकार कमी होतात. अशावेळेस वृध्दांना असे वाटते की, आपली कुटुंबाला व समाजाला गरज नाही, परिणामी ते हळूहळू आत्मकेंद्रित व एकलकोंडी बनतात. त्यामुळे एकांतवास, निवृत्तीनंतर मनातील काही इच्छा पूर्ण होत नाहीत आणि वयाच्या मानाने मानसिक दडपणातून शारीरिक समस्या निर्माण होतात तर कधी ताण—तणाव, वादविवाद, एकलकोंडेपणामुळे आरोग्यावर परिणाम होऊन शारीरिक समस्या निर्माण होऊन त्यातून मानसिक समस्या निर्माण होतात.

**५) आर्थिक समस्या**

कार्ल मार्क्सच्या मते, "आर्थिक समस्या इतर सर्व समस्यांचे मूळ कारण आहे."वृध्दावस्थेत व्यक्तीचा उत्पादनातील सहभाग संपुष्टात येतो. उत्पादनात व्यक्ती सहभागी नसल्यामुळे व्यक्तीला निवृत्तीवेतनाच्या माध्यमातून मर्यादित मोबदला मिळतो पण त्याच्या गरजा मात्र वाढत जातात. त्याचबरोबर आरोग्याच्या समस्या सुध्दा निर्माण होतात. अशावेळेस त्याला आर्थिक परावलंबन येते. अशा अवस्थेत आपल्या पालकांचे पालन पोषण करण्यास मुले तयार नसल्यास बिकट परिस्थितीचा सामना वृध्दांना करावा लागतो.

**६) परावलंबनाची समस्या**

वृद्धावस्थेला परावलंबनाचा काळ म्हणतात. कारण या काळात व्यक्ती इतरांवर अवलंबून असतो. लहान मुलांप्रमाणे वृध्द पूर्णपणे परावलंबी असतात. शारीरिक, आर्थिक, सामाजिकदृष्ट्या ती परावलंबी होते. या परावलंबनाच्या काळात वृद्धांना प्रेम, स्नेह, सहानुभूती अशा मानसिक आधाराची गरज असते. परंतु आधुनिक काळात मुलांकडे असलेल्या वेळेचा अभाव, नैतिक जबाबदारी फेटाळणे, मूल्यांचा होणारा ऱ्हास, राहत्या घराची कमतरता, "हम दो, हमारे दो", जेष्ठांप्रति असलेली संवेदना कमी होणे, वाढलेली बेरोजगारी, मुलांकडे आर्थिक उत्पन्नाचे साधन नसणे, अशामुळे वृद्धांची कुटुंबातील इतर सदस्यांना अडचण वाटू लागते. त्यामुळे वृद्धांना त्यांच्या परावलंबनाच्या काळात मदत करण्याची प्रवृत्ती कमी होत असलेली आढळून येते.

**७) निवासस्थानाची समस्या**

वृद्धावस्थेमध्ये एकाकीपणा ही त्यांच्या समोरची फार मोठी समस्या आहे. आज आत्यंतिक वैयक्तिकतेमुळे आपली मुले जन्मदात्या मातापित्यांना आधार देण्याचे टाळतात. शहरांमध्ये औद्योगिक विकासामुळे व शहरीकरणामुळे शहरामध्ये राहण्याच्या जागेचा तुटवडा जाणवतो. मुलांना विवाहानंतर आपल्या आई वडीलांना राहत्या घरात सामावून घेणे कठीण वाटते. विवाहानंतर वेगळया घरात स्वतंत्रपणे संसार थाटण्याकडे त्यांचा कल असतो. त्यामुळे राहत्या घराच्या समस्या वेळोवेळी वृध्द व्यक्तींना उद्भवत असतात.

**८) सुरक्षाविषयक समस्या**

समाजात वेगाने होणारे परिवर्तन, मूल्यांचा होणारा ऱ्हास, वाढती बेरोजगारी, वाढती गुन्हेगारी, जूनया व नवीन पिढीतील विचारातील तफावत यामुळे वृद्धांचे जीवन अधिकच असुरक्षित दिसून येते. घरी जर एखादे वृध्द जोडपे असेल तर त्यांच्यावर नजर ठेवणारे चोर त्यांच्या घरात धाड घालतात. घरात जर कोणी एकाकी वृध्द राहत असतील तर तेथे बरीच वर्षे काम करणारे घरगडीदेखील अशा वृद्धांचा खून करून मिळेल ते लुटून पळ काढतात. बस पकडणे, रेल्वेतून प्रवास करणे, रस्ता क्रॉस करणे, गर्दी, वेगाने जाणारी वाहनेदेखील वृद्धांच्या अपघातास कारणीभूत ठरतात. असे वृद्धांचे अपघात व मृत्यू होणाचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर कुटुंबात उपासमार, शिवीगाळ, मारहाणीचे प्रकार सर्रासपणे घडताना दिसून येतात. अशावेळेस वृध्दांच्या जीवनात सुरक्षाविषयक समस्या निर्माण होतात

**वृध्दांच्या समस्यांची कारणे**

**१)वाढते आयुर्मान**

सकस अन्नाचा पुरवठा, योग्य आरोग्याच्या सोयी—सुविधा, प्राणघातक असणाऱ्या रोगांविरुध्द लसी, वैद्यकीय क्षेत्रातील प्रगत तंत्रज्ञान, जवळच रुग्णालयांची उपलब्धता, शुद्ध पाण्याचा पुरवठा, आरोग्याबाबत वाढत्या जाणीवा यामुळे वृद्धांचे आयुर्मान वाढत आहे. ज्यातून वृद्धांच्या

लोकसंख्येत वाढ होत आहे परिणामी त्याचा भार कुटुंबातील कर्त्या किंवा कमवत्या व्यक्तीवर पडत आहे. सध्याची जीवन पध्दती अतिशय धावपळीची बनलेली असल्यामुळे कुटुंब सदस्यांना घरातील वृध्द नकोसे झालेले आहेत. म्हणुन वृध्दांचे वाढते आर्युमान हे त्यांच्या समस्या निर्माण होण्याचे एक कारण बनले आहे.

**२)संयुक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास**

भारतीय समाजात पारंपरिक संयुक्त कुटुंब पद्धती होती. या संयुक्त कुटुंबात नातेसंबंधाला फार महत्त्व होते. वडिलधाऱ्या मंडळीना कुटुंबीय लोक आदराच्या भावनेने पाहत असत. त्यामुळे वृद्ध व्यक्ती कुटुंबासाठी ओझे वाटत नव्हते. घरातील कर्ता पुरुष वृद्ध असायचा. त्यामुळे सर्व प्रकारच्या कार्याचे नियोजन त्याच्या सल्यानेच व्हायचे. कुटुंबात मानाचे व आदराचे स्थान होते त्यामुळे मरेपर्यंत त्यांच्या हाती कौटुंबिक अधिकार आणि आर्थिक सत्ता होती. आज मात्र ही सर्व परिस्थिती बदलली आहे. नागरीकरण व औद्योगिकरणाचा झालेला विकास हे देशातील आर्थिक प्रश्न सोडविण्यास कारणीभूत ठरत असले तरी ते संयुक्त कुटुंबाच्या विनाशाचे कारण ठरले आहे. त्याचबरोबर वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, नोकरदार स्त्रियांचे वाढते प्रमाण, नवीन व जूनया पिढीतील विचारांतील तफावत, मूल्यसंघर्ष, पारंपरिक संस्कृतीचा ऱ्हास या बदलत्या परिस्थितीत मुले स्वत:चाच विचार करू लागले. विवाहानंतर मुले स्वतंत्र राहू लागली आणि 'हम दो हमारे दो' ही संकल्पना उदयास आली. इत्यादी सर्व कारणांमुळे संयुक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास झाला. परिणामत: वृद्धांना एकाकी जीवन जगण्याची वेळ आली.

**३)ग्रामीण समुदायातील परिवर्तन**

भारतात वृद्धांना समस्या निर्माण होण्यामध्ये ग्रामीण समुदायातील परिवर्तन हे सुद्धा महत्त्वाचे कारण आहे. भारतातील बहुसंख्य लोक ग्रामीण भागात राहतात. ग्रामीण जीवनात वृद्धांना महत्त्वपूर्ण स्थान होते. ग्रामपंचायत, न्यायपंचायत, कृषीक्षेत्र, आर्थिक व्यवहार, धार्मिक व्यवहार, जन्म ते मृत्यू संस्कार, सामाजिक व नैसर्गिक संकट निवारणाच्या कामात वृद्धांचे सहकार्य घेतले जात होते. परंतु सामाजिक जीवनात वेगाने होणाऱ्या बदलांमुळे नवीन पिढी व जूनया पिढीत अंतर निर्माण होऊ लागले. हळूहळू ग्रामीण जीवनाच्या विविध क्षेत्रात आधुनिक ज्ञान प्राप्त केलेल्या नवीन पिढीच्या हातात सूत्रे आली. बदलत्या जीवनशैलीप्रमाणेच आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानामुळे जीवनाच्या विविध क्षेत्रातील वृद्धांजवळचे परंपरागत स्वरूपाचे ज्ञान व त्यांच्याजवळ असणारा अनुभव याचे महत्त्व कमी झाले. म्हणून ग्रामीण समुदायातील परिवर्तन हे देखील वृध्दांच्या समस्या वाढीचे एक कारण बनले आहे.

**४)औद्योगिकीकरण व नागरीकरण**

पाश्चात्यांच्या आगमनानंतर भारतात उद्योग निर्मितीची सुरुवात झाली. स्वातंत्रोत्तर काळात औद्यागिकीकरण व शहरीकरणाला विशेष चालना मिळाली. पूर्वीच्या व्यवसायात व प्रशासनात वृद्धांच्या पारंपरिक ज्ञानाचा उपयोग होई. परंतु औद्योगिक अर्थव्यवस्थेत ग्रामीण भागातील व्यवसाय व कुटुंब साहचर्य संपुष्टात आले. व्यवसायातील पिढीजात भूमिका संपुष्टात आली. त्यामुळे ग्रामीण भागातील लोक रोजगाराच्या निमित्ताने कारखान्यात काम करण्यासाठी हजारोच्या संख्येने शहराकडे येऊ लागले. त्यातून शहरीकरणाच्या प्रकियेला सुरुवात झाली. परिणामत: गावातील कुटुंबाचा आकार लहान होत गेला. औद्यागिकीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली. शहरातील नोकरी, रोजगार तसेच करमणुकीच्या साधनांचा उपभोग घेण्याचे आकर्षण निर्माण होऊन ते आपल्या पत्नीस घेऊन शहरात स्थायिक होऊ लागले. परंतु शहरातील घरांचा प्रश्न, मर्यादित उत्पन्न, व्यक्तीवादी विचारसरणी, पैसाला जास्त महत्व, स्वार्थी वृत्ती इत्यादी कारणामुळे वृद्धांचा सांभाळ करणे नकोसे झाले आणि अशाप्रकारे वृद्धांना सांभाळणारी माणसे ग्रामीण समुदायातून कमी झाल्यामुळे वृद्धांच्या समस्येत वाढझाली.

**५)नोकरी करणाऱ्या महिलांचे वाढते प्रमाण**

औद्योगिकीकरणामुळे व्यवसायाची विविध क्षेत्रे उपलब्ध झाली. शिक्षणामुळे नोकरी व व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण हे दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातून स्त्रियांना शिक्षण, व्यक्तिस्वातंत्र्य मिळाले. पूर्वी नोकऱ्यांमध्ये असणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण फार कमी होते. वर्तमानकाळात स्त्री शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे दिवसेंदिवस नोकऱ्या व व्यवसाय करण्यामध्ये

ISSN : 2278-9308
July 2021

स्त्रियांचे प्रमाण वाढत आहे. या बदलत्या जीवनशैलीत स्त्रियांच्या दर्जा व भूमिकेत परिवर्तन झाले आहे. या बदलत्या पारंपरिक दर्जा व भूमिका आणि नवीन दर्जा भूमिकेत संघर्ष निर्माण झाले. त्याचा परिमाण म्हणजे कुटुंबसंबंधात असंतुलन व विसंवाद निर्माण होण्याचे प्रमाण वाढले आहे. पती—पत्नी दोघेही नोकरी व व्यवसाय करण्यास बाहेर पडत असल्यामुळे तसेच वेळेअभावी व जीवनशैलीतील बदलामुळे वृद्ध व्यक्ती त्यांना कुटुंबात नकोशी झाली. त्यातूनच वृद्धांबाबत असहयोगाची कारणे पुढे आली. सुनेला सासु—सासरे कुटुंबात अडगळ वाटू लागली. स्वत:च्या स्वार्थासाठी, संसार सावरण्यासाठी वृद्धाला अडगळीत काढले जात आहे. इतकेच नव्हे तर नातवंडेदेखील आजोबा—आजीशी चांगले वागत नाहीत व त्यांची टिंगलटवाळी/शिवागाळ करतात. अशी अवहेलना वृद्धांच्या वाटयाला येत आहे. अशाप्रकारे वृद्धांच्या समस्या गंभीर स्वरूप धारण करीत आहेत.

**६)जातीव्यवस्थेचा ऱ्हास**

भारतीय समाज हा पारंपरिक जातीव्यवस्थेवर आधारित समाज मानला जातो. आज संपूर्ण जाती नष्ट झाल्या नसल्या तरी त्यावर आधारित व्यवस्थेचा अंत झाला आहे आणि काळानुसार अनेक परिवर्तनही झाली आहेत. उदा. व्यवसाय, रोटीव्यवहार याबाबत जातीतील सदस्यांवर पूर्वीएवढी कठोर बंधने आज राहीली नाहीत. पूर्वी एखाद्या व्यक्तीने आपल्या मातापित्यांचा सांभाळ करण्यास नकार दिल्यास त्याला जातीतून बहिष्कृत केले जाई. या जातीव्यवस्थेच्या दबावामुळे कोणतीही व्यक्ती वृद्धांची जबाबदारी सहसा नाकारू शकत नसे. परंतु औद्यागीकरण, नागरीकरण, शिक्षण, व्यवसाय, संचार माध्यमे, सामाजिक आंदोलने इत्यादी कारणांमुळे आज ही पारंपरिक जातीव्यवस्था नष्ट झाली. आणि जाती व्यवस्थेचा ऱ्हास होत असताना वृद्धांचे महत्त्व देखील कमी झाले. त्यातून वृद्धांच्या जीवनात अनेक समस्या निर्माण झाल्या.

**७)मूल्यात्मक संघर्ष**

नागरीकरण, औद्योगिकीकरण, व्यक्तीवाद, चंगळवाद इत्यादींचा नव्या पिढीवर जो प्रभाव आहे त्यातून त्यांची मूल्ये व जूनया पिढीची मूल्ये यात कमालीची तफावत आहे. पाश्चात्यांचे अनुकरण, भौतिकवाद, स्त्री—पुरूष समानता, व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्री—स्वतंत्रता, व्यक्तीवाद, कुटुंब म्हणजे 'हम दो हमारे दो', उपयुक्ततावाद, आदी मूल्ये ही नव्या पिढीची मूल्ये बनली आहेत. ही मूल्ये परस्परविरोधी, संघर्षात्मक असतात. थोरांचा आदर करावा, त्यांचा मान ठेवावा, गरजूंना मदत करावी, लवकर उठावे, लवकर निजावे, सत्य बोलावे, ध्येये समाजमान्य असावीत, ती गाठण्यासाठी साधन सुनिश्चिचता बाळगावी, लाच लुचपत घेवू नये, कामात हेळसांड करू नये, धार्मिक रितीरिवाजांचे आचरण करावे, स्त्रियांनी एकटे—दुकटे बाहेर जाऊ नये, मुलींनी संध्याकाळी लवकर घरी यावे, इत्यादी जूनया पिढीची मूल्ये आहेत. अशाप्रकारची जून्या—नव्या पिढ्यांमध्ये तफावत दिसून येते.

**संदर्भ**

१)लोटे.रा.ज (जून,२००७)*भारतीय सामाजिक संरचना आणि सामाजिक समस्या*. नागपूर: पिंपळापूरे ॲण्ड कं.पब्लिशर्स.
२)आगलावे प्रदीप (२०११) *भारतीय समाज संरचना आणि समस्या* नागपूर: श्री साईनाथ प्रकाशन.
३)कोंडेकर.ए.वाय (ऑक्टोबर,२००४)*भारतीय सामाजिक समस्या*. कोल्हापूर: फडके प्रकाशन.
४)हडप गोविंद.नी, जोशी अरविंद.द (ऑगस्ट,२००७)*वृद्धांच्या सामाजिक समस्या आणि जेष्ठांचे समुपदेशन*-(Sociology of Aging and Counselling of Senior Citizens) नागपूर: पिंपळापूरे प्रकाशन.
५)मेश्राम.आर.बी (१ ऑगस्ट २०१३) *भारतीय समाज प्रश्न आणि समस्या*. नागपूर: विद्या प्रकाशन.

ISSN : 2278-9308
July 2021

# महात्मा ज्योतिबा फुले- महाराष्ट्रातील थोर समाज सुधारक

**Mr.Rajesh Sharadrao Chavhan**
Ded,Bed,Dsm,Hr,Dj,Ccce,Ma,Med,Set(Sociology).Net (Education)
Z.P.Primary School Dhanora Bu Post Kothari Tq. Mangrulpir Dist. Washim
Email: rsc009988@gmail.com ,Mo. no. 7775932537

महात्मा ज्योतीबा फुले हे महाराष्ट्रातील थोर समाजसेवक आणि थोर विचारवंत म्हणून 19 व्या शतकात प्रसिद्ध होते. महात्मा फुले यांनी प्रामुख्याने महाराष्ट्रातील जाती व्यवस्थेविरुद्धमोठा लढा उभारला. समता आणि समानता यासाठी येथील प्रस्थापिता विरुद्ध संघर्ष केला. त्याचबरोबर महात्मा ज्योतिबा फुले यांनी त्यांच्या संपूर्ण जीवनभर मुलींना शिक्षण मिळावे यासाठी प्रस्थापित समाजव्यवस्थे विरुद्ध लढा दिला .

महात्मा ज्योतिबा फुले एक विचारवंत आणि एक लेखक होते. त्यांनी आपल्या लेखातून प्रस्थापित ब्राह्मण ब्राह्मणाच्या वर्चस्वा `विरुद्ध संपूर्ण जीवनभर लढा दिला. महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला . त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यात खटाव तालुक्यातील कटगुण होते . महात्मा ज्योतिराव फुले हे थोर विचारवंत होते. त्यांनी सत्यशोधक समाज नावाची संस्था स्थापन केली. शेतकरी आणि अस्पृश्य व बहुजन समाजाच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेऊन पुरोगाची विचारांची मांडणी केली तसेच त्यांनी महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. मुंबईच्या जनतेने त्यांना महात्मा ही पदवी बहाल केली होती. ही पदवी त्यांना इ. स. १८८८ या साली मिळाली. महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास“फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र” असे म्हणतात. २४ सप्टेंबर १८७३ रोजी, त्यांनी आपल्या अनुयांयासह, सर्व जातीतील लोकांना समान हक्क मिळवण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. यात सर्व जाती धर्मातील लोकांनीएकत्रित येऊन उत्पीडन वर्गाच्या उन्नतीसाठी काम केले.

शेतकऱ्यांचा आसूड हा महात्मा फुले यांचा प्रसिद्ध ग्रंथ होय. तत्कालीन समाजातील जातिभेद अनिष्ट प्रथा, तसेच समाजातील उच्चवर्णीयांची मकतेदारी या विरुद्धची प्रतिक्रिया महात्मा फुले यांच्या साहित्यातून उमटलेली आहे.

त्या काळाच्या समाजाला प्रबोधनाची व सामाजिक परिवर्तनाची वाट दाखवण्यासाठी त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे मार्गदर्शक, मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरले. समताधीषिष्ठ समाजाच्या निर्मितीमध्ये महात्मा फुले यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. त्यांचे कार्य समाजाला प्रेरणादायी असल्याचे सर्वमान्य आहे.

मानवी हक्कावर इ. स. १७९२ मध्ये थॉमस पेन यांनी लिहिलेले पुस्तक त्यांच्या वाचनात आले. त्यांचा प्रभाव त्यांच्या मनावर झाला. सामाजिक न्यायाबाबत त्यांच्या मनात विचार येऊ लागले. त्यामुळेच विषमता दूर करण्यासाठी स्त्री शिक्षण आणिमागासलेल्या जातीतील मुला-मुलींना शिक्षण यावर त्यांनी भर देण्याचे ठरवले. सामाजिक भेदभाव त्यामुळे कमी होईल असे त्यांचे निश्चित मत आणि अनुमान होते. कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही. आणिचातुवर्ण व जातिभेद ही निर्मिति मानवाचीच आहे. असे बोलताना मात्र याविषयी विश्वास निर्मिती करणारी कोणती तरी शक्ती आहेअशी त्यांची किंवा (अस्तिक्यवादी) विचारसरणी होती. मानवाने गुण्यागोविंदाने राहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकर्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचा क्रांतीकारक म्हणून ही ज्योतिरावांचे दर्शन होते. ‘नितीहाच मानवी जीवनाचा आधार’ आहे हा विचार मांडणारे ज्योतिराव एक तत्त्वचिंतक व्यक्तिमत्त्व होते. महात्मा फुलेंनी सामाजिक प्रबोधन करण्यासाठी शेतकऱ्यांच्या आसूड इ. ग्रंथ लिहून सामाजिक प्रबोधन केले. मूलभूत मानवी हक्काच्या आधारावरून विश्वकुटुंब असे निर्माण होईल व त्याकरिता कशा प्रकारचा वर्तनक्रम व वैचारिक भूमिका स्वीकारली पाहिजे ,हे ज्योतिराव फुले यांनी आपल्या ‘सार्वजनिक सत्यधर्म’संहितेत अनेक वचनांच्या आधारे मांडली आहे त्यातली काही महत्त्वाची वचने लिहिली..

*संसाराविषयी फुले यांचा दृस्टीकोण अर्थातच आशावादी होता. कष्टपूर्वकचालणाऱ्या गृहस्थाश्रमाला ते फार मान देत. कौटुंबिक जीवनाची व समाजाची खरी प्रगती परिश्रमाची वाढ होऊनच होणार आहे. कष्टाने जगन्याचे ज्यांना धमक नाही, असे लोक संन्यासी व भिक्षुक होतात व प्रपंच खरा नाही, व्यर्थ आहे असा भ्रम प्रपंचातील लोकांच्या बुद्धीत उत्पन्न करतात. असे करण्यात त्यांच्या आळशी धूर्तपणाच्या असतो; असे त्यांचेचे मत होते;

* सर्व गावांच्या, प्रातांच्या, देशाच्या, खंडाच्या संबंधात अथवा कोणत्याही धर्मातील स्वतःच्या संबंधात स्त्री आणि पुरुष उभयतांनी अथवा सर्व स्त्रियांनी एकमेकात कोणताही प्रकारचा आवड-निवड {भेदभाव} न करता या भूखंडावर आपले एक कुटुंब समजून एकमताने सत्यवर्तन करून राहावे.

* आपणा सर्वांच्या निर्माण कर्त्याने एकंदर सर्व प्राणीमात्रांना उत्पन्न करते वेळी मनूष्यास जन्मतास स्वतंत्र प्राणी म्हणून निर्माण केले आहे आणि त्यास आपापसात साऱ्या हक्कांचा उपभोग घेण्यास समर्थ केला आहे.
*स्त्री व पुरुष जे शेतकरी अथवा कलाकौशल्य करून पोटेभरण्यास श्रेष्ठ मानतात, परंतु शेतकरी वगैरे त्यांना मदत करण्याचा आदरसत्कार करतात त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावे.
* स्त्री अथवा पुरुष जेआपल्याकुटुंबासह,आपल्याभाऊबंदास आपल्या सोयऱ्यास  आणि आपल्या इष्ट मित्र साथींना मोठ्या तोऱ्याने पिढीजात श्रेष्ठ माणूस त्यास नीच मानीत नाही त्यासअसत्यवर्तन करणारे म्हनावे.

24 सप्टेंबर इ.स.1873 रोजी महात्मा ज्योतिराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाज सोसायटीचे पहिले अध्यक्ष आणि खाजिनदार होते. वेदांना झुगारून त्यांनी हे कार्य करण्यास सुरुवात केली. त्यांनी जातीय भेद आणि व नियम विरोध करण्यास सुरुवात केली.

महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली तेव्हा स्त्री विभागाचे नेतृत्व सावित्रीबाई फुले यांनी केले.    सावित्रीबाई यांच्या बरोबर 19 स्त्रिया सत्यशोधक समाजाचे कार्य करीत होत्या. त्याचवेळी सावित्रीबाई या एका कन्या शाळेच्या शिक्षिका ही होत्या. दीनबंधू प्रकाशनाने सत्यशोधक चळवळीच्या वेळी लेखक-प्रकाशन चे काम केले.  छत्रपती शाहू महाराजांनी सत्यशोधक चळवळीस पाठिंबा दिला. न्यायापासून, अत्याचारापासून व गुलामगिरीतून पासून शूद्राती शूद्र समाजाची मुक्त करणे व हक्काची जाणीव करून देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते.सर्वसाक्षीजगतपती त्याला नको मध्यस्ति! हे या समाजाचे घोषवाक्य होते.  सत्यशोधक समाजाने गुलामगिरी विरुद्ध आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनरचनेची मागणी केली. समाजातर्फे पुरोहिताशिवाय विवाह लावण्यास सुरुवात केली.

महात्मा फुले यांच्या निधनानंतर सत्यशोधक चळवळ महाराष्ट्रात रुजवण्यासाठी  दिनकरराव जवळकर व केशवराव जेधे यांनी खूप मेहनत घेतली. राजश्री शाहू महाराजांनी  त्यांना समाज प्रबोधण्यासाठी मदद केली . ब्राम्हेह्नेतर  चळवळीसाठी जेथे-जवळकर जोडीने अवघा महाराष्ट्र ढवळून काढला.

फुलेंचे सामाजिक कार्य

*ऑगस् १८४८ मध्ये पुणे येथे बुधवार पेठेत भिडे यांच्या वाड्यात मुलीची पहिली शाळा सुरू केली.  यांच्या वाड्यात मुलींची पहिली  शाळा सुरु केली.
*१७ मार्च १८५२ रोजी वेताळपेठेत भिडे त्यांच्या वाड्यात मुलींची दुसरी शाळा सुरू केली.
*१८५२ मध्ये दलितांना शिक्षण देण्यासाठी पहिली शाळा सुरू केली.
* १८५५ मध्ये रात्रीची शाळा सुरू केली.
* १८६३ मध्ये बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना आपल्याच घरी केली.
* १८६४ मध्ये पुण्यात एक पुनर्विवाह घडवून आणला
* १८६८ मध्ये स्वतःच्या घरातील पिण्याचा पाण्याचा हौद अस्पृश्यांना खुला करून परंपरागत रूढींना धक्का दिला.
* "शेतकऱ्यांचा आसूड" या आपल्या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्यांचे विदारक चित्र रेखाटून शिक्षणाअभागी समाजाची स्थिती शब्दबद्ध केली.
* यातच त्यांनी शिक्षण, वस्तीगृह, सिंचन, धरणे, तलाव, विहिरी यासारखे उपाय सुचवले.
* सुधारणावादी विचारांचा प्रसार करण्यासाठी कृष्णराव भालेकर यांच्या मदतीने पूर्ण पुण्यातून दीनबंधू हे वृत्तपत्र १८७७ मध्ये सुरू केले.
*महात्मा फुले यांनी आपल्या मित्रांच्या सहकार्याने अस्पृश्य लोकांना विद्या शिकण्याकरिता मंडळ नावाची संस्था स्थापन केली.
*२४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.
*१८८० मध्ये महात्मा फुले यांनी कामगारांच्या प्रश्नांची वाचा फोडण्यासाठी नारायण लोखंडे यांच्या माध्यमातून बॉम्बे असोशिएसन या घटनेची स्थापना केली.
* इ. स. १८८८ मध्ये विक्टोरिया राणीच्या चिरंजीवच्या कार्यक्रमात त्यांनी "शेतकऱ्यांचा प्रतिनिधी" म्हणून पारंपरिक वेशात उपस्थित राहून शेतकऱ्यांचे गाऱ्हाणे मांडले.
*महात्मा फुले यांनी  हंटर कमिशनपुढे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे अशी आग्रही मागणी केली.  यामुळे जनतेने त्यांना १८८८ साली महात्मा ही पदवी दिली.

फुलेंचे साहित्य

महात्मा फुले यांनी लिहिलेला "सार्वजनिक सत्यधर्म" हा सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. या समाजाचे मुखपत्र म्हणून "दीनबंधू" हे साप्ताहिक चालविले जात असे.  तुकारामाच्या अभंगाच्या धर्तीवर त्यांनी

अनेक "अभंग" रचले. आपला"गुलामगिरी" ग्रंथ अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना त्यांनी समर्पित केला.'अस्पृश्यांची कैफियत' हा महात्मा फुलेंचा अप्रकाशित ग्रंथ आहे. सार्वजनिक सत्यधर्म हा त्यांचा धर्म त्यांच्या मृत्यूनंतर ई. स. १८९१ मध्ये प्रकाशित झाले.

संदर्भ;

१. फुले, "महात्मा जोतिरओ गोविंदराव". vishvakosh.marathi.gov.in. ६ जून २०२१ रोजी पहिले.
२. BhadruG."contribution of satyashodhaksamaj to the low caste protest movement in 19th century" proceeding of the Indian history Congress 2002.
३. कालवणे, केदार(सप्टेंबर २०२०). "लौकिक जिवानमार्गाचे वैश्विक तत्वध्यान". अक्षर वाड्.मय. पहिला: ७९-८०.
४. गुंदेकर,श्रीराम. "महाराष्ट्राचे शिल्पकार महात्मा जोतिबा फुले"{pdf}. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई चे संकेतस्थळ. १९ ऑगस्ट २०१८ रोजी पहिले.
५. Charlesworthnai,l peasants and imperial rule agriculture and agrarian society in the Bombay presidency 1850-1935 Cambridge University press 2002 ISBN 978-0-52152-640-1.
६. कांडगे, राम {मार्च २००८}. महा-महात्मा जोतिराव फुले व्यक्ति व कार्य. चाकण: राजश्री प्रकाशन, चाकण. Pp.१४६,२६,२७.
७. GavaskarMaheshphules critique of Brahmin power' in Michale, S.M. untouchable,Dalits in modern Indialynnerienner publishers, 1999 ISBN978-155587-697-5.
८. समजोक्त मंगळाष्टकसह सर्व पूजा-विधी. १८८७.
९. कीर, धनंजय(२०२०). महात्मा जोतिराव फुले. मुंबई:पॉप्युलर प्रकाशन. pp. १७७.ISBN ९७८-८१-७१८५-५५४-४.
१०. Guha Ramchandra "makers of modern India" Harvard University press2011 ISBN 978-0-67405-246-8.
११. चव्हाण, रा. ना., संपादक श्री. रमेश चव्हाण {२०१३}. संत-सुधारक व त्यांचे धर्मविचार एक अभ्यास. पुणे: रा. ना. चव्हाण जन्मशताब्दी वर्ष प्रकाशन. Pp. २४७.
१२. KeerDhananjay, "Mahatma jyotiraoPhooley father of the Indian social revolution Mumbai , indian popular Prakashan,1974 ISBN 978-817154-0-666-2.
१३. सावित्री-जोतिरावांच्या चारित्रावर मालिका. ६ जून २०२१ रोजी पहिले.
१४. O" Hanlon, Rosalind, "Caste Conflict and Ideology Mahatma JyotiraoPhule and low caste protest in nineteenth century western India" cambrige University press 2002 ISBN 978-052-15-2308-5.
१५. समजोक्त मंगळाष्टकसह सर्व पूजा विधी. १८८७.
१६. कीर धनंजय(२०२०). महात्मा जोतिराव फुले. मुंबई; पॉप्युलर प्रकाशन ,मुंबई. Pp.१४८. isbn९७८-८१-७१८५-५५४-४.
१७.Sarkar Sumit, bibliographic a survey of social reform movements in the eighteenth andnineteethcentururies , MotilalMotilalBanarasidass/ Indian council of historical research,1975.
१८. कीर,धनंजय(२०२०). महात्मा जोतिराव फुले. मुंबई: पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. Pp.१५६, isbn ९७८-८१-७१८५-५५४-४.

ISSN : 2278-9308
July 2021

# भारतातील बांलकाची परिस्थिती

सहा.प्रा राहुल आर. लव्हाळे
महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, यवतमाळ
Email Id. lawhale.rahul@rediffmail.com

देशाचे बळ हे आरोग्यवान संरक्षित, सुशिक्षित, सुविकसित मुलांवर अवलंबून असते जे पुढे देशाच्या उत्पादक नागरिकांमध्ये परिवर्तित होत असतात. देशातील सुमारे ४० टक्के मुले त्यांच्या विशिष्ट सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीमुळे सुभेद्य (vulnerable) असून अवघड परिस्थितीचा सामना करीत आहेत. या सर्व मुलांना विशेष काळजीची आणि संरक्षणाची गरज आहे जगातील एकूण मुलांपैकी सुमारे १९ टक्के मुले ही भारतात राहतात. सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील बालकांची संख्या एकूण लोकसंख्येच्या ३९ टक्के इतकी आहे. बालके आपल्या विशिष्ट परिस्थितीमुळे असंरक्षित किंवा असुरक्षित वातावरणामध्ये वाढझाल्यामुळे ते विविध प्रकारचे गुन्हे करतात १पअीं असताना आपल्याला समाजामध्ये दिसून येतात. बालगुन्हेगारी सज्ञा खरंतर आपल्या कायद्यामध्ये वैद्य नाही. कायद्याला ही संज्ञा मान्य नाही, तर मुलं गुन्हेगार नसतं तर विशिष्ट परिस्थिती त्याच्याकडून गुन्हेगारी कृत्य करण्यासाठी प्रवृत्त करत असते आणि त्यामुळेच त्याला कायद्याच्या प्रक्रियेतून जावे लागते आणि पुढे त्यामुळे कायदा त्याला “विधिसंघर्षग्रस्त बालक” असे म्हणतो.

मुलांना सुधारण्याची संधी दिली जाणे गरजेचे आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यात बालका विषयीचे प्रकरण येत असतात त्याकरिता बालकल्याण अधिकाऱ्याची नेमणूक प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये केली जाते. बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम –२००० या कायद्यानुसार पोलीस ठाण्यात अशी व्यवस्था कलम ६३ नुसार करण्यात आली आहे आणि ती करणे अनिवार्य आहे. या पोलीस अधिकाऱ्याकडे काळजी आणि संरक्षणाची गरज असणाऱ्या मुला संदर्भात प्रक्रिया सोपवली असते. खरंतर पोलीस काय आपण सर्वच जण अशा मुलांना गुन्हेगार असे संबोधत आलोय हा शब्द आपल्या मनात आणि व्यवहारात रुडलेला आहे. “बालगुन्हेगार” ही मुलाची संज्ञा आपल्या कायद्यात नाही हे लक्षात घेणे आवश्यक आहे. काळजी आणि संरक्षण अधिनियम २००० मध्ये गुन्हेगारी कृत्ये गेलेल्या मुलाला ‘‘विधिसंघर्षग्रस्त बालक‘‘ असं म्हटलं आहे हे कायदा असं म्हणतो की मुलं गुन्हेगार नसतात तर त्यास विशिष्ट परिस्थिती गुन्हेगार बनवीत असते. जेव्हा मुलं सामाजिकदृष्ट्या स्वीकारलेल्या मानदंडपेक्षा अपेक्षित वर्तन त्यांच्याकडून होत नसतं किव्हा होण्याची स्थिती मानदंडाच्या कुठेतरी बाहेर जाऊन कृत्य करण्याचा किंवा कृती करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा ती समाजविघातक वृत्तीमध्ये ती मोडली जाते आणि त्याच्या हातून गुन्हा घडला असे आपण म्हणतो. त्याच वातावरणात त्यांच्याकडून मोठे गुन्हे घडून येतात आणि पुढे हीच मुलं समाजामध्ये गुन्हेगार म्हणून जन्मास येतात. या दृष्टचक्रास कुठेतरी थांबवणं आवश्यक आहे.डिस्ट्रिक्ट इन्फॉर्मेशन सिस्टीम फोर एज्युकेशन (DISI)नुसार पहिली ते बारावी पर्यंतचे शालेय शिक्षण फक्त १ टक्के मुलं घेतात. तसेच आपल्या देशात शालेय वयातील चार पैकी एक मुलगा शाळेच्या बाहेर आहे. एकूण ९९ दशलक्ष मुलांनी शाळा सुटली आहे. ही आकडेवारी २०११ च्या जनगणनेनुसार, प्रत्येक शंभर पैकी केवळ ३२ टक्के मुले त्यांचे शालेय शिक्षण योग्यप्रकारें पूर्ण करतात. बालकांचा दुरुपयोग आणि शोषणाचे प्रमाण भारतामध्ये ५ ते १४ वर्षे दरम्यान १०.१३ दशलक्ष बालकामगार आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार भारतामध्ये ५ ते १८ वयोगटातील सुमारे ३३ दशलक्ष बालकामगार आहेत,जे देशाच्या विविध भागात काम करतात. दररोज भारतात सुमारे १५० मुले बेपत्ता होतात त्यांचा अपहरण होतं मुलांची चोरी होते हा आपल्या देशातील मुलांवरील विरोधात मोठा गुन्हा आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो यांनी प्रकाशित केलेल्या अहवालानुसार दहा वर्षात मुलांवरच्या गुन्हयामध्ये ५०० पट वाढझालेली आहे. २०१५ आणि २०१६ या वर्षामध्ये मुलांवरील अत्याचार आता भारतात ११ टक्क्यांची वाढझाली आहे. हा रिर्पोट एन सी आर बी च्या अधिकृत माहितीवरून समोर आला आहे. त्याचप्रमाणे मुलां

विरोधी अत्याचारांमध्ये मुलांचे अपहरण करणे आणि त्यांचे शोषण करणे त्याचप्रमाणे बलात्कार त्यांचा मर्डर तसेच मुला—मुलींचा विनयभंग करणे यांसारखे अत्याचार ५० टक्के पेक्षा अधिक प्रमाण आहे हे फक्त पाच राज्यांमध्ये होतात.त्यामध्ये उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, दिल्ली आणि पश्चिमबंगाल यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे मुलांच्या आत्महत्या हा मोठा विषय ठरलेला आहे. यामध्ये सर्वाधिक दुसऱ्या क्रमांकाचे मुलांचे आत्महत्येचे कारण म्हणजे परीक्षेत नापास होण्याची भीती अशावेळी मुलांना सांभाळणे आवश्यक आहे. हा रिपोर्ट ॲक्सिडेंटल डेथ अंड सोसायटी इंन इंडिया २०१४ यांनी प्रकाशित केला होता.

**आरोग्य आणि मुलांचे पोषण**

भारतातील ६ वर्षाखालील १९.८ दशलक्ष मुले मोठ्या प्रमाणावर कुपोषणाचे बळी ठरलेले आहेत. भारतातील फक्त ९.१६ टक्के मुलांनाच जी ६ ते२३ महिन्याचे आहेत त्यांनाच फक्त पुरेशा प्रमाणात आहार प्राप्त होतो. बाकी मुलांना आजही आहाराची उपलब्धता होऊ शकली नाही. तसेच भारतामध्ये आजही ३८ टक्के मुले अशी आहेत त्यांचा योग्य प्रमाणात विकासझाला नाही. त्याच्यामुळे आजही ३ पैकी १ मुलं जे ० ते ५ वर्षे वयोगटातील आहेत त्यांच पुरेशा प्रमाणात विकास झालेला नाही. त्याचप्रमाणे कुपोषण अपंगत्व यांनी ग्रासलेले आहेत. त्याचे प्रमाण एकुण बालकांमध्ये २१ टक्के आहे ती रोग शारीरिक दुर्बलता इत्यादींनी सफर करत आहे भारतामध्ये एकूण मुलांपैकी ३६: मुले ज्यांचे वय १५ वर्षापेक्षा कमी आहे, ज्यांचे वजन कमी आहे अशी बालके आहेत.एकूण बालकांपैकी ३६ टक्के बालके यांचे वय ६ महिने ते ५ वर्षापेक्षा कमी आहे. त्यांचे प्रमाण ५८ टक्के आहेत ती मोठ्या प्रमाणात अशक्त आहेत. अशा मुलांना सकस आहाराची उपलब्धता करून देणे हे शासनाचे कर्तव्य आहे परंतु पाहिजे त्या प्रमाणात शासन सुद्धा या मुलांची काळजी घेऊ शकत नाही. भारतामध्ये आजपर्यंत फक्त ६२ टक्के मुलांचं लसीकरण होऊ शकले. तर ही आकडेवारी २०१८ आहे, अजूनही भारतामध्ये हॉस्पिटल मध्ये जन्म घेणाऱ्या बालकांचे प्रमाण ७९ टक्के आहे. अजूनही २१ टक्के गर्भवती महिला अशा आहेत ज्या संस्थात्मक डिलिव्हरीसाठी अजूनही हॉस्पिटलमध्ये पोहोचत नाहीत हीसुद्धा भारतासाठी मोठी लाजिरवाणी बाब आहे. आज आपण भारताला महासत्ता होण्याचे स्वप्न पाहतो त्याविषयी मोठ्या आशा बाळगतो, आज आपली अर्थव्यवस्था ही जवळजवळ तीन डॉलरपर्यंत विस्तारित आहे. परंतु आजही आपलं संस्थात्मक प्रस्तुतीचे प्रमाण, त्याचप्रमाणे कुपोषणाचं प्रमाण हे पाहिजे त्या प्रमाणात कमी झालेली नाही.

**मातेचे आरोग्य**

भारतामध्ये आज फक्त २१ टक्के माता आशा आहेत ज्यांची आरोग्याची योग्य प्रकारे काळजी ही घेतली जाते आहे. म्हणजेच पाचपैकी एका महिलेलाचं फक्त चांगली आरोग्यदायी काळजी मिळते. त्यामुळे ती आरोग्यवान मुले जन्मास येऊ शकतील. परंतु ७९ टक्के माता आशा आहेत कीज्या गर्भधारणेच्या वेळी काळजी घेतली जात नसल्याचे दिसून आलं आहे, ज्यांचे वय १५ ते ४९ वर्षे दरम्यान आहे हे भारताच्या भविष्यासाठी अति घातक अशी बाब आहे.आरोग्य आणि मुलांचे पोषण भारतातील ६ वर्षाखालील १९.८ दशलक्ष मुले मोठ्याप्रमाणावर कुपोषणाचे बळी ठरलेले आहेत. भारतातील फक्त ९.१६ टक्के मुलांनाच जी ६ ते२३ महिन्याचे आहेत त्यांनाच फक्त पुरेशा प्रमाणात आहार प्राप्त होतो. बाकी मुलांना आजही आहाराची उपलब्धता होऊ शकली नाही. तसेच भारतामध्ये आजही ३८ टक्के मुले अशी आहेत त्यांचा योग्य प्रमाणात विकास झाला नाही. त्याच्यामुळे आजही ३पैकी १ मुलं ० ते ५ वर्षे वयोगटातील आहेत त्यांच पुरेशा प्रमाणात विकास झालेला नाही. त्याचप्रमाणे कुपोषण अपंगत्व यांनी गाजलेले ही मुले आहेत. त्याचे प्रमाण बालकांमध्ये २१ टक्के आहे ती रोग शारीरिक दुर्बलता इत्यादींनी सफर करत आहेत. भारतामध्ये एकूण मुलांपैकी ३६ टक्केमुले ज्यांचे वय १५ वर्षापेक्षा कमी आहे, ज्यांचे वजन कमी आहे अशी बालके आहेत. एकूण बालकांपैकी ३६ टक्के बालके यांचे वय ६ महिने ते ५ वर्षा पेक्षा कमी आहे. त्यांचे प्रमाण ५८ टक्के आहेत ती मोठ्या प्रमाणात अशक्त आहेत. अशा मुलांना सकस आहाराची उपलब्धता करून देणे हे शासनाचे कर्तव्य आहे परंतु पाहिजे त्या प्रमाणात शासन सुद्धा या मुलांची काळजी घेऊ शकत नाही. भारतामध्ये आजपर्यंत फक्त ६२ टक्के मुलांचं लसीकरण होऊ शकले. तर ही आकडेवारी २०१८ आहे, अजूनही भारतामध्ये

हॉस्पिटल मध्ये जन्म घेणाऱ्या बालकांचे प्रमाण ७९ टक्के आहे. अजूनही २१ टक्के गर्भवती महिला अशा आहेत ज्या संस्थात्मक डिलिव्हरीसाठी अजूनही हॉस्पिटलमध्ये पोहोचत नाहीत हीसुद्धा भारतासाठी मोठी लाजिरवाणी बाब आहे. आज आपण भारताला महासत्ता होण्याचे स्वप्न पाहतो त्याविषयी मोठ्या आशा बाळगतो, आज आपली अर्थव्यवस्था ही जवळजवळ तीन ट्रिलीयन डॉलरपर्यंत विस्तारित आहे. परंतु आजही आपलं संस्थात्मक प्रमाण, त्याचप्रमाणे कुपोषणाचं प्रमाण हे पाहिजे त्या प्रमाणात कमी झालेली नाही. त्याचप्रमाणे मातेचे आरोग्य भारतामध्ये आज फक्त २१ टक्के माता आशा आहेत ज्यांची योग्य प्रकारे काळजी ही घेतली जाते आहे. म्हणजेच पाचपैकी एका महिलेलाचं फक्त चांगली आरोग्यदायी काळजी मिळते. त्यामुळे ती आरोग्यवान मुले जन्माला येऊ शकेल. परंतु ७९ टक्के जास्त माता आशा आहे गर्भधारणेच्या वेळी काळजी घेतली जात नसल्याचे दिसून आलं आहे, ज्यांचे वय १५ ते ४९ वर्षे दरम्यान आहे हे भारताच्या भविष्यासाठी अति घातक अशी बाब आहे.भारतातील मुलांसंदर्भातील ही परिस्थिती हे महासत्ता होण्याचं स्वप्न बाळगणाऱ्या देशाला कदापी शोभणारं नाही.

**संदर्भ**

१. बाल न्याय मुलांची काळजी आणि संरक्षण अधिनियम २०००
२. डिस्ट्रिक्ट इन्फॉर्मेशन सिस्टीम फोर एज्युकेशन (DISI) अहवाल
३. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो इन्फॉर्मेशन २०१६
४. ॲक्सिडेंटल देत अँड सुसाईड इंडिया रिपोर्ट २०१४
५. आय सी डी एस २०१५ अहवाल
६. भारतीय जनगणना २०११ अहवाल
७. मानव संसाधन विकास आणि मानवाधिकार भागीरथ प्रकाशन रंजन कोळंबे आवृत्ती २०१७
८. भारतीय अर्थव्यवस्था भाग—१ प्रकाशन रंजन कोळंबे आवृत्ती २०१७
९. भारतीय समाज आणि प्रश्न समस्या डॉक्टर बी मेश्राम विद्या प्रकाशन नागपूर २०१३

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# सावित्रीबाई फुले आणि स्त्री शिक्षण

प्रा.राहुल जोंधळे
सहाय्यक प्राध्यापक
महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, यवतमाळ.
Email – rjondhale358@gmail.com,Mob. 9420452370

**प्रस्तावणा :**

स्त्रियांनी शिकावे हे ज्या महिलांचे ब्रीद वाक्य होतेत्या मराठी शिक्षण प्रसारक, समाज सुधारक, कवयत्री, पहिल्या शिक्षका व मुख्याध्यापिकासावित्रीबाई फुले होते. समाजात स्त्रियांना शिक्षणामुळे मानाचे स्थान, घराबाहेर निघण्याची संधी,स्वातंत्र्य हे जर कुणामुळे साध्य झाले असेल तर ते सावित्रीबाई फुले यांच्यामुळे शक्य झाले.

सावित्रीबाई फुले यांचा जन्म नायगाव, खंडाळा तालुका, सातारा जिल्हा येथे३ जानेवारी १८३१ मध्ये लक्ष्मीबाई नेवसे व खंडोजी नेवसेया दाम्पत्याच्या पोटीझाला. त्यांच्या पतीचे नाव ज्योतिराव फुले होते. ज्योतिराव फुले यांच्याशी १८४० मध्ये त्यांचे लग्न झाले त्यावेळेससावित्रीबाई अवघ्या नऊ वर्षाच्या तर ज्योतिराव फुले तेरा वर्षाचे होते. लग्नानंतर सावित्रीबाईंनीत्यांच्या पतीकडून शिक्षणाचे धडे घेतले व पहिल्या शिक्षिका आणि मुख्याध्यापिका होण्याचा मान मिळवला. सावित्रीबाई फुले भारतातील मुलींच्या शाळेची मुख्याध्यापिका आणि शेतकरी शाळेची संस्थापक होत्या संस्थापिका होत्या. सावित्रीबाई च्या जीवनात समाजाप्रती उदांत हेतू व तळमळ होती. विधवा विवाह करणे,

जातिभेद दूर करणे, महिलांची प्रगती आणि दलित स्त्रियांना शिक्षित करणे इत्यादी उदांत हेतु होते.

शिक्षणाचे धडे समाजातील स्त्रियांना देताना त्यांना अनेक हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. यांच्या काळातील स्त्रियांची स्थिती अतिशय दयनीय होती. पडदा पद्धती, घरा बाहेर न निघणे, शिक्षणापासून वंचित ठेवणे, एकंदरीत महिलांना कोणत्याच क्षेत्रातस्वातंत्र्य नव्हते. चूल आणि मूल एवढेच त्यांचे जीवन होते आणि एवढ्या कठीण परिस्थितीत महिलांची प्रगती करणे, त्यांना शिक्षण देणे ही बाब अशक्य होती परंतु अशा परिस्थितीवर मात करून सावित्रीबाईंनी स्वत:च्या जीवनातील धेय्य गाठायचे ठरविले आणि महिलांना शिक्षित केले. महिलांना शिक्षित करताना समाजातील विरोधकांचा अतोनात त्रास झाला. दगडफेकने, शेन घाण विष्ठा फेकणे, शिवीगाळ करणेहे सर्व सुरूच राहायचे. शाळेत जाऊन मुलींना शिकविण्याच्या प्रेरणेने त्या एका पिशवी मध्ये स्वच्छ साडी घेऊन विद्यालयात बदलवून मुलींना उत्साहाने शिक्षण देत होत्या.

**उद्देश**

१.सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या कार्याची उजळणी करणे
२.महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण जाणून घेणे

**सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक सामाजिक क्षेत्रात क्रांतिकारक अमूल्य योगदान**

१८४८ मध्ये पुण्यात ज्योतीरावांसोबत विविध जातीतील ९ विद्यार्थ्यांनी सोबत घेऊन एक शाळा सुरू केली.याच शाळेची प्रेरणा घेऊन त्यांनी पुढे पाच शाळा काढल्या. १६० वर्षापुर्वी समाजात महिलांनानिव्वळ शिक्षणावरच बंधने होती असे नाही तर प्रत्येक कार्यात, क्षेत्रात त्यांची पायबंदी होती अशा कठीण परिस्थितीत महिलांना शिकविणे, शाळा काढणे, समाज विरोधी काम करणे हे सर्वअशक्य होते. परंतु ज्योतिबा फुले यांची प्रेरणा आणि स्वत:चे ध्येय यामुळे आलेल्या समस्यांना सामोरे जाऊन समाजातील महिलांची प्रगती केली.

१जानेवारी १८४८ रोजी भिडे वाड्यात ज्योतिराव व सावित्रीबाईंनी मुलींची शाळा काढली त्या काळात पुण्यातील अन्य भागातही मुलींच्या शाळा सुरू केल्या व काही काळ चालवल्या मुंबईतल्या गिरगावातही त्याच सुमारास स्टुडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटीने कमलाबाई हायस्कूल नावाची मुलींसाठी ची शाळा सुरू केली. सावित्रीबाईंच्या शाळेत सुरुवातीला सहा मुली

होत्या पण १८४८ सालसंपेपर्यंत ही संख्या ४० ते ४५ पर्यंत जाऊन पोहोचली या शाळेचे स्वागतसनातनी उच्चवर्णीयांनी धर्म बुडाला जग बुडणारअसे सांगून केले. काही उन्मत्तांनी तर अंगावर हात टाकण्याची भाषा केली. शेण, शिवीगाळ झाली, घर सोडावे लागले, नातेवाईक सोडून गेले, अनेक आघत होऊनही सावित्रीबाई डगमगल्या नाहीत. शिक्षणाचे धडे देताना सामाजिक क्षेत्रातही काम करीत होत्या. शाळेतील मुलांची गळती थांबविण्यासाठी फुले दाम्पत्याने विद्यार्थ्यांना प्रोत्साहन भत्ता तसेच आवडेल ते शिक्षण देण्यावर भर दिला. अभिरुची संवर्धन व चारित्र्याची जडणघडण या गोष्टींकडे फुलेंच्या शाळांमध्ये कटाक्षाने लक्ष दिले जात असल्यामुळे सरकारी शाळेच्या मुलांच्या संख्येपेक्षा दहा पटीने विद्यार्थ्यांची संख्या वाढली.

सावित्रीबाई महिला असल्यामुळे महिलांचे प्रश्न समस्या त्या जाणत होत्या. महिलांशी अधिक जवळीक साधून त्यांचा आत्मविश्वास वाढवत होत्या. त्यामुळे सावित्रीबाईंना कार्यकरतांना मदत मिळत असे.त्यावेळी समाजात बाल जरठ विवाहप्रथेमुळे अनेक मुली वयाच्या बारा—तेराव्या वर्षी विधवा व्हायच्या. ब्राह्मण समाजात विधवा—पुनर्विवाह अजिबात मान्य नव्हता. पतीच्या निधनानंतर अशा विधवांना सती जावे लागे किंवा मग त्यांचे केशवपन करून कुरूप बनविले जाई. विरोधाचा अधिकार नसलेल्या या विधवा मग कुणातरी नराधमाच्या शिकार बनत आणि गरोदर झाल्यास समाज छळ करत जन्माला येणाऱ्या मुलांना यातनांशिवाय काहीच मिळणार नाही अशा विचारांनी या विधवा आत्महत्या करत किंवा भृणहत्या करत. या समस्येवर उपाय म्हणून जोतिबांनी बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. सावित्रीबाईनी ते समर्थपणे चालविले. फसलेल्या वा बलात्काराने गरोदर राहिलेल्या विधवांचे त्या बाळंतपण करत गृहातील सर्व अनाथ बालकांना सावित्रीबाई आपलीच मुले मानत या ठिकाणी जन्मलेल्या काशीबाई या ब्राह्मण विधवेचे मूल त्यांनी दत्तक घेतले. त्यांचे नाव यशवंत ठेवले.

केशवपन बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करणे व त्यांचा संप घडवून आणणे, पुनर्विवाहाचा कायद्यासाठी प्रयत्न करणे सत्यशोधक समाजाच्या अनेक कार्यात त्यांनी सक्रिय भाग दर्शविला. १८९६ सालातल्या दुष्काळात सावित्रीबाईंनी समाजाला सत्कार याचा आदर्श घालून दिला. पोटासाठी शरीर विक्रय करणाऱ्या बाया—बापड्यांना दुष्टांच्या तावडीतून सोडवून त्यांनी त्यांना सत्यशोधक कुटुंबांत आश्रयास पाठविले, स्त्रियांनी शिकावे, अनाथांना आश्रय मिळावा इत्यादी कार्यक्षेत्रात हिरारीने भाग घेतला. पुणे येथील शैक्षणिक क्षेत्रातल्या मौलिक कार्याबद्दल १८५२ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी सरकारने फुले पती—पत्नींचा मेजर कॅन्डी यांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला आणि शाळांना सरकारी अनुदानही देऊ केले. जोतीरावांच्यासमता, सत्यपरायणता, मानवतावाद या तत्त्वांचा अंगीकार करून त्यासाठी सावित्रीबाईंनी आपलं सारं जीवन व्यतीत केले.

**महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण**

सावित्रीबाईंचे शैक्षणिक, सामाजिक योगदान बघताना आजच्या एकविसाव्या शतकात महिलांची शैक्षणिक सामाजिक प्रगती निश्चितच वाढली आहे. आज प्रत्येक क्षेत्रात महिला आघाडी मारत आहे.

दहावी—बारावी गुणवत्ता असो वा कल्पना चावला असो लोकसभा, राज्यसभा, राजकारण, चित्रपट कवयत्री, अशा अनेक क्षेत्रात तिने स्वत:ची उत्तुंग भरारी घेतली आहे. आज असे एकही क्षेत्र नाही जिथे महिलांची स्वत:चे पंख पसरवलेली नसेल.

आज खंत एकाच गोष्टीची वाटते की १३७ कोटीच्या वर लोकसंख्याअसलेल्या भारतात आजही महिलांचे शिक्षण पुरुषाच्या तुलनेत व लोकसंख्येच्या तुलनेत कमी आहे. याची पाहणी पुढील तक्त्यात

तक्ता क्र. १

भारतातील साक्षरता दर (१९५१ - २०११)

| वर्ष | एकुन व्यक्ती% | पुरूष% | स्त्रीया% | स्त्री—पुरूष साक्षरता भेद |
|---|---|---|---|---|
| १९५१ | १८.३३ | २७. १६ | ०८. ८६ | १८. ३० |
| १९६१ | २८. ३० | ४०. ४० | १५.३५ | २५. ०५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९७१ | ३४.४५ | ४५.९६ | २१. ९७ | २३. ९८ |
| १९८१ | ४३.५७ | ५६.३८ | २९. ७६ | २६. ६२ |
| १९९१ | ५२. २१ | ६४.१३ | ३९. २९ | २४. ८४ |
| २००१ | ६४.८३ | ७५.२६ | ५३. ६७ | २१. ५९ |
| २०११ | ७४. ०४ | ८२. १४ | ६५. ४६ | १६. ६८ |

(स्त्रोत : भारतीय जनगणना)

जनगणनेद्वारेप्राप्त माहितीचे विश्लेषण केल्यानंतर असे दिसून येते, की भारतातील साक्षरता वृद्धीचा दर हा कमी आहे. १९५१साली १८.३३टक्के लोकसंख्या साक्षर होती तर २०११ मध्ये ७४. ०४टक्केइतकी झाली. म्हणजेच साठ वर्षात ५५. ७१तेवढीच वाढझाली. पुरुषांचा विचार करता १९५१साली २७. १६ टक्के शक्यता होती आणि २०११साली ८२.१४ टक्के साक्षर आहेत म्हणजेच साठ वर्षात ५४.९८ वाढझाली तर स्त्रिया १९५१मध्ये ८.८६ टक्के साक्षर होत्या. तर २०११ मध्ये ६५.४६टक्के साक्षर आहेत म्हणजेच साठ वर्षात ५६. ६० टक्के वाढझाली जरी १९५१ आणि २०११साली महिलांच्या साक्षरतेत वाढझालेली असली तरी पुरुष व स्त्रिया यांच्यात १६. ६८ साक्षरतेचा भेद आहे.

तक्त्याचे निरीक्षण केल्यास असे निदर्शनास येते की,१९५१ ते १९९१ वर्षापर्यंत महिलांचा साक्षर दर फार खूप कमी वाटला तर २००१, २०११ मध्ये हा दर अधिक वाढला पण पुरुषाच्या तुलनेत नाही.

आपण म्हणतो एक महिला शिकली तर ती पूर्ण कुटुंबाला सुरक्षित करते परंतु पुरुष व स्त्री यांमधील साक्षरतेची दरी भेद बघता ते अशक्य आहे. कारण पुरुष बर घराबाहेर असतो, पैसा कमविण्यासाठी झटत असतो आणि महिलांना दिवसभर घरची कामे व मुलांचे संगोपन करावे लागते. आजही एकविसाव्या शतकात महिलांचे साक्षरतेचे प्रमाण एवढे कमी असेल तर ती मुलं बाळांना काय शिकवेल हा एक मोठा प्रश्न समाजात पुढे येत नाही काय.

समाजात स्त्रियांबद्दल उदासिनता बघता आज महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे. स्त्री—भृण हत्या, बलात्कार, अपहरण, हुंडाबळी आणि अशा कितीतरी समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. महिलांचे सक्षमीकरण म्हणतो पण कुठे झाले हो. आजही स्त्री सायंकाळी सहाच्या नंतर सुरक्षित नाही, माजी महिलांना मंदिरात प्रवेश नाही. जी की पुरुषांना नऊ महिने नऊ दिवस स्वत:च्या पोटात वाढवते, लहानाचा मोठा करून सूशिक्षित नागरिक बनवते त्या स्त्रीची अवस्था किती दयनीय, किती लाजिरवाणी आहे. स्त्री संपूर्ण ब्रह्मांड चालवते, तिच्या पोटी पुरुष जन्माला येतो आणि ती त्याच्याच पासुन सुरक्षित नाही.

**महिलांवरील अत्याचाराची आकडेवारी पुढील प्रमाणे**

| अनु क्र. | गुन्हा | २०११ | २०१२ | २०१३ |
|---|---|---|---|---|
| १ | बलात्कार | २४२०६ | २४९२३ | ३३३०७ |
| २ | अपहरण | ३५५६५ | ३८२६२ | ५१८८१ |
| ३ | हुंडाबळी | ८६१८ | ८२३३ | ८०८३ |
| ४ | पती व नातेवाइकाकडुन कृरता | ९९१३५ | १०६५२७ | ११८८६६ |
| ५ | शालीनता व बदनामीचे हल्ले | ४२९६८ | ४५३५१ | ७०७३९ |
| ६ | विनयभंग | ८५७० | ९१७३ | १२५८९ |
| ७ | परराष्ट्रातुन मुलींची आयात | ८० | ५९ | ३१ |
| ८ | सती प्रतिबंधक अधिनियम | ०१ | — | — |
| ९ | अनैतीक व्यापार प्रतिबंधक अधिनियम | २४३५ | २५६३ | २५७९ |

(स्त्रोत : राष्टीय गुन्हे अभिलेख मंडळ)

भारतात स्त्री शिक्षणासाठी आणि त्यांच्या प्रगतीसाठी अनेकांना अथक परिश्रम घेतले. परंतु स्त्रीशिक्षणाच्या प्रगतीचा खरा आधारस्तंभ जर कोणी असेल तर त्या सावित्रीबाई फुले आणि फक्त सावित्रीबाई फुले आहेत. म्हणून त्यांच्या स्मरणात ३ जानेवारी हा बालिका दिवस म्हणून आपण

ISSN : 2278-9308
July 2021

साजरा करतो. सावित्रीबाईंनी निव्वळ शिक्षणासाठी स्वत:चे आयुष्य झिजवले नाहीतर विधवा—पुनर्विवाह, केशवपन बंदी, आंतरजातीय विवाह, वस्तीगृह, शाळा अशा अनेक क्षेत्रात कार्य स्त्रियांना समाजात ताठ मानेने चालवण्यास मार्ग दिला. स्त्रियांचे जीवन चूल आणि मूल एवढेच सीमित नाही तर यापुढेही कार्य करू शकते हे त्यांनी समाजाला पटवून दिले आणि तिलाही प्रगतीच्या अनेक वाटा दाखविल्या.

ज्या महिलेने स्त्रीच्या शिक्षणासाठी त्याच्या प्रगतीसाठी स्वत:चे सर्वस्वी आयुष्य वाहून घेतले अशा या महान स्त्रीच्या कर्तृत्वाचा वारसा डोळ्यासमोर ठेउन त्यांनी केलेल्या त्यागाला, हाल—अपेष्टा, बलिदानाला आपण निवड फोटो व बालिका दिन एवढा साजरा करण्यापर्यंत मर्यादित ठेवले तर महिलांची खरोखर प्रगती कशी होईल.

**निष्कर्ष :**

भारतातील स्त्री शिक्षण ही नव्या काळाची नितांत गरज आहे. देशातील महिलांनी योग्य शिक्षण घेतल्याशिवाय आपण विकसित देशाची अपेक्षा करू शकत नाही. कुटुंब, समाज आणि देशाच्या प्रगतीत महिला महत्वाची भूमिका निभावतात. देशात लोकशाही यशस्वी होण्यासाठी पुरुषांसह महिला शिक्षण आवश्यक आहे. सुशिक्षित महिला कुटुंब, समाज आणि देशातील वास्तविक आनंदाचे स्रोत आहेत. हे खरोखरच म्हटले जाते की एखाद्या पुरुषाला शिक्षित करणे म्हणजे फक्त एकच व्यक्ती शिक्षित होतो आणि स्त्रीला शिक्षित करणे हे संपूर्ण कुटुंबाला शिक्षित करणे आणि अशा प्रकारे संपूर्ण देशाला शिक्षित करणे.महिलाची आज दिसुन येणारी प्रगती ही खऱ्या अर्थाने सावित्रीबाई व म. फूले यांच्या बलिदानानाची प्रचिती आहे. भारतीय समाज व्यवस्थेमध्ये अतिशय आमुलाग्र बदल घडविण्याच्या दृष्टीकोनातून या दांपत्यानी प्रयत्न केले आहेत.तसेच तळागाळातील लोक, अस्पृश्य, शेतकरी, कष्टकरी महिला इ. साठी यांनी जीवन व्यतित केले आहे. यामुळेच या सर्व शोषित पीडील जनतेला विकासाच्या मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळाली.

**संदर्भसूची**

अन्नदाते, शशिकांत (२०१६).*संपूर्ण महिला व बालविकास*. पुणे : के सागर पब्लिकेशन
अहुजा, राम (२०१४).*सामाजिक समस्याऐ*. जयपुर : रावत पब्लिकेशन
घोडके, अमोल. (२०१३). *भारतातील मानव संसाधन विकास*. पुणे : द युनिकॲकॅडमी
जाधव, तुकाराम. (२०१८).*मानवी हक्क*. पुणे :द युनिकॲकॅडमी
महाराष्ट्राचा इतिहास महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# जाती, वर्ण आणी वर्ग (एस,एस टी,ओबीसी) व्यवस्थेतील गोंधळ!

डॉ. पुरोषत्तम गुणवंतराव पखाले
मराठी विभाग प्रमुख
मातोश्री अंजनाबाई समाजकार्य महाविद्यालय नरखेड
ई मेलः–puroshotampakhale@gmail.com

इसवीसनपूर्व ५६३ मध्ये जातिव्यवस्था नसून गण व्यवस्था होती ती प्रामुख्याने आढळते ते पाच प्रकारचे गण असायचे कोलिय, लिच्छवी, गौड़, शाक्य आणि द्रविड ई. या गणांचे राज्य म्हणजे गणराज्य जणपद असा त्यांचा उल्लेख व्हायचा त्या वेळी कोणतेही जात अस्तितवात नव्हती. फक्त आणि फक्त संघ किंवा गणराज्य अशी त्यावेळी माणसाच्या माणुष्कीची व्यवस्था निर्माण झालेली होती. ‘‘ज्यादा राज्यावर राजाची सत्ता होती त्या राज्यांना जनपद म्हणत व ज्याचावर राजाची सत्ता नव्हती त्या राजांना संघ किंवा गणराज्य असे म्हणत असत. उदा. शाक्य यांच्या स्वतंत्र, गणतंत्र राज्याचे अनेक राजवंश होते व ते आळीपाळीने राजसत्ता चालवित होते. सिद्धार्थ गौतमाच्या जन्माच्या वेळी राजपद धारण करण्याची पाळी शुद्धोधनाची होती.’’[१]पृष्ठ क्र. ३३ बुद्धाच्या काळानंतर बुद्धाच्या अस्तित्वानंतर काही काही विकृत माणुष्कीचे माणसात भेद पाहणारे विषमतावादी विदेहवादी, फुटीरवादी चौथ्या शतकानंतर मूर्ती पूजेच्या अनुषंगााने भरतात जाती निर्माण व्हायला लागली. त्यानंतरच माणसाच्या कर्मानुसार जातीव्यवस्थेची निर्मीती सवर्ण विचारसरणीच्या माणसांनी करण्यात आली जे अस्तित्वात नाही ते सांगितल्या गेलेत. जात म्हणजे जन्माने मिळालेली जात जी मेल्याशिवाय जात नाही. तिला जात म्हणतात. जन्म घेताच ज्या जातिमध्ये जन्माला येतो ती जात, आमच्या भारत देशाच्या सांस्कृतिच्या इसवीसन चौथ्या पिढीनंतर जन्माला आल्याचे दिसते ही जात कधीही मरत नाही किंवा कुजत नाही ते जन्माबरोबर माणसासोबत राहते. आणि माणसासोबतच मरते म्हणजे जातिचे जन्म मृत्यूचे कालावधी तोच जातिच्या जीवनाचा कालावधी असे म्हणता येईल. आमच्या या देशात जसजशी मुर्तीपूजा आणि तिचे स्वरूप विशाल होत गेले. तसतसा माणुस जाती–जातीत विभाजीत होत गेला. समाजाने किंवा उच्च वर्णातील लोकांनी माण्साच्या कामावरून त्यांना त्यांच्या जातिचे वर्णन नाव दिल्या गेले. ते पुढे जातिच्या रूपाने विकसीत झाले आता जात म्हटले कि, माणसाचा चेहरा माणसाचे विभाजन झालेले स्वरूप दिसते. ही माणसा माणसातली प्रथम झालेली विभगणी जिथे माणूसच वाटला जातो तेथे सर्वच वाटल्या जाऊ शकते.हीच सद्भावना पुढे विकसित झाली. त्यामुळे आज आमच्या देशात साडे सहा हजाराच्या वर जाती आहेत यामुळे माणसामाणसात भेद होऊ न माणुसच माणुसाच्या दुर झाला. त्याला दुसऱ्या जातीचा मनुष्य हा वैरी वाटायला लागला त्या जातीमध्ये शत्रुत्व निर्माण झालेत. याच शत्रुत्वाने मनुष्याच्या धर्म विकासाला आळा बसून कुणी आदिवासी झाला. तो जंगलात राहयला लागला. जंगलात राहतो म्हणून त्याला वनवासी समजल्या गेलेत जो सुरूवातीचा आदिवासी होता तो वनवासी झालात. ही अशी असवैधानिक शब्द रचना त्या त्या धर्म समूहासाठी वापरल्या गेल्यात. याप्रमाणे अनेक धर्म संप्रदाय आमच्या भारतात निर्माण झाले. या भारतातील सर्व माणसे धर्मानि पिळुन निघाली धर्म आणि जात त्यांच्या रक्तात भिनले.

या जातिव्यवस्थेने माणसामाणसात भेद निर्माण करून हजारो जातीना जन्म दिला. यातूनच कितीतरी धर्माची निर्मिती झाली. अनेक धर्म आपापल्या पद्धतीने आज इथेच तो वाटण्याचे थांबले नाहीत, येथेच त्याचे विभाजन व्हायचे थांबले नाहीत. तर पुढे वर्ण व्यवस्था निर्माण झालीत. समाजातील श्रेष्ठाकंडे वेगळे अधिकार म्हणून समाज जिकडेतिकडे विभागु लागला त्यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारची सामानता न राहता त्यातील कटुता उफाळून आली. ही कटुता उच्च आणि वरिष्ठ समजलेत खालच्या लोकांनी वेगळे काम करायचे,शुद्राने वेगळे कार्य करायचे, अतिशुद्र आणि त्याहीपेक्षा खालच्या दर्जाची काम करायची आणि संवर्णानी अधिकार गाजवायचे. या अधिकाराच्या माध्यमातून लोकांची लूट करायची आणि आपले हित साध्य करायचे. याचा फायदा

ISSN : 2278-9308
July 2021

पुढील काळात ब्राम्हण क्षत्रिय वैश्य या तिन्ही वर्णना झाला. परंतु शूद्र आणि अतिशूद्र खचला गेलात. तो शोषल्या जाऊ लागला. त्याच्या हाती पारंपारिक रित्या आणि कूळ व्यवस्थेने दिलेले काम आले. यात अतिशूद्र ही अतिशय खालच्या दर्जाची काम करणारी समाजातली वीष्ठा उचलणारी जमात म्हणून अतिशूद्र यांचा उल्लेख होऊ लागला. यामुळे त्यांना हीनत्व प्राप्त झालेत. पुढे याच शुद्र आणि अतिशूद्रांना दलित म्हणून संबोधल्या गेलेत.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदर्भात म्हणतात,'' ''अस्पृष्यासारख्या तुमच्याच देशबांधवांच्या एक मोठ्या जनसमूहाला तुम्ही सार्वजनिक शाळेत शिकण्यास बंदी घालता आणि तरीही तुम्ही राज्यशासनाला पात्र आहात का? त्याना तुम्ही सार्वजनिक विहिरीवर पाणी भरू देत नाहीत आणि तरीही तुम्ही राज्य शासनाला पात्र आहात का? सार्वजनिक रस्त्यावरून चालण्यास अस्पृश्यांना तुम्ही बंदी करता तरीसुध्दा तुम्ही शासनसत्ता चालविण्यास योग्य ठरता? त्यांच्या आवडीचे कपडे आणि दागिने त्यांनी वापरू नयेत अशी बंधने घालणारे तुम्ही शासन सत्तेसाठी पात्र आहात? त्याच काय अशा प्रश्नांची एक मोठी मालिका मी विचारु शकतो.''[२] असे डॉक्टर बाबसाहेब आंबेडकर एका ठिकाणी वरिष्ठ समाजाच्या राजसत्ता उपभागणाऱ्या लोकांच्या संदर्भात बोलतात. अशांना दलित अस्पृश्य कितितरी नावाने चिढवल्यागत करता. भारतीय राज्यघटना मुलभूत हक्का भाग ३ मधील कलम नं. १७ यामध्ये,'' अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे. व तिचे कोणत्याही स्वरूपातील आचरण निषिद्ध करण्यात आले अस्पृश्यतूंनउदभवणारी कोणतीही निस:समर्थता लादणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.''[३](पृष्ठ क्र. ८) असे असतानाही दलित अस्पृश्यता, दलित हा शब्द मुद्दाम म्हणून उच्चारणे आणि हिंनत्वाची वागणूक देणे हे संविधानुसार चुकीचे आणि असह्य वेदना देणाऱ्याबाबी अंसवैधनिक आहेत. या प्रकारचा वापर सतत भारतीय प्रसारमाध्यमांमधुन होत असताना दिसतो. तो काणत्याही वर्गातचा असला तरी त्याला दलित समजतात, ओबीसी जरी असला तरी तो दलितच आहे, एसटी असला तरी तो दलितच आहे. अशी वारंवारता वापरून यावर्गामध्ये गफलत होत चाललेली आहे. आणि हे करण्याचे काम प्रसार माध्यम करत आहेत.त्यांचा सतत ते वापर करून या ठिकाणी एससी, एसटी, ओबीसी यामध्ये गफलतीचे वातावरण तयार करू पाहात आहे. असे वातावरण तयार करून कुठेतरी सत्तासंघर्ष चालु असल्याचे दिसते आहे. एससी,एसटी,ओबीसी मध्ये गफलत करून एससीला दलित समजणे या एसटीला दलित समजणे आणि ओबीसीला ही दलित समजणे हा कुठेतरी कनिष्ठ असल्याचा प्रकार किंवा कनिष्ठ म्हणुन दर्शविण्याचा प्रकार या ठिकाणी चालू असल्याचे दिसते.वर्तमान परिस्थितीत काही उदाहरणे पाहता आपल्याला असे दिसुन येते की, नेमके दलित म्हणजे कोण? काही उदाहरणे आपल्याले शंका दुर करण्यासाठी पाहिले उदाहरणार्थ युपीतील असून फुलन देवी मल्लाह जातीची होते आणि ही जाती ओबीसी वर्गामध्ये येतात, असे असताना देखील पत्रकार आणि न्यूजचॅनल वाल्यांनी तिला दलित समजले एवढेच नाही तर तिच्यावर जेव्हा चित्रपट निघाला तेव्हा त्यातही तिला दलित समजण्यात आले. वास्तविक ती ओबीसी वर्गामध्ये तिची जाती येते. प्रख्यात लेखकही तिला दलित समजण्यात आले. वास्तविक ती ओबीसी वर्गामध्ये तिची जाती येते. प्रख्यात लेखककांचा इलिया यांची जाती गरेडी आहे ओबीसी तध्ये येते तरीही त्या लेखकांना दलित लेखक म्हणून गणल्या जाते. दलित रोहीत वेमुला कांड सर्व भारतीयांना आणि जगाला माहिती कळले की प्रसारमाध्यमामधुन रेहित वेमुला याला मिडियाने दलीत म्हणुन समजले परंतु नंतर लोकांना माहिती कळले की प्रसारमाध्यमांमधून रोहित वेमुलालादलित समजत आहेत तो वास्तविक पाहता ओबीसी मधून येत असल्याने आणि ते ओबीसी असल्याने लोकांना जेव्हा कळले तेव्हा मिडीया वाटले की आपण निर्माण केलेली माहिती ती चुकीची होती तेव्हा प्रसार माध्यमे गप्प बसली.

आमच्या देशाला स्वातंत्र्य मिळून जवळपास चौऱ्याहत्तर वर्षे झालीत आणि भारतीय संविधान निर्माण व्हायला ७२ वर्ष झाली तरी या देशामध्ये एससी, एसटी, ओबीसी यांच्या विषयी जनजागृती निर्माण करून देण्याचे आणि कोणत्या वर्गामध्ये कोणत्या जाती येतात आणि कोणकोणत्या जातीचा कोणत्या वर्गामध्ये त्यांचा समावेश केला जातो याची जाणीव जागृती अजून पर्यंत आमच्या देशात कोणत्याही केन्द्रसरकारने, कोणत्याही राज्य सरकारने केल्याचे दिसत नाही. यामुळे आपण कोणत्या वर्गात येतो. आपली जात कोणत्या वर्गामध्ये समाविष्ट आहे एससी मध्ये

आहे एसटी मध्ये आहे. किंवा ओबीसी मध्ये आहे.तसेच दुर राहणाऱ्या गावांमध्ये जीवन जगणाऱ्या लोकांना अजून पर्यंत कळले नाहीत आणि म्हणूनच या देशात साठ टक्के जनता आपण कोणत्या वर्गामध्ये आहोत याची शाश्वती देऊ शकत नाही.काही व्यक्तिमत्व एससी मध्ये असून ते आपण ओबीसीमध्ये आहो असे ते समजुन घेतात यामुळे त्या जातीतील माणसाच्या चिारसरणीमध्ये फरक पडत जातो आणि आपण याठिकाणी या वर्गाचे आहोत हे त्यांना कळत नाही. ओबीसीच्या काही लोकांना आतापर्यंत असे वाटायचे की आपण वरच्या जातीमध्ये मोडत असल्याने ओबीसी वर्गाचे आपल्याला काही घेणेदेणे नाही. ओबीसी काय करतो याकडे लक्षद्यायचे नाहीत म्हणून ओबीसीच्या माणसालाच आपली जात कोणत्या वर्गामध्ये आहे हे कळले नाही. तिचामाणसाला आपली जात कोणत्या वर्गामध्ये आहे हेही कळले नाहीत आणि अनुसूचीत जातीच्या जमातीच्या माणसाची याठिकाणी जातीचा वर्ग समजण्यात गफलत झाली. यामुळे भारतात कोणत्या समुहाचे, कोणत्या वर्गाचे, कोणत्या जातीचे किती लोकसंख्या आहे ते सांगता येत नाही

भारतीय मनुष्य आपली जात कोणत्या वर्गामध्ये आहे हे नक्की सांगण्यात अपयशी ठरला यामुळे आमच्या भारतीय लोकांच्या व्यक्तिमत्वामध्ये फरक पडून त्यांची मानसिकता ही उच्चवर्णीय मानसिकतेसी जुळत गेली याचा फायदा या देशातल्या राजकारणी, सत्ताधारी आणि समाजकारणी लोकांना झाला म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, “ राज्य घटनात्मक प्रश्न मुख्यत्वेकरून हक्काचे प्रश्न नसून शक्ती चे प्रश्न असतात कोणत्याही देशाच्या वास्तविक शासन पद्धतीचे अस्तित्व त्या देशात प्रत्यक्ष आढळून येणाऱ्या शक्तीवर अवलुबून असते. याच कारणामुळे एखाद्या समाजात अस्तित्वात असणाऱ्या शक्तींना जेव्हा त्या देशाच्या राज्यघटनेमध्ये योग्य स्थान मिळते तेव्हा त्या घटनेला महत्व आणि स्थिरता प्राप्त होते.”[४]उदा. मोढघांची, मोढ वणिक आणि मोढबनिया या तिन्ही जाती वैश्य समाजाच्या उपजाती सहित एकुण अडतीस (३८) गुजरात मधील काही जाती, १९९४ मध्ये केंद्र सरकारने ओबीसी मध्ये समाविष्ट केल्यास ज्या जाती मुख्यता वरच्या वर्गातल्या होत्या आणि त्यांना ओबीसी मध्ये समाविष्ट करून २००१ या सालीकेंद्र सरकारने ओबीसी यादीत वरील जातिचा समावेश केला अशा उच्चवर्णिय जातीचा समवेश ओबीसी मध्ये होत गेल्याने ओबीसीतील कोणत्या नेत्यांनाही कळले नाही की, नेमक्या ओबीसीच्या जाती कोणत्या अशाप्रकारची गफलत मोठया प्रमाणात ओसीबी सोबत झाल्याने ओबीसी सुद्धा गोधळून गेल्याचे दिसून आलेत.

संदर्भ ग्रंथ:—

१) बुद्ध आणि त्यांचा धम्म बुद्धीस्ट रिसर्च असोसिएशन नांदेड २००३
२) सविधान २६ जानेवरी २०१४ महाराष्ट्र शासन अनुवादीत भारत सरकारच्या वतीने
३) जातीचे निर्मुलन डॉ. भिमराव रामजी आंबेडकर प्रकाशन सोनबा भगवानजी जामनकर उंटखाना नागपूर
४) तत्रेव

ISSN : 2278-9308
July 2021

# वेदों की द्रष्ट्रा ऋषिकाएँ

प्रा.डॉ.प्रिती मंगेश कुलकर्णी
सहायक प्राध्यापक
श्रीमती सु.रा.मोहता महिला महाविद्यालय,खामगांव,महाराष्ट्र, ८३२९६११६३३,
Kpriti1975@gmail.com

'वेद' भारतीय संस्कृति के मूल स्त्रोत एवं सर्व प्राचीन विश्ववाङमय है। 'वेदोऽखिलो धर्ममूलम्'। शास्त्र, उपनिषद्, दर्शन, पुराण आदि सभी धर्मग्रन्थों के मूल वेद' ही है। जीव, जगत्, प्रकृति और परमात्मा के स्वरूप वास्तविक ज्ञान ही वेद का स्वरूप है।

आज विश्वभर में वैदिक संस्कृति को शिरोधार्य मानके अनेक देश वेदज्ञान को अपनाने में गौरव का अनुभव करते है । वेदों का ज्ञान सदीयों सें सभी को आकृष्ट करता दिखायी देता है । इस ज्ञानसंपदा को कईयोंने आत्मसात किया तो कई ने इसे लूट कर ले गये । इस ज्ञानसंपदासे अनेक देशों के विद्वानोंने अध्ययन कर अनेक 'शोध' अपने नाम से प्रसिध्द किये । वास्तव में उनकी खोजों का मूल भारत वर्ष सेले जाये गयी ज्ञान संपदा थी किंतु इसे जान बुझकर छिपाया गया । ऐसे एक/दोन नही कई उदाहरण है ।

अब प्रश्न यह है की, इस बात का ढिंढोरा भारतद्वारा क्यो नही पिटा गया ? इसका उत्तर बिलकुल सरल है । हमारे ऋषियोंने कभी भी, कही पर भी ऐसा नही कहां की, यह वेद हमारे द्वारा लिखे गये है । उनका कथन यही रहा है की, यह ज्ञान हमारे ज्ञानचक्षूंओं का दृष्टीगोचर हुआ हमने इन्हे सिर्फ केवल श्रृती तथा स्मृतीद्वारा स्मरण में रखा और आगे संक्रमित किया । हम इसके रचयिता नही है । इसलिये वेदोंको 'अपौरुषेय' कहां गया है । जिन ऋषियों को यह ज्ञान दृष्टिगोचर हुआ उन्हें 'द्रष्टा' कहां गया है । आचार्य यास्क के 'ऋषिर्दर्शनात् वचनों में यह स्पष्ट कहां ' गया है की, ऋषियोंने मन्त्रोंको देखा, इसलिये उनका नाम 'ऋषि' पडा । इससे यह स्पष्ट है की ऋषियों ने मन्त्रों की रचना नहीं की, उन्होंने तप:पूत अपने अन्त:करणमें मन्त्रशक्ति के स्वरुप का दर्शन किया और श्रुतिमान् के द्वारा अपने शिष्य–प्रशिष्यों में उसे प्रसारित किया, इस प्रकार आगे वेदोंका विस्ताार होता गया । श्रुति–परम्परा से अध्यापित होने से ही वेदों को 'श्रृति' कहा गया है । इन मन्त्रोंक दर्शन केवल ऋषियोंद्वारा हुआ है ऐसा नही है । ऋषियों की तुलना में ऋषिकाओं की संख्या नाममात्र है । ऋग्वेद के सुक्तों के आधार पर वेदो में नारी का स्थान गौरव पूर्ण तथा पूजनीय है । बृहद्देवता में ब्रह्मवादिनी ऋषिकाओं का वर्णन इस बात की पुष्टी करता है ।

घोषा गोधा विश्ववारा, अपालो पनिषन्निषत्
ब्रह्मजाया जुहूर्नाम अगस्त्यस्य स्वसादिति: ।।८४।।
इन्द्राणी चेन्द्रमाता च सरमा रोमशोर्वशी ।
लोपमुद्रा च नद्यश्च यमी नारी च शश्वती ।।८५।।
श्रीर्लाक्षा सार्पराज्ञी वाक्श्रध्दा मेघा च दक्षिणा ।
रात्री सूर्या च सावित्री ब्रह्मवादिन्य ईरिता ।।८६।।

**अर्थात्** – घोषा, गोधा, विश्ववारा अपाला उपनिषद्, निषद्, ब्रह्मजाया (जूह), अगस्त्य की भगिनी, आदिति, इन्द्राणी और इन्द्र की माता सरमा, रोमशा, उर्वशी, लोपामुद्रा और नदियाँ, यमी, शश्रुती, श्री, लाक्षा, सार्पराज्ञी, वाक्, श्रध्दा, मेधा, दक्षिणा, रात्री और सूर्या–सावित्री आदि सभी ब्रह्मवादिनी है ।[1]

प्राचीन समय में स्त्रियाँ गृहस्थाश्रम का आचरण करने वाली एवं ब्रह्मवादिनी भी होती थी । गृहस्थाश्रम का संचालन करने वाली स्त्रिओं को 'सद्योवधू' कहां जाता था । तथा ब्रह्मोपासना एवं वेदाध्ययन करनेवाली स्त्रियों को 'ब्रह्मवादिनी' कहां जाता था ।

**घोषा** — घोषा काक्षीवती (१०.३९.४०) । घोषा काक्षीवती का ऋषित्व के दोसूक्तों १०.३९—४० में दृष्टी गोचर होता है । कक्षीवत् ऋषि की ब्रह्मवादिनी कन्या होने के कारण इनके नाम के साथ काक्षीवती पद संयुक्त हुआ है । घोषा के पुत्र सुहस्त्य घौषेय को ऋ. १०.४१ के ऋषि होने का गौरव प्राप्त है । ऋग्वेद १०.४०.५ और १.११७.७ में घोषा उल्लिखीत हुई है । जिन्हे अश्विनी कुमाारों की कृपा से पति प्राप्त हुआ था । घोषा और उनके पुत्र सुहत्स्यने उन सुक्तो में अश्विनी कुमारोंकी स्तुती की है ।

बृहद्देवता ग्रंथ (७.४१—४८) में घोषा की कथा वर्णित है । घोषा काक्षीवान् ऋषि की कन्या थी । बचपन में इन्हें कुष्ठरोग हो गया था । इसीसे योग्य समय पर इनका विवाह न हो पाया । अश्विनी कुमारों की कृपा से वे जरा और रोगों से मुक्त हुई और अपने पती को प्राप्त हुई । ये बहुत प्रसिध्द विदुषी और ब्रह्मवादिनी थी । बृहद्देवता (३.१४५.१४६) में इनके पिता काक्षीवान् को अंगीरस कुलमें उत्पन्न दीर्घतमस् का पुत्र बताया गया है । आचार्य सायण ने काक्षीवत् की सुपुत्री के रुप में इनका ऋषि परिचय प्रस्तुत किया है । (कक्षीवतो दुहिता घोषा नाम ब्रह्मवादिन्यृषि: ऋ.१०. ३९.सा.भा.)

घोषा ने स्वयं ब्रह्मचारिणीके रुप में ब्रह्मचारिणी कन्या के समस्त कर्तव्यों का उल्लेख दो सूक्तों में किया है । इन्होंने कहां है —'हे अश्विनी कुमारों ! आपके अनुग्रह से आज घोषा परम भाग्यवती हुई है । आपके आशीर्वाद से घोषा के स्वामी के भले के लिये आकारासे प्रचुर वर्षा हो, जिससे खेत लहलहा उठे । आपकी कृपा दृष्टी घोषा के भावी पति को शत्रुकी हिंसा से रक्षा करे । युवा एवं सुन्दर पति को पाकर घोषा का यौवन चिरकाल अक्षुण्ण बना रहे ।'

'हे अश्विनी कुमारो ! पिता जैसे संतान को शिक्षा देते है, वैसे ही आप भी मुझें सत्—शिक्षा दें । मै बुध्दिहीन हूँ । आपका आशीर्वाद मुझे दुर्गति से बचाये । आपके आशीर्वाद से मेरे पुत्र—पौत्र—प्रपौत्र आदि सुप्रतिष्ठत होकर जीवनयापन करें । पतिगृह में मैं पति की प्रियपत्नी बनूँ । ' (ऋग्वेद —१०.३९—४१)

**गोधा**—गोधा ऋषिका का ऋषित्व ऋग्वेद की देढ ऋचाओं और सामवेद के देढ ऋचाओं में दृष्टिगोचर होता है । बृह.६.१०६,यजु.२४.३५, तैत्ति.सं.५.५.१५.१ आदि में गोधा शब्द पशुवाचक (नक्र या ग्राह आदि) के रुप में प्रयुक्त हुआ है । बृह.२.८२ में स्त्री द्रष्ट्रीयों के नाम में गोधा ऋषिका का नामोल्लेख मिलता है । आचार्य सायण ने गोधा ऋषिका को 'ब्रह्मवादिनी' रूप में उपन्यस्त किया है । —पूर्वेणेत्यर्धर्चसहिताया: सप्तभ्यास्तु गोधा नाम ब्रह्मवादिन्यृषि: ऋ.१०.१३४.सा.भा.

गोधा ऋषिका के संदर्भ में अधिक जानकारी नही है। पं. मधुसूदन ओझाजी के यज्ञविज्ञान विभाग के 'आधिदैविकाध्याय ग्रंथ के वेद प्रवर्तक —ऋषि—अधिकार प्रकरण के पृष्ठ ५३ पर जो वर्णन प्राप्त होता है उसके अनुसा बृहस्पति के वंश में बीस ऋषि है । इनमें द्रष्टा ऋषिका मात्र दो है उन्ही में से एक 'गोधा' है जो बृहस्पति ऋषि की पौत्री है । '

**विश्ववारा आत्रेयी**— अत्रि महर्षि के वंश में उत्पन्न विदुषी विश्ववारा द्रष्टा ऋषिका है । अपनी तपस्यासे उन्होंने ऋषिपद को प्राप्त किया था । वैदिक साहित्य में जहां ऋषियों का स्थान गौरवपूर्ण रहा है उतना ही ऋषिकाओं का स्थान गरिमामण्डित रहा है । प्रत्युत् बढा—चढा ही रहा है । 'अत्रिदुहिता विश्ववारा'उदाहरण है । अत्रि पुत्री होने से कहीं इन्हें 'अत्रिदुहिता विश्ववारा' कहां गया और कही 'विश्ववारा आत्रेयी'। ऋग्वेद एवं यजुर्वेद में कई मन्त्रों की द्रष्ट्र ऋषिका होनेकी प्रतिष्ठा उन्हें प्राप्त है । यजुर्वेद मे इनके ऋषित्व का विवरण सर्वानुक्रम सुत्र मे इस प्रकार प्राप्त होता है — अग्नेशर्ध्दाऽत्रिदुहिता विश्ववारा (सर्वा.३.१७) यजुर्वेद मे इसी मन्त्र (३३.१२) का भाष्य करते हूए आचार्य महीधर लिखते है त्रिष्टुप् विश्ववारा द्रष्ट्रा द्वितीयमरुत्वतीयपुरोरुक् (मही.भा.)। विश्ववारा द्वारा दृष्टिगोचर हुआ ऋचाओं में नारी को अग्निवन्दना तथा पति को प्राजापत्याग्नि की रक्षा का उपदेश दिया गया है । ऋ.५.२८ ।

**अपाला आत्रेयी** — ब्रह्मवादिनी अपाला अत्रिमुनिके वंश मे उत्पन्न हुई । कहते हैं की अपाला को कुष्ठरोग हो गया था, इससे उनके पतिने उन्हे घरसे निकाल दिया था । वे अपने पीहर में दु:खी रहती थी । उन्होने कुष्ठरोग से मुक्त होने के लिये इन्द्र का आराधना की । एक बार इन्द्र को अपने घर बुलाकर सोमपान कराया तथा उन्हे प्रसन्न किया । इन्द्र देव ने प्रसन्न होकर उन्हें वरदान

ISSN : 2278-9308
July 2021

दिया । उनके वरदान से अपाला के पिता के सिर के उडे हुए केश फिर आ गये, उनके खेत हरे–भरे हो गये और अपाला का कुष्ठरोग मिट गया ।

अपाला ब्रह्मवादिनी थी । ऋग्वेद के अष्टम मण्डल के ९१ वे सूक्त की १ से ७ तक की ऋचाये इन्ही की संकलित है । बृहद्‌देवताकार २.८२ में अनेक ऋषि ऋषिकाओं को साथ अपाला आत्रेयी के ऋषित्व का प्रतिपादन किया है ।

**उपनिषद् और निषद्**–ऋषिका निषद्और उपनिषद् निर्मल प्रजासम्पन्न जुड़वां बहने है । दोनो ऋषिकाओं ने तप और साधना के बल प्राणापान रुप पक्षी से तादात्म्य स्थापित किया । निषद औरउपनिषद् दोनों ने प्राणापान के देवता अश्विनीकुमारों को वहन करने वाले हंसपक्षी की भांति प्राणों को हंसा सुंदर पंखोवाली बताया है ।

इन ऋषिका द्वय का नाम ऋग्वेद मे नही मिलता अपिल इनका परिचय ऋग्वेद के खिलसूक्त संग्रह की अंतिम ऋचा मे प्राप्त होता है । इन ऋषिका द्वयो का वर्णन कश्मीर की खिलों की पाण्डुलिपी में उपलब्ध है । उन्होंग यज्ञों में मन्त्रों को प्रत्यक्ष किया है । ये जुडवा बहनें स्तुतिगान करने वाली थी तथा यजमान और उनकी पत्नी को पुत्र–पौत्र प्रदान करने की कामना करने वाली थी ।

**ब्रह्मजाया (जुहू)**– जुहू नामक ब्रह्मवादिनी ऋषिका का ऋषित्व ऋग्वेद के एक सूक्त १०.१०९ मे दृष्टिगोचर होता है । बृहद्‌देवता के प्रणेता ऋषि शौनक ने इन्हे 'ब्रह्मजाया' कहकर निरूपित किया है । (तेऽवदन्वैधदेवं तु ब्रह्मजाया जुहूर्जगौ बृहः ८.३६) आचर्य सायण ने भी ऋग्वेद भाष्य में इन्हें 'ते ऽ वदन्' इति सप्तर्च दशयं सूक्तम् । जुहूर्नाम ब्रह्मवादिन्यृषिः ऋ.१०.१०९. सा.भा.

ऋग्वेद के दशम मण्डल के १०९ वे सूक्त को ऋषिका जूहू है । बृहस्पति की पत्नी होने के कारण 'ब्रह्मजाया' जूहू के नाम से प्रसिध्द हुयी । जूहू का जीवन तपश्चर्यामय था । बृहस्पतिने किसी कारण जुहू का त्याग किया किंतू निर्णायक मण्डल (देव समाज) के आदेश उन्होने फिरसे जुहू का ग्रहण किया । तपस्या एवं सच्चरित्रता को जूहुद्वारा सर्वश्रेष्ठ बताया गया है ।

**अगस्त्य की भगिनी**– अगस्त्य स्वसा का ऋषित्व केवल ऋग्वेद के दसवे मण्डल के साठवे सूक्त छठी ऋचा में ही मिलता है । अगस्त्य ऋषि की बहन का अन्यत्र कहि उल्लेख दृष्टिगोचर नही होता है । आचार्य सायणने ऋषित्व को स्पष्ट निर्दिष्ट किया है । षष्ठ्यास्वगस्त्यस्य स्वसैषां मातर्षिका । उन्होने अनुक्रमणी का उध्वरण देकर इसी तथ्य की पुष्टी की है । षष्ठयागस्त्यस्थ स्वसा मातैषाम् (ऋ.१०.६०.सा.भा)

**आदिति**– अदिति दक्ष प्रजापति की पुत्री थी । इनका विवाह ऋषि कश्यप से हुआ था । अदिति का उल्लेख प्रायः देवाो की माता एवं आदित्योंकी माता के रुप में हुआ है । खगोलिय दृष्टिसें अन्तरिक्ष में द्वादशा आदित्य भ्रमण करते है वे आदित्य अदिति के पुत्र है । अदिति के पुण्यबल से ही उनके पुत्रों को देवत्व प्राप्त हुआ । (अष्टयोनिमष्टापुत्राम् । ........ अष्टौ पुत्रासो अदितेः– तैत्तरिय आरप्यक १.१३.१–२)

अदिति को पृथ्वीः अन्तरिक्ष एवं है । द्यौ आदि में सार्वभौम सत्ता के रूप में भी उल्लिखित किया गया है । (अदितिद्यौरादितिरन्तरिक्षमदितिर्माता सपिता स पुत्रः ।'' ऋ.१.८९.१० वेदों में शक्तियों का ऋषित्व भी यदा – कदा दृष्टिगोचर होता है । आदिति का ऋषित्व केवल ऋ. ४.१८.७ मे हि मिलता है । अनुकमणी आख्यायिका में ऋषि विषयक उल्लेख में इस सम्पुर्ण सूक्त ४.९८ की ऋषिका अदिति को माना गया है । (इन्द्रोदितिर्ऋषिश्चस्मिन्मिथः सूक्ते सनूचिरे' अनुक्रमणीभाष्य ४.१८) बृहद्‌देवताकारने इन्हे वैश्वदेव सूक्तों की दृष्टी और दक्ष पुत्री के रुप मे उल्लिखित किया है । (पार्थोदक्षसुतादिति–बृह.३.५७)

**शची इन्द्राणी**–इन्द्रकी पत्नी है । ये भी भगवती आद्याशक्ति की एक कला भी मानी गयी है । ये स्वयंवर की अधिष्ठात्री देवी है । प्राचीन कालमें जब कही स्वयंवर होता था तो पहले शची का आवाहन और विधिवत् पूजन किया जाता था । जिससे स्वयंतर –सभामें कोई विघ्न या बाधा पडने की सम्भावना अथवा उत्पात, कलह और किसी प्रकार के उपद्रव आदि की आशंका नही रहती थी । ऋग्वेद में कई ऐसे सूक्त मिलते है', जो शचीद्वारा दर्शन किये गये है ऐसा बतलाये जाते है । शचीदेवी पतिव्रता स्त्रियों में श्रेष्ठा मानी गयी है । वे भोग– विलासमय स्वर्गकी रानी होकर भी सतीत्व की साधना में संग्लन रहती है ।

ISSN : 2278-9308
July 2021

शची देवीका जन्म दानव कुल में हुआ था, तथापि वे अपने त्याग–तपस्या और संयम आदि सद्गुणोंसे देवताओं की भी वन्दनीया हो गयी । शची के पिता का नाम पुलोमा था । वह दानव कुल के सन्मानित् वीर थे । उन्हीं के नाम पर शची को 'पौलोमी' तथा 'पुलोमजा' भी कहत है । इन्द्राणी का ऋषित्व सूक्त १०.१४५ और सूक्त १०.८६ की कुछ ऋचाओं में मिलता है । सूक्त १०.८६ में इन्द्र, इन्द्रपुत्र वृषाकपि तीनों का ऋषित्व निर्दिष्ट है । बृहद्वेवताकारनें इन्द्राणी के ऋषित्व को प्रमाणित किया है । (इमांखनामीति सूक्तं इन्द्राणी यत्स्वयं जगौ–बृह.८.५५) आचार्य सायण ने भी अपने भाष्य में इन्द्राणी को मन्त्रद्रष्टी के रुप में स्वीकार किया है । (वृषाकपिर्नमेन्द्रस्य पुत्रः । स चेन्द्राणीन्द्रद्यैतै जयः संहताः सविवादं कृतवन्तं । ......इत्याद्याश्चतस्त्र इत्येकादशर्च इन्द्राष्या वाक्यानि अतस्तासामिन्द्रा व्यषिः ऋ.१०.८६ सा.भा.)

**इन्द्र मातरः**–देवो की बहने (१०.१५३) ऋग्वेद का एक सूक्त १०.१५३ का ऋषित्व 'इन्द्रमातरो देवजामयः' को प्राप्त है । इसी सूक्त के दोन मन्त्र थोडे पाठ – भेद को साथ सामवेद १२ एवं १७५ में मिलते है । बृहद्वेवता के प्रणेता ऋषि शौनकमे स्त्री द्रष्ट्रीयों के नाम (बृह.२.(३) में इन्हें एक वचनरुप 'इन्द्रमाता' के रुप मे स्वीकार किया है । आचार्य सायण ने ऋषि विषयक उल्लेख में देवो की बहिनों के रुप में उपन्यस्त किया है । (ईङ्खयन्तिः इति पञ्चर्चगायत्रमैन्द्रं द्वितीयं सूक्तम् देवानां स्वसृभूता इन्द्रमातरो नामर्षिकाः –ऋ.१०.१५३.सा.भा.)

**सरमा –देवशुनी**–सृष्टी के प्रत्येक जीव में ईश्वर का अंश है तो जैसे मनुष्य (ऋषि/ऋषिका) द्वारा मन्त्रों का दर्शन किया गया वैसे ही मनुष्येतर प्राणीयों का भी ऋषित्व स्वीकारा गया है । ऐसे ही ऋषिका– सरमा– देवशुनी है । ऋग्वेद के कुछ मन्त्रों का ऋषित्व देवों की कुतिया सरमा को दिया गया है । 'यस्य वाक्यं ऋषिः' इस सूत्रानुसार सरमा ऋषिका मानी गयी है । आचार्य सायण ने इसकी पुष्टी की है । (अत्र त ऋषयः सरमा देवता द्वितीया चतुर्ध्यायाघायुज एकादशी च षट् सरमाया वाक्यानि–ऋ.१०.१०८)

इस सूक्त में पणियों और सरमा का संवाद है पौराणिक संदर्भ में पणियों मे इन्द्र देव की गौएँ चुरायी थी । बृहस्पति देव ने यह देख लिया । उनकी सूचना पर इन्द्रदेवने सरमा को दूती बनाकर भेजा । आध्यात्मिक संदर्भ में पण व्यवहारे–धातू के अनुसार पणि केवल सांसारिक व्यवहार में लिप्त पुरुष है । उन्हें असुराः भी कहा है । असू– प्राणेषू रमते के अनुसार वे केवल प्राणरक्षा में रमे हुये स्वार्थी है । शरीरस्थ इन्द्रियाँ जीवात्मा से विमुख स्वार्थ में लिप्त हो जाती है, यही गौआं की चोरी है । बृहस्पति (ज्ञान के अधिष्ठाता) यह तथ्य समझा लेते है, तब 'सरमा' 'सरान् विद्याधर्य यह तथ्य समझ लेते है, तब 'सरमा''सरान्' विद्याधर्य बोधान् मिमीते इति सरमा' ज्ञान का बोध करानेवाली अन्तः वृत्ति–बुध्दि सरमाहै । इसे देवशनि भी कहा गया है । 'शुन–गतौ' के अनुसार देवताओं की ओर ले जाने वाली बुध्दि संकीर्ण स्वार्थीद्वारा अपहत कार्य शक्तियों को देवोन्मुख बनाने में सहायक है।

इस नुसार देवो की कुतिया अर्थात् प्राणी नही यह केवल एक रुपक कहां जा सकता है।

**रोमशा**– रोमशा का अर्थ होता है 'रोमोवाली' ये ऋग्वेद की एक ऋचा १.१२६.७ एवं सामवेद के अनेक मन्त्रों की द्रष्टी है । बृहद्देवताकारने इन्हे राजा भावयव्य की पत्नी और बृहस्पति की पृत्री रुप में उल्लिखीत किया है । (प्रासात्सुतां रोमशां नाम नाम्ना बृहस्पतिर्भावमव्याय राज्ञे–बृह.३.१५३) मन्त्रद्रष्टी के रुप में ये सरमा, उर्वशी आदि के साथ भी उल्लिखीत है । (बृहदेवता२.७७.८३) आचार्य सायण ने इन्हे 'ब्रह्मवादिनी' कहकर इनका ऋषित्व उल्लिखीत किया है । (आदितीः पञ्चानां कक्षीवावृषिः षष्ठयाः भावयव्यः सप्तम्या रोमशा नाम ब्रह्मवादिनी – ऋ.१.१२६.सा.भा.)

**उर्वशी**– उर्वशी को ऋग्वेद के दशम मण्डल के पञ्चानवें सूक्त में देवत्व प्राप्त हुआा है । इसी सूक्त की कुछ ऋचाओं का ऋषित्व भी इन्हे प्राप्त है । ऋ. सप्तम मण्डल के ३३ वे सूक्त के ११ वे मन्त्र में वसिष्ठ को उर्वशी का पुत्र वर्णित किया गया है । (उतासिमैत्रारुणो वसिष्ठोर्वश्या ब्रह्मम्मनसोऽधिजतिः ऋ.७.३३.११) उर्वशी का आवाहन सरिताओं (जलधाराओं) के साथ किया गया है । (स्मन्नदिभिरुर्वशी वा गृणात्–ऋ.५.४१.१९) बृहद्देवताकार ने उर्वशी का देवत्व विवेचित किया है । (चरन्सरसि सो ऽ पश्चद्र अभिरुपाभिवोर्वशीम्–बृह.७.१५१) आचार्य सायणने अपने ऋग्वेद भाष्य में उर्वशी के देवत्व एवं ऋषित्व को प्रमाणित किया है । (नवर्च ऐळस्य पुरुरवसो वाक्यानि ।

ISSN : 2278-9308
July 2021

अतस्तासां सऋषि: । शिष्टा नवोर्वश्या वाक्यानि । अतस्तातु सर्षिका । उभयोर्वाक्येषु योर्य: प्रतिपायते सादेवता—ऋ.१०.९५ सा.भा.)

ऋ.१०.९५. में उर्वशी के साथ उनके पति इळापुत्र पुरुरवा का संवाद वर्णित है । पौराणिक संदर्भ में अप्सरा उर्वशी का पूरूरवा से स्नेह हुआ । वह कुछ शर्तो के साय पत्नी की तरह उनके पास रही । शर्ते टुटने पर वह लुप्त हो गई । पुरुरवा व्याकुल घूमने लगे । एक सरोवर पर उर्वशी अन्य अप्सरांओ के साथ पुरुरवा से मिली वहां यह संवाद हुआ । व्युत्पत्तिशास्त्र के अनुसार 'पुरुरवा' का अर्थ विपुल शब्द वाला है ।

'शब्द' ज्ञान का प्रतिक है । अस्तु 'पुरुरवा' का तात्पर्य 'विपुल ज्ञानवाले' या 'निर्देश देने में सक्षम' हुआ । वे इळा पुत्र है इळा—लक्ष्मी, सरस्वती दोनों का नाम है । 'धी' एवं 'श्री' युक्त होकर ही 'स्त्री' प्राप्त करनी चाहिये, इस सूत्र का बोध इस प्रकरण से होता है । इसी प्रकार पत्नी को 'उर्वशी' 'उरु अभ्यश्नुते' बहुत गुणोंवाली या 'उर'—हृदय को वश में रखनेवाली (उर्वशी) होना चाहिये ।

गूढ संदर्भ में उर्वशी 'अप्सरा'है । वह ब्रहम से उत्पन्न मूल सक्रीय तत्त्व 'अप' से उत्पन्न है । उसे मूल तत्त्व अप् से उत्पन्न बृहद् प्रकृति कह सकते है । 'उर्वशी' अप्सराओं में से है, जो 'उरु अभ्यश्नुते' के अनुसार व्यापक गुणों या क्षेत्रवाली है अथवा 'उरु वशिनी' विशाल इच्छा—प्रभाव के नियंत्रण में समर्थ है । स्कन्दाचार्य इसे विद्युत् के अर्थ में भी लेते है । पुरुरवा (शब्द,कलरव से जुडा) जीव कहा जा सकता है । निरुक्त (नि.१०.४.४७) के अनुसार ''प्राण एव हि पुरुरवा'' — प्राण हि पुरुरवा है । जीव या प्राण, प्रकृति के समागम से सुखोपभोग करता है । प्रकृति उसके साथ अपनी ही शर्तो पर जुडती या विलग होती है । निर्धारित मर्यादा में उर्वशी—प्रकृति मनुष्य की सभी कामनाओं को पुर्ण करती हुई फलित होती है । ('निर्धारित मर्यादा' यह महत्वपूर्ण संदेश है । मानव ने प्रकृति के साथ जो खिलवाड किया है उसके परिणाम हम देख रहे है और उसे भूगत रहे है । कोविड १९ उसी खिलवाड का परिणाम स्वरुप है । )

**लोपामुद्रा** — मन्त्र द्रष्टि ऋषिकाओं मे लोषामुद्रा का महत्वपूर्ण स्थान है यह ऋषि अगस्त्य की पत्नी थी, जिन्होंने मन्त्र द्रष्टि ऋषिकाा के रुप मे नारियों दो ऋचाओं तथा यजु.१७.११.३६.२० काण्डिकाओंका ऋषित्व इन्हे प्राप्त है । इन्होने अपने तथ और ज्ञान के प्रभाव से आर्थ जगत् मे नारियों (गृहणियों) का ललाट उँचा कर दिया — मन्त्रदर्शिका ऋषिका बनकर । अगस्त्य ऋषिद्वारा द्रष्ट ऋचा ऋ.१.१७९.४ में लोपामुद्रा उल्लिखित हुई है । अगस्त्य ऋषि, ऋषिपत्नी लोपामुद्रा और उनके शिष्योगणोंद्वारा दृष्ट इस सूक्त के दर्शन का उल्लेख बृहदेवताकार ने (बृह.४.५७—५९) किया है । आचार्य सायण ने भी इनका ऋषित्व को प्रमाणित किया है । (अत्रत्रयाणां द्वृचानां लोपामुद्रागस्त्य्—तच्छिष्यै दृष्टत्व एवर्षय: ऋ.१.१७९.सा.भा.)

इस सूक्त में सुसन्तति उत्पन्न करते की दम्पति लोपामुद्रा एवं मर्यादाओंका उल्लेख किया है । ऋषि दम्पति लोपामुद्रा एवं अगस्त्य के बीच हुआ संवाद इसका आधार है । ऋषियों ने परिपक्व शारीरिक—मानसिक स्थिती बन जाने पर ही दम्पतियों की आवश्यकताा के अनुरुप संतान उत्पन्न करने का निर्देश दिया है पति —पत्नी की शारीरिक —मानसिक स्थिती का परिक्षण करने के बाद ही गर्भाधान संस्कार कराया जाता था । आवश्यकता के अनुसार परिपक्वता लान के लिये विशेष तप भी कराये जाता थे । राजा दिलीप द्वारा सपत्नीक गुरु—आश्रम में रहकर तपक रने पर रघू तथा भगवान श्रीकृष्ण द्वारा बद्रिकाश्रम में तपक रने पर उन्हें प्रद्युम्न जैसे पुत्र प्राप्ति की कथाएँ सर्वाविदित है । सन्तान उत्पादन के यज्ञीय अनुशासन का उल्लेख इस सूक्त में है ।

श्रेष्ठा व्यक्तित्व वाले व्यक्तियों से ही समाज को श्रेष्ठा संस्कार युक्त नयी पीढ़ी के नागरिक प्राप्त होते है । इसलिए श्रेष्ठा व्यक्तित्ववानों को ही संतान उत्पन्न करने की प्रेरणा देने की मर्यादा का उल्लेख किया गया है ।

**नद्य**— (नदी ऋषिका) कुछ वैदिक ऋचाओं में नदियों का ऋषित्व भी दृष्टिगोचर होता है । जैसे ऋग्वेद ३.३३.४,६,८,१० म नदियाँ ऋषिका के रुप में प्रतिष्ठित है । ये तो ऋ.३.३३ के ऋषि विश्वामित्र है ; किन्तु विश्वामित्र और नदियों के संवाद में जो ऋचायें नदियोंद्वारा विश्रामित्र को संबोध्धित है उनमें नदियों का ऋषित्व झलकता है । 'यस्य वाक्यं स ऋषि:' सूत्र के अनुसार यह उचित भी है; जैसे आ ते कारो श्रृणवामा वचांसि ..... कन्या शश्वचैते—ऋ.३.३३.१०

बृहद्देवताकार ने नदियों के ऋषित्व को स्विकारा है । (लोपामुद्राच नव्यश्व यमी नारीच शश्वती.... .....बृह.२.८३—८४) आचार्य सायण भी नदियों के ऋषित्व का प्रतिपादन करते है । (अत्र चतुथीषष्टयष्टमी दशमीनां नदी वाक्य त्वान्नद्य एव ऋषयः —ऋ.३.३३.सा.भा.)

**यमी**— यमी सूर्य कह कन्या है । जिनकी माता का नाम संज्ञा था । इनके सगे भाई यम अथवा यमराज है । यम तथा यमी एक साथ जुडवाा जन्मे थे और यमी का दुसरा नाम यमुना भी है ऋग्वेद के अनुसार विवस्वान् के आश्वद्वय यम तथा यमी सरव्यू के गर्भ से हूए थे । (ऋ.१०.१४) यहां यम और यमी के बीच के वार्तालाप का वर्णन है । वहां यमी वैवस्वती को जब यम वैवस्वत ने सम्बोधित किया, तब यम ऋषि ओर यमी वैवस्वती देवता है और जब यमी वैवस्वती ने यम वैवस्वत देवता है ओर जब यमी वैवस्वती ने यम वैवस्वत को सम्बोधित किया तब यमी वैवस्वती ऋषिका और यम वैवस्वत देवता है । इस प्रकार 'यस्य वाक्यं स ऋषिर्या तेनोच्यते सा देवता' सूत्र के अनुसार दोनो ऋषि मै है और देवता थी । ऋग्वेद १०.१०.४ मे यमी और यम का एक कथोपकथन वर्णित है, जिसमें दोना ने अपने को अप्यायोषा (जलीय दिव्यांगना) और गंधर्व की सन्तान भी कहां है ।

**शश्वती**—ऋग्वेद ८.१.३४ की ऋषिका शश्वती अंगीरसी है । अंगिरस सुता होने के कारण इनके नाम के साथ अपत्यार्थक पद अंगीरसी संयुक्त किया जाता है ˙ शश्वती अंगीरसी आसङग प्लायोगि की धर्मपत्नी थी । एक बार उनके पति पुस्त्वरहित होकर स्त्री हो गये थे, तब मेध्यातिथि के प्रयत्न से वे पुनः पुरुष बने । तदुपरांत उन्होने शश्वती ने ८.१.३४ ऋचा का दर्शन कर लेने पर शश्वती को आनन्दित किया । पति के पुस्त्व प्राप्त कर लेने पर शश्वती ने ८.१.३४. ऋचा का दर्शन कर पति की स्तूती की । अतः इस ऋचा का ऋषित्व इन्ही को प्राप्त हुआ है । आचार्य सायण ने शश्वती अंगीरसी ऋषित्व प्रमाणित किया है । (अस्थासंगस्थ भार्यांगिरसः सुता शश्वत्याख्या भर्तुः पुंस्त्वमुपलभ्य प्रीती सखी स्वभर्तारमन्वस्य स्थूरमित्यनया स्तुतवती । अतस्तस्था ऋचः शश्वतृषिका—ऋ.८.१.सा.भा.) ऋ.१०.१८९ वें सूक्त में तीन मन्त्र उपलब्ध है, यही तीनो मंत्र यजु.३.६—८, सामवेद ६३०—६३२, १३७६—१३७८ तथा अथर्ववेद ६.३१.१—३, २०.४८.४—६ मे बार बार उद्धृत हुए है ; परन्तु अथर्व ६.३१.१—३ ले उपरिब्रभव नामक ऋषि का उल्लेख है । यजु भाष्य एवं सर्वानुक्रम सूत्र में भी इनको ऋषिका के रुप मे विवेचित किया गया है । (आयं गौरित्यादिनां—सार्पराज्ञीति नामधेयम्—यजू.३.६.मही.भा.) बृहद्देवता कार ने भी इनके नाम को विवेचित किया है । (श्रीर्लाक्षासार्पराज्ञी वाक् श्रध्दा मेघाच दक्षिणा बृ.२.८४) ब्राह्मण ग्रन्थों में भी इनके नाम का वर्णन प्राप्त होता है । परन्तु ऋषिका के रुप में नही । (इयं (पृथिवी) वै सर्पराज्ञीयं हि सर्पतो राज्ञी ऐत.ब्रा.५.२३.१.२.)

**वाक्**— वाक् अम्भृण ऋषि की पुत्री थी । ये प्रसिध्द ब्रह्मज्ञानिनी थी । इन्होंने भगवति देवी के साथ अभिन्नता प्राप्त कर ली थी । ऋग्वेद संहिता के दशम मण्डल के १२५ वे सूक्त में 'देवी सूक्त' के नाम से जो आठ मन्त्र है, वे इन्ही के द्वारा दर्शन किये है । चण्डी पाठ के साथ इन आठ मन्त्रोंका पाठ का बडा माहात्म्य माना जाता है । इन मन्त्रों मे स्पष्टतया अद्वैतवाद का सिध्दान्त प्रतिपादित है । वाक् अर्थात वाणी का संबंध बृहस्पति से है । इस सूक्त को 'वाक् सूक्त' भी कहां गया है । इसमे आत्म कथन है ।

**श्रध्दा कामायनी**— ऋग्वेद के दसवे मण्डल के सूक्त १५१ वे की ऋषितव श्रध्दा कामायनी को दिया गया है । ये कामगोत्रीय होने के कारण कामायनी पद से संयुक्त हुई है । बृहद्देवता कारने अपने ग्रन्थ में २.८४ में ऋषि रुप में और २.७४ में देवता रुप में श्रध्दा को वर्णित किया है । उक्त सूक्त में श्रध्दा ही ऋषि एवं देवता रुप में अभिप्रेत है । ब्राह्मण ग्रंथो में उन्हे सूर्य दुहिता भी कहा गया है । (श्रध्दा वै सूर्यस्य दुहिता —शत.ब्रा.१२.७.३.११) तैत्तरिय ब्राहमण २.३.१०.१ में उन्हे प्रजापति दुहिता के रुप में भी वर्णित किया गया है ˙ आचार्य सायण ने भी काम गोत्रीय के रुप में इनका ऋषित्व विवेचिचत किया है । (श्रध्दया इति पञ्चर्चं त्रयोविंशं सूक्त मानुष्टुभं श्रध्दादेवत्यम् । काम गोत्रता श्रध्दा नामर्षिका— ऋ.१०.१५१सा.भा.)

**दक्षिणा प्राजापत्या**— ऋग्वेद के एक सूक्त १०.१०७ की ऋषिका प्रजापति पुत्री दक्षिणा प्राजापत्या है । प्रजापति सुता होने से ये प्राजापत्या पद से संयुक्त हुई है । पौराणिक संदर्भ में दक्षिणा को यज्ञ प्राजापत्य की बहिन और १२ याम देवों की माता बताया गया है । बृहददेवता ग्रंथ के अनुसार

दक्षिण प्राजापत्या ने अपनी स्वयं की स्तुती की है अथा दक्षिणा देने वाले यजमानों की स्तुती की है । (बृह.८.२२–२३) आचार्य सायणने भी इनका ऋषित्व प्रमाणित किया है । (प्रजापतेः सुता दक्षिणा सा.वा.ऋषिका–ऋ.१०.१०७ सा.भा.) सूक्त में प्राप्त वर्णन के अनुसार यज्ञ के प्रसंग में दी जाने वाली दक्षिणा अथवा दक्षिणा देनेवालो की महिमा का वर्णन किया गया है । सृष्टि सृजन यळ के बाद सृष्टि संचालन पोषण यज्ञ के क्रम में दान देने अर्थात् प्राप्त विभूमियों को सद्भावना पूर्वक लोक मंगल में प्रयुक्त करने का विवरण एव महत्व दिया गया है । प्रथम मन्त्र में सृष्टि –रचना के साथ ही दान परंपरा प्रारंभ होने की बात कही गई है । दानी व्यक्ती के लिये उच्च पद होते है, पद के अधिकार से धन संचय करनेवालों के लिए नही । सद्विचारों का दान सर्वश्रेष्ठ है, उसे ब्रहम दान कहां जाता है । सद्विचार सम्पन्न ही सत्कर्मो का मर्य समझकर उनका विस्तार करने में समर्थ होते है ।

**रात्रि भारद्वाजी**–ऋग्वेद के एक सूक्त १०.१२७ के ऋषि कुशिक सौभारि तथा विकल्प में रात्रि भारद्वाजी है । इस सूक्त के देवता भी रात्रि है । रात्रि भारद्वाज गोत्रीय होने कारण अपत्यार्थक पद 'भारद्वाजी' से संयुक्त हूई है । बृहद्देवता कारने 'रात्रि' को देवता के रुप में स्विकार किया है । (बृह.८.४४.)आचार्य सायण ऋषि विषयक उल्लेख में इन्हे भारद्वाज सुता कहां है । (भारद्वाजस्य सुता रात्राख्या अस्य सुक्तस्यर्षिका गायत्रं रात्रिदेवताकम् ऋ.१०.१२७. सा.भा.)

**सुर्या सावित्री**– ऋग्वेद के एक सूक्त १०.८५ की ऋषिका 'सूर्या सावित्री' है । ये सविता पुत्री होने के कारण अपत्यार्थक पद सावित्री वर्णित हुई है । इस सूक्त में सूर्या के विवाह का विसृत विवरण मिलता है । अतः उक्त सूक्त को सूर्या सूक्त तथा विवाह सूक्त भी कहा जाता है । ऋ.६.५८.४ में सूर्या को पूषा की बहिन के रुप में वर्णित किया गया है । ब्राहमण ग्रंथ में प्रजापति की पुत्री के रुप में सूर्या सावित्री उल्लिखित हुई है । (प्रजापतिवै सोमाथ राज्ञे दुहितरं प्रायच्छत् सुर्या सावित्रीम् ऐत.ब्रा.४.७) इन्हे सोम अथवा अश्विनीकुमारों की पत्नी के रुप में थी वर्णित किया गया है ।

**शिखण्डिनी** (कश्यप पुत्री दो अप्सराएँ) ऋग्वेद के ९.१०४ के ऋषि नाम में पर्वत–नारदकाण्व के साथ विकल्प में शिखण्डिनी नाम की दो कश्यप पुत्री अप्सराओं को विवेचित किया है । आचार्य सायण ने शिखण्डिनी के ऋषि विवेचन में इन्हें कश्यप पुत्री दो अप्सराओं के रुप में वर्णित किया है । (काण्वौ पर्वतनारदावृषी अथवा काश्यपस्य पुत्र्यौ शिखण्डिन्याखे द्वै अप्सरसावस्य सूक्तस्थ द्रष्ट्यौ–ऋ.९.१०४.सा.भा.) ऋषिकाएँ सोम के ब्रहममयरुपसे प्रभावित होकर सोम से अन्धकार नष्ट करने की प्रार्थना करती है ।

**निष्कर्ष**– किसी भी संस्कृति का अध्ययन करते समय उस संस्कृति में स्त्रियों का स्थान क्या है इसीसे उस संस्कृति की महत्ता सिध्द होती है । भारत वर्ष में नारियोंका समूचित सम्मान सदीयों से रहां है । धार्मिक, आध्यात्मिक एवं ईश्वर प्राप्ति सम्बन्धी कार्यो में नारी का सर्वत्र स्वागत किया गया है । वेदों के मन्त्रद्रष्टा जैसे ऋषि है वैसेही ऋषिकाएँ भी है । ईश्वरीय ज्ञान महान आत्मावाले व्यक्तिओं के ज्ञानचक्षुंओ द्वारा दर्शन किया गया इस ईश्वरीय ज्ञान का दर्शन करनेवाली स्त्रियाँ भी है । ऐसे अनेक प्रमाण प्राप्त होते है । अथर्ववेद इसी बात की पुष्टी करता दिखायी देता है ।

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते श्मन्ते तत्र देवता : ।
यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ।।

**संदर्भ**–

१.वेद कथान्क – गीता प्रेस गोरखपूर
२.ऋग्वेद संहिता भाग –१ ते ४ संपादक – वे.मु.पं. श्रीराम शर्मा, आचार्य भगवती देवी शर्मा.
३.यजुर्वेद संहिता – भाग १ व २ – संपादक– वे मु.पं. श्रीराम शर्मा, आचार्य भगवती देवी शर्मा, आचार्य भगवती देवी शर्मा, गीता प्रेस, गोरखपूर.
४.सामवेदसंहिता– संपादक वे.मू.पं. श्रीराम शर्मा, आचार्य भगवती देवी शर्मा, गीता प्रेस, गोरखपूर.
५.अथर्ववेदसंहिता– भाग १ व २ – संपादक – वे.भू. पं. श्रीराम शर्मा, आचार्य भगवती देवी शर्मा, गीता प्रेस, गोरखपूर.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# १९०९ च्या मोर्ले – मिंटो कायद्याचे परीक्षण

**प्रा.डॉ.प्रमिला डी. भोयर**
(सहा. प्राध्यापक) इतिहास विभाग प्रमुख स्व. निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लाखनी, जि. भंडारा – ४४१८०४
E-mail id – bhandarkarpriyansh@gmail.com
Mobile no. – 9765889913, 7620959936

**प्रस्तावना :–**

भारताच्या सवैधानिक विकासाच्या इतिहासात १९०९ च्या कौन्सिल कायद्याला विशेष महत्वाचे स्थान आहे. तत्कालीन भारतमंत्री मोर्ले व व्हाईसराय मिंटो यांच्या पुढाकाराने हा कायदा पास झाल्याने त्याला मोर्ले – मिंटो सुधारणा कायदा असे म्हणतात. भारतातील चीघडत असलेली राजकीय परिस्थिती सावरण्यासाठी एका बाजूने दडपशाही करणे तर दुसऱ्या बाजूने काही राजकीय सुधारणा करून भारतीय लोकमत शांत करणे असे ब्रिटिशांचे धोरण होते. १९०९ चा कायदा अमलात येण्यासाठी कोणती परिस्थिती कारणीभूत होती त्याचा आढावा खालील प्रमाणे –

**१९०९ च्या कायद्याला कारणीभूत ठरलेली परिस्थिती :–**

**१) इ.स. १८९२ चा अपुरा कायदा :–**

इ.स. २८ डि. १८८५ रोजी मध्यभारतात राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना करण्यात आली याच कॉंग्रेसच्या माध्यमातून भारतीय जाणते मध्ये जनजागृती होत होती, राष्ट्रीय भावना जागृत होत होत्या म्हणून त्यावर प्रतिबंधक लावण्यासाठी ब्रिटिश सरकारने इ.स. १८९२ मध्ये एक कौन्सिल कायदा पास केला परंतु या कायद्यामध्ये अनेक त्रुटी असल्यामुळे हा कायदा भारतीयांचे समाधान करू शकला नाही म्हणून भारतीय जनतेच्या मनात ब्रिटिशांविषयी प्रचंड असंतोष निर्माण होत होता. भारतीय जनतेचा असंतोष कमी करण्यासाठी एका कायदा करून भारतात काही सुधारणा करण्याची आवश्यकता ब्रिटिश सरकारला वाटली आणि त्यातूनच १९०९ चा कायदा अमलात आला.

**२) लॉर्ड कर्झनची दडपशाही नीती :–**

लॉर्ड कर्झन हा ब्रिटिश साम्राज्यवादाचा कट्टर पुरस्कर्ता होता. भारतातील व्हाईसराय पदाची सत्तासूत्रे हाती येताच भारतीय जनतेच्या आशा – आकांक्षांची पर्वा न करता कठोर अशा दडपशाही धोरणाचा अवलंब केला. कर्झनच्या अन्यायी धोरणामुळे भारतीय जनतेमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला. त्याविरोधात भारतात चालवली सुरु झाल्या ह्या चळवळींना प्रतिबंधक घालण्यासाठी काही तरी सुधारणा करण्याची गरज ब्रिटिश सरकारला भासली त्यातूनच १९०९ चा कायदा अमलात आला.

**३) नैसर्गिक आपत्ती आणि क्रांतिकारी चळवळी :–**

१९ व्या शतकाच्या शेवटच्या दशकात भारतातील काही प्रांतात भयानक दुष्काळ पडला, दुष्काळा पाठोपाठ प्लेग सारख्या साथीच्या रोगांनी थैमान घातले परंतु ब्रिटिश सरकारनी याकडे विशेष लक्ष दिले नाहीत. दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी ब्रिटिश सरकारने जे काही अधिकारी नेमले होते ते जनतेला मदत करण्या ऐवजी त्यांच्यावर अत्याचार करीत. इंग्रजांच्या या धोरणामुळे भारतीय जनतेच्या मनात प्रचंड असंतोष निर्माण होऊन त्यातून क्रांतिकारी चळवळीचा उदय झाला. भारतीय क्रांतिकारांनी आपल्या क्रांतिकारी कार्याद्वारे ब्रिटिश सरकारला अडचणीतून आणले म्हणून त्यावर आवर घालण्यासाठी ब्रटीश सरकारने १९०९ चा कायदा अमलात आणला.

**४) जागतिक घटनांचा प्रभाव :–**

इ.स. १८९६ मध्ये अॅबेसिनिया ह्या आफ्रिकन राष्ट्राने इटलीला पराजित केले. १९०५ मध्ये आशिया खंडातील चिमुकल्या जपानने बलाढ्य आसा रशियाचा पराभव केला. ह्या जागतिक घटनांचा भारतीय राजकारणावर सुद्धा मोठा प्रभाव पडला. जागतिक घटनांनपासून भारतीयांना प्रेरणा मिळाली. भारतातील राष्ट्रीय चळवळी ब्रिटिश सरकारच्या विरोधात दिवसेंदिवस जोर धरू मागल्या

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

होत्या भारतातील राष्ट्रीय जागृती कमी करण्याच्या दृष्टीने भारतात काही सुधारणा करण्याची गरज भासली.

**५) मुस्लिमांना खुश करण्याची निकड :—**

१९०५ च्या बंगाल फडणीनंतर भारतात प्रबळ राष्ट्रवादी लाट निर्माण झाली. या फाळणीच्या विरोधात भारतातील हिंदू—मुसलमानांनी एकत्र येऊन ब्रिटिश सरकारच्या विरोधात प्रखर आंदोलने उभारण्यास सुरुवात केली. हिंदू — मुसलमान यांच्यातील एकी अशीच कायम राहली तर आपल्याला भारतात जास्तकाळ राज्यकरने कठीण होईल याची जाणीव इंग्रजांना झाली होती त्यामुळे हिंदूंपासून मुसलमान वेगळे करणे ब्रिटिशांना आवश्यक वाटले. त्यासाठी एखादा कायदा करून त्यामध्ये मुसलमानांना जास्तीत जास्त सवलती दिल्यास मुसलमान आपोआपच खुश होऊन हिंदूंपासून दूर जातील किंवा वेगळे होतील असे ब्रिटिश सरकारला वाटल्यामुळे १९०९ चा कायदा अमलात आणला.

**६) ब्रिटनमधील राजकीय परिवर्तन :—**

ब्रिटनमध्ये राजकीय परिवर्तन होऊन ब्रिटनची सत्तासूत्रे उदारमतवादी भारतमंत्री म्हणून नियुक्त झाला तर मिंटो हा मावळवादी भारताचा व्हाईसराय बनला. लॉर्ड कर्झनच्या साम्राज्यवादी धोरणामुळे भारतीय जनतेच्या मानत ब्रिटिशांविषयी जो असंतोष निर्माण झाला होता तो असंतोष कमी करण्यासाठी भारतात काहीतरी सुधारणा करणे अत्यंत गरजेचे आहे असे ह्या दोघांना वाटले आणि त्यातून १९०९ च्या कायद्याची निर्मिती झाली.

**राजकीय आयोगाची नियुक्ती :—**

इ.स. १९०६ मध्ये सर अरुडेल यांच्या अध्यक्षतेखाली एका राजकीय आयोगाची निर्मिती करण्यात आली. या आयोगाने केंद्रीय आणि प्रांतीय विधिमंडळात भारतीयांची संस्था, त्यांचे अधिकार व कार्ये यासंबधीची चर्चा करून एक प्रस्ताव तत्कालीन भारतमंत्री मोर्ले यांच्याकडे सोपविला त्यानंतर मे १९०९ मध्ये भारतमंत्र्यांनी तो प्रस्ताव ब्रिटिश पार्लमेंट मध्ये सादर केला आणि त्या प्रस्थावच्या आधारावर जो कायदा पास करण्यात आला त्यालाच मोर्ले — मिंटो सुधारणा कायदा असे म्हणतात.

**कायद्यातील तरतुदी :—**

**अ) केंद्रीय विधिमंडळ :—**

१) या कायद्यानुसार केंद्रीय विधिमंडळ सदस्यसंख्येत वाढ करून ती ˆ७ करण्यात आली. यापैकी ह्लिं सदस्य बिनसरकारी व २८ सदस्य सरकारी असावेत. ह्लिं बिन सरकारी सदस्यांपैकी ह्लक्त सदस्य निर्वाचित आणि ह्व सदस्य हे गव्हर्नर जनरलने नेमलेले बिनसरकारी सदस्य असावेत.
२) निर्वाचित सदस्याचे तीन भागात विभाजन करण्यात आले.

**अं) सामान्य मतदार संघ :—**

या गटात प्रांतिक विधिमंडळातील बिनसरकारी प्रतिनिधी निर्वाचित केलेले सदस्य असावेत.

**ब) वर्गीय मतदार संघ :—**

या गटात जमीनदार आणि मुसलमान या विशिष्ट वर्गाच्या हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांचा समावेश या गटात केला जाते.

**क) खास मतदार संघ :—**

या गटात विभिन्न प्रांतातील व्यापारी मंडळाच्या निर्वाचित सदस्याचा समावेश करण्यात आला होता.

३) या कायद्यानुसार उमेदवार आणि मतदार यांची विशिष्ट प्रकारची पात्रता ठरविण्यात आली निवडणुकीला उभा राहणार उमेदवार हा वयाची ह्लघ वर्षे पुरणे केलेला आणि ब्रिटिश नागरिकत्व असणारा असावा. तो सरकारी अधिकारी नसावा तसेच पागल दिवाळखोर नसावा. परंतु या पात्रतेमध्ये मुसलमानांपेक्षा हिंदूंवर अतिशय कडक बंधने लादण्यात आली होती.

४) केंद्रीय विधिमंडळाच्या आकाराबरोबर यांच्या अधिकारात सुद्धा वाढ करण्यात आली. केंद्रीय विधिमंडळातील सदस्यांना सरकारी ध्येयधोरणावर चर्चा करण्याचा अधिकार असला तरी अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार विधिमंडळात अध्यक्षाला होता.

ISSN : 2278-9308
July 2021

**ब)प्रांतीय विधिमंडळ :—**

१) केंद्राप्रमाणेच प्रांतीय विधिमंडळाच्या सदस्यसंख्येत सुद्धा वाढ करण्यात आली. प्रांताच्या आकारावर प्रांतिक विधिमंडळाची सदस्यसंख्या ठरविण्यात आली. उदा. बंगाल — ५२, मुंबई — ४७ अशा प्रकारे सदस्य संख्या निर्धारित करण्यात आली. प्रांतातही सदस्यांचे सुद्धा सरकारी निर्वचत बिनसरकारी आणि गव्हर्नरने नेमलेले बिनसरकारी सदस्य अशा तीन गटात विभागणी करण्यात आली. प्रांतामध्ये बिसरकरू सदस्यांची संख्या जास्त ठेवल्या गेली असली तरी प्रत्यक्ष मतदानाच्या वेळी सरकारी गट बहुमतात राहील याची तरतूद सुद्धा या कायद्यात केल्या गेली.

२)प्रांतीय विधिमंडळ सदस्यांच्या निवडणुकीचे तीन मतदारसंघ निर्माण करण्यात आले —

**अ) सामान्य मतदार संघ :—**

या मतदारसंघात महानगरपालिका, नगरपालिका आणि जिल्हा इ. मधून निवडलेल्या सदस्याचा समावेश या गटात केल्या जाते.

**ब) वर्गीय मतदार संघ :—**

जनिंदर व मुसलमान यांच्या स्वतंत्र मतदार संघातून निवडून आलेल्या सदस्यांचा या जातात समावेश केल्या जातो.

**क) खास मतदार संघ :—**

या गटात व्यापारी मळे मालक विद्यापीठांनी निवडून दिलेल्या सदस्याचा समावेश या मतदारसंघात केल्या जातो.

३) प्रांतीय विधिमंडळातसुद्धा उमेदवार आणि मतदार यांच्या साठी केंद्राप्रमाणेच कडक नियम करण्यात आले.

४) केंद्रीय विधिमंडळातील सदस्याप्रमाणेच प्रांतीय विधिमंडळातील सदस्यांच्या अधिकार क्षेत्रात वाढ करण्यात आली. प्रांतीय सरकारच्या ध्येयधोरणावर चर्चा करण्याचा अधिकार विधिमंडळ सदस्यांना देण्यात आला परंतु ते मंजूर वा नामंजूर करण्याचा अधिकार गव्हर्नरकडे ठेवण्यात आला.

प्रांतातील कार्याचा वाढत व्याप बघून प्रांतीय सरकायचा कार्यकारी मंडळाची स्थापना करण्यात येऊन या कार्यकारी मंडळाच्या सदस्य संख्येत सुद्धा वाढ करण्यात आली इ. तरतुदी या कायद्यात समाविष्ट करण्यात आल्या.

**परीक्षण :—**

इ.स. १९०९ चा सुधारणा कायदा भारताच्या घटनात्मक विकासाच्या दृष्टीने महत्वाचा ठरला असला तरी सुधारणांमुळे भारतीय जनतेच्या आशा आकांक्षांची पूर्तता झाली नाही. यावर के. एम. मुन्सी म्हणतात; " मोर्ले — मिंटो सुधारणा नावाच्या राजकीय परिवर्तनाद्वारे मवाळवाद्यांना लाच देण्यात आली तर मवाळवादी म्हणतात कॉंग्रेसने ह्यर्ं वर्षे चालविलेल्या लढ्यचे फळ म्हणजे मोर्ले — मिंटो कायदा होय " मावलवाद्यांनी ह्या सुधारणा अमलात आणण्याकरिता शासनाला सहकार्य करावे असे आव्हान भारतीय जनतेला केलेत. या सुधारणांमध्ये अंगभूत असलेल्या तत्वाबद्दल समाधान व्यक्त करून भारतीयांना प्रशासनात सहभागी होण्याची संधी मिळेल असे समजून सुरेंद्रनाथ बॅनर्जी आणि फिरोजशाह मेहता यांनी आनंद व्यक्त केला परंतु या तरतुदी प्रत्यक्ष जेव्हा अमलात आणल्या गेल्या तेव्हा मवाळवादी नेतेसुद्धा निराश झालेत.

या कायद्यानुसार जे विधिमंडळ निर्माण करण्यात आले होते त्यांचे स्वरूप एखाद्या सल्लागार मंडळासारखे होते. एका जातीला दुस़ऱ्या जातीच्या विरोधात, एका वर्गाला दुस़ऱ्या वर्गाच्या विरोधात, एका गटाला दुसरया गटाच्या विरोधात लढण्याचा डाव ब्रिटिश सरकारने या कायद्याद्वारे अमलात आणले. जमीनदार आणि व्यापाऱ्यांना सुक्षितीत वर्गापेक्षा जास्त प्रमाणात प्रतिनिधित्व देऊन भारतीय सुशिक्षित वर्गावर या वर्गावर अन्याय केल्या गेला. यावर बोलतांना डॉ. छकेरिया म्हणतात. " मोर्ले — मिंटो सुधारणांचे तत्व अर्थहीन गोष्टींना मान्यता देणारे होते.

एकंदरीत भारतातील मुसलमान आणि जमीनदार या वर्गाव्यतिरिक्त इतर सर्व भारतीयांचे समाधान करण्यास हा कायदा अपुरा पडला. यावर इतिहासकार किथ म्हणतात; " स्वशासनाला हक्कासाठी चाललेल्या प्रचार थांबविण्यासाठी हा कायदा अपयशी ठरला" तर डॉ. मजुमदार म्हणतात " घ्श्द्भ्ज्ञ चा कायदा म्हणजे जन्माला आलेले एक मेलेले अभ्रक होय".

**निष्कर्ष :—**

इंग्रज भारतात व्यापार करण्यासाठी आले आणि व्यापार करता — करता भारताचे सत्ताधीश बनले. इ.स. १७५७ पासून इंग्रजांनी भारतावर आपला अमल सुरु केला आणि इ.स. १८५७ पर्यंत बराच भारत आपल्या अमलाखाली आणून भारतीय जनतेला गुलाम बनविले. या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी भारतीय लोक उठाव, बंड, आंदोलने आणि चळवळी करीत त्यामुळे इंग्रज सरकार अडचणीत येत होत हे सर्व थांबवण्यासाठी किंवा शांत करण्यासाठी शस्त्र, सैन्य, भांडवल आणि वेळ यांचा अपव्यय होत असे. हे सर्व थांबविण्यासाठी भारतीय जनतेच्या मनातील असंतोष कमी करण्यासाठी ब्रिटिश सरकार भारतीयांना काहीतरी सोइ सुविधा किंवा सुधारणा करतो म्हणून एखादा कायदा करण्याचे आमिष देत असे आणि यातूनच असे कायदे अमलात येत होते. १९०९ चा कायदा सुद्धा असाच अमलात आला. इ.स. १९०५ ला लॉर्ड कर्झनने बंगालची फडणी केली त्यामुळे भारतीय जनतेच्या मनात इंग्रज सरकार बद्दल असंतोष निर्माण झाला होता. तो कमी करण्यासाठी १९०५ चा कायदा करण्यात आला. या कायद्यात उत्तरदायी सरकारच्या स्थापनेबाबत कुठेही असा उल्लेख नव्हता किंवा चर्चा केली नव्हती. या कायद्यान्वे मुसलमानांना वेगळा मतदार संघ देऊन जातीयवादाला चालना देण्यात आली. इंग्रज सरकार सुरुवाती पासूनच फोड आणि राज्य करा या तत्वच अवलंब करीत आहे. केंद्रीय व प्रांतीय विधिमंडळात मुसलमानांना जास्त प्रतिनिधित्व दिल्यामुळे ते हिंदू पासून दूर जाऊ लागले. या कायद्याने सरकारनी भारतीयांना प्रशासनात सामावून घेत आहोत असे फक्त दाखविले कारण केंद्रीय विधिमंडळात सरकारी सदस्यांचे बहुमत असल्यामुळे आणि अंतिम निर्णयही त्यांच्यात हातात असल्यामुळे भारतीय सदस्यांना विधिमंडळात राहण्याचा काहीच लाभ मिळत नसे. तसेच व्यापारी आणि जमीनदार यांना सुशिक्षित तरुण वर्गापेक्षा जास्त प्रतिनिधित्व देऊन अन्याय केला. इ.स. १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्यात म्हंटले होते कि, जात, धर्म, वर्ग यांचा विचार न करता गुणवत्तेच्या आधारावर प्रशासनात सामावून घेतल्या जाईल. परंतु या कायद्यात या तत्वांना काळिमा फासण्यात आली होती. हिंदू— मुसलमान च्या अधिकारात भेदभाव करून एक—दुसऱ्याच्या विरोधात करण्यास सुरुवात केली आणि दिवसेंदिवस हि दारी वाढत जाऊन शेवटी इ.स. १९४७ ला भारताचे विभाजन झाले.

**संदर्भ सूची :—**

१) आचार्य धनंजय : ”भारताचा इतिहास”(१७६१—१९७१), श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर; प्रथमावृत्ती २००९.

२) डॉ. विभा आठल्ये : ”आधुनिक भारताचा इतिहास” (१७६१—१९७१), प्रकाशक संजय ठाकरे; प्रथम आवृत्ती २००९.

३) डॉ. श. गो. कोलारकर : ”आधुनिक भारत”(१७०६—१९५०), श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती २००४.

४) डॉ. अनिल कठारे : ”आधुनिक भारताचा इतिहास”(१६००—१९८६), कल्पना पब्लिकेशन, नांदेड.

५) डॉ. बि. एल. ग्रोवर, डॉ. एन. के. बेलेकर : ”आधुनिक भारताचा इतिहास” (१७०७ पासून आधुनिक कालखंडापर्यंत ), एस. चांद कंपनी लिमिटेड रामनगर, दिल्ली, २०१७.

६) डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांत कोठेकर : ”आधुनिक भारताचा इतिहास”(१८५७—१९२०), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

# महिला सक्षमीकरण आणि पंचायत राज
# (Women Empowerment and Panchayat Raj)

**परमानंद उके**
(सहाय्यक प्राध्यापक)डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा
मो. नं. ८६००८१७५५६,Mail ID :pbukey10@gmail.com

**सारांश**

स्वातंत्र्यानंतरच्या ५० वर्षाच्या काळात स्त्री–शिक्षणाचा प्रसार खूप मोठ्या प्रमाणावर झाला. स्त्री शिकली पाहीजे. ह्याचे महत्व खेडोपाडीही पटू लागले. शहरी भागातील बऱ्याच मुली उच्च शिक्षण घेऊ लागल्या चांगल्या नोकऱ्या मिळू लागल्या, चाकोरी बाहेर जाऊन आव्हानात्मक नोकऱ्याही त्यांनी स्विकारल्या. परंतु निर्णय प्रक्रियेत त्यांचा अपेक्षीत सहभाग वाढला नाही. १९७५ साली युनोने आंतरराष्ट्रीय महीला वर्ष जाहीर केल्यावर स्त्री–मुक्ती चळवळीचे वारे शहरी व ग्रामीण भागात वाहू लागले. पंचायत राज व्यवस्थेत महीलांना नेतृत्वाची संधी मिळाली. सत्तेत सहभागी होऊन निर्णय घेण्याचे अधिकार मिळाले. पंचायत राज व्यवस्थेमुळे महीलांच्या सक्षमीकरणाचा लाभ ग्रामीण भागातील महीलांना मिळाला नाही. सत्तेतील त्यांचा सहभाग अल्प आहे. महीलांसाठी राखीव जागा वगळता त्यांना पुरूषांप्रमाणे नेतृत्वाची संधी प्राप्त होत नाही. कौटूंबिक विरोध, नेतृत्व कार्यात कुटूंबियांचा व राजकीय नेत्यांचा हस्तक्षेप, आत्मनिर्भरतेचा अभाव, आर्थीक दुर्बलता, सामाजिक बंधने व स्त्रियांवरील प्रथा परंपरांचा पगडा, यामुळे ग्रामीण महीलांच्या सक्षमीकरणात अडथळा निर्माण होतो.

**विषयाची ओळख**

भारतीय समाजामध्ये स्त्रियांना अजूनही दुय्यम दर्जा आहे. त्या आर्थीक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल तसेच निर्भर आहेत. पण वर्तमान स्थितीत स्त्रियांमध्ये शिक्षण व तत्सम कारणांमुळे जागरूकता वाढत चालली आहे. त्यामुळे स्त्री सक्षमीकरणाच्या संकल्पनेचा विचार गांभीर्याने होणे महत्वाचे आहे. स्त्री सक्षमीकरण हा आज स्वतंत्र विषय समजला जातो. समानता व सर्वांगीण विकासासाठी स्त्री सक्षमीकरण गरजेचे आहे. पंचायत राज व्यवस्थेत ३३% महीला आरक्षणामुळे राजकारणात हळूहळू स्त्रियांचा प्रवेश झाला. स्त्रियांसाठी शासनाच्या वतीने अनेक चांगले उपक्रम व योजना तयार करण्यात आल्या. देशाच्या एकूण लोकसंख्येत महीला आणि मुले यांचे प्रमाण ७०%असल्याने देशाच्या विकासावर प्रभाव पाडणारा हा मोठा घटक आहे हे स्पष्ट होते. थोडक्यात वर्तमानकाळात विकासाच्या पटलावर स्त्री हा घटक दुर्लक्षीत करून चालणार नाही.

भारतीय संविधानाने स्त्री–पुरूषांना समान हक्क व अधिकार प्रदान केलेले आहे. पंचायत राज व्यवस्थेत महीलांना ७३ व ७४ व्या घटना दुरूस्तीने ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थेत ३३%आरक्षण मिळाले आहे. परंतु अजुनही पंचायत राज व्यवस्थेत महीला समर्थनीय भूमीका पार पाडतांना दिसत नाही. याचे कारण म्हणजे कुटूंब, समाज व राजकीय पक्षीय व्यवस्था यांचा एकत्रीतपणे होणारा विरोध होय.

पंचायत राज व्यवस्था महाराष्ट्र राज्यातून २३ एप्रिल १९९२ पासून सुरू करण्यात आली. व ७३ व्या घटनादुरुस्तीने पंचायत राज व्यवस्थेला घटनात्मक दर्जा प्राप्त झाला. संपूर्ण भारताचा विचार केला असता पंचायत राज पद्धती कार्यवाहीत आनणारे महाराष्ट्र हे अकरावे राज्य आहे.

पंचायत राजमध्ये स्त्रियांच्या संख्यात्मक वाढीने स्त्रियांचे प्रश्न आता राजकारणाच्या चौकटीत आल्याचे दिसून येते. पाणी स्वच्छता सुविधा, रस्ते, आरोग्य, शिक्षण, वीज, दारूबंदी यांची अग्रक्रमाने चर्चा होत आहे. पंचायतीमध्ये महीलांकरीता आरक्षीत जागा असल्यामुळे पंचायतीमध्ये महीलांचा प्रवेश निश्चित असतो. महीलांमध्ये पंचायत राज व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पदावर राहून कामाच्या अनुभवातून नवा आत्मविश्वास निर्माण होत आहे ही एक जमेची बाजू आहे. पंचायत राज हे महिला सक्षमीकरणासाठी प्रभावी माध्यम आहे असे म्हणण्यास हरकत नसावी. ग्रामीण भागातील पंचायत राज व्यवस्थेतील सहभाग व त्यांचा झालेला विकास

सक्षमीकरण यांची वास्तविकता जाणून घेण्यासाठी सदर अध्ययन कार्य संशोधनकर्त्यांने केलेले आहे.

**अध्ययन पद्धती**

सदर अध्ययन कार्य हे गुणात्मक संशोधन पद्धतीचे आहे. प्रस्तुत अध्ययन कार्य हे वर्धा जिल्ह्यातील वर्धा तालुक्यातील एकुर्ली, अलीपूर, तळेगाव, वायगाव, नेरी, मिरापूर, वाघोली, शिरूळ, ऐरणवाडी, पिंपळगांव या १० गावातील ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडीताई, आशा वर्कर व प्राथमिक शाळेच्या शिक्षिका यांचा उत्तरदाते म्हणून संभाव्यता नमुना निवड पद्धतीने निवड करण्यात आली. या अध्ययन कार्याचे क्षेत्र वर्धा तालुका असून अध्ययन विश्व ७७ एककाचा आहे. नमुन्याचा आकार ३० एकाकांचा आहे.

**अध्ययनाचे उद्देश**

१)पंचायत राज व्यवस्थेतील महीलांच्या सहभागाचे अध्ययन करणे.
२)पंचायत राज व्यवस्थेमुळे महीलांच्या सक्षमीकरणावर झालेल्या प्रभावाचे अध्ययन करणे.
३)महिलांच्या विकासाकरीता पंचायत राज व्यवस्थेतील विकासात्मक धोरण अध्ययन करणे.

**महीलांची सामाजिक स्थिती**

आधुनिक जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरी कार्यरत आहेत. तरीही आज त्या पूर्वीपेक्षाही अधिक असुरक्षित आहेत. संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार भारतात २४.५ कोटी स्त्रिया निरक्षर आहेत. तर ९० टक्के स्त्रिया अशा आहेत की, ज्यांना आपल्या आरोग्यासंबंधीचे निर्णय घेण्याचाही अधिकार नाही. आपल्या देशात एकूण लोकसंख्येच्या सुमारे ५० टक्के स्त्रिया आहेत. भारताचे संविधान मुलभूत हक्कांच्या दृष्टिने स्त्रि–पूरूष समानता मान्य करते. परंतु आजही स्त्रियांच्या समस्या आजच्या आधुनिक जगात कमी होण्याऐवजीवाढत असल्याचे जाणवते. अशिक्षीत असो की सुशिक्षीत, अनेक स्त्रिया, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिकदृष्ट्या पीडीत असल्याचे त्यामुळेच जाणवते. मानवाधिकार असतांना या स्त्रियांच्या अधिकाराला दडपून टाकण्याचा जो प्रयत्न केला जातो. त्यासाठी सामाजिक स्तरावर उपाययोजना होणे महत्वाचे आहे. स्वातंत्र्योत्तर काळात योजनापूर्वक प्रगतीनंतर जवळ जवळ तीन दशकांनी १९७४ मध्ये राष्ट्रीय स्तराला नियुक्त मंडळाने देशातील स्त्रीचा समाजातील दर्जा आणि स्थान याचा पहिला अहवाल सादर केला. या अहवालावरून स्त्रीचे स्थान डागाळलेले, विदारक धक्कादायक आढळले. मध्यम वर्गातल्या स्त्रियांचे शिक्षण आणि नोकरी व्यवसाय या संदर्भात थोडी जमेची बाजू वगळता एकूण सर्वसामान्य स्त्रीचे स्थान हे मागासलेले दिसून आले. भारतातील जवळ जवळ निम्म्या स्त्रियांच्या जीवनात बालमृत्यू, उपासमार, दारिद्र्य, व्यवसाय उपलब्धतेची संधी न मिळाल्यामुळे वाढलेली बेकारी, अति शारीरिक श्रम, निराधारपणा या सर्वांमुळे उतरती कळा लागलेली आढळते.

पंचायत राज व्यवस्थेमुळे महीलांना नेतृत्वाची संधी मिळत आहे. त्यामुळे त्यांच्या सामाजिक दर्जात वाढ होण्यास व सामाजिक प्रतिष्ठा वाढण्यास मदत होत आहे.

**महीलांची आर्थिक स्थिती**

आधुनिक युगात एकूण श्रमशक्तीत स्त्रियांचा वाटा फार मोठा आहे. अर्थार्जनासाठी जवळ जवळ सर्वच क्षेत्रात स्त्रिया कार्यरत असलेल्या दिसून येतात. आजही आर्थिक क्षेत्रात स्त्रिया मोठ्या प्रमाणात संख्येने कार्यरत आहेत. काही व्यवसाय तर स्त्रियांमुळेच कार्यरत चहाचे मळे, शेतीतील रोवणी, निंदण आणि कृषी क्षेत्र तसेच गालीचे तयार करणे, भरतकाम, नक्षीकाम इत्यादी जगप्रसिद्ध पारंपारिक कार्ये कमी मजूरीवर काम करण्यास स्त्रीश्रमीक सदैव तयार असतात. एकंदरीत शारीरिक श्रमाच्या कार्यात स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. स्त्रियांचे प्रमाण वाढविण्यासाठी आर्थिक स्वातंत्र्य व सक्षमता तिला बहाल करणे अधिक महत्वाचे आहे. ज्यामुळे कुप्रथा व अपत्य जन्माला घालण्याचे स्वातंत्र्य तिला मिळेल. पंचाय राज व्यवस्थेमुळे स्त्रियांना सत्तेत सहभागी होण्याची व स्त्रियांकरीता स्त्री विकास चळवळ सुरू करण्याची संधी मिळाली आहे. पंचायत राज अंतर्गत सुरू केलेल्या स्वर्णग्रामजयंती योजना, महाराष्ट्र ग्रामीण जिवनोन्नती अभियानातून स्त्रियांचा अर्थिक विकास झाल्याचे दिसून येते.

**महिलांची आरक्षणाची स्थिती**

२१ व्या शतकात ग्रामपंचायत, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषदेच्या राजकारणात स्त्रिया थोड्याशा, रूळलेल्या स्थिरावलेल्या दिसतात. परंतु त्यांच्या समस्या कमी झाल्या आहेत असे मुळीच नाही. काळाबरोबर समस्यांची तीव्रता कमी वाटू लागली असेल, पण स्त्रियांनी तक्रारीचा सूर न लावता परिस्थितीशी जुळवून घेत काम करण्यास प्राधान्य दिले. तरीही स्त्रियांना रोज अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. मात्र स्त्रिया स्थानिक सत्तेतील विविध पदांवर आल्यामुळे त्यांना सन्मान मिळू लागला.

पंचायत राज व्यवस्थेत महीलांचा राजकीय सहभाग राजकीय क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी खुले द्वार भारतीय घटनेच्या ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीने महीलांना मोठी संधी मिळाली. विशेषत: इतर मागास प्रवर्ग, अनुसूचीत जाती व जमाती मधील स्त्रियांना स्वतंत्र आरक्षण मिळाले. म्हणजेच महीलांसाठी राखीव जागा झाल्या व महीला आरक्षणात स्त्रियांना आरक्षणाची सुविधा दिली. महीला आरक्षणाची तरतूद झाल्याने गावखेड्यातील सर्वात उपेक्षीत शोषीत महीलांना प्रथमच राजकारणाचे अवकाश मोकळे झाले. पण त्याचे राजकीय प्रवेश हे कुटूंबाच्या पुरुषांच्या निर्णयावर निर्भर झाले आहे.

पंचायत राज संस्था, नगरपालिका यामध्ये महीलांना पूर्वी ३३ टक्के व आता ५० टक्के आरक्षण देण्यात आला. या आरक्षणाचा अनुभव उत्साहजनक आहे. राजकारणात चंचू प्रवेश झाल्यानंतर अनेक महीलांनी आपले कर्तृत्व सिद्ध करुन दाखविले. (देशमुख—१९९३)

महाराष्ट्राच्या विधानमंडळाचा मागील पाच वर्षातील प्रतिनिधीत्व

| अ. क्र. | वर्ष | एकूण संख्या | महीला सदस्य |
|---|---|---|---|
| १ | १९९९ | ९२८८ | १२ |
| २ | २००४ | २८८ | १२ |
| ३ | २००९ | २८८ | ११ |
| ४ | २०१४ | २८८ | २१ |
| ५ | २०१९ | २८८ | २३ |

स्थानिक स्वशासन व संसदेमध्ये महिलांचा सहभाग वाढविण्याकरीता आरक्षण एक मुख्य मार्ग आहे. यासाठी सर्वच राजकिय पक्षांनी महीलांना प्रतिनिधीत्व देणे महत्वाचे आहे. परंतु राखीव जागा वगळता इतर जागांवर महिलांचे उमेदवारांचे प्रमाण अत्यल्प आहे.

**राजकिय सहभाग**

पंचायत राजमधील व्यवस्थेतील सहभागाविषयी असे दिसून येते की, १९५७ ते २००१ च्या काळात १५० उमेदवारांत केवळ ४ स्त्रिया होत्या. १७ एप्रिल २०१४ च्या काळात लोकसभा निवडणूकीत महाराष्ट्रातील १९ मतदारसंघात ३५८ उमेदवारांपैकी केवळ २४ महीला उमेदवार होत्या. महीला आरक्षणामुळे ग्रामीण क्षेत्रात महिला उमेदवारांचे प्रमाण वाढले आहे. बऱ्याच प्रमाणात विशेषत: आरक्षीत जागांवर स्त्रिया निवडून देखील आल्या आहेत. परंतु विशिष्ट पदावर जरी महीला उमेदवार निवडून आल्या असल्या तरी या पदाचा कारभार तिचा पती चालवित असल्यामुळे राजकिय क्षेत्रात आपल्या कार्याचा स्वतंत्र ठसा उमटविता आला नाही.

१५ व्या लोकसभेत (२०१४) एकूण ५५६ म्हणजे सर्वाधिक महीलांनी लढविली. त्यापैकी ५९ महीला खासदार पदावर निवडून आल्या. अर्थात लोकसभेच्या एकूण सदस्यसंख्येचा विचार करता महीला सदस्यांचे प्रमाण केवळ १०.६१% एवढेच आहे.

**महीलांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग**

वर्तमान काळात राजकीय क्षेत्रात येणाऱ्या महीलांचा टक्का वाढता आहे ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे. पण सत्तेवर आल्यानंतर त्यांना त्यांच्या मनासारखे निर्णय स्वतंत्रपणे घेता येतात का? हा प्रश्न तेवढाच महत्वाचा आहे. शहरी क्षेत्रात स्त्रियांच्या राजकिय नेतृत्वाचे प्रमाण अधिक आहे. तर ग्रामीण क्षेत्रात तुलनात्मकदृष्ट्या ते कमी आहे. महीलांना नेतृत्व जरी पंचायत राज व्यवस्थेत मिळाले असले तरी निर्णय प्रक्रियेचे स्वातंत्र्य मिळाले नाही. पती शासकीय अधिकारी, राजकिय वरीष्ठ नेते अशा विविध लोकांच्या दडपणाखाली त्यांना निर्णय घ्यावा लागतो. राजकाराणात कार्यरत असणाऱ्या स्त्रियांना कौटूंबिक व सामाजिक आघाड्यांवर अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यामुळे त्या राजकारणात येण्यास घाबरतात. राजकिय क्षेत्रात कार्य करतांना देखील त्या विशिष्ठ दडपणाखाली वावरतात हे एक वास्तव होय. ज्या दिवशी स्त्रिया राजकीय निर्णय स्वतंत्रपणे घेतील त्या दिवशी महीलांच्या हिताचे नियम व कायदे तयार होऊन त्यांची अंमलबजावणीकेली जाईल. महीलांच्या हातातील अधिकार महीलांना न्याय मिळवून देतील व समानता निर्माण होण्यास हातभार लागेल.

**शासकीय धोरण व महिला सक्षमीकरण**

भारतीय राज्यघटनेचा सरनामा, मुलभूत हक्क, मुलभूत कर्तव्ये व मार्गदर्शक तत्वे यामध्ये 'स्त्री—पुरुष समता' हे तत्व व्यक्त होते. राज्यघटना केवळ महीलांना समतेची शाश्वती देत नाही. तर राज्यसंस्थेने प्रसंगी किंमत मोजूनही महिलांच्या सार्वजनिक हिताचा विचार केला पाहिजे, अशी भूमिका घेते. यासाठी राज्यसंस्थेला अधिकार राज्यघटना देते. महीला सबलीकरण धोरण निश्चिती करण्यावर भारतामध्ये नव्वदीच्या दशकात राज्यसंस्थेने भर दिला. त्या अगोदर सबलीकरण धोरण नव्हते. केवळ महीलांच्या संदर्भात कायदे केले गेले. प्रारंभीच्या काळात भारत सरकारने महीलांसाठी कल्याणकारी धोरण निश्चित केले. यामध्ये सरकारचा भर कायदे करण्यावर होता. याशिवाय शिक्षण, आरोग्य व  कल्याण अशा सामाजिक सेवांच्या लाभार्थी म्हणून महीला धोरण समजले गेले. कल्याणकारी धोरणाची जागा १९७५ नंतर विकासलक्षी कायद्यांनी घेतला. यानंतर १९९० नंतरर कल्याणकारी व विकासलक्षी हे दोन दृष्टिकोन मागे पडले आणि त्या जागी 'महीला सक्षमीकरण' हे नवे धोरण भारत सरकारने स्विकारले. महीला सक्षमीकरण धोरणाअंतर्गत महीलांना सत्तेमध्ये समान वाटा निर्णय प्रक्रियेत सक्रीय सहभाग, समान संधी, सर्वच पातळ्यांवर दर्जेदार शिक्षण, समान वेतन, सामाजिक सुरक्षा, व्यावसायिक सुरक्षा, राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व नागरी क्षेत्रात महीलांना समान हक्क व स्वातंत्र्य दिले पाहीजे. महीलांचा शोषण करणाऱ्या अनिष्ठ प्रथा—परंपरांचे उच्चाटन, कायद्याची निर्मिती व प्रभावी अंमलबजावणी, सुलभ न्यायदान प्रक्रिया या सर्व बाबींचा सक्षमीकरण प्रक्रियेत समावेश असला पाहीजे. व त्या दृष्टिने कृतीकार्यक्रमांची अंमलबजावणी झाली पाहीजे.

**महीला सक्षमीकरणातील अडथळे**

स्त्री सक्षमीकरण हा विषय बराच व्यापक व बहुआयामी आहे. स्त्री सक्षमीकरणाचे अनेक पैलू लक्षात घेता, स्त्री सक्षमीकरण होणे ही देशासाठी अत्यंत गौरवाची बाब आहे. स्त्री सक्षमीकरणामुळे स्त्रियांशी संबंधीत अनेक चांगले मुद्दे, विकासाची भक्कम बाजू नजरेच्या टप्प्यात येत असेल तर तिचा दर्जा, सन्मान तसेच स्थितीत सुधारणा होत आहे असे म्हणता येईल. पण स्त्री सक्षमीकरणाचे प्रयत्न जेवढे वाढत आहेत तेवढीच मागे खेचण्याची जणू स्पर्धाच लागली आहे. स्त्रियांचे स्वातंत्र्यावर बंदी, लैंगिक शोषण, स्त्री अपराधांचे वाढते प्रमाण, स्त्री—पुरुष भेदाभेद, संधीचा अभाव, मातामृत्यूदर, हिंसा व मारहाण, अंधश्रद्धा, अनिष्ठ प्रथा—परंपरांचा पगडा, बालविवाह, शिक्षणाच्या अधिकारांचा अभाव, कार्यालयीन कामकाजातील स्त्रियांचे दुय्यम स्थान, राजकारणातील अत्यल्प सहभाग, कौटूंबिक व सामाजिक असहकार्य, सुशिक्षीत वर्गातील लोकांची स्त्रीबद्दलची संकुचित मानसिकता, शासनाचा चालढकलपणा या सर्व बाबी महीला सक्षमीकरणाच्या कार्यात अडथळा ठरतात असे म्हणण्यात हरकत नाही.

**निष्कर्ष**

सदर विषयावरील संशोधन कार्याअंतर्गत खालीलप्रमाणे निष्कर्ष निश्चित केले आहे.

१)पंचायत राज व्यवस्थेमुळे महीलांच्या सामाजिक व राजकिय विकासाची संधी मिळाली.

२)पंचायत राज व्यवस्थेच्या प्रक्रियेत महीलाचा सहभाग अत्यल्प आहे.

३)पंचायत राज व्यवस्थेमुळे महीलांना सत्तेत सहभाग मिळाला पण निर्णय प्रक्रियेत त्या दुर्लक्षीत आहेत.

४)पंचायत राज व्यवस्थेमुळे 'महीला विकासाची चळवळ' उभी राहण्यास व कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यास सुरुवात झाली.

**उपाययोजनात्मक शिफारशी**

१)महिलांचे सत्तेवर येण्याचे प्रमाण बघता राजकिय पक्षांनी महीला उमेदवारांना सत्तेवर येण्यासाठी कृतीशील प्रयत्न करावे.

२)सत्तेवर असणाऱ्या महीलांना कामकाजात व त्यांच्या कुटूंबाचा, राजकिय सदस्यांचा, शासकीय अधिपत्यांचा हस्तक्षेप नसावा या दृष्टिने कार्यवाही करण्यात यावी.

३)दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या महीलांच्या समस्या निवारण्यासाठी अग्रक्रमाने प्राधान्य देण्यात आले पाहीजे. त्यासाठी त्यांना निवास, रोजगार व आरोग्याच्या सेवा सुलभ मिळणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची**

१) देशमुख अल्का (२०११) 'विविधांगी आयामातून स्त्री' साईनाथ प्रकाशन, नागपूर.
२)बोधनकर सुधीर (१९९९), अलोनी विवेक 'सामाजिक संशोधन पद्धती' साईनाथ प्रकाशन, नगपूर.
३)गगने वर्षा (२०१८), 'स्त्री सक्षमीकरण दशा आणि दिशा' साईज्योती पब्लिकेशन, नागपूर.
४)जोसेफ एम. (१९९८), 'कामकरी महीलांच्या समस्या' केन्द्रीय श्रमिक बोर्ड, उत्तर अंबाझरी रोड, नागपूर.
५)खडसे भा. की. 'भारतीय सामाजिक समस्या' श्री मंगेश प्रकाशन, शांतादुर्गा निवास, नागपूर.
६)कुलश्रेष्ठ नितीश (२०१२), 'पंचायती राज एवं ग्रामीण विकास योजनाएँ' रितु पब्लिकेशन, अजमेर रोड, जयपूर.
७)मिना हनुमान प्रसाद 'पंचायत राज और महीला सशक्तिकरण' बाबा पब्लिकेशन, जयपूर.
८)मेहेत्रे स्मिता (२०११), 'भारतीय स्त्री मानवाधिकार' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
९)शर्मा श्रीनाथ, सिंह मनोजकुमार 'पंचायत राज एवं ग्रामीण विकास' अर्जुन पब्लिशींग हाऊस, दरीयागंज, नवी दिल्ली.
१०)साळुंखे आ. ह. (१९९८), 'हिंदू संस्कृती आणि स्त्री' लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
११)पवार वैशाली (२०१२), 'महीलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
१२)तुळपुळे मालती (१९९१), 'स्त्री माणसशास्त्र' महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, गांधी मार्ग, नागपूर.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# माता बाल मृत्युदर निवारणात जननी सुरक्षा योजनेचे योगदान

प्रा. डॉ. पल्लवी शामसुंदर देशमुख
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख राजीव गांधी महाविद्यालय, सडक अर्जुनी,
जि.गोंदिया ४४१८०७
ई—मेल pallavigabhane82@gmail.com, मो.नं.:९४०३६१४४६६

**प्रास्ताविक :—**

'' जननी जन्मभूमीश्च स्वर्गादपी गरीयसी '' या शब्दांमध्ये माता तसेच मातृभूमीचे महात्म्य आपण अनादी काळापासून वर्णन करीत आलेलो आहोत. आजची मुलगी ही भविष्यातील माता आहे हे लक्षात घेऊन महिला व मुलींच्या सुदृढ आरोग्याची अधिक चांगल्या प्रकारे काळजी घेने ही काळाची गरज आहे. कारण आजच्या मुली ह्या उद्याच्या सुदृढ माता होतील. व त्यांच्या पोटी सुदृढ बालके जन्माला येतील.

'आ' म्हणजे आत्मा आणि 'ई' म्हणजे ईश्वर यांचा सुंदर संयोग जेथे असतो ती व्यक्ती म्हणजे 'आई'. आई म्हणजे माता. स्वातंत्र्यपूर्व काळात बाळांतपण म्हणजे बाईचे पुनर्जन्म असं पूर्वी मानल्या जात असे वैद्यकिय सुविधांच्या आणि परंपरागत रूढीप्रिय विचारसरणी यामुळे माता बालमृत्युचे प्रमाण विशेष होते. मात्र स्वातंत्र्य प्राप्तीनंतर कुटुंब कल्याण हा केवळ खाजगी प्रश्न न राहता ते शासकीय पातळीवरील एक उद्दिष्ट मानण्याचा धाडसी निर्णय आपल्या देशात घेतला गेला. पुढे भारत सरकारने चांगली संतती होण्यासाठी समतोल आहाराकडे विशेष लक्ष दिले. आजचा बालक हा 'पालकाची सुरक्षित ठेव' आहे तर तो देशाचा भावी भाग्यविधाता आहे? याकरिता सर्वांगाने समृद्ध आणि समर्थ बालक घडविण्यात माता, पिता, कुटुंब सदस्य, शेजार, समाज व यांचा देखिल मोलाचे स्थान आहे. मुल सुदृढ जन्माला येण्यासाठी माता सुदृढ हवी. माता—पितांचे आरोग्य चांगले असायला हवे याचेच औचित्य राखून माता बालमृत्युच्या समस्यांच्या निराकरणात भारत सरकारने विशेषत: ग्रामीण महिलांच्या प्रसवकाळातील समस्यांवर आळा घालण्याकरिता 'राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान' सुरू केले. त्यात माता बालक यांच्या आरोग्यावर विशेष लक्ष केंद्रित केले गेले. कारण देशाचा विकास साधायचा असेल तर भावी नागरिक म्हणजे बालक सुदृढ, निरोगी जन्माला येने गरजेचे आहे.

**माता बालक मोलाचे रक्षण करू त्यांच्या जीवाचे**

**संशोधन संज्ञाच्या कार्यात्मक व्याख्या :—**

- **जननी सुरक्षा योजना :—**

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाअंतर्गत येणारी ही योजना असुन या योजने अंतर्गत अनुसूचित जाती व जमाती व बी.पी.एल ग्रामीण गर्भवती महिलांना प्रसव काळात तपासणी, उपचार व आर्थिक मदत करणारी योजना म्हणजे जननी सुरक्षा योजना होय.

- **बाल मृत्यूदर :—**

''एका वर्षात दर हजारी जिवंत जन्मापैकी मृत्यू पावणाऱ्या एक वर्ष आतील बालकांची संख्या म्हणजे बालमृत्यू दर होय.

- **माता मृत्यूदर :—**

दर हजार जिवंत जन्मांमागे प्रसूतीच्या कारणांमुळे गर्भ धारणेपासून प्रसूतीनंतर ४२ दिवसांपर्यंत मृत्यू पावणाऱ्या मातांची संख्या म्हणजे माता—मृत्यू दर होय.

भारतात माता मृत्यूदर हा दर हजार जिवंत जन्मामागे ३.०१ इतका आहे प्रगत देशांमध्ये हा दर ०.५ पेक्षाही कमी आहे. यावरून हेच सिद्ध होते की भारतातील माता—बालकांचे मृत्यूदराचे प्रमाण हे प्रगत देशातील माताबाल मृत्यू दरापेक्षा अतिशय जास्त आहे. याची अनेक प्रमुख कारणे आहेत.

चंगल्या प्रतीची नैसर्गिक खत टाकून मशागत केलेल्या शेतीत पीक चांगलच येतं तसेच गर्भधारणेपूर्वी आई सशक्त असेल तर तिथं बाळही सशक्त होणारच. याचेच औचित्य राखून

जननी सुरक्षा योजना दारिद्रय रेषेखालील, अनुसूचीत जाती, जमातीतील गरोदर स्त्रियांना प्रसुतीपूर्व प्रसुतीपश्चात तपासणी करून घेतल्याबद्दल एकुण ७०० रू. प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येते रोजगार बुडवून तपासणीसाठी येणे शक्य नसल्याने गरोदर माता तपासणी करिता टाळाटाळ करतात. समतोल, पुरेसा आहार घेण्यासाकरिता पैसे नसतात. या अनेक अडचणी लक्षात घेऊन हि योजना सुरू केली आहे. या योजनेचा लाभ मिळालेला एक समाधानी लाभधारक हा इतर दहा लाभधारकांना प्रवृत्त करू शकते व माता—बाल मृत्यू दर कमी करता येऊ शकतो.

- **राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान :—**

शहरी, ग्रामीण व आर्थिक दुर्बल लोकांना सर्वांगिण आरोग्यसेवा उपलब्ध करण्याच्या उद्देशाने भारताचे माजी पंतप्रधान मा. डॉ. मनमोहनसिंग यांनी १२ एप्रिल २००५ रोजी ' राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान' सुरू केले त्यात माता—बालकांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष दिले जाते.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत विविध आरोग्य विषयक सरकारी योजना कार्यरत असून जननी सुरक्षा योजना हि देखिल ग्रामीण व शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या महिलांचे आरोग्य संस्थांमध्ये होणाऱ्या प्रसुतीचे प्रमाण वाढविणे व मातामृत्यू व बालमृत्यूचे प्रमाण कमी करणे असे आहे.

'निरोगी गांव, निरोगी देश' हे ब्रिदवाक्य घेऊन अनेक योजना जन्माला आल्यात त्यातीलच जननी सुरक्षा योजना ही एक आहे. ग्रामीण व दुर्गम माता भगिणी अपेक्षित प्रमाणात या आरोग्य सेवांचा लाभ घेत नाहीत. स्वत:च्या आरोग्य समस्येकडे दुर्लक्ष करण्याची स्त्रियांची प्रवृत्ती, शिक्षणाचा अभाव, धार्मिक व रूढी परंपराचा प्रभाव आणि अंधश्रद्धा अशा अनेक संपूर्ण कारणांमूळे गरोदरपणातील तपासणी, लसीकरण, दवाखाण्यातील प्रसुती यासारख्या सेवांच लाभ पुरेशा प्रमाणात घेतला जात नाही. परिणामी माता बालमृत्यूचे प्रमाण कमी करणे हे जिकरीचे ठरते आहे.

जननी म्हणजे माता. माता जर सुरक्षित असेल तरच बालक सुरक्षित असतो. कारण आईचा बाळाशी निकटचा संबंध असतो. बाळाचे जतन व्हावे, गरोदर माता व नवजात अर्भकांच्या मृत्यूचे प्रमाण कमी व्हावे, डॉक्टर्स, नर्स यासारख्या कुशल व्यक्तींकडून बाळंतपण करवून घ्यावे, प्रसुती प्रामुख्याने रूग्णालयातच करावी, महिलांसह बालकांचे आरोग्यही चांगले राहावे या हेतूने ही योजना सुरू करण्यात आली आहे.

- **जननी सुरक्षा योजना :—**

हि योजना १०० टक्के केंद्रसरकार द्वारा कार्यन्वित करण्यात आली आहे. हि योजना केंद्रशासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत जननी सुरक्षा योजना सन २००५—२००६ पासून राज्यात कार्यन्वित करण्यात आली आहे. या योजनेचा आर्थिक लाभ शासकिय आरोग्य संस्थेत अथवा जननी सुरक्षा योजनेकरिता मानांकित करण्यात आलेल्या खाजगी आरोग्य संस्थेत प्रसुती झाल्यास देय आहे. दवाखाण्यात नेण्यासाठी होणारा वाहतुकीचा खर्च, डॉक्टरांची फी, औषधीचा खर्च न परवडणारा असतो. अशा अनेक कारणांवर आळा घालण्यासाठी भारत सरकारने एक नवीन योजना सुरू केलेली आहे. ती म्हणजे 'जननी सुरक्षा योजना' होय.

- **जननी सुरक्षा योजनेचे उद्दिष्टे :—**

▪ राज्यातील मातामृत्यू व अर्भकमृत्यूंचे प्रमाण कमी करणे.
▪ कुपोषित माता व बालकांचे प्रमाण कमी करणे.
▪ राज्यातील दारिद्रय रेषेखालील महिलांचे आरोग्य संख्यामध्ये होणाऱ्या प्रसूतीचे प्रमाण वाढविणे.
▪ लोकसंख्या वाढीला आळा घालणे.
▪ विवाहाचे वय वाढविणे.

- **जननी सुरक्षा योजनेची अमलबजावणी :—**

▪ गर्भवती महिला ही अनुसूचित जाती, जमाती व दारिद्रय रेषेखालील ग्रामीण भागातील असावी.
▪ गर्भवती महिलेने गरोदरपणाच्या कालावधीत कमीत कमी चार वेळा आरोग्य केंद्रात तपासणी करणे आवश्यक आहे.
▪ जे.एस.पाय. चा लाभ प्रसुतीनंतर जास्तीत जास्त सात दिवसाच्या आत चेकद्वारे दिल्या जातो.

- प्रसुती हि आरोग्य संस्थेतच झालेली असावी.

- **जननी सुरक्षा योजनेच्या अर्हतेचे निकष :—**

- घरी प्रसुती होणाऱ्या बी.पी.एल कुटुंबातील लाभार्थी मातेस बाळंतपणानंतर ७ दिवसात रू. ५००/— रोखीने देण्यात येते.
- शहरी भागातील गरोदर मातेचे बाळंतपण जर शासकीय आरोग्य संख्येत झालेले आहे त्यांना रू. ६००/—रोखीने देण्यात येते.
- ग्रामीण भागातील गरोदर मातेस बाळंतपणानंतर रू. ७०० /— रोखीने दिले जाते.
- ग्रामीण भागातील सिझेरियन शस्त्रक्रीया झाल्यास तज्ञ वैद्यकिय अधिकाऱ्याला रू. १५००/— मानधन देण्यात येत.

देशातील सर्व राज्यांमध्ये जननी सुरक्षा योजना २००५ पासून कार्यन्वित असून या योजनेमुळे गर्भवती मातांची तज्ञ डॉक्टर, प्रशिक्षण नर्स, प्रशिक्षित स्वयंसेविका (आशा) असा अनुभवी आरोग्य सेविकांद्वारे गर्भवती स्त्रयांची वेळोवेळी तपासणी करणे, मार्गदर्शक करणे, नि:शुल्क औषधोपचार व प्रसुतीपश्चात मातेची काळजी घेता यावी म्हणून आर्थिक मदतीमुळे माता—बालमृत्युचे प्रमाण कमी झाले. या योजनेमुळे ग्रामीण भागातील मातांचे—बालकांचे मृत्यदरात कमतरता निर्माण झाली, कुपोषीत माता—बालकांचे समतोल आहारामुळे प्रमाण कमी झाले.

- **निष्कर्ष :—**

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानातील जननी सुरक्षा योजनेचा महीलांना प्रसवपूर्व काळात व प्रसवपश्चात काळात नक्कीच पूरेपूर फायदा मिळालेला आहे. आणि त्यामुळेच राज्यातील मातामृत्यू व अर्भकमृत्यूंचे प्रमाण कमी झालेले आहे कारण या योजनेचा लाभ मिळण्यासाठी गर्भधारण पश्चात १२ आठवड्यापूर्वी गर्भवती स्त्रीने आरोग्य केंद्रात नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच आरोग्य केंद्रात कमीत कमी चार वेळ तपासणी करणेही आवश्यक असल्यामुळे तज्ञ डॉक्टर, नर्स, आरोग्य सेविकांचा योग्य सल्ला प्राप्त होते. सदर योजनेचा लाभ दोन अपत्यांपूरतेच मर्यादित असल्यामुळे लोकसंख्येत घट होते. आर्थिक लाभामुळे सकस समतोल आहार घेतल्याजाते व परिणामी कुपोषण सारख्या गंभीर समस्यांवर मात देता येते. योजनाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थीचे कमीतकमी १८ वर्षे वयोमर्यादा असल्यामुळे विवाह वयोमर्यादेत वाढझाली. तसेच महत्वाचे म्हणजे अशिक्षित, ग्रामिण भागातील दारिद्रय रेषेखालील महिलांच्या प्रसुती ह्या आरोग्य संस्थेत जास्त प्रमाणात होऊ लागल्यामुळे निश्चितच माताबालमृत्यू दर निवारणात जननी सुरक्षा योजना ही खरच फलदायी ठरल्याचे स्पष्ट होते.

- **संदर्भ ग्रंथ :—**


- जुननकर, कुसुम, ''मातृकला आणि बालसंगोपन'' पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.
- पाटील मनोज, ''नागरीकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजना'' चौधरी लॉ पब्लिशिंग, पुणे.
- फरकाडे त्रिवेणी व गोंगे सुलभा, ''बालविकासाची मुलतत्वे'', पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.
- गुप्ता सुरेश, महाराष्ट्र आरोग्य पत्रिका, वर्ष बारावे, अंक दूसरा, प्रकाशक विलास देशपांडे, पुणे.
- http://www.jsy.in

**निलेश माधव घोरपडे**

(M.A. Political Science, M.A. Marathi, B.Ed.)

E-mail – ghorapadenilesh@gmail.com,Mob.No.8999194676

**प्रा.डॉ. आर.पी. निकम सर**

(M.A. Political Science, NET, Ph.D.)

राज्यशास्त्र विभाग प्रमुख नानासाहेब य.ना. चव्हाण कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय,

चाळीसगाव जि. जळगाव 424101

E-mail – rpnikam1971@gmail.com ,Mob. No. 9371024888

- **प्रस्तावना –**

1947 मध्ये स्वातंत्र्य झालेल्या भारताने धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्याचा स्विकार केला. भारतात 1952 पासून सार्वत्रिक निवडणुकांचा शुभारंभ झाला. नव्याने स्वतंत्र्य मिळालेल्या भारतीय समाज राजकारणाबद्दल उदासिन होता. परंतु जसा जसा काळ ओलांडत गेला तस तसे निवडणुकाचे समिकरणे बदलत गेलेत. पक्षांची वाढती संख्या व सत्ता प्राप्त करण्याची स्पर्धा यातुन भारतीयनिवडणुकांत मग त्या सार्वत्रिक निवडणुका असो वा स्थानिक स्वराज्य संस्था ते ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये सत्ता प्राप्तीचे विविध मार्ग अवलंबिले जाऊ लागलेत. त्यातील मुख्य मार्ग म्हणजे लिंग, धर्म आणि जाती. देशाची वाढती लोकसंख्या नुसार लिंग, धर्म आणि जाती यांचे ही महत्त्व वाढत गेले. या वाढत्या आकड्यांचा फायदा राजकीय पक्ष आपल्या हितासाठी अधिकाधिक करीत आहेत. तसेच यात आणखिनच भर म्हणजे जाती धर्मावर आधारित किंवा विशिष्ठ जाती धर्माच्या विचारधारेवर आधारीत पक्षांची निर्मिती ही मोठ्या प्रमाणात होतांना दिसते. व विशिष्ठ वर्गाचा फायदा आपल्या मतदगानात भर घालण्यासाठी करुन घेतला जातो.

असे अनेकदा म्हटले जाते की राजकारणात अपघाताने काहीही घडत नाही. मते मिळविण्यासाठी राजकारणी त्यांच्या भडकीतील प्रत्येक बाण आपल्या सोईनुसार वापरतात. या राजकारण्याच्या भडकीतील काही महत्वाचे बाण लिंग, धर्म आणि जात या सर्व घटकांचा राजकारणात कसा मोठा वाटा आहे हे पुढिल घटकांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

- **उद्दिष्ट्ये –**

1) सार्वत्रिक निवडणुकांचा अभ्यास करणे.

2) राजकारणात लिंग आधारित घटकांचा प्रभाव कसा होतो हे जाणुन घेणे.

3) निवडणुकांवरती धर्माचा प्रभाव कसा होतो याचा अभ्यास करणे.

4) मतदार व त्यांच्या जातीचा राजकारणावरील प्रभाव जाणुन घेणे.

- **गृहितके –**

1) राजकारणात संविधानिक मुल्यांचा वापर होतांना दिसुन येत नाही.

2) निवडणुकांमध्ये मते मिळविण्यासाठी अनैतिक मार्गाचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहेत.

3) भारतीय राजकारणावर लिंग, धर्म आणि जातींचा मोठा प्रभाव आहे.

4) राज्य तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व क्षेत्रिय निवडणुकांमध्ये धर्म व जातीच्या राजकारणाचा समावेश दिसुन येतो.

- **लिंग आणि राजकारण –**

जीवशास्त्राच्या आधारे पुरुष व स्त्रिया भिन्न आहेत यात कोणतीही शंका नाही. परंतु संविधानानुसार पुरुष व स्त्री यात हक्क अधिकारांच्या बाबतीत समानता राखण्यात आली आहे. असे अशुन देखिल काही घटकांमध्ये लैंगिक आधारावर भेदभाव करण्यात येतो. असे लैंगिक पक्षपात करणारे क्षेत्र म्हणजे राजकारण होय. सध्या जगात विशेषत: भारतातील महिलांचे राजकिय सहभागाचे प्रमाण नगन्य दिसुन येते. ही समस्या भारतीय समाजातील पुरुष प्रधान संस्कृतीमुळे निर्माण झाली आहे. आज देखिल 21व्या शतकात स्त्रीयांना दुय्यम वागणुक देवुन फक्त चुल आणि मुल सांभाळणारी साधन म्हणून स्त्रीकडे पाहिले जाते. हे बिनपगारी अदृश्य काम आहे आणि या कडे दुर्लक्ष करणारा आफला समाज अपराधी आहे.

दुर्दैवाने समाजाच्या या लैंगिक भेदाचा देशाच्या राजकारणातही महिलांच्या सभागाला त्रास होतो उदा. 2014 च्या निवडणुकांमध्ये केंद्र सरकारमधील महिलांची संख्या पहिल्यादाच 10% प्रतिनिधित्वाचा आकडा पार केला होता. जगातील इतर विकसनशील देशांच्या तुलनेत आजही भारताच्या राजकिय सहभागात लैंगित सर्वातवाईट आहे. तर 2019 च्या 17 व्या लोकसभेत हे प्रमनाण जेमतेम 14% फर्यंत पोहचले. आकृती क्रमांक 1.1 वरुन पहिली ते सतराव्या लोकसभेत स्त्रियांचे प्रमाण लक्षात येते.

2017 मध्ये जागतीक स्थरावर झालेल्या सर्वेक्षणानुसार खांडा देशात सर्वाधिक महिला राजकारणात आहेत. हे प्रमाण 61% येवढे आहे तर भारताचे 12% येवढेच अत्यल्प प्रमाण आहे.

भारतात लैंगिक विषमता कमी करण्यासाठी वेळोवेळी संविधानिक कायदे करण्यात आले आहेत. आता स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना 33% वरुन 50% आरक्षणदेण्यात आले आहे. परंतु येवढेच करुन पुरेसे नाही, तर राज्य व केंद्र स्थरावरही समान प्रतिनिधीत्वाचा कायदा करणे आवश्यक आहे.

- **धर्म आणि राजकारण –**

भारतीय राज्यघटनेत अगदी स्पष्टपणे म्हटले आहे की, भारताला कोणताही अधिकृत धर्म नाही. आम्ही एक "धर्मनिरपेक्ष राज्य" आहोत. भारतातील सर्व भारतीयांना कलम 28 नुसार धार्मिक स्वातंत्र्य देण्यात आले आहे. अर्थात ते आपल्या आवडीनुसार कोणत्याही धर्माचे आवरण व स्विकार करुन शकतात. आणि या अधिकारांवर आधारित कोणताही भेदभाव होऊ शकत नाही. परंतु प्रत्यक्षात भारतीय राजकारणात धर्म एक मोठा घटक आहे. याची सुरुवात प्राचीन काळापासूनच झाली आहे. श्रेष्ठ कनिष्ठतेच्या भावनेतुन जातीवाद निर्माण झाला.

आपल्या देशात राजकिय पक्षांची स्थापना झाल्यापासून या जातीवादाचा राजकिय सत्ता मिळविण्यासाठी उपयोग केला जात आहे. त्यांच्यासाठी धर्माच्या आधारे मते गोळा करण्याचा हा एक प्रभावी मार्ग आहे. आणि अनेकदा येण निवडणुकांच्या वेळेस ते बहुसंख्य अल्पसंख्यांक धर्म विरोधी मुद्दे उमळुन काढतात व समाजात धर्म विरोधी भांडणे पेटवतात व यातुन राजकारणी आपली मतांची पोळी भाजतात.

धर्म किंवा जातीवर आधारित राजकिय पक्ष स्थापन करणे आश्चर्यपणे भारतात बेकायदेशिर नाही. धर्माच्या पालन करण्याचे जणु त्यांना स्वातंत्र्यच मिळाले आहे. यात आणखिण भर म्हणजे बहुसंख्य भारतीय हे राजकिय निरक्षर आहेत. तसेच धार्मिक दृष्ट्या अतिसंवेदनशील आहेत. याचाच फायदा विविध राजकिय पक्ष आपली मतांची टोपली भरण्यासाठी करुन घेतात. अनेक वेळेस तर धार्मिक गट येवढे सवेदनशिल असतात की, त्यातुन मोठ मोठ्या धार्मिकदंगली घडतात. यातुन धार्मिक गटांची विचारधारा असणारे पक्ष किंवा सदस्य अधिक बळकट होतात. अशा धार्मिक घटकांचा आधार घेवून सत्ता प्राप्त करणाऱ्या राजकारनातुन संविधानिक धर्मनिरपेक्ष लोकशाही तत्त्वांना तिलांजली दिली जाते. यावर एकमात्र उपाय म्हणजे नागरीकांना राजकिय साक्षर बनविणे तसेच कायद्यांची कडक अमंलबजावणी करणे. व धार्मिक आधार घेणाऱ्या सभासदांचे सदस्यत्व रद्द करणे. यातुनच भारत खऱ्या अर्थाने 'धर्मनिरपेक्ष लोकशाहीची' स्थापना करु शकेल.

- **जाती आणि राजकारण –**

लिंग धर्म प्रमाणेच भारतीय राजकारणात मोठा प्रभाव हा बहुसंख्यांक असलेल्या जातींचा पहावयास मिळतो. जगात कुठेही जात आणि जातीवाद इतका खोलवर देशाच्या समाजात व राजकारणात अंतर्भूत नाही जेवढा की, भारतात आहे. पुरातनकाळापासून अस्तित्वात असलेली आपली जातीव्यवस्था इतकी कठोर आणि व्यापक होती की, त्याचे उच्चाटन करणे अत्यंत कठीण झालेय. शहकीरण आमि आधुनिकीकरणामुळे समाजाने प्रगती केली आहे. परंतु जातीय विषमतेची दरी कमी करण्यात आजही समाजाला यश आले नाही. परंतु असे असतांना मात्र काही ठिकाणी प्रगत समाजाने जातीवादाचा त्याग केलेला दिसुन येतो. यात फक्त मोठ्या शहरांचा उल्लेख करता येईल. परंतु ग्रामिण बागांमध्ये आजूनही जातीवाद मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे.

भारतात 29 घटक राज्ये आहेत. या 29 घटकराजांमध्ये वास्तव्यास असणारे नागरीक कमी अधिक प्रमाणात विशिष्ट जातींचे आढळुन येतात. उदा. महाराष्ट्रात मराठा जाती, यु.पी. व राजस्थानात राजपूत, पं. बंगाल मुसलीम, बिहार दलीत अशा बहुसंख्यांक जाती आढळुन येतात. आणि याचा फार मोठा प्रभाव निवडणुकांवर होतो. व याचा फायदा राजकिय पक्ष घेतात. राजकिय पक्ष निवडणुकांसाठी टिकीटाचे वाटप करतांना उमेदवार कोणत्या मतदार संघातील आहे व त्या क्षेत्रात कोणत्या जातीचे मतदार संख्या जास्त आहे. याचा विचार करुन त्याच जातीतील व्यक्तीस आपल्या पक्षाची उमेदवारी देतात. पर्यायने उमेदवार हा कितपत लायक आहे याचा कोणताहीविचार केला जात नाही. आणि जाती बळावर अयोग्य उमेदवार निवडुणही येतात. याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रभाव हा देशाच्या विकासावर होतो. कारण अयोग्य व भ्रष्ट निवडुन आलेला नेता हा आफल्या मतदार संघासाठी नव्हे तर विशिष्ट जातीसाठी आणि आपल्या स्वार्थासाठीच कार्य करतात. परीणामत: अल्पसंख्यांक जाती दाबल्या जातात व मुख्य विकास प्रओवाहापासुन वंचित होतात. हा त्यांच्या वरील सर्वात मोठा अन्याय आहे. स्वार्थी राजकारणी व पक्ष अशाच पध्दतीने राजकारणातजाती या शस्त्राचा वापर करीत राहिले तर भारतात जातीवाद कमी होण्याएवजी वाढत जाईल व यातुन पुन्हा नव्या वर्ग संघर्षास सुरुवात होईल. व भारतीय घटनेचे धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्याचे स्वप्न भंग होण्यास वेळ नाही लागणार.

- **निष्कर्ष –**

1) स्त्रियांना लैंगिक पक्षपातामुळे कौटुंबिक, शैक्षणिक, सामाजिक व राजकिय हक्क मिळाले नाहीत.
2) राजकारणात धर्माचा आधार घेतल्यास समाजात धार्मिक तेढ निर्माण होत आहे.
3) धार्मिक राजकारणातुन वित्तीय व मानवी हानी मोठ्या प्रमाणात घडतांना दिसुन येते.
4) जातीय घटकाचा वापर करुन अयोग्य व भ्रष्ट प्रतिनिधी निवडुन येतात.
5) लिंग, धर्म व जातीयुक्त राजकारणामुळे बहुसंख्य नागरीक संविधानिक मुल्य व हक्कांपासुन वंचित राहतात.

- **संदर्भ –**

1) 2019 निवडणुक आयोगाचा अहवाल.
2) धर्म, समाज आणि राजकारण, डॉ. अशोक चौसाळकर
3) लोकराज्य, 8 मार्च 2019 महिला आणि हक्क
4) www.orfonline.org.in
5) www.mscw.org.in

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# सामाजिक परिवर्तन की प्रक्रियांमे महिला आंदोलन की भुमिका

मनविंदर की भामरा
एम.एम. द्वितीय सत्र
डॉ. म.वा.पी. डब्लूएस कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर

---

सार

वर्तमान में महिलाओ को जो कुछ सन्मान मिल रहा है वह सन्मान एकदम से नही मिला. महिला आंदोलन की नींव १७८९ को रखी गयी जिस वक्त क्रांती का उदय हूआ जिसके घोश्ना पत्र में महिलाओं को नागरिकही नही माना गया था। महिलायों की दयनीय स्थिती को समाज से रूबरू करवाने के लिए विश्व स्थिती सकारात्मक बन रही थी। वैदिक काल में महिलाओं को कम आखा गया था। मनुस्मृती ने महिलाओं को गौण स्थान देकर प्रताडिंत कीया था उस मनुस्मृती को डॉ.आंबेडकरने जला दिया, हिंदू समाजव्यवस्थाने महिलाओं को गौन स्थान देकर पुरू कों उॅचा स्थान दिया, पुरू प्रधान समाज ने महिलाओं पर जुल्म, अत्याचार, ढायें यह सिलसिला लंबी समय तक चलता रहा. समय ने भी अंगडाई लिया और महिला आंदोलन का निर्णय हुआ, महिलाओं ने अन्याय , अत्याचार के विरोध में एक आवाज बुलंद किया. सामाजिक, आर्थिक,राजनैतिक तथा सांस्कृतिक बदलाव के हेतू महिला आंदोलन सक्रियतासे खडा हुआ महिला आंदोलन की भूमिका समाजपरिवर्तन की प्रक्रिया में अहम रही यह महिला आंदोलन तथागत बौध्द, महात्मा ज्योतिबा ले, सावित्रीबाई ले, राजा राममोहन रॉय, ताराबाई शिंदे, डॉ. आंबेडकर आदी परिवर्तनवादी विचारवंतोने महिलाओंको समाज में पूरू के बराबर हक्क और सम्मान मिलने के हेतू समय समय पर आंदोलन किया तथा महिलाओं के उनके अधिकार के प्रति सजग कराया है, इसलिए आज महिला समाज बौध्दीकता के क्षेत्र में पूरू के बराबर नजर आते है । पुरू प्रधान समाज में महिलाओं के जिस तरह से दबाया जाता था आज वो महिला है जो अपने अधिकार के प्रति लढना जानते है ।

सुचक शब्द ;key words महिला आंदोलन, समाजपरिवर्तन, अधिकार, बौध्दीकता, शिक्षा जगत

'शोध निबंध का

१) महिला आंदोलन का परिचय करना

२) महिआ आंदोलन की भूमिका का परिचय करना.

३) महिला आंदोलन का प्रभाव का स्वरूप स्पट करना,

प्रस्तावना

जब हम आंदोलन का इतिहास जानने की बात करते है तो हमे यह दिखाई देता है की, किसी ना किसी को समाजव्यवस्था मे दबाया जाता है. वर्तमान स्थिती से एक पक्ष असंतूष्ठ हो जाता है, अन्याय, अत्याचार तथा उनको उत्पीडन किया जाता है। जुल्म सहनेवाले कोई भी क्यू ना हो एक ना एक दिन परिस्थितीका सामना किया जाता है. सामाजिक आंदोलन के पिछे कोई ना कोई विचारधारा अवश्य होती है। आंदोलन का प्राथमिक स्वरूप असंगठित होता है और बाद में आंदोलन में सक्रियता बढ जाती है और एक संगठित रूप धारण यह आंदोलन कर लेता है । सामाजिक आंदोलन में एक प्रकारका सामूहिक व्यवहार होता है जो सामाजिक परिवर्तन के बारे में रूची पैदा करता है महिला आंदोलन उस सामाजिक आंदोलन मे से एक है जो अपने उपर होने वाले जुल्म और उत्पीडत का सामना करना चाहता है और जुल्म ढाहने वाली व्यवस्था से संघ करके स्वाभिमान कर जिंदगी बसर करना चाहती है।

पुरूष प्रधान समाजव्यवस्था में महिलाओं को जितना मान सन्मान देना चाहिए था उतना दिया नही गया, हिंदू समाजव्यवस्था में जातिव्यवस्था का बोलबाला रहा. इस में महिलाओ को दबाने का प्रयास रहा है। मनुस्मृती ने तो महिलाओं का वस्तू के रूप में देखा है लडकी यह पराया धन होता है, इस प्रकारकी बातें पुरू प्रधान समाजव्यवस्था में कि जाती है। इस महिला आंदोलन के जरिए महिलाओं को राकने वाली परिस्थितीसे संघर्श करके और उनको विकास की

प्रक्रियांमे सम्माहित करने के हेतू कुछ समाजसुधारक और प्रबोधनकार, कुछ राजनीतीक लोगोने अथक रूप से प्रयास करके पुरू के बराबर मान और सन्मान की जिंदगी बसर करने के हेतू समय समय पर आवाज निकालकर आंदोलन को सिध्दत के साथ खडा किया गया तथागत भगवान बौध्द, महात्मा ज्योतिबा ले, सावित्रीबाई ले, राजा राममोहन रॉय, ताराबाई शिंदे, महर्शिकेशव कर्वे,डॉ.आंबेडकर आदि विचारवंत एवं समाजसुधारक का महिला आंदोलन में परिवर्तन के हेतू योगदान दिखाई देता है।सामन्तवादी तथा पुंजीवादी व्यवस्था

इस सामन्तवादी तथा पुंजीवादी व्यवस्था मे महिलाओं के साथ बेहद अन्याय, अत्याचार किया गया. पुरूश प्रधान समाज में महिलाओं को दुयम स्थान दिया गया. कुशि आधारित इस समान्तवादी व्यवस्था मे महिलाओं को किसी भी प्रकारकी अनुमती नही दी. वह वस्तू की तरह समझी जाती थी. उनके देह और जिंदगी के पैसले उनके मालीक लेते है । इसलिए आज जो महिला आंदोलन हमे उचि मकाब में अन्याय अत्याचार से लढने के लिए खडा हुआ है उसके पिछे निश्चित तौर पर अन्याय अत्याचार का कारन रहा है।

वैदिक काल में महिलाओं की स्थिती

वैदिक काल में महिलाओं का जिवन इतना साधा एवं सरल नही था. इस काल में महिलाओं को समानता का दर्जा नही था. इस काल में महिलाओं को सामाजिक, आर्थिक, धार्मिक,राजनितीक और
सांस्कृतिक दृश्टीकोन से दबाया गया था।

स्त्री समाज की यातनायें दर्द, अत्याचार जिंदगी के विरोध में अंदर ही अंदर सुलग रही थी. इस विश्‍व में जब हमे आंदोलन का इतिहास देखते है तोकोई भी आंदोलन एक दिन मे खडा नही हुआ है समाज में जब लैंगिक भेद होने लगा महिलाओं को दुयम स्थान दिया गया, इसलिए महिलाओं ने एक आवाज बुलंद किया और सामाजिक,आर्थिक, राजनितीक, धार्मिक, तथा सांस्कृतिक बदलाव के हेतू अपना कदम उसी दिशा में बढाना उचित समजा, वैदिक काल यह महिलाओं की अवगती का काल रहा है।

महिला आंदोलन नें दो महत्वपूर्ण बांतो पर बल दिया है. समानता का अधिकार , भेद –विभेद का अधिकारवाद जी कार्य पुरू द्वारा होते है वही कार्य महिलाओं द्वारा होते है दृ पितृसत्ताक व्यवस्था नें महिलाओंकी रचनात्मक और सृजनात्मक प्रतिभा संकुचित कर दी है ।

महिला आंदोलन एवं परिवर्तन

समुहिक स्तर पर भारत में मध्यम व उससे कुछ अन्य श्रेणीयों की महिलाओं में हमे व्यापक रूप से परिवर्तन दिखाई देता है। समाजसुधारक और संतो के विचार से महिला आंदोलन महिलाओं के परिवर्तन के लिए हमेशा काम करते नजर आ रहा है श्शनैःशनै महिलाओं के परिवर्तन दिखाई दे रहा है। आधुनिक युग के नए व्यवसायों में महिलाओं का आगमन हुआ. डॉक्टर, प्राध्यापक, नर्स, विमान परिचारिका, डायव्हर आदि व्यवसायोंमे महिलाओं ने अपना कदम रखा. व्यवसाय में काम करने से उनके अनुभव क्षेत्र का विकास हुआ. ग्रामिण क्षेत्र मे आधुनिकता के सूचको के आधारपर महिलाओं को स्थिती पुरू की तूलना में निम्न एवं कमजोर है । इस आंदोलन की वजह से महिला अपने जिवन में बदलाव लाने का प्रयास कर रही है। मां, गृहिनी, अध्यापिका , संशोधक, वैज्ञानिक, राजनितीक आदि पदो पर आज महिला विराजमान हो गयी है , महिलाओं उन श्शक्तियां और परम्परागत भूमिका के उपर अपना परिपक्ष्य बदल दिया है। इस आंदोलन की वजह से समानता का अधिकार की लढाई लढने का अवसर मिल गया.

पुरूष द्वारा महिला आंदोलन

मनु ने महिलाओं को स्वतंत्रता नही प्रदान की थी। इस देश में कुछ ऐसे समाजसुधारक हुए कुछ ऐसे विचारवंत हुऐ जिन्होने महिला आंदोलन मे गतिशिलता प्रदान की, १९ श्शताब्दी में सुधार आंदोलन के प्रणेता राजा राम मोहन रॉय जिन्होंने महिलाओं को मान–सन्मान मिलने के लिए हमेशा ही कार्य किया है । पुनजगिरण आंदोलन में सर्वप्रथम पुरू ने महिला उत्थान के लिए आंदोलन चलाया. जिन जिन समस्याओं से महिलाये असंतूलित हो जाती थी उन समस्याओं के बारे में कुछ पुरू महिलाओं के हित में ही कार्य किया है। १४ शताब्दी से लेकर १७ वी सदी तक विभिन्न संतो और समाजनसुधारकोंने सामाजिक, धार्मिक, बुराईयो के निराकरण हेतू अनेक प्रयास

ISSN : 2278-9308
July 2021

किये.डॉ. बी. आंबेडकर, महात्मा ज्योतीबा पुले, गोविंद रानडे, सावित्रीबाई पुले,ताराबाई शिंदे, आदि परिवर्तनवादी विचारकोने महिला आंदोलन का स्वरूप व्यापक बनाकर समानता का हक्क दिलाने ने के पक्षधर रहे.

महिलाओं द्वारा आंदोलन

राटीय और अंन्तराश्टीय स्तर पर महिला आंदोलन महिला समस्यांओ को लेकर ही किये गये. ब्रिटिश शासन काल मे अनेक परिवर्तन हुए। इस शाशासन काल मे महिलाओ को एक चेतना और प्रेरणा मिली इसलिए ए.आर.देसाई कहते है सामाजिक अस्तित्व की स्थिती मे जो समाजसुधारक आंदोलन उदभूत हुए उनका एक लक्ष्य यह भी था की भारतीय नारी जिन सामाजिक और न्यायिक विमताओं एवं अनीतीयो की शिकार है, उन्हे दूर किये जाये महिला आंदोलन मे महिलाओं अनेक क्षेत्र मे सलता मिली. ब्रिटन मे १९७० मे समान वेतन एक्ट पारित किया गया। भारत मे महिलाओं द्वारा अनेक आंदोलन चलाये गये साथ साथ माहिलाओ के उत्थान के हेतू कई सामाजिक और आर्थिक एवं तथा श्शैक्षणिक संगठन की स्थापना कि गयी । महिला जागृती और महिला आंदोलनों ने विश्व की तमाम महिलाओं को एक विचार मंच पर लाकर समस्यांओ के बारे में सोचना सुरू करे दिया है. इस आंदोलन ने महिलाओं मे अनेक दृश्टिसे परिवर्तन लाने का प्रयास किया है दृ कुछ कुछ महिलाओंने वैचारिक क्रांती लाने के लिए कुछ रचनाओ को निर्मान किया अरूंधती रॉय, मेघा पाटकर, महाश्रवेतादेवी , ॲड. सिमा साखरे. डॉ. रूपा कुलकर्णी, ॲड.पारोमिता गोस्वामी, आदि महिलाओं के समस्योंके बारे में प्रयासरत हमेशा सहे है।

महिलाओं के लिए सविधान मे तरतूद/उपबंध

भारतीय संविधान मे महिलाओं अधिकार देकर समानता प्रदान कि गयी. डॉ.बी.आर. आंबेडकर तथा संविधान समिती ने महिलाओं के विकास हेतू जो कदम उठाया है वो सराहनीय है लेकिन सच यह भी है की महिलाओं का सन्मान की जिंदगीबसर करने वाले हिंदू कोड बिल नामंजूर कर दिया गया जो डॉ. आंबेडकर ने बनाया था.भारतीय संविधान के भाग ३ मे अनच्छेद १२से लेकर ३२ तक भारत के सभी महिला–पुरू को मौलिक अधिकार दिये गये है, अनच्छेद १४से १८ मध्ये समानता के अधिकारोकी चर्चा कि गयी है। अनच्छेद १४ के अंतर्गत प्रत्येक व्यक्ती को कानुन के तहत समान सरंक्षण प्रदान किया है ।

भारतीय संविधान के भाग–४में अनच्छेद ३६से लेकर ५१ तक नीती निर्देशक तत्वो के अंतर्गत महिलाओं के अधिकार , सरंक्षण, उत्थान, विकास आदि हेतू राज्य को महत्वपूर्ण अनुदेश दिए गए है। भारतीय संविधान और कुछ अनुच्छेद महिलाओं कही तरह से विकास के लिए तथा संरक्षणात्मक दृटीसे प्रोत्साहित करता है ।

निकर्श

सामाजिक परिवर्तन प्रक्रियां मे महिला आंदोलन की भूमिका इस विय को लेकर श्शोध निबंध जो लिखा है उससे यह प्रतित होता है की वर्तमान में महिलाओंको जो मान–सन्मान मिल रहा है, महिलाओं ने अनेक क्षेत्र में क्रियाशिलहुई है । बौदिक तथा वैचारिक, तांत्रिक क्रांती के लिए आज महिला अग्रेसर रहीहै उसमे महिला आंदोलन का प्रभाव रहा है । महिला आंदोलन कामयाबी के पिछे सभी परिवर्तनवादी महानायोंको के विचारोंका प्रभाव रहा है ।

संदर्भ

१) देसाई ए आर. भारतीय राटवाद की सामाजिक पृठभूमी पृठ २१९
२) शहा घनश्याम दृ भारतातील सामाजिक चळवळी टनूवाद– प्राची चिकटे डायमंड पब्लिकेशन्स पूणे
३) जाधव डी आर . डॉ. आंबेडकर के समाजशाहणीय विचार समता साहित्य सदन जयपूर
४) राव. एम.एस. ए . सोशल मुव्हमेंट इन इंडिया मनोहर पब्लिकेशन न्यू दिल्ली
५) डॉ. वैध . भारतीय संविधान और महिलाओं के अधिकार जर्नल
६) शाह घनश्याम . भारत मे सामाजिक आंदोलन
७) सिंधी नरेन्द्रकुमार . समाजशास्त्रीय सिध्दांत विवेचन व रावत पब्लिकेशन, जयपूर

# भारतीय आदिवासी समाजाच्या आर्थिक समस्या

प्रा. मनिषा नि. अवगान
manisha.awagan@gmail.com, 9158720560 ; 9307238051

**सारांश :—**

जगाच्या पाठीवर असा कोणताही समाज नाही की ज्याच्या कोणत्याच समस्या नाही. प्रत्येक मानवी समाजात अनेक समस्या असतात. प्रत्येक समाजात समस्या असल्या तरी त्या समस्यांचे स्वरूप आणि तीव्रता प्रत्येक समाजात वेगवेगळे दिसून येते. भारतात प्रगत समाजाच्या तुलनेत आदिवासी समाजाच्या समस्या वेगळया आहेत. कारण आदिवासी समाज हा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिकदृष्टया मागासलेला आहेत. आदिवासींची बोलीभाषा, निवासस्थान, प्रथा—परंपरा, संस्कृती ही पूर्णपणे वेगळी आहे. एकंदर आदिवासी समाजाची पार्श्वभूमी वेगळी आहे. म्हणून आदिवासी समाजाच्या समस्यांची कारणे आणि समस्यांचे स्वरूप वेगवेगळे आहेत. आदिवासी समाजाच्या समस्यांची सुरूवात ख—या अर्थाने ब्रिटिश शासनकाळात झाली. यापूर्वी आदिवासींच्या जीवनात समस्या नव्हत्या असे म्हणता येणार नाही. परंतु त्या समस्यांचे स्वरूप हे फारसे गंभीर नव्हते. ब्रिटिश राजवटीपूर्वी आदिवासी समाज पूर्णपणे स्वच्छंदी व स्वतंत्र जीवन जगत होता. त्यांना जंगलाचे राजे म्हटले जायचे. संपूर्ण जंगलावर आदिवासींचाच अधिकार होता. जंगलच त्यांचा निवारा आणि उपजीविकेचे साधन होते. आदिवासी समाजाची अर्थव्यवस्था आत्मनिर्भर होती. परंतु ब्रिटिश राजवटीत अनेक जंगलविषयक, जमीन विषयेक कायदे केल्याने जंगलाचे स्वामी असलेल्या आदिवासींना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. म्हणजेच इतर समाजाच्या संपर्कामूळे आदिवासींच्या सुखी—समाधानी जीवनात अनेक समस्या निमार्ण झाल्या त्यासोबतच आदिवासींच्या प्रथा—परंपरा, धर्म, दुर्गम निवासस्थान इत्यादी पारंपारिक जीवन पध्दती त्यांच्या जीवनात अनेक समस्यांची उगमस्थान आहे. भारतातील आदिवासी समाजाच्या समस्या साध्या व सरळ नाहीत. तर या समस्या विस्तृत आणि जठील आहे. भारतातील सर्वच आदिवासी समाजाच्या दारिद्रय, निरक्षरता, कर्जबाजारीपणा, आर्थिक शोषण, शेती संबंधी समस्या अशा अनेक आर्थिक समस्या आहे. आदिवासींची आर्थिक समस्या ही मुलभूत व महत्त्वपूर्ण अशी समस्या आहेत. आर्थिक समस्यांमूळे आदिवासींचे संपूर्ण जीवनच खालावलेले आहे. आदिवासींच्या आर्थिक समस्यांचा विचार केला तर

त्यांची सामाजिक, आर्थिक स्थिती पूर्णपणे दयनीय झाल्याची दिसते. टिचभर पोटाची खळगी भरण्यासाठी आदिवासींना आपले संपूर्ण जीवनच खर्ची पाडावे लागते.

**बीज शब्द :—**

आदिवासी, आर्थिक, समाज, भारतीय, समस्या, जंगल.

**प्रस्तावना :—**

जगाच्या पाठीवर असा कोणताही समाज नाही की ज्या समाजाला कोणत्याच समस्या नाही. मानवी समाजात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय इत्यादी अनेक प्रकारच्या समस्या असतात. प्रत्येक समाजात या समस्या दिसत असल्या तरी प्रत्येक समाजातील समस्यांचे स्वरूप आणि त्या समस्यांची तीव्रता यामध्ये फरक दिसून येतो. भारतात प्रगत समाजाच्या तुलनेत आदिवासी समाजाच्या समस्या या वेगळया आणि जटिल स्वरूपाच्या आहे. कारण आदिवासी समाज हा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिकदृष्टया मागासलेला समाज आहे. भारतातील आदिवासींच्या समस्या या साध्या आणि सरळ नाहीत. ख—या अर्थाने यांच्या समस्या विस्तृत व गुंतागुतीच्या आहेत. भारतातील आदिवासींच्या समस्यांची अनेक उगमस्थाने आहेत. त्यापैकी आदिवासींच्या प्रथा—परंपरा, राहणीमान, धर्म, आचारविचार इत्यादी पारंपारिक जीवनपध्दतीतून समस्या निर्माण झाल्या आहेत. तर इतर संस्कृतीच्या संपर्काने आदिवासींच्या जीवनात अनेक नवीन समस्यांची भर पडली आहे. एकाच भौगोलिक प्रदेशात राहणा—या आदिवासी जमातींच्या समस्या हया वेगवेगळया असतात. आदिवासी समाजातील समस्यांचे स्वरूप हे भिन्न असले तरी काही समस्या या सर्वच आदिवासी समाजात सारख्या आहेत. भारतातील सर्वच आदिवासी समाजाच्या

दारिद्रय, निरक्षरता, कर्जबाजारीपणा, आर्थिक शोषण, शेतीविषयक समस्या अशा अनेक आर्थिक समस्या आहे. आदिवासींची आर्थिक समस्या ही मुलभूत व महत्त्वपूर्ण अशी समस्या आहे. आर्थिक समस्येमूळे आदिवासींचे जीवन विस्कळित झाले आहे . त्यामूळे किमान आवश्यक जीवनमान जगण्यापासून आदिवासी समाज वंचित आहे.

**संशोधनाची उद्‌दिष्टे :—**

१) ब्रिटिश राजवटीपूर्वीचे आदिवासींचे आर्थिक जीवन समजून घेणे.
२) आदिवासींच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेणे.
३) आदिवासी जीवनात निर्माण झालेल्या आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके :—**

१) ब्रिटिश राजवटीपूर्वी आदिवासींचे आर्थिक जीवनात स्वतंत्र, आत्मनिर्भर असल्याचे दिसत आहे
२) आदिवासींचे आर्थिक शोषण झाल्यामूळे त्यांची आर्थिक परिस्थिती दयनीय झालेली आहे.
३)आदिवासी जीवनात निर्माण झालेल्या आर्थिक समस्यांमूळे आदिवासींचे आर्थिक जीवन असहय झाले आहे.

**संशोधन पध्दती :—**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला असून तथ्य संकलनासाठी पुस्तके, संदर्भग्रंथ इत्यादी दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केलेला आहे.

**आदिवासींची ओळख :—**

भारतीय लोकसंख्येत ८ .६%लोकसंख्या असणारा आदिवासी समाज हा अखंड समाज नसून तो अनेक जमातींमध्ये विभाजित झालेला आहे. त्यांचे निवासस्थान, बोलीभाषा, प्रथा—परंपरा, संस्कृती, जीवन जगण्याच्या पध्दती वेगवेगळया आहेत. अलीकडच्या काळात 'आदिवासी' हा शब्द विशिष्ट भाषा बोलणा—या, विशिष्ट जीवन पध्दतीने अनेक वर्षे जंगल—पहाडात जीवन जगत असताना आपली धार्मिक व सांस्कृतिक मूल्ये जोपासणा—या मानव समूहाची ओळख करून देण्यासाठी वापरला जातो. आदिवासींना वन्य जमाती, गिरिजन, वनपुत्र, धरतीची लेकरे अशा अनेक नावांनी ओळखले जाते . डॉ . घुर्ये यांनी त्यांना 'तथाकथित मूळचे रहिवासी' व हिंदू म्हटले आहे . भारतीय राज्यघटनेत त्यांना 'अनुसूचित जमात' असे म्हटले आहे . आधुनिक कोणत्याही प्रगत समाजाच्या तुलनेत आदिवासी जमात निर्धन, निरक्षर असतील, त्यांचे राहणे मागासलेले व रानटी असेल, पण ते असंस्कृत नाहीत . त्यांनी स्वत:ची अर्थपूर्ण संस्कृती, बोलीभाषा, धर्मविधी इत्यादी आहेत.

**व्याख्या :—**

**१) गिलीन आणि गिलीन :—**

" एका विशिष्ट भुप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा, पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटाच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतात. "

**भारतीय आदिवासी समाजाच्या आर्थिक समस्या**

**१) दारिद्रय :—**

भारतातील बहुसंख्य आदिवासी जमाती दारिद्रय रेषेखाली जीवन जगत आहेत . याचे कारणे अनेक आहेत त्यापैकी एक म्हणजे शेती हाच व्यवसाय करणा—या आदिवासींची शेतजमीन प्रामुख्याने जंगले व पर्वतीय क्षेत्रातील आहे . ती जमीन फारशी सुपीक नसते. शिवाय त्यांची शेती ही संपूर्णत: निसर्गावर अवलंबून आहे म्हणून आदिवासींना शेतीतून मिळणारे उत्पन्न अत्यल्प आहे . काही आदिवासी कंदमुळे गोळा करणे, मध गोळा करणे, तेंदूपत्ता तोडणे, शिकार करणे इत्यादी प्रकारचे प्राथमिक व्यवसाय करतात . या व्यवसायात वापरण्यात येणारे तंत्रज्ञान प्राथमिक स्वरुपाचे असते . या व्यवसायात शारीरिक उदरनिर्वाह देखील होत नाही . स्थानांतरित शेतीतील अपूरे उत्पन्न, व्यवसायात तंत्रज्ञानाचा अभाव, खादय संकलनाचा अपूरेपणा, जंगलविषयक कायदे, वेठबिगारी, इत्यादींमूळे आदिवासी दारिद्रयाच्या खाईत लोटले गेले आहे.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

**२) निरक्षरता :—**

साक्षरता दर हा सामाजिक—आर्थिक विकासाची गुरुकिल्ली आहे. असे म्हटले जाते. आदिवासी समाजात शिक्षणाचे प्रमाण कमी असण्याचे आणि निरक्षरतेचे प्रमाण जास्त असण्याचे अनेक कारणे आहेत. दुर्गम भागात राहणा—या आदिवासींच्या मुलांसाठी प्राथमिक शाळांचे प्रमाण कमी आहे. गावापासूंन लांब अंतरावर असणा—या शाळामध्ये मुलांना पाठविणे दारीद्रयजन्य स्थितीत जीवन जगणा—या आदिवासींना शक्य होत नाही. कुटुंबाच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी लहान मुलांना शिक्षण देण्याऐवजी आर्थिक क्रियेत सहभागी करून घेतले जाते. आजच्या स्पर्धात्मक युगात चाललेल्या जीवनसंघर्षात टिकून राहण्यासाठी औपचारिक शिक्षणाची गरज आहे. असे आदिवासींना अजूनही वाटत नाही. शिक्षणाअभावी आदिवासी लोकांचे मोठया प्रमाणात अज्ञान वाढतच आहे. त्याचाच फायदा घेवून सावकार, जमीनदार यांनी अज्ञानी आदिवासींचे मोठया प्रमाणात शोषण करताना दिसत आहे.

**३) मुद्रा प्रधान अर्थव्यवस्था व कर्जबाजारीपणा :—**

आदिवासींच्या कर्जबाजारीपणाची सूरुवात भारतात मुद्रा विनिमयापासून झाली. मुद्रेच्या माध्यमातून विनिमयाचे सर्व व्यवहार सूरु झाल्यानंतर आदिवासींना प्रत्येक गोष्टींसाठी पैशाची गरज भासू लागली. यापूर्वी आदिवासी समाजात वस्तू विनिमय पध्दती होती, परंतू पैशाच्या अर्थशास्त्राने त्यांच्या बंदिस्त, पण स्वतंत्र जीवनावर सरळ आक्रमणच सुरु झाले. अत्यंत अज्ञानी, डोंगरकपा—यात जगापासून दूर राहणा—या आदिवासींच्या अज्ञानाचा व भोळेपणाचा पुरेपुर फायदा व्यापारी, महाजन, सावकार यांनी करून घेतला आणि आदिवासींचे आर्थिक शोषणच चालू केले. आदिवासींकडून जंगलातील वस्तू घेऊन त्यांची फारच कमी किंमत दिली जाते. वस्तूंची किंमत मुद्रेत लावल्याने त्याचा हिशोबही आदिवासींना समजत नाही. आदिवासींच्या सततच्या आर्थिक शोषणामूळे, त्यांचे खरे उत्पन्न कमी झाल्यामूळे त्यांना त्यांच्या आवश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी कर्ज काढणे भाग पडते. ठेकेदार किंवा सावकार आदिवासींना थोडी कर्जाऊ रक्कम देऊन त्यावर भरमसाठ व्याज लावतात. त्यामूळे अनेक आदिवासी कर्जबाजारी झाले आहेत. या कर्जाची परतफेड म्हणून त्यांच्या शेतजमिनी सावकारांनी बळकावल्या आहेत.

**४) वेठबिगारीची पध्दती :—**

आदिवासींच्ये आर्थिक शोषण करणारा वेठबिगारिचा हा प्रकार अजूनही अस्तित्वात आहे. व्यापारी, ठेकेदार, प्रशासकीय अधिकारी आदिवासी लोकांना वेठबिगारीस धरून त्यांच्याकडून आपली कामे करून घेतात. त्यांना त्यांच्या कामाचा मोबदला मात्र अत्यल्प प्रमाणात दिला जातो. अशा अत्यल्प वेतनाने आदिवासींच्या किमान गरजा ही भागत नाही. तरीदेखील वेठबिगार असलेला आदिवासी हा कळसुत्री बाहुलीप्रमाणे मालकांची कामे बिनतक्रार करित असतो. असे न केल्यास मालकांकडून कुरतापूर्वक वागणूक दिली जाते. जमीनदार, सावकार आदिवासींकडून आपल्या जमिनीची मशागत करून घेतात, कपडे धुणे, भांडी घासणे, जंगलातील लाकडे गोळा करून ते फोडणे देणे इत्यादी सर्व घरची कामे जबरदस्तीने करून घेतात. आणि त्याबदल्यात अत्यल्प मोबदला दिला जातो. अनेकदा तर कुटुंबातील सर्वच लोक एखादया सावकार, जमीनदार यांच्याकडे जन्मभर काम करतात. आज कायदयाने वेठबिगारीच्या पध्दतीला आळा घातला असला तरी ही पध्दत बंद झाली असे म्हणता येत नाही. आता वेठबिगारीने आदिवासींचे शोषण करणा—या सावकार, जमीनदार यांची जागा जंगल कर्मचा—यांनी घेतली आहे. वेठबिगारी पध्दतीचा आदिवासींच्या आर्थिक जीवनावर फार अनिष्ट परिणाम होत आहे.

**५) स्थानांतरित शेतीची समस्या :—**

आदिवासी समाजातील आर्थिक प्रश्नांमध्ये स्थानांतरित शेतीचा प्रश्न प्रामुख्याने दिसून येतो. आदिवासी लोक स्थानांतरित शेती करतात. एकाच जागी दोन—तीन वर्षे शेती केल्यानंतर

जमिनीची सुपीकता कमी होते. असा आदिवासी लोकांचा विश्वास आहे. म्हणून ते शेतीचे वेळोवेळी स्थान बदलवित असतात. जंगलातील लाकडे जाळून निर्माण झालेल्या राखेचा ढीग शेतजमिनीवर पसरवून व त्यात बियाणे टाकून शेती करण्याची ही पध्दती अतिशय मागासलेली आहे. स्थानांतरित शेतीपध्दतीमुळे वर्षभर पुरेल एवढेही उत्पन्न त्यांना मिळत नाही. जंगलावरील सरकारच्या मालकी हक्कामुळे स्थानांतरित शेती करणे दिवसेंदिवस कठीण होत आहे. एकीकडे

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

जमीन नांगरायची नाही ही धार्मिक श्रध्दा व दुसरीकडे जंगल जमिनीचा वापर करण्यावर शासनाने घातलेले निर्बंध यामूळे आदिवासींची अवस्था खूपच बिकट झाली आहे.

**६) जमीनमालकी व जंगलसंबंधी समस्या :—**

ब्रिटिशांचे शासन सुरू होण्यापूर्वी आदिवासी जंगलाचे स्वामी होते. संपूर्ण जंगलावर त्यांचा अधिकार होता. जंगलच त्यांचे घर व उपजीविकेचे साधन होते. ते तिथे स्वच्छंदी व स्वतंत्र जीवन जगत होते. जंगलातून त्यांना कंदमुळे, फळे, पाने, मध इत्यादी उत्पादन मिळत होते. जंगल उत्पादन आदिवासींच्या अत्यल्प मिळकतीला पूरकच होते. शतकानुशतके ते जंगलात वास्तव्य करित असल्याने जंगल आपलेच आहे, अशी त्यांची धारणा होती. परंतु ब्रिटिशांनी जंगलविषयक कायदे तयार करून आदिवासींच्या जंगलाविषयक अधिकारांवर अनेक बंधने घातली. स्वातंत्र्यानंतरही राष्ट्रीय वन धोरण जाहीर झाल्यावर आदिवासींच्या जंगलविषयक अनेक सवलती काढून घेतल्या गेल्या त्यामूळे जंगलातील नैसर्गिक वस्तूंचा उपभोग घेण्यास अनेक निर्बंध निर्माण झाले आहेत. यामूळे आदिवासींचे आर्थिक स्वातंत्र्य संपुष्टात आले. त्याचप्रमाणे आदिवासींना स्थिर शेती करावी म्हणून काही आदिवासी लोकांना शासनाने शेतजमिनी दिल्या. मालकी हक्काने दिल्या. परंतु आदिवासींना प्राप्त झालेल्या बहुतांश शेमजमिनी निकृष्ट दर्जाच्या असल्यामूळे त्या जमिनीतून मिळणारे उत्पन्न हे तुंटपुंजे आहे. याशिवाय शेती करण्यासाठी आदिवासी सावकारांकडून कर्जे घेतात आणि कर्जाची परतफेड न झाल्यामूळे ब—याच आदिवासींच्या शेतजमिनी सावकारांनी ताब्यात घेतल्या. अशाप्रकारे जंगलविषयक निर्बंध आणि शेतजमिनीवरील मालकी हक्क गमावल्यामूळे आदिवासींची आर्थिक स्थिती खालावतच गेली.

**७) जंगल कामगारांच्या शोषणाची समस्या :—**

जंगलातील झाडे, बांबू तोडणे तसेच तेंदूपत्ता संकलन करणे इत्यादी कामे जंगल खाते कंत्राटी पध्दतीने करून घेतात. ही सर्व कामे करून घेण्यासाठी कंत्राटदार आदिवासींना मजूर म्हणून कामाला लावतात आणि स्वत:च्या नफ्यासाठी आदिवासींन कडून जबरदस्तीने व

भरमसाठ कामे करवून घेतात. पण त्या कामाची अल्प मजुरी त्यांना देतात. आदिवासी अज्ञानी व निरक्षर असल्यामुळे जंगल तोड, बांबू व तेंदूपत्ता संकलन, गाडी वाहतुक व कोळसा वाहतुक यांचा कुठलाही हिशोब त्यांना ठेवता येत नाही. केलेल्या कामाचा कुठलाही लिखित पुरावा नाही, म्हणून हे कंत्राटदार आदिवासींच्या अज्ञानाचा, भोळेपणाचा फायदा घेऊन त्यांची आर्थिक पिळवणूक करित असतात.

**८) औदयोगिक क्षेत्रातील आदिवासींच्या समस्या :—**

भारतात औदयोगिकीकरणची सुरूवात ब्रिटिश शासनकाळातच झाली. पर्वतीय आणि वनक्षेत्रामध्ये विविध खनिज द्रव्यांचा शोध घेऊन खाणी उद्योग उभारण्याची सुरूवात ब्रिटिशांच्या राजवटीतच झाली. जंगले नष्ठ करून त्या ठिकाणी खनिज द्रव्यांच्या खाणीचा उद्योग सुरू झाल्यामूळे आदिवासींना खाण मजूर म्हणून काम करणे भाग पडले आदिवासींना रोजगार तर प्राप्त झाला, नियमित हाताला काम मिळाले , परंतु ठेकेदार त्यांच्याकडून भरपूर काम करवून घेतात. परंतू फारच अल्प मोबदला त्यांना त्यांच्या कामाचा मिळतो. त्यांना पशू प्रेमाणेच वागणूक दिली जाते. औद्योगिक क्षेत्रात काम करणा—या आदिवासींचे ठेकेदाराकडून एक प्रकारचे शोषण होत असल्यामूळे आदिवासींची अवस्था दयनीय झाली आहे.

**९) आर्थिक शोषणाची समस्या :—**

ब्रिटिश शासनाकाळात आदिवासींच्या आर्थिक शोषणाची प्रक्रिया अधिक गतिमान झाली. आदिवासी लोकांचे आर्थिक शोषण करणारा जमिनदार, सावकार, जंगलाचे ठेकेदार, व्यापारी, सरकारी अधिकारी यासारख्या लोकाचा एक वर्गच त्यांच्या क्षेत्रात दिसून येतो. या वर्गातील सावकार हे आदिवासींना कर्ज देऊन दाम दुप्पट करून घेतात. आदिवासी लोकांकडे उत्पादनाची साधने अपुरी असल्यामूळे ते कर्जाची परत फेड करू शकत नाही. यातूनच 'कर्जातून कर्ज' असे दृष्टचक्र सतत चाललेले असते. म्हणूनच 'आदिवासी कर्जात जन्मतो, कर्जात जगतो व कर्जातच मरतो' असे म्हटले जाते. ठेकेदार हे आदिवासी कामगारांना वेठबिगारीस धरून शोषण करतात. व्यापारी तेंदूपत्ते, चारोळी, मध, डिंक इत्यादी वस्तू मिठाच्या, रॉकेलच्या मोबदल्यात घेऊन भरमसाठ नफा कमवितात. जंगल अधिकारी व कर्मचारी शासकीय नियम दाखवून किंवा जबरदस्तीने त्यांचे हक्क हिरावून

घेतात. एकंदरीत सर्व क्षेत्रातील परकीय लोक वन्यजातीय क्षेत्रात आर्थिक शोषण प्रकियेत सहभागी झाल्याचे दिसून येते.

**१०) जमिनीबाबतच्या परात्मतेची समस्या :—**

जमिनीबाबतची परात्मता ही मंद गतीने आणि अनेक शतकांपासून सुरू असणारी प्रकिया आहे .जमिनीबाबतची परात्मता ही आदिवासी समाजाची एक प्रमुख समस्या आहे. काम केल्या नंतर त्यामधून मिळणा—या आंनद व समाधानाला मुकणे म्हणजे परात्मता होय. ब्रिटिश राजवटीपूर्वी आदिवासी जंगलाचे राजे होते. जंगल क्षेत्रावर आणि जंगलामधील संपत्तीवर शतकानुशतकांपासून मालकी हक्क होते. एकेकाळी आदिवासींनी जंगली संपत्ती खूप उपभोगली, परंतु जंगलविषयक कायदयाने आदिवासींना जंगलातील वस्तूंचा उपभोग घेण्यास निर्बंध आले. एकेकाळी जंगलांचे स्वामी असणारे आदिवासी आता मात्र जंगलक्षेत्रावर व जंगल संपत्तीवर त्यांचा कुठलाही हक्क नाही. त्याचबरोबर वनक्षेत्राच्या सीमाप्रदेशात असणारी शेतजमीन ही आदिवासींनी प्रदीर्घ काळ कष्ट करून, जमिनीची मशागत करून पिके घेण्यायोग्य केली होती. त्या शेतजमिनेचे मालकीहक्क आदिवासींनी कष्टाने मिळवीले होते. एका अर्थाने जमीन ही आदिवासींची स्वकष्टार्जित मालमत्ता होती .त्यावेळी आदिवासी स्वतंत्र व आत्मनिर्भर जीवन जगत होते .परंतू ब्रिटिश शासनाने जंगलविषयक, जमिनीविषयक कायदे करून आदिवासींचे पारंपारिक हक्कच हिरावून घेतले. त्यातच जमीनदार,सावकार यांनी ही शोषण करून आदिवासींच्या जमिनी हस्तगत केल्या .एकेकाळी जंगलांचे, शेतजमिनेचे स्वामित्वहक्क असणा—या आदिवासींना जमीनदार, सावकार यांच्या शेतजमिनीत शेतमजूर म्हणून काम करावे लागते. अशाप्रकारे पूर्णपणे आदिवासींचे शोषण करून त्यांना जंगलापासून, त्यांच्या जमिनीपासून परात्म केल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :—**

अशाप्रकारे आदिवासी लोकांना अनेक सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक अशा अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. त्यापैकी सर्वात महत्वाची आणि मुलभूत समजली जाणारी समस्या म्हणून आर्थिक समस्येकडे बघितले जाते कारण दारिद्रय कर्जबाजारीपणा, आर्थिक शोषण अशा अनेक आर्थिक समस्यांमुळे आदिवासींची अवस्था फारच छिन्नविछिन्न झाली आहे. दारिद्रय कर्जबाजारीपणा यामध्ये आदिवासींचे संपूर्ण आयूष्यच बळी पडलेले आहे .आदिवासींना भेडसावणा—या अनेक समस्या तेवढ्याच त्रासदायक आहे. परंतु आर्थिक समस्येने आदिवासींचे आयुष्य पूर्णपणे खालावलेले आहे . आदिवासींच्या आर्थिक समस्या बघितल्यानंतर त्यावर उपाययोजना करणे ही खरच काळाची गरज वाटते.

**संदर्भग्रंथ:—**

१) आगलावे पी. (२०१०). आदिवासी समाजाचे समाजशास्त्र. नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन.
२) क—हाडे, बी .एम .(२०१४) .आदिम जमातीचे समाजशास्त्र .नागपूर : पिंपळापूरे अॅन्ड कं .पब्लिशर्स
३) लोटे, रा.ज.(२०१०).आदिवासी समाजाचे समाजशास्त्र. नागपूर : पिंपळापूरे अॅन्ड कं. पब्लिशर्स .

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# आदिवासी स्त्रियांच्या जीवनावर सामाजिक परिवर्तनाचा प्रभाव

डॉ.मंगला अ.कडवे
मा.अं.मुदाफळे समाजकार्य महाविद्यालय,नरखेड,ता.नरखेड
Email : mangalakadve37@gmail.com

आदिवासी स्त्री ही शहरी अथवा ग्रामिण स्त्रियापेक्षा भिन्न असते.तसेच निडर असते. रानावनातून मुक्तपणे संचार करित असते.परंतु आज तशी परिस्थिती राहीलेली नाही.आज कितीतरी आदिवासी स्त्रिया आणि मुलींना व्यवसायाच्या शोधात आपल्या गावाकडुन शहराकडे स्थलांतर करावे लागत आहे.याला कारण म्हणजे जंगलाचा नाश आणि शहरी जीवनाचा प्रभाव यामुळे जंगलात,दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या आदिवासी स्त्रियांचे जीवन विस्कळीत झाले आहे. झाडे,फुले,फळे,कंदमुळे नाहीत तसेच शिकारीवर आलेली बंधणे,औषधी वनस्पतीची कमी झालेली मागणी या परिस्थितीमुळे आदिवासी स्त्रियासुध्दा पुरूषाबरोबर शहराकडे धाव घेत आहे.शहरातील वातावरण आणि शहरातील जीवनपध्दती त्यांच्याकरिता नवीन आहे.त्यांना या बदलत्या परिस्थितीशी व वातावरणाशी समायोजन साधणे कठीन जाते.आदिवासी समाजाचा जेव्हा विचार केला जातो तेव्हा आदिवासी समाजात दु:ख,वेदना तसेच समस्यांचे स्वरूप काही इतर समाजापेक्षा वेगळे नाही. त्यामुळे या समस्यांची झळ आदिवासी स्त्रियांनासुध्दा प्रभावित करते.त्याचा तर आपण विचारच करत नाही.आजही आदिवासी स्त्रियांना विविध समस्यांचा सामना करावा लागतो. कुपोषण,अंधश्रध्दा,आरोग्य समस्या,व्यसनाच्या समस्या अशा कितीतरी समस्यांचा आदिवासी स्त्रियांना सतत सामना करावा लागतो.

**प्रस्तावना :**

जगाच्या पाठीवर आदिवासी समाज सर्वत्र विखुरलेला आहे.सर्व आदिवासी जमातीचा अभ्यास एकाचवेळी करणे अत्यंत कठीण कार्य आहे.आदिवासी जमातीचे क्षेत्र व्यापक असले तरी त्यांचे दु:ख व वेदना,तसेच समस्यांचे स्वरूप जवळजवळ सारखेच आहे.आदिवासींचे संघटन सक्षम नसल्यामुळे त्यांना आपला विकास साधता आला नाही.संस्कृती बदलाला फारसे महत्व आदिवासींनी न दिल्यामुळे त्यांच्यात विशेष सामाजिक परिवर्तन देखिल घडुन आले नाही.हीच परिस्थिती स्त्रियांच्या बाबतीत सुध्दा दिसुन येते.भारतात तर हे चित्र अधिक विदारक आहे.जागतिक पातळीवर आदिवासींना एक विचार प्रणालीची प्रक्रिया सुरूझाली असली तरी तिला अजुन बाळसे आलेले नाही.ही ऐक्याची प्रक्रिया जागतिक पातळीवर सरूझाली असली तरी तिला काही बंधने आहेत.तेव्हा प्रत्येक देशातील आदिवासींना एक होवून जगात आदर्श घालून संपुर्ण जगातील आदिवासींनी एकत्रित येणे गरजेचे आहे.

आदिवासी संस्कृतीत स्त्रियांचा सन्मान व तिचा आदर या गोष्टींना फार महत्व आहे.त्यामुळे आदिवासी स्त्रियांचा दर्जा इतर स्त्रियांच्या तुलनेत समाधानकारक आहे.आदिवासी कुटुंबात स्त्रियांना समानतेचा अधिकार बहाल केला जातो.त्यामुळे त्यांना स्वतंत्र व स्वछंदी जीवन जगता येते.अशी संस्कृती त्यांच्यामध्ये विकसित केलेली आहे.त्यामुळे स्त्रियांना दुय्यम घटक असल्याची भावना त्यांच्यात वाढीस लागत नाही.म्हणूनच आदिवासी स्त्रिया व मुली निडर व साहसी दिसून येतात. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास,निर्णयक्षमता,परस्परांविषयी प्रेम व सहानुभूती,समता,बंधुता व एकात्मकता इत्यादी गुण प्रकर्षाने जाणवतात.परंतु शैक्षणिक दृष्टया विचार केल्यास शैक्षणिक क्षेत्रात आदिवासी स्त्रियांचा दर्जा खालावलेला आहे.त्यामुळे त्यांना अनेक संकटाचा सामना करावा लागतो.उदा. बालविवाह,अनारोग्य,माता मृत्युदर,कुपोषण,आर्थिक फसवणूक व लैंगिक शोषन या समस्यांचा त्यांना सामना करावा लागतो.

**आदिवासी शब्दाचा अर्थ :**

'एका विशिष्ट भूप्रदेशात राहणारा,समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिकजीवन जगणाऱ्या स्थानिय गटांच्या समुहाला आदिवासी समाज म्हणतात.

आदिवासी आज देखिल आपले परंपरागत व्यवसायाची कास धरून आहे.यात रूद्राक्ष माळा विकणे,डिंक,मध,खारिक,खोबरे,शहद विकणे,चटई विणणे,बांबूकाम,कुक्कुटपालन,मत्स्यव्यवसाय,शेळया मेंढया पालन,आयुर्वेदिक वनस्पती,वनभाज्या इत्यादी विकुन अर्थाजन करणारा समाज असून ते गावोगावी जावून यांची विक्री करतात.

भारतात जवळपास सर्वच राज्यात आदिवासी लोक वास्तव्य करीत आहेत.आदिवासी 'जमात' किंवा जमाती. या सुरवातीपासूनच दऱ्याखोऱ्यात किंवा जंगलात निवास करणारे लोक म्हणजे आदिवासी होय.त्यामुळेच त्यांना जंगलात किंवा डोंगराळ भागात राहणाऱ्या लोकांना 'आदिवासी'असे संबोधले जाते.भारतीय संविधानातील कलम ३४२(१)नुसार ज्यांचा समावेश 'अनुसुचित जमातीच्या यादित केला आहे.त्यांना 'अनुसुचित जमाती' असे म्हणतात.

**आदिवासी स्त्रियांच्या जीवनावर सामाजिक परिवर्तनाचा प्रभाव :**

आदिवासी ही समुहाने राहणारी जमात आहे.या समाजीतील कुटुंबव्यवस्था अत्यंत सुदृढ व निरोगी असी दिसून येते.गोंड,प्रधानगोंड या जमातीत मातृसत्ताक कुटुंबपध्दती असल्या कारणाने या स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीचा दर्जा दिला जात असुन त्यांना निर्णय स्वातंत्र्य देखिल असते. सामान्यत: संयुक्त कुटुंबपध्दती असल्यामुळे कुटुंबाच्या या जमातीत आधुनिक विचारसरणीचा प्रभाव दिसुन येतो.उदा.संयुक्त कुटुंबातील मुलाचे लग्न झाल्यास त्याला आपल्याच समुहाजवळ स्वतंत्र झोपडीबांधुन दिली जाते.एखाद्या स्त्रिला मुल न झाल्यास पतीच्या संमतीने आपल्याच समुहातील दुसऱ्या पुरूषाकडुन संतती करता येते किंवा पती दुसऱ्या स्त्रीपासून संतती मिळवू शकतो.येथे संतती उत्पत्ती पुरतेच दुसऱ्या स्त्री अगर पुरूषाशी लैंगिक संबध ठेवले जातात.यामुळे कुटुंबातील स्त्री सुरक्षित राहून कुटुंबव्यवस्था सुदृढ राहते.तसेच त्याच घरातील परूषाशी किंवा मर्जीप्रमाणे पुनर्विवाह करण्याचे स्वातंत्र सुध्दा या समाजात दिसुन येते.यावरून असे दिसुन येते की आदिवासी समाजात स्त्रियांना सन्मानाचे स्थान असुन त्यांना बरोबरीचा दर्जा सुध्दा दिला जातो.

आदिवासी समाजात स्त्रियांचे प्रमाण साधारणपने ५० टक्के आहे.२०११ च्या जनगननेनुसार महाराष्ट्र राज्याच्या एकुण लोकसंखेच्या ८.८७ टक्के एवढी म्हणजे १ कोटी ५ लाख एवढी आहे. देशाच्या आदिवासींच्या ५० टक्के आदिवासी हे महाराष्ट्रात आहेत.आदिवसी लोकसंखेच्या बाबतीत पुर्वेकडील राज्ये सोडल्यास महाराष्ट्र हे मध्यप्रदेश पाठोपाठ दुसऱ्या नंबरचे राज्य आहे.संपूर्ण जगातील आदिवासी समाजाची लोकसंख्या २७ टक्के आहे.तर भारतात ही संख्या ७ टक्के आहे. एकटया महाराष्ट्रात २३ लक्ष आदिवासी आहेत.भारतीय जनगनना २००१ नुसार आदिवासी समाजात १००० पुरूषामागे ९३७ आदिवासी महिला होत्या.जे प्रमाण सर्वसाधारण महिलांपेक्षा जास्त आहे.कारण महाराष्ट्र राज्यात एकुण लोकसंखेत १००० पुरूषामागे ९२२ स्त्रिया होत्या.

२०११ च्या जनगणनेनुसार आदिवासींचा सामान्य साक्षरता दर ५९ टक्के स्त्रियांचा दर ४० टक्के आहे.शासन अहवालानुसार २०११ पर्यंत यात २८ टक्के वाढझाली.तरिही ग्रामिण भागातील एकुण ६० टक्के स्त्रियांच्या लोकसंखेला अजुनही शिक्षणाचा गंध नाही हेही तितकेच खरे आहे. महाराष्ट्र राज्यापुरताच विचार करावयाचा झाल्यास ग्रामिण आदिवासी भागातील शिक्षणाचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन व स्वंयसेवी संस्थाव्दारा प्रयत्न सुरू आहेत.तरिही मुलिंचे शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.कारण आईवडिल शेतात जातात.घरकाम,लहान भावंडाचा सांभाळ अशा कारणामुळे मुलींना शाळेत टाकले जात नाही किंवा पाठविले जात नाही.तसेच पोषणयुक्त आहाराचा अभाव यामुळे कुपोषण, त्याचप्रमाणे लैंगिक शोषन हे सुध्दा शाळा सोडण्यासाठी कारणीभूत आहे.

आदिवासी स्त्री ही शहरी अथवा ग्रामिण स्त्रियापेक्षा भिन्न असते.तसेच निडर असते. रानावनातून मुक्तपणे संचार करित असते.परंतु आज तशी परिस्थिती राहीलेली नाही.आज कितीतरी आदिवासी स्त्रिया आणि मुलींना व्यवसायाच्या शोधात आपल्या गावाकडुन शहराकडे स्थलांतर करावे लागत आहे.याला कारण म्हणजे जंगलाचा नाश आणि शहरी जीवनाचा प्रभाव यामुळे जंगलात,दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या आदिवासी स्त्रियांचे जीवन विस्कळीत झाले आहे. झाडे,फुले,फळे,कंदमुळे नाहीत तसेच शिकारीवर आलेली बंधणे,औषधी वनस्पतीची कमी झालेली मागणी या परिस्थितीमुळे आदिवासी स्त्रियासुध्दा पुरूषाबरोबर शहराकडे धाव घेत आहे.शहरातील वातावरण आणि शहरातील जीवनपध्दती त्यांच्याकरिता नवीन आहे.त्यांना या बदलत्या परिस्थितीशी व वातावरणाशी समायोजन साधणे कठीन जाते.याव्यतिरिक्त त्यांना आर्थिक फसवणूक आणि

लैंगिक शोषन या समस्यांचा सुध्दा सामना करावा लागत आहे.प्रवासी आदिवासी स्त्रियांची एक मोठी संख्या २४ ते ४७ वर्षे वयोगटातील असुन १६ ते २३ या वयोगटातील आदिवासी मुली सुध्दा यात सहभागी आहेत.त्यांना स्थानिक भाषेमध्ये संवाद साधण्यास अडचणी येतात.तसेच निवासाची समस्या,रोजगार आणि शिक्षणांच्या समस्यांचा सामना त्यांना करावा लागत आहे.ही तर झाली शहरी भागात येणाऱ्या प्रवासी आदिवासी महिलांचा परंतु ग्रामिण आदिवासी स्त्रिया सामाजिक रूढी,परंपरा,प्रथा,अंधश्रध्दा,निरक्षरता,अप्रगत शेती,दुष्काळ,अनारोग्य,कुपोषण व व्यसनाधिनतेच्या विळख्यातुन मुक्त होवू पाहात आहे.आदिवासी जमातीचे क्षेत्र व संख्या व्यापक असली तरी त्यांचे दु:ख व वेदना तसेच समस्यांचे स्वरूप जवळजवळ सारखेच आहे.आदिवासींना त्यांचे संघटन सक्षम करता आले नाही.त्यामुळे त्यांचा विकास झाला नाही.याची झळ आदिवासी स्त्रियांना सुध्दा सोसावी लागत आहे.आदिवासी समाजाने संस्कृती बदलाला फारसे महत्व न दिल्यामुळे त्यांचे विशेष सामाजिक परिवर्तन देखिल घडले नाही.भारतात हे चित्र तर अधिकच विदारक आहे.

या सर्व समस्यातून आदिवासी स्त्रियांना बाहेर काढण्यासाठी,आदिवासी स्त्रियांना सर्वांगिण विकासाचे शिक्षण देण गरजेचे आहे.स्त्रियांच्या शिक्षणाचा विचार करता हे शिक्षण केवळ सरकारी आकडेवारीत वाढ किंवा सही करण्यापुरते मर्यादित न ठेवता नविन बदल,घडामोडीचे ज्ञान,वैज्ञाणिक दृष्टिकोनातून विचार करण्याची सवय लावणे हे महत्वाचे आहे.यात या समाजातिल शिकलेल्या स्त्रियांची जबाबदारी व भुमिका महत्वाची आहे.

**निष्कर्ष :**

आदिवासी संस्कृतीत स्त्रियांचा सन्मान व तिचा आदर या गोष्टींना फार महत्व आहे.त्यामुळे आदिवासी स्त्रियांचा दर्जा इतर स्त्रियांच्या तुलनेत समाधानकारक आहे.आदिवासी कुटुंबात स्त्रियांना समानतेचा अधिकार बहाल केला जातो.त्यामुळे त्यांना स्वतंत्र व स्वछंदी जीवन जगता येते.अशी संस्कृती त्यांच्यामध्ये विकसित केलेली आहे.त्यामुळे स्त्रियांना दुय्यम घटक असल्याची भावना त्यांच्यात वाढीस लागत नाही.म्हणूनच आदिवासी स्त्रिया व मुली निडर व साहसी दिसून येतात. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास,निर्णयक्षमता,परस्परांविषयी प्रेम व सहानुभूती,समता,बंधुता व एकात्मकता इत्यादी गुण प्रकर्षाने जाणवतात.

परंतु शैक्षणिक दृष्टया विचार केल्यास शैक्षणिक क्षेत्रात आदिवासी स्त्रियांचा दर्जा खालावलेला आहे.त्यामुळे त्यांना अनेक संकटाचा सामना करावा लागतो.उदा. बालविवाह,अनारोग्य,माता मृत्युदर,कुपोषण,आर्थिक फसवणूक व लैंगिक शोषन या समस्यांचा त्यांना सामना करावा लागतो.आदिवासी स्त्रियांसाठी शासन स्तरावर विविध योजना असुनही आदिवासी जमाती अतिशय दुर्गम भागात रहात असल्यामुळे या विकासाच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहचत नाही.सध्या शासकिय स्तरावरून आणि स्वयंसेवी संस्थाकडून आदिवासी भागामध्ये विकासासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.शिक्षण,आरोग्य,उद्योग,दळणवळणाची साधणे,महिलांच्या समस्या,बालकाचे कुपोषण,विकासाच्या योजना व संधी इत्यादी महत्वाच्या बाबीवर लक्ष देवून आदिवासी जमातीचा विकास करण्याचा प्रयत्न सुरू आहे.या सर्व प्रकारच्या विकासामुळे आदिवासी महिलांची जीवनपध्दती सुध्दा प्रभावित होत आहे.

**संदर्भ :**

१) आगलावे प्रदिप (२००७),आदिवासी समाजाचे समाजशास्त्र,साईनाथ प्रकाशन,नागपूर
२) देवगांवकर शैलजा,देवगांवकर रा.गो. (२००१), आनंद प्रकाशन,नागपूर
३) गंगणे वर्षा (२०१५),आदिवासी स्त्रियांच्या आर्थिक व सामाजिक समस्या,ऋचा प्रकाशन,नागपूर
४) काचोळे दा.धो. (२००९),आदिवासी समाजशास्त्र,कैलाश प्रकाशन,नागपूर
५) कुलकर्णी शौनक (२००९),महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड प्रकाशन,नागपूर
६) माने माणिक गढवाल रा.रा. (२०१२),आदिवासींचे समाजशास्त्र,विद्या प्रकाशन,नागपूर
७) https://www.loksatta.com
८) https://mr.m.wikipedia.org

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# "Impact of caste, class of Religion on poor people"

# गरीब जनतेवर जात,वर्ग आणि धर्म यांचा परिणाम

प्रा. डॉ.एम.एफ.राऊतराहे
विभाग प्रमुख आणि सहयोगी प्राध्यापक लोकप्रशासन विभाग.
श्री.शिवाजी महाविद्याल,परभणी
Email ID-mfrautrahe@gmail.com

---

**प्रस्तावना:—**

महात्मा फुले, शाहू महाराज तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी गरीब जनतेसाठी फार मोठे योगदान दिले आहे. या महामानवाच्या विचारातून आज समाज जागृती झाली आहे. बाबासाहेब हे गोरगरीब जनतेचे कैवारी होते. त्यांनी अनेक फायदे केले म्हणून आज सर्व जातीधर्मीना सुखाने जीवन जगता येत आहे. ज्यांना फुले, शाहू, आंबेडकर कळाले त्यांच्या जीवनाचे सोनेच झाले. बाबासाहेबांचे विचार हे आदर्शवादी होते. त्यांनी भारतीय संविधानलिहिले त्यामुळेच त्यांना घटनेचे शिल्पकार म्हटले जाते. विश्व दारिद्रय जनतेला शैक्षणिक सामाजिक, राजकीय यांची जाणीव व्हावी, म्हणून बाबासाहेबांनी आरक्षणाचे धोरण अवलंबले. नविन विचारांची जाणीव लोकांना करून दिली. गरीब जनतेला भारतीय संविधानाचा खूप मोठया प्रमाणात फायदा झाला आहे. बाबासाहेबांनी प्रत्येक माणसाचा स्वाभीमान कायम राहावा, त्याला समाजात सन्मानपूर्वक न्याय मिळावा , म्हणून बाबासाहेबांनी घटनेचे वे कलम लागू केले आहे आणि जगात फार मोठी क्रांती घडवून आणली आहे.यामुळेउदयोगधंदे,शैक्षणिक संस्था, शासकीय कार्यालय, निमशासकीय कार्यालय यामध्ये गरीब जनतेच्या मुलामुलींना नोकरीची संधी प्राप्त करून दिली आहे. शिक्षणाचे परिवर्तन झाले आहे. गरीब जनतेवर जात,वर्ग आणि धर्म यांचा सकारात्मक परिणाम झाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले संपूर्ण कार्य गरीब जनतेच्या हक्कासाठी, न्यायासाठी केले आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्या कुटूंबाला अनेक समस्या मधून जावे लागत होते. तरी पण ते मागे हटले नाहीत. अशा कठीण परिस्थितीतही बाबासाहेबांनी सामाजिक, धार्मिक, राजकीय, तसेच शैक्षणिक कार्य केले आहे. माणसाची परिस्थिती कितीही गरीब असली तरी विकास करण्यासाठी आपण नेहमी तत्पर असले पाहिजे, असे बाबासाहेब नेहमी म्हणत असत. माणसाची गरीबी ज्ञान विकसीत करण्याचे आपल्याला शिकवित असते. माणसानी कष्ट करण्याचे प्रयत्न सतत ठेवले पाहिजेत तर गरीबीवर आपण मात करू शकतो. डॉ. बाबासाहेब यांनी सामान्य जनतेसाठी सामाजिक आंदोलन उभे केले परंतु त्यांच्यासाठी विविध सुविधांचा लाभ मिळून दिला आहे.

**संशोधनाचा उद्देश :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार गोरगरीब जनते पर्यंत जाऊन गरीबी नष्ट व्हावी,तसेच जात, धर्म, प्रवर्ग, अस्पश्यता नष्ट व्हावी. नविन विचारांची भर सामान्य जनतेच्या विकासात पाडावी माझे संशोधन तळागाळातील लोकांपर्यंत पोहचावे, असा माझा मानस आहे. माझो संशोधन लिखाण तरूण विद्यार्थ्यां पर्यंत तसेच जगाच्या कान्याकोप—यात साहित्यात पोहचावे, अनेक गरीब तरूण संशोधनासाठी पुढे यावे, असा हा संशोधन पेपर मागचा मुख्य उद्येश आहे.

**विचारधारेचा आधार :—**

बाबासाहेबांचा राष्ट्रीय विचार हा गरीब जनतेवर जात, वर्ग अणि धर्म यावर परिणाम करणारा आहे. हि मुलतत्वे अशी :घसामाजिक लोकशाही ह्य जातिविहीन समताधिष्ठित समाज ... नैतिकता , मानवी मूल्ये , मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण ,उच्च शिक्षणास संधी आणि अवसर अन्याय विरूध्द संघर्ष सामाजिक प्रबोधन हे वैचारिक क्रांतीची पूर्वतयारी ९ लोकशाही समाजवाद ,संविधानिक नीतीमत्ता वरील मुद्यांवरून हे स्पष्ट होते की, बाबासाहेबांची चळवळ हि मानवमुक्तींचा लढा आहे. हजारो वर्ष लोक गुलामगिरीत जीवन जगत होते. परंतु बाबासाहेबांनी हे

सर्व परिवर्तन करून समाजाला गरीब जनतेला नवि दिशा प्राप्त करून दिली आहे असे आपणाला म्हणता येईल.

**संशोधनाची गृहितके :—**

१.गरीब जनतेवर जात, वर्ग, आणि धर्म यावर कसा परिणाम झाला त्यांचा अभ्यास करणे.
२.भारतीय संविधानाच्या माध्यमातून समाजाची परिवर्तन दिशा ठरविणे.
३.सामान्य जनतेचा विकास करण्यासाठी संविधानाचा आधार घेणे आवश्यक आहे.
४.अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी समाजाला चांगले शिक्षण देणे आवश्यक आहे.
५.समाजाचा विकास साध्य करण्यासाठी मानवी मुल्ये जपणे आवश्यक आहेत.

वरील गृहितकातून लक्षात आले असेल की, समाजाचा उद्धार करण्यासाठी अंधश्रध्दा, रूढी, परंपरा आणि अज्ञाननष्ट करणे आवश्यक आहे. गरीब जनतेच्या मुलांना चांगले शिक्षण देणे आवश्यक आहे. यासाठी बाबासाहेबांनी संविधानात अनेकशैक्षणिक सवलती नमुद केल्या आहेत. वरिष्ठ लोकांच्या डोक्यातली जात काढण्यासाठी, अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी समाजाला उच्च शिक्षण देणे आवश्यक आहे. महामानव यांनी अनेक समाज सुधारक कायदे काढले आहेत. परंतु आजही दारिद्रय रेषेखालील लोक शिक्षण घेत नाहीत. यासाठी बाबासाहेबांनी अनुसूचित जाती, जमातीसाठी घटनात्मक आरक्षण लागू केले आहे.

**तथ्यसंकलन :—**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा उपयोग केला आहे. यात विविध लेखकाची संदर्भग्रंथ, पुस्तके, मासिके तसेच इंटरनेटचा उपयोग केला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीसंस्था विषयक सिध्दांतः—**

अमेरिकेत डॉ. आंबेडकरांना कोलंबिया विद्यापिठात परिसंवादात भाग घेऊन“भारतातील जाती, त्यांचा उगम, विकास आणि वास्तविकता“ या विषयावर व्याख्यान दिले. या शोध पस्तिकेत डॉ. आंबेडकरांनी वर्ग आणि जात तसे मानायचे झाले तर निकटवर्ती होत. कालांतराने ते अलग होतात. बंदिस्त केलेली गोठवलेला वर्ग म्हणजे “जात“ अशा जातीविषयक मत मांडतांना “जात ही श्रम विभागणी वरही अवलंबून नाही आणि नैसर्गिक कल वा योग्यतेवर ही अवलंबून नाही. व्यक्तीची कामे जात आधीच तयार करते. कुळ कुवतीच्या आधारे नव्हे तर जन्मानुसार किंवा आई—वडीलांच्या सामाजिक स्थानानुसार ठरते.“ असे विचार मांडले.

कलम राज्य केवळ धर्म,जात,वंश,लिंग जन्मस्थान या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल असा भेदभाव करणार नाही. कलमात स्त्रीयां व बालके यांच्याकरिता विशेष तरतुदींचा उल्लेख झालेला आहे. कलम व सेवा योजना, पद नियुक्ती नौकरी इ. मध्ये कोणत्याही कारणावरून धर्म,जात,वंश,लिंग,कूळ इ. भेदभाव केला जाणार नाही व सर्व नागरिकांस समान संधी मिळेल. या स्वरूपाच्या तरतुदी स्त्री — पुरूष समानता राखण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या दिसून येतात. विशेषता सर्व स्तरांवरील समानता साधण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले आहे. गरीब पडीत शोषित समाजावरील होणारा अन्याय दूर करण्याचे प्रयत्न केले आहेत. डॉ. आंबेडकरांनी तळागाळातील सर्वसामाल्य माणूस सर्व शक्तीनिशी जागा केला. त्याला आत्मसन्मान स्वाभिमान, अस्मिता व सामर्थ्याची जाणीव करून दिली. मानसिक गुलामगिरीतून मुक्त केले. हक्काने जगण्याचे शिकविले. त्यासाठी संघर्षाने सत्याग्रह करून समता व न्याय समाजात निर्माण केला. एक व्यक्ती, एक मत, एक मुल्य आणि त्याची एकच किंमत हा सिध्दांत मांडला आहे.

**समाजसुधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एखादया जाती किंवा वर्णाचे शत्रू नव्हते तर जे चांगले आहे त्यास सांभाळून ठेवणे जे वाईट आहे त्याला मार्गातून काढून टाकणे त्यांना अपेक्षित होते. म्हणून ते एक आंदोलनकारी समाजसुधारक होते. त्यांना जाणीव होती की, भारतीय दर्शन खूप उदात आहे. परंतु विकृत रूढी,परंपरा,कर्मकांड यांचा अनावश्यक अतिरेक त्यांना मान्य नव्हता. सुधारणावादी आंदोलनामध्ये ते म्हणत असत ढोंग,पाखंड,भेदभाव कर्मकांड यांच्यापलीकडे जाऊन धर्मामध्ये असलेल्या सदगुणांचे संरक्षण करत आपल्याला पुढे गेले पाहिजे. मानवी जीवनामध्ये धर्माची काहीच आवश्यकता नाही. या मताशी ते सहमत नव्हते. म्हणून ते म्हणत असत धर्माचा पाया समाजाच्या

जीवन आणि व्यवहारासाठी अनिवार्य आहे. अर्थात धर्म माणसाचे चांगले चारित्र विकसित करण्यासाठी सहाय्यक ठरतो. परंतु त्याचबरोबर समाजाच्या संरचनात्मक बाबी देखील निर्धारित करतो, असे ते मानत. अर्थात धर्म म्हणजे कर्मकांड नाही हे त्यांचे ठाम मत होते. व्यक्तीगत कौटूंबिक आणि सामाजिक व्यवस्थेला आदर्श रितीने संचलित करणारे “नैतिक दर्शन“ जे सर्वांसाठी श्रेयस्कर आहे. तोच धर्म आहे असे त्यांचे मत होते.

**राजकीय दृष्टीकोन :—**

कोणत्याही समाजात त्या देशातील सर्वसामान्य जनतेचा जीवनमार्ग हा राजकीय परिस्थितींनी घडविलेला असतो. राजकीय सत्ता जनतेच्या आशा—आकांक्षांना मूर्त रूप देत असते. सत्ता ज्यांच्या हातात असते त्यांना आपल्या आशा आकांक्षांना मूर्त रूप देण्याची संधी मिळते व सत्ता त्यांचीच बटीक बनते. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखले. या देशातील त्या काळातील पक्षाचे नेतृत्व भांडवलदार, जमीनदार व ब्राम्हण वर्ग यांच्या हातात असल्याने राजकीय सत्ता त्यांच्या हातात जाईल व दलित कष्टकरी वंचित बहूजन समाज गुलामा सारखा राबविला जाईल. असे होऊ नये म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाही मुल्यांवर आधारित असणारा स्वतंत्र मजूर पक्ष साली स्थापन केला. बाबासाहेबांनी इ.स. पासून सामाजिक व राजकीय क्षेत्रामध्ये काम करायला सुरूवात केली. तसेच पर्यंत

त्यांना अनेक राजकीय पदावर काम करण्याची संधी मिळाली डिसेंबर मध्ये मुंबई गव्हनर ने त्यांना विधान परिषदेचे सदस्य म्हणून नेमले. अस्पृश्यांना कोणतेही अधिकार नसतांनाही त्यांना मध्ये लंडन येथे भरलेल्या गोलमेज परिषदेस, अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून आमंत्रण दिले गेले. बाबासाहेबांनी सर्व राजकीय पक्षास राष्ट्रीय स्वरूप देण्यासाठीच सर्व अनुसूचित जातींना या पक्षाच्या झेंडयाखाली आणण्यासाठी त्यांनी ऑल इंडिया शेडयुल कास्ट्स फेडरेशनची मध्ये स्थापना केली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर नेहरूंच्या मंत्री मंडळात डॉ. आंबेडकरांना भारताचे कायदा व न्यायमंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले. आंबेडकरांना दोन मुदतीसाठी भारतीय संसदेचे वरिष्ठ सभागृह असलेल्या राज्यसभेत मुंबई राज्याचे प्रतिनिधीत्व केले. थोडक्यात असे म्हणता येईल की, बाबासाहेबांचा राजकीय प्रवास हा गरीब दिन—दलीत मजूर कामगार वर्गाच्या कल्याणसाठीच असल्याचे आपणास दिसून येते.

**सारांश आणि निष्कर्ष :—**

डॉ. आंबेडकरांनी केलेले कार्य दिन—दलित कामगार यांच्यावर सकारात्मक परिणाम करणारे तसेच शोषित वर्गाच्या कल्याणासाठी, विकासासाठी केल्याचे दिसून येते. बाबासाहेब हे गोरगरीब जनतेचे नेते होते. प्रस्तुत संशोधन लेखातून गरीब जनतेवर जात, वर्ग आणि धर्म यांचा परिणाम समाजातील लोकांवर कसा होतो याचे वर्णन केले आहे. एवढेच नव्हे तर बदल म्हणजे व्यक्तीच्या तसेच समाजाच्या जीवनाला मर्यादित करणारा निसर्गाचा नियम आहे की, जुन्या जीवनमुल्यांत सतत क्रांती घडून यावयास हवी आणि माणसाच्या आचरणाचे मुल्य ठरविण्यासाठी जर काही मानकांची आवश्यकता असेल तर ही मानके बदलत्या काळानुरूप बदलून घेण्याची तयारी ठेवली पाहिजे. शेवटी बाबासाहेब असे म्हणतात की, जातीप्रथा, अस्पृश्यता, वर्ण व्यवस्थेत परिवर्तन व्हावे, आणि समाजाचा विकास मोठया प्रमाणात व्हावा. म्हणून धर्म—शास्त्रावर आघात करून या शास्त्राच्या दास्यातून मुक्त व्हावे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते.

**संदर्भ:—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार, संपादक डॉ. धनराज डाहाट, संकेत प्रकाशन, नागपूर पृ.क्र.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लेखन आणि भाषणे, खंड भाग
डॉ. यशवंत मनोहर, निबंधकार डॉ. आंबेडकर— युगासाक्षी प्रकाशन, नागपूर
भि. रा. आंबेडकर जातिभेद निर्मुलन (भाषा:गांजारे) नागपूर पृ.क्र.९*९९.
किर्ती विमल,डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेला स्वतंत्र मजूर पक्ष जडणघडण (ह्व) आणि धोरण, प्रबोध प्रकाशन नागपूर.
गायकवाड”राजवंश“ डॉ. ज्ञानराज काशिनाथ, महामानव डॉ. भिमराव रामजी आंबेडकर
B. Aadhar – Multidiscplinary International Research Journal April-2021 page no. 97,98.

ISSN : 2278-9308
July 2021

# ऐतिहासिक जीवनावर जाती, वर्ग आणि धर्म यांचा प्रभाव

प्रा.डॉ. किशोर शेषराव चौरे
इतिहास विभाग प्रमुख, म.ज्यो. फुले महाविद्यालय, बल्लारपूर, जि. चंद्रपूर
chaurekishor12@gmail.com ,Mob.No. 9028616685

**Abstrac :**

प्रत्येक देशाचा इतिहास हा त्या देशातील रहिवाश्यांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक विकास व परिवर्तनाचा आलेख असतो. भौगोलिक परिस्थितीने त्या—त्या देशातील लोकांची शारीरिक ठेवण, मानसिक विकास प्रभावी होतो. एवढेच नव्हे तर त्या देशातील राजकीय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक, शैक्षणिक संस्थाही या प्रभावापासून मुक्त नसतात. यावर एखाद्या जातीचा, वर्गाचा आणि धर्माचा प्रभाव जाणवतो. भारत देशाच्या ज्ञात इतिहासापासून ते वर्तमान काळापर्यंत नुसती नजर टाकली तरी भारताच्या ऐतिहासिक जीवनावर जाती, वर्ग आणि धर्म यांचा प्रभाव ठळकपणे जाणवतो.

**प्रस्तावना :**

भारतीय इतिहासाची सुरूवात सिंधू संस्कृतीने होते. सिंधू संस्कृतीपूर्वी मनुष्य भटकंती अवस्थेत म्हणजे टोळ्या—टोळ्यांनी राहत होता. तत्कालीन समाज जीवनात जाती, वर्ग आणि धर्म यांचा प्रभाव दिसून येत नाही. सिंधू संस्कृतीतही जाती वर्ग आणि धर्म यांचा दिसून येत नाही. सिंधू संस्कृतीत उत्खननामध्ये सापडलेल्या अवशेषांवरून धार्मिक जीवनाची कल्पना आपल्याला येते. तेथील लोक निसर्गपूजा करीत असत. म्हणजे नैसर्गीक शक्तीविषयी वाटणाऱ्या भितीतून मानवाच्या धार्मिक विचारांचा उदय झाला असावा. सिंधू संस्कृतीनंतर वैदिक संस्कृतीचा उदय झाला आणि विकास पावला. वैदिक संस्कृतीचे संस्थापक आणि प्रसारक आर्य होते. आर्य गौर वर्णीय होते. ते प्रथमत: भारतात आले तेव्हा कृष्णवर्णीय भारतीयांना त्यांनी अनार्य ही संज्ञा दिली. पुढे गुणकर्मावर आधारित तीन वर्ण आर्य समाजात निर्माण झाले. पूर्व वैदिक काळात वर्णव्यवस्था बीजरूपाने अस्तित्वात आली. उत्तरवैदिक काळात जातिसंस्थेने मुळ धरून हळूहळू तिचा विकास होवू लागला. प्राचीन भारतात जातीव्यवस्थेचा विकास झाला आणि ती पुढे मध्ययुगीन काळात, आधुनिक पूर्व काळात आणि आधुनिक काळात बदलत गेली. आजही जाती, वर्ण आणि धर्म या व्यवस्थेची पाळेमुळे समाजात खोलवर रूजलेली दिसतात. प्रस्तुत शोधनिबंधात याचा अल्पशा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**ऐतिहासिक जीवनावर जाती, वर्ग आणि धर्म यांचा प्रभाव :**

ऐतिहासिक जीवनावर जातीव्यवस्थेचा प्रभाव दिसून पडतो. जाती व्यवस्था हे भारतीय समाजाचे एक महत्वाचे वैशिष्ट्य मानले जाते. आज भारतात ज्या निरनिराळ्या जाती दिसतात त्या उत्तर वैदिक काळात निर्माण झाल्या. म्हणजे जातीव्यवस्था ही जवळ—जवळ २५०० वर्षे जुनी आहे. काळाबरोबर या व्यवस्थेत अधिकाधिक गुंतागुंत निर्माण झाली आणि हिंदू समाजात जाती व पोटजातींचे रान माजले. आज हिंदू समाज तीन हजार जाती व पोटजातींमध्ये दुभंगल्या गेला आहे. एखाद्या जळवेप्रमाणे ही व्यवस्था भारतीय समाजाला चिकटून बसली आहे. जातीव्यवस्थेतील मोठी संरचनात्मक स्थित्यंतरे मुघल साम्राज्याच्या काळात आणि ब्रिटिश साम्राज्याच्या काळात झाली आहे. ब्रिटिशांनी भारतीय समाजाला जातीय स्तरावर वेगवेगळे मांडायला सुरूवात केली होती; त्यातूनच प्रशासकीय पदे आणि कामे ही फक्त उच्च जातीय लोकांनाच देण्याचा पायंडा त्यांनी पाडला. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर अनेक बदल झाले. ज्यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग अशा वेगवेगळ्या जातीची भारत सरकारने एक यादीच तयार केली. जातीय पातळीवर भेदभाव करणे हे भारतीय संविधानाच्या कलम १५ नुसार बेकायदेशीर ठरवण्यात आलेले आहे. तरीही जातीव्यवस्थेचे भूत अजूनही लोकांच्या मानेवरून उतरायला तयार नाही. अशाप्रकारे जातीव्यवस्थेचा प्रभाव भारतीय लोकांच्या मनावर आजही दिसून येतो.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

ऐतिहासिक जीवनावर जसा जातीचा प्रभाव पडलेला जाणवतो तसाच धर्माचा प्रभाव सुद्धा दिसून येतो. प्रा. एम.एम. लिहितकर लिहितात, “धर्म म्हणजे काय? आपण वस्तूंचा गुणधर्म म्हणतो. जो नैसर्गिक गुण तोच त्याचा धर्म असेल जसे पाण्याचा गुणधर्म शितलता, तहान भागविणे, मिरची तिखट, मिठ खारट, ऊस गोड, नैसर्गिक गुण तोच धर्म असेल तर मानव ही सुद्धा निसर्गाची निर्मिती, मानवाचा धर्म मानवता असलाच पाहिजे; पण तो माणसाचा गुणधर्म म्हणता येणार नाही. कारण व्यक्ती तितक्या प्रवृत्ती असतात. म्हणून प्रत्येक व्यक्तीचा गुणधर्म एक दुसऱ्यांपासून भिन्न असू शकतो. परंतु मानव हा समाजप्रिय प्राणी असल्याने त्याच्या गुणधर्माचा स्वैराचार रोखण्यासाठी त्याला इतरांसोबत एकत्र राहतांना सर्वांना एका सुत्रात गुंफणारा सर्वांच्या कल्याणाचा विचार स्विकारणे आवश्यक असते. त्यातूनच धर्माची संकल्पना आली.” सिंधू संस्कृतीत उत्खननामध्ये सापडलेल्या अवशेषांवरून धार्मिक जीवनाची कल्पना येते. वृक्ष, प्राणी यांची पूजा तेथील लोक करीत होते. धार्मिक दृष्ट्या निसर्गास ते महत्व देत होते. पुढे भारतात आर्यांचा प्रवेश झाला. आर्यांनी चातुर्वर्ण्य ‘ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र’ व्यवस्था आणली. पुढे उत्तर वैदिक काळात आर्यांच्या राज्यांचा बराच विस्तार झाला. त्यामुळे धर्माचे साधे स्वरूप जाऊन ते अधिक समारंभाचे बनले. एकूण धार्मिक कार्यात यज्ञाला अतिशय महत्व प्राप्त झाले. आपल्या आकांक्षाच्या, अभिलाषांच्या पूर्तीसाठी ह्या काळातील आर्यांनी मंत्रबळाच्या साहाय्याने देवतांना वश करून घेण्याचा प्रयत्न सुरू केला. विविध उद्दिष्टांसाठी व्रात्यस्तोम, वाजपेय, राजसूय, अश्वमेघ असे यज्ञ केले जाऊ लागले. काही काही यज्ञ महिनोगणती चालत अशाप्रकारे यज्ञाचा व्याप व खर्चही वाढू लागला. ह्याच सुमारास यज्ञात प्राणीहत्येला सुरूवात झाली. एकूणच यज्ञकर्म सर्वसामान्यांसाठी राहिले नाही. प्रत्यक्ष उद्देशापेक्षा कर्मकांडाला जास्त महत्व आले. मा.म. देशमुख लिहितात, “वास्तविक ब्राम्हण आणि ब्राम्हणेत्तर यांचा धर्म एक नाही ब्राम्हण हे वेगळ्या धर्माचे (वैदिक धर्माचे) आहेत. परंतु अडाणी बहुजन समाजावर भट—ब्राम्हणांचा एवढा पगडा आहे की, तो त्यांच्या सांगण्यानुसार वागत आहे. बहुजन समाजात जे शिकलेत त्यांच्यातही शिक्षित अडाणी भरपूर आहेत. कारण त्यांच्या मेंदूतील विचार करण्याचा ‘कक्ष’ बंदच आहे. त्यामुळे ते ब्राम्हण पंडितांच्या कुटिल आणि कपटी शिकवणूकीला सहज बळी पडतात. यज्ञ, व्रत, जप, तप, नवस, कुंडली, चमत्कार वगैरे अंधश्रद्धावर विश्वास ठेवतात.” अशाप्रकारे आर्यांनी म्हणजेच ब्राम्हणानी ऋग्वेद काळापासून तर आजपर्यंत भारतातील अनार्यांना म्हणजे बहुजन समाजाला अशा धार्मिक कलहात गुंतून ठेवले. ब्राम्हणानी वेगवेगळ्या आकाराच्या मूर्त्या करून त्या मूर्त्यांना वेगवेगळ्या देवतांची नावे दिले व आज या कल्पित देवतांच्या मूर्तीची पूजा बहुजन वर्ग करतांना दिसतो. अज्ञानी व अडाणी लोकांची मने देव—देवतांच्या भक्तीमार्गाकडे वळवून त्यांना धर्माची भीती दाखवून राज केले व आजही करीत आहेत. धर्माचा पगडा ब्राम्हणानी बहुजन समाजावर इतका पडला आहे की, धर्माच्या नावावर बहुजन समाजातील माणूस मारायला व मरायलाही तयार असतो. अशाप्रकारे ऐतिहासिक जीवनावर धर्माचा प्रभाव दिसतो.

**निष्कर्ष :**

आजही भारत देशाच्या तत्कालीन परिस्थितीचा अभ्यास केला तर आपणास स्पष्टपणे जाणवते की, देशातील असे एकही क्षेत्र सुटले नाही. ज्यावर जाती, वर्ग आणि धर्म यांचा प्रभाव नसेल. मग ते राजकीय, धार्मिक, शैक्षणिक वा औद्योगिक असो. या प्रभावातून ही क्षेत्रे मुक्त नाही. आजही राजकारणात जातीगत उदाहरणे पहावयास मिळतात. शैक्षणिक क्षेत्रातही तीच स्थिती आहे. आपल्याच जातीचे, धर्माचे लोक तेथे भरती करतात किंवा निवडतात. जातीला, धर्मालाच प्राधान्य देतात. प्राचीन काळापासून ज्या आर्यांनी अनार्यांचे शोषण करून आर्थिक स्थिती मजबूत केली ती आजही कायम आहे. सर्व उत्पादनाची साधने त्यांनी त्यांच्या हातात कायम ठेवली आहे. महात्मा फुले यांनी विषम जातीनिष्ठ समाजरचना मोडून सामाजिक समता निर्माण करण्याचा विचार प्रथम मांडला. जातीभेदाविरूद्ध उघड उघड बंडाचा झेंडा उभारला तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाची अस्मिता, स्वाभिमान महत्वाकांक्षा जागी केली. तरीही या ऐतिहासिक जीवनावर प्राचीन काळपासून तर आजपर्यंतचा प्रवास बघितला तर जाती, वर्ग आणि धर्म यांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो.

ISSN : 2278-9308
July 2021

**संदर्भ ग्रंथसूची :**

(१)दीक्षित, नी.सी., ‘भारताचा इतिहास’ (प्रारंभापासून ते इ.स. १५२६), पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, द्वि.आ., ऑक्टोबर २००४, पृ. ३४
(२)https://mr.m.wikipedia.org>wiki,भारतातील जातीव्यवस्था, १९.०७.२०२१
(३)प्रा.एम.एन. लिहितकर,‘हिंदूराष्ट्रनिर्मितीचे स्वप्न आणि संविधान दिनाची फॉर्म्यालिटी’, मूलनिवासी संघटक मराठी पाक्षिक, वर्ष १४, अंक २२, १६ ते ३१ डिसेंबर २०१८, पृ. ५
(४)सपकाळ प्रभा; शब्बीर एस.; मार्डीकर मदन, ‘भारताचा इतिहास (प्राचीन व मध्यकालीन भारत), एस. चांद आणि कंपनी लि. नवी दिल्ली, प्र.आ., १९९४, पृ. ४
(५)देशमुख मा.म., ‘महात्मा फुले यांचे समाज प्रबोधन’, शिवभारती प्रकाशन, नागपूर, प्र.आ., १९९७, पृ. १,३,४
(६)गारे गोविंद; लिमये शिरूभाऊ, ‘महाराष्ट्रातील दलित — शोध आणि बोध’, सहाध्ययन प्रकाशन, मुंबई, प्र.आ., ४ मार्च १९७३, पृ. २, ३

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# "आदिवासी समुदायावर जाती, वर्ग आणि धर्म यांचा प्रभाव"

कु.गोदावरी विठ्ठलबन बन
पी.एच.डी. संशोधक विद्यार्थीनी समाजशास्त्र विभाग,
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठ, अमरावती.
भ्र.क्र. ८८८८०१६६५१ ,८३०७२९२०५,Email ID :godavariban5@gmail.com

❖ **प्रस्तावना :—**

जगातील सर्वच देशात कमी अधिक प्रमाणात आदिवासी समाज आढळून येतो. जगाच्या तुलनेत भारतातील आदिवासीची लोकसंख्या लक्षणिय आहे. आदिवासी समुदाय प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. प्रगत समाजाच्या मुख्य प्रवाहापासुन ते अलिप्त आहेत म्हणुन त्यांची जीवन जगण्याची पध्दत इतर समुदायापेक्षा वेगळी आहे. आदिवासी समाज भारताच्या चौफेर दिशांनी विखुरलेला आहे त्यांना वेगवेगळया नावांनी संबोधल्या जाते. डॉ.हट्टन आणि ठक्कर बाप्पा यांनी आदिवासीना मुळ निवासी म्हटले आहे. तर डॉ.जी.एस.धुर्ये यांनी मागासलेले हिंदू व एलविन यांनी आदिवासी या नावानी संबोधले तर भारतीय संविधानाने अनुसूचित जमाती असा उल्लेख केला आहे.

आदिवासींचे भौगोलीक, भाषिक, वांशिक तसेच प्रादेशिक आधारावर वर्गीकरण केल्या जाते. समान संस्कृती, समान धर्म, परंपरा, चालीरिती, समान बोलीभाषा, प्रथा यामुळे त्यांच्यात एकात्मता असलेली दिसुन येते. आदिवासी विशिष्ट भुप्रदेशात वास्तव्य करत असल्याने त्यांची लोकसंख्या आणि सामाजिक संपर्काचे क्षेत्र कमी प्रमाणात आहे. प्रत्येक आदिवासी स्वत:चा एक वेगळा पुर्वज मानतो त्यामुळे त्यांच्यात असलेल्या रक्तसंबंधाला विशेष महत्व आहे. आदिवासींची अर्थव्यवस्था साधी असुन त्यांच्यात लेखन कलेचा अभाव असल्याने त्यांची भाषा अलिखित आहे. आदिवासी जमातीत जमात—प्रमुख व जमात—पंचायतीचे विशेष महत्व आहे. थोडक्यात आदिवासीची इतर समुदायाच्या तुलनेत विशीष्ट जीवनपध्दती आहे.

आदिवासीचा जेव्हा सभ्य समाजाशी संपर्क आला तेव्हा त्यांच्या जीवनात परिवर्तनाला सुरूवात झाली. विशेषत: ब्रिटीश कालखंडात त्यांच्या स्वयंपुर्ण अलिप्त जीवनपध्दतीत खुप मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडुन आले. ब्रिटिश सरकार, हिंदु, ख्रिश्चन धर्मीय लोकांच्या तसेच सावकार, जमीनदार ठेकेदांच्या संपर्कात आल्यामुळे त्यांचे मानसिक, शारीरिक, आर्थिक, सांस्कृतीक शोषण झाले.

आदिवासी लोक दऱ्याखोऱ्यात शतकानुशतकापासुन जीवन जगत आहेत भौगोलिक पृथकथेतून सांस्कृतीक पृथकथा त्यांच्या जीवनांचे अंग बनले आहे. त्यामुळे त्यांचे जीवनमान जैसे थे अशाप्रकारचे होते. परंतु पुढे आदिवासी लोकांचा गैरआदिवासी लोकांशी संपर्क आला. शासन, सावकार, ठेकेदार, व्यापारी, मिशनरी इतर समाजसेवकाचा आदिवासी क्षेत्रात प्रवेश झाला आणी त्यातुन आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. जे आदिवासी आजही घनदाट अरण्यात राहत आहेत त्यांच्या आधुनिकीकरणाचा प्रत्यय येत नाही. परंतू ग्रामीण आणी शहरी जीवनाशी निगडीत असलेल्या आदिवासी समुदायात आधुनिकीकरणाची मात्रा जास्त दिसुन येते म्हणुन या घटकात आदिवासीचे जीवन विषमतेने कसे भरलेले आहे. त्यांच्या जीवनात सामाजिक आणी आर्थिक बाजु पाहता कशी भिन्नता आहे हे दिसून येते.

भारतात १९६१ साली झालेल्या जणगणनेत ८९ टक्के आदिवासीनी आपला धर्म हिंदु असल्याचे नमुद केले आहे. ५ टक्के लोकांनी ख्रिश्चन, ४ टक्के लोकांनी आदिवासी धर्माचा उल्लेख केला आहे. त्याच बरोबर मुस्लींम, बौध्द आणि जैन धर्मीयाची संख्या खुप कमी आहे. आदिम धर्माची संख्या ५२ टक्के आढळुन आली. बहुतांशी आदिवासी धार्मीक हिंदुच्या संपर्कात आले तेव्हा त्यांनी आपला धर्म हिदु म्हणुन कथन केला असावा किंवा आदिवासी धार्मीक विश्वासाला वेगळे संबोधन आहे काय असा प्रश्न त्यांना पडला असावा. उत्तरपुर्व भारतात

ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यात आला तेव्हा त्या क्षेत्रातील बहुतांश आदिवासींचा धर्म ख्रिश्चन ठरला आहे.

महाराष्ट्रात मुस्लीम अमदानीत भिल्लाचे धर्मातरण करण्यात आले त्यातुन तडवी भील्ल हा इस्लाम धर्माला मानणारा वर्ग निर्माण झाला म्हणुन घटकाच्या शेवटच्या भागात हिंदु आणी ख्रिश्चन धर्माचा आदिवासी धर्मावर पडलेला प्रभाव लक्षात घेतला आहे. त्याचप्रमाणे आदिवासींनी हिंदू ख्रिश्चन धर्म सांगितला असता तरी त्याच्या मुळच्या आदिवासी धर्माच्या अनेक खुणा त्यांच्या धार्मीक सामाजिक जीवनात रूतलेल्या आहेत हे स्पष्ट झाले आहे. साधारणत: आदिवासी धर्माचे स्वरूप साधे सरळ असते आणी त्यांच्यापेक्षा इतर धार्मीक तत्वज्ञान उच्चकोटीचे आहे असा आपला समज आहे. परंतु आदिवासी धर्मातील स्वर्ग, मत्युनंतरचे जीवन आत्म्यासंबंधीचे विश्वास, निसर्गपुजा, पुर्वज पुजासंबंधी विधी लक्षात घेतले म्हणजे आपल्या आणी आदिवासी धर्मात अंतर नाही हे स्पष्ट होईल.

**❖ अध्ययनाचे उद्देश :—**

१)आदिवासी समुदायाचा जीवन प्रणालीचे अध्ययन करणे.
२)आदिवासी समाजाच्या संकल्पनेचे अध्ययन करणे.
३)आदिवासी समाजावर इतरत्र धार्मिक विचारांच्या प्रभावाचे अध्ययन करणे.
४)सातपुडा पर्वतरांगीत चिखलदरा—धारणी भागातील कोरकू आदिवासी समुदायाचे अध्ययन करणे.

**❖अध्ययनाचे गृहितके :—**

१)आदिवासी समुदायावर इतर धर्माचा प्रभाव दिसुन येत आहे.
२)आदिवासी समुदायाची स्वयंपुर्ण व विशिष्ट जिवनप्रणाली आहे.

**❖अध्ययन पध्दती :—**

संशोधन विषयाचे अध्ययन करण्यासाठी मी सदरील शोध निबंधात दुय्यम साधन सामुग्रीचा वापर करण्यात आला असुन विषयास अनुसरून उपलब्ध संदर्भ ग्रंथाचा वापर व इंटरनेटवरील माहिती विकिपिडीया इत्यादी साधनाच्या आधारे अभ्यास करून तथ्य संकलन केले असुन शोध निबंध पुर्ण केला आहे.

**❖ आदिवासी जीवनप्रणाली :—**

आदिवासीच्या जीवनातील सर्व क्रियाकल्पामध्ये धर्म पुर्णपणे समाविष्ठ झालेला आहे हे जाणुन घेण्यासाठी तोडा आदिवासीच्या जीवनपध्दतीचा विचार करून

दक्षिण भारतात निलगिरी पर्वतावर तोडा आदिवासी राहतात ते म्हशीचे पालन करतात त्यांच्या वस्तीतील घरे गोल आकाराची असतात. दुग्धशाळा हे त्यांचे मंदिर असते. तोडाचे दोन वर्गात विभाजन झालेले आहे. जसे तारथनोल आणी तेईवलीथोल हे विभाजन विशिष्ट विधी विधानाच्या आधारे झाले आहे. त्यापैकी तारथरोला वर्गातील लोकांची म्हशीवर आणी दुग्धशाळेवर मालकी असते. तेथीवलीयोल वर्गातील लोकांना देवदेवतांचे सेवक म्हणुन मानतात. ते दुग्धशाळा मंदिरात प्रजाअर्चा करतात यांचे आर्थिक आणि सामाजिक जीवन म्हशीभावती केंद्रीत झालेले आहे. त्याचा बहुतांशी वेळ म्हशीच्या रक्षणासाठी जातो ही त्यांची धार्मीक जबाबदारी मानली जाते.

तोडा लोक म्हैस, दुग्धशाळा आणी कुरणासंबंधी सतत पुजापाठ करतात. काही कारणामुळे दुग्धशाळा अपवित्र झाली तर पुजापाठ करून तीला प्रवित्र करतात, दुग्धशाळा बांधणे, छप्पर टाकणे, म्हशीचे नामकरण, म्हशीचे प्रथम दोहन, म्हशीला मीठ खाऊ घालणे, तीला प्रथमच कुराणात चारण्यासाठी नेणे, त्या प्रत्येक क्रियेच्या वेळी पुजाअर्चा करण्यात येते. कुरण वाढावे म्हणुन देवतासमोर दीप प्रज्वलीत करून विधी करतात. तसेच तोडाच्या सामाजिक जीवणातही धार्मीक पुजापाठाचे तितकेच महत्व आहे. तोडा स्त्रिच्या प्रथम गर्भधारणेच्या वेळी तिला धार्मिक दृष्टीने अपवित्र मानतात तीला गावाच्या बाहेर झोपडीत पाच महिने जीवन घालावे लागते. सातव्या महिन्यात पती पुजा करून तीला तीर धनुष्य देतो या विधीतुन जन्मास येणाऱ्या अपत्यास पितृत्व प्रदल केले जाते समजा एखाद्या स्त्रिला अपत्य जन्मापुर्वी तीन धनुष्य दिला नाही ती संतती एवैध मानतात अशा मुलाचा पितृकुळात समावेश होत नाही. तोडामध्ये भ्रातृ—बहुपतीत्व पध्दती होती तेव्हा जन्मास येणाऱ्या अपल्याच्या वेळी भावाच्या अनुक्रमाने पत्नीला विधीपुर्वक तीर धनुष्य देत असत.

❖आदिवासी समाजाची संकल्पना :—

आदिवासी समाजाची संकल्पना ही सर्वसमावेशक अर्थाने वापरली जाते. इंग्रजीमधील 'Tribe' या शब्दाचा अर्थ 'जमात' असा होतो. काही समाजशास्त्रज्ञांनी त्यांना मुळचे रहिवाशी, वन्य जमाती, जंगलराजे, गिरिजन हि नांवे दिली. भारतीय राज्यघटनेत त्यांना अनुसुचित जमाती (Scheduled Tribe) असे म्हटले आहे. भारताचे राष्ट्रपती घटनेच्या ३४२ (i) कलमान्वये नोटीफीकेशन काढुन एखाद्या आदिम जमातीला अनुसुचित जमात (Scheduled Tribe) म्हणुन घअनेच्या ५ व्या अनुसुचीत(5th Scheduled) मध्ये टाकु शकतात नंतर तिला अनुसुचित जमात असा दर्जा प्राप्त होतो म्हणजेच राज्यघटनेतील तरतुदी या अनुसुचित जमाती या घटनात्मक संकल्पनेशीच संलग्न आहेत.

❖व्याख्या :—

१) गिलीन ह्यांच्या मते :—

"एका विशिष्ट भुप्रदेशावर राहणारा समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतील जीवन जगणाऱ्या स्थानीय गटाच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतात"

२) एडवर्ड टायलर ह्यांचे मते :—

"दैवी विभुतीच्या अस्तीत्वावरील श्रध्दा म्हणजे धर्म होय"

❖आदिवासी समुदाय :—

भारतातील एकुण लोकसंख्येच्या ८ टक्के लोकसंख्या आदिवासींची आहे त्यात ४२७ आदिवासी समुदाय मुख्य आहेत हे आदिवासी समुदाय उत्तरपुर्व भारत, मध्यभारत आणि दक्षिण भारतातील डोंगरदऱ्यात वसलेले आहेत. या सर्व आदिवासी समुदायात भिन्नता आहे. लोकसंख्या या घटकाचा विचार केला तर असे लक्षात येते की गोंड, संथाल, भिल्लांची लोकसंख्या प्रत्येकी ४० लाखापेक्षा जास्त आहे. चेंचु आदिवासीची संख्या १८००० नोंदलेली आहे. दक्षिण भारतातील निलगीरी पर्वतावर राहणाऱ्या तोडा आदिवासींची लोकसंख्या फक्त २४ आहे. गोंड, संथाल, वागा, इत्यादी आदिवासीची लोकसंख्या वाढत आहे आणी तोडा, ओंगे, ग्रेट अंदमानी यांची लोकसंख्या घटत आहे.

दक्षिण भारतातील कादर, चेंचु, पस्लियान हे आदिवासी पुर्व—मुळे जमा करून उदरनिर्वाह करतात. गुजरातमधील खाडी उत्तर भारतातील भोटीया पशुपालक आहेत पुर्वोत्तर भागातील आदिवासी झुम (बदलनी) शेती करतात धारू आदिवासी प्रगत शेती करतात. कोरकू आदिवासी शेती करतात तर चेरो अगेरिया धातुकाम करतात. आता आदिवासीमध्ये जागृती झाली आहे. शासकीय योजनाचा लाभ घेत आहे. काही क्षेत्रात स्वयंसेवी संस्था मार्गदर्शन करीत आहेत. काही आदिवासी लोक तर शेतकरी म्हणुन ओळखु लागले आहेत. लोकसंख्येने जास्त असलेले आदिवासी शिक्षण आणी शासकीय योजनाचा लाभ घेत आहेत. त्याप्रमाणात न्युनतम लोकसंख्या असणाऱ्यांना लाभ मिळत नाही. उत्तर पुर्व भारतात राजकीय जागृती मोठ्या प्रमाणात झाली आहे. संथाल मुंडा आदिवासीमध्ये झालेल्या चळवळीमुळे अशा जागृतीचे प्रमाण वाढले आहे इतर भागातील आदिवासीमध्ये जागृती कमी आहे. त्यामुळे विकास योजनाचे फायदे त्यांना विशेषरित्या मिळत नाहीत इतकेच नाही तर निर्णय प्रकियेत ते दबाव समुह म्हणुन भूमिका सुध्दा वठवु शकत नाही.

❖कोरकु:—

सातपुडा पर्वतरांजीत चिखलदरा, धारणी भागात कोरकुचा निवास आहे. कोरकु हे मुंडा आदिवासी गटातील मानले जातात त्यांचा वांशिक आणि भाषिकदृष्ट्या संबंध मध्ये प्रदेशातील कोरवा आदिवासी बरोबर जोडला जातो. कोरकुंची शारिरीक लक्षणे प्रोटो—ऑस्ट्रालायड वंशात मोडणारी असुन ते ऑस्ट्रीक भाषा गटातील कोरकु भाषा बोलतात. कोरकु स्वत:ला रानवंशी मानतात ते रावण आणी मेघनाथची पुजा करतात कोरकु परंपरागत जीवन व्यतीत करीत होते परंतू याचा संपर्क प्रगत समाजाशी आला. चिखलदरा थंड हवेचे ठिकाण असल्याने लोकांची वर्दळ वाढली कोरकुचीच वस्तु खरेदी करणेसाठी, चिखलदरा, धारणी, परतवाडा, अचलपुर येऊ—जाऊ लागले त्यांचा बाजार अर्थव्यवस्थेशी संबंध आला. त्यातुन सांस्कृतीक घटकाची देवाण—घेवाण सुरू झाली. कोरकु परंपरागत देवी देवताबरोबर महादेव, पार्वती, गणेश, हनुमानाची पुजा करू लागले. त्यांच्या धार्मिक जीवनावर हिंदु धर्माचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. हिदु समाजाच्या संपर्कामुळे कोरकु

ISSN : 2278-9308
July 2021

हिंदुचे सण उत्सव साजरे करीत आहेत. काही कोरकु जवळपासच्या गावात राहु लागले. गावरहाटीत त्यांचा समावेश झाला. खानपान, पेहराव तसेच जीवन पध्दतीत बदल झाला.
चिखलदरा आणी अचलपुर येथे ख्रिश्चन मिशनऱ्यांची केंद्र आहेत. चिखलदरा येथे मिशनऱ्यांनी शाळा वस्तीगृह चालविली आहेत याचा परिणाम म्हणजे कोरकुंचे ख्रिश्चनीकरण सुध्दा होत आहे. ख्रिश्चनझालेल्या कोरकुंना काही मदत आणी संधी देण्याचे प्रयत्न करण्यात आले. धारणी वा चिखलदरा ही शैक्षणिक केंद्र आहेत या केंद्रातुन संस्थेने कमी का असेना परंतू कोरकु मुले शिक्षण घेऊ लागली आहेत. आदिवासी विकास खंडामधुन विद्युतीकरण, पक्के रस्ते, प्राथमिक स्थास्थ केंद्रे, शेती सुधार, पशुसुधार, बालकल्याण इत्यादी अनेक कार्यक्रम राबविले जात आहेत. लोकशाही शासनप्रणालीत पंचायत राज व्यवस्थेत कोरकुंचा सहभाग वाढला आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणी विधानसभेत त्यांचे प्रतिनिधी आहेत. कोरकुंचा राजकीय सहभाग त्यांच्यातील सहभाग त्यांच्यातील राजकीय जागृतीसाठी उत्तरदायी ठरला आहे. पुर्वी कोरकु बदलती शेती करीत असत आता सखोल लागवडीची शेती करतात. शेती विभाग, पंजाबराव कृषी विद्यापिठ, अकोला यांनी दिलेल्या मार्गदर्शनामुळे त्यांनी पिकाच्या प्रतिमानात बदल केला असुन नवीन अवजारे बी बियाने आणी जोर खते ओलीताच्या सोयी केल्या आहेत.
कोरकुमधील सुशिक्षित पिढीने परंपरागत वेशभुषेऐवजी पाश्चिमात्य वेशभुषेचा स्वीकार केला आहे. त्याच्यात व्यावसायीक गतिशिलता प्रत्ययास येते. काही लोक नोकरी करू लागले आहेत. शिक्षणाप्रती आस्था वाढलेली आहे. परंपरागत वैद्यकीय इलाजाऐवजी डॉक्टरांकडे जाण्याची प्रवृत्ती वाढली आहे. यावरून हे स्पष्ट की कोरकु आदिवासीची आधुनिकीकरणाची प्रक्रिया शहर—गावाच्या संपर्कात असलेल्या कोरकु आपले परंपरागत जीवन व्यतीत करीत आहेत.

**❖अध्ययनाचे वैशीष्ट्ये :—**

१) विशिष्ट भुप्रदेश
२)समान लघुत्ता
३)एकाच रक्त संबंधावर आधारीत.
४)स्वत:ची बोलीभाषा व लेखन कलेचा अभाव.
५)समान धर्म.
६)साधी अर्थव्यवस्था.
७)सिमीत तंत्रविद्या.
८)आदिवासी समाज बरेचसे स्वयंकेंद्रीत असतात.
९)धर्मात निसर्गपुजेस व जादुसारख्या क्रियाकल्पास महत्व असते.

**❖आदिवासी धर्माचे स्वरूप :—**

प्रत्येक धार्मिक संघटनांची तीन तत्वे असतात जसे
(क) अलौकीक शक्तीवर विश्वास
(ख) मानवाचा त्या शक्तीसमवेत संबंध,
(ग) या संबंधाच्या स्थापनेसाठी विधी करणे.
१) अलौकीक शक्तीवरील विश्वासाचा संबंधी धार्मिक विश्वास व्यवस्थेशी आहे.
२)मानवाचा त्या शक्तीबरोबर असलेले संबंध नैतीक मुल्यव्यवस्थेशी जुळलेले आहे.
३)या शक्ती समवेत संबंध स्थापन करणे धार्मिक कार्यप्रणाली अंतर्गत आहे.

या तीनही व्यवस्थेचे स्वरूप सामाजिक संघटना परत्वे वेगवेगळे असते. तसे पाहिले तर आदिवासी धर्माचे स्वरूप अतिशय साधे सरळ आहे ते वर्णनात्मक असुन त्यात अभिव्यक्त केले जाते ही अभिव्यक्त करण्याची पध्दती आपल्या सहज लक्षात येते. आदिवासीचे धार्मीक विश्वास मुल्ये, व्यवहार हा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात उपयोगात आणल्या जाणाऱ्या विश्वास आणी व्यवहारापासुन वेगळा नसतो असे असले तरी आदिवासी लोकांचे विश्वास आणी विधी इतर लोकांना रहस्यमय वाटू शकतात इतके मात्र खरे की आदिवासी धर्म इतर कोणत्याही प्रगत धर्मापेक्षा कमी महत्वपुर्ण नाही. या धर्माचेही तत्वज्ञान आहेक ते व्यवस्थाबध्द पध्दतीने मांडलेले नाही इतकेच ! त्यांच्या धर्मास सार्वभौम सत्याचा स्वीकार केलेला आढळतो.

ISSN : 2278-9308
July 2021

❖आदिवासी समुदायावर ख्रिश्चन धर्म विचाराचा प्रभाव :—

इंग्रजांनी भारतात व्यापारासाठी प्रवेश केला आणी त्यातुन इंग्रजी राज्याची सुरूवात झाली इंग्रजी सत्तेबरोबर ख्रिश्चन मिशनऱ्यांना आपले क्रियाकल्प करण्यासाठी भरपुर संधी मिळाली. मिशनऱ्यांनी यासाठी आदिवासी आणि मागासलेल्या समाजक्षेत्राची प्रामुख्याने निवड केली. दुर्गम प्रदेशात जाउन लोकांना वैद्यकीय मदत देण्यासाठी दवाखाने, शाळा, वस्तीगृहे सुरू केली. या जोडीला त्यांनी धर्मप्रसाराचे काम केले. लोकांच्या अज्ञान गरीबी, अगतिकतेचा फायदा घेतला. काही वेळा उन्नतीचे अमीष दाखविले याचा परिणाम म्हणजे आदिवासी प्रक्षेत्रात ख्रिश्चन धर्माचा फैलाव झाला. भारतातील एकुण ख्रिश्चन लोकसंख्येचा सहावा भाग आदिवासी ख्रिश्चन लोकांचा आहे. एल्विनच्या मते नागा, मिझो, गारो, आदिवासींचा अध्यपिक्षा जास्त तर काही भागात पुर्णपणे ख्रिश्चन धर्म पसरलेला ख्रिश्चन मिशनऱ्यांनी १९१३ साली आसाम प्रदेशात खासी १८५० साली छोटा नागपुर क्षेत्रात उटांव आणी १८८० साली मध्य प्रदेशातील भिल्लांमध्ये धर्मांतराचे कार्य सुरू केले. त्यांनी यासाठी लोकसंख्येने महत्तम असलेल्या आदिवासींची निवड केली संख्येने लहान असलेल्या गटांना वगळले. मोठ्या आदिवासीना लक्ष्य ठरविल्यामुळे धर्मांतरणाचे कार्य विस्तारले आणि लोकजीवनावर ख्रिश्चन धर्माची पकड वाढली.

भारताच्या मध्यवर्ती भागात दोन तृतीयांश खासी लोक एक चतुर्थांश मुंडा आणी एक चतुर्थांश उटाव आदिवासींनी ख्रिश्चन धर्माला जवळ केले आहे. मध्यप्रदेश आणी ओरीसा मध्ये आदिवासी क्षेत्रात चेरो, बिरघेर, बैगा पहाडीया, आदिवासीचे धर्मांतरण झाले आहे. मोडीया गोंडामध्ये धर्मातरणाचा प्रयत्न चालला असला तरी त्याला विशेष प्रतिसाद मिळालेला नाही. दक्षिण भारतात पुळ्या, पुल्लियार आदिवासीनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला आहे. महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील कातकारी, वारली, कोकणा, महादेव कोळी ह्या आदिवासीच्या धर्मातरणासाठी मिशनऱ्यांनी नियोजितपणे प्रयत्न केले आहेत त्यात वसतीगृहे, शाळा, दवाखाने उघडण्याचा आणि उच्च जीवनमानाच्या प्रलोभनाचा समावेश आहे. यांचे प्रत्यंतर चिखलदरा परिसरातील कोरकु लोकामधील धर्मातरणातुन येते. ख्रिश्चन धर्मातील प्रवेशामुळे आदिवासी क्षेत्रात ख्रिश्चन धर्म, चर्च, इंग्रजी शिक्षण, रोमन लिपी पाश्चिमात्य पेहराव, वर्तन प्रणालीस लोकांनी आत्मसात केले आहे. यांचे प्रत्यंतर उत्तरपुर्व भारतातील नागासाखी, मिझो आदिवासीमध्ये येते, ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केल्यामुळे आदिवासीचे संबंध प्रादेशिक, राष्ट्रीय आणी आंतरराष्ट्रीय स्तरावर आले आहेत. त्याच्या जीवनात गतीशिलता प्रत्ययास येते. मात्र त्याचबरोबर काही समस्यासुध्दा निर्माण झाल्या आहेत.

आदिवासीचा परंपरागत धर्म आणि जीवनशैलीचा लोकांना विसर पडला आहे. आदिवासी क्षेत्रात ख्रिश्चन धर्माचा फैलाव झाला असला तरी काही भागात धार्मिक सुधारणावादी चळवळीच्या प्रभावाने आदिवासी मुळच्या धार्मिक प्रणालिचा स्वीकार करीत आहे. हिंदु आणि ख्रिश्चन धर्माच्या स्वीकारासोबतच काही भागात आदिवासीनी इस्लामचा स्वीकार केला आहे, उदाहरणार्थ खानदेशातील तडवी, भिल्ल, लडाख प्रदेशातील आदिवासीनी बौध्दधर्माची जीवनपध्दती मान्य केली आहे.

❖सारांश :—

आदिवासी दुर्गम प्रदेशात राहतात. ही पृथ्यकता नंतरच्या म्हणजे १९ व्या शतकापासुन कमी झाली. या आदिवासी समुदायापैकी काही घटकाचा आणी काही भागात संपुर्ण आदिवासी समुदायाचा मिशनरी, शासकीय अधिकारी, व्यापारी, जमीनदार, ठेकेदार यांच्याशी संपर्क आला आसपासच्या ग्रामीण आणी शहरी जीवनात त्यांचे येणे जाणे वाढले. या भागात चहाचे मळे, कोळशाच्या खाणी, कॉफीचे मळे, पोलादाचे कारखाने उभारण्यात आले या औद्योगीकरणाच्या प्रक्रियेत आदिवासींना नवीन व्यवसाय नौकरी क्षेत्रात प्रवेश मिळाला त्यांच्यात स्थानीय गतीशीलता व्यावसायीक गतीशिलता प्रत्ययास आली.

आदिवासी धर्मावर ख्रिश्चन धर्माचा प्रभाव विभीन्न क्षेत्रात पडलेला दिसतो. इंग्रजी आयदानीत ख्रिश्चन धर्माचा प्रभाव बाजुला उत्तरपुर्व क्षेत्रात नागा, मिझो, गारो आदिवासींनी मोठ्या प्रमाणात धर्मांतर केले. आदिवासी जीवनाचा आढावा घेतला तर आदिवासी समुदायात विविधताआहे ते वेगवेगळ्या सांस्कृतीक स्तरातील आहेत.

❖ संदर्भ ग्रंथ सुची :—

१) प्रा.सी.टी.कांबळे व प्रा.टी.एस.पवळे — भारतातील सामाजिक चळवळीची रूपरेषा, क्रिएटीव्ह पब्लीकेशन, नांदेड पृष्ठ क्र.१०५, १०६

२) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ नाशिक — भारतीय समाज जाती व वर्ग आणि भारतीय आदिवासी, प्रथम प्रकाशन जुन २००२, पुर्नमुद्रन १४ जुलै २०१६ पृष्ठ क्रमांक ६६, ७५, ७६, ६७, ७०, ८०.

३) डॉ.एस.जी.देवगावकर, डॉ.सौ.शैलजा देवगांवकर, डॉ.सौ.जयमाला डुमरे — सामाजिक चळवळी (परंपरागत आणि नवीन) श्री साईनाथ प्रकाशन धरमपेठ नागपुर पृष्ठ क्रमांक ११९

४) डॉ.दिलीप खैरणार — समाजशास्त्र परिचय, डायमंड पब्लिकेशन्स पुणे, आवृत्ती ऑक्टो. २००८.

५) श्री.प्रा.रा.ज.लोटे, डॉ.ए.डी.चौहान — समाजशास्त्र परिचय भाग—२, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लीशर्स, नागपुर पृष्ठ क्र. १०६.

६) Vikipedia. “https://mr. Vikipedia.in/social welfare.

७) archive.mu.ac.in7myweb-test., Runal Dev 2012.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# भारतीय संस्कृती मध्ये देवळांचे महत्व.... हिंदु संस्कृतीच्या अनुशंगाने

डॉ. दिलीप चव्हान
समाजशास्त्र विभाग प्रमूख ,श्रीमती राजकमल बाबूराव तिडके महाविद्यालय, मौदा.

भारत हा देश संपुर्ण जगामध्ये विविध धर्म, पंथ, संप्रदाय संस्कृती यामुळे ओळखला जातो. त्याचप्रमाने भारतात विविध भाषा, बोलीभाषा हया त्यां त्या प्रदेश, विभ्रवार बदलत जातात. त्यांचप्रमाणे भारतातील राज्यांची संरचना देखिल त्यांच्या भाषेवरुनच केल्याचे चित्र दिसुन येते. उदा. महाराष्ट्र (मराठी), गुजरात (गूजराती), पंजाब (पंजाबी), आंध्रप्रदेश (तेलगु), बिहार, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश या राज्यांमध्ये (हींदी), बंगाल (बंगाली), अशा वेगवेगळया राज्यांची आपली स्वतंत्र भाषावार रचना आढळते. त्याचप्रमाने त्या त्या विभागवार बोलीभाषा आढळुन येते. याचे उदा. म्हणजे महाराष्ट्र विदर्भ (या विदर्भात बनेक भाषा आढळूण येतात. यात मराठीत झाडीबोली, पश्चिम महाराष्ट्र असेल तर वह्राडी बोली, नागपूरातील मराठी व हिंदी दोन्ही चा संगम ) या प्रकारची भाषा आपनास पाहावयास व ऐकावयास मीळते.

त्याचप्रमाने आपल्या देशात अनेक जाती, धर्म, पंथ, समूदायाचे लोक राहतात. त्यांच्या चालीरीती, प्रथा, परंपरा, निरनिराळया आढळुण येतात.

१) धर्माचा विचार केल्यास भारतात प्रमूख धर्म ६ आहेत. त्यात प्रामूख्याने हिंदू, मूस्लिम, शिख, ईसाई, पारसी, बौध्द आहेत. तर जातींचा विचार केल्यास १४०० जाती पोटजाती आढळून येतात. त्याचप्रमाने पंथांचा विचार केल्याच कबीरपुंथ, महानुभाव पंथ, असे अनेक पंथ आढळुन येतात.

२) यात धर्मचा विचार केल्यास प्रमुख धर्म हा हिंदु धर्म आहेत. व यात अनेक पोटजाती निर्माण झाल्या आहेत. १४०० हया पोटजाती भारत देशात आहेंत. प्रत्येक जातींच्या अनेक सन समारंभ देखिल आहेत. यात शहरिकरण व ग्रामीण भाग यांचा देखिल प्रभाव आपनास पाहावयास मिळतो. कारण आदिवासी, गोंड अशा अनेक प्रकारच्या संस्कृत्यांचे वेगवेळे सन समारंभ आहेत.

३) त्यानंतर मूस्लिम धर्मामध्ये पण हिंदु धर्माप्रमाणेच जामींचा देखिल पगडा दिसुन येतो. या बरोबरच इतर धर्मांमध्ये देखिल पोटजातींची संख्या आहे. सोबतच त्यांच्या रितीरिवाज, चालीरीती, यांच्यामध्ये फरक आढळून येतो.

आपनास माहित आहे की आपला देश विविध धर्म, जाती, पंथ, परंपरा यांनी नटलेला आहे. रितीरिवाज वेगवेगळे जरी असले तरी यात एकसमान बांधुन ठेवन्याचे कार्य आपले भारतीय संविधान करित आहे. याच संविधानाने भारतातील प्रत्येक व्यक्तीला व्यक्तीस्वातंत्र दिलेले आहे. तो व्यक्ती कोणत्याही धर्माचा त्याग करुन दुसरा त्याला पाहीजे तो धर्म स्विकारु शकतो. त्याला आपल्या मर्जिने जिवन यापन करता येते. तो कोणत्याही राज्यात राहु शकतो. मात्र त्याला संविधानाने काही बंधने देखिल घातलेली आहेत त्याचे तो पुर्णपणे उल्लंघन करु शकत नाही त्या संविधानाच्या चाकोरी बाहेर जावुन कार्य करु शकत नाही. तरि पण याचे अपवादात्मक उदाहरणे आपणास दिसुन येतात मात्र त्या व्यक्तींना संविधानिक कायद्यानुसार दंड देखिल भरावा लागतो. त्याचप्रमाने आपनास विविध सन समारंभ आयोजित करणे, उत्सव करणे याची देखिल मुभा आहे. मात्र धार्मीक उत्सव साजरे करित असतांना प्रत्येक धर्मची एक विशिष्ठ जागा ठरलेली असते. यालाच मंदिरे, मज्जिद, देउळे, विहार, गुरुव्दारा, चर्च अशा नावांनी संबोधिले जाते. या लेखामध्ये आपन हिंदु धर्मातील मंदिरे यांच्याशी संबंधित माहीती प्राप्त करुन घेणार आहोत.

देउळ किंवा मंदिरे हे हिंदु धर्मचे प्रतीक आहे. व त्याचबरोबर ते श्रध्दास्थान देखिल आहे. भारतातील एकूण लांकसंख्येच्या भारतात हिंदु धर्माला मानणारी लोकसंख्या ७९ टक्के आहे. तर मूस्लिम धर्मीय १५.२३ टक्के व बौध्द धर्मीय ०.७० टक्के आहेत. ईसाई धर्मीय २.३ टक्के तर सिख धर्मीय १.७२ टक्के आहेत. म्हणजेच या आकडयावरुन असे दिसून येते की भारतातील हिंदू धर्माला मानणारी लोकसंख्या जास्त प्रमानात आहे.



(मथूरा येथिल क्रिष्ण मंदिर)

पण ज्या प्रमाने इतर धर्माामध्ये धर्मचा संस्थापक स्पष्ट आहे या हिदु धर्मात स्पष्ट नाही. काही विचारवंत रामाला मानतात. काही विचारंवांच्यामते क्रिष्ण मानतात. त्यामूळे हिंदु धर्मात अनेक देवि देवतांना मानण्याची प्रथा रुढ आहे. त्याचप्रमाने त्यांना वेगवेगळया सन समारंभात देखिल पुजले जाते.

त्या अनेक देवि देवतांची मंदिरे देखिल आपनास पाहावयास मिळतात. त्यामूळे भारतात देवळांची संख्या कीती आहे यांचा अंदाज लावणे कठिन आहे. समाजातील प्रत्येक वर्ग आपआपल्या सोइनूसार त्या त्या देवि देवतांचे पुजन करित असतो. यासाठी नेमकी जागा देखिल राखिव ठेवण्यात आलेली असते.

भारतातील हिंदू मंदिरांचा इतीहास—

भारतामध्ये मंदिरांची महान परंपरा राहीलेली आहे. भारतात सर्वप्रथम पुरातन युगापासूनच मान्यता आहे की भारतात अनेक देवि देवतांना पुजन्याची कल्पना आहे. पुर्वी सुर्य, चंद्र, तारे, यांची पुजा करण्याची कल्पना होती. त्यानंतरच्या काळात अनेक बदल होत गेले आणि त्यानंतर मात्र देवांच्या कल्पना बदलत गेल्या व लहान मोठया मंदिरांची कल्पना पुढे आली. त्यानंतर बौध्द धर्माच्या उदयानंतर मात्र संपुर्ण आशिया खंड बुध्दमय करण्याचे कार्य भगवाान गौतम बुध्द यांनी केले. त्या युगामध्ये अनेक राजांनी, सम्राटांनी बौध्द धमाची दिक्षा घेउन संपुर्ण आशिया खंड बौध्दमय केला होता. त्यात महान सम्राट राजा अशोक हे प्रथम स्थानी होते. कलिंगच्या युध्दानंतर त्यांनी संपुर्ण जग बौध्दमय करण्याचे ठरविले त्यानुसार त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना अनेक देशांमध्ये पाठविले त्याचप्रमाने त्यांनी बौध्द भिक्षुंना राजाश्रय दिला. त्यांच्या काळात अनेक विहार बांधन्याची प्रथा रुढझाली. त्याचेच एक उदाहर आपनास बौध्दगया येथिल महाविहार ही त्यांची देन होय. आजदेखिल ते विहार मानाने आपल्या देशाचे प्रतीनिधित्व करत आहे. त्यानंतर देशभरात अनेक विहार बांधन्याचा पाठपुरावा आपनास दिसतो. त्यांच्याच कालकिर्दितील सारनााथ येथिल अशोक स्तंभ आपल्या भारताचे प्रतीक आहे. त्यांनी संपुर्ण आशिया खंडातील अनेक ठिकानी प्रसिध्द बुध्द मंदिराचे निर्माण केले.

त्यानंतर भारतात आलेले आर्य हे अतिशय कट्टर व विष्णुभक्त होते. भारतात आलेले अनेक आर्यापैकी मनु हा एक महत्वकांक्षी व्यक्ती होतो कारण त्यावेळेला एखादी सत्ता उलथुन पाडावयासाठी अनेक षडयंत्र करण्यात येत होते. साम, दाम, दंड, भेद वापरुन आपले कार्य पुर्ण करण्याठी व्यक्ती कोणत्याही स्तराला जाचयास तयाार होते. त्यानंसाारच अनेक रचना करणे, देव देवतांचे विचार, कल्पना येथिल लोकांच्या मनात रुजविने सरु झाले. भारताततील लोक हें बुध्द धर्माची दिक्षा घेतल्यामूळे ते हिसेचा मार्ग सोडुन अहिंसेचा मार्ग पत्करित होते. त्यामूळे काही समाजकटंक लोकोनी याचा फायदा घेउन आपले षडयंत्र सरु ठेवले त्यात अनेक बौध्द राज्यांच्या कत्तली सुरु झाल्या. तेथिल मुळ लोकांना काबिज करणे त्यांना कामापासुन परावृत्त करणे या व अशा अनेक प्रकारे येथिल लोकांचा अमानुश छड सुरु झाला. काही महत्वकांक्षी राजांनी देखिल भारतावर आक्रण केली यात महम्मद घोरी याचे नाव सर्वात प्रथम आहे. कारण यांनीच भारतातील अनेक मंदिरांची नासधुस सरु केली. व त्याठिकानी आपली प्रार्थनास्थळे निर्माण करण्यास सरुवात केली. त्यामूळे भारतातील अनेक मंदिरांची तोड सरु झाली व हेच भारतातील बौध्द धर्माच्या पतनाचे कार्य ठरले.

त्यानंतर हिंदू संस्कृतीचा झपाटयाने वाढ होत गेला. भारतातील बौध्द धर्माचा लोप व इतर धर्माचा उगम होता. हिंदु देव देवळांची निर्मीती कधि झाली याचा उल्लेख सापडत नाही. मात्र या संस्कृतीत सुर्य, चंद्र, तारे, पाणी, वायु या सर्वांना देव मानून पुजनाचे कार्यक्रम चालत असत. कारण पुर्वीच्या काळी शुभ अशुभ या कल्पना होत्या व त्यांना पुजन्याची कल्पना देखिल रुढ होती. यातुनच देवळांचा अदय झाला असावा. मात्र यावरुन असे दिसून येते की आपल्या देशात फार पुर्विपासुनच अवगत आहे. त्या वेळची स्थापत्यकला आज देखिल आपनास पाहावयास मिळते. आजच्या पेक्षा पुर्विच्या स्थापत्यकला आजही त्यांना जोळ नाही व त्या वेळच्या स्थापत्या कला व मंदिरे आजही शाबुत आहेत.

देवळांची रचना—

देउळ हे हिंदू धर्माचे आस्थेचे प्रतीक आहे. हिंदु धर्मातील लोकांना कोणतेही कार्य करावयाचे असेल तर श्शुभ अशुभ हा प्रकार मोठया प्रमानात दिसुन येतो. त्यामूळे आपल्याला देखिल सुख दुख व्यक्त करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ असावे लागते. त्यामूळेच कदाचीत देवळांची निर्मीती झाली असावी असा एक अंदाज आहे. कारण समाजात आपन पाहतो की, कोणतेही कार्य करावयाचे असेल तर देवळांमध्ये आशिर्वाद घ्यावा ही प्रथा आहे. समाजोत शुभ अशूभ कल्पना वाढिस लागल्याने देवळांचे महत्व वाढले आहे. घरात सन, समारंभ, रितीरिवाजानुसार देवळांचे महत्व वाढीस लागले.

देवळांच्या रचनांची विचार केल्यास देवुळ हे विचार केल्यास हे आकर्षक दिसून येतात. श्शांततेचे प्रतीक देखिल मानल्या जाते. यांची रचना वेगवेगळी आहे हे दिसुन येते हे आपनास जाणवते. देवुळ आकर्शक व हिंदु धर्माचे एकतेचे प्रतीक सुध्दा म्हणता येईल. देवळांमध्ये खालील प्रतीक दिसुन येतात.

१. घुमट
२. सभामंडप
३. देवांचे स्थान

४. आवार

असा प्रकार दिसुन येतो त्याचप्रमाने यावर दगळांच्या भागावर कोरीव काम केलेल दिसुन येते. हे कोरीव काम अतीशय सुंदर व सुबक दिसुन येते. हे करीव काम अतीप्राचीन असून त्यातील नक्काशे व अनेक देवी देवतांच्या मूर्त्या देखिल अतिशय सुंदर व सुबक दिसुन येते. मंदिराच्या चारही बाजूंनी नक्काशी काम केलेले आढळते. त्याचप्रमाने पुर्वमूखी कींवा दक्षिणामूखी आढळतात. भारतातील संर्यमंदिर हे सुर्यमुखी आहे. तर हनुमानांची मंदिरे ही अधिकतर दक्षिणामूखि आढळूण येतात. काही मंदिरे हेंमाळपंथी शिल्पाचे आढळतात. काही मंदिरे ही गोल नक्काशीदार खांबावर आढळूण येतात. या सर्वांमध्ये घुमट हे महत्वाचे आहे. त्याला कळस असे म्हणतात. महाराष्ट्रातील विठ्ठलाचे मंदिर हे सुर्यमूखी आहे. व त्यांच्या मदिरावर चांदिचा कळस पाहावयास मीळतो. यात अनेक धर्म, जाती, पंथाचे लोक दर्शन घ्यावयास येतात.

हिंदू धर्मातील देवळांचे उद्देश –

भारत हा विविध जाती, धर्म, पंथ यांनी नटलेला देश आहे. यात आपनास वेगवेगळया जाती, धर्म, पंथानुसार प्रार्थनास्थळे निर्माण केलेली आहेत असे दिसून येते. मात्र याचा अर्थ असा नाही कि त्याच धर्माची लोक त्या मंदिरात, प्रार्थनास्थळात जातील, आज काळ बदललेला आहे. आपनास संविधानाने सर्व धर्म समभावतेचा संदेश दिला आहे. त्यामूळे कोणत्याही जाती, धर्म, पंथाचे लोक प्रार्थना करतांना दिसून येतात. देवळांचा महत्वाचा उद्देश आपनास खालील प्रमाने पाहावयास मिळतो.

१. यात यर्वधर्म समभावाची वाागणुक असावी.
२. कला व संस्कृतीचे दर्शन असावे.
३. आपली संस्कृती ही पीढयानपीढया लोकांना समजावी.
४. या संस्कृतीचे वाचन, अभ्यास करण्यासाठी ही मंदीरे उपयूक्त असतात.
५. बाहेर देशातील व्यक्तींना आपल्या संस्कृतीची जाणिव करुण देता येते.
६. देवळांचे दर्शन व आस्था यांच्याशी जूळलेंले एक भावनीक नाते निर्माण होते.
७. देवळे हे रमनिय स्थळ सुध्दा आहे. कारण त्या नितीत्याने आपन स्थळांना भेटी देण्यासाठी जात असतो. व प्रवासाचा आनंद घेत असतो.
८. आपली पुर्वीपासूनची संस्कृती आपनास पाहता येते. व ओळखता येते.
९. आपन एका बंधनात आहोत अशी जानीव सतत असते.

हिंदू धर्मातील देवळांचे महत्व–

**अ. शारिरिक–**

देवळांमध्ये ज्या पुजा अर्चना होतात त्या एक विशिष्ठ प्रकारच्या असतात. कुठे उभे राहून तर कूठे बसून, विशिष्ठ आसन तयार करुन करत असतात. त्यामूळे आपला शारीरिक व्यायाम सूध्दा होत असते. आपले मन, चित्त, एकाग्र होते. आपले कार्य सूध्दा चांगले होते. वाईट मार्गाची अनुभूती होते. त्यामूळे प्रत्येक व्यक्तीला शारिरिक व्यायाम करणे गरजेचे ठरते.

**ब. मानसिक :–**

देवळांशी व्यक्ती, कूटुंब, समाज, देश यांचे घट्ट नात जूळलेल आहे. मानसिक आस्था जूळलेल्या आहेत. समाजामध्ये आपण भावणेला जास्त महत्व देतो. कोणतेतरी कार्य करण्यासाठी सर्वप्रथम केलेली पुजा हे मानसीकतेचे द्योतक आहे. आपल्या आजारपणात देव व देवळांचे स्थान महत्वाचे वाटते. आपनास मानसिक आधार मीळतो.

आपनास मानसिक आधार निर्माण झाले तर आपले कार्य पुर्णपणे चांगले होतील याची एक मनात शास्वती असते समाजातील प्रत्येक व्यक्तीला मानसिक स्थैर्य निर्माण झाले तर तो आपले कार्य योग्य पध्दतीने करण्यात सक्षम होतो.

**क. कौटुंबीक:–**

देवळांमध्ये संपुर्ण कुटूंबाला घेउन जाणे म्हणजे कुटूंबाला मानसिक स्थौर्य निर्माण करने होय. त्याचप्रमाणे येणा या पीढीला आपल्या संस्कृतीक सौंदर्याचे दर्शन घडविता येते. आपल्या पिढिला त्याचे महत्व आहे हे समजावून सांगता येते.

**ड. सामाजिक :–**

देवळे हे सामाजाला एकत्रित करण्याचे स्थळ होय. हिंदु धर्मातील सन समारंभ यात अनेक कार्यक्रम हे मीळून मिसळून करण्यात येतात. यामूळे आपनास सामाजिक एकत्रिकरण आपनास दिसून येते. समाजाला एक सूत्रात बांधन्यासाठी अशा देवळांचा वाटा फार मोठा आहे.

**हिंदू धर्मातील महत्वाची देवळे :—**

खालीलपैकी मंदिरे भारतातील अनेक भागात आपनास दिसून येतील. त्या त्या भागात यांचे अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले आहे.

१. कोणर्क मंदिर
२. जगन्नाथ पूरी मंदिर
३. चार धाम मंदिर
४. वैष्णोदेवी मंदिर
५. बलाजी मंदिर
६. महालक्ष्मी मंदिर
७. साई मंदिर
८. बुध्द मंदिर
९. गणेश मंदिर

**सारांश :—**

समाजातील आस्थेचे प्रतीक म्हणजे मंदीर होय. भावनिक व सुख शांतीचे स्थान म्हणजे मंदिर होय. सर्व जाती, धर्म, पंथ, यांना या मंदिरात कोणताही थारा नाही. सर्वधर्म समभावतेचे प्रतीक म्हणजे मंदिर होय. भारताला आपल्या संस्कृतीचे दर्शन घडविण्यासाठी तसेच विविध देशातील अभ्यासकांना देवळांची मदत घ्यावी लागते. कारण हिंदू संस्कृतीचा इतीहास हा देवळांचे जतण करुण ठेवलेला आहे.

**संदर्भ :—**

१. बौध्द दर्शन : राहुल सांस्कृत्यायन
२. बौध्द संस्कृतीचा उदय व र्‍हास : के. पी. संखवार
३. भारतीय संस्कृतीमे दलीतो और श्शुद्रों का योगदान : ए. एस. गौतम
४. प्रीयदर्शी अशोक सम्राट : डॉ. बाबासाहेब आंबेडकर
५. हिंदु संस्कृतीचे प्रतीक : आर्य मीश्रा
६. भारत के मूल निवासी व आर्य आक्रमण : स्वपनकूमार विश्वास
७. हिंद के आदि निवासी : पं. छेदिलाल पांडया
८. श्रमण, ब्राम्हण संस्कृतीयोंका संघर्ष : भागीरथ

# उत्तर भारतीय समान स्वर वाले रागों में स्वर—लगाव की तकनीक : एक अध्ययन

दयाशंकर
संगीत विभाग दयालबाग, एजूकेशनल इंस्टीट्यूट दयालबाग आगरा।
मो०— ७८९५७६०३६७, ईमेल—daya05662@gmail.com

**भूमिका—**

संसार की जितनी भी प्राचीनतम संगीत प्रणालियाँ हैं उन सभी में भारतीय संगीत का विशेष स्थान है। भारतीय संगीत की चर्चा होते ही सबसे पहले राग शब्द पर ध्यान जाता है। यद्यपि संसार की लगभग सभी प्रणालियाँ स्वर तथा लय पर ही आधारित हैं किन्तु राग की अवधारणा को भारतीय संगीत की विशेषता माना गया है। प्राचीन काल से लेकर आधुनिक काल तक भारतीय संगीत में अनेक परिवर्तन हुये हैं और यह स्वाभाविक भी है, किन्तु राग का आधार बना रहा है। हिन्दुस्तानी संगीत में राग का बहुत महत्वपूर्ण स्थान है। हिन्दुस्तानी शास्त्रीय संगीत को जो स्थिरता प्राप्त है उसका आधार राग ही है। राग भावों तथा संगीत कला को प्रदर्शित करने का ऐसा माध्यम है जिसमें भाषा, भाव, स्वर, लय, कल्पना तथा कलाकार की कुशलता इन सभी का सुचारू रूप से सामंजस्य दृष्टिगोचर होता है।[१]

उत्तर भारतीय संगीत में ऐसे अनेक राग हैं जिनके स्वरूप से मेल खाते अन्य राग भी प्रचलन में है इन रागों को समप्रकृतिक राग कहा जाता है। ऐसे रागों को स्वतन्त्र स्वरूप प्रदान करने के लिये अनेक आवश्यक तत्व होते हैं जिनके कारण समप्रकृतिक राग अपना स्वतन्त्र स्वरूप प्राप्त करते हैं।

जहाँ तक प्रश्न अलग—अलग स्वरों के प्रयोग का है वहाँ तो रागों में परिवर्तन होना स्वाभाविक है। किन्तु जिन रागों में एक जैसे स्वर प्रयोग किये जाते हैं ऐसे रागों के गायन—वादन में राग की विशेषतायें तथा कलाकार की कुशलता ही राग के उचित स्वरूप का निर्माण कर सकती है। जिसके कारण ये राग एक—दूसरे से भिन्न स्वरूप प्राप्त करते हैं। उत्तर भारतीय संगीत में ऐसे अनेक राग हैं जो स्वर की दृष्टि से तो समान हैं किन्तु स्वर प्रयोग, चलन, वादी—संवादी, रागांग, न्यास, कण, मींड़ इत्यादि के आधार पर वे अपनी स्वतन्त्र पहचान बना लेते हैं।[२]

रागों में प्रयोग किये जाने वाले शुद्ध तथा विकृत स्वर राग विशेष को अन्य राग से स्वतन्त्र स्वरूप प्रदान करते हैं। फिर भी हमारे उत्तर भारतीय संगीत की एक महत्वपूर्ण विशेषता है कि यहाँ पर एक समान स्वरावली अर्थात् एक जैसे शुद्ध—विकृत स्वरों का प्रयोग, आरोह—अवरोह (थाट) समान होते हुये भी इस प्रकार के दो या दो से अधिक राग प्रचलित हैं। समान स्वर होते हुये भी ये राग अपना स्वतन्त्र अस्तित्व बनाये हुये हैं तथा अपने समकक्ष राग से भिन्न स्वरूप प्राप्त करते हैं। ऐसे रागों के स्वरूप निर्धारण में वादी—संवादी, चलन आदि के अतिरिक्त आन्दोलन, न्यास, श्रुतिभेद, सप्तक भेद, कण (स्पर्श), मींड़, गमक तकनीक अत्यन्त सहायक होती है।

**समान स्वर वाले रागों में स्वर लगाव की तकनीक—**

- आन्दोलन तकनीक
- श्रुतिभेद तकनीक
- न्यास तथा सप्तक भेद तकनीक
- कण (स्पर्श), मींड़, गमक तकनीक

• **आन्दोलन तकनीक** — यद्यपि आन्दोलन द्वारा स्वर का लगाव उत्तर भारतीय संगीत के कई रागों में किया जाता है किन्तु समान स्वर वाले रागों में यह तकनीक विशेष महत्वपूर्ण है। चलन, अंग प्रधानता, वादी—संवादी आदि के अतिरिक्त आन्दोलन तकनीक भी समान स्वर वाले रागों के स्वरूप निर्धारण में सहायक होती है।

**भैरव—कालिंगड़ा** — भैरव तथा कालिंगड़ा दोनों ही रागों में समान स्वरावली का प्रयोग किया जाता है। किन्तु दोनों ही रागों में जो प्रमुख अन्तर है वह है ऋषभ व धैवत स्वर का लगाव। भैरव में ऋषभ व धैवत स्वरों का लगाव विशेष आन्दोलन के साथ किया जाता है जिस कारण यह अधिक रंजक हो जाता है। इन स्वरों पर किये जाने वाले विशेष प्रकार के आन्दोलन से ही यह राग उत्तम रीति से व्यक्त हो पाता है।

ऋषभ पर आन्दोलन गंधार के स्पर्श देते हुये किया जाता है,इसका आरोहात्मक उच्चारण करते समय गंधार का स्पर्श विशेष सावधानी से किया जाता है, जिससे ऋषभ के आन्दोलन युक्त उच्चारण में अल्प प्रमाण में गंधार का भी आभास होता है, धैवत पर आन्दोलन करते समय निषाद के कण का प्रयोग किया जाता है।

भैरव की अपेक्षा कालिंगड़ा में ऋषभ, धैवत स्वर दुर्बल हैं तथा इन पर आन्दोलन नहीं किया जाता है इसी कारण यह राग भैरव से अलग स्वरूप प्राप्त करता है।

**मेघ मल्हार—मध्यमाद सारंग** — मेघ मल्हार में ऋषभ का आन्दोलन के साथ प्रयोग इस राग की प्रमुख विशेषता मानी जाती है। मध्यम के सहारे ऋषभ पर आन्दोलन किया जाता है। इसी प्रकार निषाद को आरोह में तार षड्ज तथा अवरोह में पंचम के स्पर्श से आन्दोलित किया जाता है। मध्यमाद सारंग में इन स्वरों का लगाव सरल रूप में किया जाता है।

- **श्रुतिभेद तकनीक** — उत्तर भारतीय संगीत में ऐसे कई राग है जिनमें स्वर प्रयोग करते समय श्रुतियों में सूक्ष्म भेद द्वारा स्वर को निश्चित स्थान से तनिक ऊपर या नीचे लगाया जाता है। इस प्रकार का प्रयोग समान स्वर वाले रागों में अत्यन्त महत्वपूर्ण होता है। स्वर लगाव की यह तकनीक दो समान स्वर वाले रागों के स्वरूप निर्धारण में बहुत सहायक होती है।

**भूपाली—देशकार** — भूपाली और देशकार दोनों ही समान स्वर वाले औडव—आडव जाति के राग हैं यद्यपि दोनों ही रागों के वादी—संवादी, न्यास इत्यादि में अन्तर है फिर भी दोनों रागों में धैवत स्वर का लगाव विशेष रीति से किया जाता है। देशकार में धैवत अपनी शुद्ध अवस्था से तनिक चढ़ा हुआ प्रयोग किया जाता है। श्रुतियों के सूक्ष्म भेद के कारण धैवत ऊँचा लगता है। भूपाली में धैवत का प्रयोग तार षड्ज को छूकर या मींड़ से या आन्दोलन से उच्चारा जाता है।

**मेघ मल्हार—मध्यमाद सारंग** — मेघ मल्हार और मध्यमाद सारंग दोनों ही रागों में समान स्वर प्रयोग किये जाते हैं किन्तु स्वरों के लगाव में भिन्नता के कारण दोनों ही राग अपना स्वतन्त्र स्वरूप प्राप्त करते हैं। निषाद का लगाव दोनों ही रागों में अलग प्रकार से किया जाता है। मध्यमादि सारंग में निषाद का प्रयोग सरल रूप में होता है किन्तु मेघ मल्हार में निषाद का प्रयोग श्रुति भेद द्वारा किया जाता है। आरोह में निषाद का प्रयोग तार षड्ज के स्पर्श से किया जाता है तथा अवरोह में इसे पंचम के स्पर्श से प्रयोग किया जाता है। ''हमारे शास्त्रकारों ने ऐसा बताया है कि मेघ मल्हार में निषाद का लगाव श्रुति भेद द्वारा किया जाता है आरोहात्मक लगाव में निषाद अपने स्थान से थोड़ा ऊँचा तथा अवरोहात्मक लगाव में निषाद अपने स्थान से थोड़ा उतरा होता है।''[3]

- **न्यास तथा सप्तक भेद तकनीक** — उत्तर भारतीय संगीत के समान स्वर वाले रागों में न्यास तथा सप्तक भेद तकनीक के द्वारा भी स्वतन्त्र स्वरूप निर्धारण में सहायता प्राप्त होती है।

**मारवा—पूरिया—सोहनी** — मारवा, पूरिया, सोहनी तीनों में ही समान स्वर प्रयोग किये जाते हैं तीनों में रे कोमल, म तीव्र होता है तथा पंचम वर्जित होने से जाति षाडव है। यद्यपि तीनों रागों में स्वर समान हैं किन्तु वादी—संवादी, चलन, स्वर प्रयोग के अतिरिक्त न्यास भेद तथा सप्तक भेद तकनीक के कारण तीनों ही रागों को स्वतन्त्र स्वरूप निर्धारण में सहायता मिलती है।

राग मारवा में ऋषभ व धैवत स्वरों की प्रबलता, षड्ज का तिरोभाव व ऋषभ पर न्यास करने के बाद विशेष रीति से षड्ज स्वर पर आना तथा इस राग का गायन मध्य सप्तक आदि क्रियायें इसकी प्रौढ़ता, गम्भीरता आदि भावों को स्थापित करती हैं। इसके विपरीत अर्थात् गंधार, मध्यम और निषाद स्वरों को महत्व देते तथा मन्द्र सप्तक की प्रधानता देने से पूरिया का स्वरूप बनता है। राग सोहनी में उत्तरांग के स्वरों की प्रधानता तथा तार षड्ज पर अधिक न्यास इसके स्वरूप को अतिशीघ्र स्पष्ट करता है।

- **कण (स्पर्श), मींड़, गमक तकनीक** — समान स्वर वाले रागों में कण स्वर, मींड़ तथा गमक तकनीक के प्रयोग द्वारा भी इनके स्वरूप में परिवर्तन हो जाता है।

**भूपाली—देशकार—** यह दोनों ही राग समान स्वर वाले राग हैं, समान स्वर होते हुये भी कुछ स्वरों का प्रयोग इन रागों में विशेष तकनीक से किया जाता है जो इन दोनों रागों को अलग स्वरूप देने में सहायक होते हैं।

**कण—** भूपाली में गंधार स्वर का उच्चारण करते समय अपनी इच्छानुसार इस स्वर के प्रारम्भ में अत्यन्त सूक्ष्म दूसरे किसी स्वर का अंश या कण जोड़ दिया जाता है।[४] गंधार को प्रमुख रूप से दिखाते हुये उसमें मध्यम या पंचम का सूक्ष्म कण संगत के रूप में जोड़ देते हैं।[५]

**मींड़—** भूपाली में गंधार स्वर बहुत बल पाता है और वह प्रायः पंचम या धैवत की मींड़ के स्पर्श से अधिक प्रौढ़ व गम्भीर बन जाता है। देशकार के गन्धार को कभी भी मींड़से नहीं लिया जाना चाहिये। उस पर कभी भी आन्दोलन न दिया जाये, उसे पंचम या धैवत का स्पर्श न किया जाये अन्यथा भूपाली का आभास होना।

**भैरव—कालिंगड़ा** — भैरव, कालिंगड़ा दोनों ही समान स्वर वाले राग हैं। इन रागों में कण तथा मींड़ प्रयोग तकनीक द्वारा अन्तर दृष्टिगोचर होता है।

**कण—**ऋषभ व धैवत स्वरों का प्रयोग इन दोनों रागों में बहुत महत्वपूर्ण है। भैरव में ऋषभ व धैवत स्वरों का प्रयोग आन्दोलन युक्त होता है। इस प्रकार आन्दोलन युक्त ऋषभ, धैवत का प्रयोग दोनों रागों को अलग करता है। ऋषभ तथा धैवत पर आन्दोलन करते समय ऊपर के स्वरों का स्पर्श किया जाता है। कालिंगड़ा में ऋषभ, धैवत का प्रयोग करते समय किसी भी स्वर का स्पर्श नहीं किया जाता है। इस प्रकार ये दोनों राग एक—दूसरे से अलग स्वरूप प्राप्त करते हैं।

**मींड़—** भैरव में मींड़ का प्रयोग इस प्रकार किया जाता है— सा—ग म <sup>ग</sup>रे़, ऋषभ पर न्यास करते समय मध्यम से गम्भीरतापूर्वक मींड़ से गंधार को लेते हुये उतरना चाहिये।[६]

कालिंगड़ा में इस प्रकार कण तथा मींड़ का प्रयोग नहीं किया जाता है उसमें सरल स्वरों का प्रयोग होता है।

**गमक तकनीक** — यद्यपि **मेघ मल्हार** तथा **मध्यमाद सारंग** दोनों ही समान स्वर वाले राग हैं किन्तु मेघ मल्हार मींड़, गमक प्रधान राग है तथा मध्यमाद सारंग में स्वरों का प्रयोग सरल रूप में किया जाता है।

**निष्कर्ष** — उक्त अध्ययन से यह स्पष्ट है कि रागों के गायन—वादन में स्वर—लगाव की तकनीक के द्वारा ही रागों में भिन्नता को प्रकट किया जाता है। समान स्वर वाले रागों के गायन—वादन में तो यह तकनीक अधिक महत्वपूर्ण है। स्वर—लगाव की तकनीक के कारण ही समान स्वर वाले रागों को एक—दूसरे से अलग स्वरूप प्राप्त होता है।

**सन्दर्भ ग्रन्थ** —

१.हिन्दुस्तानी संगीत में राग की उत्पत्ति एवं विकास — डा० सुनन्दा पाठक, प्रथम संस्करण, राधा पब्लिकेशन, १९८९
२.प्रचलित समप्रकृतिक रागों का तुलनात्मक अध्ययन— डा० शशि कालड़ा, २०११, पे०—५४—५५
३.पं० विकास कशालकर द्वारा साक्षात्कार के माध्यम से प्राप्त विचार
४.हिन्दुस्तानी संगीत के रागों में ऋषभ स्वर का महत्व—डा० रामशंकर
५.हिन्दुस्तानी संगीत पद्धति—प्रथम भाग, पं० भातखण्डे, पे०—८३
६.संगीताजलि, पंचम भाग, पं० ओंकारनाथ ठाकुर

# महिला सक्षमीकरणात बचतगटाची भूमिका

प्रा. बाळासाहेब विठ्ठलराव तौर

सहाय्यक प्राध्यापक आणि विभाग प्रमुख समाजशास्त्र विभाग,

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंकुशनगर, ता. अंबड,

जि. जालना– ४३१२१२, मो.नं.-९४०३८८९२१९,ई मेल –balrajetaur100@gmail.com

**गोषवारा–**

महिलांचा सामाजिक, आर्थिक विकासासाठी निर्माण केलेले एकात्मिक ग्राम विकास कार्यक्रम (IRDP),स्वयरोजगारासाठी ग्रामीण युवकांना प्रशिक्षण कार्यक्रम (CRYSM), ग्रामीण क्षेत्रातील महिला व बाल विकास(BWCRA), ग्रामीण कारागिरांना सुधारित साहित्य पुरविणे(STTRA),अशा विविध योजनांचे एकत्रीकरण करून,'स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना' निर्माण करण्यात आली आणि या योजनेअंतर्गत बचतगटाची निर्मिती करून महिलांना आपल्या आर्थिक विकासाची संधी उपलब्ध करून दिली. त्यामुळे त्यांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक सक्षमीकरण होण्यास मदत होत आहे.

महिला बचतगट म्हणजे,'महिला एकत्र येतात, त्या एकमेकांना मदत करतात, पैशाची बचत करतात, बचत केलेल्या एकत्रित पैशातून छोटासा व्यवसाय सुरू करतात व स्वतःचे आर्थिक व्यवहार स्वतः निर्णय घेऊन करतात आणि त्यातून मिळणाऱ्या नफ्यातून कुटुंब चालवतात या कार्यासाठी एकत्रित आलेल्या महिलांच्या गटाला महिला बचतगट असे म्हणतात.

बचतगट ही एक सामाजिक चळवळ आहे. सामाजिक चळवळ म्हणजेच सामूहिक प्रयत्नाद्वारे समाजाच्या प्रचलित व्यवहार, विचार आणि सामाजिक संबंधांमध्ये परिवर्तन घडवून आणणे होय. या चळवळीची सुरुवात सर्वप्रथम १९७६ मध्ये बांगलादेशातील एका विद्यापीठाने 'जाबरा' या गावात बचतीवर आधारलेल्या स्वयंसहाय्यता समुहाची स्थपना केली. आज हीचळवळ फक्त बंग्लादेशापुरती मर्यादित न राहता अत्यंत अल्प काळात संपूर्ण आशियाई देशात पसरली आहे. महिला बचतगट ही एक महत्त्वपूर्ण योजना असून. महिलाबचतगटामुळे महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थितीत सुधारणा होत आहे. त्यांच्या नेतृत्वगुणांचा विकास होऊन राजकीय सहभाग वाढला आहे. त्यांच्यात सचोटी, मेहनत करण्याची प्रवृत्ती, आत्मविश्वास वाढून त्यांचे सामाजिक सक्षमीकरण झाले आहे. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधामध्ये,'महिला सक्षमीकरणात बचतगटाची भूमिका' या अध्ययन विषयाची निवड करूनबचतगटाची संकल्पना आणि ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेऊन महाराष्ट्रातील बचतगटाचाअभ्यास करणे, महिला सक्षमीकरण आणि बचतगट यांचा सहसंबंध तपासणे आणि बचतगटासमोरील आव्हाने अभ्यासने इत्यादी बाबींचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**मुख्यशब्द** -महिला,सक्षमीकरण, बचतगट, भूमिका.

**प्रस्तावना -**

जगातील प्रत्येक देशात समाज व राष्ट्राच्या विकासातील एक महत्त्वाचा घटक म्हणजे महिला आहेत. तरीही जगभरातील महिला आजही उपेक्षित जीवन जगत आहेत. भारतीय समाजव्यवस्थेचा विचार केला असता भारतीय महिला विकासाच्या प्रक्रियेपासून खूप दूर असल्याचे दिसून येतात. भारतातील पुरूषप्रधान समाजव्यवस्थेने या ना त्या कारणास्तव त्यांना विकास प्रक्रियेपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेने महिलांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा दिलेला आहे. तसेच भारताने आपले आर्थिक धोरण राबविताना पुरूषांप्रमाणेच महिलांनाही समान संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. असे असले तरीही आज भारतीय महिला सामाजिक, आर्थिक,शैक्षणिक व राजकीय यासारख्या सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या तुलनेत मागास असल्याच्या दिसून येतात.

जागतिकीकरणाच्या युगात महिलांना आजही दुय्यम स्थान दिले जाते. शहरी भागात हे प्रमाण कमी असून ग्रामीण भागात आजही अतिशय विदारक दृश्य पहावयास मिळते. महिलांच्या दुय्यम स्थितीमुळे वर्तमानकाळात महिलांच्या विकासासाठी जगभर अनेक चळवळी, आंदोलने, धोरणे व विविध योजना राबविल्या जात आहेत. त्यापैकीच महिला बचतगट ही एक महत्त्वपूर्ण योजना आहे. महिलांच्या सक्षमीकरणात महिला बचतगटाची महत्वाची भूमिका असलेली आपल्याला दिसून येते. महिला बचतगटामुळे महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थितीत सुधारणा होत आहे. त्यांच्या नेतृत्व गुणांचा विकास होऊन राजकीय सहभाग वाढला आहे. त्यांच्यात सचोटी, मेहनत करण्याची प्रवृत्ती,आत्मविश्वास वाढवून त्यांचे सामाजिक सक्षमीकरण झाले आहे. म्हणून प्रस्तुत,'महिला सक्षमीकरणात बचतगटाची भूमिका' या अध्ययन विषयाला खूप महत्त्व आहे.

**संशोधनाचे उद्देश -**

1. बचतगटाची संकल्पना आणि ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेणे.
2. महाराष्ट्रातील बचतगटाचा अभ्यास करणे.
3. महिला सक्षमीकरण आणि बचतगट यांचा सहसंबंध तपासणे.
4. बचतगटासमोरील आव्हाने अभ्यासणे.

**संशोधन पद्धती–**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन आराखडाचा उपयोग केला असून. सदरील विषयाच्या संदर्भातील तथ्ये संकलनासाठी दुय्यम स्रोतांचा उपयोग केला आहे. त्यामध्ये शासकीय व निमशासकीय संस्था, नाबार्ड यांच्या अहवालाचा उपयोग करून, संदर्भग्रंथ, नियतकालिके, मासिके, संकेतस्थळे, वर्तमानपत्रे इत्यादी चा उपयोग केला आहे.

**बचतगटाची संकल्पना –**

महिलांचा सामाजिक, आर्थिक विकासासाठी निर्माण केलेले एकात्मिक ग्राम विकास कार्यक्रम (IRDP),स्वयरोजगारासाठी ग्रामीण युवकांना प्रशिक्षण कार्यक्रम (CRYSM), ग्रामीण क्षेत्रातील महिला व बाल विकास(BWCRA), ग्रामीण कारागिरांना सुधारित साहित्य पुरविणे(STTRA),अशा विविध योजनांचे एकत्रीकरण करून,'स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना' निर्माण करण्यात आली आणि या योजनेअंतर्गत बचतगटाची निर्मिती करून महिलांना आपल्या आर्थिक विकासाची संधी उपलब्ध करून दिली. त्यामुळे त्यांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक सक्षमीकरण होण्यास मदत होत आहे.

महिला बचतगट म्हणजे,'महिला एकत्र येतात, त्या एकमेकांना मदत करतात पैशाची बचत करतात, बचत केलेल्या एकत्रित पैशातून छोटासा व्यवसाय सुरू करतात व स्वतःचे आर्थिक व्यवहार स्वतः निर्णय घेऊन करतात आणि त्यातून मिळणाऱ्या नफ्यातून कुटुंब चालवतात या कार्यासाठी एकत्रित आलेल्या महिलांच्या गटाला महिला बचतगट असे म्हणतात.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी–**

बचतगट ही एक सामाजिक चळवळ आहे. सामाजिक चळवळ म्हणजेच सामूहिक प्रयत्नाद्वारे समाजाच्या प्रचलित व्यवहार, विचार आणि सामाजिक संबंधांमध्ये परिवर्तन घडवून आणणे होय. या चळवळीची सुरुवात सर्वप्रथम १९७६ मध्ये बांगलादेशातील एका विद्यापीठाने 'जाबरा' या गावात बचतीवर आधारलेल्या स्वयंसहाय्यता समुहाची स्थपना केली. आज हीचळवळ फक्त बंग्लादेशापुरती मर्यादित न राहता अत्यंत अल्प काळात संपूर्ण आशियाई देशात पसरली आहे.

रिझर्वबँकेच्या सहकार्याने नाबार्डने म्हसूर पुनर्निर्माण आणि मीरादा एजन्सी (MYRAADA) या स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने भारतात सर्वप्रथम १९८७ -८८ मध्ये स्वयंसहायता गटासंबंधी प्रकल्पाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर अशा गटांचा विस्तार संपूर्ण देशात झाला. याचा विचार करून भारत सरकारने २४ जुलै १९९१ मध्ये 'भारतीय रिझर्व बँक' व २६ फेब्रुवारी १९९२ मध्ये 'राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण बँक' यांनी परिपत्रके काढून या

योजनेला अधिकृतरीत्या मान्यता दिली.१९९९पासून केंद्र सरकारने 'स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार' योजनेअंतर्गत स्वयंसहायता गटांची निर्मिती करण्यास सुरुवात केली.

**स्वर्णजयंती स्वयमरोजगार योजनेअंतर्गत स्थापन झालेल्या महाराष्ट्रातील बचतगटाविषयी माहिती -**

आज भारतात पंचवीस लाख ८० हजार बचतगट असून महाराष्ट्रातील बचतगटाची संख्या १ लाख पंचवीस हजाराच्या जवळपास आहे. महाराष्ट्रातील बचतगटाविषयीची माहिती पुढील तक्त्यात जिल्ह्यानुसार दिली आहे.

| अ.क्र. | जिल्हा | बचतगटांची संख्या | महिला बचतगटांची संख्या | व्यवसाय सुरू केलेले एकूण बचतगट | व्यवसाय सुरू केलेले महिला बचतगट |
|---|---|---|---|---|---|
| १. | ठाणे | ५५४९ | ४५४५ | १६३६ | १०६९ |
| २. | रायगड | ४५०६ | ३९४८ | ७३४ | ५५४ |
| ३. | रत्नागिरी | ५१६९ | ३३०२ | ३६५६ | ३६२ |
| ४. | सिंधुदुर्ग | ३४८१ | १९३२ | ५१८ | ३१७ |
| ५. | नाशिक | ४८०३ | ३०१८ | १३५२ | ८५० |
| ६. | धुळे | २६३२ | १८३८ | २८१७ | ७५५ |
| ७. | नंदुरबार | ३००१ | २८२१ | २५३१ | ५५० |
| ८. | जळगाव | ६५६३ | ४४४८ | २१३७ | १६३७ |
| ९. | अहमदनगर | ४७८१ | २६२२ | ३२०२ | ८५८ |
| १०. | पुणे | ७३०५ | ५५११ | ४४३४ | ८७२ |
| ११. | सातारा | ४४२१ | ३४४३ | २७१० | ७४३ |
| १२. | सांगली | ३६८५ | ३५४७ | २००९ | ६८० |
| १३. | सोलापूर | ८६४४ | ७२४४ | ५२४८ | १४१३ |
| १४. | कोल्हापूर | ६५६९ | ५३८० | ३१७२ | ८८९ |
| १५. | औरंगाबाद | ४२३७ | ३०८० | ७५६ | ३३३ |
| १६. | जालना | २९४५ | २१३४ | ५८५ | ६४६ |
| १७. | परभणी | २४४७ | १९३६ | ४७६ | ४७६ |
| १८. | हिंगोली | २५५८ | १५९५ | १७०१ | ४१३ |
| १९. | बीड | ३१०१ | २५१२ | १३८० | ४४३ |
| २०. | नांदेड | ४८८५ | ४४०९ | १०११ | ७८८ |
| २१. | उस्मानाबाद | ४४०० | २७६९ | २२९८ | ४५१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २२. | लातूर | ४००६ | ३६६९ | ३०१४ | ८१७ |
| २३. | बुलढाणा | ६६८३ | ३१५१ | ४८१२ | ५४४ |
| २४. | अकोला | ५४७६ | ४३११ | ११०७ | ७९५ |
| २५. | वाशिम | २९३३ | २१४७ | २१८८ | ६४९ |
| २६. | अमरावती | ८५१२ | ६९९७ | ६२९० | १४३१ |

(स्रोत : लोकराज्य, डिसेंबर– २००७)

उपरोक्त तक्त्यामध्ये महाराष्ट्रातील स्वर्णजयंती ग्राम स्वयरोजगार योजनेअंतर्गत स्थापन झालेली सर्व जिल्ह्यातील एकूण बचतगट, महिला बचतगट व व्यवसाय चालू केलेली बचतगट यांची सविस्तर माहिती दिलेली आहे.उपरोक्त तक्त्याचे विश्लेषण केले असता असे दिसून येते की, महाराष्ट्रात सोलापुर जिल्ह्यात सर्वाधिक बचतगट आहेत तर परभणी जिल्ह्यात सर्वात कमी बचतगट आहेत. एकूण बचतगटांपैकी जवळपास ८० टक्के बचतगट हे महिला बचतगट आहेत. व्यवसाय सुरू केलेल्या बचतगटामध्ये सर्वाधिक प्रमाण अमरावतीचे तर सर्वात कमी प्रमाण परभणीचे आहे.

**महिला सक्षमीकरणात बचतगटाची भुमिका -**

आजही मागास असलेल्या ग्रामीण महिलांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय विकास करून त्यांचे खऱ्या अर्थाने सामाजिक सक्षमीकरण आज महिला बचतगटाच्या माध्यमातून होत असल्याचे दिसून येते. ते पुढील प्रमाणे सांगता येईल-

**१. आर्थिक विकास–**

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये समानतेच्या मूल्या ऐवजी लिंग,जात आधारित विषमता होती. प्रथा, परंपरा आणि दारिद्र्याच्या विळख्यात सापडलेल्या महिलांना अपमानास्पद जीवन जगावे लागत होते. परंतु महिला बचतगटांची चळवळ सुरू झाली आणि महिलांची उन्नती होऊ लागली. बचतगटाच्या माध्यमातून महिला एकत्र येऊन एकमेकींच्या आर्थिक समस्या बचतीच्या माध्यमातून सोडू लागल्या आणि पिढ्यानपिढ्या दारिद्र्याच्या विळख्यात जीवन जगणाऱ्या महिलांना बचत गटाच्या माध्यमातून एक आशेचा किरण मिळाला.

**२. सामाजिक विकास–**

बचतगटात सहभागी झालेल्या महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याबरोबरच सामाजिक भान आले आहे. समाजाच्या विकासात आपणही महत्वाची भूमिका पार पाडून सामाजिक परिवर्तन घडवून आणू शकतो याची जाणीव झाल्याने त्या आज दारूबंदी कार्यक्रम, रोगनिदान शिबिर याबाबत गावागावातून समाज प्रबोधन करीत आहेत. शासनाने सुरू केलेल्या'संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान हागणदारी मुक्त गाव' अभियानात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून येतो. तसेच खाजगी सावकारी पाशात अडकलेल्या आपल्या कुटुंबाला बचतगटाकडून आर्थिक मदत व कर्ज घेऊन मुक्त करीत आहेत. म्हणून बचतगट चळवळ ही महिला सक्षमीकरणातील महत्त्वाचे साधन समजले जाते.

**३. महिला नेतृत्वाचा विकास–**

'चूल आणि मूल' एवढेच सीमित क्षेत्रात अडकलेल्या महिला आज बचतगटाच्या चळवळीमध्ये सहभागी झाल्यामुळे घराबाहेर पडू लागल्या त्यामुळे त्या जागतिक, राष्ट्रीय पातळीवर काय घडामोडी घडत आहेत हे समजून घेत असून त्यावर चर्चा देखील करत आहेत. त्यामुळे त्यांच्यातील निर्णयक्षमता वाढली आहे, राजकीय सहभाग वाढला आहे आणि त्या माध्यमातून नवीन नेतृत्व उदयास येत आहे. त्याचे फलित म्हणून आज अनेक स्त्रिया सरपंच, जिल्हा परिषद सदस्य, आमदार, खासदार, मंत्री, राष्ट्रपती या पदावर यशस्वीरित्या कार्य करीत आहेत. तसेच नेतृत्व विकासामुळे महिलांमध्ये संघभावना वाढली. आज त्या ग्रामसभेत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

**४. शैक्षणिक विकास–**

शिक्षण हे सामाजिक विकासाचे महत्त्वाचे साधन आहे. शिक्षणामुळे आपल्यातील सुप्त गुणांचा विकास होऊन आत्मनिर्भरता व निर्णय क्षमता वाढते. याची जाणीव आज महिलांना झाले आहे. तसेच सुशिक्षित महिला बचतगटात आल्यामुळे त्या इतर बचतगटातील महिला आपल्या पाल्यांना शिक्षण देऊन त्यांच्या बौद्धिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. शिक्षणाचे महत्व पटल्यामुळे बचतगटातील महिलांनी प्रोढ साक्षरता वर्ग, बालवाडी, पाळणाघरे यासारख्या योजना सुरू केल्या आहेत. थोडक्यात बचतगटाच्या माध्यमातून शिक्षणाचा विकास होऊन महिलांच्या वैचारिक जाणिवा समृद्ध आणि संपन्न होत आहेत.

**बचतगटा समोरील आव्हाने–**

बचतगटानी महिलांच्या सक्षमीकरणात महत्त्वाची भूमिका बजावली असली तरी आज बचतगटा समोर अनेक आव्हाने असल्याचे दिसून येतात. राज्यभर अनेक स्वयंसेवी संस्था आणि कार्यकर्ते आपल्या पद्धतीने बचत गटाचे माध्यम वापरून काम करत आहेत. हे सर्व प्रकार आपल्या सोयीप्रमाणे राबवले जातात. गटांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढली असली तरी अनेकदा संख्या अधिकृतपणे कुठेही नोंदवलेली नाही हे अत्यंत दुर्दैवी आहे. केंद्रीय पद्धतीने माहिती मिळत नसल्याने संसाधनाचा दुरुपयोग तर होतोच शिवाय चुकीचे निष्कर्षही समोर येण्याचा धोका वाढतो. ग्रामविकास खात्याने संपूर्ण संगणकीकृत डेटाबेस बनवण्याचे काम हाती घेतले आहे. पुणे विभागात ते पूर्ण झाले आहे इतर विभागात ते पूर्ण करणे आवश्यक आहे. एखादा विभाग किंव्हा संस्थेने यासंदर्भात शिखर संस्था म्हणून कार्य करणे आवश्यक आहे. त्यामुळे कामात एकजिन्सीपणा येईलच शिवाय कार्याचे व्यवस्थापनही अधिक चांगल्या पद्धतीने होणे शक्य होईल.

**सारांश–**

ग्रामीण भागातील महिलांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी व महिलांना आर्थिक व सामाजिक दृष्ट्या सक्षम बनवून राष्ट्रीय विकासात सहभागी करून घेण्यासाठी शासन अनेक प्रकारच्या योजना राबवत आहे त्यातील महिला बचतगट अतिशय महत्त्वाची योजना किंवा चळवळ महिलांचा आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक विकास करून त्यांच्यातील नेतृत्व गुणाला प्रोत्साहन देऊन राजकीय सहभाग वाढवत आहे. त्यामुळे त्यांच्यातील सचोटी, मेहनत करण्याची प्रवृत्ती, आत्मविश्वास यामध्ये वाढ झाली आहे. महिला बचतगटा समोर आज अनेक आव्हाने जरी असले तरीही ग्रामीण महिलांचे खऱ्या अर्थाने सक्षमीकरण करण्यात महिला बचतगट हे महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

**संदर्भग्रंथ–**

१. Nassir Naeem and Magma Zia, (2009),'MicroFinance in India Issues and Strategies-in Micro Finance and Women Empowerment by Raid Ahmed', Mittal Publication, New Delhi.
२. BasuKishanjit and Jindal Krishna, (2000), 'Micro Finance Emerging Challenges', Banker's Institute of Rural Development Publication, Luknow.
३. DrustiStreeAdhyanProbodhan Kendra, (2007), 'An Evaluation of Impact of SHG on the Social Empowerment o Women in Maharashtra, National Commission for Women, New Delhi.
४. GaikwadMadhav, (2012), 'the study of SHG in Maharashtra, Article, Arthvichar, 2 Year, Volume 1st, Feb. – 2012.
५. Shashikala and Uma H. R., (2011), ' Women Empowerment Through SHG's: a Study', Article, Southern Economist, 49 year, Volume 49, 19 Nov.-2011.
६. मुलांनी एम. यु., (२००६),'महिला स्वयंसहायता गट', डायमंड पब्लिकेशन, टिळक रोड, पुणे.
७. योजना, एप्रिल – (२००७).
८. लोकराज्य, डिसेंबर –(२००७).

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# मनोरंजन माध्यमे आणि महिलांची स्थिती

सहा. प्रा. डॉ. अतुल पुंजाजी राउत
श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, वाशीम
Mail - atulraut.wsm@gmail.comCell - 9850298137

**प्रस्तावना :-**

भारतीय व्यवस्थेमध्ये अनेक घडामोडी दिसून येतात, भारतीय इतिहासात अनेक बदल झालेले दिसतात, काही बदल झपाट्याने तर, काहींचा वेग कमी आहे. राजकारण, सत्ता, अधिपत्य इत्यादी बाबतीत हे बदल दिसून येतात, या बदलाची मूळ कारणे अनेक आहेत. त्यापैकी समाजमन हे महत्त्वाचं. समाजाचे एखाद्या बाबीकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा आहे त्यावरून काही घटना घडतात अनेक बाबी यामध्ये येतात उदाहरणार्थ सत्ताधारी कोण असायला पाहिजे ? कोण्या घराण्याकडे सत्ता असावी ? क्रीडाक्षेत्र कोणी चालवावे ? मनोरंजन क्षेत्रात कोणती व्यक्ती असायला पाहिजे ? तसेच समाजातील प्रत्येक घटका विषयी एक मत या समाजमनाचे बनलेले आहे सामाजिक घटकांमध्ये स्त्री-पुरुष, वृद्ध, बालक असे अनेक घटक दिसून येतात त्या प्रत्येक घटकांबाबत एक धारणा समाजमनाची असते. प्रत्येकाचा दर्जा समाज मनामध्ये ठरलेला असतो. त्यामध्ये वेळ,काळानुसार बदल होत आहे, तसेच विशिष्ट जात, धर्म याबाबतही ही मत समाजमनाचे बनलेले असते.

या सर्व बाबतीत समाजाच्या मनामध्ये मत तयार होण्यामागे अनेक घटक जबाबदार असतात जसे, ऐतिहासिक विचार, रूढी, प्रथा, कायदे, नियम, संस्कृती, थोरांची शिकवण, ग्रंथ साहित्य, मनोरंजनाची साधने, जाहिरातील इत्यादी अनेक बाबी मधून समाजातील लोकांच्या मनात एखाद्या विषयी मत बनत असते व तशीच मानसिकता समाजाची दिसते अशा अनेक समाज घटकांपैकी महिला किंवा स्त्री या घटका विषयीचे समाज मत कसे आहे या संदर्भात अभ्यास करण्याचा योग मला माझ्या संशोधनातून मिळाला आणि स्त्री विषयीची भावना व मानसिकता मला समाजातील घटकांची अभ्यासता आली. वर उल्लेख केल्याप्रमाणे समाजातील प्रत्येकच घटका विषयाचे मत तयार होण्यात अनेक बाबी कारणीभूत आहेत.तसेच स्त्रियांची आजची स्थिती, या अगोदर ची स्थिती, असण्यात किंवा स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या वागणुकी विषयी अनेक घटकांनी समाज मत बनवल आहे त्यामध्ये प्रचलित रूढी, प्रथा याबरोबरच कायदे, नियम, मनोरंजनाची माध्यमे, सोशल मीडिया यांचाही समावेश आहे. आजच्या या सोशल मीडियाच्या जगात मनोरंजनाच्या साधनांचा स्त्रियांच्या स्थितीवर काय परिणाम झाला किंवा होत आहे ? किंवा असेही म्हणता येईल की महिलांच्या आजच्या दर्जा निर्धारणात मनोरंजन माध्यमे ची भूमिका काय आहे ?

माझ्या समाज विज्ञान शाखेतील समाजकार्य विषयातील आचार्य पदवी करता सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा विषय"स्त्रीभ्रूणहत्येस कारणीभूत सामाजिक, आर्थिक आणि मानसशास्त्रीय पैलूचे अध्ययन" हा असल्यामुळे समाजातील अनेक घटका सोबत स्त्रियांच्या दर्जाबाबत चर्चा करण्यात आली. त्यामधून महिलांचा दर्जा याविषयीचे मत समाजमनात कोणत्या घटकामुळे बनत आहे हे समजण्याचा प्रयत्न केला गेला.

**उद्देश :-**

संशोधन कार्याच्या माध्यमातून मिळालेल्या माहितीच्या आधारे पुढील उद्देश या शोध निबंधासाठी मांडले गेले.

1. समाज जीवनावर व समाज वर्तना वरील मनोरंजन माध्यमाचा प्रभावअभ्यासणे.

2. महिलांच्या बाबत सामाजिक मत निर्धारणात मनोरंजन माध्यमाची भूमिका अभ्यासणे.

संशोधन कार्य करत असताना मिळालेल्या माहितीच्या आधारे महिलांची जी आजची स्थिती आहे यामध्ये, कसे परिवर्तन होत गेले याचा अभ्यास झाला व त्यामधून अनेक घटकांपैकी मनोरंजन विश्व किती महत्त्वाची भूमिका,समाज मत बनविण्यात बजावत आहे ते समोर आले.

**उपकल्पना :-**

वरील उद्देशाच्या बाबतीत अनेक घटकाचा अभ्यास करण्यापूर्वी मांडलेले मत

1. मनोरंजन माध्यमाचा समाज मनावर चांगलाच प्रभाव दिसून येतो.
2. महिलांच्या विषयी बदलत्या विचारसरणीवर मनोरंजन माध्यमांची भूमिका महत्वाची आहे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधात माझ्या संशोधनातून मिळालेल्या माहितीच्या आधारे, ज्यामध्ये प्राथमिक सामग्री निरीक्षण, मुलाखत अनुसुची, चर्चा इत्यादी साधनाबरोबरचदुय्यम सामग्री ज्यामध्येअनेक लेख, पुस्तके, मासिके, वृत्तपत्र व टीव्ही,चित्रपट ,धारावाईक इत्यादी चा उपयोग झाला. असून शोधनिबंध मांडण्यासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**विषयाचे महत्त्व :-**

सामाजिक प्रश्नांची उकल होऊन सामाजिक प्रश्नावर समाधान निर्माण करणे गरजेचे आहे.मुळात सामाजिक संशोधनाच्या माध्यमातून हाच उद्देश महत्त्वाचा आहे. त्या अनुषगाने प्रस्तुत विषय हा समाजातील महत्त्वाचा घटक, महिलांशी संबंधित आहे अनेक प्रश्नांची व सामाजिक समस्यांची सुरुवात महिलांच्या बाबतीत असणाऱ्या दुय्यम दर्जामुळे, तिला मिळणाऱ्या निम्न्तेमुळे झाली आहे. म्हणून समाजात आजही एवढ्या मोठ्या प्रमाणात जनजागृती होऊन सुद्धा समता, न्याय, बंधुत्व, मानवाधिकार सारख्या मूल्यांची रुजवण होऊनसुद्धा स्त्रियांची स्थिती पुरुषांच्या तुलनेत दुय्यमच आहे. यासाठी समाजातील जबाबदार साधनांचा शोध घेऊन त्या माध्यमातून सकारात्मक जागृती होणे गरजेचे आहे. या शोधनिबंधाचा उपयोग निश्चितच मनोरंजन माध्यमांचे महत्त्व समजून घेण्यासाठी होईल. व त्या माध्यमातून महिलांच्या स्थिती निर्धारणातील या माध्यमाचे योगदान समजून येईल.

**तथ्य संकलन :-**

या शोधनिबंधा करिता, प्राप्त झालेली आचार्य पदवी च्या माध्यमातून संकलित केलेल्या प्राथमिक व दुय्यम स्त्रोताचा उपयोग करण्यात आला. हिंगोली जिल्ह्यातील 1075 पैकी 288 ग्रामीण अंगणवाडी सेविकांच्या मतांचे अध्ययन या संशोधनात केले गेले . त्या माहितीचा आधार घेऊन दुय्यम स्त्रोताच्या माध्यमातून ज्यामध्ये अनेक वाहिन्यांवरील मनोरंजन करणाऱ्या मालिका, कौटुंबिक मालिका, चित्रपट इत्यादी च्या व्दारे केलेले अवलोकनावरून व मिळालेल्या माहितीच्या आधारे हा शोध निबंध पूर्ण करण्यास मदत होत आहे. महिलांची संख्या देशातच नव्हे तर कमी अधिक प्रमाणात महिलांची स्थिती पुरुषांपेक्षा सर्वच ठिकाणी दुय्यम आहे, याला अनेक कारणे जबाबदार आहेत जसे, पुरुषप्रधान संस्कृती, महिला विषयीचे अनेक मते, महिलांना मिळालेल्या नैसर्गिक देणगी चाचुकीचा अर्थ लावणे, महिला उपभोग्य वस्तू, महिला दासी इत्यादी अश्या अनेक कारणातून, मानसिकतेतून महिलांना दुय्यम स्थान आहे. मग ते शिक्षण, कामाचा मोबदला, लग्नविधी, निर्णय अधिकार इत्यादी अनेक बाबतीत आजही अनेक महिला हिंसाचाराच्या, अत्याचाराच्या बळी पडत आहेत. राजकीय क्षेत्रातही महिला उमेदवाराचे काम नवरोबा किंवा इतर पुरुषाच्या हाती आहे असे दिसते. सरकारी किंवा इतर नोकरीतही बऱ्याच प्रमाणात हस्तक्षेप आहे. स्त्री ही अबला आहे ,तिच्यामध्ये निर्णयक्षमता कमी आहे असे चित्र पाहावयास मिळते. आर्थिक,सामाजिक,राजकीय,सांस्कृतिक बाबतीत दुय्यम अशीच महिलांचे स्थान आहे. लिंग गुणोत्तरावरून हे अजूनच स्पष्ट होईल, आजही देशांमध्ये एक हजार पुरुषांच्या मागे 940 महिलांचे प्रमाण आपल्याला दिसते.राज्यात तर हे प्रमाण 925 आहे.

**महिलांच्या दर्जात परिवर्तन घडवून आणणारे घटक :-**

अनेक काळापासून महिलांची स्थिती दुय्यम असली तरी मात्र, महिलांना उत्तरोत्तर अनेक अधिकार मिळत आहेत. पूर्वीपेक्षा आज महिलांना अनेक क्षेत्रामध्ये संधी मिळत आहे,तरी त्या- त्या क्षेत्रात महिलांचे स्थान निम्नच आहे. कारण कायदा, नियम, आरक्षण इत्यादींमुळे महिलांची स्थिती वर पाहता सुधारत आहे पण सामाजिक मानसिकता अजून बदलले नाही. म्हणून महिलांचे शोषण दिसते. महिलांना मिळालेले अधिकार,महिलांना मिळत असलेल्या संध्या, याच्या पाठीमागे अनेक घटक आहेत उदा. कायद्यातील समानतेची तरतूद, आरक्षण, आधुनिक शिक्षण, पाश्चात्य शिक्षण, समाजसुधारकांचे कार्य त्याचबरोबर मनोरंजनाची माध्यमे इत्यादी यामध्ये समाजमन बदलविण्यासाठी या बाबी महत्वाच्या ठरत गेल्या व महिलांना संधी प्राप्त होऊन गेली. शिक्षणातून समानतेची शिकवण दिली गेली. नोकरीतील आरक्षणामुळे नोकरीमध्ये महिलांचा सहभाग वाढला.याबरोबरच मनोरंजनाची साधने आता घराघरात पोहोचली आहेत. त्याचा परिणाम सर्वात जास्त तळागळातील लोकांमध्ये होत आहे.

विशेषतः जी महिला स्वतःच्याच मनाने स्वतःला अबला समजत होती स्वतःला दासी समजत होती तिच्या मध्ये पण आता बदल होत आहे. टीव्हीवरील धारावाईक, चित्रपट बघून त्यांच्यामध्ये तर आत्मविश्वास वाढतोच आहे आणि इतर समाजातील व्यक्तींना स्त्रियांची शक्ती व अधिकाराची जाणीव होत आहे. आज मनोरंजन वाहिन्या घराघरात आहेत दूरदर्शन बरोबर खाजगी वाहिन्यांनी घराघरात जागा मिळवली आहे व यातूनच अनेक मालिका, धारावाईक हे जीवनातील एक भाग बनल्या आहेत. एखादा अभिनेता किंवा एखादी अभिनेत्री कशी वागते त्यानुसार तरुण-तरुणी वागत आहेत.

सोशल मीडियाचा पण मोठा परिणाम दिसून येत आहे. या चित्रपटामधून धारावाईक मधून महिलांची स्थिती व महिलांच्या मनाची बाजू दाखविली जाते. त्याचा परिणाम हा जनजीवनावर होत असून कुटुंबामध्ये महिलांच्या बाबतीत सकारात्मकता निर्माण होत आहे. पूर्वीच्या काळात समाजामध्ये असणाऱ्या विविध प्रथा -परंपरा यांच्या सन्मानासाठी चित्रपटांमधून सुद्धा सामाजिक चित्रण दाखविले जात होते, त्यामध्ये महिलांची भूमिका ही गृहिणी अशीच सर्वसाधारणपणे दाखविल्या जात होती. परंतु त्यावेळी चित्रपटातून जे दाखवायला पाहिजे ते दाखविले गेले नाही. तेव्हाही अनेक प्रेमी जोडपे दाखवले जायचे त्यामध्ये अभिनेत्रीकडून नैतिकता, विश्वासाची अपेक्षा दाखवली जायची. भारतीय चित्रपटसृष्टीने समाजातील रूढी- प्रथांना तडा बसेल असे काही केले नाही. एकदा जीवनसाथी निवडला तर मरेपर्यंत तोच असावा, अशा अनेक कहाण्या चित्रपटात या अगोदर दाखवल्या गेल्या, मग तो व्यसनी असो, नालायक असो, बिनकामाचा असो वा व्यभिचारी असो त्याला सुधारण्याची जबाबदारी पत्नीची आहे असेही काही चित्रपटात, धारावाईक मध्ये दाखविले गेले, त्यानंतर काही काळ गेल्यावर पुन्हा त्याचं घरांमध्ये समायोजन करावे असेही काही कहाण्या, कथा चित्रपटातून दाखवले जात होते. परंतु हळूहळू जसजसे महिलांनाही अधिकार आहे यासंबंधीचे चित्रपट येत गेले त्या पद्धतीच्या धारावाईक अनेक वाहिन्यांवर दाखविल्या जाऊ लागल्या. आता मात्र काही धारावाईक मधून, मालिकांमधून स्त्री यांच्या अधिकाराचा उल्लेख दिसून येतो. कुटुंबामध्ये स्त्री किती महत्त्वाची आहे, हे दिसते या करिता चालू काळातील काही मालिका चित्रपटाचा उल्लेख महत्वाचा ठरेल उदा. सास भी कभी बहू थी, ये रिश्ता क्या कहलाता है, चार दिवस सासूचे माझ्या नवऱ्याची बायको, अगबाई सासुबाई, अगबाई सुनबाई,आई कुठे काय करते. अशा अनेक मालिका आज खाजगी वाहिन्यांवरून प्रदर्शित होत आहेत तर बंदिशाळा सारखी चित्रपट स्त्री अधिकारांची जाणीव करून, समाजमन बदलवण्याच काम या माध्यमातून होत आहे. पूर्वी विधवा स्त्रियांना पुनर्विवाहाचा अधिकार नव्हता, पण आता नालायक पतीला सोडून दुसरे लग्न लावून देण्याची मानसिकता मुलीच्या सासू-सासऱ्यांची होत आहे. हे या मालिकांमधून दिसत आहे म्हणजे महिलांना सुद्धा आनंदी व स्वमनाने जीवन जगण्याचा अधिकार आहे हे मनोरंजन विश्वातील कथाकार यांना समजले आहे, हि स्थिती समाजात मांडण्याचे त्यांचे धाडस आता होत आहे. अशा प्रकारचे अनेक चित्रपट सुद्धा आहेत यामध्ये महिलांचा हक्काचा, त्यांच्या इच्छांचा विचार केला गेला आहे पुरुषप्रधान संस्कृतीचा अट्टाहास सोडून स्त्रीवादाचा स्वीकार करणारे अनेक चित्रपट , मालिका समाजमन बदलण्याचा प्रयत्न करीत आहे.

**सारांश :-**

या शोधनिबंधाच्या माध्यमातून पुढे ठेवलेल्या उद्देशानुसार व केलेल्या अध्ययनानुसार, आजही महिलांची स्थिती असावी तशी नसली तरी, पूर्वीपेक्षा महिलांच्या अधिकाराबाबत मात्र निश्चितच जागृती होत आहे असे दिसते. तशा प्रकारची परंपरा समाजात दिसून येत आहे. या सर्व बदलाच्या मागे कायदा, नियम, शासकीय धोरण या बरोबरच शिक्षण, प्रसार माध्यमे मनोरंजनाची माध्यमे, सोशल मीडियाचा सहभाग खूप मोठ्या प्रमाणात आहे. त्यातील सर्वात महत्त्वाचे म्हणजे मनोरंजन साधन होईल कारण इतर घटक हे शासकीय किंवा नियमाचा भाग आहे म्हणून पाळावेलागतात. परंतु मनोरंजनाच्या माध्यमातून केली गेलेली जागृती ही मन परिवर्तनासाठी प्रभावी असते. आज नवनवीन मालिकांचा, चित्रपटांचा मानवी जीवन वर्तनावर परिणाम दिसून येत आहे. आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग चित्रपट व मालिकेतल्या भूमिका बनत आहेत. म्हणूनच समाज वर्तनावर मनोरंजन माध्यमाचा प्रभाव हा खूप मोठ्या प्रमाणात दिसून येतो याच चित्रपट व मालिकांच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या जनजागृती बरोबरच इतरही काही बाबी या वाहिन्यांच्या माध्यमातून जनमानसात पसरविल्या जात आहेत, उदाहरणार्थ कधीकधी वस्तू विक्रीला प्रतिसाद मिळावा म्हणून जाहिराती मध्ये तर चित्रपटाला चांगली टीआरपी मिळावी म्हणून महिलांचा किंवा स्त्रियांचा उपयोग केला जातो. कधीकधी अंग प्रदर्शन केले जाते, ज्यामुळे स्त्रीविषयीची कामवासना जागृत केली जाते यामुळे टीआरपी वाढत असेलही पण स्त्रीयाची सामाजिक असुरक्षितता वाढते. त्यामुळे मनोरंजन विश्वातील अनेक निर्मितीच्या माध्यमातून समजावर प्रभाव पडतो निश्चित आहे.

त्यामुळे धारावाईक जाहिराती या माध्यमातून महिलांचा आदर सन्मान ठेवला गेला पाहिजे. समाजातील अनेक घटक आता मनोरंजन विश्वातील अनेक चित्रपट व मालिका च्या माध्यमातून आपले जीवन जगत आहेत. त्यामुळे खुप मोठी जबाबदारी मनोरंजन माध्यमांवर येऊन पडली आहे. कोणत्या घटकाने समाजात कशा पद्धतीने

वागावे किंवा वागले पाहिजे हेही कमी अधिक प्रमाणात या मनोरंजन माध्यमातून समाज शिकत असतो. त्याचे अवलोकन करत असतो. म्हणून महिलांच्या अनेक अधिकाराची जाणीव समाजाला या माध्यमातून होऊ शकते. अनेक कौटुंबिक मालिकेमधून, कुटुंबामध्ये स्त्री मनाचा विचार होत आहे, म्हणजे महिलांना समाजात कोणते स्थान असावे याची जागृती करणे,हि मोलाची भूमिका माध्यमे बजावू लागले आहेत. या सर्व विवेचनातून असे स्पष्ट होते की मनोरंजनाच्या माध्यमावर समाजपरिवर्तनाची खूप मोठी जबाबदारी आहे. ज्या पद्धतीने मालिका व चित्रपटाच्या कथा तयार केल्या गेल्या तशा पद्धतीची जीवनशैली अनेक लोक जगू लागतात त्यामुळे, सुधारात्मक स्त्री सन्मानाच्या मालिका प्रसारित झाल्या तर, स्त्रियांच्या आदराची सवय लागेल व अशाच प्रथा परंपरा निर्माण होतील. या मध्ये मनोरंजनाच्या माध्यमातून समाजमन बदलणे सोपे होईल म्हणजे अनेक कुप्रथा बंद होऊन नवीन समताधिष्ठित, समानताधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण होऊ शकेल.

**संदर्भ :-**

1. प्रा. सुरेश मेश्राम – प्रात्यक्षिक सामाजिक संशोधन – यश प्रकाशन, नागपूर.

2 .प्रा. पांगुळ-बारहाते नंदा-भारतीय ग्रामीण समुदाय विकास – आर.बी. प्रकाशन, नागपूर.

3. स्त्री- भ्रूण हत्या एक गंभीर सामाजिक राजकीय समस्या कारण उपाय 11 फेब्रुवारी 2012 (संपादक प्रा प्रतिभा टावरी गोसे महाविद्यालय, खामगाव)

4. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम 2005

5. चार दिवस सासूचे (कलर्स मराठी वरील टीव्ही ची मालिका)

6. अगबाई सासुबाई (झी मराठी वरील मालिका)

7. अगबाई सुनबाई (झी मराठी वरील मालिका)

8. माझ्या नवऱ्याची बायको (झी मराठी वरील मालिका)

9. आई कुठे काय करते (स्टार प्रवाह वरील टीव्ही ची मालिका)

10. ये रिश्ता क्या कहलाता है (स्टार वरील मालिका )

11. बंदिशाळा (मराठी चित्रपट )

12. उंबरठा (मराठी चित्रपट )

13. Ph.D thesis(2018) “स्त्रीभ्रूणहत्येस कारणीभुत सामाजिक आर्थिक आणि मानसशास्त्रीय पैलूचे अध्ययन”

# अंधश्रद्धेवर स्वसंकल्पनेचा होणारा परिणाम : एक मानसशास्त्रीय अध्ययन

प्रा. डॉ. अनिल आय. थूल

अनिकेत समाजकार्य महाविद्यालय,देसाईगंज (वडसा), जि. गडचिरोली

मो.नं.८८०६०४६०१० ,Mail ID : anilthool@gmail.com

**सारांश**

रोटर्स यांच्या सामाजिक अध्ययन सिद्धांतामुळे स्थानिक नियंत्रण केन्द्र (Locus of Control) ही संकल्पना विकसित झाली. काही व्यक्ती आपल्या वर्तनाचे नियंत्रण केन्द्र म्हणून नशीब किंवा दैवांना महत्व देतात म्हणजेच आपल्या जीवनात घडणाऱ्या विविध घटना, प्रसंग याबाबत स्वत:चे नशीब, दैव इत्यादी बाह्य शक्तिस जबाबदार धरतात. याला बाह्य नियंत्रण केन्द्र (External Locus of Control)किंवा बाह्य घटक म्हणतात. याउलट काही व्यक्ती आपल्या वर्तनाचे नियंत्रण केन्द्र नशीब व संधी याला जबाबदार न धरता स्वत:ला व स्वत:च्या प्रयत्नाला किंवा कर्तृत्वाला जबाबदार धरतात. म्हणजेच स्वत:च्या नशीबावर, दैवावर स्वत:चेच नियंत्रण असणे म्हणजेच स्वकर्तृत्वावर विश्वास असणे याला आंतरिक नियंत्रण केन्द्र (Internal Locus of Control) असे म्हणतात. स्थानिक नियंत्रणाच्या बाबतीत बाह्य व्यक्तिच्या वर्तनाचे नियंत्रण केन्द्र आंतरिक किंवा स्वत:च्या आत्मशक्तित असते. सदर विषयावर सहसंबंधाची पडताळणी केली असता सकारात्मक स्वसंकल्पना जास्त बुद्धीमत्ता आणि आंतरिक नियंत्रण केन्द्रीत व्यक्ती ह्या नकारात्मक स्वसंकल्पना, कमी बुद्धीमता व बाह्य नियंत्रण केन्द्रीत व्यक्तिपेक्षा कमी अंधश्रद्धाळू असतात. तसेच पुरूष हे स्त्रियांपेक्षा कमी अंधश्रद्धाळू आढळतात. यामध्ये शिक्षणाची भूमिका सुद्धा महत्वाची आहे.

**अंधश्रद्धा**

भारतीय लोकांची एकूण जडणघडण आणि उभारणी ही दैववाद, नशीब, मोक्ष, पूर्वजन्म, कर्मसिद्धांत, ज्योतिष्य, चमत्कार, शुभ—अशुभ, व्रतवैकल्ये अशी कितीतरी अतार्किक, अवैज्ञानिक, भोंगळ कल्पना फलद्रूप होण्यासाठी केली जाणारी निरर्थक कर्मकांडे कोणतीही प्रथा, परंपरा किंवा एखादी घटना नीट तपासून तिची उपयुक्तता व सत्यता पडताळून स्विकारण्याऐवजी रूढीग्रस्त वृत्ती व मानसिकता कमी होतांना दिसत नाही. हे निरक्षर, अडाणी लोकांच्या बाबतीतच घडते असे नव्हे तर चांगले सुशिक्षीत, विज्ञानाच्या कितीही पुढे गेले तरी विज्ञानाच्या अभ्यासातून वैज्ञानिक दृष्टी आणि वैज्ञानिक मनोभाव निर्माणच होत नाही. अंधविश्वाचे चलन हे दिवसेंदिवस वाढतच असल्याचे दिसते आणि या अंधविश्वासाची कास या विज्ञान युगातही टिकूण आहे असे दिसून येते. इंग्रज व्यक्ती सुद्धा यात मागे नाहीत स्पेसर आणि हक्सले असे मानत की, १३ हा आकडा त्यांच्यासाठी अशुभ आहे. बुद्धीप्रामाण्यवादी सुद्धा यावर विश्वास ठेवतात की, जर आपणास नवीन कार्य सुरू करावयाचे असल्यास ते शुक्रवारी करू नये. कारण शुक्रवार हा दिवस नवीन कार्य करण्यासाठी योग्य नाही.

आजचे युग हे स्पर्धेचे युग म्हणून ओळखले जाते. या युगात मानवी जीवन अतिशय गतिमान आहे. असे निदर्शनास येते. तंत्रज्ञान व औषधीशास्त्र यात बरीच प्रगती झाल्याचे दिसते. तरीही मनुष्याने अतार्किक कार्यवृत्ती किंवा अंधश्रद्धा जोपासल्या आहेतच. आजच्या काळातही आरसा फुटणे हे अशुभ मानणारे लोक आहेतच.

जोहोदा (Johoda) - (१९६९) यांच्या मते, अंधश्रद्धा हा मनुष्याच्या जीवनाचा एक अत्यंत महत्वाचा घटक आहे. अंधश्रद्धा या एखाद्या नियंत्रकाप्रमाणे मानसशास्त्रीय कार्य करतात.

**व्याख्या**

१) प्रा. सौ. आशा परूळेकर यांच्या मते, "डोळस दृष्टिकोन बाळगता अंधपणाने जी श्रद्धा जोपासली जाते त्याला अंधश्रद्धा म्हणतो."

२)प्रा. श्याम मानवाच्या मते, "जे मूळात सत्य नाही, त्यावर विश्वास ठेवणे म्हणजे अंधश्रद्धा होय."

३)ज्योतिराम भोसले यांच्या मते, "अंधश्रद्धा म्हणजे एखादी परंपरेने आलेली विज्ञान व

बुद्धीच्या कसोटीला न उत्तरणारी गोष्ट म्हणजे स्विकारणे होय.”

**स्वसंकल्पना**

स्वसंकल्पनेविषयी गार्डन आलपोर्ट म्हणतात, “स्व म्हणजे ज्याची आपल्याला ताबडतोब जाणीव होते. म्हणजे आपल्यामध्ये असलेला एक प्रकारचा गाभा होय.” म्हणजेच व्यक्तीचे स्वत: विषयीचे विचार म्हणजे स्वसंकल्पना होय. स्वत:चे स्वत: विषयीच्या सर्व समजूती आणि स्वत: विषयीची संपूर्ण माहिती ही संकल्पनेत समाविष्ठ आहेत. व्यक्तिची स्वत:कडे पाहण्याची अभिवृत्ती ही स्वसंकल्पनेत समाविष्ठ आहे.

व्यक्तिच्या अभिवृत्तीचे तीन विभाग आहेत.

(१) बोधात्मक

(२)भावनात्मक

(३) क्रियात्मक

(१) बोधात्मक अंगात स्वत: बद्दल वर्णनाचा समावेश होते. जसे मी बुद्धीमान, प्रामाणिक, ईमानदार, महत्वाकांक्षी, उच्च, बलवान, वजनदार इत्यादी आहे.

(२)भावनात्मक भावनात्मक अंगात स्वत: बद्दलच्या भावनांचा समावेश होतो. जसे मी लोकांना आवडत नाही, मला झूरळाची भीती वाटते, लोकांना माझे गाणे आवडते, स्त्रिया माझा तिरस्कार करतात, मला सर्दिचा त्रास होतो, मी कुत्र्याला घाबरतो वगैरे या भागात भावनात्मक बाबींचे मूल्यांकन होते.

(३) क्रियात्मक अंगात मनुष्य स्वत: कसा वागेल व कसे वागण्याची शक्यता आहे हा भाग अंतर्भूत होतो. जसे (त्या अपघाताचे वर्णन ऐकल्यानंतर मी माझे रडू आवरू शकलो नाही. म्हणजेच वेदनेची तीव्रता फार मोठ्या प्रमाणात असते. तेव्हा अशा क्रिया व्यक्त होतात.

**अध्ययनाचे उद्देश**

(१)स्वसंकल्पनांचे अंधश्रद्धेशी संबंध जाणून घेणे.

(२)मुले व मुली यांच्यातील अंधश्रद्धेबाबत फरक शोधणे.

(३)विज्ञान व कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या अंधश्रद्धेचे स्वरूप पाहणे.

**अध्ययन पद्धती**

देसाईगंज शहरातील असलेले २ विज्ञान महाविद्यालय, २ कला व वाणिज्य महाविद्यालय व १ समाजकार्य महाविद्यालयातील ६० विद्यार्थ्यांची नमुना म्हणून नियमित अंकन पद्धतीने निवड केली. अध्ययनाचे क्षेत्र हे गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज (वडसा) शहर आहे. या अध्ययन कार्यात (१) ई. एल. सिंग यांची अंधश्रद्धा मापण श्रेणी (२) डॉ. मुक्ताराणी रस्तोगी यांची स्वसंकल्पना मापण श्रेणी (३) रोटर्स यांची स्थानिक नियंत्रण मापण श्रेणी यांचा उपयोग केला आहे. या अध्ययनात २×२×२ या घटनात्मक आराखड्याचा उपयोग करण्यात आला. या अध्ययनात उत्तरदात्यांच्या गुणांकनावरून त्याचे सरासरी मूल्य (Mean) आणि प्रमाण विचलन मूल्य (SD)काढण्यात आले. व दुसऱ्या टप्प्यात उत्तरदात्यांच्या गुणांकाचे विश्लेषण व स्पष्टीकरण करण्यासाठी त्रिमार्गी सांख्यिकीय पद्धतीचा उपयोग केला.

**विषय विश्लेषण**

प्राचीन काळामध्ये समाजामध्ये अंधश्रद्धेचे प्रमाण जास्त होते. त्यामुळे या अंधश्रद्धा समाजामध्ये दैनंदिन जीवनात दिसून येत असते. पण आजच्या वैज्ञानिक युगातसुद्धा अंधश्रद्धा असल्याचे दिसून येते. अंधश्रद्धेबाबत अनेक संशोधकांनी अभ्यास केला असता, त्यांना असे दिसून येते की, सर्व प्रकारच्या अंधश्रद्धांमध्ये निसर्गवादाला महत्व देण्यात आले आहे.

गडचिरोली जिल्हा आदिवासी व मागास म्हणून ओळखला जातो. त्यामुळे इथे इतर जाती पेक्षा आदिवासींचे प्रमाण जास्त आहे. व ते देवदेवतांना जास्त महत्व देतात. म्हणून त्यांच्यात इतरांपेक्षा अंधश्रद्धेचे प्रमाण जास्त दिसून येते. महाविद्यालयात विविध विद्याशाखेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या अंधश्रद्धेविषयी मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून अध्ययन कार्य करण्याकरीता प्रेरीत होवून सदर विषयावर अध्ययन कार्य केले.

**प्रमुख शोध**

(१)स्वसंकल्पनेवर उच्च सार्थक फरक आठ वर्गीकृत समुहात आढळते. तरीही सकारात्मक संकल्पनेशी संबंधीत लोक नकारात्मक स्वसंकल्पनाच्या व्यक्तिपेक्षा कमी अंधश्रद्धाळू आढळते.
(२)उच्च बुद्धीमता असेलल्या लोकांची निम्न बद्धीमता असलेल्या लोकांशी तुलना केली असता कमी अंधश्रद्धाळू आढळले.
(३)आंतरिक नियंत्रण केन्द्र असलेले लोक बाह्य नियंत्रण केन्द्र असलेल्या लोकांपेक्षा कमी अंधश्रद्धाळू आढळले.
(४)विज्ञान शाखेतील व्यक्ती ह्या कला आणि समाजकार्य व्यक्तिशी तुलना करता कमी अंधश्रद्धाळू आढळले.
(५)स्त्रीया ह्या तुलनेने पुरूषांपेक्षा जास्त अंधश्रद्धाळू आढळल्या.

**निष्कर्ष**

वरीलप्रमाणे निरीक्षणावरून असे निष्कर्ष काढण्यात आले की, सकारात्मक स्वसंकल्पना, उच्च बुद्धीमता आणि आंतरिक नियंत्रण केन्द्र असलेली व्यक्ती ह्या नकारात्मक स्वसंकल्पना, कमी बुद्धीमता व बाह्य नियंत्रण केन्द्र असलेल्या व्यक्तीपेक्षा कमी अंधश्रद्धाळू असतात. पुरूष हे स्त्रियांपेक्षा कमी अंधश्रद्धाळू आढळतात. यामध्ये शिक्षणाची भूमिका महत्वाची आहे. कारण कला व समाजकार्य शाखेतील विद्यार्थी हे विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांपेक्षा जास्त अंधश्रद्धाळू आढळतात.

**संदर्भ सूची**

१)कऱ्हाडे डॉ. बाबू (२००४), आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, मानवता सांस्कृतिक विकास शोध केन्द्र, चामोर्शी.
२) कतरणी सौ. स्फुर्ती (२०००), 'मानसशास्त्रीय विचार विषयक आणि उपाययोजना' साईनाथ प्रकाशन, नागपूर.
३) देशपांडे प्रा. सु. वा. (१९८०), 'मानसशास्त्रीय प्रयोग',कॉन्टनेन्टल प्रकाशन, पुणे.
४) दाभोळकर डॉ. नरेन्द्र, 'अंधश्रद्धा विनाशाय',राजहंश प्रकाशन, पुणे.
५) परूळेकर प्रा. सौ. आशा, 'जनमनाचे मानसशास्त्र',विमल प्रकाशन, पुणे—३०.
६) पंडीत डॉ. र. पी. (१९८५), 'मानसशास्त्राची मुलतत्वे',विद्या प्रकाशन, नागपूर.
७) बोधनकर डॉ. सुधीर व अलोणी प्रा. विवेक (१९९९), 'सामाजिक संशोधन पद्धती',साईनाथ प्रकाशन, नागपूर.
८) मानव प्रा. श्याम (१९९०), 'वादळ अंधश्रद्धेचे',मनोविकास प्रकाशन, मुंबई.
९) Adornaort Al (1930), 'The Authoritari an Personality', Newyork Harper.
१०)Becker S. M., 'Superstitions and Suggestions', Disserstation 1969-70.
११)Johoda G., 'The Psychology of Supersition', Great Britain Pelican Books 1970.
१२)Plug C., 'An Investigation of Supersititous Belters and Behaviour Journal of Behaviourial Science', 1975 (June) Vol. 2 (4) P. P. 169-178.
१३)Willian Benton, 'Encyclopaedia Britanic Vol. 21 University of Chicase 1969. Mannual For Raven's Progressive.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)

ISSN : 2278-9308
July 2021

# अश्विनी भिड़े देशपांडे द्वारा रचित राग छायानट के बंदिश का सांगीतिक अध्ययन

**Amol Wasudeorao Gawande**
Research Scholar Of Jjtu
Under the Guidance of ,Dr.Sobharani Kodesia & Dr. Shirish Kadu
MOB:- 9823983614,Email :-amolwgawande4@gmail.com

**प्रस्तावना :—**

बंदिश के तीन तत्व विशेष रूप में देखे जाते हैं जिसमें स्वर ताल और पद यह विशेष है प्रस्तुत बंदिश यह राग छायानट में स्वरबद्ध की गई है और द्रुत तीनताल में बांधी हुई रचना है। बंदिश के विश्लेषण की दृष्टि से बंदिश के विविध अंगों का विश्लेषणात्मक अध्ययन करना महत्व का है उस हिसाब से प्रस्तुत बंदिश के विविध अंगों का अध्ययन करते हैं।

**स्थाई और अंतरा के काव्य का भावार्थ:—**

आवन कहिलवा पिया मोरा कछु और ना लागे जिया ।

प्रस्तुत बंदिश में मेरा पिया परदेस से घर आने को कह रहा है और यह खबर सुनकर प्रेमिका पत्नी या माशूका का खुशी के मारे कहीं काम में दिल नहीं लग रहा है।

जबसे गये पतियाँ हूँ न भेजी नींद न जाने मोरी अँखियाँ ।।

प्रेमिका अपने प्रेमी को जब से गए आपने पतिया यानी कि चिट्ठी संदेशा भेजा नहीं है और इसी कारण आप जब से गए हो तब से मेरी अंखियों ने नींद नहीं ली है।प्रस्तुत काव्य मे एकभी यह जोडाक्षरे नहीं है। पारंपरिक गीतों में जोडाक्षर युक्त शब्द होगा, तो वह शब्द उच्चार—सुलभ करने की रीत है। लेकिन यहां एक भी शब्द उच्चार सुलभ करने की आवश्यकता नहीं दिखाई देती।

**तात्पर्य** — यह संपूर्ण रचना गायन के लिए उच्चार सुलभ है। राग गायन की दृष्टि से देखा जाए तो बंदिश की शुरुआत द्रुत तीनताल के नवें मात्रा से शुरू होती है।स्थाई में कहिलवा शब्दों में से 'वा' यह अक्षर सम पर आकार युक्त आने के कारण आलाप गायन की दृष्टि से उपयुक्त है। स्थाई और अंतरा के अंतिम पंक्ति में पतियाँ,जिया — अखियां इन शब्दों के माध्यम से रचनाकार के द्वारा यमक साधा गया है।

**राग छायानट** द्रुत तीनताल

**स्थायी** : आवन कहिलवा पिया मोरा
कछु ओर ना लागे जिया।

**अंतरा** : जबसे गये पतियाँ हूँ न भेजी
नींद न जाने मोरी अँखियाँ।।

**स्थायी** :

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सा—— | रे —— | —— | रे | गरे | ग | म | धप |
| आऽ | ऽव | ऽऽ | न | ऽ | क | हि | ल |
| ० | | | | ३ | | | |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प | ग | म | रे | सा | — | रे | सा | रे—— | सा —— | —— | ध़ | मिप़ | प़ | सा | रे |
| वा | ऽ | ऽ | पि | या | ऽ | मो | रा | कऽ | ऽछु | ऽऽ | औ | ऽऽ | र | ना | ऽ |
| x | | | २ | | | ० | | | | ३ | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सारे | ग | रेग | म | मरे | रे | सा | — | |
| ला | ऽ | गे | ऽ | ऽ | जि | या | ऽ | आवन |
| x | | | २ | | | | | ० |

**अंतरा** :

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प | प | सां | सां | सां | — | सां | सां |
| ज | ब | से | ग | ये | ऽ | प | ति |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | ० | | | | ३ | | | |
| सां | ध | सा | रें | सां | ध | सांध | प | सां | — | ध | प | रे | ग | म | प |
| यॉ | ऽ | हूॅं | न | भे | ऽ | जी | ऽ | नीं | ऽ | द | न | जा | ऽ | ने | ऽ |
| x | | २ | | | | ० | | | | ३ | | | | | |
| म | ग | म | रे | सा | रे | सा | — | | | | | | | | |
| मो | ऽ | ऽ | री | अॅ | खि | यॉ | ऽ | आवन | | | | | | | |
| x | | २ | | | | ० | | | | | | | | | |

स्थायी :— आवन क हि ल वा पि या मो रा क छु ओ र ना ला गे जि या
अंतरा :— ज ब से ग ये प ति यॉं हूॅं न भे जी नीं द न जा ने मो री अॅं खि यॉं

उपर अधोरेखांकित किये हुए — आ न व क ल प य म र ग ज इन अक्षरों के पुनरावृत्ती से जो छोटे—छोटे अनुप्रास तैयार हुये है, उनकी गितो के नादमाधुर्य में महत्वपूर्ण भूमिका रही है ।

**सारांश** :— इस गीत की काव्यरचना मे प्रेयसी अपने प्रियकर से रूठ कर शिकायत कर रही है, जो विरह रस से अनुकूल और नादमधुर है। गायन अभिव्यक्ति के दृष्टी से काव्य निश्चित ही उत्तम दर्जे का है। अक्षर की पुनरावृत्ति का अनुप्रास का प्रयोग करके काव्य की शोभा बढ़ाई है, यह उच्च कोटि की बंदिश रचनाकार के द्वारा रची गई है।

**स्वर अभ्यास** :—स्वर अभ्यास के दृष्टि से देखा जाये तो इस बंदिश के स्वर रचना मे छायानट राग के राग दर्शक स्वर समुदाय निम्नलिखित है।

**राग स्वरूप** :—बंदिश की प्रथम पंक्ति — सा रे रे ग रे
बंदिश की द्वितीय पंक्ति — सा रे रे ग ग म
बंदिश की तृतीय पंक्ती — सां ध सां रें सां
बंदिश की चौथी पंक्ति — सां ध प रे ग म प म ग म रे सा

नट अंग दिखाने वाले सा रे रे ग ग म यह प्रथम पंक्ति में आने वाले स्वर समूह द्वितीय मे पुनरावृत्त हुआ है।ग म रे रे सा यह प्रथम पंक्ति में आने वाले स्वर समूह द्वितीय में पुनरावृत्त हुआ है। सां ध सां रे यह तृतीय पंक्ति में आने वाले स्वर समूह और चौथी पंक्ति सां ध प रे मे पुन: पुनरावृत्त हुआ है। प रे स्वर संगति से कल्याण अंग दिखाई देता है।

उपरोक्त विश्लेषण से रचनाकार ने राग छायानट का स्वरूप प्रभावी ढंग से बंदिश मे दिखाया है, राग स्वरूप के ऊपर उनकी पकड़ तथा बंदिश की रचना निर्माण और स्वरांकन में कोई शिथिलता नहीं है। यह स्पष्ट रूप से दिखाई पड़ता है। जो स्वर समुदाय बार—बार आऐ है, उनको राग वाचक स्वर समुदाय कहते है।उदा.— सा रे रे ग ग , सा ध प रे ग म प म ग म रे सा रे साप्रस्तुत बंदीश में आरोह—अवरोह दर्शक स्वर समुदाय लिखने के बाद निम्नलिखित आरोह—अवरोह सिद्ध होता है।

आरोह— सा रे रे ग ग म प,ध नि सां ।
अवरोह— सां नि ध प ग म रे सा ।

**निरीक्षण** :— राग छाया कुछ गायकों के मतानुसार छायानट राग, छाया और नट इन दो रागों के मिश्रण से बना है। किन्तु केवल 'छाया' के स्वतंत्र रूप का कहीं वर्णन नहीं मिलता।छायानट के आरोह में निषाद का और अवरोह में गान्धार का वक्रत्व है। जो बंदिश में हमें दिखाई देता है।प्रचार में राग छायानट की बंदिशों में तीव्र मध्यम का आरोहात्मक रूप में प्रयोग दिखाई देता है लेकिन उपरोक्त बंदिश मे तीव्र मध्यम का प्रयोग किया नहीं है केवल शुद्ध मध्यम का ही प्रयोग बंदिश में किया गया है।सा रे रे ग ग यह स्वर संगति स्थायी मे २ बार प्रयुक्त हुई है जो नट अंग का प्रदर्शन करता है।अंतरा में प रे स्वर संगति कल्याण अंग निर्देशित करता है।

**तात्पर्य** :—अश्विनी भिड़े देशपांडे जी के बंदिश के द्वारा राग छायानट का स्वरूप स्पष्ट होता है। यह बंदिश रागदारी संगीत की भव्यता और माधुर्य से ओत—प्रोत मालूम पडती है। परंपरा से चले बंदिश के स्वरूप को धक्का न देते हुए कुशलता पूर्वक नई बंदिश की रचना रचनाकार द्वारा की गई है।

**स्वर प्राधान्य** :—इस बंदिश में आई हुई स्वर रचना में क्रमश: किस प्रकार स्वर प्राधान्य दिए है यह देखेंगे।प्रस्तुत बंदीश की स्थायी ताल त्रिताल के २ आवर्तन में यांनी ३२ मात्रा में और अंतरा दो

ISSN : 2278-9308
July 2021

आवर्तन में यांनी ३२ मात्रा में बंदिस्त किया गया है। ३२ मात्रा कि स्थायी तथा ३२ मात्रा का अंतरा ३२+३२ = ६४ मात्रा में यह बंदिश बंधी हुई है।

**स्वरों के मात्रा अवकाश का तक्ता:—**

इन ८० मात्रों के स्वरों का प्राधान्यक्रम निम्न का प्रकार है —

| पंक्ति,क्र / स्वर | १ | २ | ३ | ४ | कुल |
|---|---|---|---|---|---|
| **षडज** | ४$^{१/२}$ | ४$^{१/२}$ | ९ | ५ | २३ |
| **रिषभ** | ५ | ५$^{१/२}$ | १ | ३ | १४$^{१/२}$ |
| **गंधार** | २$^{१/२}$ | २ | — | २ | ६$^{१/२}$ |
| **मध्यम** | २ | १ | — | ३ | ६ |
| **पंचम** | २ | १$^{१/२}$ | ३ | २ | ८$^{१/२}$ |
| **धैवत** | — | १ | ३ | १ | ५ |
| **कोमल निषाद** | — | १/२ | — | — | १/२ |
| **कुल** | १६ | ३२ | १६ | १६ | ८० |

| | | |
|---|---|---|
| १. | षडज | २३ |
| २. | रिषभ | १४$^{१/२}$ |
| ३. | पंचम | ८$^{१/२}$ |
| ४. | गंधार | ६$^{१/२}$ |
| ५. | मध्यम (शुद्ध) | ६ |
| ६. | धैवत | ५ |
| ७. | कोमल निषाद | १/२ |
| | कुल = | ८० |

शास्त्र मे इस राग का वादी स्वर पंचम तथा संवादी स्वर षडज बताया गया है। किंतु उपरोक्त मात्रावकाश के तालिका से इस बंदिश में षड्ज स्वर का बहुत्व बंदिश का वैशिष्ट्य दिखाता है। लेकिन उपरोक्त तालिका से स्पष्ट है कि वादी संवादी के विषय में इस बंदिश की एक अलग भूमिका है। उपरोक्त स्वरों की तालिका और बंदिश के विश्लेषण से स्पष्ट है कि प्रत्येक राग की रचना में एक प्रमुख स्वर और एक गौण स्वर का होना आवश्यक है। वादी संवादी स्वरों को ध्यान में रखते हुए इस बंदिश के अनुसार स्वरों का प्राधान्यक्रम इस प्रकार होगा।

| **अ.क्र** | **स्वर** | **मात्रावकाश** | **मूल्यांकन** |
|---|---|---|---|
| १. | षडज | २३ | प्रधान स्वर |
| २. | रिषभ | १४$^{१/२}$ | उप प्रधान स्वर |
| ३. | पंचम | ८$^{१/२}$ | साधारण प्रधान स्वर |
| ४. | गंधार | ६$^{१/२}$ | साधारण प्रधान स्वर |
| ५. | मध्यम (शुद्ध) | ६ | साधारण प्रधान स्वर |
| ६. | धैवत | ५ | अल्प स्वर |
| ७. | कोमल निषाद | १/२ | अत्यल्प स्वर |

प्रत्येक राग में प्रधान स्वर और उपप्रधान स्वर होना राग घडन की दृष्टि से अनिवार्य होता है। उसी प्रकार साधारण प्रधान स्वर और अल्प स्वर का होना भी महत्वपूर्ण माना जाता है। जिससे राग सौंदर्य, उसकी सुंदरता इन स्वरों के कारण खुलकर सामने आती है, यह उपरोक्त स्वर प्राधान्य स्वर के विश्लेषण से ध्यान में आता है।

**अलंकारिकता:—**राग गायन करते समय आलाप,बोल आलाप,तान और बोलतात इनके कलात्मक आविष्कार के लिये अलंकारों का होना बहुत महत्वपूर्ण है। विविध अंगों से बंदिश गाते समय स्वर

रचना में जो अलंकारिक स्वर समुदाय आते है, उससे सामान्य गायक कलाकार को भी राग गायन के लिए स्फूर्ती स्त्रोत का काम करते है।

ऐसे अंगभूत अलंकार बंदिश की स्वर रचना में कौन से है, यह देखेंगे१)प्रथम पंक्ति — सा रे रे ग ग म (आरोही ढंग) २) द्वितीय पंक्ति — सा रे रे ग ग म (आरोही ढंग)३) तृतीय पंक्ति — सां ध प प (अवरोही ढंग)४) चौथी पंक्ति — रे ग म प म ग म रे सा(आरोही अवरोही ढंग)

प्रस्तुत राग की जाती संपूर्ण— संपूर्ण होने के बाद भी अलंकारों का प्रमाण कम ही दिखाई पड़ता है। इस प्रकार अलंकारिता की दृष्टिसे अनेकानेक उपज इस बंदिश से उपलब्ध होने से यह बंदिश समृद्ध हुई है।

**लयसौंदर्य** :—प्रस्तुत बंदिश के लिए ताल त्रिताल का चयन किया गया है जो द्रुत लय में बंदिश की गति को बनाए रखता है।प्रस्तुत बंदिश का उठाव ९वी मात्रा से शुरू हुआ है। इसलिए इस बंदिश के स्थायी के प्रथम पंक्ति का मात्रा प्रवास ९वी मात्रा से शुरू होकर ८वी मात्रा तक संपूर्ण एक आवर्तन का अर्थात कुल १६ मात्रा का है। जो कि एक सर्वसामान्य तथा सरल मुखड़ा है। स्थायी के समान अंतरा की रचना की गई है।प्रस्तुत बंदिश की एक विशेषता यह भी है कि, स्थायी की दूसरी तथा तीसरी पंक्ति को एक साथ ही गाया जा सकता है अर्थात इन पंक्तियों को भिन्न रूप से उसके स्वाभाविक या मूल स्थान से नहीं गाया जा सकता, क्योंकि ''बलमा तुम हम संग" इन शब्दों को ताल की ७वी मात्रा से ४थी मात्रा तक रचा गया है तथा" करत ऐसी चतराई" शब्दों को ५वी मात्रा से ताल के नवीन आवर्तन के अंत तक रचा गया है, जिससे कि इन पंक्तियों को भिन्न—भिन्न रूपों में पुनरावृत्ति करना या गाना संभव नहीं हो सकता। शेष बंदिश को सीधा व सरल रूप से ताल — अंग से रचा हुआ दिखाई देता है। राग कि लय बंदिश की लय और कलाकार की प्रदर्शनी की लय एक दूसरे के पूरक है जिसे बंदिश से भाव निर्मिती तथा सौंदर्य निर्मिती होती है।

**तात्पर्य** :— नववी (काल) मात्रा से उठाव होने वाली पारंपरिक बंदिशों जैसी यह बंदीश है। जिसे अधिकतर सीधे सरल रूप से रचा गया है।प्रस्तुत बंदिश के अंतर्गत आने वाली विभिन्न प्रकार की लयकारी का शोध लेंगे।इस बंदिश में एक मात्रा में १ स्वर एकपट की लय में और जिस जगह दोन मात्रा में १ स्वर गाया जाता है, उस जगह निमपट लय होगी। जिस जगह एक मात्रा में २ स्वर गायेजाते है, उस जगह दुप्पट लय होगी।अब शब्द के मेल—मिलाप से इस गीत के प्रत्येक आवर्तन से तैयार हुए ताल एकताल के आकृतिबंध देखेंगे।१) प्रथम पंक्ति —

आऽ ऽव ऽऽ न ऽ क हि ल वा ऽ ऽ पि या ऽ मो रा
५ ६ ३ २ = १६२) द्वितीय पंक्ति —

क छु ऽ औ ऽ र ना ऽ ला ऽ गे ऽ ऽ जि या ऽ
३ ३ २ ५ ३ = १६३) तृतीय पंक्ति —

ज ब से ग ये ऽ प ति याँ ऽ हूँ न भे जी
३ ३ ४ १ १ २ = १६४) चौथी पंक्ति —

नीं ऽ द न जा ऽ ने ऽ मो ऽ ऽ री अँ खि याँ ऽ
३ १ ३ ४ ४ = १६उपरोक्त विश्लेषण से नीचे दिये हुये ताल त्रिताल के चार आकृती बंध हमारे सामने आते है।१) प्रथम पंक्ति —

५ + ६ + ३ + २ = १६
२) द्वितीय पंक्ति — ३ + ३ + २ + ५ + ३ = १६
३) तृतीय पंक्ति — ३ + ३ + ४ + १ + १ + ४ = १६
४) चौथी पंक्ति — ३ + १ + ४ + ४ + ४ = २२इस वैशिष्टपूर्ण आकृती बंद से इस बंदिश का लय सौंदर्य बहुत सुंदर दिखाई पडता है।

**सौंदर्यात्मक दृष्टिकोन**:—अब तक काव्य, रचना और लयसौंदर्य इन तीनों स्तर पर प्रस्तुत बंदिश का चिकित्सक अध्ययन किया है,इसका सारांश निम्नलिखित है—बंदिश का मध्य—द्रुत लय मे चलना अद्वितीय और सुंदर लगता है।स्वर प्राधान्य की दृष्टि से परंपरा से चलते आहे वादी—संवादी

को इस बंदिश में नई दिशा गयी है, लेकिन राग के व्याकरण को सही तरीके से संभाला है।पद की दृष्टि से राग की प्रकृति और बंदिश की गति के अनुरूप भावपूर्ण, शुद्ध व सरल बोलों का चयन किया गया है।स्वर की दृष्टि से स्वर—राग का शुद्ध प्रयोग तथा मात्राओं की समुचित भरावट का ध्यान रखा गया है।ताल की दृष्टि से ताल त्रिताल का बंदिश की गति के अनुरूप चयन किया गया है, जिस कारण बंदिश का सौंदर्य खुलकर सुंदर प्रतीत होता है।सांगीतिक दृष्टि से देखा जाये, तो इस बंदिश का काव्य उत्तम दर्जे का है। प्रस्तुत राग छायानट की बंदिश में एक विशेष पहलू नजर आता है इस बंदिश में संपूर्ण रचनामें कहीं पर भी तीव्र मध्यम का उपयोग नहीं किया गया है जो इस बंदिश की विशेषता है। इस बंदिश के अंतर्गत आने वाले लयसौंदर्य चार प्रकार के लय सौंदर्य के विभिन्नता से प्रकट होता है। इस बंदिश की ४ पंक्तियों में प्रयुक्त होने वाले चार आकृतिबंध श्रोता व को मंत्रमुग्ध करते है।

**तात्पर्य:**—सौंदर्य की दृष्टि से अत्यंत तेजस्वी और आकर्षित यह रचना रचनाकार और रचना कौशल्य की साक्ष्य देने वाली है। यह एक उच्च प्रति की श्रृंगार रस की बंदिश है ऐसा कहा जाएगा। रागदारी संगीत को समृद्ध करने वाली एक उच्च कोटि की बंदिश है। अश्विनी भिड़े देशपांडे जी ने रागदारी शास्त्रीय संगीत में राग छायानट में शुद्ध मध्यम की बंदिश की निर्मिती से भारतीय शास्त्रीय संगीत में एक नई दिशा प्रदान की है। रचनाकार की यह सोच, यह विचार, यह कल्पना वास्तव में प्रशंसनीय है।

**संदर्भ ग्रंथ:—**

➢ संगीत विशरद वसंत हाथरस प्रकाशन
➢ राग रचना अंजलि भाग २ श्रीमती अश्विनी भिड़े देशपांडे राजहंस प्रकाशन सदाशिव पेठ पुणेISBN:978-81-7434-510-3
➢ डॉ मुकेश गर्ग (२०१०), साहित्य और सौंदर्य बोध, पब्लिकेशंस डिसटीब्यूटर्स, नई दिल्ली. ISBN:९७८—८१—७३९१—४७८—८
➢ डॉ लक्ष्मी नारायण गर्ग, (२०१२) निबंध संगीत, संगीत कार्यालय, हाथरस
➢ डॉ. सरिता निगम (२०१२), हिंदुस्तानी संगीत में राग वर्गीकरण, कनिष्क पब्लिशर्स डिसटीब्यूटर्स नई दिल्ली.ISBN:९७८—८१—८४५७—३२६—८

ISSN : 2278-9308
July 2021

# ''आदिवासी जमातीवर जाती धर्माचा प्रभाव''

प्रा.यादवराव आर. गहाणे
फुले—आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली.
ई—मेल—yadaoraogahane09@gmail.com,Mobile no&9421735349

**सारांश :—**

जगाच्या पृष्ठभूमीवर आपणाला आदिवासी जमाती वेगवेगळ्या नावाने संबोधल्या गेलेल्य दिसतात. त्यातही भारतात सुरुवातीपासूनच दऱ्याखोऱ्यात निवास करणारे लोक पहायला मिळतात. या सर्वप्रकारच्या जाती जमातीच्या लोकांवर जात व धर्म कशाप्रकारे आपले वर्चस्व मिळवून आहे याची कल्पना आपणाला येते. या जाती जमातीची लोकसंख्या ही फार मोठी आहे. त्यांची संख्या २१२ वरुन जवळपास ५५० झाल्याचे आपणाला दिसून येते. परंतु या जमातीच्या वाढत्या प्रभावामुळे जात व धर्म कसे वाढीस लागले. किंबहूना जातीच्या व धर्माच्या प्रभावाने या जामातीस कशाप्रकारे जखडले आहे. हे दिसून येते.

**उद्देश—**

- जातीच्या उत्पत्तीचा अभ्यास करणे.
- जात धर्माची उत्पत्ती व त्यांच्या विकासाचे अध्ययन करणे.
- संस्कृती जतनाचे अध्ययन करणे.
- जातीच्या मागासलेपणाचे अध्ययन करणे.
- अंधश्रध्देच्या प्रभावाचे अध्ययन करणे.

**उपकल्पना:—**

१. आदिवासी जमातीचा पाहिजे त्या प्रमाणात विकास झालेला नाही.
२. इतर जाती धर्माचा प्रभाव आदिवासी जमातीवर अत्यल्प प्रमाणात दिसुन येते.
३. अंधश्रध्दा मोठ्या प्रमाणातदिसुन येते.
४. आदिवासी जमातीचे संघटन मोठ्या प्रमाणात दिसून येते.

**प्रस्तावना :—**

जाती म्हणजे काय —

वास्तविक पाहता जात म्हणजे काय याचा विचार केला तर, 'जात' हा शब्द आपणाला 'जण' या शब्दापासून बनलेला दिसतो. जण म्हणजे 'जन्म' असा त्याचा अर्थ होतो. म्हणजेच एकप्रकारे जन्माने प्राप्त होणारा समूह म्हणजे जात होय. हा प्रकार सर्वच जातीमध्ये आपणाला पाहायला मिळतो. त्यामुळे समाजाचे एकप्रकारचे सामाजिक स्तरीकरण झाले असे आपणाला म्हणता येईल. परंतू हे जातीवर झालेले स्तरीकरण बंदीस्त स्वरुपाचे असल्याचे आपणाला दिसून येते. वरील सर्व विवेचनावरुन जातीच्या खालील व्याख्या आपणाला अभ्यासता येतील.

१. चार्ल्स कुले — ''जेव्हा वर्ग अनुवंशिकतेच्या तत्वावर आधारलेला असतो तेव्हा आपण त्याला जात म्हणू शकतो.''[१] असे विचार मांडले तर

२. डॉ. मुजूमदार व डॉ. मदन — यांच्या मते, ''जात हा एक बंद वर्ग होय.''[२]असे म्हटले आहे.

याचा अर्थ असा की, जात हा एक अंतर्गत विवाह संबंध असून त्याचे सदस्यत्व केवळ जन्माच्या आधारावर प्राप्त होते. कारण जात हा एक बंद वर्ग असुन विस्तृत संबंध प्रस्तापित करतो. परंतू जात व जमात यांचा जर विचार केला तर या दोन स्वतंत्र अर्थ असणाऱ्या संकल्पना आहेत. कारण जमातीचा जर व्यापकदृष्ट्या विचार केला तर एखाद्या भुप्रदेशावर राहून, एकच भाषा व समान श्रध्दा आणि विश्वास बाळगून आचरण करण्यामधून निर्माण झालेल्या संस्कृतीची व जिवनपध्दतीची जोपासना करणाऱ्या समुहाला आपण जमात असे म्हणतो.

ISSN : 2278-9308
July 2021

**धर्माचे स्वरुप —**

आपण जर धर्माचा विचार केला, तर पूर्वीच्या आदीमानवाच्या जिवनातील अनुभव, मुक्त व स्वतंत्र्य जिवन जगणाऱ्या वनमानवाला बऱ्याच गोष्टी अनाकलनीय होत्या. त्यामुळे मानवाजवळ जतबल होण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. त्यामुळे मानवाने आपल्या मनाचा व बुध्दीचा उपयोग करुन त्यांच्यावर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यातुन जादू निर्माण झाली आणि त्यामुळे धर्म निर्माण झाला. या संदर्भात फ्रेजर याने ''धर्म म्हणजे निसर्ग व मानवी जीवन यांना निर्देश देणाऱ्या व नियंत्रीत करणाऱ्या व मानवापेक्षा श्रेष्ठ अशा शक्तीच्या संतूष्टी करण्याची व आराधनेची पध्दती होय.'' [३] असे म्हटले आहे. तर डी.एन.मुजूमदार व टि.एन.मदन यांनी, ''धर्म म्हणजे अलौकीक व आतिद्रीयेशक्तीपासून वाटणाऱ्या भयाला मानवी प्रत्युत्तर होय.''[४] असे म्हटले आहे. म्हणजेच धर्म हे अगम्य, अनाकलनीय व अलौकीक अशा शक्तीवरील नितांत श्रध्देचे मानवी अनुभवातून प्रगटणारे रुप आहे.

**जमातीची संकल्पना —**

जमातीच्याबाबतीत जर विचार कला तर भारतात विविधतेत एकता आहे, असे आपण म्हणतो. यातून नागरी, ग्रामीण, आदिवासी अशा अनेक संस्कृतीचे दर्शन आपल्याला होते. पण या सर्व घटकामध्ये आदिवासी जमातीमध्ये आपल्याला परिवर्तन झाल्याचे दिसुन येत नाही. ही जमात आजही आपणाला मागासलेली किंवा प्राचीन विचारांनी ग्रासलेली दिसते. परंतु त्यांची समाज व्यवस्था मात्र आपणाला आजही टिकून असल्याचे जाणवते. या जमातीला इंग्रजीमध्ये Tribal असे म्हणतात..या जमातीची आपणाला काही वैशिष्ट्ये ढोबळमानाने पहायला मिळतात. जसे विशीष्ट भूप्रदेश, मर्यादित आकार, धर्माचा प्रभाव, स्वत:ची बोलीभाषा व लिपीचा अभाव अंधश्रध्दा व जादूचा प्रभाव, अर्थव्यवस्थेचे साधेपण, तंत्रज्ञानाचा अभाव, परस्पर रक्त संबंध, साधी जीवनपध्दती, शैक्षणिक मागासलेपण, आदी राहात असल्यामुळे, निसर्गमय वातावरणात रममान होणारे, नैसर्गिक आपत्तीचा सामना करणारे, डोंगराळ भागात शेती करणारे धर्म गुरुंच्या प्रभावामुळे यांचे समाज जिवन मागासलेले असल्याचे प्रकर्षाने जाणवते. भारतात जवळपास १९५० पासून या जमातीचे अध्ययन खऱ्या अर्थाने होऊ लागले. वास्तविक पाहता ही जमात प्राचीन काळापासून अस्तित्वात असल्यामुळे त्यांच्यात असणारे अनेक समुह इतर भागातून आल्याचे दिसून येते. परंतु मुख्य प्रवाहातील लोकांपासून मात्र ते दुरच असल्याचे आढळते. असे असले तरी मात्र त्यांनी आपली वेगळी अशी जीवनपध्दती टिकवून ठेवली आहे. गैर आदिवासी लोकांच्या वस्तीत राहुन व स्वत:ची स्वतंत्र वस्ती तयार करुन अनेक खेड्यामध्ये त्यांचे वास्तव्य असल्याचे दिसून येते. ज्या भागात दळणवळणाची साधने पोहचलेली नाहीत. अशाही भागात त्यांचे वास्तव्य आहे आणि म्हणूनच ही जमात आजही विकासापासून कोसो दूर आहे. अशा या अनुसूचित जमातीची संकल्पना भारतीय शासन व्यवहारात रुढझालेली आहे. या जमातीच्या लोकांवर धर्म व जाती यांचा प्रभाव कशाप्रकारे पडला याचाही विचार आपणाला करता येईल.

**जात व जमात यातील फरक —**

जातीच्या वैशिष्ट्यांचा प्रभाव आपणाला प्रामुख्याने पूर्ण भारतीय समाज जिवनावर झालेला दिसून येतो. त्यामुळे ही जमात त्यापासुन अलीप्त राहु शकत नाही. कारण प्रामुख्याने ही जमात खेड्यात राहणारी असून ग्रामीण जिवनावर तीचा अधिक प्रभाव असल्याचे दिसून येते. जात ही मानव निर्मित व्यवस्था असली तरी जमातीवर तीचा पगडा आहे. तरीही या जातीच्या बऱ्याच गोष्टीपासून ही जमात वेगळी असल्याचे आपणाला दिसून येते. कारण जन्म या आधारावर जातीचे अस्तीत्व अवलंबून असले तरी जमत मात्र रक्त संबंध व सामाजिक संघटन या आधारावर अवलंबून असते. जातीव्यवस्थेत आपणाला श्रेष्ठ कनिष्ठ असा भेदभाव पहायला मिळतो. तर जमातीमध्ये आपणाला अशा पध्दतीचा भेदभाव पहायला मिळत नाही. जातीमध्ये व्यवसाय हा परंपरेनुसार निर्माण झालेला असतो. त्याना इतरांना व्यवसाय निवड करण्याची मुभा राहात नाही. तर जमातीमधील विभिन्न आदिवासी हे विभिन्न प्रकारचे व्यवसाय करु शकतात. जाती व्यवस्थेत सामाजिक संबंधांना अवसर निर्माण होतो. तर जमातीमध्ये सामाजिक संबंध हे परस्परांच्या सहकार्याने निर्माण करता येतात. जाती व्यवस्थेत आपणाला काही जातीध्ये जात पंचायतीचे प्राबल्य दिसते. तर काही जातीमध्ये जात पंचायत स्वतंत्र अशी पंचायत असल्याचे दिसून येते व त्यावर

सर्वांचे नियंत्रणही असते. तसेच जातीमध्ये आपणाला प्रत्येक जातीमधील माणसे आत्मनिर्भर असल्याचे दिसून येत नाही. ते परस्परावलंबी आहेत. तर जमातीमध्ये मात्र प्रत्येक आदिवासी हा स्वावलंबी असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे प्रत्येक जातीची बोलीभाषा ही वेगवेगळी असते. परंतु जमातीची बोलीभाषा ही वेगळी नसून त्यांची स्वतंत्र बोलीभाषा असते. शिक्षणाच्या संदर्भात विचार केला तर जातीमधील लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार फार मोठ्या झपाट्याने झालेला दिसून येतो. तर जमातीमध्ये मात्र शिक्षणाचा प्रसार झालेला नसल्यामुळे त्यांच्यात निरक्षरतेचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसते. याचा अर्थ असा की, जातींमध्ये गतीशीलता दिसून येते. तर जमातीमध्ये गतीशीलता दिसून येत नाही. जातीच्या अर्थव्यवस्थेबाबत विचार केला तर, त्यांची अर्थव्यवस्था ही प्रगत असल्याचे दिसून येते. परंतू जमातीची अर्थव्यवस्था ही फार प्रगत नाही, हे समजते.

**जमाती व धर्म –**

धर्माच्या अनुषंगाने आदिवासी जमातीचा विचार केला, तर धर्माचा प्रभाव हा या जमातींवर फार प्राचीन काळापासूनच असल्याचे दिसून येते. परंतु इतर धर्माच्या तुलनेत या जमातीच्या धर्माचे वेगळेपण आपणाला दिसते. त्यांनी आपला धर्म टिकवून ठेवण्यासाठ जीवाचे रान केले. धर्मावरील त्यांची निष्ठा गाठ होती. या संदर्भात 'होबल' :— यांनी "धर्म अलौकीक शक्तीवरील विश्वासावर आधारीत असुन आत्मवादाचे अस्तीत्व दर्शवितो यालाच धर्म असे म्हणतात,"[५] असे म्हटले आहे. म्हणजेच या जमातीचा धर्मावरील विश्वास हा फार वेगळ्या दृष्टीकोनातून निर्माण झालेला आहे. अशा या जमातीचे धर्मांविषयीचे मत फार वेगळे आहे. इतर धर्मांची निर्मिती व जमातीच्या धर्माची निर्मिती ही फार भिन्न असल्याचे दिसून येते. जमातीचा धर्म हा निसर्गावर विश्वास ठेवणारा आहे. निसर्गात घडणाऱ्या अद्‌भुत अशा घटनांची ही जमात साक्षीदार आहे. त्यामुळे इतर प्रगत समाजातील धर्माच्या प्रभावापासुन या जमातीचा धर्म फार वेगळा आहे. या धर्माला तात्वीक चिंतनाची जोड नाही. त्यांच्या कोणत्याही कार्याची सुरुवात धर्माला साक्षी ठेऊनच केली जाते. कारण धर्म हे या जमातीच्या जीवनातील अविभाज्य घटक आहे. त्यांच्या कौटूंबिक जीवनावर, संस्कृतीवर धर्माचा पगडा दिसतो. त्यामुळे ही जमात धर्माचे आचरण मोठ्या भक्तीभावाने करतात. त्यातुनच त्यांची संस्कृती व सामाजिक संघटन आबांधीत असल्याचे दिसून येते. त्यांच्या धर्मात प्रार्थना, यज्ञ, धार्मिक विधी, विशेष नियम, जादू यासारख्या गोष्टींना फार महत्व आहे. त्यांच्या धर्मात प्रामुख्याने दोन सिध्दांत दिसून येतात.

१) आत्मावाद, २) सचेतनवाद. वास्तविक अन्य धर्मातही या संकल्पना आहेत. परंतु त्या इतर आदिवासी जमातीमध्ये धर्म प्रयेकाला भावनात्मक, मानसिक आधार व सुरक्षीतता प्रदान करीत असतो. एवढेच नाही तर व्यक्तीमत्वाच्या जडणघडणीतही धर्माची भुमीका फार मोठी आहे. त्यातुन सद्‌गुणांचा विकास होतो, सामाजिक व्यवहारामध्ये सहभाग वाढतो व व्यवहार सुलभतेने पार पडतात अशी त्यांची धारणा आहे.

तात्पर्य जाती धर्माचा आदीम जमातीवर झालेल्या परिणामां संदर्भात आपणाला असे म्हणता येई की, इतर समाजातील जातींचा ज्या प्रमाणे त्या त्या समाजातील लोकांवर प्रभाव पडलेला आहे. त्या पध्दतीचा जातीचा प्रभाव जमातीवर पडलेला नाही. जमातीची संकल्पना ही जातीच्या संकल्पनेपेक्षा फार वेगळी आहे आणि त्यामुळे इतर जातीसोबत जमातीची तुलना होऊ शकत नाही. जातीची वैशिष्ट्ये व जमातीची वैशिष्ट्ये फार भिन्न आहेत. प्रत्येक जमातीचे नाव परंपरेने निर्माण झाले आहेत. त्यांचे पूर्वज समाज असल्याचे दिसून येते. तसेच रक्तसंबंधावर त्यांचे संघटन टिकून राहते. त्यांच्या संस्कृतीत एकजीवसीपना दिसून येतो. म्हणजेच इतर जातीच्या वैशिष्ट्यांचा परिणाम या जमातीवर झालेला दिसून येत नाही. त्यांची विशिष्ट व स्वतंत्र अशी जमात निर्माण झाल्याचे दिसून येते.

धर्माच्या संदर्भात इतर धर्म आणि या जमातीचा धर्म या दोन्ही गोष्टी फार वेगळ्या आहेत. त्यांच्या धर्मात निसर्ग, पूर्वत, आत्मावाद, जादू यांसारख्या गोष्टींना महत्व दिल्या गेले आहे. एवढेच नाही तर त्यांच्या धर्मात नम्रताही दिसून येते. प्रामुख्याने जातीपध्दती ही हिंदू धर्माशी निगडीत दिसते. तर जमातीचा धर्म हा सर्वात्मवाद यात दिसून येतो. त्यांच्या विश्वाकडे पाहण्याचा दृष्टीकोन किती व्यापक आहे, हे दिसते. त्यांच्या धर्मातून समाजजिवन कसे नियंत्रीत करता येते हे दिसून

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)

ISSN : 2278-9308
July 2021

येते. एवडेच नाही तर त्यांच्या धर्माला वास्तवाच्या आधाराची झालर चढविलेली आहे. त्यांचे संपूर्ण जीवनच धर्ममय झाल्यामुळे त्यांचे कार्यही त्याच पध्दतीचे असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष –**

१. आदिवासी जमातीने अजुनही सांस्कृती टिकवुन ठेवली आहे, असे दिसते.
२. औद्योगीक युगामध्ये शैक्षणिक क्षेत्रात अंशत: बदल झालेला आहे.
३. भौतीक सु:ख साधना पासुन वंचित आहे.
४. इतर समाजाच्या तुलनेत मागासलेले आहेत.
५. जणजागृतीचा अभाव दिसुन येतो.
६. अंधश्रध्दा मोठ्या प्रमाणात दिसुन येते.
७. आदिवासी जमात इतर जातींपेक्षा फार वेगळी आहे.
८. आदिवासी जमातीचा धर्म इतर धर्मापेक्षा वेगळा आहे.

**सुचना व शिफारशी–**

१. दुर्गम भागापर्यंत शासकिय सोयी–सुविधा पोहचविणे आवश्यक आहे.
२. जणजागृती करण्यात यावी.
३.शैक्षणिक सुधारणा करण्यात यावे.
४. जुनी परंपरागत संस्कृती टिकविण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात.

**संदर्भ–**

१. डॉ. आगलावे प्रदीप, ''आदिवासी समाजाचे समाजशास्त्र'', श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर तृतीय आवृत्ती (२०१०)
२. डॉ. देवगावकर शैलजा, डॉ.देवगावकर गो., ''आदिमांच्या धर्म, संकल्पना आणि देवदेवता'' आनंद प्रकाशन, नागपूर (प्रथम आवृत्ती – फेब्र. २००१)
३. लोटे रां.ज.,''आदिवासी समाजाचे समाजशास्त्र'', पिंपळापूरे ॲन्ड कं. पब्लीशर्स, नागपूर (दुसरी आवृत्ती– जुलै २०१० )
४. डॉ. साळीवकर संजय, ''भारतीय आदिवासी : जीवन आणि संस्कृती'', श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर (प्रथम आवृत्ती, २०१४)

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# ''वैश्वीकरण और भारतीय कलाओं में संगीत''

प्रा. वर्षा आगरकर
दयानंद आर्य कन्या महाविद्यालय, जरीपटका, नागपुर.
12varshaagarkar@gmail.com ,Mob. No. : 9860713712

"Art is manifestation of perfection in man"'कला' मानवीय जीवन को पूर्णत्व के मार्ग पर ले जाती है। भारतीय कलाओं का स्थान पूरे विश्व में चारों और फैला है। सद्विचार, सद्आचरण का मुख्य स्त्रोत होता है 'कला'। एक संस्कृत श्लोक से स्पष्ट है कि –

साहित्य, संगीत, कला विहीन: साक्षात्
पशु:पुच्छ विषाणहीन:।।

अर्थात् साहित्य संगीत और कला से रहित मनुष्य पूँछ और सींग रहित पशु के समान है। शास्त्रों में कुल ६४ कलाओं का उल्लेख है। जिसमें संगीत, नृत्यकला, दृश्य–कला, शिल्पकला, वास्तुकला, साहित्यकला, काव्यकला आदि कलाओं का समावेश होता है। इन सभी कलाओं में संगीत एक सम्मोहक कला है, जो सभी को अपनी ओर आकृष्ट करती है। इस परिष्कृत विशुद्धतम् कला द्वारा आध्यात्मिक सोपान एवं सिद्धि तक पहुंच संभव होती है। इसीलिए सभी कलाओं में संगीत कला का स्थान सर्वश्रेष्ठ माना है।

ब्रम्हांड की हर रचना क्षण–क्षण परिवर्तनशील है, यह एक प्राकृतिक नियम है। प्राचीनतम इतिहास इसका साक्षी है। विश्व के प्रत्येक क्षेत्र में जैसे सामाजिक, औदयोगिक, आर्थिक, राजनैतिक एवं सांस्कृतिक मूल्यों का आदान–प्रदान ही इसका प्रमुख कारण रहा है। जिससे सम्पूर्ण विश्व एक ''वैश्विक गाँव'' के रूप में परिवर्तित होता हुआ दिखाई दे रहा है। मानो विश्व सिमटकर हमारी मुठ्ठी में आ गया है। विश्व में विकासशीलता की आंतरिक भावना की प्रेरणा ही वैश्वीकरण है। इस परिवर्तन में संगीत क्षेत्र भी अछूता नही रहा है। इसे तेजी से वृद्धिगत करने में वैज्ञानिक तकनीकी की सशक्त भूमिका रही है। आज आधुनिकीकरण समान ''वैश्वीकरण भी एक प्रक्रिया के रूप में वर्तमान समय का यथार्थ है। जिसके कारण हमारी जीवनशैली तथा मानसिक सोच में क्रियात्मक तथा सकारात्मक बदलाव आया है।

भारतीय संगीत में वैश्वीकरण का प्रभाव प्राचीनकाल से ही दिखाई देता है। जैसे संगीत के अनेक पदों में सूफियाना प्रभाव है।उसी प्रकार भारत में आर्य, द्रविड अंग्रेजों का आना, हमारे संस्कृति से घुल–मिल जाना। जिससे हमारे संस्कृति पर असर पडना। उसी प्रकार शास्त्रीय संगीत में सरोद इसराज वादयों का उपयोग जो अरब, फारस इरानी संस्कृति की देन है। इस तरह का सांस्कृतिक आदान–प्रदान हमारे यहाँ प्राचीन काल से चलते आ रहा है। यह कह सकते है कि आज यह गति प्राचीन समय से बहुत तेज है और उसका कारण हम आज का ''वैज्ञानिक युग'' ष्मइ ज्मबीदवसवहलष कह सकते हैं। भारतीय संगीत की सभी विधाए उपशास्त्रीय, शास्त्रीय, सुगमसंगीत चित्रपट संगीत, पर वैश्वीकरण की छाप दिखाई देती है।

त्वरित संचार–माध्यम वैज्ञानिक प्रगति, तकनीकी समृद्धता, कंप्युटर के बाद आये वेबसाइट ने पूरे विश्व को एक रूप में जोडने का कार्य किया है। जिसके कारण विभीन्न संस्कृतियों संगीतों का भी संगम हो गया है। संगीत भारतीय हो, पाश्चात्य या प्राच्य, उसमें सुर सात ही माने जाते हैं। संगीत एक सार्वभौम भाषा है। वैश्वीकरण से आज हमारे भारतीय संगीत के सात सुर सात समुंदर पार तक गूँज रहे हैं। भारतीय व पाश्चात्य कलायें एक दुसरे के गले मिल रही हैं। एक दुसरे के श्रेष्ठ तत्वों, गुणों व शैली को अपनाकर आत्मसात कर रही हैं।

पाश्चात्य फिल्मों में भारतीय राग एवं वादयों का खुले दिल से प्रयोग किया जा रहा है। भारतीय कलाओं को देश–विदेशों में प्रसारित करने में राष्ट्रीय–अंतर्राष्ट्रीय चर्चा सत्र,Fusion, Remix, Film, T.V.का भी महत्वपूर्ण योगदान है। यूरोप व अमेरिका की युनिवर्सिटीज में हिंदुस्थानी संगीत के विभाग बन रहे हैं। और कई स्तरों पर इसका अध्ययन भी किया जा रहा है। पश्चिम के संगीतकार भारतीय संगीत को समझने में रूचि ले रहे हैं और उसका प्रयोग भी कर रहे हैं। इसी

श्रृंखला में भारतीय संगीतकारों ने भी वायलिन, गिटार, सिन्थेसाइज़र, इसराज सरोद, ड्रम आदि वादयों को अपनाया है।

भारत की महान विभूतियों जिनमें पं. रविशंकर, उस्ताद अली अकबर खाँ, उस्ताद जाकिर हुसैन, पं. उदयशंकर आदि ने अपने गायन, वादन व नृत्यों को विदेशों में प्रचार एवं प्रसार किया। साथ ही शिक्षा संस्थाओं का निर्माण किया और ग्लोबल हो गये। इसी श्रृंखला में फिल्म संगीतकार ए.आर. रहमान ने भारतीय संगीत को बहुत ही कम उम्र में विश्व दरबार में पहुँचा दिया। आज जहाँ हर १००–२०० मील के बाद लोगों की बोली, रहन–सहन, व्यवहार में परिवर्तन आम बात है, वहा एकमात्र संगीत ही वह कला है जो परिवर्तनों के बावजूल भी 'वसुर्धव– कुटुम्बकम् का संदेश देते हुए पूर्व–पश्चिम और उत्तर–दक्षिण का एक सुत्र मे पिरों सकने में समर्थ है। यही तो है Globalisation पद Indian Music.

आधुनिक इलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी ने हमें अनेक सुविधायें प्रदान की है। जिसमें प्रमुख सुविधा है गायन, वादन आदि विधाओं को संग्रहित करके लंबे अरसे के लिये सुरक्षित रखना। इन उपकरण के माध्यम से कभी भी, कहीं भी देखसुनकर सीखने की सेवायें भी उपलब्ध हो जाती हैं। इसके अतिरिक्त वर्तमान समय के संघर्षमय जीवन उपार्जन के अवसर भी सरलता से प्राप्त हो रहे हैं। साथ ही नूतन परिक्षा विधि, संगीत शिक्षा के नवीन उपक्रम भी वृद्धीगत होते जा रहे है। विश्व स्तर पर संगीत द्वारा जटिल रोगों का निदान भी आधुनिक उपलब्धि है। जिसमे बाबा रामदेव, श्री रविशंकर जी का योगदान उल्लेखनीय है।

दुसरे पहलु में भौतिकवादी मस्तिष्क के कारण शीघ्र धन की इच्छा, संगीत शिक्षा ग्रहण करनेवालों में धैर्य व लगन की कमी हो रही है। इलेक्ट्रॉनिक वादययंत्रों के उपकरणों से पारंपारिक वादय यंत्र बजाने वालों के सामने आर्थिक संकट खडा हुआ है।

उपर्युक्त सकारात्मक तथा नकारात्मक पहलुओं को देखा जाये तो वैश्वीकरण से भारतीय संगीत को हानि की अपेक्षा लाभ ही ज्यादा हो रहा है। आज के युग को देखते हुये संगीत में आये इन बदलाव का सभी ने उत्सुकता से स्वागत करना चाहिये।

**संदर्भग्रंथ :–**

१. भारतीय संगीत में नए आयाम – पं. विजयशंकर मिश्र संगीत विशारद – डॉ. लक्ष्मीनारायण गर्ग

2- Internet

३. अंतर्नाद सुर और साज – पं. विजयशंकर मिश्र

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# डॉ. आंबेडकर आणि पत्रकारिता

प्रा. वंदना ह. तागडे
नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज,कारंजा (घा.), जि. वर्धा

डॉ. आंबेडकर हे सर्व जगाला घटनातज्ञ, कायदेपंडीत, अर्थतज्ञ अशा अनेक अंगानी परिचित आहे. हे पत्रकार देखील होते. पण पत्रकारसृष्टीने पत्रकार म्हणून डॉ. आंबेडकरांची दखल घेतलेली दिसून येत नाही. त्यांची पत्रकारिता ही वरपांगी, पोटभरु नव्हती तर त्यांच्यासमोर देशातील तमाम जनतेच्या प्रगतीची दृष्टी होती. हे त्यांचे महत्वाचे उद्दिष्ट होते. म्हणूनच त्यांच्या पत्रकारितेमध्ये राष्ट्रउध्दाराचा ठासून उल्लेख केलेला दिसून येते. ही त्यांची राष्ट्रउध्दाराची तळमळ त्यांच्या लेखनातून दिसून येते.

डॉ. आंबेडकरांनी ४ वृत्तपत्रांना जन्म दिला. भारतातील तमाम पददलितांच्या समस्या, त्यांची अवस्था चव्हाटयावर आणण्याकरीता पत्रलेखन फार महत्वाचे आहे. म्हणूनच त्यांनी १९२० मध्ये 'मूकनायक', १९२७ मध्ये 'बहिष्कृत भारत', १९३० मध्ये 'जनता', १९५६ मध्ये 'प्रबुध्द भारत', ही पाक्षिके काढली. 'मूकनायक' व 'बहिष्कृत भारत' या पत्रांचे संपादन त्यांनी स्वत: केले, तर 'जनता' व 'प्रबुध्द भारत' या पत्रांचे संपादन आपल्या सहकाऱ्यांकडून केले. बहिष्कृत भारतच्या संपादनात डॉ. आंबेडकरांनी अतिशय दक्षतेने लक्ष घातले. बारिक–सारिकगोष्टींकडे लक्ष दिले. यासबंधी डॉ. आंबेडकर म्हणतात, ''बहिष्कृत भारतांच्या संपादकास मदत करण्यासाठी दुसरा एखादा संपादक ठेवण्याइतपत पत्राची सांपत्तिक स्थिती नव्हती. तसेच स्वार्थ त्यागी असा दलितांमधील माणूस सुध्दा मिळाला नाही. बाहेरचा लोकांचाही पाठिंबा न मिळाल्यामुळे 'बहिष्कृत भारत' मधील बरेच लिखाण मला करावे लागले.''[१] बाबासाहेब निस्वार्थ हेतूने आपले पत्रकारितेचे कार्य करीत राहले.

बाबासाहेबांची पत्रकारिता जाणून घेण्यासाठी 'मूकनायक' व 'बहिष्कृत भारत' मधील पत्र त्यासाठी आधारभूत आहे. या पत्रांमधून बाबासाहेबांच्या पत्रकारितेचे संपूर्ण दर्शन घडते. ''काय करु आता धरुनिया भीड । नि:शंक हे तोंड वाजविले ।। नव्हे जगी कोणी मुकीयाचा जाण । सार्थक लाजून नव्हे होत.''[२] या ओळीने बाबासाहेबांनी 'मूकनायक' पत्राला सुरुवात केली. मुक्या असलेल्या समाजाला त्यांच्या या पत्राने बोलके केले. पाक्षिकांच्या पहिल्या अंकात डॉ. आंबेकरांनी आपल्या पाक्षिकाचे सुबोध, सरळ, जोरदार व स्पष्ट भाषेत उद्देश स्पष्ट केले. ते म्हणतात ''हिंदूस्थान हा देश म्हणजे केवळ विषमतेचे माहेरघर आहे. हिंदू समाज हा मनोरा आहे व एक एक जात म्हणजे एक एक मजला आहे. पण या मनोऱ्यास शिडी नाही. एका मजल्यावरुन दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही. ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे, त्यांनी त्याच मजल्यात मरावे. खालच्या मजल्यातील मनुष्य कितीही लायक असो त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही. वरच्या मजल्यातील माणूस कितीही नालायक असो त्याला खालच्या मजल्यावर लोटण्याची कुणाचीही छाती नाही. युगानेयुगे चालत आलेले हास्य, दारिद्र्य हयापासून बहिष्कृत वर्गाची मुक्तता करण्यासाठी आकाशपाताळ एक केले पाहिजे.''[३] त्या काळात वृत्तपत्राचे दोन उद्देश असल्याचे दिसते. एक स्वातंत्र्याच्या आंदोलनाला गती देणे आणि दुसरे म्हणजे समाजसुधारणा करणे. पण बाबासाहेबाची पत्रकारिता ही संपूर्ण मानवजातीच्या हितासाठी होती. वरवरची सुधारणा त्यांना मान्य नव्हती. मूकनायकच्या एका लेखात ते म्हणतात, ''भारत स्वतंत्र होण्यानेच सर्व कार्यभाग साधेल, असे नाही, भारत हे एक राष्ट्र बनले पाहिजे की, ज्यात प्रत्येक नागरिकाला धार्मिक, आर्थिक आणि राजकीय हक्क सारखे असून व्यक्तिविकासाला प्रत्येक नागरिकास वाव मिळेल. ते म्हणतात की, राजकीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणारे नेते दुसरीकडे या देशातील माणसाला माणसासारखी वागणूक दयायला तयार नाही. तेव्हा माणसाला माणूसकीचे निसर्गदत्त हक्क मिळवून देण्याचा येथील लोकांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देण्याचा प्रयत्न डॉ. आंबेडकरांनी आपल्या पत्रातून केला.

त्यांच्या लेखातून प्रचंड विद्‌वत्तेचे दर्शन घडते. त्यांचे लेख म्हणजे प्रचंड कोटीचे तत्वज्ञान होते. त्यांची पत्रकारिता आक्रमक पण तितकीच संयमी होती. ते म्हणतात, ''एखादी जात अवनत

झाली तर तिच्या अवनतीचा चट्टा इतर जातीस बसल्याशिवाय राहणार नाही. समाज ही एक नौकाच आहे. ज्याप्रमाणे आगबोटीत बसून प्रवास करणाऱ्या उतारुने जाणूनबुजून इतरांचे नुकसान व्हावे किंवा त्रेधा उडावी म्हणून किंवा विनाशक स्वभावामुळे इतरांच्या खोलीस छिद्र पाडले तर सर्व बोटीबरोबर त्यालाही आधी नाही पण मागावून का होईना जलसमाधी दयावी लागणार आहे.[४]

पत्रकारितेकरीता अत्युच्य दर्जाची पात्रता हवी असते ती बाबासाहेबांकडे होती. त्यांचे तत्वज्ञान, विषयाची खोली जाणण्याची क्षमता, गाढा अभ्यास, यासारखे गुण त्यांच्यामध्ये होते. त्यांच्या वृत्तपत्रातून तत्कालीन भारतीय परिस्थितीबरोबरच जगातील घडामोडींचाही आढावा सुध्दा घेतल्या जाई. ते उच्चशिक्षणासाठी इंग्लंडला गेले तेव्हा त्यांनी मूकनायकची जबाबदारी ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांचेकडे दिली. तरीही ते विदेशातून बातम्या, लेख वइतर माहिती पाठवित असे. पण व्यवस्थापकीय गोंधळामूळे 'मूकनायक' चा आवाज बंद झाला. याचे बाबासाहेबांना अतिशय दु:ख झाले. कारण कोणतीही चळवळ चालवित असतांना वृत्तपत्राचे महत्व काय असते याची त्यांना जाणीव होती. ते म्हणत की, 'की अधिकतर वृत्तपत्रे पूर्वग्रहदुषित व जातीच्या आधारावर प्रकाशित होतात. त्यात विशिष्ट जातीचेच हित साधल्या जाते. त्यामूळे इतर जातीच्या हिताचा विचार केल्या जात नाही.''[५]

मूकनायक मे उन्होने कहाँ की, समता और ज्ञान की अभाव से ब्राम्हणेत्तर (ओबीसी मुख्य रुप में) पिछड रहे है । उनकी प्रगती नही हो रही है, क्यो की उनके लिए खेती, व्यापार, उद्योग और नौकरी करके जीवन यापन करना कठीण नही लेकीन अछूत दुर्बलता, दारीद्रयता और अज्ञान की त्रीवेणी मे इतना बडा बहिष्कृत अछूत पूर्णत: बह गया है ।[६]

तेव्हा अस्पृश्य वर्गाला समानतेचा दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी आणि अस्पृश्यांचा राजकीय सत्तेत सहभाग व्हावा या हेतूने चळवळीची व्यापकता वाढविणे आवश्यक वाटल्याने कुलाबा येथील जिल्हा बहिष्कृत परिषदेच्या पहिल्या अधिवेशनानंतर तेरा दिवसांनी ३ एप्रिल १९२७ रोजी 'बहिष्कृत भारत' हेदुसरे पाक्षिक सुरु केले. या पाक्षिकामधील त्याची लेखनशैली बघता त्यांची पत्रकारिता प्रगल्भ असल्याचे दिसून येते. या पाक्षिकामध्ये मुख्यत: 'आजकालचे प्रश्न' या नावाने चालू घडामोडीविषयीचे सदर, आत्मवृत्त, अग्रलेख, विविध विचार संग्रह, वर्तमान सार अशा बाबी विशेष करुन नमूद केल्या जात असे.

'बहिष्कृत भारत' सुरु झाले त्या काळातच महाड सत्याग्रहाला सुरुवात झालेली होती. तेव्हा या पत्राने चळवळीसाठी अनुकूल वातावरण निर्माण केले होते. त्यांनी या पत्रात जे लेख लिहिले त्यावरुन त्यांचे भाषावैभव, लेखनशैली, विद्वत्ता लक्षात येते. लोकभाषेमध्ये त्यांनी आपल्या लेखांची शिर्षके दिली. 'आरसा आहे नाक असेल तर तोंड पाहून घ्या'. खोटया साक्षीने खरे सिद्ध होते काय ? आपलेपणाची साक्ष दे नाही तर पाणी सोड, 'गुण श्रेष्ठ की जात श्रेष्ठ' बहिष्कृत भारत चे ऋण हे लौकिक ऋण नव्हे काय' असे शिर्षक असलेले लेख लिहून सर्वत्र रान पेटवले.[७]

'बहिष्कृत भारत' पाक्षिक सुरु असतांनाच डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली समाज समता संघाचे मुखपत्र म्हणून 'समता' पाक्षिक २९ जून १९२८ ला सुरु झाले. सारख्या विचारांची दोन्ही पाक्षिक वृत्तपत्रे एकाच तारखेला प्रसिध्द करण्याऐवजी एका आठवडयाचे अंतर ठेवून प्रकाशित करण्यात आले. 'बहिष्कृत भारत' बंद पडल्यानंतर बाबासाहेबांनी २४ नोव्हेंबर १९३० रोजी 'जनता' हे पाक्षित सुरु केले. या पाक्षिकाचे संपादक श्री. देवराव नाईक होते.

जनतेत प्रसिध्द झालेल्या २.१२.३३ च्या पत्रात ते म्हणतात, आपल्या समाजाची होत असलेली कुचंबना बघता एका वर्तमानपत्राची आवश्यकता भासत होती. 'जनता' पत्रासारखा पत्राचा प्रसार आपल्या समाजात लोकजागृती कार्य आरंभिले परंतू जनतेने आपलुकीने पाहीजे तेवढा आश्रय दिला नाही. पण गोलमेज परिषदेत अस्पृश्यांची हक्काची सनद मिळवण्यासाठी बाबासाहेबांनी जो अभूतपूर्व लढा दिला त्याची हकीकत जनतेपर्यत पोहचविण्यासाठी हे पत्र हाच आधार होता.[८]

डॉ. आंबेडकरांच्या आंदोलनाची निकराने टवाळी करण्याकरीता आघाडीवर असलेल्या वृत्तपत्रकारांशी निकराने झूंज देवून आपले निस्वार्थी कार्य त्यांना सिध्द करावे लागले. बहिष्कृत भारतच्या अंकातून ते म्हणतात, आमच्या टिकाकारांना सवाल आहे की, तुम्ही जर अस्पृश्य जातीत जन्माला आला असता तर तुम्ही असेच शांत राहीले असते काय?[९] असे खडसावून सांगायला

ISSN : 2278-9308
July 2021

बाबासाहेब कचरत नव्हते. अशाप्रकारे आपल्या विद्वत्तेने, वाक्‌चातुर्याने व हजरज बाबी स्वभावाने त्यांनी त्यांच्या टिकाकारांना नामोहरम केले.

वर्तमानकालीन पत्रकारितेने डॉ. आंबेडकरांच्या पत्रकारितेकडून खूप काही शिकण्यासारखे आहे. अनेक वृत्तपत्रे लोकप्रियतेसाठी नैतिक—अनैतिक मार्गाचा वापर करतात. कारण वृत्तपत्र चालविणे हा त्यांचा धंदा झालेला असतो. आज सर्व प्रकारची सुविधा असूनही कोणत्याही वृत्तपत्राचा मालक, संपादक जनतेच्या मनाची कायमची पकड घेवू शकत नाही. याची अनेक कारणे असली तरी महत्वाचे कारण म्हणजे आजच्या वृत्तपत्राची समाजाशी फारकत झाली आहे.[१०] असे मत व्यक्त केले. आजची वृत्तपत्रे कशी आहेत याविषयी ते म्हणतात, 'दारिद्र रेषेखालील असलेल्या जनतेच्या कोणत्याही प्रश्नापेक्षा नको त्या गोष्टींना वृत्तपत्रात स्थान दिल्या जाते. मुख्य प्रश्न त्यामुळे बाजूला राहतात व मनोरंजनकारी गोष्टींना त्यात स्थान दिल्या जाते. बातमीचे ते विषय होतात.[१०]

आज क्वचितच एखादया दैनिकाचा मालक अथवा संपादक जनतेचा पुढारी नसतो तो फक्त राजकीय नेता म्हणून वावरतो. सर्व प्रश्नांची उत्तरे सत्तेत शोधण्यासाठी सत्ता व संपत्तीचा वापर करुन राजकारण करतो.

डॉ. आंबेडकांनी २७ सप्टेंबर १९५१ ला केन्द्रिय मंत्रीमंडळाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यागपत्र का दिले यासंबंधी त्यांनी आपले मत १० ऑक्टोंबर १९५१ ला नवी दिल्लीला प्रस्तुत केले. संसदेच्या बाहेर आपले मत प्रगट करण्याचे कारण की, आपले मत व्यक्त करण्यास संसदेमध्ये त्यांना विरोध झाला. कारण आपल्या मताची प्रत ते भाषणाआधी अध्यक्षास देण्यास तयार नव्हते. कारण त्यामध्ये त्यागपत्र देण्याच्या कारणाविषयी माहिती दिली होती. संसदेला उद्‌देशून त्यांनी आपले मत व्यक्त करतांना म्हणाले, 'उन्हे तीन वजहोसे त्यागपत्र के बारे में वक्तव्य देना पड रहा है । तिसरी वजह पत्रकारितासे संबोधित है । उन्होने कहाँ की, तिसरे हमारे यहाँ के अखबार भी है । जो कुछ लोगो के लिए सदीयो पुराने पक्षपात और अन्य के खिलाफ पूवग्रह रखते आए है । उनकी धारणाए तथ्योपर कम ही आधारित है । जब उन्हे कोई रिक्त स्थान दिखाई देता है, जिसमें उनके प्रिय लोक बेहतर नजर आए । ऐसा ही कुठ मेरे मामले में हुआ है, ऐसा मुझे लगता ।[११]

अशाप्रकारे बाबासाहेबांची पत्रकारिता ही उत्तूंग दर्जाची होती. त्यात समाज उध्दाराचा विडा त्यांनी उचललेला दिसून येतो. आजच्या पत्रकारिता विश्वाला त्यांची पत्रकारिता अभ्यासण्याची गरज आहे. बाबासाहेब एकाच वेळी वृत्तपत्राचे संपादक व कोटयवधी जनतेचे नेते होते. कारण त्यांनी कधीही व्यावसायिक तरजोड केली नाही. म्हणून आजही पत्रकार म्हणून डॉ. आंबेडकरांची कारकीर्द अंतर्मूख व्हायला भाग पाडते.

**संदर्भ सुची**

1. M. Marathi.webdunia.com
2. तत्रैव https://Marathi-webdunia.com
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकर — धनंजर कीर, प्राप्युलर प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती, ६ डिसेंबर २०१६, पृष्ठ क्र.४९.
4. मनु की विक्षिप्तता के विरुध्द, चयन एंव प्रस्तुती : शर्मिला रेगे. अनुवाद : डॉ. अनुपमा गुप्ता मार्जिना लाइण्ड— २०१९
5. मूकनायक — ३१ जाने. १९२० (अंक—१), पृष्ठ क्र. ३३.
6. तत्रैव .
7. तत्रैव
8. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारताला महासत्ता बनविण्यासाठी वैचारिक योगदान, अथर्व पब्लिकेशन, १७ एप्रिल २०११, पृष्ठ क्र. ७९.
9. बाबासाहेब आंबेडकर संपूर्ण वाड्.मय खंड १, पृष्ठ २७३.
10. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटींग अँड स्पिचेस, महाराष्ट्र शासन, १९९३.

# स्त्रियांच्या कार्यकक्षेचा विस्तार व स्त्री सक्षमीकरण

डॉ. उज्वला तेजराम कापगते
सहा. प्रा. (अर्थशास्त्र विभाग प्रमुख)कर्मवीर महाविद्यालय मुल जि. चंद्रपुर
ujwalakapgate@gmail.com

**सारांश :—**

जगात सर्वत्रच स्त्रिला मीळालेली हीनत्वाची वागणुक व दुय्यम दर्जा व त्यातच पुरूषी मानसीकतेचे वर्चस्व यामुळे तिचे जीवण मर्यादित व संकुचीत झाले होते. आज मात्र तीच स्त्री मिळालेल्या संधीचे सोन करीत प्रत्येक क्षेत्रात कर्तृत्वाची छाप सोडतांना दिसते. बदलत्या परिस्थीतीत स्त्रीची भुमिका हि बदलत असतांना व तिच्या जिवणात अनेक पैलू लाभले असतांनाही तीने आपल्या कर्तुत्वाने एक वेगळी चमक व झळाळी या सर्व पैलुंना प्राप्त करून दिलेली आहे. स्त्री जिवनातील या परिवर्तनाचे श्रेय हे स्त्रिसंबधात करण्यात आलेल्या सुधारणा, घटनात्मक तरतूदी, कायदे, शिक्षणाचा प्रसार व व्यापक स्तरावरील स्त्री सक्षमीकरणाला जाते. स्त्री सक्षमीकरणाच्या प्रक्रीयेला गती मिळाल्यामुळेच आज स्त्रिया विविध क्षेत्रात यशाचा उंच शिखर गाठुन आपला नाव लौकीक करीत आहेत. एकीकडे स्त्री सक्षमीकरणातुन बदलाचे वारे वाहत असले तरी दुसरीकडे मात्र अजुनही असंख्य स्त्रीयांना त्यांच्या न्याय व हक्कासाठी संघर्ष करावा लागत असल्याचे चित्र दिसते. समाजात आजही अस्तित्वात असलेले रूढी व अनिष्ठ प्रथा स्त्रीयांना संकुचीत लेखणारी मानसीकता जाती व धर्माचे प्राबल्य यामुळे अनेक स्त्रियांना विकासाच्या संधी नाकारल्या जातात. त्यातच या ग्रामीण भागात या सर्वाची तीव्रता अधीकच आहे. त्यामुळे विविध संकटांना तोंड देत प्रगतीच्या वाटा शोधणाऱ्या असंख्य स्त्रीयांना आज उत्तेजनासोबतच सहकार्याची तेवढीच गरज आहे. म्हणून सक्षमीकरणाच्या या प्रक्रियेला अधिक गती प्रधान करून या प्रक्रियेत समाजातील तळागाळातील सर्वच स्त्रीयांना सहभागी करून घेता आले पाहीजे.

**बिज शब्द :—**

इतिहास, अत्याचार, जीवनस्तर, पुरूषी वर्चस्व, उत्तेजन, कुंटुंब, सहभाग, व्यवसाय, जबाबदारी, वस्तूस्थिती, क्रियाशीलता, कार्यकक्षा.

**प्रस्तावना :—**

इतिहासाच्या प्रत्येक कालखंडात व जगातील बहुतांश देशात स्त्रियांना दुय्यम लेखुन तीला अनेक प्रकारच्या संधी नाकारण्यात आल्याचे दिसत असले तरी याच इतिहासातुन स्त्रीने तीच्या कर्तूत्वाची व यशाची महती जगाला पटवून दिलेली आहे. अशा या स्त्री शक्तीचा प्रत्यय आपल्याला पुराणातील बलाढय राक्षसाचा वध करणाऱ्या आदी शक्तीपासून ते ब्रिटीशांच्या जुलमी सत्तेविरूध्द प्राणपणाने लढणाऱ्या झाशीच्या राणीपर्यंत तसेच संस्कारमूर्ती व किर्तीवंत छत्रपती शिवराय घडविणाऱ्या जिजाऊ मातेपासून तर अनेक संकटांना तोंड देत सामान्यांना ज्ञानाचा प्रकाश देण्यासाठी धडपडणाऱ्या क्रांतीज्योती सावीत्रीबाई फुलेच्या स्वरूपात येतो. यातच विविध क्षेत्रात यशाचा उंच शिखर गाठून नावलौकीक करणाऱ्या असंख्य स्त्रीयांचा उल्लेख करता येईल.

बदलत्या परिस्थीतीत स्त्रीची भूमिका ही नेहमीच बदलत राहिली आहे. ती मुलगी, सून, पत्नी, माता या भूमिका व्यतीरीक्त अधिकारी, वैज्ञानिक, शिक्षक, कर्मचारी अशा अनेक रूपांनी आहे. तिच्या जीवनात अनेक पैलू लाभले आहेत आणि त्यांना अधिक चमक तिने आपल्या कर्तुत्वाने दिली आहे. आपल्या बुध्दिला आत्मसन्मानाला तिने नवीन दिशा दिली आहे. आजच्या जगात असे कोणतेही क्षेत्र नाही जिथे स्त्रीने आपला पाया रोवला नसेल. प्रत्येक क्षेत्रात स्त्री ही पुरूषांच्या बरोबरीने किंबहूना पुरूषाच्या पुढेही मार्गस्थ होतांना दिसते.

आज अनेक महिला डॉक्टर, इंजीनीअर, शिक्षिका, अभिनेत्री, मंत्री तसेच देशाच्या सर्वोच्च पदावर देखील आहेत. त्याचवेळी दुसरीकडे गावात स्त्रिया मुलांना जन्म देतांना मरतात, हुंडयाच्या अभावी जळतात, त्या लैंगीक अत्याचाराच्या बळी ठरतात. त्याचे विविध प्रकारे शोषण केले जाते. पण त्यांना न्याय मिळत नाही. मालमत्तेची मालकी प्रशिक्षण आणि रोजगारात पुरूषांच्या तुलनेत

स्त्रियांना कमी संधी मिळणे, स्त्रियांची सर्वांगीणी प्रगती तसेच त्यांच्या विकासातील असमतोलपणा याकरिता महिलांचे सबलीकरण त्यांचे सक्षमिकरण होणे गरजेचे आहे. देशात महिलांचे स्थान, त्यांची स्थीती यावरून देशाच्या एकदंरीत स्थितीची कल्पना येऊ शकते. भारतालाही विविध क्षेत्रात मोठी प्रगती साधायची असेल तर स्त्री सक्षमीकरण अत्यावश्यक आहे.

**स्त्री सक्षमिकरण :—**

सर्वांगाने विचार करिता मानव समुहात स्त्री जातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. स्त्रियांशी हतोत्साहीत करणारे वर्तन, त्यांच्या जीवनस्तर उंचावण्याकडे दूर्लक्ष करण्यापासून ते त्यांचा छळ आणि अत्याचार करण्यापर्यंत अनेक प्रकारे हिनत्वाची वागणूक स्त्री जातीला मीळत राहिली आहे. हा भेदभाव दुर करून स्त्रियांच्या प्रगतीस पोषक वातावरणाची भेदभाव दुर करून स्त्रीयांच्या प्रगतीस पोषक वातावरणाची निर्मिती आणि त्याचे सुचालन करने आणि लैंगीक समानतेद्वारे समाजाचे संतुलन साधने यासाठी पूरोगामी आणि विवेकी समाजाने बाळगलेला दृष्टिकोन, केलेली कृती यांचा समुच्चय म्हणजे स्त्री सक्षमिकरण असे म्हणता येईल.

आज महिला सबलीकरणामुळे देशाच्या विविध क्षेत्रात बदलाचे वारे वाहू लागले आहेत. स्त्रीयांना त्यांची जागा मिळण्यास मदत झाली आहे. जीथे—जीथे तीला संधी मीळाली त्या संधीचे सोने करीत तीने आपल्या कार्यकर्तुत्वाने व्यक्तिमत्वाची स्वतंत्र छाप सोडत नावलौकीकास पात्र ठरली आहे. एकीकडे अशा काही सकारात्मक बाबी असतांना दुसरीकडे आपल्याला तीला तीच्या न्याय—हक्कारिता संघर्ष करावा लागत असल्याचे निदर्शनास येते. कारण अनेक क्षेत्रातील पुरूषी वर्चस्व, ग्रामीण — शहरी संबधातील तफावत, मातृत्वाची जबाबदारी या व अशा अनेक बाबी तीच्या प्रगतीत अडथडे ठरू पाहत आहेत. म्हणजेच यासाठी आपल्याला बरेच प्रयत्न करावयाचे आहेत. या प्रयत्नाची व्याप्ती एक व्यक्ति वा संमस्येपुरती मर्यादीत न राहता यासाठी समाज, देश व स्वत: महिलाही एकत्रीत येऊन प्रयत्न केले पाहिले. हे प्रयत्न केवळ समाजातील काही महिलापुरतेच आणि शहरी भागात सिमीत न राहता ते समाजाच्या तळागाळापर्यंत पोहचण्याची नितांत गरज आहे.

समाजाच्या तळागाळातील परिस्थितीचे अवलोकन केले असता असे आढळून येते की, आजही विशिष्ट अशा समाजात अनिष्ट रूढी प्रथा परंपरेचे अस्तीत्व आहे. अगोदर पासूनच जाती धर्माचे प्राबल्य असलेल्या अशा समाजात महिलांच्या प्रगतीची गोष्ट तर दुरच पण तीच्या अस्तित्वाचा संघर्ष दिसतो. महिलांचे सक्षमीकरण होत असतांनाच शासनाच्या विविध प्रयत्नातून या समाजाकडे शिक्षण पोहचले असले तरी या शिक्षणाच्या प्रवाहात विशिष्ट जबाबदारी म्हणा वा महिला जातीला मिळालेला दुय्यम स्थान म्हणा यामुळे तीला सामील होता आलेले नाही.

आज विज्ञान — तंत्रज्ञानातील प्रगतीने सर्वांचेच डोळे दिप्यमान झाले आहे. या क्षेत्रातही महिलांनी नेत्रदिपक प्रगती करून ती सर्व समाजासाठी एक आदर्श ठरू पाहत आहे. हा आदर्श ठेवत विविध संकटांना तोंड देत प्रगतीच्या वाटा शोधणाऱ्या असंख्य स्त्रियांना आज उत्तेजनासोबतच सहकार्याचीही तेवढीच गरज आहे. म्हणूनच सक्षमिकरणाच्या प्रक्रियेला गती मिळायला पाहिजे व या प्रक्रियेत समाजाच्या तळागाळातील सर्व स्त्रियांना सहभागी करून घेता आले पाहिले. तेव्हाच खऱ्या अर्थाने समानतेचे उद्दीष्ठ गाठण्याचे प्रयत्न सार्थक ठरतील.

देशातर्गंत होणारी चर्चासत्रे परिसंवाद तसेच विविध परिषदा यामध्येही महिला विषयक विविध समस्या तसेच स्त्री—पुरूष समानता या विषयावर गहन विचार —मंथन होतांना दिसते. यातील निष्कर्षेही आज कोणत्याही क्षेत्रात स्त्री आणि पुरूषांच्या सहभागाबाबत दिसणारी असमानता आता फारशी राहिलेली नाही हे सुचित करते. या अनुषंगाने देशात महिला सक्षमीकरणाची प्रक्रीया अधीक गतीमान होत असतांनाच देशातील सामाजिक आर्थिक व राजकीय क्षेत्रातील महिलांची एकूणच स्थिती व या क्षेत्रातील असमानता यांच्या वास्तवांचा वेध घेणे तेवढेच क्रमप्राप्त ठरते.

स्वातंत्र्यपुर्व काळातील अनेक समाजसुधारक व महापुरूषांनी केलेल्या समाज सुधारणा व सामाजिक चळवळीमुळे स्त्रीयांच्या विविध प्रश्नांना वाचा फुटली. यामुळे स्त्री जिवणात व्यापक प्रमाणात बदल घडुन आला. सतीप्रथा, केशवपंथ, जठरविवाह इ. अशा अनिष्ट प्रथांना त्यामुळे पायबंद घालण्यात यश आले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही राज्यघटनेतील स्त्री विषयक विविध तरतूदी व कायदे तसेच शासन स्तरावरील विविध उपक्रम व योजना या सर्वामुळे स्त्रियांच्या समान न्याय

हक्कासाठी व तिला संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयास झाला व होत आहे. याची फलश्रृती म्हणजे समाजातील स्त्रियांचे प्रश्न तिच्यावरील अन्याय,लैंगीक शोषण, हिरावलेले हक्क, हुंडयासाठी होणारा छळ, कौटुबीक हिंसा या भोवतीच बहुसंख्य स्त्रिया एकत्रित झाल्या त्यातूनच संस्था आणि चळवळी निर्माण झाल्या. काही चांगले बदलही घडले. या बदलातूनच स्त्रियांसाठी असलेले कायदेही कडक झाले. त्यामूळेच स्त्री–पूरूष समानतेच्या तत्वाला बळकटी मिळली व महिलांच्या स्वातंत्र्य व अधिकाराविषयी जाणीवा प्रगल्भ झाल्या. असे असतांनाही निर्भया कांड किंवा कोपर्डीसारख्या अमानूष अत्याचाराच्या घटना घडतात आणि अशावेळी आपल्यासमोर महिलांचे प्रश्न बिकट समस्या म्हणून उभ्या राहतात. त्यावर उपचार म्हणून समाजात महिलांना स्वायत्तता, सुरक्षा व संरक्षण देण्यासाठी सबलीकरणाचे अभियान राबविण्यास सुरूवात होते. कुंटुबाचाच विचार केला तरी अगदी जन्मापासूनच भेदभावाला सुरूवात होते. मुलगा आणि मुलगी यांचे कपडे वेगळे असतात. ऐवढेच काय तर त्यांचे रंगही ठरलेले असतात. मुलाने मुलीसारखे असुच नये अशी घट्ट सिमारेषा स्त्री मनावर समाजपुरूषाने आखलेली आहे. तीच रेषा पुढे शाळेत गेल्यावर अधिक गडद होते. मुलीने हे करावयचे नाही ते करायचे नाही अशी अनेक बंधने घालत समाजाने स्त्रीला 'नाही रे' वर्गात लोटुन दिले. ज्यातून बाहेर येन्याची घडपड आजही अनेक महिलांसाठी क्लेषकारक ठरते आहे. लहाणपणापासूनच स्त्रियांना ज्या पध्दतीने वाढविले जाते त्यामुळेही स्त्रियांमधील निर्णयक्षमता वाढत नाही किंवा अनेक स्त्रिया स्वतंत्रपणे विचार करू शकत नाहीत.

संविधानाने स्त्री व पुरूष यांना समान अधिकार दिले असले तरी भारताच्या पुरूषप्रधान संस्कृतीमुळे स्त्री आज समाज व कुंटुबाच्या बंधनात अडकुन पडली दिसते. पीता, पती आणि पुत्र यांच्या आदेशाने व बंधनाने ती आपले आयुष्य काढते आहे. महिला सबलीकरण प्रकियेच्या माध्यमातुन आज या स्थितीत सकारात्मक बदल होऊन नागरी क्षेत्रातील महिलांच्या सर्वांगीण स्थितीत सुधारणा होऊन महत्त्वाच्या निर्णयातील सहभागाविषयी आज स्त्रियांची परिस्थिती सुधारत असली तरी ग्रामीण अशिक्षीत, दारिद्रय कुटुंबातल्या आणि सामाजिक –दृष्टया मागासलेल्या राज्यामध्ये ही परिस्थिती आणखी सुधारायला हवी.

भारतातील शहरी भागात स्त्री जिवनासंबधात आज मोठया प्रमाणात बदल घडुन येत असलेला दिसतो. तिचे स्वताचे जीवनमाण उचावण्यास अनेक संधी उपलब्ध होत असतांना दिसते. असे असतांनाही मात्र बहुसंख्य स्त्रिया या घरकामात गुंतलेल्या असतात. कमी उत्पादकतेची व कमी कौशल्याची कामे स्त्रियांकडे दिली जातात. यात विशेष तत्वाने ग्रामिण भागाचा उल्लेख करावा लागेल. महिलांचे आर्थिक दृष्टया सबलीकरण होण्याचे प्रमाण व वेग फार कमी आहे. महिला हया उपजिविकेसाठी शेती, मजुरी, उद्योग दुग्ध व्यवसाय इ. क्षेत्रात काम करीत असतात. त्यातच अनेक स्त्रिया घरच्या शेतांवर काम करीत असल्या तरी त्यांना त्याचा मोबदला मिळत नाही. इतकेच नव्हे तर दुग्ध व्यवसायासारख्या अनेक व्यवसायात स्त्रीचा महत्त्वाचा सहभाग असला तरी तो 'घरकाम' या सदरातच धरला जातो. परंतू त्या कामाचे कधीच मोजमाप केले जात नाही. त्यामुळे आर्थिक सबलीकरणाला चालना मिळत नाही.

गरीब वर्गातील स्त्रियांची स्थिती तर याहून बिकट आहे. या वर्गातील स्त्रिया स्वता: मिळवून संसार चालवतातच मात्र इतर जबाबदाऱ्या सांभाळत नवऱ्याचा मारही खातात आणि त्यांने मागीतले तर त्याच्या दारूला पैशेही देतात. पण तेवढयाच ताट मानेने त्या जगतात हे विशेष. घरकाम ही अद्याप स्त्रियांचीच प्राथमिक जबाबदारी आहे. पुरूषांचा त्यातला सहभाग विशिष्ठ स्तरापुरता मर्यादीत, नाममात्र आणि 'मदत' या पातळीवरच आहे. विविध कारणांमुळे स्त्रिया घराबाहेर जाऊन ही कमावतात त्यामुळे स्त्रियांच्या संचाराचे निबंर्ध काहीसे शिथील झाल्यासारखे दिसतात. मात्र कुटूंब प्रमुखाचा मान पुरूषालाच आहे. फायद्यासाठी स्त्रियांच्या नावावर मालमत्ता केली जाते तरीही त्याचे प्रमाण कमीच आहे. अर्थात मालमत्तेवर अंतीम नियंत्रण मात्र पुरूषांचेच आहे. हाच पुरूषप्रधानतेचा भौतीक आधार आहे.

उद्योग व्यवसायाशी संबधीत संघटीत क्षेत्रातही फक्त उच्च शिक्षण मिळाल्यामुळे वा वेळेत नोकरी मिळाल्यामूळे, स्त्रियांचे उत्तम करीअर होते असे अजिबात नाही. प्रत्येक स्त्रिच्या आयुष्यात

ISSN : 2278-9308
July 2021

अशा काही नाजूक वेळा येतात जेव्हा कर्तृत्ववान स्त्रियांनाही जर कुंटुबातील वा नोकरीतील वरिष्ठांचा आधार मिळाला नाही तर त्यांचे करीअरही फसल्याचे दिसते.

स्त्रियांमधील सर्जनशिलता आणि प्रतिभा हा समाजाचा वा देशाचा अमुल्य ठेवा असतो. या गुणाचा वापर उद्योगासारख्या क्षेत्रात करून घेणे हे निकडीचे आणि अत्यंत अनिवार्य आहे. काही उद्योग अजूनही पुरूषप्रधान उद्योग आणि काही स्त्रीप्रधान व्यवसाय म्हणूनच ओळखले जातात. उद्योगातील तंत्रज्ञान जसजसे विकसीत होत जाईल तस तसे त्यांचे शिक्षण घेण्यात मुला — मुलींना संधी मिळणे आवश्यक आहे. तेव्हाच या क्षेत्रात समानता येऊन देशाच्या अर्थकारणाला मोठा लाभ होईल.

विविध क्षेत्राप्रमाणेच स्त्रियांची राजकीय क्षेत्रातील सहभागाविषयीसुध्दा उदासीनता दिसून येते. राज्यघटनेतील स्त्री विषयक विविध तरतूदी व कायदे तसेच शासकीय योजना व उपक्रमाच्या माध्यमातुन स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढविण्यावर जोर देण्यात आला. हे खरे असले तरी या प्रयत्नांना पाहिजे त्या प्रमाणात यश प्राप्त झाल्याचे दिसत नाही. स्त्रियांचा राजकारणातील वाढलेल्या सहभागाचा मागोवा घेतला तर तो एक नाईलाज म्हणुन स्वीकारलेला दिसतो. स्त्रियांनी राजकीय प्रक्रीयेत सहभागी होऊन केवळ बघ्याची भुमिका न घेता त्या निर्णय प्रक्रिया समजावुनघेवु लागल्या. व एक प्रशासक म्हणूनही स्वताला त्यांनी सिध्द केले. याचे प्रमाण वेळोवेळी देऊन सूध्दा ही वस्तुस्थिती समाजाने आत्मसात केली नाही. बहूतेक ठिकाणी तर तिच्या पदाचा पक्ष श्रेष्ठी वा दूसरा कोणीतरी गैरवापर करतांना प्रत्ययास येते. ही स्थिती निश्चितच स्त्रियांच्या राजकीय सहभागाविषयी निराशाजनक व नकारात्मक आहे. या स्थितीत सुध्दा व्यापक प्रमाणात परिवर्तन होणे गरजेचे आहे व हे सर्व सक्षमीकरणाच्या मार्गातुन शक्य आहे. या सक्षमीकरणातुनच स्त्रीला तिच्या न्याय व हक्काविषयक जागृक करून राजकीय सहभाग त्यातील तिची क्रियाशीलता वाढण्यास मदतगार होईल आणि यातुनच तिच्या कार्यकक्षेचा विस्तारही साधला जाईल.

**निष्कर्ष :—**

समाजसुधारणा व सामाजिक चळवळीमुळे स्त्रियांच्या जीवनात जी परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली त्या प्रक्रियेत स्त्री सक्षमीकरणामुळे निश्चितच गतीमान झाली आहे. समाजात स्त्रियांवर जो अन्याय, अत्याचार केला जातो. तो अन्याय दुर करण्यासाठी अनेक कृतीशिल प्रयत्न स्त्री सक्षमीकरणातून झालेले आहेत व होत असतांत दिसतात. या प्रयत्नामुळेच स्त्री—पुरूष समानता प्रस्थापीत होण्याच्या दृष्टीने स्त्री — पुरूष असा भेद दुर होतांनाच स्त्रियांच्या प्रगतीस पोषक वातावरणाची निर्मिती होतांना दिसते. त्यातच स्त्रियांच्या प्रगतीस पोषक वातावरणाची निर्मिती होतांना दिसते. त्यातच स्त्रियांना त्यांचे नैसर्गिक अधिकार व न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता मुल्यांचीही उपलब्धता होण्यास बरीच मदत झालेली आहे. २१ व्या शतकातील आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतीक इ. क्षेत्रात व्यापक स्वरूपात बदल होत असतांना तसेच विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे विकासाची अनेक क्षेत्र सर्वांसाठी समान स्वरूपात खुली होत असतांना यात स्त्रियांनाही संधी प्राप्त होणे गरजेचे आहे. स्त्रियांच्या समान भागीदारीतुनच या सर्व क्षेत्राचा विकास साध्य होऊन पर्यायाने देशाची प्रगती सुध्दा झपाटयाने होईल. त्याकरिता स्त्रियांना सक्षम व सुशिक्षीत करणे गरजेचे आहे. म्हणूनच यात सक्षमिकरणाच वाटा महत्वाचा असणार आहे. एकूणच स्त्री सक्षमिकरणाच्या माध्यमातून स्त्रियांच्या कार्य कर्तुत्वाच्या कक्षा विविध क्षेत्रात रूंदावत आहेत. सक्षमीकरणाची ही प्रक्रिया जेवढी गतीमान होईल तीतक्याच वेगाने या सर्व क्षेत्रातील असमानता दुर होण्यास मदत होईल.

**संदर्भ ग्रंथ सूची :—**


- स्वामी व्ही. एन., २०१५, महाराष्ट्रातील समाजसुधारक, संत, साहित्यीक आणि थोर भारतीय विचारवंत, विद्याभारती प्रकाशन.
- लोटे रा. ज., सप्टेबंर २००२, ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स.
- डॉ. आगलावे प्रदीप, २००९, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
- सौ. क्षीरसागर शोभा देवी, २०१३, समग्र मानवी हक्क, के. सागर पब्लीकेशन्स, पुणे.
- https://mr.m.wikipedia.org

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# संस्कृति, शिक्षा एवं धर्म के संदर्भ में स्वामी विवेकानंद का दर्शनः एक दर्शन शास्त्रीय विवेचन

**प्रा.शिवचरण नामदेव धांडे**
सहा.प्राध्यापक, इतिहास विभाग.
स्व.निर्धन पाटील वाघाये महाविद्यालय एकोडी त.साकोली.जि.भंडारा ४४१८०२
E-mail :shavicharandhande@gmail-com, मो. ९०४९८३०८०३.

**सारांश—**

स्वामी विवेकानन्द भारत के बहुमूल्य रत्न एक जीवित क्रांति के मशाल थे, एक व्यक्ति नही एक चमत्कार थे। आज से प्रायः एक सदी पहले पराधीन और पददलित भारत के जिस एकाकी और अकिंचन योद्धा संयासी ने हजारों मील दूर विदेश में नितांत अपरिचितों के बीच अपनी ओजमयी वाणी में भारतीय धर्म—साधना के चिरंतन सत्यों का जयघोष किया। स्वामी विवेकानन्द सामायिक भारत में उन कुशल शिल्पियों में हैं जिन्होने आधारभूत भारतीय जीवन—मूल्यों की आधुनिक अंतराष्ट्रीय परिप्रेक्ष्य में विवेक संगत व्याख्या की। स्वामी विवेकानन्द के जीवन कोश में भारतीय नव—निर्माण के उर्वर बीच यत्नपूर्वक संकलित है ही, उसमें पीड़ित और जर्जरित मानवता के पुनर्सृजन की कार्यात्मक, कार्यसाधक योजना भी सम्मिलित है। भारत के लिए स्वामी जी के विचार चिंतन और संदेश प्रत्येक भारतीय के लिए अमूल्य धरोहर है तथा उनके जीवन शैली और आदर्श प्रत्येक युवा पीढ़ी के लिए प्रेरणास्रोत्र हैं। स्वामी विवेकानंद ने अपने जीवन का प्रधान लक्ष्य भारत के नैतिक तथा सामाजिक पुनः उद्धार के लिए उन्होंने एक अनुप्रेरित कार्यकर्ता के रूप में अपना संपूर्ण जीवन खपा दिया । स्वामी जी भारतीय संस्कृति, शिक्षा तथा धर्म के समग्रता के संबंध ने आज हमारे सामने विशेषकर युवा पीढ़ी के लिए यह आह्वान कि—'' मानव स्वाभव गौरव को कभी मत भूलो"। हममें से प्रत्येक व्यक्ति यह घोषणा करें कि — मैं ही ईश्वर हूँ , जिससे बड़ा कोई न हुआ है और न ही होगा। उनके विचारानुसार शिक्षा का उद्देश्य केवल जानकारी देना मात्र नही है अपितु उसका लक्ष्य जीवन चरित्र और मानव का निर्माण करना होता है। चूंकि वर्तमान शिक्षा उन तत्वों से युक्त नहीं है अतः वह श्रेष्ठ शिक्षा नहीं है। वे शिक्षा के वर्तमान रूप को अभावात्मक बताते थे, जिसमें विद्यार्थियों को अपनी संस्कृति का ज्ञान नही होता। भारत की गुरू—शिष्य परंपरा जिसमें विद्यार्थीऔ तथा शिक्षकों में निकटता के सबंध नया संपर्क रह सकें तथा विद्यार्थियों में पवित्रता ज्ञान,धैर्य, विश्वास, विनम्रता आदि के श्रेष्ठ गुणों का विकास हो सके। वे धर्म के सबंध में किसी एक धर्म को प्राथमिकता नही देते थे , स्वामी जी मानव धर्म के प्रति दृढ़ प्रतिज्ञ थे। उन्होने धार्मिक संकीर्णता से उपर उठते हुए यह घोषणा की कि '' प्रत्येक धर्म, सम्प्रदाय जिस भाव में ईश्वर की आराधना करता है , मैं उनमें से प्रत्येक के साथ ठीक उसी भाव से आराधना करूंगा" । स्वामी जी के अनुसार बाईबिल, वेद, गीता, कुरान तथा अन्य धर्मग्रथ समूह मानो ईश्वर के पुस्तक में के एक—एक पृष्ठ है। वे प्रत्येक धर्म को महत्व देते थे तथा उनके सारभूत तत्वों को जो मानव जीवन को उनका चरित्र तथा ज्योति प्रदान करने में सक्षम हो को अपनाने का आहवान करते थे जिसे एक नाम दिया गया '' सर्व धर्म सम्भाव''। उन्होंने प्रत्येक धर्म के विषय में कहा कि कोई व्यक्ति जन्म से हिन्दू, ईसाई, मुस्लिम, सिक्ख या अन्य धर्म के नहीं होते। उनके अपने माता—पिता, पूर्वज जिस संस्कृति, संस्कार या परंपरा से जुड़े रहते है वे उसे सीखते और आज्ञा पालन करने वाले होते हैं।मानव से बढ़कर और कोई सेवा श्रेष्ठ नही है और यहीं से शुरू होता है वस्तविक मानव की जीवन यात्रा। हमें आज आवश्यकता है स्वामी जी के आदर्शो पर चलने हेतु दृढ़ प्रतिज्ञ होने, उनके शिक्षा, विचार संदेश तथा दर्शन को साकार रूप में अपना लेने की। स्वामी जी के जीवन शैली को आत्मसात करके जन—जन में एकता प्रेम,और दया की नंदियॉ बहाकर नए युग की शुरूआत करने की। तो आईये जाति, धर्म, सम्प्रदाय, पंथ और अन्य संकीर्ण मानसिकता से उपर उठकर एक—दूसरे का हाथ थामकर मॉ भारती को समृद्धि ,विकास और उपलब्धि की ओर ले जाए।

**प्रस्तावना—**

स्वामी विवेकानंद जी भारतीय और विश्व इतिहास के उन महान व्यक्तियों में से हैं जो राष्ट्रीय जीवन को एक नई दिशा प्रदान करने में एक अमृत धारा की भांति हैं । स्वामी जी के व्यक्तित्व और विचारों में भारतीय संस्कृति परंपरा के सर्वश्रेष्ठ तत्व निहित थे। उनका जीवन भारत के लिए वरदान थे। स्वामी जी का संपूर्ण जीवन मॉ भारती और भारतवासियों की सेवा हेतु समर्पित था । उनका व्यक्तित्व विशाल समुद्र की भॉति था। वे आधुनिक भारत के एक आदर्श प्रतिनिधि होने के अतिरिक्त वैदिक धर्म एवं संस्कृति के समस्त स्वरूपों के उज्जवल प्रतीक थे । प्रखर बुद्धि के स्वामी और तर्क विचारों से सुसज्जित जलते दीपक की तरह प्रकाशमान थे । उनके अंत:करण में तेज ज्वाला थी यही कारण है कि उनके विचारों से हमें प्रेरणा, नव चेतना तथा स्फूर्ति प्राप्त होती है, हमारे अत:करण में आलोकित प्रस्फुटित ज्वाला प्रज्जवलित होती है। ''उनके विचार शिक्षा और दर्शन इतने प्रभावी हैं कि स्वामी जी के द्वारा दिए गए सैकड़ों वक्तव्यों में से कोई एक वक्तव्य महान् क्रांति करने के लिए, व्यक्ति के जीवन में आमूल परिवर्तन करने में समर्थ है ''।१..

**स्वामी विवेकानंद का जीवन दर्शन—**

स्वामी जी का जीवन दर्शन वास्तव में भारत का वास्तविक जीवन दर्शन है। स्वामी विवेकानंद का वास्तविक नाम नरेन्द्रनाथ दत्त था, उनका जन्म १२ जनवरी १८६३ ई. में कलकता के अभिजात क्षत्रिय परिवार में हुआ। सन १८८१ में उनकी मुलाकात रामकृष्ण परमहंस से हुई । सन १८८६ में श्री रामकृष्ण परमहंस की मृत्यु के समय विवेकानंद उनके सर्वप्रिय शिष्य थे। अब विवेकानंद जी लंबी यात्राएँ प्रारंभ की । ''वे भारतीय संस्कृति के सभी महत्वपूर्ण केन्द्रों में गए और हिमालय से लेकर कन्याकुमारी तक इस विशाल देश का कोना—कोना छान मारा। उनकी कुशाग्र बुद्धि और संवेदनशील हदय ने हजारों बातें आत्मसात की ''२

सन् ११ सिंतबर १८९३ ई. में शिकागों (अमरीका) के विश्व धर्म सम्मेलन में वे भारत के प्रतिनिधि बनकर गए । उन्होनें हिन्दू धर्म का आध्यात्मिक आधार पर सम्मलेन में जीवंत विवेचन दिया । इस विवेचन के समक्ष पश्चिमी धर्मो का दिवालियापन स्पष्ट हो गया । जिस स्पष्टता और सूक्ष्मता से विवेकानंद ने 'वेदांत' की व्याख्या की पाश्चात्य विद्धानों को यह जीवन का अंतिम सत्य मालूम पड़ने लगा । स्वामी जी ने अनेक देशों का भ्रमण किया। उस भ्रमण के दौरान वे अनेक व्यक्तियों से मिले एवं अनेक समस्याओं ,रीति—रिवाजों, संस्कृतियों तथा परिस्थितियों का प्रत्यक्ष परिचय प्राप्त किया। ४ जुलाई १९०२ को स्वामी विवेकानंद की मृत्यु हो गई । स्वामी जी एक महान राष्ट्रवादी ,देशभक्त तथा विश्व—बंधुत्व की भावना से ओत—प्रोत थे ।

**संस्कृति के संदर्भ में स्वामी विवेकानंद का दर्शन—**

स्वामी विवेकानंद जी प्राचीन भारतीय संस्कृति के केवल मानने वाले ही नही बल्कि उनके सच्चे उपासक भी थे। स्वामी जी ने भारत के जन—समुदाय के सामाजिक ,धार्मिक एवं आर्थिक परिस्थितियों को निकट से देखा तथा समझा था। इस जानकारी के पृष्ठभूमि में ही उनका दार्शनिक चिन्तन का उद्भव हुआ । स्वामी जी भारतीय संस्कृति के प्राचीनता और महत्व को जानने और समझने के लिए भारत वासियों को सदैव प्रेरित करते रहे। संस्कृति के संदर्भ में उनका मानना था कि ''वैदिक संस्कृति भारत की आत्मा है और यहॉ की आध्यामिकता (भारत वर्ष ) इन का मेरूदण्ड हैं ''।३ स्वामी जी मानते थे कि जब व्यक्ति संस्कारवश अच्छे कार्य करता है तभी उसका चरित्र गठित होता है । वे कहते थे कि बुराईयों का कारण मनुष्य में ही निहित है, किसी दैवीय सत्ता में नही । मनुष्य रेशम के कीडों के समान है वह अपने आप से ही सूत निकालकर कोष बना लेता है और फिर उसी में बंदी हो जाता है । इस जाल को व्यक्ति स्वयं ही नष्ट कर सकता है कोई दूसरा नहीं। वे कहते थे ' तुम्हारे अंदर जो कुछ है अपनी शक्तियों द्वारा उसका विकास करो पर कभी भी दूसरों का अनुशरण करके नही। वे नवयुवकों को ध्येयवादी होने निरंतर प्रेरणा देते रहते थे । वे भारत को ' अमर भारत' की संज्ञा देते थे। स्वामी जी हमेशा कहते थे कि यदि भारतवासियों ने पाश्चत्य भौतिकवादी सभ्यता के चक्कर में पड़कर आध्यात्मिकता का आधार त्याग दिया तो उनके परिणाम स्वरूप तीन पीढ़ियों में ही उनका अस्तित्व समाप्त हो जाएगा, जिसका सीधा परिणाम होगा सर्वतोन्मुखी सत्यानाश । स्वामी जी कहते थे कि अन्य व्यितियों से

हम जो लेना चाहें ले ग्रहण करें किन्तु उसे जीवन के आदर्श के अधीन करे । स्वामी विवेकानंद का दर्शन दूरदृष्टि था उनके विचारों में दिव्यता झलकती थी वे जो भी कहते थे बिल्कुल सटीक और मानव के भवनाओं व मास्तिष्क पर सीधे पहुँचने वाले होते थे। स्वामी जी ने भारतीय संस्कृति के विषय में जो भी कहा आज हमारे सामने परिणाम स्वरूप प्रकट हो रहे है । क्योंकि भारतीय संस्कृति की मधुरता पवित्रता और महक धीरे–धीरे लुप्तता के कगार पर खड़ी दिखाई पड़ने लगी है भारतीय संस्कार और परंपरा जो प्रत्येक रिश्ते–नाते की पवित्रता बनाए रखती थी आज के परिदृश्य में भारत मॉ के दामन में क्रूरता के बीज बो रही है, क्योंकि आज की आधुनिकता ने मानवता के पवित्र रिश्ते को दागदार कर दिया है । प्राचीन भारतीय संस्कृति के आधार स्तंभ पर गहरा प्रहार किया है, क्योंकि खून के रिश्ते अब खून के प्यासे हो गये है बेटे बाप के, भाई–भाई के, मॉ–बेटी के बीच नफरत की दीवार खड़ी दी है जो कि मानवता के लिए अत्यंत हानिकारक है। इसका मूल कारण है भारतीय संस्कृति को तुच्छ जानना और आधुनिकता के नशें मे चूर विदेशी सभ्यता और संस्कृति को आत्मसात् कर लेना। भारतीय संस्कृति, ज्ञान ओर संस्कारों को त्याग देना मूल कारण है । स्वामी विवेकानंद जी एक सौ दस वर्ष पहले जो आशंका जताई थी वह आज हमें देखने को मिल रहा है। ''स्वामी विवेकानंद एक सच्चे वेदांती थे वह सत्य के अनुपालन के समर्थक थे और उनकी दृष्टि में सत्य वही है जिससे व्यक्ति एवं समष्टि दोनों का हित हो उन्होंनें प्राचीन भारतीय वैदिक संस्कृति को जीवन के शाश्वत मूल्यों के रूप में स्वीकार किया ''।४ अब हमारे समक्ष प्रश्न यह उठता है कि क्या हम सच्चे मायने में भारतीय हैं और भारत के मूल संस्कृति को अपने में समाहित किए हुए है ? मित्रों हमारे पास अभी–भी अवसर है सनातन ,वैदिक संस्कृति को समझने, जानने और आत्मसात् कर लेने की। हमारे मूल सांस्कृतिक गरिमा को अपने में पुनर्जिवित करने की । स्वामी विवेकानंद जी के दर्शन और उच्च विचारधारा को स्वीकार करके राश्ट्र और समाज के प्रत्येक व्यक्तियों में सांस्कृतिक एकता और जागृति लाने की है। हे जवानों उठो, ये देश है तुम्हारा मॉ भारती पुकारती है अपनी सच्ची संस्कृति को पहचानों और मानसिक दासता के बोड़ियों से स्वतंत्र हो जाओं । मित्रों वास्तव में संस्कृति हमेशा विशिष्ट होती है और दूसरे प्रतिबद्ध उतराधिकारी समाज, विशिष्ट समाज होता है। संस्कृति लोगों की जीवन रीति है एक संस्कृति व्यवहार की वह व्यवस्था है जिसमें किसी समाज के सदस्य सहभागी होते है और समाज वह जनसमूह है जो एक सर्वनिष्ट संस्कृति है जिसमें मानव के जीवन मूल्य और ज्ञान का असीम भण्डार है। जीवन मूल रहस्य को यदि जानना है तो वैदिक संस्कृति का ज्ञान आवश्यक है।'' मानव जीवन के इतिहास को जानने का सबसे प्राचीन साहित्य 'वेद' है विश्व के इतिहास में अति प्राचीन और प्रमाणित साहित्य है ''। ५

**शिक्षा के संदर्भ में स्वामी विवेकानंद का दर्शन–**

स्वामी विवेकानंद जी ऐसे परम्परागत व्यवसायिक तकनीकी शिक्षा शास्त्री न थे जिन्होंने शिक्षा का क्रमबद्ध सुनिश्चित विवरण दिया हो। वह मुख्यत: एक दार्शनिक ,देशभक्त, समाज सुधारक और दिव्यात्मा थे जिनका लक्ष्य अपने देश और समाज की खोयी हुई जनता को जगाना तथा उसे नव निर्माण के पथ पर अग्रसर करना था। शिक्षा दर्शन के क्षेत्र में स्वामी जी की तुलना विश्व के महानतम् शिक्षा शास्त्रियों प्लेटो, रूसों, और बट्रैण्ड रसेल से की जा सकती है क्योंकि उन्होंने शिक्षा के कुछ सिद्धांत प्रस्तुत किए है जिनके आधार पर विशाल ज्ञान का भवन निर्माण तकनीकी रूप से कर सकते है । स्वामी जी के शैक्षिक विचार भी उनकी वेदांत विचारधारा से प्रेरित है। उनका मुख्य उद्देश्य थे मानव का नवनिर्माण क्योंकि व्यक्ति समाज का मूल आधार है । व्यक्ति के सर्वागीण उत्थान से समाज का सर्वागीण उत्थान होता है और व्यक्ति के पतन से समाज का पतन होता है स्वामी जी ने अपने शिक्षा दर्शन में व्यक्ति और समाज दोनों के समरस संतुलित विकास को ही शिक्षा का प्रमुख लक्ष्य माना । स्वामी जी के अनुसार वेदांत दर्शन में प्रत्येक बालक में असीम ज्ञान और विकास की सम्भावना है परन्तु उसे इन शक्तियों का पता नहीं है । शिक्षा द्वारा उसे इनकी प्रतीति कराई जाती है तथा उनके उत्तरोतर विकास में छात्र की सहायता की जाती है । स्वामी जी वेदांती थे इसलिए वे मनुष्य को जन्म से पूर्ण मानते थे और इस पूर्वता की अभिव्यक्ति को ही शिक्षा कहते थे । स्वामी जी के शब्दों में '' मनुष्य की

अन्तर्निहित पूर्णता को व्यक्त करना ही शिक्षा है''६ स्वामी विवेकानंद लोगों का नैतिक गुणों तथा व्यक्ति के गौरव के समर्थक थे ।

स्वामी विवेकानंद शिक्षा के विषय में कहते है कि सच्ची शिक्षा वह है जिससे मनुष्य की मानसिक शक्तियों का विकास हो। वह शब्दों को रटना मात्र नहीं है। वह व्यक्ति की मानसिक शक्तियों का ऐसा विकास है , जिससे वह स्वयंमेव स्वतंत्रतापूर्वक विचार कर ठीक—ठीक निर्णय कर सकें। इक्कसवीं शताब्दी के बदलते परिवेश में जहाॅ सूचना और प्रौद्योगिकी का युग चल रहा है वहाॅ भारत की वर्तमान शिक्षा पद्धति महज उपब्धियाॅ वितरण करने के अतिरिक्त और कोई विशेष उपलब्धि प्राप्त नही की गई हैं वहाॅ स्वामी जी के चिंतन को अपनाना आवश्यक है । स्वामी जी शिक्षा के वर्तमान रूप को अभावात्मक बताते थे जिनके विद्याथियों को अपनी संस्कृति का ज्ञान नही होता, उन्हें जीवन के वास्तविक मूल्यों का पाठ नही पढ़ाया जा सकता तथा उनमे श्रद्धा का भाव नही पनपता है । स्वामी जी का मानना था कि भारत के पिछड़ेपन के लिए वर्तमान शिक्षा पद्धति भी उत्तरदायी है । यह शिक्षा न तो उत्तम जीवन जीने की तकनीक प्रदान करती है और न ही बुद्धि का नैसर्गिक विकास करने में सक्षम है । स्वामी जी आधुनिक शिक्षा पद्धति की अलोचना करते हुए लिखा '' ऐसा प्रशिक्षण जो नकारात्मक पद्धति पर आधारित हो, मृत्यु से भी बुरा हैं।७ '' बालक स्कूल में जाता है और पहली बात सीखता है कि उसका पिता मूर्ख है, दूसरी बात सीखता है कि उसका बाबा पागल है, तीसरी बात कि उसके सभी शिक्षक पाखण्डी हैं , चैथी कि सभी पवित्र ग्रंथ झूठे है । १६ वर्ष के होते—होते तो विद्यार्थी निषेधों का एक समूह, अस्थिहीन और जीवनहींन बन जाता है यही कारण है कि पचास वर्षो में भी यह शिक्षा एक भी मौलिक व्यक्ति उत्पन्न नही कर सकी। प्रत्येक व्यक्ति जिसमें मौलिकता नही है, उसे देश में नही बल्कि कही औंर पढ़ाया गया है अथवा फिर से अन्धविश्वासों से मुक्त होने के लिए अपने देश के पुरातन शिक्षालयों में जाना पड़ा है। स्वामी विवेकानंद भारतीयों के लिए पाश्चात्य दृष्टिकोण से प्रभावित शिक्षा पद्धति को उचित नही मानते थे ।'' वे शिक्षा की भारतीय पद्धति गुरूकुल पद्धति को श्रेष्ठ मानते थे जिसमें विद्यार्थियों तथा शिक्षकों में निकटता के संबंध तथा सम्पर्क रह सके और विद्यार्थियों के श्रद्धा, पवित्रता, ज्ञान, धैर्य, विश्वास, विनम्रता, आदर आदि श्रेष्ठ गुणों का विकास हो सकें''।८ स्वामी जी भारतीय शिक्षा पाठयक्रम में दर्शनशास्त्र एवं धार्मिक ग्रथों के अध्ययन को भी आवश्यक मानते थे वे ऐसी शिक्षा के समर्थक थे जो संकीर्ण मानसिकता तथा भेदभाव साम्प्रदायिकता दोषों से मुक्त हो । स्वामी विवेकानंद के अनुसार शिक्षा के मूल उदेश्य, जिसमें व्यक्ति का सर्वांगीण विकास हो । उतम चरित्र ,मानसिक शक्ति और बौद्धिक विकास हो, जिसमें व्यक्ति पर्याप्त मात्रा में धन अर्जित कर सके और आपात काल के लिए धन संचय कर सके । संक्षेप, में स्वामी जी का शिक्षा दर्शन मानव निर्माण, चरित्र निर्माण शारीरिक विकास, बैद्धिक विकास, मानसिक विकास, उत्तम चिंतन एवं आत्मविश्वास का विकास, एकाग्रता शक्ति का विकास, आध्यामिक गुणों का विकास , स्वतंत्र व्यक्तित्व का विकास करना था। वर्तमान शिक्षा पद्धति एवं समाज में नैतिक गुणों का हास हुआ है उसे स्वामी जी के विचारों को अपनाकार ही समाप्त किया जा सकता है।

## धर्म के संदर्भ में स्वामी विवेकानंद का दर्शन—

स्वामी विवेकानंद मानव धर्म को सर्वश्रेष्ठ धर्म मानते थे, धर्म के संदर्भ में उनके विचार अत्यंत आकर्षक एवं हृदयस्पर्शी थे । उनके अनुसार '' धर्म मनुष्य के चिंतन और जीवन का सबसे उच्च स्तर है ।''९ हम देखते है कि मानव प्रेम एवं धर्म जगत में इन दो ही शक्तियों की क्रिया सबसे अधिक प्रस्फुट हुई है। मानवता को जिस तीव्रतम प्रेंम का ज्ञान है, वह धर्म से ही प्राप्त हुआ है , और वह घोरतम पैशाचिक घृणा भी, जिसे मानवता ने कभी अनुभव किया , वह भी धर्म से ही प्राप्त हुई है । संसार ने कभी महानतम् शांति की जो वाणी सुनी है , वह धर्म राज्य के लोगों के मुख से निकली हुई है और जगत ने कभी भी जो तीव्रतम भत्र्सना सुनी है, वह भी धर्म राज्य के मनुष्यों के मुख से उच्चरित हुई है। किसी धर्म का उद्धेश्य जितना ही उच्च होता है , उसका संगठन जितना ही सूक्ष्म होता है, उसकी क्रियाशीलता भी उतनी ही अद्भुत होती है । धर्म प्रेरणा से मनुष्यों ने संसार में जो खून की नदियाॅ बहायी है , मनुष्य के हृदय की और किसी प्रेरणा ने वैसा नही किया । और धर्म प्रेरणा से मनुष्यों ने जितना चिकित्सालय,

धर्मशाला, अन्न क्षेत्र आदि बनाये उतने और किसी प्रेरणा से नहीं । मनुष्य हदय की और कोई वृत्ति उसे, सारी मानव जाति की ही नही निकृष्टतम प्राणियों तक की सेवा करने को प्रवृत्त करती । धर्म प्रेरणा से मनुष्य जितना निष्ठुर हो जाता है, उतना और किसी प्रेरणा से नही, उसी प्रकार, धर्म प्रेरणा से मनुष्य जितना नम्र हो जाता है उतना किसी और प्रवृत्ति से नही।

स्वामी विवेकानंद के अनुसार भारतवासियों को ऐसे धर्म की आवश्यकता नही है जो कमजोरी पैदा करें। उनका मानना था कि इस संसार में नायात्मा बलहीने लक्ष्य: ;जीम मां कवमे दवज हमज दलजीपदह पद जीपे वतसक द्ध अर्थात कमजोर को इस संसार में कुछ भी प्राप्त नही होता । इस प्रकार स्वामी जी ने भारतीयों को अभयम् व शक्तिषाली बनने का सुझाव दिया । स्वामी जी धर्म को मानव शक्ति का स्रोत्र मानते थे । वे ऐस धर्म को नही मानते थे जो कायरता सिखाता हो। उनका कहना था कि स्वयं अपने में विश्वास रखो। स्वामी जी ने भारतीयों को उद्‌बोधित करते हुए कहा है कि '' यह समय न तो रोने का है और न खुशियॉ बनाने का है''। यह समय कमजोरी दिखाने का भी नही है । यह कमजोरी इस हद तक हो गई है हम रूई के ढेर की तरह कमजोर हो गए है। आज हमारे देश को लौह पुरूषों तथा दृढ़ इच्छाशक्ति के लोगों की आवश्यकता है जिन्हें अपने लक्ष्य प्राप्ति से कोई रोक न सकें। चाहे इन्हें उसके लिए समुद्र की सतह में क्यों न जाना पड़े अथवा मृत्यु का सामना क्यों न करना पड़े।'' स्वामी विवेकानंद का मानना था कि प्रत्येक धर्म के मूल तत्व समान है''। हिन्दू वैदिक धर्म विवेकानंद के अनुसार नैतिक मानववाद तथा आध्यात्मिक आदर्शवाद के सार्वभौमिक तत्वों का संदेश देता है। प्राचीन हिन्दू वैदिक धर्म के अन्तर्गत मानवता के कल्याण के लिए जो नैतिक तथा आध्यात्मिक समादेश दिए गए है जिनका स्वरूप सार्वभौमिक है । स्वामी विवेकानंद का धर्म सर्व धर्म है वे किसी एक धर्म के पक्षधर नही थे बल्कि प्रत्येक धर्म के मूल, सारत्व मानव कल्याणकारी अनिवार्य उपयोगिता जो मानव को सच्चे धार्मिकता प्रदान करते हो के मानने वाले थे। सार्वभौमिक धर्म के संदर्भ में उनका कहना था कि '' धर्म की सार्वभौमता धर्म का सार है''[१०] सार्वमौम धर्म की सार्वभौमता मूलत: दो अनविार्य लक्षणों पर आधारित होती है— एक बात तो यह कि धर्म सार्वभौम तभी हो सकता है जब इसका द्वार सबके के लिए खुला रहे।'' दूसरी बात'' ऐसे सर्विभौम धर्म में यह शक्ति होनी चाहिए कि वह विभिन्न धार्मिक संस्थाओं को संतुष्ट एवं तृप्त कर सके। सार्वभौम धर्म किसी धर्म की उपेक्षा ना करके आपसी मतभेदों और विवादों से ऊपर उठकर विभिन्न धर्म संस्थाओं को भी ''सार'' या सार्थकता दिखाई दे।''[११] धर्म को यह बात देखनी है कि नवजात शिशु अबोध तथा निर्दोष है, वह किसी धर्म के साथ पैदा नही होता, मानव जीवन में सामान्यत: हम देखते है कि हिन्दू मॉ—बाप का बच्चा हिन्दू धर्म को स्वीकारता है तथा मुस्लिम मॉ—बाप का बच्चा इस्लाम को ही स्वीकारता है। ऐसा इसलिए होता है कि बचपन से ही उसकी शिक्षा—दीक्षा उसके सामाजिक जीवन, उनका परिवेश उसे एक विशेष धर्म की ओर उन्मुख कर देता है। किन्तु धर्म में यह नही कहा जाता है कि बच्चा किसी धर्म को लेकर पैदा होता है। यह तो बाद में उसकी अभिरूची एवं मनोवृत्ति पर निर्भर करता है कि वह किस धर्म को स्वीकार करें। धर्म का चयन तो व्यक्ति के अपने स्वतंत्र निर्णय पर आधृत है। अत: धर्मो की सार्वभौमता की एक पहचान यह है कि उसके द्वार हर धर्म के व्यक्ति के लिए खुले रहे। हर धर्म व्यक्ति के लिए खुल जाने से यह सार्वभौम धर्म कहलाता है। स्वामी जी कहते है कि जिस प्रकार , विश्व बंधुत्व के संबंध के कहा जा सकता है विश्व बंधुत्व वास्तविक है ठीक उसी प्रकार सार्वभौम धर्म के संबंध में कहा जा सकता है कि सार्वभौम धर्म भी वास्तविक है । स्वामी विवेकानंद धर्म को सार्वभौम धर्म कहते है''[१२] धर्म को वे मानव जाति को एकता के सूत्र में बांधने वाली शक्ति के रूप में मानते थे । स्वामी विवेकानंद का चिंतन केवल एक देश या एक धर्म विशेष तक सीमित नही था बल्कि उसकी सरहरी (सीमा में) में संपूर्ण विश्व का मनुष्य समाज समाया हुआ था वे वृहत्तर संसार के भातृत्व में भी सभी धर्मो की सार्थकता मानते थे। अपने इस विश्व दृष्टि के कारण विवेकानंद यह मानते थे कि भारत की प्रगति समूचे विश्व की प्रगति से संबंद्ध है। स्वामी जी का कहना था कि हमें ऐसा धर्म चाहिए जो मनुष्य का निर्माण करने वाला हो उन्हें कमजोर नही बल्कि सबल बनाने वाला होना चाहिए। उन्होंनें सर्वश्रेष्ठ और उॅचा धर्म मानव की सेवा को माना इस संबंध मे उनका विश्व विख्यात प्रिय नारा'' मानव की सेवा करना ईश्वर की सेवा और आराधना करना है''। गरीबों की सेवा ही ईश्वर

सेवा है''।१३ ईश्वर या देवता की दिव्यता कोई नई और बड़ी बात नही है , बड़ी बात तो तब है जब मानव में भी दिव्यता हो। स्वामी विवेकानंद सार्वभौम धर्म के द्वारा राष्ट्रीय एकता को सशक्त करना चाहते थे। अत: आज हमें स्वामी जी के विचारों का गहराई से चिंतन मनन करने की आवश्कता है, जिससे हममें से प्रत्येक में सत्य, आत्मा की विशुद्धता निष्कपट तथा दैवीय प्रकृति से युक्त गुणों का विकास कर नव मानव का निर्माण करना आवश्यक है।

**निष्कर्ष—**

स्वामी विवेकानंद का विचार, दर्शन और शिक्षा अत्यंत उच्चकोटि के है जीवन के मूल सत्यों, रहस्यों और तथ्यों को समझने की कुंजी है। उनके शब्द इतने असरदार है कि एक मुर्दे में भी जान फूॅक सकता है। वे मानवता के सच्चे प्रतीक थे, है और मानव जाति के अस्तित्व को जनसाधारण के पास पहुॅचाने का अभूतपूर्व कार्य किया।'' वे अद्धैत वेंदांत के प्रबल समर्थक थे। भारतीय संस्कृति एवं उनके मूल मान्यताओं पर दर्शन आधारित जीवन शैली अपनाने तथा आपनी संस्कृति को जीवित रखने हेतु भारतीय संस्कृति के मूल अस्तित्व को बनाए रखने का आहवान किया ताकि आने वाली भावी पीढ़ी पूर्ण संस्कारिक, नैतिक गुणों से युक्त, न्यायप्रिय, सत्यधर्मी तथा आध्यात्मिक और भारतीय आदर्श के सच्चे प्रतीक के रूप में विश्व में उॅचा स्थान रखें''। वर्तमान में आज के युवा पीढ़ी के लिए यह आवश्यक है कि वे अपने मूल संस्कृति से परिचित होवे और नैतिक गुणों से भरपूर होकर सच्चे भारतीय होने के गौरव को बनाए रखें। आधुनिकता और पाश्चात्य संस्कृति और जीवन शैली के आडम्बर में न फंसकर थोडें दिनों के सुख के लिए बहुमूल्य जीवन का नाश न करें। स्वामी जी के आदर्शो पर चलने हेतु दृढ़ प्रतिज्ञ रहें और शिक्षा के मूल्य को समझे गुरू को उचित आदर सम्मान दें, भौतिकता के अंधे दौड़ में मौलिकता का त्याग न करें। शिक्षा जैसी पवित्र प्रकाश जो अज्ञानता के बंधन से मुक्ति दिलाती है और जीवन के दु:खों से छुड़ाकर सुखमय ज्योतिर्मय जीवन प्रदान करती है। गुरू—शिष्य के पवित्र रिश्तों को कलंकित न करें। नैतिक आदर्शो पर चलने हेतु दृढ़ संकल्पित हो ताकि विश्व के भूपटल पर भारतीय होने के गौरव का छाप सुनहरें अक्षरों में सदैव अंकित रहें। धर्म के संबंध में जो स्वामी जी ने हमें मार्ग बताया उन पर अमल करें और साम्प्रदायिकता, धार्मिक कट्टरता, घृणा, भेदभाव, जात—पात, छुआ—छूत जैसी संकीर्ण मानसिकता व विचारों से उपर उठकर धार्मिक सहिष्णुता को हदय में जगह दें। ईश्वर एक है और हम सब उसी के संतान है इसलिए मानवता की सेवा को व मानव प्रेम को दिल में पहला स्थान दें। यह सब तभी संभव होगा जब हम सचमुच स्वामी विवेकानंद के बताये हुए मार्ग पर चलेंगे। स्वामी विवेकानंद के व्यक्तित्व और आदर्शो पर चिंतन करें सत्य को समझने की कोशिश करेंगे। खुद को सर्वश्रेष्ठ समझकर या अधिक बुद्धिमान जानकर स्वयं को धोखे में न रखें बल्कि वर्तमान में हम किस रास्ते में जा रहें हैं जिसका परिणाम क्या होगा ? विचार करें। स्वामी जी के कार्यो को स्मरण करें और अपनी मातृभूमि मॉ भारती के खोई हुई गौरव को समस्त भारतवासी मिलकर और दृढ़ संकल्प लेकर वापस लाने का प्रयास करें। यही स्वामी जी को सच्ची श्रद्धाजंली होगी और मॉ भारती के प्रति सच्चा समर्पण। संस्कृति देश की धरोहर व पहचान है शिक्षा ज्योंति है। धर्म मानव होने का प्रतीक है। इसालिए संस्कारिक चरित्रवान उत्तम गुणों से अपने को सजायें। शिक्षा के द्वारा देश के विकास को चरम पर ले जावें। और सर्व धर्म के द्वारा सच्चे मानवता को अपनाकर ईश्वर की सेवा करें। तो आइए हम एक होकर राष्ट्रीय नवचेतना जगाएं, नए समाज एवं ,नवयुग, का निमार्ण करें।

**संदर्भ ग्रंथ—**

१.गुप्त , राजेन्द्र प्रसाद (१९९७) ''स्वामी विवेकानंद: व्यक्ति और विचार'' प्रकाशक —राधा पब्किकेशन ४३७८/४B अंसारी रोड, दरियागंज नई दिल्ली — ११०००२ प्रसंस्करण

२.स्वामी, व्योमरूपानन्द ''विवेकानंद संचयन'' रामकृष्ण मठ नागपुर

३.स्वामी निखिलानंद (२००५)'' विवेकानंद एक जीवनी'' प्रकाशक स्वामी बोधसारानन्द , अध्यक्ष अध्दैत आश्रम , मायावती, चम्पावत, उत्तरांचल कोलकाता स्थित प्रकाशन विभाग द्वारा प्रथम संस्करण।

४.रहबर, हंसराज (१९९८) '' योद्धा संन्यासी विवेकानंद'' प्रकाशक राजपाल एण्ड सन्ज, मदरसा रोड कश्मीरी गेट, दिल्ली—६ प्रथम संस्करण।

५.स्वामी रंगानंद (मई—अगस्त २००८) '' स्वामी विवेकानंद और भारत का भविष्य ''
६.सरित, सुशील एवं भार्गव अनिल (२००४—२००५) '' आधुनिक भारतीय शिक्षाविदों का चिंतन '' वेदान्त पब्लिकेशन, एचत्रपीत्र भार्गव बुक हाउस ४/२३०, कचहरी धाट , आगरा — २८२००४ I.S.B.N.k~-& ८१—८६८५१—८७—९ प्रथम संस्करण
७.सिंह , जगबीर (नवम्बर—जनवरी— २००९) '' शोध समीक्षा और मूल्यांकन '' ैछ ०९७४. २८३२ टवसण्प् ेंम.५ संपादक कृष्ण वीर सिंह ए—२१५ मोतीलाल नगर गली.न. ७ क्वीन रोड़ जयपुर (राज.)
८.स्वामी विवेकानंद '' विश्ववधर्म वेदांत '' वेदांत केन्द्र प्रकाशन जोधपुर
९.दमोदरन , के, (१९८२) '' भारतीय चिंतन परंपरा ''
१०.लाल , बंसत कुमार (१९९१) ''समकालीन भारतीय दर्शन '' प्रकाशक मोतीलाल बनारसी दास बंगलों रोड जवाहर नगर दिल्ली — ११०००७
११ श्रीमति बाधवा, प्रमिला (दिसम्बर—जनवरी २०१०) ''रिसर्च एनालिसिस एण्ड एवैल्युएशन'' ISSN ०९७५.३४८६ Vol.०१ , Issue ३.४ संपादक कृष्ण वीर सिंह ए—२१५ मोतीलाल नगर गली.न. क्वीन रोड़ जयपुर (राज.)
१२.स्वामी विवेकानंद (२९ दिसंम्बर १८८०) ''नया भारत गढ़ो'' रामकृषण मठ नागपुर

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# जातीचा भारतीय राजकारणावर प्रभाव

प्रा. डॉ. सरला वसंतराव मेश्राम
राज्यशास्त्र विभाग प्रमुखमहिला कला महाविद्यालय, उमरेड
Ermail ID – meshram.sarla1@gmail.com,Mob. No. 9422230993

भारतात विविध धर्म, जाती, पंथ, भाषा, प्रदेश आहेत. प्रत्येक घटकाचा भारतीय समाजमनावर फार मोठा प्रभाव पडलेला आहे. भारतीय समाजाला ज्याप्रकारे प्राचीन व महान अशा संस्कृतीचा वारसा लाभलेला आहे त्याचपद्धतीने हजारो वर्षापासून जाती, धर्म, पंथ, भाषा, प्रदेश या आधारावर व्यक्ती—व्यक्तीमध्ये, समाजा—समाजामध्ये, गटा—गटामध्ये असणारी विषमता खोलवर रूजलेली आहे. प्रत्येक व्यक्तीने, समान विचार असणाऱ्या समुहाने वा गटाने आपापली निश्चित अशी विचारसरणी स्विकारलेली आहे. प्रत्येक व्यक्ती, समुह वा गट आपल्या विचारसरणीचे समर्थन करतांना तिचा दुसऱ्या विचारांच्या व्यक्ती वा समुहानेही स्विकार करावा अशी त्यांच्या कडून अपेक्षा केली जाते. त्यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात. परंतू स्वत: मात्र दुसऱ्यांच्या विचारांना एकुन सुद्धा घेण्याच्या तयारीत नसतात. कधी कधी काही गट वा समुह सत्तेचा आधार घेउन ती विचारसरणी जबरदस्तीने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष स्वरूपातदुसऱ्यांवर लादण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रयत्नांना समाजीतील जे घटक अधिक भावनाप्रधान, आर्थिकदृष्टया कमकुवत, सत्ताहीन असताततेे सहजरित्या बळी पडतात. कारण त्यांना धर्म, जात इ. चा आधार घेउन संधीसाधू भडकवितात. भारतासारख्या देशात बहुतेक व्यक्ती जातीय मनोवृत्तीच्या आहेत. त्यापैकी अधिकारात असलेल्या व्यक्ती, जे त्यांच्या जाती जमातीचे नाहीत, त्यांना समानतेची वागणुक देतील अशी अपेक्षा करणे कठीण आहे. भारतात स्वातंत्र्यापुर्वी असणारी विषमता स्वातंत्र्यानंतर काही प्रमाणात कमी झालेली असली तरी आजही पक्षपाती वागणूक मागास समजल्या जाणाऱ्या जाती, जमातींच्या वाटयाला येतेच.

भारतात हजारो वर्षापासून जातीचे अस्तित्व भारतात आहे. जात ही सामाजिक स्तरीकरणाची प्रक्रिया आहे. वैदिक काळापासून तर स्वातंत्र्यपुर्व काळापर्यंत जातीचे स्वरूप फार उग्र होते. भारतात व्यक्तीचा दर्जा जातीवरून ठरत असे. ब्रिटीश कालीन भारतात १८८५ मध्ये अखिल भारतीय कॉग्रेसची स्थापना झाली. कॉग्रेस ही हिंदूचे प्रतिनिधित्व करणारी संस्था म्हणून ओळखल्या जाउ लागली. भारतात हिंदूची संख्या अधिक असल्यामूळे ब्रिटिश सरकारमध्ये हिंदूचा सर्वाधिक प्रभाव होता. ब्रिटीशांनी १९०९ मध्ये मोर्ले मिंटो सुधारणा कायदा आणला त्यात प्रांतीय निवडणुकीमध्ये मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यात आले. १९१९ मध्ये मॉटेग्यू चेम्सफोर्ड कायदा आणला. या कायद्याने शीख, ख्रिच्छन, पारसी, ॲग्लो इंडियन यांना स्वतंत्र मतदार संघ देण्यात आले. तसेच काही अटीवर मतदानाचा अधिकारही देण्यात आला. म्हणजेच ब्रिटिशकालीन भारतात हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिच्छन, पारसी, ॲग्लो इंडियन या सर्वांना स्वतंत्र मतदार संघ देण्यात आले. परंतू अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींना मात्र यापैकी काहीच मिळाले नाही. अस्पृश्य हा देखील अल्पसंख्याक समुदाय आहे हे सुद्धा मान्य करायला त्यावेळेचे तत्कालीन नेते तयार नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३० मध्ये झालेल्या पहिल्या गोलमेज परिषदेत दलितांचे प्रतिनिधी म्हणून भाग घेतला. या परिषदेत त्यांनी अस्पृश्य वर्गासाठी स्वतंत्र राजकिय प्रतिनिधित्वाची मागणी केली. १९३१ मध्ये झालेल्या दुसऱ्या गोलमेज परिषदेत डॉ. आंबेडकरांनी या मागणीचा पाठपुरावा केला. त्यावर महात्मा गांधींचे मत होते की, केवळ त्यांचा कॉग्रेस पक्षच संपूर्ण भारतीयांचे प्रतिनिधित्व करते. परंतू डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी त्यांचा कडाडून विरोध केला. अस्पृश्य हे हिंदू असून ते अल्पसंख्यांक नाहीत म्हणून त्यांना वेगळे मतदारसंघ नकोत असे गांधीचे विचार होते. परंतू एखादा समाजघटक अल्पसंख्यांक आहे की नाही हे त्याला त्याच्या समाजाकडून कितपत पक्षपाती वागणूक मिळते यावर त्या समाजाचे अल्पसंख्यात्व ठरवायला हवे. अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ मिळू नये म्हणून गांधींनी आमरण उपोषण केले. त्यांच्या समर्थकांनी डॉ. आंबेडकरांवर मोठया प्रमाणावर दबाव आणला. परिणामत: १९३२ मध्ये अस्पृश्यासाठी स्वंतत्र प्रतिनिधीत्व या

बाबीवर डॉ. बी. आर. आंबेडकर आणि महात्मा गांधीं यांच्यात पुणे करार झाला. पुणे करारानुसार प्रांतिक विधिमंडळात सर्वसामान्य मतदारसंघातून अस्पृश्य वर्गाकिरिता काही जागा राखीव ठेवण्यात आल्या. उदा. मद्रास — ३०, मुंबई (सिंधसहित) — १५, पंजाब — ८, बिहार आणि ओरीसा — १८, मध्यप्रांत — २०, आसाम — ७, बंगाल — ३०, उत्ता प्रदेश — २० अशा एकुण १४८ जागा राखीव ठेवण्यात आल्या. या जागांवर संयुक्त मतदारसंघाद्वारे निवडणुका घेण्याचे ठरविण्यात आले. परंतू स्पृश्य हिंदू आणि अस्पृश्य यांच्या मतसंख्येत जी प्रचंड तफावत होती त्यामूळे अस्पृश्यांना आपले खरे प्रतिनिधी निवडून आणण्याच्या दृष्टिने संयुक्त मतदारसंघाची पद्धती निरूपयोगी होती. पूणे करार डॉ. बाबासाहेब आंबेकरांनी स्विकारला, कारण गांधी यांनी उपोषणाद्वारे दडपण आणले आणि अस्पृश्यांच्या निवडणुकीत स्पृश्य हिंदू ढवळाढवळ करणार नाही असे आश्वासन देण्यात आले होते. परंतू पुणे कराराचा अस्पृश्यांना आपले खरे प्रतिनिधी विधिमंडळात पाठविण्याचा उद्देश्य धुळीस मिळाला.

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला मूलभूत अधिकार दिले. लिंग, धर्म, जाती, पंथ, भाषा, प्रदेश इ. आधारावर कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान अधिकार प्रदान केले. व्यक्तीचा दर्जा तिच्या जन्मावरून नव्हे तर तिच्या गुणवत्तेवरून ठरविला जावा व सर्वांना विकासाची समान संधी प्राप्त व्हावी या उद्देशाने भारतीय संविधाननिर्मात्यांनी जातीचे वर्चस्व कमी केले. असे असतांनाही भारतीय राजकारणात आजही जाती जातीच्या आधारे निवडणूका लढविल्या जातात. स्वातंत्र्यपुर्व आणि स्वातंत्र्यानंतर अनेक काळपर्यत भारतीय राजकारणात विशिष्ट जातीची मक्तेदारी पाहावयास मिळत असे. वरिष्ठ जातीची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी महात्मा फुले, शाहू महाराज, विठ्ठल शिंदे, डॉ. बी. आर. आबेंडकर इ. नी समाजात नवचेतना निर्माण करण्याचे कार्य केले. तामिळनाडूमध्ये रामास्वामी नायकर यांनी ब्राम्हणेतर चळवळ सुरू केली. या चळवळीमूळे जातीजातीच्या संघटना निर्माण होउ लागल्या. त्यामूळे वरिष्ट जातीचे वर्चस्व कमी होउ लागले. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून जातीव्यवस्थेविरूद्ध संघटनात्मक चळवळ सुरू केली. डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी तर स्वातंत्र्यपुर्व आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळातही महाराष्ट्रात शेतकरी चळवळ मोठया प्रमणावर सुरू करून बहूजनांना संघटित करण्याचे प्रयत्न केले. त्यामूळे राजकारणात कनिष्ठ व मध्यम जातींना सहभाग मिळू लागला.

व्यक्तीच्या जिवनात जातीचे फार मोठे स्थान असते. आजपर्यंतच्या राजकारणात वरिष्ठ जातीचे प्राबल्य असल्याचे दिसून येते. कनिष्ठ जातीच्या लोकांना आजतागायत राजकारणात आपले प्रभावी स्थान निर्माण करता आलेले नाही. राजकारणात मोठया प्रमाणात जातीचा प्रभाव दिसून येतो. सध्याचे राष्ट्रीय राजकारण एका विशिष्ट जातीभोवती फिरत असतांना दिसते. वरिष्ठ जाती आपल्या राजकिय सत्तेच्या बळावर आपली मक्तेदारी दिर्घकाळ टिकवून ठेवण्याच्या प्रयत्नात असतात. अनेक राज्यात अशाच प्रकारची परिस्थिती दिसून येत आहे. उदा. आंर्धप्रदेशातील रेड्डी, कमार, मुदलियार, केरळमध्ये नायर व इझावार, महाराष्ट्रात मराठा व कुणबी, गुजरातमध्ये पटेल व पाटीदार, पंजाब, हरियाणा व राजस्थानमध्ये आणि उत्तरप्रदेशच्या काही भागात जाट, राजपुत, अहिर व गुजर, बिहारमध्ये भुमिहार, कायस्थ व राजपूत, उत्तरप्रदेशात ब्राम्हण व राजपूत, पश्चिम बंगालमध्ये ब्राम्हण ही सर्व वरिष्ठ जातीचीच उदाहरणे आहेत. या जातींच्या लोकांची संख्या कमी असली तरी या लोकांकडे असणारी संपत्ती, जमिन, शिक्षणाच्या सोयी, राजकिय सत्ता या आधारावर या जाती आपले आपले वर्चस्व टिकवून ठेवण्यात यश प्राप्त करतात.भारतीय संविधानाने प्रौढ मताधिकाराचे तत्व मान्य केले. त्यामूळे भारतीय राजकारणात संख्येचे राजकारण सुरू झाले. परंतू तरिही बहुजन असणाऱ्या मागासवर्गीय जातीकडे या सत्तेचे हस्तांतरण झाले नाही. शिक्षण, नेतृत्व, आर्थिक सत्ता, उपक्रमशीलता इ. च्या बळावर आजही ते आपली मक्तदारी टिकवून आहेत. स्वातंत्र्याच्या काही काळानंतर काही राजकिय पक्ष मध्यम वर्गाना सत्तेत सहभागी करू लागले व विशिष्ट जातीची मक्तेदारी मोडीस येउ लागली. सत्तेपासून लांब असणाऱ्यांना राजकारणाची दालने मोठया प्रमाणावर सरू करण्यात आली. डॉ. बी. आर. आबेंडकर यांनी १९४२ सालीश्शेडयूल कास्ट फेडरेशन आणि स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली आणि दलितांच्या राजकारणातील प्रवेशाचा मार्ग आखून दिला. स्वातंत्र्यानंतर डॉ. बी. आर. आबेंडकर यांनी रिपब्लिकन पार्टीची स्थापना करून प्रथमच दलित चळवळीला राजकिय क्षेत्रात आणले. त्यानंतर

काही काळाने कांशीराम यांनी बामसेफची स्थापना करून दलित समाजाचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. डॉ. आबेंडकरांचा आदर्श समोर ठेवून सरकारी नोकऱ्यातील जातीचे प्रमाण व आरक्षणाच्या संदर्भातील आपली धोरणे त्यांनी जाहीर केली. १९८४ मध्ये त्यानी 'बहुजन समाज पक्षाची स्थापना करून उत्तर प्रदेशच्या राजकारणात प्रवेश केला. या पक्षाला दलित व मागासवर्गीयाचा पक्ष म्हणून ओळखले जाउ लागले. आंध्रप्रदेश, तामिळनाडू, महाराष्ट्र या राज्यातून दलित चळवळी प्रभावी ठरल्या. डॉ. राममनोहर लोहीया यांच्या विचारातून मागास जातीच्या राजकारणाचा पाया टाकण्यात आला. त्यांनी वरिष्ठ जाती आणि मागास जाती यांचे नविन समिकरण मांडले. 'पिछडो की निती' या नावाने ते ओळखले जाते. उत्तर प्रदेशात १९६७ पासून मागास जातीच्या राजकारणाला सुरवात झाली. चौधरी चरणसिंग यांनी भारतीय क्रांतीदल हा पक्ष स्थापन करून त्याद्वारे उत्तर भारतात मागासलेल्या जातींचे संघटन निर्माण होण्यास सुरवात झाली. १९७७ ते १९९६ या दरम्यान जात आणि राजकारण यांच्या परस्पर संबंधामध्ये मागास जातीगटांचे राजकारण महत्वाचे ठरले. जाट, यादव, अहिर, कुर्मी अशा बिगरक्षेत्रीय मध्यम शेतकरी जाती यांचे राजकारणातील स्थान उंचावले. बिहारमध्ये लालूप्रसाद यादव, नितिशकुमार आणि उत्तरप्रदेशात मुलायमसिंग यादव हे गेल्या काही दशकापासून मागास जातींचे राजकारण करित आहेत. १९६७ मध्ये केंद्रात कॉंग्रेस पक्षाचे सरकार स्थापन झाले तरी अनेक घटकराज्यातून संमिश्र सरकारे बनली होती. ज्या राज्यात मागास जातींची संख्या जास्त होती अशा राज्यातून कॉंग्रेसला आपली सत्ता गमवावी लागली. मात्र उत्तरप्रदेशात आणि बिहारमध्ये मागास जातीच्या राजकारण जितके प्रभावी आहे तितके अन्य राज्यात आजही दिसत नाही. महाराष्ट्रमात्र मागास जातीच्या राजकारण तितके प्रभावी ठरले नाही. यावरून भारतीय राजकारण हे प्रामुख्याने विशिष्ट जातीगटांच्या भोवताली फिरतांना आढळते. परंतू राजकिय पक्ष जातीय हितसंबंधाचा विचार करूनच निवडणूकामध्ये इतर पक्षाशी युती किंवा आघडी करतांना दिसतात. निरनिराळे राजकिय पक्ष मध्यम व कनिष्ठ जातींना सत्तेच्या राजकारणासाठी गोंजारत असले तरी सत्तेत आल्यानंतर मात्र त्यांच्याकडे दुलर्क्ष करतांना दिसतात. हे अलिकडच्या भारतीय राजकारणाचे वास्तव बनलेले आहे.

१९५४ मध्ये शिक्षण मंत्रालयाने अनुसुचित जाती व जमातीसाठी २० टक्के जागा शैक्षणिक क्षेत्रात राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला. १९८२ मध्ये सरकारने १५ टक्के अनुसुचित जाती व ७.५ टक्के अनुसुचित जमातीसाठी जागा शैक्षणिक व सार्वजनिक क्षेत्रात राखीव ठेवण्यात आल्या. १ जानेवारी १९७९ मध्ये पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या कार्यकाळात मंडल कमिशन नियुक्त करण्यात आले. मंडल कमिशन आयोगानुसार भारतात ५२ टक्के लोकसंख्या (ओबीसी) हे अन्य मागासवर्गीयांची आहे. त्यांना लोकसंख्येनुसार आरक्षण न मिळता केवळ २७ टक्के मिळाले. सर्वोच्च न्यायालयाच्या मते एकुण आरक्षण५० टक्क्यांच्या वर जाणार नाही. म्हणून अनुसुचित जाती, जमाती व ओबीसीसाठी एकुण आरक्षण ४९ टक्के देण्यात आले.१९८० मधील मंडल आयोगाच्या शिफारशीवरून देशात मागास जाती व जमातीसाठी संख्येनूसार आरक्षण असावे म्हणून सुचना करण्यात आल्या. पण त्यामूळे उच्चभ्रु समजल्या जाणाऱ्या वर्गाच्या पोटात दुखणे सुरू झाले व त्याविरोधात गुजरातमध्ये मोठे वादळ उठले. गुजरातमध्ये आरक्षणच्या विरोधात सवर्ण व दलित यांच्यात सांप्रदायीक दंगे झाले. ही सांप्रदायीक हिंसा गूजरातमधिल १९ जिल्हयापैकी १८ जिल्हयात पसरली. उत्तर आणि मध्य गुजरातमधिल अनेक गावामध्ये पाटीदारांनी दलित वस्त्यांना आगी लावुन गाव राख करण्यात आल्या. अल्पसंख्यांक विरोधी हिंसेने सामाजिक व राजकिय दहशतीचे अशी वातावरण निर्मिती केली की, मानवाधिकार आणि समाज सुधारणा आंदोलने त्यासमोर कमकुवत पडु लागली. सन १९८५ मध्ये पुन्हा जातीय दंगे निर्माण झाले. भारतात आजही जात पंचायत अस्तित्वात आहे. जात पंचायतीमध्ये उच्च जातीचे लोक असतात. जात पंचायतीचा निर्णय गावातील सर्वांना मान्य करावा लागतो. जर जात पंचायतीने दिलेला निर्णय कनिष्ठ जातींना अन्यायकारक वाटला व त्याविरोधात त्यांनी आवाज उठविला तर त्यांच्यावर गावाकडून बहिष्कार टाकण्यात येतो. अशाप्रकारे बहिष्काराचे तंत्र वापरून उच्च जातीचे लोक सर्वसामान्यावर अन्याय करित असतत.

भारतातील उच्च समजल्या जातीतील लोकांना आजही चार्तुवर्णव्यवस्था राबवायची आहे. मनुस्मृतीने घालून दिलेले नियम पुन्हा लागू करायचे आहेत. उच्च किंवा वरिष्ठ ही पत जन्माने नाही

तर कतृत्वाने मिळते. एकविसाव्या शतकातही स्वत:ला उच्च समजणारे कमी शिक्षित असले तरी ते स्वत:ला उच्च शिक्षित असणाऱ्या कनिष्ठ जातींतील व्यक्तीपेक्षा जास्त हुशार व ज्ञानी समजतात. जातीच्या आधारे त्यांना अजूनही पुर्वीसारखीच प्रतिष्ठा, मानसन्मान मिळावा व बाकीच्यांनी कायम त्यांच्या हातातील बाहुले बनून राहावे अशी त्यांची कायम इच्छा असते. परंतू स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाने सर्वांना सारखेच अधिकार व आरक्षणाच्या माध्यमातून सर्व क्षेत्रात पुढे जाण्याची संधी दिलेली आहे. या संधीचा सर्वांनी पुरेपुर फायदा करवून घेतलेला आहे आणि अनुसुचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीयांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. तेही सवर्णाच्या बरोबरीने पद भुषवित आहेत आणि देशाच्या प्रगतीत हातभार लावीत आहेत. नेमकी हीच गोष्ट सवर्णांना खटकते. म्हणून ते सत्तेच्या आधारे आपली सत्ता दिवसेनदिवस मजबूत करण्याचा प्रयत्न करित आहे. संविधानाने दिलेले अधिकार व आरक्षण काढुन टाकुन पुर्वीचे दिवस आणण्याच्या प्रयत्नात आहेत. परंतू भारतीय संविधानाने दिलेल्या अधिकारामूळे आज सर्व जाती धर्मातील लोक सतर्क व जागृत झालेले आहे. त्यांना आपल्या अधिकारांची व कर्तव्याची पुर्णपणे जाणीव आहे.

संदर्भग्रंथ सुची


| अनु. क्र. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | प्रकाशन |
|---|---|---|---|
| १) | राज्य आणि अल्पसंख्यांक | डॉ. बी. आर. आंबेडकर | प्रबुद्ध पुस्तकालय, नागपूर |
| २) | साझी संस्कृती के पक्ष मे धर्मनिरपेक्षता और भारतीय समाज | राम पुनियानी | उद्‌भावना, दिल्ली |
| ३) | भारताचे शासन आणि राजकारण | प्रा. शेख हाशम<br>प्रा. जोगेंद्र गवई | विश्व पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर नागपूर |

४) www.caste in India

# सामाजिक एवं धार्मिक परिपेक्ष में संगीत की भूमिका

डॉ. सारिका विवेक श्रावणे
(संगीत विभाग),स्व.छ.मु.कढीकला महाविद्यालय,अचलपूर कॅम्प, जिल्हा अमरावती.
email id- sarikashrawane@rediffmail.com ,M. 9766169685

**•सारांश :–**

मनुष्य एक सामाजिक प्राणि है, इसिलिए संगीत भी मनुष्य से जुडा होने के कारण समाज में अपना विशेष स्थान रखता है । संगीत के व्यापक क्षेत्र को दखने पर ज्ञात होता है कि संगीत के क्षेत्र मे ज्ञान की विभिन्न शाखाओं का विकास हुआ है । तथा उनका पृथक अध्ययन क्षेत्र विकसित हो गया है । जैसे, धार्मिक परंपराएँ एवम्, संगीत का मनोविज्ञान, संगीत का दर्शन, संगीत का सौंदर्यशास्त्र, संगीत चिकित्सा प्रयोग, आदि अत: वैसेही संगीत का समाज से भी परस्पर घनिष्ठ समन्ध होने के कारण संगीत की सामाजिक स्थिती तथा समाजशास्त्रीय दृष्टी से अध्ययन एवं विश्लेषण की विचाारधारा भी सामने आयी है । हर काल में संगीत नेसमाज को प्रभावित किया है तथा समाज से संगीत प्रभावित रहा है । काल प्रवाह में जैसे समाज जीवन में स्थित्यंतर आये वैसे संगीत के स्वरूप ने भी संगीत का समाजशास्त्रीय चिंतन, आधुनिक समाज मे संगीत की सत्ता और सार्थकता की पहचान के बौध्दिक प्रयत्न की देन है । आज संगीत की दुनिया केवल कला और सौंदर्य की साधना के सहारे नही चलती है । वह समाज के आर्थिक ढॉचे, राजनितिक परिवेश, सामाजिक संरचना और सांस्कृतिक संस्थाओं से बहुत दूर तक प्रभावित होती है । समाज में धर्म भी एक महत्वपूर्ण कडी है क्योंकि कोई भी समाज बिना धर्म के टिक नही सकता । हमारे ऋषियों और मुनियों के समाज को सुव्यवस्थित बनाने के लिए धर्म का उपदेश किया संगीत कला से केवल मानवजाती ही नही अपितु देवदेवताओं भी परिपुष्ट होते है । और देवों की तुष्टी से मनुष्य का परम कल्याण, सुंदर बुध्दि उत्पन्न होती है । जिससे सामाजिक प्राणियों में धार्मिक भावना से समाज में दया, परोपकारिता, सहृदयता, सहानुभूती की भावना उत्पन्न होती है । प्रस्तुत शोधनिबंध में सामाजिक तथा धार्मिक परिपक्ष में संगीत की महत्त्वपूर्ण भूमिका अभिव्यक्त करने का मैने प्रयास किया है ।

**•उद्देश :–**

१)वैदिक काल से लेकर आजतक प्रत्येकधार्मिक कार्य में संगीत का अपना एक महत्वपूर्ण स्थान रहा है तथा ललित कलाओं के अंतर्गत संगीत को प्रमुखता देने के पिछे उसकी आध्यात्मिक और धार्मिक प्रवृतियॉ है । क्योंकी स्वयं भगवान कृष्ण ने भी गीता में कहा है, –'मद्‌भक्ता यत्र गयन्ति तत्र तिन्ठिमि नारद' अर्थात जहा मेरे भक्त गा रहे है मै वही निवास करता हूॅं । तो इस अनुसार धार्मिक दृष्टी से संगीत का स्थान महत्वपूर्ण है यह स्पष्ट करना है ।

२)सामाजिक दृष्टी से देखा जाए तो संगीत का समाज से परस्पर घनिष्ठ सम्बन्ध होने के कारण संगीत की समाजशास्त्रीय दृष्टीसे अध्ययन एवं विश्लेषण की विचारधारा भी सामने आयी है । तदापि इस क्षेत्र में अभी तक उल्लेखनिय कार्य नही हुआ है । इसके दो मुख्य कारण नजर आते है, पहला समाजशास्त्र की दृष्टि और पध्दति से अपरिचय दुसरा संगीत की दुनिया से समाजशास्त्रीयों की उदासीनता । तो संगीत और समाज के जीवंत सम्बन्ध मे विकास उत्पन्न होना चाहिए इस उद्‌देश से प्रस्तुत विषय का मैने चयन किया है ।

**•संशोधन पध्दती :–**

मनुष्य एक सामाजिक प्राणि होने के कारण समाज से जुडा है तथा समाज धर्म से जुडा है और इन दो स्तर पर संगीत का अपना एक महत्वपूर्ण स्थान है । इस संदर्भ में प्राचीन तथा आधुनिक ग्रथों का अध्ययन, ग्रंथों मे लिखित विव्दानों के मत जानना, अन्य विश्वविद्यालयों में इस संदर्भ मे हुए संशोधन कार्य, शोधप्रबंध,लघुशोधप्रबंध, शोधनिबंध, तथा दृक–श्राव्य माध्यमसे प्राप्त जानकारी के आधार पर इस विषय में संशोधन करने का प्रयास किया है ।

ISSN : 2278-9308
July 2021

●**परिकल्पना** :–

१)सामाजिक दृष्टी से संगीत की पहचान होगी ।

२)आधुनिक काल में बढ रहे तान तनाव मे धर्मिक संगीत से मनोबल,धैर्य एवं मन:शांती मिलेगी ।

३)प्राचीन काल में आध्यत्मिक और धार्मिक दृष्टी से यदि देखे तो एक भव्य भजन–किर्तन के व्दारा अपने हृदय के सुक्ष्म भाव–सुमनों को अपने आराध्य के चरणों मे अर्पित कर देता था । परमात्मा एवं इश्वरोपासना करता था यही भावना आज भी जागृत होगी ।

४)सामाजिक एवं धार्मिक स्तर पर संगीत की महत्तता इस संदर्भ में आज के पिढी को संशोधन करने की प्रेरणा मिलेगी ।

●**व्याप्ती और सीमाएँ** :–

प्राचीन काल में धर्मप्रभावना में संगीत से इश्वराधना, मन:शांती, समाज अस्तित्व से संगीत का स्थान आदी महत्वपूर्ण घटकों का अध्ययन प्रस्तु शोधनिबंध में होगा ।

शब्दमर्यादा के कारण संक्षिप्त में प्राचिन तथा आधुनिक काल में समाजिक एवं धार्मिक स्तर पर संगीत का महत्व स्पष्ट होगा ।

●**साहित्य की समिक्षा** :–

देवदेवताओं के कालसेही संगीत के आध्यात्मिक तथा धर्मिक स्वरूप से हम भलिभॉती परिचित है । प्रत्येक धर्म में संगीत की अपनी एक अलग पहचान है, वैसेही मनुष्य प्राणि को अन्न वस्त्र निवारा यह भौतिक जरूरते है इसके साथ–साथ संगीत मानव की सांस्कृतिक एवं मानसिक जरूरत है ।

समाज धर्म के साथ जुडा है तथा धर्म समाज के साथ एवं इन दोनो घटकों में संगीत का महत्वपूर्ण रहा है । इस संदर्भ में प्रस्तुत संशोधन साहित्य की समिक्षा करते समय, –

१)विभिन्न मध्यकालीन धार्मिक परंपराओं का हिंदुस्तानी संगीत पर प्रभाव, रेनू सचदेव, शोधप्रबंध, दिल्ली विश्वविद्यालय दिल्ली ।

२)सामाजिक एवं सांस्कृतिक जीवन मे संगीत का स्थान, सपना भाटे, लघुशोध प्रबंधदेवी अहिल्या विश्वविद्यालय, इन्दौर.

३)धार्मिक परम्पराऍ–एक सांगीतिक अध्ययन, संतोष भंडारी,लघुशोधप्रबंध, दिल्ली विश्वविद्यालय ।

४)संगीत एवं सामाजिक उत्थान : एक तार्किक अध्ययन, अम्वस्ठा अंजली कुमारी लघुशोधप्रबंध, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली.

५)संगीत एवं समाजशास्त्रीय पक्ष,दिव्या त्रिपाठी,लघुशोधप्रबंध दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली ।

आदि विषयों पर अभ्यासपूर्ण संशोधन प्राप्त है । इससे यह सिध्द होता है कि, आज संगीत की केवल मनोरंजनात्मक दृष्टी नही रही बल्कि आत्मिक एवं आध्यात्मिक मन:शांती प्राप्त करने हेतु एक संजीवनी विद्या है । वैसेही मनोरंजन के साथ साथ अंजन का भी कार्य संगीत कला करती है जिसकी आज के समाज को आवश्यकता है । इस संदर्भ मे जो संशोधन हुआ है तथा हो रहा है, इससे भी ज्यादा उल्लेखनीय कार्य हो सकता है ऐसा मै मानती हूं ।मैने प्रस्तुत शोधनिबंध के उद्देश मे भी यह कहा है । आध्यात्म, धार्मिकता की दृष्टीसे बहुत संशोधन हुआ है परंतु समाजशास्त्रीय दृष्टीसे अध्ययन एवं श्लेिषण की विचारधारा भी सामने आनी चाहिए । जो संगीत और समाजशास्त्र के बीचजीवंत सम्बन्ध दर्शाये ।

●**प्रस्तावना** :–

संगीत कला यह मनुष्य ने अपने लिए निर्माण की गई कला है । तो कला से संस्कृती और संस्कृती से मनुष्य की पहचान होती है । किसी एक व्यक्ती से समाज नही बनता व्यक्ती के संगठन से समाज बनता है । और कला समाज का आइना होता है । "Art is a reflection of society"सामाजिक जीवन के चित्र संगीत मे दर्शाये रहते है । टॉलस्टॉय के अनुसार, "Music itself is a social activity." समाज का सर्वंकष एवं सर्वांगिन अध्ययन जिसमें होता है वह समाजशास्त्र अर्थात समुहशास्त्र । मनुष्य प्राणि को अन्न–वस्त्र–निवारा यह भौतीक तरूरते है वैसेही संगीत मानव की सांस्कृतिक एवं मानसिक जरूरत है । समाज में जितने सुख के साधन उपलब्ध है, वे सब अत्यान्तिक नही है,अर्थात वे कुछ काल के लिए ही होते है । किन्तु संगीत–कला के प्रदर्शन तथा श्रवण से मनुष्य को जो सुख उपलब्ध होता है वह आत्यान्तिक होता है । इसिलिए संगीत

ISSN : 2278-9308
July 2021

कला का वरिष्ठ साधक संसार के सुख–साधनों को कुछ समझता है इस प्रकार समाज के धीरे धीरे नैतिकता का विकास होता है । संगीत व्दारा समाज का चारित्रिक उत्थान होता है । धार्मिक पक्ष से देखा जाए तो सृष्टी निर्माण होने सेपूर्व ही देवदेवताओं के समय संगीत की उपलब्धी मानी जाती है एवं आध्यात्मिक स्तर पर संगीत का महत्वपूर्णस्थान है । सृष्टी मेसमाज के बदलाव के साथे कला मे भी परिवर्तन हुए परंतु धार्मिक परंपराओंमे संगीत का महत्व बढता गया दिखाई देता है । संगीत एवं धर्म का सम्बन्ध दृढ होता चला गया वैदिक युग में संगीत समाज मे स्थान बना चुका था । धीरे धीरे सभी सभ्यताओं में संगीत का जन्म भक्तिभावना बढती गई उसका निरन्तर पल्लवन और विकास भी होता रहा है । अत: प्रस्तुत शोधनिबंध में सामाजिक तथा धार्मीक प्रसंगोव्दारा संगीत की विकसित श्रृंखला दर्शाने का मैने प्रयास किया है ।

**•विषय की ओर –**

**संगीत एवं सामाजिक उत्थान :–**

संगीत का क्षेत्र अत्यंत व्यापक है । हर काल में संगीत को प्रभावितकिया है, प्राचीन काल से लेकर आजतक संगीत पल–पल, हर मोड पर साथ देता है । व्यक्ती तो एक होता है पर उसके जीवन मे पारिवारीक,आर्थिक,धार्मिक,राजनितिक,सामाजिक,नैतिक सम्बन्धों का जाल–सा बिछा जाता है । ऐसेही विभिन्न सम्बन्धों की इस सन्तुलित व्यवस्था को ही हम 'समाज' कहते है । समाज में विवाह, शिक्षा, धार्मिक विधी आदी की कार्यप्रणालियों का बडा ही महत्वपूर्ण भाग है । इन सबका केंद्रबिंदू है 'कला' । इस सामाजिक विकास के दौर में कला का माध्यम भी सामुहिक, सामाजिक और समाजनिष्ठ है । कला का कार्य अपने समय के सामाजिक जीवन की अभिव्यक्ती करना है । समाज की इस प्रगतीशीलता के कारण कला भी स्थिर नही रह पाती, वह निरन्तर विकसित एवं परिवर्तित होती है । अत: समाज परिवर्तन के साथ संगीत भी बदलजाता है । जैसे वैदिककालीन संगीत सर्वाधिक इश्वरोपासना के लिए था उस पश्चात समाज की ऋचि अनुसार विलासीनता तथा मनोरंजन के उद्देश से अधिक था । आज संगीत केवल मनोरंजन ही नही वरण समाजकल्याण, यश तथा धन अर्जित का भी साधन बन गया है । अर्थात मनुष्य के साथ संगीत का घनिष्ठ संबंध है यह मानव के साथ तबसे चला आ रहा जबसे मनुष्य ने सामाजिक रूप से संगठित होना सिखा । किसी एक व्यक्ती से तो समाज नही बनता तो संगठन होने बाद संगीत की व्याप्ती और बढ गई । अब समाज मे संगीत का विपूल प्रचार था । इसका प्रभाव संगीत सम्बन्धी उत्सवों मे भी उल्लेख मिलता है, जहा गीत, वाद्य, नृत्य होता था । आज भी यही चित्र दिखाई देता है । समय के साथ परिवर्तन एवं स्वरूप तथा परिभाषाओं मे बदलाव दिखाई देता है तथा उद्देश भी विस्तारित हुआ है । जन्म से लेकर अंत तक संगीत हर कदम पे मनुष्य के साथ जुडा है । विश्व मे शायदही ऐसा कोई हो जिसका संगीत से सम्बन्ध नही हो । व्यक्ती समाज की इकाई होने के कारण संगीत का समाज से भी घनिष्ट सम्बन्ध है । यदी वह संगीत का सफल कलाकार होता है तो उससे समाज स्वास्थ एवं समृध्द होता है । संगीत व्दारा समाज का सुधार भी हुआ है । अनेक संगीतज्ञ अपने संगीत का अनुकूल वातावरण उपस्थित करते है । इतना ही नही समाज की जो आर्थिक स्थिती है उसमे भी संगीत का योगदान हुआ है, हो रहा है । बडी–बडी संगीत संगोष्ठि मे सम्मेलनो मे अपने संगीत कला प्रदर्शनोंव्दारा समुचित धन का उपार्जन कर लेते है । इस क्षेत्र में अनेक व्यावसायिक संधी उपलब्ध है इससे भी हम भलिभॉंती परिचित है । जिससे समाज का कोई भी संगीत कालाकारा नि:संदेह भुखा नही मर सकता । संगीत कला प्रेमी निरन्तर अपनी संगीत साधना मे संलग्न एवं तत्पर होने के कारण अनेक कुरितियों अनिष्ट एवं दोषों से सर्वथा मुक्त हो जाते है । कहते है कि, कला समाज का आइना होता है जैसे Music is the tone picture of the society. अर्थात संगीत समाज का ध्वनिरूप चित्रण है । तथा संगीत एवम् समाज का अतुट संबंध है ।

**धार्मिक परिपेक्ष में संगीत की भूमिका :–**

भारतिय संस्कृति आदिकाल से ही आध्यत्मिक एवं धार्मिक संस्कारों से युक्त रही है । भक्ति तथासंगीत का घनिष्ठ रूप से सम्बन्ध है, क्योंकी धर्म के प्रती लोगों में श्रध्दामय चेतना लाने का कार्य उस समय की मॉंग थी । सम्भवत: यही उद्देश भक्ति आंदोलन के संतो की दृष्टी मे था इस कार्य मे नि:सन्देह ही संगीत ने एक अति महत्वपूर्ण भूमिका का निर्वाह

ISSN : 2278-9308
July 2021

किया । मिरा, सुरदास, तुलसी तथा कबीर आदि संतो ने अपने विचारों को काव्यरूप देकर संगीत के माध्यम से सजाया सॅवारा एवं साधारण जन को कल्याणार्थ उसका प्रचार–प्रसार किया । भक्ति मार्ग पर चलते समय संगीत इनके लिए इश्वरोपासना का श्रेष्ठतम साधन था । स्वयं भगवान ने कहा है कि, –

''मदभक्ता: यत्र गायन्ती तत्र वसामि नारद ।''इससे हम भलिभॉती परिचित है ।

आध्यात्मिक उद्देश मे इश्वरआराधना, परमेश्वर साधना अर्थात मनकी एकरूपता, सुख–दुख का त्याग करके इश्वरभक्ती मे विलीन होना । सामवेद मे ऋचाओं का पठण, सुफी संगीत की इश्वरोपासना, हिंदुओं की भक्तिसाधना हो या मुस्लीम का अल्ला हो अकबर संगीत के बिना कोई भी धार्मिक कार्य अधुरा है । धीरे धीरे मार्गी संगीत से देशी संगीत विकसित होने लगा । अब संगीत का उद्देश सिर्फ इश्वरआराधना ही नही बल्की यह कला सभी धर्म में अपना स्थान उच्च स्तर पे ले जाना । हिंदु धर्म में सभी संस्कार जैसे जन्म, नामकरण, यज्ञ, विवाह यहां तक मृत्यू के बाद भी मनुष्य के साथ संगीत रहता है ।

विश्वनाथ प्रसादजी के अनुसार, ''कला का मुल धार्मिक भावना से ही है''। चित्र स्थापत्य, मुर्ती, काव्य, साहित्य, संगीत इन सबका विकास भी धर्म की छत्रछाया में हुआ है ।

इन सब ललित कलाओं में संगीत का सर्वोच्य स्थान माना जाता है । हम जानते है कि, संतो ने अपनी प्रतिभा संपन्न कृयोंव्दारा लोगों मे धार्मिक जागरण एवं धर्म को पुनर्जीवित किया । जब कभी राष्ट्र की चेतना लुप्त होने लगी, एकता भंग होने लगी तभी ईश्वर ने किसी न किसी रूप में प्रकट होकर धर्म संस्थापन का कार्य किया इसिलिए धर्म और संगीत का सम्बन्ध हर युग में अटूट रहा है ।

**●निष्कर्ष** :–

मनुष्य ने जन्म लिया तभी से संगीत उसके साथ जुडा और मनुष्य के मृत्यु तक उसने साथ दिया । अत: अन्त मे कह सकते है कि, संगीत और समाज तथा धर्म का घनिष्ठ सम्बन्ध रहा है । जिस प्रकार संगीत से समाज की उन्नती हुई, ठीक उसी प्रकार समाज से संगीत की उन्नती होती आयी है । दोनों ही एकदुसरे से अनुप्रणित रहे है । व्यक्ती से समाज है और समाज मे धर्म तथा धर्मिकता पनपती है, जीवन सिर्फएक अनुशासन या शास्त्र नही है । जिवन एक कला है जो की समाज से परिपूर्ण है, धर्म के आधार पर सामाजिक एवं धार्मिक स्तर पर संगीत एक शक्तीशाली,सुख–शांती के माध्यम के रूप में स्वीकार किया गया है ।

**●संदर्भ** :–

१) संगीत का समाजशास्त्र :–डॉ. सत्यवती शर्मा,पंचशील प्रकाशन, जयपूर, प्रथम संस्करण, १९९५.
२) संगीत मणि, भाग–२,डॉ. महारानी शर्मा, श्री. भुवनेश्वरी प्रकाशन, इलाहाबाद, संस्करण २०१२.
३) भारतीय संगीत :– सामाजिक स्वरूप एवं परिवर्तन डॉ. प्रिती राजपाल,Unistar Books Pvt. Ltd. Sco, 26-27 Sector 34 , Chandigarh 160022, 2013.
४) धर्म संगीत एवं संस्कृती – डॉ. रेखा सेठ एववं डॉ. निलिमा गुप्ता, प्रकाशन Luminous Books, हिंदी प्रकाशन, १ जनवरी २०१६
५) भारतीय संगीत का इतिहास – डॉ. शरदचंद्र परांजपे, चौखम्बा विद्याभवन, वाराणसी
६) संगीत, अप्रैल २०१२, सामाजिक चेतना का आधार भक्ति आदोलन में संगीत, डॉ. अशोककुमार 'यमन', (संगीत–प्रधान सम्पादक–डॉ. लक्ष्मीनारायण गर्ग, संगीत कार्यालय,हाथरस २०४१०१ उ.प्र.)

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# मराठी लोकसाहित्य संशोधनाच्या नव्या दिशा

प्रा.डॉ संतोष चंपती हंकारे
सहयोगी प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय, राणीसावरगाव,ता.गंगाखेड जि.परभणी
ई—मेल:sanchankare555@gmail.comभ्रमन ध्वनि.7972831323,9421489487

**प्रस्तावना:**

भारतीय समाज आणि संस्कृतीचे सातत्य टिकवून ठेवण्यामध्ये लोकसाहित्याचे फार मोठे योगदान राहिले आहे.मानवी समाज जीवनाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक कलात्मक जीवनाला सर्वप्रथम लोकसाहित्यानेच मौखिक स्वरूपात का होईना मूर्त स्वरूप प्राप्त करुन दिले.आजच्या ज्ञान—विज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानाच्या जागतिकीकरणाच्या युगात लोकसाहित्य काळाच्या ओघात लोप होत चालले आहे.म्हणून मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत आलेला लोकसाहित्याचा हा अनमोल ठेवा जतन व्हावा.लोकसाहित्यात मूलभुत संशोधन व्हावे.लोकसाहित्य संशोधनातील अडचणी कोणत्या,त्याच्या दिशा काय किंवा लोकसाहित्याचे संशोधन कसे करावे याचा प्रस्तुत शोधनिबंधात सारांश रूपाने विचार करावयाचा आहे.गेल्या ६०ते७०वर्षात तसे अनेक विद्यापीठात मराठी विषयाचे पीएच.डी.आणि एम्.फील.चे जे काही अनेक शोधप्रबंध सादर झाले त्या तुलनेत लोकसाहित्यावरील संशोधनाचे प्रबंध हे अत्यंत नगण्य आहेत असेच आपणास दिसून येईल. कारण लोकसाहीत्यात म्हणावे असे संशोधन झाले नाही. तेंव्हा लोकसाहित्यात संशोधन व्हावे, लोकसाहित्याच्या संशोधनाची नेमकी दिशा कोणती, तसेच लोकसाहित्य संशोधनाचे नवीन विषय कोणते, त्यातील अडचणी कोणत्या, त्यावर उपाय काय आणि त्याच्या मर्यादा किती व कोणत्या या विषयाच्या अनुषंगाने येथे विचार केला आहे.

लोकसाहित्याची परंपरा ही आदिमानव काळापासूनची आहे. बदलत्या समाजजीवनाचे संदर्भ घेत घेत ही परंपरा आज येथपर्यंत येऊन पोहचली आहे. लोकसाहित्याला निरनिराळ्या काळाचे,युग धर्मातील लोकजीवनाचे आयाम लाभले आहेत.म्हणून विविध ज्ञानशाखांच्या अभ्यासात अभ्यासाचे साधन म्हणून लोकसाहित्याच्या अभ्यासाला विशेष महत्त्व आहे."लोकसाहित्याचे आता विद्यापीठीय पातळीवर संशोधन होऊ लागले आहे. मात्र अद्यापही लोकसाहित्याच्या विविध प्रकारातील वांङ्मयीन गुण वैशिष्टये कोणती? ती का निर्माण होतात?त्याचे मुल्य काय असते?इत्यादी प्रश्नांचा विवेचक अभ्यास होतांना आढळत नाही. या प्रकाराच्या अभ्यासाला समाजशास्त्रीय अभ्यासाची जी शिस्तशीर बैठक असावी लागते ती आपल्या संशोधकांना बहुधा नसते.म्हणून अनेकदा हा अभ्यास समाजशास्त्राच्या अथवा वाङ्मयाच्या दृष्टीने फारसे फलदायी होताना दिसत नाहीत."[१]तेंव्हा लोकसाहित्याचे संशोधन करतांना अभ्यासकांनी आपापल्या अभिरुचीनुसार,सोयीनुसार अभ्यासाचे काही निकष ठरवून संशोधनाला कुठे वाव आहे हे पाहून सामग्रीची उपलब्धता लक्षात घेवून संशोधनाचा विषय निवडावा आणि अभ्यासाची दिशा निश्चित करावी. तरच ते संशोधन पूर्णत्वाला जाईल.लोकसाहित्य हे लोकमनाचा आणि समाजजीवनाचा एक सहज असा अविष्कार आहे. त्यामुळे लोकसाहित्य हे समाजाचे वाङमय आहे. लोकसाहित्य ही एक व्यापक अशी संज्ञा आहे. त्यामुळे लोकसाहित्याचा पुन्हा नव्याने वेगवेगळ्या दृष्टिने अभ्यास होणे गरजेचे आहे.परंतु सौध्दांतिक अंगाने लोकसाहित्याचा म्हणावा तसा अभ्यास झालेला नाही. प्रारंभी डॉ.सरोजनी बाबर यांच्या माध्यमातून वेगवेगळ्या ठिकाणी विखूरलेल्या लोकसाहित्याचे संकलण करुन त्याचा अभ्यास केला गेला. परंतु व्यापक स्वरूपात सर्वांगिन अंगाने लोकसाहित्याचा अभ्यास झालेला जाणवत नाही. तेंव्हा पुन्हा नव्याने लोकसाहित्याचे संशोधन होणे महत्वाचे वाटते.कारण "कोणत्याही साहित्याचा अभ्यास करण्याचे माध्यम भाषा हे असते.भाषेच्या माध्यमातून प्रकट होणाऱ्या सामग्रीतून जे सामाजिक,सांस्कृतिक,धार्मिक,मानशास्त्रीय संदर्भ आलेले असतील,त्या संदर्भाचा शोध घेवून शब्दाच्या माध्यमातून प्रकट झालेल्या मौखिक कलाकृतिचे आकलन अधिक चांगल्या प्रकारे करुन घेणे त्यामुळे शक्य होते."[२]म्हणजेच भाषेच्या माध्यमातून प्रकट झालेला आशय जसा मुख्य अर्थाचा

असतो तसा तो व्यंग्यार्थाचाही असू शकतो. हे ध्यानात घेऊनच अभ्यासकांनी विश्लेषन करणे महत्त्वाचे असते.स्थानिक पार्श्वभूमी ध्यानात घेवून उदा.स्थानिक इतिहास,रहाणीमान,पोषाख पध्दती,आचार विचार,प्रथा—परंपरा,यात्रा,सन उत्सव,देव—देवता इ. गोष्टींची माहिती करुन घेऊन विश्लेषन करावे.लोकसाहित्याचे संशोधन करातांना,लोकसाहित्य संशोधनाच्या नव्या दिशा कोणत्या याचा शोध घेतांना प्रथमत:लोकसाहित्य संशोधनातील प्रमुख अडचणी कोणत्या ते जाणून घेणे महत्वाचे आहे.

**लोकसाहित्य संशोधनातील प्रमुख अडचणी** :—

लोकसाहित्याचे संशोधन करतांना संशेधकाला ज्या काही प्रमुख अडचणी येतांना दिसून येतात त्या अशा आहेत की लोकसाहित्य संशोधनाचे नेमके स्वरूप आणि संकल्पना पद्धतीची संशेधकाला माहिती नसते.लोकसाहित्यात समग्र लोकसाहित्याचे संशोधन न करता काही ठराविक लोकवाङ्मय प्रकाराचेचसंशोधन केले जाते.लोकसाहित्याची माहिती देणाऱ्या नियतकालिकांचा प्रामुख्याने अभाव जाणवतो.संशोधन करतांना तात्त्विक अधिष्ठान,वैचारिक बैठक—आवश्यक असते. परंतु ती बैठक दिसून येत नाही.लोकसाहित्याच्या संशोणनात ढिसाळपणा जाणवतो कारण लोकसाहित्याच्या प्रेरणा निश्चित नाहीत.लोकसाहित्य संशोधन संस्थांचा अभाव जाणवतो तसा लोकसाहित्य संशोधन नेतृत्वाचाही अभाव जाणवतो. तसेच लोकसाहित्याचे संशोधन करणाऱ्या अभ्यासकात देशी जाणिवांचाही अभाव जाणवतो.लोकसाहित्याचा आंतरराज्य साहित्य व्यवहार होतांना दिसून येत नाही.लोकसाहित्याच्या निर्मात्यामध्ये सर्वदूर शिक्षणाचा अभाव जाणवतो. लोकसाहित्याच्या अभ्यासकाला ऐतिहासिकतेचे भान नसते.आर्थिकता/जगण्याचे प्रश्नच त्याला महत्वाचे वाटतात.स्वागतशीलता दिसून येत नाही. त्यामुळे लोकसाहित्याविषयी अभ्यासकांमध्ये आदराची भावना दिसून येत नाही.प्रस्थापित संशोधन व्यवस्थेकडून लोकसाहित्याची उपेक्षाच होते. म्हणून तर लोकसाहित्य हे आवर्तात सापडलेले साहित्य आहे असे म्हटले जाते.इंग्रजी भाषेला महत्व दिले जाते,अन्य भाषांबद्दल आणि बोलींभाषांबद्दल अज्ञान असते.लोकसाहित्य संशोधनाबद्दल शासनाची उदासीनता दिसून येते.लोकसाहित्यावरती खाऊजा धोरणाचा परिणामझालेला दिसतो. लाकसाहित्याबद्दल रूढी परंपराग्रस्त साहित्य म्हणून गैरसमज दिसतो.लोकसाहित्याकडे अभ्यासक तुच्छतेने पाहतात.लोकसाहित्याचा अभ्यास कनिष्ठ मानला जातो तर भाषाशास्त्र,सौंदर्यशास्त्र या साहित्याचा अभ्यासक सर्वश्रेष्ठ मानला जातो.मनोरंजन म्हणूनच लोकसाहित्याकडे पाहिले जाते. लोकसाहित्याच्या अभ्यासाबाबत संकोचितवृत्ती दिसून येते.लोकसाहित्यिकांनीच समीक्षा केली पाहिजे व लोकसाहित्याची चळवळ वाढण्यासाठीमुखपत्रिका नाही.लोकसाहित्य संशोधन प्रकाशन संस्थांचा अभाव जाणवतोवाचन संस्कृती रुजविण्याचे काम करणे होत नाही.लोकसाहित्याचे शिबीरे,संमेलने होणे आवश्यक तरच संशोधन होईल परंतु तसे होत नाही.लोकसाहित्य अभ्यात समूह भावना—समिष्टीचे चित्रण होतांना दिसून येत नाही.लोकसाहित्याचा संबंध अलिप्तवादी धोरणचळवळ,संघटना यांच्याशी संबंध ठेवणे आवश्यक,न्युनगंडाची भावना दिसते.स्त्री सन्मानाचा अभाव जाणवतो.प्रस्थापितांनाच पुरस्कार (नवीन प्रेरीत होत नाहीत).कसदार अभ्यासकांपर्यंत पोहचत नाही. त्यामुळे पर्यायाने संशोधन होत नाही.साधन सामुग्री व संदर्भग्रंथाची मर्यादा आहे.लोकसाहित्य चळवळ : प्रभावहीन—अभिनिवेश असन्यामुळे,वस्तुनिष्ठ संशोधन होत नाही.तटस्थतेचा अभाव आणि वस्तुनिष्ठतेचा अभाव जाणवतो.लोकसाहित्याचे चुकीच्या मार्गाने संशोधन होत असल्यामुळे लोकसाहत्य संशोधनाला मर्यादा जाणवतात.भलावण—पाठराखण,गट—तट,चाहत्यांचा वर्ग,पाठ थोपटण्याची— खोटी स्तुती करण्याची प्रवृत्ती वाढतांना दिसतो.

**उपाय** :नव्या संशोधक अभ्यासकांनी आज चिंतन करुन पुर्वसुरीच्या अभ्यासकांच्या लेखन—संदर्भात यथायोग्य वापर करुन,नव्यानेलेखन करण्याची गरज आहे. उदा.लोकसाहित्य संशोधनाचा इतिहास लेखन केल्याने अनेक प्रश्न सुटतील,त्यासाठी लोकसाहित्याचे नवे प्रकल्प हाती घ्यावे लागतील. नवे मुखपत्र सुरू करावे लागेल. तसेच त्याचबरोबर चळवळीच्या निमित्ताने असलेला प्रभाव—अभिनिवेश दूर करून वस्तुनिष्ठ मांडणी करणेही गरजेचे आहे. तसेच संशोधन शिस्त पाळून,वाङ्मय निकषानुसार,समीक्षा,संशोधन पद्धतीने करणे आवश्यक आहे.शिवाय अभ्यासकांनी लोकसाहित्याचे संशोधन करतांना नव्याने स्पष्ट भूमिका घेणे आज गरजेचे आहे.योग्य मार्गदर्शनाची गरज—मार्गदर्श—संशोधक विद्यार्थी समन्वयाची गरज तसेच संशोधन क्षेत्रातील अनिष्ठ गोष्टींना थारा

ISSN : 2278-9308
July 2021

न देता,संशोनधन हाच यावरील उपाय आहे.अन्य चळवळींनी नाकारलेले स्वयंघोषित विद्वान दूर ठेवले पाहिज असे मला वाटते.

**लोकसाहित्य संशोधनासाठी काही विषय :—**

१. लोकसाहित्य आणि जागतिकीकरण.
२. लोकसाहित्य आणि कृषी साहित्य साम्यभेद.
३. लोकसाहित्य आणि साठोत्तरी मराठी साहित्य.
४. हिंदी—मराठी लोकसाहित्याचा तुलनात्मक अभ्यास.
५. साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त हिंदी—मराठी कादंबरीतील लोकतत्त्वीय अभ्यास.
६. रंजनवादी आणि विज्ञानवादी लोकसाहित्य.
७. लोकसाहित्याची भषाशैली.
८. लोकसाहित्यातून अविष्कृत होणारे सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन.
९. लोकसाहित्याचे बोलीविज्ञान.
१०.लोकसाहित्यातील प्रादेशिकता.
११.लोकसाहित्यावरील आधुनिकतेचा परिणाम.
१२.लोकसाहित्यातील खेड आणि जीवन.
१३.लोकसाहित्य आणि राजकारण.
१४.२१वे शतक आणि लोकसाहित्य.
१५.शेतकऱ्यांचे प्रश्न आणि लोकसाहित्य.
१६.लोकसाहित्यातून अविष्कृत होणारा निसर्ग.
१७.लोकसाहित्यातील स्त्री प्रतिमा.
१८.लोकसाहित्यातील स्त्रीयांचे स्थान.
१९.शेतीचे प्रश्न आणि लोकसाहित्य.
२०.लोकसाहित्यातून ध्वनीत होणारे शैक्षणिक प्रश्न.
२१.अप्रकाशित लोकसाहित्य—एक चिकित्सक अभ्यास.
२२.लोकसाहित्य निवेदन तंत्र—एक अभ्यास.
२३.लोकसाहित्यातील प्राणी जगत—एक चिकित्सक अभ्यास.
२४.लोकसाहित्यातील गावकुसाबाहेरचे जीवन.
२५.लोकसाहित्यातून अविष्कृत होणारे विधी
२६.भटक्याविमुक्तांचे लोकसाहित्य—एक चिकित्सक अभ्यास.
२७.प्रादेशिक लोकसाहित्याचा—एक तुलनात्मक अभ्यास.
२८.ग्रमदैवते,कुलदैवते आणि लोकदैवते—एक चिकित्सक अभ्यास.
२९.प्राचीन मराठी अख्यायिका आणि समकालीन संर्दभ—एक चिकित्सक अभ्यास.
३०.लोकसाहित्यातील लोकश्रध्दांचा लोकतत्त्वीय अभ्यास.
३१.धार्मिक स्थळांचा लोकतत्त्वीय अभ्यास.
३२.समाज परिर्वतनाच्या चळवळीत लोकसाहित्याचे योगदान—एक चिकित्सक अभ्यास.
३३.भारतातील लोकोक्तीचा तुलनात्मक अभ्यास.
३४.लोकश्रध्दा आणि लोकसमजूतीचा तुलनात्मक अभ्यास.
३५.मौखिक लोककथाआणि लोककथागीते:एक तुलनात्मक अभ्यास.
३६.आंबेडकरी लोकगीते:एक अभ्यास.
३७.लोकगीतातील भिमदर्शन:एक अभ्यास.
३८.लोकगायक आणि त्यांची लोकगीते—एक चिकित्सक अभ्यास.
३९.लोकसंस्कृतीचे उपासक उदा.वासुदेव,डक्कलवार,कुडमुडे जोशी राईदर,चुडबुडकेवाले आणित्यांचे विधी,विधीनाट्य,सणउत्सव,नृत्य इत्यादींचा अभ्यास.
४०.विविध जातीसमूहाचे आणि लोकसमूहाचे लोकसाहित्य.
४१.जागतिकीकरणाचे लोकसाहित्यावरील परिणाम.
४२.दैवतकथा आणि लोकसमूह अनुबंध.

४३.वेगवेगळ्या आदिवासींच्या लोकसाहित्यातील सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन.
४४.वेगवेगळ्या आदिवासींच्या लोकसाहित्याचा:एक तुलनात्मक अभ्यास.
४५. स्त्रियांच्या ओवीगीतातील सण,उत्सव,कुलाचार,विधी इ.अभ्यास

अशा प्रकारे लोकसाहित्याच्या संशोधनाच्या नव्या दिशा स्पष्ट करातांना अनेक प्रश्न आणि अडचणी निर्माण होत असल्या तरीही वरील प्रमाणे लोकसाहित्य संशोधनाचे काही विषय आपणास सुचवता येतील. तसेच विविध बोली,भाषा,प्रदेश,जात,धर्म यांच्या सीमारेषांची मर्यादा ओलांडून लोकसाहित्याचा तौलनिक अभ्यास केल्यास लोकसाहित्याचे संशोधन परिपूर्ण होईल.भाषांतरीत साहित्यातून येणारे लोकजीवनचित्र उदा.गुजराती,कानडी,तेलगू,तमीळ,मल्याळम,कन्नड इ.भाषेतील लोकसाहित्याचे संशोधन केल्यास व्यापक जीवनपटाचे वस्तुनिष्ठ दर्शन होईल.तरीही काही मर्यादा . मान्य करुन लोकसाहित्यात जे काही संशोधन झाले आहे ते मौलिक अशा स्वरुपाचे आहे.त्याची मौलिकता कोणालाही नाकारता येणार नाही.

**संदर्भटिपा:**

१.गो.मा.पवार—मराठी संशोधन:सद्यस्थिती व दिशा,भाषा व साहित्य संशोधन खंड दुसरा,संपा.डॉ. वसेत जोशी,ग.ना.जोगळेकर,महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे,१९९५,पृ.क्र.३१८,३१९.
२.प्रा.विश्वनाथ शिंदे— मराठी लोकसाहित्य संशोध्नाच्या नव्या दिशा,“मराठी साहित्य संशोधन:नव्या दिशा”संपा.डॉ.अविनाश अवलगावकर,प्रतिमा प्रकाशन,पुणे,२००६,पृ.क्र. १७६,१७७.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# कोविड १९ च्या काळातील कामगारांचे स्थलांतर आणि उलट स्थलांतर

प्रा डॉ. साधना डी. वाघाडे
सहायक प्राध्यापक गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुखकला व वाणिज्य पदवी
महाविद्यालय,पेट्रोल पंप ;जवाहरनगर ता.जि. भंडारा
भ्रमणध्वनी क्र. ९४२३६४१४७३,sadhanawaghade @ gmail.com

**प्रस्तावना :—**

कोरोनानंतरचे स्थलांतर, हे भारताच्या फाळणीनंतरचे सर्वात मोठे स्थलांतर आहे. स्थलांतर हा माणसाच्या आजपर्यंतच्या इतिहासात कायमच महत्वाचा घटक आहे. आदिम काळापासून आजच्या कोरोना संकटापर्यंत माणसे सतत एका ठिकाणाहून दुस—या ठिकाणी जात आहेत.कधी संकटापासून दूर जाण्यासाठी तर कधी पोटाची खडगी भरण्यासाठी. या स्थलांतर करणा—या माणसांशी तेथील मुळच्या लोकांसोबत झालेल्या संघर्षाच्या आणि सहकार्याच्या कहाण्यांनीमाणसाचा इतिहास भरलेला आहे. आज एकविसाव्या शतकात ,वाढलेला प्रवासाचा वेग आणि संपर्काची क्रांती यामुळे या स्थलांतराचे नवेनवे पैलू समोर येत आहेत. स्थलांतराचे हे गणित समजून घेतल्याशिवाय आता आपल्याला पुढे जाता येणे अशक्य आहे.किमान भारताबाबत तरी याचा धोरणात्मकविचार करणे आपल्या सर्वांसाठी तातडीचे ठरले आहे.

कोरोनाच्या संकटापासून वाचण्यासाठी आणि भविष्यातील आर्थिक मंदीच्या भितीने आज लक्षावधी लोक मुंबई, दिल्ली सारख्या शहरातून आपल्या मुळ गांवाकडे परत जात आहेत. वाहतुकीच्या तुटपुंज्या व्यवस्थेमध्ये होत असलेल्या या स्थलांतराच्या कहाण्यांनी काहींना थेट १९४७ च्या फाळणीच्या वेळीझालेल्या ऐतिहासीक स्थलांतराची आठवण येत आहे. ही सारे माणसे अशी का सैरभैर होतहोती, याचा मुळापासून अभ्यास करणे आजच्या परिस्थितीत खूप महत्वाचे आहे. आजवर सगळा गोधळ होता हे जरी मान्य केले तरी ,यापुढे स्थलांतरासारख्या माणसाच्या या मूलभूतप्रेरणेचा धोरणकर्त्यांनी गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे. एकीकडे कोरोनाच्या काळात काही लोकांचे झालेले स्थलांतर आपल्या देशातील समाजरचनेला आव्हान आणि नवा आकार दिला जात आहे. याच परिस्थितीत नव्या ठिकाणाचा शोध घेतला जात आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे प्रमुख **गाय रायडर** यांनी सांगितल्यानुसार , स्थलांतर हा मुद्दा समाजातील आर्थिक व्यवस्थेला गतिमानता देणारा आणि समाजातील विवध घटकांना उपजीविकेचे साधन मिळवून देणारा आहे. तरीही त्यामुळे निम्न अतिनिम्न वर्गातील माणसांना एखाद्या जनावराप्रमाणे शोषण आणि अन्याय सहन करावा लागणे, ही देखील स्थलांतराची महत्वाची बाजू आहे. आजवर ही बाजू व्यवस्थेकडून नेहमीच दुर्लक्षित राहिली आहे.

**ब्लुमबर्ग— क्विंट**:— या आघाडीच्या उद्योग अर्थवृत्तसंस्थेने नमूदकेल्यानुसार, कोरोनाच्या काळात सुमारे चाळीस कोटी कामगारावरील दारिद्रयाचे संकट अधिकाधिक गडद होत जाणार आहे. अशावेळी मुंबई, दिल्ली सारखी शहरे सोडून कोरोनाच्या भितीमुळे व हाताला काम नसल्यामुळे आपापल्या गांवात परतलेल्या कामगारांना नवीन नोक—या, छोटे उद्योग सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देणे किंवा आर्थिक स्वावलंबी बनविणे आवश्यक आहे. त्यासाठी मार्गदर्शन करणा—या यंत्रणांची आपल्या देशात पुष्कळ कमतरता आहे. त्यामुळे बेरोजगारी आणि उपासमारीची वेळ येते. बहुतांशी भारतासारख्या विकसनशील देशात ध्येये व महत्वाकांक्षापेक्षा अगतिकता आणि अन्य पर्यायाची कमीपणा या कारणांमुळे देशातील निम्न व मध्यमवर्गीय समाज स्थलांतर करीत आहे ही वास्तविक परिस्थिती आहे.

कोरोनाच्या काळातील झालेली स्थलांतरे आणि त्या स्थलांतर प्रक्रियेतझालेला कामगार वर्गाच्या व त्यांच्या लेकराबाळांना भोगाव्या लागलेल्या हालअपेष्टा या वास्तवाला अधिक गडद करून गेल्या. कोरोनासारख्या अनेक विषाणूंना किंवा अनेक नैसर्गिक आपत्तींना आपल्याला भविष्यात तोंड देण्याची तयारी आताच करावी लागणार असल्याचे भाकीत, त्या क्षेत्रातील तज्ज्ञ अभ्यासक मंडळी करत आहेत. आपल्या संस्कृतीला, देशाच्या आकृतीबंधाला संतुलित स्वरुपांत

जपून ठेवत विकास साधायचा असेल तर आपल्याला स्थलांतरे, विकास प्रक्रिया आणि व्यवस्थापन यांचे संतुलन साधणा—या नवनव्या पध्दतीचा विचार करावा लागेल. कोरोना काळातील स्थलांतरे आणि चक्रीवादळातून निर्माण झालेल्या समस्या आपल्याला पुष्कळ काही शिकवित आहेत. लॉकडाऊनच्या काळात पायीच आपापल्या राज्याची वाट धरलेल्या लाखो मजुरांना उपासमारीचे चटके बसले.

जगात कोव्हिडची साथ पसरल्यानंतर प्रत्येक देशात मुख्यत: दोन समस्या उद्‌भवल्या आरोग्याची आणि अर्थव्यवस्थेची. भारतात या दोन समस्यासोबतच स्थलांतरीत मजुरांची तीसरी समस्या आहे.कोविड—१९ च्या काळात मजुरांच्या जेवणासाठी लांबच लांब रांगा होत्या. अपुरे अन्न मिळत असे राहण्याची, पाण्याची व्यवस्था नाही खिशात पैसे नाहीत. कारण सगळीकडे सर्वच काम बंद होते. त्यामुळे कष्टाने कमवून जगणा—या व्यक्तिवर आता फुकटच्या अन्नासाठीसकाळ—संध्याकाळरांगेत उभे राहण्याची वेळ आली होती. महाराष्ट्र, गुजरात, तेलंगणा, तामिळनाडू मधील लाखो मजुर परत आले, तर उत्तरप्रदेश, बिहार सरकारचे म्हणणे की हा रोग अनेक पटीने वाढू शकते म्हणून या रोगाचा फैलाव न होण्यासाठी **आहेत तिथेच थांबा**अशी सरकारची घोषणा होती. लॉकडाऊननंतर, प्रशासन, स्थलांतर करणा—या मजूरांशी अमानवी पध्दतीने वागत होते.

**व्याख्या** :— स्थलांतरण—" एका गांवातून दुस—या गांवात, खेडयातून शहराकडे, एका शहरातून दुस—या शहरांत, एका राज्यातून दुस—या राज्यात, एका देशातून दुस—या देशात कायमचे किंवा काही कालावधीसाठी वास्तव्यास जाणे म्हणजे स्थलांतर होय. "

डेविड एम.हीर ( David M. Heer ) :-" स्थलांतराचा अर्थ आपले निवासस्थान सोडून दुसरीकडे वास्तव्यास जाणे होय. "

**स्थलांतराचे प्रकार**

अ)जिल्हा अंतर्गत स्थलांतर

ब)राज्य अंतर्गत स्थलांतर

क)दोन राज्यामधील आंतरराज्य स्थलांतर

ड)दोन देशामधील , परदेशात झालेले स्थलांतर

**प्रत्याकर्षक कारक**( Push Factors ):–स्थलांतरणाच्या प्रत्याकर्षक कारणांमध्ये काही परिस्थिती किंवा अनिष्ट घटकांचा समावेश होतो. अनिष्ट परिस्थिती किंवा कारणांच्या प्रभावाने व्यक्ती आपले निवासस्थान सोडण्यांस तयार होतात. या स्थलांतरांस प्रत्याकर्षक कारक जबाबदार असतात. ही स्थलांतरे बहुतेक वेळा अनैच्छिक व सक्तीचे असतात.

१.रोजगाराच्या संधीचा अभाव.

२.शिक्षण, निवास, तंत्र शिक्षणाचा अभाव.

३.उत्पन्नाच्या संधीचा अभाव.

४.मनोरंजनाच्या साधनाचा अभाव.

५.नैसर्गिक अरिष्ट/ आपत्ती ( दुष्काळ, पूर )

६.अनिष्ट सामाजिक / प्रशासकीय स्थिती

७.आतंकवाद/ असामाजिक गोष्टीमध्ये वाढ.

कोविड— १९ ची सुरूवात झाल्यापासून देशात हाहाकार माजला कोरोना विरूध्दच्या युध्दात अनेक देशात निर्माण झालेली विपरीत परिस्थिती पाहता भारतात वेळीच लॉकडाऊनचा निर्णय घेण्यांत आला. यामुळेच की काय आज जगातील इतर देशाच्या तुलनेत भारतात कोरोना रूग्णांची संख्या व कोरोनामुळे मृत्यु पावलेल्यांची संख्या कमी आहे. भारतासारख्या अॅफाट लोकसंख्येच्या देशात अमेरीका किंवा इटली सारखा कोरोनाचा फैलाव झाला असता तर त्यावर आवर घालने अत्यंत कठीण झाले असते. त्यामुळेच वेळीच लॉकडाऊन लावणे आणि सर्व राज्यांना सोबत घेवून कोरोनाचे युध्द लढणे यासाठी सरकारचे अभिनंदन करणे गरजेचे आहे. परंतू त्याचबरोबर हा ही विचार करणे महत्वाचे आहे की, या लॉकडाऊनमुळे समाजातील एका मोठया वर्गावर अतिशय विपरित परिणाम पडला आहे. तो वर्ग म्हणजे स्थलांतरीत कामगारांचा वर्ग होय.

मार्च २०२० आणि २०२१ या काळात देशातील सध्याच्या कोरोना विषाणू विरूध्द लॉकडाऊन (टाळेबंदी) हा गंभीर चर्चेचा विषय झाला आहे.प्रदीर्घ लॉकडाऊनमुळे जगभरातील सुमारे

२ – ७ अब्ज हंगामी कामगारांची रोजीरोटी बंद झाल्याचा अंदाज संघटनेने प्रसिध्द केला आहे. भारतात एकूण श्रमशक्तीच्या ९० टक्के हिस्सा असंघटित कामगारांचा आहे. आधीच हातावर पोट असलेले भारतीय अर्थव्यवस्थेच्या असंघटित क्षंत्रातील सुमारे ४० कोटी मजूर व कामगार सध्याच्या कोरोना संकटामुळे आणखी दारिद्रय रेषेच्या खाईत लोटले जाईल आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने भारतात ४० कोटी बेरोजगार होण्याची भिती वर्तविली आहे. सन २०१८ मध्ये देशातील श्रमिकांच्या सर्वेक्षणाचा जो अहवाल प्रसिध्द झाला आहे. त्यानुसार देशात एकूण ४६ कोटी ५० लक्ष श्रमिक होते. यापैकी ५२ टक्के स्वयंरोजगार करणारे व २५ टक्के पोटासाठी भटकंती करणारे मजूर होते. आणखी १३ टक्के श्रमीक असंघटित क्षेत्रात काम करतात. कायमस्वरूपी रोजगार असलेले केवळ १० टक्के लोक आहेत. त्यामुळे लॉकडाऊनमुळे बहुतांशी श्रमिक वर्गाला तीव्र झळ पोहचली आहे.

कोरोना अर्थात कोविड–१९ हा आजार नेमका काय आहे आणि सर्व जग याला घाबरून घरात दडी मारुन का बसले आहे. कोरोना विषाणू सर्दी, व पुढे ताप निर्माण करणारा आहे. सर्दी ताप हा नेहमीचाच आजार आहे परंतू हा विषाणू माणसाच्या घशात थोडीशी जागा करतो नंतर तो फुफुसामध्ये प्रवेश करतो. आणि फक्त
५ दिवसांत शरीरात वेदना निर्माण होतात.

**देशातील टाळेबंदी**– कोरोनाचा प्रभाव देशात जाणवू लागल्यापासून त्यावर प्रतिंबंध म्हणून सरकारने टाळेबंदी जाहीर केली. टाळेबंदीमुळे संपूर्ण जगच ठप्पझाले. सर्व जागच्याजागी राहीले देशात टाळेबंदी खालीलप्रमाणे करण्यांत आली.

२२मार्च जनता कर्फ्यू

पहिला टप्पा – २४ मार्च २०२० ते १४ एप्रिल २०२०
दुसरा टप्पा – १५ एप्रिल २०२० ते ३ मे २०२०
तिसरा टप्पा – ४ मे २०२० ते २० मे २०२०
चवथा टप्पा – २१ मे २०२० ते ३१ मे २०२०
पाचवा टप्पा – १ जून २०२० ते ३० जून २०२०
सहावा टप्पा – १ जूलै २०२० ते ३१ जूलै २०२०

**स्थलांतरीत कामगारांची स्थिती व परिणाम** :–

राज्यातील महानगरीत उत्तरप्रदेश, बिहार व इतर आजू–बाजूच्या राज्यातून रोजगारासाठी आलेल्या कामगारांची संख्या मोठया प्रमाणांत आहे. टाळेबंदी नंतर महानगरात हजारोंच्या संख्येनी कामगार अडकून पडले. या अडकलेल्या स्थलांतरीत मजूरांचे काय? सर्वांनाच घरी जायची घाई होती. परंतु जाता येत नव्हते. कोणत्याही लहान–मोठया संकटाच्या वेळी आपण आपल्या घरी लवकरांत लवकर गेले पाहिजे अशी सर्वांचीच भावणा असते. आपण केव्हा एकदाचे घरी जातो असेच वाटते. हेमानवी सत्य या कामगारांनाही लागू होते. कारण ते हौस म्हणून गांव सोडून आलेले नसतात.गावी पोट भरता येत नाही म्हणून शहर हा त्यांचापर्याय असतो. परंतु कोरोनासारख्या संकटात पोट भरण्याची हमी मिळत नसेल तर त्यांना शहरात ठेवण्याचे बंधन कशाला घालायचे?

दुस–या टप्प्याच्या टाळेबंदी पर्यंत कोणत्याही कामगाराला सरकारने मदत दिलेली नव्हती. त्यांच्या खात्यावर रोख रक्कम जमा झालेली नाही. या कामगारांना फक्त घरी जाण्याची इच्छा होती. गावाला जाण्यासाठी तयार असणा–या स्थलांतरीत कामगारांचे घोळके दिशाहीन, इकडून तिकडे,डोक्यावर सामान घेवून वणवण फिरत होते. त्यांच्यासमोर गांवाकडे जाण्यासाठी कोणताही पर्याय नसल्यामुळे लहान मुलांना घेवून चालतच गांवाला जाण्यासाठी निघाले.या स्थलांतरीतांची दुरावस्था अनेक माध्यमांनी दाखवून दिली. त्यांची दुरावस्था पाहून डोळे भरून येत होते. स्थलांतरीत मजूरांचा प्रश्न चुकीच्या पध्दतीने हाताळला गेला. त्यांना घरी जाण्याची आस होती, अन्न व पाणी मिळत नव्हते. अनेक अडचणी होत्या त्यामुळे ते हत:श होवून मार्गक्रमण करू लागले.पायी जात असतांना कोणी रस्त्यातच मरण पावले. कोरोना या विषाणूने मरण्यापेक्षा काहींना अन्न पाण्यावाचून मृत्यूला कवटाळावे लागले. देशाबाहेरील लोकांना देशात आणण्यासाठी

जे प्रयत्न करण्यांत आले तसे प्रयत्न या मजुरांना गावी पोहचविण्यासाठी करण्यांत सरकार अपयशी ठरले. त्यांना अनेक दुर्दैवी घटनांचा सामना करावा लागला.

सरकारी धोरणामुळे मजुरांवर बेरोजगारीची वेळ आली.टाळेबंदीच्या काळात त्यांच्याजवळअसलेली रोकड संपली. दवाखाण्यावर फुले उधळण्याचा हवाई कार्यक्रम करण्यापेक्षा या मजुरांना घरी पाठविण्याचा खर्च करणे महत्वाचे होते. जेव्हा स्थलांतरीतांना घरी पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला तेव्हा फार उशीर झाला होता. टाळेबंदीच्या तिस—या टप्प्यात हा निर्णय घेण्यांत आला त्यावेळी अनेक कटकटी होत्या. त्या म्हणजे त्यांची स्थानिक पोलीस ठाण्यात नोंदणी पाहीजे, त्यांचेकडे कोरोना मुक्तिचे प्रमाणपत्र पाहीजे मजूर असे आजार मुक्तिचे प्रमाणपत्र कुठून आणणार अशा अनेक अडचणीमुळे ते त्रासून गेले होते.

<u>**स्थलांतरित कामगार**</u> :— टाळेबंदीमुळे कारखाने आणि कामाची ठिकाणे बंद झाल्यामुळे लाखो स्थलांतरित कामगारांना उत्पन्नातील तोटा, अन्नटंचाई, आणि भविष्याविषयी अनिश्ततेचा सामना करावा लागला. यानंतर त्यांच्यातील बरेच लोक आणि त्यांची कुटुंबे उपाशीच राहिली. सरकारी योजनांनी लॉकडाऊनमुळे गरीबांना जादा राशन मिळण्याची हमी दिली असतांनाहीवितरण व्यवस्था प्रभावी ठरली नाही. कोणतेही कांम आणि पैसा नसल्यामुळे हजारो स्थलांतरित कामगार शेकडो किलोमिटर चालत किंवा सायकल वरून त्यांच्या मुळगांवी परत जाण्यासाठी निघाले. लॉकडाऊनचे उल्लंघन केल्याबध्दल ब—याच जणांना अटक करण्यांत आली आणि काहींचा थकवा किंवा रस्त्यावर अपघातात मृत्युझाला. २९ मार्चरोजी सरकारने घरमालकांना , भाडेकरूंना भाडे न मागण्याचे व मालकांना वजावटीशिवाय वेतन देण्याचे आदेश दिले. लॉकडाऊनचे उल्लंघन करणा—यांना १४ दिवसांकरीता शासनातर्फे चालविण्यांत येणा—या विलगीकरण केंद्रात पाठविण्यांत येत होते. बनावट बातम्यांमुळे घाबरून स्थलांतरित कामगार घाबरून गेले, आणि त्यामुळे त्यांनी आपापल्या राज्यात जाण्यासाठी रेल्वेस्टेशनवर गर्दी केली आणि त्यामुळे काही प्रमाणांत गोंधळ निर्माण झाले. त्यांच्यास्वगावी देखील आप्तस्वकीय घरांत घेण्यासतयार होत नव्हते.

<u>**स्थलांतराची कारणे**</u> :— शहरांत स्थलांतरापूर्वी गावात हे लोक काय काम करीत होते हे पाहीले तर असे लक्षात येते की, २८ टक्के लोक हे शेती करीत होते तर ११ टक्के कामगार हे शेतमजूरी करत होते, तर १६ टक्के लोक मिळेल ते काम करतांना दिसून आले. गावांतून मोठया शहरांत स्थलांतर जास्त प्रमाणात करण्यात आले. यातूनच प्रमुख कारणे आहेत

१. काही कामगारांना गांवात शेतातून येणा—या उत्पन्नामध्ये भागत नव्हते.

२. काही कामगारांकडे शेतीच नाही.

३. काही कामगार गांवात मजुरी/ काम मिळण्यात अडचणी असल्याकारणाने शहरांत येणे पसंत केले. यापेक्षा वेगळे कारण म्हणजे गावांतल्यापेक्षा चांगली नोकरी आणि जास्त उत्पन्न मिळविण्याच्या हेतूने शहरांत येणे हा उद्देश असणारे अधिक लोक आहेत. चांगले शिक्षण प्राप्त करण्यासाठी काही विद्यार्थी शहरात आले. काही स्थलांतरीत कामगार हे भूमिहीन आहेत. काही कामगार हे अल्पभूधारक आहेत तर काही मध्यम मोठे शेतकरी स्थलांतरित झाले आहेत.

<u>**राज्यांतर्गत स्थलांतराचे वैशिष्टये**</u> :—

१. स्थलांतरित कामगार हे पत्नी आणि मुले यांच्यासह स्थलांतरित होतात.

२. काही स्थलांतरित कामगार हे शहरांत कुटुंबियासोबत राहतात तर काही एकटे राहतात.

३. शहरांत काही पती आणि पत्नी दोघेही काम करतात..

४. शहरांत स्थलांतरित कामगारांमध्ये काही तीन वर्षाहून अधिक काळापासून राहत आहेत.

५. काही कामगारांकडे स्वत:च्या मालकीचे घर देखील नाही.

<u>**महाराष्ट्रातील उलटे स्थलांतर**</u> :—<u>स्थलांतरितामध्ये मराठवाडयातील श्रमिकांचे प्रमाण</u>

महाराष्ट्रातील विविध मोठया शहरात जे श्रमिक रोजगाराच्या निमित्ताने आणि विद्यार्थी अभ्यासासाठी गेले होते. त्यापैकी अनेकजणकोरोना महामारीच्या संकटामुळे परत आपापल्या गांवी आले. टाळेबंदीची सर्वाधिक झळ असंघटित क्षेत्रातील श्रमिकांना बसत आहे. शेतीक्षेत्रातील पेचप्रसंग, सततचा दुष्काळ, कर्जबाजारीपणा , रोजगार संधीचा अभाव यांतून राज्यातील मागास जिल्हयातून कामगारांचे तर चांगले शिक्षण मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांचे मोठया शहरांमध्ये स्थलांतर होण्याचे प्रमाण अधिक आहे. कोरोना महामारीमुळे कराव्या लागलेल्या टाळेबंदीमध्ये पुणे, मुंबई उपनगरांतून

ISSN : 2278-9308
July 2021

निमशहरी व खेडेगावांत जे उलटे स्थलांतर झाले त्यात मराठवाडयातील काही कामगार परत आल्याचे समोर आले. कुशल, अर्धकुशल व अकुशल अशा कनिष्ठ व्यवसायात काम करणारे मजूर कोरोना महामारीच्या भितीबरोबरच वेतन बंद असल्याने आणि नोकरी गेल्याने गावी परतलेले आढळून आले. परप्रांतीय कामगार त्यांच्या राज्यात गेल्याने निर्माण झालेल्या नविन संधी स्विकारण्याचा आणि पुन्हा शहरात परतण्याचा आशावादही राज्यातील कामगारांनी व्यक्त केला.

**पुण्यातून मताठवाडयात उलटे स्थलांतर** :— लॉकडाऊन घोषित झाल्यानंतर राज्यांतर्गत जे उलटे स्थलांतर सुरूझाले त्यात पुणे आणि मुंबई परिसरातून आपापल्या गांवी जाणा—या कामगारांचे प्रमाण अधिक दिसून आले.

विद्यार्थी शिक्षणघेण्यासाठी तसेच नोकरीच्या शोधात तर काही विद्यार्थी वेगवेगळया कंपन्यांत नोकरी करीत होते. टाळेबंदीमुळे तेथे राहण्याची आणि खाण्यापिण्याची गैरसोय होत असल्यामुळे नंतर रेल्वेसेवा, बससेवा देखील बंद करण्यांत आली त्यामुळे काहींना पायीच प्रवास करावा लागला यात रस्त्यात अनेकजण मृत्युमुखी पडले.

मागास, अविकसीत जिल्हयातील अर्थव्यवस्था रोजगार पुरविण्यासाठी सक्षम नसल्याने मजूर मोठया शहरात विविध असंघटित क्षेत्रांत काम करू लागले. सहाव्या आर्थिक गणनेनुसार राज्यातील एकूण रोजगारापैकी अधिक रोजगाराची संधी ही मुंबई, मुंबई उपनगर,ठाणे, रायगड, पुणे नाशिक या शहरी भागातच केंद्रित आहे. आणि हा भागच कोरोना बेल्ट बनल्याने कामगारांसमोर पेच निर्माण झाले. टाळेबंदीमध्ये परराज्यातील कामगाराबरोबरच राज्यांतर्गत कामगार ही आपापल्या गावी परतू लागले.

**लॉकडाऊन काळात आलेल्या समस्या** :— लॉकडाऊन दरम्यानच्या काळात श्रमिकांना अनेकविध समस्यांना सामोरे जावे लागले. वेतनावरच कुटुंब अवलंबून असल्याने दैनंदिन जीवनांत अडचणी आलेल्या दिसतात. कारण ४९ टक्के श्रमिकांचे उत्पन्न लॉकडाऊन काळामध्ये एकदम बंद पडल्याचे तर ४७ टक्के कामगाराचे उत्पन्न हळूहळू कमी होत गेल्याचे आढळून आले. लॉकडाऊनच्या काळात कुटुंबाच्या एकुण कमाईतून कुटुंबाच्या आवश्यक गरजा पूर्ण करण्यांत मोठया प्रमाणात अडचणी आल्याचे कामगार सांगतात. तर खाण्यापिण्याच्या वस्तू मिळवण्यांत मोठया प्रमाणात अडचणी आल्याचे काही कामगारांनी सांगितले. काही कामगारांना पैशाची अधिक प्रमाणांत अडचण आल्याचे सांगितले. टाळेबंदीच्या काळात कामगारांना राज्यांतर्गत गांवी जाण्याची सुविधा उपलब्ध नव्हती.एस.टी. महामंडळाची, रेल्वेसेवा वाहतूक बंद असल्या कारणाने कामगारांना खाजगी वाहनाने प्रवास करावा लागला. तर टक्के विद्यार्थी हे खाजगी वाहनातून गांवी परतले. त्यासाठी त्यांना अधिकचे पैसेही मोजावे लागले.

टाळेबंदीच्या काळात शासनाकडून गरीब कुटुंबास गहू आणि तांदूळ पुरविले गेले. यामध्ये काही कामगार कुटुंबाला गहू आणि तांदूळ मिळाले. तर काही कामगार कुटुंबाला या सुविधा मिळाल्या नाहीत. काहीकडे राशन कार्ड उपलब्ध नव्हते, तर काही कुटूंबाचे राशन कार्ड त्यांच्या मुळगावातील पत्त्यावर होते. काही कामगाराकडे राशनकार्ड असल्याचे आढळून आले. त्यापैकी काही कामगारांचे राशन कार्ड हे त्यांच्या मुळ गांवातील पत्त्यावरील असूनही शहरी भागात त्यांना गहू, तांदूळ मिळाले. केंद्र सरकारने असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी आर्थिक मदतीची घोषणा केली. त्याविषयी काही कामगारांना माहितीच नव्हती. ही मदत त्वरीत आणि प्रत्यक्ष नसल्याने याचा फायदा कामगारांना झाला नाही.

कामगारांचे उलट स्थलांतर झाले ते प्रामुख्याने कोरोना महामारीच्या भीतीतून झाले असून साथ संपल्यानंतर पुन्हा शहरांत जाण्याची इच्छा दर्शविणा—यांची संख्या अधिक आहे. कोरोना महामारीच्या भीतीने अर्ध्ये अधिक कामगारांनी गांवी परतणे पसंत केले.वेतन मिळणे बंद झाल्याने काही कामगारांनी गांवी परतण्याचा निर्णय घेतला तर नोकरी गेल्याने काही कामगारांनी आणि खाण्यापिण्याचा प्रश्न निर्माण झाल्याने काही कामगारांनी स्वगांवी जाणे पसंत केले. विद्यार्थी तर कोरोनच्या भीतीपोटी, जेवण आणि राहण्याच्या समस्येमुळे काही विद्यार्थी आणि आर्थिक कारणांनी काही विद्यार्थी आपापल्या गांवी गेले परंतू परत आलेल्या कामगारांचे गांवक—यांनी स्वागत न करता गांवात प्रवेश दिले नाही.काही टक्के गावक—यांच्या प्रतिक्रिया हया शहरातून आलेल्यांना वेगळे

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)

ISSN : 2278-9308
July 2021

ठेवण्याची होती. काहींना वाटत होते की, शहरातून आलेल्या लोकांमुळे गांवात कोरोना महामारी पसरेल तर काही गांवक—यांनी स्थलरांतरित कामगाराप्रती मदतीची भावना व्यक्त केली.

लॉकडाऊनच्या घोषणेनंतर जवळपास १ महिन्यांनी केंद्र सरकारने प्रवासी मजुरांसाठी ‘आत्मनिर्भर भारत ’ पॅकेज अंतर्गत अन्नधान्य वाटपाची घोषणा केली. एक महिन्यातच जवळपास १२ कोटी लोकांना नोकरी किंवा कामावरून कमी करण्यांत आले. यामध्ये बहुतांश लोक असंघटित किंवा ग्रामिण क्षेत्रातले आहेत. लॉकडाऊनच्या काळात घरी परत जात असतांना वाटेत कितीतरी लोकांचा मृत्यु झाला. कामगारांचे जे उलटे स्थलांतर झाले ते प्रामुख्याने कोरोना महामारीच्या भीतीतून झाले असून कोविड १९ची साथ संपल्यानंतर पुन्हा शहरात जाण्याची इच्छा दर्शविणा—यांची संख्या ही अधिक होती .कोरोना महामारीच्या भीतीने काही कामगारांनी आपल्या गांवी परतणे पसंत केले.

कोविड—१९ च्या काळात अनेक बालकांना भाजी, डाळ मिळणे कठीण झाले. गेल्यावर्षी मार्च महिन्यात जेव्हा कोरोनाच्या प्रादुर्भावातून अचानकपणे शासनाने लॉकडाऊनचा निर्णय घेतला तेव्हा पुणे आणि परिसरातील वीटाभटी कामगारांच्या कष्ट आणि उपासमारीला पारावार उरला नाही. वीटाभट्ट्या बंद करण्यांत आल्या, कारागिरांचे रोजगार आपोआपच बंद झाले.तिथून बाहेर पडून वेगळा काही रोजगार मिळवावा तर तेही

अशक्य झाले होते. कंपन्या बंद, बिगारी काम नाही.शेतात कोणी कामासाठी घेत नव्हते. धुणी— भांडी करावी तर घरकामें बंद होती. या सर्वांचा परिणांम म्हणून याच वीटाभट्टी कामारांच्या कुटूंबांना, मुलांना मोठया उपासमारीचा सामना करावा लागला.

ही विस्कळीत झालेली परिस्थिती पूर्ववत व्हायला, झालेले नुकसान भरून निघायला, कर्ज फिटायला पुढील २ ते ३ वर्षे जातील. परंतु मुलांच्या शारिरीक आणि मानसिक आरोग्यावर झालेले परिणांम, कुपोषणामुळे झालेली शरीराची हानी कायमस्वरूपी असणार आहे. त्यांच्या वाढीवर आणि विकासावर याचे कायमस्वरूपी परिणांम राहणार आहेत.

**उलटस्थलांतराचा वेग नियंत्रित करण्यासाठी उपाय:—**

१. कामगारांचे नोंदणी रजिस्टर — स्थलरांतर करणा—या प्रत्येक माणसाची नोंदणी , त्यात त्याच्या कामाचे वर्गीकरण असावे. त्यामुळे त्यांना पुढे आरोग्यविमा, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अशा विविध योजनांचा लाभ मिळू शकेल.

२. जसे ‘‘**एक नेशन एक राशन**’’ आहे तसे आता शिक्षणाचे सुध्दा ऑनलाईन युग आहे. एक नेशन एक शिक्षण आता परीक्षांची पध्दत सुध्दा नव्याने तयार होत आहे.

३. पैसे कमावण्याचे एकक हे ‘व्यक्ती’ न राहता ‘कुटुंब’ होण्याची गरज आहे.कृषी उत्पादन प्रक्रिया उद्योग घरोघरी होणे. सेवा व्यवसायात खाद्य पदार्थ बनवणे, इलेक्ट्रॉनिक हार्डवेअरचे छोटे पार्टस बनवणे, जे आज झोपडपट्टीत गृहउद्योग म्हणून केले जाते. कृषीक्षेत्रात मानवीय श्रम मर्यादित करून यांत्रिक श्रम वाढविणे आणि त्याच बरोबर IT क्षेत्रातील आणि कौशल्याधिष्ठीत सेवा क्षेत्रातील जोड कामे करणे.

४. आज प्रस्थापित सहाकर क्षेत्राने वेगवेगळया पूर्वनियोजित कामाबरोबरच नवनविन कामाचे प्रयोग करायला हवे. सहकारी संस्थांनी आता आत्मनिरिक्षणाने याकडे लक्ष द्यावे.

५. अनेक कांमे अशी आहेत, ती जगाच्या पाठीवरून कुठूनही करता येतात. त्याला आपण आऊटसोर्सिंग म्हणतो. त्याच्या सुविधा त्याच गावात मिळावी. नवीन युगाच्या नव्या वाटा आत्मसात करून त्या गांवागावांत पोहचू द्यावे.

६. जिथे मुळ ‘गांव तेथे काम’ या संकल्पनेनुसार ब—याच तरूणांनी कमी पगारात सुध्दा गावच्या गांवी नोकरी पत्करणे स्विकारले.

७. सामाजिक आरक्षणांत थोडी सुधारणा करुन स्थानिक सामाजिक आरक्षण आणता येईल का? हे विकासाच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१) मानवी विकासाचा आलेख आणि भारतीय नागरी समाजातील समकालीन समस्या :—
डॉ.अशोक शेळके, प्रा. छाया शिंदे , प्रा. सर्जेराव बोराडे, प्रा. प्रतिभा भालेराव, प्रा.पी.डी.पाटील
प्रा. अविनाश वैठणकर
२) कोरोना कालावधीतील दैनिक वृत्तपत्र
४) दैनिक लोकसत्ता
३) www.google.com

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# रूपक-संख्या : एक अध्ययन

डॉ. रोशन खंडू भगत
सहाय्यक प्राध्यापक. संस्कृत विभाग, संगमनेर नगरपालिका कला, दा. ज. मालपाणी वाणिज्य वब. ना. सारडा विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), संगमनेर
E-Mail : - roshanbhagat@sangamnercollege.edu.in ,Mo No. : - ८८५५९३१७३७

नाट्यशास्त्राचे अध्ययन अगदी आचार्य भरत यांच्याही पूर्वीपासून आपणास पहावयास मिळते. भरतमुनी यांच्यानंतर नंदिकेश्वर, सागरनंदी, धनंजय, रामचंद्र, गुणचंद्र, शारदातनय, शिंग भूपाल, रूपगोस्वामी आणि सुंदरमिश्र यांसारखे अनेक आचार्यांनी नाट्यशास्त्रात अमूल्य योगदान दिले आहे. त्यामुळेच आपणास या परंपरेत एक सखोल चर्चा आढळून येते.

'रूपक-प्रकार' हा नाट्यशास्त्रातील प्रमुख विषयांपैकी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. प्रस्तुत शोधनिबंधात 'रूपकाचे एकूण प्रकार किती' यावर विचार करण्यात आलेला आहे.

नाट्यशास्त्रीय परंपरेनुसार काव्याचे दोन प्रकार मानले गेले आहेत - श्रव्य आणि दृश्य. यातील दृश्य काव्याचा एक प्रकार नाटक म्हणून ओळखला जातो. परंतु याचे ग्रहण हे मुख्यतः दृष्टीद्वारे होत असल्याने हळूहळू दृश्य काव्यालाच नाटक म्हटले जाऊ लागले.

सर्वप्रथम अग्निपुराणात नाटकलक्षण इत्यादींचे निरूपण आलेले आहे. त्यात काव्याच्या एका प्रकाराचे नाव प्रकीर्ण सांगितले आहे. या प्रकीर्णाचेच दोन प्रकार सांगितले आहेत - काव्य आणि अभिनेय. अग्निपुराणात दृश्य काव्याचे २७ प्रकार सांगितले आहेत (नाटक, प्रकरण, डिम, ईहामृग, समवकार, प्रहसन, व्यायोग, भाण, वीथी, अंक, त्रोटक, नाटिका, सट्टक, शिल्पक, विलासिका,दुर्मल्लिका, प्रस्थान, भाणिका, भाणी, गोष्ठी, हल्लीशक, काव्य, श्रीनिगदित, नाटयरासक, रासक, उल्लाप्यक, प्रेक्षण). विशेष म्हणजे त्यात रूपक आणि उपरूपक असे विभाजन केलेले आढळून येत नाही.

अग्निपुराणानंतर भरताचे नाट्यशास्त्र हा या विषयातील सर्वात प्राचीन व आधिकारिक ग्रंथ मिळतो.दृश्य काव्याचे मुख्य दोन विभाग आहेत - रूपक आणि उपरूपक. 'रूपक-प्रकार' हा नाट्यशास्त्रातील प्रमुख विषयांपैकी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. भरतमुनींचे नाट्यशास्त्र हा या विषयातील सर्वात प्राचीन ग्रंथ आपणास उपलब्ध होतो. त्यानुसाररूपकाचे मुख्य १० प्रकार आहेत - नाटक, प्रकरण, भाण, व्यायोग, समवकार, डिम, इहामृग, अंक, वीथी, प्रहसन. उपरूपकाचे १८ प्रकार मानले आहेत - नाटिका, त्रोटक, गोष्ठी, सट्टक, नाटयरासक, प्रस्थान, उल्लाप्य, काव्य, प्रेक्षण, रासक, संलापक, श्रीगदित, शिंपक, विलासिका, दुर्मल्लिका, प्रकरणिका, हल्लीशा और भणिका।

रूपकप्रकारांच्या संख्येविषयी परंपरेत अनेक विद्वानांनी आपली मते मांडली आहेत. अभ्यासादरम्यान बहुतांश मतांचा आढावा घेतलेला आहे. या सर्व विद्वानांनी मानलेली रूपक प्रकारांची एकूण संख्या पुढील तक्त्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. सोबतच या तक्त्यामध्ये आचार्य भरत यांनी मानलेल्या १० पेक्षा अधिक रूपक प्रकार ज्या विद्वानांनी दर्शविले आहेत, त्यांच्या समोरील रकान्यात १० व्यतिरिक्त असलेल्या रूपकांची नोंद करण्यात आलेली आहे.

**रूपक-संख्या तक्ता :-**

| क्रम | रचना | रचयिता | काळ ई.स.मध्ये | रूपक-संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | नाट्यशास्त्र | भरत | २ रे शतक | १० |
| २ | दशरूपक | धनंजय | ९७५-१००० | १० |
| ३ | अवलोक | धनिक | ९७५-१००० | १० |
| ४ | शृंगारप्रकाश | भोज | १०२५-५० | १२ (नाटिका, सट्टक) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | काव्यानुशासन | हेमचंद्रसूरी | ११२५-७७ | १२ (नाटिका, सट्टक) |
| ६ | नाट्यदर्पण | रामचंद्र आणि गुणचंद्र | १२ वे शतक | १२ (नाटी, प्रकरणी) |
| ७ | प्रतापरूद्रयशोभूषण | विद्यानाथ | १३००-२५ | १० |
| ८ | नाटकलक्षणरत्नकोश | सागरनंदी | १३ वे शतक | १० |
| ९ | भावप्रकाशन | शारदातनय | १३ वे शतक | १० |
| १० | रसार्णवसुधाकर | शिंग भूपाल | १३३०-८० | १० |
| ११ | साहित्यदर्पण | विश्वनाथ | १४०० | १० |
| १२ | - | सोमेश्वर | - | १३ (नाटिका,सट्टक, त्रोटक) |

वरील १२ ग्रंथांपैकी ०८ ग्रंथांचे रूपक संख्येविषयी एकमत होताना आपणास दिसते. यासंदर्भात आचार्य भरताचे अनुकरण करत धनंजय, धनिक,विद्यानाथ,सागरनंदी, शारदातनय, शिंग भूपाल,विश्वेश्वर आणि विश्वनाथ इत्यादी नाट्यशास्त्री रूपकांचे फक्त १०(नाटक, प्रकरण, भाण, व्यायोग, समवकार, डिम, इहामृग, अंक, वीथी, प्रहसन) प्रकार आहेत, असे मानतात. भोज आणि हेमचंद्रसूरीरूपकांचे एकूण १२(१० + नाटिका, सट्टक) प्रकार आहेत, असे मानतात.आचार्य हेमचंद्र यांचे शिष्य रामचंद्र आणि गुणचंद्र रूपकांचे एकूण १२(१० + नाटी, प्रकरणी) प्रकार आहेत, असे त्यांच्या नाट्यदर्पण या ग्रंथात सांगतात. तर सोमेश्वर हा एकमेव विद्वान एकूण १३ (१० + नाटिका,सट्टक, त्रोटक) प्रकार असल्याचे मानतो.

वरीलपैकी भोज,हेमचंद्रसूरी आणि सोमेश्वर हे १२ किंवा १३ ही संख्या का असावी याची योग्य कारणमीमांसा करताना दिसत नाहीत. रूपकांच्या बाबतीत नाट्यदर्पणाचा दृष्टीकोन भिन्न आहे.

नाट्यशास्त्रातील उच्चतम आणि आधिकारिक व्यक्ती भरतमुनी यांनी नाटिका हा जरी वेगळा रूपक प्रकार मानून तो परिभाषित केलेला आहे, तरीही रूपक प्रकार मात्र १० असल्याचेच ते सांगतात. दशरूपककार धनंजय आपली चर्चा १० रूपकांपर्यंतच मर्यादित ठेवतात.

धनंजयाने १० मुख्य रूपक + १(नाटिका) = ११ रूपकांचे वर्णन केले आहे. यामागील कारणे अगदी सोपी आहेत.

• नाट्यशास्त्राच्या १८ व्या अध्यायात भरतमुनिंनी नाटिकेसहित ११ रूपकांचे वर्णन केले आहे. या उपारांत त्यांनी १८ व्या अध्यायाचे नामकरण 'दशरूपकनिरूपणाध्याय' असे केले आहे. धनंजयाने सुद्धा त्यांचे अनुकरण करून आपल्या ग्रंथाला 'दशरूपक' असे नाव दिले.

• आचार्य भरत हे विष्णुभक्त होते. विष्णूचे दशावतार जगविख्यात आहेत. असे दिसून येते की, भगवान विष्णूप्रति आपले समर्पण दाखवण्यासाठी भरताने रुपेकांच्या प्रकारांचे स्पष्टीकरण करण्यासाठी दहाची संख्या ठेवली. भरताच्या पदचिह्नांवर चालताना धनंजय सुद्धा हे अशाच प्रकारे समजावून सांगतो आणि १० हा आकडा सुनिश्चित करतो. (-दशरूपक १.२) *दशरूपानुकारेण यस्य माद्यन्ति भावकाः / नमः सर्वविदे तस्मै विष्णवे भरताय च //*) शिवाय त्याच्या वडिलांचे नावही विष्णु होते. हे देखील १० या आकड्यामागील कारण असू शकते.

जरीही रामचंद्र आणि गुणचंद्र यांनी आचार्य भरताच्या नाट्यशास्त्राचा आधार घेऊन नाट्यदर्पण या ग्रंथाची रचना केली, तरीही त्यांनी त्यात नाट्यशास्त्राच्या फक्त १८ व्या अध्यायाचीच चर्चा केली आहे. याच १८ व्या अध्यायावर धनंजयाने दशरूपकाची रचना केली. जरीही नाट्यशास्त्राच्या १८ व्या अध्यायाचे नाव 'दशरूपकनिरूपणाध्याय' असे असले, तरीही त्या अध्यायात १२ रूपकांविषयी काही संकेत आपणास मिळतात. पुढील कारिकेच्या आधारे: *अनयोश्च बन्धयोगादेको भेदः प्रयोक्तृभिर्ज्ञेयः / प्रख्यातस्त्वितरो वा नाटीसंज्ञाश्रिते काव्ये* //(नाट्यशास्त्र१८ - ५७) काही विद्वान मानतात की, नाटिका आणि प्रकरणी असे दोन प्रकार आहेत. काहींचे मत असे आहे की, नाटी किंवा नाटिका असा फक्त एकच प्रकार आहे. धनंजय नाटिका हा फक्त एकच प्रकार मानतो. तर

दुसरीकडे नाट्यदर्पणकार नाटिका आणि प्रकरणी या दोन प्रकारांची चर्चा करतात. दशरूपकाचा टीकाकार धनिक या दोन प्रकारांचे खंडन करतो. (दशरूपक३.४३ वीटीका)

अशाप्रकारे, त्याच्या भाषणातून अनुमान निघते की -

- भरत नाटिका आणि प्रकरणी यांचा उल्लेखही करत नाही आणि त्यांची वैशिष्ट्ये आणि गुणधर्म सुद्धा सांगत नाही.
- जर आपण असा विचार केला की नाटिका आणि प्रकरणी यांचे गुणधर्म सारखेच आहेत, तर त्यांमध्ये फरक शोधणे कठीण आहे.
- जे लोक प्रकरणी हा वेगळा प्रकार असल्याचे म्हणतात, ते त्याचे गुणधर्म पुढीलप्रमाणे सांगतात – प्रकरणीचे नायक, रस आणि वस्तु प्रकरणासारखेच असतात. अशाप्रकारे, प्रकरणी हा वेगळा प्रकार विचारात घेणे अयोग्य आहे.

अशाप्रकारे, रूपाकांच्या गुणधर्मांच्या मिश्रणाने निर्माण होणारा एक प्रकार स्वीकारणे शक्य आहे, तो म्हणजे नाटिका. धनिकाचा निषेध असूनही, नाट्यदर्पणकार नाटिका आणि प्रकरणी यांना दोन भिन्न रूपक मानतात. ते म्हणतात –नाट्यदर्पण – १२४ (२.८) (*एवं प्रकरणी किन्तु नेता प्रकरणोदितः।*) याचा अर्थ प्रकरणीमध्ये चतुरंकत्व इत्यादी नाटिकेप्रमाणेच वैशिष्ट्ये आहेत. परंतु या दोघांमधील एक लहान फरक असा आहे की, नाटिकेत नायक एक राजा असतो आणि प्रकरणीमध्ये व्यापारी हा नायक बनतो. नायकांचे हे तपशील अनुक्रमे नाटक आणि प्रकरण यांमधून घेतले आहे. अशाप्रकारे, नाट्यदर्पणाने 12 रूपकांचा उल्लेख केला आहे, ज्यात दोन प्रकार नाटिका आणि प्रकरणी आहेत.

बारा रूपकांची कल्पना आचार्य हेमचंद्रसूरी यांनी रामचंद्र आणि गुणचंद्र यांना सुचवलेली दिसते. हेमचंद्रसूरी हे त्यांचे गुरू होते, म्हणून असे दिसते की, त्यांनी नाट्यदर्पण नावाच्या आपल्या ग्रंथात दोन अधिक प्रकार जोडण्यास सांगितले असावे. म्हणूनच नाट्यदर्पणामध्ये आपणास १० प्रकारांव्यतिरिक्त नाटिका आणि प्रकरणी हे दोन प्रकार अधिक दिसतात. नाट्यदर्पण सट्टक या रूपकाच्या जागी प्रकरणीचा समावेश करते. तसेच नाट्यदर्पणकार १२ रूपकांचा संबंध धर्माच्या १२ अंगांशी जोडताना दिसतात. (१.आचारांग, २.सूत्रकृतांग, ३.स्थानांग, ४.समयांग, ५.भगवती व्याख्या प्रज्ञप्ति, ६.न्यायधर्म कथा (णायाधम्महाओ),७.उपासकादशा, ८.अंतकृदशा, ९.अनुत्तेरोपपातिक, १०.प्रश्न व्याकरण, ११.विपाक सूत्र,१२.दृष्टिवाद) रूपकांची संख्या जैन धर्माच्या १२ अंगांसह संबद्ध करण्याचा विचार नाट्यदर्पणकारांचा आहे. (नाट्यदर्पण -१.१ *चतुर्वर्गफलां नित्यं जैनीं वाचमुपास्महे ।रूपैर्द्वादशभिर्विश्वं यया न्याय्ये धृतं पथि ।।*)

तरीही आपण सांगू शकतो की, जैनांनी सर्वप्रथम रूपकांची संख्या १२ असल्याचे दर्शविले. भरताने हे सुचविले की,*नाटिसंज्ञाश्रिते काव्ये* (- नाट्यशास्त्र १८.५७) धनिकानेसुद्धा आवलोक टीकेमध्ये नाटिका आणि प्रकरणी यांचा संदर्भ दिला आहे. शृङ्गारप्रकाश या आपल्या ग्रन्थात भोज स्पष्टपणे दशरूपाकाच्या यादीत नाटिका आणि सट्टक या दोन रूपकांचा समावेश करत एकूण १२ प्रकार मानतो. हेमचंद्राचार्यांचे काव्यानुशासन हे शृङ्गारप्रकाशचेच अनुकरण करते. नाट्यदर्पणकारांनी त्यांच्या गुरूंना किंवा भोजाला अंशतः अनुसरले आहे, कारण त्यांनीसुद्धा रूपकांचे एकूण १२ प्रकार मानले आहेत. परंतु त्यांनी सट्टक ऐवजी प्रकरणी हे १२ वे रूपक मानले. सोमेश्वर तर एकूण १३ प्रकारचे रूपक असल्याचे म्हणतो.(११ भारताचे (१०+नाटिका) + कोहलाचे २ - त्रोटक आणि सट्टक)

नाट्यदर्पणकारांनी १२ रूपाकांमध्ये सट्टक ला स्थान दिले नाही याची कारणे पुढीलप्रमाणे :-

- सट्टक हे संपूर्णतया प्राकृतात रचलेले असते आणि म्हणूनच ते इतर नाट्यरूपकांप्रमाणे मानता येणे शक्य नाही, कारण मुख्य रूपक प्रकार हे संस्कृतात आहेत.
- क्वचित फरक वगळता स्वरूप आणि विषय यांमध्ये सट्टक जवळ-जवळ नाटिकेसारखेच असते. तसेच त्याची स्वतःची विशेष अशी काही लक्षवेधी लक्षणे नाहीत.
- भरतासारख्या सर्वात जुन्या आणि श्रेष्ठ आचार्यांनी सुद्धा ते मान्य केलेले नाही.

अशाप्रकारे रामचंद्र-गुणचंद्र यांच्यामते सट्टक हे प्रमुख १२ रूपाकांमध्ये समाविष्ट करणे अशक्य आहे. ते आपल्या गुरूच्या कृपेने त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी इतर रूपाकांच्या यादीत प्रथम या १२ रूपकांचा उल्लेख करतात.

शेवटी असा निष्कर्ष निघतो की संपूर्ण नाट्यशास्त्रीय परंपरेचा अभ्यास केला तर नाट्यदर्पणकारांनी मानलेले रूपकांचे १२ प्रकार हेच योग्य आहेत. नाट्यदर्पणाच्या रचनेचा उद्देश म्हणजे रूपक या विषयातील मागील सर्व कामांचा योग्य आढावा घेऊन परीक्षण करणे आणि आवश्यकतेनुसार काही बिंदुंसह सुस्पष्ट अभ्यास सादर करणे हा होय. म्हणूनच संस्कृत नाट्यशास्त्राने सुद्धा याच १२ रूपक संख्येला मान्यता द्यावी.

**संदर्भग्रंथ सूची**


- Dhananjaya, Pansikar V.L.(Ed.). 1917. ***Dasarupa with comm. of Avaloka of Dhanika***. Bombay: NirnaySagar Press.
- Dr. Nandi, T.S. 2000. ***Kāvyānuśāsana***. Ahmedabad: Navabharat printing press.
- Dr. Unni, N.P. 1998. ***Nāṭyaśāstra (Vol-2)***. Ernakulam: Nag Publishars.
- Ghosh, Manmohan (Ed.). 1951.***The Nāṭyaśāstra***. Calcutta: The Royal Asiatic Society of Bengal.
- T. Venkatacharya. 1979. ***The Rasārṇavasudhākara of Simhabhūpāla***. Madras: The Adyar Library and Research Center.
- Yadugiri, YatirajSwami(ED.); RamaswamiShastri, K.S.(Ed.). 1968. ***Bhāvaprakāśana of Śāradātanaya***. Baroda: Oriental Institute.
- आचार्य विश्वेश्वर. १९६१. ***हिंदी नाट्यदर्पण.*** दिल्ली: हिंदी विभाग, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली-६.
- डॉ.व्यास, भोलाशंकर. १९९५. ***दशरूपकम्.*** बनारस: चौखम्बा विश्वभवन.
- त्रिपाठी, राधावल्लभ. १९९९. ***नाट्यशास्त्रविश्वकोश (खंड- ४).*** दिल्ली: प्रतिभा प्रकाशन.
- द्विवेदी, दुर्गाप्रसाद. १९२२. ***साहित्य दर्पण.*** बॉम्बे: निर्णय सागर प्रेस.
- द्विवेदी, हजारीप्रसाद, द्विवेदी पृथ्वीनाथ. १९६३. ***नाट्यशास्त्र की भारतीय परंपरा और दशरूपक.*** दिल्ली: राजकमल प्रकाशन प्रायवेट लिमिटेड.
- शुक्ल, बाबुलाल शास्त्री.१९७२. ***नाटकलक्षणरत्नकोश.*** वाराणसी: चौखम्बा संस्कृत सिरीज ऑफिस.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# स्वतंत्र भारतातील तरुणांवर जातीव्यवस्थेचा झालेला परिणाम

**प्रा. रिता पी. खोब्रागडे**
कार्यकारी प्राचार्य ,गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख
एस चंद्रा महिला महाविद्यालय सडक अर्जुनी जि. गोंदिया

**प्रस्तावना**

भारत माझा देश आहे सारे भारतीय माझे बांधव आहेत भारतात राहणारे प्रत्येक व्यक्ती या प्रार्थनेला नतमस्तक असतात. आपल्या भारतामध्ये विविधतेने नटलेल्या म्हणजे विविध धर्माचे, पंथाचे लोक एकत्र राहतात भारत देश स्वतंत्र होण्यापूवी ब्रिटिशांच्या तावडीत होता आणण स्वातंत्र्यानंतर भारत देश जातीच्या बंधनात अडकल्याचे टदसून येते माणूस जन्मताच त्याला जात—पात नसते मग ही जात आली तरी कुठून? हे प्रश्नचिन्ह आहे. प्राचीन काळात वर्ण व्यवस्थेवरून जातीव्यवस्था निर्माण झाली. या चातुरवर्ण व्यवस्थेवरूनच जातीचा उल्लेख केला जाऊ लागला.भारतीय समाजामध्ये म्हणजेच इ. स.पूर्व १४०० ते ५०० दरम्यान वर्णव्यवस्था अस्तित्वात असल्याचे मानले जाते. वर्ण व्यवस्थेत पहिले तीन गट म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य त्यानंतर शुद्र हा चौथा गट निर्माण करण्यात आला. सुरवातीचा काळ ३२० ते ६५० या काळात महाभारत काव्य निर्मितीचा टप्पा चौथ्या शतकाच्या शेवटी पूर्ण झाला असे मानले जाते. त्या महाकाव्यांमध्ये वर्णव्यवस्थेचा उल्लेख १२, १८१ या श्लोकांमध्ये येतो. आणि त्यात दोन रूपे दाखवली आहेत त्यातील पहील्या प्रारूपामध्ये वर्णहीन रंगावर आधारित व्यवस्था आहे. भृगु नावाच्या व्यक्तीरेखेच्या माध्यमातून ब्राम्हण वर्णाचे लोक गोरे, क्षत्रिय वर्णाचे लाल, आणि वैश्य वर्णाचे लोक पिवळे आणि शूद्र हे काळे होते असे वर्णन आले आहे, या वर्णनाला भारद्वाज मुनींनी प्रश्न विचारला आणि म्हणाले सर्व रंग सर्व वर्णाच्या लोकांमध्ये दिसतात. इच्छा, भीती, मोह, मत्सर, भूक इत्यादी सर्वच बाबी मानवामध्ये असतात. सर्व मानवांमध्ये वाहणारे रक्त एकच असते असे असताना आपण मानवांना एकमेकांपासून वेगळे कसे करू शकतो त्यावर महाभारतामध्ये अशी घोषणा आहे की या विश्वामध्ये असले काहीही वर्ण नाहीत. हे ब्राम्हणाने रचलेले असून सर्व विश्व ब्राम्हण आहे . आणि आता त्यांच्या कर्मानुसार त्यांचे वर्गीकरण केले जात आहे. त्यानंतर महाभारतामध्ये प्रत्येक वर्णाच्या वर्तनाची प्रारूपे वर्नीनेली आहे. क्षत्रिय हे रागीट सखोल आणि उघडपणे विचार मांडणारे असतात. जनावरे पाळून आणि शेतीला ग्रुप ओटी भरण्याची वृत्ती वैशांमध्ये असते. शूद्रांना हिंसा गुप्त कारखाने आणि अशुद्धता याची ओढ असते. सत्य निरोग आणि शुद्ध चारित्र्याने सवोत्तम उदाहरण म्हणजे ब्राम्हण वर्ण होत. येतील यांच्यामते महाभारत आणि त्यासारख्या पूर्व मध्ययुगीन काळातील हिंदू ग्रंथांमध्ये वर्ण हे वंशपरंपरेने पाळली जाणारी बाब नसून ते सामाजिक वर्गीकरणाचा भाग होतो. असे असताना देखील आपल्या भारत देशामध्ये जातीयतेला फार महत्त्व देऊन पुढे नेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. आणि याचाच परीणाम आजच्या भारतीय तरुणांवर फार मोठ्या प्रमाणात आपल्याला पहावयास मिळत आहे. जाती व्यवस्था ही समाजाला लागलेली फार मोठी किड आहे असे बाबासाहेबांचे म्हणणे होते. जाती व्यवस्थेच्या स्वरूपाविषयी मत व्यक्त करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, श्रेष्ठ कनिष्ठतेवर आधारित जातींची रचना कशी अस्तित्वात आली ते स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. म्हणून या संदर्भात त्यांनी मांडलेल्या विचारांना जातीच्या रचनेसंबंधीचा सिद्धांत (Theory Structure of Cast) असे म्हटले आहे. या जातीव्यवस्थेच्या स्वरूपाविषयी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

चातुरवर्ण व्यवस्थेचे समीक्षण व जातीव्यवस्थेच्या रचनेविषयी विचार मांडताना ते सर्वप्रथम चातुरवर्ण व्यवस्थेचे समीक्षण करतात त्यांच्या मते चातुरवर्ण व्यवस्थेचा सिद्धांत हा असामान्य सिद्धांत आहे. यातील चार वर्ण हे केवळ भिन्न आहे नाहीत. तर त्यांचा दर्जा सुद्धा असमान आहे. एक वर्ग दुसऱ्यावर उभा आहे. म्हणूनच या योजनेत सर्वात उच्चस्थानी ब्राम्हण हा वर्ग असून त्यानंतर क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे वर्ण आहेत. शूद्रांच्या खालच्या स्थानी अस्पृश्य

ISSN : 2278-9308
July 2021

आहेत. चातुर वर्ण सिद्धांत मानवी जीवनाच्या विविध अंगांना प्रभावित करतो चातुर वर्ण पद्धतीवर आधारित असलेली हिंदू समाजव्यवस्था, समान आवश्यकता, समान कार्य आणि समान क्षमतेचे श्रमिक यांना आधार मानीत नाही.

प्रथम वर्णातील लोकांच्या जीवनात चांगली वस्तुस्थाने मान सन्मानाची पदे देण्याच्या बाजूने आहे, दुसरे म्हणजे हा सिद्धांत प्रत्येक वर्णासाठी वंशपरंपरागत निर्धारित व्यवसायाचा पुरस्कार करतो, तिसरी म्हणजे या सिद्धांताने विभिन्न आवरणातील लोकांच्या परस्परक्रिया त्याचा वर्ण गटा पुरता मर्यादित केला आहे. हिंदू समाज व्यवस्थेत सर्व वर्ण गटातील लोकांचे एकत्रित असेच सहभोजन आणि विवाह यावर प्रतिबंध करण्यात आले होते. व्यक्तीवर आधारीत अशी हिंदू समाजव्यवस्था नाही. त्यामध्ये व्यक्तीला संधी आणि व्यक्तिगत न्याय या दोघांनाही स्थान नाही. डॉ. आंबेडकर यांच्या मते भारतीय समाजातील वर्ण व्यवस्था जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता अशा तिन्ही प्रकारच्या सामाजिक भेदांचे मूळ हिंदू धर्मग्रंथ हेच आहे. भारतीय समाजव्यवस्था ही पूर्णत: आचरण आणि समज जातिव्यवस्थेवर आधारलेली आहे. हिंदू समाजातील एका जातीने दुसऱ्या जातीशी कसे वागावे याची नियमावली कायद्याच्या स्वरूपात धर्मग्रंथामध्ये केली आहे. याच आधारावर डॉ. आंबेडकर असे म्हणतात की, हिंदू सामाजिक संघटनेचे तत्त्व म्हणजे हिंदूची चातुरवर्ण व्यवस्था होय. समाजात लागलेल्या या कीडीला काढून टाकण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अहोरात्र प्रयत्न करून भारताला एक सुंदर संविधान बहाल केलेला आहे. आणि त्या मध्ये सर्व जाती—धर्माला एकत्र जोडण्याचा एक स्वरूप त्यांनी निर्माण करून दिलेले आहे. आणि त्यातच आजच्या तरुणांसाठी जीवन जगण्याची एक व्यवस्था त्या ठीकाणी तयार करून देण्यात आलेली आहे . तरीही आपल्या भारत देशामध्ये आज जाती व्यवस्थेच्या नावाखाली तरुणांवर खूप मोठ्य प्रमाणात अन्याय अत्याचार होताना आपल्याला पाहावयास मिळते. भारत देश कितीही पुढारलेला असला तरीही आजही आपल्या भारतामधील तरूणांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढा देण्याची ताकद आपल्याला पाहीजे त्या प्रमाणात कोणाहीमध्ये ही दिसून येत नाही जाती व्यवस्थेचा एवढा मोठा बाहू या ठीकाणी पहावयास मिळतो.

जाती व्यवस्थेवर आधारित जातीवर राजकारण सुद्धा केले जाते. आज नोकऱ्यांच्या बाबतीत जर बघीतला तर आज विद्यार्थ्यांना असो किंवा मग येणारी ही तरुण पीढी असो जाती व्यवस्थेवर नोकर्‍या आरक्षण या ठीकाणी आपल्याला पाहावयास मिळते. मुळत: जन्मापासून जात मिळालेली नाहीतर जन्मानंतर आपल्या आई—वडलांपासून आपल्या समाजापासून आपल्याला जात मिळालेली आहे. याचा फार मोठा परीणाम हा आजच्या तरुण पिढीवर होताना आपल्याला दिसून येतो.

**१)आजचा तरुण :—**

आजचा तरुण धाडसी व पराक्रमी आहे आजच्या तरुणांमध्ये हनुमानाइतकी ताकत आहे. आपल्या चातुर्याने तो संपूर्ण जगाला जिंकू शकते फक्त त्याला जाणीव करून देण्याची गरज आहे. विज्ञान आणि अध्यात्माक हि जीवनाची दोन नाणे नसुन. एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. याशिवाय जीवनाला अर्थ नाही हे समजून घेणे तितकेच गरजेचे आहे. प्रत्येक तरुण जातीजातीमध्ये विभागला गेला आहे. "मृग जळाचे पाणी पिऊन तहान भागत नाही हे पूर्णपणे माहीत असूनही त्यात मृग जळाच्या मागे लागून स्वत:चे जीवन अधिकाधिक फुकट करण्याच्या मागे लागलेला आहे". तरुणाईला आपल्या जातीविषयी धर्माविषयी प्रचंड अभिमान आहे. परंतु धर्म म्हणजे काय हे माहीत नाही. आणि कधी ते जाणून घेण्याचा प्रयत्न करत नाही. "धर्मो तेन्हा तो हान्ति धर्मो रक्षति रक्षित: तस्मा धर्म न हन्तोव्योमा न धर्म न हतोड वंधित:" याची जाणीव नसेल तर धर्माचा स्वाभिमान बाळगण्यात काहीच अर्थ नाही.

**२)जाती व्यवस्थेचा तरुणावर झालेला परिणाम :—**

आजची तरुणाई भौतिकवादी आहे आणि वयावरच तरुणीची ओळख आहे असे वाटते. पण वास्तविक पाहता तारुण्याचा वयाच्या परिस्थितीशी संबंध नसून मनस्थीतिसी संबंध असतो. स्वामीजींच्या मते आदर्श व्यक्ती कोण? तर त्याच्या चेहऱ्यावर तेज देहामध्ये शक्ती, मनामध्ये उत्साह,बुद्धीमध्ये विवेक हृदयामध्ये करूणा, मातृभूमीवर प्रेम, इंद्रियावर संयम, प्रबळ इच्छाशक्ती , धाडसाचे बड, सिहासारखी निर्भयता सेवेसाठी तत्पर आहे तोच आदर्श युवक आहे .

एवढे सगळे तरुणाचे व्यक्ती खंबीर असूनही आपले आई वडील व समाजाकडून वारसा पद्धतीने आलेल्या जाती व्यवस्थेचा तरुणाने स्वीकार केलेला दिसतो विज्ञानाच्या जगात आजही तरुण जातीव्यवस्थेला चिकटलेला आहे. एवढे ज्ञान संपादन करून तारुण्यात विवाहाच्या वेळी तो जाती बंधनाला सांभाळतो जातीमधीलच मुलींना प्राधान्य देण्याची प्रथा आजही समाजातील तरूणामध्ये काही प्रमाणात दिसून येते. अल्प अश्या प्रमाणात तरुण जातीच्या बाहेर काम करतांना दिसतात म्हणून आजच्या पिढीला केवळ पुस्तकी ज्ञानापेक्षा गुणवत्ता पूर्ण शिक्षण देणे गरजेचे आहे. बऱ्याच प्रमाणात तरुण जातीमध्ये विभागलेले आहेत. प्रत्येकाला आपल्या जातीचा अभिमान आहे त्यांच्या मनावर जाती परंपरेचा श्रेष्ठ कानिष्ठत्वाच ठसा आजही कायम आहे.

**३)आधुनिक भारतीय विचारसरणी आणि तरुण :—**

आज आपण तरुणाकडून भारतीय विकासाची अपेक्षा करतो आहे . कारण भारत हा जगामध्ये युवकांचा देश म्हणून ओळखल्या जातो. म्हणूनच भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांनी सांगितल्याप्रमाणे इंडिया २०२० चे स्वप्न पूर्ण करण्यासाठी युवकांच्या मदतीची आवश्यकता आहे कारण भारतामध्ये विकासाच्या आड येणाऱ्या अनेक समस्या आहेत. त्यापैकी जातीपातीची व्यवस्था हि समस्या गेल्या हजारो वर्षापासून भारतीयांना भेडसावत आहे. मनुष्य म्हणून जीवन जगण्यासाठी जात पात नष्ठ झाली पाहिजे. जातीने समाजामध्ये विषमता निर्माण होते. हि विषमता थांबवायची असेल तर तरुणनानी आपली जात जगाच्या नकाशावरून काढून टाकली पाहिजे व आपली ओळख देशाच्या नावाने केली पाहिजे तेव्हाच भारत देश जगात महासत्ता होईल हे लक्षात घेतले पाहिजे. समाजामध्ये माणसाला माणसासारखे वागवणे हा खरा धर्म तरुणांनी निर्माण केला पहिजे. आधुनिक काळामध्ये पैशाला महत्व आले आहे . सध्या देशात ज्या घटना घडतात त्यातून एक प्रकारची विकृती व टोकाची मानसिकता निर्माण होतांना दिसते. ती बदलविणे आवश्यक आहे.

**४)तरुणांचे शिक्षण आणि जात :—**

शिक्षणामुळे माणूस घडतो त्यामुळे शिक्षण पद्धती उत्तम असायला हवी. जातीचे लेबल हे कुचकामी आहे जात वैगरे अस काही नसत हे प्रत्येकाला मन आहे, बुद्धी आहे. प्रत्येक माणूस समानच आहे. या सगळ्याची जाणीव शिशक्षणामुळे आपल्याला होऊ शकते. आजच्या जगात जातीपाती नष्ट केल्या पाहिजे भारताच्या संविधांनाचे पालन हे सर्व भारतीयांचे आद्य कर्तव्य असले पाहिजे. देशात रहाताना भारतीय एवढीच ओळख करून देणे अनिवार्य आहे जेणेकरून एक निरपेक्ष व निखळ वातावरण तयार होईल आणि या जातीपातीच्या राजकारनाला आळा बसेल आणि भारतीय, माझा भारत देश एकतेची ताकद भारतिय संविधानातून निर्माण होते. असे खास कार्यक्रम बालवाडीपासून राबविले पाहिजे यामध्ये विद्यार्थ्यांचा मोठ्य प्रमाणावर सहभाग घेतला पाहिजे जेणेकरून आपली जात म्हणजे माणुसकी हा विचार त्यांच्या मनात या शिक्षनामधून रुजविल्या जाऊ शकते. आणि तेव्हाच Make in India, Startup India, Digital India यासारख्या उपक्रमांनी भारताची नक्कीच प्रगती होईल. शहरातील जि तरुण पिढी जात पात फारशी मनात नाही पण ग्रामीण भागात अजूनही तरुण तरुणीच्या मनात जाती बद्दल गैरसमजुती आहे. हा विरोधाभास कमी करण्यासाठी तरुणांनी एकत्र येऊन चळवळ उभी केली पाहिजे. मागासवर्गीय अनुसूचित जाती जमाती या वर्गाकडे जाऊन त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आनता येईल असे शिक्षण देऊन त्यांच्यामधील जातीभेत नष्ट करण्याचा प्रयत्न केला बदल तर घडू शकतो आज जातीच्या नावाखाली विघातक गोष्टी घडतांना दिसून येत आहेत.

**५)जातीयतेसाठी तंत्रज्ञानाचा उपयोग :—**

आज आधुनिक युगात जगाची तंत्रज्ञानाने नेत्रदीपक प्रगती झालेली आहे. अनेक कठीण कामे तंत्रज्ञानाने सहज आणि सुलभ झालेली आहे. पण आम्ही भारतीयांनी या तंत्रणाचा उपयोग आमची जाती प्रथा घट्ट करण्यासाठी केलेला आहे. प्रत्येक ठिकाणी जातीयतेच्या नावाचे वेगवेगळे Whatsapp ग्रुप सुरु केलेले आहे आणि म्हणून हि जातीयता तोडायची असेल तर तरुणांनी या ग्रुप मध्ये सामील न होता माणुसकी निर्माण करणारे ग्रुप मध्ये सामील व्हावे. तेव्हाच तरुण स्वताला जातीपातीच्या दंगलीतून मुक्त करू शकेल. जातीच्या किडीमुळे आज प्रत्येक तरुण हा व्यवसायात किवा शासकीय कार्यालयात काम करणारा असो किंवा नोकरीच्या संदर्भात वणवण फिरणारा तरुण

असो त्याला जातीयतेचे लेबल त्याच्या आयुष्याला मोठ्या प्रमाणात धोकादायक आहे. रोहित वेमुला ने केकेल्या आत्म्हत्येमुळे देशभरात वातावरण संकटमय झालेले आपल्याला पाहायला मिळत आहे. रोहित वेमुला सारखे असे कित्येक तरुण आहेत की ज्यांनी आत्महत्या केलेली आहे. म्हणजेच समाजात जाती पातीची भीती भक्कम असल्याचे दिसून येते. आणि अशा परिणामामुळे आजच्या तरुणपिढीला स्वत: तील गुणवत्ता असूनसुद्धा मनासारखे काम मिळत नाही. कित्येक दिवस स्पर्धा परीक्षा पास होऊनही नोकर भरतीकरिता वाट पहाव लागते आणि त्यामुळे अधिक गरिबी, वयोमर्यादा वाढत चाललेली आणि त्यात जाती, आरक्षणाचे बंधन या सर्वांना आजची तरुणपिढी आत्महत्तेच्या मागे लागलेली आहे. तसेच मानसिक विकृतीच्या अवस्थेत दिसून येत आहे. आजच्या वर्तमानातील असे बरेच उदा. आपल्याला पहावयास मिळत आहेत. याचच एक ताज उदा. गेल्या आठ दिवसापूर्वीच म्हणजे ०५ जुलै २०२१ मध्ये स्वप्नील लोणकर सारख्या कर्तबगार,हुशार मुलालाही आपले प्राण गमवावे लागले. याला जबाबदार कोण? हा एक मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झालेला आहे.

**निष्कर्ष :—**

१)जाती व्यवस्था हि मानसिकता आहे ती मानवनिर्मित आहे. हि नष्ट करता येते. असे तरुणावर बिंबवले पाहिजे.

२)सर्व तरुणांना उचित शिक्षण देण्याची सोय करून जातीयतेची मानसिकता विकासाला घातक आहे असे शिक्षण तरुणाला दिले पाहिजे.

३)सर्व तरुणांना शिक्षण पद्धतीत सर्व स्तरावर संविधांनाचे शिक्षण दिले पाहिजे.

४)जातीयतेच्या विषमतेएवजी समानतेची शिकवण तरुणांना दिली पाहिजे.

५)आंतरजातीय विवाहाला शासकीय स्तरावर अधिक महत्व देवून आंतरजातीय विवाह करणाऱ्या तरुण तरुणींना भरघोस पुरस्कार देऊन उचित मानसन्मान केला पाहिजे.

**संदर्भ :—**

१)Mr.m.wikipedia.org

२)लोटे रा. ज. भारतातील समाज शास्त्रीय परंपरा, पिंपळापुरे अंड कंपनी पब्लिकेशन नागपूर. २०१७

३)Mr-quora-com

४)Tarunbhart-net 2020

5)Maharashtra Times 30/01/2016

**B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal**
**Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)**
**ISSN : 2278-9308**
**July 2021**

# 'डॉ. आंबेडकर आणि शेडयुल्ड कास्ट फेडरेशन'

प्रा.डॉ. रमेश के. शेंडे
मातोश्री अंजनाबाई मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय, नरखेड, जि, नागपूर,
मो.नं. ९४२३६०४७२३,ईमेल–rkshende70@gmail.com

**प्रस्तावना**

भारतीय जनतेने १९४२ मध्ये ''चले जाव'' हा नारा देत ब्रिटिश सत्तेच्या विरोधात स्वातंत्र्याची मागणी केली. भारतीय राजकीय पेचप्रसंगावर तोडगा काढण्यासाठी व भारताची राज्य घटना कशी असावीयाचा मसुदा ब्रिटिश मंत्रिमंडळाने बनवला व हा मसुदासर स्टॅफर्ड क्रिप्स यांच्या नेतृत्वाखालील कमिशनलासोपवून भारतीय नेत्यांशी चर्चा करण्यासाठी १९ मार्च १९४२ मध्ये भारतात पाठविले. क्रिप्स योजनेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विरोध केला. कारण यायोजनेत भारताची भावी राज्यघटना भारतीयांनीच तयारकरावी, पण ही घटना समिती भारतीय राष्ट्रीय जीवनातीलप्रमुख जाती–जमातींच्या घटकांच्या सहविचाराने झालीपाहिजे, असे या योजनेत असले तरी अस्पृश्यांना आपलेस्वतंत्रपणे प्रतिनिधी पाठविण्याची व्यवस्था नसल्याने घटना समितीत अस्पृश्यांचे प्रतिनिधी निवडून जाण्याची शक्यतानव्हती. क्रिप्स योजनेला विरोध करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घणाघाती हल्ला केला होता. त्यात ते म्हणतात, 'क्रिप्स योजना' म्हणजे अल्पसंख्याकांच्याहक्कांवर हल्ला असून बहुसंख्याकांची मर्जी संपादनकरण्यासाठी ही एक शरणागतीच आहे. क्रिप्स कमिशनभारतीय राजकीय पेचप्रसंगावर तोडगा काढण्यासाठी वनवीन भारताची राज्यघटना कशी असावी या महत्त्वाच्याविषयावर भारतीय नेत्यांसोबतचर्चा करण्यासाठी भारतात आलेअसले तरी त्यांनी केवळ काँग्रेस, मुस्लिम लिग, हिंदू महासभा,शीख आणि संस्थानिकांच्याप्रतिनिधींसोबत चर्चा केली, पणकरोडो अस्पृश्यांच्या प्रतिनिधींना आमंत्रित करण्याचे सौजन्य दाखवले नाही. क्रिप्स यांच्याया कृतीला विरोध करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीस्वतंत्र मजूर पक्षाच्या वतीने ३० मार्च १९४२ रोजी क्रिप्स कमिशनला भेटून अस्पृश्यांची कैफियत मांडली. क्रिप्सयोजना अस्पृश्यांच्या विरोधात कशी आहे ते सविस्तर मांडल्यानंतर क्रिप्स कमिशन यांनी सर्व ऐकून घेतल्यानंतर तुम्ही अस्पृश्यांचे नेते आहात का कामगारांचे? असाप्रश्न उपस्थित करण्यांत आला. अस्पृश्यांच्या संघटनेच्यावतीने तुम्ही तुमची बाजू मांडा, असे क्रिप्स कमिशनने सांगितल्याने करोडो अस्पृश्यांच्या राजकीय हक्क वसंरक्षणासाठी डॉ. आंबेडकर यांनी स्वतंत्रमजूर पक्ष बाजूला ठेवून अखिल भारतीय पातळीवरअस्पृश्यांचा राजकीय पक्ष बनविण्याचा संकल्प केला. क्रिप्स योजनेवर विचारविनिमय करण्यासाठीआणि अस्पृश्यांची अखिल भारतीय पातळीवरस्थापना करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरयांनी ३० व ३१ मार्च १९४२ रोजी दिल्ली येथेप्रमुख अनुयायांची बैठक बोलावली. त्या बैठकीला संपूर्ण देशातील प्रमुख अस्पृश्य नेते उपस्थित होते. अस्पृश्यांसाठी अखिल भारतीय पातळीवर संघटनाअसावी, अशी सर्व प्रमुख नेत्यांनी मागणी करूनअस्पृश्यांचा राजकीय पक्ष स्थापन करण्यासाठीनागपूरमध्ये बैठक घेण्याचे जाहीर केले.

अस्पृश्यांचा देशव्यापी राजकीय पक्ष स्थापन करण्यासाठी १७ ते २० जुलै १९४२ मध्ये नागपूरमध्ये कार्यकर्त्यांचे अधिवेशन घेण्यात आले होते. संपूर्णभारतातून एक लाख प्रतिनिधी आले होते. अधिवेशनाचेअध्यक्ष रावबहादूर एन. शिवराज होते. या अधिवेशनातडॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ऐतिहासिक भाषण झालेहोते. त्यात ते म्हणाले होते, ''माझा तुम्हाला शेवटचा एकउपदेश आहे की तुम्ही शिक्षणघ्या, चळवळ करा, संघटनाकरा, स्वत:वर विश्वास ठेवा, न्याय आपल्या बाजूने असल्यामुळे आम्ही लढाईत हरु असे मला वाटत नाही. अस्पृश्यांनी सर्वांगिण उन्नती केली पाहिजे. राजकिय ज्ञान प्राप्त करुन घेण्यात त्यांनी चांगली प्रगती केलेली आहे. आपण जी काही प्रगती करु शकतो ती आपण केलेल्या स्वत:च्या कर्तुत्वावर आणि संघटनेवर करु शकतो. आपणाजवळ आर्थिक बळ नाही व सामाजिक सामर्थ्य नाही. याकरिता आपल्याला राजकिय सत्ता पाहिजे. ही राजकीय सत्ताआपण आपल्या संघटनेच्या बळावर हस्तगत केली तरच आपण आपली प्रगती करू शकू.

हा आपल्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. त्यावर आपण सारे लक्षकेंद्रित केले पाहिजे. यासाठी आपल्याला अखिल भारतीय स्वरूपाची संघटना आवश्यक आहे. आपण सर्वांनी संघटितरीत्या जर कार्य केले तर जय आपलाचआहे. कारण आपण न्यायासाठी झगडत आहोत'', असेसांगून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेडयुल्ड कास्टफेडरेशन या पक्षाची स्थापना केली व पक्षाचे अध्यक्ष म्हणून एन. शिवराज यांची निवड केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पक्षाचे अध्यक्षपद मद्रासमधील एन. शिवराज यांना देऊन आपल्या विचारांची व्यापकता दाखवून दिली होती. पण आज—कालचे रिपब्लिकन पक्षाचे गटपती स्वत:च पक्ष काढून मरेपर्यंत राष्ट्रीय अध्यक्ष असतात. दुसऱ्या व्यक्तीला अध्यक्षपद न देता,आपणच राष्ट्रीय अध्यक्ष अशी बिरुदावली लावून लोकशाहीच्या तत्त्वाला खुंटीला बांधून ठेवतात.

''शेडयुल्ड कास्ट फेडरेशन'' असे पक्षाचे नाव असले तरी पक्षाची विचारधारा, ध्येयधोरणे आणि उदिष्टे व्यापक होती, ती एकजातीय नव्हती.सामाजिक, आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य प्रत्येकभारतीय नागरिकाला मिळालेच पाहिजे. तसेच जुलूम, पिळवणूक पासून प्रत्येक माणूस, वर्ग आणि राष्ट्र याची मुक्तता अशी सर्वसमावेशक भूमिका पक्षाची होती.११ मार्च १९४६ च्या सार्वजनिक निवडणुकीत काँग्रेस, मुस्लिम लिग व शेडयुल्ड कास्ट फेडरेशनहे पक्ष निवडणुकीच्या रिंगणात असले तरी मुस्लिमलीगसाठी स्वतंत्र मतदारसंघ असल्याने त्यांना निवडणूक सोपी होती. स्वातंत्र्य लढयाचे श्रेय काँग्रेसला मिळाल्यानेकाँग्रेसला पाठिंबा मोठा होता, पण शेडयुल्ड कास्टफेडरेशनसाठी ही निवडणूक अवघड होती. कारणसंयुक्त मतदारसंघामुळे काँग्रेसने जाती—पोटजातीचेराजकारण करून अस्पृश्य समाजातील पुढाऱ्यांना सत्तेचीलालच दाखवून राखीव मतदारसंघातून निवडणूकलढवली व त्यांना निवडून आणले. शेडयुल्ड कास्टफेडरेशनचा मोठा पराभव झाला. पुणे कराराच्यामाध्यमातून मिळालेल्या संयुक्त मतदारसंघामुळे शे.का.फे. चा पराभव झाला. या पराभवानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कार्यकर्तांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, १९४६ च्या

इलेक्शनमध्ये आपण हरलो.इलेक्शनमध्ये हरलो म्हणून खंत वाटण्याचे कारणनाही. पराभवाबद्दल मला कधीच दु:ख होत नाही.गेल्या इलेक्शनमध्ये काँग्रेसने आपला पराभव केलाअसता तर त्याबद्दल विशेष काही मानण्यांसारखे नव्हते, परंतु काँग्रेसच्या लोकांनी आपल्यांवर जो जोर, जुलूमव अत्याचार केला, तसा अत्याचार हिंदुस्थानात इतरत्र क्वचितच झाला असेल. १९४६ च्या अत्यंत बिकट प्रसंगातून आपण, निभावून निघालो ही काही लहान सहान गोष्ट नव्हे. आता आपंणात धैर्य आलेले आहे. तुम्ही काय करणार? असे विचारल्यास तुमच्यापैकी प्रत्येक जण खात्रीने म्हणेल, आम्ही आपला पक्ष सोडणार नाही. एवढे धैर्य आपल्यात आलेले आहे. १९४६ च्या पराभवानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कार्यकर्तांना धीर दिला होता. शेडयुल्ड कास्टफेडरेशन हा काँग्रेस विरोधी असल्याने काँग्रेस विरोधीपक्षासोबत या पक्षाने नेहमीच आघाडी केली. शेडयुल्डकास्ट फेडरेशन हा काही ठराविक जातींचा पक्ष अशीमानसिकता निर्माण झाल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हा पक्ष बरखास्त करून नवीन सर्वसमावेशक रिपब्लिक पार्टी ऑफ इंडियाची संकल्पना मांडली होती. शेडयुल्ड कास्ट फेडरेशन या पक्षाने अखिलभारतीय पातळीवर अस्पृश्यांचे संघटन केले होते.भारतातील प्रत्येक राज्यात या पक्षाचा विस्तार झालाहोता. स्वतंत्र मजूर पक्षानंतर शेडयुल्ड कास्ट फेडरेशन हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेला दुसरा राजकिय पक्ष होता.

**संशोधन पध्दती :—**

कोणत्याही विषयाचे संशोधन वस्तूनिष्ठ व्हावे म्हणून संशोधन पध्दतीचा अवलंब करुन संशोधन केले जाते. प्रस्तुत शोध निबंधासाठी '' डॉ. आंबेडकर आणि शेडयुल्ड कास्ट फेडरेशन'' या विषयाची निवड केली आहे.

**उद्देश :—**

१) शेडयुल्ड कास्ट फेडरेशन स्थापन करण्यामागील उद्देश व कार्य जाणून घेणे.
२)या संघटनेच्या माध्यमातुन पक्षाच्या सबळीकरणाचा अभ्यास करणे.

५

३)पक्षाच्या वतीने दलितांचा विकास आणि उत्थान अभ्यासणे.

**गृहिते :—**

१) शेडयुल्ड कास्ट फेडरेशनचे वतीने दलितांचा विकास झाला व राजकिय क्षेत्रांत संधी मिळाली.
२)दलितांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पक्षाची स्थापना करुन दिली.
३)या संघटनेच्या माध्यमातुन अनेक कार्य आणि पक्ष सबळीकरण घडून आले.

**नमुना निवड :—**

प्रस्तुत शोध निबंधात गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दतीतील सोईस्कर नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधन आराखडा :—**

प्रस्तुत शोध निबंधात अंशत: वर्णनात्मक व अंशत: निदानात्मक संशोधन आराखडयांचा वापर करण्यात आलेला आहे.

**तथ्य संकलन :—**

प्रस्तुत शोध निबंधात तथ्य संकलनासाठी प्राथमिक स्त्रोतामधील मुलाखत अनुसुची व निरिक्षण या तंत्राचा वापर करुन दुय्यम स्त्रोतामध्ये वर्तमानापत्रे, पुस्तके, मासिके, योजना, बुकलेट, जीआर इत्यादी तंत्राचा वापर करण्यात आलेला आहे.

**निष्कर्ष —**

शेडयुल्ड कास्टफेडरेशन हा काँग्रेस विरोधी असल्याने काँग्रेस विरोधीपक्षासोबत या पक्षाने नेहमीच आघाडी केली. शेडयुल्डकास्ट फेडरेशन हा काही ठराविक जातींचा पक्ष अशीमानसिकता निर्माण झाल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हा पक्ष बरखास्त करून नवीन सर्वसमावेशक रिपब्लिक पार्टी ऑफ इंडियाची संकल्पना मांडली होती. शेडयुल्ड कास्ट फेडरेशन या पक्षाने अखिलभारतीय पातळीवर अस्पृश्यांचे संघटन केले होते.

भारतातील प्रत्येक राज्यात या पक्षाचा विस्तार झालाहोता. स्वतंत्र मजूर पक्षानंतर शेडयुल्ड कास्ट फेडरेशन हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेला दुसरा राजकिय पक्ष होता.

**संदर्भसुची :—**

१) आगलावे प्रदिप 'सामाजिक संशोधन पध्दती व तंत्रे'साईनाथ प्रकाशन नागपूर.
२)अलोनी बोधनकर 'सामाजिक संशोधन पध्दती'साईनाथ प्रकाशन नागपूर.
३)पुण्यनगरी — 'डॉ. आंबेडकर आणि शेडयुल्ड कास्ट फेडरेशन'दि. ०२/०७/२०१५ पेज नं. ०४
४)लोकशाही वार्ता ''फुले, शाहु, आंबेडकरांची शिकवण व आपण'' दि. ०२/११/२०१७ पेज क्र. ०५
५)लोकशाही वार्ता ''हिंदू कोड बिल आणि आंबेकडकर''दि.३०/११/२०१४पेज क्र. ०४
६)लोकशाही वार्ता ''डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य' दि. २४/०५/२०१७पेज क्र. ०५
७)लोकशाही वार्ता ''डॉ. आंबेडकर साहित्य संमेलन'' दि. १६/०३/२०१७ पेज क्र ०५

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)

ISSN : 2278-9308
July 2021

# भारतीय लोकशाहीसमोरील एक आव्हाहन : भ्रष्टाचार

**डॉ. राजेंद्र ओ. बेलोकार**
सहा. प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख,
एस. एन. मोर कला, वाणिज्य आणि श्रीमती गोदावरीदेवी सराफ
विज्ञान महाविद्यालय, तुमसर, जि. भंडारा

**सहा. प्राध्या. मनोज के.सरोदे**
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
आर्ट्स कॉलेज सिहोरा, तह. तुमसर, जि. भंडारा

विधान देशात लागू झाले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशात झालेल्या बदलाचे परीक्षण केले असता असे लक्षात येते की, देशात सकारात्मक व नकारात्मक बदल झालेले आपणास दिसून येईल. स्वतंत्र भारताने गेल्या सात दशकात सर्वच क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. प्रगती बरोबरच काही अवगुण लोकशाही समोर नव्याने आले आहे. आपला देश जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे, याचा मला अभिमान वाटतो. आज जगाला पुरेल इतके अन्नधान्याचे उत्पादन करण्याची क्षमता भारतामध्ये आहे. जगाला मानव संसाधन पुरवू शकेल इतके तंत्रज्ञानक्षम मानव संसाधन भारतात निर्माण होत आहे. परंतु आज भारत एकविसाव्या शतकातील सगळयात बिकट अशा आव्हाहनांनासमोर जात आहे. याचपैकी भ्रष्टाचार या आव्हाहनाचा आढावा घेण्याचा प्रयत्न या लेखामध्ये केला आहे.

भारताच्या राजकीय समाजव्यवस्थेत भ्रष्टाचाराची मुळे खोलवर रुजलेली आहेत. व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, आरोग्यविषयक अशा सर्वच क्षेत्रात आपल्याला भ्रष्टाचार आढळून येईल. भ्रष्टाचार या शब्दाची उत्पत्तीच मुळात भ्रष्ट व आचार अशा दोन शब्दांच्या एकीकरणातून झाली असून भ्रष्ट असे आचरण म्हणजे भ्रष्टाचार. व्युत्पत्ती शास्त्रानुसार एखाद्या व्यक्तीने आपल्या स्वस्वार्थासाठी आपली सद्सदविवेकबुद्धी गहाणठेवून केलेले व्यक्तिगत वर्तन म्हणजे भ्रष्टाचार होय.

**संशोधन पद्धती :**

सदर संशोधन हे विश्लेषणात्मक पद्धतीचे असून ते दुय्यम स्त्रोतांवर आधारित आहे. यात संदर्भग्रंथ, ग्रंथालयातील पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे, इंटरनेट इत्यादी साधनाचा वापर केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. भ्रष्टाचारामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणा—या परिणामाचा अभ्यास करणे.
२. भ्रष्टाचार भारतीय लोकशाही समोरील नवीन आव्हाहन आहे. त्याचे समूळ उच्चाटन होणा—या उपाययोजनेचा अभ्यास करणे.
३. भ्रष्टाचाराच्या परिणामाचा कारणाचा अभ्यास करणे.

भ्रष्टाचार या शब्दाचा अर्थ पैसे खावे एवढ्या मर्यादित अर्थाने वापरला जातो एवढेच नव्हे तर लाचलुचपत, कमिशन, अफरातफर, घोटाळा इत्यादी पर्यायी शब्द योजून ही त्याची ओळख पटविली जाते.अशाप्रकारे भ्रष्टाचार हा व्यक्तीच्या अशा प्रकारचा व्यवहार आहे की, जो कायदा आणि व्यक्तीच्या सार्वजनिक भूमिका संबंधी कर्तव्य पूर्ण करतांना व्यक्ती स्वत:च्या स्वार्थाकरिता आपल्या पदाचा दुरुपयोग करतो.भ्रष्टाचारही फार जुन्या काळापासून चालत आलेली समस्या आहे. भ्रष्टाचाराचे अनेक दाखले आपणास प्राचीन वाङ्मयात सुद्धा पाहायला मिळतील.कौटिल्याचे अर्थशास्त्र या आपल्या ग्रंथात भ्रष्टाचाराच्या वेगवेगळया प्रकारांची चर्चा केलेली दिसून येते. त्यांच्यामते ज्याप्रमाणे जिभेवर पडलेल्या मधाची चव घेतल्याशिवाय माणसाला राहवत नाही. त्याचप्रमाणे राज्याच्या महसुलातील थोडातरी भाग हडप केल्याखेरीज सरकारी अधिकारी कर्मचा—यांना राहवत नाही. असे कौटील्याचे स्पष्ट मत होते.भ्रष्टाचार हा मानवी शरीरातील कॅन्सर रोगासारखा असून समाजाला लागलेला कलंक आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हापासून ते आजपर्यंत आपल्यामधील अनेक व्यक्तींना अगदी प्रत्यक्षपणे प्रभावित करणारी समस्या म्हणजे भ्रष्टाचार होय.भारतीय समाज जीवनाची जवळपास सर्वच क्षेत्रे भ्रष्टाचाराने पोखरून काढली जात आहे. त्यामुळे शासकीय व्यवस्थेला प्रत्येक स्तरावर आपणास भ्रष्टाचाराचा अनुभव आल्याशिवाय राहत नाही.भारतातील वेगवेगळया क्षेत्रात

आजवरझालेल्या भ्रष्टाचाराकडे लक्ष केंद्रित केले तर भ्रष्टाचाराचे आक्राळ–विक्राळ रूप आपल्या शब्द डोळयासमोर येते. उदा. बोफोर्स घोटाळा, बँकिंग क्षेत्रातील प्रकरणे, निरव मोदी, चोकशी तहलका प्रकरण, चिक्की घोटाळा, महाराष्ट्र सदन शासकीय भूखंड विक्री प्रकरण यावरून भ्रष्टाचाराने आपल्या भारतीय समाजाच्या विकासामध्ये फार मोठा अडथळा निर्माण केला आहे असेच म्हणावे लागेल.

एखाद्या व्यक्तीने आपल्या कामासाठी दुस–या व्यक्ती कर्मचा–याला (अधिका–याला) पैसे देणे हा भ्रष्टाचाराचा ढोबळ मार्ग असला तरी त्याची विविध रूपे आहेत. उदा. अधिकारी वर्गाने आपल्या पदाचा गैरवापर करून मित्र–नातेवाईक यांना सेवा सुविधा पुरविणे, बक्षिसे, भेटवस्तू स्वीकारणे, संबंधित राजकीय पक्षांना देणगी देण्यास भाग पाडणे इत्यादी अनेक भ्रष्टाचाराचे मार्ग आहेत.भ्रष्टाचार आणि राजकीय नेतृत्व यांचे अतूट असे संबंध आपल्याला स्वातंत्र्य प्राप्तीपासून असलेले पाहायला मिळतात. प्रत्येक कालखंडात राजकीय नेतृत्वावर भ्रष्टाचाराचे आरोप झालेले आहेत. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या काळात घडलेल्या मुंदडा प्रकरणातून ते डॉ. मनमोहन सिंग यांच्या कालखंडातील टू–जी स्पेक्ट्रम घोटाळयाविषयी म्हणजेच पहिल्या लोकसभेपासून सुरू झालेली ही भ्रष्टाचाराची मालिका अखंडितपणे सुरु आहे.

**भ्रष्टाचाराची वैशिष्ट्ये :**

१. व्यक्तिगत फायद्यासाठी सार्वजनिक मालमत्तेचा गैरवापर केला जातो.

२. भ्रष्टाचारात व्यक्तींकडून कर्तव्याचे योग्य पालन केले जात नाही. उलट जाणीवपूर्वक नियम पायदळी तुडविले जातात.

३. भ्रष्टाचारातून संबंधित व्यक्तीला प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रूपाने लाभ प्राप्त होत असतो.

४. भ्रष्टाचाराचे क्षेत्र व्यापक असून ते शासकीय अधिकारीपासून राजकारणी नेते पुढा–यापर्यंत पसरले आहे.

५. भ्रष्टाचार सर्वत्र दिसून येत असला तरी शासकीय सेवेमध्ये त्याचे प्रमाण जास्त आहे.

**भ्रष्टाचाराची कारणे :**

१) स्वार्थी राजकीय अभिजन वर्गाचा उदय :

स्वार्थी राजकीय अभिजनांनी शासकीय योजनाचानितीनियम व कार्याचा दुरुपयोग करून दुव्यवहार करून त्याचा उपयोगलोककल्याणासाठी न करता स्वत:च्या आणि मित्र नातेवाईकाच्या कल्याणासाठी केला. त्यामुळे योजनांचा फायदा हा ख–या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचलाच नाही.

२) आर्थिक सुरक्षिततेची अस्पष्टता :

शासकीय सेवेत काम करणा–या कर्मचारी वर्गाला आर्थिक सुरक्षितता नसल्यामुळे ते भ्रष्टाचाराकडे वळतात कारण जो दर्जा किंवा पगार आज आपल्याला मिळत आहे. तो उद्याही कायमच राहील. याची शाश्वती ही बदलणा–या नवनवीन कायदे व नियमामुळे शक्य नाही. उदा. पेन्शन योजना बंद झाली. त्यामुळे भविष्याची तरतूद म्हणून अनैतिक मार्गाने पैसा कमविणे त्यांना आजची गरज वाटते.

३) ख–या सामाजिक विकासाचा अभाव :

आजही भारतीय समाजामध्ये दारिद्रय, निरक्षरता, अंधश्रद्धा (सनातनी) वृत्ती यामुळे पाहिजे तेवढ्या प्रमाणात सामाजिक सुधारणा झालेल्या दिसून येत नाही. तसेच लोकांना प्रशासकीय व न्यायालयीन नियमांची स्पष्टता, संदिग्धता लक्षात येत नाही. याचाच फायदा अधिकार वर्ग घेऊन त्याचे भ्रष्टाचाराच्या माध्यमातून एकप्रकारे शोषण करतो.

४) अप्रभावी राजकीय नेतृत्व :

आज दिवसेंदिवस प्रभावहीन राजकीय नेतृत्व पाहायला मिळते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रशासकीय व राजकीय अनैतिकतेत वाढ होत आहे आणि हीच बाब भ्रष्टाचाराला खतपाणी घालण्यासाठी कारणीभूत ठरते.

५) पगारातील विषमता :

आपल्या देशात कर्मचा–यांच्या पगारामध्ये बरेच अंतर दिसून येते. प्रत्येक कर्मचारी आपल्या वरिष्ठ अधिका–याचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करीत असतो. वरिष्ठ अधिकाराचे

आरामदायक जीवन पाहून पगार कमी असल्यामुळे भ्रष्ट आचरणाचा मार्ग अवलंबून पैसा कमवितो. उदा. जिल्हा अधिका—यांचा पगार आणि क्लर्कचा प्रकार.

६) नैतिक मूल्यांचा —हास :

वर्तमान विकसित समाजाचे शहरीकरण तसेच औद्योगिकरणावर नेहमी जोर दिल्यामुळे भौतिक मूल्ये ही सामाजिक मूल्यापेक्षा वरचढ ठरली.भौतिक सुख सुविधा वाढल्यामुळे ईमानदारीने पैसे कमविणे दिवसेंदिवस कठीण होत चालले असून अनैतिक मार्गाने पैसे कमविण्यातच आनंद वाटतो आहे.

७) आदर्श मूल्याकडे दुर्लक्ष :

आपल्या देशात काही निश्चित मूल्ये, नियम आहेत. त्यानुसार आपण सर्वांनी आचरण करावे अशी अपेक्षा असते. परंतु आधुनिक परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये या राष्ट्र उपयोगी मूल्याकडे पूर्णत्वाने दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. शासकीय नियमांचे उल्लंघन करून, सार्वजनिक निधी, गैरवापर करणे, वस्तूचा काळाबाजार करून कृत्रिम टंचाई निर्माण करणे आणि जनतेकडून जास्तीचे पैसे उकळणे तसेच लाच घेऊन व देऊन आपले कामे करून घेणे म्हणजे हा एक प्रकारचा मानवी व्यवहाराचा भाग बनला आहे.

८) न्याय संस्थेतील दिरंगाई :

भारतीय न्याय संस्थेत वेळेवर न्याय मिळत नसल्याने तसेच न्यायालयीन शुल्क आणि वकिलाची फी ही सर्वसामान्य लोकांना परवडणारी नसल्याने न्याय मिळणे महाग झाले आहे. त्यामुळे सत्याला न्यायालयात न्याय मिळतो यावरचा विश्वास कमी होत आहे.त्यामुळे अन्यायाविरुद्ध दाद मागण्याऐवजी लोक भ्रष्टाचारी मार्गांचा अवलंब करून आपले कार्य उरकून टाकतात.

९) दंडात्मक कार्यवाहीचाअभाव :

घोटाळा करून ही आपण अडकणार नाही आणि जर अडकलो तरी कठोर अशी शिक्षा होणार नाही आणि झाली तरी त्यास ती दिर्घकाळ लांबविता येते. राजकीय व्यवस्थेतील भ्रष्टाचार हा सामाजिक स्वरूपाच्या असल्याने आणि भ्रष्टाचारात खालपासून वरपर्यंत सर्वांचेच हाथ बरवटलेले असल्यामुळे कोणी कोणावर कार्यवाही करावे? हाच मुख्य प्रश्न असतो. त्यामुळे भ्रष्टाचारी कार्यवाहीला न घाबरता खुलेआम भ्रष्टाचार करतात. भ्रष्टाचाराविरुद्ध न्याय मागायचा असेल तर पुन्हा आपल्याला भ्रष्ट आचरण करावे लागते. यापेक्षा मोठा उपहास लोकशाहीचा कोणताही नसेल.

अशा अनेक कारणावरून आपल्या देशात भ्रष्टाचार निर्मूलनार्थ विविध कायदे आणि समित्या नेमल्या आहेत. उदा. १९४७ मध्ये भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९५५ प्रशासकीय दक्षता विभाग, १९६४ मध्ये केंद्रीय दक्षता आयोग, २००५ मध्ये माहितीची अधिकार आदी.भ्रष्टाचार कमी वा नष्ट करण्यासाठी शासन व्यवस्थेचे आधारस्तंभ असणा—या कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ, नोकरशाही व मिडीयायांनी आपले नेमून दिलेले कार्य कुशलतेने आणि प्रामाणिकपणे, ईमानदारीने पारदर्शकपणे पार पाडणे आवश्यक आहे.संपूर्ण भारतीय समाजाने नैतिक मूल्याचा ख—या अर्थाने अंगिकार करून आपल्या मनोवृत्तीत समाजहिताच्या दृष्टीने परिवर्तन करणे गरजेचे आहे.(भ्रष्टाचार ही वर्तमान जीवन जगण्याची पद्धती बनली की काय? असेच चित्र दिसते.)यातुन आपल्या राजकीय समाजव्यवस्थेला सावरायचे असेल तर क्रांतिकारक स्वरूपाच्या उपाययोजना कराव्या लागतील.

आजचे शासन कायदे भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी अपुरे पडत असल्याने या विषयीचे कठोर कायदे करण्याची गरज आहे.निव्वळ कठोर दंडात्मक कायदे करून चालत नाही. तर त्यासंबंधी कायद्याद्वारे नियोजनबद्ध आराखडा आखूनअत्यंत काटेकोरपणे अंमलबजावणी होणेसुद्धाआवश्यक आहे.

**उपाययोजना :**

❖ भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी आपल्यालानिर्मित कायदे कार्यप्रणाली आणि शासन यावर लक्ष केंद्रित करून विशेष परिस्थितीला विशिष्ट व्यक्तीला कार्य आणि व्यवहार करण्यासाठी कायदे आणि नियम असणे आवश्यक आहे.

❖लोकपाल व लोकायुक्तांची सर्वच राज्यांमध्ये त्वरित नियुक्ती करणे भारतीय समाजव्यवस्थेत नैतिकता, प्रामाणिकता, ईमानदारी, राष्ट्रीय एकात्मतासारख्या आदर्श मूल्यांची नव्याने रुजवणूक करून त्याचे महत्त्व नागरिकांना पटवून देणे.

❖आवश्यक वस्तूचा तुटवडा पडू न देता त्यासाठी योग्य ते नियोजन करणे आणि अवैध व्यापारावर कठोर नियंत्रण ठेवणे.

❖नागरिकांनी भ्रष्टाचाराच्या बाबतीत अधिक सहनशील न राहता त्या विरुद्ध एकमुखाने लढा देणे गरजेचे आहे.

❖संशयास्पद अधिका—यांची नेते, पुढा—यांची संवेदनशील महत्त्वाच्या पदावर नियुक्ती करू नये.

❖मंत्री तथा सरकारी अधिकारी—यांसाठी आचारसंहिता निर्माण करून त्यांचे कठोर पालन करणे.

❖ख—या अर्थाने ओम्बड्मनसारख्या स्वायत्त संस्थेची निर्मिती होऊन त्यानुसार अंमलबजावणी होणे.

❖उदारीकरणाच्या नीति नियमांना सावधगिरीने लागू केल्या जावे.

❖शासकीय कर्मचारी अधिकारी वर्गाची निवड योग्य आधारावर करून त्यांच्या समाधानकारक वेतनाची व्यवस्था करणे.

❖निवडणूक खर्चावर कठोर नियंत्रण ठेवून दोषी आढळल्यास विनाविलंब कठोर शिक्षेची व्यवस्था करणे.

❖भ्रष्टाचार विरोधी चळवळीद्वारे जागृती घडून लोकांचा सहभाग अधिकाधिक संख्येने वाढविणे नितांत आवश्यक आहे. कारण जबाबदार आणि जागृत नागरिकेचा सामूहिक प्रयत्नच भ्रष्टाचाराला नष्ट करू शकतो.

**समारोप :**

भारतात भ्रष्टाचाराचेऐवढे साम्राज्य पसरले आहे याला कारण म्हणजे पैसा मिळविण्याकरिता जीवनातील नैतिक मूल्याची झालेली घसरण होय. विसाव्या शतकाच्या अखेरीस आर्थिक महासत्ता बनण्याची स्वप्ने भारताला पडू लागल्यानंतरच्या काळात जगाला भारताची ओळख ही सर्वाधिक भ्रष्ट देशांपैकी एकअशी झाली आहे. सार्वजनिक विवेकाला गुंडाळून सार्वजनिक व्यवहार होऊ लागल्यावर भ्रष्टाचाराच्या विरोधात कितीही कठोर कायदे केले किंवा यंत्रणा स्थापन केल्या तरी अशा भ्रष्टाचाराला प्रतिबंध घालण्यात अजूनही शासनाला यश आले नाही. भ्रष्टाचारविरोधी पथकाच्या जाळयात ५० रुपयासाठी अडकलेला तलाठी किंवा टू—जी स्पेक्ट्रम घोटाळयात अडकलेला मंत्री यादोघांनाही विश्वास आहे की या प्रकरणातून मी सहज बाहेर पडेल. राजकीय, प्रशासकीय, आर्थिक, सामाजिक अशा सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचार वाढलेला दिसून येतो. भारतातील वाढता भ्रष्टाचार हा राष्ट्रीय विकासाचा पुढील सर्वात मोठे आव्हाहन आहे.

**संदर्भसूची :**

१.क—हाडे बी. एम., भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर, २००९.
२.पाटील वा. भा., लोकप्रकाशन, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव, २०१९.
३.घांगरेकर चि. ग., भारतीय राजकीय व्यवस्था.
४.आहुजाराम, सामाजिक समस्याऐं, रावत पब्लिकेशन्स, जयपुर, २०१०.
५.लोटे रा. ज., भारतीय समाज आव्हाने आणि समस्या, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर, २०१५.
६.लक्ष्मिकांत एम., इंडियन पॉलिटिक्स, के. सागर पब्लिकेश,पुणे.
७.पाटिल बी. बी., आधुनिक शासन, फडके प्रकाशन, कोल्हापुर.

# जातीय व धर्म सलोखा राखण्यात ग्रामगीतेचे योगदान

प्रा.डॉ. प्रशांत रा. देशमुख
(Asst. Professor)
मातोश्री अंजनाबाई मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय नरखेड जि.नागपुर
Email :-prashantdeshmukh114@gmail.com mob:-9404405006

**प्रस्तावना**

आदर्श ग्राम हे संत तुकडोजींचे एक आवडते स्वप्न होते. या आदर्श ग्रामाचे स्वरूप कसे असावे हे सागण्यासाठी त्यांनी साडे चार हजार ओव्यांचा ग्रामगीता हा ग्रंथ अत्यंत सोप्या भाषेत असून चार इयत्ता पास झालेल्या मुलाने चातुर्मासात त्याचे वाचन करावे आणि गावातील स्त्री—पुरूषांनी श्रवण करून आपला गाव आदर्श करायची दिक्षा घ्यावी, असा या ग्रथ लेखनामागे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा हेतु आहे आणि बऱ्याच अंशी तो सफलही झाला आहे. ग्रामगीतेचा प्रभाव सांगताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सांगतात या सर्व विश्वात ईश्वर पुर्ण भरला आहे. म्हणून हे जगच आमचा देव विश्वाचामुळ घटक गाव आहे. म्हणून या ग्रामासाठी ही ग्रामगीता अवतरली आहे. या ग्रामगीतेत गावाचा उदो उदो केला आहे. कारण सर्व तिर्थ क्षेत्रांना गावाचाच आधार आहे. जगाचा पाया ही गावच आहे. या मंदिरातील देव म्हणजे त्या गावातील जनता होय या सर्व लोकांनी सेवा समत्व भावनेने करणे हीच आमची देव पुजा होय ग्रामगीता ही शब्दाद्वारे केलेली ग्राम देवतेची सेवाच होय ती माणसावर उत्तम संस्कार घडविते त्यामुळे गावात सदैव रामराज्य नांदेल दु:ख विवारण्याचा आपुलकीचा समानतेचा जातीय व धर्माच्या एकतेचा ग्रामगीता मार्ग दाखविते त्यामुळे, ग्रामगीता प्रत्येक्ष हसत मुखाने तोंड देण्यास समर्थ करते. जगात मानव धर्म वाढावा म्हणून ग्रामगीता सहकारी तत्वाने वागण्याचे शिक्षण देते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाणी ग्रामगीतेची फलश्रूती सांगीतली की, ग्रामगीतेतील एक एक ओवी म्हणजे नेम चुकणारा तीक्ष्ण बाण आहे. तो सरळ हृदयात जाऊन भिडतो. टाकी लागुन जशी दगडातून मुर्ति आकारतात, तसे या ग्रंथाचे वाचन मनावर रूढ संस्कार करते ग्रामगीता ही पारायणा साठी लीहली नाही. तीचे वाचन करताना ती उन्नतीचा मार्ग लोकांना दाखविते तिचा अर्थ मनात ठसला म्हणजे ती वाचकाचे समुळ जीवनच बदलून टाकते सर्व राष्ट्राला एकतेचा संदेश देते ही फुलांची पुजा दृष्टि देते.म्हणुन ग्रामगीतेने मनावर उत्तम संस्कार व मनुष्य सदगुण संपन्न होण्यास पात्र होईल. त्या ग्रंथात जे उपाय सांगितेल आहेत, ते कृतीत उतरविले तर जीवनात सुख व शांती लाभेल अल्प बुद्धि नाहीसी होऊन वाचताना बोध होईल. त्या बोधाने जीवन प्रकाशित झाले की खरा धर्म इष्ट कर्तव्य अंगी बनेल आजवर जे प्रेम आत्मकेंद्रित होते ते या ग्रंथाच्या चिंतनाने व्यापक होईल व सर्वाविषयी मनात करूणा आपुलकी एकता वाटून ग्रंथ वाचनाचे फळ पदरात पडेल.जी द्वेष भावना जाती धर्माची होती ती ग्रंथ वाचकाने नष्ट होईल.

अस्पृश्यता व विषमता हा हिंदुधर्मावरील कलंकच नव्हे तर हे मोठे संकट आहे. जगात ख्रिस्तीधर्म, इस्लामधर्म व बौद्धधर्म यांची लोकसंख्या क्रमाने एकापेक्षा एक कमी आहे. त्या सर्वाहुन कमी हिंदुधर्मीयांची लोकसंख्या आहे. त्याची तत्व फार उच्च व व्यापक आहेत पण रूढयांनी खूपच गोंधळ घातला आहे. ही शुद्ध तत्वे व्यवस्थितपणे अजून व्यवहारात न आणली गेली तर पुढे या थोर धर्माचे काहीच मूल्य उरणार नाही. यासाठी आम्हाला मानवतेच्या दृष्टिकोनातून धर्ममय जीवन करणे अत्यंत जरूरीचे आहे जातीने उच्च म्हणविणारा पण कामात आळशी, अशाला सामान्य सेवक समजून काम देणे आणि कुळाने हलका मानला गेलेला पण गुणांनी थोर, अशा व्यक्तीला प्राधान्य देणे आज आवश्यक आहे. व्देशमस्तर कोणाचाही नको. सहकारिता, सद्भावना, सद्गुण, सत्प्रेम यांचे पवित्र वातावरण गावभर निर्माण करून गावाला एक आदर्श कुटुंब बनविणे हेच महान पुण्यकार्य आहे. हाच खरा धर्म आहे ! अशा धर्माने रचलेले छोटे—मोठे आदर्श गाव पाहून कोणाच्याही ह्रदयात नवचैतन्य निर्माण होईल, असे कार्य आपण आपापल्या गावी करू

ISSN : 2278-9308
July 2021

शकलो तर तीर्थोतीर्थी जाण्याऐवजी लोक आपल्या गावाचे दर्शन घ्यायला वारंवार उत्सुकतेने येतील.

'ग्रामगीते' तील एकोणिसावा अध्याय 'दलित सेवा' या शीर्षकाचा आहे. समाजात दलित वर्ग निर्माण होण्याची मुख्य कारणे म्हणजे आपल्यातील धर्मभेद, जातिभेद, वर्णभेद, लिंगभेद होत. या विविध भेदभावामुळे एक वर्ग स्वत:ला श्रेष्ठ मानतो आणि म्हणूनच तो इतरांना तुच्छ लेखतो. एका विशिष्ठ धर्माचे अभिमानी अन्य धर्मियाकडे, उच्च जातीचे लोक इतर जातींकडे गोऱ्या वर्णाचे लोकांकडे, पुरूषवर्ग स्त्रीवर्गाकडे तिरस्काराने पाहतो. भेदभाव मानणाऱ्या यामनोवृत्तीुळे समाजात विषमता मूळ धरते आणि तिच्या जीवावर दालित्य—दलितपण एखाद्या विषारी वेलीसारखे अधिकाधिक फोफावत जाते. ही विषमता समूळ नाहीशी व्हावी म्हणून 'दलित सेवा' या अध्यायात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अनेक विधायक विचार मांडतात.

एका श्रोत्याच्या लहानशा प्रश्नाने हा अध्याय सुरू होतो. 'सर्व धर्म सारखेच असता परधर्म भयावह का?' हाच तो प्रश्न आहे. या प्राश्निकाला 'धर्म' या शब्दाचा मूलार्थच समजलेला दिसत नाही,. म्हणून महाराज तो प्रथम स्पष्ट करतात. आपापल्या अंर्तभूत स्वभावधर्मानुसार लोकाभिमुख वर्तन असणे, म्हणजेच स्वधर्माचे पालन करणे होय असे ते सांगतात. अर्थातच, दुसऱ्याच्या स्वभावधमार्सनुसार वागणे म्हणजे परधर्माचा अंगीकार करणे ठरते. 'एकाची प्रकृती ज्या कार्याची। ज्या गुणांची स्वभावेचि। त्यासि गुणकर्मे दुसऱ्याची। साधती केवि?। कोणात शक्ति, कोणात युक्ति। कोणात ज्ञान सेवावृत्ती साधे त्याची साधने करावी भक्ती। जनताजनार्दनाची। त्याने आपल्या प्रकृतिपरी। करावी राष्ट्राची चाकरी। दुसऱ्याचे कर्तव्य घेता शिरी। विनाश त्याचा। म्हणोनि परधर्म भयावह। ऐसे कथिले नि:संदेह। तुपात नोहे मत्स्याचा निर्वाह। पाण्याहूनि उत्तम जरी।' ग्रा.गी.अ. २९ – ६ ते ९

तूप पाण्यापेक्षा मौल्यवान असले तरी मासळी तुपात जगू शकणार नाही, त्याप्रमाणे परधर्म कितीही आकर्षक वाटला तरी त्यात आपला निर्वाह होणार नाही असे महाराज ठामपणे सांगतात. समाजात प्रचलित असलेल्या धर्मभेदांवर प्रकाश टाकताना ते म्हणतात, 'मुसलमान म्हणता मारावा। ख्रिश्चन म्हणता हाकूनि द्यावा। आपला पापीही छातीशी धरावा। हा नव्हे अर्थस्वधर्माचा।' ग्रा.मी.अ. २९—१५ इतरांना कमी लेखण्यातून समाजात दलिताचा अन् दीनदुबळयांचा वर्ग निर्माण होतो. त्यामूळेच सर्वभूती समभाव लोपतो. मानवतेच्या तत्वांचा विसर पडतो म्हणून महाराज सांगतात —'मानव' हेचि आपले नाम। मग स्वधर्म म्हणजे 'मानवधर्म' हे तरी ध्यानी घ्या सत्य वर्म। साध्या बोली। आपण आहोत मानप। मानव्याचा वाढवावा गौरव। सुखी राहावेत आबालवृद्ध सर्व। हेचि कार्य आपुले।'ग्रा.गी. अ. २९—२८, २९अशा मानवतावादी अधिष्ठानावरून महाराजांची दलित संवेदना ग्रामगीतेत प्रगटते. एका मानवाने दुसऱ्या मानवाचा स्पर्श पापी,अन् अपवित्र माणावा आणि तोच माणूस परधर्मात गेला की, त्याच्याशी आदराने हस्तांदोलन करावे या परधार्जिण्या वृत्तीचा महाराज निषेध करतात. या मूर्खांना धर्माचा अर्थबोधच झालेला नसतो असे ते स्पष्ट सांगतात —'मानवाचा स्पर्शही पाप। मानूनि त्यासि करिती दु:खरूप विधर्मी जाता मानिती बाप। त्यासीच मग। दीन—दलितांची तहानभूक। दीन—दलिताचे सुखदु:ख। काहीच नेणती अभिमानी मूर्ख। स्वधर्म—घोक चालविती। ग्रा.गी.अ. २९—६२,६३

अशाप्रकारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामिण विकासाच्या व जातीय सलोख्याच्या दृष्टीकोणातून गावाचा विकास व व्यक्ती विकास साधण्या करीता गावातील प्रत्येक व्यक्तीणे कूठल्याही प्रकारच्या भेदभाव न पाळता आपूलकीने ऐक मेकाण सोबत कसे राहावे हे फार साध्या भाषेत व उदाहरणासहीत सांगीतले आहे जाती सर्व एकची आहे. परी धंदा गुन कर्मासम राहे आपल्या उधोगाच्या प्रवाहे ओळखी द्यावी पुर्वी जाती च्या वर्गा नुसार व्यवसाय होते. परंतु ग्रामगीतेतुन राष्ट्रसंत तुकडोजी महाराजसांगतात जाती सर्वाची एकच आहे आणि व्यवसाय त्यांच्या गुन कर्मानुसार आहे. तसेच वर्ण व्यवस्था या ग्रामगीतेतील अध्यायातुन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सांगतात कि म्हणोनि अस्पृश्याता क्रियेवरी मानावी जाति सर्व एक जाणावी आपआपल्या परीने उचलावी कामे सकळानी याठीकानी जातीपातीचा भेद न पाळता स्पृश्य अस्पृश्य न पाळता त्या व्यक्तीच्या कामावरून वर्तनावरून त्याची अस्पृश्यता ठरवावी वाईट कुर वागनुकीतुन समाजाला हानी पोचवनाऱ्या व्यक्तिला अस्पृश्य समजावे. जाती सर्व एकच आहे. असे समजावे तसेच

शुद्राघरी उत्तम वर्तनी जन्मला तो शुद्र कसाराहनार त्यांचे वर्तन गुण हे चांगले म्हणुन त्याला कसे शुद्र मानावे त्यालानुस्त जातीपातीवरून शुद्र मानने हे चुकीचे आहे. तसेच क्षेत्रीयाच्या घरी भ्रष्ट निपजला त्याचे वर्तन आणि कर्मजर भ्रष्ट असेल तर त्याला क्षत्रिय कसे समजावे. म्हणुन व्यक्तिची जात हि त्याच्या कर्म व वर्तनावरून समजावी म्हणुन कुठलाही भेद भाव धर्म जात न पाडता सर्वांना समान वागनुक दयावी. या जात,धर्म,पंथावरून आपल्या समाजात अनेक वाद आणि भेद दिसुन येतात ते दुर करण्याचा मार्ग ग्रामगीता दाखवत आहे. व या ग्रामगीतेच्या माध्यमातूण जातीय व धर्म सलोखा निर्मान झाला आहे. व होत आहे हे ग्रामगीतेच्या विविध ओविच्या माध्यामातूण दिसून येते. म्हणुन जर जातीय सलोखा राखायास सामुदायीक सर्व धर्म समभावाची प्रार्थनेची रित रामधुन व संत उत्सव वगैरेची व्यवस्था ही ग्रामगीतेच्या आचारणाणे उपयोगात आणली तर सर्वास शांती लाभु शकते. प्रस्तुत संशोधन करीत असतांनी असे लक्षात आले कि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजानी ज्या ज्या गावात अखील भारतीय श्रीगुरूदेव सेवामंडळाची स्थापना केली आहे. त्या त्या गावात खुप मोठया प्रमानावर जातीय सलोखा आढळुन येतो आहे. प्रत्येक गावात सर्वधर्म समभावाची प्रार्थना व ध्यान तसेच गावातुन रामधुन काढण्यात येते ज्यामध्ये गावातील सर्व धर्मांचे सर्व जातीचे लोक सहभागी होतात. यामधुन जातीय सलोखा वाढीस लागतो. आणि हे ज्या ज्या ठिकानी अखील भारतीय श्रीगुरूदेव सेवामंडळे आहे त्या त्या ठिकानी प्रत्यक्षात दिसुन आले.

**संशोधनाचे महत्व**

संशोधनाच्या माध्यमातुन वर्ग,वर्ण,जात,धर्मा मध्ये समान सलोखा राखण्याच्या दृष्टीकोनातुन ग्रामगीतेतुन सर्वाशी सौजन्याच्या व्यवहाराची, सर्व धर्माबद्दल व त्यातील आदर्श तत्वाबद्दल आदर, समाजातील प्रत्येक घटकाबद्दल त्या घटकांचा कार्याबदल, प्रत्येकाच्या मनात नैतिक मुल्यांची रूजवणुक करण्याकरीता, समाजातील जातीभेद नष्ट होण्यास मदत, मागासलेल्या समाजाची सुधारणा राष्ट्राचा उद्धार सहकारिता, सद्भावना, सद्गुण, सत्प्रेम धर्मभेद, जातिभेद, वर्णभेद, लिंगभेद मनावर उत्तम संस्कार व मनुष्य सदगुण संपन्न होण्यास मदत व्हावी म्हणुन प्रस्तुत संशोधनातुन ग्रामगीतेच्या माध्यमातुन हे सर्व साध्य होत आहे हे सर्वच ठिकानी साध्य करण्या करता वरील सर्व गोष्टि ग्रामगीतेच्या आचरनातुन वाढीस लावण्या करीता एक अल्पसा हातभार लागावा म्हणुन प्रस्तुत संशोधनाचे महत्व आहे.

**संशोधनाचे उद्‌देश**

संशोधनाचे उद्देश निश्चित करून उद्धेशाच्या आधारे संशोधनाला योग्य दिशा देता येईल. या सोबतच संशोधनाला मर्यादीत ठेवण्याकरीता उद्देश महत्वाचे आहे. संशोधनाला जर उद्देश नसेल तर संशोधन दिशाहीन व व्यर्थ व्हायला वेळ लागणार नाही. म्हणुन सर्वप्रथम संशोधनाला उद्देश स्पष्ट करणे तितकेच महत्वाचे आहे.

१) ग्रामगीतेतील जात, धर्मातील सलोख्याचे योगदान जाणुन घेणे

२) ग्रामगीतेतुन सामाजीक विकासाचा अभ्यास करणे.

**गृहीतकृत्य**

१) जात आणि धर्माचा सलोखा राखण्यात ग्रामगीतेचे योगदान आहे.

**अध्ययन पध्दती**

प्रस्तुत संशोधनाकरिता नरखेडतालुक्याची निवड करण्यात आली. प्रस्तुत संशोधनाकरीता नरखेड तालुक्यातील निवडक श्रीगुरूदेव सेवा मंडळ स्थापीत गावातील ५० ग्रामस्थांचा समावेश करण्यात आला. यामध्ये पुरूष, महीला, युवक, युवती, लोकप्रतीनिधी, श्रीगुरूदेव सेवा मंडळ प्रमुख व सर्व प्रर्वगातील घटकांचा समावेश करण्यात आला. या करीता गैरसंभाव्यता नमुणा निवड पद्धती मधील सोईसकर नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात आला. या सर्व उत्तरदात्याकडुन तंथ्य संकलनाकरीता मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात आला.

**तथ्य विश्लेषण व निर्वचन** :—मुलाखत अनुसूचीच्या आधारे संकलीत संपुर्ण तंथ व्यवस्थित क्रमबद्ध करण्यात आली. तंथ्यामध्ये असलेल्या उणीवा दुर करण्यात आल्या. प्राथमिक तंथ्य व दुय्यम तंथ्याच्या आधारे विविध सारण्याच्या व विविध प्रमाण मापणाचा वापर करून तथ्य गोळा करण्यात आले.

**निष्कर्ष**

गाव आणि खेडयाला केंद्र स्थानी ठेवून सुपूर्ण जिवनाला हिताचा जातीय व धर्म सलोख्याचा विचार या ग्रंथात केला आहे. तो ग्रथ म्हणजे ग्रामगीता होय. माणसाचे जिवन जितके व्यापक आणि प्रवाही आहे. तेवढीच ग्रामगीता व्यापक व प्रवाही आहे. जिवनाच्या व्यापकतेला व प्रवाहीपणाला आपल्या प्रतिभेने बोध घालून मानव कल्याणाचे सुत्र शब्द बद्ध करण्याचा विचार ग्रामगीता आहे. एकविसाव्या शतकात दळणवळणाच्या साधनामध्ये व जैविक संशोधनामध्ये प्रचंड क्रांती घडत असलेल्या काळात मानवीय मुल्यांच्या आधारावर ग्रामराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी व्यवहार्य कार्यक्रम ग्रामगीतेने दिला आहे. अराजकता, जातीय तेढ, धार्मीक वाद, अस्पृश्यता, असमानता,आरोग्य, शिक्षण, रोजगार व निवारा हे प्रश्न अक्राळ विकाळ रूप धारण करीत असतांनाच या प्रश्नांची उकल व व्यवस्थापन ग्रामपातळीवर तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेच्या माध्यमातुन केली आहे. समाजातील विवाह संस्कार व मागासलेल्या समाजाची सुधारणा राष्ट्राचा उद्धार ग्रामगीतेत सांगीतला आहे.ग्रामगीतेच्या वाचनाने व वागण्याणे गावाची वैकुंठपुरी होईलग्रामगीतेमुळे ग्रामीण समाजातील जातीभेद नष्ट होण्यास मदत मिळाली.राष्ट्रसंतांचा 'ग्रामगीता' हा ग्रंथ प्रत्येकाच्या मनात नैतिक मुल्यांची रूजवणुक करणारा आदर्शग्रंथ आहे.समाजातील प्रत्येक घटकाबद्दल त्या घटकांचा कार्याबदल राष्ट्रसंत सारखीच संवेदना प्रकट करतात.राष्ट्रसंताना सर्व धर्माबद्दल व त्यातील आदर्श तत्वाबद्दल आदर असुन मानवाने सर्वधर्म सहिष्णुता राहुन मानवता जोपासावी हे अपेक्षित आहे. राष्ट्रसंत सर्वाशी सौजन्याच्या व्यवहाराची उपयुक्तता पटवून देतात. प्रत्येक नागरीकाने राष्ट्राने स्वीकारलेल्या शासन प्रणालीवर व त्यातील मुल्यांवर विश्वास ठेवून आचरण करावे संकुचित वृत्तीला बाजुला ठेवून सर्वापेक्षा 'राष्ट्र' महान मानावे असे सुचवतात.

**शिफारसी**

१)अखील भारतीय श्रीगुरूदेव सेवामंडळे ज्याज्या गावातआहे त्या गावातील जे संस्कार गावावर झाले आहे. त्याप्रमाणे इतरही बाकी गावानी ति संस्कृती आचरनात आनावी.
२)प्रत्येक ग्रामपंचायतीने आपल्या ग्रामपंचायतीचा कार्यभार ग्रामगीतेच्या मार्गदर्शनातुन आचरनात आनावा.
३)शासनाने प्रत्येक ग्रामपंचायतीला ग्रामपंयतीचा कार्यभार ग्रामगीतेच्या सुचवीलेल्या तत्वानुसार चालवण्याचा आग्रह करावा.
४)शासनाने शासकीय कर्मचाऱ्याना ग्रामगीतेच्या माध्यमातुन प्रशिक्षण आयोजित करावे.
५)प्रत्येक व्यक्तीने आपल्या मुलाना ग्रामगीतेच्या माध्यमातुन संस्कार करावे.
६)प्रत्येक गावात लाहान मुलान करीता ग्रामगीतेच्या माध्यमातुन बाल संस्कार शिबीराचे आयोजन करावे.
७)सामुदायीक सर्व धर्म समभावाची प्रार्थनेची रित रामधुन व संत उत्सव वगैरेची व्यवस्था ही ग्रामगीतेच्या आचारणाणे
उपयोगात आणली तर सर्वास शांती लाभु शकते.
८)समाजातील विवाह संस्कार व मागासलेल्या समाजाची सुधारणा राष्ट्राचा उद्धार ग्रामगीतेत सांगीतला आहे.
९)ग्रामगीतेच्या वाचनाने व वागण्याणे गावाची वैकुंठपुरी होईल
१०)गावात भीकारी व बेकारी राहणार नाही. कोणालाही सत्तेची बंधने राहणार नाही कारण ग्रामगीतेमुळे सर्वच शाहाणे सावध होतील
११)गावलोक निरोगी राहतील, कुठे तंटा— भांडणाचे नाव राहणार नाही. अन्याय व्यसने व एकमेकातील कुटील करावयाचा द्वेष वगैरे शिल्लक उरणार नाहीत
१२)गावातील लोक संघटीत होंतील सगळयात माणसीक बळ वाढेल त्याच प्रमाणे गावातच विश्वकुटूंबाची रचना नांदु लागेल.
१३)गाव स्वर्गा सारखे नांदेल सर्व स्त्री पुरूष सुखी होतील व परमार्थाचे आनंददायी विचार घराघरातुन वाहू लागतील

ISSN : 2278-9308
July 2021

संदर्भ


- रा.तु. भगत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गौरव ग्रंथ चैतन्य प्रकाशन कोल्हापूर २००९
- मारुलकर विजय समाजशास्त्र परिचय फडके प्रकाशन कोल्हापूर २००७
- राष्ट्रसंत तूकडोजी महाराज,ग्रामगीता,श्रीगूरूदेव प्रकाशन गूरूकूज२०११
- सुरेश मेश्राम, प्रात्यक्षीक संशोधन पद्धती,
- रघुनाथ कडवे . ग्रामविकासाची संजिवनी ग्रामगीता अमोल प्रकाशन नागपूर २००१
- डॉ. सुधीर बोधनकर, सामाजीक संशोधन पद्धती,
- सतीश तराळ राष्ट्रसंत तूकडोजी महाराज गैरव ग्रंथ

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# कौटुंबिक हिंसा — एक सामाजीक समस्या

प्रमोद चं. वानखेडे
सहाय्यक प्राध्यापक समाजशास्त्र
रा.सुं बिडकर कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हिंगणघाट
मो. नं ९७६३९३२२८६,E-Mail – pramodwankhede38@gmail.com

स्त्री आणि पुरूष हे कुटुंब संस्थेचे दोन महतवपूर्ण घटक आहे. पुरूषांच्या जीवनात स्त्रिचे स्थान अत्यंत महत्वपूर्ण मानले जाते. शिक्षणाचा प्रसार स्त्रियांचे आर्थिक स्वालंबन, स्त्रियांना संरक्षण देणारे नवनवीन कायदे अस्तित्वात आले असतांना देखील स्त्रीयांवरील अत्याचारांचे प्रमाण कमी होतांना दिसत नाही. समाजातील विविध विचार, परंपरा, रितीरीवाज, मुल्ये नियमांनी स्त्रियांना वारंवार अपमानीत केले, आहे. भारतीय समाज हा पुरूष प्रधान समाज आहे. पूर्वी वैदीक काळातील धर्म, अर्थ, काम मोक्ष हया जीवनाच्या क्षेत्रात स्त्रियांनी भूमिका महत्वपुर्ण होती. भारतात ब्रिटीशाच्या आगमनानंतर स्त्रियांच्या स्थितीमध्ये मोठया प्रमाणावर सुधारणा झाली. स्वातंत्र प्राप्तीनंतर स्त्रियांच्या समर्थनार्थ कायदे करण्यात आले. भारतीय राज्यघटनेने महिलांना समान अधिकार बहाल केले. कौटुंबिक हिंसा या प्रक्रियेमध्ये धमकी देणे, जखमी करणे शारीरीक हल्ला करणे, तसेच दुसऱ्या व्यक्तीच्या अधिकारावर आक्रमण करणे इ. चा समावेश होतो. या अत्याचाराचे लक्ष असलेली स्त्री कोणीही असू शकते. स्त्रियांवरील अत्याचार ही प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेली समस्या आहे. कौटुबिंक आंतरक्रियात्मक घटक मुख्यता स्त्रियांवरील अत्याचारास कारणीभुत ठरत आहेत. भारतीय समाजात सर्वच स्तरातील महीलांवर अत्याचार होताना दिसून येते. महिलांवर अनेक गलिच्छ आरोप केले जाते. वास्तविकता घर एक मंदीर व स्त्री ही त्या मंदीरातील देवता आहे. असे माले जाते परंतू ना घर ना दैवत, कारण कितीतरी अत्याचार तिच्या घरातच होत असते.

आज भारत जगात महासत्ता बनण्याचे ध्येय बाळगतो. समाजातील अनेक वाईट प्रथा नष्ट करण्याचा विचार करतो. परंतू स्त्रियांच्या अत्याचाराचे निर्मुलन करू शकला नाही. स्त्रियांवर होणारे अत्याचार दिवसेदिवय वाढताना दिसुन येते. संयुक्त राष्ट्र संघाच्या लोकसंख्या फंडाच्या अहवालानुसार भारतातील सहा कोटी मुली बेपत्ता आहेत. दररोज १४ स्त्रियाचा खुन कुटुंबियाकडून केला जातो. दर ५४ मिनिटांना एका स्त्रिवर बलात्कार होतो. थोडक्यात स्त्रियांना देण्यात येणाऱ्या संरक्षण अधिनियमातील तरतुदी व्यापक प्रमाणात दिल्या असल्यातरी स्त्रायांवरील अत्याचारात बरीच वाढझाली आहे. सामाजीक विषमता ही जात धर्म व लिंग या घटकांवर आधारीत आहे. पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान मिळालेले आहे. स्त्री ही केवळ उपभोगाची वस्तु आहे. अशी पारंपारीक मानसिकता आहे. स्त्रियांना शिक्षण, सत्ता संपत्तीचे सर्व अधिकार नाकारण्यात आले होते. धार्मीक कायद्यायांच्या आधारावर स्त्रियांवर अनेक बंधने लादली होती. सतीप्रथा, हुंडापध्दती, बालविवाह इ. अन्यायकारक चालीरीतीनी अनेक स्त्रियांचे आयुष्य उदवस्त केले. भारतात ब्रिटीशांच्या आगमनापुर्वी या निर्दयी प्रथा प्रचलीत होत्या. महात्मा जोतीबा फुले, सावित्रीबाई, राजा राममोहन रॉय इ. समाजसुधारकांनी स्त्री स्वातंत्र्याची चळवळ राबविली आणि म्हणुन इंग्रज सरकारने अनेक अनिष्ठ प्रथा बंद केल्या. आधुनिक काळात घरगुती हिसेच्या घटना वारंवार घडत आहेत. एकाच ठिकाणी निवास करणाऱ्या लोकांवर त्याच कुटुंबातील लोक अन्याय करतात. साधारपणे घरगुती हिंसा ही प्रामुख्याने महिलाच्या संदर्भात दिसून येते. म्हणुन घरगुती हिंसा ही महिलांच्या विरूध्दची हिंसा होय. घरगुती हिंसेच्या संदर्भात महत्वाची गोष्ट हिंसेतील पिडीत व्यक्ती हा हिंसा करणाऱ्या व्यक्तीची नातेवाईक असते. घरगुती हिंसा एक फार मोठी समस्या बनली आहे. म्हणुन घरगुती हिंसेला प्रतिबंध करण्यासाठी केंद्र सरकारने घरगुती हिंसेपासून महिला संरक्षण कायदा २००५ आणि घरगुती हिंसेपासून महिला संरक्षण नियम २००६ लागु केला आहे. या कायद्यानुसार पिडीत व्यक्तीच्या स्वास्थ,सुरक्षा, जीवन किंवा मानसिक किंवा शारिरीक लाभाची संरक्षण करते. घरगुती हिंसेमध्ये शारिरीक, लैगीक, मौखीक व भावनात्मक

ISSN : 2278-9308
July 2021

दुरूपयोग आणि आर्थिक दुरूपयोग इ. समावेश केला आहे. शारिरीक दुरूपयोगामध्ये आरोपी व्यक्तीचे असे कार्य किंवा आचरण होय की, ज्यामुळे पिडीत व्यक्तीला शारिरीक त्रास नुकसान किंवा त्यांच्या जीवनास आरोग्यास धोका निर्माण करते तसेच त्यांच्या स्वास्थ किंवा विकासाचा ऱ्हास करणे म्हणजेच स्त्रियांची अवमानना करणे होय.

घरगुती हिंसेमध्ये महत्वाची बाब म्हणजे घरातील लोंकानी अन्याय अत्याचार केला तरी, तो अपराध मानला जात नाही. हिंसा करणाऱ्या व्यक्तीला देखील आपण हिंसा करीत आहो. असे वाटत नाही. घरगुती हिंसेविषयी पोलीसांमध्ये तक्रार देखील केली जात नाही. म्हणुन पर्यायाने घरगुती हिंसेची आकडेवारी प्राप्त होत नाही. जेव्हा घरगुती हिंसेचे प्रमाण वाढते तेव्हाच त्याविषयी पोलीसात तक्रार केली जाते. २९ जानेवारी १९९३ च्या भारत सरकारच्या आकडेवारी नुसार महिलांच्या अत्याचारांच्या प्रमाणात मोठया प्रमाणावर वाढझाली. घरगुती हिंसेपासून महिला संरक्षण कायदा २६ ऑक्टोबर २००६ पासून लागु करण्यात आल्यानंतर या कायद्या अंतर्गत पहिली घरगुती हिंसेची बळी आंध्र प्रदेशात ठरल्याची नोंद करण्यात आली. भारतात शेकडो वर्षापासून अस्पृश्यांप्रमाणे महिलांना देखिल गुलामीचे जीवन जगावे लगत होते. ''चुल आणि मुल'' ऐवढेच त्यांचे कार्य क्षेत्र निश्चिती केले होते. भारतातील कुटुंब व्यवस्था अतिशय हिन दर्जाची होती. या संस्कृतीने महिलांना दुय्यम मानण्याचेच काम केले आहे. भारतात स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. महात्मा जोतीराव फुले यांनी १८१८ मध्ये पुण्यामध्ये मुलींची पहिली शाळा सुरू केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून महिलांना विशेष अधिकार बहाल केले. विवेकानंदानी भारतीय स्त्रियांचे स्थान आणि त्यांचे भविष्य या विषयावरील आपले मत स्पष्ट केलेले आहे. प्राचीन भारतात महिलांना समानतेची वागणुक दिली जात नव्हती आणि म्हणून स्त्रियांच्या संरक्षणाची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

कोविड १९ ची भारतातील स्थिती

फ्रान्स, स्पेन, ऑस्ट्रेलिया, इटली, अमेरीका व भारत यासर्व देशामध्ये कोरोना संदर्भात एक बाब सर्व ठिकाणी समान दिसुन येते. कोरोनामुळेझालेल्या लॉकडाऊनच्या काळात कौटुंबिक हिंसाचारांचे प्रमाण वाढले आहे. जगभरातल्या महिलांना समस्येच्या सामना करावा लागला. भारतातील महिलांना देखील कौटुबिंक समस्येचा सामना या काळात मोठया प्रमाणावर करावा लागला. भारता अशा पुरूषांवर कमी प्रमाणात कार्यवाही झाली आहे. कारण याकरीतामध्यवर्गीय महिलांही कारणीभुत आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या सर्वेक्षणानुसार २४ मार्च २०२० नंतर भारतात कौटुबिंक हिंसाचारात मोठया प्रमाणावर वाढझाली आहे म्हणजे लॉकडाऊनच्या काळामध्ये पहिल्याच आठवडयात तब्बल २५७ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. साधारणपणे संपुर्ण जगामध्ये अशीच समान परिस्थिती दिसून येते. जगातील १५० देशांमध्ये कोरोना संसर्गाची भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे. संसर्गजन्य आजारामुळे मृत्यूने अनेक लोकांना आपल्या कवेत घेतले आहे. म्हणजेच या रोगराईची संक्रमण साखळी निर्माण झाली. लॉकडाऊनच्या घोषणेमुळे सर्व व्यवहार थकीत झाले. शाळा, महाविद्यालय, कार्यालय, कपण्या, बाजार, वाहतुक सर्व काही याकाळात बंद होते. कोविड १९ च्या काळात हिंसाचारांचे कारण समोर आले आहे. पती–पत्नी कामानिमित्यबाहेर असतात परंतु कोविड १९ मुळे अनिश्चित काळासाठी घरात बंदीस्त असल्यामुळे तसेच कार्यालयातिल कामाचा बोजा आणि घरातील कामे या दुय्यम भुमिकेत त्यांची मोठया प्रमाणावर हेडसांड झाल्यामुळे कौटुबिंक कलक निर्माण झालेले दिसून येतात.

कोरोना काळात कौटुंबीक हिंसेत वाढ

मरनाच्या भेटीला अनेक वाटा असे म्हटले जाते म्हणजे मृत्यू येण्याची अनेक कारणे आहेत. संपुर्ण जग एका माहामारीचा सामना करीत आहे. कोरोना नावाचा नवा रोग आणि त्याचा थेट उपचारही नाही आणि म्हणुन आपण कोरोनाचा प्रसार तरी रोखू या विचारातून लॉकडाऊनचा पर्याय पुढे आला. कोरोना प्रचंड प्रमाणात वाढण्यास सुरूवात झाल्यानंतर अनेक देशांनी या मार्गाचा अवलंब केला. तसेच भारतात देखील २५ मोर्च २०२० पासून २१ दिवसाचा लॉकडाऊन जाहीर झाला. तो तीन वेळा वाढविण्यात आला, आता तो १७ मे पर्यंत राहणार आहे. लॉकडाऊनच्या नियमाचे काटेकोर पालन करीत घरी रहा सुरक्षित रहा असा संदेश सर्वत्रदिला जात आहे. साधारपणे समाजातील सर्वात सुरक्षित मानला जाणारा घटक म्हणजे स्त्रियांना मोठया प्रमाणात

कौटुंबिक अत्याचारांचा समाना करावा लागला. एका सर्वेक्षणानुसार असे सिध्द झाले की, आणिबाणी, आर्थिक संकटे, साथीचे रोग व टाळेबंदी इ. काळात महिलांवरील अत्याचाराच्या प्रमाणात वाढझाली आहे.

जागतिक आरोग्य संघटनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ट्रेडोस अधनोम यांनी जगाला संबोधीत करतांना म्हटले की, ''घरी राहण्याचे आदेश तसेच विलगीकरणाच्या उपायामुळे कौटुंबिक हिंसाचारांच्या घटनामध्ये वाढ होण्याची तीव्र शक्यता आहे.'' हिंसाचार रोखण्यासाठी देण्यात येणाऱ्या सेवांचा समावेश अत्यावश्यक सेवांमध्ये करावा, असेही त्यांनी सुचवीले होते. कौटुंबिक हिंसाचाराचे प्रमाण जगातील इतर देशाप्रमाणे भारतात देखील वाढले आहे. ज्या महिला मदतीसाठी संपर्क करू शकल्या त्यांच्या आकडेवारी वरून हा निष्कर्श काढण्यात आला परंतु तक्रार न करणाऱ्या महिलांची संख्या प्रचंड आहे.भारतात कौटुंबिक हिंसाचारांच्या तक्रारी या राष्ट्रीय महिला आयोगाकडे जातात, राष्ट्रीय महिला आयोगाच्या आकडेवारी नुसार या लॉकडाऊनच्या काळात आलेल्या तक्रारी सामान्य काळाच्या तुलनेत दुपटीने वाढल्या आहेत.

कौटुंबिक हिंसेचे परिणाम

- ❖ घरगुती हिंसेचे परिणाम हे चांगले असू शकत नाही. घरगुती हिसेचे अनेक वाईट परिणाम समाजावर दिसुन येतात. अशिक्षित व्यक्तीपासुन तर सुशिक्षितापर्यंत सर्वच आपल्या पत्नीला कमी अधिक प्रमाणात मारहाण करतांना दिसून येते म्हणजे ही समस्या घरगुती हिंसेमधुन निर्माण झाली आहे साधारणपणे पती पत्नी मध्ये कौटुंबिक कारणावरून मतभेद होत असते. बऱ्याचदा मारहाणीचे कारण बरेच शुल्क असते.
- ❖ आधुनिक काळात घरगुती हिंसेमुळे नववधुला जाळुन मारले जाते. ही समस्या आज मोठया प्रमाणावर उग्र रूप धारण करीत आहे. साधारपणे वधुला जाळण्याचे अमानवीय कृत्य पतीकडून केले जाते तसेच विधवा स्त्रियांवरील अत्याचारात वाढझाली आहे. विधवा स्त्रीला कोणीही आधार देत नाही. म्हणुन तिला अशा समस्यांचा सामना करावा लागतो.
- ❖ बलात्कार करणारा व्यक्ती हा कुटुंबातील सदस्य असतो स्त्रिया बदनामीच्या भितीने आपल्यावर झालेल्या बलात्काराची माहिती नोतेवाईकांना देत नाही. पर्यायाने बलात्कार करणाऱ्या व्यक्तीना संरक्षण मिळते.
- ❖ आज आपण बऱ्याचदा वर्तमान पत्रातून महिलांशी दुर्व्यवहार अशा बातम्या वाचत असतो अनेकदा कुटुंबातील वृध्द महिलावर देखील दुर्व्यवहार केला जातो.
- ❖ कोविड १९ च्या कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रमाणात झपाटयाने वाढझालेली आहे. पर्यायाने कौटुंबिक कलह निर्माण झाला आहे.

अशा प्रकारे घरगुती हिंसेमुळे समस्या निर्माण झाल्या आहेत. घरगुती हिसेचा वाईट परिणाम स्त्रियांच्या वाटयाला येतो. घरगुती हिंसेची कुठेही वाच्छता केली जात नाही. पर्यायाने ही समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. संरक्षण देणारे अनेक कायदे करण्यात आले स्त्री अत्याचारा विरोधात अनेक महिला संघटना कार्यरत आहेत दिवसेंदिवस घरगुती हिंसेच्या घटनांमध्ये वाढझाली आहे. आणि म्हणुन हिंसा ही एक जटील सामाजीक समस्या बनली आहे.

उपाय –

कौटुंबिक हिंसाचार कायदा हिंसाचाराचा प्रश्न भारतात सर्वकश स्वरूपाचा असला तरी सार्वजणीक जीवनात तो अदृश्य आहे. कारण कौटुंबीक अत्याचारा विषयी स्त्रि जाहिरपणे बोलत नाही. एखाद्या स्त्रीवर नवऱ्याने किंवा त्याच्या नातेवाईकाने अत्याचार केले, वाईट वागणूक दिली तर भारतीय दंड विधानाच्या ४९८ (अ) नुसार तो गुन्हा मानला जातो. भारताचे राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांनी १३ सप्टेंबर २००५ मध्ये या कायद्याला आपले समर्थन दिले आणि कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायद्याची अमंलबजावणी २६ आक्टोबर २००६ पासुन लागु झाली. हा कायदा देशातील सर्व नागरीका करीता लागु असेल. या कायद्याचे स्वरूप अतिशय व्यापक असल्यामुळे स्त्रियांना संरक्षणात्मक दृष्टीने विशेष उपयुक्त आहे. एखाद्या अत्याचार पिडीत स्त्रिने या काद्याच्या आधारे न्याय मिळविण्याचा प्रयत्न केल्यास प्रतिपक्षाला तिला या करीता लागणारा खर्च नुकसान भरपाई स्वरूपात द्यावा लागतो. कौटुंबिक हिंसेचा हा कायदा महत्वाचा असला तरी देखील प्रत्यक्ष व्यवहारात या कायद्या अंतर्गत गुन्हा नोंदविला जात नाही. ही वास्ताविकता आहे आणि म्हणुन

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

स्त्रियांनी या कायद्या अंतर्गत न्याय मगगण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना कोणीही सहकार्य करीत नाही. जोपर्यंत पुरूष प्रधान मानसिकतेत परिर्वतन होणार नाही तोपर्यंत स्त्रियांच्या स्थितीत परिर्वतन होणार नाही. स्त्रियांकडे व्यक्ती म्हणून पाहण्याची प्रवृती वाढीस लागणे आवश्यक आहे. पोलीस व न्याय व्यवस्थेत सुधारणा होणे आवश्यक आहे. तसेच कौटुंबिक मानसिकता बदलेने महत्वाचे आहे. जोपर्यत वरील प्रकारचे परिर्वतन होणार नाही. तोपर्यंत स्त्रियांच्या कौटुंबिक अत्याचारात बदल होणार नाही.

**संदर्भ सुची**


| पुस्तकोच नांव | लेखक | प्रकाशन |
|---|---|---|
| १.भारतीय समाज संरचनात्मक प्रश्न आणि सामाजीक समस्या | डॉ. प्रदिप आगलावे | श्री. साई प्रकाशन नागपुर |
| २.भारतीय समाज प्रश्न आणि समस्या | डॉ. बी.एम कऱ्हाडे | पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिर्श नागपुर |
| ३.भारतीय नारी | स्वामी विवेकानंद | स्वामी ब्रम्हास्थानंद नागपुर |
| ४.कर्तव्य साधना ऑनलाईन | साधना साप्ताहीक | साधना प्रकाशन |
| ५.महिला अत्याचार– विकिपीडीया | | |
| ६.प्रखर देशभक्त आणि राष्ट्रनिर्मिती डॉ. आंबेडकर पुस्तकालय | प्रा. अनिल जोंधळे | प्रबुध्द भारत आणि प्रकाशन व्यवसाय, नागपुर १७ |
| ७.स्त्रियांसाठी कायदे | ॲड. रेणु सुरेश देव | सकाळ मिडीयाप्रा.ली. ५९५ बुधवार पेठ पुणे |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# भारतीय राजकारण आणि जातिचा प्रभाव : एक चिंतन

डॉ.प्रकाश घ. कांबळे
कला,वाणिज्य व गृहविज्ञान महिला महाविद्यालय,जळगाव
मोबा.८९५६५९८६४९, E-mail :tushit034@gmail.com

'शिक्षणामुळे जातिचा विध्वंस होऊ शकतो काय?याचे उत्तर 'होय' त्याचप्रमाणे 'नाही'असे आहे.आज जे शिक्षण दिले जाते तेच जर दिले जाणार असेल तर त्या शिक्षणाचा जातिवर काहीच परिणाम होणार नाही.ती ज्या स्वरुपात आहे त्याच स्वरुपात राहील.'
-डॉ.बाबासाहेब आंबेडकर

साधारणत: सत्तर वर्षापूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जातिसंदर्भात वरील उद्गार काढले होते.आजही त्याचप्रकारचे शिक्षण दिले जाते.विवेकाधिष्ठित,विज्ञाननिष्ठ अशा शिक्षणाची आजही आपल्याकडे वानवाच आहे.आणि याचा राजकारणाशी फार घनिष्ठ संबंध आहे.सर्व चिकित्सेचा मार्ग धर्मचिकित्सेतून जातो हे जितके खरे आहे.अगदी त्याचप्रमाणे राजकारण हे सर्व क्षेत्राला व्यापून उरत असते,म्हणून त्याचा सुटा विचार करता येत नाही.राजकारण हे सर्वव्यापी असते.प्रस्तुत शोध निबंधामध्ये आंबेडकरी दृष्टिकोनातून भारतीय राजकारणावरील जातिच्या प्रभावाचा विचार करून त्यातून बाहेर पडण्याच्या मार्गासंदर्भातही स्वतंत्र चिंतन मांडले आहे.

आधुनिक भारतामध्ये भारतीय जातिव्यवस्थेचा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जितक्या सखोल पातळीवर अभ्यास केलेला होता तसा आजतागायत कोणी केला आहे असे दिसत नाही.त्यातही बाबासाहेब केवळ संशोधक आणि तत्त्वचिंतक नव्हते; तर समाजकारणात आणि राजकारणात राष्ट्रीय पातळीवर काम करणारे क्रांतिकारी असे राष्ट्रीय नेते होते.जातिव्यवस्थेची तीव्रता त्यांनी केवळ पहिलीच नव्हती तर तिचे हलाहल ते प्यालेही होते.व नंतरच्या काळामध्ये राष्ट्रीय राजकारणाचा भाग झाल्यानंतर राष्ट्रीय नेते आणि स्वत:ला महात्मा म्हणवणारेही आपापल्या जातीला चिकटूनच नव्हे; तर जात आणि वर्णाच्या समर्थनात  जाहीर भूमिकाही घेत होते. त्यामुळे जातिचा प्रश्न त्यांच्या पक्षाच्या राष्ट्रीय अजेंड्यावर येणे केवळ अशक्य होते.आणि बाबासाहेब मात्र जातिच्या प्रश्नाला बगल देऊन या देशाचे कल्याण कधीही होऊ शकणार नाही या निष्कर्षाप्रत आलेले होते.अगदी उर्वरित जगामध्ये क्रांती घडवून आणणारा मार्क्सवाद सुद्धा भारतीय परिप्रेक्षात त्यांना अपुरा वाटत होता.म्हणून तर ते रशियात क्रांती करणाऱ्या लेनिनला उदेशून म्हणाले होते,"जातिभेद व अस्पृश्यता ही कम्युनिझमच्या मूलतत्त्वांना सोडून आहेत.लेनिन भारतात जन्मला असता तर प्रथम त्याने जातिभेद व अस्पृश्यता यांना साफ गाडून टाकले असते व तसे केल्याखेरीज त्याने क्रांतीची कल्पनाही मनात आणली नसती."२ भारतीय क्रांतीची पूर्वअट जातिव्यवस्थेचे उच्चाटन ही आहे हे बाबासाहेबांनी पुन्हा पुन्हा प्रतिपादले व त्यासाठी शर्थीचे प्रयत्नही केले. कृतीच्या पातळीवरील त्यांनी केलेले वेगवेगळे प्रयोग पहिले तर हे आपल्या लक्षात येईल. मात्र आपल्याकडे म.गांधी सारख्या नेत्याला या जातीच्या प्रश्नापेक्षा खादीच्या प्रश्नाला प्राधान्यक्रम देणे आवश्यक वाटलेले आहे. म.गांधी यांनी बाबासाहेबांच्या खांद्याला खांदा लावून जातीच्या प्रश्नावर आंदोलन उभा केले असते तर वर्तमान वेगळे असते.मात्र ते होणे नव्हते असेच म्हणावे लागेल. म.गांधींनी शेवटच्या टप्प्यामध्ये अंतरजातीय विवाह झाले पाहिजेत यासाठी आग्रही भूमिका घेतली.मात्र जातिविध्वंसनासाठी तो काही प्रभावी उपाय नव्हता नाही. मुस्लीम आणि शीख यांच्या  स्वतंत्र मतदार संघाला त्यांनी मान्यता दिली मात्र बाबासाहेबांची स्वतंत्र मतदार संघाची मागणी ब्रिटीश सरकारने मान्य करूनही म.गांधीनी त्याला तीव्रपणे विरोध दर्शिविला त्यामुळेअधिकच दुही निर्माण झाली.या विरोधातूनच पुणे कराराचा जन्म झाला.ज्याचा एकूणच भारतीय राजकारणावर विपरीत परिणाम झाला.संविधान निर्मितीच्या वेळीही भारतीय जात वास्तव बाबासाहेबांच्या डोक्यात होते.त्यामुळेच 'समता-स्वातंत्र्य-बंधुता-न्याय'ही मूल्य आणि सर्वसामान्य भारतीय माणूस हा संविधानाचा केंद्रबिंदू ठेवला.Researvation आणि तत्सम प्रावधनाची व्यवस्था करणे हा त्याचाच एक भाग होता.त्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तीन गोष्टीचे विशेष प्रावधान केले होते.शिक्षण,प्रशासन आणि राजकारणात प्रतिनिधित्त्व देऊन उपेक्षित वर्गाला मजबूत करता येईल ही त्यापाठीमागे धारणा होती. व दुसरे म्हणजे संविधानाची नीटपणे आमलबजावणी झाली तर आपणाला अपेक्षित असलेली समाजव्यवस्था निर्माण होईल याचा त्यांना विश्वास होता.मागील सत्तर वर्षात संविधानाची नीटपणे अंमलबजावणी होऊ शकली नाही.आणि दुसरे म्हणजे अ.जा./अ.ज.आणि इ.मा.वर्गाला मिळालेले राजकीय आरक्षणही प्रतिनिधित्त्व म्हणून यशस्वी होऊ शकले नाही

ISSN : 2278-9308
July 2021

किंबहुना तसे ते होऊ दिले नाही.इतकेच कशाला येथील जातिव्यवस्थेच्या मजबुतीसाठीच त्याचा अधिक वापर झाला,आजही होतो आहे. स्वातंत्र्यानंतर इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा राजकरण हे जातीने अधिक प्रभावित झाले नव्हे तिथे 'जात' हा राजधर्म झाला.येथील धर्म,धर्मग्रंथ आणि त्यना प्रदान केलेले पावित्र्य हेच जातीचे अधिष्ठान आहे.त्याचे पावित्र्य नष्ट करणे हा या देशातील कुठल्याही राजकीय पक्षाचा प्रमुख सोडून द्या त्यांच्या जाहीरनाम्यातील शेवटचा मुद्धा म्हणूनही त्यांच्या अजेंड्यावर नसतो कारण जात आणि धर्म हे राजकारणातील चलणी नाणे राहात आलेले आहेत.ज्यांना जातीपाती आणि धर्मामध्ये ध्रुवीकरण करून सत्तेची पोळी भाजून घ्यायची आहे त्यांना जात नष्ट होऊ द्यायची नाही हे पहिल्यांदा समजून घेणे आवश्यक आहे.तरच जाती नष्ट करणे ही प्रमुख गरज कोणाची आहे आणि त्यासाठी कोणता कार्यक्रम देणे आवश्यक आहे हे लक्षात येईल.जात पाहून उमेदवार दिला जातो ,जात पाहूनच मतदान केले जाते,मतदारसंघाची निर्मिती करत असतानाही जात हेच प्रमुख सूत्र लक्षात घेतले जाते.यावरून राजकारण हे जातीने किती प्रभावित झाले आहे पहा...असे म्हणणे म्हणजे भोळेपणा आहे.हे केवळ परिणाम आहेत.आणि परिणामावर चर्चा करून कारण नष्ट होत नाही त्यासाठी कारणाची मीमांसा करावी लागते व ते नष्टही करावे लागते.राजकीय सत्ता पर्यायाने सरकार नावाची व्यवस्था प्रचंड अवाढव्य अशी असते सरकारने ठरवले तर काहिच अशक्य असू शकत नाही हे आपण कोरोना काळातील लॉकडाऊनच्या माध्यमातून अनुभवले आहे.मात्र कुठलेही सरकार जातिच्या प्रश्नाला हात लावायला तयार नाही.असे का होते आहे याचा विचार करूच मात्र त्यापूर्वी आणखी एका गोष्टीचा विचार करणे आवश्यक आहे.ते म्हणजे ज्यावेळी देशातील राजकारण अधिक प्रभावित होते त्यावेळी संपूर्ण व्यवस्थाच म्हणजे शिक्षण,अर्थकारण,समाजकारण,सांस्कृतिक धोरण आणि पर्यायाने देशातील सर्व मानवी समूह श्बालीत होतात आणि देश रसातळाला जातो.म्हणून इतर गोष्टीना दुरुस्त करण्याच्या भानगडीत न पडता राजकारणातूनच म्हणजेच संपूर्ण राजकीय व्यवस्थेतून जातीला हद्दपार करने आवश्यक आहे.जात भारतीय माणसाच्या नेणीवेत घट्ट बसलेली आहे हे खरेच आहे.ती राजकारणातून नष्ट झाली की मनामनातून ही नष्ट होईल असे नाही.मात्र राजकीय व्यवस्थेच्या माध्यमातून तसा राष्ट्रव्यापी कार्यक्रम राबवून ते शक्य आहे.कारण 'माणसाच्या सामाजिक अस्तित्वादावारे त्याच्या जाणीवा ठरत नसतात,तर माणसाच्या सामाजिक जाणिवावामुळे त्याचे अस्तित्त्व ठरत असते.'३ असे कार्ल मार्क्स म्हणाले होते आणि भारताची सामाजिक जाणीव जातीय आहे.तर भारतीय राजकारणाने तिला अधिकच चिवट आणि घट्ट करून ठेवलेले आहे.तिला ते साधे किलकिलेही होऊ देत नाही.पुन्हा तोच प्रश्न असे का?याची कारणमीमांसा केल्याशिवाय ही समस्या सुटणार नाही.स्वातंत्र्याच्या अगोदर राष्ट्रीय कॉंग्रेस हा एकमेव राष्ट्रीय पक्ष होता नव्हे तोच भारताचे सर्व काही होता.त्याची स्थापना व्योमोशचंद्र बॅनर्जी आणि तत्सम व्यक्तींनी केली होती.वर्तमान भारतात आठ राजकीय पक्ष राष्ट्रीय पक्ष म्हणू मान्यता प्राप्त आहेत.पैकी कॉंग्रेस,भाजपा,तृणमल कॉंग्रेस व माकप/भाकप हेच अधिक शक्तिशाली आहेत.बाकी त्या त्या राज्यापुरते मर्यादित आहेत जरी ते राष्ट्रीय म्हणून मान्यता प्राप्त असले तरी हे वास्तव लक्षात घेणे आवश्यक आहे.आणि जे खऱ्या अर्थाने राष्ट्रीय आहेत त्याचे संस्थापक हे ब्राह्मण आहेत हीही वस्तुस्थिती आहे.जातीच्या प्रभावाचा विचार करत असताना या वस्तुस्थितीकडे डोळेझाक करून चालणार नाही.या देशात पहिल्यांदा वर्ग बंदिस्त करून जात निर्मितीलाही तेच पहिल्यांदा कारण ठरले.वर्णव्यवस्था व जातव्यवस्थेच्या सर्वोच्च स्थान त्यांनीच पटकाविले.जातिव्यवस्थेचे सर्वोच्च लाभार्थी सुद्धा तेच.मागचे जाऊ द्या स्वतंत्र्याच्या सत्तर वर्षात कार्यपालिका,न्यायपालिका,प्रशासन आणि प्रसारमाध्यमे या लोकशाहीच्या चारही स्तंभावर त्यांचीच मक्तेदारी राहात आलेली आहे.धर्मसत्ता आणि राजसत्ता या दोन्हीचे सूत्रधार तेच राहात आलेला आहेत.ही सर्व वस्तुस्थिती मांडण्याचे कारण असे की,ज्यांना प्रचंड प्रमाणात जातीचा फायदा होत आलेला आहे ते जातव्यवस्थेला संपविण्याचा अजेंडा आपल्या पक्षाच्या माध्यमातून अथवा सत्तेच्या माध्यमातून राबविणे केवळ अशक्यच आहे. इतकेच नाही तर ते संपूर्ण राजकारण अधिकाधिक जातिधिष्टीत आणि धर्माधिष्टीतकसे होईल याचीच काळजी घेणार.अर्थात या जातीचा प्रादुर्भाव सर्वांनाच झालेला आहे हेही नाकारण्यात अर्थ नाही.म्हणून या जातव्यवस्थेचा फायदा केवळ ब्राह्मणानांच होतो आहे असे नाही तर तो सर्वच जात दांडगे आणि धन दांडगे यांना होतो आहे.त्यामुळे त्याचे लाभार्थी जात नष्ट कशी करणार?कारण 'इतिहास दाखवून देतो की जिथे नीतिशास्त्र आणि अर्थशास्त्र यांच्यात संघर्ष होतो.विजय नेहमीच अर्थशास्त्राचा होत असतो.स्वहितसंबधियानी आपली सत्ता,आपले अधिकार स्वतःहून सोडून दिल्याचे ऐकिवात नाही,जोपर्यंत पुरेशा ताकदीनिशी त्यांना तसे करण्यास भाग पाडले जात नाही."४ भारतीय जात वास्तवाच्या परिप्रेक्षात हे साधे सूत्र लक्षात घेणे आवश्यक आहे.**सारांश**,स्वतंत्र्यपूर्व आणि स्वातंत्रोत्तरभारतीय राजकारण जातीने संपूर्णपणे प्रभावी झालेले आहे.कारण भारतीय मन हे जातीय आहे.त्यापासून राष्ट्रीय आणि आं.रा.म्हणवले जाणारे नेतृत्त्वही अलिप्त राहू शकले नाही.डॉ.बाबासाहेबांनी जातिव्यवस्थेच्या विरुद्ध निकराची झुंज दिली आणि तिला कमिअधिक खिळखिळे करायचा यशस्वी प्रयत्न केला.त्यांच्या या प्रयत्नाला म.गांधी सारख्या राष्ट्रीय नेतृत्त्वाची साथ मिळाली असती तर जातीने लवकरच शेवटच्या घटका मोजल्या असत्या मात्र तसे होऊ शकले नाही.संविधानाच्या माध्यमातून जातीय

राजकारणाला शह द्यायचा प्रयत्न केला मात्र तोही यशस्वी होऊ शकला नाही.नव्हे जाति अधिक घट्ट करण्याचा कार्यक्रम म्हणूनच त्याकडे पहिले गेले.संविधानाचा अंमल नीट न झाल्यामुळे राजकारण अधिकाधिक जातिग्रस्त झाले.राष्ट्रीय पक्ष आणि देशाची सर्वोच्च सत्ता व लोकशाहीचे सर्व खांब उच्चवर्णीयांच्या हाती राहिले.व त्यांनी इतर जात दांडगे व धनदांडगे यांना आपल्या दावणीला बांधून राजकारण अधिकच जातिग्रस्त केले. हे सर्व जातीव्यवस्थेचे लाभार्थी असल्यामुळे राजकारणाला जातीमुक्तीचे परिमाण देणे केवळ अशक्यच.मात्र भारतीय वास्तव हे आहे, की जातीच्या लाभार्थ्या पेक्षा तिच्या बळीची संख्या केवळ प्रचंड अशी आहे.त्याने एक वज्रमुठ करून एक प्रचंड मोठे जनआंदोलन उभारायला हवे व त्यामाध्यमातून भारतीय राजकारण पर्यायाने सत्ताकारण हातात घेवून त्या सत्तेच्या माध्यमातून जातीउच्चाटणाचा कार्यक्रम प्रभावीपणे राबवायला हवा तरच येथील राजकारण पर्यायाने हा देश जातिमुक्त होईल.

संदर्भ:

१.चव्हाण दिलीप,समकालीन भारत:जातिअंताच्या दिशा,हरिती पब्लिकेशन्स,पुणे,दु.आ.२०१९.पृ.क्र.१३ वरुन उधृत
२.कांबळे प्रकाश,अब्राह्मणी योद्धा कॉ.शरद् पाटील,लोकायत प्रकाशन,सातारा,प्र.आ.२०२१,पृ.क्र.०२
३.तेलतुंबडे आनंद,साम्राज्यवाद आणि जातिविनाश,सुगावा प्रकाशन,पुणे,प्र.आ.२००७,पृ.क्र.७६ वरुन उधृत
४.तत्रैव,पृ.क्र.२०० वरुन उधृत

ISSN : 2278-9308
July 2021

# जाती व वर्णव्यवस्थेचा भारतीय समाजावर झालेला परिणाम

प्रा. डॉ. नागोराव के. सोरे
(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)
श्री बा. दे. पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा जि. यवतमाळ.
मो.९५११६३०९४४

**प्रस्तावना:**

भारतीय समाजव्यवस्था ही प्रामुख्याने वर्णव्यवस्था आणि जातिसंस्थेवर आधारीत आहे. जातिसंस्था हे भारतीय समाजाचे एक मुख्य लक्षण असून, वस्तुनिष्ठ अध्ययन करण्यासाठी चातुर्वर्ण्य व्यवस्था आणि जातिसंस्थेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. भारतीय समाजाचे शेकडो जातींमध्ये विभाजन झालेले आहे. त्यामुळे भारतीय समाज एकसंघ नाही. जातिसंस्था ही एक सामाजिक संस्था आहे. परंतु या संस्थेस हिंदु धर्माचा आधार आहे. अशी जातिसंस्था जगात इतर देशात आढळून येत नाही. भारतात हिंदु धर्माची मान्यता असल्यामुळे जातिसंस्था शेकडो वर्षापासून टिकून आहे. हिंदु धर्माची प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या जातीची सदस्य आहे. विशेष महत्वाची बाब म्हणजे भारतीय समाजात व्यक्तीचा दर्जा हा त्याच्या जातीवरून निश्चित होतो. व्यक्तीची ओळख त्याच्या गुण किंवा कर्तृत्वावरून केली जात नाही. तर जातीच्या आधारावर व्यक्तीची ओळख करण्याची परंपरा आपल्या देशात आहे. भारतीय समाज जीवनावर जातिसंस्थेचा फार मोठा प्रभाव पडला आहे.

वर्ण आणि जाती या वेगवेगळया संकल्पना आहेत. वर्णव्यवस्थेमुळे भारतीय समाजाचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या चार वर्णात विभाजन झाले होते. तर जातिसंस्थेमुळे भारतीय समाजाचे शेकडों जाती आणि उपजातीत विभाजन झालेले आढळून येते. प्राचीन काळी भारतीय समाजात प्रथम वर्णव्यवस्था अस्तित्वात आली. त्यानंतर जातीव्यवस्था निर्माण झाली. वर्ण व जातीचे महत्त्वाचे साम्य म्हणजे प्रत्येक वर्ण आणि जातीचा दर्जा हा समान नाही. वर्णव्यवस्था आणि जातिव्यवस्थेमुळे भारतीय समाजात विषमता निर्माण झाली. वर्ण आणि जाती या जन्मावर आधारीत असल्यामुळे व्यक्तीचा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ दर्जा हा जन्मत:च निश्चित होत आला.

सुप्रसिध्द भारतीय समाजशास्त्रज्ञ डॉ. जी.एस.धुर्वे यांनी **'Caste and Race in India'** (१९६७) या ग्रंथात स्पष्टपणे नमूद केले आहे की, " **आर्य जेव्हा भारतात आले तेव्हा त्यांच्यामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य असे तीन सुस्पष्ट वर्ण, वर्ग निर्माण झाले होते. या तीन वर्गामध्ये आपसातच विवाह करायला हवेत असे बंधन नव्हते. तरी देखील त्यांच्यात अशा प्रकारचे विवाह क्वचित प्रसंगी होत असावे.**" चौथ्या शुद्र वर्णाचा उल्लेख तत्कालीन वाड्.मयात उशीरा येतो. प्राचीन वैदिक वाड्.मयात प्रामुख्याने ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या चारही वर्णाचा उल्लेख आहे.

वर्णव्यवस्थेत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या चार वर्णांचा समावेश करण्यात आला होता. म्हणून वर्णव्यवस्थेला चातुर्वर्ण्य व्यवस्था असे म्हटले जाते. चातुर्वर्ण्यव्यवस्थेत ब्राह्मण वर्णाचा वर्चस्व आणि श्रेष्ठत्व टिकून रहावे, याकरीता वर्णव्यवस्थेची निर्मिती करण्यात आली. इतकेच नव्हे तर वर्णव्यवस्थेस धार्मिक अधिष्ठान दिले गेले आहे.

**जातिव्यवस्थेवर झालेला परिणाम:**

आधुनिक काळात पाश्चात्य शिक्षण, वैज्ञानिक विचारसरणी, औद्योगीकरण, नागरीकरण, वाहतूक आणि संचार साधनात वाढ, नवीन व्यवसाय, सामाजिक चळवळ, लोकशाही मूल्ये, शासकीय कायदे इत्यादी कारणांमुळे जातिव्यवस्थेत परिवर्तन घडून आले आहे. याचा विचार आपण केला आहे. जातिव्यवस्थेत वर्तमान काळात नेमके कोणते परिवर्तन घडून आले याचा विचार करणे आवश्यक आहे. आज जातिव्यवस्था पूर्णत: नष्ट झाली नाही, अजूनही जातिव्यवस्था टिकून आहे. परंतु पूर्वीची परंपरागत जातिव्यवस्था आज नाही. जातिव्यवस्थेमध्ये वरील कारणामुळे बराच बदल

घडून आला आहे. पूर्वीसारखी जातीची कडक बंधने राहिली नाहीत. जातिप्रथेमध्ये बरीच शिथीलता निर्माण झाली आहे. पूर्वीसारखा लोकांचा जातिभिमान आज आढळून येत नाही. जातिव्यवस्थेमध्ये घडून आलेले परिवर्तन पुढील विवेचनावरून अधिक स्पष्ट करता येते.

**१.व्यवसायाच्या निर्बंधामधील परिवर्तन :** पूर्वी व्यक्तीने आपल्या जातीचाच व्यवसाय करणे बंधनकारक होते. प्रत्येक जातीचा एक विशिष्ट व्यवसाय असायचा. लोक आपआपल्या जातीचा परंपरागत व्यवसाय करायचे. दुस—या जातीचा व्यवसाय करण्याची सक्त मनाई होती. आधुनिक काळात व्यवसायाच्या संदर्भात असलेल्या जातीच्या निर्बंधामध्ये आमुलाग्र परिवर्तन झाले आहे. व्यक्तीने आपल्या जातीचा परंपरागत व्यवसाय केलाच पाहिजे, अशी सक्ती कुणी करू शकत नाही. एखादी व्यक्ती आपल्या सोयीनुसार परंपरागत व्यवसाय इच्छेने करीत असेल, ती गोष्ट वेगळी आहे. परंतु जातीचा व्यवसाय केला पाहिजे असे बंधन राहिले नाही. कुणीही व्यक्ती आपल्या शिक्षण आणि गुणवत्तेनुसार कोणताही व्यवसाय करू शकते. आज अनेक लोक आपल्या जातीचा परंपरागत व्यवसाय करीत नाही. कनिष्ठ जातीचे लोक शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण घेऊन वेगवेगळे व्यवसाय करीत आहे. ब्राह्मण आपला पुरोहिताचा व्यवसाय सोडून नवे व्यवसाय करीत आहेत. यावरून हे स्पष्ट होते की व्यवसायाबाबत जातीच्या निर्बंधामध्ये आमुलाग्र परिवर्तन घडून आले आहे.

**२.भोजनासंबंधीच्या निर्बंधात परिवर्तन:**खानपानाच्या संदर्भात जातीची बंधने होती. उच्च जातीचे लोक कनिष्ठ जातीच्या लोकांसोबत भोजन करीत नव्हते. अस्पृश्य जातीच्या लोकांसोबत भोजन करणे सामाजिक गुन्हा मानला जात होता. परंतु अलिकडे भोजनासंबंधीच्या निर्बंधाचे कुणी पालन करीत नाही. सर्व जाती—जमाती आणि धर्माचे लोकं एकमेकांसोबत भोजन करतात. एकमेकांना आपल्या घरी भोजनासाठी आमंत्रित करतात. शहरात तर सर्व जातीचे लोक एकत्रित भोजन करतात. कोण, कोणत्या जातीचा आहे याची विचारपूस देखील करत नाही. शहरातील भोजनालये आणि उपहारगृहात सर्वच जाती, धर्माचे लोक भोजन आणि जलपान करतात. भोजनालय किंवा उपहारगृह कोणत्या जातीच्या व्यक्तीचे आहे याची कुणी चौकशी करीत नाही. भाजनासंबंधी आता कोणते विशेष निर्बंध राहिले नाहीत.

**३.ब्राह्मणांचे प्रभुत्व घटले:** जाती व्यवस्थेत ब्राह्मण जातीचे स्थान सर्वश्रेष्ठ होते. ब्राह्मणांना जातिव्यवस्थेने विशेषाधिकार दिले होते. धार्मिक, सामाजिक, शिक्षण, राजकीय या सर्वच क्षेत्रात ब्राह्मणांचे प्रभुत्व होते. ब्राह्मण सांगतील त्याप्रमाणे इतर जातीचे लोक वर्तन करायचे. परंतु शिक्षण, लोकशाही मूल्ये, कायदे वैज्ञानिक विचारसरणी इत्यादीमुळे जन्मत: कुणी श्रेष्ठ नाही. जन्मत: सर्व माणसे समान असतात, या विचारास विशेष प्राधान्य मिळाले. त्यामुळे समाजव्यवस्थेतील ब्राह्मणांचे महत्व कमी झाले. जातिव्यवस्थेत केवळ जन्माच्या आधारावर ब्राह्मणास श्रेष्ठ मानले जायचे. परंतु आधुनिक काळात कनिष्ठ आणि अस्पृश्य जातीच्या लोकांना शिक्षणाची संधी मिळताच आम्ही ज्ञान, बुध्दी आणि कौशल्य यामध्ये उच्च जातीपेक्षा कमी नाही, हे त्यांनी सिध्द केले. परिणामत: जातिव्यवस्थेने निर्माण केलेली श्रेष्ठ—कनिष्ठतेची भावना कमी होवू लागली आहे.

**४.विवाह संबधीच्या प्रतिबंधामध्ये परिवर्तन:** जातिप्रथेच्या नियमानुसार व्यक्तीने आपल्याच जातीमध्ये विवाह करण्याचे कडक बंधन होते. दुस—या जातीमध्ये विवाह करणे निषिध्द मानण्यात आले होते. जातीअंतर्गत विवाह हे जातीचे महत्वाचे वैशिष्टे आहे. कायदयाने जातीच्या आधारावर भेट करणे गुन्हा मानण्यात आला. वेगवेगळया जातीच्या मुलामुलींना आपल्या इच्छेनुसार एकमेकांशी विवाह करण्याची कायदयाने परवानगी दिली आहे. शासनाने **नोंदणी विवाहाचा कायदा** केला आहे. भिन्न जातीचे मुलं मुली **नोंदणी पध्दतीनुसार** कोर्टात जाऊन विवाहकरू शकतात. कायदयाद्वारे आंतरजातीय आणि प्रेमविवाह करण्यास प्रोत्साहन देण्यात आले आहे. त्यामुळे आंतरजातीय विवाह करण्यास घरच्या लोकांना कितीही विरोध असला तरी, त्यांना आंतरजातीय विवाह करण्यापासून कुणी रोखू शकत नाही. मात्र आंतरजातीय विवाहास कायदयाने मान्यता दिली असली तरी अजुनही लोकं आपल्याच जातीमध्ये विवाह करतात.त्यामुळे आंतरजातीय विवाहाचे फारसे प्रचलन आढळून येत नाही. विवाह संबंधीचा प्रतिबंधामध्ये परिवर्तन झाले असेल तरी, आजही लोकं

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

जातीअंतर्गत विवाह करणे पसंद करतात. म्हणून जातीअंतर्गत विवाहाचा प्रथेमध्ये विशेष परिवर्तन घडून आलेले आढळून येत नाही.

५.**अस्पृश्यतेचे निर्मुलनः** असपृश्यते सारखी अतंत्य क्रुर प्रथा जातीव्यवस्थेतून निर्माण झाली आहे. जातिव्यवस्थेतून निर्माण झाली आहे. जातिव्यवस्थेत अस्पृश्यांचा दर्जा सर्वात खालचा होता. अस्पृश्यांना मुलभूत मानवी अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले होते. जातिव्यवस्थेत सर्वात जास्त अन्याय अत्याचार हे अस्पृश्यांवर झालेत. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी **जोतीराव फुले** यांनी १९ व्या शतकात फार मोठे कार्य केले. **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी** जातिप्रथा आणि अस्पृश्यतेचे निर्मूलन करण्यासाठी देशात अस्पृश्यांनी स्वतंत्र चळवळ निर्माण केली. अस्पृश्य समाजाचा विकास घडवून आणण्याच्या संदर्भात **डॉ. आंबेडकरांचे**विशेष योगदान आहे. **राज्यघटनेच्या १५** व्या कलमानुसार धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अधारावर भेदभाव करण्यास कायदयाने मनाई करण्यात आली. १७ व्या कलमानुसार असपृश्यता नष्ट करून अस्पृश्यता पाळणे कायदयाने गुन्हा ठरविण्यात आला. भारतातील सर्व जातीधर्माच्या लोकांना समान मानण्यात आले. आणि सर्वाना समान अधिकार देण्यात आले. आज कुणी अस्पृश्यांचा विटाळ मानत नाही. असपृश्य लोकांनी शिक्षण घेवून स्वत:ची प्रगती केली. आज भारतात कायदयाने अस्पृश्यता नष्ट झाली आहे. कुणीही असपृश्यांचा विटाळ मानत नाही हे सत्य असेल तरी असपृश्येतेचे विषाणू उच्च जातीच्या मनातून समुळ नष्ट झाले नाही. उघडेपणे कुणी अस्पृश्यता पाळत नसेल तरी आंतरीक स्वरूपात असपृश्यता पाळली जाते.

अशाप्रकारे जातीव्यवस्थेत परिवर्तन घडून आले आहे, त्यामुळे नजिकच्या काळात जातिव्यवस्थेचे निर्मुलन होईल असा विचार सर्व सामान्य लोकांच्या मनात येवू शकतो. परंतु देशातील सद्य परिस्थितीचा वस्तुनिष्ठपणे विचार केल्यास जातीव्यवस्था पूर्णतः नष्ट होईल की नाही, याबद्दल शंका वाटते. विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकापासून भारतातील जातीव्यवस्थेचे निर्मुलन करण्याऐवजी ही व्यवस्था दृढ करण्याचे प्रयत्न होत असल्याचे आढळून येते. देशात अंधश्रध्दा, कर्मकांड, धार्मिक कट्टरता, धर्मांधता इत्यादी गोष्टीला नियोजित पध्दतीने प्रोत्साहन दिल्या जात आहे. स्वातंत्र्यानंतरच्या ४०–४५ वर्षात जातीव्यवस्था नष्ट करण्याचे प्रयत्न झालेत त्यामुळे जातीसंस्थेत परिवर्तन घडून आले. परंतु अलिकडे जातीव्यवस्था अधिक मजबूत करण्याचे प्रयत्न केल्या जात आहेत. जातीच्या आधारावर सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय संघटन निर्माण केले जात आहे. त्यामुळे भविष्यात जातीव्यवस्था नष्ट होण्याऐवजी ती अधिक मजबुत होण्याची शक्यता अधिक आहे. परिणामतः देशात जातीवादीच्या ज्वलंत समस्या निर्माण होईल. पुढे त्यातून जातीसंघर्ष घडून येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**संदर्भ सूचि**

१.आठल्ये विभा – 'भारताचा इतिहास' अंशुल पब्लिकेशन्स रेशीमबाग नागपुर–९ प्रथमावृत्ती– १ जाने २००३.

२.आगलावे डॉ. प्रदिप – ' भारतीय समाज संरचना आणि समस्या' तिसरी आवृत्ती, २००८, साईनाथ प्रकाशन नागपूर–१०.

३.गोडबोले, श्री.त्र्यं – ' मानवैकात्मता' प्रथमावृत्ती–१९९३, त्रिदल प्रकाशन, गिरगाव, मुंबई–०४.

४.दिक्षित नी.सी – ' भारताचा इतिहास' द्वितीय आवृत्ती–२००४ पिंपळापूरे ॲन्ड कं. पब्लिशरर्स, नागपूर–३२.

५.सुमंत यशवंत, पुंडे द.दि– ' महाराष्ट्रातील जाती संस्थाविषयक विचार' प्रतिमा प्रकाशन, शिवदास पेठ, पुणे–३०.

# नगरपरिषद मधिल निर्वाचित महिला प्रतिनिधीची नगरविकासात भुमिका

डॉ. मनोज श्रीकृष्णराव पवार
मातोश्री अंजनाबाई मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय,नरखेड जि.नागपूर
Mail ID: - manojpawar.manoj@gmail.com ,Mob.No:-९४२१८२९०६६

**गोषवारा:—**

मानव समुहात स्त्री जातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. समाज व्यवस्थेच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास स्त्री व पुरुष दोघेही समान आहेत. समाजाला जर विकसित करावयाचे असल्यास दोन्ही घटकांचा समानतेने विकास होणे आवश्यक आहे. परंतू पुरातन काळापासून स्त्रीयांना गैण स्थान दिल्या गेले आहे. चुल व मुल या पलीकडे स्त्रियांकडेच कोणतेच काम देण्यात आले नाही. स्त्रियांवर पुर्वीपासूनच धार्मिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय बंधणे घालण्यात आली. धार्मिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रापासून स्त्रियांना दुर ठेवल्या गेले. स्त्री म्हणजे प्रजोत्पादनचे एक साधन म्हणून राहून गेले. मनु विचार सरणीच्या काळात तर पुरुषाचे सर्व दोष स्त्रिला चिटकविण्यात आले. या काळातच सतिप्रथा, बहुविवाह, बालविवाह, देवदासी, या सारख्या अनिष्ट प्रथांची सुरवात झाली. यामुध्ये महिलांचे जिवण फारच कष्टाचे बनले. स्वातत्र्योत्तर कालखंडात महिला सुधार कार्यक्रमाला सुरवात झाली. याच कालखंडात अनिष्ट प्रथांच्या निमुलनामध्ये ज्योतिबा फुले, सावित्री फुले, राजाराम मोहनराय, स्वामी दयानंद सरस्वती या सारख्या समाजसुधारकांनी महिलांचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न केलेत. यामध्ये स्वातंन्त्र्य कालखंडात केंद्रीय समाजकल्यान मंडळ, महिला आयोग, महिला विकास महामंडळ इत्यादीच्या माध्यमातून महिलांच्या विकासाला सुरवात झाली. यांच्या माध्यमातून महिलांना अनेक अधिकार व हक्क मिळालेत. यामध्ये मतदाराचा अधिकार मिळाला व राजकारणांमध्ये सहभागाची संधी मिळाली.

**प्रस्तावना:—**

विश्वाच्या निर्मिती सोबत सजीव निर्मिती मध्ये स्त्री आणि पुरूष या दोन वर्गाची रचना निसर्गाने केली आहेआणि समाज व्यवस्थाच्या दृष्टीने पाहिले तर स्त्री आणि पुरूष हे दोघेही समान आहेत आणि समाजाला निरंतर प्रगतीच्या दिशेने न्यायचे असेल तर दोघांचाही सारखाच विकास होणे आवश्यक आहे.परंतु भारतास इतर सर्व देशात अगदी इ.स.पुर्व काळा पासून तर आज पर्यत समाज व्यवस्थेने स्त्रीला गौण स्थान दिले आहे.महिलांमध्ये क्षमता असतांना सुध्दा 'चुल व मूल' या पलीकडे स्त्रीयांकडे कोणतेही काम दिले नाही.वैदिक काळाचा विचार केला तर असे दिसून येईल की, स्त्रीला धार्मिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय, क्षेत्रात स्त्रीला फार महत्व दिल्या जात नव्हते, तसेच स्त्रीलाआपल्या वडीलांचा संपत्ती मध्ये वारसा हक्क सुद्धा मिळत नसे मध्ययुगीन काळखंडामध्ये मात्र स्त्रिच्या अधोगतीला सुरूवात झाली. वैदिक काळात वेदपठण करण्याऱ्या स्त्रीला शुद्राचा दर्जा प्राप्त झाला.

विवाह व प्रजोत्पत्ती हे पुरूषाचे ध्येय आणि स्त्री म्हणजे ध्येय प्राप्तीचे साधन होते.याच काळात मनु विचार सरणीचा स्विकार होवून पुरूषाच्या अंगाचे दोष स्त्रीला चिटकविले.तर स्वातंत्रपुर्व काळात स्त्रीसुधार कार्याला सुरूवात झाली. सतीप्रथा, बहुविवाह, विधवा पुनर्विवाह, बालविवाह प्रथा बंदी इत्यादी कायद्याची सुरूवात झाली.स्वातंर्त्योत्तर काळात स्त्री सुधारणा कार्यक्रमाची सुरूवात झाली यामध्ये प्रामुख्याने केंद्रीय समाज कल्याण मंडळ, महिला आयोग, महिला विकास महामंडळ इत्यादीच्या माध्यमातून महिला विकासाला सुरवात झाली.स्वातंर्त्यानंतर महिलांना अनेक अधिकार व हक्क देण्यात आलेत. या हक्का बरोबर महिलांना मतदानाचा हक्क मिळाला. परंतु महिलांना राजकारणामध्ये योग्य सहभाग मिळाला नाही राजकारणामध्ये महिलांचा सहभाग हा फारच अल्प स्वरूपाचा होता.देशाचा एंकदरीत जर विकास साधायचा असेल तर देशाच्या अर्ध्या लोकसंख्येला विकास प्रक्रियेपासून दूर ठेवून विकास साध्य करता येणार नाही म्हणून महिलांचा राजकारणातील सहभाग वाढविणे आवश्यक आहेही बाब लक्षात घेवून महिलांचा राजकारणातील सहभाग वाढविण्यासाठी २४ एप्रिल १९९३ ला महिलांना स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायत राज मध्ये

३३ टक्के आरक्षण देण्याकरिता ७३ आणि ७४ व्या घटना दुरूस्ती करून स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायत राज संस्थेमधील जागांवर त्याच बरोबर पदावर ३३ टक्के आरक्षण स्त्रीयांना देण्यात आले आहे.

या आरक्षणामुळे अनेक महिला राजकारणात आल्यात आणि त्यांनी आपल्या कतृत्वाचा ठसा उमटविलाआणि राजकारणातील महिलांचा सहभाग वाढला.त्यामुळे २०११ ला स्थानिक स्वराज्य संस्थेमधिल महिला आरक्षण हे ३३ टक्के वरून ५० टक्के करण्यात आले.आणि यामुळे महिलांचा स्थानिक राजकारणातील सहभाग वाढला व या सहभागामुळे मोठया प्रमाणात त्या राजकारणात आल्या व त्यामुळे स्त्रीयांचा राजकारणातील सहभाग तर वाढलाच व सोबतच सामाजिकरणातील सहभाग सुद्धा वाढला इतकेच नाही तर अनेक महिला वेगवेगळया पदावर आल्या आणि पदभार सांभाळतांना महिलांनी आपल्या कार्याचा ठसा देखील उमटविला.काही स्त्रीयांनी तर पुरूषांनाही लाजवेल अशा पध्दतीने कामे करून दाखविले आहे.आज मोठया प्रमाणात स्त्रीया राजकारणामध्ये सहभाग घेत असतानां दिसून येते.त्यापैकी किती महिला स्वत: राजकारणात आल्या व कितीमहिला अशा आहेत की ज्यांना राजकीय पाठबळ किंवा घराण्याचे पाठबळे लाभते. किती महिलांचा कुंटूबातील पती, वडील, भाऊ, सासरे, किंवा अन्य जवळचा नातेवाईक हा राजकारणातील प्रस्थापित नेता असतो.अनेकदा आरक्षणाच्या तरतुदीमुळे या पुरूष नेत्याला निवडणूक लढविता येत नाही त्यामुळे नाईलाजाने आपल्या कुंटूबातील एखादया स्त्रीला निवडणूकीच्या रिंगणात उतारण्याचे धाडस करतात.या स्त्रीया निवडून आल्यात तरी त्यात पुरूषाचा वाटा मोठया प्रमाणात असतो.अशा पाठबळातून निवडून आलेल्या महिलांची सर्वसूत्रे ही पुरूष सांभाळतात.काही वेळातर महिलांना कोणत्या कागदावर आपण सही करीत आहोत याची साधी कल्पना सुद्धा अनेक वेळा नसते.कुंटूबातील सदस्य जे सांगतील त्याच गोष्टी या महिला करीत असतात.आज स्थानिक स्वराज्य संस्था आरक्षणामुळे महिलांचा सहभाग वाढला व राजकारणातील सहभागामुळे महिलांमध्ये आपले अधिकार व क्षमता या वापर करण्याची संधी मिळाली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिला आरक्षणामुळे राजकारणातील महिलांचा सहभाग वाढला. व महिलाचे राजकीय व सामाजिक सक्षमीकरणाचा एक नवा मार्ग सुरू झालात. राजकारणातील सहभागामुळे राजकीय व सामाजिक जबाबदारीचा जाणिव महिलांमध्ये निर्माण झाली व महिला सक्षमीकरणाला गती मिळाली या राजकीय सहभागामुळे महिला विकासा सोबतच समाज विकासात काय बदल घडून येईल हे पाहणे महत्वाचे ठरले.

**स्थानिक स्वराज्य संस्था:—**

स्थानिक स्वराज्य संस्था या स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या संस्था आहेत या संस्थांच्या माध्यमातून स्थानिक लोकांच्या समस्या स्थानिक पातळीवर सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रामुख्याने दोन भाग पडतात. १)ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्था २) नागरी स्थानिक स्वराज्य संस्था. ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थेलाच पंचायतराज सुध्दा म्हणतात. स्थानिक स्वराज्य संस्था ह्या केंद्र शासन व राज्य शासनाच्या तुलनेने जनतेच्या अधिक जवळचे असतात. याचे प्रमुख कारण म्हणजे या संस्थामधिल प्रतिनिधी हे संस्थेंच्या अत्यंत जवळच्या असतात.

**स्थानिक स्वराज्य संस्थेचा अर्थ:—**

स्थानिक पातळीवर लोकशाही विकेंद्रीकरणातून स्थानिक गरजानुरुप कार्य करणाऱ्या स्थानिक जनप्रतिनिधी मार्फत चालविल्या जाणारा व्यवस्थेला स्थानिक स्वशासन म्हणतात. गिलखिस्त, "स्थानिक स्वशासन संस्था म्हणजे केंद्र अथवा राज्यशासनाला वास्तविक स्वरुपात सहाय्यक म्हणून कार्य करणारी संस्था जिला एका मर्यादित क्षेत्रात कार्य करण्याचे स्वातंत्र्य असते."

भारताचे संविधान (७ व्या अनूसुचितील, राज्यसुचितील ५ वी तरतुद) स्थानिक शासन म्हणजे महानगर पालिका, सुधारणा विस्वत मंडळे, खाणी वस्ती प्राधिकरणे आणि स्थानिक स्वयंशासन किंवा ग्राम प्रशासन यांच्या प्रयोजनार्थ असलेली अन्य स्थानिक प्रधिकरणे यांची घटना व त्यांचे अधिकार.स्वातंर्त्यपूर्व काळात स्थानिक स्वशासन संस्थाचे प्रथम नागरी व नंतर ग्रामीण स्तरावर लोकशाहीकरण सुरू झाले.विकेंद्रिकरणासही प्रारंभ झाला परंतू लोकशाही विकेंद्रिकरणाची प्रक्रीया वास्तव अर्थाने स्वातत्योत्तर काळात गतीमान झाली.१५ आगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र

झाला व स्वातंत्या प्राप्तीने भारतात स्थानिक स्वशासन संस्थेमध्ये क्रांती पर्वच सुरू झालेत.केंद्रिय आरोग्य मंत्री अमृता कौर यांच्या अध्यक्षतेखाली भारतातील सर्व प्रांताच्या स्थानिक शासन मंत्र्याची परिषद दिल्ली येथे १९४८ आयोजत करण्यात आली.या परीषदेच्या उद्घाटन प्रसंगी तात्कालीन पंतप्रधान जवाहलाल नेहरू यांनी स्थानिक स्वशासनाच्या पुढील विधान केले.''स्थानिक स्वशासन हा कोणत्याही लोकशाहीचा पाया आहे व तो असलाच पाहिजे लोकांना केवळ वरच्या स्तरावरील नाही.जो पर्यत तुम्ही लोकशाहीचा पाया खालच्या स्तरापासून बांधत नाही तोपर्यत वरच्या स्तरावरील लोकशाही यशस्वी होणार नाही.''असे उद्गार काढले.

स्वातंर्त्यानंतर भारताने संसदीय लोकशाही पद्धतीचा स्विकार केला व २६ जानेवारी १९५० पासून भारतीय राज्यघटनेची अंमलबजावणी सुरू झाली व भारत सार्वभौम बनला.८६ भारतीय राज्यघटनेतील चौथ्यामार्गदर्शक तत्वात कलम ४० अंतर्गत ग्राम स्तरावर ग्रामपंचायतीची स्थापना करण्यासंबधी तरतूद आहे.या मार्गदर्शक तत्वानुसार का होईना नगरपरिषदतीना घटनात्मक दर्जा प्राप्त झालेला आहे.तसेच कलम २४६ नुसार राज्याच्या घटक कायदे मंडसत स्थानिक स्वशासनाच्या संदर्भातील कोणत्याही विषयाच्या संदर्भात कायदे करण्याची अनन्य साधारण शक्ती प्राप्त झालेली आहे.लोकशाही नियोजनाची व विकेंद्रिकरणाची जसजशी गरज भासू लागली तसतशी नागरी स्थानिक स्वशासनाच्या विकासाला गती मिळाली.

**संशोधनाचे उद्देश:—**

- नगरपरिषद मधिल निर्वाचित स्त्री प्रतिनिधीच्या कार्यपध्दतीत होणाऱ्या बदलाचे अध्ययन करणे. महिलांना नगरपरिषद मध्ये पुरुषासोबत काम करित असतांना येणाऱ्या अडचणीचे अध्ययन करणे.
- नगरपरिषद मधील सहभागामुळे महिलांच्या सामाजिक व राजकीय जिवनामध्ये झालेल्या बदलाचे अध्ययन करणे.
- नगरपरिषद मधील सहभागामुळे महिलांशी निगडीत प्रश्न सुटण्यास मदत झाली का ते अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितकृत्य:—**

- नगरपरिषद मधील निर्वाचित स्त्री प्रतिनिधीच्या कार्यपध्दतीत सकारात्मक बदल झाला.
- निर्वाचित महिलांना नगरपरिषद मध्ये पुरुषासोबत काम करतांना अडचणी आल्यात.
- नगरपरिषद मध्ये कार्य करित असतांना त्यांच्या सामाजिक व राजकीय जिवनामध्ये सकारात्मक बदल झाला.
- नगरपरिषद मधील महिलांचा सहभाग वाढल्यामुळे महिलांशी निगडीत प्रश्न सोडविण्यास मदत झाली.

**अध्ययनाचे क्षेत्र:—**

प्रस्तृत संशोधनात नागपुर जिल्ह्यातील नरखेड व काटोल नगरपरिषद चा समावेश करण्याात आला.

**अध्ययनाचे विश्व:—**

समाजकार्य संशोधनामध्ये सामामजिक प्रश्न व सामाजिक समस्या यांचा अत्यंत बारकाईने अभ्यास करावा लागतो. ज्या माध्यमातून सामाजिक प्रश्नाला योग्य न्याय देता येईल. व अध्ययन विश्वातील प्रातिनिधीक एककांचा समावेश अध्ययनाच्या नमुन्यामध्ये करता आला.

प्रस्तृत विषयाच्या अध्ययन विश्वामध्ये नरखेड व काटोल नगरपरिषद मधिल मागिल तीन वर्षापासून नगर परिषद मध्ये निर्वाचित सर्वच प्रवर्गातील महिलांचा समावेश करण्यात आला.

**नमुणा निवड:—**

प्रस्तृत अध्ययनामध्ये नरखेड व काटोल नगरपरिषद चा समावेश करुन या नगरपरिषद मध्ये मागील तीन वर्षपेक्षा अधिक कालखंडापासून काम करित असलेल्या सर्वच प्रवर्गातील महिलांचा समावेश करण्याच्या दृष्टीकोणातून जणगणना नमुणा निवड पध्दतीचा अवलंब करण्यात आला. अशा प्रकारे निर्वाचित सर्वच महिलांचा समावेश करण्यात आला.

**तथ्य संकलन पध्दती व तंत्रे:—**

प्रस्तृत संशोधनात अध्ययनाचे उत्तरदात्ते सर्वच जातीच्या प्रवर्गातील असून त्यांच्या एकंदरित त्याचा शैक्षणिक व सामाजिक दर्जाच्या अभ्यास करुन मुलाखत अनूसुचीच्या माध्यमातून

प्राथमिक तथ्य करण्यात आली. तर दुय्यम तंथ संकलीत करण्याकरिता पुस्तके व इंटरनेटचा वापर करण्यात आला.

**निष्कर्ष:—**

प्रस्तुत संशोधन हे नरखेड व काटोल नगरपरिषद मधिल निर्वाचित महिलांवर आधारित होते. या संशोधनाद्वारे महिलांचा नगरपरिषद मधील सहभाग पुरुषासोबत काम करित असतांना निर्माण होणाऱ्या समस्या, राजकीय व सामाजिक जिवनामध्ये होणारा बदल व नरखेड व काटोल नगरपरिषद प्रशासनाच्या माध्यमातून महिलांशी निगडीत प्रश्न सोडविण्यासाठी झालेली मदत इत्यादी विषयांचा अभ्यास करण्यात आला.

➢ नगरपरिषद मध्ये निर्वाचित ज्या महिला प्रतिनिधी आहेत. यांना नगरपरिषद प्रशासनाचा अभ्यास होवून त्या नगरपरिषदच्या प्रशासनामध्ये सक्रीय सहभाग दर्शवितात व प्रशासकीय कार्यात सक्रीय सहभाग घेतात. त्यामुळे महिलांच्या कार्यपध्दतीमध्ये सकारात्मक बदल दिसून येतो.

➢ निर्वाचित नगरपरिषद महिला सदस्यांना पुरुषासोबत काम करित असतांना समस्या निर्माण होतात. याचा बारकाईने अभ्यास केल्यास असे दिसून येते की, ज्या युवक निर्वाचित सदस्या आहेत त्यांना जास्त समस्या निर्माण होतात.

➢ निर्वाचित महिला संदस्यांना नगरपरिषद मध्ये काम करित असतांना कौटूंबिक व सामाजिक समस्या निर्माण होतात. परंतू याचा सकारात्मक पैलू पाहता असे दिसून येते की, काही अंशी राजकीय जिवनामध्ये सहभाग वाढला, सामाजिक व राजकीय कार्यक्रमामध्ये सहभाग वाढून त्यांच्या सकारात्मक बदल झाला.

➢ नगरपरिषद प्रशासनात आज पुरुषापेक्षा महिलांची संख्या जास्त आहे. महिलांमध्ये कामाप्रती असलेली आस्था व प्रशासनातील सहभागामुळे नगरातील महिलांचे प्रश्न सोडविण्यात मदत झाली.

➢ महिला नेतृत्वामधील परिपक्वतेचे अध्ययन केले असता असे दिसून येते की, महिलांमध्ये आज राजकीय परिपक्वता निर्माण झालेली आहे. नगरपरिषद मध्ये निर्वाचित महिला प्रतिनिधी असल्यामुळे महिलांचे प्रश्न मांडण्यासाठी महिला प्रतिनिधीची संख्या असल्यामुळे आज महिलांचे प्रश्न सोडविण्यात मदत केली.

**समाजकार्यकर्त्याची भूमिका व समुपदेशन:—**

नगरपरिषद प्रशासनामध्ये आज महिला काम करित आहे. या महिलांचा सहभाग हा समाधानकारक आहे. परंतू महिला नेतृत्वाचा पुर्ण क्षमतेत उपयोग आजही प्रशासनात होत नाही. त्यामुळे महिला नेतृत्व पुर्णपणे सक्षम करण्याकरिता निर्वाचित महिलांकरिता शासन पातळीवर प्रशिक्षण देण्याची गरज आहे. ज्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिलांचे नेतृत्व अधिक क्षमतेने विकसित होवून नगरपरिषद प्रशासनाने पुर्णपणे काम करु शकेल. नगरपरिषदची जी दृष्टी महिलांमध्ये ज्या पध्दतीने विकसित व्हायला पाहिजे होती. त्या पध्दतीने विकसित होवू शकली नाही. त्या करिता आदर्श नगरपरिषद भेटीच्या कार्यक्रमांची आखणी करुण त्या ठिकाणी निर्वाचित महिला सदस्यांच्या भेटी घेणे आवश्यक आहे.

**संदर्भ :—**


- डॉ. बी. एम. कऱ्हाडे, ''शास्त्रीय संशोधन पद्धती,'' जानेवारी २०१८
- आगलावे प्रदिप, ''सामाजिक संशोधन पद्धती''साईनाथ प्रकाशन २०१६
- ज्योती लांजेवार, ''भारतीय समाज आणि स्त्री'' सुगावा प्रकाशन,२००५
- दमयंती पाठक, ''वैदर्भीय महिलांचे संग्रामातील सहकार्य'' मंगेश प्रकाशन, नागपुर २००३
- स्मिता मेहत्रे, ''भासतीय स्त्री आणि मानवाधिकार'' साईनाथ प्रकाशन,२०११
- पद्मजा पाटील, प्रा. शोभना जाधव, ''भारातीय इतिहासतील स्त्रीया'' फडके प्रकाशन,२०११
- शाम शिरसाठ, ''भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था'' विद्या बुक पब्लीर्शस, औरगाबाद
- सतिश ठोंबरे, ''जिल्हा प्रशासन आणि स्थानिक स्वशासन'' कैलास पब्लीर्शस,२००७

ISSN : 2278-9308
July 2021

# आदिवासींच्या जीवनावर सामुदायिक विकास योजनेचा झालेला परिणाम

प्रो. मनोहर रामचंद्र चौधरी
आनंद निकेतन कॉलेज आनंदवन, वरोरा
मो. क्र. ७८७५९०६७६३ ,Email Id :- mchoudhri1965@gmail.com

**१)प्रस्तावना :—**

सामुदायिक विकास योजनेचा दृष्टीकोन हा फार विशाल स्वरूपाचा आहे. त्यामुळे आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी व ग्रामीण विकासासाठी शासनाने सामुदायिक विकास योजना तयार केली आहे. ''सामुदायिक विकास योजनेत लोकांचा सहभाग'' यावर फार महत्त्वाचे स्थान आहे. ग्रामीण खेड्यांचा संपूर्ण विकास घडवून आणण्यासाठी संपूर्ण खेड्यांचा सहभाग महत्त्वाचा असून त्यावर सामुदायिक विकास योजनेची मुळ संकल्पना आधारित आहे. परिणामे खेड्याचा विकास झाला तरच देशाचा विकास होतो हा दृष्टिकोन समोर ठेवून सरकारने सामुदायिक विकास योजना कार्यान्वीत केली आहे. तसेच आदिवासीची धार्मिक व सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊन सरकारने आदिवासींच्या विकासासाठी सामुदायिक विकास योजनेच्या व्यतिरिक्त चार पंचवार्षिक योजना सुध्दा आखल्या आहे. ''समुह विकास योजना'' ही ग्रामीण पुर्णरचनेचे एक महत्वाचे साधन आहे. ग्रामीण आदिवासी जनतेत नविन धैर्य नविन आशा आकांक्षा व नविन आत्मविश्वास निर्माण करणे हा सामुदायिक विकास योजनेत महत्त्वाचा उद्देश मानला गेला आहे. सामुदायिक विकास योजना ही २ ऑक्टोबर १९५२ पासुन सर्व राज्यात सुरू करण्यात आली आहे.

''सामुदायिक विकास योजना ही संपूर्ण भारतात एकाच वेळी सुरू करणे शक्य नव्हते त्या करिता सामुदायिक विकास योजना ही व्यवस्थित पणे व सुरळीतपणे चालावी आणि जनतेचा विकास व्हावा या दृष्टीने ही योजना देशात टप्या टप्याने सुरू करून या योजनेचा विकास करण्यात आला. सामुदायिक विकास योजनेमुळे दुर्बल घटकांचे दारिद्रये दुर होऊन त्याचा विकास झाला. त्यामुळे सामुदायिक विकास योजना ही एक वरदान'' योजना म्हणून सिध्द झाली आहे.

**२)सामुदायिक विकास योजनेचा अर्थ व व्याख्या:—**

१)सामुदायिक योजना म्हणजे संपूर्ण समुदायाची आर्थिक व सामाजिक प्रगती घडवून आणण्याची प्रक्रिया होय. हेल्पर्न

२)आपल्या स्वत:च्या प्रयत्नाच्या बळावर जनतेने सामाजिक व ग्रामीण जिवनात आणि आर्मिक जिवनात परिवर्तन घडवून आणण्याचे प्रयोग म्हणजे सामुदायिक विकास योजना होय. योजना आयोग

३)सर्वसामान्य भुभागात राहणाऱ्या व एक दुसऱ्याबद्दल परस्परावलंबनाचे संबध असलेल्या समुहातील लोकांचा समान क्षमतेचा व गुणाचा विकास घडवून आणणारी योजना म्हणजे सामुदायिक विकास योजना होय. डॉ. ओमप्रसाद डाहमा

४)शासन व लोकांच्या संघटीत प्रयत्नाद्वारे सर्व समाजाच्या सांस्कृतिक, आर्थिक व सामाजिक परिस्थितीमध्ये सुधारणा घडवून आणणारी व राष्ट्रीय विकास कार्यक्रमास हातभार लावण्यास शिकवणारी एक परिवर्तनाची प्रक्रिया म्हणजे समाज विकास योजना होय. संयुक्त राष्ट्र संघ

**३) सामुदायिक विकास योजनेचे ध्येय:—**

१) शेतीच्या उत्पादनात अधिकाधिक वाढ करणे.
२) बेकारीचा खेड्यातील प्रश्न सोडविणे.
३) घराची समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणे.
४) घरघुती उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देणे.
५) खेड्यातील आवागमनाची साधने सुधारणे व वाढविणे.
६) शिक्षण, आरोग्य व मनोरंजन विषयक केंद्र प्रस्थापित करणे.

**४)सामुदायिक विकास योजनेचे वैशिष्ट्ये:—**

सामुदायिक विकास योजना ही ग्रामीण विकासाकरिता असली तरी या योजने अंतर्गत आदिवासीचा विकास घडवून आणणे हे देखील तेवढेच महत्त्वाचे आहे. सामुदायिक विकास योजना ही व्यापक स्वरूपाची आहे. या योजनेची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहे.

**१)शासन व जनता यांचे सहकार्य :—**

ही योजना सरकार व जनता यांच्या सहकार्याने अंमलात येते. हे सामुदायिक योजनेचे पहिले वैशिष्ट्ये आहे. जनतेचा सहभाग या योजनेत फार महत्त्वाचा असतो. शासन व जनता या दोघात समन्वय व सहकार्य या योजनेमुळे साधले जाते. स्थानिक नेतृत्वाला व साधनसामुग्रीला या योजनेत महत्त्वाचे स्थान आहे. ही योजना जनता व शासन यांना जोडणारा दुवा आहे.

**२)व्यापक कार्य :—**

योजनेची व्यापकता हे या योजनेचे दुसरे वैशिष्ट्ये होय. योजनेची अंमलबजावणी करण्यापुर्वी सपूर्ण ग्रामीण जनतेचा विचार करण्यात येतो. या योजनेत ग्रामीण जनतेच्या उत्पादनाची साधने व त्यांचा जीवनस्तर उंचावण्याचा प्रयत्न केला जातो. अनेक विकास कार्यक्रम या योजनेत राबविले जातात. उदा. जलपुर्ती, शिक्षण, गृहउद्योग, आरोग्य इ.

**३)लोकशाहीचे तत्व व लोकभिमुखता :—**

लोकशाहीच्या तत्वानुसार ही योजना चालत असते. लोकांच्या सहकार्यावर सर्व कार्यक्रम अवलंबून असते. या योजनेची अंमलबजावणी ही पंचायत राज्यामार्फत केली जाते. ही योजना जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांच्या सहकार्यावर अवलंबून असते. ही योजना लोकाभिमुख असून लोकशाही प्रतिनिधी मार्फत कार्यक्रमाचे संचालन केले जाते.

**४)समन्वयाचे तत्व :—**

ही योजना मोठ्याप्रमाणाने संपूर्ण देशात राबविल्या जात आहे. ही योजना २ ऑक्टोबर १९५२ पासून सुरू झाल्यानंतर या योजनेत अनेक प्रकारचे बदल घडवून आणण्यात आले आहे. या योजनेत अनेक विभाग असते तरी हया सर्व विभागामध्ये समन्वय घडवून आणण्यात आला आहे.

**५)क्षेत्रीय विकासाची कल्पना :—**

विकास कार्यक्रम राबवित असतांना अनेक विकास क्षेत्र निर्माण करण्यात आले आहे. प्रत्येक विकास खंडात त्या विकास खंडाच्या परिस्थितीनुसार कार्यक्रम राबविण्यात येत आहे. हे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विकास कार्यक्रमास लागणारा पैसा शासनाकडुन पुरविण्यात येत आहे. यासाठी लोकाचे सहकार्य या योजनेत घेण्यात येत आहे.

**६)शासकीय परिवर्तन :—**

सामुदायिक विकास योजना राबवितांना खेड्यातील अज्ञानी निरक्षर लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी व त्यांना सहाय्यता करण्याच्या दृष्टीने प्रत्येक खेड्यात एक ग्रामसेवक नेमणुक करण्यात येतो. तसेच खेडे हे जर खुपच लहान लहान असतील तर दोन, तिन खेड्यामिळून एक ग्रमसेवक दिला जातो. ग्रामसेवक जनतेच्या समस्या जानून घेतात व त्या सोडवण्याच्या दृष्टीने तो प्रयत्न करतो. तसेच ग्रामसेवकाकडुन कार्यक्रमाची योग्य अंमलबजावणी होते किंवा नाही हे पाहण्यासाठी एक विकास खंड अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाते. हे विकास कार्यक्रम सामुदायिक तत्वावर चालत असतो.

**७)क्रमाक्रमाने व योजनापुर्वक विकास :—**

ही योजना राबवित असतांना एकवेळ ही योजना संपूर्ण भारतात सुरू करण्यात आली नाही तर क्रमाक्रमाने या योजनेची सुरळीत करण्यात आली. कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याकरिता २० सुत्री कार्यक्रमाची आखणी करणे ही प्रत्येक पंचायत समिती यातील राबविण्यात आली. क्रमाक्रमाने व योजनापूर्वक विकास घडवूण आणणे हे या योजनेचे वैशिष्ट्ये आहे.

**५)सामुहिक विकास योजनेचे उद्देश :—**

१) अनुसुचित जाती जमातीच्या कल्याणासाठी विशेष योजना राबविणे.

२) पशुसुधार कार्यक्रम अंतर्गत ग्रामीण जनतेला कुकुटपालन, वराहपालन, संकरीत गाई, म्हशी पुरविण्यासाठी तांत्रिक व सहाय्य व मदत देणे.

३) दळणवळनाची साधने, स्थान सुधार, शिक्षण व प्रौढ शिक्षणाकडे लक्ष देणे.
४) कृषी सुधारासाठी खते, बि—बियाणे, किटकनाशके या करिता शेतकऱ्यांना तांत्रिक सहाय्य करणे.
५) गृहउद्योग विकासाद्वारे ग्रामीण भागातील बेकारीची समस्या दुर करणे.
६) ग्राम पुर्ननिर्मितीचे कार्यक्रम आखतांना ग्रामीण भागातील समस्यांवर लक्ष देणे.
७) ग्रामीण नेतृत्व विकासाकरिता महीला मंडळे, युवकदल, मनोरंजन मंडळे, सहकारी समित्यांची स्थापना करणे.
८) ग्रामीण भागातील राहणीमान सुधारण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांमध्ये सहकार्याची भावना निर्माण करणे.

**६) सामुदायिक विकास योजना कार्यक्रम :—**

सामुदायिक विकास योजना कार्यक्रम अंतर्गत ग्रामीण खेड्याचा व आदिवासींचा विकास करण्याच्या दृष्टीने अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते ते खालील प्रमाणे

१) शेतीसुधार कार्यक्रम
२) ओलीताच्या सोयी
३) दळणवळन
४) शिक्षण
५) आरोग्य
६) रोजगार
७) गृहनिर्माण
८) समाजकल्याण
९) प्रशिक्षण

इत्यादि सामुदायिक विकास योजना कार्यक्रम ग्रामीण भागात राबविले जातात.

**७) सामुदायिक विकास कार्यक्रमाची विभागणी :—**

सामुदायिक विकास कार्यक्रमाची प्रामुख्याने ४ भागात विभागणी केली जाते.

१) निर्माण कार्यक्रम
२) ओलीताचा कार्यक्रम
३) शेती कार्यक्रम
४) संस्थात्मक कार्यक्रम

**८) सामुदायिक विकास योजनेचे मुल्यांकन :—**

सामुदायिक विकास योजना कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लोकांचा सहभाग हा महत्वाचा असतो.ग्रामीण जनतेचा व अधिकारी वर्गाला सहभागावर या योजनेचे यश अवलंबून असते.

**१)लोक सहभागाचा अभाव :—**

शासनाच्या ग्रामीण विकासाकरिता अनेक योजना आहे. ग्रामीण जनतेच्या सहभाग हा योजना कार्यान्वीत करण्यासाठी अपेक्षित असते. परंतु ही जबाबदारी शासनाची आहे. आपली नाही या भावनेमुळे ग्रामीण जनतेकडुन सहकार्य मिळत नाही.

**२)नौकरशाहीची प्रवृत्ती :—**

नौकर वर्गावर सामुदायिक विकास योजनेचे यश अवलंबून असते. परंतु लोकांच्या मनात नौकर वर्गाकडुन विश्वास निर्माण केला जात नाही. नौकरशाहीने विकासाच्या योजना लोकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य केले नाही.

**३)कार्यक्रमाची आखणी :—**

कार्यक्रमाची आखणी करतांना ग्रामीण समस्या व लोकांच्या भावना लक्षात घेतल्या पाहिजे. परंतु सामुहिक विकास योजनेतील कार्यक्रमाची आखणी ही वरच्या स्तरावरून करण्यात येते.

**४)प्रशिक्षण कार्यक्रमाचा अभाव :—**

ग्राम पुर्ननिर्माण कार्यक्रम जलद गतीने कार्यान्वित करण्यात आल्यामुळे त्यासाठी सुरूवातीला प्रशिक्षित कार्यक्रम उपलब्ध होऊ शकले नाही.

५) ग्रामीण नेतृत्व :—

भारतीय ग्रामीण जीवनावर परंपरागत नेतृत्व हे वरील जातीकडे असते. जमीनदार व ग्रामपातळीवरील अधिकारी यांनाच ग्रामीण लोक नेते मानत असते. त्यामुळे ग्रामीण समुहातील इतर जाती जमातीच्या व आर्थिक दृष्टया मागासलेल्या घटकांच्या हिताकडे दुरलक्ष करण्यात आहे.

**६)उदासिनता, देव प्रवृत्ती :—**

दैववादी प्रवृत्ती ही प्रामुख्याने भारतातील ग्रामीण व आदिवासी भागात आढळते. ग्रामपुर्ननिर्माण योजनेत ग्रामीण व आदिवासी लोकांवर उदासिनतामुळे योजनेला स्विकृती मिळत नसल्यामुळे त्यांची मोठी प्रगती होत नाही.

**७)असंतुलीत कार्यक्रम :—**

अनुसुचित जाती व जमाती यांच्या प्रगतीसाठी ग्रामीण भागात योग्य त्या योजना राबविल्या जात नाही. या उत्तर ग्रामीण भागात शेती व इतर कार्यक्रमावर भर दिला जातो. त्यामुळे कार्यक्रमात असंतुलन निर्माण झाले.

**८)प्रचार यंत्रणा :—**

योजनेला कार्यान्वित करण्यासाठी कोणतीही योजना ही लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे. परंतु प्रचार यंत्रणा ही ग्रामीण भागात न पोहोचल्यामुळे कोणत्याही योजना ही ग्रामीण व आदिवासी लोकांपर्यंत पोहोचण्यावर दिसत नाही. त्यावर त्या योजनेची प्रचार यंत्रणेच्या माध्यमातून जनजागृती ही करण्यात आलेली नाही.

**९)संशोधनाचे क्षेत्र :—**

एखादया जिल्हयाच्या सर्व तालुक्यातील ग्रामीण व आदिवासी गावाच्या आधारावर आधारित हा शोधनिर्बंध राहील व त्यामध्ये प्रत्येक तालुक्यातील काही निवडक आदिवासी गावे यामध्ये घेतली व त्यानुसार त्यांचे अध्यावत केले जाईल. हेच संशोधनाचे क्षेत्र राहील.

**१०)संशोधनाचे महत्त्व :—**

१)आदिवासीच्या विविध पैलुचा अभ्यास करणे.

२)आदिवासी समाजाची जीवन जगण्याची पध्दती त्यांची कला व त्यांचे सांस्कृतिक जीवन हे इतर समाजापेक्षा वेगळे आहे. यांचा अभ्यास करणे.

३)आदिवासीची लग्न पध्दती, नृत्यप्रकार, सामाजिक चालीरीती, देवदौलत इतर समाजापेक्षा वेगळाच आहे. याचा अभ्यास करणे.

४)सामुदायिक विकास योजने अंतर्गत आदिवासी समाजाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.

५) सामुदायिक विकास योजनेचे आदिवासीच्या जीवनावर झालेले आर्थिक, सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक व शैक्षणिक परिणामाचा अभ्यास करणे.

६) आदिवासी समाजाची संस्कृती टिकवूण ठेवण्यासाठी आदिवासी समाजाचा अभ्यास करणे.

एकंदरित आदिवासीच्या जीवनावर सामुदायिक विकास योजनांचा झालेला परिणाम जाणून घेण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनाला महत्वाचे स्थान आहे.

**११) संशोधनाच्या पध्दती :—**

"आदिवासीच्या जीवनावर सामुदायिक विकास योजनेचा झालेला परिणाम" या विषयाच्या अनुषंगाने माहिती संकलन करित असतांना संशोधनाच्या खालील पध्दतीचा अवलंब केला जाईल.

१) क्षेत्रकार्य अध्ययन पध्दती

२) ऐतिहासिक पध्दती

३) तुलनात्मक पध्दती

४) सहभागी निरिक्षण पध्दती

**१२) संशोधनाची उदिष्ट्ये :—**

१) सामुदायिक विकास योजने अंतर्गत अनुसुचित जाती व जमातींना कोणते फायदे मिळाले यांचा शोध घेणे.

२) सामुदायिक विकास योजने अंतर्गत आदिवासीच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगतीचा शोध घेणे.

ISSN : 2278-9308
July 2021

३)सामुदायिक विकास योजना राबवणारी शासकिय यंत्रणा व आदिवासी यांच्यातील संबंधाचा शोध घेणे.

४)आदिवासीच्या शेती व्यवसायाला पुरक असणाऱ्या उद्योग धंदयाचा व दैनंदिन गरजांचा शोध घेणे.

५)आदिवासीच्या विकासाची आवश्यक असणाऱ्या दळणवळण व आरोग्य विषयक साधनाच्या प्रगतीचा शोध घेणे.

६)सामुदायिक विकास योजनेत आदिवासीकडून कोणत्या बाबतीत सहकार्य मिळत नाही यांच्या शोध घेणे.

७)आदिवासीचे शोषण थांबवण्याच्या दृष्टीने उपाय योजनांचा शोध घेणे.

**१३)तथ्य संकलन :—**

१)मुलाखत अनुसुची

२)प्रश्नावली

३)ग्रंथालयाचा वापर

**१४)नमुना निवड पध्दती :—**

''आदिवासीच्या जीवनावर सामुदायिक विकास योजनेचा झालेला परिणाम'' या विषयाच्या अनुषंगाने अध्ययन करतांना खालील नमुना निवड पध्दतीचा अवलंब केला जाईल.

१) सरल यादृच्छिक नमुना निवड

२) व्यवस्थापन नमुना निवड

३) सोयीस्कर नमुना निवड

४) स्तरीय यादृच्छिक पध्दती

५) इच्छा प्रभावी स्तरीय नमुना निवड

**१५) संशोधनाची गृहीत कृत्ये :—**

''आदिवासीच्या जीवनावर सामुदायिक विकास योजनेचा झालेला परिणाम'' या विषयाचे अध्ययन करण्यासाठी खालील गृहित कृत्ये निश्चित केले आहे.

१)सामुदायिक विकास योजना कार्यक्रमामुळे आदिवासीची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व शैक्षणिक प्रगतीत बदल घडून आलेला नाही.

२) शासकीय यंत्रणेकडून सामुदायिक विकास योजनेची माहिती आदिवासीपर्यंत पोहचविल्या जात नाही.त्यामुळे या योजनेचा लाभ आदिवासींना कमी प्रमाणात मिळाला.

३)अंधश्रध्दा, जुन्या रूढी, पंरपराचा पगडा हया प्रामुख्याने आदिवासीच्या जीवनात दिसून येते.

४)आदिवासी भागात दळणवळनाची साधने, मनोरंजन साधने, आरोग्य व जीवन आवश्यक सोयी व सुविधांचा अभाव दिसून येते.

५)आदिवासीचे जीवनमान उंचावण्याकरिता आदिवासीमध्ये उदासीनता दिसून येते.

६)आदिवासी भागात काम करणाऱ्या स्वयंसेवक संस्था, राजकीय नेतृत्व, शासकीय यंत्रणा याचे आदिवासी सोबत संबंध हे समाधानकारक नाही

**१६)निष्कर्ष:—**

''आदिवासीच्या जीवनावर सामुदायिक विकास योजनेचे झालेले परिणाम'' या विषयाच्या अभ्यासातून पुढील निकर्षे प्राप्त झाले आहे.

१)सामुदायिक विकास योजनेमुळे आदिवासीच्या आर्थिक जीवनात झालेले परिवर्तन.

२)सामुदायिक विकास योजनेमुळे आदिवासीच्या सामाजिक जीवनात झालेले परिवर्तन.

३)सामुदायिक विकास योजनेमुळे आदिवासीच्या शैक्षणिक जीवनात झालेले परिवर्तन.

४)सामुदायिक विकास योजनेमुळे आदिवासीच्या जीवनात झालेले राजकीय परिवर्तन.

५)सामुदायिक विकास योजनेमुळे आदिवासीच्या जीवनात सामुदायिक सोयी सवलतीमध्ये झालेले परिवर्तन.

**१७)शिफारसी :—**

१)आदिवासीच्या विकासासाठी राबविली जाणारी सामुदायिक विकास योजना कार्यक्षम असावयास पाहिजे.

२)आदिवासीच्या विकासासाठी राबविली जाणारी सामुदायिक विकास योजना कार्यक्रमाची योग्य

अंमलबजावणी झाली पाहिजे.
३)आदिवासी भागात पाणी पुरवठयाच्या व सिंचनाच्या सोयी व सुविधा झाल्या पाहिजे.
४)दारिद्रय रेषेखाली जे आदिवासी कुटुंब आहे. त्या कुटुंबाला शासनाकडून घरकुल मिळाले पाहिजे.
५)आदिवासी समाजातील साक्षरतेचे प्रमाण शासनाने वाढविले पाहिजे.
६)आदिवासी भागात प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना करून आरोग्य केंद्राचा दर्जा सुधारण्यात यावा.
७)आदिवासीच्या अंधश्रध्दा, रूढी व परंपरा नष्ट करण्यासाठी अंधश्रध्दा निर्मुलन कायदा व अंधश्रध्दा निर्मूलन केंद्राची स्थापना करण्यात यावी.
८)आदिवासीचा सर्वांगिण विकास घडवून आणण्याकरिता आदिवासी खेड्याचा विकास होणे आवश्यक आहे.
९) आदिवासीच्या विकासाकरिता सामाजिक संस्थानी पुढाकार घ्यावयास पाहिजे.

१८) संदर्भ ग्रंथसूची :—

१)आदिवासी समाजाचे समाजशास्त्र :डॉ. प्रदिप आगलावे श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर — २००४
२) सामाजिक संशोधन पध्दती :डॉ. पु. ल. भांडारकर महाराष्ट्र विद्याविठ ग्रंथ निर्मिती नागपूर — १९७६
३)सामाजिक मानवशास्त्र : प्रा. रा. ज. लोटे,पिंपळापूरे ॲन्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर — १९९० डॉ. बोबडे
४)आदिवासीचे सण उत्सव :डॉ. सरोजनी बाबर शासकीय मुद्रालय वाई (जि. सातारा) — १९८३
५)भारतीय समाजरचना:सौ. डॉ. सूधा काळदाते महाराष्ट्र विद्याविठ ग्रंथ निर्मिती नागपूर — १९७६
६)सामाजिक समस्या : प्रा. शेख शब्बीर मंगेश प्रकाशन, नागपूर —१९७८ प्रा.जी. के. पालकर

१९) विशेषांक :—

लोकराज्य :— आदिवासीचे विशेषांक — डिसे. १९८३ शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.

२०) अनुसुचित जमाती कल्याण समितीचा अहवाल :—अनुसुचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सन — १९८९—९६ महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# भारतातील दारिद्र्य : कारणे, परिणाम व उपाय

डॉ. महेन्द्र गावंडे
अर्थशास्त्र विभाग नारायणराव काळे स्मृति मॉडेल कॉलेज, कारंजा(घा.),जि.वर्धा.
मो.9049939479,Email-gawandemahendra9@gmail.com

भारतामध्ये अनेक समस्यापैकी एक समस्या म्हणजे दारिद्र्यहोय, निर्धनता, गरिबी,दारिद्र्य हे सर्व शब्द पर्यायवाची असून एकाच अर्थाने वापरण्यात येतात. मानवी समाजाचा एक असा घटक की, जो आपल्या जिवनाआवश्यक मुलभूत गरजाही पूर्ण करू शकत नाही, त्याचा सबंध दारिद्र्यासोबत असतो. तिसऱ्या जगातील देशांमध्ये जास्त दारिद्र्याचे प्रमाण आढळून येते. तसेच युरोप व अमेरिकेच्या काही क्षेत्रातही दारिद्र्य दिसून येते.म्हणजेच दारिद्र्याचे स्वरूप वेगवेगळे असले तरी समस्या सारखीच आहे व यामध्ये समाजातील एक भाग आपल्या जीवनाआवश्यक गरजा पूर्ण करू शकत नसल्यामुळे हालाखीचे व दु:खी जिवन जगत आहे.
प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम सामग्रीवर आधारीत आहे.

**दारिद्र्याची संकल्पना—**

दारिद्र्य ही संकल्पना व्यापक व विविधांगी आहे. तसेच दारिद्र्य हे स्थल,काल, सापेक्ष आहे. दारिद्र्यातील लोकांना कमी क्रयशक्तीमुळे किमान जीवन जगण्याकरिता आवश्यक गरजा पूर्ण करण्यात अडथळे निर्माण होतात.दारिद्र्याच्या संकल्पनेसबंधी अर्थशास्त्रज्ञांमध्ये मतभेद दिसून येतो. काही विचारवंतानी 'किमान जीवनमान' विचारात घेवून तर काही विचारवंतानी 'वाजवी जीवनमान' विचारात घेवून दारिद्र्य संकल्पनेचा विचार मांडला आहे. 'व्यक्ती अथवा कुटुंबाच्या मुलभूत गरजा पूर्ण करण्याची क्षमता नसने म्हणजे दारिद्र्य होय'. असे काहीचे मत दिसून येते. तर काहीच्यामते 'योग्य जीवनमान जगण्याची उत्पन्न क्षमता नसने म्हणजे दारिद्र्य होय'. विकासाबरोबरच गरजांचे स्वरूपही बदलत जाते, तसेच जीवनमानाच्या संकल्पना वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या असते. कारण प्रत्येक देशाची विकास पातळी ही वेगवेगळी असते. रॉबर्ट एस. मॅकनामाराच्यामते,''कुपोषण, निरक्षरता, आजारपण, बालमृत्यूचे अधिक प्रमाण व सरासरी कमी आर्युमान अशी स्थिती ज्याठिकाणी आढळून येते, ती अवस्था म्हणजे दारिद्र्य होय''. योजना आयोगाने आहारासंबंधी गरज विचारात घेवून पुढीलमत मांडले,''ग्रामीणक्षेत्रातील एका व्यक्तीला दररोजच्या आहारात २४०० उष्मांकांची आणि शहरीक्षेत्रातील एका व्यक्तीला दररोजच्या आहारात २१०० उष्मांकांची आवश्यकता असते, एवढे उष्मांक मिळवून देणारे अन्न खरेदी करण्याकरीता जो खर्च येतो, ती राशी म्हणजे दारिद्र्य रेषा होय''.अमर्त्य सेनच्यामते,''एखाद्या व्यक्तिला त्याने जोपासलेल्या मूल्यांप्रमाणे जिवन जगता न येणे म्हणजे दारिद्र्य होय.'' सी.टी. कुरीयन च्यामते,''दारिद्र्य ही अशी अवस्था आहे की, ज्यामध्ये देशातील उपलब्ध साधनसामुग्रीचा आवश्यकतांच्या पुर्ततेकरिता वापर न करता अमर्याद गरजांचा पाठलागकरण्यासाठी वापरला जातो.''

भारतात दारिद्र्याला दोन भागात विभाजित केले जाते. त्यातील एक म्हणजे **निरपेक्ष दारिद्र्य**, यामध्ये ग्रामीणक्षेत्रातील एका व्यक्तीला दररोजच्या आहारात २४०० उष्मांकांची आणि शहरीक्षेत्रातील एका व्यक्तीला २१०० उष्मांकांची आवश्यकता असते, एवढे उष्मांक मिळवून देणारे अन्न खरेदी करण्याकरीता जो खर्च येतो, ती राशी समाजातील ज्या व्यक्ती खर्च करू शकत नाही त्यांना दारिद्र्य म्हटले जाते. दारिद्र्यरेषा वस्तु व सेवांच्या किंमतीवर आधारीत असून, वस्तु व सेवांच्या किंमतीमध्ये बदल झाला की, दारिद्र्यरेषा बदलते. सर्वच विकसनशील देशामध्ये निरपेक्ष दारिद्र्य कमी अधिक प्रमाणात आढळून येत असले तरी विकसीत देशात क्वचित आढळते.

दुसरे म्हणजे **सापेक्ष दारिद्र्य**, हे उत्पन्नातील विषमतेवर आधारित असून देशाच्या आर्थिक विकासाबरोबर राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होतांना समाजामध्ये त्याचे समान वितरण होत नाही. त्यामुळे विषमता निर्माण होवून देशात उत्पन्नानुसार अनेक गट निर्माण होते. यातील सर्वात तळाचा गट

म्हणजे दारिद्र्य अवस्थेतील गट होय. विकसीत व विकसनशील देशामध्ये सापेक्ष दारिद्र्य आढळते कारण ही तुलनात्मक संकल्पना आहे. म्हणजेच भारतात दोन्ही प्रकारचे दारिद्र्य दिसून येते.

**भारतातील दारिद्र्याचे अनुमान—**

**बी. एस. मिन्हास** यांनी १९५६—५७ ते १९६७—६८ या कालखंडाचे अध्ययन करून, किमान राहणीमानाकरिता दरडोई वार्षिक खर्च २४० रूपये. गृहित धरला भारतातील दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण या काळात ६४ टक्के वरून ५०.६ टक्के झाले. **दांडेकर व रथ** यांनी १९७१ मध्ये २२५० कॅलरीज किमान पोषण मात्रा मानली. १९६०—६१ मध्ये ग्रामीणक्षेत्रात दरडोई वार्षिक खर्च १७० रूपये व शहरीक्षेत्रात दरडोई वार्षिक खर्च २७१ रूपये आवश्यक समजुन १९६८—६९ मध्ये ग्रामीणक्षेत्रात एकूण लोकसंख्येपैकी जवळजवळ ४० टक्के व शहरीक्षेत्रात एकूण लोकसंख्येपैकी जवळजवळ ५० टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली आहे असे सुचवीले. **पी. के बर्धन**यांनी १९७० मध्ये १९६०—६१ च्या किंमतीच्या आधारावर दरडोई प्रतिमहिना १५ रू. ग्रामिणक्षेत्राकरिता व दरडोई प्रतिमहिना १८ रू. शहरीक्षेत्राकरिता आवश्यक मानले होते. त्यानुसार १९६८—६९ मध्ये ग्रामीणक्षेत्रात एकूण लोकसंख्येपैकी जवळजवळ ५५ टक्के व शहरीक्षेत्रात एकूण लोकसंख्येपैकी जवळजवळ ४१ टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली आहे, असे त्यांचे मत होते.**एम. एस. अलुवालिया**यांनी १९७८ मध्येदारिद्र्याचे अध्ययन करतांना १९५६—५७ ते १९७३—७४ याकालखंडाचे अध्ययन केले, त्यानुसार त्यांनी १९६०—६१ च्या किंमतीच्या आधारावर, ग्रामीणक्षेत्राकरिता किमान आवश्यक गरजांवरील किमान दरडोई मासिक खर्च १५ रू. व शहरीक्षेत्राकरिता किमान आवश्यक गरजावरील किमान दरडोई मासिक खर्च २० रू. गृहित धरून, १९५६—५७ मध्ये ग्रामीणक्षेत्रात एकूण लोकसंख्येपैकी ५४.१ टक्के व शहरीक्षेत्रात एकूण लोकसंख्येपैकी ३८.९ टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली आहे. तसेच त्याच्या अध्ययनावरून असे सिध्द झाले की, भारतात दारिद्र्यामधील लोकसंख्येत चढउतार दिसून येते. कारण १९६०—६१ मध्ये ३८.९ टक्के होवून, १९६६—६७ मध्ये ५६.५ टक्के झाले. १९७३—७४ मध्ये ४६.१ टक्के दारिद्र्य दिसून आले.**नियोजन मंडळानुसार**दारिद्र्यामध्ये १९७९—८० च्या किंमतीच्या आधारावर १९७२—७३ मध्ये ग्रामीणक्षेत्रात५४.१ टक्के, शहरीक्षेत्रात४१.२ टक्के, एकूण ५१.५ टक्के होत, ते १९७७—७८ मध्ये ग्रामीणक्षेत्रात५१.२ टक्के, शहरीक्षेत्रात३८.२ टक्के, एकूण ४८.३ टक्के होत, नंतर ते १९८३—८४ मध्ये ग्रामीणक्षेत्रात४०.१ टक्के, शहरीक्षेत्रात२८.१ टक्के, एकूण ३७.४ टक्केझाले, तर १९८७—८८ मध्ये ग्रामीणक्षेत्रात २८.३७ टक्के, शहरीक्षेत्रात १६.८२ टक्के, एकूण २५.४९ टक्के झाले, म्हणजेच ते घटत गेले. **टी.डी. लकडावाला** समितीच्या अहवालानुसार १९९३ मध्ये १९७३—७४ च्या किंमतीच्या आधारावर ग्रामीणक्षेत्राकरिता किमान आवश्यक गरजावरील किमान दरडोई मासिक खर्च ४९.०९ रू. व शहरीक्षेत्राकरिता किमान आवश्यक गरजावरील किमान दरडोई मासिक खर्च ५६.६४ रू. गृहित धरून, दररोज दरडोई २४०० कॅलरीज उष्मांक उपभोग होता. १९७३—७४ मध्ये उपभोगाकरीता वार्षिक खर्च ४९.०९ रू. ग्रामिणक्षेत्राकरिता व ५६.९६ रू. शहरीक्षेत्राकरिता, १९७७—७८ मध्ये उपभोगाकरीता वार्षिक खर्च ५६.८४ रू. ग्रामिणक्षेत्राकरिता व ७२.५० रू. शहरीक्षेत्राकरिता, १९८३—८४ मध्ये उपभोगाकरीता वार्षिक खर्च ८९.४५ रू. ग्रामिणक्षेत्राकरिता व ११७.६४ रू. शहरीक्षेत्राकरिता, १९८७—८८ मध्ये उपभोगाकरीता वार्षिक खर्च ११५.४३ रू. ग्रामिणक्षेत्राकरिता व १६५.५८ रू. शहरीक्षेत्राकरिता, १९९३—९४ मध्ये उपभोगाकरीता वार्षिक खर्च २११.३० रू. ग्रामिणक्षेत्राकरिता व २७४.८८ रू. शहरीक्षेत्राकरिता, १९९९—२००० मध्ये उपभोगाकरीता वार्षिक खर्च ३२७.५६ रू. ग्रामिणक्षेत्राकरिता व ४५४.११ रू. शहरीक्षेत्राकरिता, २००४—०५ मध्ये उपभोगाकरीता वार्षिक खर्च ३५६.०० रू. ग्रामीणक्षेत्राकरिता व ५३८.०० रू. शहरीक्षेत्राकरिता दिसून येतो. तसेच दारिद्र्यामधे सतत घट होतांना दिसून येते. १९७३—७४ मध्ये एकूण ५४.९ टक्के दारिद्र्य होते ते २००४—०५ मध्ये २७.५ टक्के झाले. **तेंडूलकर** समितीचा अहवाल २००९यांनी उपभोग्य वस्तु व सेवांची आदर्श मात्रा विचारात घेतलीत्याच बरोबर शिक्षण व आरोग्यावर होणारा खर्च सुध्दा लक्षात घेतला, त्यानुसार २००४—०५ ला ग्रामीणक्षेत्राकरिता दरडोई मासिक खर्च ४४६.६८ रू. व शहरीक्षेत्राकरिता दरडोई मासिक खर्च ५७८.८० रू. गृहित धरून, यानुसार ग्रामीणक्षेत्रात एकूण लोकसंख्येपैकी ४१.८ टक्के व शहीरीक्षेत्रात एकूण लोकसंख्येपैकी ३७.२ टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली होते. राष्ट्रीय नमुना पाहणी **६६ वी** फेरी

यामध्ये कौटुंबिकउपभोग खर्चाची माहिती विचारात घेतली. २००९—१० करिता, प्रतिमहिना ६७२.८० रू. ग्रामिणक्षेत्राकरिता व दरडोई प्रतिमहिना ८५९.६० रू. शहरीक्षेत्राकरिता आवश्यक मानले होते. यानुसार ग्रामीणक्षेत्रात एकूण लोकसंख्येपैकी ३३.८ टक्के व शहीरीक्षेत्रात एकूण लोकसंख्येपैकी २०.९ टक्के व देशात २९.८ टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली होते. राष्ट्रीय नमुना पाहणी **६८ वी** फेरी यामध्ये कौटुंबिकउपभोग खर्चाची माहिती विचारात घेतली. २०११—१२ करिता, प्रतिमहिना ८१६ रू. ग्रामिणक्षेत्राकरिता व दरडोई प्रतिमहिना १००० रू. शहरीक्षेत्राकरिता आवश्यक मानले होते. यानुसार ग्रामीणक्षेत्रात एकूण लोकसंख्येपैकी २५.७ टक्के व शहरीक्षेत्रात एकूण लोकसंख्येपैकी १३.७ टक्के व देशात २१.९ टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली होते. पण टिकारांच्यामते वास्तविक दारिद्र्य कितीतरी जास्त आहे असा आक्षेप घेण्यात आला. **सी. रंगराजन समिती अहवाल**—२०१४ ही समिती ६८ व्या फेरीवर पुर्नविचार करण्याकरिता नेमन्यात आली होती. त्यांनी २०११—१२ करिता, प्रतिदिन ३२ रू. ग्रामिणक्षेत्राकरिता व दरडोई प्रतिदिन ४७ रू. शहरीक्षेत्राकरिता आवश्यक मानले होते. यानुसार ग्रामीणक्षेत्रात एकूण लोकसंख्येपैकी ३०.९ टक्के व शहीरीक्षेत्रात एकूण लोकसंख्येपैकी २६.४ टक्के व देशात २९.५ टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली आहे असे नमुद केले. म्हणजचे निश्चित अशी दारिद्र्यरेषा नाही असे दिसून येते. तरी पण भारतात दारिद्र्य आहे हे नाकारता येत नाही.

**भारतातील दारिद्र्याची कारणे—**

१. देशाचा अपर्याप्त विकास— देशाच्या अपर्याप्त आर्थिक विकासामुळे भारताचे विकसीत देशाच्या तुलनेत राष्ट्रीय उत्पन्न बरेच कमी दिसून येते. राष्ट्रीय उत्पन्न कमी असल्यामुळे दरडोई उत्पन्न कमी आहे, त्यामुळे मुलभूत गरजा पूर्ण करणे अवघड जाते.

२. वाढती लोकसंख्या— नियोजनामुळे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत असली, तरी वाढत्या लोकसंख्येमुळे दरडोई उत्पन्नात विशेष वाढ आढळत नाही व त्यांना मुलभूत गरजा पूर्ण करण्यात अडथळे निर्माण होते.

३. बेकारी व अर्धबेकारी— देशाचा आर्थिक विकास अपर्याप्त असल्यामुळे रोजगार संधीची कमतरता असून, असंख्य लोकांना बेरोजगारी व अर्ध बेकारीच्या समस्या भेडसावतात.

४. भांडवल निर्मितीचा दर कमी— भांडवल निर्मितीच्यादरावर गुतवणूक व आर्थिक विकास असतो. लोकांचे उत्पनन कमी म्हणून बचत कमी, त्यामुळे भांडवल निर्मिती कमी होवून,गुंतवणूक व रोजगार कमी असे चक्र देशात सतत चालू असते.

५. संपत्ती व उत्पन्नाचे विषम वितरण— राष्ट्रीय उत्पन्नाचा बराच मोठा हिस्सा ५ ते १० टक्के लोकांकडे असून, अल्प हिस्सा बहुसंख्य लोकांच्या वाट्याला येत असल्यामुळे ते हालाखीचे जीवन जगतांना दिसते.

६. संपत्ती व संसाधनावर खाजगी मालकी— भांडवलवादी अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनावर खाजगी मालकीमुळे संपत्तीचे केंद्रीकरण होवून काही लोक श्रीमंत व इतर गरीब होत जाते.

७. मागसलेली शेती— परंपरागत शेती व्यवसाय असल्यामुळे त्याची उत्पादकता बरीच कमी असून, अनेक शेतकऱ्यांना उदरनिर्वाहापूरतेही उत्पन्न मिळत नाही.

८. शिक्षणाचा अभाव— लोक गरीब असल्यामुळे ते आपल्या मुलांना योग्य शिक्षण देवू शकत नाही. त्यामुळे त्यांना चागला रोजगार मिळत नाही.

९. वाढती महागाई— वाढत्या किंमतीमुळे संध्दा लोकांचे उत्पन्न कमी पडून आवश्यक गरजा पूर्ण करणे त्यांना कठीण जाते व ते दारिद्र्यात जिवन जगतात.

१०.आर्थिक विषमता— एकीकडे दारिद्र्यात जिवन जगणाऱ्या लोकांचे प्रमाण फार वाढ असून, दुसरीकडे अतिश्रीमंतांची संख्या सुध्दा वाढत आहे.

११.दोषपूर्ण विकास व्यूहरचना— रोजगारात वाढ न होता विकास घडून येणे.

१२.सामाजिक कारणे— धर्म संस्कृति, परंपरा, रूढी इत्यादीमुळे विकासात अडथळे

याच बरोबर नैतिकमूल्याचा ऱ्हास, परदेशी गुंतवणूक, ब्रिटीश शासन, जाति व्यवस्था, आर्थिक धोरणे, विविध दारिद्र्य निर्मुलन कार्यक्रमाची अयोग्य अमंलबजावणी, तांत्रिक विकासाचा अभाव, बेरोजगारी, अल्पवेतनदर, एकत्र कुटुंब पध्दती, दैववाद, वारसा हक्क कायदा, सार्वजनिक सुविधांचा

अभाव, जिवनाआवश्यक वस्तुची कमी उपलब्धता इत्यादी घटक दारिद्र्याकरिता जबाबदार आहेत हे नाकारता येत नाही.

**दारिद्र्याचे परिणाम—**

**उत्पादनावर पडणारे परिणाम—**दारिद्र्य असल्यामुळे त्यांचे उत्पन्न फार कमी असते, त्यामुळे त्यांना हालाखीचे जीवन जगावे लागते. शिक्षण प्रशिक्षणाचा त्यांच्यात अभाव असतो. खालावलेले राहणीमान असते. त्यामुळे त्यांची कार्यक्षमता व उत्पादकता कमी असते. म्हणजेच दारिद्र्याचे कारण व परिणाम स्वत: दारिद्र्य असते. दारिद्र्यामूळे कार्यक्षमता कमी होवून उत्पादनावर प्रतिकूल परिणाम पडतो.

**वितरणावर पडणारे परिणाम—** दारिद्र्यामूळे कार्यक्षमता कमी होवून उत्पन्न कमी होते व ते आवश्यक गरजा भागवीण्यात खर्च होते. तर एकीकडे भांडवलदार वर्गाचे उत्पन्न त्याची कार्यक्षता व उत्पादकता जास्त असल्यामुळे वाढत जाते व आर्थिक विषमता निर्माण होते. गरीब, गरीब होत जाते व श्रीमंत अधिक श्रीमंत होत जातो.

**समाजावर पडणारे परिणाम—**समाजात श्रीमंत लोक व सरकार विरूध्द असंतोष निर्माण होवून सामाजिक शांतता नष्ट होण्याचा धोका निर्माण होतो. निराशावादी मनोवृत्ती तयार होते कारण अनेक वर्ष दारिद्र्यामध्ये काढल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास नष्ट होतो. नैतिक अध:पतन घडून येते. बालकामगाराचा प्रश्न निर्माण होतो. शहरीकरणाला वाव मिळते. त्यामुळे अनेक समस्यांचा जन्म होतो. जसे गलिच्छ वस्त्या, बालगुन्हेगारी, व्यसनाधीनता इत्यादी.

**दारिद्र्य निर्मूलनाकरिता सरकारी प्रयत्न—**

सार्वजनिक वितरण व्यवस्था, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना, मध्यान्ह भोजन व्यवस्था, अन्न सुरक्षा कायदा, जनधन योजना, पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल योजना, उज्वला योजना एकात्मिक बाल विकास योजना, सिमांत शेतकरी व शेतमजुर यांच्या विकासाकरिता विविध संस्थाची निर्मिती, स्वयंरोजगाराकरिता ग्रामीण युवक प्रशिक्षण कार्यक्रम, एकात्मिकग्रामीण विकास कार्यक्रम, ग्रामीणक्षेत्रातील महिला व बालविकास कार्यक्रम, ग्रामीण भूमीहिन रोजगार कार्यक्रम, इंदिरा आवास योजना, दशलक्ष विहीर योजना, जवाहर रोजगार योजना, जवाहर ग्राम समृध्दी योजना, स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, शहरी रोजगार व दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम, स्वयंसहाय्यता गट, अशा अनेक नावाने कितीतरी योजना व विकास कार्यक्रम भारतामध्ये राबवीण्यात आले, पण अजुनही ही समस्या आपल्याला आढळून येते हे वास्तव आहे.

**दारिद्र्य दूर करण्याकरिता उपाय—**

१.**आर्थिक विकासात वाढ करणे—**दारिद्र्यदूर करण्याकरिता आर्थिक विकासाचा दर वाढवीणे. लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर जास्त असला पाहिजे. तरच दरडोई उत्पन्नात वाढ होवून दारिद्र्याचे प्रमाण कमी होईल.

२.**लोकसंख्यावाढीवर नियंत्रण टाकले पाहिजे—** लोकसंख्यावाढीवर कुटुंब नियोजनाच्या सहायाने नियंत्रण टाकल्यास, राष्ट्रीय उत्पन्नात व दरडोई उत्पन्नात वाढ घडून येईल.

३.**रोजगाराच्या नवीन संधीची उपलब्धता करणे—**लघु, कुटीर व ग्राम उद्योगांचा विकास करून, रोजगारीच्या नवनवीन संधी निर्माण करणे आवश्यक आहे. त्यामुळे उत्पादन व उत्पन्न वाढून दारिद्र्य दूर करण्यास मदत मिळेल.

४.**भू—सूधारणा करणे—** कमाल जमीन धारणा कायद्याची कडक अंमलबजावणी करून, मिळालेल्या जमिनी लहाण शेतकरी व भूमीहीनांना वाटून द्याव्या. तसेच चेकबंदीव्दारे जमीनीच्या तुकडी करणावर प्रतिबंध घालावा. यामुळे दारिद्र्य दूर करण्यास सहाय मिळेल.

५.**किमान गरजापुर्तीचा कार्यक्रम राबवीला पाहिजे—**यामध्ये सरकारने किमान न्युनत्म किमंतीवर जीवनाआवश्यक वस्तुचा पुरवठा केला पाहिजे. त्याचबरोबर वेगवेगळ्या आवश्यक सेवा शासनाने नागरीकांना विनामुल्य पुरवील्या पाहिजे, तरच दारिद्र्य दूर होवू शकते.

६.**आर्थिक विषमता कमी केली पाहिजे—**दारिद्र्य कमी करण्याकरिता आर्थिक विषमता कमी करणे गरजेचे आहे. त्याकरिता चैनीच्या वस्तु ऐवजी उपभोग्य व जीवनाआवश्यक वस्तुचे उत्पादन

करण्याकरिता उत्पादक घटकांचा जास्त वापर करावा. कराचा भार श्रीमंतावर दिला पाहिजे. समाजातील काळा पैसा शोधुन गरीबाच्या कल्याणाकरिता वापरावा.

७.**महागाईवर नियंत्रण ठेवावे**—चलनवाढ रोखून वस्तु व सेवाच्या किंमती स्थिर ठेवाव्या. कारण अस्थिर उत्पन्न मिळविणारा वर्ग व गरीब वर्ग यांच्यावर किंमत वाढीचा प्रतिकुल प्रभाव पडून दारिद्र्यात वाढ होते.

८.**समाजिक सुरक्षीततेच्या विविध योजनांची अंमलबजावणी करावी**—गरीब औद्योगिक कामगाराकरिता भविष्य निर्वाह निधी, वृध्दापकाळालीन पेन्शन, उपदान, इत्यादीची व्यवस्था करून सामाजिक सुरक्षा दिली पाहिजे. शासनाने शिक्षण, औषधोपचार, निवास सोयी, आवश्यक वस्तु व सेवावर खर्च करून गरिबांच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय उत्पन्नाच्या पुर्नवितरणावर जोर दिला पाहिजे.

**निष्कर्ष—**

भारतात दारिद्र्य ही एक गंभीर संमस्या असून, आकलनात एक वाक्यता नाही. त्यामुळे दारिद्र्य हे कशाला म्हणावे यासबंधी निश्चित अशी व्याख्या सुध्दा नाही. पण **तेंडूलकर समितीचा अहवाल** २००९ यांनी उपभोग्य वस्तु व सेवांची आदर्श मात्रा विचारात घेतली, त्याच बरोबर शिक्षण व आरोग्यावर होणारा खर्च सुध्दा लक्षात घेतला व त्यानुसार दारिद्र्य ठरवीण्याचा प्रयत्न केला. तसेच आज विकासाबरोबरच विषमता सुध्दा वाढत आहे. दारिद्र्य निर्मूलनाकरिता सरकारने  अनेक योजना राबवील्या परंतु पाहिजे त्याप्रमाणात यश सरकारला आले नाही. कारण फक्त निशुल्क व कमी किमंतीला वस्तू व सेवा देवून चालत नाही, तर समाजरचना व व्यवस्था अशी असली पाहीजे की, त्यामुळे सामान्य व्यक्ति कार्यप्रवण होवून आपल्या गरजा पूर्ण करण्यास सक्षम झाला पाहिजे. तरच दारिद्र्य निर्मूलन होवू एक सक्षम समाज निर्माण होईल व आत्मनिर्भरता येवून आत्मनिर्भर भारत निर्माण होईल.

**संदर्भ सूची—**

१.डॉ. श्रीधर आत्माराम देशपांडे व डॉ. विनायक श्रीधर देशपांडे— भारतीय अर्थव्यवस्था
२.डॉ. सुधाकर शास्त्री व नितीन कावडकर— भारतीय अर्थव्यवस्था
३.प्रा. बी.एल. जिभकाटे व डॉ. सुधाकर शास्त्री— भारतीय अर्थव्यवस्था—१
४.डॉ. जि. एन. झामरे—भारतीय अर्थव्यावस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र
५.अर्थसंवाद मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक
६.आकाशवाणी, टि.व्ही., वर्तमानपत्रे
७.इंटरनेटचा वापर

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# आधुनिक धर्मव्यवस्थेचा आदिवासींच्या जीवनावर झालेला परिणाम

डॉ.माधुरी झाडे
डॉ.आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा
मो. ९४२३४२०२६३,मेल—madhurizade@gmail.com

मानवी समाजाच्या संदर्भात अनेक विचारवंतांनी वेगवेगळे कालखंड सांगितले आहे. शेतीचा शोध लागल्यानंतर मानव एका ठिकाणी स्थिरावला व दिर्घकाळपर्यंत एकाच ठिकाणी अनेक लोक वास्तव्यास राहु लागली त्याचवेळेस समाज नावाची संकल्पनांना जन्म मिळाला तेव्हा शास्त्रीय आधार नसला तरी कालांतराने जेव्हा समाजाचा अभ्यास करण्याची सुरुवात झाली तेव्हा वरिल समाजाची परिस्थीती समजुन घेणे गरजेचे वाटले. समाजाच्या उत्पत्तीच्या कालखंडापासूनच धर्म सुध्दा तितकाच जुना असलेला दिसुन येतो. फक्त फरक एवढाच होता की, धर्माचे अस्तीत्व अगदीच प्राथमीक स्वरुपाचे होते.

सुरुवातीच्या कालखंडामध्ये धर्माच्या नावावर कोणत्याही प्रकारचे स्त्री—पुरुष किंवा इतर, मानवा—मानवांमध्ये भेद केल्या जात नव्हते. धर्म अगदी जीवन जगण्याचा सुंदर आधार होता. अलौकिक, अध्यात्मिक, समाधान नैसर्गिक संरक्षण इत्यादी दृष्टिकोनातून धर्माची गरज आदिवासींना वाटायला लागली व त्यातुन कर्मकांडी स्वरुपी समाजव्यवस्था निर्माण झाली. आदिवासी लोक आपले सामाजिक जिवनाचा भाग म्हणुन धार्मिक प्रतिकांना महत्व देउ लागली प्रत्येक सन, उत्सव, विधी, पुजा अर्चा मध्ये धार्मिक प्रतिकांचे महत्व वाढत गेले व त्यामधुनच धर्म संकल्पना विस्तारत गेली.

हिंदु धर्म, ख्रिश्चन धर्म,मुस्लिम धर्म, बौध्द धर्म इत्यादि धर्माप्रमाणेच 'आदिवासी धर्म' अशी नोंद १९३१ आदिच्या जनगणना अहवालात होत असे परंतु १९३२ पासुन जनगणना करतांना आदिवासी धर्म अशी स्वतंत्रपणे नोंद केल्या गेली नाही. जनगणना करतांना काही आदिवासींनी आपला धर्म आदिवासी आहे असे सांगीतले तरी त्यांची नोंद अन्य धर्म या प्रकारामध्ये करायची असा निर्णय त्याळातील शासनाने घेतला. भारतीय आदिवासींचा धर्म कोणता ?या बाबतीत अनेक विचारवंत, अभ्यासकांमध्ये बरिच मतेमतांतर होती. जीवात्मवाद अशी धर्मश्रध्दा असणाऱ्या आदिवासींचा धर्म हा हिंदु धर्मापेक्षा वेगळा आहे त्याला आदिवासी धर्म संबोधने योग्य ठरते असे काही अभ्यासकांचा आग्रह आहे. आदिवासींच्या धर्मासंदर्भात आजही अनेक मतेमतांतरे कमी, अधिक प्रमाणात दिसुन येतात म्हणुन आदिवासींच्या धर्मश्रध्दा आणि धार्मीक प्रथांचे अध्ययन करणे गरजेचे आहे. तत्पुर्वी आपण धर्माचा अर्थ लक्षात घेउयात.

**धर्माचा अर्थ :—**

धर्म हा मानवी समाजाएवढाच प्राचीन आहे. धर्माचा अभ्यास विविध दृष्टीकोनातुन केला गेला आहे. जसे तत्वज्ञान, इतिहास, धर्मशास्त्र समाजशास्त्र इत्यादी शास्त्राचा तो अभ्यासविषय आहे. अन्य शास्त्राप्रमाणेच सामाजिक मानवशास्त्रात आदिवासी धर्माचा अभ्यास केला जातो. आदिवासी धर्माच्या अभ्यास करण्याच्या संदर्भात टायलर, फ्रेजर, मॅलीनोव्हस्की, या सामाजिक मानवशास्त्रज्ञाचे योगदान महत्वाचे आहे.

**किंग्जले डेव्हिस यांच्या मते :—**

'धर्म ही मानवी जीवनात एवढा सार्वत्रीक, शाश्वत व व्यापक आहे कि, धर्माचे स्वरुप लक्षात घेतल्याशिवाय समाजाच्या स्वरुपाचे यथार्थ आकलन होउ शकत नाही.

**एडवर्ड टायलर :—**

यांनी अगदी सोपी व सुटसुटीत व्याख्या केली आहे. त्यांच्या मते "दैवी विभूतीच्या अस्तीत्वावरिल श्रध्दा म्हणजे धर्म होय."

सर जेम्स फ्रेजर यांच्या मते :—

"मानवापेक्षा श्रेष्ठ असलेल्या आणि ज्या मानवी जीवनाचे नियंत्रण करतात त्या शक्तींना अनिष्ठ टळावे म्हणून प्रसन्न करुन घेण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे धर्म होय."

**मॅलीनोव्हस्की:—**

यांनी व्याख्या करतांना समाजशास्त्रीय व मानवशास्त्रीय अशा दोन्ही बाजुचा आढावा घेतला. त्यांचा मते "धर्म हा श्रध्दा व विधी यांचा व्यवस्था आहे तसेच धर्म ही एक सामाजिक घटना व वैयक्तिक अनुभुती आहे."

**प्रा.बॅलर्ड यांच्या मते :—**

सामाजिक परिस्थीतीत आढळुन येणारे, अमुर्त, अदृश्य, अनोळखी व अप्रतिबध्द अशा शक्तीशी मिळते जुळते घेण्याची प्रक्रिया म्हणजे धर्म होय.

वरिल सर्व व्याख्यांवरुन आपल्याला असे निदर्शनास येते की, मानवापेक्षा कुठल्यातरी श्रेष्ठ शक्तीवर ठेवलेला विश्वास यावर आधारित सामाजिक जीवनाची रचना व कार्य यांचा मिलाप णर्म या संकल्पनेच्या माध्यमातुन दिसून येतो.

**धर्माच्या उत्पत्तीचे सिध्दांत :—**

धर्माच्या उत्पत्तींच्या सिध्दांतासंदर्भात अनेक विचारवंतांनी अभ्यासकांनी वेगवगळे सिध्दांत मांडले या सिध्दांताचा थोडक्यात विचार करने महत्वाचे आहे. तेव्हाच आपण धर्माची संकल्पना अधिक चांगल्यानी समजुन घेउ शकु.

**१.सर्वात्मवाद किंवा आत्मवादाचा सिध्दांत :—**

या सिध्दांताची मांडणी एडवर्ड टायलर यांनी केली व त्यामध्ये स्पेन्सर यांनी देखील भर घातली. टायलर यांच्या मते आत्म्याच्या अस्तीत्वावरिल विश्वाच हाच सर्व मानव समाजातील धर्माचा प्रारंभबिंदु आहे. अगदी सुरुवातीपासुन तर आधुनिक व्यवस्थेचा धर्माचा आधार हा आत्म्याची संकल्पना आहे. टायलरणी स्वप्न आणि मृत्यू यांचा आदिवासींच्या जीवनावर झालेला परिणाम विषद करुन धर्म संकल्पनेचा उदय झाला असे स्पष्ट केले. आत्म्याच्या ठीकानी मानवी जीवनाचे संचलन असते.

म्हणुनच त्याला प्रसन्न करण्याकरिता वेगवेगळया पुजा, अर्चा करणे विधी, कर्मकांड करणे यातुन आपले जीवन सुकर होईल ही त्यामगची धारणा आहे.

**२.चेतनावाद किंवा मानावाद सिध्दांत :—**

यांनी चेतनावाद/मानावादाचा सिध्दांत मांडला, त्यानी या जगामध्ये प्रत्येक सजीव आणि निर्जीव वस्तु मध्ये एक अलौकिक शक्ती असते व ही अलौकिक शक्ती संपुर्ण सृष्टिचे नियत्रित करित असते म्हणुन स्वत: व समाजाचे हित लक्षात घेउन वेगवेगळया प्रकारच्या पुजा, अर्चा, विधी, कर्मकांड यांच्या माध्यमातुन या अलौकिक शक्तीला प्रसन्न केले जाते. या अलौकिक शक्तीलाच माना,बोंगा असे म्हटले जाते.या संदर्भातील वेगवेगळे अतार्किक संदर्भ मांडुन धर्माची उत्पत्ती या शक्तीच्या माध्यमातुन झाली असल्याचे अनेकांनी स्पष्ट केले.

**३. निसर्गवादाचा सिध्दांत :—**

हा सिध्दांत सुध्दा जर्मन विचारवंत मॅक्समुलर यांनी मांडला नैसर्गिक शक्तीच्या ठिकाणी अलौकिक शक्ती आहे अशा संकल्पनेतुन कर्मकांड, पुजा, अर्चा, विधी यांचा प्रांरभ झाला व तिथूनच धर्म नावाच्या संकल्पनेची सुरुवात झाली मॅक्समुलरने सांगीतले की आदिवासी मानवांवर निसर्गाचा फार मोठा प्रभाव होता. निसर्गामध्ये घडणाऱ्या घटनांमागील कारणे तो जानु शकत नव्हता उदा. ऋतूचक्र, सुर्य उगवणे व मावळणे, ढगांचा कळकळाट, विजांचा आवाज मुसळधार पाउस परिणामी त्यांच्या मनात भिती निमाण होत होती व या भितीपोटीच तो वेगवेगळे कर्मकांड करून धर्म संकल्पना रूढ करत गेला.

**४. प्रकार्यवादाचा सिध्दांत :—**

या सिध्दांताचे समर्थन रॉबर्ट स्मिथ मॅलिनोव्हस्की, मॅक्स वेबर, पारसन्स या विचारवंतांनी केले. या विचारवंतांनी कुटूंब व विवाह या संस्थेप्रमाणेच धर्मसंस्था ही सुध्दा महत्वपुर्ण मानली त्यांनी धर्माच्या उदयापेक्षा कार्याला जास्त अधोरेखीत केले त्यांच्या मते.

१) धर्म व्यक्तीला समुहाशी एकरूप करतो.
२) असुरक्षित व्यक्तीस मानसीक सुरक्षितता प्राप्त करतो.
३) निराशा दु:ख संकट या काळात व्यक्तीचे सांत्वत करतो व व तिची नितीमत्ता वाढवतो.

४) समाजातील प्रस्तापीत मुल्य व उद्दिष्ट यांचे महत्व वाढवुन समाजाचे संघटन व नियंत्रण घडवून आणतो.

**५) सामाजिक सिध्दांत :—**

या सिध्दांताची मांडणी दुर्खीम यांनी केली यालाच धर्माचा समाजशास्त्रीय सिध्दांत असेही म्हणतात. त्यांनी या सिध्दांताची मांडणी पवित्र आणि अपवित्र संकल्पणांच्या आधारावर केली. दुर्खीम यांनी आपल्या सिध्दांताची मांडणी आस्ट्रेलीयन अरूंटा या आदिवासींचा अभ्यास करून मांडली दुर्खीमच्या मते कुलप्रतिकवाद हा धर्माचा सर्वात प्राथमिक प्रकार होय. अरूंटा जमात विविध कुलात विभागली आहे. एका कुलातील सर्व कभासदांचे पूर्वज समान असतात कुलात अंतरविवाह होत नाही. सभासदांना न्याय मिळवुन देण्यात येतो. एखाद्या प्राणी किंवा वनस्पती कुलाचे प्रतिक असते हे कुलचिन्ह पवित्र मानन्यात येते यांची शुध्दता टिकवुन ठेवण्यासाठी विधी निषेध, नियम, पुजा अर्चा समारंभ याचा जन्म होतो व्यक्ती श्रध्दा व भितीपोटी यांच्या पुढे नतमस्तक होतो आणि यातूनच तो धार्मिक अनुभूती घेतो.

**संशोधन पध्दती :—**

संशांधनकर्ती मागील बारा वर्षापासुन डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा येथे सहायक प्राध्यापक म्हणुन कार्यरत आहेत त्यापुर्वी त्या अनेक वर्ष मेळघाटमध्ये आदिवासींकरिता काम करित होत्या. संशोनधनकर्ती समाजकार्य महाविद्यालयात समाजशास्त्राच्या प्राध्यापीका असल्याने विद्यार्थ्यांना धर्मव्यवस्था शिकवीत असतांना तसेच दुसऱ्या वर्गातील विद्यार्थ्यांना आदिवासी समुदायातील परिवर्तन शिकवत असतांना त्यांच्या लक्षात आले की आदिवासींच्या जीवनावर धर्माचा फार मोठा प्रभाव होता परंतु आता त्यांच्यात आधुनिक धर्म उदा. हिंदु, खिश्चन, मुस्लिम यांचा प्रभाव पहावयास मिळतो म्हणुन त्यांनी अध्ययनकरिता आधुनिक धर्मव्यवस्थेचा आदिवासींच्या जीवनावर झालेला परिणाम या विषयाची निवड केली.

**अध्ययनाची उद्रिष्टये :—**

१.आदिवासींच्या पुजा, अर्चा व आधुनिक धर्माचा प्रभाव जाणुन घेणे.
२. आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनावर धर्माचा झालेला परिणाम अभ्यासने.
३. आदिवासींच्या विवाह पध्दतीवर आधुनिक धर्मव्यवस्थेचा झालेला परिणाम जाणुन घेणे.
४. आदिवासींच्या सामाजीक जीवनावर धर्माचा झालेला परिणाम अभ्यासने.

**गृहितकृत्ये :—**

१) आधुनिक धर्माच्या प्रभावामुळे आदिवासींच्या पारंपारिक पुजा, अर्चा मध्ये बदल झाला.
२) आधुनिक धर्माच्या प्रभावामुळे आदिवासींच्या सांस्कृतीक जीवनामध्ये बदल झाला.
३) आधुनिक धर्माच्या प्रभावामुळे आदिवासींच्या विवाह पध्दतीत बदल झाला.
४) आधुनिक धर्माच्या प्रभावामुळे आदिवासींच्या सामाजिक जीवनात परिवर्तन झाले

संशोधनकर्ती जरी डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा येथे सहायक प्राध्यापक पदावर कार्यरत असली तरी अभ्यासदौऱ्याच्या माध्यमातुन तिचा अनेक आदिवासी विभागासोबत संपर्क असतो. उदा. मेळघाट, गडचिरोली, यवतमाळ इत्यादि अभ्यास दौऱ्याच्या निमीत्याने ती अनेक स्वयंसेवी संस्था कार्यकर्ते आदिवासी गावातील ग्रामपंचायत, सरपंच, सदस्य, महिला, वृध्द व्यक्ती, आदिवासी युवक, युवती, अंगणवाडी सेविका तसेच महाविद्यालयातील आदिवासी युवक, युवती, वनकर्मचारी तसेच मेळघाट मध्ये वास्तव्यास असताना त्यांचे सुक्ष्म निरीक्षण यातुनच या विषयाची त्यांनी मांडणी केली आहे.

**१) आदिवासी पुजा, अर्चा व आधुनिक धर्म :—**

आदिवासींच्या जीवनात पुजा, अर्चेला फार महत्वाचे स्थान आहे. आदिवासी लोक आपल्या कोणत्याही नवीन कार्याची सुरुवात ते पुजा अर्चा करुन करतात उदा. शेतीची पेरणी, विवाह, पीक काढणी इत्यादी. त्यांच्या पुजा अर्चेमध्ये प्रामुख्याने त्यांच्या पारंपारिक देवाचा समावेश असतो तसेच गंडे दोरे, धागे, नविन कपडे बांगडया इत्यादींचा समावेश असतो परंतु आधुनिक धर्माच्या प्रभावामुळे जे आदिवासी ज्या ज्या धर्माच्या संपर्कात आले आहे त्या त्या धर्माच्या देवतानुसार/धर्मानुसार पुजा करायला लागले उदा. हिंदु धर्माच्या संपर्कात आलेले आदिवासी हिंदु धर्माच्या देव देवतांची पुजा करायला लागले. खिश्चन धर्माच्या संपर्कात आलेले आदिवासी खिश्चन धर्माच्या रिती नियमानुसार

पुजा करायला लागले तर मुस्लिम धर्माच्या संपर्कात आलेले आदिवासी हे मुस्लिम धर्माच्या रितीनीयमानुसार पुजा करायला लागले आज अनेक आदिवासी विभागातील वेगवेगळया धर्माची मंदिर, चर्च बघावयास मिळते यावरुन असे लक्षात येते की आदिवासी पारंपारिक धर्मामध्ये आधुनिक धर्माचा हस्तक्षेप होउन त्यांच्यामध्ये परिवर्तन होत आहे.

२) **आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनावर धर्माचा प्रभावः—**

आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनावर देखील धर्माचा फार मोठा प्रभाव पडलेला आपणास दिसुन येतो आदिवासी समुदायामध्ये सांस्कृतिक जीवन हे पारंपारिक स्वरुपाचे होते. अनेक समुदायांमध्ये युवागृह/गोटुल नावाची संकल्पना अस्तीत्वात होती या गोटुल युवागृहामध्ये ७ वर्षापासुन तर लग्न होईपर्यंत मुल, मुली सकाळी सायंकाळी एकत्र यायची गाणी नाच यामध्ये मग्न व्हायची आपले पारंपारिक नृत्य गाणी शिकायचे तसेच गावामध्ये कोणत्याही कार्यक्रम प्रसंगी ते सादर करायचे लग्न समारंभ, उत्सव इत्यादी प्रसंगी पारंपारिक नृत्य यांना महत्वाचे स्थान असायचे परंतु आज आधुनिक धर्मव्यवस्थेचा प्रभाव आविवासींच्या जीवन पध्दतीवर झालेला आहे आज अनेक उत्सव कार्यक्रम प्रसंगी सिनेमाचे गाणे लावतात मुले मुली सिनेमांच्या गाण्यांवर नृत्य करतात. अनेक धार्मीक कार्यक्रमामध्ये सुध्दा परिवर्तन झाले उदा. आज मोठया प्रमाणात आदिवासी समुदायामध्ये गणेशउत्सव, दुर्गात्सिव, ख्रिसमस, गुडफ्रायडे इत्यादी उत्सव साजरे केले जातात.

३) **आदिवासींच्या विवाह पध्दतीवर धर्माचा प्रभाव.**

आदिवासींच्या विवाहपध्दती हया वेगवेगळया स्वरुपाच्या आपणास दिसून येतात. वेगवेगळया जमातीमध्ये जोडीदार निवडण्याच्या वेगवेगळया पध्दती आहेत. आदिवासींची विवाह पध्दती ही फार साधी आणि आगडी वेगडी आहे. अनेक आदिवासींमध्ये आाजही विवाहाच्या वेळेस वधुमूल्याची प्रथा अस्तीत्वात असलेली दिसुन येते. अगदी साध्या पध्दतीने विवाह व्हायचे कोणत्याही प्रकारच्या लग्नांमध्ये मोठेपणा नसायचा आपआपल्या एपतीप्रमाणे पाहूण्यांना बोलावून त्यांचे आगत स्वागत करून आदिवासी त्यांच्या विवाह विधीप्रमाणे विवाह पार पाडायचे परंतू आज विविध धर्माचा शिरकाव आदिवासी समुहामध्ये झाल्याने त्यांच्या विवाह पध्दतीत बदल झालेला दिसुन येतो.उदा. मेळघाटमध्ये जे आदिवासी हिंदू धर्मियांच्या संपर्कात आले त्यांच्या विवाह पध्दतीवर हिंदु धर्मीय विवाह पध्दतीचा प्रभाव पडलेला दिसून येतो जसे मंगल अष्टके, मंडप, बॅड इत्यादि. ख्रिश्चन धर्मियांच्या जे आदिवासी समूदाय संपर्कात आले त्यांच्या विवाहपध्दतीवर ख्रिश्चन धर्मीयांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. उदा. अनेक आदिवासी चर्चमध्ये विवाह करतात तर जे आदिवासी समुदाय मुस्लिम धर्माच्या संपर्कात आले त्यांच्या वैवाहीक पध्दतीवर मुस्लिम धर्मीयांचा प्रभव पडलेलो दिसून येतो अशा रितीने ज्या ज्या आदिवासी समुदायचा वेगवेगळया धर्मिय लोकांच्या अधिक संपर्कात आले त्या त्या धार्मिक विवाह पध्दतीचा प्रभाव आदिवासी विवाह पध्दतीवर झालेला दिसुन येतो.

५) **आदिवासींच्या आर्थिक जीवनावर धर्माचा प्रभावः—**

अनेक वर्षापर्यंत आदिवासींचे आर्थिक जीवन एकप्रकारे स्वयंपूर्ण स्वरूपाचे होते. त्यांच्या मर्यादित गरजांची पुर्तता ते त्यांच्या समुहाच्या माध्यमातुन करित होते. परंतू जेव्हा आदिवासी समुदाय वेगवेगळया धर्मीयांच्या संपर्कात आल्यामुळे त्यांच्या खानपानाच्या सवयी बदलल्या अनेक निषेध नियम लागु करण्यात आले. त्यांचे जंगलावर आधारित असलेले जीवन उदा. मासेमारी, पशू पक्षांचा शिकार यावर निर्बध यावयास लागली त्यामुळे त्यांना वेगवेगळया ठिकाणी मोलमजुरी करून जीवनाचा उदरनिर्वाह करण्याची पाळी आली. अर्थव्यवस्थेला वेगवेगळे स्वरूप प्राप्त झाले त्यांच्या पारंपारिक व्यवसायाच्या जागी नवनवीन कार्य व व्यवसायाची भर पडत गेली. अनेक धर्म विधी करिता त्यांना पैशाच्या स्वरुपात खर्च यायला लागला धर्म उत्सव साजरे करित असतांना त्यांच्याकडुन पैसे गोळा केल्या जाउ लागले त्यामुळे धर्माच्या नावावर त्यांच्या आर्थिक परिस्थीतीमध्ये एकप्रकारे हस्तक्षेप होउ लागला.

६) **आदिवासींच्या सामाजीक जीवनावर धर्माचा प्रभाव :—**

एकंदरित आदिवासींचे संपुर्ण जीवन हे वेगवेगळया धर्माने प्रभावीत केले. आदिवासींच्या पारंपारिक प्रथा, परंपरा रूढी प्रमाणके यामध्ये बदल होउन नवधर्माच्या रूढी, प्रथा, परंपरा ते आत्मसाम करावयास लागले. आज आदिवासींमधील अनेक पारंपारिक विधी आजच्या तरूण

पीढींना माहित नाही. कोरकू मधील शिदोली नावाचा प्रकार आदिवासीमधून यूवागृह, गोटुल अशा वेगवेगळया नावांनी जे आदिवासींचे सांस्कृतीक सामाजिक भवन होते. त्यांच्या मोठया प्रमाणात लोप होतांना दिसत आहे. आदिवासींचे पारंपारिक खेळ, नृत्य यांचीही हळूहळू लोपाकडे वाटचाल सूरू आहे.कारण अनेक तरूण मुला मुलींना पारंपारिक नृत्य, गाणी येत नाही तर वेगवेगळया धर्मीयांची गाणी ते आपल्या घरी कार्यक्रमांमध्ये वाजवतांना दिसतात एवढेच नव्हे तर अनेक आदिवासी तरूण तरूणींची मोबाईल रिंगटोन सुध्दा धार्मीक गाण्याची, स्टेटस धार्मीक देवदेवतांची पहावयास मिळतात. त्यांच्या वेशभुषा, केशभुषा पुर्णपणे बदलल्या आहेत एवढेच काय ते एकमेकांसोबत सुध्दा कधी कधी आपली मातृभाषा सोडून मराठी, हिंदी भाषेमध्ये बोलतात यावरून त्यांच्या सामाजिक जीवनात मोठया प्रमाणात बदल झालेला दिसुन येतो.

**निष्कर्ष** :—

आज आदिवासींच्या परंपरागत जीवनपध्दतीमध्ये मोठया प्रमाणात बदल होतांना दिसत आहे. आदिवासी संस्कृतीचा लोप होतांना दिसत आहे. पुर्वी ख्रिश्चन मिशनऱ्यांनी या समुदायामध्ये वास्तव्य करून स्वत:च्या धर्माचा प्रचार आणि प्रसार मोठया प्रमाणात केला त्यानंतर हिंदु, मुस्लिम समुदाय देखील आदिवासींना आपल्या धर्माकडे वडविण्याचा प्रयत्न करित आहे त्याचा परिणाम म्हणुन आज अनेक तरूण तरूणींना स्वत:चे दैवत माहीत नाही. पारंपारिक पुजा अर्चा करता येत नाही त्यांची सांस्कृतीक साधने व माध्यमे बदलली आहे. विवाह विधी सन उत्सव यामध्ये देखील बदल झालेला दिसतो त्यांची युवागृहे, गोटुल इत्यादी पध्दतीचा लोप होत आहे. पारंपारिक गाणी नृत्य विसरत चालली आहे. एकंदरितच संपुर्ण आदिवासी जीवन आज वेगवेगळया धर्माने प्रभावीत झालेले दिसुन येते गावांमध्ये गेल्यानंतर वेगवेगळया धर्माची मंदिरे, चर्च बघावयास मिळतात, वेगवेगळया धर्माची प्रतिके बघावयास मिळतात, त्यांचा स्वतंत्र असलेला आदिवासी धर्माचे अस्तीत्व आज गावांमधुन नामशेश होत आहे. व नवधर्म रचना गावांमध्ये प्रवेश करताना दिसत आहे.

**संदर्भग्रथसूची**:—

१) लोटे रा.ज (२०१०). 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र', पिंपळापुरे ॲड क पब्लिशर्स नागपूर ४४४००३२.
२) खडसे भा.की (१९९९). 'सामाजिक मानवशास्त्र', श्री मंगेश प्रकाशन श्री शांतादुर्गा निवास २३, नवि रामदासपेठ नागपूर ४४४००१०.
३) नेहरू पंडित जवाहरलाल (१९९७). 'भारत कि खोज' (मराठी आवृत्ती साने गुरूजी व करंदीकर) कॉन्टीनेटल प्रकाशन पुणे.
४) आंबेडकर डॉ.बाबासाहेब(अनुवाद घोडेस्वार देविदास).
'बुध्द आणि त्यांचा धम्म' डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोशीएशन नागपूर.
५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग—३ खंड—१८, प्रकाशन उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन २००२.
६) कऱ्हाडे स.दा (२०११). 'समाजप्रबोधन' लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद.
७) मिश्र रामनाथ (१९९४). प्राचीन भारतीय समाज, अर्थव्यवस्था एवं धर्म भोपाळ, व्दितीय आवृत्ती.
८) जिज्ञासू चंद्रिकाप्रसाद (१९८६). 'भारत के आदी निवासीयो की सभ्यता' लखनउ अष्ठम संस्कारन.

.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# भारतीय फिल्म संगीत की उत्पत्ति, विकास एवं नाट्य संगीत का विकसित स्वरूप

किशोर चंद राठौड़
शोधार्थी (संगीत—विभाग) बरकतउल्लाह विश्वविद्यालय भोपाल (म.प्र.)
E mail ID-rathodkishorsing@gmail.com

**सार—**

वर्तमानयुग में संगीत की हर एक शैलियों के प्रचार का सर्वोत्तम माध्यम सिनेमा है। इसके अत्यंत लोकप्रिय होने के कारण यह अपने में विहित संगीत को जनसाधारण तक सरलता से पहुंचा देता है। वर्तमान में सिनेमा के अतिरिक्त रेडियो, टेलीविजन, ग्रामोफोन, टेप रिकार्ड व मोबाईल इत्यादि द्वारा भी प्रचार—प्रसार होता है किंतु सिनेता की बात कुछ और ही है। सिनेमा में गीतों के साथ—साथ नृत्य, चित्रकला, नाट्य—कला, काव्यकला, कथा—साहित्य तथा अभिनय द्वारा विभिन्न स्वरूपों में भावाभिव्यक्ति होती रहती है जिसमें दर्शकों पर व्यापक प्रभाव पड़ता है अत: यह कहना अनुचित नहीं है कि सिनेमा संगीत प्रचार—प्रसार का सर्वोत्तम साधन है। भारतीय सिनेमा संगीत का सर्वप्रथम आरम्भ १४ मार्च १९३१ ई. में बम्बई के मैजेस्टिक सिनेमाघर से माना जाता है इसी के पूर्व सन् १९१२—१३ के आस—पास मूक फिल्मों का निर्माण विशेष कर भारत के पंजाब, महाराष्ट्र, बंगाल व मद्रास इत्यादि राज्यों में हुआ करता था तथा मूल फिल्मों से भी पूर्व देश में आंचलिक संगीत की परंपराओं में मुख्य रूप से लोक संगीत, शास्त्रीय संगीत, नाट्य संगीत, रवीन्द्र संगीत, गजल, कव्वाली तथा टप्पा, ठुमरी इत्यादि विधाओं का प्रचलन था जैसे कि मानव में स्वभाव से ही अनुकरण करने की प्रवृत्ति पाई जाती है। यहां प्रवृत्ति मनुष्य के अतिरिक्त वानर एवं कुछ अन्य पशुओं में भी मानी गई है, इस प्रवृत्ति का एकमात्र लक्ष्य आनंद प्राप्त करना है अर्थात मनुष्य की इसी प्रवृत्ति से नई शैली के रूप में संगीत की शुरूआत हुई जिसे फिल्म—संगीत कहा जाने लगा तथा तब से लेकर आज फिल्म संगीत का क्षेत्र अत्यधिक विकसित हुआ है जिसमें हजारों फिल्में एवं लाखों गीत बन चुके हैं। वर्तमान युग में चर्चित फिल्म—संगीत का जन्म मुख्य रूप से लोक संगीत तथा शास्त्रीय का ही परिवर्तित स्वरूप है जो आज प्रत्येक संगीत की शैलियो के प्रचार प्रसार में फिल्म संगीत का माध्यम अन्य विकल्पों की अपेक्षा अत्यधिक लोकप्रिय सिद्ध हुआ है।

**प्रस्तावना—**

भारतीय संगीत सबसे प्राचीन कला है जब मानव ने भाषा भी नहीं सीखी थी तो भी किसी न किसी रूप में संगीत था। आदि मानव भी अपने उदगार खुशी आदि भी गुनगुनाकर ही व्यक्त करता रहा होगा जैसे— पक्षियों को कोई चहचहाना कोई नहीं सिखाता, शिशु को रोना—हंसना कोई नहीं सिखाता उसी प्रकार मानव को गाना—नाचना, आदि स्वत: ही आता है। यह बात अलग है कि इसका रूप परिष्कृत न हो किंतु आज के वर्तमान युग में प्रचलित हर तरह का सांगीतिक नाद मनुष्य ने ही निर्मित किया है। प्राचीन संगीत से लेकर आज तक जाति, भाषा—बोली, संस्कृति एवं स्थानीय परंपराओं के आधार पर संगीत का विभिन्न रूपों में विकास हुआ एवं संगीत की इन्हीं विधाओं के बिना उसका जीवन अधूरा है। खुशी के क्षणों में भी मनुष्य गीत गुनगुनाता है और दु:ख के क्षणों में भी संगीत उसका मन बहलाता है। विश्व में अनेक प्रकार का संगीत विद्यमान है परंतु भारतीय संगीत की अपनी बात ही निराली है। भारतीय संगीत परंपरा में मुख्य रूप से लोक संगीत, सुगम संगीत तथा शास्त्रीय संगीत ये तीनों विशेष तौर पर प्रचलित है। लोकसंगीत अर्थात किसी विशेष क्षेत्र में प्रचलित जो जनसाधारण की भावनाओं को सरलता से अभिव्यक्त करने वाला होता है और इसमें किसी भी प्रकार की कृत्रिमता नहीं रहती है। सुगम संगीत भी जनसाधारण का संगीत है परंतु इसमें शहर और गांव का कोई भेद नहीं है इसलिए इसकी कोई भाषा या कोई विशेष क्षेत्र नहीं होता। संगीत में जहां सादगी होती है वहीं सुगम संगीत में विभिन्न

सौंदर्यपूर्ण अलंकारों का प्रयोग किया जाता है तथा शास्त्रीय संगीत विधा एक विशिष्ट वर्ग के लिये रही है इसलिए इसे अभिजात संगीत भी कहते हैं।

**फिल्म संगीत की उत्पत्ति**—भारतीय संगीत की परंपरा सदा से ही परिवर्तनशील रही है जिसका उल्लेख हमें प्राचीन ग्रन्थों के आधार पर मिलता है इस विषय पर साहित्य ग्रन्थों का अध्ययन करने से ज्ञात होता है कि प्राचीन समय के भरतकालीन संगीत के आरम्भिक काल में ध्रुवा गायन की परंपराओं का प्रचलन था तथा उससे भी पूर्व जाति गायन की परंपरा मानी जाती थी। कुछ कालान्तर पश्चात मध्ययुग के आरम्भ से ही जाति गायन व ध्रुवा गायन में परिवर्तन स्वरूप प्रबन्ध गायन के रूप में संगीत की परंपरा आरम्भ हुई तथा भारतीय संगीत में प्रबन्ध गायन की परंपरा भी सत्रहवीं सदी के आसपास तक परिवर्तनस्वरूप शास्त्रीय गायन में परिणित हो गई तब से लेकर आज तक वर्तमान संगीत में शास्त्रीय गायन के अतिरिक्त लोकसंगीत सुगम संगीत व नाट्य संगीत इत्यादि शैलियों का प्रचार प्रसार सर्वाधिक रूप से हुआ है। भारतीय संगीत में परिवर्तनस्वरूप एक ओर संगीत की परंपरा आरंभ हुई है अर्थात जिन शैलियों को शास्त्रीय संगीत, सुगम संगीत व लोकसंगीत के रूप में जाना जाता है इन्हीं शैलियों से आधुनिक समय में संगीत के तीनों प्रकारों को मिलाकर एक नया संगीत तैयार हुआ है जिसे चित्रपट या फिल्मी संगीत कहते हैं।

भारतीय फिल्म संगीत की उत्पत्ति के प्रारंभिक काल में १५ अप्रैल १९११ का दिन एक ऐतिहासिक दिन था क्योंकि इस दिन दादासाहब फाल्के— जो कि त्रयम्बक मुबई के रहने वाले थे। इन्होंने बंबई में अमेरिका इंडिया सिनेमा नाम के सिनेमाघर में लाईफ आफ क्राइस्ट फिल्म देखी और ठान लिया कि भारत में फिल्म बनाना है। ४ फरवरी १९१२ को दादा साहब फाल्के इंग्लेंड गये और वहां उन्होंने सिनेमा निर्माण कला का गहराई से अध्ययन किया। दादा साहब फाल्के वहां के कैमरा प्रिंटिंग मशीन लेकर भारत आये और सितम्बर १९१२ में भारत की प्रथम फिल्म राजा हरिश्चंद्र का निर्माण कर दिया। ८ महीनों तक बहुत कठिनाइयों का सामना करते हुए दिनांक २१ अप्रैल १९१३ को इस फिल्म का ओलम्पिया थियेटर में विशेष प्रदर्शन हुआ जिसमें देश के बड़े—बड़े उद्योगपति, वकील तथा जज इत्यादि उपस्थित थे। इस प्रकार दादा साहब फाल्के द्वारा फिल्म निर्माण की क्रान्ति ने युग परिवर्तन कर दिया। इसके उपरांत ही भारतीय सिनेमा जगत में चित्रपट संगीत या फिल्मसंगीत का इतिहास सवाक हिन्दी फिल्म आलमआरा से शुरू होता है जो १४ मार्च १९३१ ई. को प्रथम बार मैजेस्टिक सिनेमाघर बंबई के पर्दे पर प्रदर्शित हुई। इसके पूर्व सन् १९१२—१३ के आस—पास मूक फिल्में का निर्माण विशेषकर भारत के पंजाब, महाराष्ट्र, बंगाल व मद्रास आदि राज्यों में हुआ करता था। मूक फिल्मों के स्वरूपों की बात करें तो इसके प्रदर्शन के समय एक व्यक्ति बोलकर समझाता रहता था कि दृश्य में अमुक चीज दिखाई जा रही है। इस फिल्म के प्रदर्शनस्वरूप एक हारमोनियम वादक और एक तबला वादक लोगों का मनोरंजन करने के लिए इन्हें रखा जाता था तथा इस प्रकार वे दृश्य के भाव के अनुसार वादन करके पार्श्व—संगीत की कमी पूरी कर देते थे किंतु धीरे—धीरे मूक फिल्मों में श्रोता—दर्शकों की रूचि कम होने से आकर्षण हटता गया और अंततः मूक फिल्मों का सिनेमा युग से विदाई हो गई तत्पश्चात् नवीनतम परिवर्तन स्वरूप बोलती फिल्म संगीत का निर्माण आरंभ हुआ।

**फिल्म संगीत का विकास**—भारतीय फिल्म संगीत के आरंभिक काल में शास्त्रीय संगीतकार ही फिल्म संगीत की रचना करते थे और प्रत्येक फिल्मी संगीतकार किसी न किसी सांगीतिक घराने का शिष्य हुआ करता था। इनके समय में घरानेदार व शास्त्रीयता पर आधारित संगीत का खूब प्रचलन था। विशेषकर सन् १९४० से १९६२ तक के फिल्मों के गीत—संगीत शास्त्रीय संगीत पर आधारित है जैसे— बैजूबावरा, झनक—झनक पायल बाजे, गूंज उठी शहनाई, मुगलेआजम, संगीत सम्राट तानसेन इत्यादि। भारतीय फिल्म संगीत के इन गीतों में जिन संगीतकारों ने शास्त्रीय संगीत का स्वरूप निर्मित किया उनमें मुख्य रूप से नौशाद, रोशन, बसंत देसाई, सी.रामचन्द्र, एस.डी. बर्मन, शंकर—जयकिशन, एस.एन.त्रिपाठी, ओ.पी.नैयर और मदन मोहन आदि का नाम विशेष रूप से उल्लेखनीय है। भारतीय फिल्म संगीत के शुरूआती दौर में सन् १९१३ के आस—पास जब बोलती फिल्में शुरू हुई तो कथा, संवाद और संगीत तीनों प्रयोग की दृष्टि से विकसित होने लगे थे। लोक संगीत, शास्त्रीय संगीत के विविध रूपों से फिल्मों में जान पड़ गई। फिल्मों का जनमानस में रूचि बढ़ने से निरंतर दिन—प्रतिदिन विकास बढ़ता गया। एक—एक फिल्म में

ISSN : 2278-9308
July 2021

१०–१० गीत आने लगे। धीरे–धीरे फिल्म संगीत के विकसित होने से संगीत का निर्माण करने वाले संगीतकार भी बढ़ने लगे। अलग–अलग प्रांतों से जो संगीत निर्देशक फिल्मों में आए उन सबने अपने–अपने घराने और अपने प्रान्त के संगीत से फिल्मी धुनों को चटकीला बनाया इससे फिल्म संगीत इतना समृद्ध होता गया कि छोटे–छोटे बच्चे भी उसे गलियों में गाने लगे। एच.एम.वी., टिवन कोलम्बिया, हिन्दुस्तान और यंग इण्डिया कम्पनी के डिस्क रिकार्ड लाखों की संख्या में बिकने लगे जिससे फिल्म संगीत का विकसित होता गया।

भारतीय फिल्म संगीत के इसी दौर में प्राचीन संगीत परंपरा की प्रमुख गायन शैलियों में ध्रुपद, धमार, तराना, कव्वाली, गजल, दादरा, भजन और लोकगीत फिल्मी दायरे में आकर ऐसे सज उठे कि लोग उन्हें सुनकर आनंद से झूम उठे एवं तब से लेकर आज तक फिल्म संगीत में विशेष प्रगति के साथ–साथ आमजनमानस में मनोरंजन व शिक्षा संस्कार के रूप में इसमें अत्यधिक रूचि बढ़ी है। वास्तव में फिल्म संगीत ने हमारे देश में जैसा तहलका मचाया है उसकी मिसाल विश्व में कहीं नहीं मिलती है। चित्रपट संगीत जिंदगी के उतार–चढ़ाव से परेशान, मायूस एक आम इंसान को भी भावना और कल्पना के समुद्र में डुबकियां लगाना सिखाया है। यह कहना अतिश्योक्ति नहीं होगी कि फिल्म संगीत ही है जिसने शास्त्रीय संगीत को जनसाधारण तक पहुंचाया तथा भारतीय संगीत जगत पर अपना एक अमिट प्रभाव छोड़ा है।

**नाट्य संगीत का विकसित स्वरूप–**

**नाट्य संगीत से आशय–**नाट्य संगीत पर भरतमुनि ने नाट्य संबंधी सूत्रों का एक ग्रंथ तैयार किया जिसे नाट्यशास्त्र कहा जाता है। भरत के अनुसार ऐसी कोई विधा या ऐसा कोई शिल्प नहीं जिसका समावेश, नाट्य संगीत में न किया जा सके अतः इसलिये नाट्य या नाटक ज्ञानियों को ज्ञान प्रदान करता है मूर्खों को उपदेश देता है और साधारण जनों को आनंदित करता है। नाट्य को पंचम वेद की संज्ञा दी गई है और गीत को नाट्य की शैया कहा गया है अर्थात् नाटक की एकरूपता से थके हुए मन को विश्राम देने के लिये नाटके के बीच में गीत,वाद्य और नृत्य का आयोजन किया जाता है और जब तक यह संगीत चलता है उतने काल तक नाट्य को भी विश्राम प्राप्त होता है। नाटक के अनेक तत्व हैं जिनमें संवाद एवं अभिनय को प्रमुख माना गया है।

**नाट्य संगीत का स्वरूप–**भारतीय फिल्मों से पहले समाज में नाटकों का प्रचार था। पारसी, गुजराती और बंगाली नाट्य मंडलियों के साथ मराठी नाट्य मंडलियों की धूम मची हुई थी। जिस प्रकार आज फिल्मों में मनोरंजन होता है उसी प्रकार नाटक दिन भर के थके मांदे समाज को कलाजन्य आनंद प्रदान करते थे। संगीत नाटक का एक अभिन्न अंग था। केवल संगीत के लंबे कार्यक्रम श्रोताओं को उबा देते थे और संगीतविहीन नाटक बड़ा रूखा प्रतीत होता था इसलिए नाटकों के साथ संगीत और नृत्य घुलने–मिलने लगे थे। किसी नाट्यसंगीत के विकास में बंगाली नाटकों में रवीन्द्र संगीत ने प्रश्रय पाया। पारसी नाटकों में गजल, उत्तर भारतीय नाटकों में लोकसंगीत, कव्वाली, दादरा और गजल तथा मराठी में भजन और भाव–गीतों ने स्थान बना लिया है। नाट्य संगीत के बढ़ते जा रहे प्रचार प्रसार ने समाज की स्थितियों, परंपराओं और संस्कारों के अनुसार नाटक ने संगीत का अपना अलग स्थान बनता गया तथा संबंधित विषय के कलाकारों द्वारा उसका संवर्धन होने से महाराष्ट्र में नाट्य संगीत का अभ्युदय होता गया क्योंकि उसे बड़े–बड़े शास्त्रीय गायक, वादकों का सहयोग मिलता रहा जो उस काल में अधिकांशतः उसी प्रान्त में थे। मराठी जनता में अध्यात्मपरक भावना का अत्यधिक विकास हुआ इसलिए लोग जितनी रूचि नाट्य में लेते थे उतनी ही संगीत में भी इसके फलस्वरूप बड़े–बड़े गायकों को संगीत के साथ अभिनय भी अपनाना पड़ा जिनमें मास्टर दीनानाथ मंगेशकर, बालगंधर्व राममराठे, सवाई गंधर्व, शांता आप्टे, हीराबाई, बड़ोदकर जैसे बड़े कलाकारों के नाम प्रमुख है जो कलाकार अभिनय के अतिरिक्त केवल भावगीतों का गायन करते थे उनका भी मराठी नाट्य संगीत के मंच पर बहुत स्वागत हुआ। बसंतराव देशपाण्डे, कुमार गंधर्व, कृष्ण राव चोणकर, प्रभाकर काव्हेकर, जितेन्द्र अभिषेकी, सुधीर फड़के, रामदास कामत, मास्टर कृष्णराव और भालचन्द्र प्रोठारकर जैसे संगीतकारों को नाट्यसंगीत के कारण ही इन्हें विशेष ख्याति प्राप्त हुई।

नाट्य संगीत के इसी कालांतर में भावगीत और भक्तिगीतों के नवसृजन से नाट्यसंगीत का मंच समृद्ध होने लगा जिसका प्रभाव आज चित्रपट संगीत के युग में भी कम नहीं हुआ है। उत्तर भारत में मुस्लिम प्रभाव के कारण गजल,दादरा और ठुमरी का विकास हुआ तो महाराष्ट्र में अभंग कीर्तन और भावसंगीत विकसित हुये। महाराष्ट्र के बड़े—बड़े संगीताचार्य शास्त्रीय गायन के बाद नाट्य संगीत का प्रदर्शन करने लगे। इस प्रकार मराठी नाट्य संगीत भारतीय संगीत में गजल, ठुमरी की भांति स्वतंत्र अस्तित्व लेकर उभरा और इसी से नाट्य संगीत की एक नयी शैली का जन्म हुआ जिसे संत परंपरा की देन माना जा सकता है।वर्तमान में नाट्य संगीत शास्त्रीय संगीत की समस्त विशेषताओं से अलंकृत है और भावप्रधान होने के कारण मानवमन को उत्कर्ष की ओर ले जाती है इसीलिए संगीत जगत में उसने बहुत शीघ्र अपना सम्मानपूर्ण स्थान बना लिया है।

**निष्कर्ष**—भारतीय फिल्म संगीत का इतिहास आज से सैकड़ो वर्ष पुराना है जो वर्तमान में भी समाज में मनोरंजन, शिक्षा—संस्कार व सामाजिक सौहार्द की दृष्टि से सर्वप्रमुख लोकप्रिय साधन बना हुआ है। फिल्म संगीत के आरंभिक काल में इसके निर्माण की संरचना में अनेक उतार—चढ़ाव आते जाते गये इसके शुरूआती दौर में संगीत का स्वरूप प्राचीन संगीत की परंपराओं के अनुसार यह लोकसंगीत, शास्त्रीयसंगीत, नाट्यसंगीत, गजल, कव्वाली इत्यादि रूपों में हुआ करता था जो कि इन शैलियों का प्रचलन मध्यकालीन समय में भी था और आज भी है। इन्हीं संगीत की शैलियों से एक नई शैली के रूप में संगीत का जन्म हुआ जिसे वर्तमान में फिल्म संगीत के नाम से जाना जाता है। इसकी आरंभिक संरचना में भारतीय फिल्म जगत में एक ऐसे महान व्यक्ति का जन्म हुआ जिनका नाम पितामह दादा साहब फाल्के के रूप में जाना जाता है इनका जन्म ३० अप्रैल १८७० ई. में त्रयम्बक महाराष्ट्र में हुआ था इन्होंने ही भारतीय फिल्मों की सर्वप्रथम नींव रखी। इनके द्वारा ही भारतीय फिल्म जगत में पहली बार सन् १९१२ में राजा हरिश्चन्द्र नामक फिल्म पर्दे पर प्रदर्शित हुई तथा इस फिल्म के बाद भारत के विभिन्न भागों में मूक फिल्मों का निर्माण आरंभ हुआ किंतु जनमानस में मूक फिल्मों के प्रदर्शन से रूचि कम होने व आकर्षण हटने से बोलती संवाक हिन्दी फिल्मों का नवयुग आरंभ हुआ एवं एक के बाद एक हिन्दी फिल्में बनती गई तथा फिल्म के किरदार के अनुसार संगीत का निर्माण भी विभिन्न स्वरूपों में होता गया इस प्रकार फिल्म संगीत के आरंभिक काल से आज तक हजारों फिल्में एवं असंख्य लोकप्रिय गीतों का निर्माण हो चुका है। वर्तमान भारतीय संगीत में फिल्म संगीत सबसे पसंदीदा कार्यक्रम है जो कि मनोरंजन, शिक्षा—संस्कार इत्यादि के विकास के लिए यह एक अत्यंत बेहतरीन माध्यम है। इसके अतिरिक्त फिल्म संगीत द्वारा एक गुणी कलाकार या व्यक्ति विशेष को मंच मिलने से उसकी पहचान और मान प्रतिष्ठा बढ़ी है तथा इसी सिनेमा संगीत में स्वर, ताल, नृत्य, संवाद, नाट्य संगीत एवं अभिनय इत्यादि में श्रेष्ठ योग्यता रखने वाले कलाकारों ने फिल्म संगीत के माध्यम से भारत का विश्व स्तर पर मान—सम्मान बढ़ाया है जिसके कारण अन्य देशों के साथ हमारे संबंध मजबूत हुये हैं तथा साथ ही हमारा देश वर्तमान में विकास की राह पर एक बढ़ी अर्थव्यवस्था के साथ उभरा है अतः सार शब्दों में कहा जा सकता है कि भारतीय फिल्म संगीत की आरंभिक शुरूआत एवं विकास में पितामह दादा साहब फाल्के का सर्वश्रेष्ठ योगदान रहा है। भारतीय फिल्म संगीत जगत इनके महान कृतित्व को सदैव श्रद्धासुमन स्मरण करता रहेगा।

**संदर्भ ग्रन्थ सूची—**

१.बसंत—संगीत विशारद,प्रकाशन.संगीत कार्यालय हाथरस उ.प्र. सन् २०१०,पृष्ठ सं ६३०,६३१,६३५,७२०,७२१,७२३,७२४
२.शर्मा, भगवतशरण.हाईस्कूल संगीतशास्त्र, प्रकाशन. संगीत कार्यालय हाथरस उ.प्र. सन् १९८९, पृष्ठ सं—१७७,१७८
३.गर्ग, डॉ लक्ष्मीनारायण. संगीत निबन्धावली, प्रकाशन— संगीत कार्यालय हाथरस उ.प्र. सन् २००६, पृष्ठ सं—८४,९४
४.स्नेही शिखा व आकांक्षा सारस्वत.संगीत नेट, प्रकाशन.अरिहंत पब्लिकेशन्स इण्डिया लिमिटेड सन् २०१४ पृष्ठ सं.३५८—३५९
५—गर्ग, डॉ लक्ष्मीनारायण—फिल्मी शास्त्रीय गीत अंक भाग—१, प्रकाशन—संगीत कार्यालय हाथरस उ.प्र. सन् १९७३, पृष्ठ सं—७,१०,१४,१५,१६

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# ''भारतीय राजकारणावर जाती धर्माचा प्रभाव''

डॉ. किशोर बी. कुडे
सहा. अधिव्याख्याता, फुले आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली
मो.नं. : ९३७०३२२३१८ ई मेल : gojirikude@gmail.com

**सारांश**

आज भारतीय लोकशाहीमध्ये जाती धर्मांचा प्रभाव हा विषया अंतर्गत ''जाती—धर्माचा प्रभाव तसेच राजकारणामध्ये सहभागाचा अभ्यास आजतागायत राजकारणाविषयी समाजसुधारक व राजकीय तत्वज्ञान त्याचे मत ह्या विषयक अभ्यास या प्रकारचे उद्देश संशोधनामध्ये मांडण्यात आले.

राजकारणावर जातीधर्माचा प्रभाव दिसुन येतो. राजकारणामध्ये येण्याकरीता उच्च शिक्षीत लोकांची उदासीनता दिसुन येतात. तसेच राजकीय तत्वज्ञान, नितीमुल्य अवलोकन केल्या जात नाही याप्रकारे उपकल्पना मांडण्यात आल्या.

भारतीय राजकारणात धर्म जात यांचा आधार घेऊन राजकारण जय पराजय वर प्रभाव पडत असतो. प्रत्येक पक्षामध्ये यांचे प्राबल्य दिसुन येतात. काही पक्ष किंवा राजकारणी सुक्षित तरुणांना परंपरागत, राजेशाही सारखे राजकारणात सत्ता हस्तांतरण करीत आहे.

**प्रस्तावना**

**महात्मा गांधीजींचे राजकीय विचार**

'धर्म' हे महात्मा गांधींच्या राजकीय जीवनाचे जीवनवाहक होते. धर्म—धोरणावर राजकारण करणे याचा अर्थ गांधींना असा अधिकार नव्हता की, सत्ता धार्मिक अधिकाऱ्यांकडे सोपवावी किंवा एखाद्या राज्यास विशिष्ट धर्माचा उपदेशक बनवावे. सत्य, अहिंसा, प्रेम, सेवा इत्यादी धर्माच्या सार्वभौम नियमांचे राज्याने पालन केले पाहिजे, असा बापूंचा विश्वास होता. म्हणून राजकारण धर्मविरहित राहणे ही राज्याची आवश्यक दुष्कर्म आहे. त्यांच्या स्वतः च्या शब्दांत, ''जर मी राजकारणात भाग घेताना दिसत असेल तर एकच कारण म्हणजे सध्याचे राजकारण आपल्याला सापासारखे गुंडाळत आहे. मला सापाशी लढायचे आहे म्हणून मला राजकारणात धर्म आणायचा आहे.'' गांधींनी धर्माच्या रंगात रंगवून नैतिकतेवर आधारीत राजकारणाचा प्रयत्न केला. त्यांनी अलिप्तता, विघटन, बंडखोरी, कपट, नफा, विश्वासघात, फसवणूक इत्यादीसारख्या घाणेरड्या प्रवृत्तीचे निर्मूलन आणि राजकारणातील प्रेम, सहकार, यावर जोर दिला. अहिंसा आणि संबंध यासारख्या घटकांच्या वापरावर त्यांनी जास्तीत जास्त प्रकाश टाकला.

राजकारण या शब्दाला अत्यंत वाईट अर्थ प्राप्त झाला आहे. वास्तवात संघर्ष संपला. कायदे करणे, त्या कायद्याची अंमलबजावणी करणे. या दोन्ही प्रक्रियांवर योग्य नियंत्रण राजकारण म्हणजे, 'समाजाला सुनियंत्रित शांत व सामान्य जीवन जगण्यासाठी हवे ते राखून कायद्याच्या चौकटीत न्याय देणे.' या सर्व प्रक्रियेत जो व्यवहार चालतो त्यात सामान्य माणूस व शासनसत्ता यांच्यात दुवा म्हणून वावरणाऱ्या व्यक्तीची कृती उक्ती असते. म्हणून राजकारणात येणारी व्यक्ती बुद्धिमान विवेकी व न्यायबुद्धी असलेली असावी लागते. या व्यक्तीला सुसंस्कृत असे चरित्र आणि चारित्र्य असावे लागते.तसेच सर्व जाती, धर्म, पंथांचा क्षेत्राचा सहभाग असावा. न्याय, समता, बंधुत्व असावे.

**उद्देश :—**

- भारतीय राजकारणावर जाती धर्माच्या प्रभावाचे अभ्यास.
- राजकीय सहभागाविषयक अध्ययन.
- भारतीय राजकारणाविषयी तत्व आणि मुल्यांचा अभ्यास करणे.

**गृहितकृत्य :—**

- भारतीय राजकारणामध्ये जाती धर्माचा प्रभाव दिसुन येतो.

➢ राजकारणामध्य राजकीय निती मुल्यांचा ऱ्हास होत आहे.

➢ राजकारणाविषयी सर्वसामान्य लोकांमध्ये उदासिनता दिसुन येते.

**नेत्याचे नेतृत्वाचे गुण व नैतीकता**

कोणत्याही राजकीय पक्षाच्या बळकटीला तीन गोष्टी लागतात. पहिली गोष्ट पक्षाचा नेता एवढा मोठा असावा की तो कोणत्याही प्रतिपक्षांच्या नेत्यांशी समतुल्य ठरावा. दुसरी गोष्ट म्हणजे शिस्तबद्ध संघटना. तिसरी गोष्ट म्हणजे स्पष्टअसा कार्यक्रम. तसेच सर्व धर्म समभाव ही भावना असावी.

**लोकशाहीचे विकेंद्रीकरण**

भारतातील लोकशाही येथील ग्रामपंचायतीवर आधारली तर ती प्रगत होऊ शकणार नाही. ग्रामसंस्थांनी हा समाज जगविला आहे हे खरे आहे. परंतु त्यांनी आम्हाला कशाप्रकारे जगविले याचा विचार कोणीच करीत नाही. आम्ही जगत होतो, पण आमचे जगणे मृतवत होते. हा समाज या प्रदीर्घ काळात अगदी स्थितीशील राहिला. त्याची गतिशीलताच नष्ट झाली. आपल्या समाजाला ही कर्तृत्वशून्य अवस्था आली. त्याचे एक प्रमुख कारण आमची ग्रामसंस्था. आमची खेडी आर्थिक, सामाजिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होती. एका खेड्याचा दुसऱ्या खेड्याशी संबंध नव्हता. त्यामुळे विचारांची देवाणघेवाण करण्याचे मार्ग तर बंदच राहिले. आमच्या जातीभेदाचा खरा बालेकिल्ला कोणता असेल तर तो म्हणजे आमची ही मध्ययुगीन ग्रामराज्येच होत.

**जातीवादातुन बाहेर निघने**

गांधीवादात नवीन असं काही नाही. गांधीवाद हा रूसो, रस्किन,समाजाच्या जातिजमातीत, गटागटात, वर्गावर्गात जो दुरावा आहे. तो लोकशाहीच्या यशाला मारक ठरेल. कारण लोकशाहीत प्रत्येकाला—मग तो पीडित असो वा हक्क भोगणाऱ्या वर्गातील असो— मतदानाचा हक्क आहे. जे सत्ता, 'सवलती व हक्क भोगतात ते जर वंचित दलित समाजाला देशाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घ्यावयास तयार नसतील तर या दोन 'आहेरे' व 'नाहिरे' वर्गातील तणाव वाढतच जाईल व लोकशाही उध्वस्त होईल.

धर्मात भक्तिमार्ग हा मुक्तिमार्ग बनू शकतो. परंतु राजकारणात भक्तिमार्ग हा अपाताचा व पर्यायाने हकूमशाहीचा खात्रीदायक मार्ग होतो.

आम्हास राज्यपद्धती अशी पाहिजे की, ज्यात मतदानाचाच नव्हे तर माझ्या समाजाचे प्रतिनिधी विधिमंडळात पाठविण्याचा अधिकार असा पाहिजे. माझ्या प्रतिनिधींना त्याठिकाणी होणाऱ्या चर्चेतच नव्हे तर निर्णय करण्याच्या कार्यातसुद्धा अधिकार असला पाहिजे.

संयुक्त राज्यघटनेप्रमाणे हिंदुस्थानातील प्रत्येक राज्याला स्वायत्तता मिळणार! अशा प्रकारे या देशात राज्यांना स्वायत्तता दिली तर अप्रगत देशभर एकाच पातळीवर होणार नाही. अशी प्रगती व्हावी असे वाटत असेल तर मध्यवती सरकार ठरवील तेच एक धोरण सर्व राज्यांनी प्रमाण मानले पाहिजे. या दृष्टीने मी संयुक्त राज्यघटनेपेक्षा एकतंत्री राज्यघटना पसंत केली पाहिजे.

**द्वीपक्षीय पध्दतीचे महत्व**

एकपक्षीय पद्धती ही लोकराज्याला मारक आहे खरोखर एकपक्षीय लोकशाही म्हणजे लोकशाहीचा अस्तच होय. राज्ययंत्रणा चालविण्यासाठी पक्षांची गरज आहे. परंतु सरकारला जुलमी राजवटीपासून दूर ठेवण्यासाठी दोन पक्षाची आवश्यकता आहे. राज्यात दोन पक्ष असले तरच लोकशाही सरकार लोकशाही तत्वानुसार चालेल. हे दोन पक्ष म्हणजे सत्तारूढ पक्ष आणि विरोधी पक्ष

आज या देशात जी राजकीय परिस्थिती निर्माण झाली आहे तिजमुळे कोणस या एकाच पक्षास मुजरा करण्याची सवय लोकांना आहे. देशात लोकशाही आहे. परंतु या लोकशाहीने आपली बुद्धि चालविण्याचे स्थगित केले आहे. तिने आपले हातपाय एकाच पक्षाशी जखडून ठेवले आहेत. माझ्या गते हे मोठे दुखणे आहे. तो एक रोग आहे. मोठी दुर्दैवाची गोष्ट अशी की, हिंदी लोक परंपरेने बुद्धिवादी नसून अतिरिक्त श्रद्धाळू वृत्तीचे आहेत.हिंदी लोकांनी राजकीय प्रश्नावर आपली सर्व शक्ती केंद्रित करावी नि चुकीची गोष्ट आहे.

बहुमतामुळे राज्यकर्ता पक्ष भ्रष्ट बनतो. अनिर्बंध बहुमताने तो पूर्णपणे ब्रिटीश संसदेतील बहुसंख्या ही राजकीय बहुसंख्याच असते. परंतु भारतातील बहुसंख्या मात्र जातीय बहुसंख्या

असते. ती राजकीय बहुसंख्या असत नाही. त्यामुळे भारतातील जातीय बहुसंख्या आपल्या मनाप्रमाणे राज्य करण्यास स्वतंत्र होईल आणि ती अल्पसंख्य जातीवर आपल्या मर्जीप्रमाणे राज्य करील. दुसऱ्या राष्ट्राचे प्रश्न सोडविणे व आपले स्वतःचे प्रश्न न सोडविणे हेच भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचे मुख्य सूत्र आहे.

**लोकशाहीचे तत्व**

लोकशाही म्हणजे प्रजासत्ताक किंवा संसदीय सरकार नव्हे. लोकशाही म्हणजे सहजीवनाने राहण्याची एक पद्धती होय.राज्यघटना कितीही चांगली वा वाईट असली तरी शेवटी ती चांगली की वाईट ठरणे हे जे राज्यकर्ते तिचा वापर करतील त्यांच्यावर अवलंबून राहील. आपले सामाजिक आणि आर्थिक हेतु साध्य करताना घटनात्मक साधनांचाच मार्ग स्वीकारला पाहिजे. घटनाबाह्य मार्ग म्हणजे केवळ अराजकाचे व्याकरण होय. जनतेने आपल्या पक्षाचे मत राष्ट्रहिताच्यापेक्षा श्रेष्ठ मानले तर भारतीयांचे स्वातंत्र्य दुसऱ्यांदा धोक्यात येईल.

भारताने एकदा नाही अनेकदा आपले स्वातंर्त्य गमावले आहे ते आपल्याच ते लोकांनी विश्वासघात व दगा केल्यामुळे या इतिहासाची पुनरावृत्ती होईल काय? आम्हाला जुन्या बरोबरच आता निरनिराळ्या जातींच्या गटांच्या व परस्पर विरोधी असंख्य राजकीय पक्षांना तोंड द्यावयाचे आहे. देशाचे हित सर्वाआधी, त्यानंतर आपले जे काही असतील ते मतभेद, अशी भावना ठेवून आपण सर्वांनी आपले स्वातंत्र्याचं रक्षण करण्यासाठी दलितबंध घटनेत जी तरतूद केलेली आहे ती माझ्यामते सर्वस्वी अपुरी आहे.सांसदीय लोकशाहीने तीव्र खतपाणी घालून पल्लवित केले, परंतु समतेला मात्र तिने हजारो मैल दूर एखाद्या रखरखीत वाळवंटात तडफडत ठेवले. समतेचे महत्त्व ओळखण्यात सांसदीय लोकशाहीस अपयश आलेच. पण स्वातंत्र्य व समता यात समतेचा बळी घेतला आणि जगाच्या पाठीवर आपल्या विषमतारूपी हिडीस प्रजेला मोकळे रान करून दिले.

**परसंस्कृतीग्रहण ही भारतीय समाजात एक मोठी समस्या**

सृष्टीच्या निर्मितीपासूनच मनुष्य हा दुसऱ्या मनुष्याचे वा एक समूह दुसऱ्या समूहाचे काही तरी ग्रहण करीत असतो. शिकत असतो. सामान्य अर्थानुसार व्यक्ती वा समूह कुठल्याही वैशिष्ट्यंचा स्वीकार करतात आणि आपल्या जीवनात त्यां स्विकारतात. वाला परसंस्कृतीग्रहण असे म्हणतात.

जेव्हा समाजशास्त्राच्या दृष्टीने आपण पाहतो तर परसंस्कृतीग्रहण म्हणजे ''एका समूहाद्वारे दुसऱ्या समूहाची संस्कृती ग्रहण करणे होय.''परसंस्कृतीकरणाचा भारतीयांच्या संदर्भात अध्ययन केले गेले तेव्हा संस्कृती परिवर्तनाच्या रूपात संस्कृती विकास, संस्कृती विघटनाच्या रूपात सर्वात जास्त प्रभाव लोकांच्या संस्कृतीवर पडलेला आहे.

(१) एकदम आदिवासी अवस्थेत राहणारे लोक जे सभ्यतेपासून अतिशय दूर राहतात.

(२) असे लोक जे प्राचीन परंपरेला चिकटून आहेत. मात्र सभ्य समाजाचा प्रभाव त्यांच्यावरही पडतो.

(३) असे लोक ज्यांची प्राचीन संस्कृती, धर्म, सभ्यता इ. सभ्य समाजाजवळ आल्याने लुप्त झाल्या. ह्यांची संख्या अधिक

(४) असे लोक जे सभ्य समाज आल्यावर आपली सभ्यता आणि संस्कृती वाचवू पाहत आहेत. उदा. भिल्ल, नागा.. डॉ. एन. मजूमदार यांनी एल्विन यांचे वर्गीकरण चुकीचे मानून सांस्कृतिक विकासाच्या आधारे तीन वर्गात आपले वर्गीकरण केले आहे.

(५) हिंदू प्रभावारहित आदिम लोक ज्यांच्या संस्कृतीवर अजून आक्रमण झालेले नाही.

(६) असे लोक ज्यांनी हिंदू व्यवहारांना स्विकारून समता दर्शविली आहे. या जातींनी काही सांस्कृतिक उच्चता प्राप्त केली आहे. मात्र या लोकांना अजूनही बहिर्गत जातीचा दर्जा मिळालेला नाही.

(७) असे लोक ज्यांनी परसंस्कृतीग्रहण केले व ज्यांनी हिंदुत्व ग्रहण करून वा ख्रिश्चन धर्म ग्रहण केला असून त्या संस्कृतीपर्यंत, त्या स्तरावर ते पोहचले, जिथे हिंदु झाल्यामुळे शह, अस्पृश्य व्हावे लागले व ख्रिश्चन झाल्यामुळे आपल्या धर्माला लांच्छन लावले

**देशातील राजकीय वातावरण व जनता**

स्वातंत्र्योत्तर भारतातील राजकीय वातावरण विविध विचारसरणीने भरलेले आहे. हिन्दुत्ववादी, ब्राह्मणवादी, गांधीवादी, मार्क्सवादी, आंबेडकरवादी इत्यादी विचारधारांनी प्रेरित झालेले

आहे. प्रामुख्याने दोन मुख्य विचारधारांनीच राजकीय जीवन प्रभावित आहे. एक हिन्दुत्ववादी ब्राह्मणवादी व दुसरी साधारणपणे सांप्रदायिक ब्राह्मणवादाला विरोध करणारी मार्क्सवादी, गांधीवादी विचाराधारा, या दोनपेक्षा तिसरा प्रवाह आंबेडकरवादी विचारधारेचा आहे.

सांप्रदायिक राजकीय शक्तीपासून समाज—देशाचे कसे नुकसान आहे हे सांगितले पाहिजे. त्यामुळे पक्ष लोकांपर्यंत जाईल आणि खरा मार्ग लोकांनाही लागेल. त्याकरिता कार्यक्षेत्र कसे वाढेल, याचा विचार झाला पाहिजे.

**अस्पृश्यता निर्मूलन**

भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे. या देशात सर्व धर्मांचे लोक वास्तव्य करतात. भारताला खंडही म्हणतात पण त्याची अंतर्गत महानता खूपच कमकुवत दिसते. जर आपण या ऐक्य आणि विचित्रतेचे विश्लेषण केले तर हे कळेल की किती दयनीय परिस्थिती जपल्या आहेत आणि त्या दयनीय परिस्थिती जपल्या गेल्या आहेत आणि तरीही महान आहेत. या देशात केवळ बळकट परंतु असंख्य अशक्त असहाय लोक राहतात. जे सामर्थ्यवान किंवा सामर्थ्यवान असतात त्यांना सरळ डोळ्यांनीसुद्धा दिसत नाही, त्यांना अपमान आणि तिरस्कार दिसलाच पाहिजे, जे प्राचीन काळापासून आजपर्यंत फारसे बदल झाले नाही. आजचे लोक काही लोकांना अस्पृश्य किंवा गलिच्छ मानतात. या लोकांच्या अद्वितीय आणि अथक परिश्रमानंतर सामान्य लोक श्रीमंत किंवा बलवान होताच ते त्यांच्याकडे पडलेल्या डोळ्यांकडे पहात आहेत आणि त्यांना त्यांच्या समकक्षतेची जागा देखील देत नाहीत. या लोकांना अस्पृश्य म्हणतात पण त्यांना असे म्हणायला न्याय्य आहे काय? हे अंतर वाजवी आहे, कधीही नाही. ही विडंबना पूर्णपणे असत्य आणि निराधार आहे कारण अस्पृश्य असे म्हणतात की जे घडले किंवा स्पर्शही करू शकत नाही.

**विवेकानंदांचे सामाजिक—राजकिय विचार**

''ज्या काळात ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचे वर्चस्व होते त्या वेळी शिक्षण आणि सांस्कृतिक प्रगती यांचे केंद्रीकरण झाले होते. त्याचप्रमाणे वैश्यांचे वर्चस्व म्हणजे संपत्तीचा संचय. वैश्यांचे सामर्थ्य आहे ते नाणे कबजात घेण्यामध्ये ज्या नाण्याच्या खणखणाटाने चारही जातींच्या (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र— विनय रॉय) लोकांच्या मनावर विलक्षण भुरळ पडते. वैश्याला नेहमी भीती वाटते की कदाचित आपल्याकडे असणारी ही एकमेव वस्तू ब्राह्मण फसवून आपल्याकडून हिरावून घेईल आणि कदाचित क्षत्रिय आपल्या श्रेष्ठ शस्त्रसामर्थ्याने ती गडप करेल. स्वसंरक्षणासाठी वैश्यांचे एक वर्ग म्हणून एकमत असते. वैश्याची पैशावर हुकमत असतेय इतरांना त्याचा वापर करायचा असेल तर जणू काही स्वत:च्या हातात चाबूक असल्याप्रमाणे तो त्यांच्याकडून अफाट व्याज वसूल करतो, इतरांच्या मनात दहशत निर्माण करण्याचे त्याचे ते प्रभावी शस्त्र असते. पैशाच्या जोरावर राज्यसत्तेला नेहमी दाबात ठेवण्यात तो व्यग्र असतो. स्वत: कडे जो संपत्तीचा ओघ येत असतो त्यात राज्यसत्तेचा कुठेही अडथळा येऊ नये म्हणून व्यापारी नेहमी डोळ्यांत तेल घालून असतो. पण हे सगळे असले तरी शासनकर्त्या वर्गाकडून सत्ता शूद्रवर्गाकडे जावी असे त्याला कधीही काडीमात्र वाटत नाही.

**राजकारणाच्या दोऱ्या विद्येशिवाय हाती येणार नाहीत**

शिक्षण व विद्या या गोष्टीशिवाय आपला उद्धार होणार नाही. मी माझ्या आयुष्यात अनेक कार्ये अंगिकारिली. राजकारणात माझा विशेष महत्त्वाचा काळ गेला. सध्या राजकारणाच्या दोऱ्या उच्चवर्णियांच्या हातात आहेत. त्या दोऱ्या तशाच हाती ठेवण्यासाठी उच्चवर्णियांची धडपड चाललेली आहे. उच्च प्रतीच्या महत्वाच्या जागा पटकाविण्यासाठी जी विद्या पाहिजे. ती अजून उच्चवर्णियांखेरीज इतरांना प्राप्त झालेली नाही. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी तीच.....' असे काही म्हटले जाते. त्याचप्रमाणे राजकारणाच्या दोऱ्या विद्येशिवाय आपल्या हाती येणार नाहीत. राजकीय सत्ता हाती यावी म्हणून अनेकांनी प्रयत्न चालविलेले आहेत पण त्यांना यश येत नाही. ह्या तफावतीचे अधिष्ठान हेच आहे. इंजिनियर, कलेक्टर वगैरे जागा फक्त उच्चवर्णियांनाच शिक्षणामुळे मिळतात.

**राष्ट्र कायदा औद्योगिक विश्लेषण**

जातीसाठी इंग्रजी कास्ट (जात) शब्द वापरणे आहे. हा पुर्तगाली भाषेचा कॅस्टा (सीमा) शब्द बनवणे, त्याचा अर्थ (जाती) नस्ल किंवा वर्ग (प्रकार) आहे. राष्ट्र शब्दाच्या उत्पत्तीचा पत्ता

सन् १६६५ मध्ये ग्रेसिया—डी ओरेटा नाम विद्वान ने आपूर्ति. त्यानंतर फ्रान्सचा अब्बे दुब्बॉय ने प्रोटोटी संदर्भ घेतला. एक वेगळ्या प्रमाणानुसार देशाच्या शब्दांची उत्पत्ती लॅटिन शब्द कॅस्टसपासून मानी जाती आहे. लॅटिन शब्द कॅस्टसचा अर्थ वायूपेटी (शुद्धता) किंवा 'आनुवंशिकता' के निकट आहे. इतर एक प्रमाणानुसार जन्मजात जन्म (जन्म) शब्द देखील मानी गेले आहेत.

देशातील संबंधित अध्ययनात भारताच्या राष्ट्र कायद्याचे प्रमुख आधार आहेत. हे केवळ भारतीय लोकसंख्येत नसले तरी ही भारत सरकारची एक विशिष्ट आणि संपूर्ण स्वरूपाची (अत्यंत स्वरुपाची) दृश्य आहे आणि ज्यायोगे एखाद्या विचाराधीन संपूर्ण हिंदु समाज आहे. प्रवत्नी केली, त्याप्रमाणे इतर ठिकाणी जात नव्हती. म्हणून भारतीय लोकसंख्या सांस्कृतिक दृष्टीकोनातून आणि अनूठी प्रशासन आहे. डेव्हिस मान्नाचे म्हणणे आहे की, ''राष्ट्र कायद्यानुसार जगातील सर्व ठिकाणी कृष्ण आणि सर्व धर्मांमुळे जवळजवळ प्रत्येक व्यक्तीचा त्रास होतो.'' जनगणना नुसार भारतीय मुसलमान मध्ये ९४ जात लोकांची संख्यादेखील झाली. अशा प्रकारच्या युरोपमधील अल्पसंख्याक आकडेवारीचे गट (अल्पसंख्यांक) जातीचे शब्द संबोधित केले जातात. यूरोपियन जिप्सिअन आणि न्यायाधीशांचे खालील लोकसभेचे सदस्य मानले जातात आणि त्यानुसार सामाजिक विषय (सामाजिक अंतर) तयार ठेवतात. अमेरिकेच्या प्रजातीच्या आधारावर निग्रो व्यक्तींचा खालील लोकांचा उल्लेख केला जातो आणि जन्मापासूनच ती एक अमेरिकन मुलाची होती, जी त्याला सहनशील ठेवते. ईसाईसर्स मधील धर्माच्या आधारावर कॅथोलिक आणि प्रोफेस्टेंट दोन प्रमुख वर्ग, सामान्य लोक समान प्रकारचे अनेक प्रकारचे नियंत्रण आणि सामाजिक लैंगिक वैशिष्ट्यंचे वैशिष्ट्ट्य आहेत. या प्रकारच्या सामान्यत: आम्ही म्हणू शकतो की या कायद्यात काही गट जन्माच्या आधारावर असतात आणि इतर उच्च स्तरीय मानले जातात, त्या कायद्यानुसार आम्ही नागरिक आहोत.

**निष्कर्ष :**

१.भारतीय राजकारणामध्ये जाती धर्म भेदभाव दिसुन येतो.
२.सुशिक्षीताचा कल राजकारणामध्ये कल दिसुन येत नाही.
३.राजकारणामध्ये नैतीकतेचा ऱ्हास होत आहे.
४.भारतीय राजकारणामध्ये चांगल्या बाबीसोबत तडजोड करतांना दिसतात.
५.भारतीय राजकारणामध्ये जाती जाती मध्ये सुध्दा गट पडलेले दिसुन येतात.
६.समाजसुधारकाचे विचार मागे टाकलेले आहे.
७.राजकारणामध्ये जाती व पैशाचा प्रभाव दिसुन येतो.
८.वंश परंपरांगत राजकारण दिसुन येतात.

**सुचना :**

१.भारतीय राजकारणामध्ये सर्व जाती—धर्मातील जनतेचा सहभाग असणे आवश्यक आहे.
२.श्राजकारणामध्ये उच्च विद्या विभुषीत लोकांना सहभागी करुन घेणे आवश्यक आहे.
३.राजकारन्यानी भेदभाववदी राजकारण करु नये.
४.न्याय, समता, बंदुभाव व विकास या बाबीला प्राधान्य देणे आवश्यक आहे.
५.पुरोगामी विचार सरणींचा अनुकरण करणे गरजेचे आहे.
६.म्हान समाजसुधारक यांचे तत्वज्ञान अंमलात आणणे गरजेचे आहे.
७.सर्व मतांना प्राधान्य देणे गरजेचे आहे.
८.नैतीक मुल्यांचे जतन भारतीय राजकारणांमध्ये आकलन करणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**

१.डॉ. रंजन रवि, caste, politics and policy-making, सुरेद्र पब्लिकेशन्स, नवी दिल्ली
२.सिंह सुनिल कुमार, ''जाति व्यवस्था : निरंतरता एवं परिवर्तन'', रावत पब्लिकेशन्स, जयपुर
३.सिंह. एन. के., ''भारत में दलित संघर्ष एवं सामाजिक न्याय'', प्रिज्म बुक्स, जयपुर
४.डॉ. प्रसाद उपेन्द्र, ''गांधीवादी समाजवाद'', नमन प्रकाशन, नई दिल्ली
५.प्रा. दिनेशचंद्र, ''महाराष्ट्राचे राजकारण'', श्री. वैभव प्रकाशन, नागपूर
६. वाघ विलास, ''रिपब्लिकन खासदारांकडून दलित जनतेच्या अपेक्षा'', भाग्यश्री मुद्रणालय, पुणे

ISSN : 2278-9308
July 2021


७. डॉ. मिसाळ हनुमंत, ''महाराष्ट्रातील दलितांचे अंतरंग : मातंग समाजाचे समाजशास्त्रीय विश्लेषण'', जय गणेश ऑफसेट, पुणे

८. पाटलीपुत्र विजय, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तरुण विद्यार्थ्यांना मार्गदर्शन'', बुध्दिस्ट रिसर्च असोसिएशन फॉर सोशियो डेव्हलपमेंट, नागपूर

९. रॉय विनयकुमार, ''विवेकानंदांचे सामाजिक—राजकीय विचार'', लोकवाङ्मय गृह

१०.डॉ. आंबेडकर भिमराव रामजी, ''जातिभेद निर्मूलन'', राज प्रकाशन, यवतमाळ

ISSN : 2278-9308
July 2021

# समाजकब्याहामका रिती रिवाज : अन महत्व का घटक

प्रा. डॉ. काशीनाथ मानमोडे
इतिहास विभाग प्रमुख
महात्मा गांधी महाविद्यालय, पारशिवनी

प्रा.डॉ. तिर्थनंदन बन्नगरे
इतिहास विभाग प्रमुख
स्व. वसंतराव कोल्हटकर कला महाविद्यालय, रोहणा

**प्रस्तावना**

समाज की संस्कृती म्हणजे जीवनपध्दती. आपण एक समाज म रव्हूस तब आपला एक दुसरा क संग नाता गोता तयार होस. एक साठी दुसर कुरक घरसीन ब्याहा को संबंध होस. येन ब्याहा क साठी मामो, आत्या, मावशी, काको, दाजी (भाटवो) इ. नाता का घटक. अन हिरवी जांभरुम की डहारना, पिवरी हरद, मीठ. मातााताय की पुजा, रेंगी को का महत्व स. येन सब साधन येन लेखन मीन बिचार मांडणकी कोशीश करीस. सामुहिक ब्याहा क पावन पर्वपर मू मरा समाज क भोयरी पवार भाषा म विचार मांडनकी कोशीश करीस.

**बाप**

आपलं बाप की माया आभारसारखी रव्हस. स्वत: क लेकरुसाठी जीवन को हरपल वू झिजावस. घाम को मोती सारखो पाणीपाणी करस. मेहनत करकन पोरग्या को भविष्य सवारस. येलाचत बापको दमकोस. पोरग्या साठी जीवनभर राब राब राबस येलाच बापकी हिम्मत कोस. पोरग्याको जीवन सफलहोनसाठी लढस ओन टाईमला बापकी ताकद दिसकन आवस. स्वत:की इच्छा दाब कन आपलो पथगमन करत रव्हस. वू हमेशा पोरग्याक ओठपर हासी देखस जीवनभर सुखी रहे पायजे इच आपको सपनो होय. पोरग्याक जीवनकी सफलता देखकन बाप मनक मनम गदगद हासस आपलो जीवन म देखे हुए सपना साकार भये.

**माय**

माय कहेकन हाका मारे पायले पोटीन. तोरो कलिजाको तुकडो होय मामू . नको रागावून तू मोला. मा तोर गोदम मला तूलेस तब मला स्वर्गको सुख भेटस. मू केताही नखरा कऱ्या तरी तू मरो केतो लाड करस. मू केतीही रागो भरी तरी मा तू मला खूप खूप समजावस ओमा मा. तोरो येन दुनियाम रव्हनाकन अस्तीत्वम मला नाय भेव मरी भुक भागवनला तू रोज रोटी शेकस. तब तोरो तावा पर हात ना बरस. तरीबी तू इ सहन करस वोमा. स्वत: की भुख पेटम मारकन रोज मला टाईमपर खानला देस. जीवन म कबबी संकट आये. त मामा करकन मू रोवून. वीर तोरो बिन मू कसी जीवन जगू. तोर रक्त मासकन मला आजका आकार मिले. मला तू दुर नको करु. पुर जीवन भर मला राख तोरजवर.

**शिकन की इच्छा**

मा मू का सांगु तोला. नको करु दुजाभाव. तुम्ही मर साठी. शिकनकी स मरी बानी. आवन दे डोराम पानी. कशी बी जगून मू जिन्दगानी मायओ. आयकले मरी बात. नकोना तुमी करु मरो घात. खायकन रहून तुमारघर दार भात खानला. ब्याहा की मरी उमर नही भयी, कसी तुम्ही मर पर शिकन कबेरा बला लाई. मरी सोबतीन आवबी शिकतस. गाना गायकन रहून दादा संग. पैसा मू तूमला देवून. अजी आयको मोरो आपलं पिंजरा मको पाखरु. नको धूत्कारु मायको लेकरु शिकनसाठी फडफड रहेस, नको मला ब्याहा क बंधन म तुम्ही बांधू.

**ब्याहा की चाहूल**

सर्व नाता गोता क लोगना ला वाट मर ब्याहा को वय भय. तरी मला खुदला वाट मू आबबी लहानसोच स. मर ब्याहा का रिश्ता आवन लाग्या खूब, बेकार, पोटी दिखावत होता. घर का लोग्ना पोटी देखत होता. खुँखार पोटी कोणतीही भेटो कारी क गोरी. मरी आब ब्याहा करन की इच्छा बी नही होती. तरी बी मर घर का लोगना मिनमिनता करत होता. नाता गोता का लोगना बी मरी मज्या लेनला लाग्या. उनला दुई दिन भेटणार होतो भात खानला. बिजोरो लिजान की इच्छा होती. जवाईला. मला हरद लगावनकी मजा आयेन मर बहीनला. काकन बांधन की घाई स

मर दाआजी अन मायला. खूप मजा करन की हौस स मर मामाला. कसो मू टिपटाप म भाचास पास उभो रहून.

**ब्याहा को रिश्तो**

पोटी बी ई भयापर हैद्राबाद जाना की इच्छा करस. ओको कंम्पूटर कोर्स ला नंबर लागस. तेकूनच वा कव्हस नको सांगो तूमी ब्याहा को रिश्तो. आनलाईन निकाल देख्यापर डिग्री भेटेन, तब पहेले मला करीयर बनावनको स तेकूनच मला, ब्याहा को रिश्तो तुम्ही सांगू नको ना. नोकरी भेटी पुना म मला. तरीबी ऑफर स फॉरेन की, यी मोक्को नही सोडत मू . नको सांगून पोरग्याकी सुंदरता, मालमत्ता, अन जन्मपत्रिका. आब मू ढुंढ लेवून, मर जीवन साथी की, तुमी नको करुना चिंता.

सबला वाटस मरो ब्याहा को वय भय गये. मोरो पण मला खुदला वाटस मू लहान सोस स आब. मर ब्याहाक साठी निरोप ना आय रहयास खूब बेकार. बटाना पोटी दिखावस एकदमच खुंखार घरका लोगना येता घाई कर हयास. पोटी कारी भेटो क गोरी. पण इच्छाच नाय आब न मरी तरीबी घर का जबरदस्तीकन दिखावस पोटी रिश्तेदारना लागगयास मर ब्याहा की मजा लेनला काय क उनला भेटे न दूई दीन भात खानला बिजोराला जान की घाई स जवाईला. मला हरद लगावन की मजा भेटेन मर बहीनला कांकन बांधनकी घाईस मर मायबापला. ब्याहा की जोरदार मजा लेन साठी टप गयेस मरो मामो. डिजे क आवाजम नाचन स ओला आब सबलाच आय गयीस मर ब्याहा की चाहूल. त मंग आब होन देन जोरदार मर ब्याहा को माहूल.

**कायला देस मला दारुडयाला**

पोटी कव्हस बापला आयको तुम्ही मरी बात. सांगो मू तुमार शिवाय सांगू ग-हाना कोनला. कायला देस तुम्ही मला ओन दारुडयाला. किस्मत मरा फुटया. गणगोत सारा रुठया. असो लाग रहेस मला हात–पाय मरा टुटया. तुम्ही सारा सुखी रहेन, मारपीट लाडा की मू सहन करुन. वोक घर देकन मर जीव को तुम्ही का करेन. सांगु कशी मू मरो दुखनो लहानस बापू–बाईला नाय कपडा. दिनभर तपनम उई फिरस उघडा. एकटी क कमाईपर. चलाय रहीस परीवार. नही रहे मला आब कोनीको आधार. कसो चलेस मरो संसार. मू भय गयी लाचार. लाडाला नाय आघको बिचार. सोयकन उठयापर मला मारनको करस वू बिचार.

**लाडालाडी**

फुल त फुल कमल को फुल । लाडा लाडी खेलस बालक को खेल ।। १ ।।
पिवरीत पिवरी हरदकन पिवरी । आंगला लगायनकन देखेत सारखी दिसस नवरी ।।२।।
टवरीत टवरी, दिवा की टवडी
ब्याहा म जोडो शोभत स जसो लाडा लाडी ।।३।।
बॅड बाजो त बॅड बाजो । डपरी को बाजो
घोडा पर बस्कन देखत होतो नवरदेव राजो ।।४।।
गजरो त गजरो मोगरा को गजरो
लाडो लाडीला लायदेस नवो घागरो
लाडू त लाडू बुंदी को लाडू । लाडो कवस
लाडीला मरो हात नको सोडू
पानत पान मोठो बंग्लो पान
पोरग्या पोटीक ब्याहाम बाढस जवाईको मान

**लाडी**

दिनरात सपनाम बी वा गोरी पोटी आवडत होती. ब्याहा होन क पहेले सपना पडत होता, फक्त एक गोर पोटीसाठी. मर संसारसाठी दया आयी एक गावक माहेजनला. टोकूनच मरो ब्याहा जुडे कारंजाला. तब धोधो पाणी पडत होतो. म्हणून खानकी अन बॅड बाजा की आफत आय गयी. तरी बी मू मरी बरातमोठ शानकन कारंजाला लेकन गये. लाडी क घर क जवरजवर गया, तब पाणीन खूप घाई करी. बॅडवाला मांगना बिचारा इत उत दडन लाग्या. पण जान दे मला खूशी भई चांगली लाडी भेटन की ब्याहा लाग्या पर लाडी लाडाला कव्हस, तोर बीना मू कहान जावू . तोर

सीवा कसी रहू . हरघडी तू मर संग रव्हजे. तोरशिवाय मरी जिन्दगानीच नाय जीवन म फक्त मला तोरीच स आस. सांज सकार मू देखूस सपनो. आब नको संतापू मरमर लाडा.

**नवरदेव की समझदारी**

पत्रिका को कागद महंगो भय म्हणून साधीच पत्रीका छापणकी स मला उसाच डी जे का भावना भी बाढ गया म्हणून साधी डफरी ढोलक सांगन को स मला. जादा को खर्च नही कर सकूस मू फटाकानाको. जास्त खर्च बी फालतू लागस मला. साध अन कमी खर्च म ब्याहा करबो. आपल गरीबी को गाडो आपणलाच चलावन लागेन. हासन वालानाला हासन दे. ओको गम नाय मला आपली ऐपत आपलाला मालूम कायला झुलनको दिखाऊ झुलो कडकी म बी ब्याह को आनंद मू मानून. असो सांगन को तुमला.

**माता माय की पुजा**

माता मायको लिंब क झाड खल डेरो. नवती नवेली नवरी ओला घालस फेरो. आखाडी क सनला बहू बयदीको नवस देवो मोरी माता माय. कायक मला संसार म स हाऊस. धान को पहेलो पैरो तोला चढाऊन. अन सुखी संसार साठी आंगनाम तुरशी बढाऊन. फुलना बहेरेन आंगनाम तब माय मू भरुन तोरी ओटी. तू राख तोर छत्र छायाम मू भरुस तोरी ओटी.

**जामरुम क डहारी**

ब्याहा क पहले दिन नवरदेव नवरीक घर हिरव डहार को मांडो डावनू पडस. पण कोणतं झाड की डहारीना लाई पायजे. ओम जांभूर क झाडकी डहारी नाको महत्व काय जास्तस. जांभूर औषधी झाड स जामरुम को झाड हमेशा हिरवो रव्हस. म्हणूनच येन झाड को ब्याहाकमांडोशीन जास्त संबंध आवस. जामरुम की डहार ना शीतलता को प्रतीकस. जामरुमक डहारनाम कामधेनू माता वास करस. तपन नही होत. मांडोक खलत गर्द छाया रव्हस. जामरुम की डहारी घरक एकवा को प्रतीक स. म्हणून मांडो येन डहारनाको डावस. जांभरुम औषध को झाडस ब्याहाम सर्व लोगनाकी तब्बेत चांगली रही पायजे. रोग प्रतीकार शक्ती बढकन सर्वा निरोगी रहया पायजे. हातम जांभरुम को पानना अनहरद डोकसापर धरकन देखो कोणतीही बिमारी होणार नही.यीच जामरुम क डहारी ना को ब्याहा म महत्व स.

**हरद**

ब्याहामा लाडालाडीक पुर आंगला लगावस पिवरी हरद. डोमडो चेहरो बी हरद कन पिवरो होस. हरद लगायकनस लाडालाडी बनस. लाडालाडी का माय—बाप, बहीन—जवाईला हरद लगाई जास. हिरवं मांढोम हरद गाडी जास सीलपर हरद बाटी जास. सर्दी पडसो भयत हरद पाजी जास. हरदकन लाडालाडी हिरोहीन दिसस.

पिवरोस रंग तेडो मोडो. आंग पुजा क थालीम हरद की संग. सारा सारी धावस हरद लगावनला एकमेक क पास. यलावला धरो जबरदस्तीकन हरद लगावो. अन ब्याहाम आनंद मनावनको काम मांडो झोडपी पर्यंत चलत रव्हस.

**मीठ को महत्व**

बरात जब पोरग्याकं घर वापस जास. तब दुयी टोपली नाम मीठ, अन चावूर भर दे जास. तब दवडी संभालनकी जबाबदारी पोटीक दाजी की रव्हस. पोरग्या क घर दुसर दिन मांडो झोडपी होस. तब दवडीमका चावूर मांडो झोडपीक दीन शिजायकन लोगनाला पोटीक्यानको अन्न खानला घालस.

पहेले आब क सारखा आवन जावन का साधन नव्हता. तब बरात दुरक गावला जानसाठी दूई—दुई दिन लागत होता. तब मझार रातको मुक्काम करनू पडे. तब रेंगी, बंडी, छकडाला उधई नही लाग्या पायजे. उसोच नांदया बैलना क भोवताल भी मीठ फेक्या जाय. उसोच मीठ डाया पर वाहान सरपना आवत नही होता. यी वैज्ञानीक कारण ओन जमानाक लोगनानं ओळखे.

**रेंगी**

रेंगी पहेले लाडालाडीला आणन क अन ले देनक साठी उपयोगमं लाई जाय. कब कब गावला जाताजाताच रेंगी को आस्कूड तुट जाय, त कब रेंगक चाकको बुधलो फुट जाय. त कब रेंगीक चाकको बेटच पड जाय. तब रेंगी हाकलणाराला मोठो बिचार आव ओन टाईमला कोणीक जवर कुऱ्हाड जर भेटी त झोडपो तोड कन, ओको तुकडो बांधकन बी तब का लोगना थोडो

उशीरा पोटीला मायक अन ससराक घर पोहचायदे. कब कब रेंगी कि शिवर निसट जाय. त कब कब बेड्डी तुट जाय, तब जू क शेदराम काडी डायकन शिवर को काम करे जाय. उसीच बेड्डी को काम नांदया बईल की कानी सोडकन करनू पड. तरी बी रेंगी सुखरुप लाडी नवरदेव क गावपर्यन्त पोहोचाई जाय. येता अकलवान होता आमारा पूर्वज.

**पिवसी**

मायक रुपम मावसी. भाजीक रुपम पावसी. तेलकरुपम अलसी अन लाडी क रुपम पिवसी.आजक जमानाम पिवसी को रुप बदले. पहेले क बाईना जवर पिवसी रव्हत होती. भोयर पवार समाज क लाडी की वा शान होती. पिवसी कुटुंब क गठबंधनको प्रतीक समझे जाय. जेक जवर पिवसी रव्हवा बाई कुटुंब की कारभारी होयन, असो अंदाज लगाये जाये. वाच घर मालकीन, मुखीया होती. पिवसी ओटाम खोसत रव्ह. पिवसीन कई लोगनाको जीवन चांगलो बनायस. पिवसी हर समाज म रितीरिवाज कन अलग स्थानपर खोसी जाय. पिवसी दूयी आवरण की, एक तवा घर की आर्थिक सुरक्षा, अन् दुसरी बाहेरक व्यवहार की सुरक्षा. पिवसी कुटुंब की आर्थिक ढाल होती. ओको ब्याहाम महत्व होतो. ब्याहा लगावनका हर बाईना पिवसीमीन पैसा काढकन लाडालाडीला हातम देनू पड. खूप उसाच नवरदेवक शालला एक खोबरो बांधन साठी लाल कपडाकी लहानशी पिवसी रव्हत होती. यी महत्व स येन पिवसी को ब्याहा म.

**ब्याहा की परीक्षा**

सिता राम ला धनुष्यबाण उचलकन भेटी,

द्रौपदी को ब्याहा की शर्त धनूसकेन मच्छी को डोरो फोडनको होती, पहलक पेक्षा आब ब्याहा का बाराम बदल भये, जमानो नवो आये. ब्याहा पहेले पोटी क पसंत की परीक्षा होती. आबत पोरग्यापोटी एकमेक संग गोष्टना करकन मायबाप निर्णय लेनला सांगस.

आब पसंतीक परीक्षा म पोटी पोरग्याला फेल करस.

**पंगत मश्लोक को महत्व**

जेवन क पंगतम पहेले श्लोकना कव्हत होता. ब्याह म पंगत को जेवन एक प्रकारको यज्ञ स होतो. म्हणून कोणतही यज्ञ म पवित्र रव्हनू जरुरी स. आपण भोयरना पवारना अन्न की पैदावार का दाता स. ओन को सन्मान करनू आपलो परम कर्तव्य स. अन्न की स्तुती श्लोक क माध्यम कन करनू पडस. श्लोक कन मन पवित्र रव्हस. अन्नको पचन चांगलो होस. अन्न को व्हिटॅमीन माणूसक शरीर ला पोषक रव्हस. रोग प्रतीकार शक्ती बाढस शरीर चांगलो रहेत औषध को खर्च बाचस. आपल पैसा की बी बचत होस.

**ससुरवाडी**

खानाक स्वाद. कालाकी आवस बारबार याद सासूरवाडी की । साठ गाठ नसीबको लाट. ससुरवाडी होस हक्क को गाव. सडया भेदरा सारखी रहे किंमत. पण ससुरवाडी म रव्हस जवाईको भाव थाटमाट. म पलंग की खाट. जवाई को ससुरवाडी म मोठो थाट.

**सारी भाटवा (दाजी) नातो**

नाता की सुरुवात पोरगे जब पोटी देखनला पोटी क घर जास. तब लुकलुक देख ब्याहा को पोरगे कसो स एकी खबर लावन को काम सारी करस. मंग ब्याहा म जुता लपायकन सारी भाटवाला पैसा मांगस. लुटआपल परंपरा को एक हिस्सो स.दाजीला रंग लगावनको काम पहले सारी करस. यी रिस्तोत हाशी मजाक को रव्हस. ओतरोस जबाबदारीको भी सारी क ब्याहा म पाच डेरला दोरो फिरावणू , मांडो सुटणू , मांडोला तोरण बांधनू , इकाम सारी को ब्याहाम भाटवा बिना नही होय सकस.

मोठो बहीन को ब्याहाला की काळजी लहान बहीन लेस आपल दाजी पर संकट आये त सारी उनकं मदतला तयार रव्हस. बहीन बिमार पळी त बहीन की फिकर व्हा साळी करस. बहीन बारा तीन होस तब लहान लेकरुला सांभाळन को काम बहीनस करस. पण आब शिक्षणक जमानाम पहेले जसो रिकामपण आबक सारीनाला नाय.

**सासू को बहूला**

सासू कहोस बहूला कायला जास गावला. दोरी नाय पोतडीला बांधनला. उठसुठ तू जास गावला. गावपरीन उशीरा आवस असो मायकघर को खावस. हात म नाय दमडी, पडया स सारा

खेतना का करो काम लगाव जीवला लगाम मरसाठी. आये निंधन को काळ. खोस पदर अन कर खेत मकाम. आबनको करु माय क गावकी एवढं लवकर वारी.

**बर्बाद जिनगानी**

कशी सांगु बाई बडी बिपत आई येन लाडा क पायी. मला समजत नई. दारु पेकन यी करस घर म तांडव. मला येक घरम लागस ग बडो भेव. लहानलहान लेकरुनाकी करसयी दुर्दशा. नशाक पायी बरबाद भई मरी जिन्दगी. येक बराबर मरीबी जिन्दगी ओन नाली म फेकीस. घर को सामान दारुसाठी रस्तापर फेककन बिकस. घर म नाय दानो, सारी चिंता मला सतावस. येला कशी समजवू लेकरुनाक शिक्षण टेन्शन स मला भारी. कसो होयन मरो. सांगू मू कोला. पोटी ब्याहा की भयी. चिंता मला आयी. पुरी बिटार गयी येक पायी. बर्बाद भई जिन्गानी येकपायी.

**संदर्भ**

**मुलाखत**

१.प्रा.डॉ. ज्ञानेश्वर टेंभरे, माजी अध्यक्ष राष्ट्रीय क्षत्रिय पवार महासभा
२.श्री. मुरलीधर टेंभरे, अध्यक्ष, राष्ट्रीय क्षत्रिय पवार महासभा
३.प्रा.डॉ.नामदेव राऊत, अध्यक्ष, अखिल भारतीय भोयर पवार महासंघ, नागपूर
४.प्रा. भगवान बन्नगरे, भोयर पवार विद्यार्थी मंडळ, कारंजा (घा.)
५.ना. सौ. सरिताताई गाखरे, अध्यक्ष, जिल्हा परिषद, वर्धा
६.श्री. कविंद्र चौधरी, सचिव, पवारी साहित्य मंडळ, भारत

**संदर्भ ग्रंथ**

१.वाटचाल, प्रकाशन मयुर प्रिंटींग प्रेस, गणेश पेठ, नागपूर, २ ऑक्टोंबर २००१—२०१९ अखिल भारतीय भोयर पवार महासंघ, नागपूर
२.पवार संदेश, प्रकाशक रमेश टेंभरे, ऑगस्ट २०१९

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# महाराष्ट्र राज्यातील लोकसंख्या घनतेचे भौगोलिक विश्लेषण

डॉ. जयदीप रामकृष्ण सोळुंके
संशोधक मार्गदर्शक व सहा. प्राध्यापक भूगोल विभाग.
श्री. पंडितगुरू पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा ता. परळी वै. जि. बीड.
jaideepsolunke@gmail.com,Contact No: 9922463476/ 7972342835

**सारांश (Abstract):-**

जेथे भौगोलिक नैसर्गिक पर्यावरण मानवी जीवनासाठी अनूकूल आहे. तेथे दाट लोकसंख्या असते तर प्रतिकुल नैसर्गिक पर्यावरणात विरळ लोकसंख्या आढळून येते. जगातील लोकसंख्येचे वितरण अतिशय असमान किंवा विषम स्वरूपाचे आहे. लोकसंख्येच्या वितरणावर प्राकृतिक घटक, आर्थिक घटक, ऐतिहासिक घटक, सामाजिक घटक, सांस्कृतीक घटक व राजकीय घटक यांचा परिणाम होतो. लोकसंख्येचे वितरण हे नेहमी लोकसंख्येच्या घनतेवरून स्पष्ट केले जाते. कोणत्याही प्रदेशाचे एकूण क्षेत्रफळ व त्यात राहणारी एकूण लोकसंख्या यांच्या प्रमाणावरून घनता काढली जाते. लोकसंख्या घनतेवरून जमीन व लोकसंख्या यांचा संबंध स्पष्ट केला जातो. २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या घनता ३८२ आहे तर महाराष्ट्राची लोकसंख्या घनता दर चौ. कि.मी. ला ३६५ आहे. २००१ ची महाराष्ट्राची लोकसंख्या घनता ३१५ होती. दहा वर्षाच्या कालखंडात ५० बिंदूंनी लोकसंख्या घनतेत वाढझालेली आहे.

बीजसंज्ञा **(Keywords)**लोकसंख्या घनता, विरळ घनतेचे प्रदेश, मध्यम घनतेचे प्रदेश व दाट घनतेचे प्रदेश इत्यादी.

**प्रस्तावना (Introduction):-**

लोकसंख्या घनता ही विरळ, मध्यम, दाट लोकसंख्या अशी व्यक्त केली जाते. घनता विरळ असले तर साहजिकच विरळ घनतेचे भाग हे मानवी जीवनास प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीचे असतात हे स्पष्ट होते. प्रतिकूल नैसर्गिक पर्यावरणात वाळवंटी प्रदेश, अतिशित प्रदेश, टुंड्रा प्रदेश, दुर्गम डोंगर भाग, तीव्र उतार व दऱ्याखोऱ्यांचे प्रदेश, घनदाट जंगले, दमट रोगट हवामान यांचा समावेश होतो. सुपीक शेती क्षेत्रात जलसिंचन सोयीमुळे शेती, वनोद्यान, फळबागा यांची समृध्दी होते. काही भागात अनुकुल भौगोलिक परिस्थितीमुळे व सर्व सोई उपलब्ध असल्याने लोकसंख्येची घनता तेथे दाट स्वरूपाची असते. नागरी क्षेत्रांचा समावेश दाट लोकसंख्येच्या घनतेत होतो. लोकसंख्या घनदाट क्षेत्रात कामगारापासून व्यवस्थापकांपर्यंत विद्यार्थी, अध्यापककांपासून शास्त्रज्ञ. संशोधकांपर्यत, व्यापाऱ्यापासून ते उद्योगधंदयाची भरमसाट घडवून आणणाऱ्या श्रमिकांपर्यंत सर्व लोक उपलब्ध असतात. लोकसंख्या दाट घनतेच्या प्रदेशात लोकांच्या गरजा पुर्ण होतात व विकासाला संधी देणाऱ्या अनेक सोयी उपलब्ध होतात.

- **अभ्यासक्षेत्राची ओळख (Study Region):-**

महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली. महाराष्ट्रात एकूण ३६ जिल्हे व ६ प्रशासकीय विभाग आहेत. महाराष्ट्र राज्याचा अक्षांश विस्तार १५° ४४' उत्तर अक्षवृत्त ते २२° ६' उत्तर अक्षवृत्त आहे. तर रेखांश विस्तार ७२° ३६' पुर्व रेखावृत्त ते ८०° ५४' पुर्व रेखावृत्त आहे.

महाराष्ट्र राज्याचा आकार त्रिकोणाकृती असून पुर्व—पश्चिम लांबी ८०० कि.मी. तर दक्षिण —उत्तर रूंदी ७२० कि.मी. आहे. तर एकूण क्षेत्रफळ ३,०७,७१३ चौ. कि.मी. असून क्षेत्रफळाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्याचा देशात तिसरा क्रमांक लागतो.

- **संशोधनाची उद्दिष्टे(Objective):-**

प्रस्तूत शोधनिबंधासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१.महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्या घनतेचा अभ्यास करणे.
२.राज्यातील विविध प्रदेशातील घनतेची तुलना करणे.
३.लोकसंख्या घनता वाढीचा आढावा घेणे.

- **माहितीस्त्रोत व संशोधनपध्दती(Database and Methodology):-**

प्रस्तूत शोधनिबंध पुर्णपणे व्दितीय स्त्रोताव्दारे माहिती घेवून तयार करण्यात आलेला असून आवश्यक आकडेवारी ही महाराष्ट्र राज्याची जनगणना पुस्तीका तसेच महारष्ट्र राज्य सांख्यिकी गोषवारा यातून घेण्यात आली असून प्रत्येक जिल्हयाची लोकसंख्या घनता काढण्यासाठी पुढील सुत्राचा वापर करण्यात आला आहे.

**सूत्र : लोकसंख्या घनता =प्रदेशाची एकूण लोकसंख्या/प्रदेशाचे एकूण क्षेत्रफळ (द.चौ.कि.मी.)**

दुय्यम स्त्रोताव्दारे संकलीत केलेली माहिती वरिल सूत्राच्या सहाय्याने विश्लेषण करून सारणीत दर्शविण्यात आली असून लोकसंख्या घनतेचे विश्लेषण दर्शविले आहे. याकरिता तक्त्याचा वापर करण्यात आला आहे. व त्याचे विश्लेषण करण्यात आले आहे.

- **विश्लेषण(Discussion):-**

लोकसंख्येची घनता ही प्रामुख्याने उदरनिर्वाहासाठी कशा प्रकारचा व्यवसाय उपलब्ध होते यावर अवलंबून असते. पुरेसे आणि खात्रिचे उत्पन्न, वाहतुकीच्या सोयी, व्यवसाय वगैरे बाबीवर लोकसंख्या घनता अवलंबून असते. महारष्ट्र राज्यातील ५५ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात केंद्रित झालेली आहे. व त्यांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. शेतीचे उत्पन्न अनिश्चित स्वरूपाचे असते म्हणून कोरडवाहू शेती प्रदेशात लोकसंख्या घनता कमी असते. बागायती क्षेत्रात व औद्योगिक प्रदेश, कारखाने असणाऱ्या प्रदेशात निश्चित स्वरूपाचा कामधंदा मिळत असल्याने अशा प्रदेशात लोकसंख्या घनता दाट ते अतिदाट असते.

महाराष्ट राज्यात १९०१ साली लोकसंख्या घनता ६५ होती. ती १९५१ साली १०४ घनता झाली. १९९१ साली महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या घनता २५७ होती. १९५१ ते १९९१ या ४० वर्षाच्या काळात घनता १५३ ने वाढली म्हणजे लोकसंख्या घनता १.५ पटीने वाढली होती. २००१ साली लोकसंख्या घनता ३१५ झाली. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या लोकसंख्येची घनता दर चौ. कि.मी. ला ३६५ आहे.

**तक्ता क्र. ०१ : महाराष्ट्र जिल्हावार लोकसंख्या घनता (दर. चौ.कि.मी.)**

| अ.क्र. | जिल्हे | लोकसंख्या घनता | | दसवार्षीक बदल |
|---|---|---|---|---|
| | | २००१ | २०११ | |
| १ | मुंबई शहर | २१२६१ | २००३८ | —१२२३ |
| २ | मुंबई उपनगर | १९३७३ | २०९२५ | ५५२ |
| ३ | ठाणे | ८५१ | ११५७ | ३०६ |
| ४ | रायगड | ३०८ | ३६८ | ६० |
| ५ | रत्नागिरी | २०७ | १९६ | —११ |
| ६ | सिंधुदुर्ग | १६५ | १६३ | —०२ |
| ७ | पालघर | उ.ना | उ.ना | उ.ना |
| ८ | पुणे | ४६२ | ६०३ | १४१ |
| ९ | सातारा | २६७ | २८७ | २० |
| १० | सांगली | ३०१ | ३२९ | २८ |
| ११ | कोल्हापूर | ४५७ | ५०४ | ४७ |
| १२ | सोलापूर | २५९ | २८७ | २८ |
| १३ | नाशिक | ३२१ | ३९३ | ७२ |
| १४ | अहमदनगर | २४० | २६६ | २६ |
| १५ | धुळे | २११ | २८५ | ७४ |
| १६ | नंदूरबार | २५० | २७६ | २६ |
| १७ | जळगांव | ३१३ | ३५९ | ४६ |
| १८ | औरंगाबाद | २८९ | ३६५ | ७६ |
| १९ | जालना | २०९ | २५५ | ४४ |
| २० | बीड | २०२ | २४२ | ४० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१ | परभणी | २२९ | २०५ | २४ |
| २२ | हिंगोली | २१८ | २४४ | २६ |
| २३ | उस्मानाबाद | १९५ | २१९ | २४ |
| २४ | लातूर | २९० | ३४३ | ५३ |
| २५ | नांदेड | २७२ | ३१९ | ४७ |
| २६ | अमरावती | २१३ | २३७ | २४ |
| २७ | बुलढाणा | २३० | २६८ | ३८ |
| २८ | अकोला | ३०० | ३२१ | २१ |
| २९ | वशिम | १९८ | २४४ | ४६ |
| ३० | यवतमाळ | १८१ | २०४ | २३ |
| ३१ | नागपूर | ४०९ | ४७० | ६१ |
| ३२ | वर्धा | १९५ | २०५ | १० |
| ३३ | भंडारा | २९२ | २९३ | ०१ |
| ३४ | गोंदिया | २२१ | २५३ | ३२ |
| ३५ | चंद्रपूर | १८२ | १९२ | १० |
| ३६ | गडचिरोली | ६७ | ७४ | १७ |
| | **म्हाराष्ट्र राज्य एकूण** | **३१५** | **३६५** | ५० |

- **संदर्भ :—Ranking of Districts by Population Density 2001 & 2011**

वरिल तक्त्यावरून असे दिसून येते की, २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील लोकसंख्या घनतेचे पहिले पाच जिल्हे पुढील प्रमाणे आहे. महाराष्ट्रात लोकसंख्या घनतेत प्रथम क्रमांक मुंबई उपनगर जिल्हयाचा असून घनता २०९२५ आहे. २००१ ची घनता १९३७३ होती. १० वर्षात लोकसंख्या घनतेत ५५२ ने वाढझाली आहे. लोकसंख्या घनतेत दुसरा क्रमांक मुंबई शहराचा असून त्याची घनता २००३८ आहे. मुंबई शहराची २००१ ची लोकसंख्या घनता २१२६१ होती. २००१ ते २०११ या १० वर्षात घनतेत —१२२३ ने घट झालेली आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे मुंबई शहरातून मुंबई उपनगरात आणि ठाणे जिल्हयात लोकांनी स्थलांतर केले आहे. २०११ च्या जनगणनेनुसार घनतेत तिसरा क्रमांक ठाणे जिल्हयाचा आहे. ठाणे जिल्हयाची घनता ११५७ आहे. १० वर्षात ठाणे जिल्हयाची घनता ३०६ इतकी वाढली आहे. तर चौथा क्रमांक पुणे जिल्हयाचा आहे. २००१ मध्ये पुणे जिल्हयाची घनता ४६२ वरून ६०३ इतकी झाली असून दसवार्षीक वाढ १४१ इतकी आहे. घनतेच्या बाबतीत कोल्हापूर जिल्हयाचा पाचवा क्रमांक असून २००१ च्या तुलनेत लोकसंख्या घनता ४६ ने वाढली आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार सर्वात कमी घनता गडचिरोली जिल्हयाची ७४ आहे. २००१ मध्ये ६७ होती त्यात ०७ ने वाढ दिसून येते. सिंधुदुर्ग जिल्हयाचा घनतेत दुसरा क्रमांक आहे. २००१ साली १६७ घनता होती त्यात १० वर्षात ०२ ने घट झाली आहे. चंद्रपुर जिल्हयाची लोकसंख्या घनता १९२ आहे. २००१ च्या तुलनेत चंद्रपूर जिल्हयाची घनता ११ ने वाढली आहे. रत्नागिरी जिल्हयाचा शेवटून चौथा क्रमांक आहे. २००१ साली घनता २०७ होती. १० वर्षात त्यात ११ ने घट झाली आहे. सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयातून लोकसंख्येचे स्थलांतर मुंबई शहर व उपनगरात झाले आहे.

- **महाराष्ट्रातील लोकसंख्या घनता प्रदेश (२०११):—**

१. अतिदाट लोकसंख्या घनता प्रदेश (लोकसंख्या घनता १००० पेक्षा जास्त ):—
महाराष्ट्रात २०११ च्या जनगणनेनुसार अतिदाट लोकसंख्या घनता प्रदेशात मुंबई उपनगर २०९२५ व मुंबई शहर २००३८ यांचा समावेश होतो. मुंबई शहर सुमारे ३१.४६ लाख आणि मुंबई उपनगर ९३.३२ लाख मिळून सुमारे १२४.७८ लाख लोक राहातात. याशिवाय अतिदाट लोकसंख्या घनतेच्या प्रदेशात ठाणे जिल्हयाचा समावेश होतो. २०११ च्या जनगणनेनुसार ठाणे जिल्हयाची घनता ११५७ आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे या तिन जिल्हयात संपुर्ण महाराष्ट्र राज्यातून व भारत देशातून लोक स्थलांतर करतात. याप्रदेशात आसणारे औद्योगिकरण,

शहरीकरण, रोजगार, वाहतूकीची साधने या सर्व कारणामुळे या भागात लोकसंख्येचे केंद्रीकरण होत आहे.

**२.घनदाट लोकसंख्या घनतेचा प्रदेश (४०० ते ८०० लोकसंख्या घनता):—**

महाराष्ट्रातील घनदाट लोकसंख्या घनतेच्या प्रदेशात पुणे विभागातील पुणे व कोल्हापूर जिल्हयांचा समावेश होतो. २०११ च्या जनगणनेनुसार पुणे जिल्हयाची घनता ६०३ तर कोल्हापूर जिल्हयाची घनता ५०४ इतकी आहे. २००१ ते २०११ या १० वर्षात अनुक्रमे १४१ व ४७ इतकी वाढझाली आहे. शिवाय नागपूर विभागातील नागपूर जिल्हयाची लोकसंख्या घनता ४७० आहे. १० वर्षात नागपूर जिल्हयात लोकसंख्येची घनता ६१ ने वाढली आहे.

**३.मध्यम लोकसंख्या घनतेचा प्रदेश (२५० ते ४०० लोकसंख्या घनता):—**

महाराष्ट्रात २०११ च्या जनगणनेनुसार मध्यम लोकसंख्या घनतेच्या प्रदेशात एकूण १८ जिल्हयांचा समावेश होतो. मध्यम लोकसंख्या घनता प्रदेशात अनुक्रमे प्रथम कमांक नाशिक जिल्हयाचा आहे. नाशिक जिल्हयाची घनता ३९३ आहे. त्या खालोखाल रायगड ३६८, औरंगाबाद ३६५, जळगांव ३५९, लातूर ३४३, सांगली ३२९, अकोला ३२१, नांदेड ३१९, परभणी २९५, भंडारा २९३, सातारा २८७, धुळे २८५, सोलापूर २८७, नंदुरबार २७६ असा कम लागतो. याशिवाय बुलढाणा, अहमदनगर, जालना व गोंदिया या जिल्हयांचा समावेश ही मध्यम घनता प्रदेशात होतो.

**४.कमी लोकसंख्या घनतेचे प्रदेश (२५० पेक्षा कमी लोकसंख्या घनता ):—**

महाराष्ट्रातील कमी लोकसंख्या घनता प्रदेशात एकूण ११ जिल्हयांचा समावेश होतो. हिंगोली २४८, वाशिम २४४, बीड २४२, अमरावती २३७, उस्मानाबाद २१९, वर्धा २०५, यवतमाळ २०४, रत्नागिरी १९६, चंद्रपूर १९२, सिंधुदुर्ग १६३ आणि सर्वात कमी लोकसंख्या घनता गडचिरोली ७४ आहे. कमी लोकसंख्या घनता प्रदेशात डोंगराळ प्रदेश, पर्जन्याचा आभाव, निकृष्ट मृदा, वनांचे घटते प्रमाण, औद्योगिकरणाचा आभाव, कोरडवाहू शेतीचे प्राबल्य असल्यामुळे या जिल्हयात लोकसंख्या घनता विरळ आहे.

**• निष्कर्ष (Conclusion):-**

१.महाराष्ट्र राज्यातील लोकसंख्या घनता २००१ ते २०११ नुसार मुंबई शहर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयात घट झालेली दिसून येते.
२.२०११ च्या जनगणनेनुसार ५०० पेक्षा जास्त लोकसंख्या घनता प्रदेशात महाराष्ट्रातील मुंबई उपनगर, मुंबई शहर, ठाणे, पुणे व कोल्हापूर या जिल्हयांचा समावेश होतो.
३.मुंबई शहरातून मुंबई उपनगरात मोठया प्रमाणात स्थलांतर झाले आहे.
४.अतिदाट लोकसंख्या प्रदेशात मुंबई उपनगर,मुंबई शहर व ठाणे या तिन जिल्हयांचा समावेश होतो.
५.घनदाट लोकसंख्या प्रदेशात पुणे, कोल्हापूर, व नागपूर या जिल्हयांचा समावेश होतो.
६.मध्यम घनता प्रदेशात सर्वाधिक १८ जिल्हयांचा समावेश होतो.
७.कमी घनता प्रदेशात राज्यातील एकूण ११ जिल्हयांचा समावेश होतो.
८.सर्वात कमी लोकसंख्या घनता गडचिरोली जिल्हयात ७४ इतकी आहे.
९.मागास प्रदेश व अप्रगत प्रदेशातून औद्योगिक क्षेत्र सेवा सुविध उपलब्ध असणाऱ्या प्रदेशात लोकसंख्येचे स्थलांतर होत असल्याचे दिसून येते.

**• संदर्भ ग्रंथ (References) :-**

१.डॉ. सुरेश फुले (२००९) 'महाराष्ट्राचा भूगोल' विद्याबुक पब्लीशर्स, औरंगाबाद.
२.डॉ. एस.डी. कौशिक (२०००) 'मानव तथा आर्थिक भूगोल', रस्तोगी पब्लीकेशन, मेरठ
३.डॉ. प्रकाश सावंत (१९९७) 'मानवी भूगोल', फडके प्रकाशन, कोल्हापूर
४.प्रा. प्र.र. करमरकर, प्रा. प्रकाश सावंत (१९९७) 'मानवी भूगोल', कॉन्टीनेंन्टल प्रकाशन, पुणे
५.डॉ. शेटे, डॉ. फुले, डॉ. शहापूरकर (१९९७)'लोकसंख्या भूगोल', अभिजीत पब्लीकेशन, लातूर
६.ए.बी. सवदी (२०११) 'महाराष्ट्राचा भूगोल', निराली प्रकाशन, पुणे.

ISSN : 2278-9308
July 2021

# डॉ. भा.ज. कविमंडन यांची सौंदर्यशास्त्रीय भूमिका

प्रा. जगजीवन विश्वनाथ कोटांगले
मराठी विभाग कला, वाणिज्य महाविद्यालय, पे.पंप, जवाहरनगर,भंडारा (महाराष्ट्र)
मोबाईल क्र. ९९२३४८३७३८,ईमेल–jvkotangale@gmail.com

**प्रस्तावना :—**

मराठी काव्य—कथा—वाङ्मयाबरोबरच मराठी साहित्यविचार (समीक्षा) जन्मास आला, त्याचबरोबरच सौंदर्यविचारही आला. ललित कलेच्या संदर्भातील सौंदर्यविचाराची चर्चा मराठी साहित्यात फार उशिरा झाली व अगदी मोजक्या मीमांसकांनी केली आहे. यात बा.सी. मर्ढेकरांची कलाविचारांवरची सौंदर्यशास्त्रीय भूमिका फार महत्त्वाची मानली जाते. आणि त्यांच्या आगेमागे पु. शि. रेगे, दि.के. बेडकर, वा.ल. कुलकर्णी, रा.भि. जोशी यांचीही चर्चा मौलिक ठरली आहे. पुढे रा.भा. पाटणकर प्रभाकर पाध्ये मुक्तिबोध, दिलीप चित्रे, द.ग. गोडसे व पु.ग. सहस्रबुद्धे यांच्यानंतर भा.ज. कविमंडन यांची सौंदर्यशास्त्रीय चर्चा मौलिक स्वरूपाची आहे.

**भा.ज. कविमंडन व्यक्ती आणि वाङ्मय :—**

भास्कर जनार्दन उर्फ नाना कविमंडन यांचा जन्म ११ नोव्हेंबर १९३३ व मृत्यू २० मे १९९७ चा. कविमंडन यांचा जन्म यवतमाळ जिल्हातील पाटणबोरी या गावचा. पण अकोला जिल्हातील 'वाशिम' हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे पदवी व पुढील शिक्षण नागपूर आणि पुणे येथे झाले. तत्त्वज्ञान या विषयात एम.ए. ची पदवी नागपूर येथे मिळविली आणि 'आदिवासी कला आणि सौंदर्यशास्त्र' या विषयात पुणे विद्यापीठात पीएच.डी. झाले. इ.स. १९६० ला अमळनेर येथे तत्त्वज्ञानाचे अधिव्याख्याता म्हणून रूजू, पुढे पुणे विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान अभ्यासमंडळात सभासद व अध्यक्ष म्हणून कार्य व तत्त्वज्ञान विभागाच्या विभागप्रमुख प्रदावरून सेवानिवृत्त झाले. नरहर कुरूंदकर, राम शेवाळकर, कवी अनिल, ग्रेस व वा.रा. सोनार हे त्यांचे स्नेही होते.

भा.ज. कविमंडन तत्त्वज्ञानाचे अध्यापक व एक प्रतिभावान कवी, श्रेष्ठ समीक्षक, कथाकार, अनुवादक, निबंधकार, संपादक म्हणून ख्याती प्राप्त झालेले व्यक्तिमत्व होते. 'कविता स्वरूप आणि रसास्वाद', 'साहित्यकृती आणि रसिक', 'उज्ज्वल कवितेचा अस्त' (बालकवी समीक्षा) आणि 'सौंदर्यविचार' हे समीक्षाग्रंथ प्रकाशित असून दोन वैचारिक ग्रंथर, एक दीर्घकथा, काही संपादन, अनुवाद व नियतकालिकांचे संपादक म्हणून साहित्याच्या क्षेत्रात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

भा.ज. कविमंडन यांनी आपल्या समीक्षा ग्रंथाच्या रूपात मराठी साहित्य समीक्षा क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या ग्रंथात साहित्यशास्त्र व सौंदर्यशास्त्र या मूलभूत कालमीमांसेची महत्त्वाची चर्चा झाली आहे. किंबहुना तत्त्वज्ञानाच्या मानसशास्त्राच्या अंगाने त्यांनी केलेले सौंदर्यसंकल्पनांची मांडणी खूप महत्त्वाची ठरली आहे. त्या अनुषंगाने 'सौंदर्यविचार' या त्यांच्या महत्त्वाच्या समीक्षाग्रंथात सौंदर्यसंकल्पनांच्या अगदी तळापर्यंत जाऊन शास्त्रशुद्ध चिकित्सा केली आहे, ती मराठी वाचकांना लक्षात घेण्यासारखी बाब आहे. त्यांनी प्रस्तुत ग्रंथात 'सौंदर्यभावना', 'संवेदना' व 'मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्र'ाची केलेली समीक्षा अत्यंत मौलिक स्वरूपाची असून सुद्धा भा.ज. कविमंडन मराठी वाचकांना पाहिजे तितके परिचित झाले नाही. खरे तर सौंदर्यशास्त्राची व्यापक पातळीवर समीक्षा करणारे समीक्षक मराठीच्या साहित्यप्रांतात दुर्मिळ असून सुद्धा भा.ज. कविमंडन यांची पाहिजे तितकी दखल घेतलेली दिसत नाही. या लेखाच्या माध्यमातून त्यांची सौंदर्यशास्त्रीय भूमिका कशी मार्मिक आहे. याचे प्रामाणिक प्रयत्न केले आहे.

**सौंदर्यशास्त्रीय भूमिका :—**

भा.ज. कविमंडन यांचे सौंदर्यविचार इतर सौंदर्यशास्त्र समीक्षकांपेक्षा वेगळे आहेत. कारण कोणताही सौंदर्यशास्त्रज्ञ किंवा सौंदर्यसमीक्षक सौंदर्यासंबंधच्या विशिष्ट वैचारिक भूमिकेशी बांधील असतो. सौंदर्य हे वस्तुनिष्ठ किंवा व्यक्तिनिष्ठ असते. यापैकी एक भूमिका स्वीकारून त्यानुसार आपले सौंदर्यविचाराचे विवेचन करतो. भा.ज. कविमंडन यांनी अशी भूमिका स्वीकारली नाही असे

ISSN : 2278-9308
July 2021

म्हणता येणार नाही; पण त्यांना सौंदर्याची वा त्यांच्या कसोटयांची बंदिस्त चौकट नको आहे. सौंदर्य वस्तुनिष्ठ की व्यक्तिनिष्ठ हा प्रश्न भा.ज. कविमंडन यांना दुय्यम दर्जाचा वाटतो. सौंदर्य हे वस्तुनिष्ठ व आत्मनिष्ठ दोन्ही प्रकारचे असू शकते, पण याचा अर्थ असा नव्हे की सौंदर्य हे काही प्रमाणात आत्मनिष्ठ व काही प्रमाणात वस्तुनिष्ठ मानता येऊ शकते. सौंदर्य हे पूर्ण प्रमाणात आत्मनिष्ठच किंवा वस्तुनिष्ठच मानता येऊ शकते. म्हणून सौंदर्यशास्त्राला वास्तववादात किंवा चिद्वादात अडकवून ठेवू नये अशी भा.ज. कविमंडनांची भूमिका आहे. कारण त्यांना वाटते की, सौंदर्य हे वस्तुनिष्ठ आहे. असे म्हटले तरी ते सौंदर्यासंबंधीचे स्पर्वस्पर्शी विधान होणार नाही किंवा सौंदर्य हे व्यक्तिनिष्ठ आहे असेही म्हटले तरी ते सर्वस्पर्शी विधान होणार नाही. युक्तिवादाने किंवा शास्त्राच्या आधाराने दोन्ही गोष्टी सिद्ध करता येऊ शकतील. सौंदर्य हे वस्तुनिष्ठ आहे असे म्हटल्यावर ते व्यक्तिनिष्ठ नाही असे अनुमान निघेल आणि एखादी व्यक्ती सौंदर्य व्यक्तिनिष्ठ आहे असे सिद्ध करेल. आता दोघांही सौंदर्यवाद्यांचे विधान खरे आहे, पण सौंदर्यास्वादक यांपैकी एकाच भूमिकेला ग्रहय मानतो आणि सौंदर्याला बंदिस्त करून घेतो. साधारणत: मराठी सौंदर्यविचारात असेच झाले आहे, पण असे करतांना सौंदर्यसंकल्पनेला योग्य न्याय मिळू शकत नाही. पण याची उणीव भा.ज. कविमंडन यांच्या 'सौंदर्यविचार' या ग्रंथात भरून निघाली आहे.

भा.ज. कविमंडन यांच्या 'सौंदर्यविचार' ग्रंथात 'सौंदर्यभावना', 'संवेदना विचार' व मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्राची भा.ज. कविमंडन यांनी केलेली समीक्षा इत्यादी महत्त्वाच्या मुद्दांवर मौलिक चिंतन मांडलेले आहेत. यात सौंदर्यभावना आणि कलासंवेदना याचे स्वरूप स्पष्ट करताना मराठीत आधी झालेल्या उपरोक्त संकल्पनांवर प्रतिक्रिया नोंदवून स्वत:ची जी भूमिका विशद केली आहे. त्यात त्यांच्या सौंदर्यविचारांचे मर्म दडले आहे.

भा.ज. कविमंडन यांनी 'सौंदर्यभावनेसंबंधीची भूमिका विशद करताना. सौंदर्यशास्त्र म्हणजे काय? त्याचे स्वरूप काय? या मुद्दांवर मूलभूत चिंतन मांडले आहे. तसेच भावना म्हणजे काय? त्याची व्याख्या देऊन सौंदर्यभावना म्हणजे काय? व सौंदर्यभावनेसंबंधीची भा.ज. कविमंडन यांनी आपली भूमिका मांडताना मर्ढेकरांच्या सौंदर्यभावनेची टीका करताना स्वत:चा जो युक्तिवाद मांडला आहे त्यातून 'सौंदर्यभावना ही इतर भावनेप्रमाणेच एक भावना आहे यांचे सूक्ष्मरित्या विवेचन मांडलेले आहे.

इमोशन आणि फिलिंग या दोन शब्दाचा अर्थ मराठीत आम्ही भावना असाच घेतो पण हे दोन्ही शब्द वेगळे आहेत. इमोशन म्हणजे भावना आणि फिलिंग म्हणजे 'विकार' भीती ही भावना निर्माण झाल्यावर शरीराच्या अवयवावर भितीमुळे जे बदल होतात उदा. हातपाय थरथर कापणे, अंगाला घाम सुटणे इ. जे बदल होतात त्यांना विचार असे संबोधल्या जाते. म्हणजेच भावनेचे परिणाम हेच विकार होत असे म्हणायला काही हरकत नाही.

इमोशन व फिलिंग यांचा वेगळा अर्थ लावताना भावना म्हणजे काय हे कळते. 'भावनेपेक्षा सौंदर्यभावना वेगळी आहे असे मर्ढेकर मानतात' व हीच भूमिका मराठी सौंदर्यशास्त्रीय संकल्पनेत रूढ आहे पण कविमंडन यांनी ही भूमिका खोडून काढलेली आहे. भावनेची किंवा सौंदर्यभावनेची चर्चा त्यांनी मानसशास्त्रीय पद्धतीने केली आहे. सुंदर हा भाग जाणिवेचा नव्हे किंवा ज्ञानांगाचाही नव्हे. हा अनुभव जाणीव किंवा संवेदना यापेक्षा वेगळा, जास्त संकीर्ण, जास्त परिणामकारक आहे. या अनुभवाला एक प्रकारचा भावानुभव म्हणावे लागते. हे सांगून डॉ. कविमंडन यांनी दुसरे कारण सांगताना भावना आणि विकार या शब्दांचा योग्य वापर करून म्हणजे भावना व विकार हयांना वेगळे मानून 'सौंदर्यानुभवाला इतर भावनेप्रमाणेच एक भावनेप्रमाणेच एक भावना मानले'.

राग, द्वेष आदी साध्या भावनांचा परिणाम पाहिला तर असे दिसते की, या सर्व भावना शेवटी काही विकार (फिलींग) निर्माण करतात. रागापासून यातना, अपमानापासून दु:ख, प्रणयापासून आनंद किंवा यातना असे विकार (फिलींग) उद्‌भवतात. भावना आणि विकार (इमोशन अँड फिलिंग) यांचे हे असे नाते मानसशास्त्रात मान्य झाले आहे. सौंदर्यस्वाद निर्हेतूक असतो किंवा असावा असे म्हणणारे हे मान्य करतील की सौंदर्यस्वादानंतर आनंद होतोच, ज्याअर्थी सौंदर्यानुभवानंतर नेहमीच्याच मूलभूत विकारांपैकी (बेसिक–फिलिंग) एक विकार म्हणजे 'आनंद' हा विकार निर्माण होतो त्या अर्थी हा अनुभव देखील भावनेच्या प्रकारात मोडणारा ठरतो. (पृ. ४५)

'म्हणूनच सौंदर्यभावना आणि इतर भावना यात फरक करता येत नाही अशी डॉ. कविमंडन यांची स्पष्ट भूमिका आहे.

डॉ. भा.ज. कविमंडन यांनी कलासंवेदना बाबतही योग्य विवेचन मांडले आहे. कलासंवेदना स्वीकारताना ते एखादया भूमिकेशी बांधले नाही. कारण मानवी अनुभव बंदिस्त भूमिकेतून स्पष्ट होऊ शकत नाही. 'सौंदर्य वस्तुनिष्ठ' की 'व्यक्तीनिष्ठ' या बंदिस्त चौकटीच्या एकाच पद्धतीने सौंदर्याचा विचार करायला लागलो की मनमोकळेपणाने स्वत:च्या अनुभवाने जे जे आत्मसात झाले ते ते खुल्या मनाने सांगता येत नाही याची जाणीव भा.ज. कविमंडन यांना आहे. सौंदर्याला चौकट नसते. म्हणजे 'नियमरहीत नियमितता' असावी असे कांट म्हणतात. याचेच मत डॉ. कविमंडन यांनी स्वीकारले असावे असे वाटते.

भा.ज. कविमंडन यांचे कलासंवेदनेसंबंधीचे विवेचन मानसशास्त्र, भाषाशास्त्र, तत्त्वज्ञान, साक्षात्कारशास्त्र इत्यादी शास्त्रांचा योग्य ठिकाणी आधार घेऊन कलास्वादाचे व सौंदर्यस्वादाचे स्वरूप मांडले आहे व प्रत्यक्ष अभिजात आस्वादक्रिया आणि कलाकृती यांच्या आधारे सौंदर्यशास्त्रीय विचार मांडले आहेत.

**समारोप :—**

भा.ज. कविमंडन यांनी संवेदनेसंबंधीचे विचार फार मौलिक असून त्यांनी यावर सूक्ष्मरित्या मांडले आहे. कलासंवेदना व सौंदर्यभावना या रसिकनिष्ठ घटकांना सौंदर्यशास्त्रात अनन्य साधारण महत्त्व असल्याचे सिद्ध केले आहे. शिवाय 'सौंदर्यानुभवातील संवेदना', 'सौंदर्यभावना', 'कलासंवेदना', 'मर्ढेकरांचा वास्तववाद', 'मर्ढेकरांची भूमिका' अशा महत्वपूर्ण सौंदर्यशास्त्रीय संकल्पनांवरचे विवेचन मराठी सौंदर्यविचारात दुर्मिळ आहे. या दुर्मिळ सौंदर्यशास्त्रीय लेखनाच्या इतिहासात भा.ज. कविमंडन यांनी मोलाची भर घातली आहे व मराठी सौंदर्यमीमांसकांना विचारसन्मुख केले आहे. तसेच कलेकडे पाहण्याची समग्रदृष्टी दिली म्हणूनच भा.ज. कविमंडन यांचे सौंदर्यविषयक विचार शास्त्रशुद्ध व व्यापक वाटतात व मराठी सौंदर्यशास्त्रीय लेखनापेक्षा वेगळेही वाटायला लागतात.

**संदर्भग्रंथ :—**

१.कविमंडन भा.ज., 'सौंदर्यविचार', मधुराज प्रकाशन प्रा.लि. पुणे, १९९२.
२.कविमंडन भा.ज., 'साहित्यकृती आणि रसिक', मधुराज प्रकाशन प्रा.लि.पुणे, १९९२.
३.कुलकर्णी द.भि., 'मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र: पुन:स्थापना, प्र.आ., अमेय प्रकाशन, नागपूर. १९८२.
४.पाटणकर वसंत, 'सौंदर्यविचार', प्रथम आवृत्ती, (मुंबई मराठी साहित्य संघ), मुंबई १९९३.
५.मर्ढेकर बा.सी., 'सौंदर्य आणि साहित्य', ति.आ., मौज प्रकाशन, मुंबई, १९७५.

# शहरीकरणाचा आदिवासींच्या जीवनावर झालेला परिणाम
## विशेष संदर्भ — मेळघाट, महाराष्ट्र

प्रा. डॉ. एच.यु.पेटकर
समाजशास्त्र विभाग प्रमुख कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय चिखलदरा.
जि. अमरावती.
मो. न. ९४०३६१८३७५,Email – harishpetkar2012@gmail.com

मानवी समाजाची प्रामुख्याने तीन भागात विभागणी केली जाते. ते म्हणजे आदिवासी समुदाय, ग्रामिण समुदाय व नागरी समुदाय. प्रत्येक समुदायामध्ये सातत्याने परिवर्तन होतांना दिसत आहे. परिवर्तन हा सृष्टिचा नियम आहे तसेच तो आज प्रत्येक समाजाचा/ समुदायाचा देखील नियम बनलेला दिसून येतो. परिवर्तन होत असतांना प्रत्येक समुदायामध्ये परिवर्तनाची गती ही समान नसते. शहरी समुदायापेक्षा ग्रामिण समुदायामध्ये परिवर्तनाची गती ही संथ असते तर आदिवासी समुदायमध्ये परिवर्तनाची गती ही ग्रामिण समुदायापेक्षाही संथ स्वरूपाची असते. प्राचिन काळापासून आदिवासी समूदायने आपली परंपरागत मुल्य, प्रथा, परंपरा व विश्वासांना कमी अधिक प्रमाणात टिकवून ठेवलेले आपणास दिसून येते. परंतू आवश्यक ते बदल आज आदिवासी समूदाय स्विकारत असलेला दिसून येतो. आज दळणवळणाच्या साधणांमुळे व रस्त्यांच्या जाळयामुळे गाव, आदिवासी पाडे, वस्त्यांचे शहरामध्ये मोठया प्रमाणात येणे जाणे वाढले आहे. शहरीकरणाचा झगमगाट पाहून त्यांनाही त्यांच्या जीवनामध्ये परीवर्तन करावेसे वाटने एक स्वाभावीक गोष्ट वाटली. शहरातील जीवनमान आदिवासी समूदायाला आकर्षीत करू लागले त्यामुळे आदिवासींच्या विविध घटकांवर शहरी समुदायाचा प्रभाव दिसू लागला.

औद्योगीकरण, यांत्रीकिकरण आणि विज्ञानाचा विकास व प्रगतीमुळे नगरांच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक संरचनेला बदलुन टाकले आहे. नागरी व्यक्तींची संपुर्ण जीवनपध्दती ही आधुनिक स्वरूपाची आहे. शहराचा विकास आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक संरचनेला बदलून टाकले आहे. नागरी व्यक्तिची संपूर्ण जीवनपध्दती ही आधुनिक स्वरूपाची आहे. शहराचा विकास आर्थिकतेबरोबरच अन्य कारणांनी झाला औद्योगीकरण, यांत्रिकीकरण हे यामागील प्रमुख कारण आहेत. जगामध्ये सर्वत्र मोठमोठी शहरे व त्यांचे आकारमान दिवसेंदिवस वाढत आहे. भारत देखिल त्याला अपवाद नाही. शहराची संख्या आणि विस्तार वाढल्याने देशात शहरी समाजाची विशेषत: भौतीकवादी व्यक्तीवादी जीवनाची तिव्र गती, सामाजिक संबंध, सामाजिक गतिशीलतेमध्ये वृध्दी झालेली आहे.

कोणत्याही देशातिल, राज्यातील अथवा जिल्हयातीलशहरीकरणाचे प्रमाण जसे वाढत जातं तसे काही नविन प्रश्न, समस्याही जन्म घेतात. या समस्यांचा दुष्परीमणाम समाजावर होत असला तरी शहरातिल लोकांना ग्रामिण व आदिवासी समूदायातील लोकांपेक्षा अधिक चांगले जीवन जगण्याची संधी प्राप्त होते त्यामुळे जगातील प्रत्येक देशात, राज्यात अथवा जिल्हयात शहरीकरणाची पातळी सतत वाढत असल्याचे दिसून येते. कारण ग्रामिण व आदिवासी समुदायापेक्षा शहरी समुदायामध्ये आर्थिक विकासाच्या सोयी जास्त उपलब्ध असतात किंवा नवनविन तंत्रज्ञानाचा शोध घेउन त्या निर्माण केल्या जातात.

नागरीकरणाच्या प्रक्रियेतून समाजाच्या पायाभूत सुविधामध्ये वाढ होते. बाजारपेठांची मोठया प्रमाणात वाढ होते. तांत्रिक बदल विसरून येतात त्याचा कृषी क्षेत्रावार परिणाम होतो त्यामुळे कृषी क्षेत्राची गती वाढते व आदिवासी तसेच ग्रामिण जीवनमान उंचावण्यास एकप्रकारची मदतच होते.

**शहरीकरणाचा अर्थ:**

भारतात जनगणणेनुसार शहरी क्षेत्राचे पुढील निष्कर्ष ठरविण्यात आले आहेत.

अ)ज्या वस्तींमध्ये महानगरपालीका, नगरपालीका, कॅटानमेंट्स बोर्ड स्थापन झाले आहेत अशा वस्ती की ज्या शासनाने नगर म्हणून मान्य केल्या.

ब) पाच हजारांपेक्षा जास्त लोकसंख्या दर चौ. कि. मी. ला ४०० पेक्षा अधिक लोकसंख्येचे घनत्व आणि बिगर कृषी व्यवसायात ७५ टक्के पेक्षा अधिक लोकसंख्या कार्यरत असलेल्या वस्त्या म्हणजे शहरी क्षेत्र होय.

क) गावामध्ये बॅक, पोष्ट ऑफिस, दवाखाना, दळणवळणाची साधने यासारख्या शहरी वैशिष्टयांचे अस्तित्व असावे.

१.नेल्सन अंडरसन यांच्या मते, "ज्या ठिकाणी उद्योगशिलता अधिक प्रमाणात आढळते आणि संपूर्ण जीवनपध्दती नविन तयार होते त्यास शहरीकरण असे म्हणतात."

२.डॉ. मज्जादी हुसैन यांच्या मते,"शहरीकरण म्हणजे नगर आणि शहरामध्ये लोकसंख्येचे विकेंद्रिकरण घडून येणे होय."

३.डॉ. हॅरीस व एल एडवर्ड यांच्या मते, "मानवाची पृथ्वीवरिल उद्योगाची व उपयुक्ततेची केंद्रे म्हणजे शहरे होय."

४.रॉबर्ट बी.मिचेल यांच्या मते,"शहर म्हणजे प्रचंड संख्येतील लोक, विविध धार्मियांची प्रार्थना स्थळे, बॅका, इमारती, वाहतूक व सांडपाणी इत्यादींची व्यवस्था होय. या व्यवस्थेद्वारे आपण घडविले गेले असतो.मानवी अनुभुतीच्या दृष्टिने नविन अस्तित्वात आलेली शहरे ही जूनी असतात तर अगदी जुण्या शहराचे नित्य नुतनिकरण होत असते"

वरील सर्व व्याख्यांचा विचार केल्यानंतर आपल्या असे निदर्शनास येते की, शहरामध्ये विविध सोयी सुविधा उपलब्ध असतात त्या सोबतच ग्रामिण व आदिवासी लोकांच्या आकर्षनाचे ते एक विवीधतेने नटलेले गाव असते. मानवाच्या विविध गरजांच्या पुर्तीकरण्याचे ते एक केंद्र असते.

**आदिवासी जमातीचा अर्थ :**

भारतीय राज्यघटनेमध्ये आणि भारतातील शासन व्यवहारात जमाती या शब्दाचा वापर आदिवासींना संबोधण्याकरीता करण्यात येतो. भारतीय राज्यघटनेतील तरतुदीनुसार भारताचे राष्ट्रपती घटनेच्या ३४२ (१) कलमान्वये परिपत्रक काढून एखादया आदिम जमातीतिल अनुसूचित जमात (Sheduled Tribe) म्हणून घटनेच्या पाचव्या अनुसूचिमध्ये टाकू शकतात. त्यामुळे जमातिला अनुसूचित जमाती असा दर्जा प्राप्त होतो. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश राजवटीतील १९३५ च्या भारत शासन कायदयापासून 'अनुसूचित जमाती' ही घटनाात्मक संकल्पना भारतीय शासन व्यवहरात रूढझालेली आहे. भारतीय राज्यघनेच्या पाचव्या अनुसूचीत जमाती म्हणून राज्यघटनेत जमात (Tribe) हा शब्द वापरला असला तरी ही जमात वा जमाती या संज्ञेची व्याख्या केलेली नाही. एकूण जमात या संज्ञेची सर्व संमत अशी व्याख्या दिसून येत नाही. मात्र जमात या शब्दाच्या वेगवेगळया मानवशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्या पुढिलप्रमाणे आहेत.

१.गिलीन आणि गिलीन यांच्या मते, "एका विशिष्ट भुप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा, समान सांस्कृतीक जीवन जगणाऱ्या स्थानिक लोकांच्या गटाला आदिवासी समुदाय असे म्हणतात."

२.डॉ. डी. एन. मुजूमदार यांच्या मते,"समान तत्व असणारा, एकाच भुप्रदेशावर वास्तव करणारा, विवाह, व्यवसायासंबंधी समान निषेधनियमांचे पालण करणारा, समान भाषा बोलणारा, परस्पर उत्तरदायीत्व निर्माण करण्याच्या दृष्टिने एक पध्दतशीर व्यवस्था स्विकारणाऱ्या कुटुंबाचे किंवा कुटुंबसमूहाचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समुदाय होय."

३.मानववंशशास्त्राच्या शब्दकोषात ई. बी. टायलर हयांनी केलेली व्याख्या, "एका निश्चीत भुप्रदेशात राहणारा एक बोलीभाषा, सांस्कृतीक एकजीनसीपना आणि एकात्मीक सामाजिक संघटन असलेला सामाजिक गट म्हणजे आदिवासी जमात होय. त्यांचे प्रमाण पुर्वज, समान देवता आणि सामान्यता समान नेतृत्व असते आणि त्यांच्या गटातील सदस्य आर्थिक, सामाजिक,धार्मिक तसेच कौटुंबिक आणि रक्तसंबंधी धाग्यांनी परस्परांशी सलग्न असतात."

वरील व्याख्यांवरून असे दिसून येते की, आदिवासी जमातीची एक बोलीभाषा, एक प्रदेश, समान सांस्कुतीक जीवन, समान देवदेवता व कर्मकांड पुजाअर्चा, अंतर्विवाह समूह असलेला गट आहे.

**संशोधन पध्दती :**

संशोधक मागील वीस वर्षापासून कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय चिखलदरा येथे प्राध्यापक पदावर कार्यरत आहे. चिखलदरा व धारणी हे मेळघाट क्षेत्रामध्ये येतात. मेळघाटचा परीचय फक्त महाराष्ट्रालाच नाही तर संपूर्ण देशाला आहे. मेळघाट हे आदिवासी क्षेत्र आहे. ७५ टक्के पेक्षा अधिक लोकसंख्या ही आदिवासी आहे तसेच संशोधक ज्या महाविद्यालयामध्ये शिकवितो त्या महाविद्यालयामध्ये कला शाखेत ८० टक्के विद्यार्थी हे आदिवासी समूदयातील आहे. अनेक शिबीरांच्या माध्यमातून तसेच वेगवेगळया शाळा महाविद्यालयामध्ये दिलेल्या व्याख्यांनांमधून संशोधनकर्त्यांचा अनेक गाव, गावकरी, सरपंच, तसेच गावतिल शिक्षक, अंगणवाडी सेविका, ग्रामपंचायत सदस्य, वयोवृध्द व्यक्ती, महाविद्यालयातील तरूण तरूणी यांच्याशी आलेल्या संपर्कातून 'शहरीकरणाचा मेळघाटतील आदिवासींच्या जीवनावर झालेला परिणाम' या विषयाची निवड केली.

**संशोधनाची उदिष्टे :**

१.आदिवासींच्या आर्थिक जीवनावर झालेला परीणाम जाणून घेणे.
२.शहरीकरणाचा आदिवासींच्या शैक्षणिक जीवनावर झालेला परीणाम अभ्यासने.
३.शहरीकरणाचा आदिवासींच्या वैवाहीक जीवणावर झालेला परीणाम जाणून घेणे.
४.शहरीकरणाचा आदिवासींच्या धार्मिक जीवनावर झालेला परीणाम अभ्यासणे.
५. शहरीकरणामुळे आदिवासींच्या राजकीय जीवनात झालेला बदल अभ्यासणे.
६.शहरीकरणाचा आदिवासींच्या सामाजिक जीवनावर झालेला परीणाम जाणून घेणे.

**गृहितकृत्य:**

१ शहरीकरणामुळे आदिवासींच्या आर्थिक व शैक्षणीक जीवनावर परिणाम होवून व्यवसाय व शैक्षणिक घटाकंमध्ये बदल झाला.
२ शहरीकरणामुळे आदिवासींच्या विवाह पध्दतीमध्ये बदल झाला.
३ शहरीकरणामुळे आदिवासींच्या धार्मिक जीवनामध्ये बदल झालेला आहे
४ शहरीकरणामुळे आदिवासींच्या सामाजिक व राजकीय जीवनामध्ये बदल झालेला आहे.

संशोधनकर्त्यांने मेळघाटमधिल अनेक गावातीलसंरपंच,सदस्य, वृध्दमहिला—पुरूष,शाळांमधीलशिक्षक, अंगणवाडी सेवीका, महाविद्यालयातील तरूण, तरूणी,वनविभागातील जेष्ठ कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते यांच्या घेतलेल्यामुलाखती तसेच विस वर्षापासून संशोधनकर्ता वास्तवास असल्यामुळे त्यांनी केलेलेसुक्ष्म निरीक्षण यामधुन या विषयाची मांडणी केली.

**आदिवासींच्या आर्थिक जीवनावर झालेला परीणाम:**

शहरीकरणाचा आदिवासींच्या आर्थिक जीवनावर परीणाम झाला. आदिवासींची पारंपारीक असलेली अर्थव्यवस्था उदा. कृषी व शिकार, झाडांची कंद मुळे गोळा करणे, पशूपालन, वेगवेगळी कारागीरी करणे उदा. बांबुपासून टोपल्या बनविने, हस्तकला इत्यांदिमध्ये बदल होवून आज कृषी व्यवस्थेतील पारंपारीकतेमध्ये बबदल घडून आधुनिक शेती अवजारांचा वापर करून शेती करायला लागले, पारंपारीक हस्तकलाचा लोप होवुन आधुनिक साहित्यांच्या वापरांमध्ये मोठया प्रमाणात वाढझाली. शिकार, कंदमुळे गोळा करणे बंद होवून छोटे उदयोग, व्यवसाय, रोड रस्त्यांची काम करून अर्थार्जन करायला सुरूवात झालेली दिसते. वनविभागाच्या कडक नियमांमुळे पशुपालनाचे प्रमाण सुध्दा कमी झाले. एकंदरीत शहरीकरणाचा त्यांच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम झालेला दिसून येतो.

**शैक्षणिक जीवनावर झालेला परिणाम :**

साधारणत: तिस चाळीस वर्षापुर्वी आदिवासींमध्ये शिक्षणाचे प्रमाण हे नगण्य होते. आदिवासी जमातीच्या संज्ञेमध्ये त्यांची निरक्षर म्हणून ओळख होती, परंतू दळणवळणाच्या साधनांमुळे त्यांचा शहरीकरणाशी हळूहळू संपर्क वाढत गेला. शहरातील मुले मुली शाळेत जातांना बघुन त्यांनाही आपल्या मुलामुलींना शाळेत पाठविण्याची ओढ निर्माण होत गेली. त्यामुळे गावामध्ये शाळा नसतांना देखील शेजारी गावातील शाळेमध्ये मुलांना शिक्षणाकरीता पाठवू लागले. आज तर प्रत्येक गावामध्ये शाळा आहे त्यामुळे मुलांना शाळेत पाठवितात. इतकेच नाही तर तालुक्याच्या ठिकाणी

किंवा जिल्हयाच्या ठिकाणी उच्य शिक्षणाकरीता ते आपल्या मुलांना पाठवू लागले आहेत. शिक्षणामुळे आपल्या पाल्यांमध्ये होणारा बदल लक्षात धेवून इतरांना देखिल ते शिक्षण घेण्याकरीता प्रवृत्त करीत आहे. उच्य शिक्षणाबाबतही काही प्रमाणात त्यांच्यामधे जाणिव निर्माण होत आहे.

**वैवाहिक जीवनावर झालेला परीणाम:**

आदिवासींच्या विवाह पध्दतीवर शहरीकरणाचा फार मोठया प्रमाणावर प्रभाव पडलेला दिसून येतो. आदिवासींची विवाह पध्दती ही फार साधी आणि आगळी वेगळी होती. अनेक वर्षापर्यन्त व आजही मेळघाट मधील काही ठिकाणी वधुमुल्याची प्रथा आहे. अगदी साध्या पध्दतीने विवाह व्हायचे. कोणत्याही प्रकारचा भपकेपणा नसायचा. आपआपल्या ऐपतीप्रमाणे पाहुण्यांना बोलावून साध्यापध्दतीन त्यांचे स्वागत करून आदिवासी विवाह पध्दतीप्रमाणे विवाह पार पाडायचे. आज मात्र हे चित्र धुसर होतांना दिसते आहे. शहरीकरणाचा आदिवासींच्या वैवाहिक जीवनावर प्रभाव पडलेला दिसतो. आज शहरी विवाहपध्दतींचा शिरकाव आदिवासींच्या वैवाहिक जीवनावर प्रभाव पडलेला दिसतो. आज शहरी विवाहपध्दतींचा शिरकाव आदिवासी समुदायामध्ये झालेला दिसून येतो. आदिवासी आपल्या कुटुंबाची आर्थिक स्थिती बघुन लग्नामध्ये डीजे, बॅन्डपार्टी बोलवितात. लग्नमंडप, झगमगाट, गालीचे, लग्नविधी यांचा सुध्दा परीणाम आदिवासी कुटुंबव्यवस्थेवर दिसून येतो. विवाहानंतर पुरूषसत्ताक व्यवस्थाच बघायला मिळते पुर्वी पितृसत्ताक व्यवस्था असली तरी स्त्रीयांना कुटुंबव्यवस्थेमध्ये महत्वपुर्ण स्थान असायचे परंतू आज शहरी पुरूषसत्ताक व्यवस्थेचा मोठया प्रमाणात शिरकाव झालेला दिसून येतो.

**धार्मिक जीवनावर झालेला परीणाम:**

आदिवासींच्या धार्मिक जीवनावर मोठया प्रमाणात शहरीकरणाचा प्रभाव पडलेला दिसतो. मेळघाटमधिल आदिवासी समूदाय प्रामुख्याने त्यांच्या पारंपारीक पुजा अर्चा, विधी, कर्मकांड करीत होते. त्यांचे पारंपरीक देव खेडा आणि मुठवा यांचे त्यांच्या धार्मिक जीवनात अनन्यसाधारण महत्व होते. कोणत्याही कार्यप्रसंगी ते खेडा व मुठवा देवाची पुजा अर्चा करायचे परंतू आज मेळघाटमधिल कोरकू समूदाय स्वत:चा धर्म विसरून शहरीकरणामध्ये रूजलेले धर्म उदा. हिंदू, ख्रिश्चन, मुस्लिम यांचे मोठया प्रमाणात अनुकरन करायला लागले. या समुदायातील जी लोक ज्या धर्माच्या संपर्कात आली त्या धर्माचा प्रभाव त्या त्या भागातील लोकांवर पडलेला दिसतो. आज अनेक गावांमध्ये हिंदू धर्माची विविध मंदिरं बघायला मिळतात. तर काही गावांमध्ये चर्च देखिल बघायला मिळते, काही ठिकाणी मुस्लिम धर्माचे अनुकरण करतांना सुध्दा पाहयला मिळते. यावरून आदिवासी समुदाय आपला मुळ धर्म सोडून शहरी संपर्कामुळे इतर धर्मियांचे अनुकरण करीत असतांना आढळतो आहे.

**राजकीय जीवनावर प्रभाव:**

आज आदिवासींच्या राजकीय जीवनावर सुध्दा शहरीकरणाचा मोठया प्रमाणात प्रभाव बघायला मिळतो. पुर्वी त्यांचे राजकीय जीवन हे पंचकमीटीपुरते मर्यादित होते. त्यांना कुठल्याही राजकीय पक्षाची ओळख नव्हती. ते व्यक्तीकडे बघून मतदान करायचे. मतदानाची टक्केवारी सुध्दा कमी असायची परंतू आज शहरी समुदायाच्या संपर्कात आल्यामुळे त्यांच्या राजकीय जीवनात परीवर्तन झाले. आज मेळघाटमधील बहुतांश गावांमध्ये अनेक राजकीय पक्षांचा शिरकाव झालेला आहे. पुर्वी अनेक गावातील ग्रामपंचायत सदस्य अनपोज निवडून यायचे. परंतु आज गावांमध्ये वेगवेगळया राजकीय पक्ष समर्पीत उमेदवार उभे रहायला लागले. अगदी शहरी राजकारणासारखे गावचे राजाकरण सुध्दा तापायला लागले आहे. वेगवेगळया राजकीय पक्षाचे सदस्य गावांमध्ये दिसायला लागले.

**सामाजिक जीवनात परीवर्तन :**

आज मेळघाट मधिल आदिवासी समुदायाच्या जीवनमानात वेगवेगळया पध्दतीने परीवर्तन झालेले पहावयास मिळते. हे परीवर्तन होण्यास शहरांचा फार मोठया प्रमाणात वाटा आहे. एकुणच मेळघाटमधिल आदिवासींचे संपुर्ण सामाजिक जीवनमानात बदल झाला आहे. आज अनेक सण, उत्सव जसे शहरांमध्ये मोठया उत्साहात साजरे केले जातात त्याचप्रमाणे मेळघाटमधिल आदिवासीसमुदायामध्ये देखिल तेवढयाच उत्साहाने साजरे करण्यात येते. उदा. गणेश उत्सव, दुर्गाउत्सव, विविध जयंती या सोबतच आदिवासी समुदायातील तरूण तरूणींचे रहाणीमान उदा.

केशभुशा, वेशभुशा, घरांची रचना यावर सुध्दा शहरीकरणाचा मोठा परीणाम दिसून येतो. आज आदिवासींची मनोरंजनाची साधनेसुध्दा बदली. त्यांच पारंपारीक नृत्य नावापुरतेच शिल्लक राहीले. सिनेमातील गाण्यांवर आज आदिवासी तरूण तरूणींचे नृत्य सादर होवू लागले. त्यांच्या खानपाणाच्या सवयींमध्ये सुध्दा परीवर्तन झाले. एकुणच शहरीकरणाच्या संपर्कामुळे आदिवासींच्या सामाजिक जीवनात परीवर्तन झालेल दिसुन येते.

**निष्कर्श:**

संपुर्ण जगामध्ये शहरीकरणामध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे. या शहरीकरणाच्या झगमगाट दुनियेने सर्वांचे डोळे दिपवून टाकले आहे. त्याला मेळघाटमधिल आदिवासी कसा अपवाद असेल? आज राजकारणाचा प्रभाव आदिवासींच्या जीवनातील प्रत्येक घटकांवर झालेला दिसून येतो. परंपरागत व्यवस्थेत जगणाऱ्या आदिवासींची कदाचित ही शेवटची पिढी असेल. अनेक आदिवासी तरूण तरूणींना त्यांचे प्रमुख दैवत माहित नाही. पुजा अर्जा कर्मकांड, विधि, माहिती नाही. वेगवेगळया धर्मांचे अनुकरण करावयास लागले आहे. त्यांची सांस्कृतिक साधणे व माध्यमे बदलली आहे. विवाह विधी बदलले, सण उत्सवांमध्ये बदल झाला. भौतिकवादानी आदिवासी जीवनात प्रवेश केलेला दिसून येत आहे. आणि यामध्ये सातत्यांने वाढ होतांना दिसत आहे. एकूणच काही कालावधीत आदिवासी संस्कृतीचा लोप होवून एक नव शहरीकरण संस्कृतीचा उदय होईल असे वाटते.

**संदर्भग्रंथ सूची:**

१.लोटे रा. ज. (२०१०) आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर ४४००३२.
२. कऱ्हाडे बी. एम. ग्रामिण व नागरी समाजशास्त्र पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर ४४००३२.
३.खडसे भा. की. (१९९९) सामाजिक मानवशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, श्री शांता दुर्गा निवास २३, नवी रामदास पेठ नागपूर ४४४००९०
४. N. Jayaplan (2002) “Urban Sociology”, Atlantic Publishers and Distributors New Delhi
५. Govt of India “Maharashtra Development” Report 2007
६. UNDP – Human Development Report – 2005
७.मानव संसाधन विकास अहवाल २००५

# संत तुकारामाच्या मनातील अंतर्बाहय संघर्ष

प्रा.डॉ.गणेश भि. मोहोड
वाणिज्य भाषा प्रमुख
नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज कारंजा (घाडगे) जि.वर्धा
Email- ganeshmohod5@gmail.com,Mob. 9923738920

**गोषवारा (Abstract)**

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संपूर्ण महाराष्ट्राच्या व मराठी माणसाच्या मनावर अनेक शतकांपासून अधिराज्य गाजविण्याचे कार्य संतानी केलेले आहे. सांस्कृतिक, मानसिक, बौध्दिक, धार्मिक व भाषिकदृष्टया महाराष्ट्राच्या व मराठी माणसाच्या जडणघडणीचा ताना आणि बाना विणण्यात वारकरी पंथाचे व वारकरी संतांचे व त्यांच्या अभंग वाङमयांचा सिंहाचा वाटा आहे. हे कोणालाही मान्यच करावे लागेल. संतांच्या साहित्याचा व विचारांचा जबरदस्त पगडा प्रत्येक मराठी मनावर आहे. "ज्ञानदेवे रचिला पाया, उभारिले देवालया ।। तुका झालासे कळस । भजन करा सावकाश । या ओव्या बरेच काही सांगून जातात. वारकरी संप्रदायात संत ज्ञानेश्वरापासून सुरु झालेल्या सारस्वतांच्या या इमारतीचा कळस होण्याचे भाग्य संत तुकारामांना लाभले आहे.

ज्ञानदेव—तुकाराम यांचे सर्वच काव्य ही सुर्वण रत्नांची खाणच आहे. ज्ञानदेव—तुकाराम या थोर संतानी महाराष्ट्रात धार्मिक परिवर्तन करुन जे भक्तियुग सुरु केले ते एक प्रकारचे क्रांतिकारक प्रबोधनयुगच होते. संत तुकारामांचे लौकिक जीवन, त्यांना करावा लागलेला कठोर भावनिक, मानसिक संघर्ष, संपूर्ण कुटुंबाची झालेली वाताहत, कुटुंबाची झालेली अन्नान्न दशा. नियतीने लवकरच त्यांचा सुखी संसार संपविला. अगदी विशी—बावीशीच्या आतच त्यांचे उध्दवस्त झालेले प्रापंचिक जीवन, पत्नी, मुलाचा डोळयादेखत झालेला मृत्यू, भयंकर व दीर्घकाळ पडलेला दुष्काळ, यात झालेला कर्जबाजारीपणा,आत्पस्वकीयांनी तोडलेले संबंध या सर्वातून तुकाराम तावून सुलाखून निघाले. तुकारामच्या जीवनात आलेल्या या खाचखळग्यांमुळे त्यांना आलेले अनुभव त्यांनी आपल्या अभंगामध्ये अतिशय प्रभावीपणे व प्रभावी शब्दांमध्ये मांडलेले आहे. रात्रंदिवस आम्ही युध्दासारख्या प्रसंगाचा सतत सामना करीत आहोत असे ते म्हणतात.

**बीजशब्द (Key Words)**—

महाराष्ट्र,संतसाहित्य, वारकरी, संत,अभंग, तुकाराम, शब्दांचे,दुर्देवी,मौलिक, जीवन, रात्रंदिवस, लढा, तुकोबा, संसार, दुःख, प्रतिभा, कवित्वशक्ती, काव्य, अंतर्बाहय,भूमी, सत्पुरुष, लौकिक.

**प्रस्तावना**—

महाराष्ट्र भूमीला संतांची फार मोठी परंपरा लाभलेली आहे. म्हणूनच महाराष्ट्राला संतांची "पवित्र भूमी" असे संबोधण्यात येते. या भूमीमध्ये होऊन गेलेल्या अनेक संतांनी अतिशय सकस अशी साहित्य निर्मिती केलेली आहे. संतांनी निर्माण केलेली साहित्य संपदा अजरामर झालेलीदिसून येते.अनेक शतकांअगोदर निर्मित झालेल्या साहित्य संपदेची गोडी इतकी अविट आहे की, जागतिकी—करणामध्ये जन्माला आलेल्या नवीन पिढीलाहीया संतांच्या साहित्याचे प्रचंड आकर्षण आहे, नव्हे ते मोठया प्रमाणात दिवसेंदिवस वृध्दिंगत होत आहे.

"संत या शब्दाचा सामान्य अर्थाने "साधुपुरुष" किंवा "सत्पुरुष" असा वापर समाजात आपण करीत असलो तरी त्या शब्दाचा विशिष्ट अर्थ वेगवेगळया संदर्भात वेगवेगळा असल्याचे अभ्यासाअंती आपल्याला दिसून येतो.

साक्षात्कारी सत्पुरुष, समाजाला अज्ञानाच्या अंध:कारातून बाहेर काढणारा, समाजाला सतत मार्गदर्शन करणारा अधिकारी सत्पुरुष, संप्रदाय प्रवर्तक सत्पुरुष, वेगवेगळया संप्रदायाला उर्जित तत्वज्ञान देणारे सत्पुरुष, ग्रंथलेखन करणारे, मध्ययुगीन कालखंडात वाङमय निर्माण करणारे साक्षात्कारी अशा सत्पुरुषांना "संत"हा शब्द वापरण्यात येतो.महाराष्ट्रातील वारकरी संप्रदयात तर संताची मोठीच मांदियाळी निर्माण झालेली दिसून येते. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत

ISSN : 2278-9308
July 2021

एकनाथ,संत तुकाराम आणि त्यांच्या प्रभावळीतील सर्वच संत सत्पुरुषांचा समावेश यात होतो. वारकरी संप्रदाया बरोबरच इतरही संप्रदायात किंवा पंथात मोठया प्रमाणात संताची मांदियाळी आहे.

१३ व्या शतकापासून तर अठराव्या शतकापर्यंत मराठीभाषेतील साहित्यनिर्मिती प्रामुख्याने संतानी केलेली आहे, असे दिसून येते. संत ज्ञानेश्वर ते संत तुकाराम अशी ही समृध्दपंरपरा आहे. संत ज्ञानेश्वरांनी तर मोठीच समृध्द व सकस अशी वाङमय निर्मितीची देणगी दिलेली आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम तर संत निळोबापर्यंत संत साहित्याचा वारसा अतिशय समृध्द झाला आहे.

संत साहित्य म्हणजे या संत सत्पुरुषांनी निर्माण केलेले जे साहित्य ते होय. मध्ययुगीन मराठी साहित्य सृष्टीतील संतसाहित्य हे वाङमयप्रकारानुसार किंवा कविप्रकृती नुसार वेगळे काढता येत नाही. उपलब्ध सर्व संत साहित्याच्या आधारे त्याचे आशयदृष्टया काही वैशिष्टये सांगता येऊ शकतात. प्रामुख्याने भक्ती, वैराग्य, तत्वज्ञान, नीती, सदाचार, सद्वर्तन याच विषयाच्या संदर्भात संतसाहित्याची निर्मिती झालेली दिसून येते. गुणवत्तेच्या निकषांचा विचार करता या विषयांवर आजपर्यंत मराठीत जे जे साहित्य निर्मिती झाली त्यात प्रामुख्याने समाजाबद्दल तळमळ, जिव्हाळा, उत्कटता या सर्वच बाबतीत संतसाहित्य अतिशय सरस आहे. त्यामुळे संतसाहित्य हे मनात घर करुन बसते.

मराठीतील संतसाहित्य म्हणजे महाराष्ट्र शारदेच्या मुकुटातील सर्वात तेजस्वी व श्रेष्ठ हिरा होय. हे संतांचेसाहित्य शतकानुशतके मराठी जनतेच्या मनात व ओठावर साम्राज्य करीत आहे. या साहित्याला सुभाषितांची गोष्ट प्राप्त झाली आहे. आजही लोक या वाणीला श्रध्दापूर्वक आपल्या अंत:करणात जतन करीत आहेत. तिच्यात मायेचाओलावा आहे. परमेश्वरप्राप्तीची उत्कटता आहे, समाजोध्दाराची तळमळ आहे. भावनांचे उमाळे आहेत, ऋषींचा द्रष्टेपणा आहे. वाणीचा सहज सुंदर गोडवा आहे. माऊलीची आर्तता आहे. विश्वाला ओलाचिंब करणारा प्रेमळपणाचा ओलावा आहे. तात्पर्य सर्व मांगल्याचे अधिष्ठान असलेली, सर्वभूतमात्रांना पोटात सामावून घेणारी कणव आहे. तेजस्वी तशीच सुकोमल अशी संतांचीवाणी ही मराठीभाषेचे चिरंतर चकाकणारे अपूर्व असे भूषण आहे. संतसाहित्य म्हणजे अविवेकाची काजळी फोडून विवेकाचा दीप सदोदीत तेजस्वीपणे प्रज्वलीत ठेवणारा अमूल्यठेवा होय.

वारकरी पंथाने व त्यातील संत प्रभावळीने हा अमूल्य ठेवा मराठी भाषेला व साहित्याला भरभरुन दिला आहे. वारकरी संप्रदायाच्या प्रारंभालाच संत ज्ञानेश्वरांनी “ज्ञानेश्वरी” सारखा अलौकिक ग्रंथ संप्रदायाला देऊन भक्कम पायावर ही इमारत उभी केली. पुढे या ज्ञानरुपी मंदिराचा कळस होण्याचे भाग्य संत तुकारामांना प्राप्त झाले.

संतकृपा झाली । इमारत फळा आली ।
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।।
नामा तयाचा किंकर । तेणे केला हा विस्तार ।।
जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ।।
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।

वरील अभंगातून संत तुकारामाचे वारकरी संप्रदायातील महत्व सहज लक्षात येते. संत तुकारामाने सर्व काव्य हे सुवर्ण रत्नांची खाणच आहे.

धर्माचे पालण । करणे पाषांड खंडण ।।
हेचि आम्हा करणे काम। बीज वाढवावे नाम ।
तीक्ष्ण उतरे । हाती घेऊनि बाण फिरे ।।
नाही भीडभार । तुका म्हणे साना थोर ।।

वरील अभंगातून संत तुकारामानी धर्माचे पालन करणे, म्हणजेच समस्त समाजातील पाखंड, पाप, कुकर्म, वासना या सर्वाचा नाश करणे होय आणि यासाठी काय काय कर्म केले पाहिजे ते सांगीतले आहे. वरील अभंगात त्यांच्या कार्याचे बरेचशे विचारधन प्रकट झालेले आहे. त्याच्या अंतरीची उत्कट भावोर्गी आशयघन रुपाने प्रकट होते. त्याच्या काव्याचे हेच मर्म आहे. म्हणूनच त्यांच्या काव्याला सुभाषितांचे रुप, प्राप्त झालेले दिसते.

आम्हां घरी धनं शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्न करु ।।१।।

शब्दचि आमुच्या जीवाचें जीवन । शब्दें वाटूं धन जन लोका ।।२।।

तुका म्हणे पाहा शब्दचि हा देव । शब्देंचि गौरव पूजा करुं ।।३।।

या त्यांच्या अभंगातून आमचे घरी शब्दरुपी धन आहे. आणि तेच धन आमचे रत्ने आहे. रत्ने जसे चमकदार असते व आपल्या तेजाने संपूर्ण परिसर उजळून टाकते तसे आमच शब्दरुपी रत्ने ज्ञानरुप तेज निर्माण करते. या शब्दरुपी रत्नांचे । धनाचीच आम्ही प्रयत्नपूर्वक शस्त्रे करु तसेच हेच आमच्या जीवाचे जीवन आहे. शब्द हे धन असून तेच आम्ही जनलोकात वाटणार आहे. शब्द हाच देव आहे. अशा शब्दरुपी देवाची पूजा आम्ही शब्दांनीच गौरव करुया. संत तुकारामानी शब्दांची पूजा बांधली आहे. शब्दांचे महात्म सांगितले आहे. शब्दांचे सामर्थ्य, शब्दांचा आवाका, शब्दाची व्याप्ती वर्णन केला आहे.

हजारो वर्षापासून अज्ञानाच्या अंधःकारात खितपत पडलेल्या सुस्त समाजाला त्यांनी एक ज्ञानाची दिशा दाखविलेली आहे. डॉ.रा.स.गाडगीळ लिहितात, “सतराव्या शतकात महाराष्ट्रामध्ये एकाच कालखंडात तीन महापुरुष होऊन गेले. छत्रपती शिवाजी महाराज, संत रामदास आणि देहू येथील संत तुकाराम (जन्म १६०८).विठ्ठल मोरे हे यांचे कुलदैवत होते. साहित्य क्षेत्रात संत ज्ञानेश्वरानंतर एवढा महान युगपुरुष तुकारामांशिवाय दुसरा कोणी झाला नाही.

प्रारंभ काळात वडीलांच्या सांगण्यावरुन परंपरेने चालत आलेला व्यापारउद्दीम तुकोबांनी अत्यंत चोखपणे, प्रामाणिकपणे चालविला.“जोडोनिया धन उत्तम वेव्हारे” हा प्रस्तूत अभंग लेखाच्या शीर्षस्थानीच उदधृत केला आहे. या अभंगातून तुकारामांच्या अगदी वेगळया वैशिष्टयपूर्ण व्यक्तीमत्वाचे दर्शन होते.पण नियतीनेलवकरच त्यांचा सुखी संसार संपविला. अवघ्या विशी—बावशीच्या आतच त्यांचे प्रापंचिक जीवन उद्ध्वस्त झाले. माय—बाप सोडून गेले. पहिली पत्नी गेली, मुलगा गेला, भीषण दुष्काळाने शेती बुडाली, सावकाराकडून कर्ज काढून काही दिवस काढले. पुढे कर्जही मिळेना, जवळचे स्नेही—सोबतीही फिरकेनासे झाले. या सर्व आपत्तिजनक परिस्थितीने प्रापंचिक जीवनावरील त्यांचा विश्वास उडाला. आश्चर्य असे की, या सर्व दुर्देवी घटना तुकारामांनी काव्यरुपात मांडल्या आहेत. समाजच्या सामान्य प्रवत्तीचे त्यांनी चार—दोन ओळीतच अंत्यत प्रभावी चित्रण केले आहे.

धनवंतालागी । सर्व मान्यता आहे जगीं ।।

जवं मोठा चाले धंदा । तवं बहिण म्हणे दादा ।।

सदा शृंगार भूषणें । कांता लवे बहुमाने ।।

सामान्य मानवाचीही मूलभूत प्रवृत्तीच आहे, हे व अशी अनेक मौलीक चिरंतन सत्ये तुकाराम आपल्या कित्येक अभंगातून सांगतात. त्यांचा अशा कसदार विधानांना सुभाषितांचे रुप लाभले ते यामुळेच” [१]

संत तुकारामाच्या लौकिक जीवनात मोठमोठी संकटे आलीत. महापुराने अनेक मोठ मोठी वृक्षे उन्मळून पडतात. मात्र मान टाकणारी लव्हाळी पुन्हा उभी होते, ती जीवंतच राहते. संत तुकाराम मात्र लौकिक जीवनात पूर्णपणे कोसळलेले दिसते. म्हणून त्यांनी परमेश्वराला शरण जाण्याचे निर्धारितकेले. त्यांचे संपूर्णच जीवन अत्यंत खाचखळग्यांचे खडतर असल्यामुळे या खाच खळग्यामुळे त्यांना संपूर्ण जीवनात आलेले अनुभव त्यांनी आपल्या अभंगामध्ये अतिशय प्रभावीपणे व अतिशय प्रभावी शब्दांमध्ये शब्दबध्द केलेले आहे.

रात्रंदिन आम्हां युध्दाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ।।

जीवा ही आगाज पडती आघात । येऊनिया नित्य नित्य करी ।।

तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळे । अवघियांचे काळे केले तोंड ।।

रात्रदिवसं आम्ही युध्दासारखा प्रसंगाचा सतत सामना करीत आहोत. आतील आणि बाहेरील जगाशी व आपल्या मनाशी देखील जीवावर जे आघात होत आहेत त्याचं हे ईश्वरा तू येऊन पुन्हा पुन्हा निवारण करतो आहेस परमेश्वराला ते म्हणतात, तुझ्या एका नामस्मरणाच्या बळाने हया सर्व वाईट गोष्टींच तोंड आम्ही काळं करुन टाकलं आहे. संत तुकारामांचे संपूर्ण जीवन हा एका संघर्षाचीच कहाणी आहे. सुरवातीच्या २०—२१ वर्षे त्यांचा जीवनात फारसी संकटे नव्हती. पण पुढेपुढे एकेक आपत्ती येत गेली. नियतीच्या वेगवान

लाटेनं तुकारामांच्या आयुष्यात प्रचंड उलथापालथ होत गेली. सार घर व आयुष्य धुवून निघालं. हे सर्व दुर्दैवी आघात झेलता झेलता तुकाराम अंतर्मुख होत गेले. आत्मचिंतन करु लागले. या विषयी निर्मलकुमार फडकुले आपल्या लेखात लिहितात "विचारशील माणसाच्या मनातल्या वैचारिक आणि भावनिक संघर्ष तीव्र अतो.वावटळीत (खांदपान) गिरक्या घेत रहावं तशी अवस्था तुकोबांची झाली. परमार्थाच्या दिशेने त्यांच्या मनानं झेप घेतली. साऱ्या सुखदु:खांच्या पलीकडं जाण्याची ओढ त्यांच्या मनाला लागलेली होती. पंख झेप घेऊ पाहात होते, पण पाय मात्र जमिनीशी बांधलेले होते. या प्रकारचा अटीतटीचा संघर्ष प्रत्येक मुमुक्षूच्या मनात नेहमीच होत असतो. विशेष म्हणजे ज्या नानाविध संघर्षाना त्यांना तोंड द्यावं लागलं ते संघर्ष अनेक पातळयांवरचे होते. त्याचं स्वरुप गुंतागुतीचं होत. तुकोबांच्या जागी दुसरा एखादा दुबळा माणूस असता तर तो केव्हाच खचून गेला असता. पुन्हा उभा राहिला नसता पण, सर्व प्रकारचे आघात सहन करीत हा वीर पुरुष चालतच राहिला. जो आपल्या अंत:करण प्रवृत्तीला पटेल तेच तो करीत राहीला."[२]

संत तुकारामाचा लढा हा जेवढा स्वत:च्या मनाशी आहे तेवढाच तो बाहय जगताशीही आहे. बरेचदा आजूबाजूला पसरलेला स्वार्थी जग व केवळ रोटी, कपडा व मकान यालाच सर्वस्व मानणारे सर्वसामान्य संसारी लोकं तुकोबांसारख्या महान ध्येयवादी संत सत्पुरुषाला ओळखूच शकले नाही. सर्वस्व लुटलेला एक सर्वसामान्य शुल्लक संसारी पुरुष एवढीच काय ती तुकोबांची किंमत या स्वार्थी, हिशेबी व तकलादू जगाच्या लेखी त्यांची होती. तुकारामाच्या जवळ असलेली श्रेष्ठ प्रतिभा व संतत्व या स्वार्थी जगाला दिसूनच शकले नाही, खरी खंत हीच वाटते. तुकोबामध्ये असलेले संतत्व व श्रेष्ठतम कवित्व या जगाला पारखताच आले नाही. स्वत:ला पंडित म्हणून घेणाऱ्या तथाकथीतांत तुकारामाचे सर्वच बाबतीत असलेले मोठेपण, श्रेष्ठत्व ओळखताच आली नाही. त्यामुळे त्यांचेकडून मोठया प्रमाणात झालेला मानसिक अवहेलनाही तुकोबांना सहन करावी लागली.

तुकारामाचे लौकिक जीवन हे अनेक अभावांनी भरलेल होते. परंतु ते या अभावांनी कोलमडून पडले नाहीतर सत्वशोधनाची संधी म्हणूनच त्यांनी या अभावांकडे पाहिले. या विषयीपुढे डॉ.निर्मलकुमार फडकुले लिहितात, "प्रत्येक संताला, क्रांतीकारकाला, महापुरुषाला पराभावाचे चटके सहन करावे लागतात. पण तो पराजयातूनही आत्मविजयाकडे निग्रहांनवाटचाल करीत राहातो. संघर्ष केल्याशिवाय मोठेपणा प्राप्त होत नाही. केवळ अपघातानं आलेला तात्पुरता मोठेपणा अल्पकाळ टिकतो. ज्ञानेश्वर— तुकारामांसारखे महनीय संत हे आंतरिक आणि बाहय संघर्ष करीत महानतेच्या ध्रुवताऱ्यापर्यंत पोहोचलेले आहेत, हे लक्षात घेतलं पाहिजे."

तुकारामाचे वेगळपण असे आहे की, ते बऱ्याच काळापर्यंत म्हणजे संसार थाटेपर्यंत म्हणजे लग्न, मुले होईपर्यन्त तरी परमार्थ मार्गात असल्याचे दिसून येत नाही. त्यांच्या "सवंसारे जालो अतिदु:खे । मायबाप सखी क्रमिलिया ।।१३३३।।

या तुकारामाच्या उद्‌गारावरुन त्यांना संसाराच्या दु:खाचे भान प्रथमच आले असावे. कारण तो पर्यत संपूर्ण सांसरिक जबाबदाऱ्या कदाचित त्यांच्यावर पडलेली नसावी. त्यांच्या व्यावसायिक जीवनाचा आरंभ मातापिता हयात असल्यापासूनच झालेला असावा. आपण शुद्र वर्णाचे व वंशाचे तसेच जातीने कुणबी किंवा यातिहीन असल्याचे अनेक उल्लेख त्याच्या अनेक अभंगात आढळतात. खरे तर ते आपले चरित्र सांगतात ते वाण्याच्या व्यवसायात पडल्यापासून.

"जातीचे वाणी मी पोटींचे कुडें । नका मजपुढे ठकाठकी ।। १८५९

असा आपल्या जातीचा व व्यवसायाचा स्पष्ट उल्लेख ते करतात. माप, टाळी, सळ धरिली विठ्ठल" "बरें जालें देवा निघाले दिवाळे " (१३३५) असे ऐक ना अनेक उल्लेख त्यांच्या अभंगात येतात. या व्यवसायाच्या जोडीलाच त्यांनी कुणबीच असल्याने कुणब्याचा जो शेती व्यवसाय आहे. तोही त्यांनी मनापासून केलेल्याचे अनेक उल्लेख त्यांच्या अभंगात दिसते. "२८३५ या क्रमांकाच्या अभंगात "लक्ष्मी मदे माते घडले महादोष" असे त्यांनी म्हटले आहे. त्यावरुन त्यांच्या धनसंप्पनतेची आणि सुखासीन आयुष्याची पुसटशी कल्पना येण्याजोबी आहे. "दुष्काळे आटिले, द्रव्यें नेला माल (१३३३) सहज सरले होते कांही ।

द्रव्य थोडे बहु ते ही (१३३४) असा द्रव्याचा आणि प्रतिष्ठेचाही जो उल्लेख येतो तोही त्यांच्या त्यावेळेच्या सुस्थितीचा द्योतक म्हणावा लागेल."[३]

त्यांच्या आई—वडीलांच्या मृत्यूनंतर लागलीच मोठा दुष्काळ पडला. या दुष्काळाने पार दैना करुन टाकली. होती नव्हतीती धनदौलत गेली. जीवनाची अन्नान्न दशा झाली. त्यातच पत्नी, मुलगा व जन्मदात्री आई—बाप गेले. संपूर्ण जीवनाचीच वाताहत झाली. पुन्हा दुष्काळ पडला तो बरेच वर्ष टिकला. पैसा अडका संपतो, गुरेढोरे मरतात. संपूर्ण कुटुंबाचेच दिवाळे निघते. मद चढावा वा प्रतिष्ठितपणा मिळावा ऐवढे द्रव्य आपल्या कुटूंबाकडे होते, असे तुकाराम स्वत:च सांगतात. म्हणजे ऐवढी धनसंपन्नता व प्रतिष्ठाही असतांना एखाद्या कुटूंबाची अन्नान्न दशा व्हावी, ही काही साधी गोष्ट नसते.आत्मस्वकीय व जीवलगांचा मृत्यू झाल्यानंतर काही ठिकाणी तुकाराम वरवर तठस्थ असल्यासारखे बोलतात पण त्या त्यांचा बोलण्यातले दु:ख, वेदना काही लपत नाही. ते व्यक्त होतात.

बाईल मेली मुक्त जाली। देवे माया सोडविली ।।
पोरे मेलें बरे जालें । देवे मायाविरहीत केले ।।
माता मेली मज देखता । तुका म्हणे हरली चिंता ।। ७७८

वरील तुकारामाचे उद्‌गार काही सुख समाधानाचे नाही. वरील दु:खद घटना ज्या काळात घडल्या त्या काळात तुकोबांची प्रतिभा बहरली नव्हती, की, त्यांच्यातील कवित्वशक्ती जागृत झाली नव्हती. परंतू मनाची संवेदनशीलता मात्र जागृत झाली होती. त्यांच्या जीवनात घडलेली एकेक घटना त्यांच्या अंत:करणावर कोरली जावी अशी संवेदनशीलता त्यांच्या जवळ नक्कीच होती.

याती शुद्र, वैश्य केला वेवसाय । आधी तो हा देव कुळपुज्या ।।
नये बोलो परि पाळिले वचन । केलियाचा प्रश्न तुम्ही संती।।
सवंसारे झालो अतिदु:खे दु:खी । मायबापे सेखी क्रमिलिया ।।
दुष्काळे आटिले द्रव्य नेला मान । स्त्री एकी अन्न अन्न करिता मेली ।।
लज्जा वाटे जीवा त्रासलो या दु:खे । वेवसाय देखे तुटी येता ।।
देवाचे देऊळ होते जे भंगले । चित्तासी ते आले करावेसे ।।
आरंभी कीर्तन करी एकादशी । नव्हे अभ्यासी चित्त आधी ।।
काही पाठ केली संताची उत्तरे । विश्वास आदरें करोनिया ।।
गाती पुढे त्याचे धरावे धृपद । भावे चित्त शुध्द करुनिया ।।
संतांचे सेविले तीर्थ पायवणी । लाज नाही मनी येऊ दिली ।।
ठाकला तो काही परउपकार । केले हे शरीर कष्टऊनी ।।
वचनें मानिली नाही सुहृदयाची । समूळ प्रपंची वीट आला ।।
सत्य असत्यासी मन केले ग्वाही । मानियेले नाही बहुमता ।।
मानियेला स्वप्नी गुरुचा उपदेश । धरिला विश्वास दृढ नामी ।।
यावरी या झाली कवित्वाची स्फुर्ती । पाय धरिले चित्ती विठोबाचे ।।
निषेधाचा काही पडिला आघात । तेणे मध्ये चित्त दुखविले ।।
बुडविल्या वहया बैसलो धरणे । केले नारायणे समाधान।।
विस्तारी सांगता बहुत प्रकारा । होईल उशीर आता पुरे ।।
आता आहे तैसा दिसतो विचार । पुढील प्रकार देव जाणो ।।
तुका म्हणे माझे सर्व भांडवल । बोलविले बोलं पांडूरंगे ।।

या संपूर्ण अभंगामध्ये तुकारामाचे संपूर्ण चरित्रच आलेले दिसते. अगदी सुरवातीच्या दु:खद घटनापासून तर कवित्वशक्ती पर्यंत संपूर्णच लेखाजोखा त्यांनी मांडलेला आहे. यात त्यांची संवेदन शीलताही प्रकट होते. काही दु:खांचे ओरखडे त्यांच्या वाणीत सतत प्रकट होतांना दिसते. संवेदनशीलता आणि तटस्थता यांचा एक सहज समन्वय साधलेला दिसून येतो. म.सु.पाटील आपल्या "तुकाराम अंतर्बाहय संघर्षाची अनुभवरुपे " या ग्रंथात लिहितात, "तुकाराम हे मुख्यत:

भावकवी आहेत. त्यांच्या अभंगातून त्या त्या वेळची त्यांची भाववृत्ती ऐकेका अस्तित्वावस्थेच्या स्वरुपात साकार करतात. त्यांचे अंभगलेखन अस्तित्वलक्ष्यी कृतीसारखे असते. तिचा अगदी फिका प्रत्यय अशा कथनपर अभंगात येतो,तो त्यांना असलेल्या भाववृत्तीचा कोंदनामुळे त्या सोसलेपणाच्या खुणा आहेत पण शोक उरलेला नाही. याचा अर्थ हे कथन भावशून्य आहे असा नाही. त्याला निर्वेद या भावाचे कोंदण लाभलेले आहे. आपण कोणी मोठे आहोत याचे साधे भानही येथे नाही." [४]

**निष्कर्ष :—**

१. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, मानसिक, बौध्दिक, धार्मिक व भाषिक जडण—घडणीत वारकरी पंथ व संताचे मोठेच योगदान आहे.
२.वारकरी संप्रदायातील संतांनी अतिशय सकस अशी साहित्य निर्मिती केली आहे.
३.मध्ययुगीन मराठी साहित्यसृष्टीतील संत साहित्य हे वाङमय प्रकारानुसार किंवा कवि प्रकृतीनुसार वेगळे काढता येत नाही.
४.तुकारामाच्या साहित्याला सुभाषितांचा दर्जा प्राप्त झाला आहे.
५.संत तुकारामाच्या लौकिक जीवनात संकटांची मालिकाच सुरु होती.
६.संत तुकोबांचा लढा हा जेवढा स्वत:च्या मनाशी होता, तेवढाच तो बाहय जगताशीही होता.
७.संत तुकोबांजवळ असलेली श्रेष्ठ प्रतिभा व संतत्व या स्वार्थी जगाला पारखता आली नाही.
८.संवेदनशीलता आणि तठस्थता यांचा एक सहज समन्वय तुकोबांच्या जीवनात व साहित्यात दिसून येतो.

**संदर्भ—**

१. डॉ.रा.स.गाडगीळ — मराठी काव्याचे मानदंड — खंड पहिला — पृ.९४, ९५
२. निर्मलकुमार फडकुले — संत तुकारामाचे अभंग — पृ. २१, २२ (शब्दसाधना—१)
३. म.सु.पाटील — तुकाराम अंतर्बाहय संघर्षाची अनुभवरुपे — पृ. २
४. .म.सु. पाटील — तुकाराम अंतर्बाहय संघर्षाची अनुभवरुपे — पृ.३ व ४

**संदर्भ ग्रंथसूची—**

१. डॉ.रा.स.गाडगीळ, मराठी काव्याचे मानदंड खंड पहिला, पद्मगंधा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २०नोव्हे. २००५.
२.डॉ. कल्याण काळे, रा.शं. नगरकर (संपादक) संत साहित्य:अभ्यासाच्या काही दिशा, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, १९६२.
३.म.सु.पाटील , तुकाराम अंतर्गत संघर्षाची अनुभवरुपे, शाब्दल प्रकाशन १, आवृत्ती पहिली, २० जून २००४.
४.डॉ. इंद्रजित ओरके व इतर (संपादक), शब्दसाधना—भाग १(लेख — संत तुकारामांचे अभंग — निर्मलकुमार फडकुले, राघव पब्लिशर्स अॅन्ड डिस्ट्रीब्युटर्स नागपूर, प्रथम आवृत्ती—२०२०.
५.डॉ. शरयु तायवाडे, डॉ. राजेन्द्र वाटाणे, डॉ. कोमल ठाकरे (संपादक), युगप्रर्वतक संत तुकाराम रामदास, विजय प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती, २२ डिसे.२०१०.
६.डॉ.बी.एन.पाटील, प्राचीन महाराष्ट्र वाङमयवैभव, प्रशांत पब्लीकेशन, जळगांव, प्रथमावृत्ती२००९.
७.गं.बा.सरदार, संत वाङमयाची सामाजिक फलश्रृती, लोकवाङमय गृह, मुंबई, आवृत्ती ८ वी, २०१०.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# भगवानदास मोरवाल के उपन्यासोंमें धार्मिक प्रभाव

डॉ. डिंपल सुरेश पाटिल
(विभाग प्रमुख)कला वाणिज्य और गृह विज्ञान महिला महाविद्यालय, जलगांव
ई मेल –patildimpal23@gamail.com,Mo.no. 7030172949

देश मे सांस्कृतिक एवम् सामाजिक जीवन में आदिकाल से ही धर्म का विशिष्ट महत्व रहा है| धर्म किसीभी संस्कृति का प्रमुख तत्व होता है| बुद्धी के बल पर मनुष्य अपने जीवन मे सुधार करता रहा है| परंतु बादमे उसे महसूस होने लगा कि प्रकृति और मनुष्य जीवन को नियंत्रित करने वाली कोई दिव्य शक्ती है| इस शक्ति की कृपा हमेशा बनी रहे साथ ही यह जीवनक्रम सुव्यवस्थित चलता रहे इस भावना से धर्म संकल्पना का निर्माण हुआ है| डॉ. रक्षापुरी के अनुसार "देश के सांस्कृतिक एवं सामाजिक जीवन में आदिकाल से ही धर्म का विशिष्ट महत्व रहा है| इस धर्म का बुद्धी पक्ष जहा एक ओर दर्शन से संबंध रहा है वहा दूसरी ओर उसका भाव पक्ष आचार व क्रियाकलापो से संबंधित रहा है"1धर्म भारतीय संस्कृति और दर्शन की प्रमुख संकल्पना है। 'धर्म' धब्द का पश्चिमी भाषाओं में कोई तुल्य शब्द पाना बहुत कठिन है। साधारण शब्दों में धर्म के बहुत से अर्थ हैं जिनमें से कुछ इस प्रकार हैं - कर्तव्य, अहिंसा, न्याय, सदाचरण, सद्‌गुण आदि। धर्म संस्कृत भाषा का शब्द हैं जो कि धारण करने वाली 'धृ' धातु से बना हैं।

वर्तमान काल मे धर्म का स्वरूप बदलकर राजनीतीज्ञो ने इसेओर ही मोड दे दिया| पहले नैतिकता और मूल्य को धर्मव्यवस्थाकी'रीढ की हड्डी' माना जाता था| धर्म का मुख्य कार्य व्यक्ति और समाज को अनुशासन पूर्ण जीवन जीने के लिए प्रेरित करना था| परंतु समय के साथ साथ धर्म का उदात्त स्वरूप सडीगली रूढी या जीर्णशीर्ण परंपराओ आडम बरो शास्त्र और धर्म के ठेकेदारोने इसे विकृत बनाकर रख दिया| धर्म के नाम पर व्याप्त ढकोसलेबाजी, धर्माचारो स्वार्थी मनोवृत्ती, धार्मिक स्थान पर होने वाले अनाचार एवम् अत्याचार आदि ने इस क्षेत्र में कई तरह की विसंगतीयों को जन्म दे दिया है| इस संदर्भ में डॉ.राधाकृष्णन के विचार कितने सार्थक है "विचारों की कोई भी गंभीर साधना विश्वासों की कोई भी खोज सद्‌गुणों के अभ्यास का कोई भी प्रयत्न यह सब उन्हीं स्त्रोतों से उत्पन्न होते हैं जिनका नाम धर्म है|"2 आज धर्म के नाम पर अनेक समस्याओं ने जन्म ले लिया है, मोरवाल ने धर्म के बदलते स्वरूप के कारण निर्माण होने वाली समस्याओं को अपने उपन्यासों में चित्रित किया है| धार्मिकता के संदर्भ में यह कहना उचित होगा कि वास्तव में धर्म और धार्मिकता अपने आपमें अलगअलग अर्थों को अभिप्रेत करते हैं व्याकरण की दृष्टि से धर्म संज्ञा है तो धार्मिकता विशेषण है विश्व में अनेक धर्मों का प्रचलन है और हर विद्वान अपने अपने धर्म को खुद के भावनिक बौद्धिक प्रथाओं और आस्था के अनुसार संप्रेषित करता है| इसीलिए धर्म के अर्थ ग्रहण में अनेक विसंगतियां पाई जाती है| इस संदर्भ में अमेरिका के जॉन डूबी का कथन महत्वपूर्ण है उन्होंने अपने ग्रंथ 'कॉमन फेथ'में यह स्पष्ट किया है कि "किसी स्थाई महत्व के आदर्श लक्ष्य में दृढ विश्वास के आधार पर व्यक्तिगत नुकसान खतरे को सहते हुए और बाधाओं का सामना करते हुए की गई किसी भी गतिविधि का चरित्र धार्मिक है"3

भगवानदास मोरवाल के काला पहाड़, बाबल तेरा देस में, तथा हलाला उपन्यासों में हिंदू और मुस्लिम धर्म से जुड़े साझे रीति-रिवाजों, उत्सवों, पर्वो, और उनकी आस्थाओं का वर्णन करते हैं| उन्होंने प्रमुख रूप से हिंदू मुस्लिमों की साझी धार्मिकता और गूढ विश्वासों का चित्रण किया है| मोरवाल ने साझी संस्कृति के अद्वितीय उदाहरणों द्वारा यह स्पष्ट किया है कि यहां हिंदुओं में मेवों की कुछ धार्मिक कथाएं इस कदर घुली मिली है जैसे दूध में पानी| इसीलिए धर्म नगीना के हिंदू मुस्लिम की मित्रता में कभी बाधक नहीं बना| सलेमी,बुद्धन, मनीराम, नबी खा, हरसाय, रोबड़ा (काला पहाड़) तथा नसीब खां, पारो, जैतूनी, असगरी, धनसिंह,फत्तू, शकीला (बाबल तेरा देस में) यह ऐसे प्रौढ़ व बुजुर्ग पात्रों की पीढ़ी है जो सांप्रदायिकता, अलगाववाद, कट्टर धार्मिकता, तत्ववाद, फासिज्म से कोसों दूर है| परंतु उनकी अगली पीढ़ी बाबू खा बनवारी खुर्शीद अहमद हाजी अशरफ (काला पहाड़) तथा यूनुस,मुबीन, रामचंद्र (बाबल तेरा देस में) यह इसकी चपेट में आ जाते हैं और यहीं से मेवात की साझी धार्मिक संस्कृति में दरार आना शुरू हो जाती है| उपन्यासों के बुजुर्ग पात्र इस धार्मिक संस्कृति को बचाने की बहुत कोशिश करते हैं, पर अफसोस वह नाकाम रहते हैं हिंदू मुस्लिम एकता की यह धार्मिक परंपरा और धार्मिक सद्भाव का यह

वातावरण बाबरी मस्जिद के विध्वंस स्वरूप 6 दिसंबर के संभावित आतंक के अंतर्गत आने वाली गतिविधियों के माध्यम से धीरे-धीरे बिखरना शुरू हो जाता है| काला पहाड़ उपन्यास में प्रतिक्रियावादी ताकतों ने धर्म की आड़ में किस प्रकार अलगाववाद को बढ़ावा दिया इसका खूलेआम वर्णन किया है| सामान्य जनता में अलगाववाद फैलाने के लिए तरह-तरह के तर्क देकर उन्हें उकसाया जाता है परंतु सामान्य जनता अपने विश्वासों को छोड़ने के लिए तैयार नहीं होती| इसकी पुष्टि लेखक ने लीला के माध्यम से की है"आज ई हिंदू परिसद हमारी गारंटी दे रो है.... और इन मुसलमान का कोई भरोसा ना है.... इनको मगज खराब हो रहे जो यह खून खच्चर करेगा"4 नगीना में हिंदू मुस्लिम एकता की नीव इतनी पक्की थी कि गांव की हिंदू लड़की को छेड़ने पर सलेमी अपने बेटे बाबू खां को चप्पल से मारता है|

सांझी धार्मिकता के अलावा लेखक ने धर्म की आड़ में शरीयत और हदीस के कानूनों का सबूत देकर मौलवियों के बढ़ रहे वर्चस्व और धर्म की आड़ में मेवा स्त्रियों के हो रहे शोषण पर भी प्रश्नचिन्ह लगाया है| बाबल तेरा देस में तथा हलाला इन उपन्यासों में लेखक ने इसका विस्तार से वर्णन किया है|बाबल तेरा देस में उपन्यास में हवेली की औरतों को बहिश्ती जेवर में लिखी आयतों एवं कथनों के माध्यम से धर्म की आड़ में हो रहे शोषण से बचने का रास्ता बताया गया है, तो हलाला उपन्यास में 'हलाला बजरिए नजराना सीधे-सीधे पुरुषवादी धार्मिक सत्ता और एक पारिवारिक सामाजिक समस्या को धार्मिकता का आवरण ओढा स्त्री के दैहिक शोषण के खिलाफ बिगुल बजाने और स्त्री शुचिता को बचाए रखने की कोशिश का आख्यान है'

मेवों में तीन तलाक की प्रवृत्ति बढ़ती जा रही है मुल्ला मौलवी जैसे लोग कुरान का सहारा लेकर उस प्रवृत्ति को और बढ़ावा दे रहे हैं| इसका उदाहरण लेखक ने हलाला उपन्यास में दिया है "भाई वाह तम भला मुसलमान हुआ जो इतनो भी पत्तों ना है के तलाक दिए पीछे अगर कोई फिर सू वाही घर में आणो चाहवे, तो वाकू हलाला जरूरी है ...देखो कोई के संग भी निकाह करवाओ मेरो तो बस इतना कहणो है कि अपणा मजहब ए मत भूलों|"5 बाबल तेरा देस में भी मुमताज और दादी जैतूनी के संवादों से स्पष्ट होता है कि 'बूढ़ी मां जब मर्द ने जुबान से कह दिया कि मैंने अपनी बीवी को तलाक दे दी और यह इस तरह कहां कि चाहे किसी और को सुनाई दे या ना दे किंतु अपने लफ्जों को उसने ही सुन लिया तो समझ लो तलाक पड़ गई चाहे वह यह किसी के सामने कहे या अकेले में कहे चाहे लफ्जों को उसकी बीवी सुने या ना सुने हर हाल में तलाक हो गई'

उपर्युक्त धार्मिक उद्धरण से लेखक समाज में सबके समक्ष यह प्रश्न उपस्थित करता है कि क्या सिर्फ तीन बार तलाक शब्द के उच्चारण के साथ ही जीवन भर का बंधन टूट जाता है? क्या मेवों में स्त्री का स्थान दोयम है? क्या उसे खुद के निर्णय लेने का अधिकार नहीं है? क्या वह अपने पैरों पर खड़ी नहीं हो सकती? मुस्लिम स्त्री के मन का इतना अंतरंग एवं सूक्ष्म यथार्थ धार्मिक चिंतन शायद ही किसी ने किया हो| ईश्वर के प्रति असीम विश्वास भारतीय धर्म की रहस्यमयी आस्था का प्रमाण है|

विकट परिस्थितियों में व्यक्ति ईश्वर की आराधना करता है उसे संकट मोचन मानकर सभी दुखों का हर्ता मानता है और अगर कोई संकट आए भी जाये तो भगवान का नाम लेते से ही वह टल जाता है ऐसी मान्यता सामान्य मनुष्य रखता है| नरक मसीहा उपन्यास में भी सानिया श्री साई गीता सार का जप करती है सरला बजाज मां शेरोवाली की आराधना करती रहती है सानिया तो हमेशा एक ही दोहा रखती रहती है|

कैसे मिले अचानक धन, बिन मेहनत बिन काम
उमर गुजारे रोग रहित, पुण्य बताओ नाथ

इस संपूर्ण उपन्यास में मोरवाल ने व्यंग्यात्मक भाषा का प्रयोग कर शोषित वर्ग पर प्रहार किया है कि किस तरह सानिया, सरला जैसे लोग अपने स्वार्थ सिद्धि के लिए भगवान को भी नहीं छोड़ते हैं|

उपर्युक्त विवेचन से ज्ञात होता है कि मोरवाल हिंदुओं के साथ साथ मेवों (मुस्लिम)के धर्म संस्कृति का सुक्ष्मतिसुक्ष्म धार्मिक चिंतन किया है| साथ ही धर्म के दायरे में रहकर इस्लाम और हिंदू शास्त्रों, कुरान और वेदों की स्त्री विरोधी पुरुष वर्चस्ववादी सत्ता का भी वर्णन किया है|

भारतवर्ष में अनेक धर्मों की अपनी अलग अलग मान्यताएं होने के बावजूद एकत्रित रहते हैं| एक सच्चा धर्म पक्षपातविहीन होता है| परंतु कालानुरूप धर्मों में परिवर्तन होता गया| इस परिवर्तन की प्रक्रिया से धर्म परिवर्तन होकर वह समस्या बनकर लोगों के सामने आ रहा है| आज लोग धर्म का उपयोग निजी स्वार्थ के लिए कर रहे हैं| इसी कारण समाज में धर्म के असली रूप को तो लोग जैसे भूल ही गए हैं इसमें कोई संदेह नहीं है कि धर्म मूलत: उदार एवं उदात्त भाव से परिपूर्ण होता है| उसमें किसी भी प्रकार की संकीर्णताओं को स्थान नहीं होता है| डॉ इकबाल के शब्दों में कहा जाए तो :

ISSN : 2278-9308
July 2021

मजहब नहीं सिखाता आपस में बैर करना|

**संदर्भ ग्रंथ सूचि :-**

१. प्रेमचंद के साहित्य में व्यक्ति और समाज – डॉ. रक्षापुरी पृ. २०४

२. धर्म और समाज – डॉ. राधाकृष्णन पृ. ४०

३. Googlebook- धर्म दर्शन सामान्य एवं तुलनात्मक –डॉ.रामेन्द्र पृ. २०४

४. काला पहाड़ – भगवानदास मोरवाल पृ. २०६

५. – हलाला - भगवानदास मोरवाल पृ. ९३

**B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal**
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# गोंड आदिवासी जमातीच्या शैक्षणिक समस्याचे अध्ययन.

**प्रा.चित्रा दिगंबर साळुंखे**
एस.एम.आर.के.बी.के.ए.के. महिला महाविद्यालय, नाशिक

भारताच्या कोगरदर्यात, कडेकपारीत आदिवासी लोकाचे वास्तव्य आहे. सातपुडा, सहयाद्री व इतर पर्वताच्या कुशीत आदिवासी शतकांनुशतक आपले जीवन व्यतीत करीत आहेत. आदिवासी या नावाला फार प्राचीन इतिहास लाभला आहे. आदिवासी समाज म्हणजे असा समाज ज्याचे जीवन लंगलावर अंबलबुन असते. आदिवासी समाज आणि समाजाच्या समस्या, संस्कृती, चालीरीती, राहणमान, लाकाचा स्वभाव यामध्ये शहरी किंवा ग्रामिण भागापेक्षा खुप फरक आढळुन येतो. भारतसरकारने संविघानाच्या ७५ व्या अनुसूचित आदिवासीचा अंतर्भाव केला आहे. भारतातील महाराष्ट्र, गुजराम, मध्यप्रदेश, बिहार, ओरिसा, बंगाल, आसाम, मेघालय, ओडीसा, अरूणाचलप्रदेश, हिमाचलप्रदेश, मिझोराम, नागालॅड, त्रिपुरा केरळ, तमिळनाडु, कर्नाटक, आंध्रप्रदेश, मणिपुर, राज्यस्थान या राज्यात आदिवासीची वस्ती स्थाने आहे. आदिवासीच्या एकुण ४७ जमाती आहे. यापैकीगौंड, वारली, संथाल, भिल, रावार, कातकरी, वारली, फासे, पारधी, नागा, गोरो, चकमा, तोडा, बडला, चेंचु यापरिचित जमाती आहे. ब्रिटीशाच्या काळामध्ये आदिवासींचा सर्वागीण विकास करण्यासाठी विशेष प्रयत्न झाले नाही. आदिवासीचे जीवन कष्टमय आहे. आदिवासी लोक गरीब बसल्यामुळे ते सकस आहार घेऊ शकत नाही. तसेच ते गरीबीमुळे जास्त कपडे शिवु शकत नाही. एकच पोशाख वापरतात. त्यामुळे त्योच कपडे मळकटलेले असतात. त्याच्यात चर्मरोगाचा प्रादुर्भाव झालेला असढळतो. त्याच प्रमाणे सकस आहाराच्या अभावामुळे त्यांना अनेक रोगांना सामोरे जावे लागते. आदिवासी समाजात कुपोषण व उपासमारीची समस्या आहे. देवी, कॉलरा, क्षयरोग या सारखे अनेक रोगाचे ते बळी ठरतात. विशेष म्हणजे आरोग्याच्या सोयी—सुविधा दुर्गम भागात उपलबध होत नाही. त्यामुळे त्यांना अनेक रोगांना सामोरे जावे लागते. आदिवासी समाजात कुपोषण व उपासमारीची समस्या आहे. देवी, कॉलरा, क्षयरोग या सारखे अनेक रोगाचे ते बळी ठरतात. विशेष म्हणजते आरोग्याच्या सोयी—सुविधा दुर्गम भागात उपलब्ध होत नाही. त्यामुळे त्याचात आरोग्यविषयक अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. आदिवासी समाजात शिक्षणाचे प्रमाण कमी असण्याचे आणि निरक्षरता अधिक असण्याचे कारणे आहेत. शिक्षण हि प्रत्येक व्यक्तीची मुलभूत गरज आहे. म्हणजे शिक्षणाचा आधिकार हा मुलभूत मानवी आधिकार आहे. याकडे आदिवासीचे लक्षच नसते. दुर्गम भागात प्राथतिक शाळेचेक प्रामण देखील कमी आहे घरापासुन आणि गावापासुन लांब अंतरावर असणाऱ्या शाळामध्ये शिक्षणासाठी पाठवणे दारिद्रिजन्य स्थितीत जीवन जगणाऱ्या आदिवासींना शक्य होत नाही. आदिवासी समाज दुर्गम अशा डोंगराळ प्रदेशात राहत असल्याने शिक्षणाची विशेषत: आदिवासी विकास विभागाची शैक्षणिक गंगा तळागाळापर्यंत पोहचली असे म्हणता येईल. परीणामत: सामाजिक आणि आर्थिकदृष्टया तसेच शैक्षणिकदृष्टीकोनातुन आदिवासी समाज मागे पडला आहे. परतु स्वतंन्त्र्योत्तर भारतात आदिवासी च्या संदर्भात पंचवार्षिक योजनाच्या व इतर विकासाच्या योजनाच्या माध्यमातून मोठया प्रमाणात काम केले स्वतंन्त्र्योत्तर भारतात आदिवासी च्या संदर्भात पंचवार्षिक योजनाच्या व इतर विकासाच्या योजनाच्या माध्यमातुन मोठया प्रमाणात काम केले स्वतंन्त्र्यात्तर भारतात आदिवासी च्या संदर्भात पंचवार्षिक योजनाच्या व इतर किसाच्या योजनाच्या माध्यमातुन मोठया प्रमाणात अनेक कलमाच्या माध्यमातुन आदिवासी चे जीवन सुखकर झाले. उदा ढेबर आयोगाने अनुसूचित प्रदेशमधील अनुसुचित जमातीच्या शिक्षणाविषययक समस्यांची सर्व बाजूने छाननी केली व आदिवासी शैक्षणिक विकासबाबत काही उपयुक्त सुचना केल्या. कोठारी आयोगाने देखील या संदर्भात काही सुचना केली.

**आदिवासी शैक्षणिक विकास हा मुळात आर्थिक व सांस्कुतिक विकासशी निगडीत आहे.**

**अभ्यासाची उदिद्ष्टये –**

१) गोंड आदिवासी जमातीचे अध्ययन करणे

ISSN : 2278-9308
July 2021

२) गोंड जमातीच्या शिक्षणविषयक समस्या जाणुन घेणे.

**गृहितकृत्य**

१) गोंड जमात हि आर्थिक सामाजिक परिस्थितीत हलाखीची असल्यामुळे शिक्षणाविषयी उदासीनता आहे.

२) गोंड जमात हि नक्षलग्रस्त भागात असल्याने भीतीयुक्त वातावरण आहे.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत संशोधनाकरीता, रेकॉर्ड, संकेतस्थळ, पुस्तके, मासिके, वर्तमान पत्रे हया दुय्यत तथ्याच्या सहयाने माहिती मिळवली.

आदिवासी जमातीचे वैशिष्टय

१) आदिवासी चे अस्तित्व आणि वास्तव्य हे विशिष्ट भु—प्रदेशात असते.

२) आदिवासी चे वास्तव्य हे अनादीकाळापासुन आहे.

३) आदिवासी बोली भाषा हि वेगळी स्वंतत्र असते.

४) आदिवासी च्या बोली भाषेला लिपी नसते.

५) त्यांना त्याची वेगळी आणि वैशिष्टपुर्ण संस्कृती असते

६) स्वत:च्या कुळाचा स्वाभिमान आणि अभिमान त्याच्यात असतो.

७) एकाच रक्तसंबधावर आधारित हा समाज असतो.

८) समाजात शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प असते.

९) मानवी उत्कांतीच्या अनेक टप्प्यापैकी आदिवासी मानव हा एक महत्वाचा टप्पा आहे.

१०) आदिवासीच्या गरजा फार मर्यादित असता त्यामुळे साधी राहणी, साधी विचारसरणी असते.

वरील वैशिष्टयाचा विचार केला असता आदिवासी समाजाचे स्वरूप लक्षात येते. ते असे की, जो समाज अनादीकाळापासुन विशिष्ट भुप्रदेशावर वास्तव्य करती असतो जायची सवत:ची असी विशिष्ट बोलीभाषा असते. जीवन पध्दती तसेच संस्कृती असते. ज्या समाजाची उत्पती एकाच पुर्वलजापासुन झालेली असते. अशा अंधश्रध्दाळु व निसर्गाच्या सानिध्यात राहणाऱ्या निसर्ग पुजक समाजाला आदिवासी समाज असे म्हणतात. अशा या आदिवासी समाजाची निसर्ग शक्तीवर दृढ श्रध्दा असते. आदिवासी समाज अडाणी, अप्रगत, मागासलेला असेल परंतु सुसंस्कृत निश्चितीच आहे कारण या समाजाला स्वत:ची आदर्श अशी संस्कृती, धर्मविधी, सण—उत्सव, दैव—देवता, रूढी, परंपरा, विशिष्ट चालीरीती श्रध्दा, आचार, विचार, कृती अनेक जीवनाश्यक कला व साहीत्ययाचा अनमोल, शाश्वत वारसा लाभलेला आहे. भारतामध्ये जवळ—जवळ ५०० आदिवासी जमाती विविध ठिकाणी वास्तव्यस आहे. प्रत्येक आदिवासी जमाती विशिष्ट भूप्रदेशावर वसलेल्या आहेत तसेच प्रत्येक आदिवासी ची स्वंतत्र वैशिष्ट असता. भारतात महाराष्ट्रात, गुजरात, मध्येप्रदेश, बिहार, ओरिसा, बगाल, आसाम, मेक्षालय, ओडीसा, अरूणाचलप्रदेश, हिमाचल प्रदेश, मिझोराम, नागालॅड, त्रिपुरा केरळ, तामिळनाडु, कर्नाटक, आंध्रप्रदेश, मणिपुर, राजस्थान या राज्यात आदिवासीची वस्ती स्थाने आहे. आदिवासीच्या एकुण ४७ जमाती आहे. यापैकीगौंड, वारली, संथाल, भिल्ल, रावार कातकरी, वारली, फासे, पारधी, नागा, गारो, चकमा, तोडा, बडगा, चेंचु या परिचित जमाती आहे.

**आदिवासी जमातीचा व्याख्या**

**डी.एन. मुजुमदार** — समान नावे धारण करणारा एकसच भूप्रदेशात वास्तव्य करत राहणारा, एकाच भाषा बोलणारा, विवाह, व्यवसाय इकृबाबत समान निषेध नियम पाळणाऱ्या आणि परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने एक पध्दतशीर व्यवस्था स्वीकारणाऱ्या कुटुंबाचा समुच्चय म्हणजे आदिम समुदाय अनुसूचित जमात होय.

**विल्यम. पी. स्कॉट** — समान भाषा आणि संस्कृती असुन असे समुह की, ज्यांनी विशिष्ट भूप्रदेश व्यापला आहे व जे अशिक्षित, परपंरागत आहेत त्यांना आदिवासी असे म्हणावे.

**गोंड आदिवासी**

भारतातील संख्येने सर्वात मोठी असलेली असदिवासी जमात. ही बहुतेक सर्व मोठया राज्यांत विखुरलेली आहे. यांची लोकसंख्या १९६१ मध्ये ३९,११,७६७ होती. त्यापैकी मध्ये प्रदेशात

ISSN : 2278-9308
July 2021

३०,९४,६१६ ओरिसात ४,४५,७०५ महाराष्ट्रात २,७२,५६४ आंध्र प्रदेशात १,४६,६८० बिहारमध्ये ३३,५२१ आणि बाकीचे इतर. होते.

गोंड द्रविड वंशी प्रमुख जमात आहे. भारतातील जंगलात राहणाऱ्या जमातींत ती अग्रगण्य समजली जाते. गोंडांची वस्ती प्रामुख्याने गोदावरी व विंध्य पर्वत यांमध्ये आढळते. अशा विस्तीर्ण प्रदेशावर पसरलेल्या जमातींत वांशिक व भाषिक समानता आढळणे कठीणच अर्धे अधिक गोंड गोंडी बोलभाषा बोलतात. सर जॉर्ज ग्रीसर्वनच्या मते गोंडी बोली तेलुगुपेक्षा तमिळशी व कन्नडशी जास्त मिळतीजुळती आहे. तथापि सोळाव्या शतकातील राजगोंड राजांच्या सुवर्ण मोहरांवरून काही तूलगु भाषिक आख्यायिकांविषयी माहिती मिळते. गोंडांनी स्वतंत्र राज्ये प्रस्थापित केल्यामुळे या जमातीच्या इतिहासास आगळे महत्व प्राप्त झाले आहे. मध्य प्रदेशातील बस्तर, छिंदवाडा, मंडला जिल्हे महाराष्ट्रातील चंद्रपुर आणि आंध्र प्रदेशातील आदिलाबाद व वरंगळ जिल्हयांच्या प्रदेशास गोंडवन म्हणतात. महाराष्ट्रातील २,७२,५६४ गोंडापैकी चंद्रपुर जिल्हयात ६१ टक्के यवतमाळमध्ये ३१ टक्के व नांदेडमध्ये ५ टक्के गोंड राहतात. १,५४,१११ गोंडांची गोंडी ही मातृभाषा आहे ७३,९२० गोंडीच मराठी आणि ३१,१९७ गोंडांची माडिया मातृभाषा आहे. गोंड स्वतःस हिंदु म्हणवितात ते सवर्ण हिंदुम्हणवितात ते सुवर्ण हिंदुप्रमाणेच अस्पृश्यता पाळतात. गोंडांचा जादुवर फार विश्वास असतो ते स्वतःचे अमंगल जादुपासुन संरक्षण करण्यासाठी सामाजिक नीतिमियमांचे काटेकोर पालन करतात. वाघासारख्या हिंस्त्र पशुंपासुन रक्षण करण्यासाठी खेडयात मंगल जादुचा उपयोग करण्यात येतो. गोंड परमेश्वरास भगवान म्हणतात.आदिवासी जमातींना वनौषधीच बरच ज्ञान आहे. हे सहसा पिढीजात पुढ जाते. बऱ्याच आजारांवर अनुनही हे घरच्याघरीच इलाज करतात खरे पण त्यामानाने साक्षरतेच प्रमाण तितकसं समाधानकार नाही. गोंडी भाषा हि द्राविड कुंटुबातील म्हणुन दाक्षिणात्य बऱ्याच भाषेंशी तिचं साधर्म्य आढळत. गोंडी व्यतिरिक्त हिंदी, मराठी, तेलगु, कन्नड, पारसी अशा बऱ्याच भाषा हे लोक बोलतात. गोंडी भाषेची स्वतंत्र लिपी आहे. शिक्षण, स्थलांतर अशा बऱ्याच कारणांमुळे हि भाषा आणि लिपी मागे पडत चालली आहे. महाराष्ट्रात ७ टक्के आदिवासी साक्षर आहेत. आदिवासींमध्ये ७ टक्के गोंड साक्षर आहेत. प्राथमिक शिक्षण गोंडी भाषेत दिल्याशिवाय शिक्षणाची प्रगती होणे कठीण आहे. पुर्व महाराष्ट्रात आदिवासी कल्याण योजनांतर्गत शिक्षित गोंडांना नोकऱ्या दिल्या जातात.

**गोंड आदिवासीच्या शैक्षणीक समस्या**

आदिवासी समाज हा निरक्षर असल्याने त्याच्यावर अनेक लोकांनी आपल्या स्वार्थासाठी अत्याचार व अन्याय केले. खर्या अर्थाने त्याच्या शोषणासं इग्रंस शासन व्यवस्थेत सुरूवात झाली. इंग्रजाची धोरणे कायदे, जमीनदार, सावकार, ठेकेदार याच्यावर अन्याय— अत्याचार करत असत गडचिरोली भागात नक्षलवादी भाग असल्याने आदिवासी मध्ये भीतीयुक्त वातावरण आहे. महाराष्ट्रात गडचिरोली जिल्यातील शिक्षणाची अवस्था समाधानकारक दिसत असली तरी दुर्गम भागात अनेक शाळा, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या संख्येत तफावर आहे.

**१) भाषेची समस्या**

प्रत्येक आदिवासीची भाषा ही स्वतंत्र असते. गडचिरोली भागात गोंड आदिवासी प्रामुख्याने राहतात. त्यांची मातृभाषा ही गोडी आहे. गोंड व्यतिरीक इतरांसोबत व्यवहार करण्याची भाषा हि हिंदी आहे. तसेच गोडीभाषेची लिपी आहे. पण प्राथमिक शिक्षण व विशेषतःत बारावी पर्यंतच्या शिक्षणाचे माध्यम मराठी आहे. येथे शिक्षकाना गोडी भाषा येत नाही. त्यामुळे विचाराचे आदानप्रदान करताना अनेक समस्या निर्माण होता व विद्यार्थ्यांना मराठीचे ज्ञान अत्यल्प असल्याने शाळेविषयी आपुलकी वाटत नाही व फक्त औपचारिकता पुर्ण करण्याचे काम शाळामधुन पार पडले जाते. त्यामुळे अनेक शैक्षणिक प्रश्न निर्माण होतात.

**२) शैक्षणिक सोयीचा अभाव –**

नगरी व ग्रामीण समुदयाच्या तुलनेत आदिवासी राहत असलेल्या ठिकाणी शिक्षण संस्थाची उपलब्धता फारच अल्प आहे. ज्या शिक्षण संस्था आहे त्या ठिकाणी सोयी – सुविधाची वानवा आहे. अनुक शिक्षण संस्थाना इमारती नाही भाडयाच्या इमारतीत शाळा चालवाव्या लागता. त्या इमारती अत्यत दयनीय अवस्थेत आहे काही शाळामध्ये वाचनालय, प्रयोगशाळा, शैक्षणिक साहित्य, तर शोधुन हि सापडणार नाही अशी अवस्था आहे. त्यांच्या मालकीचे क्रीडागण व

ISSN : 2278-9308
July 2021

खेळाचे साहित्य याची उपलब्धता नाही शाळेच्या आजुबाजुला शैक्षणिक वातावरणाचा अभाव आहे काही ठिकाणी मोडक्या घरात शाळा भरवली जाते. मुलांना खाली जमिनीवरच बसावे लागते शाळेच्या शेजारी गुराचे गोठे –उकिरडे, गटारे असता अशा वातावरणात मुलांना व शिक्षकांना तिथे अध्ययन–अध्यापनाचे कार्य पार पडणे अत्यत कठीण जाते.

**३) आर्थिक स्तर**

गडचिरोली जिल्यातील ९० टक्के लोकसख्या आदिवासी जामतीची गोंड आहे ते आपला उदरनिर्वाह शेती व रोज मजुरी करून करतात. आदिवासींना त्याच्या गावामध्ये किंवा चार – पाच किलोमीटर अंतरावर रोजगार फक्त तीन–चार महिनेच मिळते. त्यामुळे मुलगा–मुलगी १०–१२ वर्षाची झाली की त्यांना देखील तीन–चार मनि काम करावे लागते त्यामुळे ते कसे बसे शाळेत जातात व नावास झाल्यानंतर मात्र घरीच बसुन काम करतात व त्याचे पुढिल शिक्षण बंद होते.

**४) विद्यार्थ्यीची अनुपस्थिती/अनियमितता**

पटसंख्येच्या तुलनेने विद्यार्थ्याची उपस्थिती फार अत्यल्प असते. त्यामुळे साहजिकच अध्ययन व अध्यापनावर परिणाम होतो. गडचिरोली भागातील अनेक स्त्री–पुरूष नोंव्हेंबर –डिसेंबर पासुन रोजगारा करीता बाहेरवागी मुलांना सोबत घेवुन जाता त्यामुळे सुरूवातीला गावातील मजुरी मुळे मुले शाळेत जात नाही व नंतर बाहेरगावी गेल्या मुळे मुले शाळेत जात नाही व सरकारी धोरणा मुळे त्या मुलांना नापास देखील करता येत नाही विद्यार्थी शाळेत सतत अनुपस्थितीत असल्यामुळे त्याला विषयाचे मुळीच आकलन होणार नाही. अशा परिस्थितीमध्ये निश्चितच शिक्षणाचा दर्जा हा खालावलेला असेल यामध्ये शका घेण्याचे कारण नाही.

**५) आदिवासीची शिक्षणाविषयक उदासीनता**

शिक्षक, पालक देखील विद्यार्थ्यांध्ये शैक्षणिक रूचीर निर्माण करत नाही. त्यामुळे विद्यार्थ्याचे हि शिक्षणात मन रमत नाही. आदिवासी लोक आज हि शिक्षणविषयी उदासीन आहेत अनुक लोकांना तर शिक्षणाचा गंध ही नाही त्यामुळे त्यांना शिक्षणाचे महत्व कळत नाही आपल्या मुलांनी शिकले पाहिजे असे त्यांना वाटत नाही. त्यामुळे भविष्यात शिकुन आपल्या परपरांगत कामात मदत करणार नाही असे काही लोकांना वाटत असते. शिक्षणाने आपली प्रगती व्हावी असे त्यांना वाटत नाही. त्यामुळे शिक्षणाविषयीच्या उदासीनतेमुळे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवत नाही.

**६)दळणवळनाची साधने उपलब्ध नाही.**

आदिवासी लोक हे अत्यंत दुर्गमभागात राहत असता. शिक्षक हे शाळेच्या ठिकाणी पासुन दुर गावातुन किंवा शहरातुन येणे जाणे करत असता. दुर्गम भागात व्यवस्थित रत्से आढळत नाही. नक्षलयुक्त भाग असल्यामुळे नक्षलवादी लोकांची भीती हि मनात असते त्यामुळे शिक्षक रोज शाळेमध्यु जात नाही एक – दोन दिवसानंतर शाळेत येत बस चे वेळापत्रक आणि शाळेचे वेळापत्रक यात खुप मोठी तफावर असते. शाळेत रोड तसेच नियमित जात येत नाही. आणि गेलेच तर वेळेवर नाही. शिक्षणाप्रमाणे विद्याथ्याची हि तीच अवस्था असते. हा भाग जंगल युक्त असल्याकारणाने पावसाचे प्रमाण देखील अधिक असते. रस्त्याचा व अन्य दळवण्वळण साधनाच अभाव इथे मोठया प्रमाणात जाणवतो.

**७) नक्षलवाद आणि शिक्षण :**

शिक्षणामुळे माणसात परिवर्तन होते. जगात काय घडते आहे याची जाणव जागृती निर्माण होते. शिक्षण घेतल्याने आदिवासी जागृत होती. त्याच्या पर्यंत विकासाच्या अनेक योजना पोहचतील त्यामुळे नक्षलवादी चळवळीला ते संहकार्य करणार नाही या भीती पोटी नक्षलवादी आत आदिवासीच्या शिक्षणाला सुध्दा विरोध करताना दिसतात. शिक्षणात हुशार असणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना आश्रम शाळामधुन उचलुन नक्षलाच्या बालदस्त्यात सहभागी करून घेण्याचा अनेक घटना गडचिरोलीत घडत आहे.

**८) दारिद्र**

आज हि अनेक आदिवासी कुटुंब दारिद्यात जीवन जगत आहे. कमालीच्या दारिद्यामुळे आदिवासी अन्न, वस्त्र, निवारा या मुलभुत गरजा भागविणे कठीण जाते अशा परिस्थिती शिक्षणावर खर्च करणे शक्य होत नाही आपल्या कुंटुबाला आर्थिक मदत व्हावी म्हणुन अनेक पालक

आपल्या घरातील मोठया मुलांना किंवा मुलीना आपल्या लहान भावडांना संभाळण्यासाठी ठेवता. त्यामुळे या मुलाचे शिक्षण होत नाही. आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे हे विद्यार्थी शिक्षणा पासुन वंचित राहतात.

**निष्कर्ष**

१) निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे.
२) शासकीय आश्रम शाळेचा अभाव दिसुन येतो.
३) आदिवासी आर्थिकस्थिती अतिशय हालाखीची आहे.
४) शिक्षणाविषयी उदासीनता दिसुन येते.
५) गोंड आदिवासी समाज आजही इतर समाजापेक्षामागासलेला आहे.

**उपाययोजना —**

१) गोंडी जमातीतील किंवा त्याभागातीलच बोलीभाषा येणारे शिक्षक नेमणे.
२) शिक्षणाविषयी जाणीव जागृती व समाजप्रबोधन करणे.
३) निवासी आश्रमशाळा सुरू करणे.
४) माध्यमिक शिक्षणपुर्ण झाल्यानंतर स्वंय रोजगार प्रशिक्षण वर्ग सुरू करणे.
५) आदिवासी विद्यार्थ्यांना प्राथमिक — माध्यमिक शिक्षण मोफत द्यावे.
६) व्यक्तीमत्व व मुल्यशिक्षणाचे धडे विद्यार्थ्यांना द्यावे त्यामुळे त्यांचातील न्युनगंड दुर होण्यास मदत होईल.
७) स्थानिक भाषेत अध्ययन साहित्य तयार करावे. तसेच तेथील विद्यार्थ्यांना हि शैक्षणिक साहित्य निर्तितीस प्रोत्साहन द्यावे.

**सारांश**

गोंड आदिवासी समाज आज हि इतर समाजापेक्षा मागासलेला आहे. आजही अति दुर्गम भागातील आदिवासी समाजाची परिस्थिती अत्यंत दयनीय आहे, आदिवासींचा विकास करावयाचा असेल तर शिक्षणाच्या मुलभुत सोयी—सुविधा सुधारल्या पाहिजेत. मुलांचे आरोग्य, त्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा, मुलींची सुरक्षितता, आश्रमशाळेत मुलींचे होणारे लैगिक शोषण थांबले पाहिजे. दुर्गम भागात दळणवळणाची साधने आणि पक्के रस्ते बांधले पाहिजेत. पाझार तलाव, शेततळी, लघुपाटबंधारे बांधुन पिण्याचा आणि शेती सिंचनाचा प्रश्न मार्गी लावला पाहिजे. वाडया—पाडयावर, हाकेच्या अंतरावर किमान प्राथमिक दवाखाना झाला पाहिजे. शेती विकासाच्या योजना राबवल्या पाहिले. आदिवासी समाजाच्या नावाखाली आजही अनेक लोक खोटया जातप्रमाणपत्रावर नोकरी करीत आहेत. मुळ खरा आदिवासी विकासापासुन दुर राहिला आहे.

**संदर्भ :**

१)डॉ. दा.धो. काचोळे, आदिवासी समाजशास्त्र, कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद.
२) शर्मा. व्ही.पी. आदिवासीचे समाजशास्त्र पंचशील प्रकाशन जयपुर
३) देशपांडे के.वा. माळी आ.ल. भारतीय शिक्षणाचा इतिहास, नित्य तुनम प्रकाशन, पुर्ण
४) करडे, सतीशकुमार, ग्रामीण विद्यार्थ्यांच्या समस्या आणि उपाय, सुगावा प्रकाशन पुणे
५) आगलावे डॉ. प्रदिप, आदिवासी समाजाचे समाजशास्त्र श्रीत्र साईनाथ प्रकाशन, नागपुर
६) कऱ्हाडे बी.एम, भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या, पिंपळापुरे, प्रकाशन, नागपुर
७) कोंडेकर ए.वाय.पाटील. डॉ. मगला, आदिवासीचे समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापुर
८) साळुंके डॉ. संजय, आदिवासी समाजशास्त्र, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
९) लोटे रा. ज, आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, पिंपळापुरे, प्रकाशन नागपुर
१०) जणगणना २०११ मराठी विश्वकोष

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# "जात, वर्ग, धर्म ह्यांचा समतावादी तत्त्वावर आधारित पडलेला प्रभाव व परिणाम"

प्रा. चंद्रशेखर सुधाकर देवघरे
स्व. निर्धन पाटील वाघाये कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , लाखनी जि. भंडारा
भ्रमणध्वनी – ९७६४९०५२२२,इ मेल –geogharechandrashekhar@gmail.com

आजच्या आधुनिक काळातदैनदीन रोजची वर्तमानपत्रे हातात घेतली असता देशाच्या कानाकोपऱ्यात कुठे ना कुठे दिवसेंदिवस हिंसाचार, दहशतवाद, नक्षलवाद, जातीय दंगे, स्त्रियांवरील लैंगिक अत्याचार व अन्याय बेरोजगारी, चोरी, दरोडेखोरी, आत्महत्या, धार्मिक व कौटुंबिक अत्याचार अशा अनेक व्यभिचाराच्या घटना पहावयास मिळतात. परंतु अशा घटनांना कुठेही आळा बसताना दिसून येत नाही, हे वास्तव आहे .

आजच्या प्रसारमाध्यमांद्वारे अनेक नवीन घटना सामाजिक व राजकीय घडामोडी, आर्थिक उलाढाली , राज्यपातळी पासून ते थेट देशांतर्गत सर्वच हालचाली माहिती होतात . म्हणूनच प्रसार माध्यमांचा थेट मानवाच्या जीवनावर प्रभाव पडलेला दिसून येतो. संपूर्ण मानवी जीवनाची व्यथा व कथा अनेक घटना व प्रसंगानुरूप तसे पडसाद पाहायला मिळतात. मानवी नितीमूल्यांचा ऱ्हास झालेला दिसून येतो. अर्थात हि मानवा मानवामधील असमानता दिसून येते. जे पूर्णतः अनिष्ट आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान.**

भारतीय राज्यघटनेचे स्वातंत्र्य, समता, बंधुता,न्याय ही जीवनमूल्ये आपणास दिलेली आहे. भारतातील लोकशाहीचे विचार हे भारतीय संविधानातले मूलभूत तत्त्व आहे. ज्याचा सर्वांनी पुरस्कार केलेला आहे. अहिंसा व शांततेचा स्वीकार करून सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय दृष्ट्या शैक्षणिक व वैज्ञानिक दृष्ट्या भारताची प्रगती व विकास घडून आला. लिंग,वर्ग,वर्ण, धर्म, जात, निरपेक्ष अशा सर्वांगीण पैलूवर संविधानात तशी सर्वसामान्य, गरीब, प्रौढ व निराधार अन्य घटकांचा सखोल विचार करण्यात आला मतदानाचा हक्क हा तळागाळातीलसर्वसामान्यांनागरीबांना, मजुरांना,भटक्या जाती व जमाती व इतरही सर्व घटकांना मिळालेला आहे आर्थत सर्वांना समान संधी मिळाली पाहिजे हेच ध्येय त्यामागे होते. हजारो वर्षाच्या समाज अंधारात व अज्ञानात राहिला अशा समाजाला जागे करण्याचे काम प्रत्यक्षपणे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी केले सामाजिक व राजकीय सुधारणा घडवून समाजातील अनिष्ट चालीरीती अनिष्ट रूढी प्रथा परंपरा मोडकळीस आलेल्या मानवी हक्क मानवी प्रतिष्ठा यांचे जाणीव करून दिली पण नवीन आधुनिक मूल्ये रुजविण्याचे कार्य केले. पूर्वी प्रार्थना समाज आर्य समाज अशा अनेक धार्मिक संस्था उदयास आल्या होत्या धर्माचा प्रचार व प्रसार करण्याचा हाच येतो धार्मिक संस्थांच्या होता विशेषता ख्रिस्ती धर्माचा प्रसार व प्रचार या हेतूनेसकारलेला आहे. हिंदू धर्मात नेक धर्म संप्रदाय, जाती निहाय वर्ग व्यवस्था निर्माण झाली व त्यातूनच चातुरवर्ण्यव्यवस्था उदयास आली तेव्हा त्या चातुरवर्ण व्यवस्थेचा विरोध करून तसेच जातिव्यवस्थेवर आधारित जातीप्रथा पुर्णपणे नष्ट करण्यात यावी. याकरिता भारतीय संविधानात तशी तरतूदही प्रामुख्याने करण्यात आली जिथे परा त्याची विषमता आहे अशा भांडवलशाहीचा विरोध करून गरीब मागासवर्गीयांच्या त्यांचे सामान्य अधिकार प्राप्त व्हावे याकरिता त्यांनी प्रयत्न केले.असमानता नष्ट करण्याच्या उदात्त हेतूने अविरतपणे तसे कार्य करून कलमांवये कायद्याची तरतूदही केलीमाक्स वादाचा प्रभाव ही त्यांच्यावर पडलेला दिसून पडते.

ग्रामीण दुर्गम, अतिदुर्गम भागातील लोक आदिवासी लोकांच्या सर्वांगीण अधिकाराची दालने सुरू केली. शिक्षणाचा अधिकार हा सर्वांना मिळावा यासाठी तशी तरतूदही करण्यात आली. सर्व बहुजन निराधार सर्वसामान्य तळागाळातील कष्टकरी लोकांना त्यांचे हक्क न्याय व आरक्षणाचे धोरणही अवलंबिले आहे. अर्थात समानतेनुरूप समाज परिवर्तन घडवून एक नवा आयाम देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. समाजव्यवस्थेत स्त्रियांचे स्वतंत्र व आदराचे स्थान स्त्री शिक्षण स्त्रियांवर आधारित संरक्षणाचे कायदे स्त्रियांच्या अधिकार व त्यांचे स्वावलंबी जीवन मजूर व कष्टकरी स्त्रियांचे अधिकार बहुजन व मागास स्त्रियांचे अधिकार व त्यांच्यासंरक्षणात्मक बाबी ह्या सर्वांच्या विचार करता स्त्रियांची अस्मिता जोपासण्याचे कार्य त्यांनी केले स्त्री-पुरुष असमानता त्यांना मान्य नव्हती स्त्रियांना देखील पुरुषांप्रमाणे स्वाभिमानाने व आदराने जगता यावे याकरिता स्त्रियांना त्यांचे अधिकार ही मिळाले पाहिजे. अर्थात स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व सर्वांनी स्वीकारायला पाहिजे हेच विचार मांडले.

म. फुले राजर्षीशाहू यांच्या वारसा जोपासणारे डॉक्टर आंबेडकरांनी ह्या जगाला एक नवे तत्त्वज्ञान प्राप्त करून दिले संपूर्ण विश्वाला शांतीचा व समानतेचा संदेश देणारे तथागत बुद्धांच्या विचारांचा व बुद्ध धम्माचा स्वीकार त्यांनी केला. हे त्यांनी त्यांच्या ग्रंथ 'बुद्ध अँड हिज धम्म' ह्या ग्रंथातून सविस्तरपणे सांगितले.

**बुद्ध धम्म विचार :-**

ज्या पूर्णता समानतेचे तत्त्व स्वीकारलेले आहे ते धम्मतत्व तथागत गौतम बुद्धाचे तत्त्वज्ञान होय ज्यात बौद्धाची संस्कृती व संस्कार ह्यांचे सविस्तर वर्णन आलेले आहे. वर्ग, वर्ण, समता, संघ,धम्म ह्यांचे विस्तृत असे वर्णन करण्यात आले असून संपूर्ण जगाला व राष्ट्राला समोर नेणारी एक नवी आदर्श व आधुनिक नीती विचारधारा प्रगट झाली आहे. तथागतांनी सांगितलेले शील, प्रज्ञा, करुणा ह्या तीन श्रेष्ठ गुणांचे समावेश असून ते सर्वोत्तम मार्गदर्शक अशी तत्त्व आहे जी मानवी जीवनाला कलाटणी देते.

**सारांश** - भारतीय संविधानात समतावादी तत्त्वाचा स्विकार केला असून जात वर्ग, वर्ण,धर्म हयविषयीचे सखोल चिंतन केलेले आहे. लोकशाहीत स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ह्या मानवी मूल्यांचा स्विकार केलेला आहे.

**संदर्भ ग्रंथ-**

डॉक्टर आंबेडकर : बुद्ध अँड हिज धम्म

सबाने आकांक्षा : डॉक्टर आंबेडकर आणि स्त्री, आकांक्षा प्रकाशन, नागपूर 2007

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे : मार्क्सवादी विश्लेषण

डॉ. चंद्रकांत धनाजी कांबळे
सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख वसुंधरा कला महाविद्यालय,जुळे सोलापूर
मोबाईल 8888838196 / kamblechandrakant49@gmail.com

**प्रस्तावना:**

भारताला मानवतावादी मूल्याची ओळख होऊ लागली ती म्हणजे, १९व्या शतकात ब्रिटीशांच्या राजकीय आणि शैक्षणिक प्रवाहातून अनेक समाजसुधारकांचा उदय झाला. यामुळेच सामाजिक आणि सुधारणावादी विचारधारेला सुरुवात झाली.अगदी याप्रमाणेच महाराष्ट्रातही सामाजिक सुधारणेची विचारधारा सुरु झाली. यामध्ये ब्रम्होसमाज, आर्यसमाज, प्रार्थनासमाज आणि सत्यशोधक समाज स्थापन झाले यांनी महाराष्ट्राला वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिले.म्हणूनच १९ वे शतक वैचारिक जडणघडणीसाठी महत्वाचे ठरले तर २० वे शतक सामाजिक सामता, न्याय हक्काची चौकट मांडण्यासाठी अधिक कारणीभूत ठरले आहे. महाराष्ट्राच्या वैचारिक आणि सामाजिक जडणघडणीत अनेक संताचे, साहित्यकांचे आणि समाजसुधारकांचे योगदान महत्त्वपूर्ण लाभले आहे. पुरोगामी महाराष्ट्राचा इतिहास मांडताना एक उत्कृष्ट साहित्यिक आणि समाजसुधारक म्हणून अण्णा भाऊ साठे यांचे नाव प्रामुख्याने पुढे येते. तेएक महान आणि क्रांतिकारक लेखक होते एवढेच नाहीतर दलित समाजातील थोर साहित्यिक होते.अस्पृश्य समजल्या जाणा-या मांग जातीत जन्म झाल्याने धर्मव्यवस्थेने त्यांच्यावर केलेला अन्याय आणि अनुभवास आलेली परिस्थिती त्यांनी आपल्या साहित्यातून चित्रित केली आहे.म्हणूनच त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीतून समाजाची वास्तवता आणि मार्क्सवाद ओसंबून वाहताना दिसून येतो. *त्यांच्या फकिरा* (१९५९) या कादंबरीला इ.स. १९६१ मध्ये राज्य सरकारच्या उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला आहे.त्यांचे एकूण १३ कथासंग्रह,३२ कादंबऱ्या,३ नाटके,१४ पोवाडे,१प्रवासवर्णन - माझा रशियाचा प्रवास,शाहिरी,लोकनाट्य इ.साहित्यकृती त्यांची प्रसिध्द आहे. महाराष्ट्रातील वंचित लोकांचे उपेक्षित जीवन त्यांनी यथार्थपणे आपल्या साहित्यातून मांडले आहे. दलित लेखक म्हणून त्याकाळात त्यांची कुचंबना होत गेल्यानेच ते दुर्लक्षित राहिले.त्यांचे साहित्य प्रभावशाली असूनही जातीच्या चौकटीमुळे त्यांना प्रसिध्दी मिळाली नाही. स्वत: त्यांना उपेक्षित आणि अपमानित जीवन जगावे लागले आहे. परंतु त्यांच्या साहित्यातील वास्तववाद फार काळ दबून राहिला नाही. दलित वर्गात जशी जशी जागृती होऊ लागली. तसे तसे त्यांचे साहित्य प्रेरणादायी ठरत गेले.

वाटेगावच्या गावकुसाबाहेर राहणारा, शिक्षणाची परंपरा नसणारा,पंधरा-सोळा वर्षापर्यंत अक्षरांची धड ओळख नसलेला अण्णा भाऊ साठे हे मराठीतील प्रतिभावंत शाहिर,लेखक,कवी,कष्टक-यांचे,शोषितांचे,पीडितांचे प्रतिनिधी होते.एवढेच नाही तर त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या आणि गोवा मुक्तीच्या चळवळीत महत्वपूर्ण योगदान देऊन कामगिरी बजावली आहे.सयुंक्त महाराष्ट्र रहावा मुंबई महाराष्ट्रातच रहावी यासाठी त्यांनी तमाशा,शाहिरी यातून समाजप्रबोधन केले. अण्णा भाऊंचे साहित्य त्याकाळातील उच्चभ्रू साहित्यकाला लाजवेल असेच होते. परंतु दलित साहित्यिक म्हणून त्यांची उपेक्षा झाली आहे हे दिसून येते. त्यांच्या साहित्यकृतीतून मार्क्सवादाचे विश्लेषण दिसून येते. म्हणजेच त्यांच्यावर मार्क्सवादाचा प्रभाव होता. हि वास्तवता अभ्यासकाला मानावी लागते.'जात' हा फॅक्टर केवळ महाराष्ट्रातच आहे असे नाही तर संबंध भारतभर हा फॅक्टर लागू असल्याने कनिष्ठ मानल्या गेलेल्या जातीच्या लोकांमध्ये प्रतिभा असूनही ती त्यांना दाखवता येत नाही. त्यामुळे हे लोक उपेक्षित राहतात त्यापैकीच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे एक होते.

अभ्यासक्षेत्र :

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी अनुभव आणि प्रतिभा याच्या जोरावर परिस्थितीवर मात करून वास्तववादी साहित्याची निर्मिती केली आहे. या शोधनिबंधात त्यांच्या साहित्यातून प्रतीबिंबित होणाऱ्या मार्क्सवादावर दृष्टीक्षेप टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

शोधनिबंधाचा उद्देश :

- लोकशाहीर अण्णा भाऊच्या साहित्यातील मार्क्सवादी सिंद्धान्ताचे अवलोकन करून घेणे.
- साहित्यरत्न अण्णा भाऊच्या साहित्यातील मार्क्सवादाचे प्रतिबिंब समजून घेणे.
- साहित्यरत्न अण्णाभाऊच्या साहित्यातील मार्क्सवादाचा आरसा समाजाचे वास्तव दाखवतो याची प्रेरणा घेऊन वंचित आणि उपेक्षित लोकांनी सामाजिक व सांकृतिक जीवनात काय बदल करून घेतला आहे याचा आढावा घेणे.

गृहीतके :

• लोकशाहीर अण्णा भाऊसाठे यांचे साहित्य अनुभवजन्य होते. त्यांच्या साहित्यात कल्पनाविलास नसून अस्तित्वासाठीचा संघर्ष आहे.
• लोकशाहीर अण्णा भाऊसाठे यांचे साहित्यमार्क्सवादाची ओळख करून देते. म्हणूनच कामगार कल्याणाची मूल्ये त्यांच्या साहित्यातून पेरली जातात.
• लोकशाहीर अण्णा भाऊसाठे यांनी आपल्या साहित्यातून सर्व सामान्याचा जगण्याचा संघर्ष उभा केला आहे. सामाजिक व्यवस्था मार्क्सवादी कशी आहे हे त्यांनी दाखवून दिले आहे. त्यांनी खरा साहित्यातून मार्क्सवाद मांडला आहे.

अशयविश्लेषण:

अण्णाभाऊंनी वयाच्या पंधराव्या वर्षापासून म्हणजे १९३५ साली कवने रचायला सुरुवात केली. आणि जीवनाच्या अखेरीपर्यंत म्हणजे १९६९ पर्यंत लिहित गेले. 'फकिरा' सारख्या चित्रपटात सावळ्या मांगाची भूमिका साकारणाऱ्या अण्णा भाऊना प्रचंड, चिरंतन उर्जा लाभली होती. त्यांना हि उर्जा त्यांच्या वाट्यास आलेल्या यातनादायक परिस्थितीने, कार्ल मार्क्सने,लेनिनने दिली होती. सर्जनशील लेखक आणि ध्येयनिष्ठ,लढाऊ कार्यकर्ता या दोन्हींचा उफळता संगम खऱ्याअर्थाने अण्णा भाऊमध्ये पहावयास मिळतो. तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील अण्णा भाऊंचे योगदान त्यांच्या नेतृत्व गुणांचा हा आविष्कार दाखवून देतो.

त्यांच्या साहित्यातील मार्क्सवादी सिंद्धाताचा आढावा आपणास पुढील विश्लेषणावरून अधिक स्पष्ट होईल.

१. मुंबईच्या कामगार जीवनाचा मार्क्सवाद :

वयाच्या १३ व्या वर्षी आपल्या कुटुंबांसोबत पायपीट करीत मुंबईला आले. लहान वयातच पालनपोषणाची जबाबदारी अंगावर पडली. त्यांनी जगण्यासाठी अनेक कष्टांची कामे केली. याच अनुभवातून त्यांची लेखणी तयार झाली. मुंबई मधील शहरी पर्यावरणाने त्यांच्या लिखाणावर लक्षणीय प्रभाव टाकला. त्यांनी तो डायस्टोपियन परिवाराच्या रूपात दाखवला. त्यांनी त्यांच्या "मुंबईची लावणी" आणि "मुंबईचा गिरणीकामगार" या दोन गाण्यांतून मुंबईला 'शोषणकारी, असमान आणि अन्यायपूर्ण' असे म्हटले आहे. कारण मुंबई ज्याच्या कष्टाने,तळहाताने नावारूपास आली तोच वर्ग उपेक्षित आहे, अर्धपोटी आहे. तर धनिक खुशाल आहे हि सामाजिक व आर्थिक विषमता अण्णाभाऊना मान्य नव्हती. या विषमतेविरुद्ध अण्णाभाऊ लिहू लागले. संयुंक्त महाराष्ट्राच्या लढ्याला अमरशेख,गव्हाणकर,यांच्यासह अण्णा भाऊनी वाहून घेतले होते. मुंबई महाराष्ट्राबाहेर काढली जाणार हि व्यथा त्यांना पोखरत होती म्हणूनच संपूर्ण महाराष्ट्र त्यांनी ढवळून काढून मुंबई हि महाराष्ट्राचीच आहे तिला अलग करता येणार नाही हे ठणकावून सांगीतले. अण्णा भाऊंचे मुंबई, महाराष्ट्र आणि भारताबद्दल असलेले प्रेम यावरून प्रकट होते.

अण्णा भाऊना मुंबईतील विषमता मनाला असह्य करून टाकते जो श्रम करून मुंबईला आर्थिक राजधानी बनवतो त्याच्या नशिबी उपासमारी असणे हे अन्यायकारक आहे. अण्णा भाऊ म्हणतात की,"हि पृथ्वी शेषनागाच्या मस्तकावर नव्हे तर कष्टकरी, कामकरी यांच्या तळहातावर तरलेली आहे." जे लोक तळहातावर पृथ्वी पेलतात त्यांनाच उपेक्षित जीवन जगावे लागते याची खंत अण्णाभाऊना वाटत असे. म्हणूनच त्यांनी आपल्या कथा, कादंबरी, शाहिरी,पोवाडे,वगनाट्य इ. साहित्यातून प्रचलित व्यवस्थेवर प्रहार करण्यास सुरुवात केली.

२. अण्णाभाऊच्या कथेतील मार्क्सवादाचे प्रतिबिंब :

अण्णाभाऊच्या प्रत्येक कथेतून समाजवादाचे प्रतिबिंब चित्रित होत असते. जे जगले तेच अण्णाभाऊनी मांडले. सामान्य माणसाचा जगण्याचा संघर्ष, बंड,विद्रोह आणि मानवी मूल्यांचे याचे यथार्थ दर्शन त्यांच्या साहित्यातून पहावयास मिळते. १९४२-४३ साली त्यांनी 'स्मशानातील सोनं' ही कादंबरी लिहली. त्यातून त्यांनी भीमा नावाचे परिस्थितीला झुंज देणारे पात्र उभे केले. अठराविश्व दारिद्र्यात पिछाडत असलेल्या समाजाचे चित्रण त्यांनी केले. भीमा नावाचा नायक स्मशानातील पुरलेल्या प्रेताच्या तोंडातील सोने चोरत असतो अशामध्येच त्यांची बोटे प्रेताच्या दातात अडकून तुटली जातात. इतके भिषण कथानक अण्णा भाऊंनी केले आहे. गरीबीमुळे माणूस लाचारीचे जिणे पत्करतो. नको त्या परिस्थितीचा सामना करतो. हे वाचकाला त्यांना दाखवून द्यायचे आहे. आणि या वाचकांच्या स्फूर्तीतून त्यांना मानव मुक्तीची चळवळ उभी करायचे आहे असे स्पष्ट दिसून येते. त्यांच्या प्रत्येक कथेतील नायक जगण्याचा संघर्ष उभा करतो, अन्यायाचा तिरस्कार करतो, तसेच त्यांच्या कथेतील असलेली स्त्री नायिका कधीही आपले चारित्र्य गहाण ठेवत नाही, तर ती कोणत्याही परिस्थितीत चारित्र्य सांभाळते, ती कधीच चारित्र्य विकत नाही.

म्हणजेच उपेक्षित वंचित वर्ग आपल्या चारित्र्याला महत्व देतो तो स्वाभिमानी असतो हे अण्णाभाऊनी वास्तव मांडले आहे. आणि हाच स्वाभिमान त्यांनी समाजव्यवस्थेत पेरण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या साहित्यातील समाजवाद हा पूर्णतः स्वाभिमान आणि समतेवर आधारलेला आहे.त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते.

३. मार्क्सवादावरील प्रभाव आणि विश्लेषण :

अण्णा भाऊ हे मार्क्सवादी प्रवृत्तीचे होते १९४४ मध्ये दत्ता गवाणकर आणि अमर शेख या शाहिरांच्या सोबत त्यांनी लालबावटा कला पथक स्थापन केले. याद्वारे त्यांनी अनेक सरकारी निर्णयांना आव्हान दिले होते. भारतीय स्वातंत्र्यानंतर उच्चवर्णीयांचे भारतावरील शासन त्यांना मान्य नव्हते म्हणून त्यांनी १६ ऑगस्ट १९४७ रोजी मुंबई येथे वीस हजार लोकांचा मोर्चा काढला आणि त्या मोर्च्यातील घोषणा अशी होती, "ये आझादी झूठी है, देश कि जनता भूखी है!" म्हणजेच गोऱ्या लोकांची सत्ता जाऊन ब्राम्हणशाही प्रस्थापित होणे, मूठभर लोकांच्या हाती सत्ता जाणे आणि पुन्हा पेशवाई येणे म्हणजे स्वातंत्र्य होय अशी साखळी त्यांना मान्य नव्हती.

अशा स्वातंत्र्याने उपेक्षित आणि वंचित वर्गाचे काहीही प्रश्न सुटणार नाहीत उलट विषमता आणि उपेक्षित लोकांचे जीवनमान खालावत जाईल असे चित्र त्यांनी रेखाटले होते. आणि तेच सत्यआपण आजही अनुभवत आहोत. आजही स्वातंत्र्याचा पुरेपूर फायदा दलित, उपेक्षित, वंचित,दुर्बल घटकाला झाला नाही. आजही या लोकांना अपमानास्पद वागणूक मिळते, जातीव्यवस्था आणि धर्मव्यवस्थेचे हे लोक बळी होतात. मग असे स्वातंत्र्य कोणत्या कामाचे, ज्यात दलितांना सन्मानाने जगता येत नाही, राजकीय स्वातंत्र्य नाही आणि सामजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक,आर्थिक, मागासलेपणा आजही कायम आहे. कारण सत्ताधीश त्याच जुनाट जातीवादी मनोवृत्तीचे आहेत.

अण्णा भाऊ साठे हे शाळेत शिकलेले नाहीत, केवळ दीड दिवस ते शाळेत गेले नंतर तेथील सवर्णांकडून होणाऱ्या भेदभावामुळे त्यांनी शाळा सोडून दिली. पण त्यांच्यात अंगजातच प्रतिभा होती ती साहित्यरुपाने दरवळत राहिली. पहिल्यांदा ते कॉ. श्रीपाद अमृत डांगेयांच्या कम्युनिस्ट विचारसरणीने प्रभावित झाले. अण्णा भाऊच्या वाट्याला केवळ पन्नास वर्षाचे आयुष्य मिळाले एवढयातच त्यांनी हा साहित्याचा आणि समाजसुधारणेचा पसारा मांडला आहे.धर्माच्या नावाखाली पिडीत असलेल्या लोकांचे दुखणे त्यांनी चव्हाट्यावर आणायला सुरुवात केली. त्यांच्या संवेदनशीलतेतून कामकरी, कष्टकरी,शोषित व धर्माने नाकारलेल्या लोकांच्या जीवन यातना आणि त्यांचा संघर्ष साहित्याच्या माध्यमातून जगासमोर येऊ लागला.पोवाडा आणि लावणी यांसारख्या लोककथात्मक कथा शैलींच्या वापराने लोकांमध्ये ते लोकप्रिय बनले व त्यांचे कार्य अनेक समुदायांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली.
धर्मांध आणि धनिक लोकांचा कुटील डाव आणि त्यांच्याकडून होणारा छळ अण्णा भाऊ आपल्या शब्दरूपी कथा,काव्यातून मांडू लागले,यातून लोकांच्या जाणीव विकसित होऊ लागल्या आणि यामुळे प्रस्थापित व्यवस्थेला हादरे बसू लागले.

४. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिकतेचा प्रभाव आणि मार्क्सवादाची सांगड :

अण्णाभाऊवर सुरुवातीला साम्यवादाचा प्रभाव होता पण नंतर ते आंबेडकरवादी झाले. डॉ.बाबासाहेबांच्या सामजिक कार्याला प्रमाण मानून त्यांना गुरु मानले. मानवमुक्तीसाठी बाबासाहेबांनी आयुष्यभर लढा दिला,दलितांना स्वाभिमानाने जीवन जगण्याचा मूलमंत्र दिला. बाबासाहेबांच्या विचारात जग बदलण्याची ताकद आहे म्हणून बाबासाहेबांचे विचार अनुसरणे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले. अण्णा भाऊ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकींना अनुसरत दलित कार्याकडे वळले आणि दलित व कामगारांच्या जीवनातील अनुभवांना प्रकट करण्यासाठी त्यांच्या कथांचा वापर केला,बाबासाहेबाबद्दल ते म्हणतात.

“ जग बदल घालूनी घाव ।सांगून गेले मला भीमराव ॥
गुलामगिरीच्या या चिखलात ।रुतून बसला का ऐरावत ॥
अंग झाडुनी निघ बाहेरी ।घे बिनीवरती घाव ॥
धनवंतानी अखंड पिळले ।धर्मांधानी तसेच छळले ॥
मगराने जणू माणिक गिळले ।चोर जाहले साव ॥
ठरवून आम्हा हिन कलंकित ।जन्मोजन्मी करुनी अंकित ॥
जिणे लादुनी वर अवमानित । निमून हा भेदभाव ॥
एकजुटीच्या या रथावरती । आरूढ होऊनी चल बा पुढती ॥
नव महाराष्ट्र निर्मून जगती । करी प्रकट नीज नाव ॥

अण्णा भाऊच्या प्रत्येक कथेतून,पोवाड्यातून, काव्यातून,वगनाट्यातून नायक अथवा नायिकेने जगण्यासाठी केलेला संघर्ष समोर येतो अन्यायाच्या विरोधात पेटून उठण्याचा लढा दिसून येतो. पिडीत,शोषित,परिस्थितीतीने गंजून गेलेल्या कुटुंबाचा अथवा माणसाचा संघर्ष आहे. बाबासाहेबांनीही वंचित समाजाला सन्मानाने जगायला मिळावे म्हणूनच लढा दिला . बाबासाहेबांच्या आणि अण्णाभाऊच्या विचारात साम्य होते. दोघांचाही लढा मानवमुक्तीसाठीच होता. बाबासाहेबानी मांडलेले तत्त्वज्ञानच जगाला तारू शकेल असा विश्वास अण्णा भाऊना होता म्हणूनच त्यांनी आपल्या समाजबांधवांना बाबासाहेबांनी सांगितलेला मार्ग अनुसरण्यास सांगतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केलेल्या ‘फकिरामध्ये, त्यांनी आपल्या समुदायाला पूर्ण उपासमारीपासून वाचवण्यासाठी ग्रामीण रूढिवादी प्रणाली आणि ब्रिटिश शासनाच्या विरूद्ध विद्रोह करणाऱ्या नायक फकिराला चित्रित केले. नायक आणि त्याच्या समुदायाला नंतर ब्रिटिश अधिकारी अटक करतात आणि छळ देतात, आणि अखेरीस फकिराला फाशी देऊन ठार मारले जाते.

सांगण्याचा तात्पर्य की अण्णाभाऊंचा नायक परिस्थितीने गांजलेला आहे तरी पण तो स्वाभिमान विकत नाही. यातूनच त्यांना समाजाचे वास्तव चित्रण दाखवून समाजवाद पेरायचा आहे हे दिसून येते.

अण्णा भाऊना  दोन व्यक्तिमत्व आदर्श होते मॅक्झीमगार्की आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर. दलित समाजाला सन्मान प्राप्त व्हावा अशी तळमळ दोघांच्याही विचारात होती. म्हणूनच अण्णा भाऊना यांचा आदर्श होता एवढेच नाही तर मॅक्झीम गार्कीचा छोटासा पुतळा मृत्युपर्यंत अण्णा भाऊनी जवळ जपला होता. सांगण्याचा मतितार्थ की अण्णा भाऊ हे समाजवादी होते. त्यांचा समाजवाद हा सत्य,समता,बंधुता यावर आधारला होता. आणि तो समाजवाद त्यांच्या प्रत्येक कथा,कादंबरी,पोवाडा,शाहिरी या साहित्यातून जनसामान्यापर्यंत पोहचतो.

५. साहित्यातील मार्क्सवादी – समाजशास्त्रीय दृष्टीकोण :

समाजशिक्षणासाठी त्यांनी आपल्या कथा कादंबऱ्याचा उत्कृष्ट उपयोग करून घेतला. साहित्यातून त्यांनी समाजप्रबोधन करण्यावर भर दिला. आपले समाजबांधव जागृत होऊन कथेतील नायकाप्रमाणे अन्यायाचा तिरस्कार करून परिस्थितीविरुद्ध बंड करावे असा संदेश त्यांचा होता. त्यांचे साहित्य हे केवळ रंजनासाठी नव्हे, तर उद्बोधनासाठी निर्माण झाले होते. त्यांच्या साहित्यातून नैतिक शिक्षणही मिळते समाजातील सर्व स्तरातील लोकांना शिक्षण उपलब्ध व्हावे म्हणून जातीव्यवस्था व निर्धनता अशा अडचणीवर मत करून सर्व लोकांचा शैक्षणिक विकास घडवून आणता येईल असा विश्वास अण्णाभाऊचा होता.

समाज प्रबोधनासाठी अण्णा भाऊंनीपुढीलप्रमाणे साहित्यनिर्मिती केली आहे.अकलेची गोष्ट (लोकनाट्य),अमृत,आघात,आबी (कथासंग्रह),आवडी (कादंबरी),इनामदार (नाटक, १९५८,)कापऱ्या चोर (लोकनाट्य),कृष्णाकाठच्या कथा (कथासंग्रह),खुळंवाडा (कथासंग्रह),गजाआड (कथासंग्रह),गुऱ्हाळ,गुलाम (कादंबरी),चंदन (कादंबरी),चिखलातील कमळ (कादंबरी),चित्रा (कादंबरी, १९४५),चिरानगरची भुतं (कथासंग्रह), १९७८),नवती (कथासंग्रह),निखारा (कथासंग्रह),जिवंत काडतूस (कथासंग्रह),तारा,देशभक्त घोटाळे (लोकनाट्य, १९४६),पाझर (कादंबरी),पिसाळलेला माणूस (कथासंग्रह),पुढारी मिळाला (लोकनाट्य, १९५२),पेंग्याचं लगीन (नाटक),फकिरा (कादंबरी, १९५९),फरारी (कथासंग्रह),मथुरा (कादंबरी),माकडीचा माळ (कादंबरी, १९६३),रत्ना (कादंबरी),रानगंगा (कादंबरी),रूपा (कादंबरी),बरबाद्या कंजारी (कथासंग्रह, १९६०),बेकायदेशीर (लोकनाट्य, १९४७),माझी मुंबई (लोकनाट्य),मूकमिरवणूक(लोकनाट्य),रानबोका,लोकमंत्र्यांचा दौरा (लोकनाट्य, १९५२),वारणेचा वाघ (कादंबरी, १९६८),वैजयंता (कादंबरी),वैर (कादंबरी),शेटजींचे इलेक्शन (लोकनाट्य, १९४६),सुगंधा,सुलतान (नाटक),कविता आणि माझा रशियाचा प्रवास (प्रवासवर्णन),पोवाडे व लावण्या इ.

अण्णाभाऊनी लिहिलेल्या कथावरून काही चित्रपटनिर्मिती करण्यात आली आहे. वैजयंता (१९६१, कादंबरी वैजयंता),टिळा लावते मी रक्ताचा (१९६९, कादंबरी आवडी),डोंगरची मैना (१९६९, कादंबरी माकडीचा माळ),मुरली मल्हारीरायाची (१९६९, कादंबरी चिखलातील कमळ),वारणेचा वाघ (१९७०, कादंबरी वारणेचा वाघ),अशी ही साताऱ्याची तऱ्हा (१९७४, कादंबरी अलगूज),फकिरा (कादंबरी फकिरा) इ.

जीवनातील सर्व सुखदुखाचा अनुभव घेऊन, अन्यायाविरुद्ध चीड आणि प्रतिभा याच्या जोरावर त्यांनी इतक्या मोठ्या साहियाची नीर्मिती केली आहे. तमाशा,शाहिरीतूनही समाजप्रबोधन करता येते. हे त्यांनी दाखवून दिले.त्यांच्यामुळेचतमाशाला सन्मान प्राप्त होऊ शकला. केवळ दीड दिवसाच्या शाळेवर त्यांनी एवढ्या मोठ्या साहित्याचे दालन वाचकाला निर्माण करून दिले.ज्यामुळे वाचकाला समताधिष्ठित समाजाची खरी ओळख होण्यास

मदत होईल. अण्णाभाऊंचे साहित्य वाचणारा वाचक वर्ग अण्णाभाऊंच्या वास्तववादी विचाराला कधीच नाकारू शकणार नाही.

ज्यांना ज्यांना अण्णाभाऊ खऱ्या अर्थाने समजतील तो त्यांचे साहित्य समाजात पसरवत राहील. म्हणूनच अण्णाभाऊ साठे समाजशास्त्रीय दृष्टिकोनाचे उद्गाते ठरतात.सत्य आणि अहिंसा यांचा परस्परसंबंध इतका घनिष्ठ आहे कि या दोन तत्वांना परस्परापासून वेगळे करता येत नाही सत्यावर निस्सीम अशी अण्णाभाऊची निष्ठा होती. परंतु आपल्या न्याय हक्कासाठी संघर्ष करण्याची प्रेरणा ही ते देतात.

**निष्कर्ष :**

परक्या सत्तेशी संघर्ष करून स्वाभिमानाने जगावे असे बाळकडूच अण्णा भाऊना लाभले होते. घरच्यांच्या आग्रहामुळे लहानपणी ते शाळेत गेले मुळाक्षरे काढता आली नाहीत म्हणून हाताची बोटे सुजेपर्यंत शिक्षकांनी मारले तेव्हा अपराध नसताना मार खावा लागला हि चीड घेऊन अण्णा भाऊनी शिक्षकाला दगड मारून शाळेतून पलायन केले. परत ते कधीच शाळेत गेले नाहीत परंतु त्यांची संवेदना त्यांच्यातील प्रतिभा विकसित करीत गेली ते अव्दीतीय साहित्यिक झाले.

वर्तमान काळात अण्णाभाऊचे साहित्य म्हणजे चिंतनाला नवी दिशा देणारे ठरते. आज प्रस्थापित साहित्य विचार आणि त्याचे मापदंड बदलत जात आहेत नवीन समीक्षा मुल्ये रुजत आहेत. परंतु अण्णा भाऊचे साहित्य नव्या पिढीला प्रेरणादायकच ठरेल केवळ दीड दिवसाच्या औपचारिक शिक्षणाचा लाभ झालेला मातंग समाजातील अण्णाभाऊसारखा माणूस अंतरराष्ट्रीय स्तरावर एक साहित्यिक म्हणून प्रतिष्ठा प्राप्त व्हावी हा एक मोठा चमत्कारच मानवा लागेल.

अण्णाभाऊंचा सन्मान म्हणून भारत सरकारने त्यांच्याजन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने भारतीय पोस्टाने खास टपाल तिकिटावर त्यांचे चित्र ठेवले. तसेच पुण्यातील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे स्मारक आणि कुर्ला मधील उड्डाणपूल यासह अनेक इमारतींना त्यांचे नाव देण्यात आले आहे. तसेच आत्तापर्यंत इतिहासात केवळ एका लेखकावर साहित्य संमेलन झाले ते अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलन होय. त्यांच्या विचारला अनुसरून सामाजिक विकास व्हावा सामाजिक बंधीलीकी जपली जावी. उपेक्षित जीवन जगण्याची कोणावरही वेळ येऊ नये यासाठी अण्णा भाऊच्या नावाने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) शासनाने स्थापन केले आहे. या मार्फत उपेक्षित असलेल्या आणि परिस्थितीने गांजलेल्यासाठी आर्थिक सहकार्य केले जाते.

अण्णाभाऊंच्या साहित्याची महिमा अंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचली असल्याने अनेक शालेय व विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात त्यांच्या कथा, कादंबरीचा समावेश झाला आहे. त्यांच्या साहित्याचे जगातील २७ भाषांमध्ये भाषांतर झाले आहे. वाटेगाव ते मास्को हा प्रवास करणारा लेखक साहित्याला मानवतावादाची भाषा शिकवून गेला, जगाला बदलण्याची प्रेरणा देऊन गेला.

अण्णाभाऊंचे योगदान भारतीय समाजाच्या जडणघडणीत महान होते. पुरोगामी व संयुक्त महाराष्ट्राच्या बांधणीसाठी त्यांचे योगदान मोलाचे राहिले आहे. त्यांच्या साहित्यातून मानवी मुल्यांची आणि समाजवादाची प्रेरणा सदैव वाचकाला होत राहील. आणि अण्णा भाऊंचे साहित्य ज्या ज्या वाचकाला समजेल तो न्यायासाठी बंड करून उठेल. आणि खऱ्या अर्थाने अण्णाभाऊ समाजशास्त्रीय सिंद्धाताचे अधिष्टान मांडतात त्यांनी सामाजिक वास्तवता आपल्या साहित्यातून उतरवली आहे.

त्यामुळेच त्यांचे साहित्य समाजशास्त्रीय सिंध्दातात भर टाकते. त्यांच्या साहित्यातून समाजशास्त्रीय दृष्टीकोण बळकट होतो आणि समाजाचे भीषण वास्तव वाचकासमोर आणतो त्यामुळे नवीन समाजशास्त्रीय दृष्टीकोनाचा प्रवाहसुध्दा वाचकासमोर येतो. अण्णाभाऊ साठेयांच्या साहित्यातून ओसंबणारा मार्क्सवाद खऱ्या अर्थाने मानवतेच्या परिसीमा गाठणारा आहे. कामगारजीवनाच्या दु:खाचे वास्तवचित्रण दाखवतो. जातीयता, अस्पृश्यता, विषमता, भेदभाव, अन्याय, दारिद्र्य, अंधश्रद्धा यांचे भिषण वास्तव अण्णाभाऊनी आपल्या साहित्यातून दाखवून दिले आहे.

खऱ्या अर्थाने त्यांना येथील व्यवस्थेचे मार्क्सवादी विश्लेषण करून या व्यवस्थेत अथवा येथील परंपरेत साम्यवाद निर्माण करायचा होता.

**संदर्भ ग्रंथ :**

१. चौसाळकर. (संपा),समाजप्रबोधन पत्रिका –मार्च २०११, कोल्हापूर, पृ २८-३०)

२.गायकवाड.अशोक, (संपा),न्यायचक्र साप्ताहिक–ओगस्ट २०१३,अण्णा भाऊ साठे जयंती विशेषांक,सोलापूर:अनुप प्रकाशन, (पृ.३४,३५.३७)

३.अहुजा.राम, २०००,'भारतीय समाजरचना एवं परिवर्तन'जयपूर : रावत पब्लिकेशन(पृ.६०-६५)

ISSN : 2278-9308
July 2021

४. गीते.विलास, २००२, अण्णा भाऊ साठे (मराठी कवी) लेखक: बजरंग कोरडे, अनुवाद',प्रकाशन : साहित्य अकादम
५. किशोर,राज.२००६, 'दलित राजनिति की समस्याएँ,' वानी प्रकाशन दिल्ली
६.सिंह.वि.एन.,२०१३,'भारत मे सामाजिक आंन्दोलन,रावत पब्लिकेशन्स दिल्ली
७. जोखे.विजयकुमार.२००३,'अण्णा भाऊ साठे : चरित्र आणि कार्य', नालंदा प्रकाशन
८.आगलावे.प्रदीप, २००३,'समाजशास्त्रीय संशोधन पद्धती' नागपूर: साईनाथ प्रकाशन...

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# भारतीय वर्ण,जातीव्यवस्था आणि आर्थिक परिस्थिती

**प्रा.डॉ.भगवान सांगळे**
बाबूजी आव्हाड महाविद्यालय पाथर्डी जि.अहमदनगर.
dr.sanglebd@gmail.com,Mobile No.9420272791

**प्रस्तावना:**

भारतात जातीव्यवस्थेच्या उदयाबद्दलचे निदान दोन मुख्य सिद्धान्त आहेत,आस्तिक आणि नास्तिक यास आर्य, द्रविडह्या दोन विचार सरणीमधील संघर्ष अनादिकाळापासून चालत आलेला आहे.द्रविड संस्कृती कृषिप्रधान होती. आर्य संस्कृती गोपालक व आधुनिक होती. आर्यांना भाषा व लिपीचे ज्ञान असल्याने त्याने अनेक ग्रंथरचना करून आपले विचार व संस्कृती द्रविड लोकांवर लादली. भारतीय समाजव्यवस्थेत वर्ण, जाती निर्माण करून आपले उच्चत्व,श्रेष्ठत्व कायम केले.या शोध निबंधामध्ये भारतातील वर्ण जातीव्यवस्था आणि तिचा भारतीय समाजावर झालेल्या आर्थिक परिणामाचा विचार केला आहे.

भारतीय समाजव्यवस्थेचा विचार करता अनादिकळापासून भारतात दोन विचारप्रवाह, पाहावयास मिळतात. पहिला प्रवाह वैदिक विचार व दूसरा द्रविड विचाराचा, वैदिक विचारप्रणालीमध्ये वर्ण जातीव्यवस्था निर्माण करण्यात आली. भारतातील द्राविडी लोकांना आर्यांनी जिकून घेतले व आपले दास बनवले. वर्ण, जातीव्यव्स्था निर्माण केली.या व्यवस्थेमध्ये आपले श्रेष्ठत्व कायम ठेऊन. आपल्या फायद्यासाठी वर्ण जातीव्यवस्था निर्माण केली. भारतीय समाजामध्ये ब्राह्मण, क्षेत्रीय,वैश्य, शूद्र अशी चातुर्वर्ण्य व्यवस्था निर्माण करून मानसामानसामध्ये भेद निर्माण केला . उत्तर वैदिक काळात मनुने मनस्मृती ग्रंथ लिहून वर्णव्यवस्थे बरोबर जातीव्यवस्था जन्मावर आधारित करून तिला अधिक बळकट केले. जी व्यक्ति ज्या जातीत जन्माला आली त्याच जातीचा व्यवसाय करणे बंधनकारक केले. शूद्र ,आदिवासी आणि महिला यांना आर्थिक,सामाजिक, शैक्षणिक ,धार्मिक,राजकीय विकासापासून वंचित ठेवले.

भारतीयावर मनुवादी विचाराने व मनुस्मृतीच्या कायद्याने मोठे अन्याय केले आहेत. मनुस्मृतीमुळे देशातला बहुसंख्य असलेला बहुजन समाज हक्क व अधिकारापासून वंचित राहिला. ब्राम्हण, क्षत्रिय,वैश्य आणि शुद्र असे चार वर्ण निर्माण केले. यातील ब्राम्हण वर्ण संपूर्ण अधिकार संपन्न व शुद्र हे अधिकार वंचित होते. शूद्र,अस्पृश्य ,महिला यांचे माणूस म्हणून जगणे नाकारले. प्राचीनकाळी सप्तबंदी लागू होती. यातील शिक्षण, संपती, शस्त्र, रोटी, बेटी, तट व समुद्र उल्लंघन या सातप्रकारच्या बंदी असल्यामुळे शुद्रवर्णाचे लोक अशिक्षित व दरिद्री जीवन जगत होते. धर्मशास्त्राप्रमाणे शुद्र वर्णाच्या व्यक्तीने शिक्षण घेण्याचा पर्यंत केल्यास त्याचे डोळे काढावे, त्याची जिभ छाटावी व त्याच्या कानात शिशे ओतावे असा धर्म कायदा होता.

भारतातील वर्ण,जातीचे व्यवसाय,जातीवर व जन्मावर निश्चित केले होते. जातिनुसार सामाजिक श्रमविभागनीकरण्यात आली होती. चार वर्णांच्या संज्ञा ज्याप्रमाणे विशिष्ट व्यवसायदर्शक आहेत, त्याचप्रमाणे व्यवसायांचे उच्चनीच स्थान ठरवून त्या भिन्नभिन्न व्यावसायिक समूहांना जन्मतः जात लाऊन मनुने त्यांचे उच्च व नीच स्थान निश्चित केले होते.

भारतातील वर्ण,जातीव्यवस्थेचे पूर्ण आकलन करावयाचे असल्यास सर्वप्रथम भारताच्या, धार्मिक,सामाजिक आणि राजकीय,आर्थिक प्रक्रियाव व्यवहार यांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त आहे.

**वर्ण व जात या शब्दाचा अर्थ**

भारतात जी वर्ण,जातीयव्यवस्था अस्तिवात आहे. तर जगातील इतर देशात वर्ग,वंशभेद मानले जातात. "ऑक्सफर्ड इंग्रजी शब्दकोशाप्रमाणे caste हा शब्द पोर्तुगीज कास्टा मधून येतो ज्याचा अर्थ 'वंश, वंशपरंपरा, शुद्ध

ISSN : 2278-9308
July 2021

आणि कश्याचेही मिश्रण नसलेली वीण किंवा वंश' म्हणजेच कास्ट असा आहे." जरी, भारतीय भाषांमध्ये कास्ट या शब्दाचे तंतोतंत भाषांतर केले जाऊ शकत नसले तरीही, वर्ण किंवा ज्ञाती हे त्याच्या जवळ जाणारे संस्कृत शब्द आहे.

"वर्ण ह्या शब्दाचा अर्थ प्रकार, रंग, वर्ग, प्रत, वर्ण हे प्राचीन वैदिक समाजातील भारतातील लोकांचे वेगवेगळया गटात विभाजन करणारी व्यवस्था होती. अनेक प्राचीन भारतीय ग्रंथांमध्ये याचा उल्लेख आढळतो."

**संशोधनाची उदिष्टे :**

- भातातील वर्ण,जातव्यवस्थेची संकल्पना समजून घेणे.
- भारतीय जातीव्यवस्थेचा धार्मिक,सामाजिकपरिस्थितीचा अभ्यास करणे.
- भारतीय जातीव्यवस्थेचा आर्थिकपरिस्थितीचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती:**

हा संशोधन लेख पूर्ण करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम संसाधनाचा वापर करण्यात आलेला आहे. ज्यामध्ये विविध संदर्भ ग्रथ, पुस्तके, मासिके, साप्ताहिके, वर्तमान पत्रातील लेख, इत्यादी. तसेच इंटरनेटवरील माहितीचा आधार घेतला आहे. प्रस्तृत संशोधन लेख पूर्ण करण्यासाठी विवेचनात्मक आधारित पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**भारतीय वर्ण जातीव्यवस्थेची धार्मिक ,सामाजिक परिस्थिती:**

भारतीय वर्ण,जातीव्यवस्था ही भारतीय समाजाची पायाभूत व्यवस्था असल्याचे मानले जाते. अनादिकाळापासूनभारतात वर्ण, जातीव्यवस्थेचा विकास झाला. मध्ययुगीन काळात वर्ण,जातीव्यवस्थेमध्ये फारसे परिवर्तन झाले नाही. संतांनी समाजरचना बदलण्याचा प्रयत्न केला त्यांना फारसे यश आले नाही.ह्या काळामध्ये राजकीय बदल मोठ्या प्रमाणात झाले.पण त्याचा परिणाम भारतातील वर्ण,जातव्यवस्थेवर झाला नाही. मुघल साम्राज्याच्या काळात,मुस्लिम,हिंदू धर्मिया यांच्यामध्ये सत्ता संघर्ष झाला.वेळ प्रसंगी रोटी,बेटी,व्यवहार झाला. पण याचा परिणाम इथल्या वर्ण,जातीव्यवस्थेमध्ये अडकलेल्या समाज व मानसाच्या आर्थिक जीवनावर झाला नाही.सध्या अस्तित्वात असलेली वर्ण,जातीव्यवस्था ही गुप्त काळात अधिक मजबूत करण्यात आली. अस्पृश्य हा पाचवा वर्ण याच काळात उदयास आला आहे.भारतीय समाजरचना अनेक स्थित्यंतरातून निर्माण झालेली आहे. मध्यकाळामध्ये अनेक शक्तिशाली व्यक्तीचा आणि गटांचा उदय झाला. त्यांनी स्वतः राजेशाही, निर्माण केली . धर्ममार्तंड आणि ब्राह्मण यांच्या विरुध्द बंड करण्याची ताकद त्याच्यात नव्हती. जातीव्यवस्था सनातन संकल्पनांपासून बनलेली आहे., वर्ण,जातीव्यवस्था सामाजिक,आर्थिक,धार्मिक शोषण करण्यासाठी निर्माण केलेली व्यवस्था आहे.

भारतात सामाजिक,आर्थिक,धार्मिक ,राजकीय परिवर्तनास सुरुवात इंग्रज कालखंडात झाली. भारतातिल विषमतेवर मात करण्यासाठी आजच्या भारतीय समाजामध्ये राजकीय, शैक्षणिक आणि सामाजिक पातळयांवर शिक्षण देण्याची व्यवस्था निर्माण करण्यात आली.ह्या सामाजिक बदलामुळे अनेक जातिबाह्य गटांमध्ये परिवर्तन होण्यास मदत झाली.

१६ व्या शतकात ब्रिटिश भारतात आले. ब्रिटीशांनी भारतीय समाजाला दिलेल्या आधिकारा मुळे जातीय स्तरावर वेगवेगळे मते मांडायला सुरूवात केली. इंग्रजांनी विविध प्रशासकीय पदे आणि कामे ही फक्त उच्च जातीय लोकांनाच देण्याचे धोरण तसेच ठेवले .१८५७ साला नंतर इंग्रजांना मोठ्या प्रमाणात भारतीय समाजातून विरोध निर्माण झाला.ब्रिटीशांना त्यांच्या ह्या धोरणामध्ये बदल करावा लागला. राणीचा जाहीरनामा जाहीर झाला आणि त्यापुढे ब्रिटीशांनी सरकारी नोकऱ्यांच्या काही पदांवर आणि एकूण पदातील काही टक्के पदांवर खालच्या जातीच्या लोकांनाही घ्यायला सुरुवात केली. इंग्रजांनी भारतातील अनेक शोषित, उपेक्षित,शूद्र,अतिशुद्र जाती - जमातीतील शूरवीर तरुणांना आपल्या सैन्यामध्ये स्थान दिले. त्यामुळे या तरुणांच्या मनामध्ये आधुनिक विचार रुजले व सामाजिक परिवर्तनात सुरुवात झाली.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर अनेक बदल झाले. भारतीय संविधानाने भारतातील बहुजन,अनुसूचित जाती,जमातीचे शतकानुशतका पासूनचे आर्थिक,सामाजिक,शैक्षणिक, मागसलेपणा लक्षात घेऊन, त्यांच्या

विकासासाठी भारतीय संविधानात आरक्षणाची तरतूद करण्यात आली. सन १९५६ नंतर भारत सरकारने अनेक कायदे केले. खालच्या जातीच्या, गटांच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा आणण्यासाठीमंडल आयोगाची स्थापना केली .त्यानुसार नंतर मंडल आयोगाच्या शिफारसीनुसार आरक्षण लागू करण्यात आले. सरकारी पदांमधील आरक्षणे आणि इतर सोयी सुविधा ह्या भारतीय संविधांनंनुसार मागासलेल्या जातीतील लोकांना मिळतील आणि ह्या सेवा-सुविधा लाभार्थ्यांकडून इतर दुसऱ्या कोणाला देता येणार नाहीत.जातीय पातळीवर भेदभाव करणे हे भारतीय संविधानाच्या कलम १५ नुसार बेकायदेशीर ठरवण्यात आलेले आहे.सामाजिक समता प्रस्थापित केली .

**वर्ण, जातीव्यवस्थेची आर्थिक परिस्थिती:**

भारत हा वर्ण, जाती प्रधान देश आहे. अनेक व्यवसाय जातीयनिहाय चालत असत.एक जातीचा व्यवसाय दुसरी जात करत नसे.प्रत्येक व्यवसाय वर्ण जातीसाठी बंदिस्त होते. त्यामुळे भातातील शुद्रां,अतीशूद्रांचा फारसा आर्थिक विकास होऊ शकला नाही. पिढ्यांपिढ्या गरीबी ,दारिद्र्य गुलामी, लाचारी यामध्ये तो सडत होता.भारतातील बहुजनाचा प्रामुख्याने शेती हाच व्यवसाय असल्याकारणाने त्यास शेतीमधुनच आर्थिक फायदा होत असे. भारतातील बहुजनाचे मागासलेपन लक्षात घेऊन, त्यांच्या, आर्थिक विकासासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले विचार महत्वाचे आहेत. ते लिहितात."रशियाच्या धर्तीवर सामुदायिक शेतीची पद्धती स्वीकारली पाहिजे. कारण सामूहिक शेतीमध्ये सामाजिक अन्याय व शोषण होत नाही तसेच शेतीचे राष्ट्रीयीकरण करून पीक पद्धती, पाणी पद्धती, उपलब्धता,उत्पादकता वाढ,साठवण व्यवस्था शेतीमालाची विक्री,शेतमालाचे भाव यांच्या संदर्भात विशिष्ट कायदा करून त्यांच्या माध्यमातून बहुजनाचा आर्थिक विकास घडून येण्यासाठी विशिष्ट कायदा करण्यात यावा".

भारतातील आर्थिक विषमता दिवसेंदिवस वाढत चालली आहे.देशातील संपत्तीचे एका विशिष्ट गटाकडे केंद्रीकरण होत आहे.भांडवलदार वर्गाची मक्तेदारी वाढत आहे. गरीब आणखी गरीब होत आहे. आणि श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहे.वर्तमान सरकार भांडवलदार धार्जिन कायदे व धोरण आखत असल्या मुळे, देशात आर्थिक विषमता वाढत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वर्ण ,जातीयव्यवस्था सुधाण्याकरिता राष्ट्रीय संपत्तीचा वापर हा गरीब जनतेचे शोषण न करता त्यांचे जीवनमान कसे सुधारता येईल . यासाठी शासनाने संपत्ती विशिष्ट गटाकडे केंद्रीकरण न होऊ देता ती गोरगरीब, दलित, शोषित जनतेपर्यंत गेली पाहिजे.देशातील संपतीचे राष्ट्रीयकरण करून तिचे समान वाटप करावे. त्यामुळे आर्थिक विषमता कमी होईल असे सांगितले. परंतु आज उलटपरिस्थिती पहावयास मिळते. वर्तमान सरकार राष्ट्रीय संपतीचे खाजगीकरण करून भांडवलदाराना विकत आहे. त्यमुळे देशात बेरोजगारी वाढत आहे.तसेच महागाई वाढत आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी गोरगरीब ,दलित, बहुजनसाठी कामगारांसाठी अनेक कायदे केले.कामगारांमधील वर्ण, जाती संदर्भात ते लिहितात "श्रम विभागणी ही श्रम विभागणी नसून जातीची विभागणी आहे.ती वर्णव्यवस्थेला खतपाणी घालणारी आहे". कामगारांना मिळणारे फायदे, नुकसान भरपाई,आरोग्य विमा योजना, दीन ,दलित गरिबांना देखील मिळायला पाहिजे. याचा खर्च शासनाने करावा.यामुळे जातीयव्यवस्था सुधारेल.भारतातील लोकसंख्येचा विचार करून जातीय व्यवस्थेची आर्थिकपरिस्थितीसुधारण्याकरिता वेगवेगळ्या योजनांची आखणी करून प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. जेणेकरून जातीय नष्ट होऊन आर्थिकविषमतेचे प्रमाण कमी होईल.

**सारांश :**

भारतातील वर्ण ,जातीभेद संपवायचा असेल तर भारतीय माणसाच्या मनातील वर्ण,जाती विषमतेचे जळमटे जाळून टाकवायचे असतील तर भारतीय मानसाच्या मनामध्ये भारतीय संविधानाने दिलेला समता,स्वतंत्र्य,बंधुता आणि न्याय ही धर्मनिरपेक्ष, मानवतावादी मूल्ये भारतातील लोकांच्या मनामध्ये रूजली पाहिजे. भारतातील वर्ण,जातीव्यवस्था ही हिंदूसमाजाची समस्या आहे. हे मानायलाच अजून भारतीय माणूस तयार नाही.भारतीय माणसाची जीवनविषयक दृष्टीकोण सनातन विषमतावादी विचारची आहे. त्यांच्या विषमतावादी विचाराचा

आधार घेऊन भारतीय समाजात जगणे आज विज्ञानयुगात अशक्य आहे . काळाप्रमाणे बदलने मानवी विकाससाठी गरजेचे आहे .डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते एखादा " समाज जगतो कि मरतो हा मुलभूत प्रश्न महत्वाचा नसून जगण्याच्या अनेक तऱ्हा असतात.त्यामुळे नुसतेच जगणे व मानाने जगणे यात फरक आहे.कोणत्याही हिंदूने काळाच्या ओघात जिवंत राहिलो.या कल्पनेत समाधान मानणे योग्य नाही.कारण ते सतत पराभूताचे जीवन जगत आले आहे. त्यामध्ये अधोगती मात्र कायम स्वरुपाची आहे."

जोपर्यंत भारतातील वर्ण,जातीरचना बदलणार नाही. तोपर्यंत भारतात कोणतीही सामाजिक,धार्मिक,आर्थिक सुधारणा घडवून आणणे असंभव आहे. या संदर्भातडॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे म्हणतात "जातीच्या आधारावर कोणती ही इमारत उभी करता येणार नाही .तुम्ही राष्ट्रनिर्माण करू शकत नाही.इतकेच काय पण चारित्र्यसंपन्न पिढीसुद्धा तुम्ही तयार करू शकत नाही.तुम्ही जातीच्या आधारावर काहीही करायला जाल तर ते कोसळून पडल्याशिवाय राहणार नाही." भारतीय समाजात जातीव्यवस्थेचे निर्मुलनासाठी आंतरजाती विवाहास प्राधान्य देणे गरजेचे आहे .असे मला वाटते.

**संदर्भग्रंथ:**

१.डॉ.भालचंद्र मुंणगेकर,भारतातील आर्थिक सुधारणा आणि दलित एक आंबेडकरी दृष्टीकोन.
२.वामन मेश्राम ,मराठा, कुणबी, ओ.बी.सी.
3.डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे . खंड २०.
४. प्रा.डॉ.दिलीप खैरनार,समाजशास्त्र परिचय, डायमंड पब्लिकेशन,पुणे.
५.प्रा.डॉ.डी.आर.जाधव," डॉ.आंबेडकर के आर्थिक विचार ".

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)

ISSN : 2278-9308 July 2021

# भारतीय वर्ग, वंश आणिजातिव्यवस्थेच्या उत्पत्तीसंबंधी डॉ. जी. एस. घुर्ये यांचे विचार

डॉ. भगवान सुरेश मनाळ

सहाय्यक प्राध्यापक , समाजशास्त्र विभाग श्री मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर

जि. औरंगाबाद

Email- bhagwansmanal@gmail.com,Mob. No. 9730424579

**गोषवारा**

घुर्ये यांनी भारतविद्या दृष्टिकोनातून भारतातील जातिव्यवस्थेचे विश्लेषण केले आहे. त्यात ऋग्वेद, मनुस्मृती व ब्राह्मण ग्रंथाच्या स्रोतांचा अवलंब केला. जातिव्यवस्थेला एक पूर्णतः विशिष्ट भारतीय घटनेच्या स्वरूपात न समजता त्याच्यासहा वैशिष्ट्यांची चर्चा करून त्याच्या सांस्कृतिक व सामाजिक घटकाला समजण्याचा प्रयत्न केला आहे. घुर्ये जातिव्यवस्थेच्या उत्पत्तीसंबंधी विश्लेषणात आपल्या पूर्वीच्या विद्वानांप्रमाणे केवळ मनुस्मृतीत उल्लेख केलेल्या वर्ण मॉडेलचाच आधार सांगत नाही तर ऋग्वेद, मनुस्मृती, उपनिषद तसेच ब्राह्मण ग्रंथ इ. विश्लेषणाच्या आधारावर निष्कर्ष दिले आहेत. भारतामध्ये जातिव्यवस्थेच्या उत्पत्तीसाठी मुख्यतः इंडो-आर्यन संस्कृतीतील ब्राह्मण जबाबदार आहेत. ज्यांनी आपली शुद्धता आणि अधिपत्य कायम राखण्यासाठी ही व्यवस्था निर्माण केली. जातिव्यवस्थेला समजण्यासाठी उपजातींना समजणे आवश्यक आहे. घुर्ये यांनी पीएच.डी. प्रबंधाचे लिखाण सन १९३२ मध्ये Caste and Race in India नावाने प्रकाशित केले.

केंब्रिजमधील जाती संदर्भातील संशोधन अध्ययनात चार विषय होते. त्यात त्यांनी सुधारणा करून एक सखोलपणे ग्रंथ प्रकाशित केला. आता सर्वश्रेष्ठ सखोल समाजशास्त्रीय अभिजात (classic) ग्रंथ बनला. या ग्रंथात एक गहन ऐतिहासिक दृष्टिकोनातून जाती समस्यावर तडजोड केली आहे. त्यांनी या लिखाणातून जातिव्यवस्थेच्या उत्पत्तीवर प्रकाश टाकला वभारतीय लोकांना आकर्षित केले आहे. त्यांच्या पुस्तकाची दोन वैशिष्ट्ये राहिलेली आहेत. १. घुर्येनी जातिव्यवस्थेची उत्पत्ती वंशातून झाल्याचे म्हटले आहे आणि २. समाजशास्त्राला एक योगदान दिले आहे. त्यांनी या पुस्तकात जातीसारखी लक्षणे भारताबाहेर अस्तित्वात असल्याचे म्हटले आहे. त्यात इजिप्त, पश्चिम आशिया, चीन, जपान, रोम व आदिवासी युरोप इ. या पुस्तकाच्या सन १९६९ मधील नवीन आवृत्तीमध्ये उपजात, उपजाती व आप्तांची उत्क्रांती, जात आणि राजकारण, अनुसूचितजातीची स्थिती ही विस्तृत प्रकरणे जोडली आहेत. या नवीन आवृत्तीच्या समारोपात उच्च संशोधन-योग्य निरीक्षणे नोंदविलेली आहेत. त्यांनी जाती व वंश संबंधीच्या या पूर्वीच्या विद्वानांच्या सिद्धांतांची चिकित्सा केलेली आहे. यात ब्रिटिश वसाहतवादीअधिकारी आणि मानवशास्त्राचे अभ्यासक हर्बर्ट रिझले होते. रिझले यांच्या विचारानुसार मानवाचे विभाजन त्याच्या शारीरिक वैशिष्ट्यानुसार होते. जसे डोक्याचा आकार, नाकाची लांबी किंवा कपाळ इ. तून भिन्न भिन्न वंशामध्ये विभाजन होते. रिझले मते भारतातील विभिन्न वंशाचा उदय हा विकासाच्या अध्ययनाची एक विशिष्ट प्रयोगशाळा होती. कारण जाती या खूप काळापासून विभिन्न समूहामधील अंतर्विवाहाला निषिद्ध मानत आल्या आहेत. रिझले मते जातीचा उगम वंशापासून झाला असावा. कारण विभिन्न जाती समूह एखाद्या वंशाशी संबंधित वाटतात. सामान्यपणे उच्च जातीमध्ये आर्य वंशाची लक्षणे आढळतात, तर निम्न जातीमध्ये अनार्य जमाती, मंगोल व अन्य वंश गुण बघायला मिळतात. रिझले यांच्या मते निम्न जाती भारताचे आदि-निवासी आहेतत्यांना बाहेरून येऊन भारतात वास्तव्य केलेल्या आर्यांद्वारे आधीन केले आहे. घुर्ये यांचे दुसरे पुस्तक, जात, वर्ग व व्यवसाय (caste, class and occupation) या पुस्तकामध्ये क्षेत्रकार्याबरोबर प्राचीन ग्रंथामध्ये उल्लेखित स्रोतांच्या आधारावर जातिव्यवस्थेची लक्षणे व त्याच्या उत्पत्तीबाबत विचार सांगितलेले आहेत.त्यांनी ऋग्वेद, मनुस्मृती व ब्राह्मण ग्रंथांना स्रोत ग्रंथ मानून जातिव्यवस्थेला पूर्णतः विशिष्ट भारतीय घटना म्हणून स्वीकारलेले नाही तर सहा प्रकारच्या विशेष वैशिष्ट्यांची चर्चा करून सांस्कृतिक व संरचनात्मक अंगाला समजण्याचा प्रयत्न केला. त्यांनी जातिव्यवस्थेच्या उत्पत्तीसंबंधी विश्लेषणामध्ये आपल्या पूर्वीच्या विद्वानांप्रमाणे केवळ मनुस्मृती उल्लेखातील वर्ण मॉडेलला आधार मानले नाही; परंतु ऋग्वेद, मनुस्मृती, उपनिषद व ब्राह्मण ग्रंथ इ. च्या विश्लेषणाधारे निष्कर्ष सांगितले आहेत. प्रस्तुत लघु शोध निबंधाच्या माध्यमातून डॉ. जी. एस. घुर्ये यांचेभारतीय वर्ग, वंश आणिजातिव्यवस्थेच्या उत्पत्तीसंबंधी विचारस्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

ISSN : 2278-9308
July 2021

**प्रास्ताविक**

जाती व वंशसंबंधी विचार डॉ. जी. एस. घुर्ये यांचे विचार समजून घेतांना मुखत्वे त्यांच्या लिखाणातून स्पष्टपणे जाणवते की,भारतातील जातिव्यवस्थेच्या उत्पत्तीसाठी मुख्यतः इंडो-आर्यन संस्कृतीचे ब्राह्मण जबाबदार राहिले आहे. ब्राह्मणांनी आपली शुद्धता आणि अधिपत्य (वर्चस्व) कायम ठेवण्यासाठी या व्यवस्थेला उत्पन्न केले. घुर्ये यांच्या मते जातिव्यवस्थेला समजण्यासाठी उपजातींना जातीची मान्यता देणे आवश्यक आहे. त्यांनी जातिव्यवस्थेच्या गतिशीलतेलासुद्धा दर्शविले आहे. त्यात इसवी सनाच्या प्रारंभी शतकामध्ये वैश्य हे शूद्र आणि शूद्र हे वैश्य कसे झाले हे सांगितले आहे.आहे. रिझले यांच्या तर्काशी घुर्ये सहमत होते; परंतु त्यांनी अंशतः सत्य मानले होते. कोणत्याही समुदायाच्या परिवर्तनाला लक्षात न घेता जे केवळ सरासरी आधारावर विशिष्ट मापदंड लागू केले जातात या समस्याकडे घुर्येनी लक्ष दिले. घुर्ये यांच्या मते रिझले यांनी उच्च जातीला आर्य व निम्न जातीला अनार्य मानले होते, हे व्यापक रूपात केवळ उत्तर भारतीयासाठी खरे होते. भारताच्या अन्य भागातील आंतरसमूहाची भिन्नता मानवमिती मापने ही अधिक व्यापक अथवा व्यवस्थित नव्हती. याचा अर्थ असा की, सिंधू-गंगा मैदान सोडले तर विभिन्न वांशिक वर्गाचा आपापसात खूप काळापासून संबंध व मिश्रण होते. शेवटी असे दिसते की, वांशिक शुद्धता केवळ उत्तर भारतामध्येच शिल्लक राहिली होती कारण तेथे अंतर्विवाह होता. उर्वरित भारतातअंतर्विवाहाचे (जाती लक्षणांमध्ये विवाह करणे) प्रचलन अशा वर्गात झाले जे वांशिक स्तरावर भिन्न होते. आज जातीच्या या वांशिक सिद्धांताला मानले जात नाही; परंतु २० व्या शतकाच्या पूर्वार्धात सत्य मानले जात होते. ज्या काळात इतिहासकारांमध्ये आर्य आणि भारतीय महाद्वीपमधील त्यांचे आगमन याबाबत मतभेद होते त्या काळात घुर्ये लिहीत होते.

**लघुशोध निबंधाची उद्दिष्टे :-**

१. भारतीय वर्ग, वंश आणिजातिव्यवस्थेच्या उत्पत्तीसंबंधीजातिव्यवस्थेच्या संरचनात्मक लक्षणांचा अभ्यास करणे.

२. डॉ. जी. एस. घुर्ये यांचेजाती उत्पत्ती व उपजाती निर्मितीविषयक विचारजाती उत्पत्ती व उपजाती निर्मितीविषयक विचार अभ्यासणे.

डॉ. जी. एस. घुर्ये यांनी जातिव्यवस्थेला एक जटिल घटना मानले आहे. त्यांनी गुणधर्म पद्धती वा लाक्षणिक पद्धतीचा अवलंब करताना जातिव्यवस्थेचे स्वरूप व संरचनेला समजण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भात घुर्ये यांनी जातिव्यवस्थेच्या सहा गुणधर्माला जातिव्यवस्थेचे महत्त्वपूर्ण निर्धारक तत्त्व मानले आहे. घुर्ये यांनी १९३२ मध्ये जातीचे विश्लेषण केले. त्यांनी प्रत्येक जातीला क्रमपरंपरेच्या श्रेणीमध्ये एक-दुसऱ्यापेक्षापृथक मानले. ही श्रेणीरचना जातीच्या आपल्या सहज गुणातून निर्माण झाली. जातीची एक विस्तृत परिभाषा करण्यापेक्षा त्यासाठी जातिव्यवस्थेची सहा संरचनात्मक लक्षणे दिली आहेत ती खालीलप्रमाणे:

**१. समाजाचे खंडात्मक विभाजन -** जातीचे एक प्रमुख वैशिष्ट्ये खंडात्मक विभाजनावर आधारित आहे. जातीच्या संकल्पनेचे विश्लेषण खंडात्मक विभाजनाच्या आधारावर केले जाऊ शकते. जातिव्यवस्थेमुळे समाजात अनेक लहान-लहानसांस्कृतिक समूह निर्माण झाले. प्रत्येक जातीची तिच्या व्यवसायानुसार व परंपरानुसार एक विशिष्ट संस्कृती बनलेली होती. जातीचे नीतिनियम, कुळदैवत, वेषभूषा, आहार, विवाहविषयक नियम, श्रद्धा विभिन्न होते. जाती-जातींची नावे वेगळी, त्यांची संस्कृती वेगळी होती. जाती जन्मावर आधारित होत्या वा आहेत. जाती सदस्याचे निर्धारण जन्मावर आधारित असते. जातीचा एक सामाजिक समूह वा जन्माने निर्धारित सदस्यता प्राप्त होते. समाजाचे खंडात्मक विभाजन हे खंड वा विभाजीकरणात जाती वा खंडाची एक संख्या असून ज्यात प्रत्येकाचे आपले एक जीवन असते. प्रत्येक जातीसंदर्भात स्वतःचे नियम, उपनियम,नैतिकतेची प्रमाणके व न्याय यांची तरतूद असते.

**२. श्रेणीरचना -** घुर्ये यांच्या मते जाती विभाजनाची श्रेणीरचना व्यवस्थाबद्ध आहे. श्रेणीरचना एक योजना आहे. जातीचा संदर्भ हा उच्च वा श्रेष्ठ आणि नीच वा निम्न दर्जा असे संबंध एक दुसऱ्यामध्ये आहेत. एका विशेष जाती समूहाचीसापेक्ष श्रेणी ही एक दुसऱ्या जातीपेक्षा वेगळी असते; परंतु प्रत्येक स्थानी ब्राह्मण हे उच्च होते आणि अस्पृश्य हे श्रेणीरचनेत तळाला होते. पवित्र आणि अपवित्र किंवा उच्च-नीच असे व्यवसायाचे मूल्यमापनही करण्यात आले होते. हिंदू समाजात प्रत्येक क्षेत्रात धर्माचा अंमल चालत असल्यामुळे धर्मग्रंथाचे रक्षण, नियम, श्रद्धा, देवकार्य, विधी, इ. कामांना अधिक महत्त्व प्राप्त होते. साहजिकच ही कामे करणारे ब्राह्मण हा प्रतिष्ठेने सर्वश्रेष्ठ ठरले. जाती-जातीत आपणच उच्च आहोत अशी अंहम् भावना दिसून येते. उच्च-नीच दर्जा बद्दल स्पर्धा पोटजातींमध्ये आढळून येते.

**३. खानपान व सामाजिक व्यवहारावर निबंध/शुद्धता व अशुद्धतेचे तत्त्व** -जातीमधील दूरत्त्व वा अलगपणा वरील दोन लक्षणांवरून प्रतिबिंबित होतो. शुद्धता व अशुद्धतेच्या तत्त्वाद्वारे अधिक शक्तिशाली अलगपणा जातिव्यवस्थेत आहे. शुद्धता व अशुद्धतेचे तत्त्व हे एक-दुसऱ्या जातीत खानपान स्वीकृतीचे नियम निर्माण करते. अभ्यासात असे लक्षात आले की, अधिकतर जातींना कच्चा भोजन घेण्यास आपत्ती जाणवत नाही किंवा ब्राह्मणांकडून शिजवलेले अन्न

व पाणी घेण्यास हरकत नव्हती. उच्च जाती या पक्का भोजन वा तुपात तळलेले अन्न असेल तर निम्न जातीकडून घेत होते; परंतु अस्पृश्यांकडून अन्नवा पाणी मात्र घेत नव्हते त्यांना स्पर्श करणेसुद्धा अशुद्धता होती. जाती ही खानपानाशी संबंधित आहे. चरितार्थाच्या अर्थव्यवस्थेवर आधारित परंपरागत व्यवसायाचे विवेचन जातीच्या विविध घटकांशी संबंधित आहे. जाती आधारावर समाजात असमानता आहे. जाती संरचनात्मक दूरत्त्वाचे कारण आहे.

**४. धार्मिक अयोग्यता आणि विभिन्न वर्गाचे विशेष अधिकार -** धार्मिक कर्मकांड, व्यवसाय, सामाजिक प्रतिष्ठा व मानसन्मान आणि इतर काही अंगामध्ये काही जातींना विशेष अधिकार प्राप्त आहेत. समाजाच्या विभिन्न वर्गात अधिकार व जबाबादारीचे असमान वाटप हा समाजाच्या श्रेणीरचनात्मक विभाजनाचा परिणाम आहे. एक जात अर्थात ब्राह्मणांचा कर्मकांडात्मक दर्जा आणि व्यवसायाच्या स्वरूपातून अयोग्यतेचे स्वरूप हा महत्त्वपूर्ण निर्धारक आहे. उच्च जातीचे बोलणे, पोषाख व रीतीरिवाज याची नक्कल निन्म जातीच्या लोकांनी करणे हे समाजाच्या नियमाविरुद्ध होते.

**५. व्यवसाय निवडीचा अभाव -** प्रत्येक जात वा समूह एक वंशागत व्यवसायाशी जोडलेली होती. त्याच्यावर शुद्ध व अशुद्ध हे निश्चितपणे ठरत होते. शुद्धता व अशुद्धतामधील व्यवसाय, जाती संबंधित वंशागत व्यवसायावर समाजातील दर्जानिश्चित होत होता. जाती व्यवसायाच्या कारणामुळे जाती एक-दुसऱ्यावर परस्पर संबंधित व आंतरसंबंधित आहेत. जाती स्वावलंबी अर्थव्यवस्थेवर आधारित आहेत. घुर्ये मते जाती व्यवसाय पिढ्यांपिढ्या हस्तांतरित होत असतो. कुटुंबातील सामाजीकरणाची प्रक्रिया ही जातीनुरूप व्यवसाय प्रशिक्षण देते. व्यवसायाच्या आधारावर जातीची ओळख बनते.

**६. विवाहावर निर्बंध -** जातिव्यवस्था अंतर्विवाहाच्या नियमावर आधारित आहे. सुनिश्चित व सुपरिचित आधारावर हिंदूमध्ये वैवाहिक संबंधाची स्थापना निश्चित आहे. जातीमध्ये आंतर-जातीविवाह हा निषिद्ध होता. त्यामुळे आपल्याच जाती समूहात व्यक्तीला विवाह करावा लागतो अर्थात तो अंतर्विवाह असतो. प्रत्येक जात लहान उपजातीने विभाजित होती. घुर्ये यांच्या मते अंतर्विवाह हे जातिव्यवस्था पाठीमागचे प्रमुख कारक आहे. जातिव्यवस्थेचे स्थिरत्त्व व संरचनात्मक सातत्याचा मूलभूत आधार अंतर्विवाहाशी संबंधित आहे. घुर्ये यांची जातीची परिभाषा जातीचे व्यवस्थित अध्ययन करण्यास साहाय्यक ठरते. त्यांची परिभाषा संकल्पनात्मक आहे जी शास्त्रीय ग्रंथांवर आधारित आहे. खरेतर जाती या अनेक रूपात परिवर्तीत होत आहेत.

**जाती उत्पत्ती व उपजाती निर्मितीविषयक विचार:-**

घुर्ये यांच्या मते जाती एक जटिल संकल्पना आहे. जातीच्या व्याख्यामध्ये उपजातींचे विश्लेषण अपरिहार्य आहे. काही जाती राष्ट्रव्यापी आहेत. काही जातींचे अस्तित्व सीमित क्षेत्रांमध्ये अनुभवले जाते. जातीमध्ये अनेक उपजाती अस्तित्वात आहेत. साधारणतः एक उपजाती व दुसऱ्या उपजातीमध्ये खानपान व वैवाहिक संबंधाबाबत एक प्रकारचे दूरत्त्व अनुभव करते.जातीचे जटिल व गुंतागुंतीचे स्वरूप विविध सामाजिक संस्थांना प्रभावित करीत असल्यामुळे त्यांनी विविध अंगाने अभ्यास केलेला दिसतो. समाजाचे निरनिराळे भाग एकमेकांपासून वेगवेगळे होऊन जाती निर्माण झाल्या अशी जातीबद्दलची विचारसरणी व विभाजन याच्यामागे उत्पत्ती होती. डॉ. घुर्ये यांनी जातीची उत्पत्ती व उपजाती या जातीच्या विभाजनामुळे बनल्या असल्याची कल्पना मांडलेली आहे. उपजाती नावाने ओळखल्या जाणाऱ्या, मोठ्या समूहांतर्गत असलेल्या लहान समूहांच्या नावांचा सूक्ष्म अभ्यास केला तर असे दिसून येते की, त्यांच्यातील भेदांमुळे हे समूह परस्परांपासून अगदी वेगळे असल्याचे स्पष्ट होते. त्यात १. प्रादेशिक वा क्षेत्राधिकार संबंधी पृथकता २. मिश्र संतती ३. व्यावसायिक विभिन्नता ४. एकाच व्यवसायात वापरले जाणारे तंत्रज्ञानात्मक व प्रातिनिधिक विशेषतः ५.सांप्रदायिक भेदभाव/पंथातील फरक ६. रीतीरिवाजसंबंधी विविधता (चालीरीतीतीलभिन्नता) ७. आकस्मिक परिस्थितीत काही नामे निर्माण होणे (टोपननावे) ही उपजाती निर्मितीची कारणे घुयेंनी विशद केली. त्यात अधिकांश जातीत अशा उपजाती उपलब्ध आहेत. सामाजिक समूह तसेच त्यातील विभिन्नता व व्यक्तींच्या दर्जाचे वर्गीकरण मानव समाजाचे एक विशाल लक्षण आहे. बहुसंख्य समुदायामध्ये व्यक्तीचा दर्जा व्यक्तीच्या त्या क्षेत्रामधील कार्यावर अवलंबून राहतो ज्याला त्या समुदायात अधिकमहत्त्व दिले जाते. या विभिन्नतेचे प्रत्यक्ष संकेत जसे की वेशभूषा, व्यवसाय व भोजनसंबंधी काही एका समूहाचे विशेषाधिकार आणि दुसऱ्या समूहाची अमर्थतता म्हणजेच तो अधिकार नसणे. या समुदायामध्ये व्यक्तीचा दर्जा जन्माने निश्चित होतो.

**जातीचा वांशिक सिद्धांतः वंश व जात –**

जातीच्या उत्पत्तीविषयी घुर्ये म्हणतात, वंश (race) व अनुलोम विवाहाची (hypergamy) निर्मिती मुख्यत्वे जातीच्या उत्पत्तीला कारण आहे. प्राच्यविद्याचा आधार घेऊन इ. स. पूर्व २५००मध्ये भारतात इंडो-आर्यन वंशाचे लोक आले. या वांशिकांचा धर्म वैदिक होता, हे मुख्य रूपात ब्राह्मण होते. त्यांनी गंगा नदीच्या मैदानी प्रदेशात संस्कृतीला विकसित केले, त्यातून जातिव्यवस्थेचा उगम झाला. जातिव्यवस्था अंतर्विवाही होती म्हणजेच जातीबाहेर

विवाह होत नसून जातीअंतर्गत होत होते, त्यातून रक्त शुद्धता टिकून राहिली. बाह्मणांनी या नियमाच्या अंतर्गत स्वतःला स्थानिक लोकांपासून (विवाह संबंधापासून) अलग ठेवले. भारतामध्ये आर्य हे उत्तर-पश्चिमेकडून आले, नंतरस्थानिक लोकांमध्ये अनेक स्तर निर्माण झाले आणि त्यातील सर्वात निम्न स्तरातील लोक दास बनले. ब्राह्मणांनी स्थानिक लोकांचे रीतीरिवाज, विश्वास व कर्मकांड स्वीकारले नाहीत; परंतु स्थानिकांनी (मूळ रहिवासी) वा निम्न स्तरांनी मात्रब्राह्मणांच्या रीतीरिवाजांना स्वीकृत केले.मानववंशीय भेदावरून मुख्यतः जाती निर्माण झाल्या असे घुर्ये यांचे म्हणणे आहे. घुर्ये यांनी भारतात जातीची अगणित संख्या आणि जातिव्यवस्थेतील काटकोरपणा याचे कारण हिंदूच्या साहित्यात, तत्त्वज्ञानात आणि धार्मिक संप्रदायात दिसून येणारी प्रत्येक विषयाचे वर्गीकरण करण्याची आणि तार्किक अंतापर्यंत त्याचा पाठपुरावा करण्याची हिदूंची मनोवृत्तीच कारणीभूत आहे असा निष्कर्ष काढला. जात व वंश यांच्या परस्पर संबंधात घुर्ये यांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष काढले.१. उत्तर प्रदेश व पंजाब मध्ये इंडो-आर्यन वांशिक लोकांनी आपल्या रक्ताची शुद्धता (purity of blood) ठेवण्याचा प्रयत्न केला.२. उत्तर भारतात शारीरिक श्रेणी व सामाजिक श्रेणीमधील परस्परसंबंधातून वांशिक शुद्धता (purity of race) राखली गेली. घुर्येचे म्हणणे असे आहे की, ब्राह्मणांनी वांशिक शुद्धता राखण्याकरिता जे प्रयत्न केले त्यातून जातींची उत्पत्ती झाली.

**निष्कर्ष/सारांश :-**

सामाजिक समूह तसेच त्यातील विभिन्नता व व्यक्तींच्या दर्जाचे वर्गीकरण मानव समाजाचे एक विशाल लक्षण आहे. बहुसंख्य समुदायामध्ये व्यक्तीचा दर्जा व्यक्तीच्या त्या क्षेत्रामधील कार्यावर अवलंबून राहतो ज्याला त्या समुदायात अधिकमहत्त्व दिले जाते. या विभिन्नतेचे प्रत्यक्ष संकेत जसे की वेशभूषा, व्यवसाय व भोजनसंबंधी काही एका समूहाचे विशेषाधिकार आणि दुसऱ्या समूहाची अमर्थतता म्हणजेच तो अधिकार नसणे. या समुदायामध्ये व्यक्तीचा दर्जा जन्माने निश्चित होतो. व्यक्तीच्या दर्जा व भूमिकेचे निर्धारण जन्मावर आधारित असते. अशा प्रकारे जात व जन्म यामध्ये तर्कपूर्ण संबंध आहे. जातीमध्ये जन्मावर आधारित ओळख असते. जाती आधारावर देशाच्या विभिन्न प्रदेशामध्ये समाजाचे स्वरूप खंडात्मक विभाजनावर आधारित आहे. जातीच्या कारणामुळे सामाजिक संरचनेमध्ये एकवाक्यतेचा अभाव आहे. जातींचे वेगवेगळे सांस्कृतिक मूल्य व प्रथागत कायदे आहेत. ग्रामीण भागात विभिन्न जातींचे निवासस्थाने वेगवेगळी आहेत. अशा प्रकारे जाती संरचनेअंतर्गत प्रत्येक जातीचे आपले अस्तित्व आहे. जातीत उपजाती आहेत, उपजातींचे आपले अस्तित्व आहे. घुर्ये यांच्यामते जातीतील स्थिरत्त्व आणि संरचनात्मक सातत्यामुळे शतकांपासून विद्यमान आहे. जाती समरूप नाहीत तर त्या खंडात्मक विभाजित आहेत आणि विभिन्न भागामध्ये विभाजित आहेत.

**संदर्भसूची**

१. अटल, योगेश. १९८५. 'ग्रॉथ पॉइन्ट इन एशियन अन्ड पॅसिफिक सोशिऑलॉजी ॲन्ड सोशल एन्थ्रॉपॉलॉजी', सोशिऑलॉजी

२. ओमन टी. के. १९८३. 'सोशिऑलॉजी इन इंडिया : ए प्ली फॉर कन्टेक्सट्युलायझेसन', सोशिऑलॉजिकल बुलेटिन. ३२.

३. सहारे पद्माकर, २०१५,'भारतीय समाजविषयक दृष्टीकोण', विद्या बुक पब्लिशर औरंगाबाद

४. गजेंद्रगढ व्ही. एन., मारूलकर व्ही. एस.,२०००,'समकालीन भारतीय समाजशास्त्र',फडके प्रकाशन, कोल्हापूर.

**B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal**
ISSN : 2278-9308
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
July 2021

# भारतातील वर्ण ,जातीव्यवस्था आणि धर्मनिरपेक्षता

डॉ. अशोक डोळस
बाबुजी आव्हाड महाविद्यालय , पाथर्डी . जि. अहमदनगर
मोबाईल नंबर 75 88 8 12 240,Email, ashok.dolas2@gmail.com

**प्रस्तावना: -**

जगात पृथ्वीतलावर जेव्हा इतर प्राण्यांनाबरोबरच मानव प्राणी उदयास आला तेव्हा तो इतर प्राण्या सारखाच निसर्गाच्या सान्निध्यात आपले जीवन जगत असे. नंतरच्या काळात मानवाला निसर्गाने दिलेल्या बौद्धिक आणि भाषिक क्षमतेमुळे मानवाने आपली बौद्धिक व सांस्कृतिक ओळख निर्माण केली. आपल्या बौद्धिक क्षमतेनुसार मानवाची शारीरिक आणि सामाजिक उत्क्रांती होत गेली आणि मानवाने आपला बौद्धिक भाषिक विकास घडवून आणला. कालांतराने मानवास लिपीचा शोध लागला आणि तो आपल्या भावना विचार अक्षरबद्ध करू लागला असावा,आपल्यासाठी एक भाषा आणि संस्कृती निर्माण केली आणि त्याच बरोबर धर्म ही उदयास आला. आपल्या जगण्यासाठी काही नियम ठरवून घेतले, त्यामुळे टोळीत शिस्त निर्माण झाली. अनेक मानवी टोळया पृथ्वीतलावर असाव्यात आणि ते आपल्या अन्न पाण्याच्या शोधासाठी भटकंती करत असत. अनेकदा नैसर्गिक कारणांमुळे त्यांना स्थलांतर करावे लागत असे. त्यामुळे दोन मानवी टोळयांमध्ये अनेकदा संघर्ष होत असे आणि जीत आणि जेते असे दोन वर्ग निर्माण होऊन , जे जीत आहेत ते जेते त्यांना आपल्या पदरी ठेवून त्यांच्याकडून आपली कामे करून घेत असत. त्यांचे संरक्षण करणे व इतर कामे करणे. या तीन वर्णाची चाकरी करण्यास भाग पाडले. अशा मानवी मनातून वर्ण आणि जात निर्माण झाल्या . मानवी उत्क्रांतीतून मानव जात असताना, एका चालक मानवी टोळीने इतरांवर आपले वर्चस्व निर्माण करण्याच्या हेतूने वर्ण जातीव्यवस्था निर्माण केली. मानवाचे विभाजन केले आणि प्रत्येकास काम ठरवून दिले. नंतरच्या काळात मनुने ही वर्ण, जातीव्यवस्था त्या व्यक्तीच्या जन्मावरून श्रेष्ठ-कनिष्ठ ठरविण्याचा नवीन सिध्दांत मांडला आणि यातूनच पुढे वर्ण, जातीव्यवस्था निर्माण झाली अथवा केली . एकविसाव्या शतकात जगणाऱ्या माणसांसाठी कोणते मूल्य अधिक महत्त्वाचे आहेत. याची मांडणी या संशोधन पेपरमध्ये करण्याचा मानस आहे.

**2. निसर्ग आणि मानव : -**

आज जगाला ज्ञात असणाऱ्या मानव प्राण्याचा विचार करता,सर्व मानवजात शारीरिक दृष्ट्या सारखीच आहे. जगाच्या पाठीवर भारत हा एकमेव असा देश आहे की भारतात वर्ण, जातीव्यवस्था ईश्वर निर्मित असल्याचे सांगितले गेले. जगात कुठेही नसणारे वर्ण, जातीव्यवस्था भारतात पिढ्यानपिढ्या पासून अस्तित्वात आहे. ही आज पर्यंत का टिकून आहे. याचा शोध घेणे हेच एकविसाव्या शतकातील मानवाची गरज आहे. मानवा मानवामध्ये निसर्गाने कोणता शारीरिक भेद केला नाही. मग भारतात वर्ण,जातिव्यवस्थेच्या नावाने इतके तुकडे का केले असतील हा प्रश्न पडतो, तेव्हा याचे बीज मला इथल्या वैदिक सनातन विचारात दिसते. उच्च वर्णीय लोकांनी आपला स्वार्थ साधण्यासाठी ही वर्ण, जातीव्यवस्थेवर आधारित समाजरचना निर्माण करणारे तत्त्वज्ञान निर्माण केले, नंतरच्या काळात वैदिक ग्रंथकारांनी याची ग्रांथिक ,वैचारिक मांडणी करून इतर वर्ण,जातींना आपले गुलाम बनवले आणि शतकानुशतकापासून त्यांचे शोषण केले, आणि या वर्ण, जातीतील लोक देखील मूकपणे आपली गुलामी मान्य करत जगले? का जगले असा प्रश्न पडतो ,तेव्हा या वर्गाचा सामाजिक, मानसिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कतिक विकास करण्याची संधी नाकारली होती. एवढेच नव्हे तर त्यांचे माणूसपण नाकारले होते. म्हणून तो आपल्या गुलामीला श्रेष्ठ मानून जगत होता. गुलामांना गुलामगिरीची जाणीव होणार नाही अशी समाजव्यवस्था वर्ण, जातीव्यवस्था या देशातल्या मूठभर उच्च वर्णीयांनी निर्माण केली होती. तिला छेद देण्याची हिम्मत एकाही

राजे अथवा महाराजांमध्ये नव्हती, ते देखील पूरोहित , धर्माचे गुलाम होते. त्याचप्रमाणे ते आपले वर्तन करत असत. त्यांचा नैसर्गिकअधिकार नाकारून गुलाम केले आणि एक शोषणाची व्यवस्था निर्माण केली .

**3. वैदिक तत्त्वज्ञान आणि मानव; -**

अनादीकाळी भारतात आर्य लोकांनी आक्रमण केले आणि भारतातील सिंधू संस्कृतीचा नायनाट केला. आर्य भारतात येण्याअगोदर या देशात द्रविड लोकांची सिंधूसंस्कृती अस्तीत्वात असल्याचे अनेक पुरावे सापडतात. पण आर्यांच्या आगमना नंतर आर्यांनी इथल्या द्रविडी, सिंधूसंस्कृतीचा ऱ्हास घडवून आणला आणि आपली वैदिक संस्कृती त्यांच्यावर लाटली. वेद, उपनिषद ,पुराण, गीता, रामायण ,महाभारत यांसारख्या ग्रंथांचे रचना करून आपले वर्ण , जातीआधारित विषमतावादी विचार इथल्या द्रविड लोकांवर लादले. काल्पनिक धार्मिक ग्रंथ रचून लोकांना गुलाम केले. या ग्रंथात वर्णव्यवस्थेचे समर्थन केले आहे . मनुस्मृती मध्ये वर्णव्यवस्था ब्रह्मादेवाने निर्माण केली असल्याचे सांगितले आहे. ब्राह्मण ,क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या चार वर्णाचे मानूमूर्ती ग्रंथात समर्थन करण्यात आलेले आहे. हे ब्रह्मदेवाने निर्माण केले असून ते बदलण्याचा अधिकार पृथ्वीतलावरील विशेषत: भारतातील कोणत्याही व्यक्तीला अधिकार नाही. असे मनूस्मूर्ती ग्रंथात पुन्हा पुन्हा व ठासून सांगितले आहे. ही संस्कृती इथल्या मूठभर उच्चवर्णीय लोकांच्या हिताची असल्यामुळे तिचे रक्षण करण्यासाठी या उच्चवर्णीयांनी आपल्या सोयीनुसार इतर राजकीय सत्तेसोबत हातमिळवणी केली,पण भारतात असणारी वर्ण, जातीव्यवस्थेत बदल होऊ दिला नाही. भारतावर अनेक परकीय आक्रमणे झाली. अनेकांनी अनेक वर्ष सत्ता उपभोगली पण भारतातील वर्ण आणि जाती व्यवस्थेला धक्का लावण्याची हिंम्मत केली नाही . वेळप्रसंगी उच्चवर्णीयांनी त्यांच्याशी रोटी-बेटी व्यवहार केला. इथल्या शूद्रातिशूद्र,आदिवासी आणि महिलांना त्यांच्या गुलामीची जाणीव होऊ दिली नाही . म्हणून आजही आपल्या देशात ही विषमतावादी वैदिक संस्कृती, सनातन संस्कृती टिकून आहे. इथल्या गुलामांना आपल्या धार्मिक आणि सांस्कृतिक राजकीय गुलामीची जाणीव अजूनही झालेली नाही. धर्म नावाच्या अफूमध्येच हा वर्ग अजूनही धुंद आहे. आणि या उच्चवर्णीय मनुवादी व्यवस्थेला हेच अपेक्षित आहे. " एकेकाळी या सुजलाम सुफलाम देशात अत्यंत प्रगत लोक राहत होते. सिंधुसंस्कृती त्याचे उत्तम उदाहरण आहे. काही लोक काही लोक खैबर खिंडीतून आले. त्यांनी पराक्रम न करता क्लूप्त्या लढवल्या आणि आपले वर्चस्व प्रस्थापित केले. आपले श्रेष्ठत्व टिकवण्यासाठी श्रमविभागणीच्या नावाखाली वर्ण आणि जाती निर्माण केल्या. काहींनी शूरपणे आणि कडवी झुंज दिली, त्यांना गाव कुसाच्या बाहेर ठेवले. त्यांना अस्पृश्य लेखले सशांवर शेळीवर,निर्बंध लादत नाहीत वाघ आणि सिंहलाच पिंज-यात कैद करतात, अस्पृश्यता हे त्याचे उदाहरण आहे. हे सर्व ईश्वराने केले हे श्री ची इच्छा असे सांगण्यात आले. म्हणजेच वर्णव्यवस्था जातीव्यवस्था व अस्पृश्यता याचे समर्थन करण्यासाठी धर्ममार्तंडांनी देव-देवता,दैवत,आत्मा,पुनर्जन्म,राक्षस भुते या खोट्या कल्पनांची पेरणी केली. आपल्या वर्चस्वासाठी सर्वसामान्य, प्रामाणिक ,इमानदार कष्टाळू माणसांचे शोषण सुरू केले. ऐतखाऊ लोकांचा हा समूह सोशल बनला, येथील लोक भाषांना कनिष्ठ तुच्छ सामान्य ठरवून संस्कृत श्रेष्ठ भाषा आहे. हे मानसिक दृष्ट्या समजावले भाषा हे शोषणाचे माध्यम असू शकते याची अनुभूती सामान्य आली. " विशेष महत्त्वाचे. या माध्यमातून सर्वसामान्य जनतेची लूट शोषण होत असेल या संदर्भामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी क्रांती आणि प्रतिक्रांती या पुस्तकांमध्ये विचार मांडताना लिहिले आहे " की यज्ञ केल्याने यज्ञकर्त्यासोबत त्याच्या पितरांचा उद्धार होतो. त्याचबरोबर त्याचे वैभव प्राप्ती सोबतच स्वर्गलाभ पण होतो असा तर्क लावून ब्राह्मण यज्ञाचे समर्थन करत असत. बहुतेक ब्राह्मणवर्ग यज्ञ हे पृथ्वीवरील उत्तम वस्तू प्राप्त करण्यासाठी करत असत. लाभ प्राप्ति शिवाय ब्राह्मण लोक यज्ञ करत. यज्ञ करून आपण समाजाला मूर्ख बनवीत आहोत हे या पूरोहित ब्राम्हण वर्गाला माहित होते. प्रत्येक यज्ञ केल्यानंतर पुरोहितांना दक्षिणा म्हणून दान वाटण्यात येत असे . दक्षिणेसंबंधी ब्राह्मण पुरोहित यांचे नियम स्पष्ट आहेत. दक्षिणा व दान घेण्याच्या हक्काचे ब्राह्मण पुरोहित निर्लज्जपणे समर्थन करत. केवळ दक्षिणा उकळण्याच्या हेतूनेच ब्राह्मण यज्ञ करत. या यज्ञात दान स्वरूपात ब्राह्मणांना मूल्यवान वस्त्र,गायी, घोडे आणि सोने प्राप्त होत असे. " अशाप्रकारे वैदिक तत्त्ववेत्त्यांनी किंवा ग्रंथकारांनी ब्राह्मणी साहित्य निर्माण करून इतरांना गुलाम केले. त्यांचे शोषण केले . एक तर इतरांना शिक्षणाचा अधिकार नाकारला गेला ,म्हणून त्यांचा विकास होऊ शकला नाही. ब्राम्हण सांगेल तेच सत्य मांडले गेले. त्याविषयी प्रश्न निर्माण करण्याची हिंमत शूद्र , अतिशूद्र व महिलांमध्ये नव्हती. तसे केले तर त्यांचा वध केला जात असे . धर्मासाठी एखाद्याच वधकरणे पुण्याचे मानले जाई . क्षत्रीयांचा धर्म मानला जाई. या अन्याया विरोध करून न्याय मागण्याचा

ISSN : 2278-9308
July 2021

अधिकार देखील या वर्गाला नसे. याचे अनेक दाखले आपणास धर्म ग्रंथात सापडतात, शंभूकाचा वध अशाच कारणासाठी झाल्याचं दिसते. म्हणून या वैदिक ब्राह्मण ग्रंथ वर्ण,जातीव्यवस्था व इतरांच्या गुलामीस कारणीभूत आहेत.

**4 . भारतीय समाज रचना :-**

इ. स. पूर्व काळापासून भारतीय समाजव्यवस्थेत राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक व्यवस्थेत इथल्या वर्णव्यवस्थेत तमाम शूद्र ,अतिशूद्र, आदिवासी, महिलांना माणूस म्हणून कोणतेच स्थान नव्हते. मनुस्मृती ग्रंथामध्ये प्रत्येक वर्ण जातीतिल माणसाची कामगिरी ठरवून दिली होती. प्रत्येक माणूस आपल्या जातीत बंदिस्त करून. रोटी-बेटी व्यवहार बंद करून टाकले होते. प्रत्येक व्यक्तीच्या जन्मानुसार त्याचा दर्जा व काम ठरवून दिले होते. मनुने कर्मसिद्धांत मांडणी करून प्रत्येक जातीतिल व्यक्तीने आपले पूर्वपार चालत आलेले कर्म करण्याचे निर्बंध लादून त्यांचे कठोर पालन करण्याची सक्ती करण्यात आली होती. वर्ण, जाति व्यवस्था मोडणाऱ्या व्यक्तीला दंड करण्याचा अधिकार राजा, गावातली कुलकर्णी व गावच्या पाटलांना बहाल करण्यात आला होता. जातिव्यवस्थेचे पाळेमुळे इथल्या विषमतावादी वैदिक ,सनातन विचारत आहेत याची जाणीव होणे इतके, बौद्धिक विकास इथल्या शूद्रातिशूद्रांच्या आदिवासी आणि महिलांचा होऊ दिला नाही. वर्ण जातिव्यवस्थेच्या देवधर्माच्या या समाजाला सतत झिंगत ठेवले होते. आपल्यावर ही गुलामी लादली आहे. ती ईश्वर कृपेने किंवा आपल्या पूर्वी जन्माचे फळ आहे. असे त्यांच्यावर पिढ्यानपिढ्या नियोजनपूर्वक बिंबवले. यात बदल करण्याचा अधिकार फक्त ईश्वरालाच आहे. आणि तो इथल्या शूद्रातिशूद्रांनी मान्य केल आपल्या गुलामी विषयी प्रश्न विचारण्याचं धाडस त्यांच्यात नव्हते. असे धाडस केले तर जीभच छाटली जात असे ,ज्ञान ग्रहण केले तर कानात उकळते तेल टाकण्याचा आधार मनुच्या मनुस्मूर्तीने दिला होता . शुद्राने धर्माचे पालन केले नाही तर त्याचे मुंडके छाटन्यासारखी अघोरी प्रथा निर्माण करून समाज मनावर धर्माची दहशत निर्माण केली होती . भीती निर्माण केली होती. त्यामुळे हा समाज आपल्या गरिबी. दारिद्र्य, गुलामी विषयी प्रश्न विचारण्याची शक्यता नव्हती आणि विचारू नये अशी व्यवस्था निर्माण केली होती. तिला ईश्वराचा गोंडस मुलामा चढवला होता. ईश्वराला हा प्रश्न विचारणे म्हणजे नरकात जाणे, पाप करणे . म्हणून याविरुद्ध बंड करायची हिंमत कोणीही केली नाही. आणि कोणी हिंमत केली तर त्यास विमानात बसून वैकुंठाला पाठविले जात असे . याचे अनेक दाखले आपल्या ग्रंथांमध्ये आपणास पाहावयास मिळतात.

**5. आधुनिक मानवतावादी मुल्ये :-**

इ. स. पूर्व काळापासूनच भारतामध्ये इराणी, युनानी असे काही परकीय आक्रमण झाल्याचे पुरावे सापडतातत्यांचा हेतू राजकीय होता त्यामध्ये ते यशस्वी झाले. भारतात राजकीय सत्ता सतत बदलत राहिल्या पण भारतातील पूर्वापार चालत आलेली मूळ वर्ण,जातीव्यवस्थेत फारसा बदल होऊ शकला नाही. कारण भारतातील वर्ण ,जातीव्यवस्था उच्चवर्णीयांच्या हिताची असल्यामुळे त्यांनी राजकीय तडजोडी करून राजकीय फायदे करून घेतले, पण इथल्या वर्ण ,जातीव्यवस्थेत हस्तक्षेप करण्यापासून सर्वच अतिक्रमण करणाऱ्यांना रोखले आणि भारतीय समाजव्यवस्थेत आपले उच्चत्व टीकवण्यात , ते यशस्वी झाले आणि आजही आहेत.

इ. स. पूर्व ६०० ते इ.स ३०० या कालखंडात या देशात बौद्ध आणि जैन धर्माचे प्राबल्य होते . सम्राट अशोकाने बौद्ध धर्माचा (धम्माचा) मोठ्या प्रमाणात प्रचार प्रसार केला, राजकीय आश्रय दिला त्यामुळे बौध्द धम्माचा जगत प्रसार झाला आहे . पणसम्राट अशोकाच्या नंतर त्याचा नातू बह्दरथ याचा पुष्यमित्र शुंग या गुप्त वंशीय सेनापतीने वध केला आणि मौर्य साम्राज्याला उतरती कळा लागली . भारतात मध्यकाळात गुप्त वंशीय राजघराण्याची सत्ता प्रस्थापित झाली आणि भारतात वर्ण, जातीव्यवस्था अधिक मजबूत करण्यात आली. सम्राट अशोकाच्या कालखंडामध्ये वर्णव,जातिव्यवस्थेला काही प्रमाणामध्ये हादरे बसले होते. बौद्ध धर्मामध्ये वर्णव्यवस्था ,जातिव्यवस्था पाहावयास मिळत नाही. भारतात जेव्हा गुप्त राज्यांची सत्ता प्रस्थापित झाली त्यांनी इथल्या वैदिक संस्कृतीला राजाश्रय दिला आणि सनातन विचारांचा प्रचार प्रसार करण्याकरता फार मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले . तसेच सनातन विचार मजबूत होऊन ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चार वर्णा बरोबरच पाचवा वर्ण म्हणून 'अस्पृश्य' वर्णाची निर्मिती याच कालखंडात झाली. या पाचवा वर्ण निर्मिती संदर्भामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

अस्पृश्य मुळचे कोण या ग्रंथात लिहितात "  अस्पृश्य वर्ण म्हणजे हे वाताहात झालेले लोक बुद्ध धर्म असून जेव्हा ब्राह्मणी धर्माचा बुद्ध धर्मावर वरचष्मा झाला तेव्हाही ब्राह्मणी धर्मात इतरांप्रमाणे सहजगत्या परत येण्यास नाखूष होता.  अस्पृश्य लोक ब्राह्मणांना अशुभ का मानतात, त्यांचा आपले उपाध्ये का नेमत नाहीत आणि आपल्या वस्तीमध्ये शिरण्यास त्यांना मनाई  का? करतात... वाहतात  झालेल्या या लोकांनी ब्राह्मणाचा तिरस्कार करणे म्हणजे ब्राह्मण बुद्धधर्मियांचे सूत्र होते . आणि त्यांनी बौद्ध धर्म सोडला नाही या अनुमानावरून असा निष्कर्ष निघतो की,जे लोक बौद्ध होते.  त्यांच्याबद्दल ब्राह्मणांनी पसरविलेला द्वेष  व तिरस्कार हे अस्पृश्य उदगमनाच्या करणा पैकी एक कारण आहे". २यावरून स्पष्ट होते की साधारणत इ. स.पू  सहाव्या शतकपासून ते  तिसऱ्या शतकापर्यंत भारतामध्येफक्त चार वर्णन होते.  पण गुप्त वंशाच्या सत्तास्थापना नंतर बौद्ध धर्माचा राजकीय आश्रय संपला आणि सनातन धर्माला राजाश्रय  मिळाला ,व  गुप्त राजांनी बौद्ध धर्माचा ऱ्हास घडवून आणला.  त्यांचे अधिकार काढून घेतले. ज्याबौद्ध धर्मिय लोकांनी सनातन धर्म व विचार स्वीकारण्यास नकार दिला अशा बौद्ध धर्मियांना 'अस्पृश्य' ठरवून गावाच्या बाहेर हाकलले . या तीन वर्णीयांची सेवा करण्याचे काम या वर्गाकडे दिले.  त्यांचे शिक्षण बंद केले . राजकीय, सामाजिक ,सांस्कृतिक, आर्थिक विकासाची दारे बंद करून त्यांना या तीन वर्णीयांचे गुलाम बनवले आणि त्यांना पशु पेक्षा तुच्छ लेखून त्यांचे माणूसपण नाकारले गेले. जगात कोठेही नव्हे ते या भारत देशामध्ये माणसाचा माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नाकारला.  त्यास पशुवत जीवन जगण्यास भाग पाडले . ते साधारणतः आठराव्या शतका  पर्यंत . या देशांमध्ये शूद्रातिशूद्र आणि महिलांचे  अशा प्रकारचे माणूस असून देखील गुलाम ठरवून त्यांचे विविध प्रकारच्याशोषण केले.

**6. इंग्रजी राजवट आणि मानवतावाद :-**

मध्यकालखंडात  भारतामध्ये अनेक आक्रमणे झाली.  त्यामध्ये मोगलांनीसातशे वर्षे राज्य केले.  मोगल आणि भारतात असणारे विविध संस्थाने यांच्यामध्ये अनेकदा  संघर्ष होत .इंग्रज व्यापारी दृष्टिकोन समोर ठेवून भारतात आले, आणि भारतातील राजकीय, सामाजिक ,वर्ण, जातीयव्यवस्था विभाजन  पाहून त्यांनी भारतामध्ये आपली सत्ता प्रस्थापित करण्याच  प्रयत्न केला.  भारतातील असणारी अनेक संस्थांने त्यांनी  जिंकून घेतले. १ जानेवारी १८१८ साली  इंग्रज आणि पेशवे यांच्यात पुण्याजवळील भीमा कोरेगाव या गावी लढाई झाली . इंग्रजी सैन्यामध्ये असणारी महार बटालियन या तुकडीने इंग्रजांना पेशव्यांविरुद्ध लढाई  जिंकून दिल .  पिढ्यानपिढ्यापासून गरीबी ,दारिद्रे ,गुलामीत खितपत पडलेल्या तिथल्या शूद्र, अतिशद्र,आणि  महिलांच्या जीवनात प्रथमच  विकासांचा सूर्य उगवला.  इंग्रजांनी केलेल्या विविध सुधारणा पैकी या देशांमध्ये सर्व वर्ण,जाती, धर्म, पंथातील लोकांनाशिक्षणाचा अधिकार दिला.  शिक्षण संधी निर्माण करून दिली.  इंग्रजांनी निर्माण करून दिलेल्या या शिक्षणाच्या  संधीमुळे कधी नव्हे ते शूद्रातिशूद्र, आदिवासी आणि  महिलांना शिक्षणाची दारे खुली झाली. यातून अनेक समाजसुधारकांची एक पीढी तयार झाली, यामध्ये प्रामुख्याने लोकहितवादी, गो.गा  आगरकर आणि म. जोतिबा फुले यांचे महत्त्वाचे कार्य आहे.  म. जोतिबा फुले यांनी सनातन धर्म ग्रंथाचा अभ्यास केला. या धर्म ग्रंथातील उच्चवर्णीयांची लबाडी जगासमोर मांडली. त्यांचा या  कार्यामुळे देशांमध्ये परिवर्तनाचे वारे वाहू लागले.  त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या कार्यामुळे सामाजिक बदलास, मानसिक परिवर्तनस सुरुवात झाली. वर्ण ,जात,धर्म, पंथ यावर चर्चा होऊ लागल्या . वर्तमानपत्रांमध्ये यावर मंथन होऊ लागले आणि  या मंथनातून आज भारतामध्ये आधुनिक मानवी मूल्ये रुजण्यास सुरुवात झाली.

**७. आधुनिक भारत आणि धर्मनिरपेक्षता :-**

म.जोतिबा फुले यांच्या क्रांतीकार्य  नंतर भारतीय समाजात आमूलाग्र क्रांती करण्याचे काम डॉ.  बाबासाहेब आंबेडकर यांनी केली. स.न. १९२०  नंतर  भारतीय राजकारणात दोन व्यक्तींचा उदय झाला . यामध्ये म.  गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरया दोन महामानवांच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक,विचार ,संघर्ष मंथनातून भारतीयसमाजरचनेतील विषमतावादी मूल्यावर परखडपणे चर्चा होऊ लागले.  स्वातंत्र्याच्या लढयाबरोबरच देशात धार्मिक,सामाजिक,संस्कृतिक  परिवर्तनाचे वारे मोठ्यावेगाने वाहू लागले.  डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध, कबीर आणि फुले यांची  वैचारिक बैठक घेऊन सामाजिक बदलाची प्रक्रिया सुरू केली.  भारतीय समाजव्यवस्थेत असणारी वर्ण ,जातीव्यवस्थेचा अभ्यास करून उच्चवर्णीय  समाजाने कशी लबाडी केली आहे. शूद्रातिशूद्र ,आदिवासी आणि महिला,शेतकऱ्यांना शतकनूशतकापासून गुलाम करून, त्यांचे कशा प्रकारे शोषण केले

ISSN : 2278-9308
July 2021

आहे. त्यांचे शैक्षणिक ,सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विकास कसा रोखला आहे. याची जाणीव करून दिली. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. त्यांना शिक्षणाची संधी निर्माण करुन दिली. अनेक शतकापासून माणूस पण नाकारलेल्या माणसाला आधुनिक समतावादी, मानवतावादी , धर्मनिरपेक्ष अशा मानवी मूल्यांची ओळख करून दिली . भारतीय संविधानची रचना समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही समताधिष्ठित , धर्मनिरपेक्ष मानवीमूल्य निर्माण करून जात, धर्म, पंथ पेक्ष माणूस श्रेष्ठ आसल्याचे संगितले . आधुनिक मानवतावादी , धर्मनिरपेक्ष विचार देशाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिले आहे . हा विचार माणसाला महाणमानून माणसाचे श्रेष्ठत्व मान्य करतो . प्रत्येक माणसाला आपल्या शारीरिक, बौद्धिक क्षमतेनुसार प्रत्येक क्षेत्रामध्ये आपले कार्य कर्तृत्व दाखवण्याची संधी देतो . त्यामुळे आधुनिक भारताच्या उभारणीमध्ये भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्ष विचारांची खूप मोठी देणगी आहे.

**८. भारतीय संविधान आणि धर्मनिरपेक्षता:-**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताच्या एकुण विकासासाठी आवश्यक असणारी सर्व समावेशक भारतीय राज्यघटनेची निर्मिती करण्याची जबाबदारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर सोपवली गेली, मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील विविध धर्म,वर्ण, जाती, भाषा, संस्कृती, पंथ यांचा विचार करून, तसेच भौगोलिक. सामाजिक, सांस्कृतिक,आर्थिक , राजकीय व मानसिक जडणघडण याचा विचार करून . या देशाला कोणत्या मूल्यांची गरज आहे. याचा साकल्याने अभ्यास केला. आणि आधुनिक भारत निर्माण करण्यासाठी पारंपारिक सनातन विचारांच्या चष्म्यातून पाहून चालणार नाही. तर आधुनिक भारतासाठी नवीन समता, स्वातंत्र्य, बंधुता, ही समतामुलक , मानवतावादी, धर्मनिरपेक्ष मूल्ये आवश्यक आहेत,असं त्यांना वाटलं आणि त्यांनी भारतीय राज्यघटनेची निर्मिती या मूल्यांवर आधारित केली.

भारतामध्ये अनेक धर्म, पंथ, वर्ण, जाती असल्याकारणाने कोणत्याही एका धर्माचे समर्थन केल्यास इतर धर्मावर अन्याय होईल. कारण भारत देश हा विविधतेने नटलेला आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मनिरपेक्ष विचार भारतीय संविधानाने स्वीकारले आहे. मुळात माणसाने आपली वर्ण,जात, धर्म, पंथ, बाजूला ठेवून, एक भारतीय म्हणून त्याने भारतीयत्वाचा स्वीकार करावा. आपला धर्म, पंथ, विचारांना न सोडता तो फक्त आपल्या घरातच ,आपल्याच पुरता मर्यादित ठेवून सार्वजनिक, सामाजिक जीवनामध्ये फक्त एक चांगला माणूस म्हणून जगावे. आणि आपल्या धर्माचा अवडंबर न माजवता . इतर जाती धर्मांचा तिरस्कार द्वेष न करता त्याला जगू देणे. हा धर्मनिरपेक्ष मूल्यांची शिकवण आहे. कारण इतर धर्म, वर्ण ,जाती, पंथांपेक्षा माझा धर्म, वर्ण,जात, श्रेष्ठ आहे. इतर धर्म कनिष्ठ आहेत. अशा प्रकारची धारणा मनात ठेवून, इतरांचा सातत्याने द्वेष करणे. सामाजिक संघर्ष निर्माण करणे हे अयोग्य आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील सर्व माणसे सारखेच आहेत .

मानवाने आपल्या स्वार्थासाठी वर्ण, जात,धर्म, पंथ, वर्ग निर्माण करून माणसांचे विभाजन केले आहे. माणसाने भारतीय संविधानाने दिलेले समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही मानवतावादी,धर्मनिरपेक्ष मुल्यांचा अंगीकर करून आपले व इतर माणसांचे, मानवांचे जीवन अधिक सुंदर सुखी, शांत जगण्यासाठी सतत कार्यशील राहण्यातच मानवाचे कल्याण आहे. असे मला वाटते. या वाटेने गेले तर जगात शांतता नांदू शकते . जगातील माणसाला आज युद्धाची नव्हे तर बुद्धाची गरज आहे. शंतता,अहिंसावादी विचारांची गरज आहे. असे माला वाटते . भारतीय संविधानाने दिलेला धर्मनिरपेक्ष विचार व अत्यंत महत्त्वाचा आहे. तो प्रत्येक व्यक्तीने अंगीकारला पाहिजे, आणि त्या पद्धतीने आपले वर्तन केले पाहिजे. त्याच वेळेस भारतातमध्ये खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष मूल्यांची रुजवण होऊन भारतात शांतता प्रस्थापित होऊ शकते. माणूसच माणसासाठी महान आहे . हा धर्मनिरपेक्ष विचारच देशाला एकत्रित ठेऊ शकतो .

**संदर्भ ग्रंथ .**

१ .डॉ.अशोक डोळस . भक्ती आंदोलने शोध : क्रांती - प्रतिक्रांती . चिन्मय प्रकाशन,
औरंगाबाद डॉ. कमलाकर कांबळे . प्रस्तावना .
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर,क्रांती - प्रतिक्रांती प्रदीप रोडगे प्रकाशन नागपुर . पृष्ठ. क्र. १२
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर. अस्पृश्य मूळचे कोण . पृष्ठ . क्र. ६८, ६९

ISSN : 2278-9308
July 2021

# ''लोकसाहित्य और गढ़वाली लोकगाथाएं''

प्रा. अनिता शर्मा
संगीत विभाग दयानंद आर्य कन्या महाविद्यालय, जरीपटका, नागपुर.
anitarsharma12@gmail.com ,Mob. No. : 94213 54153

गढ़वाली लोक साहित्य लोकजन की अनुभूतिजन्य, सहज, सरल, प्राकृतिक प्रकट करना है जिसमें जीवन मूल्यों की अभिव्यक्ति सरलता से ही हुई है। चाहे वह लोकगीत हो, लोककथा या लोकगाथा। प्रकृति का निकट सानिध्य गढ़वाली लोकजनों की अपनी विशेषता है।

**गढ़वाली लोकसाहित्य का वर्गीकरण**

लोकगाथा

गढ़वाली लोक साहित्य को विशेषकर लोक गाथाओं को डॉ गोविन्द चातक ने चार भागों में बाँटा है।

१.धार्मिक गाथाएं
२.वीर गाथाएं
३.प्रणय गाथाएं
४.चैती गाथाएं

इनमें अधिकांश धार्मिक गाथाओं का आधार पौराणिक है। वीरगाथाओं में तीलू रौतेली, कालू भण्डारी रणरीत, माधोसिंह भण्डारी, लोदी रिखोला की गाथाएं प्रमुख है। प्रणय गाथाओं में तिल्लोगा (अमरदेव सजवाण) राजुला मालूशाही तथा धार्मिक गाथाओं में पाण्डव गाथा, क्रुद्र—विनता, सृष्टि उत्पत्ति और कृष्ण गाथा मुख्य है।

कोई भी लोक जिसे मौखिक रूप में अभिव्यक्त करता है, वह वहां का लोक साहित्य कहलाता है। लोक साहित्य की अभिसृष्टि में एक व्यक्ति विशेष न होकर संपूर्ण लोक की धरोहर पूँजी थाती बन जाती है। लोकसाहित्य में लोक की अभिव्यक्तियों के अंतर्गत कहावतें, पहेलियाँ, गाथाएं, कथाएं, गीत आदि समाहित होती है।

लोकसाहित्य किसी भी समाज के लिए महत्वपूर्ण है। लोकसाहित्य में किसी समाज के चिन्तन एवं ज्ञान के दर्शन होते है। वह उस समाज का वास्तविक प्रतिबिम्बन करता है। किसी समाज की वास्तविक अभिव्यक्ति उसके लोकसाहित्य में विद्यमान होती है। यह उस समाज की अमूल्य धरोहर होती है। लोकसाहित्य आदर्शवाद तथा यथार्थ का सुंदर सामंजस्य होता है। सच में वह सही प्रतिनिधि जनकाव्य होता है, जो लोक जनजीवन को सुख—दु:ख, आशा—निराशा, हास—परिहास, पीड़ा—खुशी आदि भावनाओं का सजीव चित्रण करता है। लोकसाहित्य मानव प्रकृति का स्वच्छन्द गायन है, जिसका कोई आदि अंत नही है।

**लोकसाहित्य के अंग**

१) लोकगीत
२) लोकगाथा
३) लोककथा
४) लोक कहानी
५) लोक नाट्य
६) प्रकीर्ण साहित्य

लोक साहित्य लोकाभिव्यक्तियो का ऐसा ढांचा है, जिसे अस्तित्व में लाने के लिए कई हाथों की भूमिका होती है। कालांतर में इसमें सामूहिकता आ जाती है और यह संपूर्ण लोक की थाती का रूप ले लेती है।

**गढ़वाली लोकगाथाएं**

लोकगाथा गीतों के रूप में गाकर कही जाने वाली कथा है, जिसमें प्राचीनता, साहस, भक्ति ऐतिहासिकता और धर्म के तत्व समाविष्ट होते है। लोकगाथा गीत की भाषा में लंबा—चौड़ा वह रोचक आख्यान है, जिसमें कल्पना के साथ ऐतिहासिक बिन्दु भी होता है।

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

लोकगाथाएं प्रबंधात्मक गीत है। इनमें गेयता के साथ कथानक की प्रधानता होती है। लोकगाथाएं आकार में बड़ी और विस्तुत होती है। इनमें प्रेम का गहरा पुट, संघर्ष और अंत में प्रेम की जीत होती है। ऋग्वेद के अनेक मंत्रो में पद्य अथवा गीत के अर्थ में 'गाथा' शब्द का प्रयोग मिलता है।

गाथा शब्द विशिष्ट विधा के लिए प्रयोग किया मिलता है। गढ़वाली लोकगाथाओं में अतीत से वर्तमान और वर्तमान से अतीत का प्रभाव व्यक्त हुआ है। गढ़वाल में लोकगाथाओं का अक्षय भंडार है। विडंबना यह है कि लोक गाथाएं अब जाति विशेष या अनुष्ठान विशेष की धरोहर बनकर रह गई है। पौराणिक तथा धार्मिक गाथाएं, घड़ियाला अथवा पूजा के अवसर पर जागरी पुरोहितों के द्वारा देवताओं का आह्वान और नर्तन के लिए गाई जाती है।

**गढ़वाली लोकगाथाओं की उत्पत्ति –**

लोकसाहित्य का रचयिता अज्ञात और रचनाकाल अविदित होता है। इसलिए यह कहना मुश्किल है कि गढ़वाली लोक गाथाओं की उत्पत्ति कब हुई और किस गाथा का रचयिता कौन है। यद्यपि यह कल्पना सत्य व सार्थक हो सकती है कि किसी न किसी विशेष ने किसी गाथा की अभिसृष्टि की होगी, किन्तु यह इतना बड़ा सत्य है कि समय के कोई पड़ावो को पार करते हुए वर्तमान स्थिति तक उक्त गाथा अपने मूल स्वरूप में नही होगी अर्थात् समय–समय पर उसमें कुछ अन्य तथ्य और तत्व जुड़ते गए होगे। विद्वान भी गढ़वाली लोकगाथाओं को किसी व्यक्ति अथवा कवि द्वारा रचित स्वीकार नही करते है।

लोकगाथाओं का लिखित रूप प्राप्त नही होने के कारण उनकी रचना का अनुमान कल्पना पर आधारित है ऐसा अनुमान लगाया जाता है कि मानव सभ्यता के विकास के साथ ही गाथाओं का भी विकास हुआ होगा। समुदाय विशेष की परंपराए, चिंतन, अनुभूतियाँ मिलकर लोकगाथाओं की रचना करती है।

**गढ़वाली लोकगाथाओं की विशेषताएं –**

गढ़वाल का एक अलग लोकजीवन है। यहां के लोगों का व्यवहार अलग है। सादापन, प्रकृति संबंध एवं अपनापन, देवी–देवतओं मे गहरा विश्वास, सच्चाई, सेवा, सच की आराधना आदि विशेषताएं यहां के लोगों को अन्य क्षेत्रो के मनुष्यों से अलग करती है। यहा की धरती भी बड़ी सुन्दर एवं मोहित करनेवाली है। प्रेम मनुष्य के मन का झुकाव है। यह प्रेम विभिन्न क्षेत्रों में पृथक रूपों मे पाया जाता है। सेवा प्रेम, राष्ट्र प्रेम, भक्ति प्रेम, वात्सल्य प्रेम, मित्र के प्रति प्रेम को प्रेम के कई रूपों में गढ़वाली लोकगाथाओं में देखा जा सकता है।

**संगीत नृत्य अभिनय का सामंजस्य –**

संगीत का ही प्रभाव होता है कि जागर गाथाओं के गायन में देवी–देवता प्रकट हो जाते है। गाथाओं में नृत्य के साथ ही पश्वा संबंधित देवी–देवता का अभिनय करता है।

**स्थानीय प्रभाव** – गढ़वालमे बहुत पहले मनोरंजन तथा यातायात के साधन नही होने से इन लोकगाथाओं में स्थानीयता का पुट आच्छादि हो पाया है।

**एक से अधिक गायक** – गढ़वाली लोकगाथाओं का प्रस्तुतीकरण एक ही गाथाकार के माध्यम से नही हो पाता है। एक गायक मुख्य गाथाकार के रूप में होता है। किन्तु उनके साथ सह प्रस्तुतकर्ता की भी भूमिका महत्वपूर्ण होती है।

**अवसर विशेष का महत्व** – गढ़वाली लोकगीतों की तरह लोकगाथाओं को कही भी प्रदर्शित नही किया जाता है। जागर व चैती गाथाओं में यही खूबी है कि इनमे समय–अवसर का विशेष महत्व है।

गढ़वाली लोकगाथाएं यहा के साहित्य का महत्वपूर्ण भाग है जिनमे यहा कि प्राचीन रचनाधर्मिता के दर्शन होते है उपरोक्त आधार पर कहा जा सकता है कि गढ़वाली लोकगाथाएं यहां के लोकजीवन का प्रतिबिंब है। प्रत्येक गाथा में एक संदेश एवं प्रेरणा होती है।

**संदर्भ–**

१. गढ़वाली गाथाओं में लोक और देवता – डॉ. वीरेन्द्र सिंह बर्त्वाल
२. इंटरनेट –theexampillar, com ,https//umjb.in>gyankash>life-val….

# जाती, वर्ण आणि धर्माचा भारतीय व्यक्तींच्या मानसिकतेवर झालेला परिणाम

**प्रा.अजय व्ही.निंबाळकर**
फुले—आंबेडकर कॉलेज ऑफ सोशलवर्क,गडचिरोली.
ई—मेल—ajayvnimbalkar@gmail.com,Mobile no&9049169936

**सारांश—**

भारतात जाती,वंश, धर्मसंस्था फार प्राचीन काळापासून आहे. या जाती, वंश, धर्माचा भारतीय व्यक्तींच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक स्थितीवर झालेल्या परिणामावर अनेक संशोधन, शोधनिबंध लिहिलेले आहेत. वर्णद्वेषाचा परिणामाचा अभ्यास इतर देशांमध्ये झालेला आहे.परंतु जाती, वंश धर्माचा भारतीय व्यक्तीच्या मानसिकतेवर झालेल्या परिणामाबाबत फारच कमी संशोधन झालेले आहे. त्याचप्रमाणे जाती, वर्ण, धर्माचा भारतातील स्त्रियांच्या, बालकांच्या मानसिकतेवर झालेल्या परिणामाबाबत फारच कमी संशोधन झाले आहे.प्रस्तुत शोधनिबंधात या घटकांच्या अनुषंगाने शोध घेण्यात आलेला आहे. त्याकरिता विविध पुस्तके, लेख, शोध निबंधाचा आधार घेण्यात आलेला आहे.**महत्वाचे शब्द—** जाती,वंश, धर्म, मानसिकता.

**प्रस्तावना—**

'अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील कलंक आहे.'
(महात्मागांधी)

भारतीय जाती व्यवस्था,धर्म व्यवस्था हे भारतीय समाजाची पायाभूत व्यवस्था आहे. धर्माची व्याख्या वेगवेगळ्या प्रकारे केलेली आढळते. परंतु यावर तज्ञांचे एकमत नाही. ऑक्सफर्ड शब्दकोशानुसार 'Religion as the belief in and worship of superhuman controlling powers,especially a personal God or gods.' वेबस्टर यांच्यानुसार "A strong belief in a supernatural powers that control human destiny " स्वामी विवेकानंद यांच्यानुसार"Religion is the manifestation of divinity takes, the answer was "in consciousness" प्राचीन भारतात या व्यवस्थेचा विकास झाला आणि ती पुढे मध्ययुगीन काळात, आधुनिक पूर्वकाळात आणि आधुनिक काळात बदलत गेली असे मानले जाते. जातीव्यवस्था दोन भिन्न संकल्पना पासून बनलेली आहे. वर्ण व्यवस्था आणि जाती व्यवस्था. वर्णव्यवस्था ही प्राचीन, वैदिक समाजामध्ये अस्तित्वात होती. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशा चार वर्णांमध्ये वर्गीकरण करण्यात आले होते. वर्णांमध्ये वर्गीकरण करण्यात आले होते. संतवांग्मयामध्ये जातीबद्दल लिहिल्या गेलेले आहे.

''जातीभेदे गांजिले त्रासिलो विटाळे ।......
एकापुढे एक पडती आघात । सारिता न सरत काय करू ?''
(संत चोखामेळा)

त्यातून संत चोखामेळा यांची जातीव्यवस्थेबद्दल उद्विग्नता दिसून येते. संत चोखामेळा लिहितात,

''वेदासी विटाळ शास्त्रस विटाळ ......... जन्मता विटाळ मरत विटाळ
चोखा म्हणे विटाळ आदि अंती ।। ,..... ऐवढेच काय ''
(संत चोखामेळा)

यावरून प्राचीन काळामध्ये जातीव्यवस्था किती निष्ठूर होती हे लक्षात येते.
साहित्यामध्येसुद्धा दलितांचे मानसिक खच्चीकरण करणारे वाक्य आढळून येते.
'ब्राह्मणाने ब्राह्मणाला गुरु करावे. शूद्राला कधीच करू नये.'
अशा प्रकारचे साहित्यामध्ये लिहिले गेले.

**जातिव्यवस्थेचा उगम —**

प्राचीन आणि मध्ययुगीन भारतात जातिव्यवस्थेच्या उगमाबद्दलचे दोन मुख्य सिद्धांत आहेत. या दोन्ही सिद्धांताचा पाया समाजातील विचार प्रणालीच्या घटकांवर किंवा सामाजिक, आर्थिक घटकांवर आधारित आहे. सिद्धांताचा पहिला प्रवाह हा विचार प्रणालीच्या घटकांना जाती व्यवस्था निर्माण करण्यात आणि ती पुढे तशीच ठेवण्यास कारणीभूत असल्याचे तसेच चातुर्वर्ण

ISSN : 2278-9308
July 2021

व्यवस्थेमध्ये जातीव्यवस्थेची मुळे असल्याचे मानतो. दुसरा मतप्रवाह सामाजिक, आर्थिक घटकांना जातिव्यवस्थेच्या केंद्रस्थानी मानतो आणि त्यांच्या मते हेच ते घटक आहेत ज्यांच्यामुळे जातीव्यवस्था निर्माण झाली आणि ती पुढे तशीच चालू ठेवणे शक्य झाले.सध्या अस्तित्वात असलेली जातीव्यवस्था ही मुघल काळाच्या अंताकडे आणि ब्रिटिश काळाच्या सुरुवातीला भारतीय समाजामध्ये झालेल्या स्थित्यंतरातून निर्माण झालेली आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जाती व्यवस्थेमध्ये अनेक बदल झाले. ज्यामध्ये अनुसूचित जाती आणि जमातींची एक यादी भारत सरकारने तयार केली.

भारतामध्ये मुख्यता हिंदू,मुस्लीम, ख्रिश्चन, इसाई, शिख, बौद्ध,जैन हे धर्म तर इतर मागासवर्गीय(OBC), अनुसूचित जाती(SC), अनुसूचित जमाती(ST), विशेष मागास प्रवर्ग (SBC), भटक्या जमाती(VJ) हे जातीचे प्रवर्ग आहेत. त्यामध्ये सुद्धा अनेक पोटजाती, वर्गवारी आहेत. अनुसूचितजातीमध्ये ५९ जाती आहेत, अनुसूचित जमाती मध्ये ४७ जाती येतात, इतर मागासवर्गीय मध्ये ३४६ जाती येतात , विशेष मागास प्रवर्ग मध्ये ०७ जाती येतात तर भटक्या जमाती मध्ये ३७ जातींचा समावेश होतो. जातीधर्मामुळे व्यक्ती व्यक्ती मध्ये मतभेद, वैचारिक फरक, एकमेकांबद्दल द्वेष,भेद दिसून येतो. भारतामध्ये ७९.८ टक्के हिंदू,१४.२टक्के मुस्लिम, २.३ टक्के ख्रिश्चन,१.७२ टक्के शिख, ०.७ टक्के बुद्ध, ०.३७ टक्के जैन आहेत (भारतीय जनगणना २००१).

भारतामध्ये शैक्षणिक दृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या, आर्थिक दृष्टीने सर्व धर्मातील लोक अग्रेसर नाही. भारतामध्ये शिक्षणामध्ये बुद्धिमत्ता आणि विद्वत्ता मोठ्या प्रमाणामध्ये आहे. परंतु शिक्षण हे केवळ उच्च समाजापुरतेच सीमित झाले आहे(मूर्ती २०१३,प्रमिला २०१४). भारतामध्ये पूर्वीपासूनच जाती धर्मानुसार भेदभाव केला गेला. दलितांवर तर खूप अन्याय झाला.दलितांना शुद्र म्हटले गेले. त्यांना अस्पृश्य समजले गेले.अस्पृश्यता इंग्रजांच्या आगमनापूर्वी शेकडो वर्षे प्रचलित होती. समाजातील एक गट जन्मापासून मृत्यूपर्यंत अछुत व अस्पृश्य आहे अशी समजूत होती. शूद्रांना पूर्वी कमी दर्जाची कामे करावी लागे. मेलेली जनावरे सक्तीने व कायद्याने त्याला ओढून न्यावी लागे. मेलेल्या माणसाच्या मरणासाठी लाकडे,गोवऱ्या सक्तीने टाकावे लागत. लग्नकार्यात बस्ती धरणे, गावोगावी मयताचा सांगावा देणे, गाव, भंडाऱ्यात लाकडे गोळा करणे इत्यादी कामे करावी लागत. वरिष्ठांच्या शेतीची सारी कामे करणे इत्यादी कार्य करावे लागत. या तुच्छ कामामुळे दास,शूद्र मध्ये हीनत्वची भावना, न्यूनगंडाची भावना निर्माण झाली आणि त्यातूनच जन्मतः जात हेच आपले काम अशी अत्यंत वाईट, माणसाचे व समाजाचे अंधपतन करणारे मानसिक गुलामगिरी वाढीस लागली. या जाती व्यवस्थेमुळे, धार्मिक फरकामुळे भारतामध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली नाही.अमेरिकेत जातीचा प्रश्न नाही, भारतात जाती आहेत. या जाती राष्ट्रविरोधी आहेत. जाती सामाजिक जीवनात विषमता निर्माण करतात. जाती—जातीत भेद निर्माण करतात.(डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर )

**जाती—धर्माचा स्त्रियांवर झालेला परिणाम**

जातिव्यवस्थेचा, धर्म व्यवस्थेचा स्त्रियांवर सुद्धा परिणाम झालेला दिसतो. पूर्वी स्त्रियांचे लग्न पाळण्यात, बालपणी लावले जात. तिसऱ्या, पाचव्या वर्षी तिचे लग्न लावण्यात येई.कधी सती म्हणून जिवंतपणे मरायला भाग पडे. यामुळे स्त्रियांचे मानसिक खच्चीकरण झाले. त्यांच्यामध्ये असुरक्षितता, असहाय्यपणा निर्माण झाली.

एकंदरीतजातिव्यवस्थेचा, धर्माचा मागासलेल्या वर्गावर, स्त्रियांवर परिणाम झाला. जातिव्यवस्थेची भारतात मजबूत पकड आहे.आजही ती तशीच आहे.

**पूर्व साहित्याचा आढावा—**

पूर्व साहित्याच्या आढावामध्ये, भारतामध्ये जातिभेदांमुळे शिक्षणावर परिणाम होत आहे असे दिसून येते. भारतामध्ये १९५० मध्ये भारतीय संविधानाने जन्मतः जातीमध्ये भेदभाव नाकारला असला तरी तो अजूनही अस्तित्वात आहे आणि त्याचा विपरीत परिणाम मागासलेल्या जातींच्या शिक्षणावर होत आहे-(MHRD2008)-आत्मप्रतिष्ठा आणि शाळेतील कार्यकुशलता यामध्ये जवळचा संबंध आहे. (विषालक्षी यशोधरा २०१२). स्व प्रतिष्ठेवर वातावरणाचा परिणाम होतो. वोंग आणि त्यांच्या सहकार्याने आफ्रिकन—अमेरीकन पौगंडांवर केलेल्या अभ्यासात असे दिसुन आले की,

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)

ISSN : 2278-9308
July 2021

वर्णभेदाचा आफ्रिकन अमेरीकन पौगंडावस्थेतील विद्यार्थ्यांच्या शाळेतील ग्रेडवर, मार्कांवर विपरीत परिणाम झालेला आहे (wong, eccles et.al 2003). युनिसेफनी जातीभेदाविषयी नोंदविलेल्या निरीक्षणातुन असे निदर्शनास येते की, मागासलेल्या जातीतील मुले शिक्षणापासुन वंचीत होते आणि त्याचा नकारात्मक परिणाम मुलांच्या आत्मप्रतिष्ठेवर, शाळेतील कार्यकुशलतेवर झाला (Nambissan, UNICEF,2009). व्यक्तिमत्वाचा शाळेतील कार्यकुशलतेवर परिणाम होतो, असे दिसुन येतो (Premuzic and Furnham, 2003). दलित मुलांना शाळेमध्ये दररोज अपमान, शोषण, अमानविय वागणुकीचा सामना करावा लागतो (Holzwarth et.al, 2006). शाळेतील अपमान, शोषणामुळे दलीत मुलांमध्ये शाळेबद्दलची रुची आणि प्रेरणा कमी झालेली आहे (Nambissan, UNICEF,2009). भारतातील चेन्नई मधील ९६ विद्यार्थ्यांवर अभ्यास केला गेला. त्यांना असे दिसून आले की, सामाजिक आर्थिक स्तर आणि शाळेतील गुणवत्ता यामध्ये लक्षणीय आणि धनात्मक संबंध दिसून आला (Franky and Chamundeshwari, 2014). गोयल आणि सिंग (२०१४) यांनी केलेल्या संशोधनात असे दिसुन आले की, सर्वसामान्य (General) प्रवर्गापेक्षा इतर मागासवर्गीयांची ¼OBC½ व्यावसायिक शिक्षणातील कामगिरी चांगली असते. भगत, जस्मीन यांना शाळेतील कामगिरी आणि आत्मप्रतिष्ठा यामध्ये लक्षणीय फरक दिसुन आला. (भगत, २०१६ ; जस्मीन, २०१५)

**अध्ययन पद्धती** :—

**स्वतंत्र परिवर्त्य—** भारतातील जात, वंश, धर्म.

**आश्रित परिवर्त्य—** भारतातील पुरुष, स्त्री, बालक.

**गृहीतकृत्य** :

१. धर्माचा भारतातील व्यक्तींच्या मानसिकतेवर नकारात्मक परिणाम झाला आहे.
२. जातिव्यवस्थेचा भारतातील व्यक्तींच्या मानसिकतेवर नकारात्मक परिणाम झाला आहे.
३. जाती आणि धर्माचा नकारात्मक परिणाम भारतीय स्त्रियांवर झालेला आहे.
४. जाती—धर्माचा लहान बालकांच्या मानसिकतेवर नकारात्मक परिणाम झाला आहे.

**साहित्य—**

प्रस्तुत संशोधनामध्ये गृहितकृत्याच्या पडताळणी करता विविध पुस्तके, पूर्व संशोधने, मासिक, वर्तमानपत्र या प्राथमिक स्त्रोतांचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**निष्कर्ष—**

१. धर्माचा भारतातील व्यक्तींच्या मानसिकतेवर नकारात्मक परिणाम झालेला आहे.व्यक्तींमध्ये असुरक्षितता, मत्सर, भेदभाव दिसून येतो.
२. जातिव्यवस्थेचा भारतातील व्यक्तींच्या मानसिकतेवर नकारात्मक परिणाम झालेला आहे. व्यक्तीमध्ये, न्यूनगंड, असुरक्षितता दिसून येते.
३. जाती—धर्माचा नकारात्मक परिणाम भारतातील स्त्रियांवर झालेला आहे. त्यांच्यामध्ये असुरक्षितता, अपराधीपणाची भावना, न्यूनगंड,असहाय्यता दिसून येते.
४. जाती—धर्माचा लहान बालकांच्या मानसिकतेवर नकारात्मक परिणाम दिसून येतो. लहान बालकांमध्ये असुरक्षितता, कमी आत्मप्रतिष्ठा (Low self-esteem), अपराधीपणा,आत्मविश्वासाची कमी दिसून येते. पण त्यावर आणखी संशोधन होणे आवश्यक आहे.

**संदर्भ** :—

डॉक्टर मेश्राम योगेंद्र. 'दलित साहित्य—उगम आणि विकास'. श्री. मंगेश प्रकाशन (१९९८), नागपूर.

गायकवाड सुभाष. 'दलित चळवळ—चिंता आणि चिंतन' (२००२).

कांबळे बी. सी. 'समग्र आंबेडकर चरित्र—खंड चोविसावा' (द्वितीय आवृत्ती, २००७) सुगावा प्रकाशन, पुणे.

खैरमोडे चां.भ. 'डॉक्टर भीमराव रामजी आंबेडकर खंड १२' (द्वितीय आवृत्ती २०००) सुगावा प्रकाशन पुणे.

Boby xavier thaiparambil (2017). ''influen ce of caste system on self-esteem andschool performance''(०७—१५).

विकिपीडिया. ''भारतातील जातीव्यवस्था'' (१७ जुलै २०२१).

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# जाती वर्गाचा आणि धर्माचा राजकारणावर होणार परिणाम

डॉ. अजय पी.बोरकर
(कार्यकारी प्राचार्य) सिध्दार्थ महाविद्यालय – चिचपल्ली ता.जि. चंद्रपूर

**सारांश :—**

भारतीय जाती व्यवस्था ही भारतीय समाजाची पायाभूत व्यवस्था आहे. प्राचीन भारतात हया व्यवस्थेचा विकास झाला आणि तीपुढे मध्ययुगीन काळात, आधुनिक पूर्व काळात आणि आधुनिक काळात बदलत गेली असे मानले जाते. हया व्यवस्थेतील मोठी संरचनात्मक स्थित्यंतरे मुघल साम्राज्याच्या काळात आणि ब्रिटिश साम्राज्याच्या काळात झाली आहेत असे मानले जाते. हया व्यवस्थेला मात देण्यासाठी आजच्या भारतीय समाजामध्ये राजकीय, शैक्षणिक आणि सामाजिक पातळयांवर आरक्षणाची व्यवस्था निर्माण करण्यात आली. जाती व्यवस्था दोन भिन्न संकल्पनांपासून बनलेली आहे, वर्ण व्यवस्था आणि जाती व्यवस्था वास्तविक पहाता हया सामाजिक स्तरीकरणाच्या विश्लेषणासाठी वापरण्यात येणाऱ्या दोन वेगवेगळया पध्दती आहेत.

सध्या अस्तित्वात असलेली जाती व्यवस्था ही मुलग काळाच्या अंताकडे आणि ब्रिटिश काळाच्या सुरूवातीला भारतीय समाजामध्ये झालेल्या अनेक स्थित्यंतरातून निर्माण झालेली आहे. मुघल साम्राज्याच्या अंताच्या काळामध्ये अनेक शक्तिशाली व्यक्तीचा आणि गटांचा उदय झाला. त्यांनी स्वत: राजेशाही, धर्मात आणि ब्राम्हण यांच्या बरोबरीने उभे राहण्याची ताकद कमावली होती, हया सामाजिक बदलामुळे अनेक जातिबाहय गटांमध्ये ही जातीय अस्मितांची निर्मिती व्हायला मदत झाली. ब्रिटिश काळात हयाच सामाजिक स्थित्यंतराचे ब्रिटिशांनी आणलेल्या प्रशासकीय व्यवथेमध्ये स्थिर अश्या जाती घडविण्यामध्ये रूपांतरण झाले. १८६० आणि १९२० दरम्यान, ब्रिटीशांनी भारतीय समाजाला जातीय स्तरावर वेगवेगळे मांडायला सुरूवात केली होती. त्यातूनच प्रशासकीय पदे आणि कामे ही फक्त उच्च जातीय लोकांनाच देण्याचे ठरविले. ज्याचा परिणाम स्वरूप १९२० साली मोठया प्रमाणात समाजातून विरोध निर्माण झाला आणि ब्रिटीशांना त्यांच्या हया धोरणामध्ये बदल करावा लागला. आणि त्यापुढे ब्रिटीशांनी सरकारी नोकऱ्यांच्या काही पदांवर आणि एकूण पदातील काही टक्के पदांवर खालच्या जातीच्या लोकांनाही घ्यायला सुरूवात केली आणि आरक्षणाची सुरूवात केली.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर अनेक बदल झाले ज्यामध्ये अनुसूचित जाती आणि जमातींची एकयादीच भारत सरकारने तयार केली आणि त्यानुसार जाती आधारित आरक्षणे सरकारी नोकऱ्या आणिशिक्षणाच्या बाबतीत लागू करण्यात आल. १९५०० पासून भारत सरकारने अनेक कायदे आणि सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा आणण्यासाठी निर्माण केले. ही शैक्षणिक, सरकारी पदांमधील आरक्षणे आणि इतर सोयी सुविधा हया वंशपरंपरेने विशिष्ट जातीतील लोकांना मिळतील आणि हया सेवा—सुविधा लाभार्थ्यांकडून इतर दुसऱ्या कोणाला देता येणार नाहीत अशा स्वरूपाच्या होत्या[१]

- **प्रस्तावना :—**

महाराष्ट्रातील समाजाची अभिसरण राजकिय प्रक्रिया भारतीय समाजात १९४७ पूर्वीपासून राजकीय दृष्टया अनेकांनी, विविधांगी प्रक्रियांनी कार्यस्तरीय, कार्यरत आहे. त्यातील समाजातील भारतातील धर्म, जात, अर्थ यांची स्वरूप परीणामकारकरीत्या कार्यरत आहे. वर्तमानस्थितीत त्यात सामाजिक व राजकिय सहिष्णु व असहिष्णुतेसाठी भारतीय समाज राजकियरीत्या जातीच्या समस्यातून सुटला नाही आजपर्यंत जातीनिष्ठ कार्यरत आहे.

सामाजिक स्थरीकरण व सामाजिक राजकिय अभिसरण प्रक्रियेत जात ही राजकीय शक्ती चे स्वरूप धारण केले आहे, राजकिय संघर्षात्मक भूमिका, संघर्ष, जातीचे राजकारण समाजाची मुख्य उद्दिष्ये सोडवतात किंवा समाजाची मुख्यत्वेकरून मुलभुत तत्वे राजकीयरित्या सोडविली जातात. हा चर्चेचा विषय आहे ही दिशाभूल आहे. मुख्यत्वे करून हयामधील अर्त:प्रवाह हा राजकीय समाज मजबूतीकरणासाठी आहे की सामाजिक जातीच्या अभिसराणासाठी आहे हया

ISSN : 2278-9308
July 2021

दोहोतील भाव, आभास, विचारही आहे. जात व राजकारण ही द्विदिशात्मक राजकिय करणाची प्रक्रिया अथवा जातीचे राजकिय संस्थात्मक संर्घशीत करण्याची विविधांगी प्रक्रिया वर्तमानस्थितीत राजकिय दृष्टया कार्यरत आहे. राजकीय, सामाजिक स्थरीकरणाची, अभिस्तरणाची प्रक्रिया समाजाच्या विशिष्ट गरजानुसार होत असते. भारतीय सामाजिक स्थरीकरण, अभिकरण पारंपारिक पध्दतीनुसार जातिनिष्ठतव स्वरूपाची आहे. वैदिक काळात सामाजाची धार्मिक अभिसरात चौकट, कार्यकरण, कार्यात्मक स्वरूप रूपरेषा चार वर्णात्मक चौकोटीत विभागण्यात आणि त्यामध्ये कार्यात्मक, कार्यकरण कार्यकारक रूपरेषा त्यांच्या चार वर्णात्मक ओळखीनुसार कार्यबध्द स्थितिबध्द कार्यात्मकरीत्या सामाजिक स्थरीकरणात अभिप्रेतरीत्या कार्यत्मक झाली त्यामध्ये कार्यात्मक रूपरेषाचे श्रेष्ठ स्थान १) ब्राह्मण २) क्षत्रिय ३) वैश्य आणि ४) शुद्र वर्तमान काळातील दलितअसे चार वर्ग व चार वर्णझाले आणि राजकियकरण राजनितीज्ञानी प्रशस्तक्रिया धुरीणांनी धर्मात्मक दृष्टया ४) शुद्राचे दलित व आवर्तीय दलित असे राजकिय अभिसरण प्रक्रियेनुसार मताचे, बेरजेचे राजकारण कार्यरत केले. कनिष्ठ जाति दलितात अनेक राजकिय व घटनात्म वैधात्मिक फायदे घेण्यासाठी पूर्वानुभावीच्या हिंदु महारातअनेक पोट जाती/जमाती प्रशासकिय दृष्टया निर्माण करण्यात आल्या. त्यामुळे सामाजिक स्थरीकरणात श्रेष्ठतव टिकविण्यासाठी जाती जातित अनेक अस्थरीय जाती निर्माण झाल्या. त्या उपजातीत विभागीय झाली त्यामुळे जातीसमूहाचे अस्थित्व टिकविण्यासाठी समूहाचे अस्मित्ववेधानिकरीत्या सिध्द करण्यासाठी भारतीय राजकारणाची चौकट बदलली ही भारतीय राजकारणाची सामाजिक वस्तुस्थिती आहे. पारंपारीक वर्ण व्यवस्थेच्या परिभाषेत महाराष्ट्र स्थितीत उच्च श्रेष्ठीजन जाती ब्राह्मणवर्णाच्या आहेत. मराठा जाती स्वत:तील श्रेष्ठतव क्षत्रियरूपी मानतो समाज कनिष्ठ जातीसमूह वैश्य आणि क्षुद्र या वर्णात समाविष्ठ केल्या जातात. तर अनुसूचित जाती (अ. ५४%) अनुसुचित जमाती, भटक्या विमूक्त जाती या धोरणात्मक वैधात्मिक विभाग २४ आहेत. या जाती अतिशुद्र, समजल्या जातात. त्याचे हे घटनात्मक, वैधानिकरित्या विकसित स्वरूप आहे. त्यामध्ये पोटजाती सवर्ण व अस्पृश्य अशीही विभागणी करण्यात आली असे जानवते.

शहरी विद्वत वृंद व ग्रामीण स्थरातील विद्वत विकसनशील समाजात मध्यमरीत्या कष्ट करणारा समाजातील जाती वर्ग आहे. त्यांनी शहरातील पांढरपेषी वर्गाला निम्नस्थर समजले त्यामध्ये पांढरपेशा वर्ग उच्च जाती श्रेष्ठीजन. अन्य अभ्यासकाच्या मते राजकीय स्वायत्ततेतील स्थानिक नेते आणि राजकिय विघटनशील नेते त्याच्या तील स्वायत्त समुह हा जातीय स्वायत्त समुह हया पंचायाती राज्य स्थरापासूनचे सहभागी सद्य:स्थितीत मराठा जातीचे राजकिय व समाजातील श्रेष्ठतव आहे. यालाच जातीचे (मराठा) राजकीयकरण संबोधले जाते. जातीच्या शुद्र दलित उतरडिंत, शृंखलेत विविध जातीचे स्थान, प्रतिष्ठा महत्व उतरत्या क्रमाने.

- **महाराष्ट्रातील प्रमुख जातिसमूह**

| जाति समूह | टक्केवारी |
|---|---|
| उच्चवर्णी | ४% |
| मराठा कुणबी | ४१ % |
| कनिष्ठ जाती | १९% |
| अनुसूचित जाती (अ.ज.) | ०७% |
| नवबौध्द | ०६% |
| अनुसूचित जमाती (अ.ज.) | ०९% |
| मुस्लिम | ०९% |
| इतर अल्पसंख्य | ३% (२२%) |
| इतर जमाती (इ.ज) | ८२% |

- **महाराष्ट्रातील प्रभावी घटकाची प्रक्रिया**

१) उच्च वर्णीय :—ब्राम्हण, गौड, सारस्वत, चांद्रसेनिय, कायस्थ, पाठारे (सी.के.पी.), प्रभु इत्यादी जाती उच्च वर्णीयात समावेश करण्यात येतो.

२) मध्यस्थरीय :— मराठा कुणबी जाती समूहाचा मध्यस्थरीय जातीत समावेश या व्यतिरिक्त राजपूत, लेवा पाटील जातीचा समूहाचा समावेश केला जातो.
३)कनिष्ठ जाती :—(इ.मा.जा.) इतर मागास जातिची संख्या दोनशे (२००) हून अधिक आहे. कुणबी मराठा जातिसमूहाचा समावेश (इ.मा.जा.) करण्यात आला आहे.
४) दलित ५९ (अ.जा.) अनुसूचित जाती आणि नवबौध्दचा समावेश आहे. त्यातच पूर्वाश्रमीच्या (महार जाती) दलित सदरीय समावेश करण्यात येतो योजनात्मकरित्या वियुक्त जाती आणि भटक्या जमाती त्यातच समावेश केल्या आहेत.
५) अनुसुचित जमाती :— ४७ आदिवासी किंवा आदिम जमाती अति दुर्गम भागात वास्तव करणारे मान्यता प्राप्त अनुसूचित जमाती आहेत.
६) अल्पसंख्य :— अल्प संख्य सदरात मुस्लिम, जैन, बौध्द, पारशी, ख्रिस्तीया धार्मिक अल्पसंख्य गटाचा समावेश आहे.
७) इतर जाती जमाती :— या गटात इतर अमराठी गटाचा समावेश आहे. उदा. उत्तर भारतीय, तेलगू मल्याळी, तामिळी इत्यादीचा समावेश आहे.

१९३१ च्या जनगणनेत खानेसुमारित जाती जातीतील देण्यात आलेली आकडेवारी सर्वसामान्य स्वरूपाची आहे मात्र अनुसूचित जाति, नवबौध्द, अनुसूचित जमाती, धार्मिक अल्पसंख्य यासंबंधीचे आकडेवारी १९९१ च्या जनगणणेच्या आधारे आहे[२]

- **जातीभेद विषमतेचे परिणाम**

**१) मानवी मूल्यांचा अभाव** (Lack of Human Values) : व्यक्तीच्या सर्वांगीन विकास होण्याकरीता मुलभूत मानवी अधिकारांची आवश्कता असते. व्यक्तीला विकास करण्याकरीता स्वातंत्र, समान संधी, न्याय या मानवी मूल्यांची गरज असते. जेव्हा समाजात ही मानवी मूल्यअसतात, तेव्हा समाजातील प्रत्येक व्यक्तीला विकास करण्याची संधी मिळते. आणि व्यक्तीगत विकासाबरोबरच सामाजिक विकास देखील घडून येतो. परंतु जातीव्यवस्थेत या मानवी मूल्यांचा पूर्णत: अभाव आहे. आज संपूर्ण जगात मानवतावादाची जोपासना केली जाते. परंतू जातीभेदामूळे भारतात मानवतावाद रूजू शकला नाही. मानवी मूल्यांचा अभाव असने हा जातीचा सर्वात मोठा दोष असून जातीभेदामूळे मानवी मूल्यांचा अभावी समस्या निर्माण झाली आहे.

**२) समान सामाजिक आणि धार्मिक हक्कांचा अभाव** ( Lack of Equal Social and Religious Rights): जातीव्यवस्थेने उच्च जातींना सामाजिक आणि धार्मिक हक्क प्रदान केलेत. उच्च जातींना काही विशेष धार्मिक हक्कसुध्दा सुध्दा आहेत. परंतू बहूसंख्यांक असलेल्या कनिष्टजातीच्या लोकांना सामाजिक आणि धार्मिक हक्कांपासून वंचीत ठेवले आहे. इतकेच नव्हेत तर कनिष्ठ जातीवर अनेक सामाजिक आणि धार्मिक अपात्रता लादण्यात आल्यात. सर्व जातीचाा एकच धर्म असतांना देखील कनिष्ठ जातीच्या लोकांना धार्मिक विधि वैदिक पध्दतीने करण्याचा अधिकार सूध्दा नाकारण्यात आला होता. हक्कांपासून वंचीत ठेवले आहे.

**३) सामाजिक विषमता** : जातीभेद हा व्यक्तीगत विकासाला बाधक आहे. त्याचप्रमाणे सामाजिक विकासासाठी पण बाधक आहे. जातिनियमांचा व्यक्तीवर विशेष प्रभाव असतो. त्यामूळे ते परंपरा, रूढी विश्वास आणि संकेताचे निमूटपणे पालन करतात. जातिनियमांच्या वेगळीगोष्ट करीयला ते तयार नसतात. एकतर जातीचे संस्कार आणि दुसरी गोष्टम्हणजे जातीबहिसकृत करण्याची भिती, यामूळे नविन गोष्ट करण्यास ते तयार नसतात. थोडक्यात, जातिव्यवस्था ही सामाजिक विकासास बाधक आहे. विशेषत: कनिष्ठ जाती आणि अस्पृश्यांचा सामाजिक विकास जातीभेदामूळे होऊ शकला नाही.

**४) सामाजिक गतीशीलतेचा अभाव** (Lack of Social Mobility) : जातीव्यवस्थेत सामाजिक गतीशीलतेचा पूर्णपण अभाव आढळतो. व्यक्तीला जन्माच्या आधारावरजातीचे सभास्यत्व मिळते. आणि जातीनूसार सामाजिक दर्जा मिळतो. कोणत्याही परिस्थीतीत व्यक्तीला सभास्यत्व मिळते. आणि जातीनूसार त्याचा सामाजिक दर्जा मिळतो. कोणत्याही परिस्थीतीत व्यक्तीला जात बदलता येत नाही. त्यामूळे त्याचा सामाजिक दर्जा हा स्थिर असतो. आपला विकास व्हावा, दर्जा बदलावा असे व्यक्तीला वाटले तरी जातीच्या कडक निर्बंधामूळे हे शक्य होत नाही. जातिभेदामूळे कनिष्ठ जातीतील बुध्दीमान लोकांना सूध्दा उच्च जातीचा सामाजिक दर्जा प्राप्त होत नाही. जातिभेदामूळे

कनिष्ठ जातीच्या लोकांच्या विकासाचे आणि गतिशीलतेचे सर्व मार्ग बंद केले आहेत. जात ही बंद स्तरीकरणाची व्यवस्था आहे. म्हणून भारतीय समाजात गतीशीलता आढळून येत नाही.

५) **आर्थीक विषमता** : जातीमूळे समाजात श्रमविभाजन घडून आले. हे श्रम विभाजन व्यक्तीच्या गुण आणि कौशल्याच्या आधारावर झालेले नाही. काही महत्वाचे व्यवसाय श्रेष्ठ जातींना देण्यात आले. तर कनिष्ठ व्यवसाय कनिष्ठ जातीवर लादण्यात आले. व्यवसायाची निश्चिती जातीच्या आधारावर करण्यात आली असल्यामुळे समाजात आर्थिक विकास घडविण्याच्या दृष्टीने कोणतीही अनूकूल परिस्थिती जातीव्यवस्थेने निर्माण होऊ दिली नाही. म्हणून भारतीय समाजाचा आणि विशेषत: मागास जातींचा आर्थिक विकास होऊन शकला नाही.

६) **अस्पृश्यत** (Untochability) : 'अस्पृश्सता'ही जातीव्यवस्थेची निर्मीती आहे. जातीव्यवस्थेत काही अस्पृश्य जाती आहेत. या जातीच्या लोकांना स्पर्श होणे आधर्म मानला जातो. अस्पृश्य जातीच्या लोकांवर अनेक अपात्रता लादण्यात आल्या होत्या. अस्पृश्य लोकांना मुलभूत मानवी अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले होते. डॉ.बी.आर आंबेडकर यांच्या मते, 'अस्पृश्यता ही गुलामगिरीच्या तुलनेत अतिशय रानटी व क्रुर आहे' आजही देशातील अस्पृशांची परिस्थिती अतिशय विदारक आहे. केवळ जातीभेदामूळे समस्या निर्माण झाली आहे.

७) **जातिवाद** (Casteism) : प्रत्येक व्यक्तीचे सामाजिकरण हे त्याच्या जातीनूसार होत असते. उच्च जातीचे लोक स्वत:ला श्रेष्ठ समजतात. आणि कनिष्ठ जातीच्या लोकांना तुच्छ मानतात. व्यक्तीच्या निष्ठा ह्या त्याचा जातीपूरत्याच मर्यादित असतात. त्यामूळे प्रत्येक व्यक्तीला आपल्या जातीचा अभिमान वाटतो. व्यक्ती आपल्या जातीच्या हितांचाच विचार करते. यातूनच जातीवाद निर्माण होतो. आज भारतातील शैक्षणिक, आर्थीक, सामाजिक, राजकीय इत्यादी सर्वच क्षेत्रात जातीवाद बोकाळला आहे. जातीभेदामूळे एक ज्वलंत समस्या निर्माण झाली आहे.

८) **राष्ट्रीय ऐकतेस आडा** : जातिव्यवस्थेमुळे देशातील लोकांचे शेकडो जातीमध्ये विभाजन झाले आहे. जातीमूळे व्यक्ती आपल्या जातीपूर्ती मर्यादीत होते. व्यक्तीला आपल्या जातीचा समूहे हाच महत्वाचा वाटतो. त्यामूळे जाती–जातीचे स्वतंत्र समूह निर्माण झालेत. त्यांच्या निष्ठा ह्या जातीपूरत्याच मर्यादीत राहिल्या. जातीभेदामूळे त्यांच्यात राष्ट्रीय भावनेचा विकास होऊ शकला नाही. म्हणून आपल्या देशात राष्ट्रीय ऐकात्मतेचा अभाव आहे.

९) **वरिष्ठ वर्गाची हूकूमशाही**: जातिव्यवस्थेची निर्मीती ही प्रामूख्याने उच्च जातीचे संरक्षण करण्यासाठी झाली आहे. जातीव्यवस्था हि उच्च जातीच्या सुरक्षितेची ढाल आहे. म्हणूनच उच्च जातीच्या हिताचे अनेक नियम आहेत. तर कनिष्ठ जातीच्या लोकांनी कधीच प्रगती करून नये, त्यांनी उच्च जातीचे गुलाम बनून राहावे, म्हणून त्यांच्यावर अनेक निर्बंध केवळ जातीभेदामूळे लादण्यात आलेत. उच्च जातीच्या लोकांचे गुलाम बनून रहावेत अशा प्रकारची कायम व्यवस्था जातीव्यस्थेव्दारे निर्माण करण्यात आली आहे.

१०) **जाती संघर्ष** (Caste Conflict) : सर्व जातीचा दर्जा समान नाही. ज्या जाती उच्च ओत त्या जातीच्या लोकांनी आपल्या उच्च जातीचा अभिमान असतो. आणि कनिष्ठजातीच्या लोकांविषयी घृणेची भावना असते. कनिष्ठ जातीच्या लोकांवर ते सतत अन्याय करतात. त्यांची वारंवार अवहेलना केली जाते. उच्च जातीचे लापेक आपल्यावर अन्याय करतात ही भावना कनिष्ठ जातीच्या लोकांमध्ये असंतोष निर्माण करते. भारतात जाती संघर्षाची शेकडो उदाहरणे आढळून येतात.

अश्याप्रकारे जातीभेदामूळे अनेक सामाजिक प्रश्न निर्माण झाले आहेत. जातीभेदामूळे अनेक सामाजिक, सांस्कृती, आर्थिक, धार्मीक, शैक्षणिक, राजकीय आणि राष्ट्रीय समस्या निर्माण झाल्या आहेत. जातीव्यवस्था आणि त्या अनुषंगाने निर्माण झालेला जातीभेद हा अनेक सामाजिक समस्यांची जननी आहे. याचे प्रमूख कारण म्हणजे हिंदू धर्माची जातीव्यवस्थेला असलेली मान्यता होय [३]

या घटनेच्या अनुषंगाने भारतीय समाजाची जडणघडण होत असता त्याला कायद्याची जोड देऊन भारतीय समाजाला भेडसावणाऱ्या अनेक समस्यांचे निवारण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. सर्वांना समान कायदा लागू करून जातिभेद, लिंगभेद, धर्मभेद आदी माणसांना दूर ठेवणाऱ्या कृत्रिम भिंती नाकारल्या आहेत. अस्पृश्यता निवारणासाठी काटेकोर व कठोर कायदेकेलेआहेत.

ISSN : 2278-9308
July 2021

एवढेच नव्हे तर सामाजिक न्यायाच्या तत्वाचा आविष्कार करून मागासलेल्या म्हणजेच अनुसूचित जातीव जमातीच्या कल्याणासाठी शासकीय व अशाकीय क्षेत्रात नोकऱ्या राखीव ठेवल्या आहेत. दीर्घकाळ ज्यांना समाजव्यवस्थेत पददलितांची वागणूक दिली त्यांना स्वातंत्र्योतर काळात आपला दर्जा उंचावता यावा, शिक्षण घेता यावे यासाठी अनेक सोइ–सवलती दिल्या आहेत [४]

भारतीय समाज हा अनेक जाती व उपजातीत विभागला आहे. परंपरेने त्याची रचना एखादया उतरडा प्रमाणे आहे. भारतात आधुनिकीरणाची सुरवात झाल्यावर हे चित्र बदलू लागले. ब्रिट्श्याच्या राजवटीत शिक्षणाचे दरवाजे सर्वांना खुले झाले. परंपरागत व्यवसाय टाकून नविन व्यवसाय करण्याची मुभा मिळाली. सामाजिक सुधारनेतून समता व स्वातंत्र्याची नवी मुल्ये समाज सुधारकांनी स्विकारली. लोकशाही त्या स्थापनेतुन या परिवर्तनाच्या प्रक्रियेत प्रामाण्य लाभले. तत्वत लोकांच्या प्रतिष्ठेपेक्षा त्यांच्या संख्येला महत्व आहे. या नवीन व्यवस्थेत आपल्या संख्याबळाचा आणि संघटनेचा वापर करून आपल्या जातीच्या लोकांना सत्ता व उन्नतीची साधने मिळवून देण्यासाठी स्पर्धा सुरू झाली. दुसरीकडे राजकारणात जातीय निष्ठांचा उपयोग पक्षास अनुयायी मिळविण्यासाठी करता येतो हे लक्षात आल्याने अनेक पक्ष आपले उमेदवार निवडण्यासाठी, धोरण ठरविण्यासाठी जातीस महत्तव देऊ लागले. त्यातुन जात आणि राजकारण यांच्या संबंधात गुंतागुंतीचे चित्र निर्माण राजकारणात परिणामकारक प्रभाव टाकण्यासाठी जातिजातीत युत्याही झाल्या आहेत अथवा जातींच्या संघटना निर्माण झाल्या आहेत. स्वातंत्र्याच्या सुरूवातीच्या काळात सत्तेवर उच्चवर्णीयांची पकड होती परंतु वर वर्णिलेल्या प्रक्रियेतून हळूहळू पांरपारिक प्रतिष्ठेच्या दृष्टीने मध्यम समजल्या गेलेल्या जातींनी राजकारणात शिरकाव करून त्यांना आव्हान दिले. जमीन–मालकी आणि लक्षणीय संख्या यांच्या साहाय्याने त्यांनी अनेक सत्तास्थानांवर आपला प्रभाव पाडला आहे.

स्वातंत्र्यापूर्वीच अस्पृश्यता निर्मूलनाच्या आंदोलनाने वेग घेतला होता. अस्पृश्यांचे नेतृत्व करणारे बाबासाहेब आंबेडकर हे संविधान समितीतील प्रभावी सदस्य होते. संविधानाचा मसुदा त्यांच्या अध्यक्षतेखाली समितीने तयार केला. सर्व पक्षांना अस्पृश्ता निर्मूलनाचे तत्व मान्य होते. तेव्हा संविधानात खास तरतूद करून अस्पृश्यतेस बंदी घालण्यात आली. १९५५ मध्ये यासंबंधीचा कायदा होऊ अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरविण्यात आला. १९७५ मध्ये हा कायदा अधिक कडक करण्यात आला. अस्पृश्य हे सर्वच अर्थांनी उपेक्षित, पददलित असल्याने त्यांना इतर समाजाच्या बरोबर आणण्यासाठी खास व्यवस्था करावयास हवी, याबद्दल एकमत होते. दहा वर्षासाठी अस्पृश्य विधिमंडळात ८३७. राखीव जागांसंबंधीच्या या तरतुदीची मुदत १९९० पर्यंत वाढविण्यात आली आहे. सरकारी नोकऱ्या, शिक्षणसंस्थेतील प्रवेश यासंबंधीही सरकारने या जातिजमातींना पुरेसे प्रतिनिधत्व मिळावे, म्हणून राखीव जागा ठेवल्या आहेत. प्रत्यक्षात राजकीय जागृती मोठया प्रमाणात झाली असली, तरी अद्याप ते इतर समाजाच्या बरोबरीस आले आहेत, असे दिसत नाही. अद्यापही त्यांचे शोषण चालु असल्याचे दिसते.

• **निष्कर्ष :–**

जातीव्यवस्था ही विषमतेवर आधारीत आहे. त्यामूळे जातीच्या गुणांपेक्षा जातीचे दोषच अधिक आहेत. भारतीय समाजात जातीभेद किंवा जाती विषमता एक फार मोठी सामाजिक समस्या आहे. जातीव्यवस्थेमूळे भारतीय समाजात विविध प्रश्न निर्माण झाले आहेत. स्वातंत्र, समता, बंधुता आणि न्याय या मानवि अधिकारांचे हनन झाले. जातिवाद, अस्पुश्यता, सामाजिक शोषन इत्यादी अनेक समस्या जातिभेदामूळे निर्माण झाल्यात. जातिभेदामूळ ऐक संघ असा भारतीय समाज निर्माण होऊ शकला नाही व्यक्ती आणि सामाजिक विकासामध्ये जातीभेद फार मोठा अडथळा बनला आहे.

सामाजिक व राजकीय क्षेत्रात विविध अंगाने जाती व वर्गाची जातीव्यवस्थेत विविध अंगाचे राजकारणावर विविध परिणाम होतांना जाणवते. कारण जाती व्यवस्था ही निर्माण होऊन त्यातील दुष्परिणाम धर्मावर होऊन धर्माची विभागणी अनेक क्षेत्रात होतांना जाणवते. अनेक व्यक्ती विविध जातीत निर्माण झालेले श्रेष्ठ कनिष्ठ अशा भेदभाव करण्यास सुरूवात झाली व धर्माच्या फुटीरतेचे वातावरण निर्माण झाले, व विविध अंगाने जाती वर्गाचा, धर्माचा राजकारणावर विविध परिणाम होतांना जाणवते.

- संदर्भ

१. भारतीय जातीव्यवस्था गुगल सर्च
२. Renukacollege. Org
३. Religion and social Change-समाजशास्त्र बी.ए. ३ पेपर २
४. डॉ. कुलकर्णी जे.बी.प्राचार्य— महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रिया — मार्च २०१६

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# ''बौध्द धर्माचा समाज जीवनावर पडलेला प्रभाव''

प्रा. डॉ. विद्या श्रीकृष्ण भारंबे
सहयोगी प्राध्यापक रा.तु.म.ना.वि.बॅ.एस.के. वानखेडे शिक्षण महाविद्यालय, नागपूर
Email: -vs.bharambe@gmail.com,Mob. No. :- 9890878696

**प्रस्तावना :—**

बौध्द पूर्व समाज जीवनावर वैदिक संस्कृतीचा प्रभाव असुन समाजात सर्वत्र अराजकता पसरली होती. समाजामध्ये वर्णव्यवस्था जातीव्यवस्था स्वर्ग, नरक, आत्मा, वंश, कर्मकांड, वेद, पुर्नजन्म आणि ईश्वर यासारख्या मानवी जीवनाशी असंबधित बाबींच्या मागे लावला होता. समाजामध्ये धर्माचा नावावर मद्यपान, जुगार भोगावर आणि अनैतिकता मोठया प्रमाणात होती. तत्कालीन वस्तूस्थिती पाहता जनसामान्यांना वैदिक धर्मापेक्षा वेगळया जीवन पध्दतीची आवश्यकता भासली होती. कर्मकांडाचे प्राबल्य जातीव्यवस्था, संस्कृत भाषेचा आग्रह हे वैदिक धर्मात रूढझाले होते. त्यामुळे वेगळया मार्गाने जीवन दाखविणारी दिशा सामान्य जनतेला हवी होती.

तथागताने वैदिक संस्कृतीतील अनैतिकता आणि भोगवादावर प्रहार करून जनतेला नैतिकता आणि सदाचाराची शिकवण देवून धर्माच्या खऱ्या तत्वांची ओळख निर्माण करून दिली. व्यक्तीच्या सुखी जीवनाकरीता जीवनाचा मापदंड म्हणून नैतिक आचण आवश्यक आहे. अशी बुद्धाची शिकवण होती. बौध्द धर्मात माणसाने माणसाशी कशाप्रकारे वागले पाहिजे याचा विचार केलेला आहे.

तथागताने ''ईश्वरविषयक कर्मकांडाऐवजी आधार शीलतेची प्रतिष्ठापना धर्माचा गाभा म्हणून केलेली आहे. नीतीमत्ता ही बौध्दधर्माची सर्वप्रथम व प्रमुख अशी आधारशीला मानली गेली आहे. बौध्द समाज जीवनाशी कर्तव्यदक्ष असतो. तत्वप्रणाली प्रमाणे समाजाला नीतीतत्वांनी वागण्यास कार्यपवण करणे व प्रापंचिक लोकांपुढे स्वत:च्या माणूसकीचा एक उत्तम नमुना ठेवणे हा प्रमुख हेतु बौध्द भिक्खु निर्माण करण्यामागे होता. या धर्मानुसार पृथ्वीतलावर जन्माला आलेल्या प्रत्येक माणसाला सुख व शांती मिळाली पाहिजे व सर्वांनी सुखी राहले पाहिजे बौध्द धर्म हा बुध्दीवादावर व अनुभवावर आधारीत आहे.

बुध्दाने या धर्माला विज्ञानाची जोड दिली आहे. धर्मस्वातंत्र बहाल केले आहे. या धर्मात सामाजिक वैयक्तिक आर्थिक व राजकीय स्वातंत्र्यांचा पुरस्कार केलेला आहे. बुध्दाने स्त्री पुरूषांमध्ये भेद नाकारला आहे स्त्रियांना सन्यास किंवा परिव्रजा देण्याचे क्रांतीकार्य केले आहे.

''फ्रान्सच्या राज्यक्रांतीने जगाला स्वातंत्र्य क्षमता बंधुत्व व न्याय ही आधुनिक मानविय मुल्ये दिल्याचा गैरसमज आहे परंतु हजारो वर्षापूर्वी या मानवीय मुल्यांचा पुरस्कार बुध्दाने केलेला होता त्यामुळे ज्या विभूती हिंदू स्थानात निर्माण झाल्या त्यात बुध्दाचे स्थान उच्च प्रतिचे आहे.''

१)बुध्दाचे संपूर्ण तत्वज्ञान चार श्रेष्ठ आर्यसत्या मध्ये सांगीतले आहे.
२) दु:खदायी कारणांच्या उपाय अज्ञानतेमुळे मनुष्यप्राणी दु:खी आहे कारण जगात दु:ख आणि दारिद्रय हे महाभंयकर रोग आहेत दारिद्रयामुळे व्यक्तीच्या अतृप्त इच्छा मनुष्यास दु:खी करतात.
३)बुध्दाने दु:खास कारणीभूत असणाऱ्या कारणांचा शोध घेतला. अतृप्त इच्छा, वासना, कामना, लोभ, माया इ.
४)दु:खाला दूर करता येते
५) दु:खाला दूर करण्याकरिता आष्टांगिक मार्गाचा उपाय सांगीतला आहे.

तथागतांच्या आचार — विचारांचे भारतीय संस्कृतीवरच नव्हे तर जगाच्याही संस्कृतीवर दुरगामी आणि अमीट परिणाम झाले आहे. तथागतांच्या या आचार — विचारांचे पाच आर्यसत्य वा आष्टांग मार्ग यामुळे जगातील सर्व लोकांना व समाजाला नविन ज्ञान वा शिकवण दिल्या गेली की ज्यामधून जागतिक स्थरावर आज बौध्द धर्माचे ज्ञान सर्वांगिण विकसित झाले.

वैश्वीक समाज जीवनाच्या घडणेत बौध्दधर्माचा फार मोठा परिणाम पडल्याचे दिसून येते. बौध्द धर्माच्या मुळ शिकवणूकीत जे पंचशिल व अष्टांग मार्ग सांगितले आहे. या पंचशिलाचा व अष्टांगाचा प्रभाव जगातील सर्वच राष्ट्रांवर पडल्याचे दिसून येते. पंचशिलांमध्ये मी प्राणीमात्रांची हिंसा करणार नाही या शिलाचा विश्वातील अनेक राष्ट्रांच्या संविधानावर परिणाम होऊन प्राणीमात्रांच्या हिंसेवर प्रतिबंद लादणारे कायदे पास केल्याचे दिसून येते किंवा तयार केल्याचे दिसून येते.

बौध्द धर्माचे दुसरे शिल गरजेपेक्षा जास्त धनाचा संचय करू नये याही शिलाचा अनेक राष्ट्रांच्या जडण — घडणेवर परिणाम झाल्याचे दिसून येते. अनेक राष्ट्रांनी व्यक्तीला गरजेपेक्षा जास्त व वाम मार्गाने संपत्ती मिळविण्यावर

ISSN : 2278-9308
July 2021

प्रतिंबध लादले आहे. बौध्द धर्मातील तिसरे शिल आणि बंध कामवासनेला विरोध करणारे या तत्वाचा जागतिक जिवनाच्या जडण – घडणेचे परिणाम झाल्याचे दिसून येते. अनेक देशामध्ये अनियंत्रित कर्मचाऱ्यांवर प्रतिबंध दिसून येते. स्त्री च्या इच्छाविरोधात बळजबरी करणाऱ्या पुरूषांना अनेक देशांमध्ये कायदेशिररित्या शिक्षा देण्याची तरतुद करण्यात आली. बौध्द धर्माचे चौथे शिल असत्य वार्तालाप करण्यास प्रतिबंधीत करीत असते. जगातील समाज जिवनाच्या जडण घडणेत असत्य बोलु नये. नेहमी सत्य बोलावे याशिलाचा संपूर्ण विश्वातील समाज जिवनावर परिणाम पडल्याचे दिसून येते. अनेक देशातील कायदयाने असत्य वार्तालाप करण्यास किंवा खोटी साक्ष देण्यास कायदेशिर शिक्षा देण्याची तरतुद करण्यात आली आहे. या तत्वाचा जगातील मानव समुहात फार मोठा प्रभाव पडल्याचे दिसून येते. बौध्द धर्मातील पाचवे शिल मादक पदार्थाच्या सेवनावर प्रतिबंध लादत असते. या मादक पदार्थाच्या सेवनातून अनेक कुटुंब उध्वस्थ होत असतात. मादक पदार्थाचे सेवन हे समाजामध्ये अनैतिकता पसरविण्याचे मुख्य साधन आहे. बौध्दाने या मादक पदार्थाच्यासेवनाला विरोध केला आहे. अनेक देशातील कायदयाव्दारे मादक पदार्थाच्या सेवनाला प्रतिबंध घातलेले दिसून येते. अष्टांगमार्ग दथगतानी पृथ्वीतलावावर येवून मनेष्यास सुखी व संपन्न करण्यासाठी तसेच मनुष्याला दु:ख मुक्त करण्यासाठी अष्टांग मार्ग सांगितले. बौध्द धर्मातील हे अष्टांकग मार्ग म्हणजे जगातील संपूर्ण दु:खाचा नायनाट वा वैश्विक समाजजिवनास नवचैतन्य प्राप्त करून देण्यारे एक पेय आहे.

**१) सम्यक दृष्टी :–**

व्यक्तीच्या अंगी सकारात्मक दृष्टीचा विकास करणे तसेच नकारात्मक विचारांचा त्याग करणे आपल्याकडे जे नाही त्यावर रडत बसण्यापेक्षा जे आहे त्यात आणखी वृध्दी करण्याचा विचार करणे कठिण आहे. मला झेपणार नाही, माझयाने जमणार नाही असा नकारात्मक विचार न करता जो वैश्विक समाजातील मनुष्य काम करीत असेल त्यांचे आचार विचार वा दृष्टी सम्यक दृष्टी होय. यामधुन जागतीक स्तरावर संपूर्ण समाजाचे व जगाच्या विकास हा विसंभून आहेत. बौध्द धर्माच्या या अष्टांग मार्गातील हे पहिले अष्टांग महत्वपूर्ण वा मानव जातीस उच्च शिखरावर पोहचविण्यास महत्वपूर्ण आहे.

**२) सम्यक संकल्प :–**

तथागतांनी आपल्या अष्टांगमार्गात सम्यक संकल्प या आर्य मार्गाला उपासकाचे धैर्य किंवा उपदेश उदात्य असावा वास्तवतेच मान ठेवून संकल्प करावा न झेपणारे ध्यैय ठेवू नये तसेच दुराचारी वर्तमानापासून दुर राहण्याचा संकल्प करावा. जगातील कुठल्याही व्यक्तीचे धैर्य हे उच्च दर्जाचे असावे कमी व हलक्या दर्जाचे धैर्य ठेवु नये. जगातील मानव कल्यानाचे धैर्य बाळगावे. विवेक कामात सदाचार व निती मार्गाचे अवलंबन करावे तथागताच्या या आर्य मार्गाने वैश्विक समाज जिवनाच्या जडणघडणेत मोठया प्रमाणात बदल घडवून आणल्या गेला.

**३) सम्यक वाणि :–**

वैश्विक समाजाला घडविण्यात येते ते वाणिंणी संपूर्ण मानव समाज हा संभाषण प्रिय वा एकमेंकांचा आदर ठेवतो तो वाणी मुळे संभाषण आकर्षक आणि उठावदार असावे. संवाद साधण्याची शैली व भाषा आकर्षक असावी. बोचरी किंवा मने दुखावणारी नसावी. भाषा सौजन्यापूर्ण असावी. मृदु व दुसऱ्यांचे मन दुखवु नये अश्या प्रकारच्या वाणीला तथागताने अष्टांग मार्गात समाविष्ठ केले आहे. वैश्विक समाजाला घडविण्यात सम्यक वाणिचा मोठया प्रमाणात अवलंबन करावयास हवे.

**४) सम्यककर्म :–**

हे बौध्द धर्मातील अष्टांग मार्गातील चौथे अष्टांग आहे. जगातील समाजजीवनाच्या जडण – घडणेत हे सम्यक कर्म दुसऱ्यांच्या भावनांची आणि हक्काची जाणिव ठेवून प्रत्येक कार्य करावे. यशस्वी जीवनाच्या वाटचालीचे तुमचे कार्य पवित्र असायला हवे. इतरांचे नुकसान होईल असे कार्य करू नये. नेहमी रचनात्मक व विधायक कार्यात सक्रिय भाग घ्यावा दुराचार टाळून सत्कर्मे करावे. यामुळे वैश्वीक समाज जीवनास एक नवी दिशा मिळेल व संपूण मनुष्य जीवनात एक मोठा प्रभाव जगातील लोकांच्या राहणीमान व जडण – घडण दिसून येईल. आज सपूर्ण जगाला तथागताच्या या अष्टांग मार्गाची आवश्यकता असून या मार्गाने जे वैश्वीक समाजजीवन आज ढासळल्या गेले आहे. त्याला या अष्टांगाने पूर्णप्रस्थापीत करता येईल.

**५) सम्यकआजिवीका :–**

बौध्द धर्मातील अष्टांग मार्गातील तथागतांनी सम्यक आजिविका हे अष्टांग जगातील संपूर्ण मानव जातीस उद्देशले आहे. आपल्या उदनिर्वाहाचे साधन पवित्र असावे. दुसऱ्याच्या वस्तुंवर आपली मालकी सांगून उदरनिर्वाहाचे करू नये आज वैश्वीक समाज हा नशिला व मादक पदार्थाचा व्यसनाधिन झाला आहे. त्याला बाहेर काढण्याचे काम हे अष्टांग उपयोगी असून त्याच्या संपूर्ण जीवनाच्या आजिविकेला याचा उपयोग होत असून याचा परिणाम हा जगातील सपूर्ण मानवजातीला सकारात्मक दृष्टी प्रधान करते. अष्टांगीक मार्गाचा उपदेश हा लांकाना जीवनाची योग्य दिशा दाखविणारा होता तथागतांनी भिकुंना बहुजनांच्या हितासाठी सुखांसाठी चारिका उपदेश केला.

ISSN : 2278-9308
July 2021

**६) सम्यकव्यायाम :—**

अष्टांग मार्गातील हे अष्टांग म्हणजे जगातील कुठल्याही मनुष्या प्रयत्नाची पराकाष्ठा करावयास लावणे व ध्येये प्राप्तीसाठी निच्छित केलेले ध्येय सतत प्रयत्न पुनरावृत्तीव निरंतरीत करणे होय. सम्यक व्यायाम हे तथागताने मनुष्यास सतत प्रयत्नशिल राहणे नियोजितपणे व सुत्रबध्दपध्दतीने काम करण्यास प्रवृत्त करते. आज जगातील संपूर्ण मानवास या अष्टांगाचा मोठया प्रमाणात गरज आहे. या अष्टांगाचा अवलंबण केल्यास मानवाचा व जगाचा विकास हा उत्तरोत्तर वाढेल. व संपूर्ण विश्वाला एकत्रीतरीत्या काम करण्यास भाग पाडेल.

**७) सम्यकस्मृती :—**

सम्यक स्मृती म्हणजेच मनाचा जागरूकपणा किंवा विचारीपणा होय. आज जागतिक समाजजीवनाला या अष्टांगाची नितांत गरज आहे. मानवाच्या मनाचा जागरूकपणा विचारांची सकारात्मकता तसेच स्वत:च्या ध्येयाची व यशाचे आत्मचिंतन करणे वा मनाच्या विचारीपणातून स्वत:च्या आत्मविश्वासावरून न हलणे यामुळे जगातील मनुष्यात आपसातील दुराचार संपवून आपसात संबध व आत्मीयता निर्माण होईल.

**८) सम्यकसमाधी :—**

तथागताने सांगितलेले हे सर्वात शेवटचे अष्टांग म्हणजे सम्यक समाधी होय. यामुळे जगातील मनुष्य प्राणी हा चंचल वृत्तीचा असून त्याला मन एकाग्र करून स्वत:च्या अध्ययनावर व कार्यावर एकाग्रता साधून एका विशिष्टयं ध्येयाच्या दिशेन स्थिर करणे व जीवनाचा समतोल राखणे आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवणे व सर्व कार्य एकाग्रता साधून केल्यास निच्छितच लोभ, व्देष, आळस, सुस्ती इत्यादी अनिच्छीतता दूर करणे म्हणजे सम्यक समाधी होय. आज जगाच्या जडण —घडणेत या अष्टांगाचा महत्वपूर्ण समावेश होणे व स्विकार करणे महत्वाचे असून याशिवाय वैष्वीक समाज जीवनात बदल घडविता येणार नाही. तथागताने या आर्यसत्याला महत्वपूर्ण अष्टांगात माणले असून जागतिक स्थरावर ही सर्व अष्टांगमार्ग महत्वपूर्ण आहे.

बौध्द धर्माचा समाजजीवनावरील प्रभाव :— आज भारतीय समाजामध्ये सामाजिक विषमता, भ्रष्टाचार, दारिद्रय, बेकारी, उपासमार, गुन्हेगारी, आंतकवाद, नक्षलवाद, वैभिचार अश्या अनेक प्रकारच्या समस्यांने हैदोस मांडलेला आहे. अशा समस्यांचे पुर्णत:हा निराकरण करणे जागतिक माहासत्ता असणाऱ्या राष्ट्रालाही जमलेले नाही. कारण या समस्यांचे मुळापासून निर्मुलन करण्यासाठी समस्यांच्या मुळापर्यंत जावे लागते. याचे मुळ हे बौध्द तत्वज्ञानातील पंचशिला मध्ये दडलेले आहे. म्हणून या तत्वज्ञानाची आज जगाला गरज आहे.

आज मानवी समाजाचा जो विकास झालेला आहे. तो माहितीतंत्रज्ञाने व जैव तंत्रज्ञानाच्या माध्यमातून होय. मानवी समाजाचा विकास हा एक प्रकारचा संख्यात्मक विकास होय. केवळ संख्यात्मक विकासामुळे मानवी समस्यांचे निर्मुलन होत नसून तर समस्या हया वरचेवर वाढत जातांना दिसून येतात. म्हणूनच जेवढया प्रमाणामध्ये लोकसंख्या वाढत आहे. त्याचप्रमाणामध्ये समाजामध्ये अराजकता, नैतिक मुल्यांचा ऱ्हास होतांना दिसून येतो. म्हणून संख्यात्मक बदल महत्वाचा नसुन त्यापेक्षा जास्त गुणात्मक, परिणात्मक बदल फारच महत्वाचा आहे. म्हणूनच हे गुणात्मक बदल घडवुन आणण्याची ताकत बौध्द धर्माच्या तत्वज्ञानामध्ये आहे.

भगवान गौतम बुध्दाने बौध्द धर्माच्या तत्वज्ञानाच्या माध्यमातून प्राचीन काळी मानवी जीवनामध्ये सकारात्मक बदल घडवुन आणण्याचे कार्य केलेले आहे. त्यांच्या विचारामुळे अनेक प्रकारच्या समस्यांचे निराकरण झालेले आहे. त्यामुळे समाजामध्ये सामाजिक क्षमता निर्माण झाली. गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसला. वैभिचार, दरोडेखोरी बंद झाली. अशा अनेक प्रकारच्या समस्यांचे निर्मुलन स्व:त गौतम बुध्दाने दाखविले आहे. म्हणून आजच्या समाजामध्ये सुध्दा अशा प्रकारच्या समस्याने भयंकर स्वरूप धारण केलेले आहे. म्हणूनच आज बौध्द तत्वज्ञानाची आवश्यकता असल्याचे दिसून येते.

**१) अंधश्रध्देविरूध्द सामाजिक जागृती :—**

आजच्या या तंत्रज्ञान व विज्ञान युगामध्ये अनेक प्रकारच्या अंधश्रध्दा आपल्याला दिसून येतात. होम — हवन कर्मकांड, जादुटोना, भानामती, केगामती, पशुबली असे अनेक प्रकारच्या अंधश्रध्दा दिसून येतात. हिंदू धर्मामध्ये याचे प्राबल्य जास्त प्रमाणामध्ये दिसून येते. भारतीय हिंदू धर्माने मानवाला स्वर्गाची लालसा व नरकाची भिती दाखवून अशा प्रकारच्या अंधश्रध्देला खतपाणी घालतांना दिसून येते. त्यामुळे मानवी जीवनामध्ये दु:ख नैराश्य, भिती दडपण वाढत असल्याचे दिसून येते. या सर्व समस्येचे निर्मुलन करण्यासाठी खऱ्या अर्थाने बौध्द तत्वज्ञानाची आवश्यकता आहे. परंतु आज भारतामध्ये चित्र उलट दिसून येते. अंधश्रध्देने निर्मुलन करणाऱ्या व्यक्तीचेच निर्मुलन केल्या जात आहे. त्यामध्ये नरेंद्र दाभोळकर, कॉ गोविंद पानसरे, कलमुर्गी अशा अनेक विचारवंताचे खुन होतांना दिसून येते.

**२) नैतिक आचरणाची गरज :—**

आजच्या मानवी समाजाला दु:खापासून मुक्त करण्यासाठी नैतिक आचरणाची फारच आवश्यकता आहे. मानव आजच्या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये स्वत:ला एवढा वाहवून घेतलेला आहे की तो नैतिक आचरण विसरलेला आहे. नितिमत्ता

गहान ठेवलेला आहे तो स्वत:ला इतरापेक्षा श्रेष्ठ समजण्याच्या नादात आपले आई – वडिल, शेजारी, नातेवाईक गुरूजन मित्रमंडळी या सर्वांकडे दुर्लक्ष करत आहे स्वत:च्या ऐहिक सुखासाठी दुसऱ्यांच्या बळी घेत आहे. त्यामुळे तो स्वभावावरून जरी आनंदी सुखी वाटत असला तरी तो अंतकरणातून खूपच दु:खी कष्टी आहे. त्यांना अनेक प्रकारच्या समस्यांनी ग्रासलेले आहे. मानवाला जर सुखी, आनंदी व्हायचे असेल तर त्याचे नैतिक आचरण श्रेष्ठ असणे फारच गरजेचे आहे.

**३) अहिंसेच्या तत्वाचे पालन :–**

भगवान बुध्दाने मानवी जीवनाचे दु:ख दूर करण्यासाठी अहिंसेला फारच महत्वाचे स्थान दिले आहे. प्रत्येक मानवाने जर ठरवले की कोणत्याच प्रकारची हिंसा करायची नाही. कोणालाच इजा होवू दयायचे नाही. असे प्रत्येकाने जर ठरविले तर मानवी जीवनामध्ये दु:खच राहणार नाही. कारण मानव एकमेंकांना दु:ख देत असतात. एकमेकांचा व्देष करीत असतात. यामुळेच मानवी जीवनामध्ये दु:ख वाढलेले आहे. आज खऱ्या अर्थाने जगातील मानवाला बुध्दाच्या अहिंसेच्या तत्वाचे पालन करण्याची फारच गरज आहे.

**४) समतेची शिकवण :–**

आजच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये मानवाने स्वत:लाच श्रेष्ठ समजत असून दुसऱ्याला तुच्छ कमी, हीन समजत आहे. त्यामुळे समाजामध्ये उच्च – निच्य, गरिब – श्रीमंत, मालक – मजूर, श्रेष्ठ – कनिष्ठ असे अनेक प्रकारचे भेदभाव निर्माण झालेले आहेत. हे भेदभावाचे अंतर मानवी समाजाला विघातकाकडे घेवून जात आहेत. त्यामुळे मानवी समाजाची हानी होत आहे. मानवी मुल्यांचा ऱ्यास होतांना दिसून येते. म्हणूनच मानवाला या समस्येतून बाहेर काढण्यासाठी भगवान बुध्दांच्या समतेच्या शिकवणूकीची फारच आवश्यकता आहे. या शिकवणूकीमुळे मानवी समाजामध्ये विषमता दिसणार नाही.

जागतिकीकरणाच्या वाढत्या प्रभावामुळे मानवी मूल्यांचा ऱ्हास होतांना दिसून येतो. यामुळे मानवी जीवनामध्ये अनेक प्रकारच्या समस्या वाढतांना दिसून येतात. मानव स्वत:ला जागतिक दर्जाने श्रेष्ठ समजण्याच्या नादात अनेक समस्या ओढवून घेत आहे. तो सामाजिक प्राणी न राहता तो वैयक्तिक होत आहे. त्यामुळेच कौंटुबिक, सामाजिक, धार्मिक क्षेत्रांची विभागणी होत आहे. जागतिकीकरणामुळे अनोळखी व्यक्ती त्याला जवळचा वाटतो पण जीवाभावाची माणसे त्याच्यापासून दूर जात आहेत. ही जागतिकीकरणाची परिणीती आहे. म्हणून आजच्या जागतिक मानवी समाजाला सुखी करायचे असेल तर युध्दाची गरज नसुन भगवान बुध्दांच्या तत्वज्ञानाची गरज असल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१) साळुंखे अण्णासाहेब राकेश ''सवौत्तम भूमिपुत्र'' गौतमबुध्द लोकायत प्रकाशन, सातारा – २००७
२) देशमुख मा.ग. ''प्राचीन भारताचा इतिहास' विश्वभारती प्रकाशन, नागपूर
३) डॉ. आगलावे प्रदीप ''भारतीय समाज सरंचना आणि समस्या'' साईनाथ प्रकाशन, नागपूर २००४
४) कोसाबी डी.डी ''प्राचीन भारतीय संस्कृती व सभ्यता डायमंड प्रकाशन पूणे – २००६
५) आंबेडकर डॉ. भी. रा. ''बुध्द आणि त्यांचा धम्म, अनुवाद धनश्याम तळवटकर

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# जेरेमी बेंथॅमची सुखवादी संकल्पना

प्रा. डॉ. सुनिलदत्त सोपान गवरे
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख शां.घो. कला, विज्ञान आणि गो.प. वाणिज्य
महाविद्यालय शिवळे
ईमेल : sunildattgavarae@gmail.com ,फोन न९१५२०५२४५३/८२०८७०४६८७

**प्रास्ताविक :**

याचा जन्म इंग्लंड मध्ये १७४८ साली झाला. त्याचे शिक्षण ऑक्सफर्ड येथील क्वीन्स कॉलेजात झाले. परंतु त्याची वृत्ती परहिततत्परतेची होती. त्याने उपयुक्ततावादी नीतिशास्त्राची उपपत्ती घडवली. त्याने ब्रिटिश अनुभववादाच्या मानसशास्त्रीय आणि तात्त्विक चौकटीत आपली उपपत्ती घडवली. त्याने हजारो पानांचे लेखन केले पण ते सर्वच प्रसिद्ध होऊ शकले नाही. त्यातील काही भाग त्याचा स्विस अनुयायी 'एटिनो ह्यूमंट' याच्यामार्फत जगापुढे आला. त्याचे प्रमुख सैद्धान्तिक पुस्तक 'इन्ट्रोडक्शन टु दि प्रिन्सिपल्स ऑफ मॉरल्स अँड लेजिस्लेशन' हे होय. त्याचा मृत्यू १८६२ मध्ये झाल्यानंतर काही पुस्तके संपादित करून प्रसिद्ध केली. ती 'दि बुक ऑफ फॅलॅसीज', 'रॅशनेल ऑफ ज्युडिशिअल एव्हिडन्स' 'डी ऑन्टॉलॉजी' इत्यादी आहेत.

**संशोधनाची उद्दिश्टे :**

१) सुख म्हणजे काय? हे समजून घेता येईल.
२) सुखवादाची संकल्पना कशी असते याचा अभ्यास करता येईल.
३) स्वार्थ व परार्थ सुखवाद म्हणजे काय याचा विचार करता येईल.
४) बेंथॅमचा सुखवादाचा अभ्यास करता येईल.

**संशोधनाची गृहितके :**

१) सुखापासून माणूस वेगळा होत चालला आहे की सुखाच्या मागे लागला आहे.
२) जगातील सुखाची कल्पना एकच आहे की अनेक आहेत.
३) सुखामध्ये वाढ होत चालली आहे की दु:खामध्ये वाढ होत चालली आहे.

**अभ्यास पद्धती :**

प्रस्तुत शोध निबंध लिहिण्यासाठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. परामर्ष आणि इंटरनेट इत्यादी माध्यमातून दुय्यम सामग्रीचे संकलन करण्यात आले आहे.

**सुखवाद :**

बेंथॅम हा सुखवादाचा प्रणेता होता व त्याने 'सुखवादाचे कलन' (Hedonic calculus) तपशीलवारपणे केले. ही त्याची महत्त्वाची कामगिरी समजली जाते. त्याच्या मते कृतींना निर्माण होणाऱ्या परिणामांच्या सुखांचे व दु:खांचे गणित करून आणि त्यांची बेरीज व वजाबाकी करून ज्या कृतींनी दु:खापेक्षा अधिक सुखाचा लाभ होईल त्या कृती नैतिकदृष्ट्या योग्य ठरवाव्या. 'अधिकांचे अधिकात अधिक सुख' हे नीतितत्त्व मार्गदर्शक म्हणून समजावे असे त्याचे मत होते. परंतु सर्वच सुखे व सर्वच दु:खे एकाच प्रकारची नसतात आणि त्यांचे संख्यात्मक परिणाम ठरवून त्यांच्या बेरजा व वजाबाक्या करणे व्यवहारात अशक्य असते. सुखाचे व दु:खाचे गुणात्मक भेद असतात.

मनुष्याच्या मनाचे विश्लेषण केल्यास त्यात आत्मप्रेम व परप्रेम या दोन मूलभूत व स्वयंभू अशा सहजप्रवृत्ती आढळतात. मानसशास्त्रीय दृष्ट्या पाहिल्यास मनुष्याची स्वार्थीवृत्ती अधिक बलवान असून त्या मानाने परार्थी वृत्ती फारच दुबळी आहे. बेंथॅमचे मत 'योग्य प्रसंगी सहानुभूती योग्य ठरत असेल पण आत्मप्रेमच शेवटी अन्नाचा प्रश्न सोडविते' या विधानातून स्पष्टपणे प्रतिबिंबित होते. यावरून बेंथॅम हा हॉब्स इतका शुद्ध स्वार्थ सुखवादी म्हणून जरी सिद्ध होण्यासारखा नसला तरी तो स्वार्थाकडेच झुकत असलेला दिसून येतो. म्हणून त्याच्या नैतिक विचाराला स्वार्थाधिष्ठित परार्थ सुखवाद म्हणून संबोधणे अधिक सार्थ व उचित ठरते. परंतु बेंथॅमला स्वार्थसाधन दुर्गुणही वाटत नाही. तरी स्वार्थ सुखवादाप्रमाणे सद्गुणही वाटत नाही. तो नैतिक जीवनाच्या दृष्टीने परार्थला स्वार्थाइतकेच किंबहुना अधिक किंमत देतो. म्हणूनच तो म्हणतो, केवळ स्वार्थानुकूल वर्तन करणे यापेक्षा परहितासिद्धार्थ सदैव झटणे म्हणजे सद्गुण होय. स्वार्थ सुखवाद व परार्थ सुखवाद यांच्यामधील हा एक मौलिक भेद आहे. स्वार्थ सुखवादाप्रमाणे मनुष्याचा स्वभाव व मनुष्याचे कर्तव्य यांच्यात कोणताही भेद मानता येत नाही. उलट परार्थ सुखवादानुसार मनुष्याचा स्वभाव व मनुष्याचे कर्तव्य यात भेद मानणे अनिवार्य ठरते. म्हणेन परार्थ सुखवाद नैतिकदृष्ट्या पटण्याजोगा वाटतो. परार्थ सुखवादाप्रमाणे जसा स्वभाव

तसे वागणे म्हणजे सद्‌गुण नसून सारासार विचार करणे म्हणजे सद्‌गुण होय. दुसरा भेद असा आहे की स्वार्थ सुखवादाप्रमाणे सुख म्हणजे माझे स्वत:चे सुख होय. उलट परार्थ सुखवादाप्रमाणे सुख म्हणजे अनेक व्यक्तींचे सुख होय. ज्या आचरणाद्वारा अधिकांश लोकांचे अधिकांश सुख प्राप्त म्हणजे सदाचरण होय. म्हणजेच परार्थ सुखवादानुसार अधिकांश लोकांचे अधिकांश सुख हा नीतिनिर्णय निकष ठरतो.

बेंथॅमच्या मते सुख व दु:ख ही दोन तत्त्वे मानवाच्या सर्व कृतींवर सदैव नियंत्रण चालवितात. ती मानवाचे स्वामी असतात. शेवटी मानवाचे सर्व निर्णय आणि कृती त्याला किती अधिक प्रमाणात सुख मिळणार आहे आणि किती कमी प्रमाणात दु:ख भोगावे लागणार आहे यांचा हिशोब करून घेतले जातात. दु:खा पेक्षा सुखाचे प्रमाण अधिक ज्या कृतींनी होईल त्या कृतींची निवड तो नैसर्गिक रीतीने करतो. तशी ती करणे त्याचे नैतिक कर्तव्य आहे असे बेंथॅम मानतो.

बेंथॅमच्या मते सर्व व्यक्तींची सुखे गुणांच्या दृष्टीने सारखीच असतात. एक उच्च व एक नीच असा गुणविषयक भेद मानता येत नाही. बेंथॅम आपल्या सुखवादाचे विवेचन करताना असे प्रतिपादन करतो की, प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी स्वप्रेम आणि परप्रेम अशा दोन सहजप्रवृत्ती दिसून येतात. स्वप्रेम म्हणजे स्वत:बद्दल वाटणारी आपुलकी, सहानुभूती. तर परप्रेम म्हणजे इतरांविषयी आपुलकी, सहानुभूती. मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले तर प्रत्येक व्यक्तीची स्वप्रेमाची भावना अधिक प्रबळ असते. तुलनेने परप्रेमाची भावना दुबळी असते. याचे कारण जेव्हा पोटाचा प्रश्न निर्माण होतो किंवा एखादी निर्णायक अवस्था जेव्हा निर्माण होते तेव्हा व्यक्तीला स्वप्रेमच अधिक महत्त्वाचे वाटते. याचा अर्थ असा की व्यक्ती मूलत: स्वार्थीच असते तरी देखील व्यक्ती परप्रेमासाठी झटते असे बेंथॅमचे मत आहे.

विविध सुखे एकदम डोळ्यांपुढे आली असता त्यातील कोणाची निवड करावी व का? तसेच शारीरिक सुखापेक्षा मानसिक सुख श्रेष्ठ, वैयक्तिक सुखापेक्षा व्यक्तिनिरपेक्ष सुख श्रेष्ठ, तात्कालिक सुखापेक्षा दीर्घकालीन सुख श्रेष्ठ असे मानण्यात येत असे पण ते तसे श्रेष्ठ का या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली गेली नव्हती. या प्रश्नांचे योग्य उत्तर म्हणूनच बेंथॅमने सुखाची मोजमापे सुचविली आहेत. बेंथॅमच्या मते सुखानासुद्धा परिमाण असते. ज्याप्रमाणे मूर्त वस्तूचा आकार मोजताना लांबी, रूंदी व उंची या तीन परिणामांचा आधार घ्यावा लागतो त्याचप्रमाणे सुखाचा आकार मोजताना परिणामांचा आधार घ्यावा लागतो. म्हणून त्यांना सुखामापक परिमाणे असे म्हणतात.

'अधिकांश लोकांचे अधिकांश सुख' ही व्याख्या बेंथॅमने मान्य केली आहे. तरीपण 'अधिकांश सुख' या शब्दाने त्याला 'परिमाणात्मक जास्त' सुख अभिप्रेत आहे. जेव्हा एकापेक्षा अधिक सुखे आपल्या समोर असतात तेव्हा त्यापैकी कोणत्या सुखाला महत्त्व द्यावयाचे हा प्रश्न आहे. उदा. एखादा खेळ खेळून मिळणारे सुख, कादंबरी वाचनातून मिळणारे सुख किंवा भोजन करून मिळणारे सुख ही तिन्ही सुखे एकदमच आपल्यासमोर उभी राहिली तर कोणत्या सुखाचा स्वीकार करायचा? यावर बेंथॅमचे असे मत आहे की, दोन सुखात गुणात्मकदृष्ट्या कसलाच भेद नसतो. सर्व सुखे गुणात्मकदृष्ट्या सारखीच असतात. परंतु कोणत्याही दोन सुखात परिमाणाचा किंवा मोजमापाचा भेद असतो. ज्या सुखाचे परिमाण अधिक असते, अशाच सुखाचा स्वीकार केला पाहिजे. ज्याप्रमाणे आपण एखाद्या खोलीचा आकार लांबी, रूंदी व उंची या परिमाणांच्या सहाय्याने ठरवतो, त्याप्रमाणे एखाद्या कृतीतून निर्माण होणाऱ्या सुखाचे परिमाण आपल्याला काही तत्त्वांच्या आधारे ठरवता येते. त्यालाच बेंथॅम सुखाची मोजमापे किंवा परिमाणे असे म्हणतो. ही सात प्रकारची मोजमापे किंवा परिमाणे पुढीलप्रमाणे आहेत.

१) **तीव्रता** (Intensity): दोन सुखांपैकी जे सुख आपल्याला अधिक तीव्रतेने जाणवते त्या सुखाचे परिणाम अधिक असते. असे सुख ज्या कृतीतून निर्माण होते तीच कृती नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ समजावी. २) **कालावधी** (Duration) : दोन सुखांपैकी जे अधिक काळ टिकणारे असते ते सुख श्रेष्ठ समजावे. याचाच अर्थ अल्पकाळ टिकणाऱ्या सुखापेक्षा दीर्घकाळ टिकणारे सुख नैतिक दृष्ट्या इष्ट असते. ३) **फलद्रुपता** (Fruitfulness) : काही सुखे ही निव्वळ सुखे असतात. त्यांच्यापासून काहीही नवनिर्मिती होत नाही. ४) **निश्चितता** (Cerainity) : अनिश्चत सुखापेक्षा जे सुख निश्चित असते तेच श्रेष्ठ समजले पाहिजे. ५) **शुद्धता** (Purity) : ज्या सुखाच्या अनुभवासोबत दु:खाचा लवलेश नसतो असे निर्भेळ सुख दु:खमिश्रित सुखापेक्षा अधिक परिमाणकारक असते. ६) **निकटता** (Nearness) : दूरस्थ सुखापेक्षा समीप असणारे सुख परिमाणदृष्ट्या श्रेष्ठ असते. म्हणूनच असे म्हणतात की हातचे सोडून पळत्याच्या मागे लागू नये. ७) **व्यापकता** (Extensity) : दोन सुखांपैकी ज्या सुखाचा परिणाम जास्ती जास्त लोकांवर होतो त्या सुखाचे मोजमाप अधिक असते.

वर प्रतिपादन केलेली सात सुखांची मोजमापे बेंथॅम सांगतो व कोणत्या सुखाची निवड करावी याचे मार्गदर्शन करतो. परंतु प्रश्न असा आहे दोन सुखे कमी–जास्त असतील तर वरील तत्त्वांचा आधारे आपण निवड करू शकतो.

ISSN : 2278-9308
July 2021

पण जेव्हा दोन्ही सुखांचे परिणाम सारखेच असेल तर कोणते सुख इष्ट समजावे? याला बेंथॅमचे उत्तर आहे की अशा वेळी बाकी कोणताही भेद असला तरी ती दोन्ही सुखे सारख्याच नैतिक दर्जाची असजावीत.

उपयुक्ततेच्या तत्त्वात दोन गोष्टी अंतर्भूत आहेत : पहिला गोष्ट असा की, फक्त सुख चांगले असते आणि म्हणून फक्त सुख साधणे असते दुसरी गोष्ट अशी की, व्यक्तीने केवळ स्वत:चे सुख साधण्याचा प्रयत्न न करता सर्वांचे सुख साधण्याचा प्रयत्न करणे योग्य असते. 'सुख चांगले असते' या विधानाचा अर्थ बेंथॅम 'माणसांना सुखाची इच्छा असते' असा करतात. आता 'सुख' या शब्दाचे अनेक अर्थ होऊ शकतात. एक अर्थ असा की माणसांना अनेक गोष्टींची इच्छा असते आणि सुख ही या अनेक गोष्टींमधील एक गोष्ट होय. उदा. माणसाला अन्न, निवारा, सत्ता, कीर्ती इ. अनेक गोष्टी हव्या असतात तसेच सुख ही आणखी एक गोष्ट हवी असते. 'सुख' याचा अर्थ लावला तर 'फक्त सुख चांगले असते' याचा अर्थ 'माणसाला जरी अनेक गोष्टींची इच्छा असली तरी फक्त सुख ही गोष्ट अशी आहे की, त्याची इच्छा माणसाने धरणे योग्य असते. असा लावावा लागेल आणि मग हे तत्त्व सिद्ध करावे लागेल. माणूस ज्या अनेक भिन्न गोष्टींची इच्छा धरतो त्यांतील सुख ही एक गोष्ट होय, असा 'सुख' याचा अर्थ बेंथॅम यांनी आपल्या लिखाणात घेतलेला आढळत असला, तरी एकंदरीत 'सुख' याचा वेगळा अर्थ त्यांना अभिप्रेत आहे. या अर्थाप्रमाणे 'माणूस सुख साधण्याचा प्रयत्न करतो' याचा अर्थ केवळ 'माणूस आपल्या इच्छा तृप्त करण्याचा प्रयत्न करतो' असा होतो. 'एखाद्या माणसाला एखाद्या गोष्टीची इच्छा आहे' या म्हणण्यात ती गोष्ट साध्य करण्याचा प्रयत्न तो करील हे अभिप्रेत असते. आता माणसाला जर इच्छा असतात व त्या तृप्त करण्याचा तो प्रयत्न करतो हा मनुष्यस्वभाव आहे एवढाच अर्थ घ्यायचा आहे. 'माणसाने आपले अधिकात अधिक सुख साधणे योग्य असते' याचा अर्थ 'माणसाने आपल्या अधिकात अधिक इच्छा तृप्तकरण्याचा प्रयत्न करणे योग्य असते' तेव्हा ज्या कृत्याने माणसाच्या जास्तीत जास्त इच्छज्ञ तृप्त होतील ते योग्य कृत्य होय, म्हणजे विवेकाला धरून होय हे ओघानेच येते.

सुखाचे गणन करता येते, सुखदु:खाची बेरीज–वजाबाकी करता येते हे बेंथॅम यांच्या विचारामध्ये गृहीत आहे. या विधानाला अनेकांनी आक्षेप घेतला आहे. कधी कधी बेंथॅम सुखाचा तसेच दु:खाचा एकक असतो असे मानतात. कोणतेही सुख किंवा दु:ख किती एककांचे बनले आहे हे ठरविता येते व म्हणून एखाद्या कृत्यापासून जी सुखदु:खे निष्पन्न होतील त्यांतील सर्व सुखे एकत्र केली असता सुखांचे एकक होतील ते मोजून त्यांतून दु:खांचे एकंदर एकक वजा करता येतील, अशी भाषा ते वापरतात. या विचाराचा पाठपुरावा करून बेंथॅम यांनी गुंतागुंतीचे 'सुखगणन' रचले आहे विशिष्ट सुखाच्या परिणामाचे मापन करताना त्याच्या ज्या भिन्न 'परिमिति' ध्यानात घ्याव्या लागतील त्या त्यांनी निश्चित केल्या आहेत. त्यांनी नमूद केलेल्या परिमिति अशा : तीव्रता, अवधी, निश्चिती, सामीप्य, प्रसवता आणि शुद्धता. उदा. अधिक ताव्र पण अल्पकाळ टिकणाऱ्या सुखापेक्षा कमी तीव्र पण अधिक काळ टिकणारे सुख अधिक मोठे म्हणजे अधिक एककांचे बनले असणे शक्य आहे.

परिमाणाच्या दृष्टीने पहाता एक सुख दुसऱ्या सुखापेक्षा मोठे किंवा लहान असू शकेते. अशा परिमाणात्मक भेदाशिवाय गुणात्मक असा भेद दोन सुखांमध्ये नसतो, असेही बेंथॅम यांचे मत होते. सुखांचे भिन्न प्रकार असतात हे बेंथॅम अमान्य करीत नाहीत. पण एकाप्रकारचे सुख स्वरूपत: दुसऱ्या प्रकारच्या सुखापेक्षा श्रेष्ठ असते आणि म्हणून त्या प्रकारचे सुख दुसऱ्या प्रकारच्या सुखापेक्षा कितीही कमी असले, तरी ते दुसऱ्या प्रकारच्या सुखाऐवज ापसंत करणे याग्य असते, ही भूमिका ते नाकारतात. ज्यांना आपण उच्च प्रकारची सुखे म्हणतो, उदा. बौद्धिक सुख हे शारीरिक सुखापेक्षा उच्च असते असे आपण मानतो. ती ती सुखाची सर्व परिमाणे ध्यानात घेतली. विशषत: अवधी, शुद्धता आणि बहुप्रसवता ही परिमाणे ध्यानात घेतली तर परिमाणात्मक दृष्ट्याच मोठी ठरतात व म्हणून ती निवडणे योग्य असते, असे बेंथॅम यांचे म्हणणे आहे.

या विवेचनापासून निष्पन्न होणारा दुसरा एक मुद्दा असा की, प्रत्येक विशिष्ट प्रसंगी कोणते कृत्य केल्याने समाजात जास्तीत जास्त सुख निर्माण होईल असा विचार करीत न बसता, कोणत्या प्रकारच्या परिस्थितीत कोणत्या प्रकारची कृत्ये केल्याने समाजात अधिकात अधिक सुख निर्माण होईल हे ठरवावे आणि त्या, त्या प्रकारच्या परिस्थितीत त्या, त्या प्रकारची कृत्ये नियमाने करीत रहावे अशी व्यवस्था अधिक लाभदायक असते, असे अनुभवाने दिसून येते. मात्र ही व्यवस्था परिणामकारक ठरण्यासाठी अगदीच अपवादात्मक परिस्थिती सोडली, तर नियम कसोशीने पाळले जाणे आवश्यक असते. म्हणजे उपयुक्ततेच्या तत्त्वाला अनुसरून समाजात जास्तीत जास्त सुख निर्माण करणारे असे आचरणाचे नियम निष्पन्न करता येतात.

राजसंस्थेची घडण कशी असावी, राज्यसंस्थेचे अधिकार कोणते असावेत, नागरिकांची राज्यसंस्थेविषयक कर्तव्ये काय आहेत इत्यादी प्रश्नांना बेंथॅम यांनी दिलेली उत्तरेही त्यांनी स्वीकारलेल्या उपयुक्ततेच्या तत्त्वापासून निष्पन्न होतो. एकतर राज्य किंवा समाज अशी, व्यक्तींच्या अस्तित्वापलिकडचे अस्तित्व जिला असते अशी, वस्तू असते आणि घटक–व्यक्तींच्या हिताहून भिन्न तिचे हित असते ही गोष्ट ते नाकारतात. म्हणजेच राज्याची सेंद्रिय उपपत्ती ते नाकारतात. राज्य हा केवळ

त्याच्या घटक–व्यक्तींचा समुदाय असतो आणि या व्यक्तींच्या हितांची किंवा सुखांची बेरीज म्हणजेच राज्याचे हित किंवा सुख होय ही व्यक्तिवादी भूमिका बेंथॅम स्वीकारतात.

असा प्रश्न निर्माण होतो की व्यक्ती मूलत: स्वार्थी असूनही परार्थासाठी का झटते? याला बेंथॅमचे असे उत्तर दिले आहे की, चार प्रकारच्या नीतिप्रेरकांमुळे व्यक्ती स्वार्थी असूनही परहितासाठी झटते. हे नीतिप्रेरक चार आहेत. नैसर्गिक, सामाजिक, राजकीय व धार्मिक. या चारही प्रेरकांद्वारा परसुखसंपादनात आपले सुख साधले जाते. या नीतिप्रेरकांकडे बक्षीस आणि शिक्षा अशा दोन प्रकारच्या शक्ती असतात. व्यक्तीने या प्रेरकांच्या नियमांचे पालन केले तर ही नीतिप्रेरके बक्षीस देतात. अन्यथा या नियमांचे उल्लंघन केल्यास शिखा करतात. मनुष्याचा स्वभावच असा आहे की त्याला बक्षीस प्रिय असते तर शिक्षा अप्रिय असते. म्हणून बक्षीसाच्या आपेक्षेने किंवा शिक्षेच्या भीतीपोटी व्यक्ती स्वार्थी असूनही परहितासाठी झटते. बेंथॅमच्या मते ही नीतिप्रेरके व्यक्तीला स्वार्थापासून परावृत्त करतात आणि परहितासाठी प्रवृत्त करतात.

## सारांश

बेंथॅम हा सुखवादाचा प्रणेता होता व त्याने 'सुखवादाचे कलन' मांडले आहे, ही त्याची महत्त्वाची कामगिरी समजली जाते. सर्वच सुखे व सर्वच दु:खे एकाच प्रकारची नसतात आणि त्यांचे संख्यात्मक परिणाम ठरवून त्यांच्या बेरजा व वजाबाक्या करणे व्यवहारात अशक्य असते. सुखाचे व दु:खाचे गुणात्मक भेद असतात. परार्थ सुखवादाप्रमाणे जसा स्वभाव तसे वागणे म्हणजे सद्‌गुण नसून सारासार विचार करणे म्हणजे सद्‌गुण होय. दुसरा भेद असा आहे की स्वार्थ सुखवादाप्रमाणे सुख म्हणजे माझे स्वत:चे सुख होय. उलट परार्थ सुखवादाप्रमाणे सुख म्हणजे अनेक व्यक्तींचे सुख होय. ज्या आचरणाद्वारा अधिकांश लोकांचे अधिकांश सुख प्राप्त म्हणजे सदाचरण होय. म्हणजेच परार्थ सुखवादानुसार अधिकांश लोकांचे अधिकांश सुख हा नीतिनिर्णय निकष ठरतो. बेंथॅमच्या मते सुख व दु:ख ही दोन तत्त्वे मानवाच्या सर्व कृतींवर सदैव नियंत्रण चालवितात.

'अधिकांश लोकांचे अधिकांश सुख' ही व्याख्या बेंथॅमने मान्य केली आहे. तरीपण 'अधिकांश सुख' या शब्दाने त्याला 'परिमाणात्मक जास्त' सुख अभिप्रेत आहे. बेंथॅम सुखाची मोजमापे किंवा परिमाणे असे म्हणतो ती सात प्रकारची मोजमापे किंवा परिमाणे पुढीलप्रमाणे आहेत. १) तीव्रता २) कालावधी ३) फलद्रुपता ४) निश्चितता ५) शुद्धता ६) निकटता ७) व्यापकता उपयुक्ततेच्या तत्त्वात दोन गोष्टी अंतर्भूत आहेत : पहिला गोष्ट असा की, फक्त सुख चांगले असते आणि म्हणून फक्त सुख साधणे असते दुसरी गोष्ट अशी की, व्यक्तीने केवळ स्वत:चे सुख साधण्याचा प्रयत्न न करता सर्वांचे सुख साधण्याचा प्रयत्न करणे योग्य असते. व्यक्ती मूलत: स्वार्थी असूनही परार्थासाठी का झटते? याला बेंथॅमचे असे उत्तर दिले आहे की, चार प्रकारच्या नीतिप्रेरकांमुळे व्यक्ती स्वार्थी असूनही परहितासाठी झटते. हे नीतिप्रेरक चार आहेत. नैसर्गिक, सामाजिक, राजकीय व धार्मिक.

## संदर्भ :

१. Bentham Manuscripts at University College London (UC followed by box and page/folio no.).
२. 1829–30, Œuvres de Jérémie Bentham, 3 vols., ed. E. Dumont, Bruxelles: Hauman.
३. 1838–43, The Works of Jeremy Bentham, Published under the Superintendence of his Executor, John Bowring, 11 vols., Edinburgh: William Tait.
४. जोशी ग. ना., पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास, खंड १ ते ३, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, ३०, १९७५
५. मिल्ल, जे. एस., ॲन एक्झॅमिनेशन ऑफ सर विल्यम हॅमिल्टन्स फिलॉसफी, २ खं., लंडन, १८६५
६. वाडेकर, दे. द., संपा मराठी तत्त्वज्ञान महाकोश, खंड १ ते ३, मराठी तत्त्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे, १९७४
७. रेगे मे. पु. पाश्चात्य नीतिशास्त्राचा इतिहास, समाज प्रबोधन, पुणे
https://plato.stanford.edu/entries/bentham/
https://iep.utm.edu/bentham/

**B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal**
**Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)**
**ISSN : 2278-9308**
**July 2021**

# भारतीय प्रथा, परंपरा आणि व्यक्तिविकास

डॉ. स्मिता गजभिये.
श्री. संताजी कला व विज्ञान महाविद्यालय पालांदूर/चौ.
Email-Id – mtirpude31@gmail.com,Mob. No. 8007526252

आजचं आधुनिक जग हे तंत्रज्ञानाचं, विकासाच, प्रगतीचं आहे. व्यक्ति आज एकविसाव्या शतकात आहे. गेल्या वीस शतकांत जगात मोठया प्रमाणात वैचारिक, तांत्रिक बदल झाले. परंतु आजही लोकांच्या मनावर असलेला अंधश्रद्धांचा पगडा तसाच आहे. सुशिक्षित लोकसुध्दा या अंधश्रद्धांना बळी पडत आहेत. आपल्या देशात मुहूर्त, सोवळे, परंपरा या फार पूर्वीपासून पाळल्या जात आहेत. आजही हया सर्व गोष्टी आहेत. काळी जादू, बुवाबाजी, मंत्र, वशीकरण या गोष्टींना लोक बळी पडतात आणि आयुष्य उध्दस्त करून घेतात. काही लोक आपल्या स्वार्थासाठी लोकांच्या या अंधश्रद्धांचा उपयोग करतात. लोकांच्या मनावर असलेला अंधश्रद्धांचा पगडा दूर करणं गरजेचं आहे. हया अंधश्रद्धांचं समूळ उच्चाटन व्हायला हवं. लोकांनी काळानुसार, बदलत्या परिस्थितीनुसार स्वत:मध्ये बदल करायला हवेत. अंधश्रद्धा पाळणाऱ्या लोकांनी स्वत:ला सुशिक्षित म्हणवून घेऊच नये. चुकीच्या प्रथा—परंपरा बदलण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करायला हवेत. लोकांनी स्वत:ची मानसिकता आणि दृष्टिकोन बदलणं गरजेचं आहे. भविष्यकालीन वाटचालीच्या आणि विकासाच्या दृष्टिनं हे करणं महत्वाचं आहे.

**परंपरतेनुच परिवर्तनाची सुरूवात :—**

तथागत गौतम बुद्धांना कोशल गावाहून एक अनुयायी भेटण्यास आला होता. त्याने बुद्धांना योग्य मार्ग म्हणजे काय? असा प्रश्न विचारला. बुद्धांनी त्याला सांगितलं. मी जे काही सांगितलं त्यावर केवळ मी काही सांगितलंय म्हणून विश्वास ठेवू नकोस. केवळ परंपरा सांगते म्हणून तू काही ऐकु नकोस, कोणी प्रसिद्ध व्यक्ति म्हणते म्हणून तू ऐकु नकोस, केवळ शाक्य आहे म्हणून बरोबर आहे. असं समजू नकोस. केवळ व्यवहार ज्ञान आहे म्हणून स्वीकार करू नकोस, जे तुझ्या सद्सद विवेकबुद्धीला योग्य वाटतं त्यावर तू विश्वास ठेव व त्याचं आचरण कर. डोळयावरच्या अनेक पट्या काढून मनाची घडी बनव, हेच योग्य आहे.

व्यक्तिगत व सामाजिक जीवनात अशा कितीतरी रूढी, परंपरा आपण अशाच डोळयांवरच्या पट्या ठेवून पाळत असतो. कितीतरी परंपरा आज काळानुसार कालबाहय ठरल्या असल्या तरी आपल्या पूर्वजांनी सुरू केल्या, सांगितल्या म्हणून आपण पाळत असतो.

व्यक्तिमध्ये वांशिक व नवीन संपादित गुण असतात. हे सर्व जीवनार्थ कलहात यशस्वी होण्याकरिता उपयुक्त होतात. हे दोन्ही मिळून परंपरा निर्माण होते. मागच्या मानवी पिढीकडून पुढील पिढीस प्राप्त झालेली पद्धती म्हणजे परंपरा होय. व्यक्तिची विशिष्ट प्रकृती असते. तेवढयावर जीवनार्थ कलहात मानव यशस्वी होऊ शकत नाही. माणूस निसर्गाचा विचार करून नवे गुण, ज्ञान, कलाकौशल्ये, आचरणपद्धती वा जगण्याची साधने संपादन करतो व यशस्वी होतो. हे सर्व संपादित विशेष पूढील पिढीला मिळतात. त्यांची ठरावीक पद्धती वा चाकोरी बनते. सर्व मानवी संस्कृती ही अशी परंपराच होय. पण पंरपरेतील अपूर्णता व दोष ध्यानात आल्यावर नवी मानसिक तसेच भौतिक साधने व त्यांच्या पद्धती माणूस शोधतो. त्यामुळे नवी परंपरा निर्माण होते. मानवी जीवनाच्या म्हणजे संस्कृतीच्या सर्व शाखा वा क्षेत्रे यांत जुनी परंपरा, परिवर्तन व नवी परंपरा अशी मालिका असते आणि त्यामुळे जीवनात व्यक्ति यशस्वी होतो.

**काळानुसार परिवर्तन आवश्यक :—**

''धर्म माणसासाठी आहे, माणूस धर्मासाठी नव्हे'' हा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला होता. त्यांनी केलेला काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह म्हणजे समता आंदोलनातील एक सुवर्ण पर्व मानलं गेलं. समान मानवी हक्कासाठी लढणाऱ्या डॉ. बाबासाहेबांनी नंतर भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून स्त्री—पुरूष असा भेद केला जात असेल तर तो भारतीय राज्यघटनेचा

अवमान आहे. केवळ लिंगभेद करून महिलांना प्रवेशबंदी करणाऱ्या धर्माच्या ठेकेदारांच हे बौद्धिक मागासलेपणाचं दर्शनच होतं असं म्हणावं लागेल.

व्यक्तिचे रितीरिवाज, आचार–विचार, संस्था, संघटना, जीवनपद्धती, भोवतालचा परिसर, व्यक्तिव्यक्तींमधील वर्तन यांमध्ये सतत बदल होत असतात. आदिम अवस्थेपासून ते सांप्रत काळापर्यंत मानवी समाजाच्या सर्व अवस्थांमध्ये सतत परिवर्तन झाल्याचे दिसते. मॅकायव्हर यांच्या मते ‘‘सामाजिक संबंधातील परिवर्तनाला सामाजिक परिवर्तन म्हणता येईल. मूलभूत अर्थाने समाज रचनेतील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय. अमेरिकन समाजशास्त्रज्ञ हॅरी जॉन्सन यांच्या मते हे परिवर्तन जैविक,

**सांस्कृतिक, आर्थिक, तांत्रिक आणि राजकीय क्षेत्रांतही घडून येते.**

बदलणाऱ्या परिस्थितीला अनुसरून व्यक्ति आपल्या सामाजिक संबंधात जाणीवपूर्वक बदल करत असल्याने सामाजिक परिवर्तन घडतो. मानवाची जगण्यासाठी जी सतत धडपड चालू असते. त्यासाठी तो प्रयत्नपूर्वक पर्यावरणाशी जुळवून घेऊन फेरबदल करत असतो. या पर्यावरणाशी येणाऱ्या सांस्कृतिक व्यवस्थेत सारखा बदल होत असल्याने सामाजिक परिवर्तन चालू राहते. एका पिढीतील मूल्ये पुढच्या पिढीतील लोकांना मान्य होत नाही. मात्यापित्यांना ज्या गोष्टी आवडतात. त्या मुलांना आवडतीलच असे नाही. कुटूंबपद्धती विविध सण–उत्सव साजरे करण्याच्या पद्धती यात बदल होतात. व्यक्तिच्या प्राथमिक अवस्थेत नर–मादी एवढेच संबंध होते. त्यातून स्वैराचार घडत असे. त्यानंतर विवाह संस्था आली. कुटूंबात संस्कृतीची निर्मिती झाली. ज्वालामुखीचा उद्रेक, रोगराई, प्रचंड पूर अगर वादळ, उष्णतामान, पर्जन्यमान, हिमयूगाची सुरूवात किंवा अस्त, नदीप्रवाह बदलणे या नैसर्गिक घडामोडींमुळेही सामाजिक परिवर्तन होते. या आकस्मिक बदलांना अनुरूप असे बदल मानवाला आपल्या सामाजिक जीवनात करावे लागतात. जैविक परिस्थितीतील अनुवंशिकतेच्या व संकराच्या तत्वांमुळे सामाजिक परिवर्तन होते. जननप्रमाण आणि मृत्युप्रमाण या दोन्ही गोष्टींवर नियंत्रण ठेवता आल्याने समाजाच्या लोकसंख्येच्या रचनेत बदल होत जातो आणि याचा प्रभाव सामाजिक परिवर्तनावर पडतो.

**समाजजीवनात बदल आवश्यक :–**

बदलत्या काळानुसार समाजजीवनामध्ये अनेक बदल झाले. नवनवीन शोध लागले. मानवी समाजामध्ये भौतिक प्रगती घडून आली. उदयोगधंदयावर आधारित नवी संस्कृती उदयास आली. या उदयोगसंस्कृतीत स्त्रीजीवनाकडे नव्या दृष्टीने पाहिले जावू लागले. बुद्धिवादाचा उगम झाला. विज्ञानाच्या प्रगतीची बीजे सर्वत्र दिसू लागली. याच काळात धर्मसत्ता व राजसत्ता यांच्यामध्ये संघर्ष निर्माण झाला. सार्वभौम तत्वांबद्दल प्रश्न निर्माण झाले. याचा परिणाम म्हणून ऐहिक जीवनाकडे लोकांचे लक्ष वेधले गेले. यातूनच भौतिक समृद्धीचा विकास निर्माण झाला. राजा व धर्म याबद्दल लोकांना फारसा विश्वास राहीला नाही. त्यामुळे राजसत्ता व धर्मसत्ता यातून येणारे दास्यत्व स्वीकारण्यास लोकांचा विरोध व्हायला लागला. व्यक्ति स्वातंत्र्याची कल्पना पुढे आली एकंदरीत या बदलाचा परिणाम स्त्री जीवनावर विधायक स्वरूपात झाला.

उद्योग संस्कृतीमुळे मानवी जीवनात वैचारिक क्रांतीचे युग निर्माण झाले. नवनवे यांत्रिक शोध लागले. भौतिक सुधारणांमुळे समाज आध्यात्मिक गुलामगिरीतून बाहेर पडला. व्यक्तीच्या स्वत:बद्दलच्या कल्पना, धारणा बदलल्या आणि व्यक्तिस्वातंत्र्याला, व्यक्तिमत्व विकासाला प्राधान्य देण्यात येऊ लागले. यामुळे दास्यत्वाची संकल्पना झुगारली गेली. स्त्री दास्यविमोचनाची प्रक्रिया सुरू झाली. त्यासाठी लढा लढविला जाऊ लागला. या सर्वाचा चांगला परिणाम झाला आणि आधुनिक काळातील स्त्रीचे जीवन बदलत गेले.

**आधुनिक काळात ‘स्त्री’ जागृतीला प्राधान्य :–**

प्रथा परंपरेच्या जोखडातून बाहेर पडून आधुनिक काळात स्त्रीचे स्थान भक्कम होत गेले. स्त्री ही एक व्यक्ती असून ती दास्यातून मुक्त झाली पाहिजे असे विचार मांडले जाऊ लागले. स्त्री कोणत्याही अवस्थेत स्वतंत्र्य नाही. ती सतत कोणाच्या तरी आश्रयाने जगते. रूढी, प्रथा, परंपरा या बंधनांनी जखडलेली स्त्री मुक्त झाली पाहिजे, यासाठी आधुनिक काळात जोरदार प्रयत्न सुरू झाले.

महाराष्ट्रामध्ये १८१८ साली पेशवाई नष्ट होऊन भारतभर ब्रिटिशांचा एकछत्री अंमल सुरू झाला. या परिस्थितीत स्त्रीजागृतीचे प्रयत्न जोमाने सुरू झाले.

महाराष्ट्रात महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले या दांम्पत्याच्या विचारातून व कृतीतून स्त्रियांच्या स्वातंत्र्यासाठी, अस्मितेसाठी, ओळखीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले गेले. ज्योतिबा फुले यांनी पुण्यामध्ये मुलीसाठी पहिली शाळा सुरू केली. विधवा पुनविवाहाचा पुरस्कार केला आणि विधवा विवाह घडवून आणले विधवेच्या पोटी जन्माला येणाऱ्या अनौरस बालकांची हत्या टाळण्यासाठी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. महात्मा जोतिबा फुले यांनी उक्ती आणि कृती यांची सांगड घातली. एका ब्राम्हण विधवेच्या पोटी जन्मलेला अनौरस मुलगा त्यांनी दत्तक घेतला. त्यामुळे स्त्रियांच्या जीवनात उत्तरोत्तर प्रगती घडून आली. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या या पायाभरणीच्या कामामुळे पुढे स्त्री स्वातंत्र्याची चळवळ जोमाने पसरू लागली. उक्ती आणि कृती यांची सांगड घातल्यामुळे फुले आधुनिक काळातील स्त्री उद्धाराचे उद्गाते ठरतात. सर्व मानव प्राण्यात ‘स्त्री’ श्रेष्ठ आहे. तिला समान हक्क आणि स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. असे महात्मा फुलेंचे मत होते. या संदर्भात ते म्हणतात. ‘‘आपण आपल्यालाच मोठे शहाणे माणून विदयेच्या तोऱ्यात एकंदर सर्व मानवी पुरूषांनी आपल्या जन्मदात्या मातांनी आपल्या उदरी नऊ महिने ओझे वागवून आपणास जन्म दिला. याविषयी ते अनोळखी होऊन कृतघ्न होतात’’. पुरूषांचे कृतघ्न होणे महात्मा फुलेंना आवडत नाही. स्त्रियांनी शिक्षण घेतल्याशिवाय त्यांची उन्नती होणार नाही हे ओळखून फुल्यांनी स्त्री शिक्षणाला प्राधान्य दिले. यातूनच महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाला सुरूवात झाली. स्त्री वैचारिकदृष्टया जागृत झाली.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सरकारी पातळीवरही स्त्री जागृतीला प्राधान्य देण्याचे धोरण ठरविलेले दिसते. स्वतंत्र्य भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, पहिल्या महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी स्त्री मुक्तीचा कार्यक्रम महत्वाचा मानला. त्यामुळे स्त्रीमुक्तीच्या वाटा खुल्या झाल्या. महाराष्ट्रात छाया दातार, विदया बाळ, प्रेरणा राणे अशा स्त्रीयांच्या माध्यमातून स्त्रीमुक्तीची चळवळ वेगाने पसरू लागली. ‘‘स्त्रीने स्वत:वर काही बंधने लादली आहेत. पुरूषांच्या तुलनेने स्त्री एवढी चांगली असली तरी सर्वात जास्त मानहानी तिलाच सहन करावी लागते. स्त्री सध्याच्या वातावरणामध्ये असुरक्षित आहे. अनेक कार्येकर्ते व कार्यकर्त्या स्त्रीमुक्तीसाठी आवाज उठवत असल्या तरी या साऱ्या प्रतिकूल परिस्थितीत स्त्रीला बरेवाईट अनुभव येतातच. स्त्रियांच्या प्रश्नांसंदर्भात निलम गोऱ्हे म्हणतात, ‘‘स्त्रियांच्या प्रश्नांवर स्त्रियांनाच संघठित करायला हवं, त्यांच्या स्वत:च्या जगण्याला आणि माझ्या जगण्याला एक माणूसपणासाठी आव्हानाची जाग निर्माण करायला हवी.’’ एकुणच स्त्रीजागृतीच्या दृष्टीने पडणारे हे पाऊल अतिशय महत्वाचे आहे.

**भारतीय संस्कृती आणि स्त्री :–**

कुटूंबाचे सामाजिक स्थान व प्रतिष्ठा वाढवण्यासाठी स्त्रीला कुटूंबामध्ये समानतेची वागणूक मिळणे गरजेचे आहे. स्त्रीमुक्ती चळवळीचा लढा हा माणूसपणासाठी चाललेला आहे. या संदर्भात लीला पाटील म्हणतात, ‘‘जीवन सार्थकतेचे निकष बायकांनी बदलायला हवेत. त्यासाठी त्यांनी जागे होण्याची गरज आहे. आपण आपले जीवन दुसऱ्यासाठी जगणे, शरीर झिजवणे मन मारून घुसमटून परंपरागत आलेल्या मुल्यांची जपणूक करणे, योग्य की अयोग्य याचा विचार त्यांनी करायला हवा. आपले आयुष्य दुसऱ्या कुणाच्यातरी मर्जीवर अवलंबून ठेवणे चुकीचे आहे. आपल्या समोरचे प्रश्न आपण सोडवू शकतो. त्यासाठी आपली निर्णय शक्ती वापरली पाहिजे’’. म्हणूनच समाजाने परंपरागत, सनातनी मनोवृत्ती बाजूला सारून स्त्री विकासाच्या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत. ज्या जीवन मुल्यांचा स्वीकार भारतीय संस्कृती करते, त्या नैतिक, चारित्र्यसंपन्न अशा संस्कृतीच्या वाटचालीत स्त्रीला आगळे वेगळे असे महत्व आहे. या संदर्भात रा.ना. घोटाळे लिहितात, ‘‘स्त्री ही संस्कृतीवर्धक आहे, ‘स्त्री’ बिघडली की, संस्कृती बिघडली असे समजावे. संस्कृतीच्या उच्चनिचतेचा मापदंड म्हणजे ‘स्त्री’ भारतीय संस्कृती चिरंजीवी करण्याचे कार्य भारतीय ‘स्त्री’ नेच केले आहे.

**देव/धर्म व व्यक्ती :–**

आपल्या देशाच्या प्रदीर्घ इतिहासामध्ये अनेक धर्म आणि पंथ उदयास आले. काही धर्म आणि पंथ बाहेरील देशांमधून भारतात आले. सर्व धर्म आणि पंथ यांनी आपआपल्या परीने स्वत:च्या धार्मिक तत्वज्ञानाचा भारतामध्ये प्रसार व प्रचार करण्याचा प्रयत्न केला. बऱ्याच अंशी असा धर्मप्रसार अजूनही चालू आहे. देव/धर्म यांना मानवी जीवनामध्ये अजूनही महत्वाचे स्थान

आहे. देव/धर्म यांचा जनमानसावरील प्रभाव नष्ठ झाला आहे असे दिसत नाही. बहुतेक लोक या ना त्या स्वरूपात देव मानतात. उपासना करतात असेच दिसते. यात्रा, तीर्थयात्रा, उत्सव आजही भारतात जोरात सुरू आहेत. ज्या देशामध्ये देव/धर्माचे महत्व कमी आहे त्यापैकी बहुतेक सर्व देश आर्थिकदृष्टया विकसित झालेले आहेत. दारिद्रय, उपासमार, कुपोषण, रोगराई यांचे त्या देशांमध्ये पूर्णपणे उच्चाटन झाले आहे. त्या देशांमध्ये कायदा आणि सुव्यवस्था चांगली आहे. तेथेही भ्रष्टाचार आहे. परंतु तो गोरगरीबांना छळणारा भ्रष्टाचार नाही अर्थतज्ञांचेही असेच मत आहे. जेथे देव/धर्माचे महत्व कमी झाले आहे ते देश एकुण माणवी विकासामध्ये सध्या खूपच पूढे आहेत. त्या देशातील सर्वसामान्य मनुष्य दैनंदिन जीवनातील आर्थिक विवंचनेपासून बऱ्याच अंशी मुक्त आहेत, असे मानण्यास वावगे होणार नाही.

आजच्या विकसित देशांमध्ये, खालील तिन गोष्टी खूपशा प्रमाणात अस्थित्वात आहेत.

१) समाधानकारक दरडोई उत्पन्न आणि दारिद्रय, कुपोषण इत्यादींचे उच्चाटन.
२) समाधानकारक कायदा व सुव्यवस्था.
३) पारदर्शी व शक्यतो भ्रष्टाचाररहित आर्थिक व्यवहार.

तर अविकसित देशांमध्ये या तिन्ही गोष्टींचा बऱ्याच प्रमाणात अभाव आहे. या अभावामुळे अविकसित देशांमध्ये सर्वसामान्य मनुष्याचे दैनंदिन जीवन आनंददायी न होता कष्टप्रद होते. कारण आधुनिक काळामध्ये मनुष्याच्या गरजा प्रामुख्याने आर्थिक स्वरूपाच्या आहेत. शिवाय सध्याच्या काळामध्ये मानवी जीवन आर्थिक बाबतीत पूर्वीपेक्षा अधिक मिश्र आणि गुंतागुंतीचे झाले आहे. पूर्वीच्या साध्या जीवनातील स्वावलंबन कमी होऊन परंस्परावलंबन वाढले आहे. अशा परिस्थितीमध्ये आपली गरज पूर्ण होणे किंवा आपले 'काम होणे' आपला विकास होणे हे केवळ आपल्या एकटयाच्या प्रयत्नावर अवलंबून राहत नाही. तर त्यासाठी समाजातील इतर घटकांचे किंवा व्यक्तींचे पुरेसे सहकार्य मिळणे आवश्यक असते.

सर्वसामान्य व्यक्ती देव/धर्म यांना शरण जातो. त्यांचे महत्व वाढते. अशा प्रकारे सर्व सामान्य मनुष्याच्या जीवनामध्ये विवंचना आणि अनिश्चितता जेवढी जास्त तेवढे देव/धर्माला महत्व जास्त, असे म्हणावे लागेल. सर्वकष आर्थिक विकासामुळे सर्वसामान्य व्यक्तिच्या दैनंदिन आयुष्यातील विवंचना आणि अनिश्चितता कमी होण्यास मदत होते आणि व्यक्तीचा आत्मविश्वास वाढीला लागतो. आत्मविश्वासातून व्यक्तीला प्रगतीची दारे मोकळी होतात आणि व्यक्तीचा सर्वकष विकास घडून येतो.

**सामाजिक परिवर्तनातून मानवी प्रगती :—**

परिवर्तन हे मानवी संस्कृतीचे अविभाज्य अंग आहे. मानव रानटी—पाषाणयुगीन अवस्थेतून विदयमान प्रगत संस्कृतीपर्यंत वाटचाल करीत आला. निरनिराळया टप्याने विकसित होणे, हा मानवी समाजाचा एक गुणधर्मच आहे. हा विकास उत्क्रांतिवादाने आणि कार्यात्मक उप्पत्तीतून होत असतो. तसेच मार्क्सवादी, गांधीवादी, आंबेडकरवादी, लोकशाही समाजवादी आणि इतर अनेक प्रेरणा घेऊन काम करणाऱ्या संघटनांमुळे समाजपरिवर्तन होत असते.

समाजातील कोणताही बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन नव्हे, तर सामाजिक कृतींचे व आंतरक्रियांचे, आकृतिबंध, मूल्ये, सांस्कृतिक फलिते आणि प्रतिके या आविष्कारांसह होणाऱ्या बदलांना सामाजिक परिवर्तन असे म्हणतात. समाजाच्या विविध भागांच्या परस्पर संबंधाच्या स्वरूपात बदल झाला की, समाजरचनेत परिवर्तन घडून येते.पर्यायाने सामाजिक परिवर्तन घडून येते.

**संदर्भ :—**

१) भागवत, कमल, समाजवाद म्हणजे आहे तरी काय? पूणे १९८६
२) भागवत विदयुत, (२००४) 'स्त्री प्रश्नांची वाटचाल' — प्रतिमा प्रकाशन पूणे.
३) गांधी नंदिता, शहा नंदिता (१९९२) 'स्त्री संघर्षाची नवी रूपे' — पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
४) डॉ. बाचल वि.मा. (२०१०) 'भारतीय राज्यघटना आणि राजकीय व्यवहार' — के. सागर प्रकाशन, मुंबई.
५) साने गुरूजी, 'भारतीय संस्कृती' — व्हीनस प्रकाशन, १९६९.
६) धर्म आणि समाजपरिवर्तन — गं.वा. सरदार

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# भारतीय समाजात जात, वर्ग आणि धर्म यांचा प्रभाव

प्रा.डॉ. संतोष मेंढेकर
समाजशास्त्र, विभाग प्रमुख,रेणुका कॉलेज, बेसा, नागपूर
मो.नं. ९८६००१५०२५, ८७८८९६८६२२, santoshmendhekar@gmail.com

प्रस्तावनाः

भारतात जातीमुळे निर्माण सामाजिक विषमता(Social Inequality)

विषमता म्हणजे भेद किंवा फरक होय. दोन व्यक्तीमध्ये शारीरिक विषमता असते. एक व्यक्ती उंच आणि गोरा तर दुसरा व्यक्ती ठेंगणा आणि सावळा असतो याला देखील विषमता म्हटले जाते. तर ही जन्मतः असलेली शारीरिक विषमता होय. या विषमतेचा आणि आणि सामाजिक विषमतेचा कोणताही सबंध नाही उलट शारीरिक विषमता असलेल्या व्यक्तींना समाजात समान मानले जाते आणि त्यांच्याशी समतेचा व्यवहार केला जातो. यावरुन स्पष्ट होते की, शारीरिक विषमता आणि सामाजिक विषमता यात फरक आहे. निसर्गतः असलेल्या भिन्नतेला विषमता मानले जात नाही. सामाजिक विषमता ही समाजोद्भवित असते. म्हणजे ही वि्षमता मानव निर्मीत आहे. समाजाने कोणत्या का कारणाने होईना, निर्माण केलेली विषमता ही सामाजिक विषमता होय. या विषमतेला त्या समाजातील मूल्ये आणि प्रमाणकांची मान्यता असते. भारतात जातीच्या आधारावर सामाजिक विषमता पाळली जाते. थोडक्यात, सामाजिक विषमता म्हणजे समाज आणि सामाजातील परंपरा, मूल्ये आणि प्रमाणकाद्वारा मान्य केलेली विषमता होय.

सामाजिक विषमतेचे समाजशात्रज्ञाने केलेले प्रकार(Types of Social Inequality)

प्रत्येक देशात सामाजिक विषमतेचे स्वरुप एकसारखे नाही. सामाजिक विषमतेचे आधार देखील वेगवेगळे आहेत. वर्ग, दर्जा आणि सत्ता या आधारावर रुन्सीमन यांनी सामाजिक विषमतेचे पुढील तिन प्रकार पाडले आहेत.

१) वर्गाची विषमता(Inequality of Class)
२) दर्जाची विषमता(Inequality of Status)
३) सत्तेची विषमता(Inequality of Power)

या तीन प्रकारच्या विषमतेपैकी दर्जाची विषमता जातीच्या विषमतेशी संबंधीत आहे. रुन्सीमनच्या मते, सामाजीक गुणविशेषातील फरक आणि जिवनशैली ज्यामुळे श्रेष्ठ किंवा कनिष्ठ प्रकारची प्रतिष्ठा प्राप्त हाते त्या सर्वांचा समावेश दर्जाच्या विषमतेमध्ये केला जातो.' दर्जा हा समाजाद्वारे निर्धारीत केला जातो. म्हणून सामाजिक दर्जाच्या आधारावर जी विषमता निर्माण हाते त्यास सामाजिक विषमता म्हणतात.

भारतीय समाजव्यवस्थेचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केल्यास असे आढळून येते की, भारतीय समाजव्यवस्था ही जातीव्यवस्थेवर आधारीत आहे. जातीव्यवस्थेशिवाय भारतीय समाजाचा विचार करता येत नाही. जातीव्यवस्था हा भारतीय समाजाचा मुलभुत आधार आहे. म्हणून जातिव्यवस्था म्हणजे भारतीय समाजव्यवस्था होय.

जातिव्यवस्था म्हणजे काय (Caste System)

भारतीय समाज हा लहान अथवा मोठा आकार असणाऱ्या असंख्य गटांमध्ये विभाजित आहे. प्रत्येक गट एका विशिष्ट नावाने ओळखला जातो. उदा. ब्राह्मण, तेली, कुंभार, मराठा कुणबी इत्यादी. या गटांना जातीच्या आधारावर निर्माण झालेले गट म्हणजेच जातिगट असे संबोधिले जाते. भारतीय समाजात जातींची एकूण संख्या किती हे निश्चित सांगणे अवघड आहे. २००१-२००२ मध्ये केंद्रसरकारने प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार संपूर्ण भारतात. २,२६८ मागास जाती (ओ. बी. सी.) आहेत.

मागास जातींच्या संख्येत अनुसूचित जातींची आणि सवर्ण मानणाऱ्या जातींची संख्या मिळविली तर भारतीय समाजात पाच हजारांपेक्षा अधिक जाती आहेत, असे मत अभ्यासकांनी व्यक्त केले आहे.

जातीचा अर्थ (Meaning of Caste) :-

'जात' हा मराठी शब्द 'जन' या धातूपासून बनलेला आहे. त्याचा अर्थ 'जन्म' असा होतो. एकाप्रकारे जन्माने प्राप्त होणारा समूह म्हणजे जात होय. जातीला इंग्रजीमध्ये Caste म्हणतात. Caste हा इंग्रजी शब्द पोर्तुगीज Casta शब्दावरून बनला आहे. Casta या पोर्तुगीज शब्दाची व्यत्पत्ती Castus या लॅटीन शब्दातून झाली. Castus या शब्दाचा अर्थ वंशाची शुध्दता असा आहे. Caste हा शब्द पोर्तुगीजांनी वंश शुध्दतेला उद्देशून १५७६ मध्ये गोवा मंडळाच्या हुकूमनाम्यात प्रथम वापरला पण जाती हे वंश शुध्दतेचे निदर्शक नाही. जातीचा आणि वांशिक शुध्दतेचा कोणताच संबंध नाही. तरी देखील 'जातीला' इंग्रजीमध्ये पर्यायी शब्द म्हणून Caste हा शब्द रूढझाला.

ISSN : 2278-9308
July 2021

जातिव्यवस्थेचे समाजशास्त्रीय विश्लेषण करतांना, डॉ. बी. आर. आंबेडकर नमूद करतात की, "जात हा शब्द समान दर्जाचा नाही. जात असमानवतेवर आधारीत आहे. एक जात दुसऱ्या जातीच्या तुलनेत उच्च किंवा कनिष्ठ आहे. आणि मधल्या जाती या उच्च जातीपेक्षा कनिष्ठ व कनिष्ठ जातीपेक्षा उच्च आहेत जाती पध्दत ही एक श्रेणी पध्दत असून त्यात उच्च जातीला अग्रक्रम आणि कनिष्ठ जातीला इतरांपेक्षा न्यूनक्रम मिळतो.

जातीची व्याख्या (Definition):-

१) डॉ. बी. आर. आंबेडकर (Dr.B.R. Ambedkar) : "बहिर्गत विवाह बंधनावर अंतर्गत विवाह बंधनाचे वर्चस्व प्रस्थापित होणे म्हणजे जातीची निर्मिती होय. जात ही एक बंद झालेला वर्ग होय.

(The super position of endogamy on exogamy means the creation of cast. Cast is enclosed class. –Dr B.R. Ambedkar)

जातीची वैशिष्ट्ये(Characteristic of Caste):-

डॉ. नृपेंद्रकुमार दत्त(Dr.N.K.Datta) यांनी जातीची व्याख्या न करता जातीची सहा वैशिष्ट्ये ^Origin and Growth of Castes in India* (१९३१) या ग्रंथात स्पष्ट केली आहेत. डॉ. जी. एस. धुर्ये यांनी देखील जातीची व्याख्या केली नाही. कारण जातीच्या व्याख्येत सर्व वैशिष्ट्यांचा समावेश करणे कठीण आहे हे लक्षात घेऊन त्यांनी ^Caste and Class in India* या ग्रंथात जातीची एकूण सहा वैशिष्ट्ये स्पष्ट केलीत. डॉ. धुर्ये यांनी जातीच्या संरचनात्मक आणि संस्थात्मक अशा दोन्ही बाजूंचा विचार करून जातीची वैशिष्ट्ये विशद केलीत. या वैशिष्ट्यांवरून जातीचे स्वरूप स्पष्ट होते. म्हणून डॉ. धुर्ये यांनी सांगीतलेली वैशिष्ट्ये हीच जातीची वैशिष्ट्ये मानता येतील. जातीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे.

१) समाजाचे खंडात्मक विभाजन(Segmental Division of Society)
२) श्रेष्ठ कनिष्ठता(Hierarchy)
३) सामाजिक व्यवहार आणि रोटी व्यवहारांवरील निर्बंध(Restrictions on Social Intercoures and Feeding)
४) सामाजिक व धार्मिक अयोग्यता आणि विशेषाधिकार(Social and religious Disabilities and Previleges)
५) विवाहावरील निर्बंध(Restrictions on Marriage)
६) व्यवसाय निवडीवर निर्बंध (Lack of Unrestricted Choice of Occupation)
७) धार्मिक आधार (Based of Religion)

भारतीय समाजात जात, वर्ग आणि धर्म यांचा प्रभाव (विषमतेची संरचना)

भारतीय समाज वेगवेगळया जातीच्या समूहामध्ये विभागला गेला आहे. श्रेष्ठ-कनिष्ठता हे जातीचे एक महत्वाचे वैशिष्टय आहे. जातिव्यवस्थेत सर्व जातींचा दर्जा समान नसतो. ब्राम्हण ही जात सर्व जातिंपेक्षा श्रेष्ठ मानण्यात आली, तर अस्पृश्य जातिंचा दर्जा सर्वात खालचा आहे. ब्राम्हण जात वगळल्यास प्रत्येक जात ही कोणत्यातरी जातीपेक्षा श्रेष्ठ आणि इतर जातिपेक्षा कनिष्ठ असते. जातिव्यवस्थेचे एक अभ्यासक आणि थोर समाजशास्त्रज्ञ डॉ. बी. आर. आंबेडकर स्पष्टपणे प्रतिपादन करतात की, "जाती या दर्जाबाबत समान नाहीत. त्यांचा क्रम हा विषमतेवर आधारीत आहे.ß(caste are not equal in status,their order is base on inequality) यावरुन हे स्पष्ट होते की जातिची संरचना ही विषमतेवर आधारीत आहे.

जातीची संरचना ही मुळात विषमतेवर आधारीत आहे. अशी ही जातीव्यवस्था भारतीय समाजव्यवस्थेचा आधार आहे. म्हणून भारतीय समाजव्यवस्थेची संरचना विषमताधिष्ठीत आहे. भारतीय समाजातील सामाजिक विषमता नष्ट करायची असेल तर जातिव्यवस्था समूळ नष्ट करणे आवश्यक आहे.

जातीभेद किंवा विषमतेचे परिणाम

जातीव्यवस्था ही विषमतेवर आधारीत आहे. त्यामूळे जातीच्या गुणांपेक्षा जातीचे दोषच अधिक आहेत. भारतीय समाजात जातीभेद किंवा जाती विषमता एक फार मोठी सामाजिक समस्या आहे. जातीव्यवस्थेमुळे भारतीय समाजात विविध प्रश्न निर्माण झाले आहेत. स्वातंत्र, समता, बंधुता आणि न्याय या मानवि मूल्यांचा अभाव जातिव्यवस्थेत असल्यामूळे शुद्र आणि अस्पृष्य लोकांच्या मानवी अधिकारांचे हनन झाले. जातिवाद, अस्पुष्यता, सामाजिक शोषन इत्यादी अनेक समस्या जातिभेदामूळे निर्माण झाल्यात. जातिभेदामूळ ऐक संघ असा भारतीय समाज निर्माण होऊ शकला नाही व्यक्ती आणि सामाजिक विकासामध्ये जातीभेद फार मोठा अडथळा बनला आहे.

१) मानवी मूल्यांचा अभाव (Lack of Human Values) : व्यक्तीच्या सर्वांगीन विकास होण्याकरिता मुलभूत मानवी अधिकारांची आवश्यक्ता असते. व्यक्तीला विकास करण्याकरीता स्वातंत्र, समान संधी, न्याय या मानवी मूल्यांची गरज असते. जेव्हा समाजात ही मानवी मूल्य असतात, तेव्हा समाजातील प्रत्येक व्यक्तीला विकास करण्याची संधी मिळते. आणि व्यक्तीगत विकासाबरोबरच सामाजिक विकास देखील घडून येतो.

२) समान सामाजिक आणि धार्मिक हक्कांचा अभाव (Lack of Equal Social and Religious Rights) : जातीव्यवस्थेने उच्च जातींना सामाजिक आणि धार्मिक हक्क प्रदान केलेत. उच्च जातींना काही विषेष धार्मिक हक्क सूध्दा आहेत. परंतू बहूसंख्यांक असलेल्या कनिष्टजातीच्या लोकांना सामाजिक आणि धार्मिक हक्कांपासून वंचीत ठेवले आहे. इतकेच नव्हेत तर कनिष्ठ जातीवर अनेक सामाजिक आणि धार्मिक अपात्रता लादण्यात आल्यात. सर्व जातीचा एकच धर्म असतांना देखील कनिष्ठ जातीच्या लोकांना धार्मिक विधी वैदिक पध्दतीने करण्याचा अधिकार सूध्दा नाकारण्यात आला होता. हक्कांपासून वंचीत ठेवले आहे.

३) सामाजिक विकासाला बाधक (Hindrance to Social Progress) : जातीभेद हा व्यक्तीगत विकासाला बाधक आहे. त्याचप्रमाणे सामाजिक विकासासाठी पण बाधक आहे. जातिनीयमांचा व्यक्तीवर विषेष प्रभाव असतो. त्यामूळे ते परंपरा, रुढी विश्वास आणि संकेताचे निमूटपणे पालन करतात. जातिनियमांच्या वेगळीगोष्ट करायला ते तयार नसतात. एकतर जातीचे संस्कार आणि दुसरी गोष्ट म्हणजे जातीबहिसकृत करण्याची भीती, यामूळे नविन गोष्ट करण्यास ते तयार नसतात.

४) सामाजिक गतीशीलतेचा अभाव (Lack of Social Mobility) : जातीव्यवस्थेत सामाजिक गतीशीलतेचा पूर्णपणे अभाव आढळतो. व्यक्तीला जन्माच्या आधारावर जातीचे सभास्यत्व मिळते. आणि जातीनुसार सामाजिक दर्जा मिळतो. कोणत्याही परिस्थितीत व्यक्तीला जात बदलविता येत नाही. त्यामूळे त्याचा सामाजिक दर्जा हा स्थिर असतो. आपला विकास व्हावा, दर्जा बदलावा असे व्यक्तीला वाटले तरी जातीच्या कडक निर्बंधामूळे हे शक्य होत नाहीजातिभेदामूळे कनिष्ठ जातीच्या लोकांच्या विकासाचे आणि गतिशीलतेचे सर्व मार्ग बंद केले आहेत. जात ही बंद स्तरीकरणाची व्यवस्था आहे. म्हणून भारतीय समाजात गतीशीलता आढळून येत नाही.

५) आर्थिक विकासाला बाधक (Hindrance to Economice Development) : जातीमूळेसमाजात श्रमविभाजन घडून आले. हे श्रम विभाजन व्यक्तीच्या गुण आणि कौशल्याच्या आधावर झालेले नाही. काही महत्वाचे व्यवसाय श्रेष्ठ जातींना देण्यात आले. तर कनिष्ठ व्यवसाय कनिष्ठ जातीवर लादण्यात आले. व्यवसायाची निश्चिती जातीच्या आधारावर करण्यात आली असल्यामूळे समाजात आर्थिक विकास घडविण्याच्या दृष्टीने कोणतीही अनूकूल परिस्थिती जातीव्यवस्थेने निर्माण होऊ दीली नाही. म्हणून भारतीय समाजाचा आणि विषेशतः मागास जातींचा आर्थिक विकास होऊ शकला नाही.

६) अस्पृश्यतः (Untochability): 'अस्पृश्यता'ही जातीव्यवस्थेची निर्मीती आहे. जातीव्यवस्थेत काही अस्पृष्य जाती आहेत. या जातीच्या लोकांना स्पर्ष होणे अधर्म मानला जातो. अस्पृष्य जातीच्या लोकांवर अनेक अपात्रता लादण्यात आल्या होत्या. अस्पृष्य लोकांना मुलभूत मानवी अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले हाते. डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्या मते, 'अस्पृष्यता ही गुलामगिरीच्या तुलनेत अतिशय रानटी व क्रुर आहे' आजही देशातील अस्पृश्यांची परिस्थिती अतिशय विदारक आहे. केवळ जातीभेदामूळे समस्या निर्माण झाली आहे.

७) जातिवाद (Casteism) : प्रत्येक व्यक्तीचे सामाजिकरण हे त्याच्या जातीनुसार होत असते. उच्च जातीचे लोक स्वतःला श्रेष्ठ समाजात. आणि कनिष्ठ जातीच्या लोकांना तुच्छ मानतात. व्यक्तीच्या निष्ठा हया त्याचा जातीपूरत्याच मर्यादीत असतात. त्यामूळे प्रत्येक व्यक्तीला आपल्या जातीचा अभिमान वाटतो. व्यक्ती आपल्या जातीच्या हितांचाच विचार करते. यातूनच जातीवाद निर्माण होतो. आज भारतातील शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय इत्यादी सर्वच क्षेत्रात जातीवाद बोकाळला आहे. जातीभेदामूळे जातीवादाची एक ज्वलंत समस्या निर्माण झाली आहे.

८) राष्ट्रीय ऐकतेस बाधक (Himdrance to National Integration) : जातिव्यवस्थेमुळे देशातील लोकांचे शेकडो जातीमध्ये विभाजन झाले आहे. जातीमूळे व्यक्ती आपल्या जातीपूर्ती मर्यादीत होते. व्यक्तीला आपल्या जातीचा समूह हाच महत्वाचा वाटतो. त्यामूळे जाती-जातीचे स्वतंत्र समूह निर्माण झालेत. त्यांच्या निष्ठा हया जातीपूरत्याच मर्यादीत राहिल्या. जातीभेदामूळे त्यांच्यात राष्ट्रीय भावनेचा विकास होऊ शकला नाही. म्हणून आपल्या देशात राष्ट्रीय ऐकात्मतेचा अभाव आहे.

९) उच्च जातीची हूकूमशाही (Dictatorship of Upper Castes) : जातिव्यवस्थेची निर्मीती ही प्रामूख्याने उच्च जातीचे संरक्षण करएयासाठी झाली आहे. जातीव्यवस्था हि उच्च जातीच्या सुरक्षितेची ढाल आहे. म्हणूनच उच्च जातीच्या हिताचे अनेक नियम आहेत. तर किनिष्ठ जातीच्या लोकांनी कधीच प्रगती करु नये, त्यांनी उच्च जातीचे गुलाम बनून राहावे, म्हणून त्यांच्यावर अनेक निर्बंध केवळ जातीभेदामूळे लादण्यात आलेत. उच्च जातीच्या लोकांचे गुलाम बनून रहावेत अशा प्रकारची कायम व्यवस्था जातीव्यवस्थेद्वारे निर्माण करण्यात आली आहे.

१०) जाती संघर्ष (Caste Conflict) : सर्व जातीचा दर्जा समान नाही. ज्या जाती उच्च आहेत त्या जातीच्या लोकांनी आपल्या उच्च जातीचा अभिमान असतो. आणि कनिष्ठजातीच्या लोकांविषयी घृणेची भावना असते. कनिष्ठ जातीच्या लोकांवर ते सतत अन्याय करतात. त्यांची वारंवार अवहेलना केली जाते. उच्च जातीचे लापेक आपल्यावर अन्याय

ISSN : 2278-9308
July 2021

करतात ही भावना कनिष्ठ जातीच्या लोकांमध्ये असंतोष निर्माण करते. भारतात जाती संघर्षाची शेकडो उदाहरणे आढळून येतात.

जातीभेद नष्ट करण्याचे उपाय

१) शिक्षणाचा प्रसार करणे : इंग्रजांनी भारतात आधुनिक शिक्षणाचा पाया घातला. इंग्रज शासनाने अनेक शाळा आणि महाविद्यालये सुरु करुन पाश्चात्य शिक्षणास प्रारंभ केला. या शाळा आणि महाविद्यालयात सर्व जाती आणि जमातीच्या मुलांना प्रवेश दिला जायचा. इंग्रजांनी जाती प्रथेस विरोध केला होता. प्रत्यक्ष इंग्रज शासनाने सर्व जाती आणि जमाती आणि धर्माच्या मुलांना शिक्षणाची दारे खुली केलीत. त्यामुळे जाती व्यवस्थेवर खुप मोठा आघात झाला.

२) वैज्ञानिक विचारसरणी रुजविणे : शिक्षणाच्या प्रसाराबरोबरच वैज्ञानिक ज्ञानाचा आणि वस्तुनिष्ठ विचारांचा प्रसार होऊ लागला. वेगवेगळया जातीच्या लोकांशी व्यवहार केल्यास कोणताही अधर्म होत नाही. परंपरागत रुढी, परंपरा आणि अंधश्रद्धा यांना विज्ञानाचा कोणताही आधार नाही. उलट त्यामुळे सामाजिक प्रगती मध्ये मोठा अडथळा निर्माण झाला. हे सुशिक्षीत लोकांना कळू लागले. त्यामुळे लोकांनी जातीनियमांकडे दुर्लक्ष केले.

३) औद्योगिकीकरणास प्रोत्याहन देणे : आधुनिक काळात जातीव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्यामध्ये औद्योगिकीकरणाचे देखिल विशेष योगदान आहे. १९व्या शतकापासुन भारतात औद्योगिकीकरणास सुरुवात झाली. औद्योगिकीकरणाच्या विकासाबरोबर अनेक प्रकारचे विकास अस्तित्वात आले. आधुनिक काळात जातिप्रथेनुसार श्रमविभाजन किंवा व्यवसायाचे विभाजन करणे अशक्य होते. सर्व जातीचे लोक एकत्र काम करु लागले. कारखाने, गिरण्या किंवा शासकीय कार्यालयात सर्व जातिचे लोक काम करीत असल्यामुळे जातीचे बंधणे शिथिल झालीत.

४) नागरीकरण : औद्योगिकीकरणाबरोबरच भारतात नागरिकरण घडून आले. देशातील शहरांचा आकार आणि लोकसंख्या वाढू लागली. शहरात विविध जाती, जमाती, धर्म आणि संस्कृतीचे लोक राहतात. त्यामुळे नागरी जिवनात जातिनियमांचे पालन करणे अशक्य असते. विविध जाती, ध्र्म आणि संस्कुतीच्या लोकांचे व्यवसाय आणि इतर विविध कारणांमुळे पारस्पारीक संबंध निर्माण झालेत. अशाप्रकारे नागरिकरणामुळे जातिव्यवस्थेत विशेष परीवर्तन घडून आले.

५) वाहतूक आणि संचार साधनात वाढ : औद्योगिकीकरण आणि नागरीकरण यामुळे वाहतुक आणि संचाार साधनात वाढझाली. प्रवासात खाणे-पिणे आणि इतर बाबतीत जातिनियमांचे पालन करणे अशक्य होते. वाहतूकीच्या साधनांबरोबर रेडिओ, पुस्तके, वर्तमानपत्रे इत्यादी संदेशवाहकांच्या साधनांमुळे लोकांच्या विचारामध्ये परिवर्तन घडवून आणण्यास बरीच मदत झाली.

६) नविन व्यवसाय : पुर्वी भारतात फक्त पारंपारीक व्यवसाय होते आणि हे व्यवसाय जातींच्या आधारावर निष्चित होते. परंतू औद्योगिक प्रगतीमुळे अनेक नवीन व्यवसाय निर्माण झालेत. हे व्यवसाय कोणत्या विशिष्ट जातीचे नव्हते. वेगवेगळया जातींच्या लोकांनी हे व्यवसाय स्विकारलेत. एकच व्यवसाय अनेक जाती, धर्माचे लोक करु लागले. त्यामुळे या नव्या व्यवसायाचा आधार जाती नव्हत्या. गुण, कौशल्य हे व्यवसायाचे आधार आहेत. त्यामुळे व्यवसायाच्या दृष्टीने जातीचे असलेले महत्व संपुष्टात आले.

७) सामाजिक चळवळ : पश्चात्य शिक्षणाच्या प्रसारामुळे भारतीय लोक येथील प्रथा, परंपरेचे तुलनात्मक अध्ययन करु लागले. भारतात जातीव्यवस्था, अस्पृश्यता यांसारख्या कालबाहय प्रथा असल्याचे सुशिक्षीत लोकांच्या लक्षात आले. त्यामुळे १९व्या आणि २०व्या शतकात अनेक समाजसुधारक झालेत. त्यांनी जातिप्रथा, अस्पृश्यता आणि इतर अनेक कालबाहय प्रथांना विरोध केला.

८) लोकशाही मुल्ये रुजविणे : आधुनिक काळात लोकशाहीचा सर्वत्र स्वीकार करण्यात आला. स्वातंत्र, समता, बंधुता आणि न्याय या मानवी मुल्यांना लोकशाहीत विशेष महत्व आहे. जातीव्यवस्था ही मानवी मुल्यांच्या विरोधी आहे लोकशाहीमध्ये सर्व लोकांना समान अधिकार आहे. कुणीही जन्मतः श्रेष्ठ आणि कनिष्ठ असू शकत नाही. विकास करण्याची सर्वाना समान संधी दिली जाते. व्यक्ति आपल्या गुण आणि कर्तृत्वाच्या आधारावर मोठा होत असतो. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाही पद्धतीचा स्विकार करण्यात आला. त्यामुळे भारतीय समाजात लोकशाही मुल्यांना विशेष महत्व प्राप्त झाले. लोकशाही मुल्यांमुळे जातिव्यवस्थेत परिवर्तन घडुन आले.

९) कायद्याची अंमलबजावणी करणे : जातिव्यवस्थेचा सामाजिक जिवनावर अतिशय वाईट परिणाम झाला. हे लक्षात घेऊन शासनातर्फे विशेष प्रयत्न करण्यात आले. इंग्रज सरकारने १८५० मध्ये विवाहातील जातीबंधन निर्मूलनाचा कायदा केला. त्यानंतर वेगवेगळे कायदे करून इंग्रजांनी जातिप्रथेमुळे निर्माण झालेली विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला.

१७ व्या कलमानुसार जातीव्यवस्थेतून निर्माण झालेली अस्पृश्यता नष्ट करण्यात आली. शासनाने विवाह कायदा-१९५४, अस्पृश्यता अपराध कायदा-१९५५ इत्यादी अनेक कायदे केले. जातीप्रथा आणि जातीभेद नष्ट करण्यासाठी कायद्याची माहीती लोकांना द्यावी. तसेच शासनाने या कायद्याची योग्य अंमलबजावणी करावी.

१०) वैचारीक परिवर्तन करणे : जोपर्यंत लोकांमध्येवैचारीक परिवर्तन होत नाही, तो र्प्यंत त्यांच्या मनातील जातीभेदाची भावना नष्ट होणार नाही. म्हणून लोकांमध्ये वैचारीक परिवर्तनघडवून आणण्यासाठी चर्चासत्रे, परिसंवाद, इत्यादींचे सतत आयोजन केले पाहिजे. लोकांचे प्रबोधन करण्याच्या संदर्भात गावात आणि शहरात समित्या स्थापन करुन या समित्यातर्फे सामाजिक प्रबोधनाचे कार्यक्रम आयोजित करावे. सामाजिक प्रबोधनातून लोकांमध्ये वैचारिक परिवर्तन केल्यास त्यांच्या मनातील जातिभेदाची भावना दूर होऊ शकेल.

अशाप्रकारे जातीभेद नष्ट करण्यासाठी विविध उपाय आहेत. या उपायांची योग्य अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते, शिक्षक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी जातीभेद नष्ट करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले तर भारतातील जातीभेदाची समस्या नष्ट होण्यास वेळ लागणार नाही.

काहीआणखी उपाय योजना

१) सुरक्षित अथवा राखीव मतदारसंघ :

२) शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधाचे रक्षण :

३) घटनात्मक तरतुदीच्या अंमलबजावणीची प्रशासकीय व्यवस्था :

४) न्याय कारणांसाठी केलेला भेदभाव :

५) घटकराज्यात शासनाला आदेष देण्याबाबत केंद्र सरकारला अधिकार :

जातीभेद नष्ट करण्यासाठीझालेले प्रयत्न

विषमता हाच जातिव्यवस्थेचा पाया आहे. विषमतेवर आधारीत असणारी ही व्यवस्थ्या बदलविण्यासाठी प्राचीन काळापासून अनेक प्रयत्न करण्यात आलेत. जगातील सर्व मानसे समान आहेत. समाजात समता असल्याशिवाय समाजाची प्रगती होऊ शकणार नाही. गौतम बुध्दाचा धम्म हा समानतेवर आधारलेला आहे. बौध्द धम्मामध्ये सर्वांना प्रवेश दिला जातो. म्हणून बौध्द धर्मात जातीप्रथा आणि जातीभेद नाही. कबीर, नानक, चैतन्य, तुकाराम, चोखामेळा, रैदास इत्यादी संतांनी जातीप्रथेला विरोध केला. सर्व जातीतील लोक सारखे आहेत असा प्रचार या संतानी केला.

स्वातंत्र्यपूर्व काळ : इंग्रजांची सत्ता भारतात प्रस्थापित झाल्यानंतर जातिभेद नष्ट करण्याच्या संदर्भात विशेष महत्वाच्या घटना घडल्या इंग्रजी शिक्षणामूळे सुशिक्षित लोकांना पाश्चात्य समाजातील विचारांचा परिचय झाला. स्वातंत्र, समता, बंधुत्व आणि न्याय या पाश्चात्य विचारसरणीचा भारतीय लोकांवर फार मोठा प्रभाव पडला राजा राममोहन रॉय, केशवचंद्रसेन इत्यादी सुधारकांनी जातिव्यवस्थेला विरोध केला. सामाजिक क्रांतीचे अग्रदूत जोतीराव फूले यांनी जातीप्रथेला हादरा देण्याचे ऐतिहासिक कार्य केले.

- १ जानेवारी १८४८ मध्ये जोतीराव फूले यांनी शुद्रातिशुद्रांच्या मुलींची पहिली शाळा, पुणे येथे सुरु केली.
- २४ सप्टेंबर १८७३ मध्ये फूले यांनी 'सत्यशोधक समाजाची' स्थापणा करुन अस्पुश्यता, जातीप्रथ नष्ट करणे, धार्मिक अंधश्रध्दा दूर करणे इत्यादी कार्य केले.
- स्वामी दयानंद सरस्वती यांनी १० एप्रिल १८७५ ला आर्य समाजाची स्थापना करुन जातीभेद दूर करण्याचा प्रयत्न केला.
- १८५० मध्ये ब्रिटिश शासनाने विवाहातील जातीबंधन निर्मूलनाचा कायदा केला.
- शाहू महाराजांनी २६ जुलै १६०२ मध्ये एक वटहुकूम काढून मागासलेल्या जातीसाठी ५० टक्के जागा राखीव ठेवण्याची क्रांतीकारक घोषणा केली.
- १६१७ मध्ये कॉग्रेसने अस्पृश्यता नष्ट करण्याबाबतचा ठराव पास केला.
- महात्मा गांधींनी अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यक्रमाला अग्रक्रम दिला होता.
- महर्षी शिंदे यांनी 'दलित वर्ग मिशन' ची स्थापना करुन अस्पृश्यता आणि जातीभेद निवारण्याचे कार्य केले.

स्वातंत्र्योत्तर काळ : विषमतेवर आधारीत जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता नष्ट करण्याच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतिशय महत्वाचे आहे. जोपर्यंत भारतातील जातिभेद आणि अस्पृश्यता नष्ट होत नाही तोपर्यंत भारतीय समाजाची प्रगती होऊ शकत नाही. ही गोष्ट लक्षात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर जातीव्यवस्था आणि अस्पृश्यतेच्या विरुध्द आपली सामाजिक, राजकीय चळवळ, उभी केली. दलितांना त्यांचे हक्क भीक मागून मिळणार नाही ते लढूनच मिळवावे लागतील, या उद्देशांनी त्यांनी २० मार्च १६२७ ला महाड येथील चवदार तळयावर पाणी भरण्याचा हक्क मिळावा म्हणून सत्याग्रह केला.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर देशाची राज्यघटना तयार करण्यात आली. भारतीय राज्यघटनेत स्वातंत्र, समता, बंधुत्व आणि न्यायाचे तत्व मान्य करुन जातीव्यवथ्येच्या आधारावर निर्माण झालेली विषमता दूर करण्याच्या दृष्टीने विशेष व्यवस्था करण्यात आली.

राज्यघटनेच्या कलम १५ नुसार सर्वांना समान लेखण्यात आले. राज्य कोणत्याही नागरीकाविरुध्द कोणताही धर्म, वंश, जाती, लिंग, जन्मस्थान यापैकी कोणत्याही आधारावर भेदभाव करणार नाही. तसेच सर्वांना समान अधिकार देण्यात आले.
कलम १६ नुसार राज्याधीन नोकऱ्या किंवा पदावर नियूक्ती बाबत सर्व नागरीकांना समान अधिकार देण्यात आले.
कलम १७ नुसार जातीव्यवस्थेतून निर्माण झालेली अस्पृश्यता नष्ट करण्यात आली.
कलम १६ नुसार राज्यनिधीवर चालणाऱ्या किंवा राज्याद्वारा मदत मिळणाऱ्या शिक्षण संस्थेत कोणत्याही नागरीकास धर्म, वंश, जाती, भाषा इत्यादी आधारावर प्रवेश नाकारल्या जात नाही.
अश्याप्रकारे भारतीय राज्यघटनेने जातीच्या आधारावर निर्माण झालेली विषमता नष्ट करण्याच्या संदर्भात अनेक तरतूदी केल्यात.
१) वैधानिक व कायदेषीर उपाययोजना :
२) राजकीय उपाययोजना व मंत्रीमंडळात प्रतिनिधीत्वः
३) आरक्षणाचे धोरण :
४) शैक्षणिक विकासाच्या उपाययोजना :
५) आर्थिक विकासाच्या उपाययोजना :

संदर्भ सूची

१. आगलावे प्रदीप, 'संशोधन पद्धतिशास्त्र व तंत्र', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००८
२. आपटे डी. पी.,'सामाजिक आर्थीक पाहणीचे तंत्र' समाजप्रबोधन संस्था, पुणे २०००
३. आगलावे डॉ. सरोज, 'ज्योतिराव फुले : सामाजिक तत्त्वज्ञान', सुगावा प्रकाशन, पुणे ३०, २००४
४. आमोद, 'राज्य आणि केंद्र शासनाच्या विविध विकास योजना आणि आर्थिक विकास महामंडळे' आमोद प्रकाशन, मुंबई. पहिली आवृत्ती १ जून २०१०
५. कविमंडल डॉ. विजय, 'विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन' मंगेश प्रकाशन, नागपूर १९९९
६. खडसे प्रा. भा. की.,'भारतीय सामाजिक समस्या' पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर, २०००
७. गायधनी र. ना., 'प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास', कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे,१९५५
८. गोखले शरदचंद्र, 'सामाजिक विकासाची नवी दिशा' साधना प्रकाषन पुणे, १९८८
९. पाटील शरद, 'दास शूद्रांची गुलामगिरी खंड १', प्रकाशन, वाई जि. सातारा, २००३
१०. बोबडे डॉ. प्रकाश, 'भारतीय समाजरचना, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर. १९९८
११. लोटे रा. ज., शासन आणि राजकारण', पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर, २००४
१२. लोटे रा. ज., 'भारतीय समाज आणि सामाजिक समस्या' पिंपळापुरे पब्लिशर्रस, नागपूर २००३
१३. सागर के., 'अस्सा हा भारत' के. सागर पब्लिकेशन पुणे, २००६
१४. सागर के., 'अस्सा हा महाराष्ट्र' के. सागर पब्लिकेशन पुणे, २००६

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# स्त्री भ्रूण हत्या — कारणे व उपाय : एक अभ्यास

**प्रा.डॉ.रोहिणी दि. मेश्राम**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आर्वी जि.वर्धा
मो.९०२८२२७४१६ ,rohini.d.meshram@gmail.com

**सारांश**

भारत हा संस्कृतीप्रधान देश असला तरी येथे पितृसत्ताक पध्दतीमुळे स्त्री पुरुष भेद कायमच मतभेदाचा प्रश्न राहला आहे. स्त्री पुरुष लिंग भेदामुळे असलेल्या अनेक समस्यातील एक हृदयद्रावक वेदना असलेली समस्या म्हणजे 'स्त्री—भ्रूण हत्या' होय. आधुनिक तंत्रज्ञान—विज्ञानातील शोध यामुळे गर्भलिंग तपासणे. गर्भपात करणे, कमी वेळात कमी त्रासात सहज शक्य झाल्याने भारतातील स्त्रियांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत अधिक वेगाने घटत आहे. स्त्री भ्रूण हत्येची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक तसेच काही मानवीय कारणे आहेत. स्त्री भ्रूण हत्या संदर्भाात समाजाचा दृष्टीकोन बदलण्याची गरज आहे. तसेच स्त्रियांना सक्षम करणे, लिंगभाव दूर करणे, शासकीय तरतूदींचा योग्य उपयोग करणे, कन्या भ्रूण हत्येच्या दुष्परिणामावर जाणीव जागृती करणे आणि कायद्याची कडक अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

प्रस्तुत शोधनिंबधामध्ये स्त्री भ्रूण हत्येची कारणे व त्यावरील उपाय यावर दृष्टीक्षेप टाकला आहे.

**मुख्य शब्द** : स्त्री भ्रूण हत्या

**प्रास्ताविक** :

आज आपण २१ व्या शतकात अती उत्क्रांत अशा सहजीवनात जगतांना स्त्री पुरुष लिंग भेदामुळे असलेल्या अनेक समस्यातील एक हृदयद्रावक वेदना असलेली समस्या म्हणजे 'स्त्री—भ्रूण हत्या' होय.भौतिकवादी जगात स्त्रिची किंमत देखील आर्थिक मूल्यांत केली जाते. मुलीचे पालनपोषण करावे लागणार, शिक्षणाला पैसा खर्च करुन हुंडा सुध्दा द्यावा लागणार. हुंडा देऊन ही समाधान नाही झाले तर हुंडाबळी, अत्याचार, अन्याय होणार अशा या अनिष्ट प्रथांना सामोरे जाण्यापेक्षा मुलीचा जन्म होण्यापूर्वीच गर्भपात करुन स्त्री भ्रुण हत्या केली जाते. आधुनिक तंत्रज्ञान—विज्ञान शोध यामुळे गर्भलिंग तपासणे, गर्भपात करणे कमी वेळात कमी त्रासात सहज शक्य झाल्याने भारतातील स्त्रियांचे पुरुषांच्या तुलनेत घटणारे प्रमाण अधिक वेगाने घटत आहे.

युरोप व उत्तर अमेरिकेत स्त्री—पुरुष प्रमाण जवळजवळ सारखेच आहे. मग भारतातच महिलांचे प्रमाण सारखे का नाही. स्वातंत्र्यानंतर स्त्री—पुरुष समानता या संदर्भात मूल्याला महत्व दिले गेले असूनही स्त्री पुरुष प्रमाणात सारखी घट होतांना दिसते. १९५१ मध्ये ९४६, १९८१ मध्ये ९३४, १९९१ मध्ये ९२७ तर २०११ मध्ये ९०६ असे कमी होतांना प्रकर्षाने दिसते. दरवर्षी १.२ कोटी मुली जन्माला येतात. त्यापैकी १५ व्या वाढदिवसाच्या आधीच ३० लाख मुली काहीना काही कारणांनी मृत्युमुखी पडतात. भारतात पुरुषांच्या तुलनेत ९०६ महिला आहेत. भारतातील घटकराज्यात वेगवेगळी परिस्थिती आहे. घटकराज्यातील सामाजिक, शैक्षणिक परिस्थितीचा परिणाम संख्या प्रमाणावर झालेला दिसतो. बिहार, राजस्थान, उत्तर प्रदेश येथे पुरुषांच्या तुलनेत महिलांचे प्रमाण ६०० पर्यंत घसरलेले दिसते. जुन्या रुढी परंपराचा प्रभाव अधिक असल्यामुळे तेथे भ्रूण हत्या, बालहत्या, गर्भजलपरीक्षा, हुंडा पद्धती, हुंडा बळी यांचे प्रमाण अधिक असलेले दिसते. इंडियन मेडिकल असोसिएशन व युनिसेफ यांच्या मताने निरक्षरता, हुंडा प्रथा या दोन प्रमुख कारणांमुळे मुलींना वाढविणे हे पालकांना मोठे ओझे वाटते. यावरुन असे म्हणता येईल की भारतात स्त्री भ्रूण हत्या ही दिवसेंदिवस उग्र रुप धारण करीत आहे वेळीच त्यावर कडक शिस्तीने उपाय करणे काळाची गरज आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टये** :

प्रस्तुत शोधनिबंधाची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

१. स्त्री भ्रूण हत्येची पार्श्वभूमीवरदृष्टीक्षेप टाकणे
२.स्त्री भ्रूण हत्येची कारणांचा अभ्यास करणे.

३.स्त्री भ्रूण हत्या कमी करण्यासाठी उपाययोजना अभ्यासणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंध हा स्त्री भ्रूण हत्येची कारणे व त्यावरील उपाय यावर लक्ष केंद्रीत करतो. सदर शोधनिबंध हा वर्णनात्मक पध्दतीने लिहिला असून त्याकरिता व्दितीय तथ्य संकलन पध्दतीव्दारे माहिती गोळा करुन विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे. याकरिता स्त्री भ्रूण हत्या या समस्येंवरील ग्रंथ व पुस्तके, शोधनिबंध, संकेतस्थळावरील माहिती इत्यादींचा उपयोग केला आहे.

**स्त्री भ्रूण हत्येची कारणे :**

संशोधन, सर्वेक्षण, जनगणना अहवाल. यू.एन.डी.पी.चा रिपोर्ट, ब्रिटीश मेडिकल जर्नल, स्त्री–पुरुष, मेडिकल असोसिएशन या सर्वांच्या पुराव्यांवरुन एक निश्चित आहे की, स्त्री – पुरुष यांच्या संख्येत असमतोल निर्माण झाला आहे . असमतोल निर्माण होण्यामागे अनेक कारणे आहेत. त्यापैकी स्त्री – भ्रूण हत्या हे एक आहे. स्त्री भ्रूण हत्या होण्यामागे अनेक कारणे आहेत.

**१. सांस्कृतिक कारणे :**

भारतीय संस्कृतीत आद्यदेवता म्हणून स्त्री लिंगाची पुजा केली जात असली तरी मातृदेवो भव: आईला वंदनीय मानले जाते. पनि देवो भव: कुठेच म्हटले जात नाही. स्त्री जन्माची खरी अवहेलना लग्नानंतरच अधिक होते. पत्नी, मुलगी व सुन, वहिनी म्हणून तिचे स्थान निम्नस्तरावर समजले जात असून ही सांस्कृतिक स्थिती आहे.

**२. सामाजिक कारणे :**

स्त्री–भ्रूण हत्या होण्यामागे काही सामाजिक कारणे आहेत. उदा. पुरुषप्रधान सामाजिक व्यवस्था, पुरुषप्रधान मानसिकता, पारंपारिक विचारधारा, कुटुंबातील महिलांचे दुय्यम स्थान, विवाहसंस्थेचे दोष, विवाह संस्थेतील अनिष्ठ रुढी, प्रथा, हुंडा पद्धती, निरक्षरता इत्यादी अनेक कारणांमुळे अनेक मुलींचा जन्म एकाच घरात होणे नाकारले जाते.

**३. आर्थिक कारणे :**

आर्थिक दुर्बलता, गरीबी यामुळे मुलीचे शिक्षण, संगोपन, आरोग्य याकडे दुर्लक्ष केले जाते. शेवटी खर्च करुन हाती काय लागणार ? मुलगी शेवटी दुसरीकडे जाणार, 'बेटी तो पराया धन' असे आजही म्हटले जाते. अशी मानसिकता असल्यामुळे देखील भौतिकवादी जगात मुलगी ही मूल्यहीन समजली जाते व स्त्री भ्रूण हत्या होते.

**४. धार्मिक कारणे :**

अनेक धर्माच्या तत्त्वात महिलांना मालमत्तेचा हक्क नाकारला आहे. पुनर्विवाह बंदी, शिक्षणास बंदी, पडदा पद्धती यामुळे महिलांचे नैसर्गिक हक्क डावलले गेले. महिलांना मिळालेला दुय्यम दर्जा यामुळे जीवनात त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.वैदिक काळातील मनु विचारधारा व स्त्रिला दिलेले स्थान यापेक्षा बौद्धकाळात स्त्रियांचा गौरव केल्यामुळे त्या काळातील स्त्री जीवन गौरवशाली बनले होते.

**५. पितृसत्ताक कुटुंबपध्दती :**

पितृसत्ताक कुटुंब पध्दतीमध्ये कुटूंबावर सर्वस्वी वर्चस्व हे पुरुषाचे असते. त्यांच्या सल्ल्यानेच घर चालावे, कुटुंबातील सदस्यसंख्या ठरावी. अपत्याचे लिंग ठरावे असे आढळून येते. एक मुलगी असली तर चालेल पण दुसरी मात्र नकोच आणि त्यामुळेच महिलावर स्त्रिचा गर्भ पाडण्यासाठी पुरुषाकडून , सासू सासरे यांचे कडून जबरदस्ती होत असते.

**६. समाजातील अनिष्ठ रुढी परंपरा परंपरा :**

समाजामध्ये मुलीसाठी अधिक दृढ रुढी प्रचलित आहेत. तिच्या शिक्षणावर कराव लागणारा खर्च, लग्नात द्यावा लागणारा गलेलठ्ठ हुंडा, कन्यादान यासर्व कारणामुळे मुलगी नकोशी वाटते. लग्नाच्या वेळी लाखो रुपये खर्च करण्यापेक्षा काही हजार रुपयात स्त्रीभ्रूण हत्या करणे निर्दयी लोकांना अधिक सोयीचे वाटते.

**७. अशिक्षितपणा व अज्ञान :**

लिंगभेदाबाबत असणा–या अशिक्षितपणामुळे आणि अज्ञानामुळे स्त्री भ्रूण हत्या वाढत आहे. शिक्षीत होणे केवळ औपचारिक शिक्षण असणे नाही. कारण मुलींची संख्या ज्या राज्यामध्ये सातत्याने कमी होतांना दिसते ती सुधारीत राज्यात आहे. शहरी भागात स्त्री भ्रूण हत्येचे प्रमाण

ISSN : 2278-9308
July 2021

अधीक आहे. २०११ च्या राज्यनिहाय संख्येवरुन हे दिसून येते. महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्हयात स्त्रीभ्रूण हत्या अधिक तर गडचिरोली सारख्या आदिवासी भागात हे प्रमाण अत्यल्प आहे. यावरुन असे दिसते की, साक्षरतेच्या दरात वाढझाली परंतू मुलींच्या प्रमाणात मात्र घट झाली आहे.

**८. वंशाचा दिवा म्हणून मुलाकडे पाहण्याचा दृष्टीकोन :**

आपला वंश पुढे न्यायचा असेल तर तो फक्त मुलगाच नेवू शकतो ही मानसिकता आजही समाजात. दिसून येते. मुलगा हा कुटुंबाचा अविभाज्य घटक आहे. असेच समाजातील अधिकाधिक लोकांचा समज आहे. तर मुलगी परक्याचे धन असा तिच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन आहे. असे समाजात आलेल्या अनेक अनुभवावरुन दिसून येते. स्त्रियांच्या क्षमतेवर अविश्वास स्त्रिया या शाळेच्या व उपभोग्य वस्तु आहे असा गैरसमज समाजात प्रचलीत आहे. स्त्रिया मजोर असतात त्या घराबाहेर जावून काहीही करु शकत नाही त्यांना नेहमीच असक्षम, लाचार, अबला ठरविण्यात आले आहे.

**९. स्त्रियांची सोशीक व सहनशील वृत्ती :**

स्त्रिया स्वत:ला अनेकदा कमजोर, दुय्यम समजतात तसेच कोमलतेचं व सहनशिलतेचे प्रतिक मानतात. त्यांच्यावरील अन्याय अत्याचाराच्या संबंधात आवाज न उठवता त्या बळी पडतात. अनेकदा आपल्यावर अन्याय होत आहे याची जाणीवही त्यांना होत नाही. आर्थिक परावलंबन जन्माला आल्यावर पित्याच्या, लग्नानंतर नव—याच्या आणि म्हातारपणी मुलांच्या असे स्त्रीला आयुष्यभर कुणाच्यातरी बंधनातच राहवे लागते.

**१०.गर्भलिंग निदान ;सोनोग्राफीद्ध केंद्राचा वाढता प्रसार :**

विज्ञानाचा उपयोग अनुकूल व प्रतिकूल अशा दोन्ही होतांना दिसून येतो. शहरी आणि तालुक्याच्या ठिकाणी सोनोग्राफी केंद्र उघडत आहेत. तसेच शहरात तर सोनोग्राफी केंद्राचा सुळसुळाटच आहे. गर्भातील बाळाची वाढ आणि विकास इत्यादी तपासण्याच्या ऐवजी गर्भातील भ्रूण हे मुलगा की मुलगी यासाठीच सोनाग्राफी केंद्राचा वापर अधिक होऊ लागला आहे.

**११.कायद्याची अयोग्य अंमलबजावणी :**

अल्ट्रासाऊंट यंत्राद्वारे करण्यात येणाऱ्या लिंग परिक्षणास कायद्याने बंदी आणली तरी समाजात सर्वच स्तरात स्त्रीभ्रूण हत्येचे प्रचलन सुरुच आहे. सदर कायदा द प्री नेटल डायग्रोस्टिक्स टेकनिक ॲक्ट — पी.एन.डी.टी. ॲक्ट म्हणून ओळखला जातो. १९९४ मध्ये हा मंजूर झाला या कायद्याची योग्य अंमलबजावणी होतांना दिसत नाही. वैद्यकिय गर्भपात कायदा १९७१ चा आधार घेवून डॉक्टर राजरोजपणे स्त्रीभ्रूण हत्या करीत आहेत.

**स्त्री भ्रूण हत्या कमी करण्यासाठी उपाययोजना :**

**१.लिंगभाव दूर करणे**

समाजात स्त्रीपुरुष समानतेच्या केवळ गप्पाच न राहता २१ व्या शतकात कृतीशील समानता आपणास दाखवून देणे ही आज काळाची गरज आहे. कुटूंबात अंतर्गत लिंग भाव समानतेचा आग्रह धरला पाहिजे. मुलगा मुलगी समान आहेत, लिंग विषम अमानवीय आहे . अपत्यसंकल्पना जनमानसात रुजविने आवश्यक आहे.

**२.समाजाचा दृष्टीकोन बदलण्याची गरज**

समाज केवळ भोगवादी दृष्टीनेच स्त्रिकडे बघतो तसेच तिच्या कामाचे मुल्य नसते म्हणून हा दृष्टीकोनच मुळात बदलला पाहिजे. पुरुषाप्रमाणेच स्त्री देखील मानव आहे आणि तिच्या अधिकाराची पायमल्ली होणार नाही याची जाणीव समाजकंटकांना कडून होण्याची गरज आहे. यासाठी सर्वानीच आपापल्या ठिकाणी हे काम करावे. जेणे करुन स्त्रियाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलेल.

**३.स्त्रीयांना सक्षम करणे :**

केवळ आर्थीक दृष्टया सक्षम होवून चालणार नाही तर त्यांनी देखील स्वत:ला कोमल, नाजूक असे समजून नये . स्वत:कडे सक्षम आणि इतरांना सक्षम करणे या दृष्टिने बघीतले पाहिजे. ज्या पुरुषाला स्त्री जन्माला घालते तो सक्षम मग ती असक्षम कशी ? हा प्रश्न तीने वारंवार स्वत:च्या मुलींना मानसीक शारीरीक, आर्थिक आणि वैचारीक दृष्टिने सक्षम करावे की तु कमजोर नाही , तर पुरुषांसारखीच खंबीर आहे. तु अबला नाही तर सबला आहे हे आईला पटवून द्यावे. अशा प्रकारे

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

तिची जडण घडण करावी, सामाजिक स्तरावर संदर्भात सुध्दा विचार करावा अशी कृतिशीलता दाखविणे गरजेचे आहे.

**४.शासकीय तरतूदी :**

स्त्री भ्रुण हत्या संदर्भात जाणीव जागृती व्हावी म्हणून सरकारने अंगणवाडी शिक्षीका, आरोग्यसेवीका, शिक्षक आणि समाजातील प्रमुख व्यक्ती यांच्या कार्यशाळा घ्याव्यात एका मुलीवर तसेच दोन मुलीवर कुटूंब नियोजन करणा—या दाम्पत्यांना शासनाकडून चांगल्या प्रतिचे प्रोत्साहन द्यावे. प्रचार व प्रसार करावा. योजनांचा लाभ घेण्याची प्रक्रिया सोपी सुटसुटीत असावा. जेनेकरुन लाभ घेणा—यांना सोईचे होईल. अन्यथा इतर शासकीय योजनासारख्या याही योजना कागदोपत्रीच राहतील.

**५.कन्या भ्रूण हत्येच्या दुष्पपरिणामावर जाणीव जागृती करणे**

निसर्ग नियमाचे उल्लंघन न करता संतूलित, सुदृढ समाजव्यवस्थेसाठी समाजात स्त्री पुरुष दोघांचाही सारखीच गरज आहे. तसे न राहिल्यास निसर्गाचा समतोल ढासळून अनेक गंभीर, सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागेल. समाजात विदारक चित्र निर्माण होईल. हिंसाचार वाढेल, अत्याचाराचे प्रमाण वाढेल, असे होवू नये म्हणून या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे, डॉक्टरांचे, गरोदर माता, त्यांचे पती सासु सासरे यांचे शिबीर घेवून हे पटवून देणे आवश्यक आहे.

**६.युवा वर्गात जागृती**

युवक युवती दोघांचाही समावेश आहे. या दोघांनाही स्त्री पुरुष समानता, लिंगभेदाचे वाईट परिणाम यासारख्या विषयांवर माध्यमांनी प्रशिक्षणाद्वारे, शिबीर घेवून माहिती द्यावी त्याची या संदर्भातील समज वाढविण्यासाठी आणि ती तपासण्यासाठी, त्यातून इतरांना प्रेरणा मिळण्यासाठी या विषयावरील चित्रफिती, डाक्युमेंट्री फिल्म, मासिकातील लेख वाचन, तज्ञ व्यक्तीचे व्याख्यान, नाटक, पथनाट्य परिसंवाद, वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, पपेट शो, स्लोगन स्पर्धा अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करावे.

**७.स्वयंसेवी संस्थांची भूमीका :**

स्वयंसेवी संस्था या नविन समाज घडविण्याचे काम अशी समाजात त्यांची ओळख आहे . त्यांनी त्यांच्या विषयीच्या या समजाला अधिक दृढ करण्यासाठी या विषयाच्या संदर्भात संवेदनशील, कृतीशील व्हावे. मुलींच्या जीवन जगण्याच्या अधिकाराचेच जिथे हणण होत आहे तिथे या विषयावर आपले लक्ष केंद्रीत करुन कामाची दिशा ठरविल्यास नवा समाज निर्मितीसाठी स्वंयसेवी संस्था संजीवनीच ठरतील असा विश्वास वाटतो.

**८. प्रसार माध्यमांची भूमीका**

स्त्री भ्रूण हत्येचा मुद्दा हा केवळ स्त्रियांचा किंवा एका कुटंबाचा प्रश्न नसून तो समाजाचा सामाजिक प्रश्न आहे. त्याचा समाजावर विपरीत परिणाम होतो. जनमानसात रुजवण्यासाठी त्यांच्या मनात बिंबविण्यासाठी प्रसार माध्यमांची भूमीका आणि सहकार्य आवश्यक आहे.

**९.कायद्याची अंमलबजावणी**

भारतात विविध विषयांवर अनेक कायदे अस्तित्वात आहे. जोपर्यत कायद्याची अंमलबजावनी प्रभावीपणे प्रमाणीकपणे होत नाही तोपर्यंत कायद्याचा प्रभाव आणि परिणाम दिसून येत आहे. स्त्री भ्रूण हत्या रोखण्यासाठी पोलीस आणि न्यायपालिकेची भूमीका महत्वपूर्ण आहे. कायद्याची अंमलबजावणी प्रामाणीकपणे होण्यासाठभ निकोप, सक्रिय संबोदनशील, कर्तव्यदक्ष मानसिकतेची गरज आहे. डॉक्टर्स विशेष करुन महिला डॉक्टर्सनी याची दखल घ्यावी, पी.एन.डी.टी. कायदा प्रत्यक्षात अंमलात आणण्याचे कामच पडणार नाही अशी कृती करावी.

**निष्कर्ष :**

स्त्री भ्रूण हत्या ही एक समाजाला लागलेली कींड किंवा कलंक आहे. या समाजातील कुप्रथेला समाप्त करण्यासाठी आणि समाजातील लोकांचा दृष्टीकोन बदलण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. स्त्री भ्रूण हत्या या प्रथेला रोखण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. स्त्री भ्रूण हत्या या प्रथेला रोखण्यासाठी फक्त सरकारललाच कायदे बनवून चालणार नाही तर त्याबरोबर प्रत्येक व्यक्तीने स्त्री भ्रूण हत्या विरोधी लढा दयायला हवा. स्त्री पुरुष प्रमाणातील असमतोलामुळे कौटुंबिक हानी, सामाजिक हानी व राष्ट्रीय विकासात देखील अडथळा निर्माण करणारी बाब आहे. उज्ज्वल

भवितव्याला बांध घालणारी परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वीच योग्य दिशेने मार्ग काढले तर आव्हानाला तोंड देता येईल त्यासाठी आपली सामाजिक मूल्य बदलायला हवी.

**संदर्भ**

1. Introduction. In: T. PATEL., ed., *Sex Selective Abortion in India: Gender, Society and New Reproductive Technologies,* pp.27-58. New Delhi: Sage Publications
2. Female-Selective Abortion in Asia: Patterns, Policies, and Debates. *American Anthropologist* 103 (4): 1083-1095
3. Fighting Female Foeticide: Growing Greed and Shrinking Child Sex Ratio. Economic and Political Weekly 36 (36): 3427-3429.
4. N-S-S- Manual on Women's development and Gender Justice ' Published by Brijesh Printer's Punjab]
5. समाज आणि महिला लेखक डॉ. निलम गो—हे, प्रकाशक—अरुण जाखडे, प्रश्नगंध प्रकाशन, पुणे.
6. भगवान बुद्ध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री श लेखक—प्रा.सुशिला मुल जाधव, कौशल्य प्रकाशन
7. कुरुक्षेत्र— सप्टेंबर २००६
8. स्त्री—प्रश्नांची वाटचाल—विद्युत भागवत, प्रतिमा प्रकाशन.
9. भ्रूण हत्या और महिलाये मंजू गुप्ता, सुभाषचंद्र गुप्ता
10. महिला विकास एक परिदृश्य रू स्वप्नील सारस्वत
11. महिला सशक्तीकरण रमा शर्मा एम के.शर्मा
12. डंदनंस वद ॅवउमदश्े क्मअमसवचउमदज ंदक ळमदकमत श्रनेजपबम — तंपदनां क्हंत

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# पोवारी साहित्याचे व्यासंगी-डॉ.ज्ञानेश्वर टेंभरे: व्यक्ती व वाङ्मय

प्रा.डॉ. रामलाल चौधरी
मराठी विभाग प्रमुख,कला व वाणिज्य पदवी महाविद्यालय, जवाहर नगर, भंडारा.
drramrupchaudhari@gmail.com Mob: 7798145373

व्यक्ती परिचयः-(अत्यल्प)

डॉ.ज्ञानेश्वर टेंभरे हे तत्कालीन नागपूर विद्यापीठ, नागपूर सद्याचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे सन 1973 ते 2004 या कालावधीत प्राणीशास्त्र विभागात विभागप्रमुख, अधिष्ठाता, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद, विद्वत परिषद विधीसभा सदस्य अशा अधिकारीक पदांना विभूषीत केले आहे. आपण घेतलेला वसा सांभाळत असता विद्या दानाबरोबर विद्यार्जन करण्याची त्यांची लालसा अधिकच लालांवित होत गेली. त्याकरिताच त्यांनी जर्मनी, स्वीजरलॅंड, अमेरिका आणि इंडोनेसिया इत्यादी देशांचाशैक्षणिक, संशोधनपर दौरा केला आहे. त्यांची संशोधनवृत्ती आणि वाचनाची गोडी या गुणांमुळेच आपल्या प्राध्यापकीय सेवाकाळात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय शोध पत्रिकेत एकूण ऐंशीशोध निबंध प्रकाशित केले आहेत. त्याशिवाय पाच जीवविज्ञान शास्त्रावर ग्रंथ उपलब्ध आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण एकेवीस विद्यार्थ्यांन्ना आचार्य पदवी प्राप्त झालेली आहे. मानसावर समाजाचे काही देणे असते आणि त्याची परत फेड करायची असेल तर जमेल त्या अंगाने ती करायला पाहिजेत. हा सेवा भाव मनात ठेवून सामाजिक क्षेत्रात फार मोठे योगदान केले असून ते अविरत चालू आहेत. पोवार समाज संगठन, नागपूरचे ते प्रबंधक अध्यक्ष होते. राष्ट्रीय क्षत्रिय महासभेचे ते अध्यक्ष होते. राष्ट्रीय पवारी साहित्य कला संस्कृती मंडळाचे अध्यक्ष पदही त्यांनी भूषविले आहे. पवार संदेश, पवारी वार्षिक पत्रिका, पवार समाज दर्शन, न्यूजलेटर इत्यादी वार्षिक अंकाचे संस्थापक-संपादक आहेत. 'चक्रवर्ती राजा भोज', (2005) 'पवारी ज्ञानदीप'-पवारी भाषा विज्ञान व लोकसाहित्य(2011) 'गूंज उठे पवारी'-पोवारी कविता संग्रह(2017) दुर्वांकूर'-पोवारी कथा संग्रह(2019) 'हमारे महापुरुष' (2019) पोवार समाजाचे राजवंशीय पुर्वज''बुलंद करो पवारी'-आधुनिक पवारी कविता संग्रह(2020) आणि 'मोरो काव्य छंद'-संमिश्र पोवारी काव्य संग्रह(2021) इत्यादी साहित्य संपदा अल्प कालावधीत जनमानसात हृदयापर्यंत रुजले असून नव साहित्य निर्मितीचा प्रवाह निरंतर सुरु आहे, त्यावरुन त्यांच्या साहित्याची आणि समाज निष्ठेबद्दलची ओळख पटते.

ज्ञानदीपकारः- डॉ.ज्ञानेश्वर यांनी 'पवारी ज्ञानदीप' या पुस्तकात पोवार समाजावरील साहित्य व संस्कृती आणि चालीरीती या विषयीचा गहन अभ्यास करुन, क्षेत्र भेटी देऊन पोवार समाज व त्यांची बोली यावर आजपर्यंत ज्यांनी-ज्यांनी जे काही लेखन केलेले आहे, त्याचा चिकित्सक अभ्यास करुन 'पवारी ज्ञानदीप' या नावाने पुस्तक प्रसिध्द केलेली आहे. याच पुस्तकाच्या काव्यपुष्पातील एका काव्यपुष्पाच्या माध्यमाने कवी पवार समाजाचे जीवन दर्पण प्रकाशित करतो आहे. पोवार बांधव हा कसा चित्ताने शांत, आचरणाने शुध्द व व्यवहाराने नम्र असा सात्विक जीवन जगतो. तो ज्ञानी आहे तसा दानी आहे. जीवन साधे पनाने जगतो पण मनाने फार निर्मळ आहे. सोचविचारी आणि दक्षप्रभारी बरोबर दीन-दयालू आहे. एवढे असूनशुध्दा जीवन मात्र बैरागी सारखा जगतो आहे. पोवार समाज हा क्षत्रीय वर्णातील असल्यामुळे कवी या ठिकाणी अफाट शक्ती धारण करणारा, त्याच निष्ठेने ईश्वरावर श्रध्दा ठेवणारा असा कुशाग्र बुध्दीचा कर्मठ जीवन जगणारा म्हणजे कुलीन पोवार होय, असे या कवितेच्या माध्यमाने पोवार समाजाचे गौरवगीत गात आहेत.

शांत चित्त, शुध्द आचरण
नम्र व्यवहार, सात्विक जीवन
कुलीन पवार को जीवन दर्पण !!१!!
सुजान ज्ञानी, मुक्त हस्त दानी

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

निर्मल मन, साधो जीवन
कुलीन पवार को जीवन दर्पण !!२!!
सोच-बिचारी, दक्ष प्रभारी
दीन-दयालू, बैरागी जीवन
कुलीन पवार को जीवन दर्पण !!3!!
अफाट शक्ति, ईश्वर भक्ति
कुशाग्र बुध्दी, कर्मठ जीवन
कुलीन पवार को जीवन दर्पण !!४!!

ज्ञानदीपकारः-डॉ.ज्ञानेश्वर टेंभरे यांचे वाड्मय

'ज्ञानदीपकार' डॉ.ज्ञानेश्वर टेंभरे हे पोवारी साहित्य क्षेत्रात एक ख्यातनाम साहित्यीक म्हणून सुप्रसिध्द आहेत. डॉ.ज्ञानेश्वर यांनी पोवारी बोलीभाषेच्या संवर्धनासाठी अथक परिश्रम केले असून ते अविरत चालू आहेत. सरकारी तगाद्यानुसार अस्तित्व संपुष्ठात येतो की काय असी अवस्था पोवारी बोलीची झाली होती. ज्या पोवारी बोलीचा इतिहास हा हजारो वर्षापासूनचा चालत आलेला आहे. पोवारी बोली ही फक्त पोवार समाजाचीच बोलीभाषा नव्हती तर पोवार बहुल भागातील बहूसंख्यातील, बारा बलुतेदार पोवारी बोलीचा मोठया सन्मानाने आपल्या दैनंदिन व्यवहारात उपयोग करीत होते. अशा अनेकांच्या तोंडी खेळत असलेली जनमान्य पावलेली पोवारी बोली आधुनिक काळात फक्त मोजक्या आणि जुन्यापिठीतील लोकांच्या सहवासाची बोलीभाषा म्हणून राहिली होती. जिला नवसंजीवनीची नितांत गरज होती. ती नवसंजीवनी देण्याचे महत्तकार्य ज्ञानदीपकार डॉ.ज्ञानेश्वर यांनी केले.

चक्रवर्ती राजा भोज

डॉ.ज्ञानेश्वर टेंभरे यांचे पोवारी बोलीभाषेच्या संवर्धनासाठी भगीरथीय कार्य सुरु आहे. 'चक्रवर्ती राजा भोज' (2005) पोवार समाजाचे चक्रवर्ती राजा भोज यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून राजा भोज यांच्या विषयीची विस्तृत अशी माहिती उपलब्ध करुन दिली. मालवाचे चक्रवर्ती सम्राट राजा भोज यांचा जन्म ई. स. 980 असून त्यांचा राज्यकाल 1000 ते 1055 पर्यंत होता. ते महानप्रतापी,कुशल शासक,महाविद्वान,महान दानी,श्रेष्ठ कवी,परम ज्ञानी,सत्यवादी,न्यायप्रिय, सदाचारी, धार्मिक, विद्वानांचा आश्रयदाता, प्रजाप्रिय असा अद्वितीय राजा होता. त्यांनी जवळपास चौदासे विद्वांना आश्रय दिला होता. राजा भोज यांनी धारा नगरीत 'भोजशाळा', 'सरस्वती सदन'या नावाने विश्वविद्यालय सुरु केले हाते. उजैन आणि मांडू याठिकाणी विद्यालये उघडली होती. ज्यात देश-विदेशातील विद्यार्थी विद्या ग्रहणासाठी येत होते.

राजा भोज जसे पराक्रमी होते तसेच ते सदाचारी होते. त्यांची ईश्वरावर अगाढ श्रध्दा होती. त्याचे फलस्वरुप त्यांनी अनेक मंदीरांचे जीर्णोद्वार केले. "भोज ने रामेश्वर, सोमनाथ, केदारनाथ, महाकालेश्वर, रुद्र के मंदीरों का जीर्णोद्वार किया था। इसमे काश्मीर का पाप सूदन कपटेश्वर कुंड व भोपाल की भोजपुरी झील व भोजपुर का शिव मंदीर भी बनाया था।"1 याप्रमाणे भोजांनी आपल्या जीवन काळात धर्म रक्षणचे महत्वपूर्ण काम केले आहे. राजा भोज विज्ञानशास्त्राचे गहन अभ्यासक होते. त्यांनी जगविख्यात अशा"समरांगण सूत्र" या ग्रन्थात 'वायुयानशास्त्र' नावाने एकतीस क्रमांकाचा अध्याय असून त्यात विमाना बद्दलची माहिती आहे. "इस अध्याय का मूल आधार महर्षि भारद्वाज कृत "बृहदवायुयान विज्ञान" ग्रंथ है। राजा भोज ने इस अध्याय की रचना हेतु तत्कालीन 97 संदर्भ ग्रंथों की सूची दी है! उन्होंने ऋग्वेद, रामायण, महाभारत आदि में वर्णित (क्रमषः) आकाशगामी रथ, पुष्पक, शाल्व नामक विमानों का विवरण भी दिया है। राजा भोज ने "पांच-मिश्र लोह" धातु का वायुयान निर्माण के लिये उपयोग बताया है। ताकि आसमान में वायुयान को लेसर किरणे क्षति ना पहुंचा सके। इसी तरह इंधन के रुप में पारा(मरकूरी) इस्तेमाल करने का जिक्र किया गया है।"2 याप्रमाणे राजा भोज यांनी आपल्या ज्ञानकौशल्याच्या बळावर वायुयानाबद्दलची सखोल अशी माहिती नमूद करुन ठेवली आहे ज्याच्या बळावर "मुंम्बई निवासी कै. शिवशंकर बापूजी तळपदे ने वर्ष 1895 में एक वायुयान का निर्माण किया और उसे "मरुत्सखा" नाम दिया। इस

वायुयान (हवाई जहाज) को स्वयम् वैमानिक बनकर करीब 1500 फीट उँचाई तक उडाया। तत्कालिन मुंम्बईवासियों ने उनकी इस असाधारण उपलब्धि की सराहना की और बडोदा नरेश नें उन्हे पुरस्कृत कर सम्मानित किया था ऐसा विवरण बडोदा राजघराने के तत्कालिन रेकॉर्ड में मिलता है। किंतु ब्रिटीशशासन कर्ताओं ने कै. शिवशंकर तळपदे के इस अलौकिक उपलब्धि की अनदेखी की एवम् मात्र 8 वर्षो बाद इ. स. 1903 में पहला वायुयान उडाने का सेहरा राईट बन्धुओं के सिर मढ दिया।"3

पवारी ज्ञानदीप

'पवारी ज्ञानदीप' या पुस्तकाच्या रुपाने पोवार समाजाचा गौरवशाली इतिहास सांगून समाजासमोर पवारी ज्ञानाचा नंदादीपच प्रज्वलीत केला आहे. हा नंदादीप सतत तेवत राहावा त्याकरिता ते सतत, निरंतर आणि अविश्रांत अथक अशी आपली लेखनी चालवत आहेत. पवरी ज्ञानदीप या पुस्तकात पवारी बोली चे भाषाशास्त्रीय पध्दतीने अतिशय समर्पक आणि सविस्तर असे वर्णन केले गेले आहे. सोबतच याच पुस्तकात अतिप्रचलित असलेल्या लोक गीतांची रचना करुन मौखिक गीतांना मूर्तरुप दिले हे त्यांचे कार्य भाषा संवर्धनाच्या दृष्टीने फारच मोलाचे ठरले आहे. पोवारी बोलीभाषेत त्यांचे एकामागून एक असे साहित्य जन्माला येत आहेत. 'गुंज उठे पवारी', 'दुर्वांकूर','हमारे महापुरुष','बुलंद करो पवारी' अशा वेगवेगळया विषयांवरील अनेक लेख, विविध काव्य प्रकार, उद्बोधनपर कथा, अशा विविधांगी साहित्याचे धनीडॉ. ज्ञानेश्वर टेंभरे यांची लेखनशैली चतुरंगी असल्याची अनुभूती येते.

दुर्वांकुर

'दुर्वांकुर' म्ह्णजे पोवारीतील पहिला कथा संग्रह. या कथा संग्रहात अत्यंत मार्मिक आणि बोधपर अशा एकूण पंचेवीस कथांचा समावेश केला आहे."डॉ. ज्ञानेश्वर टेम्भरेजी की अनवरत साहित्य साधना का सुखद सुफल परिणाम है आपका कहानियों का यह गुलदस्ता दुर्वांकुर!..... सभी कहानियों में तारतम्यता, बोधगम्यता एवम् वाक्यविन्यास तथा भाषा शैली सरल एवम् सुगम हैं! कहानियाँ छोटी छोटी और शिक्षाप्रद हैं! इसमें से कुछ कहानियाँ ह्रुदय को छुती प्रतीत होती हैं!" अशा शब्दात प्राचार्या सुश्री अलका चौधरी (मध्य प्रदेश) दुर्वांकुरच्या प्रस्तावनेत उल्लेख करतात.पौराणिक, ऐतिहासिक, वैचारिकआणि वास्तववादी अशा वेगवेगळया विषयाला हात घालणार्या कथांचा संग्रह म्हणजे दुर्वांकुर. "बाप की किम्मत" या कथेत स्वतःला उच्च शिक्षीत समजणार्या अल्लड मुलाची कानउघाडणी एका प्रसंगातून त्याच्या कम्पनीचा मालक करतो. "एक पवार की टुरी" ही कथा स्वाभिमानाने जीवन कसे जगावे हे शिकविते. एखाद्या कम्पनीत काम करताना कसे-कसे प्रसंग येतात त्याचे जिवंत उदाहरण या कथेतून बघायला मिळते. कोणत्याही आमिषाला बळी न पडता, खम्बीरपणे परंतु नम्रतेने आपल्या वरिष्ठांची मनिषा ओळखूनआपला ठाम निर्णय सुनावण्याची किमया त्या टुरीच्या अंगी आहे. "ईमानदारीन देईस जीवनदान" ह्या कथेत ईमानदारी अजूनही शिल्लक असल्याचा दाखला दिला आहे. एका लहानशा खेडेगावातील विध्यार्थी उच्च शिक्षणासाठी नागपूर शहरात येतो, बापाने पाठविलेले पैसे काढण्यासाठी ए. टी. एम. ला जातो, पैसे काढतो, परत जातानी एटीएम मशिनच्या बाहेर पडलेल्या दोन- दोन हजारच्या नोटांवर त्याची नजर जाते. तो पडलेली दोन-दोन हजाराच्या पाच नोटा उचलतो आणि सम्बन्धीत शाखा व्यवस्थापकास सम्पर्क करुन ते पैसे होते त्यास परत करतो. ते दहा हजार रुपये एका सेवानिव्रुत्त, जेष्ठ, गरजूचे होते. जेव्हा त्यांच्या हाती गहाळ झालेले पैसे मिळतात तेव्हा त्या इसमाच्या डोळयातून अश्रुधारा सुटतात आणि त्याच्या मुखातून सहज वाक्य निघतो, "या मोरी पेंशन आय वा गई होती पर अजभी जगमा ईमानदारी बाकी से! इमानदारीन आमला जीवनदान देईस!!"4 "बदलतो परिस्थिती संग बदलनो सिखो" " काळाला पाहून झाडाला जगवा" या उक्ती प्रमाणे या कथेच्या माध्यमाने परिस्थितीनुरूप आपल्यात बदल करायला मानसाने शिकायला पाहिजेत तरच तो काळाच्या बरोबर जगू शकेल, असा आशय या कथेतून व्यक्त करतात. "आधुनिक जीवन शैली – एकटोपन" या कथेत वर्तमान काळाची, एकटेपणाची जीवन शैली विषद केली आहे. आज विभक्त कुटुम्ब पध्दती असून शुध्दा दोन- चार व्यक्ती आपापसात गप्पा – सप्पा करण्याऐवजी आपापल्या भ्रमणध्वनीच्या भ्रमातच अडकून पडलेले आहेत. "राजा भरतरी बनेव संन्यासी" सम्राट विक्रमादित्य यांचे जेष्ठ बंधू राजा भर्तुहरी राजपाट त्यागून नाथ सम्प्रदायाचा स्वीकार करतात. जीवनाची सार्थकता धनदौलत नसून अध्यात्मात आहे हे माणुन राजा भर्तुहरी संन्यासी बनतो. "सम्राट विक्रमादित्य"ईसा पूर्व 150 पहिले गंधर्वसेन पवार राजा यांना दोन राण्या होत्या. महाराणी सौम्यादेवी आणि दुसरी सरस्वती. सौम्यादेवीला विक्रमसेन तर सरस्वतीला मैनावती आणि भर्तुहरी असी दोन अपत्य झाली. भर्तुहरीने राजपाटचा त्याग केल्यानंतर विक्रमादित्य राजपाट साम्भाळतो. तेव्हापासून विक्रम

सम्वताला सुरुवात होते. सम्राट विक्रमादित्य यांच्या बद्दल एक कहनी, 'सिव्हासन बत्तीसी' म्हणून खूप प्रसिध्द आहे. सम्राट विक्रमादित्य छहात्तर वर्षा पर्यंत राज्य करतात. "गोपीचंद – मैंनावती बन्या बैरागी" मैंनावती ही नाथ भर्तुहरी व सम्राट विक्रमादित्य यांची बहीण असून बंगालचा राजा मालिकचंद यांची महाराणी होय. या राजघराण्यात जन्माला आलेला राज कुमार म्हणजे 'गोपीचंद' होय. "बेटा एक ना एक दिवस या तोरी सुंदर काया राख बननो से! मंग येकोपर काये करनको गर्व?" मुहन तु आपलो मन भगवान भक्ति मा लगाव, वोलक मोक्ष भेटे! येंन म्रुत्युलोक लक मुक्ति भेटे! तोरो मामा भरथरी उज्जैन की गादी सोड, मालवा साम्राज्य सोड, सोनोसरिखी रानीहिनला सोड बैरागी बनेव ना भगवान भक्ति मा लगेव! तसोच तु बी भगवान को मन मा बस जाय!"5 याप्रमाणे माता मैंनावतीच्या सांगण्यानुसार राजा गोपीचंद मामा भर्तुहरी सारखा राजपाटाचा त्याग करून संन्यासी बनतो."राजा भोज की एक कहानी", "राजा भोज की नम्रता" या दोन कथेच्या माध्यमाने राजा भोज यांच्या बद्दलची ऐतिहासिक माहिती सान्गतात. उज्जैनचा राजा सिंधुलराज परमार यान्च्या कुळी ईसवी सन 980 मध्य बसंत पंचमी या तिथीला बाळ जन्माला येतो, त्याचे नाव भोज ठेवण्यात येते. भोज आपल्या कार्यकाळात उज्जैनहून धारा नगरीत राजपाट स्थानांतरीत करतो. राजा भोज खूप पराक्रमी, न्यायी आणि प्रजापालक असा राजा होऊन गेला. "पवार राजा जगदेव सरिखो दानी नही" या कथेतून पवार राजा जगदेव यांची शौर्यगाथाच गायिली आहे. पवार राजा उदयादित्य यांना लक्ष्मणदेव, नरवर्मनआणि जगदेव असे तीन अपत्य होती.जगदेव हा युध्द कलेत पारंगत होता. त्यांचा विवाह टोकटोडचा राजा राजसिव्हची कन्या वीरमतीशी होतो. वीरमती शुध्दा युध्दकलेत कुशल असते. राजा जगदेव यांनीआपल्या पराक्रमाने विदर्भापर्यंत राज्य स्थापीत केले होते. नगरधन, चांदा (चंद्रपूर), भांदक (भद्रावती) आणि गढचांदुर इत्यादी क्षेत्रावर त्यांचे राज्य होते.

"साहित्य आय मानव मन-भाव बोहती धारा
जसो मानुस को मन तसो रंग सुगंध आये वोला"

बुलंद करो पवारी

गर रहे बचावनो पवारी संस्कृति
गर रहे बचावनो पवारी संस्कार
गर रहे बचावनो पवारी अस्मिता
त बुलंद करो,बुलंद करो पवारी.....।1।
गर से करनो पवारी लोकभाषा अमर
गर से ठेवनो लोकसाहित्य कला जिवंत
गर से विश्वविद्यालय मा गुंजावनो पवारी
त बुलंद करो, बुलंद करो पवारी.....।5।

बुलंद करो पवारी या आधुनिक पोवारी काव्य संग्रहात पोवार समाजाची संस्कृती, संस्कार, आणि अस्मिता टिकवून ठेवायची असेल तर पोवारी भाषेला बुलंद करावे लागेल असा आशावाद कवी व्यक्त करतात. पोवारी लोकभाषा जर अमर करावयाची असेल तर लोकसाहित्य जिवंत ठेवावे लागेल, आणि लोकसाहित्य जिवंत ठेवण्याकरिता विश्वविद्यालयातील अभ्यासक्रमात समावेश करावा लागेल. एखादया बोलीभाषेतील साहित्य विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश करायचे असेल तर त्या-त्या बोलीभाषेतील साहित्याची उपलब्धता विपूल प्रमाणात असणे गरजेचे आहे, त्याकरिता कवी, जे साहित्याच्या खाणी निर्माण करु शकतील अशा साहित्य प्रेमींना नवनवीन साहित्याच्या निर्मिती करिता आवाहन करीत आहेत. बुलंद करो पवारी या आधुनिक पोवारी काव्य संग्रहात एकूण दीडशे कवितांचा संग्रह असून जवळपास सर्वच्या सर्व कविता हया पोवारी भाषेला अधिकाधिक कशी बुलंद करता येईल हे सांगण्याचा कवीचा प्रयत्न आहे.

'हमारे महापुरुष'

हमारे महापुरुष या पुस्तकात पोवार समाजाचा प्राचिन काळापासुनचा इतिहास सांगितला असुन पोवार वंशीय राज्यकर्त्यांचा काळ, राज्य कारभार आणि साम्राज्य याविषयी ऐतिहासिक पुराव्यानिशी स्पष्ट उल्लेख केला

आहे. यात महायोगी भर्तुहरी,सम्राट विक्रमादित्य, चक्रवर्ती राजा भोजआणि महायोध्दा जगदेव पवार तसेच पोवारी बोलीची विशेषता, व्याकरणआणि इतर क्षेत्रिय बोलीभाषेचा जाणवणारा प्रभाव इत्यादीचा उल्लेख केला गेला आहे.

मोरो काव्य छंद

'मोरो काव्य छंद' या काव्य संग्रहात एकूण शम्भर कवितांचा संग्रह करण्यात आला आहे. जे साहित्याच्या रुपाने येणा-या काळात साहित्याचा भांडार भरुन काढतील. असी अभिलाषा ठेवून एकप्रकारचा संदेशच दिला आहे,असे मानायला हरकत नाही असे मला वाटते आहे. या काव्य संग्रहाचे खास वैशिष्ट्ये म्हणजे 'मन भाव प्रत कविता', 'ग्रामीण जीवन संस्कृती'चे दर्शन घडविणा-या कविता, जगावर पडलेले भयंकर असे संकट 'कोरोना' महामारी. या कोरोना रुपी राक्षसाचे उपद्रव आणि त्यावर कशाप्रकारे मानवाला मात करता येईल याचे योग्य मार्गदर्शन करताना दिसतात. मानवी जीवनाची खरी सार्थकता कशात असेल, तर ती 'अध्यात्मात' हे मान्य करावेच लागेल. करिताच कवी या काव्य संग्रहाच्या शेवटी 'अध्यात्म' या विषयाकडे वाटचाल करतात. 'मन भाव प्रत कविता' या काव्य प्रकारात एकूण सत्तेचाळीस कवितांचा समावेश करण्यात आला असून एकेवीस कवितांच्या माध्यमातून 'ग्रामीण जीवन संस्कृती'चे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. 'कोरोना' या विषयावर एकूण आठ कविता असून चौवीस कवितांच्या माध्यमाने कवी अध्यात्माबद्दलचे आपल्या मनातील भाव प्रगट करतात.

मिटावनो से दुरितइनको तिमिर
मोरो से यव आजीवन काम
फैलावनो से मोला ज्ञान प्रकाश
कसे जरन दे मोला अहोरात्

कवी 'मोरो काव्य छंद' या काव्यसंग्रहाची सुरुवातच मुळात 'दिवाबाती' या कवितेच्या रुपाने समाजाला ज्ञानरुपी प्रकाश देऊन अज्ञानाने भरलेला अंधकार नाहिसा करण्यासाठी अहोरात्र जळत राहण्याचा संकल्प करतात. कवी म्हणतो आहे,

नही चाहत मोला सूरज तारा बननो
नही चाहत मोला चांद सितारा बननो
मानुस क काम मानुस आये जो
चाहत से मोला उ मानुस बननो

कवीला अहंकाराचा वारा स्पर्शही करु शकलेला नाही. जो माणूस माणसाच्या कामात पडेल असा माणूसच बनायचा आहे. कवीचा आंतरिक भाव फार मोठा आहे, म्हणूनच माणूस बनून ते 'जीवन गीत' गातात. 'पलक', 'बुरगी माय', 'जीवन यात्रा', 'व्यथा', 'सुंदरता' अशा अनेकविध विषयातून कवी आपल्या मनातील भाव इतरांप्रती व्यक्त करतात.

कवी ग्रामीण जीवन संस्कृतीचे हुबेहुब दर्शन घडविताना दिसतात. 'मोरो गाव' या कवितेतून कवी गावखेडी आणि त्यातील जीवन संस्कृती कशाप्रकारे बदलत गेली त्याचे जीवंत दर्शन घडवितात. ते म्हणतात,

संस्कारी होतो मोरो गाव
संस्कृती नादे वहां छान
समय की पडी असी मार
बदल गयो गा मोरो गाव

परिवर्तन हा प्रकृतीचा अतुट असा नियम आहे. बदल होतोच होतो. परंतु बदल हा योग्य असाच बदल असावा असीच सर्वांची अपेक्षा असते. परंतु या ठिकाणी कवीची अपेक्षाभंग झालेली दिसते, गावखेडयातील खरी संस्कृती लोप पावत चाललेली आहे, याची खंत कवी व्यक्त करतो. कवीला जुण्या आठवणी अस्वस्थ करीत असल्याचे जाणवते.

वय दिवस गया रय गइ याद
दप्तर पाटी कलम रव्ह साथ
छडी रव्ह सब गुरुजीको हात
प्रार्थनाल् होय शाळा सुरुवात

आता फक्त त्या आठवणिंना आठवून मनात साठवून ठेवने ऐवढेच हाती उरल्याची हुरहुर कवीच्या मनात आहे.

सध्या जगात जे काहूर माजले आहे, ते म्हणजे 'कोरोना' या महामारीचे. कोरोना या राक्षसी रोगाने संपूर्ण जगाला आपल्या विळख्यात घेतले आहे याची कवीला जाण आहे. ते म्हणतात,

ज्ञान विज्ञान तकनिकी सब भई बेकार
गरुड झेप मारने वालो मानुस से लाचार
धनुस खडग ढाल तोफ बॉब मिसाईल बेकाम
एक वायरसनं कर देईस सबला हैरान

माणसाने आपल्या बुध्दिकौशल्याने अस्त्र, शस्त्राची निर्मिती केली त्याच्या बळावर युद्ध, महायुद्ध करुन माणूस माणसाचाच वैरी ठरला. परंतु आज या कोरोनाने सर्वांनाच हतास केले आहे. मानवाचे ज्ञान विज्ञान सर्वच बेजार ठरले आहे. कोरोनाने मानवाची औकात दाखवून दिली आहे.

मानवी जीवनाची खरी सार्थकता म्हणजे अध्यात्म होय. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष ही चार पुरुषार्थ याचीच साक्ष देतात. कवी या ठिकाणी काव्य छंद जोपासत असता शेवटच्या टप्यात अध्यात्माकडे वळले असल्याचे जाणवते.

जेवन नही यव यज्ञ आय, ब्रह्माग्नि मा आय आहुती

नरनारी शुध्द चित्त ल करो जेवन, तब् होय ब्रह्म सी मती

असीच कर शुध्द भावना, अर्पण करकन ब्रह्म ला

कर प्रेम ल पावन जेवन, सद्बुध्दि मिले कर्म ला

आपण जे जेवन करतो ते फक्त अन्न ग्रहण नसून ते एक पवित्र असे ब्रह्म यज्ञ आहे ज्याच्यात शुध्द भावना ठेवून अर्पण केल्याने आपल्या कर्माला सद्बुध्दी प्राप्त होत असते,असा कवीचा ठाम विश्वास आहे.

आपलो आत्मचिंतन मा, हरदम जागृत रव्हनो से!

आवत जावत सुवास मा, अंतरदृष्टि निहारनो से !!

चंचल मन ला बुध्दि विचारक, शुध्द हरदम करनो से!

निश्चय कर वृत्ति की धारा, अंतरमुखल् स्थिर करनो से!!

सहज समाधी चलत फिरत, सब कामइन मा ठेवनो से! विश्वरुप विश्वदृष्टि,अनाशक्ति ल् चाखनो से!! कवी चंचल मनाला आत्मचिंतनाने अंतरमुख होऊन विश्वदृष्टिने विश्वरुप निहारण्याचा निश्चय करतात.

संदर्भ:

1.डॉ. ज्ञानेश्वर टेम्भरे,'चक्रवर्ती राजा भोज' हमारे महापुरुष, श्री गजानन एन्टरप्राईजेस'नागपुर.

2. तत्रैव

3. तत्रैव

4. डॉ. ज्ञानेश्वर टेम्भरे,दुर्वांकुर, पवारी कहानी संग्रह, हिमालया पब्लिशिंग हाऊस.

5. तत्रैव

# सामाजिक न्याय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**डॉ. राजेश जा. काळे**
जी.एन.आझाद समाजकार्य महा.पुसद
rajkale.rk@gmail.com ,९४२२१२७५९३

प्रस्तावना -

समता, स्वातंत्र, विश्वबंधुत्व अशाप्रकारच्या शब्दांचे अर्थ शोधण्याचा प्रयत्न केला तर अनेकदा हे शब्द प्रत्यक्षात अनेक ठिकाणी पहावयास मिळत नाही. ईग्लंडमध्ये पुर्वी केवळ पुरुषांनाच मतदानाचा अधिकार होता म्हणजे येथे समता पहावयास मिळत नाही. न्याय हे पुरातन पुरातन राजकिय मुल्य आहे प्लेटो आणि ॲरीस्टॉटल पासुन याची चर्चा चालु आहे. सामाजिक न्याय म्हणजे समाजाने चांगल्या वाईट गोष्टीचे न्याय्य व रास्त वितरण करणे. समाजातील कोणीही दुसऱ्या व्यक्तीच्या वा समुहाच्या जिवनशैलीवर गैरवाजवी अतिक्रमण करु नये. सामाजिक न्याय हि संकल्पना सर्वप्रथम १५०० ते २५०० वर्षापुर्वी ज्युडाईझम, ख्रिश्चन, ईस्लाम धर्म, बौध्द धर्म, हिंदु धर्म ईत्यादिंच्या शिकवणीतुन मिळते. भारताच्या बाबतीत सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते म्हणुन जगभर ज्यांची ख्याती आहे असे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समता प्रस्तापीत करण्याकरीता अनेक प्रयत्न केलेत आज ज्या मानवाधिकाराची आपण गोष्ट करतो भारताच्या संदर्भाने चार्तुवर्ण व्यवस्था होती व एका वर्णातुन दुसऱ्या वर्णात जाण्याची मुभा नव्हती मानवाला जनु काहीही अधिकार नसतातच असा तो काळ अनेक संकटांवर मात करुन, संविधानामध्ये तश्या पध्दतीचे कायदे तयार करुन समता, बंधुता, स्वातंत्र्य यांचा संपुर्ण समाजाला परीचय करुन दिला

इ.स. पूर्व सहाव्या शतकात भारतात बुध्दांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता तत्वाचा प्रचार करून सर्व मानवांना त्यांचे सर्व हक्क मिळावे याकरिता प्रयत्न केले. अठराव्या आणि एकोणवीसाव्या शतकात मानवाधिकार संकल्पनेचा मोठया प्रमाणात विस्तार झाला. सर्वप्रथम इ. स. १२१५ च्या 'मॅग्ना कार्टा चार्टर' ला ब्रिटिष सम्राट जॉनने मान्यता दिली आणि त्यातूनच मानवी हक्क या संकल्पनेचा उदय झाला. इ.स. १६२८ चे पिटीशन ऑफ राईट इ.स. १६७८ चा बंदी प्रत्यक्षीकरण कायदा, इ.स. १७७६ च्या अमेरिकन स्वातंत्र्य युध्दाच्या घोषणेत सर्व माणसे जन्मतः समान असून त्यांना जगण्याचे स्वातंत्र्य मिळविण्याचा अधिकार दिला आहे. ते हक्क कोणालाही हिरावून घेता येणार नाहीत. अशाप्रकारे मानवी हक्काचे संरक्षण केले गेले. १० डिसेंबर १९४८ रोजी युनोच्या महासभेच्या अधिवेशनात मानवी हक्काचा जाहीरनामा स्वीकृत करून १० डिसेंबर १९५० ला ५८ राष्ट्रांनी मान्यता दिली.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात राजकिय आणि सामाजिक क्रांत्यांनी सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला क्रांतीकारक धार दिली. ऐतिहासीक दृष्टया सामाजिक न्याय हि संकल्पना अर्वाचीन आहे. मार्क्स यांनी अन्यायाची मुळे ही भेदभाव, दमन, शोषण, विषेशाधिकार या घटकांवर अवलंबुन आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जॉन रोल्स यांच्या थेअरी ऑफ जस्टीस या पुस्तकात सामाजिक न्यायाची संकल्पना मांडली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्काच्या सार्वत्रिक जाहीरनाम्यात एकूण तीस कलमे आहेत. त्यामध्ये स्वातंत्र्य आणि समानतेचा हक्क, सापेक्षतेपासून मुक्ती, व्यक्तीला जीवन, मोकळीक आणि सुरक्षेचा हक्क, गुलामगिरी व दास्यत्वापासून स्वातंत्र्यापासून स्वातंत्र्य, छळवणुक किंवा मानहानीकारक वागणुकीपासून स्वातंत्र्य, कायद्यासमोर एक व्यक्ती म्हणून अधिकृत मान्यतेचा हक्क, कायद्यासमोर एक समान योग्यतेचा हक्क, कार्यक्षम न्यायसभेमार्फत उपाय मिळविण्याचा हक्क, जुलमी कैद किंवा हद्दपारीपासून स्वातंत्र्य, न्याय सुनावणी किंवा सार्वजनिक सुनावणीचा हक्क, दोषी सिध्द होईपर्यंत निरपराध मानले जाण्याचा हक्क, एकांतात ढवळाढवळ करण्यापासून स्वातंत्र्य त्यात घर, कुटुंब व पत्रव्यवहाराचा समावेश आहे, हालचालीच्या स्वातंत्र्याचा हक्क आणि स्वतःच्या देशात घर असणचा आणि हवी तेव्हा येण्याजाण्याचा हक्क, सुरक्षित आश्रयस्थानाचा हक्क, राष्ट्रीयत्वाचा हक्क आणि ते बदलविण्याचे स्वातंत्र्य, विवाह व कुटुंबाच्या संरक्षणाचा हक्क, मालमत्तेवर मालकी असण्याचा हक्क, श्रध्दा आणि धर्मासंबंधित स्वातंत्र्य, अभिप्राय आणि माहितीचे स्वातत्र्य, शांततापूर्ण सभा आणि संगतीचा हक्क, शासनात सहभागी होण्याचा आणि मुक्त मतदानाचा हक्क तसेच सार्वजनिक सेवेला समान सवलती, सामाजिक सुरक्षिततेचा हक्क, काम करण्याचा व न्याय वेतन मिळविण्याचा हक्क, विश्रांती आणि फुरसतीचा हक्क, आरोग्य व सुस्थितीसाठी पुरेशा राहणीमानाचा हक्क, शिक्षणाचा अधिकार, जमातीच्या सांस्कृतिक जीवनात सहभागी होण्याचा हक्क,मानवी हक्काची हमी देणाऱ्या सामाजिक सुव्यवस्थेचा हक्क, व्यक्तीच्या संपूर्णव स्वतंत्र व्यक्तिगत विकासासाठी जमातीप्रती जबाबदार असल्याची आवश्यकता, राज्यापासून स्वातंत्र्य किंवा वरीलपैकी कोणत्याही हक्कामधील ढवळाढवळीपासून स्वातंत्र्य इत्यादी हक्क, अधिकार व स्वातंत्र्याचा समावेश आहे.

ISSN : 2278-9308
July 2021

भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेमधे भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्याचा उल्लेख आहे तसेच समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा देखिल उल्लेख आहे. भारतीय राज्यघटना समतेच्या तत्वाने पुर्ण भरलेली आहे.

भारतात सामाजिक, धार्मिक आणि राजकीय सुधारणा चळवळी सुरू केल्या. यातून भारतीय समाजव्यवस्थेतील सतिप्रथा, केशवपन, विधवा विवाहबंदी, अस्पृश्यता, जातिभेद, विषमता यासारख्या अनिष्ट चालीरिती दूर होवू लागल्या. महात्मा फुले यांनी अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केल्या. त्यामुळे अस्पृश्य समाजामध्ये शैक्षणिक जागृती होवू लागली.

अशाच एक अस्पृश्य गणलेल्या महार जातीत कुटुंबामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला. व्यक्तिस्वातंत्र्याची, समानतेची संकल्पना त्यांना रूजली आणि ते मानवी हक्काचे समर्थक बनले. भारतातील समाजव्यवस्थेने अस्पृश्यतेच्या नावाखाली आपलेच धर्मबांधव असलेल्या अस्पृश्यांचे सर्वांगीण मुलभूत अधिकार नाकारले होते. त्यांना गावकुसाबाहेर राहावे लागत होते. त्यांच्या सावलीचा सुध्दा विटाळ होत होता. त्यांना शिक्षणाचा, सार्वजनिक ठिकाणी वावरण्याचा अधिकार नव्हता. भारतात शिक्षण घेत असताना, नोकरी करीत असताना आपल्यामानवी हक्कांची अवहेलना होत आहे याचा बाबासाहेबांना वेळोवेळी अनुभव आला. यातूनच त्यांच्या जीवितकार्याची पायाभरणी झाली. मानवी हक्क नाकारलेल्या आपल्या दलित, पीडित बांधवांना, स्त्रीवर्गाला, शेतकरी, कामगार, वर्गाला भूमिहीन मजूर वर्गाला मानवी हक्क मिळवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आंदोलने केली ती एकप्रकारे भारतातील मानवी हक्काचीच आंदोलने होती.

'मूकनायक' हे मुखपत्र प्रकाशित करून त्यांनी मानवी हक्क नाकारणाऱ्या वर्गावर टीकास्त्र सोडले. शिक्षणाचा अधिकार हा एक मानवी अधिकार असताना सुध्दा भारतात हिंदूधर्माने आपल्याच अस्पृश्य धर्मबांधवांना शिक्षणापासून वंचित ठेवले होते. अज्ञान हे सर्व प्रकारच्या अवनतीचे मूळ कारण आहे असे महात्मा फुले यांनी सांगून ठेवले होते. अस्पृश्यांची अवनती दूर करण्यासाठी बाबासाहेबांनी इस १९२४ मध्ये बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. इस १९२७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडचा मुक्ती संग्राम सुरू केला. हिंदूधर्माने अस्पृश्य समाजाला सार्वजनिक ठिकाणी पाणी पिण्याचा मुलभूत मानवी अधिकार नाकारला होता. बाबासाहेबांनी महाडच्या चवदार तळयाचे पाणी प्राशन करून अस्पृश्य बांधवांना आपला मूलभूत मानवी हक्क मिळवून दिला. इस १९२८ महार वतने रद्द करण्यासाठी बाबासाहेंनी विधीमंडळात संघर्ष केला. त्याचप्रमाणे सायमन कमिशनसमोर साक्ष देवून अस्पृश्यांना त्यांचे राजकीय हक्क देण्याची मागणी केली. इस १९२९ मध्ये त्यांनी अस्पृश्य कामगार वर्गांना संपापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. गिरणी कामगारांची सभा घेवून त्यांना त्यांच्या अधिकार व कर्तव्याची जाणीव करून दिली. इस १९२९ मध्येच पुण्यातील पर्वती मंदिर प्रवेश सत्याग्रहाला त्यांनी समर्थन दिले. हिंदूधर्मीयांनी अस्पृश्यांना मंदिर प्रवेशाचा हक्क सुध्दा नाकारला होता. त्याविरूध्द बाबासाहेबांचे हे पाउल होते. इस १९३० मध्ये नाशिक येथे काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह सुरू करण्यात आला. इस १९३० मध्ये पहिल्या गोलमेज परिषदेत बाबासाहेबांनी अस्पृश्यांचे प्रतिनिधीत्व करून त्यांच्या प्रश्नांना जगासमोर ठेवले. त्यासाठी लंडनमध्ये त्यांनी अस्पृश्योंच्या मूलभूत हक्काची मागणी करणारा जाहीरनामा प्रकाशित केला. दुसऱ्या गोलमे परिषदेत सुध्दा त्यांनी अस्पृश्यांच्या मानवी हक्काची मागणी केली.

इस १९५६ मध्ये बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्दधम्माची दीक्षा घेतली. प्राचीन भारतात मानवी हक्कासाठी समता, स्वातंत्र्य, बंधुता या तत्वाचा स्वीकार करणारा बौध्दधर्म एकमेव धर्म होता. मानवी हक्काचे पुरस्कर्ते असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आधुनिक काळात बौध्दधम्माची दीक्षा घेवून मानवी हक्काला एक अधिष्ठान प्राप्त करून दिले. अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले संपूर्ण आयुष्य दीन दलित, अस्पृश्य, स्त्रीवर्ग, शेतकरी, शेतमजूर, कामगार, भूमिहीनांच्या मानवी हक्कासाठी व्यतित केले. त्यांचे आयुष्य म्हणजे मानवी हक्काची एक चळवळच बनले होते. त्यांच्याच चळवळी आणि संघर्षामुळे भारतातील अस्पृश्य समाज आपले अधिकार उपभोगत आहे. त्यांना एक नवी ओळख देण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे.

मंदिर प्रवेश आंदोलन जोपर्यंत आम्ही स्वतःला हिंदू म्हणवत आहोत व तुम्ही हिंदू समजत आहात तोपर्यंत देवळात जाऊन देवदर्शन घेणे हा आमचा हक्क आहे. अशी भूमिका डॉ. आंबेडकरांनी घेवून नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेशापूर्वी विदर्भातील अमरावती येथील अंबादेवी मंदिर प्रवेशचे आंदोलन भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख, गणेश आकाजी गवई, श्री पटवर्धन यांच्या सहकार्याने यशस्वी केले. पुणे येथे पार्वती मंदिर प्रवेश आणि नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश केला. दलितांनी केवळ मंदिर प्रवेशाच्या प्रश्नामध्ये गुरफटून राहू नये. उच्च शिक्षण पदव्या, नोकऱ्या आणि उपजीविका चालविण्याची उत्तम साधणे हाच अस्पृश्यांच्या उन्नतीचा खरा मार्ग आहे असे स्पष्ट केले.

वऱ्हाड प्रांतिक अस्पृश्य परिषद दि. १३ व १४ नोव्हेंबर १९२७ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख व गणेश आकाजी गवई यांनी डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली वऱ्हाड प्रांतिक अस्पृश्य परिषद भरविली. या परिषदेत दलितेतर नेते सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी शीलवान बनून अस्पृश्यतेचा कलंक पुसून टाकण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले.

ISSN : 2278-9308
July 2021

२० मार्च १९२७ रोजी आंबेडकरांनी अस्पृश्य बांधवांना सोबत घेवून महाडच्या चवदार तळयावर सत्याग्रह करून पाणी प्राशन केले. अमरावतीच्या दर्यापूर तालुक्यातील आराळा गावामध्ये अस्पृश्यांची पिण्याची पाण्याची गैरसोय होत होती. तेव्हा डिस्ट्रीक्ट कौसिलकडून इस १९२३ मध्ये बोर्डाच्या विहिरीवर पाणी भरण्याची परवानगी मिळाली. मनुस्मृती दहण मनुस्मृतीतील कायदे आणि नियमांमुळे अस्पृश्य आणि स्त्रियांचे जीवन पशूपेक्षाही निकृष्ट दर्जाचे झाले आहे म्हणुन मनुस्मृतीचे दहण केले.

पुणे करार गोलमेज परिषदेत जातीय प्रश्नांवर भारतीय प्रतिनिधींचे एकमत होवू शकले नाही. डॉ. आंबेडकरांच्या परिषदेतील मागणीनुसार अस्पृश्य वर्गाला स्वतंत्र मतदारसंघ दिला आणि सर्वसाधारण मतदार संघातही मताधिकार दिला. सनातनी हिंदूचा अस्पृश्यांप्रतीचा दृष्टीकोन बदलू शकत नाही. ते समता प्रस्थापित करू इच्छित नाही. हिंदू धर्मात अस्पृश्य समाजाचे हित रक्षण होणार नाही. उलट त्यांना नामोहरण करण्याचा प्रयत्न केला जाते. तेव्हा नाशीक जिल्हयातील येवला येथे १३ ऑक्टोबर १९३५ रोजी धर्मांतराची घोषणा केली आणि १४ ऑक्टोबर १९५६ला नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमीवर लाखो अनुयायांसह बौध्द धम्मात प्रवेश केला. याशिवाय आंबेडकरांनी जनता मूकनायक, बहिष्कृत भारत यासारखी वृत्तपत्रे चालविली. राजकीय पक्ष आणि संस्था, संघटना स्थापन केल्यात ते आहोरात्र दलित चळवळ आणि राष्ट्रहितासाठी झटत राहिले.

निष्कर्ष

धर्मांतर, चवदार तळे, काळाराम मंदिर सत्याग्रह, अमरावती येथिल अंबादेवी मंदिर प्रवेश, मनुस्मृती दहन, संविधानात नमुद कायदे, जनजागृती प्रसंगी आंदोलने यातुन सामाजिक न्याय निर्माण करण्याचा आंबेडकरांचा प्रयत्न निश्चीतच उल्लेखनिय आहे. आंबेडकरांचे कार्य केवळ बौध्द धर्मीयांसाठीच होते असे म्हणने चुकिचे ठरेल कारण समता, स्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय असाच आग्रह आंबेडकरांचा होता. स्वातंत्र्य आणि समानतेचा हक्क, सापेक्षतेपासून मुक्ती, व्यक्तीला जीवन, मोकळीक आणि सुरक्षेचा हक्क, गुलामगिरी व दास्यत्वापासून स्वातंत्र्यापासून स्वातंत्र्य, छहवणूक किंवा मानहानीकारक वागणुकीपासून स्वातंत्र्य, कायद्यासमोर एक व्यक्ती म्हणून अधिकृत मान्यतेचा हक्क, कायद्यासमोर एक समान योग्यतेचा हक्क, कार्यक्षम न्यायसभेमार्फत उपाय मिळविण्याचा हक्क. मानवी हक्क असले तरी भारताच्या बाबतीत सामाजिक न्याय आंबेडकरांमुळेच स्थापीत झाला.

संदर्भ :-

आंबेडकर बी. आर. घोडेस्वार देविदास, कॉंग्रेस आणि म. गांधींनी अस्पृश्यांप्रती काय केले ? २००१
कोसारे एच. एल., विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास, ज्ञान प्रदीप प्रकाषन, नागपूर १९९१
मस्के बी. आर. विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास, नभ प्रकाशन, अमरावती १४ एप्रिल २०१२
तेलतुंबडे, आनंद, सामाजिक न्याय आणि जागतीकीकरण, मुंबई, २००७
नरके हरी, कासारे म. ल., कांबळे एन. जी, गोडघाटे अशोक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड २०, उच्च आणि तंत्रशिक्षण विभग, महाराष्ट्र शासन, २००५
नरके हरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन २००८
शेंडे ना. रा. ग. आ. गवई व्यक्ती आणि कार्य, छाया सीने एजन्सी, अमरावती १९९३

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# आदिवासी कुमारी मातांचे समाजशास्त्रीय अध्ययन

डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे
विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था,नागपूर.
Email Id :bhujadepramila@gmail.com

**गोषवारा :**

२१ व्या शतकाकडे वाटचाल करतांना आदिवासी कुमारी मातांचे प्रश्न उग्र स्वरूप धारण करत आहेत. प्रस्तुत संशोधना करीता वर्णनात्मक विश्लेषणात्मक अध्ययन पध्दतीचा वापर करून दुय्यम तथ्य संकलन स्त्रोताचा वापर केला आहे. या संशोधना करीता वर्तमानपत्रावरील लेख आधारस्तंभ आहे. उद्देश्यपूर्ण नमुना निवड पध्दतीचा वापर केला आहे. आदिवासी कुमारी मातांच्या समस्यांची कारणे तसेच अभ्यासाअंती त्यावरील उपाययोजना मांडण्यात आल्या आहे. यातून स्त्रियांचा सर्वागीण विकास व्हावा हो हेतू आहे. हा उद्देश सफल करण्यासाठी तरूण मुले—मुली, शासन व शासकीय योजना, स्त्री संघटना, सेवाभावी संस्था, राजकीय पक्षांच्या महिला आघाडया या सर्वांचा सहभाग अपेक्षित असून समस्याची तीव्रता कमी व्हावी या करीता प्रस्तुत विषय अभ्यासाच्या हेतूने निवडला आहे.

**शब्दांकन** : आदिवासी, कुमारी माता, पुर्नवसन, चंगळवाद, संस्कृतीकरण.

**प्रस्तावना :**

आज एकविसाव्या शतकाकडे झेपावत असतांना स्त्रियांचे अत्याचाराचे प्रश्न अनुत्तरीत राहिलेले आहेत. 'स्त्री मुक्ती' या संकल्पनेचा उदय झाला व युनोने सुध्दा स्त्री दशक जाहिर करून आदिवासी स्त्रियांच्या दर्जात बदल करावयाचा तर त्यांना औपचारिक शिक्षण, स्वातंत्र्य, संधी, आरोग्य सेवा मिळाण्यात म्हणून जगभरात या विचारांना चालना दिली. आज जागतिकीकरण, चंगळवाद, प्रसार माध्यमातून दाखविली जाणारी स्त्रीची शरीर प्रतिमा यामुळे हुंडबळी, वासनांकांड, सती, बलत्कार, छेडछाड, आत्महत्या, आदिवासी कुमारी माता अशा अनेक समस्या समजून घेऊन समस्या समजून घेऊन मूळ डोळस — स्त्री विकसीत व्हावं यासाठी प्रस्तुत संशोधनाची गरज आहे. आज संबंध जगभर स्त्री मुक्ती, स्वातंत्र्याचा विचार विस्तृत होतांना स्त्रियांच्या समस्या उत्तरोत्ता वाढतच जात आहे. या समस्यावर प्रकाश टाकून कुमारी मतांच्या समस्या कमी करता येतील म्हणून प्रस्तुत विषय अभ्यासला गेला.

बदलती जीवनशैली, समाज माध्यमांचे तरूणाईवर असणारे गारूड, लैगिक शिक्षणाचा अभाव, भिन्न लिंगी आकर्षण यासह अन्य काही कारणांमुळे कुमारी माता होण्याचे प्रमाण वाढत्याचे समोर आले आहे. मुंबईच्या इंटरनॅशनल इस्टि्टयूट ऑफ पॉप्युलेशन सायन्स संस्थेच्यावतीने १५ ते १९ वयोगटातील महिलांचा जा अभ्यास झाला त्यात काही मुली माता, काही गर्भवती निद्रर्शनास आल्या. शहरी भागात ६०% तर ग्रामीण भागात १०.४% आणि आदिवासी भागात ३०.६%आहे.

**संशोधनाची गरज/आवश्यकता :**

आदिवासी क्षेत्राव कुमारी माताची स्थिती, खास करून शासनाच्या सर्व सेवा सुविधा, योजनाचा लाभ यांना मिळत असेल का? कारण कुमारी मातांची समस्या गंभीर आहे. कुमारी माता व बालमृत्यूदरच्या प्रमाणात काही घट झाली आहे का? या कुमारी मातांची काळजी कशाप्रकारे घेतली जाते? त्यांना कोणकोणत्या समस्या जाणवतात. त्यांच्या आरोग्याची स्थिती काय आहे. त्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यात यंत्रणेची भूमिका काय आहे. हे सर्व समस्या करीता प्रस्तुत संशोधन विषयांची गरज आहे.

**प्रस्तुत संशोधनाची उदिष्टे :**

१.कुमारी मातांच्या आरोग्य विषय सद्यस्थितीचा आढावा घेणे.
२.कुमारी मातांच्या समस्यांच्या कारणांचा शोध घेणे.
३.कुमारी माता पुर्नवसनात समाज, स्वंयसेवा संस्थाची भूमिका ज्ञात करणे.

**प्रस्तुत संशोधनाची गृहितकृत्ये :**

१.कुमारी मातांची आरोग्य विषयक स्थिती गंभीर असावी.
२.कुमारी मातांना विविध समस्यांना समोर जावे लागते.
३.आदिवासी भागामध्ये स्वंयसेवी संस्था, शासन यंत्रणा, समाज चिकित्सक पध्दतीने अभ्यासण्याची गरज आहे.

**कार्यात्मक व्याख्या :**

**कुमारी माता** : स्त्रीचा शारिरीक विकास पूर्ण होण्या आधीच जी स्त्री माता बनते तिला कुमारी माता म्हणून संबोधले जाते.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनामध्ये विश्लेषणात्मक वर्णनात्मक पध्दतीचा उपयोग केला आहे. प्रस्तुत संशोधनातील एकूण हे १२ पासून १८ वयोगटाखालील आदिवासी मुली राहणार आहेत.

**नमुना निवड :**

प्रस्तुत संशोधनामध्ये उद्देश्यपूर्ण नमुना निवड पध्दतीद्वारा तथ्य संकलन केले गेले आहे.

**तथ्य संकलन :**

प्रस्तुत संशोधनाकरीता द्वितीयक स्वरूपाच्या साधनामध्ये शासकीय व अशासकीय कार्यालयातील अहवाल, स्वंय सेवा संस्था अहवाल, वर्तमानपत्र, विविध संदर्भ ग्रंथ, मासिक, दैनिक वृत्त पत्र त्याच प्रमाणे संगणक प्रणालीद्वारे विविध संकेत स्थळाच्या माध्यमातून तथ्य संकलीत केले आहे.

**तथ्य विश्लेषण व निर्वचन :**

प्रस्तुत संशोधनामध्ये संकलीत तथ्यांचे वर्णनात्मक, संस्थात्मक पध्दतीने विश्लेषण करण्यात आले आहे.

**संशोधनाची व्याप्ती :**

कुमारी माता संदर्भात सद्यस्थिती संदर्भात करण्यात येणाऱ्या या संशोधनाची व्याप्ती खालील प्रमाणे राहिल. सदरील संशोधनाची भौगोलिक व्याप्ती व मर्यादा नागपूर जिल्हयापर्यंतच असणार आहे. सदरील संशोधनामध्ये तथ्य संकलनातील माहितीची विश्वसनीयता ही दुय्यम स्त्रोताद्वारा प्राप्त माहितीवर अवलंबून आहे.

**आदिवासी समुदाय :**

समाजातील मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या विशिष्ट संस्कृती, विशिष्ट राहणीमान, विशिष्ट भाषा असलेला असा हा आदिवासी समुदाया विकासापासून आजही कोसो दूर आहे. आदिवासींचा ओळखच त्यांच्या नावावरूनच होते. ते राना – वनात डोंगरात वास्तव्यास असतात. त्यांच्या गरजाही निसर्गावरच अवलंबून असतात हा समुदाय मुख्य प्रवाहात येत असल्यामुळे त्यांच्या संस्कृतीत बदल होत आहे. आज दळण – वळणावरच्या माध्यमातून आदिवासी मुली काही कारणाने इतर समाजाच्या संपर्कात येत आहेत. त्यांच्यातील आंतरसंबंधाने सास्कृतीत बदल किंवा अनुकरण होतांना दिसून येते.

"समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या व नागरी – ग्रामीण समाजापेक्षा वेगळा राहणारा समाज म्हणजे आदिवासी समाज होय." भारतात १० कोटी लोकसंख्या आदिवासींची आहे. महाराष्ट्रात आदिवासीच्या एकूण ४७ जमाती आहेत. महाराष्ट्रात ९.३५ % म्हणजे १ कोटी ५ लाख ऐवढी आहे. कायदेशीर मातृत्व आणि कुमारी माता किती विसंगत आहे! या दोन्ही मातृत्वामध्ये एका मातृत्वामुळे स्त्रीला आनंद उपभोगता येतो तर दुसऱ्या मातृत्वामुळे स्त्रीला दु:ख पदरी पाडून घ्यावे लागते. स्त्रीचा शारीरिक विकास पूर्ण होण्यापूर्वीच जी मुलगी माता बनते तिला 'कुमारी माता' म्हणून संबोधले जाते. तसेच जी मुलगी विवाह होण्याआधीच तिला मातृत्व लाभते तिला 'कुमारी माता' म्हणतात.

विवाहापूर्वीच मुलगी आई होणे म्हणजेच ती एक कुंटुबाला आणि समाजाला लागलेला कलंक आहे असे समजन्यात येते. त्या मुलीला कुंटुबात आणि समाजात कुठेही स्थान नसते. समाजाचा त्या व्यक्तिकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलतो. कुचेष्टा आणि प्रतिकूल नजरेने तिच्याकडे बघितले जाते. समाजाकडून त्या व्यक्तिला बहिष्कृत केले जाते. त्यामुळे कुमारी मातांना कौटुंबिक

सामाजिक, आर्थिक आणि भावनिक समस्यांना तोंड द्यावे लागते. बेकायदेशीर किंवा लादलेले मातृत्व स्त्रीला दु:ख डोंगरा एवढे देऊ शकते.

बलात्कारामुळे मुलींना, स्त्रियांना नको असलेला गर्भ राहतो. अबोध मुली, लहान वयाच्या बरेचदा पुरूषी वासनेला बळी पडतात. त्यातून त्यांना गर्भ राहतो. हल्ली तर आधुनिकीकरणाच्या नावावर आदिवासी तरूण तरूणींना नको तेवढे स्वांतत्र्य मिळतचं त्याचा परिणाम म्हणजे तरूण—तरूणी लैंगिक संबंध ठेवून मोकळे होतात. त्यातून मुलीला गर्भ राहतो. प्रेमाच्या भाकड कल्पनांनाच प्रेम समजून केवळ शारीरिक आकर्षणापाई फसलेल्या, अवैध संबंधातून गर्भिति राहिलेल्या आदिवासी मुलींची संख्या हादरवून टाकणारी आहे. या आदिवासी तरूण पिढीला मार्गदशन करणारं कुणी नाही. त्यांना नीट समजवून सांगणार कुणी नाही. पोटतिडिकेंनं सागणारा कुणी असलाच तर ही तरूण मंडळी ऐकतील ना? हा गंभीर प्रश्न आहे.

महाराष्ट्रात यवतमाळ जिल्हातील आदिवासी मुलींवर परप्रांतिय ठेकेदारांनी लैंगिक अत्याचार केल्यामुळे ४०० पेक्षा जास्त मुली कुमारीमाता झाल्याचे निदर्शनास आले. २००६ मध्ये २८५ यवतमाळ जिल्हातील झरी, जामणी, मारेगाव, पांढरकवडा व वणी तालुक्यातील होत्या. स्वाधार केंद्राच्या माध्यमाने १९९ कुमारी मातांचे पुर्नवसन करण्यात आले. यवतमाळ जिल्हात शासकीय आकडेवारीनुसार १८२ कुमारी माता आहे. त्यापैकी ५८ कुमारी मातांचे लग्न झाल्याने त्यांच्या पुनर्वसनाचा भार सरकार वर नाही. १४४ कुमारी मात व त्यांचे ११२ मुले त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आजही आहे. यात सर्वाधिक झरी तालुक्यातील आहे. यामध्ये १६ ते ३१ वर्षाहून अधिक वयाच्या कुमारी माता आहेत. यात निरक्षर मातांची संख्या अधिक आहे. या मुलींवर गावातील धनाढय लोकांनी मातृत्व लादले. शेतावर मजूरीसाठी गेलेल्या मुलींना अभिष दाखत त्यांनी आपल्या जाळयात आढले. या कुमारी माता हलाखीच्या अवस्थेत जीवन जगत आहेत. अज्ञान गरिबी, शिक्षणाच अभाव यातून त्या फसल्या जातात.

एकटया नागपूर शहरात गेल्या पाच वर्षामध्ये सुमारे १५०० कुमारी मांताची नोंद घेण्यात आली आहे. MPT केंद्राने सहा कुमारी मातांचा अकाली मृत्यू झाला. झपाटयाने जस बदलत असलेल्या नागपूर शहरावर सध्या मेट्रोचे गारूड आहे. शहरात आरोग्य आणि त्यात कुमारी मातांच्या वेदना मात्र कोणाच्याही कानी पडत नाही. १ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीत कुमारी मातांची नोंदणी झाली आहे. या कालावधीमध्ये गर्भपातासाठी १,५०१ कुमारी मातांची नोंद घेतली. २०१३ ते २०१४ या काळात सर्वाधिक ४७२ मातांची नोंद घेतली गेली. याच कालावधीत सहा कुमारी मातांचा मृत्यू झाला यातील एक मातांचा मृत्यू झाला आहे. बलात्कारामुळे काहींना गर्भधारणा होत असली तरी दु:खी किंवा असमाधानकारक कौटुंबिक जीवन विघटीत घरे, लैंगिक संबंधाविषयी ज्ञान नसते हे घटक आदिवासी मध्ये गर्भधारणेस बरेचदा जबाबदार असतात. त्यामुळे कुंटुबाने अव्हेरल्यामुळे, मदत करण्याचे नाकारल्यामुळे तया स्त्रियांचे जीवन पूर्णत: उद्‌हवस्त झालेले असते.

आर्थिक दृष्टया स्वतंत्र मुली यापेक्षा कुमारी मातांची स्थिती दयनीय असते. बहुतेक आदिवासी मुली भावनेच्या आहारी जाणाऱ्या वासनेला बळी पडलेल्या अशाच असतात. कुंटूबात आई—वडील, नातेवाईक, अविवाहीत गर्भवती पोरीला जीव नकोसा करतात. या बाबतीत मुलींचा आत्महत्या किंवा जीवे मारणे हे प्रकार खूप घडतात.

**कुमारी मातांची कारणे :**

१.मुलीला लहानपणापासून आई वडिलांकडून प्रेम न मिळणे.
२.आर्थिक परिस्थिती हालाखीची आणि दारिद्रय रेषेखालील असणे.
३.फूस लावून पळवून आणणे.
४.कौटुंबिक सामाजिक, नातेवाईकांचा आधार न मिळवे.
५.आदिवासी मधील मुलींचा हुबळेपणा अडाणीपणा, भोळसहपण, कधी तर मानसिक विकृती सुद्‌धा.
६.वयात आलेल्या मुली चित्रपटातील, सोशल मिडिया Moj, What'sapp, you tube, Google, web, यातील जे उतान गाणी आणि धुंद वातावरण पाहून मोडून जातात.
७.लैंगिक सुखाला चटकन बळी पडणाऱ्या.

८. काहींना स्वभावत:च स्वैराचाराची आवड असते.
९. मुलींला लहानपणापासून आईवडीलांकडून प्रेम न मिळणे.
१०. आज स्वतंत्र्यतेच्या नावावर जो चंगळवाद वाढला आहे. तो कुमारी मातांच्या समस्या वाढण्याचे कारण ठरतो आहे.
११.आदिवासी मूल्य, प्रमाणन, निषेधनियम, लोकनीती, लोकाचार लोप पावत आहेत.
१२. असमाधानी आणि मर्यादित अशा आकांशा.
१३. स्वार्थी प्रवृत्तीमुळे वैचारिक पातळी व संकुचितता आली.
१४. आदिवासी समाजातील रूढी, नियम, रीतिरिवाज द्वारा अतचारांचे समर्थन.
१५. नियम व्यवस्था/प्रमाणक आणि व्यवहार यामध्ये तर्कसंगती प्रस्थापित झाल्यामुळे त्याविरूध्द आवाज उठविणे अवघड झाले.
१६. प्रस्थापितांच्या अधिकारावर सर्व बाजूंनी प्रभावी समर्थन.
१७. शोषणनिष्ठ विषमतेवर आधारलेली व्यवस्था.
१८. शोषणमुक्त, अरूप्रश्यतानिवारण, विषमता या विस्तहदचे आंदोलन यशस्वी न होऊ शकणे.
१९. लिंगावर आधारलेली भेदभावाची वागणूक मुलींना दिली जाते.
२०. गेल्या चार वर्षामध्ये स्त्रियांवर अन्याय होऊ नये अशा रितीने कायद्यात बदल झाले. स्त्रियांच्या हक्कांचे संरक्षण होण्याच्या दृष्टिने नवीन सामाजिक कायदे झाले परंतु आदिवासी स्त्रियांनी माहितच झाले नाही.
२१. अशिक्षितपणा, दारिद्रय, कष्टकरी स्त्रियांचे कायदे, कायद्याने दिलेले अधिकार, अन्यायविरूध्द न्यायाची तरतुद यांची माहिती आदिवासींना नाही त्यामुळेच कुमारी नारी स्त्रियांचे प्रश्न प्रकाशात येतच नाहीत.
२२. धार्मिक रूढीचा आणि अंधश्रध्दांचा पगडा पूरवठा जबरदस्त आहे की नवीन कायदेच नव्या काळासाठी आहेत व रूढी गतकाळसाठी आहेत. हया कालबाहय झाल्या आहेत. अशी समज या मातांना आलेलीच नाही.

**उपाययोजना :**

१. शहरीकरण, आधुनिकीकरण, अंधानुकरण, पाश्चिमात्य करणे, भांडवलवाद, स्त्रीवादी दृष्टिकोणाचा चुकीचा अर्थ, लावणे, आदिवासी मध्ये असलेला पारंपारिक सामाजिक वर्तनप्रमाणके मोडकळीस आल्यामुळे हा प्रश्न फारच तीव्र बनत चालला आहे. आज संस्कृतीकरणामुळे चंगळवाद कोकावतो आहे. त्यामुळे सरकारी संघटना व स्वयंसेवी कल्याणकारी संघटना यांनी या प्रश्नाकडे अधिक लक्ष देणे नितांत गरजेचे आहे.
२. कुमारी मातांना कुंटूबात त्याचप्रमाणे समाजात पुर्नवसन करण्याच्या हेतूने त्यांच्या बदलची माहिती गोळा करणे, त्यांना सल्ला व मार्गदर्शन देण्याची तरतूद करणे व अन्य प्रकारचे साहाय्य पुरविणे अत्यंत महत्वाचे आहे.
३. आदिवासी भागामध्ये समूह गोळा करतांना व्यक्तिच्या भावनांना आवाहन केले गेले पाहिजे. त्यांच्या हृदयात जाऊन भिडतील अशी विधाने केली पाहिजे. तिथे विचार गळून पडतात. अशांना पध्दतशीरपणे विचार करून निर्णय घेण्याइतके भान राहत नाही. भावनांचा आवेग ओसरला नी लोकांना झाल्या चुकीची जाणीव होते पण तो पर्यंत काही उन्माद व अतिरेक घडून गेलेले असतात. त्यातून नण्या समस्या निर्माण होतात. वेळीच योग्य सल्ला व मार्गदर्शन व्यस्त करून सामाजिककरणाच्या घटकांने केले पाहिजे.
४. त्या क्षणी भावनेचा आवेग इतका तीव्र असतो की आपण काही चुकीचे कृत्य करीत आहोत याची जाणीव त्या निरक्षर, अबाल, मुलींना नसते. पण प्रमाद घटून गेलेला असतो आणि त्याचे भीषण परिणाम म्हणजेच एक अनौरस मुलचा जन्म अशा वेळेस पुर्नवसन संस्थांचा पुढाकार व त्यांच्या द्वारा पुरविलेल्या सोयी — सुविधा महत्वपूर्ण असतात. ज्या स्वंयसेवी संस्था करत आहेत.
५. महिला व बालकल्याण विभागाच्यावतीने कुमारी मातांची समस्या असलेल्या ठिकाणी ग्राम बालसंरक्षण समित्या स्थापन करून किशोरवयीन मुलींना वाईट मार्गाकडे जाऊ नयेत समुपदेशन करण्याची योजना आहे. पण अजूनही ही योजना कागदावरच आहे. कुमारी माता हालाखीच्या अवस्थेत जीवन जगत आहेत. अज्ञात, गरीबी, शिक्षणाना अभावाने सहज फसल्या जात आहेत.

ISSN : 2278-9308
July 2021

६. घरापासून दर राहणाऱ्या कुमारी मातांचे पुर्नवसन पुरूषांच्या वासनेला या मुली बळी पडलेल्या आहेत. घरची गरिबी, कायद्याचे अज्ञान व अन्याय करणाऱ्यांचा दरारा यामुळै या मुली पोलिसात जाऊन तक्रारही करीत नाहीत. या मुलींचे बाळंपण ही घरीच केले जाते. कुमारी मातांच्या पुर्नवसनासाठी सरकारचे प्रयत्न सुरू असले तरी ते अत्यंत तोकडे आहे. लाजेपाही अनेक कुमारी माता शासकीय कार्यालयात अर्ज करण्यासाठी उत्सुक नसतात.

७. उच्च न्यायालय, अनुसूचित जाती जमाती आयोग व शासनाने लक्ष घालून ही १५ वर्षापासून हा प्रश्न जैसे थे, कायमस्वरूपी उपाययोजना झालेल्या नाहीत. सर्वेक्षण व अभ्यासा पलिकडे प्रत्यक्ष अमंलबजावणी झाली नाही. स्वाधार केंद्र कागदावरच आहे. कुमारी मातांच्या नशिबी मात्र आजही प्रतारणाच आहे.

८. एक अनौरस मुलाला उजळ माथ्याने ती कुमारी माता वाढवू शकत नाही म्हणून तिला त्या मुलाला जन्मत:च मारण्याचे पाप करावे लागते किंवा ती त्या मुलाला टाकून देण्याचे धाडस दाखवते. असे करण्यात तिला खूप मानसिक त्रास, प्रताडना, विंवचना, भावना संघर्ष, आवेग यांना समोरे जावे लागते. तिच्या विघटनास ही क्षणिक घटना कायमची कारणीभूत होते. अशा मुलांना कुमारी मातांने जरी टाकले तरी समाज, देश टाकू शकत नाही. समजाला पुढे येऊन त्या मुलाला वाढविण्याची जबाबदारी घ्यावी लागते. त्यासाठी समाजात अनेक गैरशासकीय संस्था, आश्रमशाळा, अनाथाश्रम, स्वंयसेवा संस्था, समिती समाजात समाजसेवावृत्तीतून कार्य करत आहे. म्हणून अशा आदिवासी कुमारी मतांना योग्य वयात पध्दतशीर लैंगिक शिक्षण मुला –मुलींना देणे अत्यावश्यक आहे.

९. कुमारी माता पुर्नवसनात सामाजिक, नैतिक स्वच्छता मंडळे स्थापन झाली पाहिजे. ही मंडळ, डॉक्टर्स, समाजसेवक, पोलिस इत्यादी सर्वांनी या पुर्नवसनाच्या कामात हातभार लावला पाहिजे.

१०.कुमारी माता प्रश्नांची तीव्रता कमी करण्याचा उद्‌देश सकल करण्यासाठी आदिवासी तरूण मुले – मुली शासन व शासकीय योजना, स्त्रीमुक्ती संघटना, सेवाभावी संस्था, राजकीय पक्षांच्या महिला आघाडया, समाजाची सकारात्मक विचारसरणी या सर्वांचा सहभाग महत्वपूर्ण आहे.

११.आदिवासी महिला करीताच्या राष्ट्रीय आरोग्य अभियान, नवसंजीवनी योजना, जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, डॉ. ए.पी.जे. अब्दूल कलाम अम्रत आहार योजना, एकात्मीक बालविकास प्रकल्प योजना, याची माहिती आदिवासी कुमारी माता पर्यंत पोहचविण्यास त्यांच्या समस्या कमी होऊ शकतात.

१२.कुमारी मातांच्या पुनर्वसनासाठी शासनाचे प्रयत्न सुरू असले तरी ते अत्यंत तोकडे असल्याचे वाटते. तर लाजेपोटी अनेक कुमारी माता शासकीय कार्यालयात अर्ज करण्यासाठी उत्सुक नसतात. पुर्नवर्सन रक्कम अपुरी असल्यामुळे रक्कम वाढविणे अपेक्षित आहे. त्यामुळे कुमारी मातांचे प्रश्न बोलके आहेत.

१३.आरोग्य तपासणी, कौशल्य विकास कार्यक्रम, शबरी घरकूल योजना यातून त्यांना लाभ मिळू शकतो. समाजाला धर्माचरणी बनवून नैतिकतेचे आणि नियमांचे पालन करणारा बनविणे गरजेचे आहे. रोजगाराभिमुख, पुर्नवसन केल्याने प्रश्न निकाली लागू शकतो. बालसंगोपन योजना, मनोधैर्य योजना, महिला बचत गटाकडून विविध योजनांचा लाभ स्थानिक स्तरावर रोजगार उपलब्ध करणे. नाविण्यपूर्ण योजना, महिला व बालविकास, एकात्मिक आदिवासी विकास, महिला आर्थिक महामंडळ, कौशल्य विकास, जिल्हा नियोजन समिती काही विभागाची मदत अपेक्षित आहे. मानसिक व सामाजिक दृष्टया कुमारी मातांना सक्षम बनविणे आवश्यक आहे. भविष्यात हिरकणी कक्ष, अश्यागत कक्ष, महिला बचत गटासाठी कक्ष, मिटिंग सभागृह बनवून यांच्या प्रश्नांना अर्थ प्राप्त होईल.

**संदर्भ ग्रंथ :**

१. आगलावे प्रदीप, (२०००) संशोधन पध्दती शास्त्र, साईनाथ प्रकाशन, नागपूर
२. प्रा. पी. के. कुलकर्णी, (२००८) आरोग्य आणि समाज.
३. आदिवासी विकास विभाग माहिती पुस्तिका २०११–१२, महाराष्ट्र शासन आदिवासी विभाग मुंबई.
४. डॉ. जयक्षी जोडसे, मलिलांच्या समस्या, १ जानेवारी २००७, औरंगाबाद.

५. Maharashtra time ९ जानेवारी २०१५.
६. लोकसत्ता, २८ एफिल २०१६.
७. Maharashtra time २ जानेवारी २०१७.
८. Maharashtra time १२ डिसेंबर २०१७.
९. कुमारी मात – स्नेहवर्धन प्रकाशन, प्रथम आवृत्ती, १ जानेवारी २०००.
१०.कुमारी माता – १ जानेवारी २०१२.
११.कुमारी माता – डॉ. सुलोचना देशमुख.
१२.कुमारी माता – अमरेन्द्र किशोर.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)

ISSN : 2278-9308
July 2021

# जाती और धर्म व्यवस्था का सामाजिक प्रभाव – एक अध्ययन

डॉ प्रकाश धनसिंग पवार
इतिहास विभाग प्रमुख अरविंदबाबू देशमुख महाविद्यालय भारसिंगी,
जिल्हा– नागपुर

**सारांश**

भारतीय समाज जीवन कई मानव जातियों, धर्मों और विभिन्न भाषाओं की परंपराओं, रीति–रिवाजों आदि द्वारा आकार दिया गया था. प्रागैतिहासिक काल से इस देश में बहुत से लोग आए हैं. उनकी भाषा, परंपराएं, मानदंड जीवित रहे. कुछ सूत्र ऐसे हैं जो लोगों के इन विभिन्न समूहों को एक साथ जोड़ते हैं. जीवन ग्राम समाज, जाति व्यवस्था, परिवार संगठन जैसी सामाजिक संस्थाओं के माध्यम से होता है और ये संगठन लोगों के विभिन्न समूहों को एक साथ रखने का काम भी करते हैं. भारतीय लोगों के स्वभाव को आकार देने में धर्म संस्था का कार्य भी बहुत महत्वपूर्ण है. हिंदू समाज मे जाति व्यवस्था एक ऐसी संरचना है जो पिछले तीन हजार वर्षों से स्थिर है. यह एक सामाजिक संरचना है जिसमें विभिन्न श्रेणियां हैं, निम्न और ऊपरी, उच्च और निम्न, इनमें से प्रत्येक श्रेणी को वर्ण या जाति शब्द द्वारा निर्दिष्ट किया गया है. हिंदू धर्मशास्त्र और पवित्र परंपराओं के अनुसार, इस श्रेणी को अत्यधिक माना जाता है. विभिन्न जातियों के आर्थिक, वाणिज्यिक, राजनीतिक और अन्य सामाजिक लेन–देन को धर्म और पवित्र रीति–रिवाजों के संदर्भ में परिभाषित किया गया है. प्रस्तुत शोधपत्रद्वारा भारतीय समाज मे जाती और धर्म संचार का परिणाम इस विषय पर प्रकाश डाला गया है.

**बिजशब्द**– जाती व्यवस्था,धर्म व्यवस्था, भारतीय समाज

**प्रस्तावना**

मानव समाज में विभिन्न प्रकार की असमानताएं हैं. भारतीय समाज में भी असमानता है. भारत के सभी क्षेत्रों में असमानता है. सामाजिक–आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजनीतिक आदि. गौतम बुद्ध से लेकर डॉ. आंम्बेडकर तक, कई महान हस्तियों ने आधुनिक समय में स्वतंत्रता, समानता, भाईचारे और न्याय के मानवीय मूल्यों को अपनाने की कोशिश की, जिसने भारतीय समाज में सामाजिक असमानता को कुछ हद तक कम किया है.प्राचीन कालसे हि द्विजों अर्थात ब्राह्मणों, क्षत्रियों और वैश्यों द्वारा शूद्र की सेवा करना एक व्यवसाय था या लोहार, साली, माली, मकड़ी आदि का व्यवसाय करना अधर्म हो जाता है. इसी तरह क्षत्रियों और वैश्यों को वेदों का अध्ययन करने का अधिकार है, लेकिन उनको वेदों की शिक्षा, यज्ञ या पूजा करना ब्राह्मणी व्यवसाय करने का अधिकार नहीं है. जाति व्यवस्था भारतीय समाज का एक अभिन्न अंग है. जाति व्यवस्था के बिना भारतीय समाज की कल्पना नहीं की जा सकती. हमें लगता है कि आजादी के बाद के दौर में जाति व्यवस्था की जितनी आलोचना हुई है, उतनी कभी नहीं हुई, लेकिन ऐसा नहीं है. ढाई हजार साल पहले बौद्ध धर्म के फलने–फूलने का एक मुख्य कारण बौद्ध धर्म द्वारा खारिज की गई जाति व्यवस्था है. उस समय वैदिक धर्म में बलि प्रथा के कारण हिंसा (पशु वध) और ब्राह्मणों का महत्व तेजी से बढ़ गया था. उसे क्षत्रिय राजाओं का समर्थन प्राप्त था क्योंकि उसके पास यज्ञ करने के लिए धन था. एक प्रकार से यज्ञ की संस्था ब्राह्मण और क्षत्रिय दो वर्णों के लिए लाभकारी थी. आइए यह देखने की कोशिश करें कि ऐसा एक अलग दृष्टिकोण से क्यों हुआ. श्री. मधुकर केशव धवलीकर ने हड़प्पा और मोहनजोदड़ो पर अपनी पुस्तक में पर्यावरण का संदर्भ दिया है. उनका कहना है कि २००० से ईसा पूर्व इस अवधि के दौरान, भारत में वर्षा कम होने लगी. नदियाँ अतिप्रवाह होने लगीं या भूगर्भीय आंदोलनों ने नदी घाटियों को पूर्व की ओर ले जाने का कारण बना, सिंधु घाटी सभ्यता को नष्ट कर दिया. फिर ह्व्ब्ब के दशक के दौरान, बहुत बारिश फिर से गिरने लगी, इसलिए भारत समृद्ध हुआ, व्यापार बढ़ा. उन्होंने अपने अनुमान के लिए पर्याप्त सबूत प्रदान किए हैं. इससे यह कहा जा सकता है कि जब समाज में समृद्धि और स्वास्थ्य आता है, उसी समय बुरी चीजें समाज में प्रवेश करती हैं या

ISSN : 2278-9308
July 2021

लोगों की बुद्धि भ्रष्ट हो जाती है. भगवद गीता में वर्णित यज्ञ का मूल रूप इसी समृद्धि और स्वास्थ्य से विकृत हो गया था. जब कोई चीज बहुत दूर चली जाती है तो प्रतिक्रिया करना प्रकृति का नियम है. बौद्ध धर्म जाति व्यवस्था के अतिवाद की प्रतिक्रिया है. यही मुख्य कारण है कि बौद्ध धर्म वेदों को अस्वीकार करता है. इस काल के इतिहास पर नजर डालें तो पता चलेगा कि इस काल में महान साम्राज्यों का निर्माण हुआ था. चंद्रगुप्त मौर्य ने इस अवधि के दौरान एक विशाल साम्राज्य का निर्माण किया. इसके बाद गुप्त साम्राज्य का गठन लगभग ३०० ई.पूर्व हुवा. यदि हम बौद्ध साहित्य का अध्ययन करें, तो ऐसा प्रतीत होता है कि बौद्ध धर्म के उदय के दौरान व्यापारी श्रेष्ठ का महत्व बढ़ गया है. ऐसा लगता है कि बलिदान पर दान को प्राथमिकता दी गई है. साथ ही ब्राह्मणों का महत्व कम होने लगता है. कई ब्राह्मण बौद्ध भिक्षु बन गए और बौद्ध दर्शन को मूर्त रूप दिया.

**भारतीय धर्मतत्त्व**

इस देश में हिंदू, बौद्ध, जैन, यहूदी, पारसी, मुस्लिम, खिशचन और सिख धर्म के लोग हैं. इनमें हिंदू सबसे बड़े हैं. हिंदुओं में कई संप्रदायों को अछूत माना जाता है. यह अछूत वर्ग भी सजातीय नहीं है. यह क्षेत्रों, भाषाओं, व्यवसायों, धर्मो, संप्रदायों में विभाजित है. सभी हिंदू एक नहीं हैं. प्रत्येक भाषाई विभाजन में हिंदू कई जातियों और उपजातियों में विभाजित हैं. उनमें से प्रत्येक का पहनावा, खान—पान, अलग—अलग शिष्टाचार, अलग—अलग देवी—देवताओं का अलग—अलग व्यवसाय है. भारतीय सार्वजनिक जीवन में जाति की जड़ें बहुत गहरी हैं. ऐसा लगता है कि इसका प्रभाव अन्य धार्मिक समूहों में भी फैल गया है. उदाहरण के लिए, यहां तक कि भारतीय मुसलमान भी एकजुट नहीं हैं. बोहरा, खोजा, अहमदिया, आगा खान जैसे कुछ समूहों के अलावा इस धर्म में शिया और सुन्नी विश्व धर्म हैं, जबकि मोमिन, बगवान, मेहतर जैसे पेशेवर समूह भी हैं. पंथ भी हैं. प्रत्येक समूह का व्यवहार परंपरा द्वारा निर्धारित होता है. किस समूह को किस समूह से और किस हद तक जोड़ा जाना चाहिए, इसके नियम या संकेत हैं. अछूत मानी जाने वाली जातियों में भी पारस्परिक अस्पृश्यता है. जैनों को श्वेतांबरी में विभाजित किया गया है और दिगंबरी बौद्धों को हीनयान में विभाजित किया गया है और महायान सिखों को अकाली और निरंकारी समूहों में विभाजित किया गया है. इसके अलावा, हिंदुओं में कुछ अन्य संप्रदाय भी हैं. जैसे, शैव, वैष्णव, तांत्रिक, गणपति, दत्तोपासक, महानुभव, कापालिक आदि. पारंपरिक और ब्रह्मोसमाजी, आर्य समाज आदि. आधुनिक पंथवाद.ऐसे अनेक धर्मो द्वारा भारत देश अलंकृत है.

**सामाजिक परिणाम**

भारतीय जाति व्यवस्था प्रागैतिहासिक काल से एक मजबूत सामाजिक—आर्थिक संस्था के रूप में अस्तित्व में रही है. निस्संदेह इस व्यवस्था में व्यक्ति की स्वतंत्रता बहुत सीमित है और उसे एक विशेष जाति, एक विशेष जातीय शाखा और एक विशेष परिवार के सदस्य के रूप में जाना और माना जाता है. असमानता एक और लक्षण है. इस प्रणाली में व्यक्तिगत योग्यता और आकांक्षाओं का विशेष महत्व नहीं है. फिर भी, इस प्रणाली ने समाज को एक असाधारण स्थिरता और व्यक्तियों को शांति और सुरक्षा प्रदान की है जो अन्यत्र नहीं देखी जाती है. जातियों के आंतरिक संगठन, न्यायिक व्यवस्था और पारिवारिक दायित्वों के माध्यम से व्यक्ति को सभी प्रकार की सामाजिक सुरक्षा प्राप्त होती रही है. यह अनाथों की परवरिश, विधवाओं, बीमारों, विकलांगों और बुजुर्गों की देखभाल के लिए प्रदान करता है. लेकिन जाति व्यवस्था आधुनिक औद्योगिक अर्थव्यवस्था और लोकतांत्रिक स्वतंत्रता और समाजवादी समानता के मूल्यों से मेल नहीं खाती और यह विरोध मौलिक प्रतीत होता है. आर्थिक विकास के लिए आवश्यक वाणिज्यिक और भौगोलिक गतिशीलता के लिए जातीय संबंध एक बाधा हैं. अब देखना यह है कि वर्तमान परिवर्तनशील और संक्रमणकालीन युग में जाति अपना रूप बदलती है और सामाजिक संबंधों में एक नए युग के अनुकूल सामंजस्य स्थापित करती है या बेकार और बाधक बन जाती है.

**विवाह**

ज्यादातर भारतीय शादियां माता—पिता द्वारा तय की जाती हैं. आदर्श जीवनसाथी खोजने के लिए उन्होंने कई कारकों पर विचार किया. जिसमें से, किसी की जाति एक महत्वपूर्ण कारक

ISSN : 2278-9308
July 2021

है. लोग नहीं चाहते कि उनका बेटा या उनकी बेटी दूसरी जाति के व्यक्ति से शादी करे. जैसा कि अछूत शब्द से पता चलता है, एक ब्राह्मण कभी भी दुसरी जाति के व्यक्ति से शादी नहीं करेगा.

**शिक्षा**

सार्वजनिक विश्वविद्यालयों में वंचित पृष्ठभूमि से आने वाले छात्रों के लिए जाति आधारित आरक्षण है. इस पृष्ठभूमि का व्यक्ति आरक्षण के आधार पर समकक्ष या उससे कम शैक्षणिक अंकों के साथ शीर्ष स्तर के कॉलेज में सीट सुरक्षित कर सकता है. हालांकि, गरीब ब्राह्मण इस आरक्षण प्रणाली से वंचित हैं. उदाहरण के लिए, एक ब्राह्मण को शीर्ष स्तरीय विश्वविद्यालय में प्रवेश पाने के लिए कुछ परीक्षाओं में १००: अंक प्राप्त करने होते हैं. जबकि निचली जाति का आवेदक विश्वविद्यालय में सीट पाने के लिए परीक्षा को बायपास भी कर सकता है.

**रोजगार**

सार्वजनिक क्षेत्र की नौकरियों की एक महत्वपूर्ण राशि जाति आरक्षण के आधार पर आवंटित की जाती है. इस आरक्षण के कारण ब्राह्मण पृष्ठभूमि के गरीब समुदाय काफी प्रभावित होते हैं और राष्ट्र एकात्मता को क्षति होती है.

**समारोप**

ब्रिटिश शासन के दौरान आधुनिक पश्चिमी संस्कृति में मानवतावादी विचारधारा और सामाजिक न्याय का प्रभाव आधुनिक भारतीय शिक्षित लोगों पर पड़ा. मानव समानता, व्यक्तिगत स्वतंत्रता और मानव भाईचारे के तीन सिद्धांतों ने इन सामाजिक और धार्मिक सुधारों को प्रभावित किया. इसी तरह आर्य समाज के संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती के नेतृत्व में चतुर्वर्ण के सिद्धांत को जन्म से जाति व्यवस्था के रूप में स्वीकार नहीं किया गया और मूर्तिपूजा का विरोध शुरू हो गया. सती के कदम को कानून ने रोक दिया.विधवा विवाह कानूनद्वारा स्वीकार कर लिया गया. एक निश्चित कानून ने विभिन्न जातियों और धर्मों के पुरुषों और महिलाओं के धर्मनिरपेक्ष विवाह की अनुमति देकर तलाक की अनुमति दी. स्वतंत्रता के बाद की अवधि में, सभी हिंदू कानूनों का नवीनीकरण किया गया, सभी जातियों और सभी धर्मों की समानता को मान्यता दी गई और अंतर–जाति या अंतर–धार्मिक, धार्मिक या धर्मनिरपेक्ष विवाहों को मान्यता दी गई. वयस्क विवाह पर प्रतिबंध लगा दिया गया और बाल विवाह पर प्रतिबंध लगा दिया गया. बाल विवाह पर वही प्रतिबंध स्वतंत्रता के बाद के काल में स्वीकार किया गया था. इसी तरह अस्पृश्यता को कानूनी रूप से समाप्त कर दिया गया था. भारतीय संविधान ने ही अस्पृश्यता को नष्ट किया. अछूत हिंदुओं के कुएं, झील आदि. अछूतों को जलाशयों से पानी लेने का कानूनी अधिकार मिल गया और अधिकार से वंचित करना अपराध बन गया. अछूतों को हिंदू मंदिरों और अन्य सार्वजनिक पवित्र स्थानों में प्रवेश करने का कानूनी अधिकार दिया गया था. इस तरह सामाजिक, धार्मिक सुधारों और कानून द्वारा हिंदुओं की पारंपरिक जाति व्यवस्था को भंग कर दिया गया. आज के समाज में ऐसे कई उदाहरण हैं जहां एक धार्मिक व्यक्ति के दूसरे धर्म के व्यक्ति के साथ बहुत अच्छे संबंध हैं लेकिन ये रिश्ते तब गड़बड़ हो जाते हैं जब ऐसा व्यक्ति अपने जैसे कई लोगों के साथ मिल जाता है. समाज तभी बदलेगा जब ब्राह्मण, क्षत्रिय और वैश्य अपना अहंकार छोड़ दें और पिछड़ा वर्ग अपनी घृणा को कम कर दे. महाराष्ट्र के संतों ने इस परिवर्तन को लाने के लिए सामाजिक तत्वों को जगाने का भरसक प्रयास किया.

**संदर्भ**

- एम.एन.श्रीनिवास – आधुनिक भारत मे जाती अनुवाद, राजकमल प्रकाशन,दिल्ली.
- दि.आर.जाटव– भारतीय समाज व विचारधाराये,नेशनल प्रकाशन, दिल्ली
- देवेंद्र स्वरूप–जातीविहीन समाज का सपना,ग्रंथ शिल्पी एकेडमी,दिल्ली.
- Nesfield,J.C., 1885, Brief Review of the Caste System of the North-West Proviences and Oudh, Allahabad
- Majumdar, D.N., 1944, Races and Cultures in India, Universal Publishers, Lucknow.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींची आधुनिकतेकडे वाटचाल – एक सामाजिक अध्ययन

प्रा. डॉ. पी. एन. वाघ
समाजशास्त्र विभाग प्रमुख एस.जे.एस. पी. एम महा. धानोरा जिल्हा गडचिरोली
Pandhariwagh33@gmail.com,Mo.no.9421729004;7745860150

**किवर्डस** :– आदिवासींचे राहणीमान, शिक्षण,शासकीय योजना गतिशीलता आणि आधुनिकता.

**प्रस्तावना** – गडचिरोली जिल्हा हा प्रमुख्याने महाराष्ट्र राज्यात आदिवासी व मागासलेला व घनदाट जंगलांनी व्याप्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. हा जिल्हा अतिदुर्गम, डोंगर दऱ्याने व्याप्त व अविकसीत अशी ओळख असलेला हा जिल्हा आहे. जिल्ह्याच्या एकुण क्षेत्रफळापैकी ७६ टक्के भाग जंगलाने व्याप्त आहे. हा जिल्हा बांबूचे झाड व तेंदुची पाने करीता प्रसीद्ध आहे. या जिल्ह्याचे मुख्य पिक भात आहे. जिल्हयातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. या जिल्ह्याच्या निर्मीतीला आज ३९ वर्ष झालेले आहेत. कोट्यावधीच्या खनिज संपत्तीने समृध्द असलेला हा जिल्हा आज विकासाकडे वाटचाल करीत असलेला दिसून येतो. हा जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या उत्तर. पुर्व दिशेला वसलेला असून तेलंगणा व छत्तीसगड या राज्याच्या सीमा लागून आहेत. हा जिल्हा नक्षलग्रस्त जिल्हा म्हणूनही ओळखला जातो. आताच या जिल्हयाच्या धानोरा तालूक्यातील पैडीच्या जंगलात सी. ६० व नक्षलवाद्यांमध्ये फायरींग होवून १३ नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात पोलीस विभागाला वर्षातील मांठे यश आले. या जिल्ह्यावर तेलंगना व छत्तीसगड या राज्यांचाही प्रभाव पडलेला दिसून येतो. कारण या जिल्ह्यामध्ये एकच भाषा बोलली जात नाही तर, तेलंगू, छत्तीसगडी, हिंदी, मराठी व गोंडी इत्यादी भाषा बोलल्या जातात.जिल्ह्याची एकुण लोकसंख्या १०७२९४२ असून पुरूष व स्त्रीया यांची लोकसंख्या अनुक्रमे ५४१३२८व ५३१६१४ याप्रमाणे आहेत. (२०११च्या जणगनने नुसार ) या जिल्ह्याची एकुण साक्षरता ७४. ४ टक्के आहेत. अनुसूचित जमातीची लोकसंख्येची टक्केवारी३८.७ टक्के आहे. हा जिल्हा उद्योगविरहीत जिल्हा म्हणूनही ओळखला जातो. कारण या जिल्हयामध्ये एकही उद्योग कार्यवाहीत नाही.

या जिल्हयाच्या विकासा करीता शासकीय स्तरावरून अनेक प्रयत्न होत असलेले दिसून येतात. शासनाने या जिल्ह्यातील आदिवासींचा विकास करण्यासाठी अनेक योजना राबविलेल्या आहेत. जिल्ह्याच्या निर्मीती पासूनच पंचवार्षीक योजना राबवून आदिवासींना विकासाकडे वाटचाल करायला भाग पाडलेले आहेत. एक प्रकारची गतिशीलता निर्मान करण्याचे काम शासकीय स्तरावरून होत आहे. हा समाज स्थितीशील होता. हा समाज परीवर्तनापासून दुर होता हे सत्य आहे, परंतु त्यांचा इतर समाजाशी येणारा संपर्क, ब्रिटीशांची सत्ता, शासनाचे कायदे, शासनाच्या योजना, शिक्षण इत्यादी कारणामुळे दऱ्याखोऱ्यात राहणारा आदिवासी समाजाचा इतर लोकांशी वारंवार संबंध येवू लागला. इतर समाजाशी वारंवार संबंध आल्यामुळे ते इतरांचे अनुकरण करू लागला आहे. इतर लोकांचे अनुकरण करणे म्हणजे त्यांच्यात परीवर्तन घडून येनेच होय. ज्या समाजात सामाजिक परीवर्तन घडून येते तो समाज स्थितीशील राहत नाही तर गतिशील बनतो. म्हणजेच त्या समाजात सामाजिक गतिशीलता निर्माण होते, आणि जेथे सामाजिक गतिशीलता आहे तेथे सामाजिक परीवर्तन होत असते. म्हणुनच आदिवासी समाज आधुनिकतेकडे वाटचाल करीत असलेला दिसून येतो.

आदिवासी समाजावर विज्ञानाचाही परीणाम होतांना दिसून येतो. आदिवासी भागात संकट काळात उपयोगी साधने येवून राहिली आहेत. आदिवासी समाजात पसरत असलेली बेरोजगारी नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न सतत चालू आहे. त्या मुळे या भागातील युवकांची आर्थिक परीस्थिती सुधारत असलेली दिसून येते. हे बदल आधुनिकीकरणामुळे होत आहे. तसेच आदिवासी भागांमध्ये शासकीय, निमशासकीय शैक्षणिक संस्थांचे जाळे संपूर्ण जिल्हाभर पसरलेले दिसून येते. व्यवसायात आधुनिकीकरणाची झलक दिसून येते. आदिवासींमध्ये परंपरांना विराम देत आहेत.

ISSN : 2278-9308
July 2021

शिक्षणाला विशेष महत्व देत असल्यामुळे आदिवासी आधुनिकतेकडे वळत असलेला दिसून येतो. आधुनिकीकरणामुळे होणाऱ्या पर्यावरणीय ऱ्हासांबद्दल बरेच लहान आदिवासी गट संवेदनशील असलेले दिसून येते.

संस्कृती – आदिवासींची संस्कृती वेगळी आहे. परंतु त्यांच्या राहणीमानात बऱ्याच प्रमाणत परीवर्तन झालेले दिसून येतात. त्यांचे रहन सहन वेशभुषा आम लोकांच्या सारखीच आहे. आज सुट बुट वाल्या जमाण्यातही आदिवासी त्यांच्यात मिळलेले दिसून येतात. यामध्ये स्त्रीयाही समोर आहेत. आधुनिक पद्धतीने वेशभुषा करतात. कपडे, गहने,खान पान सर्वकाही आधुनिक पद्धतीने करीत असलेले दिसून येतात. याला कारण म्हणजे आदिवासींचा शहरीकरणासी वाढत असलेला संबंध. आदिवासींमध्ये आधुनिक भोवतीक साधनांची लागलेली ओढ. गडचिरोली मुख्यालयापासून शंभर कीलोमीटर पर्यंत गेले तरी आदिवासी गावांमध्ये कमीत कमी दहा घरांमध्ये आधुनिक पद्धतीने जीवन जगत असलेले दिसून येतात.त्यांच्याकडे अनेक प्रकारची भोवतीक साधने आहेत. शेती करण्याची परंपरागत साधने बाजूला सारून नविन पद्धतीने म्हणजेच ट्क्टरणे बरेच आदिवासी शेती करतात. काही आदिवासी शासनाच्या योजनांचा लाभ घेवून शेततळे सारख्या शासकीय योजनांचा फायदा घेवून आपल्या उत्पादनामध्ये भर घालून उत्पादनामध्ये वाढ करून आपल्या राहणी मानाचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न सतत करीत आहे. त्यामुळे त्यांच्या उत्पादनामध्ये सहाजीकच वाढ होते, काही आदिवासी तर आधुनीक पद्धतीने शेती करीत आहे. म्हणून आदिवासींची आधुनिकतेकडे वाटचाल होत असलेली दिसून येते.

**पुर्व संशोधनाचा आढावा** :– संशोधकाने या लघु शोध निबंधा विषयी पुर्व संशोधनाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला असता या विषयावर व गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींवर कोणीही संशोधन केलेले दिसून आलेले नाही. त्यामुळे हा विषय अभ्यासकांसाठी नविन राहू शकतो. संशोधनाचे क्षेत्र म्हणुन संशोधकाने अभ्यासासाठी संपुर्ण गडचिरोली जिल्ह्याची निवड केलेली आहे.

**अभ्यासाचे महत्व** :–संशोधकाचे गडचिरोली जिल्ह्यामध्ये मागील २३ वर्षा पासून वास्तव्य आहे. त्यामुळे आदिवासींमध्ये एवढ्या वर्षामध्ये काय परीवर्तन झालेले आहे, हे संशोधकाने जवळून पाहीलेले आहे. २३वर्षाअगोदरची आदिवासींची परीस्थीती व आजची परीस्थीती यामध्ये बरेच अंतर आहे. तसेच आदिवासींमध्ये अनेक बाबींमध्ये परीवर्तन झालेले दिसून येत आहे. काही अभ्यासक राजकीय मंडळी आदिवासींना मागासलेले, पीढीत असा त्यांचा उल्लेख करतात. परंतु श्री. देवाजी तोफा म्हणतात की, आम्ही मागासलेले नाही आम्ही कधीच मागासलेले आहो असे म्हटले नाही तर बाहेरून आलेले लोकच आम्हाला मागासलेले म्हणतात. तसेच आदिवासी समाजावर नागरी समाजाचा झालेला परीणाम या गोष्टीचा उलगडा करण्यासाठीच या अभ्यासाचे महत्व आहे.

**संशोधनाचे उद्देश** :–संशोधकाने आपल्या संशोधना करीता पुढील उद्देशांची मांडणी केलेली आहे.

१. गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींच्या राहणीमानाचा अभ्यास करने.
२. या जिल्ह्यातील आदिवासी भौतीक साधनांच्या उपयोगाविषयी माहिती जाणून घेणे.
३. शासकीय योजनांमुळे शेती उत्पादनात वाढ होत आहे या विषयीचा अभ्यास करणे.
४. आदिवासींची आधुनिकतेकडे वाटचाल दिसून येते या विषयी माहिती जाणून घेणे.
५. आदिवासींचे शिक्षणाविषयी मत जाणून घेणे.

**संशोधनाची गृहितकृत्ये** :–प्रस्तुत संशोधना करीता संशोधकाने पुढील गृहितकृत्याची मांडणी केलेली आहे. १. या जिल्ह्यातील आदिवासींच्या राहणी माणात परीवर्तन झालेले आहे.
२. आदिवासी लोक भौतिक साधनांचा उपयोग घेत असलेले दिसून येतात.
३. नविन बि.बियाने व शासकीय योजनांच्या माध्यमातून शेती उत्पादनात वाढ होत आहे.
४.आदिवासी लोक आधुनिक पद्धतीने जीवन जगत असलेले दिसून येते.
५. आदिवासींचे शिक्षणा विषयीचे मत सकारात्मक आहे.

**संशोधन आराखडा** : –प्रस्तुत संशोधनाकरीता अभ्यासकाने निदानात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग केलेला आहे. कारण आदिवासी समाजाची वाटचाल ही आधुनिकतेकडे होत असलेली दिसून येते. या जिल्ह्यातील आदिवासींमध्ये अनेक घटकांमध्ये परीवर्तन झालेल आहे. या उद्देशाने

आदिवासींमध्ये कोण.कोणत्या घटकांच्या प्रभावने आदिवासींमध्ये परीवर्तन झालेले आहे, हे शोधण्यासाठीच संशोधकाने निदानात्मक संशोधन आराखडा अभ्यासासाठी घेतलेला आहे.

**तथ्य संकलन पद्धती** :—प्रस्तुत संशोधना करीता अभ्यासकाने आदिवासी क्षेत्रात जावून प्रत्यक्ष निरीक्षन केलेले आहे. त्यांच्या भेटी घेवून संशोधकाला हवी असणारी माहीती मुलाखतीच्या व चर्चेच्या माध्यमातून जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील अती संवेदनशील अशा भागात जावून आदिवासींकडून चर्चेच्या माध्यमातून माहीती जाणून घेण्यात आली. तर काही ठीकाणी प्रत्यक्ष सहभाग घेवून माहिती जाणून घेण्यात आली. दुय्यम स्त्रोत म्हणून काही प्रकाशीत ग्रंथांचा उपयोग करण्यात आला.

**नमुना निवड** :—प्रस्तुत संशोधनाकरीता गैरसंभाव्यता नमूना निवड पद्धतीमधील सहेतूक किंवा उद्देश पुर्ण नमुना या संशोधना करीता उपयोगाचा ठरेल. कारण मुळात संशोधन कर्त्याचा उद्देशच आदिवासी समाजाची आधुनिकतेकडे वाटचाल अशा प्रकारचा उद्देश असल्यामुळे संशोधनाकरीता हाच नमुना योग्य ठरू शकतो. म्हणून या नमुण्याची निवड लघु निबंधा करीता केलेली आहे.

**आधुनिकते संदर्भात भारतीय सामाजिक विचार वंताची मते :—एम.एन. श्रीनिवास** ने भारतात विकसीत झालेल्या आधुनिकतेचे विश्लेषन केले आहे. त्यांनी पाश्चात्यीकरण आणि आधुनिकीकरणाचे विश्लेषण सैद्धांतीक स्तरावर केलेले आहे. ते लिहीतात की, इंग्रज भारतात आले आणि आपल्या प्रभावाने येथील सत्ता काबिज केली. प्रभावी प्रशासन चालविण्यासाठी एका विशेष प्रकारच्या आधुनिकतेला जन्म दिला. भारतात पाश्चातिकरणामुळेच विज्ञान, तंत्रज्ञान, आणि शिक्षण संस्थांचा उदय झाला. आणि आधुनिकीकरणाच्या प्रक्रीयेला गती मिळाली. **डॉ.योगेंद्र सिंह यांचे विचार** :— ते म्हणतात की, आधुनिक मुल्ये परंपरागत मुल्यांपेक्षा वेगळी आहेत. लोकशाही समानता, धर्मनिरपेक्षता इत्यादी आधुनिक मुल्ये आहेत. जेंव्हा एखाद्या समाजात आधुनिक मुल्यांचा प्रवेश होतो, तेंव्हा त्याला आपण आधुनिकीकरण म्हणतो. आणि जेंव्हा स्थानिय परंपरेत परीवर्तन घडून येते तेंव्हा त्यांना स्थानिय परीवर्तन म्हणतो. आधुनिकीकरणाचे मुलभूत तत्व सार्वभौमिक, सांस्कृतीक आहे तर परंपरांचे परीवर्तन स्थानिय आहे. **डॉ. दुबे** म्हणतात की, आधुनिकते मुळे लोकांमध्ये तर्क, परानूभुती, गतिशीलता आणि सहभागीता वाढली आहे. दुबे शिक्षणाला आधुनिकता आणि आधुनिकीकरणाचे एक सशक्त माध्यम मानतात. कारण शिक्षणामुळे ज्ञानवृद्धी होते.मूल्य आणि धारणांमध्ये त्यामुळे परीवर्तन होते.

**आधुनिकते संदर्भात डॉ. योगेश अटल चे विचार** :— त्यांची अशी मण्यता आहे की,भारतात परंपरा आणिआधुनिकता एकाच वेळी कार्यरत असल्याचे दिसून येते.त्याला कुटुंबाच्या उदाहरणाने स्पष्ट करतात. ते म्हणतातनवीन प्रकारचे शिक्षण आणि नव्या व्यवसायामुळे लोक शहरात येवून राहू लागले. त्यामुळे त्यांच्या कुटुंब व्यवस्थेत परीवर्तन आले.घरांमध्ये अनेक नविन भौतीक साधनांचा उपयोग स्त्रीया करतात. जसे,प्रेशर कुकर,किचन ओटा,गॅस मिक्सर, डायनिंग टेबल इत्यादी यंत्रतंत्राचा उपयोग करतात. तर दुसरी कडे पूजापाठ, स्नानानंतर स्वयंपाक, मंगलसुत्र, सणावारी परंपरागत भोजन वस्त्र अलंकार यांचे महत्व. लग्नात बफे, आधुनिक गाणी,नृत्ये,फॅशन, ब्युटीपार्लरचे वाढते महत्व, बॉबकट, सिवलेस ब्लॉउज, हातघड्या, प्रेमविवाह, आंतरजातीय विवाह, भाषेत इंग्रजी शंब्दांचा वाढता प्रयोग जसे, मम्मी, डैडी , अंकल, ऑन्टी अशा प्रकारे भारतात परंपरा आणि आधुनिकतेचे मिश्रीत चित्र पहावयास मिळते.

गडचिरोली जिल्ह्यतील आदिवासींची अशीच अवस्था असल्याचे आपल्याला दिसून येईल. या जिल्ह्यातील प्रत्येक गावांमध्ये कमीत कमी पाच ते दहा घरांमध्ये आधुनिक पद्धतीने जिवन जगत असलेले कुटुंब दिसून येतात. संपूर्ण गाव आधुनिक पद्धतीने जीवन जगत आहे असे दिसून येणार नाही. पण गावातील प्रत्येक व्यक्ती आधुनिक पद्धतीने जीवन जगण्याचा प्रयत्न करीत असलेले दिसून येतो हे विशेष आहे. प्रगत जिल्ह्यांमध्येही संपूर्ण गाव आधुनिक पद्धतीने जीवन जगत आहे असे म्हणता येत नाही.प्रगत जिल्हांमध्ये ग्रामीन भागात अनेक समस्या असलेल्या दिसून येतात. त्याही गावांमध्ये दहा ते पंधरा घरांमध्ये आधुनिक पद्धतीने जीवन जगत असलेले दिसून येतात. ज्या गावातील पाच ते दहा धरचे लोक आधुनिक पद्धतीने जीवन जगत आहे, त्या घरांमध्ये जवळपास सर्वच आधुनिक साधनांचा उपयोग होत असलेला दिसून येतो. मी ज्या घरांना/गावांना भेटी दिलेल्या आहेत त्या घरांमध्ये एल. इ. डी. टिव्ही, स्मार्ट फोन, बाईक,कार ट्क्टर, इत्यादी घरात

ISSN : 2278-9308
July 2021

आधुनिक पद्धतीने सीमेंट कॉक्रेटची घरे, त्यात बसण्याची उत्तम व्यवस्था, पंखा, कुलर, तसेच संडास, बाथरूम आणि अंगणामध्ये बोरवेल किंवा विहीर त्यावर मोटार पंप लावलेला अशा प्रकारची व्यवस्था आदिवासींच्या घरांमध्ये /गावांमध्ये दिसून आली.

**आधुनिक वाटचालीची कारणे** :—गडचिरोली जिल्ह्यातीआदिवासींची विकासाकडे जी वाटचाल दिसून येते त्याला खालील कारणे जबाबदार असलेली दिसून येते.—

१.**साक्षरतेचे वाढते प्रमाण**— या जिल्हयातील आदिवासींमध्ये शिक्षणाचे प्रमाण ७०.०६टक्के आहे. संपूर्ण जिल्हाभर शासकीय व निमशासकीय शिक्षण संस्थांचे जाळे पसरलेले आहेत. त्याबरोबरच शासनाच्या आदिवासीं करीता विविध योजना , राहण्याची व भोजनाची उत्तम व्यवस्थाव स्तीगृहात असल्यामुळे आदिवासींची मुले/मुली शिक्षणाकडे वळलेली आहेत. गडचिरोली जिल्ह्याच्या बाराही तालूक्यांमध्ये तंत्रशिक्षणाची सोय असल्याने आदिवासी मुले/मुली तंत्र शिक्षण सुद्धा घेत आहे. आदिवासींची पाल्ये गावाबाहेर जावून सुद्धा शिक्षण घेत आहे. एवढेच नाही तर जिल्हाबाहेर जावून उच्च शिक्षण घेवून राहीलेले आहेत. त्यामुळे आदिवासींमध्ये शिक्षणाविषयी जागृती होत असलेली दिसून येते.भारतीय संविधानाने आदिवासींकरीता शासकीय व निमशासकीय नौकऱ्यांमध्ये आरक्षणाची व्यवस्था करूण ठेवल्यामुळे आदिवासींच्या मुलांना नौकरीमध्ये सामावून घेतल्या जात आहे. तसेच अलिकडे आदिवासी भागामध्ये पेसा कायदा लागू झाल्यामुळे जिल्हयातील आदिवासी मुलांना वर्ग तीन व चार करीता राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत. या सर्व सोयी सुविधेमुळे आदिवासी भागामधील लोकांची आधुनिकतेकडे वाटचाल होत असलेली दिसून येते.

२.**दरडोई उत्पन्नात वाढ** :—आदिवासींमध्ये साक्षरतेचे प्रमाण जसे वाढत आहे तसेच दरडोई उत्पन्नही वाढत आहे. आदिवासींकरीता शासनाच्या विविध योजना आहेत त्याचा फायदा घेवून आपल्या शेतातील उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करीत असलेले दिसून येतात. आधुनिक पद्धतीने शेती काही आदिवासी करीत आहे. नविन बि.बियानांचा उपयोग लागवडीकरीता करीत असल्यामुळे सहाजीकच उत्पन्नामध्ये भर पडत असते. काही आदिवासी शेतकरी ओलीताची शेती करूण आपल्या उत्पन्नात भर घालत आहे.

३.**राहणीमानाचा जीवनस्तर उंचावलेला आहे.** :—शिक्षणाचा प्रभाव, शासनाच्या विविध योजना, नागरीकरणाचा प्रभाव, शहरी जीवनाशी जवळचा संबंध आणि आर्थिक उत्पादनात झालेली वाढ या सर्व बाबिंमुळे आदिवासींच्या राहणी माणाचा दर्जा उंचावलेला दिसूल येतो. त्याबरोबरच आदिवासी भागांमध्ये दळणवळनाच्या साधनातही वाढझालेली आहे. याही गोष्टींचा प्रभाव आदिवासींवर झालेला आहे. म्हणून आदिवासी मुले/ मुली आधुनिक पद्धतीने वेशभुषा करून जसे शहरी भागात कपडे परीधान करतात त्याच पद्धतीने आदिवासी स्त्री—पुरूष आपल्या गावांमध्ये कपडे परीधान करतात. म्हणजेच आधुनिक पद्धतीने जीवन जगत असलेले दिसून येतात.

४.**भौतिक जीवन स्तरात वाढ** :—आदिवासीलोक आधुनिकीकरणाचा विचार प्रवाह भौतिक उपलब्धीवर भर देतो. जीवनाच्या आधारभूत भौतिक गरजांची किंवा आवश्यकतांची पूर्तता होणे निश्चितच आवश्यक आहे. त्याकरीता आदिवासी समाजात प्रत्येक व्यक्ती आपले उत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक साधनाचा उपयोग करूण आपले उत्पादन वाढवित असलेला दिसून येतो. एकूणच आपले जीनव स्तर उंचावण्याचाप्रयत्न यामधुन दिसून येतो. आज प्रत्येक गावांमध्ये आणि कुटुंबांमध्ये भौतिक साधने असलेले दिसून येते.

५.**आदिवासींची आधुनिकतेकडे वाटचाल** :—हिंदुकरण, नागरीकरण आणि पाश्चिमात्यीकरण या घटकांच्या प्रभावामुळे आदिवासी समाज आधुनिकतेकडे वळलेला दिसून येतो. त्याबरोबरच आदिवासी क्षेत्रामध्ये शिक्षणाचे पसरत असलेले जाळे. त्यांची वेश भुषा, राहण्याची पद्धत रूढी, परंपराइत्यादीचे अनुकरन करून स्वत:मध्ये परीवर्तन करून घेण्याचा प्रयत्न करतात. या सर्व गोष्टींमुळे आदिवासी समाजावर प्रभाव पडलेला आहे त्यामुळे सहजच आदिवासी लोक आधुनिकतेकडे वळलेले दिसून येतात. आदिवासी भागात शहरी लोकांची वाढती येजा , त्यामुळे या लोकांचा सहजच आदिवासींवर प्रभाव पडलेला दिसून येतो. त्यामुळे आदिवासी लोकांची आधुनिकतेकडे वळलेला दिसून येत आहे.

६.**गतिशील व्यक्तीमत्व** :—आदिवासी समाजात गतिशीलता निर्माण झालेली दिसून येते. आदिवासी पुर्वी होते तसेच आज राहीलेले नाही, तर त्यांच्यामध्ये अनेक गोष्टींचा प्रभाव पडलेला असल्यामुळे

ISSN : 2278-9308
July 2021

आदिवासी लोक आज गतिशील झालेला दिसून येतो. प्रत्येक व्यक्ती आपले उत्पादन कसे वाढविता येईल यादृष्टिने विचार करीत आहे, त्याकरीता हे लोक शासनाच्या प्रत्येक योजनेचा फायदा घेवून आपला कौटुंबिक दर्जा वाढविण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे असे म्हणता येईल की आदिवासी लोकांमध्ये गतिशील व्यक्तीमत्व वाढत आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींची आधुनिकतेकडे वाटचाल हा लघू शोध निबंध तयार करतांना अनेक गोष्टी या अभ्यासातून समोर आल्या आहेत. हिंदुकरन, संस्कृतिकरण, नागरीकरन आणि शिक्षणाचा वाढता प्रभाव या सर्व गोष्टींमुळे आदिवासी समाज आधुनिकतेकडे वाटचाल करीत असलेला दिसून येतो. हा लघू शोध निबंध, एम.एन. श्रीनिवास, डॉ. योगेंद्र सिंह, डॉ.दुबे, आणि डॉ योगेश अटल या भारतातील आधुनिक विचारवंतांच्या विचाराशी जुळतामीळता आहे.

**निष्कर्ष** :—संशोधकाचे या जिल्ह्यामध्ये मागील २३ वर्षा पासून वास्तव्य आहे. त्यामुळे त्या वेळची आदिवासींची परीस्थिती व आजची परीस्थिती तसेच त्यावेळचे त्यांचे रहाणीमन व आजचे राहणीमान यामध्ये बरेच परीवर्तन झालेले आहे. तसेच आदिवासी भागामध्ये शिक्षणाचे वाढत असलेले जाळे आणि वाढते साक्षरतेचे प्रमाण या कारणांमुळे आदिवासी समाज आधुनिकतेकडे वाटचाल करीत आहे.तसेच आदिवासींच्या राहणीमानात झालेले परीवर्तन,भौतिक सुखसोयी, शासनाच्या विकासाच्या विविध योजना, या योजनांमुळे शेती उत्पादनात झालेली वाढ, आणि आदिवासींचे शिक्षणा विषयी असलेले सकारात्मक विचार , त्याबरोबरच आदिवासी भागात वाढत असलेले दळणवळणाची साधने वाढत असलेला सभ्य समाजाशी संबंध इत्यादी कारणांमुळे गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींची विकासाकडे वाटचाल होत असलेली दिसून येते. त्याबरोबरच आदिवासी युवकांचा राजकारणात वाढता सहभाग, आणि संविधानाने दिलेले आरक्षन या सर्व गोष्टिंचा प्रभाव आदिवासींवर झाल्यामुळे आदिवासी आधुनिकतेकडे वाटचाल करीत आहे.

**संदर्भ ग्रंथसूची**

१.डॉ. आगलावे प्रदिप — भारतीय समाज संरचनात्मक प्रश्न आणि सामाजिक समस्या—श्री.साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१८
२.डॉ. बोधनकर सुधिर — सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर, २००७
३.डॉ. गारे गाविंद — आदिवासी विकासातील दीपस्तंभ, श्री. विद्या प्रकाशन पुणे,२००३
४.डॉ. तोष्णीवाल सुभाष — समाजशास्त्रीय सिध्दांतातील नव—प्रवाह, श्री. मंगेश प्रकाशन नागपूर२०११

# भारतीय शास्त्रीय संगीत परंपरागत शिक्षण पध्दति में परिवर्तन की आवश्यकता

डॉ. मोनाली मसीह
असिस्टंट प्रोफेसर  दयानंद आर्य कन्या महाविद्यालय, जरीपटका, नागपुर.
monalimasih@gmail.com

"Necessity is the mother of all inventions"अंग्रेजी की यह कहावत निश्चित ही मानव सभ्यता और विकास की नींव है। समय—समय पर आवश्यकतानुसार हर क्षेत्र में बदलाव होते रहे हैं। शिक्षा के क्षेत्र में अतीत में बदलाव की परिस्थितियाँ बहुत कम थी। उसके सामाजिक, राजनैतिक, आर्थिक कारण हो सकते हैं। परंतु भारत में अंग्रेजी शासन काल में और उसी दौर में विज्ञान के आविष्कारों के कारण हर क्षेत्र में बदलाव आने लगे।स्वतक डंबंसमलको सरकारी आफिसों में बाबुओं की आवश्यकता महसूस हुई तो उसने आज के मास एजूकेशन की नींव डाली। देश की शिक्षा पध्दति बसें.मकनबंजपवद से उें.मकनबंजपवद की ओर चल पड़ी। आज बढ़ती हुई आजादी, साक्षरता आंदोलन, अनेक सामाजिक बुराइयों से ग्रसित, अंधविश्वास का शिकार भारतीय समाज की मुक्ति के लिये प्रजातंत्र की मजबूती के लिये और वर्तमान लोक कल्याणकारी सरकार के आव्हान ''सर्व शिक्षा अभियान'' के लिये देश के विकास के लिये उें दृ मकनबंजपवद का जन्म आवश्यक ही था।

क्या भारतीय शास्त्रीय संगीत पारंपारिक शिक्षा पध्दति में परिवर्तन की आवश्यकता है? वैसे बरसों—बरस से चली आ रही गुरू—शिष्य शिक्षण पध्दति में परिवर्तन की बात करना गुस्ताखी ही होगी। जिस प्रकार से आध्यात्म के क्षेत्र में गुरू का स्थान अटल है, भारतीय शास्त्रीय संगीत में भी गुरू का स्थान अटल है। आध्यात्म में जहाँ संत कबीरदासजी के शब्दों में —

''गुरू गोविंद दोऊ खड़े काके लागू पाय
बलिहारी गुरू आपने गोविंद दियो बताय''

गुरू की महत्ता स्पष्ट होती है। उसी प्रकार से संगीत में भी —

''गुरू बिन कैसे गुण गावें'', ''गुरू न माने तो गुण नहीं आवे'' गुरू का स्थान सादर निश्चित है। तो फिर परिवर्तन क्यों और किस बात का! सहस्त्रों वर्षों में संगीत शिक्षण पध्दति के बदलाव के लिये कोई बात उठी नहीं, फिर आज क्यों?

भारत देश परंपराओं का देश है। परंपराओं का पालन बड़े आदर एवं भक्ति भाव के साथ किया जाता है। परंपराओं का आधार आध्यात्म रहा है जिसके परिणाम स्वरूप देश की सभ्यता—संस्कृति का मूलभूत अस्तित्व आज भी शाश्वत—रूप से टिका हुआ है। भारतीय शास्त्रीय संगीत का आधार और उद्‌गम भी आध्यात्म रहा है। आध्यात्म और परंपराओं के कारण भारतीय शास्त्रीय संगीत भी अपने मूल अस्तित्व में टिका है। जैसे माना जाता है कि भारतीय शास्त्रीय संगीत दैवीय प्रेरणा से हमारे ऋषि मुनियों को प्राप्त हुआ। सामवेद इस बात की पुष्टि करता है। प्रारंभ में संगीत प्रमुख रूप से भक्ति आराधना का साधन था। संगीत के स्वर मंदिरों में गूंजते थे जहाँ संगीत सुना जा सकता था। संगीत सीखने के लिये गुरूओं के आश्रम में जाना पड़ता था। वहाँ आश्रम में गुरू की जी जान से सेवा करना, गुरू को प्रसन्न करना और फिर जो ज्ञान गुरू से प्राप्त हो उसे बड़ी विनम्रता एवं कृतज्ञतापूर्वक ग्रहण करना।

समय के साथ संगीत के प्रकार में, स्वरूप में परिवर्तन आते गये परंतु सीखने—सिखाने की पध्दति ज्यों की त्यों बनी रही। इसी गुरू—शिष्य शिक्षण पध्दति में से घराना परंपरा का उदय हुआ जिसमें भारतीय शास्त्रीय संगीत प्रभावशाली ढंग से पला, फूला—फला और पनपा। इसमें कोई शंका नही कि इन दो परंपराओं के कारण भारतीय शास्त्रीय संगीत विश्व मे एक उच्च कोटि का संगीत अपनी मौलिकता लिये स्थापित है।

आज वर्तमान में, संगीत शिक्षण पध्दति में परिवर्तन का जो प्रश्न उठ खड़ा हुआ है उसका प्रमुख कारण आज की दौड़ती भागती ज़िंदगी में परिवर्तनों की बौछार, नये आयामो की गदर जिनमें मानव—मन बुरी तरह से उलझता जा रहा है। विज्ञान युग के पहले मानव जीवन मंद गति

से चलता रहा है। बदलाव की गति एकदम मद्दम—नही के बराबर। शायद गति का नज़ारा आज की तुलना में था ही नहीं। ज़िंदगी एक ही ढर्रे में घूमती थी। अतीत और वर्तमान की गतिशीलता की तुलना करते आधुनिक दार्शनिक CEM Joad's अपनी पुस्तक The story of civilization में लिखते हैं — १५०० वर्ष पूर्व लोग जिस बग्घी में यात्रा करते थे, १५०० वर्ष बाद भी वही बग्घी में यात्रा होती थी, कोई फर्क नहीं। परंतु रेल्वे इंजिन के आविष्कार के बाद तो आविष्कारों का ताता ही लग गया। ग्रामाफोन, रेडियो, टी.व्ही., टेप रिकार्डर अन्य रिकार्डिंग के उपकरण, एम्प्लीफायर, साउंड सिस्टम और भी ध्वनि से संबंधित अनेक उपकरणों का आविष्कार। और पिछले २५—३० वर्षों में तो कंप्यूटर साइंस ने जो प्रगति की है वह कल्पना के परे है, वर्णन के बाहर है।

अतीत में संगीत मंदिरों में, गुरू—आश्रमों में या राजा महाराजाओं के महलों की दीवारों के भीतर सुनाई देता था। सीखने की ललक है तो बस गुरू चरणों में स्वयं को पूर्ण रूप से समर्पित करो। वो ही सीख सकता था जिसमें जन्मजात प्रतिभा हो, दिल में संगीत के लिये दीवानगी हो, कठोर से कठोर परिश्रम करने की धमक हो, घर—बार —परिवार सब प्रकार के आकर्षण छोड़ने की तैयारी हो। गुरू के अलावा और कहीं भी सीखने का साधन नहीं था। आज का वातावरण, आज की परिस्थितियाँ एकदम भिन्न हैं। अतीत में संगीत सीखना एक कठोर साधना तपस्या थी। आज साधना—तपस्या एक समस्या है। वृक्षो से भरे जंगल कॉंक्रीट के जंगलों में परिवर्तित हो गये हैं; पर्वतों पर तो घसरने का खतरा पैदा हो गया है। फिर पुराने जमाने की शुध्द हवा कहाँ रही, प्रदूषण मुक्त भोजन कहाँ रहा! बिना एकांत के एकाग्रता कहाँ! बिना अच्छे शारीरिक स्वास्थ्य के साधना करने के लिये आवश्यक स्टेमिना कहाँ! और फिर आज की ग्लेमर से घिरी जिंदगी में, Whatsapp mobile की बार—बार बनजे वाली रिंग, परिवार के सदस्यों की सहमति सहयोग की समस्या इन समस्याओं के अलावा संगीत सीखने के अनेक रास्ते खुल गये हैं— भले ही गुरू से प्राप्त ज्ञान की गहराई—ऊँचाई न हो पर पुरानी`व बंससमक उवदवचवसल सपाम`पजनंजपवद आज नहीं रही। रेडियों है, टी.व्ही है, इंटरनेट है और क्या—क्या नहीं है। फिल्म संगीत, पॉप, जाज, हिपहाप और भी विदेशी संगीत विदेशी वाद्यो के प्रति आकर्षण। कार्यक्रमों के प्रस्तुतिकरण में भी भारी परिवर्तन आ गया है। श्रोताओं की पसंद भी बट गयी है। कानूनी बंधनों के कारण समय सीमा निर्धारण के अंतर्गत कार्यक्रमों का समापन अनिवार्य हो गया है। पुराने जमाने में लाउड स्पीकर्स नहीं थे। १००—५० लोगों के लिये भी राजा—महाराजाओं को accostics को ध्यान में रखते हुए संगीत के लिये महल बनवाने पड़ते थे। रानी रूपमती का मध्य प्रदेश मांडू में बना महल या फतहपुर सीकरी में संगीत के लिये बनी इमारत ऊँचे—ऊँचे गुंबज — आज वो स्थिति नही है। पुराने जमाने में गुरू शिष्य को जोर से गाने की शिक्षा देते थे — खुली आवाज में गाओ.. .. मुँह खोलकर गाओ, ''गला दबाकर'' मत गाओ भले ही at the cost of melody क्यों न हो। गायक कलाकार होता है और कलाकार स्वयं का नहीं संपूर्ण जन मानस का होता है। उसे तो लोगों के लिये गाना होता है। इसलिये श्रोताओं को तो किसी भी हालत में नज़र अंदाज नहीं किया जा सकता। कहते हैं पुराने ज़माने में बीसवी शताब्दी के प्रारंभ में गोहर जान या छप्पन छुरी वाली जैसे गायिकाओं की आवाज राज की खामोशी में १.१) मील तक सुनाई देती थी। बात अतिशयोक्ति भी लगे तब भी स्पष्ट है कि गुरू की जोर से गाने की ज्तंपदपदह तो देनी ही पडती होगी।

अतीत में मनोरंजन के साधन सीमित, जीवन की गतिविधियाँ सीमित थीं। रातें अंधेरी होती थी, लोगों के पास समय ही समय था। श्रोता रातभर गाना सुनते थे, सुन सकते थे। लम्बे आलाप, विलंबित ख्याल, छोटा ख्याल, मध्य लय, तीव्र लय, तराना— यह सब आज संभव नहीं। पंडित रविशंकरजी पाँच घंटे आलाप झाला सितार पर बजाते रहे, तबला वादक के साथ श्रोता तल्लीन हो सुनते रहे, न कोई उठा न कोई सोया। आज तो इतना लम्बा आलाप—झाला कोई सुन नहीं सकता। पसंद इतनी बदली है कि केवल एक कलाकार को लगातार सुनना लोग पसंद नहीं करते। शास्त्रीय संगीत की बात तो दूर रही, जगजीत सिंग जी को अपनी गज़ल को रोककर तबले वाले को, व्हायलीन वाले को सितार वाले को बजाने का मौका देना पड़ता है यहाँ तक कि श्रोताओं को भी साथ गाने का आग्रह करना पड़ता है। शास्त्रीय संगीत में भी फ्यूजन संगीत के कारण

ISSN : 2278-9308
July 2021

गायन के साथ बांसरी वादन भी चलता है, सितार वादन भी चलता है... प्रस्तुतिकरण में इतना बदलाव आया है कि सुजात खां साहब अपनी सितार बजाते बजाते गज़ल भी गाने लगे हैं।

पाश्चात्य सभ्यता—संस्कृति के विध्वंसात्मक आक्रमण से भारतीय जीवन—शैली जीवन के प्रति दृष्टिकोण पर बुरा प्रभाव पड़ा है। भारतीय शास्त्रीय संगीत भी प्रभावित है। हमारे मूलभूत वाद्य—तबला, तानपूरा हार्मोनियम का स्थान कांगो बोंगो या electronic वाद्यों ने ले लिया है। वाद्यों की दुकानों में गिटार, की—बोर्ड ड्रम सेट इत्यादि ज्यादा दिखाई देंगे।

इन परिवर्तनों को आकर्षणों को ध्यान में रखते हुए अपने संगीत के अस्तित्व, उसकी पहचान एवं गरिमा को किस प्रकार से सुरक्षित रखा जाय, उसे किस प्रकार से आकर्षक बनाया जाय इसके लिये पारंपरिक शास्त्रीय शिक्षण पध्दति में नये आयामों की शोध करने की आवश्यकता होगी।

आज के भौतिकवादी वातावरण में धन संपत्ति बढ़ी है— परिणाम स्वरूप अहंकार भी बढ़ा है। क्या सीखने की इच्छा रखने वाले का ''मैं'' कठोर अनुशासन, समर्पण, आदर निष्ठा, सहनशीलता धीरज की भावना को स्वीकार कर पायेगा— एक बीहड़ प्रश्न है। यह बात अमान्य नहीं की जा सकती कि संगीत के ''घरानों'' ने शास्त्रीय संगीत को अपनी मजबूत दीवारों में पनपाते हुए उसे सम्हाले रखा है— उसकी मूल—नींव को धँसने नहीं दिया है। जब घरानों का जन्म और विकास हुआ तब परिस्थितियाँ एकदम भिन्न थीं। संगीत सीखने की इच्छा आकांक्षा रखने वाले को गुरू के पास ही जाना पड़ता था। सीखने की ललक इतनी तीव्र होती थी कि सब प्रकार के प्रतिबंध उसे स्वीकार्य थे। आज मगचवेनतम का विस्तार इतना बढ़ चुका है और 'ग्लॅमरीय' वातावरण के आकर्षणों में रहने वाला बच्चा घरानों की दीवारों में स्वयं को कितना टिका पायेगा?

शास्त्रीय संगीत की प्रारंभिक शिक्षा पध्दति और सिखाने का context इस प्रकार के हों ताकि विद्यार्थी की चाह बढ़े ना कि वह भागनें का विचार करे। सिखाने का तरीका, सरगम, अलंकारों के प्रकार में, रियाज के तरीकों में आकर्षण निर्माण करने वाली बदल जो कि विद्यार्थी को पकडे रहे...... इत्यादि मुद्दों पर चर्चा विचार करने की आवश्यकता है। आज की शिक्षा पध्दति अर्थात Mass-education में संगीत विषय को सिखाना। भारतीय शास्त्रीय संगीत के प्रति सीखने सिखाने वालों की सोच अन्य विषयों के प्रति जो सोच होती है— उससे अलग होना अत्यंत आवश्यक है। भारतीय शास्त्रीय संगीत हमारी सहस्त्रों वर्षो से संचित उच्च कोटि की सांस्कृतिक विरासत का आइना है, विश्व में हमारी संस्कृति की पहचान है, उसका संरक्षण, संवर्धन करने के लिये विद्यार्थियों को प्रवृत करना, प्रेरित करना सिखाने वालों का पावन कर्तव्य है। पंडित भातखंडे और पंडित डी.व्ही. पलुस्कर के संघर्षमय अथक परिश्रम से प्राप्त स्वर—लिपी और उसमें संचित बरसों की संगीत निधि भारतीय शास्त्रीय संगीत के लिये अनुपम देन है। अलौकिक शक्तियाँ भी किस तरह से प्रेरणा देती हैं इसके जीते जागते उदाहरण — पंडित भातखंडे एवं पंडित पलुस्कर आधुनिक शिक्षण पध्दति में पुस्तकों के बिना शिक्षण कैसे हो सकता है? साथ ही संगीत की संचित संपत्ति बनी रहे— संगीत गुरूओं के प्रयाण के साथ उसका भी विलोप हो न जाय इसके लिये इन दो महान व्यक्तित्व का योगदान बहुत बड़ा है।

अंत में, पुनश्च: यह बात समझनी और मान्य करनी है कि गुरू का स्थान अटल है, गुरू बिन ज्ञान नहीं, गुरू बिन मार्ग भी नहीं। अत: गुरू को ही परिस्थितियों का आकलन करते हुए शिक्षण पध्दति को सरस, आकर्षक बनाना है, साथ ही आज के कार्यक्रमों के प्रस्तुतिकरण तथा श्रोताओं की मानसिकता, रूझान, समय बंधन को ध्यान में रखते हुए शिष्यों को ऐसी Training nsa ताकि वे कार्यक्रमों की सफलता के लिये कुशल कलाकार बन सके।

Ref : internet
निबंध संगीत : लक्ष्मी नारायण गर्ग

**B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal**

**Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)**

**ISSN : 2278-9308**
**July 2021**

# खते व कीटकनाशकांचा वाढता वापर — यवतमाळ जिल्ह्याचे भौगोलिक अध्ययन.

कु. मयुरी नंदकुमार ठाकरे (गावंडे)
धनवटे नॅशनल कॉलेज ,नागपूर.
Email ID-mayurigawande225@gmail.com ,Contact No. 8888874330/8459643329.

**प्रस्तावना :**

कृषीतून जास्तीत जास्त उत्पादन करणे हे सद्यास्थितितील कृषीचे उद्दिष्टे आहे. आपल्या देशाचा संपूर्ण विकास शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे शेती हे केवळ उदरनिर्वाहाचे साधन राहिले नसून मानव कृषी व्यवसायाकडे व्यापारी तत्वावर बघू लागला आहे. म्हणूनच शेतीकडे ''उद्योग'' म्हणून पाहण्यात येत आहे. अलिकडील काळात औद्योगिक क्रांती झाल्याने कृषीतंत्रज्ञान विकसित होऊन शेतीमध्ये आमुलाग्र बदल आले. त्यात अवजारे, सुधारित बी—बियाणे आणि किटकनाशके यांचा समावेश आहे. कारण झपाटयाने उत्पादन वाढीसाठी सेंद्रिय व रासायनिक खतांचा वापर मोठया प्रमाणात होऊ लागला. या सर्व घटकामुळे शेती उत्पादनात वाढझाली. कृषी परिसंस्थेमध्ये वाढती लोकसंख्या व वाढत्या लोकसंख्येला वाढत जाणारी अन्नाची मागणी पूर्ण करण्यासाठी उत्पादनात वाढ करणे गरजेचे होते. यातूनच १९६८ मध्ये ''सोसायटी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट, वॉशिंग्टन'' येथे प्रथमत: हरितक्रांती या (Green Revolution) या संज्ञेचा वापर केला. त्यांच्या भाषणाचा विषय "The Green Revolution : Accomplishment & Apprehensions" असा होतो. विकसनशील देशात या क्रांतीमुळे अन्न उत्पादनामध्ये महत्वाचे बदल झाल्याचे त्यांनी निदर्शनास आले. व अन्नाच्या तुटवडयाची समस्या (अडथळा) दूर झाली. हरितक्रांती ही मुख्य आणि अन्न उत्पादन वाढवणारी पहिली पायरी ठरली. यानंतर नवनवीन शोध, अनुकरण व जास्त उत्पादन देणाऱ्या जाती व नवीन तंत्रज्ञानाचा प्रसार यामुळे कृषीचे चित्र पालटले. त्यामुळे दारिद्र, भुकबळी, कुपोषण, व मोठया प्रमाणावर उपासमार यासारख्या समस्या निर्माण झाल्या, यावर कृषी नवीन कृषी धोरणांचा परिणाम होऊ लागला. (सुरेश फुले) विकसनशील देशामध्ये जास्त उत्पादन देणाऱ्या जाती बी—बियाणे व किटकनाशके यांच्या वापरामुळे उत्पादनात वाढझाली. परिणामत: या बी—बियाणे व किटकनाशकांच्या सुधारित जाती निर्माण होऊ लागल्या आणि यामध्ये कमी कालावधीत व कमी पाणीपुरवठयात जास्त उत्पादन घेणारी बी—बियाणे तयार केली गेली. त्याचा परिणाम जास्त पिके घेणे सहज शक्य झाले. या सर्वांची परिणीती म्हणजे अन्न धान्याचा प्रश्न सुटला मात्र त्यातन अनेक समस्या निर्माण झाल्या.

**अभ्यासाची उद्दिष्टे :—**




१)यवतमाळ जिल्ह्यातील मृदेची रचना व गुणवत्ता /पोत अभ्यासणे.

२)यवतमाळ जिल्ह्यातील खतांचा व किटनाशकांचा वापर अभ्यासणे.

**अभ्यास क्षेत्राची भौगोलिक ओळख :—**

यवतमाळ जिल्हा हा १९°—२६' ते २०°—४२' आणि पूर्व रेखांश ७७°— १८' ते ७९°—९८' अक्षांश या दरम्यान वसलेला आहे. यवतमाळ जिल्ह्याचे क्षेत्र विस्तृत असून क्षेत्रफळाच्या विभागातील सर्व जिल्ह्यातील मोठे क्षेत्र आहे. महाराष्ट्राच्या तुलनेत ६ व्या क्रमांकावर आहे. यवतमाळ जिल्ह्यातील पूर्व दक्षिण नैसर्गिक सीमा प्राप्त झाल्या आहेत. जिल्ह्ययाच्या उत्तरेस वाशिम

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)

ISSN : 2278-9308
July 2021

व अमरावती हे दोन जिल्हे पश्चिमेसपरभणी, पूर्वेस चंद्रपूर व वर्धा आणि दक्षिणेस नांदेड व आंध्र प्रदेशातील आदिलाबाद जिल्हा आहे. यवतमाळचे क्षेत्रफळ १३,५८४ चौ.की.मी. आहे. हे क्षेत्रफळ महाराष्ट राज्याच्या ४.४: आहे.यवतमाळ जिल्ह्यातील १६ तालुके आहेत. यामध्ये यवतमाळ, पुसद, केळापूर, दारव्हा,नेर, वणी, दिग्रस, बाभूळगांव, महागुांव, उमरेड, राळेगांव, मारेगांव, घाटंजी, कळंब, झरीजामणी इत्यादी तालुके आहेत. यवतमाळ जिल्ह्याच्या पूर्व व उत्तर दिशेला अजिंठा डोंगराच्या रांगा आहेत. जिल्ह्याच्या पूर्वेस वर्धा नदी तर दक्षिणेस पैनगंगा नदी आहे. मध्यभागात उत्तुंग घाट असून समुद्रसपाटी या घाटांची ऊंची ३००—५०० मीटर आहे. जिल्ह्याची मृदा सुपीक आहे. पैनगंगा व वर्धा या प्रमुख नद्या यवतमाळ जिल्ह्यात आहेत. या नद्या अनुक्रमे ईशान्य व दक्षिण सीमेवरून वाहतात. २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या २७,७५,४५७ असून हे प्रमाण महाराष्ट्राच्या लोकसंख्या २.४७ : आहे. ७८.४१ टक्के लोक ग्रामीण भागात तर २१.५९ टक्के लोक शहरी भागात राहतात.

**खते व कीटकनाशकांच्या वाढत्या वापराचे मृदा व जल संपदेवर होणारे दुष्परिणाम :—**

वाढत्या लोकसंख्येची मागणी पूर्ण करण्यासाठी जास्त उत्पादन देणाऱ्या जाती व कृषीमधील नवा बदल यामुळे धान्य, भाजीपाला, उत्पादनात वाढझाली. मात्र यातून प्रादेशिक असमतोल निर्माण झाला. यामध्ये सामाजिक व आर्थिक प्रश्नांची गुंतागुंतवाढत गेली. आधुनिक कृषी तंत्रज्ञानात एकाच वेळी राबविणे शक्य नाही. त्यामुळे दोन प्रदेशात आर्थिक, सामाजिक तफावत निर्माण झाली. या प्रश्नांची गुंतागुंत सोडवणूक करण्यात जमिनीतून सातत्याने पीके घेतल्याने जमिनीचा कस कमी होतो. म्हणूनच त्या जमिनीचा पोत सुधारण्याकरीता कृषक खतांचा व विविध पध्दतीचा अवलंब करीतो. जमिनीमध्ये कोणत्याही प्रकारचे पीक घेतल्यास जमिनीतील ''नायट्रोजन व फॉस्फरस'' ते पीक शोषून घेतो. म्हणून जमिनीस खतांची गरज असते. शेणखत, सोनखत तसेच रासायनिक खते देऊन जमिनीचा पोत सुधारता येतो मात्र हल्ली सेंद्रिय खतांचा वापर कमी व रासायनिक खतांचा वापर वाढल्याने दिवसेंदिवस ''मृदेचे आरोग्यव मानव आरोग्य '' खालावलेले दिसून येते.

यवतमाळ जिल्ह्यातील गेल्या काही वर्षाचा खते व कीटकनाशकांच्या वापराच्या अहवाल लक्षात घेतला तर असे निदर्शनास येते की, दिवसेंदिवस खते व कीटकनाशकांच्या वापरातवाढ होत आहे.

**यवतमाळ जिल्ह्यातील खते व कीटकनाशकांचा वापर (मे.टनामध्ये)**

| अ.क्रं. | वर्ष | रासायनिक | जैविक |
|---|---|---|---|
| १ | २०१५-१६ | ११ हजार६६५ | १ हजार १७३ |
| २ | २०१६-१७ | १३ हजार ४९६ | १ हजार४५४ |
| ३ | २०१७-१८ | १५ हजार ५६८ | १ हजार२७१ |

वरील कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार जिल्ह्यात रासायनिक खते व कीटकनाशकांच्या वापर १६६७-१६६८ मध्ये २ हजार ५२६ मे. टन. होता. त्यात वाढ होऊन १६६८-१६ॉ६ मध्ये तो ३ हजार ५२८ मे. टन. झाला. दरवर्षी सातत्याने त्यात वाढ होत असून १६ॉ६-ॉ७ या वर्षात घह्व हजार ४५७ मे.टन. वापर झाल्याची नोंद आहे. तसेच दरवर्षी या वापरात वाढ होताना आढळते.

पीक उत्पादनात वाढ करणे हे एकच उद्दीष्ट्ये सध्या शेतकऱ्यांच्याडोळयासमोर आहे. कारण हल्ली शेतीकडे पाहण्याचा दृष्टीकोन उदरनिर्वाह स्वरूपाचा नसून तो व्यापारी स्वरूपाचा आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या शेतजमिनीतून दरवर्षी पिकांचे उत्पादन होत राहिल्यास मृदेची उत्पादन क्षमता कमी होत जाते. तसेच विशिष्ट पिकांच्या वाढीसाठी मृदेतील विशिष्ट घटक द्रव्यांची कमी अधिक प्रमाणात आवश्यकता असते. त्यामुळे मृदेतील घटक द्रव्यांचे प्रमाण बदलते. मृदेचा कस कमी होतो. मृदेचा कस टिकून राहावा व



**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

उत्पादन क्षमता वाढावी यासाठी मृदेला खत पुरवठा करणे आवश्यक आहे. गेल्या काही दशकांपासून रासायनिक खताचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. रासायनिक खते विविध प्रकारची असतात. उदा. फॉस्फेट, सल्फेट, नायट्रेट, युरिया वगैरे जमिनीला ज्या घटक द्रव्यांची आवश्यकता असते ते घटकद्रव्ये असलेले रासायनिक खत वापरण्यास मृदेतील त्या विशिष्ट घटकांचे प्रमाण वाढविता येते. त्यामुळे पिकांची वाढ जोमाने होते. उत्पादनात वाढ होते, मात्र मृदेची तपासणी करून त्या घटकांची कमतरता शोधून काढणे गरजेचे आहे; त्याच बरोबर कोणत्या रासायनिक खतांचा वापर करावा व किती प्रमाणात करावा ही माहिती असणे गरजेचे ठरते. रासायनिक खते व किटकनाशके वापरून उत्पादनात वाढ होत असली तरी रासायनिक खतांचा अतिवापर केल्यास मृदा कडक बनते व मृदेतील ह्युमसचे प्रमाण कमी होते. त्यासाठी रासायनिक खतांचा वापर योग्य प्रमाणात करणे व रासायनिक खतांवर इतर पूरक अन्नद्रव्ये व सूक्ष्म अन्नद्रव्ये देणे फायद्याचे ठरते. येत्या काळाची गरज ओळखून वाढत्या लोकसंख्येला भासणारी अन्नाची गरज पूर्ण करण्यासाठी अन्नधान्ये उत्पादन वाढविणे गरजेचे आहे.

मातीचे आरोग्य चार प्रमुख कार्याच्या देखभालीवर अवलंबून आहे. कार्बन परिवर्तन (ट्रान्सफोर्मेशन), पौष्टिक चक्र, माती रचना देखभाल आणि किटक तसेच रोगांचे नियमन यापैकी प्रत्येक कार्य विविध प्रकारच्या जैविक प्रक्रियेचा एकत्रित स्वरुपात प्रकार हाते, ज्यात अभिसरणशील माती वातावरणाच्या प्रभावाखाली विविध प्रकारच्या जैविक प्रक्रियेचा समावेश होतो. कृषी हस्तक्षेपाचा प्रभावाचे अनेक प्रतिकांचे (मॉडेल) विश्लेषण अध्ययनात केलेले आढळते. मात्र या प्रत्येक कार्यामधील परस्पर संवादाचे अत्यंत समकालीन नमुना याची पुष्टि करते आणि त्या निष्कर्षावरून अनुमान काढता येतो. जीव प्रक्रिया किंवा मातीच्या गुणधर्माच्या प्रत्येक गटात मृदेच्या आरोग्याची स्थिती दर्शविण्याकरीता पुरेसे नाही. आणखी एक अनुमान मृदेच्या आरोग्याच्या मुल्यांकन करण्यासाठी अनेक संस्था कार्यरत आहे; मात्र त्यातूनही मृदेचे आरोग्य संवर्धन होत नाही. आरोग्य जोपासणे ही काळाची गरज बनली आहे. मृदा आरोग्य (प्रत) ही मृदेची क्षमता पर्यावरण आणि जमिन वापराच्या सीमेवर एक महत्वाची सजीव प्रणाली म्हणून कार्य करण्याची क्षमता आहे. वनस्पती आणि प्राण्यांची उत्पादकता टिकवून राखण्यासाठी किंवा वृध्दींगत करण्यासाठी आणि वनस्पती तसेच प्राण्यांच्या आरोग्यास चालना देणारी आहे.

मृदेच्या आरोग्यामध्ये (अश्रोपोलेनिक घट) आणि मृदेच्या गुणवत्तेच्या वैयक्तिक घटकांपैकी एक पर्यावरणीय चिंता आहे. अमिरिकेमध्ये ''१ नोव्हेंबर २०००'' मध्ये मातीचे महत्व व उपयोगिता जागरूकता वाढविण्यासाठी मृदेचे आरोग्य; जैविक घटकांचे व्यवस्थापन या विषयावर परिषद आयोजित करण्यात आली. (जॉन डब्ल्यू डोरन, मायकेल आर झिस – १ नोव्हेंबर २०००)
उपयोजित मृदेच्या आरोग्याचे मूल्यांकन प्रतीच्या तीन मापदंडानुसार करण्यात येते.

१)भौतिक – सामु. क्षार, मृदेतील सेंद्रिय घटक
PH – Salinity – Soil Organic Matter
२)रासायनिक– पोत, पाणी धरून ठेवण्याची क्षमता
Texture, water holding capacity
३)जैविक –सुक्ष्मजीव श्वसन क्रिया.Microbial Activity
soil respiration




वरील मापदंडानुसार मृदेचे परीक्षण केले जात असले तरी मृदेचे आरोग्य जोपासले जात नाही; विकसनशील देशात शेतकरी वर्ग हा अशिक्षित आढळतो. त्यामुळे कृषी समस्या, आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग, वापर कसा करावा या विषयी अद्यापही जागृती शेतकऱ्यास व शेतमजुरास नाही. त्यामुळे कृषीतील अन्नधान्य मागणी पूर्ण करण्यासाठी त्याचबरोबर व्यापारी शेती उद्दिष्टे कृषकांच्या डोळयासमोर असल्यामुळे खते व किटकनाशकांचा वापर मोठ्या प्रमाणावर करू लागला. तसेच मृदेचे परीक्षण ग्रामीण पातळीवर केले जात असले तरी मृदेतील कोणता घटक कमी आहे आणि त्या घटकाला कोणत्या रसायनांची मात्रा कश्या प्रकारे आणि किती प्रमाणात द्यावी कृषकाला माहिती नाही. त्याच बरोबर किटकनाशके फवारणी करतांना पोशाख कसा असावा आणि कुठल्या प्रकारची काळजी घ्यावी या बाबतही

ISSN : 2278-9308
July 2021

अज्ञात आहे. त्यामुळे दरवर्षी शेतमजुर मरणाला बळी पडतात तर काही आजारांनी ग्रस्त आढळतात. त्याचबरोबर या रासायनिक खते व किटकनाशके यांच्या वापरामुळे मृदेचे आरोग्य धोक्यात आले आहे. जमिनी कडक बनत असून सुपीक मृदेचा ऱ्हास होत आहे व मृदेचे जैविक चक्रही नष्ट झाले आहे.

उदा. : गांडूळ हा शेतकऱ्यांचा मित्र असून अलीकडे शेतीमध्ये गांडुळ क्वचितच प्रमाणात दिसून येतो. रासायनिक खते व किटकनाशके यांच्या वापरामुळे गांडूळचे प्रमाण कमी झाले आहे. त्याच बरोबर याच मृदेचा वापर करून कृषक शेती करतो. अन्नधान्य उत्पादन घेतो तर या करिता रासायनिक खते व किटकनाशके यांचा वापर मोठ्या प्रमाणात करतो. त्यामुळे अन्नधान्य उत्पादनात वाढझाली मात्र मानवी शरीराला आवश्यक जीवनसत्वे व पोषकद्रव्ये यांची हानी झाली. त्यामुळे मनुष्य अनेक रोगांना बळी पडलेला दिसून येतो. मानवाच्या आरोग्यावर तेथील भौगोलिक परिस्थिती व वातावरणाचा परिणाम होत असतो. यांच्या शास्त्रोक्त अभ्यासाला भौगोलिक वैद्यकशास्त्र असे म्हणतात. (Briley Amanda २०१०) आपण एल्मस झाडावर फवारणी करतो आणि पुढच्याच वर्षी या झाडावर गाणाऱ्या रॉबिन्स पक्ष्यांचे गाणे ऐकू येत नाही. रॉबिन्स पक्ष्यावर जरी आपण फवारणी केली नसली तरीही झाडांवर फवारलेले विष टप्याटप्प्याने एल्मस झाडाकडून गांडूळात व गांडूळाकडून रॉबिन्स पक्ष्यांपर्यन्त पोहोचते. (Rechel Carson (२७ Spt. १९६२) Silent Spring)

रासायनिक खतांच्या वापरामुळे केवळ मानवी आरोग्य नाही तर संपूर्ण सजीव समूहाची हानी घडून आली असून निसर्ग समुह समस्यांनी ग्रस्त असलेला आढळतो. त्यात वनस्पती, पक्षी, प्राणी यांनाही वेगवेगळया समस्या निर्माण झालेल्या आढळून येतात. कारण रासायनिक खते हे जमिनीत पुरविली जातात. त्यामुळे पाण्याबरोबर ते जमिनीत मुरतात व बाह्य भागावरील पाण्याबरोबर नदी नाल्यावाटे वाहत जातात. काही वनस्पतीला तर कुठे नदी नाल्याद्वारे पशू व पक्षी किंबहुना ग्रामीण भागात मानवी शरीरात जातात. तर किटकनाशके हे फवारणी करतांना श्वसन क्रियेतून शरीरात प्रवेश करतात. त्यामुळे अनेक रोगांचा प्रादुर्भाव होतो.उदा. : अस्थमा, टी.बी. श्वसनाचे विविध आजार होण्याची संभावना असते. मानवाची पचन क्षमता, मलमूत्र विसर्जन क्षमता, विविध हाडांचे आजार, पोटांचे आजार हे मुख्यत: पेयजलावर अवलंबून असतात. (Briley Amanda 2010) भारतात प्रामुख्याने पेयजलाचा स्त्रोत हे भूगर्भातील जलावर अवलंबून असतात. रासायनिक खते व किटकनाशके यांच्या अति वापरामूळे जमिनीतील किंवा मृदेची पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी झाल्यामुळे ही रसायने सरळ भूगर्भात प्रवेश करतात तर काही वाहून सरळ जलाशयाला मिळतात त्यामुळे अनेक समस्या व आजार निर्माण होतात.

रासायनिक खतांचा वापर दिवसेंदिवस वाढत्या लोकसंख्येमुळे व शेतीचे उत्पन्न वाढवण्याच्या नादात अनिर्बंधपणे वाढत आहे. भारतासारख्या अविकसित देशात रासायनिक खतांचा वापर वाढत असल्याने प्रदूषणाचा धोका सतत वाढला आहे. जंतुनाशकातील ऑरगॅनो क्लोरीन व ऑरगॅनो फॉस्फेटमुळे मोठया प्रमाणावर पाण्याचे प्रदूषण होते. आशियाई राष्ट्रांमध्ये मानवी कारणांमुळे नद्यांच्या पाण्यात होणारे सेंद्रिय द्रव्यांचे प्रदूषण भयकंर आहे. या प्रदूषणामध्ये अर्धवट विरघळलेली घनद्रव्ये जसजशी पाण्यात कुजतात तसतसे त्यातील ऑक्सीजनचे प्रमाण कमी होते. याचा परिणाम पाण्यातील परिसंस्थांवर होऊ लागतो. घरगुती वापरातील पाणी नायट्रोजन फॉस्फरस संयुगाने युक्त असते. त्यामुळे पाण्यामध्ये प्राथमिक स्वरूपाच्या वनस्पतीची वेगाने वाढ होते व ऑक्सीजनची पातळी कमी झाल्याने पाण्यातील सजीवांना धोका निर्माण होतो. यालाच पाण्यातील ऑक्सीजनचा क्षय म्हणतात. पाण्यातील ही ऑक्सीजनची कमतरता शेतीतील रासायनिक खतांचा वापर व मानवी भागातील सांडपाण्यामुळे अधिक तीव्र होते. अश्या अनेक समस्या निर्माण झाल्या. याकरिता भौगोलिक घटकांशिवाय रासायनिक घटंकांची व मानवी घटकांची भूमिका तेवढीच महत्वपूर्ण आहे. यामध्ये अनेक स्थानिक प्रजाती नष्ट होत आहे. थोडक्यात महत्वाचे म्हणजे आतापर्यंत केवळ कारखाने, वाहने, वायु व जलप्रदूषण करीत होते. मात्र आता नवीन तंत्रज्ञानामुळे शेतीच्या माध्यमातून जे नवीन प्रदूषण वाढले आहे व जैवविविधतेला धोका निर्माण झाला आहे त्याचे काय ? या सर्व प्रश्नांची उत्तरे नविन तंत्रज्ञानाची दीर्घकाळात घातक बाजू दर्शविणारी आहेत.

ISSN : 2278-9308 July 2021

**—: संदर्भग्रंथ :—**


- अहिराव, अलिझाड, धपाटे, वराडे, भोस (१९८६): ''पर्यावरण विज्ञान'', निराली पब्लिकेशन, पुणे (पेज नं. १६८—१६९)
- कुंभारे अरूण राजाराम (२०१३) : ष्कृषी भूगोलष, पायल पब्लिकेशन, कर्वे रस्ता, पुणे (पेज नं. १८—१९)
- जगन्नाथ शिंदे (२०१७) : कृषी रसायने (पेज नं..१४२—१४८चिपळुणकर प्रताप (२०१५) रू ष्जमिनीची सुपिकताष (पेज नं. १४२—१४५)
- पाटील विशाल (२०१६) किटकनाशके, बुरशीनाशके व पीक संवर्धके (पेज नं. ८२—९८)
- फुले सुरेश (२००६) रू ''कृषी भूगोल'' विद्याभारती प्रकाशन, लातूर. (पेज नं. २१९—२२०)
- जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)

ISSN : 2278-9308
July 2021

# 'डॉ. आंबेडकरांचे जातिव्यवस्था निर्मूलनातील योगदान'

**डॉ. मधुरा प्रतापसिंह मोहिते**

सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,महिला महाविद्यालय, कराड, जिल्हा – सातारा

Email: mpmkarad@gmail.com,Mobile no.9960083640

**गोषवारा :**

ख—या अर्थाने जातिसंस्थेचा शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास १९ व्या शतकात विशेषत: ब्रिटीश राजवटीत होउ लागला. परंपराभिमानी व नवशिक्षितांची पिढी यांच्यातील वाद—प्रतिवादातून जातिसंस्थेविषयक अभ्यासाला चालना मिळाली.भारतातील जातिव्यवस्था व जातिव्यवस्थेचे दुष्परिणाम डॉ. आंबेडकरानी स्वत: अनुभवले होते. त्याबाबत सखोल चिंतन करून त्यांनी जातिव्यवस्था निर्मूलनाविषयी मौलीक विचार मांडले आहेत. त्यासाठी डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा अभ्यास अत्यंत उपयुक्त ठरू शकतो, म्हणून प्रस्तुत विषय शोधनिबंधासाठी निवडला आहे.

वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था हे हिंदू समाजाचे एक मूलभूत वैशिष्टय आहे. डॉ. आंबेडकरानी जातिसंस्थेची उत्पत्ती, विकास, तिची लक्षणे आणि तिचे स्वरूप यांचे समाजहिताच्या व मानवी हक्कांच्या दृष्टीने विश्लेषण केले. त्यांच्या मते व्यवहारश: व तत्वश: अशा दोन्ही दृष्टीने भारतीय समाजातील जातीची समस्या अतिशय व्यापक आहे. जात ही स्वयंमर्यादित संस्था बनली आहे व तिचे बंदिस्त स्वरूप हजारो वर्षे टिकून राहिले आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते, हिंदू समाजाच्या अधोगतीस येथील जातिप्रथाच कारणीभूत आहे. व्यक्तीजीवन, समाजजीवन, व राष्ट्रजीवन या सर्वांवर जातिसंस्थेचा घातक परिणाम झाला. म्हणून जातिप्रथेला ते व्यक्तिगत तसेच सामाजिक समस्या मानतात. डॉ. आंबेडकर यांनी जातिप्रथा अनिष्ट कशी आहे, तिने अनेक वर्षापासून अस्पृश्य समजल्या गेलेल्या वर्गाचे शोषण कसे चालविले आहे आणि या जातिप्रथेमुळे हिंदू समाज विघटीत व शक्तिहीन कसा होत चालला आहे, याचे विवेचन 'जातिसंस्थेचे उच्चाटन' (Annihilaion of Caste) या प्रबंधात सविस्तरपणे केले आहे.

त्यांना जातिनिष्ठ व जन्मनिष्ठ समाजपध्दतीऐवजी समताधिष्ठीत व अधिक लवचिक समाजव्यवस्था अभिप्रेत होती. अशी समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी सर्वप्रथम जातिव्यवस्थेचा बिमोड केला पाहिजे हे ते निक्षून सांगतात. जातिप्रथेचे उच्चाटन करण्यासाठी आंबेडकरांनी सांगितलेल्या उपाययोजना अत्यंत मूलगामी आहेत. धर्म व समाज सुधारणेतून राजकीय स्वातंत्र्य, सत्तांतर व त्यातून नव्या आदर्शांची व मूल्यांची निर्मिती असे त्यांच्या कार्याचे स्वरूप व उद्दिष्ट होते. स्वतंत्र भारताच्या शासनकर्त्यांनी देखील त्यांच्या या तत्वांचा समावेश संविधानात करून ते प्रत्यक्षात आणण्याची बांधिलकी स्वीकारली आहे. यातच त्यांच्या विचारांचे महत्व व मोठेपण सामावलेले आहे.

**'डॉ. आंबेडकरांचे जातिव्यवस्था निर्मूलनातील योगदान'**

**प्रस्तावना :**

वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था हे हिंदू समाजाचे एक मूलभूत वैशिष्टय आहे.अगदी प्राचीन काळात हिंदू समाजाची विभागणी उच्चनीच वर्णानुसार निश्चित झाली. सुरवातीच्या काळात गुण व कर्म यानुसार श्रमविभाजन करणारी व्यवस्था असे तिचे स्वरुप होते. कालांतराने वर्णव्यवस्थेची जागा जातिव्यवस्थेने घेतली. परंतु तिने वर्णव्यवस्थेची चौकट मात्र कायम ठेवली. काळानुसार जातिसंस्थेच्या स्वरुपात अनेक स्थित्यंतरे घडून आली. अनेक जातिबंधने निर्माण झाली. त्यातून जातिसंस्थेचे स्वरुप हळूहळू पण निश्चितपणे बंदिस्त बनत गेले. त्यामुळे अन्याय व विषमता यांच्या पायावर उभा असलेला जातिनिष्ठ हिंदू समाज सतत विघटित व पराभूत होत गेला.

ख—या अर्थाने जातिसंस्थेचा शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास १९ व्या शतकात विशेषत: ब्रिटीश राजवटीत होउ लागला. ब्रिटीश राजवटीचे परिणाम केवळ राजकीय क्षेत्रावरच नव्हे तर समाज, धर्म व संस्कती यावरही झाले. त्यामुळे केवळ नवशिक्षितांच्या वर्गातच वैचारिक परिवर्तन

झाले असे नव्हे तर उच्च ब्राम्हण वर्गही गोंधळून गेला. सनातनी परंपराभिमान्यांनी हिंदू धर्म, जाती व वर्णव्यवस्था यांचे समर्थन केले, तर नवशिक्षितांच्या वर्गाने हिंदू धर्माची व जातिव्यवस्थेची मूलगामी तसेच बुध्दीवादी चिकित्सा करून त्यात परिस्थितीनुसार बदल करण्याची आवश्यकता सांगितली. परंपराभिमानी व नवशिक्षितांची पिढी यांच्यातील वाद—प्रतिवादातून जातिसंस्थेविषयक अभ्यासाला चालना मिळाली.

भारतातील जातिव्यवस्था व जातिव्यवस्थेचे दुष्परिणाम डॉ. आंबेडकरांनी स्वत: अनुभवले होते. त्याबाबत सखोल चिंतन करून जातिव्यवस्था निर्मूलनाविषयी मौलीक विचार मांडले आहेत. आजही भारतामध्ये जातिव्यवस्था टिकून आहे व तिचे दुष्परिणाम अनेक व्यक्तींना तसेच संपूर्ण देशाला भोगावे लागत आहेत. म्हणून जातिव्यवस्थेचा अभ्यास करणे व तिच्या निर्मूलनाविषयी प्रयत्न करणे गरजेचे ठरले आहे. त्यासाठी डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा अभ्यास अत्यंत उपयुक्त ठरू शकतो, म्हणून प्रस्तुत विषय शोधनिबंधासाठी निवडला आहे.

**अभ्यास पध्दती :**

या शोधनिबंधासाठीचा अभ्यास ऐतिहासिक दृष्टीकोनातून केला आहे. या अभ्यासासाठी डॉ. आंबेडकरांचा 'जातिप्रथेचे उच्चाटन' हा निबंध केंद्रिभूत मानला आहे. तसेच डॉ. आंबेडकरांच्या अनेक ग्रंथांचा आधार घेतला आहे. हा शोधनिबंध अनेक ग्रंथातील माहितीवर आधारीत आहे. या शोधनिबंधामध्ये डॉ.आंबेडकरांच्या जातिव्यवस्था व जातिव्यवस्थेचे निर्मूलन याविषयीच्या विचारांचे स्पष्टीकरण व विवरण केले आहे.

**डॉ. आंबेडकरांचे जातिव्यवस्थेविषयीचे विचार :**

डॉ. आंबेडकरानी जातिव्यवस्थेविषयीच्या अभ्यासामध्ये आपल्या मौलीक विचारांची भर घातली आहे. बालवयातच त्यांना अस्पश्यतेमुळे मिळणा—या अन्यायकारक वागणुकीची जाणीव झाली होती. जातिव्यवस्थेमुळे आपला संपूर्ण समाज खितपत पडला आहे याची जाणीव त्यांना होती. त्यामुळे त्यांनी आयुष्यभर जातिव्यवस्थेविरूध्द लढा दिला. त्यांनी Castes in India (1917), Annihilation of Caste (1937), Who were Shudras (1946), Untouchables (1948) या ग्रंथांमधून जातिव्यवस्थेविषयी शास्त्रीय व बुध्दीवादी दृष्टीकोनातून विचार मांडले. त्यांनी जातिसंस्थेची उत्पत्ती, विकास, तिची लक्षणे आणि तिचे स्वरूप यांचे समाजहिताच्या व मानवी हक्कांच्या दृष्टीने विश्लेषण केले. स्वत:चे विचार मांडण्यापूर्वी त्यांनी पूर्वीचे संशोधन, अभ्यास व मांडण्यात आलेले मुद्दे तपासून पाहिले. त्यातील कांही मुददयांचे खंडन करून अभ्यासाअंती तर्कसंगत नवीन मुद्दे मांडले.

९ मे १९१६ रोजी कोलंबिया विद्यापीठात मानववंशशास्त्र विभागाच्या अभ्यासमंडळासमोर 'भारतातील जाती—त्यांची घडण, उत्पत्ती व प्रसार' या विषयावर डॉ. आंबेडकरांनी निबंध वाचला. हा निबंध म्हणजे भारतातील जातिसंस्थेचे टिकात्मक परिक्षण आहे.त्यांच्या मते व्यवहारश: व तत्वश: अशा दोन्ही दृष्टीने भारतीय समाजातील जातीची समस्या अतिशय व्यापक आहे. प्रत्येक जात ही संपूर्ण जातिसंस्थेची एक अविभाज्य व अनिवार्य घटक असते.कोणतीही जात पूर्णपणे स्वतंत्र व एकाकी नाही. जाति—जातिंची मिळून स्वयंपूर्ण जातिसंस्था निर्माण होत असली तरी जात ही एक बंदिस्त संस्था आहे. कारण जातीच्या सभासदांवर सामाजिक व्यवहाराच्या दृष्टीने अनेक मर्यादा पडतात. रोटीबंदी, बेटीबंदी, व्यवसायबंदी अशा बंदिस्त व्यवहाराला स्वयंमर्यादित जातिसंस्था नैसर्गिकपणे जबाबदार आहे. जातिबाहय रोटीबंदी व विवाहबंदी या दोन प्रमुख प्रथांमूळेच जात ही स्वयंमर्यादित संस्था बनली आहे व तिचे बंदिस्त स्वरूप हजारो वर्षे टिकून राहिले आहे.

जात ही एक स्वयंमर्यादित संस्था आहे, त्याचप्रमाणे तो एक स्वयंमर्यादित वर्ग आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते भारतातील चार वर्गापैकी ब्राम्हण वर्ग स्वत:ला उच्च व श्रेष्ठ समजत असे. या वर्गाने सर्वप्रथम स्वत:ला सर्वात वरच्या वर्गात बंदिस्त केले. या वर्गाने प्रथम आपल्या वर्गापुरती बेटीबंदीची मर्यादा घालून घेतली. त्याचे अनुकरण इतर वर्गांनी केले. यातूनच जातिसंस्था अस्तित्वात आली. काहींनी दारे स्वत: बंद केली तर इतरांना त्यांच्यासाठी दारे बंद असल्याचे आढळून आले. या दृष्टीने ब्राम्हण वर्ग हा कृत्रिम जातिसंस्थेचा जनक आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात, जातीचा कायदा कुणीतरी तयार केला असेल ही कल्पनाच करता येण्यासारखी नाही.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)

ISSN : 2278-9308
July 2021

कारण कुणीतरी केलेल्या कायदयाच्या आज्ञेवरून एकाच वेळी आपली स्थिती जनावरांच्या बरोबरीने करून घेण्यास व त्याचवेळी दुस—या वर्गास सर्वोच्च अधिकार व हक्क देण्यास समाजातील कोणताही वर्ग तयार होणे शक्य नाही.

डॉ. आंबेडकरांच्या मते, हिंदू समाजाच्या अधोगतीस येथील जातिप्रथाच कारणीभूत आहे. त्यांच्या मते, व्यक्तीजीवन, समाजजीवन, व राष्ट्रजीवन या सर्वांवर जातिसंस्थेचा घातक परिणाम झाला. म्हणून जातिप्रथेला ते व्यक्तिगत तसेच सामाजिक समस्या मानतात. डॉ. आंबेडकरांच्या मते, जातिप्रथेमुळे हिंदू समाजाची कर्तृत्वशक्ती नष्ट झाली. तिने समाजाच्या कार्यशक्तीला निर्बल व पंगू केले. जातिप्रथेने आजपर्यंत एकच गोष्ट निश्चितपणे केली आहे ती म्हणजे हिंदू समाजाचे पूर्णत: विघटन व नैतिक अध:पतन होय. अशा समाजाला 'समाज' ही संज्ञा देता येणर नाही. कारण ते अनेक जातींचे मिळून बनलेले एक मिश्रण आहे. अशा या समाजातील प्रत्येक जात स्वत:ला दुस—या जातीपेक्षा श्रेष्ठ समजते. जाती—जातींमध्ये संकुचित जात्याभिमानाच्या कल्पना आढळून येतात. एका जातीला दुस—या जातिविषयी आपुलकीची भावना नाही. प्रत्येक जातीमध्ये फक्त स्वहिताची भावना प्रकर्षाने आढळते. या अतिरेकी जात्याभिमानामुळे व संकुचित स्वहिताच्या भावनेमुळे हिंदूमध्ये राष्ट्रीय एकात्मता किंवा संघटन होणे अशक्य आहे. म्हणून ते म्हणतात की, 'जोपर्यंत जात आहे तोपर्यंत संघटन शक्य नाही आणि जोपर्यंत संघटन नाही तोपर्यंत हिंदू दुबळा आणि लाचार राहणार'.

**जातिप्रथा निर्मूलनाविषयीचे विचार :**

डॉ. आंबेडकर यांनी जातिप्रथा अनिष्ट कशी आहे, तिने अनेक वर्षांपासून अस्पृश्य समजल्या गेलेल्या वर्गाचे शोषण कसे चालविले आहे आणि या जातिप्रथेमुळे हिंदू समाज विघटीत व शक्तिहीन कसा होत चालला आहे, याचे विवेचन 'जातिसंस्थेचे उच्चाटन' (Annihilaion of Caste) या प्रबंधात सविस्तरपणे केले आहे.वास्तविक १९३६ साली जातपात तोडक मंडळासाठी लिहिलेल्या अध्यक्षीय भाषणाचा 'जातिसंस्थेचे उच्चाटन' हा मराठी अनुवाद पुस्तकरूपाने प्रसिध्द झाला आहे. डॉ.आंबेडकरांनी जातिसंस्थेची निर्मिती,तिचे स्वरूप,तिचा प्रसार आणि तिचा हिंदू समाजावरील परिणाम या विषयीचे विचार या प्रबंधाच्या पूर्वार्धात मांडले आहेत. तर जातिप्रथेच्या निर्मूलनाची आवश्यकता,तिच्या निर्मूलनाचे उपाय या मुद्दयांची चर्चा प्रबंधाच्या उत्तरार्धात सविस्तरपणे केली आहे. तत्पूर्वी त्यांनी इतर काही विचारवंतांनी व समाज सुधारकांनी जातिप्रथेच्या निर्मूलनाविषयी सुचविलेल्या पर्यायी उपायांचे परिक्षण केले. सर्वप्रथम त्यांनी आर्य समाज सुधारकांनी सुचविलेल्या उपायांचा परामर्श घेतला. आर्य समाज सुधारकांच्या मते,हिंदू समाजाची रचना जन्माधिष्ठीत वर्णाश्रम धर्मानुसार केली आहे ती कर्माधिष्ठीत वर्णाश्रम धर्मानुसार केली जावी. परंतु डॉ.आंबेडकरांच्या मते,अशी समाज रचना प्रत्यक्षात यशस्वी होऊ शकणार नाही. कारण जोपर्यंत ब्राम्हण, क्षत्रिय,वैश्य व शुद्र ही नावे अस्तित्वात आहेत, तोपर्यंत ही नावे एका विशिष्ट उच्च—नीच भावनेची द्योतक आहेत व ती जन्मजात आहेत असेच प्रत्येक हिंदू समजेल व त्याप्रमाणे वागेल. त्यामुळे त्यांनी कर्मनिष्ठ समाज रचनेची कल्पना अमान्य केली.

जातिप्रथा नष्ट करण्याच्यादृष्टीने प्रथम पोटजाती नष्ट करण्याची कल्पना मांडण्यात आली. परंतु डॉ. आंबेडकरांच्या मते, हा जातिनिर्मूलनाच्या दृष्टीने प्राथमिक व प्रभावी उपाय होउ शकत नाही. कारण पोटजाती नष्ट झाल्या तरी कालांतराने जाती नष्ट होतीलच असे म्हणता येणार नाही. उलट पोटजातींचे विलीनीकरण जाती—जातींमधील भेदाला बळकटी आणील, असे त्यांना वाटते.

जातिप्रथेचा विच्छेद करण्यासाठी रोटीबंदी तोडावी आणि जाती—जातिमध्ये सहभोजनाला सुरवात करावी,असाही एक उपाय सुचविला गेला.परंतु आंबेडकर म्हणतात,हा विचारही फारसा परिपक्व नाही.कारण आज अनेक जातींमध्ये परस्पर सहभोजनाची प्रथा सर्रास रूढ आहे.

प्रस्तुत प्रबंधाच्या उत्तरार्धात डॉ.आंबेडकरांनी जातिनिष्ठ समाजरचनेला पर्याय म्हणून आदर्श व समताधिष्ठीत अशा समाजरचनेची कल्पना मांडली. या संदर्भात ते म्हणतात,''स्वातंत्र्य,समता व भातृभाव(विश्व बंधुत्व) या तत्वत्रयीवर आधारलेली समाजरचनाच आदर्श होय'' त्यांना जातिनिष्ठ व जन्मनिष्ठ समाजपध्दतीऐवजी समताधिष्ठीत व अधिक लवचिक समाजव्यवस्था अभिप्रेत होती. ज्या समाजव्यवस्थेत स्वातंत्र्य,समता,बंधुता व न्याय या उच्च मानवी मूल्यांना महत्व असेल,ज्या समाजात व्यक्ती—व्यक्तींमध्ये कोणताही भेदभाव नसेल,समाजाचा घटक या नात्याने सर्व व्यक्तींना

आचार,विचार व कृतीचे स्वातंत्र्य असेल,आपल्या सुप्तगुणांचा विकास करण्याची समान संधी असेल,सर्व व्यक्तींना सन्मान व प्रतिष्ठा मिळेल अशी समाज व्यवस्था त्यांना हवी होती आणि अशी समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी सर्वप्रथम जातिव्यवस्थेचा बिमोड केला पाहिजे हे ते निक्षून सांगतात. जातिप्रथेचे उच्चाटन करण्यासाठी आंबेडकरांनी सांगितलेल्या उपाययोजना अत्यंत मूलगामी आहेत. ते म्हणतात की जातिप्रथा नष्ट करण्यासाठी हिंदू समाजाची मानसिकता बदलली पाहिजे.त्यांच्या मते,जातिप्रथा ही एक भावना आहे. ती मनाची एक अवस्था आहे. या भावनेचा नाश करणे म्हणजेच भावनात्मक व मानसिक पातळीवर बदल घडवून आणणे. कारण लोकांच्या जातिप्रथेविषयीच्या प्रवृत्ती,सवयी व समज कायम ठेवून कोणतीही सुधारणा करणे अशक्य आहे. जाती तशाच ठेवून राष्ट्र निर्माण करता येणार नाही आणि ते समर्थ व बलवानही करता येणार नाही.ते म्हणतात,'' जातीच्या आधारावर काहीही करायला जाल तर ते कोसळून पडलयाशिवाय राहणार नाही.''

जर समाजाची मानसिकता बदलायची असेल व जातिनिर्मूलन करायचे असेल तर हिंदूंच्या प्राचीन धर्म ग्रंथांचेही कठोर परिशीलन झाले पाहिजे,असे आंबेडकरांना वाटते. डॉ.आंबेडकरांनी धर्म ग्रंथांचे प्रामाण्य व शब्द प्रामाण्य यांना विरोध करून त्यांची कालबाहयताही स्पष्ट केली.त्यांनी मनुस्मृतीसारख्या धर्मग्रंथाचे दहन करून धर्मग्रंथाचे पावित्र्य व शास्त्र वचनांचे प्रामाण्य नाकारले. धर्मांधता,दुराग्रह व ग्रंथप्रामाण्य यांच्या मानसिक गुलामगीरीत जखडून राहिलेल्या हिंदूंची मुक्तता करावी व त्यांना विवेकाच्या वाटेवर आणावे हा आंबेडकरांचा धर्मचिकित्सेमागचा मुख्य हेतू होता. म्हणून ते म्हणतात की,अशा जातिसंस्थेला उच्चाटण्यासाठी सर्वप्रथम माणसाला कर्तृत्वशून्य व विवेकशून्य बनविणा—या धर्मग्रंथांचे व शास्त्रवचनांचे मानसिक वर्चस्व,गुलामगीरी झुगारून दिली पाहिजे. त्यासाठी धर्माचे नियमप्रधान व आज्ञाप्रधान स्वरूप नष्ट केले पाहिजे.हिंदू धर्मग्रंथ थोर ऋषी मुनींनी लिहले आहेत अशा एकांगी व चुकीच्या भुमिकेपोटी त्यांनी धर्मग्रंथांना व शास्त्र वचनांना विरोध केलेला नाही,तर धर्म वचनांना जे अपरिवर्तनीय व शाश्वत आणि दैवी स्वरूप प्राप्त झाले त्याला आंबेडकरांनी विरोध केला.

अशा नियमाधिष्ठीत धर्माऐवजी तत्वनिष्ठ धर्माची निर्मिती करण्यासंबंधी देखील एक योजना डॉ.आंबेडकरांनी सांगितली आहे त्यात त्यांनी खालील कांही तत्वांचा समावेश केला आहे.

१) संपूर्ण हिंदू समाजासाठी विशिष्ठ असा एकच धर्मग्रंथ असावा. तो सर्वमान्य,सर्वसमावेशक व प्रमाणभूत मानला जावा.

२)हिंदू समाजात पौराहित्य अनुवंशिक ठेवू नये.स्वत:ला हिंदू समजणारी कोणतीही व्यक्ती मग ती कोणत्याही जातीची असो पौराहित्यास पात्र समजली जावी.

३)सरकारकडून सर्व जातींच्या लोकांना पौराहित्याची सनद घेण्याचा अधिकार द्यावा.सरकारने अधिकृत म्हणून ठरविलेल्या व सनद घेतलेल्या व्यक्तीने केलेले धार्मिक विधी कायदेशीर समजले जावेत.

डॉ.आंबेडकरांच्या मते, या उपायांमुळे ब्राम्हण्याचा पर्यायाने जातिय वृत्तीचा उच्छेद होईल आणि एकदा का ब्राम्हण्याचा विध्वंस झाला की जातियता शिथिल होईल.

डॉ.आंबेडकरांनी जातिभेद निर्मूलनासाठी आंतरजातीय विवाह हा एक प्रभावी व जालीम उपाय ठरेल असे सांगितले आहे.त्यांच्यामते,सहभोजनाने जाती—जातींमधील उच्च—नीचतेची भावना आणि जाणीव मेलेली नाही. ती जाणीव आंतरजातीय विवाहाच्या पध्दतीने मारणे शक्य आहे. कारण जाती—जातींमध्ये विवाह झाल्यास रक्त मिश्रण होईल व त्यामुळे एकत्व व बंधुभाव निर्माण होईल अशी सजातीयपणाची भावना बलवत्तर झाली तरच जातिय भेदभाव नाहीसा होईल.

**टिकात्मक विवेचन**:

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जातिसंस्थेची निर्मिती, तिचे प्राचीन स्वरूप,नंतर बदलत गेलेले स्वरूप,तिचे दुष्परिणाम व तिच्या निर्मूलनाची आवश्यकता या मुदयांच्या आधारे जातिसंस्थेची मीमांसा केली आहे.डॉ.आंबेडकरांनी तात्विक व व्यावहारीक अशा दोन्ही दृष्टीने जातिप्रथा ही एक व्यापक समस्या मानली आहे.जातिबाहय भोजनबंदी व जात्यांतर्गत विवाह ही त्यांच्या मते,जातिसंस्थेची दोन प्रमुख बलस्थाने आहेत.या दोन रूढींमुळे जातिसंस्थेचे स्वयंमर्यादित व वर्गीय स्वरूप हजारो वर्षे टिकून राहिले.त्याचप्रमाणे धर्मग्रंथांचे अंधानुकरण,ब्राम्हण्यवृत्ती तसेच पुरोहित

वर्गाचे वर्चस्व यामुळे देखील जाती प्रथा कायम राहिली.धर्मग्रंथानी हिंदू समाजाची मनोधारणा जातिनिष्ठ बनवली.डॉ.आंबेडकरांना एकूणच जातिव्यवस्थेवर आधारलेला हिंदू समाज व त्याची रचना विकृत वाटते.त्यांच्या मते, ही विकृती केवळ वैचारिक किंवा तत्वज्ञानाच्या क्षेत्रातच नव्हे तर प्रत्यक्ष जीवनातही निर्माण झाली आहे.डॉ.आंबेडकरांनी जातिभेद निर्मूलन व अस्पृश्यता निवारण ही सवर्णापेक्षा अस्पृश्यांची मोठी जबाबदारी आहे असे मानले,त्यांनी या कार्यात सवर्ण व अस्पृश्य या दोघांनाही सहभागी करून घेतले.

डॉ.आंबेडकरांचे संपूर्ण जीवनच जातिप्रथा निर्मूलन व अस्पृश्यता निवारण या ध्येयाने प्रेरित झालेले होते.एका बाजूने त्यांनी हिंदू धर्माचे विषम आणि अन्यायकारक स्वरूप,ब्राम्हणवर्गाचे वर्चस्व,धर्मग्रंथाचे प्रामाण्य,पुरोहितशाही यांना विरोध केला तर दुस—या बाजूने त्यांनी हिंदू धर्माची, धर्मग्रंथांची मूलगामी चिकित्सा करून हिंदू समाजाला धर्मग्रंथाच्या दास्यातून मुक्त करण्याचा प्रयत्न केला.म्हणूनच त्यांचे कार्य विशिष्ट वर्गापुरते किंवा जातीपुरते मर्यादीत न राहता त्याला अखिल मानव जातीच्या कल्याणाचे परिमाण लाभले.

डॉ.आंबेडकरांना जातिप्रथा मोडण्यासाठी प्रस्थापित मूल्यव्यवस्थेविरूध्द बंड करण्याचा,चळवळ करण्याचा मार्ग योग्य वाटतो. समाजव्यवस्थेत विधायक परिवर्तन करण्यासाठी ते विद्रोह करण्याची भाषा वापरतात.

**सद्यकालीन महत्व :**

थोडक्यात,डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या या विषयावरील विचारांचे महत्व निश्चितच वादातीत आहे.त्यांनी मानवतावादी भूमिकेतून मांडलेले विचार धर्मनिरपेक्ष राष्ट्राच्या निर्मितीला उपयुक्त व मार्गदर्शक ठरले.त्यांनी मांडलेले जातिप्रथा निर्मूलनाविषयीचे विचार व त्यादृष्टीने केलेले कार्य ही फक्त समाज सुधारणेची चळवळ नव्हती तर माणसाला माणूस म्हणून जगण्याचा समान हक्क प्राप्त करून देण्यासाठी ही चळवळ होती. तसेच ती पतितोध्दाराची व लोकसंग्रहाची चळवळ होती. धर्म व समाज सुधारणेतून राजकीय स्वातंत्र्य,सत्तांतर व त्यातून नव्या आदर्शांची व मूल्यांची निर्मिती असे त्यांच्या कार्याचे स्वरूप व उद्दिष्ट होते.त्यांच्या नव्या समाजाच्या कल्पनेला स्वातंत्र्य,समता व बंधुता या तत्वत्रयींचे अधिष्ठान आहे.स्वतंत्र भारताच्या शासनकर्त्यांनी देखील त्यांच्या या तत्वांचा समावेश संविधानात करून ते प्रत्यक्षात आणण्याची बांधिलकी स्वीकारली आहे.यातच त्यांच्या विचारांचे महत्व व मोठेपण सामावलेले आहे.

**— संदर्भग्रंथ सूची —**

१)डॉ.आंबेडकर भि.रा.—जातिसंस्थेचे उच्चाटन (अनु.) मून वसंत — मनोविकास प्रकाशन,मुंबई. १९८६
२)कीर धनंजय — डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९७७
३)कसबे रावसाहेब— आंबेडकर आणि मार्क्स, सुगावा प्रकाशन, पुणे.
४)खैरमोडे चां.भ.—डॉ.भिमराव रावजी आंबेडकर यांचे चरित्र खंड—३, प्रताप प्रकाशन, मुंबई १९६४
५)डॉ.फडके भालचंद्र—डॉ.आंबेडकर आणि दलित साहित्य, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर १९८९
६)डॉ.फडके य.दि.—व्यक्ती आणि विचार, श्री.विद्या प्रकाशन, पुणे १९७९
७)सुमंत यशवंत व पुंडे दत्तात्रय —महाराष्ट्रातील जातिसंस्था विषयक विचार, प्रतिमा प्रकाशन, पुणे — १९८८

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास

प्रा.डॉ.लखन भि.इंगळे
अर्थशास्त्र विभागडॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस.कला ववाणिज्य महाविद्यालय, नागपूर.२६.
मो. ९७६४१९७३६०,E-mail: inglelakhan9@gmail.com

**गोषवारा**

यशंवतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार स्पष्ट करताना या संशोधन पेपरमध्ये कृषी, उद्योग, आर्थिक विषमता, कर पद्धती आणि चलनवाढ या विषयाला अनुसरुन त्यांनी मौलिक असे जे विचार मांडले आहेत यांचा आढावा घेतला आहे, तसेच आठव्या केंद्रीय वित्त आयोगाच्या अध्यक्षपदी असताना यशंवतराव चव्हाण यांनी केलेल्या महत्वपूर्ण शिफारशींचा उहापोह केला आहे. तसेचयशंवतराव चव्हाण अर्थमंत्री असतांना त्यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकातील महत्वपूर्ण तरतूदींचे विश्लेषण यामध्ये करण्यात आले आहे. यावरुन यशंवतराव चव्हाण यांचे विचार आर्थिक प्रगतीसाठी सुयोग्य ठरण्यासारखे दिसून येतात.

***शब्दसंकेत*** *:कृषी, उद्योग, वित्त आयोग, अंदाजपत्रक, आर्थिक विषमता, कर पद्धती आणि चलनवाढ*

**प्रस्तावना**

"एखाद्या व्यक्तिमत्वाला काळ घडवितो तर काही व्यक्तिमत्व अशी असतात जी काळालाच घडवीतात. अशाच काही व्यक्तिमत्वांपैकी एक म्हणजे यशवंतराव चव्हाण होय." १ मे, १९६० रोजी मराठी भाषिकांचे मुंबई राजधानी असणारे 'महाराष्ट्र राज्य' आणि गुजराती भाषिकांचे 'गुजरात राज्य' या दोन स्वतंत्र राज्याची निर्मिती झाली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी जबाबदारी स्विकारली. त्यांनी महाराष्ट्राच्या निर्मिती पासून आर्थिक बाबीकडे महत्वपूर्ण लक्ष केंद्रीत केले. या थोर व्यक्तिचे कार्य सर्वव्यापी आहे. त्यांच्या कार्यावर विविध विचारवंतानी प्रकाश टाकलेला आहे. मात्र यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय जीवनातील प्रकाशमान यशामुळे त्यांच्या आर्थिक कार्यावर, विचारावर विपूल असे लिखाण झालेले दिसून आलेले नाही. राजकीय विचार प्रमाणेच यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार महत्वाचे आहेत.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

१) यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे.

२) यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्र राज्याच्या विकासामधील योगदानाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधन हे प्रामुख्याने दुय्यम सामग्रीवर आधारीत आहे. या संशोधनासाठी यशवंतराव चव्हाण यांची भाषणे, लिखित साहित्य, त्यांनी सादर केलेले केंद्रिय अर्थसंकल्प, वित्त आयोगाचा अहवाल, शासकीय प्रकाशने, संदर्भ ग्रंथ इत्यादी बाबींचा आधार घेण्यात आलेला आहे.

**यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचारव कार्य**

**अ) शेतीसंबंधी विचार**

शेती संबंधीचे विचार मांडत असताना भूमिहीनांचा प्रश्न तसेच शेतीच्या विकासासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील याबाबत प्रामुख्याने विचार मांडले आहेत.

**१) जमिन मालकीचा प्रश्न**

यशवंतराव चव्हाण यांच्या मते, एखाद्या व्यक्तीकडे जास्तीत जास्त किती जमीन असावी याबाबत काही मर्यादा असावी. तसेच शेती कसणारा शेतीचा मालक असला पाहिजे. त्यामुळे भूमिहीन शेतमजूर आणि श्रीमंत शेतकरी ही वर्ग विषमता कमी होण्यास मदत होईल.थोडक्यात, यशवंतरावांनी सामाजिक समता व सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून शेतीचा विचार केलेला दिसून येतो.

**२) भूमिहीनांचा प्रश्न**

भारतात शेतीत काम करणाऱ्यामध्ये भूमिहीनांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. हे प्रमाण कमी करण्यासाठी ज्यांच्याकडे वाजवीपेक्षा जास्त जमीन आहे. त्यांनी आपल्या एकूण जमिनीपैकी काही जमीन भूमिहीनांना द्यावी. यशवंतरावांच्या मते, भारतात ८० टक्के लोकांकडे फारच कमी जमीन आहे. तर २० टक्के लोकांकडे जास्त जमीन आहे मात्र ही जमीनीबाबतची विषमता कमी झाली पाहिजे.

**३) शेती व्यवसाय म्हणून केली जात नाही**

यशवंतरावांच्या मते, भारतीय शेतकरी शेतीकडे व्यवसाय म्हणून पाहत नाही तर उदरनिर्वाहाचे साधन म्हणून पाहतो. शेती व्यापारी तत्वावर केली तर अधिकाधिक नफा मिळवण्याचा प्रयत्न शेतकरी करतील त्यामुळे त्यांचा विकास होण्यास होण्यास मदत होईल.थोडक्यात यशवंतरावांनी शेतकऱ्यांच्या उत्कर्षासाठी व्यापारी तत्वावरील शेतीचे समर्थन केल्याचे दिसून येते.

**४) जमिनीच्या विकासाचा प्रश्न**

भारतात फार मोठ्या प्रमाणात जमीन अविकसीत राहिली असल्याने ती अनुत्पादक व लागवड करण्या अयोग्य अगोदर बनली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे व देशाचे नुकसान होते. त्यूळे ही अनुत्पादक व पडीक जमीन लागवडीखाली आणली पाहिजे. त्यासाठी सिंचन सुविधांचा मोठ्या प्रमाणात विकास व विस्तार झाला पाहिजे. यावरुन यशवंतरावांचा शेती व शेतकरी यांच्या विकासाबाबत व्यापक दृष्टीकोन दिसून येतो.

**५) शेतीच्या आधुनिकीकरणाचा प्रश्न**

शेतीच्या आधुनिकीकरणाबाबत आपण फारच मागे आहोत असे यशवंतरावांचे मत होते. हरित क्रांतीनंतर रासायनिक खते, बी-बियाणे व आधुनिक तंत्रज्ञान शेतीसाठी उपलब्ध झाले असले तरी ते खरेदी करण्याची कुवत शेतकऱ्यामध्ये नसते. तसेच पाणी प्रश्न ही एक ज्वलंत समस्या शेतकऱ्यासमोर उभी आहे, जमिनीचे विभाजन व तुकडीकरण या कारणांमुळे आधुनिक पद्धतीने शेती करणे शेतकऱ्यांना परवडत नसल्याचे दिसून येते.

**६) उत्पादन वाढीसाठी पाण्याचा योग्य वापर**

भारतात नद्यांच्या पाण्याचा वापर शेतीसाठी मोठ्या प्रमाणात केला जात नाही. धरणांच्या अभावी नद्यातील पाणी वाया जाते. त्यामुळे नद्यांवर धरणे बांधले पाहिजेत. परंतू या धरण बांधणीमुळे जे लोक विस्थापीत होतील त्यांचे पुनर्वसन केले पाहिजे. असे यशवंतरावांचे मत होते.

**७) शेती शिक्षणाचा अभाव**

देशातील लोक जर अज्ञानी असतील तर कोणतेही प्रबोधनकारी विचार ते चटकन स्वीकारत नाहीत. लोकांची हीच मनोवृत्ती शेतीच्या तांत्रीक विकासाच्या आड येते. त्यामुळे शेती व शेतीशी संबंधीत असणारा मनुष्य शहाणा असल्याशिवाय शेती शहाणी होणार नाही असे त्यांचे मत होते. त्यासाठी शेकऱ्यांना आधुनिक पद्धतीने शेतीचे ज्ञान देऊन त्याविषयाचे त्यांचे अज्ञान दूर केले पाहिजे.

**८) शेतीला उद्योगाची जोड द्यावी**

यशवंतरावांच्या मते, शेती हा ग्रामीण विकासाचा गाभा आहे. या गाभ्याभोवती लहान लहान उद्योग उभारले गेले पाहिजेत. त्यामुळे खेडे व शहर यातील अंतर कमी होण्यास मदत होईल, तसेच शेतीला लागणारी आवश्यक तंत्रे या कृषी उद्योगात तयार झाली पाहिजेत. उदा. शेतीला लागणारा नांगर शहरात तयार न करता तो खेड्यातच तयार झाला पाहिजे. थोडक्यात, यशवंतराव चव्हाण यांनी शेती समोरील समस्या स्पष्ट करुन त्या सोडविण्यास उपायही सूचविले आहेत. यामागे कृषी विकासासाठी त्यांची आग्रही भूमिका दिसून येते.

**ब) उद्योगासंबंधी विचार**

यशवंतराव चव्हाण यांनी १९६० मध्ये महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषदेचे उद्‌घाटन करताना आणि वेगवेगळ्या ठिकाणी त्यांनी केलेल्या भाषणावरुन त्यांचे उद्योगासंबंधीचे पुढील विचार दिसून येतात.

**१) समतोल आर्थिक विकास**

देशाचा विकास म्हणजे कोणत्याही एका भागाचा विकास नसून सर्व प्रदेशांचा सारखाच विकास आवश्यक आहे. म्हणजे देशातील कोणताही भाग इतर भागाच्या तुलनेत मागे राहता कामा नये. म्हणूनच विकासविषयक योजना आखत असताना अविकसित प्रदेशांचा विचार सर्वप्रथम करणे आवश्यक आहे. जेणे करुन अविकसित भागांना विकसित भागांबरोबर आणून देण्याचा समतोल विकास घडवून आणणे शक्य होईल.

**२) ग्रामीण औद्योगिकीकरण**

ग्रामीण भागात शेती पूरक उद्योग सुरु करुन शेती व उद्योगांची सांगड घतली पाहिजे. यामुळे ग्रामीण भागातील लोकांना रोजगार मिळविण्यासाठी शहरांकडे धाव घेण्याची गरज भासणार नाही. तसेच ग्रामीण शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग सुरु करावेत. मात्र यासाठी वीज, पाणी, रस्ते या पायाभूत सुविधा ग्रामीण भागात उपलब्ध करुन द्याव्यात.

यशवंतरावांनी त्या काळात मांडलेला विचार आज महाराष्ट्रात मूर्त स्वरुपात आलेला असून तो "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ" या नावाने ओळखला जातो.

**३) औद्योगिकविकासाचा मास्टर प्लॅन**

देशाचा औद्योगिक विकास समतोल प्रमाणात व्हावा यासाठी ते औद्योगिक विकासाच्या मास्टर प्लॅनची कल्पना मांडतात. या मास्टर प्लॅनमुळे कोणता उद्योग कोणत्या भागात सुरु करता येईल, हे ठरविता येते.

**४) संयुक्तऔद्योगिक क्षेत्राची कल्पना**

अविकसीत भागात नवीन उद्योग उभारण्यास उद्योगपती तयार नसतात. किंवा अशा भागात तांत्रिक अडचणीमुळे उद्योग सुरु करणे शक्य नसते. अशावेळी सरकार आणि खाजगी कारखानदार यांनी एकत्र येऊन नवीन उद्योग सुरु करणे आवश्यक असते. यालाच संयुक्त क्षेत्र म्हणतात. या संयुक्त क्षेत्रामुळे ग्रामीण व अविकसित भागाच्या विकासाला चालना मिळते असे यशवंतरावांचे मत होते.थोडक्यात, अविकसीत भागाच्या विकासावर त्यांचा विशेष भर असलेला दिसून येतो.

**५) स्वयंचलित विकास**

एकूण उत्पन्नामध्ये सातत्याने वाढ घडवून आणण्यासाठी बचतीचे व पैसा गुंतविण्याचे प्रमाण वाढविणे म्हणजे स्वयंचलित विकास होय. त्यांच्या मते, उत्पदनात वाढ करुन निर्यात वाढविणे, त्यातून परकीय चलनाचा साठा वाढविणे, या परकीय चलनातून उद्योगासाठी आवश्यक असणारी यंत्र-सामग्री खरेदी करणे इत्यादी बाबी स्वयंचलित विकासासाठी आवश्यक असतात.थोडक्यात, उद्योगांच्या स्वयंचलित व सर्वांगीण विकासासाठी यशवंतराव वरिल बाबींचा पाठपुरवठा करताना दिसून येतात.

**६) उत्पन्नात नवीन तंत्राचा वापर**

उद्योगाचा जलद गतीने विकास साधण्यासाठी उत्पादनात नव्या तंत्राचा व नव्या उत्पादन पद्धतीचा वापर करावा. तसेच उत्पादन क्षेत्रातील अत्याधुनिक ज्ञान व कौशल्य संपादन करावे म्हणजे उद्योगाचा विकास व विस्तार वेगाने होईल, असे यशवंतराव यांचे मत होते.थोडक्यात, आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने औद्योगिक विकास साध्य करण्यावर त्यांनी भर दिलेला दिसून येतो.

**७) व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग**

कामगार हा उत्पादनातील महत्वाचा घटक असतो. त्यामुळे उद्योगाच्या व्यवस्थापनात त्यांना सहभागी करुन घ्यावे. त्यामुळे कामगारांमध्ये उत्पादन क्षमता वाढीस लागेल, औद्योगिक कलह कमी होण्यास मदत होईल. परिणामी उत्पादनातही सातत्याने वाढ घडून येईल असे यशवंतरावांचे मत होते.

**८) कारखानदारांना सहाय्य**

कोणताही नवीन उद्योग सुरु करत असताना उद्योजकासमोर अनेक अडचणी असू शकतात. अशावेळी शासनाकडून आवश्यक ती मदत उद्योजकांना मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे उद्योजकांना उद्योग सुरु करण्यास विशेष प्रोत्साहन मिळते, असे उद्योजकासंबंधी यशवंतरावांचे मत होते.अशा प्रकारे शासनाने उद्योजकांना आवश्यक ती मदत देण्याचे निश्चित केले तर मागास किंवा अविकसित भागात उद्योग सुरु करण्यास नवीन उद्योजक तयार होतील. परिणामी रोजगाराच्या संधी, उत्पादन व उत्पन्न यात वाढ होऊ शकते. मात्र अशा प्रकारे औद्योगिकीकरण होत असताना त्याचे सामाजिक व आर्थिक परिणाम देखिल अभ्यासणे तेवढेच महत्वाचे ठरते.

**क) करासंबंधी विचार**

सहकाराच्या महसूलात वाढ घडवून आणण्यासाठी महसूल प्राप्तीतील विषमता कमी करण्यावर, करांचा आधार वाढविण्यावर आणि करवसुली, प्रशासन यंत्रणा कार्यक्षमक करण्यावर भर देऊन त्यासंदर्भात धोरणे आखली पाहिजेत असे यशवंतरावांना वाटत असे.

**१) चलनवाढीसंबंधी विचार**

चलनवाढ रोखण्यासाठी काळ्या पैशाचे प्रमाण कमी करणे, देशात उत्पादनाचे योग्य वाटप करणे, समाजजागृती करणे या बाबींवर यशवंतरावांनी भर दिललि दिसून येतो.

**२) आर्थिक विषमतेसंबंधी विचार**

आर्थिक विषमतेसंबंधी विचार मांडत असताना यशवंतरावांनी जागतिक पातळीवरील विषमता विचारात घेतली आहे. उदा. अविकसित देशात लोकसंख्या जास्त असते. मात्र त्यांचे उत्पन्न व सुखसोयी कमी असतात. त्यामुळेच दिवसेंदिवस विकसित व अविकसित देशातील आर्थिक विषमता वाढत जाते. तेव्हा हे अंतर कमी करण्यासाठी काय करता येऊ शकेल याचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे असे यशवंतरावांना वाटत असे.आर्थिक विषमतेची दरी कमी करण्यासंबंधी अत्यंत मौलिक असे विचार यशवंतरावांनी मांडलेले दिसून येतात.

**वित्त आयोग आणि यशवंतराव चव्हाण**

केंद्र सरकार आणि घटक राज्य सरकार यांच्यामध्ये वित्तीय साधन सामग्रीचे वाटप करण्यासंबंधी शिफारशी करण्यासाठी भारतीय राज्यघटनेने वित्त आयोगाच्या नेमणुकीची तरतूद केली आहे. राष्ट्रपती दर पाच वर्षांनी वित्त

आयोगाची नेमणुक करतात. कारण केंद्र सरकार आणि घटक राज्य सरकार यांची वित्तीय स्थिती काळाच्या ओघात अनेक कारणांमुळे बदलते. प्रत्येक पातळीवरील सरकारच्या गरजा बदलतात. ही बदलती परिस्थिती लक्षात घेता केंद्र सरकार आणि घटक राज्य सरकार यांच्या वित्तीय संबंधातही काही बदल घडवून आणणे आवश्यक ठरते. यादृष्टिने विचार करता वित्त आयोगाची नेमणूक दर पाच वर्षांनी केली जाणे योग्य ठरते. त्यानुसार भारतात पहिला वित्त आयोग १९५१ मध्ये नेमण्यात आला. पहिल्या वित्त आयोगाचे अध्यक्ष के.सी.नियोगी हे होते, तर १९८२ मध्ये नेमण्यात आलेल्या आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष यशवंतराव चव्हाण होते.

यशवंतराव चव्हाण यांनी आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष या नात्याने प्राप्तीकर, मध्यवर्ती उत्पादन कर, मालमत्ता कर इत्यादी करापासून मिळणाऱ्या महसुलाची केंद्र व घटक राज्ये यांच्यामध्ये विभागणी कशी करायची आणि घटक राज्यांना द्यावयाची जी एकूण रक्कम असेल त्या रकमेचा घटक राज्यामध्ये कोणत्या तत्वानुसार वाटप करावयाचे याबाबत मोलाचे योगदान दिले असल्याचे दिसून येते.

**अर्थसंकल्प आणि यशवंतराव चव्हाण**

देशाचा आर्थिक विकास साधण्यासाठी आवश्यक असणारे मुलभूत तत्व परखडपणे मांडणारे आणि जनसामान्याविषयी ओढ असणारे, उत्कृष्ट संसदपटू व कुशल प्रशासक म्हणून यशंवतराव चव्हाण यांचे नाव लौकिक आहे. देशाच्या अर्थसंकल्पामध्ये यशंवतराव चव्हाण यांचे तत्वे विशेष उल्लेखनीय आहेत. विकासाच्या तरतुदीमध्ये अर्थसंकल्पातील तरतूदी या महत्वाच्या असतात. या तरतूदी विशेषत्वाने आणि नि:संकोचपणे मांडण्याचे कार्य यशवंतरावांनी १९७१-७२ ते १९७४-७५ या सलग चार वर्षाच्या अर्थसंकल्पात केले आहे.

**सारांश :**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रगतीमध्ये यशवंतराव चव्हाण यांचे विचार अत्यंत मोलाचे ठरले आहेत. भारतीय शेतीक्षेत्र, सहकार, शिक्षण, राजकारण, साहित्य इ. संदर्भात त्यांचे मौलिक विचार आहेत. यशवंतराव चव्हाण यांनी आपले सर्व आयुष्य राजकारणात जरी व्यतीत केले असले तरी एक उत्कृष्ट अर्थतज्ञ म्हणूनही त्यांचे योगदान महत्वपूर्ण ठरते. १९७१-७२ ते १९७४-७५ पर्यंत ते केंद्रिय अर्थमंत्री म्हणून कार्यरत होते. तर १९८२ मध्ये नेमण्यात आलेल्या भारताच्या आठव्या वित आयोगाचे ते अध्यक्ष होते. म्हणजे आर्थिकदृष्ट्या महत्वाची पदे त्यांनी भूषविली होती.यशवंतराव चव्हाण यांचे असे मत होते की, जर भारतातील लोकशाही यशस्वी करायची असेल तर शिक्षण, सहकार, शेती व आरोग्य या चार खात्याचे काम यशस्वी झाले पाहिजे. राज्याचे मुख्यमंत्री झाल्यापासून ते संरक्षणमंत्री पदाचा कार्यभार स्वीकारपर्यंत आणि अर्थमंत्री असताना स्वीकारलेल्या धोरणावरुन वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या भाषणांवरुन त्यांचे आर्थिक विचार स्पष्ट होतात.

**संदर्भसूची :**

१) चव्हाण यशवंतराव (२००६): “युगांतर” कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
२) देसाई आणि भालेराव (१९७६) :“भारतीय अर्थव्यवस्था”, निराली प्रकाशन, पुणे.
३) बोधनकर सुधिर व अलोणी विवेक (२००३): “सामाजिक संशोधन पद्धती”, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
४) जोशी रामभाऊ (१९७६): “यशवंतराव : इतिहासाचे एक पान”, केशरी प्रकाशन,पुणे.
५) कोंडेवार यू.बी. व कोंडेवार स्मिता (२००५): “आर्थिक विचारांचा इतिहास”, शोभाभारती प्रकाशन, अहमदपूर, लातुर.
६) मेंहेदळे विश्वास (२००७): “यशवंतराव ते विलासराव”, अनुबंध प्रकाशन,पुणे.
७) रायखेलकर ए.आर. (२००५): “आर्थिक विचारांचा इतिहास”, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.
८) Suory M.M. (2003) : India Central Government Budgets (1947-48 to 2003-04) New Century Publication, Delhi.

# स्वातंत्र्योत्तर भारतवर्ष मे जातीव्यवस्था का स्वरूप और प्रभाव – एक ऐतिहासिक दृष्टी

**Dr.Dipak M.Chavan**
Asso.Prof Head dept of History Arts,Commerce & Science college Arvi, Dist-wardha ,Mail Id- dipakchavan3350@gmail.com

**सारांश**

हिंदू जातीप्रथा भारतीय समाज की एक आधारभूत संस्था है. जिसने दीर्घकाल तक सामाजिक व्यवस्था व संघटन बनाये रखने मे सफलता प्राप्त की है. परिवर्तनशीलता समाज का एक शाश्वत नियम है. मानव समाज के विभिन्न पक्ष समय समय पर आवश्यकता अनुरूप परिवर्तित होते रहते है. सामाजिक परिवर्तन ही सामाजिक गतिशीलता का प्रधान वाहक है. जाती व्यवस्था मात्र एक सामाजिक, सांस्कृतिक व्यवस्था नही है, इसकी जडे धार्मिक, आर्थिक, राजनैतिक अवस्था कि गहराई से जुडी है. नियसंदेह स्वातंत्र्योत्तर भारत मे व्याप्त नवीन आधुनिक अभिवृत्तिया तथा परिवर्तनोने भारतीय समाज के परंपरागत ढाचेंपर व्यापक प्रभाव डाला है.प्रस्तुत शोधपत्र मे स्वातंत्र्योत्तर भारत मे जातीव्यवस्था का स्वरूप और उसका प्रभाव इस विषय पर विचार व्यक्त किये गये है.

**बिजशब्द** – जातीप्रथा, स्वातंत्र्योत्तर, समाज, परिवर्तन,

**प्रस्तावना**

स्वतंत्रता प्राप्ति के उपरांत एक और जहा नवीन प्रगतशील परिवर्तनसे सजा भारतीय समाज सामाजिक नवनिर्माण का दावा कर रहा था वही दुसरी और भारत मे अनेकानेक सामाजिक विघटनकारी प्रवृत्तीया विकसित होते जा रही थी. स्वातंत्र्योत्तर भारतीय समाज मे जाती का प्रश्न आज भी बुद्धिजीवी व विद्वान के लिए यथावत विचारणीय है. जहा एक और अधिकांश विद्वानोने समाज मे जातीव्यवस्था के स्थान पर गतिशीलता का अनुभव किया है, वही दुसरी और उनके द्वारा जातीव्यवस्था के सामाजिक दृढता या स्थायित्वका ही मूल्यांकन किया गया. भारत मे जातीव्यवस्था के नवतरंग पर प्रकाश डालते हुए प्रो. एम एन श्रीनिवास कहते है की अंग्रेजो ने जिस तरीके से भारतीयों को राजनीतिक सत्ता हस्तांतरित की उससे जातिवाद को राजनैतिक घरातल मे पाव जमाने मे मदत मिली. आजादी के बाद आबादी के पीछे अनुसूचित जाती है, तथा अनुसूचित जनजाति को संरक्षण प्रदान करने के लिए बनाये गये प्रावधानोने जातिवाद को नवजीवन प्रदान किया है. ब्रिटिश प्रशासन को भारतीय समाज मे जाती व्यवस्था को स्थायित्व व सुदृढता प्रदान करने का उत्तरदायी मानते हुए प्रो. श्रीनिवास लिखते है कि पूर्व ब्रिटिश काल मे राजनीतिक व्यवस्था द्वारा जातीओके क्षेत्रीय प्रसार की प्रवृत्तिपर क्षेत्रीय सीमारोपी करने का एक स्वाभाविक परिणाम यह हुंवा है की जहा एक और एक क्षेत्र मे रहने वाले विभिन्न जातीया एक दुसरे के साथ सहयोग करने को प्रेरित हुई तथा व्यवसाय मे परस्पर निर्भर रहने के लिए मजबूर किया वही दूसरी ओर प्रत्येक जाती के सभी सदस्य दुसरी जातीय द्वारा देश की जा रही वस्तू और सेवाओ को प्राप्त करने की होड मे एक दुसरे के प्रतियोगी बन गये, जो विभिन्न जातियों के मध्य आपसी तनाव तथा सामाजिक स्तर मे प्रति स्पर्धात्मक भावना को जाहीर करता है. फलस्वरुप जहा एक और स्वातंत्र्योत्तर भारत मे जातीआधारित रूढिवादी परंपरा मे शिथिलता व जातिगत अंतर निर्भरता परीलक्षित होती है वही दुसरी और जातियों के मध्य पारंपारिक प्रतिस्पर्धा तथा विविध जातियोद्वारा जातिगत पुरुस्थन व सशक्त सामाजिक स्तरीकरण को स्पष्ट रूप से देखा जा सकता है.

**वर्तमान जातीव्यवस्था का उदय**

स्वतंत्र भारत मे वर्तमान जातीव्यवस्था के स्वरूप की नींव ब्रिटिश शासन काल मे ही रखी गई. समूचे भारत वर्ष मे सडको के निर्माण, यातायात संचार साधनोके विकास, रेल्वे डाक, सस्ता कागज तथा प्रेस की स्थापना, विशेषकर क्षेत्रीय भाषा मे समाचार, पत्र पत्रिका के प्रकाशन आदिद्वारा जातियों को ईस प्रकार का संघटित होणे मे सक्षम कर दिया जैसा की पूर्व मे संभव नही

था. एक साधारण पोस्टकार्ड किसीभी जाती की सभा की खबर बहुत आसानी से घर घर पोहोचा सकता था और रेल्वे के जरिये जातिगत समाजबंधू एक जगह जमा हो सकते थे. सस्ता अखबारी कागद उपलब्ध होने के कारण यह संभव हो गया कि, किसी खास जाती की खास पत्रिका प्रकाशित की जा सके जिसका मुख्य लक्ष अपनी जाति के हेतू को बढावा देना था. देश के अनेकानेक भागो में ब्रिटिश प्रशासन द्वारा नवीन आर्थिक शक्तीयो को जन्म दिया गया इस वजाह से यहा की पारंपरिक सामाजिक श्रेणी का अध:पतन होणे लगा. सदीसे इस व्यवस्था मे दरारे पडणे लगी, बडे आर्थिक परिवर्तन होने लगे, कृषी उत्पादन संबंधोके व्यवसायीकरण, ठेकेदारी प्रथा फॅक्टरी सरकारी सेवा मे प्रतियोगिता के अवसार फलस्वरूप भारतीय जाती व्यवस्था मे व्यापक परिवर्तनका उदय हुआ इस प्रकार भारतीय जातीव्यवस्था का परंपरागत स्वरूप एक नवीन परिवर्तित स्वरूप की और अग्रहारी हुआ. परंतु इसका अर्थ कदापि नही है की आजादी के बाद भारत मे जाती व्यवस्था शितल पडने लगी. वास्तव मे एक विचारनिय प्रश्न है की, क्या इस सामाजिक–आर्थिक गतीविधीयोने जातिवाद को प्रोत्साहित नही किया? समाज के निम्न जाति वर्ग और उच्च जातीवर्ग ऐसे सामाजिक भेद आर्थिक श्रेणीयो पर तय्यार हुये इससे सामाजिक विषमता का जन्म हुआ जिसने जातीय द्विवेदीकरण तथा विखंडन की प्रक्रिया को और भी तटस्थता प्रधान की.

**स्वतंत्र भारत मे जातीव्यवस्था सामाजिक स्वरूप**

भारत दीर्घ सातत्यो का देश है. जाती व्यवस्था के इतिहास से प्रकट होता है कि उसने न केवल विभिन्न समयो की राजनैतिक, सामाजिक व्यवस्था मे महत्त्वपूर्ण भूमिका निभाई है बल्कि अपने दीर्घ अस्तित्व के दौरान विद्यमान भौतिक व समकालीन परिस्थिती को अनुकूल बनाने के लिए, वह स्वयं को, सुधारती, बदलती व नयी परिस्थिती के अनुरुप ढालती रही है. संस्कृतीकरण,पाश्च्यात्तीकरण,जातीय नियमो मे लचीलापण, कठोर जातिगत प्रतीबंधोमे शिथिलता, स्वातंर्त्योत्तर भारत मे विभिन्न कारकोके परिणाम स्वरूप जातीव्यवस्था के सामाजिक स्वरूप व संरचना मे ऐसे अनेकानेक नवीन प्रवृत्ती का उदय हुआ है.इस प्रणाली ने समाज को एक असाधारण स्थिरता और व्यक्तियों को शांति और सुरक्षा प्रदान की है जो अन्यत्र नहीं देखी जाती है. जातियों के आंतरिक संगठन, न्यायिक व्यवस्था और पारिवारिक दायित्वों के माध्यम से व्यक्ति को सभी प्रकार की सामाजिक सुरक्षा प्राप्त होती रही है. यह अनाथों की परवरिश, विधवाओं, बीमारों, विकलांगों और बुजुर्गों की देखभाल के लिए प्रदान करता है. लेकिन जाति व्यवस्था आधुनिक औद्योगिक अर्थव्यवस्था और लोकतांत्रिक स्वतंत्रता और समाजवादी समानता के मूल्यों से मेल नहीं खाती और यह विरोध मौलिक प्रतीत होता है. आर्थिक विकास के लिए आवश्यक वाणिज्यिक और भौगोलिक गतिशीलता के लिए जातीय संबंध एक बाधा हैं. अब देखना यह है कि वर्तमान परिवर्तनशील और संक्रमणकालीन युग में जाति अपना रूप बदलती है और सामाजिक संबंधों में एक नए युग के अनुकूल सामंजस्य स्थापित करती है

**स्वतंत्र भारत मे जातीव्यवस्था का राजनैतिक स्वरूप**

स्वतंत्रता के पश्चात भारत मे, आधुनिकीकरण प्रक्रिया मे, इसके औपनिवेशिक प्रतिमानसे एक आधारभूत अंतर आया है. भारत मे जाती का राजनीति से सदा ही घनिष्ठ संबंध रहा है. देश मे स्वतंत्रता प्राप्ति के बाद उठे राजनेतिक तीव्र हलचल ने भारतीय पारंपारिक समाज की सबसे विशाल संस्था जातीव्यवस्था पर भी व्यापक प्रभाव डाला. प्रजातान्त्रिक मूल्यो की स्थापना के पश्चात भारत मे समस्त जाति वर्ग के व्यक्ति को नागरिक अधिकार प्रदान किये गये. जिनमे उनकी स्वतंत्रता समानता को विशेष रूप से उल्लेखित किया गया. संसदीय निर्वाचन प्रणाली ने समस्त जाती के सभी व्यक्ति को प्रत्यक्ष रूप मे शासकीय तथा राजनैतिक गतिविधियों का अंग बना दिया. प्रमुख राजनीतिक दलों, विशेष रूप से साम्यवादी और समाजवादी राजनैतिक दलों ने सभी जातियो को सामाजिक, आर्थिक व राजनैतिक समानता दिलाने मे महत्त्वपूर्ण भूमिका निभाई. इनके प्रयासोके परिणाम स्वरूप हिंदू जाति व्यवस्था मे अनेकानेक राजनीतिक परिवर्तन हुये.

**समारोप**

स्वतंत्रता के उपरांत, जातिगत भेदभाव व सामाजिक वर्गीकरण तथा असमानता दूर करने की दिशा मे विशेष प्रयत्न किये गये. स्वतंत्र भारत ने जो संविधान अपनाया वह वैयक्तिक तथा

सामूहिक धर्म तथा सामूहिक स्वतंत्रता का अधिकार देता है, तथा निर्धारित करता है कि सार्वजनिक रोजगार व शिक्षा मे जाती धर्म के आधार पर कोई राजकीय भेदभाव नही होगा. धार्मिक व जातीय क्षेत्रो मे संविधान तटस्थ है तथा सामाजिक वर्ग व जातियों के लिए समान राजनेतिक, आर्थिक अवसरो कि उपलब्धता पर बल देता है. इस प्रकार भारत का संविधान लौकिकता व लोकतंत्र की एक मानदंडात्मक संरचना प्रस्तुत करता है जो की, भारत मे आधुनिकीकरण की परंपरा के आवश्यक भागो का गठन करती है. स्वातंत्र्योत्तर भारत मे जातीव्यवस्था के स्वरूप मे परिवर्तन लाने वाले संविधानिक कायदे और स्वतंत्र भारत मे जनता के पीछे वर्ग विशेषता अनुसूचित जाती व जनजातियों की सुरक्षा के लिए संविधान मे जो विशेष प्रावधान किया गया है उसे भारतीय जाती व्यवस्था को नवीन स्वरूप प्राप्त हुआ है.

**संदर्भ सूची**


- देवेंद्र स्वरूप–जातीविहीन समाज का सपना,ग्रंथ शिल्पी एकेडमी,दिल्ली.
- एम.एन.श्रीनिवास – आधुनिक भारत मे जाती अनुवाद, राजकमल प्रकाशन,दिल्ली.
- दि.आर.जाटव– भारतीय समाज व विचारधाराये,नेशनल प्रकाशन, दिल्ली
- Nesfield,J.C., 1885, Brief Review of the Caste System of the North-West Proviences and Oudh, Allahabad
- Majumdar, D.N., 1944, Races and Cultures in India, Universal Publishers, Lucknow.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# ग्रामीण व शहरी भागातील ग्राहकांच्या मूलभूत व चैनींच्या वस्तू खरेदी कलवर जात आणि धर्माच्या प्रभावाचे अध्ययन विशेष संदर्भ अकोला जिल्हा

**Mr. Chandrakant B. Dhumale.**
Ph.D. Research Scholar,
Shri Shivaji College of Arts, Commerce & Science Akola.
Email ID: cdhumale9@gmail.com

**गोषवारा**

प्रस्तुत संशोधनिबंधात अकोला जिल्ह्यातिल ग्रामीण व शहरी भागातील ग्राहकांच्या मूलभूत व चैनींच्या वस्तू खरेदी कलवर जात, धर्म आणि जातसवर्ग निहाय वर्गवारीच्या प्रभावाचे अध्ययन केले आहे. संशोधकाने प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी "अकोला जिल्हा" हे संशोधन क्षेत्र निवडले आहे. संशोधकाने १००० ग्राहकांच्या मुलाखत अनुसूचीनुसार प्रश्न विचारून त्यांच्या खरेदी प्रेरणांची माहिती घेतली त्यानुसार ५०० ग्रामीण व ५०० शहरी भागातील ग्राहकांच्या मूलभूत व चैनीच्या वस्तू खरेदी कलवर जात, धर्म आणि जातसवर्ग निहाय वर्गवारीचा प्रभावहे या अध्ययनातुनजाणुन घेतले.

**कळशब्द** ग्रामीण व शहरी ग्राहकांचा खरेदी कल, खरेदी कल, मूलभूत व चैनींच्या वस्तू खरेदी कल.

**प्रस्तावना**

सन २०१९ चा विचार केला तर भारताच्या एकूण १३१ कोटी लोकसंख्येपैकी ७०.५ टक्के लोक ग्रामीण भागात राहतात आणि २९.५ टक्के शहरी भागात राहतात. शहरी लोकांचे प्रश्न हे शहरी वातावरणाशी, सामाजिक परिस्थितीशी निगडीत आहेत. त्याचे स्वरूप विविध म्हणजे सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, पर्यावरण विषयक, तांत्रिक इत्यादी आहे. शहरी लोक हे तुलनेने अधिक पुढारलेले, आक्रमक, संघटित, आधिक उत्पन्न कमावणारे, व्यापार करणारे आहेत, त्यांची मूलभूत व चैनींच्या वस्तू खरेदी विषयक स्वत:ची गुणवैशिष्टे आहेत.ग्रामीण व शहरी भागातील ग्राहकांची मूलभूत व चैनींच्या वस्तू खरेदी कल जात, धर्म आणि जातसवर्ग निहाय वर्गवारीनुसार भिन्न असतो.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

संशोधन विषयाचे अध्ययन करीत असतांना संशोधकाला संशोधनाची व्याप्ती ठरविणे अत्यंत महत्त्वाचे असते. कारण संशोधक संपूर्ण, समग्राचे अध्ययन करू शकत नाही. म्हणून संशोधन करीत असतांना संशोधकाला ज्या घटकांचे अध्ययन करावयाचे आहे, त्या घटकांच्या कोणत्या समस्येचे अध्ययन करायचे व कोणत्या भागातील क्षेत्रातील घटाकांचे अध्ययन करायेचे आहे हे निश्चित, करावे लागते. थोडक्यात संशोधनाच्या व्याप्तीमध्ये संशोधनाचे क्षेत्र, संशोधनाचे समग्र व संशोधन विषयाची व्याप्ती इत्यादींचा अतंर्भाव होतो.

संशोधन प्रक्रिया अमर्याद व अखंड असल्याने कोणत्याही विषयाचे संशोधन करीत असतांना त्याची व्याप्ती ठरविणे आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधनासाठी अकोला जिल्हा हे संशोधन क्षेत्र निवडूनले आहे. प्रस्तुत संशोधनात पुढील मर्यादा संशोधकाने संशोधनासाठी ठरविण्यात आल्या आहेत.

१. प्रस्तुत संशोधनामध्ये १८ ते ७५ वर्षे या वयोगटातील ग्राहकांचा विचार करण्यात आला आहे. १८ पेक्षा कमी व ७५ पेक्षा जास्त वय असणाऱ्या ग्राहकांचा अभ्यास सदर संशोधनात केला नाही.
२. संशोधन क्षेत्रातील ग्राहकांचे प्रत्यक्ष उत्पन्न विचारात घेतले आहेत.
३. सशोधनात मूलभूत वस्तू ह्या सुध्दा ग्राहकांनाच प्रश्न विचारून ठरविल्या आहेत.
४. संशोधनात चैनींच्या वस्तू ह्या ग्राहकांनाच प्रश्न विचारून ठरविल्या आहेत. कारण कोणत्या वस्तू चैनींच्या व कोणत्या वस्तू मूलभूत आहेत हे ग्राहाकांच्या मनोवृत्ती व उत्पन्नावर अवलंबुन असते.

म्हणुन त्यांच्या कडूनच मूलभूत चैनींच्या वस्तू कोणत्या याची माहिती घेवून यादी तयार करून त्याच चैनींच्या वस्तू खरेदी संबंधित कलाचे अध्ययन संबंधित संशोधनात केले आहे.

५.संशोधकाने संशोधनासाठी निवडलेला हा ग्राहक त्याचा संपूर्ण कुटुंबाच्या खरेदी कलास प्रदर्शित करतो. म्हणजेच यात निवडलेले ग्राहक हे प्रत्येक स्वतंत्र्य कुटुंबातील व्यक्ती आहेत.

अशा प्रकारच्या मर्यादा संशोधन विषयासाठी संशोधकाने निश्चित केला आहेत. संशोधनात नमुना निवडतांना सुध्दा मर्यादा ठेवण्यात आल्या आहेत कारण भारत हा जास्त लोकसंख्येचा व विविध धर्मांचा, संस्कृतीचा देश आहे. त्यामुळे निवडलेला नमुना हा भारतीय लोकसंख्येचा योग्य प्रतिनिधित्व करणारा असावा. यांसबधी सुध्दा संशोधकाने संशोधनात नमुना निवडातांना विचार केला आहे.

**संशोधन क्षेत्र**

संशोधकाने प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी "अकोला जिल्हा" हे संशोधन क्षेत्र निवडले आहे. अकोला जिल्हा संशोधन क्षेत्र निवडण्याचे कारण सदर जिल्हा विकसनशील जिल्हा आहे. मुख्यत: हा जिल्हा शेतीवर, व्यवसायावर, नोकरीवर तसेच मजुरीवर अवलंबुन असणाऱ्या लोकांनी व्यापलेला आहे, तसेच हा जिल्हा डोंगरी, पठारी क्षेत्रात असून या जिल्ह्यात आदिवासी मोठ्या प्रमाणात आहेत. याशिवाय संशोधनकर्ता या जिल्ह्यातील रहिवासी आहे. त्यामुळे आपल्या भागाचा अभ्यास करून आजच्या आधुनिक जगात आपल्या जिल्ह्यातील उपभोक्ता किती जागरूक आहे, हे उपभोक्त्याच्यां वर्तनाकलाच्या अभ्यासावरून जाणून घेता यावे म्हणून अकोला जिल्हा संशोधन क्षेत्र म्हणून निवडले आहे.

**नमुना निवड पध्दती :**

प्रस्तुत संशोधनासाठी अकोला जिल्हा हे संशोधन क्षेत्र निवडून या जिल्ह्यातील १००० म्हणजे ५०० ग्रामीण व ५०० शहरी ग्राहकांचा अभ्यास करण्यात आला. विषयाच्या अध्ययनासाठी संभाव्यता नमुना निवड पध्दतीमधील साधा यादृच्छिक नमुना निवड पध्दतीच्या अनियमित अंकन पध्दती, या उपपध्दतीचा आणि बहुपदित किवां बहुस्तरीय नमुना निवड पध्दती, यांचा अवलंब केला आहे.

**ग्रामीण व शहरी समाजाच्या ग्राहकांची धार्मिक खरेदी कलाची पार्श्वभूमी**

**१. धर्म**

अकोला जिल्ह्यात धर्मानुसार लोकसंख्येचे प्रमाण काय आहे हे जाणून घेण्यासाठी संशोधनकर्त्यांने अध्ययनासाठी निवडलेल्या एकूण १००० ग्राहकांच्या धर्माचे अध्ययन करण्याच्या उद्देशाने मुलाखत अनुसूचीमध्ये धर्मासंबंधी प्रश्न विचारला असता प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे धर्मानुसार ग्राहकांचे वर्गीकरण सारणी क्र. १ मध्ये दर्शविली आहे.

**सारणी क्र. १ धर्मानुसार ग्राहकांचे वर्गीकरण दर्शविणारी सारणी**

| अ. क्र. | धर्म | ग्रामीण वारंवारिता | शहरी वारंवारिता |
|---|---|---|---|
| १ | हिंदू | ३६९ (७३.८%) | ३७७ (७५.४%) |
| २ | बौध्द | ६७ (१३.४%) | ४९ (२४.८८%) |
| ३ | मुस्लिम | ३७ (७.४%) | ३३ (६.६%) |
| ४ | जैन | १२ (२.४%) | १९ (३.८%) |
| ५ | सिंधी | ७ (१.४%) | १७ (३.४%) |
| ६ | इतर | ८ (१.६%) | ५ (१.०%) |
| एकूण | | ५०० | ५०० |

**स्त्रोत: मुलाखत अनुसूची व्दारा संकलित माहितीच्या आधारे.**

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, ७३.८ टक्के ग्रामीण भागात आणि ७५.४ टक्के शहरात हिंदू ग्राहकांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. तर सर्वात कमी प्रमाण १.४ टक्के ग्रामीण व ३.४ टक्के शहरी भागात सिंधी धर्माचे दिसून येते, इतर धर्म म्हणजे शिख, पंजाबी, इसाई हे ग्राहक १.६ टक्के ग्रामीण भागात आणि १.० टक्के शहरी भागात आहेत.

ISSN : 2278-9308
July 2021

आलेख १धर्मानुसार ग्राहकांचे वर्गीकरण दर्शविणारा आलेख




२. जातसवर्ग निहाय वर्गवारी

संशोधकाने अकोला जिल्ह्याची निवड करून ग्रामीण व शहरी भागातील एकूण १००० ग्राहकांची अध्ययनासाठी निवड करून त्यांची जात मुलाखत अनुसूचिव्दारा जाणून घेतली. त्या आधारे प्राप्त झालेल्या जातींची वर्गवारी महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेल्या वर्गवारी निहाय जातींच्या याद्यांप्रमाणे वर्गवारी केली. ती खालील सारणी क्र. ४ अ. ९ मध्ये दर्शविली आहे.

सारणी क्र. २ग्राहकांचे जातसवर्ग निहाय वर्गवारी दर्शविणारी सारणी

| अ. क्र. | ग्राहकांची वर्गवारी | ग्रामीण वारंवारिता | शहरी वारंवारिता |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जात S.C | ९७(१९.४%) | ७२(१४.४%) |
| २ | अनुसूचित जमाती S.T. | १०(२%) | ३(०.६%) |
| ३ | विमुक्त जाती V.J. व भटक्या जमाती N.T. | ११०(२२%) | ७४(१४.८%) |
| ४ | इतर मागास वर्ग O.B.C. | १९६(३९.२%) | २०६(४१.२%) |
| ५ | विशेषमागास वर्ग S.B.C. | ७(१.४%) | १७(३.४%) |
| ६ | खुला वर्ग Open | ८०(१६%) | १२८(२५.६%) |
| एकूण | | ५०० | ५०० |

स्त्रोत: मुलाखत अनुसूची व्दारा संकलित माहितीच्या आधारे.

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनासाठी निवडलेल्या एकूण ग्राहकांपैकी सर्वाधिक १९६ म्हणजे ३९.२ टक्के ग्रामीण व २०६ म्हणजे ४१.२ टक्के शहरी ग्राहक इतर मागास वर्ग O. B. C.या प्रवर्गात मोडतात. ग्रामीण व शहरी भागात अनुसूचित जमाती S. T. वर्गवारीचे सर्वात कमी प्रमाण आहे.

ISSN : 2278-9308
July 2021

आलेख २

ग्राहकांची जातसवर्ग निहाय वर्गवारी दर्शविणारा आलेख




३ ग्रामीण व शहरी ग्राहक कोणकोणत्या सणाला वस्तूची खरेदी करतात

ग्राहक हा बाजारपेठेचा राजा आहे. बाजारपेठेतील ग्राहकांचे वर्तन अभ्यासणे हे फार गुतांगुतीचे कार्य आहे. ग्राहकांची वर्तणूक ही त्याच्या मानसिकतेशी संबंधित आहे. त्यामुळे त्यांचा मूलभूत व चैनींच्या वस्तू खरेदी संबंधित वर्तन अभ्यासण्यासाठी या ग्राहकांच्या सणासंबधीत खरेदी वर्तन कलेचे अध्ययन करणे आवश्यक आहे. याकारणास्तव त्यामुळे ग्राहकांचा सणाविषयीच्या वर्तनाची माहिती काढणे आवश्यक आहे. यासाठी संशोधकाने संशोधन क्षेत्रातील १००० ग्राहकांची मुलाखत घेऊन त्यांच्या उत्सवांसंबंधी व सणासंबंधी वर्तणूकीचे अध्ययनाची माहिती मिळविली. त्यानुसार ग्राहक संशोधन क्षेत्रातील कोणकोणते सण व उत्सव साजरे करतात यासंबंधी माहिती पुढील सारणीत दर्शविली आहे.

सारणी क्र. ३

ग्राहकांव्दारे साजरे होणारे सण व उत्सव यांसंबधी माहिती दर्शविणारी सारणी

| साजरे होणारे सण व उत्सव | प्रतिसाद | ग्रामीण | | | शहरी वारंवारिता | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | हिंदू | मुस्लिम | इतर | हिंदू | मुस्लिम | इतर |
| दसरा व दिवाळी | फक्त मूलभूत वस्तू | ० | २९ | ० | ७ | २२ | २९ |
| | फक्त चैनींच्या वस्तू | १९ | ५ | ९० | ४० | ११ | ६ |
| | दोन्ही | ३५० | ३ | ४ | ३३० | ० | ५५ |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | वस्तू | | | | | | |
| खिसमस / नाताळ | काहीही नाही | ३६० | ३३ | ० | ३७० | ३३ | ३५ |
| | फक्त चैनींच्या वस्तू | ९ | ४ | ० | ७ | ० | २५ |
| | दोन्ही वस्तू | ० | ० | ९४ | ० | ० | ३० |
| ईद | काहीही नाही | ३५० | ० | ९२ | ३७४ | ० | ८५ |
| | फक्त चैनींच्या वस्तू | १९ | ० | २ | ३ | ० | ५ |
| | दोन्ही वस्तू | ० | ३७ | ० | ० | ३३ | ० |
| गुरूनानक जयंती | काहीही नाही | ३६९ | ३७ | ८२ | ३७७ | ३३ | ८० |
| | फक्त चैनींच्या वस्तू | ० | ० | ० | ० | ० | ३ |
| | दोन्ही वस्तू | ० | ० | १२ | ० | ० | ७ |
| बुध्द पौर्णिमा / डॉ. बाबासाहेब आबेंडकर जंयती | फक्त मूलभूत वस्तू | ३६९ | ३७ | ९२ | ३७७ | ३३ | ८५ |
| | फक्त चैनींच्या वस्तू | ० | ० | ० | ० | ० | ४ |
| | काहीही नाही | ० | ० | २ | ० | ० | १ |
| महावीर जयंती | काहीही नाही | ३६९ | ३७ | ९१ | ३७७ | ३३ | ८८ |
| | फक्त चैनींच्या वस्तू | ० | ० | २ | ० | ० | २ |
| | दोन्ही वस्तू | ० | ० | १ | ० | ० | ० |
| गुडीपाडवा | काहीही नाही | २४ | ३५ | ९० | ३०५ | ३२ | ७७ |
| | फक्त चैनींच्या वस्तू | ९ | ० | | ४७ | १ | १३ |
| | दोन्ही वस्तू | ३३६ | २ | ४ | २५ | ० | ० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | काहीही नाही | ९ | ३७ | ९४ | ३०७ | ३३ | ७५ |
| गणेश उत्सव / नवरात्री | फक्त चैनींच्या वस्तू | १० | ० | ० | ७० | ० | ५ |
| | दोन्ही वस्तू | ३५० | ० | ० | ० | ० | १० |
| अक्षय तृतीया | फक्त मूलभूत वस्तू | २४ | ३६ | १९ | ३७ | २८ | ५५ |
| | फक्त चैनींच्या वस्तू | १०० | १ | ७५ | १४० | ५ | ३५ |
| | दोन्ही वस्तू | २४५ | ० | ० | २०० | ० | ० |

**स्त्रोत: मुलाखत अनुसूची व्दारा संकलित माहितीच्या आधारे.**

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अध्ययनासाठी निवडलेल्या एकूण ग्राहकांपैकी सर्वाधिकग्राहकदसरा, दिवाळी, अक्षय तृतीया, गणेश उत्सव व नवरात्री, ईद या सणा निमित्त चैनींच्या वस्तूंवर जास्त सूट असते, म्हणून खरेदी केली जाते. तर मूलभूत या गरजेमुळे खरेदी कराव्या लागतात.

**निष्कर्ष** :— सर्वेक्षणामध्ये असे आढळून येते की, ग्रामीण व शहरी भागात अनुक्रमे ७३.८ व ७५.४ टक्के सर्वात जास्त धर्मनिहाय हिंदू धर्माचे प्रमाण आढळून आले. ग्राहकांचा खरेदी कल हा धार्मिक पार्श्वभूमीवर अध्ययनासाठी सर्वेक्षित क्षेत्रात धर्माचे अध्ययन केले. ग्रामीण भागात १९६ म्हणजे ३९.२ टक्के व शहरी भागात २०६ म्हणजे ४१.२ टक्के इतर मागास वर्ग O. B. C.वर्गवारीचे ग्राहक सर्वात जास्त आहे, तसेच विशेषमागास वर्ग S. B. C. वर्गवारीचे ग्राहक ७ म्हणजे १.४ टक्के ग्रामीण भागात ग्राहक आहे, व शहरी भागात अनुसूचित जमाती S. T. वर्गवारीचे सर्वात कमी ०.६ टक्के प्रमाण आहे.सर्वेक्षणामध्ये असे आढळून येते की, शहरी भागात ९१ टक्के ग्राहक गणेश उत्सव व नवरात्री, ४९टक्के ग्राहक ईद, ९६ टक्के ग्राहक दसरा दिवाळी, ९८.८ टक्के ग्राहक अक्षय तृतीया इत्यादी प्रकारचे सण साजरे होण्याचे प्रमाण सर्वात जास्त आहे, तर

ग्रामीण भागात ९३ टक्के ग्राहक दसरा दिवाळी, ४८ टक्के ग्राहक बुध्द पौर्णिमा, ८१ टक्के ग्राहक गणेश उत्सव व नवरात्री आणि टक्के ग्राहक ९८.६ अक्षय तृतीया उत्साहात साजरे केले जातात. मूलभूत व चैनींच्या वस्तू खरेदी संबंधित वर्तन अभ्यासण्यासाठी ग्राहकांच्या सणासंबधीत खरेदी कलचे अध्ययन केले. चैनींच्या वस्तूंची खरेदी सणाला केली जाते असा कल ग्रामीण व शहरी ग्राहकांचा आहे. एकूण ग्राहकांपैकी सर्वाधिकग्राहकदसरा, दिवाळी, अक्षय तृतीया, गणेश उत्सव व नवरात्री, ईद या सणा निमित्त चैनींच्या वस्तूंवर जास्त सूट असते, म्हणून खरेदी केली जाते. तर मूलभूत या गरजेमुळे खरेदी कराव्या लागतात.

**संदर्भ सुची**

1. श्री. कडवेकर वि., 'विपणन व्यवस्थापन', प्रथम आवृत्ती २००७, डायमंड पब्लिकेशन पुणे.
2. डॉ. बोधनकर सुधीर व प्रा. अलोनी विवेक, 'सामाजिक संशोधन पध्दती', श्री साईनाथ प्रकाशन नागपूर,
3. मंजुरे वनमाला, 'ग्राहकराजा जागा हो', पुणे: मैत्रय प्रकाशन प्रथम आवृती २०१०
4. https://research-methodology.net/descriptive-research/
5. http://zenithresearch.org.in.
6. www.americanheritagedictionary.com
7. WWW.Censusindia.gov.in
8. www.businessdictionary.com>basicgoods
9. www.econowiki.com>basicgoods
10. www.haberler.com, 2014
11. www.conceptofluxurybrands.com
12. www.wikipedia.org/wiki/luxurygoods
13. www.businessdictionary.com
14. www.wikipediya.com14 dec. 2012

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# 'लोकशाहीर अण्णा भाऊंच्या कादंबरीतील नायक –नायिका'

प्रा. अजित जयराम जाधव
सहायक प्राध्यापक , मराठी आठल्ये–सप्रे–पित्रे महाविद्यालय, ( स्वायत्त ) देवरुख, जि. रत्नागिरी ,इ-मेल –dspmaspajit@gmail.com ,मोबाईल नं. –९८६०७६७९२८

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे नाव मराठी साहित्यात अजरामर झाले आहे. कथा, कादंबरी, वगनाट्य, शाहिरी काव्य, लोकनाट्य प्रवासवर्णन इ. साहित्यप्रकारामध्ये त्यांनी लेखन केले आहे. त्यांच्या साहित्याचे वैशिष्ट्य म्हणजे सामान्यातल्या सामान्य माणसाचे वास्तव जीवन चित्रित करणे होय. दलित, शोषित, पिडीत समाजाला ग्रामपातळीवर आणि प्रस्थापितांशी करावा लागणारा संघर्ष हा त्यांच्या लेखनाचा विशेष होय. अण्णा भाऊंनी विशिष्ट भूमिकेतून प्रेरित होऊन लेखन केले आहे. आपल्या लेखानाबद्दल ते म्हणतात, "आपण जे जीवन जगतो, ज्या जीवनात आपला आणि आपल्या कैक पिढ्यांचा जन्म झाला, त्या जीवनाचा आपण रोज अनुभव घेत आलो आहोत, तेच जीवन जगणारी बहुसंख्यांक जनता, त्या जनतेचे विशाल जीवन, तिची जगण्याची धडपड, किंवा संघर्ष, त्याच जनतेत वावरणारे उदात्त विचार हे सारे आपल्या लिखाणातून आपल्या जनतेपुढे आपण मांडावे, अशाच मोहाने प्रेरित होऊन मी आजपर्यंत लिहीत आलो आहे."अण्णा भाऊंची ही लेखन प्रेरणा त्यांच्या लेखनातून प्रकर्षाने दिसून येते.

अण्णा भाऊंचे कादंबरी लेखन विपुल आणि विशेष नजरेत भरणारे आहे. त्यांच्या काही निवडक कादंबरींचा विचार केलेला आहे.

**वारणेच्या खोऱ्यात-**

अण्णा भाऊंची ही पहिलीच कादंबरी. वारणेच्या अनेक बंडखोरांच्या टोळ्या अस्तित्वात होत्या. याच बंडखोरांच्या टोळ्यांपैकी हिंदुराव एक आहे. या कादंबरीचा नायक हिंदुराव हा मुळचा शेतकरी असून अन्यायाविरुद्ध लढणारा आहे.एकीकडे गावातील सावकार, सरंजामदार सामान्य शेतकऱ्याला लुबाडून जमिनी बळकावत असत. हिंदुरावाची जमीनही बळकावली गेली होती. त्यामुळेच त्याला बंड करावे लागले. सावकारांशी लढून तो शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांना परत करत असे. म्हणूनच लोक त्याला'फिरते सरकार'असे म्हणत असत. तर दुसरीकडे इंग्रज सरकारशीही लढत असे. हिंदुरावाचा लढा हा एकाचवेळी सावकार आणि सरकार यांच्या विरोधात होता.

हिंदुरावाचे लग्न मंगल या युवतीशी होते. या लग्नाला तिचा भाऊ हंबीर याचा विरोध असतो. कारण त्याला आपल्या बहिणीचे लग्न आपल्यापेक्षा श्रीमंत, जमीनदार व इंग्रजांचा माफीचा साक्षीदार नागोजी पाटील याच्याशी व्हावा असे वाटत होते. परंतु असे न झाल्याने तो भयंकर चिडलेला असतो. त्यामुळेच 'रक्ताचे शिंपण'करण्याची त्याची भाषा असते. नागोजी इंग्रजांचा माफीचा साक्षीदार असल्याने बंडखोर हिंदुरावावर त्याची करडी नजर असते. शिवाय मंगलाशी लग्न न झाल्याने राग असतो. याचा बदला म्हणून हंबीरच्या मदतीने ती दोघं एकत्र असलेल्या वाड्यावर इंग्रजांचे सैन्य घेऊन चाल करतो. परंतु हिंदुराव व मंगला दोघेही निकराने झुंज देतात. यामध्ये नागोजी मारला जातो. दोघांच्या बंदुकीत शेवटचे एक–एक काडतुस शिल्लक असताना इंग्रज सैन्य त्वेषाने लढत असते. आता आपला निभाव लागणार नाही हे लक्षात येताच शिवाय इंग्रजांच्या हातून मरण्यापेक्षा; हिंदुरावआपल्यावर गोळी झाडण्याचे मंगलाला सांगतो. मंगलाला धीर होत नाही. शेवटी दोघेही निर्धाराने एकमेकांवर गोळ्या झाडून इंग्रजांना शरण न येता आपले जीवन संपवतात.

**चित्रा–**

चित्रा या कादंबरीच्या लेखनाविषयी अण्णा भाऊ प्रस्तावनेमध्ये म्हणतात ,"जेव्हा मी वाटेगाव येथे राहून सातारा जिल्ह्यात भटकत होतो, त्यावेळी कऱ्हाड-कोल्हापूर सडकेला मला एक भाची व एक मामा अशी दोन माणसे भेटली. त्याच वेळी एका तरुणीच्या जीवनाचे धागे मला सापडले. परंतु पुढे ही तरुणी आपल्या कादंबरीची नायिका होऊन मराठी साहित्यात अवतरेल याची मात्र मला मुळी कल्पना नव्हती."कादंबरीची नायिका चित्रा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमुळे आई व मोठी बहीण सोना यांच्यासोबत मामाकडे राहात असते. सोनाचे लग्न मामा लावून देतो; पण तिचा नवरा महारोगी असल्याने सोना माहेरीच राहाते. काही दिवसांनी मामा सोनासाठी मुंबईत स्थळ असल्याचे सांगून मुंबईला घेऊन जातो व सोनास वेश्या व्यवसायात ढकलतो. गावी येऊन सर्वकाही व्यवस्थित असल्याचे सांगतो. त्यामुळे सोनाची आई निर्धास्त होते. सोना आईसाठी दर महिन्याला मामाच्या नावावर पैसे पाठवीत असते; त्यामुळे मामा भलताच खुष असतो.

सोनाचे सर्वकाही व्यवस्थित झाल्याने चित्राच्याही लग्नाचा विचार चित्राची आई आपल्या भावाजवळ बोलून दाखवते. त्याप्रमाणे चित्रासाठीही मामा स्थळ पाहतो; व तिचेही लग्न लाऊन देतो. जेमतेम लग्नाला पंधरा दिवस होतात आणि चित्राचा नवरा मरतो. चित्रा विधवा म्हणून माहेरी जीवन जगत असते. अशा परिस्थितीत मामा चित्राचे लग्न लावून देण्याच्या निमित्ताने मुंबईला सोनाकडे वेश्या व्यवसायासाठी घेऊन जातो; पण सोनाला हे मान्य नसते. चित्राला आपल्या बहिणीचे जीवन पाहून धक्का बसतो. तिथे तिच्यावर अनेकांची वासनायुक्त नजर असते. पण सोना आपल्या बहिणीला जिवापाड जपत असते. तिला चित्राचे लग्न करून द्यायचे असते तसे ती बोलूनही दाखवते. चित्राला आपल्या असुरक्षिततेची जाणीव क्षणाक्षणाला होत असते; शिवाय'काहीही करून अब्रूला सांभाळ'हे आईचे शब्द तिला आठवतात. एका रात्री मनाचा निश्चय करून त्या दलदलीतून बाहेर पडते आणि आपल्या अब्रूला सांभाळते.

**फकिरा-**

'फकिरा'कादंबरी विशेष अर्थाने लक्षणीय आहे. अण्णा भाऊंनी ही कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या झुंजार लेखणीस अर्पण केली आहे . तर प्रस्तावना ज्ञानपीठ पुरस्कार लाभलेले वि.स. खांडेकर यांनी लिहिली आहे. या प्रस्तावनेमध्ये खांडेकर लिहितात , "या लेखकाला प्रतिभाचं देणं आहे. जीवनात आग ओतणाऱ्या हरतऱ्हेच्या गोष्टींचा अनुभव आहे. त्याच्या मनात एक प्रकारचा पीळ आहे –आणि अन्यायाविरुद्ध बंड उभारणाऱ्या वृत्तीचा तो पूजक आहे ! "अण्णा भाऊंचे साहित्य वाचत असताना या गोष्टींचा पुरेपूर अनुभव येतो.

कादंबरीचा नायक फकिरा दलित समाजातील असून आपल्या गावावर , समाजावर होणाऱ्या अन्यायाविरोधात पेटून उठतो. परंतु त्याला गावातील वडीलधाऱ्यांविषयी, कुटुंबाविषयी आदर आहे. म्हणूनच कोणतीही गोष्ट करताना त्यांचा सल्ला घेतो. वाटेगावात दलित समाज साथीच्या आजाराने, दुष्काळाने अन्न-अन्न करून टाचा घासून मरु लागला. फकिराला हे पहावेनासे झाल्याने गावकामगार पंतांना सवाल करतो, माणसांनी जगावे कसे? त्यावर पंत म्हणतात, "काहीही करा, पण जगा!"सगळेच रस्ते बंद झाल्याने फकिरा आपल्या सहकाऱ्यांना घेऊन धान्याच्या कोठारावर दरोडा टाकतो, त्यामुळे दलित समाजाच्या चुली पेटतात. फकिरावर सरकारची व गावातील विरोधकांची करडी नजर असते. म्हणून फकिरा गाव सोडून आपल्या सकार्‍यांसोबत दऱ्याखोऱ्यात राहतो. मात्र अधूनमधून आपल्या माणसांना भेटत असतो.

फकिरा बेडसगावच्या वाड्यातील सरकारी खजिन्यावर धाड टाकतो तेव्हा वाड्यातील एक स्त्री भीतीने आपल्या दोन कुमारी मुलींची अब्रू वाचवण्यासाठी भिकेचा पदर पसरते, तेव्हा फकिरा गहिवरून म्हणतो, "आई, थांब! मी खजिना न्हेनार हाय. तुमास्नी ओरबडाय मी आलो न्हाय. कारन, आब्रू खाऊन उपाशी माणसं जगत नसत्यात . जावा, आपल्या घरात बसा!"फकिरा बंडखोर असला तरी तो नीतिमान होता. या दरोड्यामुळे सरकार फकिराला

पकडण्यासाठी संपूर्ण दलित समाजाला ओलीस ठेवतात. शेवटी फकिरा व त्याचे आठ साथीदार सरकारला शरण येतात तेव्हा साऱ्यांची सुटका होते. फकिराला आपल्या प्राणापेक्षा इतरांचे प्राण महत्वाचे वाटतात.

**चंदन-**

तरुपणात वैधव्य आलेली चंदन अतिशय कष्टाने आपल्या लहान मुलासोबत कामगार वस्तीत जीवन कंठीत असते. कोणाचे पाठबळ नसल्यामुळे एका दगड खाणीत माती उपासण्याचे काम करते. परंतु तेथील पुरुषांच्या वासनायुक्त नजरेने ती घायाळ होते. अनेकवेळा तिची अब्रू लुटण्याचा प्रयत्नही केला जातो. पण ती तसे करू देत नाही. ती ज्याच्याकडे काम करते तो दयाराम इतरांच्या मदतीने स्वत:च्या घरी अब्रू लुटण्याचा प्रयत्न करतो. अशावेळी हाताला लागलेले ॲसिड जिवाच्या आकांताने त्याच्यावर ओतते, त्याच्या शरीराची एक बाजू भाजली जाते. यामुळे तिलादोन वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा होते. शिक्षा ऐकल्याने मुलाच्या काळजीने ती जो हंबरडा फोडते, त्याने सर्वजण हेलावतात.

हायकोर्टात चंदनच्या बाजूने खटला उभा राहतो. तिच्या बाजूने भक्कम पुरावे मिळतात आणि तिची सुटका होते.

**आवडी-**

'आवडी'या कादंबरीच्या लेखनाबद्दल अण्णा भाऊ म्हणतात, "आवडीचं प्रेत गोरीतून काढले, तेव्हा मी गोरीजवळ हजर होतो. प्रचंड देहाचा धनाजी काखेत लुगडे –चोळी घेऊन रडत होता. त्याला आवडीची एक चप्पल मिळाली, तेव्हा तो लहान मुलाप्रमाणे रडू लागला. त्या प्रसंगाचा माझ्या मनावर खोल परिणाम झाला. तब्बल चार वर्षे मी विचार केला. सर्व पदर हाती आल्यानंतर मी ही'आवडी'निर्माण केली."अण्णा भाऊंनी आपल्या प्रतिभेने कादंबरी लेखन केले असले तरी त्यांच्या प्रतिभेला सत्याची धार असल्याचे दिसून येते.

कादंबरीची नायिका'आवडी'हिचा भाऊ नागू चौघुला घाईगडबडीने आपल्या बहिणीचे लग्न उरकतो. लग्न झाल्यावर आवडीला कळते की, आपल्या नवऱ्याला'फेफरं'येण्याचा आजार असतो. हा आजार इतका भयानक असतो की, फेफरं येण्याच्या दरम्यान हाताला जे काही लागेल त्याचा तो चोळामोळा करतो. लग्नाच्या पहिल्याच दिवशी तिच्यावर दु:खाचा डोंगर कोसळतो. या सर्व गोष्टींची माहिती भावाला असते; हे कळल्याने तिला फारच धक्का बसतो. माहेरच्या, सासरच्या सर्वच माणसांचा राग येतो.

दरम्यान गावातील धनाजी रामोशी या तरुणाबरोबर तिचे प्रेमाचे संबध जुळतात. आवडी सासरची आणि माहेरची पर्वा न करता धनाजीच्या घरी निघून जाते. पाटलाची सून रामोशाची झाल्याने गावात याचा फार बोलबाला होतो. तिचा भाऊ नागू घराण्याची अब्रू गेल्याने सुडाने पेटतो आणि तिचा खून करतो, या घटनेने धनाजी वेडापिसा होतो. बहिणीचा नागुने खून केल्याने बारा वर्षाची सक्तमजुतीची शिक्षा मिळते. शिक्षा भोगून जेंव्हा तो बाहेर येतो,तेव्हा त्याच्या अनेक वर्ष पाळतीवर असलेला धनाजी नागूचा खून करून आपल्या प्रिय आवडीच्या खुनाचा बदला घेतो.

**वारणेचा वाघ-**

वारणेचा वाघ या कादंबरीचा नायक'सत्तू भोसले'तरुण तडफदार आणि बंडखोर आहे. सुरवातीची काही वर्षे लष्करात काम करतो; पण अधिकाऱ्याच्या जाचाला कंटाळून आपल्या मूळ गावी कुमजला परततो.गावामध्ये त्याला मान असतो. सत्तूला कोणावर अन्याय झालेला सहन होत नसतो; म्हणूनच गरोदर स्त्रीलालाथाबुक्यांनीमारणाऱ्या गावातील उर्मट मथाजी चौगुल्याचा खून करतो आणि फरारी होतो. यावेळी त्याला अनेकजण येऊन भेटतात आणि वारणा खोऱ्यात दहशत निर्माण होते. सावकारांच्या घरावर दरोडा टाकतो. मात्र सर्वसामान्यांसाठी तो आधार असतो. त्याने सावकाराकडील गहाण जमिनी शेतकऱ्यांना मिळवून दिल्या तर अनेक मुलींचे संसार सुरळीत केले. म्हणूनच अनेक मुली त्याला पाठचा भाऊ मानतात, देव मानतात. अनेकांची गाऱ्हाणी ऐकून त्यांचे प्रश्न सोडवत होता.

परंतु गावात आणि गावाबाहेर त्याचे विरोधकही होते. या विरोधकांना हाताशी धरून सरकार त्याला पकडण्याच्या प्रयत्नात असते. तसा प्रयत्नही झाला पण वाटेगावचा 'फकिरा'त्याच्या मदतीला आल्याने सत्तू सहीसलामत सुटतो. परंतु सरकार त्याच्याविषयीची मोहीम तीव्र करते. यात सत्तूला गोळी लागून एक बंड शांत होते.

**मास्तर-**

साताराजिल्ह्यातील देवगाव या शाळेतील मास्तरला शाळेत शिकवण्याबरोबरच देशभक्तीचे वेड असते. म्हणूनच देशासाठी –देशाच्या स्वातंत्र्यासाठी तो झटत होता. गुलामगिरीची त्याला चीड असल्याने शाळेतील विध्यार्थ्यांना तो देशभक्तीचे धडे देत होता. शाळा सुटली की, एखाद्या गावात जाऊन लोकांना भेटून रात्री अपरात्री सभा घेत असे. यातूनच स्वातंत्र्याची चळवळ उभी राहत होती. बेचाळीस साली सारा देश स्वातंत्र्यासाठी झुंज देत होता, यामध्ये सातारा जिल्हा अग्रेसर होता.

मास्तरवर इंग्रज सरकारची करडी नजर असते. त्याला पकडण्यासाठी सरकार इनामही जाहीर करते. त्यामुळे पैशाच्या लासेने मास्तरचे विरोधकही वाढतात. मास्तरला अनेकवेळा पकडण्याचा प्रयत्न केला जातो, पण तो सहीसलामत सुटतो. मास्तरला पकडून देण्यास गावच्या सुभानराव पाटलाचा हात असतो. हे मास्तराच्या लक्षात येताच तो त्याला अर्धमेला करतो आणि फरारी होतो. इंग्रज सरकारची त्यावर पाळत असते, त्यातच पोलिसांच्या झालेल्या चकमकीत मास्तरला कैद होते. त्याला चाळीस वर्षाची शिक्षा होते.

मास्तरची दुसरी बायको तुरुंगात अनेकवेळा भेटायला जात असते, त्यावेळी ती व्यवहारी विचार एकच प्रश्न करीत असते, 'मी काय करू ?'त्यावर शेवटी मास्तर तिला नवीन घरोबा करण्याचे सांगतो. तसे तिच्या बापालाही कळवतो. तिचे लग्न होते आणि तेराव्या दिवशी तेराव्या दिवशी कॉंग्रेस मंत्रिमंडळ सत्तारूढ होते. या सरकारने'सर्व राजबंदी सोडावे'असा पहिला हुकूम काढल्याने मास्तरची सुटका होते.

**समारोप-**

अण्णा भाऊंचे कादंबरी लेखन हे प्रामुख्याने सातारा जिल्ह्यातील वारणा खोऱ्यातील आहे. सातारा जिल्हा हा देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत आघाडीवरहोता. अशावेळी देशभक्त क्रांतिकारक, सरकार आणि खूनी-दरोडेखोर यात भीषण लढाई चालू होती. यामुळे सरकारी पोलिस देशभक्त आणि दरोडेखोर यांच्यावर एकाच वेळी हत्यारे चालवीत होते. बंदुकांनी सारा परिसर, दऱ्या-खोऱ्यातून दणाणून जात असे. या सर्व घटना अण्णा भाऊंच्या ऐकिवात होत्या. या घटनांचा, तर प्रत्यक्षपणे काही सामाजिक गोष्टींचा आधार घेऊन त्यांनी कादंबरी लेखन केले आहे. त्याचप्रमाणे मुंबईतील कष्टकरी, श्रमिकांचे जीवन त्यांच्या लेखनाचे विषय झाले आहेत.

अण्णा भाऊंच्या कादंबरीतील नायक, नायिका प्रतिकूल परिस्थितही स्वातंत्र्य व न्यायासाठी झगडताना दिसतात. त्यांची स्वत:ची अशी नैतिक जीवनमूल्ये आहेत ही जीवनमूल्ये जपताना जीवावर उदार होऊन संघर्ष, बंड करतात प्रसंगी मृत्युलाही सामोरे जातात. अण्णा भाऊंचे कादंबरीतील नायक, नायिका सर्वसामान्य असले तरी त्यांच्यामधील असामान्यत्व हा गुण वाचकांच्या मनावर बिंबतो. म्हणूनच त्यांच्याविषयी वाचकांच्या मनात आदर निर्माण होतो. त्यादृष्टीने वारणेच्या खोऱ्यात, चित्रा , फकिरा, चंदन, आवडी, वारणेचा वाघ, मास्तर इ. कादंबऱ्या लक्षणीय असल्याचे दिसून येते.

संदर्भ ग्रंथ

१ अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय ( कादंबरी खंड –भाग १ व भाग २ )
–प्रकाशक –साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# लॉकडाऊनमध्ये प्रवासी मजुरांचे स्थलांतरण, अपघात व मुत्यु

डॉ. अजय कारूजी. मेश्राम
जोतीराव फुले समाजकार्य महाविद्यालय, उमरेड जि. नागपूर
मो :— ९९७५३२१३५३ई—मेल ajaymeshram76@gmail.com

**प्रस्तावना:—**

'स्थलांतरण' हा माणसाचा आजवरच्या इतिहासात कायमच महत्वाचा घटक राहीला आहे. आदिम काळापासून आजच्या कोरोना संकटापर्यंत माणसे सतत एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी जात राहिली आहेत. मानव कधी विविध संकटापासुन दूर जाण्यासाठी तर कधी स्वत:च्या पोटाची खडगी भरण्यासाठी. या स्थलांतर करणाऱ्या माणसांशी तेथील मुळच्या लोकांसोबत झालेल्या संघर्षाच्या आणि सहकर्याच्या विविध कहाण्यांनी व गोष्टींनी माणसाचा इतिहास भरलेला आहे. आज एकविसाव्या शतकात वाढलेला प्रवासाचा वेग आणि संपर्काची क्रांती यामुळे स्थलातंराचे नवनविन पैलू सामोर येत आहेत.

कोरोनाच्या संकटापासून वाचण्यासाठी आणि भविष्यातील आर्थिक मंदिच्या भीतीने आज लाखो लोक मुंबई—दिल्लीसारख्या मोठया शहरातून आपल्या मुळ गावाकडे परत जात आहेत. वाहतुकीच्या अपुऱ्या होत असलेल्या व्यवस्थेमध्ये स्थलांतरच्या काहाण्यांनी थेट १९४७ च्या फाळणीच्या वेळी झालेल्या ऐतिहासिक स्थलांतराची आठवण येत आहे. ही सारी माणसे देश लॉकडाऊन झाल्यानंतर अशी का सैरावैरा होत आहेत याचामुळापासून अभ्यास करणे आजच्या घडीला खूप महत्वाचे ठरले आहे. त्यामुळेच लॉकडाऊन मध्ये प्रवासी मजुरांचे स्थलांतर, अपघात व मुत्यु यांचा अभ्यास करून शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनामध्ये केला आहे.

एकीकडे कोरोनाच्या काळात झालेली स्थलांतरे आपल्या देशाच्या समाजरचनेला आव्हान आणि नवा आकार देतील, असे अनेक विद्वान व अभ्यासकाचे म्हणणे आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर 'स्थलांतर' या मुद्दयाची व्याप्ती तरी नव्याने समजून घ्यायला हवी. त्यासाठी या विषयाचे अभ्यासक आणि राज्यकर्ते, धोरणकर्ते यांच्यात संवाद असायला पाहीजे.

**व्याख्या:—**

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे प्रमुख गाय रायडर यांनी सांगितल्यानुसार "स्थलांतर हा मुद्दा समाजातील आर्थिक व्यवस्थेला गतिमानता देणारा आणि समाजातील विविध घटकांना उपजीविकेचे साधन मिळवून देणारा आहे."

तरिही त्यामुळे निम्न अतिनिम्न वर्गातील माणसांना एखाद्या जनावराप्रमाणे शोषण आणि अन्याय सहन करावे लागेल ही देखील स्थलांतरणाची दुसरी महत्वाची बाजू आहे. आजवर ही बाजू व्यवस्थेकडून नेहमीच दुर्लक्षित राहीली आहे.

ब्लूमबर्ग.क्विंट या आघाडीच्या उदयोग अर्थवृत्तसंस्थेने नमूद केल्यानुसार कोरोनाच्या काळात समोर चाळीस कोटी कामगारांवर दारीद्रयाचे संकट कोसळणार आहे.

**२४ मार्च २०२० ला लॉकडाऊनची घोषणा:—**

कोरोना वायरसच्या वाढत्या फैलावामुळे २४ मार्च २०२० ला लॉकडाऊनची घोषणा झाली. सर्व कंपन्यांनी आपल्याला कर्मचाऱ्यांना, कामगारांना कोणतीही पुर्व सूचना न देता व्यवहार बंद केले. त्यानंतर सुरू झाली प्रवासी मजूरांना आपआपल्या घरी पोहचण्याची घाई गडबड. कसतरी करून लिफ्ट घेत प्रवासी मजदूर पोहचत होते. तर कुणी सायकलनी प्रवास तर हजारो लोकांनी आपला जीव गमावला आहे. अनेक प्रवासी मजुराचे अपघातामुळे जीव गले आहेत. काही प्रवासी मजूर हजारो कि.मी. पायी चालल्यामुळे रस्त्यामध्येच त्यांना मृत्युमुखी पडावे लागले. प्रवासी मजूर घरी पोहचण्याचा आतंकाने मालवाहू ट्रक किंवा इतर साधनांचा वापर करून प्रवास करू लागले परंतू काही वाहनांना अपघात होऊन किंवा घाटामध्ये बस, ट्रक पलटून हजारो प्रवासी मजूरांना आपला जीव गमवावा लागला.

**लॉकडाऊनमध्ये किती प्रवासी मजुरांचे जीव घेले?**

संसदेच्या पावसाळी अधिवेशना दरम्यान विरोधी पक्षाकडून लोकसभेत सरकारला लॉकडाऊन विषयी अनेक प्रश्न विचारण्यात आलेत. लॉकडाऊनमध्ये किती प्रवासी मजुरांचा जीव गेला? या प्रश्नाचे उत्तर सरकार देऊ शकली नाही. सरकारने या प्रश्नांवर 'माहित नाही' अस उत्तर देत जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केलेला दिसतोय. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला सुरूवात झाल्यानंतर अनेक खासदारांनी तत्कालीन भारत सरकारला वेगवेगळे प्रश्न विचारले होते. या दरम्यान लॉकडाऊनकाळात देशात किती प्रवासी मजुरांनी आपले प्राण गमावले? असा एक प्रश्नही विरोधी पक्षाने संसदेत उपस्थित केला. यावर सरकारकडून आपल्याला याबद्दल माहीती नसल्यांच उत्तर भारत सरकारकडून देण्यात आलय.

भारत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २४ मार्च पासुन अचानक लागु केलेल्या देशव्यापी लॉकडाऊनमुळे मोठया शहरांत पोट भरण्यासाठी आलेल्या अनेक प्रवसी मजुरांवर बेरोगारीची वेळ आली होती. या संदर्भात विरोधी पक्षांन लॉकडाऊन काळात देशात किती प्रवसी मजुरांनी आपले प्राण गमावले? असा एक प्रश्न सरकारला विचारला. यावर आपल्याकडे असा कोणताही आकडा नाही जो सांगु शकेल की या दरम्यान नेमक्या किती प्रवासी मजुरांचा मृत्यु झाला असे उत्तर सरकारकडून देण्यात आले. या सोबतच प्रवसी मजुरासंबंधी काही प्रश्न सरकारला विचारण्यात आले. प्रवासी मजुरांचा नेमका आकडा ओळखण्यात सरकारने चूक केली का? लॉकडाऊनमध्ये हजारो प्रवासी मजुरांनी आपले प्राण गमावल्यांच अनेक घटनांमधुन टी.व्ही बातम्यावरून, वर्तमानपत्रातून, दैनिक वृत्तातून समोर येत होत्या. अशा वेळी सरकारकडे आकडा आहे का? त्याद्वारे लॉकडाऊन दरम्यान किती मजुरांचा मृत्यु झाला? हा प्रश्न सरकारद्वारे अउत्तरीय आहे, यावरून असे लक्षात येते की, मृत्यु झालेल्या प्रवाशी मजुरांन विषयी भारत सरकार संवेदनशिल दिसुन येत नाही. लोकसभेत विरोधी पक्षाच्या प्रश्नांची उत्तर मा. मंत्री संतोष कुमार गंगवार यांनी लिखीत स्वरूपात दिली. "भारतात केंद्र सरकार, राज्य सरकारे अनेक स्थानिक प्रशासन यांनी एक देश म्हणून करोनाविरूद्ध युद्ध लढले" अस त्यांनी आपल्या उत्तरांत म्हटलंय. याशिवाय गरिब प्रवासी मजुरांच्या मृत्युच्या आकडयाबद्दल मात्र आपल्याकडे माहिती उपलब्ध नसल्याचाही त्यांनी यावेळी सांगितले.

**रेशनकार्ड धारकांना मोफत रेशन वाटप**

त्याचवेळी संसदेच्या पावसाळी अधिवेशनामध्ये सरकारने सर्व रेशनकार्ड धारकांना मोफत रेशन उपलब्ध करून दिलंय का आणि हया प्रश्नांचे उत्तर हो असेल तर त्याची माहिती सरकारने दयावी असे अनेक प्रश्न संसदेत उपस्थित झाले. करोना संकटकाळात सरकारनं उचललेल्या वेगवेगळया पावलांची विस्तृत माहिती दयावी. असाही प्रश्न संसदेत विरोधी पक्षान लिखित स्वरूपात विचारल. रेशनिंगच्या मुद्दयावरून मंत्रालयाकडून स्पष्टीकरण देण्यात आले की आकडा उपलब्ध न होऊ शकल्यांच यात सरकारकडुन सांगण्यात आले परंतू मंत्रालयाने संपूर्ण देशात ८० कोटी लोकांना पाच किलो अतिरिक्त गहू किंवा तांदूळ, एक किलो दाळ नोव्हेंबर २०२० पर्यंत देण्यात येणार असल्यांच सांगितले. याशिवाय लॉकडाऊन काळात गरीब कल्याण योजना, आत्मनिर्भर भारत पॅकेज, ईपीएफ यासारख्या योजनांचा लाभ प्रवासी मजुरांना देण्यात सरकारतर्फे जाहिर करण्यात आले होते.

**सरकारच्या गिणतीत नसलेले प्रवासी मजूर**

काहीही कल्पना नसतांना अचानक लागलेल्या लॉकडाऊनमुळे भांबावलेले आणि त्रेधातिरपीट उडालेले प्रवासी मजूर सरकारच्या गिणतीत लॉकडाऊनच्या आधीही नव्हते आणि जेव्हा लॉकडाऊनची घोषणा करण्यात आली त्यानंतरही नाहीत, कारण केंद्र सरकारच्या श्रम मंत्रालयाकडे किती प्रवासी मजुरांना या काळात हालअपेष्ठा सहन करून आपल गाव गाठाव लागले आणि त्यापैकी किती जणांवर या प्रवासात मृत्यु ओढवला याचे आकडे उपलब्ध नाहीत. अशी माहिती संसदेत सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात विरोधकाकडून प्रश्न विचारण्यात आले असता केंद्रीय मंत्री मा.संतोष गंगावर यांनी दिली. त्याच्या म्हणण्यानुसार या मजुरांचा एकुण आकडाच सरकारकडे उपलब्ध नाही. त्यामुळे त्यांना आर्थिक मोबदला देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. परंतू

प्रसार माध्यमाद्वारे देशाचे इतर नागरीक या प्रवासी मजुरांचे हाल पाहत होते आणि चहुबाजूने हळहळ व्यक्त होत होती.

**सरकारने मृत्यु पावलेल्या प्रवासी मजुरांना नुकसान भरपाई दिले का?**

केंद्रिय श्रम मंत्रालयाकडून पावसाळी अधिवेशनामध्ये झालेल्या प्रश्नाला उत्तर देतांना प्रवासी मजुरांच्या मृत्युची आकडेवारी उपलब्ध नसल्यांचे सांगण्यात आल्याने, लॉकडाऊनमध्ये प्राण गमावणाऱ्या प्रवासी मजुरांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई देण्याचा प्रश्नच येत नाही असे, उत्तर सरकारने दिलंय. अशाप्रकारे लॉकडाऊनच्या दरम्यान मृत्युमुखी पडलेल्या प्रवासी मजुरांची कोणतीही आकडेवाडी आपल्याकडे नाही. त्यामुळे नुकसान भरपाईचा प्रश्नच येत नाही असे म्हणत सरकारने सस्पेशल हात झटकलेत. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात विरोधी पक्षाकडून सरकारला प्रवसी मजुरांसदर्भात काही प्रश्न विचारण्यात आले. कोरोना वायरस लॉकडाऊनमध्ये आपल्याला कुटंबापर्यंत पोहचण्याच्या प्रयत्नात प्राण गमावणाऱ्या प्रवासी मजुरांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्यात आली का? असा प्रश्न यावेळी उपस्थित करण्यात आला होता. प्रवासी मजुरांची कोणतीही अधिकृत आकडेवारी सरकारकडे उपलब्ध नाही. त्यामुळे नुकसान भरपाईचा प्रश्नच येत नाही. असं त्यांनी आपल्या लिखित उत्तरात म्हटंल आहे.

मात्र लॉकडाऊन दरम्यान एक कोटीहून अधिक प्रवासी मजूर देशभरातून आपआपल्या राज्यांत श्रम मंत्रालयाने मान्य केले. सरकारच्या या उत्तरावर कॉंग्रेसचे जेष्ठ नेते मा.दिग्विजय सिंह आपल्याला धक्का बसल्याची प्रतिक्रिया दिली. श्रम मंत्रालयाकडे किंवा केंद्र सरकारकडे प्रवासी मजुरांच्या मृत्युची कोणतीही आकडेवारी नाही अशा वेळी नुकसान भरपाईचा कोणताच प्रश्न येत नाही असे श्रम मंत्रालयाचे म्हणणे हे धक्कादायक आहे. "कधी कधी मला वाटंत की आपण संगळे आंधळे आहोत किंवा सरकारला असे वाटते की ते सगळयांचा फायदा उचलू शकतात" अशी तीव्र प्रतीक्रिया मा.दिग्विजय सिंह यांनी दिली.

**प्रवासी मजुरांना पुन्हा परत आणण्यासाठी कंपन्याचे प्रयत्न**

कोरोनावायरस च्या वाढत्या फैलावामुळे २४ मार्च २०२०ला लॉकडाऊनची घोषणा झाली. सर्व कंपन्यांनी आपआपल्या कर्मचाऱ्यांना कोणतीही पूर्व सूचना न देता सर्व व्यवहार बंद केले. त्यानंतर सुरू झाली सर्व प्रवासी मजुरांना आपआपल्या घरी पोहचण्याची घाई. त्यावेळी संपूर्ण देश लॉकडाऊन झाल्यामुळे प्रवासी संपूर्ण साधने (बस, ट्रव्हल्स, रेल्वे, लोकल ई) बंद झाली. कसतरी करून लिफ्ट घेत प्रवासी मजूर घरी पोहचत होते. तर कुणी सायकल, तर लोकांनी पायी जाण्याचा पर्याय निवडला. आता कंपन्या पुन्हा सुरू झाल्या आहेत आणि मजुरांना पुन्हा परत बोलावण्यात येत आहे. पण मजूर आता परत येण्यास साशंक आहेत. प्रवासी मजूरांना परत बोलवण्यासाठी कंपन्या अनेक प्रकारची प्रलोभने दाखवत आहेत. कंपन्या इथपर्यंत प्रलोभन दाखवून गावातील प्रमुखांशीही चर्चा करत आहेत की, मजूरांना कामावर पाठवा असे म्हणत आहेत. त्या बदल्यात कंपन्या मजूरांना सूरक्षा देत आहेत तशी हमी देत आहेत. तसेच त्यांच्या येण्या–जाण्याची व्यवस्थाही स्वत:ह करायला तयार आहेत. अनेक मजूरांनीपरतण्याची इच्छा व्यक्त केली आहे पण त्यासाठी कंपन्यांना चांगलेच झटावे लागले आहे.

मुंबईच्या एका फार्मा कंपनीला गेल्या तीन महिन्यांमध्ये कामगार नसल्याने खुपच अडचणी आल्या. त्यानंतर कंपनी आपल्या कर्मचाऱ्यांना येण्या–जाण्यासाठी बसची योग्य सोय सुद्धा करणार आहे. केईसी इंटरनॅशनल चे एम.डी आणि सी.ई.ओ विमल केजरीवाल यांनी सांगितले की त्यांच्या कंपनीतील काही मजूर परत आले आहेत. कंपनी कडून मजुरांचे परिवार आणि गावातील सरपंचांना मजुरांच्या सुरक्षेचे वचन दिले जात आहे.सी.ई.ओ विमल केजरीवाल यांनी सांगितले की काही परीसरांमधून मजुरांना फ्लाईटने आणले जात आहे. मजुरांना परत आणण्यासाठी बस आणि ट्रेन पेक्षा पुढे जाऊन कंपन्या विमानामधूनही मजूरांना परत बोलावले जात आहे. कंपन्यांकडून मजुरांना राहण्याबरोबरच अनेक प्रकारच्या सुविधा दिल्याजात आहेत. मजुरांना राहण्याबरोबरच अनेक प्रकारच्या सुविधा दिल्या जात आहेत. मजुरांना परत आणण्यासाठी कंपन्या दोन्ही राज्यातून अधिकाऱ्यांची परवानगी मागत आहेत.

सारांश :—

केंद्रीय गृह मंत्रालयाने लोकसभेत लॉकडाऊनच्या काळात अस्थायी कामगारांना मोठया संख्यने स्थलांतर केल्याचे सांगितले. प्रवासी मजूर अन्न, पाणी, आरोग्य सेवा आणि निवाससंदर्भातील मूलभूत गरजांविषयी चिंतीत असल्यामुळे त्यांनी आपल्या मुळ ठिकाणी जाण्याचा निर्णय घेतल्याचे गृह मंत्रालयाने सांगितले. केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांनी लॉकडाऊनमध्ये असंघटीत मजुरांच्या स्थलांतरणाबाबत विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देतांना केंद्र सरकार त्याबद्दल पूर्णपणे जागरूक होती आणि या कालावधीत प्रवासी मजूर कामगारांसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्याचे सांगितले. याशिवाय गृह मंत्रालयाने लॉकडाऊनमध्ये स्थलांतरित मजूरांच्या समस्या कमी करण्यासाठी केंद्र सरकारने मंत्रालयात नियंत्रण कक्षाची स्थापना केली. तसेच अनेक उपाययोजना केल्यांचे सांगितले. केंद्रीय राज्य मंत्री नित्यानंद राय यांनी दिलेल्या लेखी उत्तरात नियंत्रण कक्षातून स्थलांतरित कामगारासह अडकलेल्या लोकांच्या तक्रारी दूर करण्यात आल्या असल्याचे सभागृहात सांगितले यामध्ये अन्न, वाहतूक, निवारा इत्यादी तक्रारीचा समावेश असल्याचे सांगुन राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना हेल्पलाईन आणि कंट्रोल रूम सुरू करण्याचा सल्ला देण्यात आला होता.

याव्यतिरिक्त सर्व राज्यांना प्रवासी कामगारांना तात्पुरती राहण्याची व्यवस्था, भोजन, कपडे, वैद्यकिय सेवा इत्यादी पुरविण्यासाठी केंद्र सरकारने राज्य आपली निवारण निधी (एस.डी.आर.एफ) वापरण्याची परवानगी दिल्याची माहिती गृह राज्यमंत्री नित्यानंदराय यांनी लोकसभेत दिली. तसेच देशात भविष्यातील गोंधळाची परिस्थिती रोखण्यासाठी काही तासांच्या अवधीतच देशव्यापी लॉकडाऊन करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले परंतु केंद्र सरकारने २५ मार्च २०२० पासून राबविण्यात आलेल्या लॉकडाऊनमध्ये झालेल्या स्थलांतरणाच्या वेळेस किती प्रवसी कामगार मरण पावले याची माहिती किंवा आकडेवारी शासनाकडे नसणे किती दुंभाग्यपूर्ण असु शकते याची प्रचीती येते. स्थलांतरणाच्या वेळी मृत्यु झालेल्या प्रवासी मजुरांच्या नातेवाईकांना किंवा वारसदारांना नुकसान भरपाई म्हणुन आर्थिक मोबदला देणे गरजेचे होते. परंतू केंद्रीय कामगार मंत्रालयाने आपल्याकडे मृत्यु पावलेल्या कामगारांची आकडेवारी उपलब्ध नाही असे म्हणून सरास हात झटकल्याचे दिसून येते. यावरून शासन सामान्य लोकांच्या जिवनाशी कशा प्रकारे खेळी करते यावरून सिद्ध होते. त्यामुळे सामान्य जनतेने स्वत:हच्या जिवनाविषयी व आरोग्याविषयी जागृत राहणे अत्यंत अनिवार्य आहे.

संदर्भ:—

१) https://www.google.com/amp/s/www.com
2) egkjk"V<sup>a</sup> VkbEl-dkWe@update:14 Sep 2020/shubhangi Palve
3) maharashtratimes.com
4) https://ruralindians.com/:Eo: A 4 :..........
5) By, Kalpesh Nukte : PUBLISHED 16 September 2020 Update.
6) Vhe bZ- ldkG@Tuesday 15 September 2020

# आदिवास्यांची वनआधारीत अर्थव्यवस्था : एक जिवनशैली

आदित्य प्रकाशराव कनेर
adityapkaner@gmail.com,मो.नं. ८०८०१५४५३०

**सारांश :—**

बहुतांश करून आदिवास्यांचे जिवनमान त्यांच्याजवळ असणाऱ्या नैसर्गिक संसाधनावरच अवलंबून असते त्यात जंगलाचा व वनाचा सहभाग सर्वाधिक आहे. २००६ च्या वनहक्क कायद्यानुसार त्यांच्या हक्कावर गदा आली आहे असे कित्येक आदिवास्यांना वाटते व ही भर इंग्रजकालीन परिस्थितीपासून पडत आली आहे अशी ही त्यांची टिका आहे. एकंदरीतरित्या वनावर वा जंगलावर आपले प्रभुत्व राहले पाहिजे अशी त्यांचे अपेक्षा आहे.

वनातुन मिळणारे साधने जसे, वनस्पतीजन्य उत्पादने, बंबूकाड्या, वेल, तसर, मध, लाख, तेंदू, मोहफुले, बिबाफुले, कंदमुळे, औषधी वनस्पती इत्यादी व्दारे व ते विकुण ते आपला उदरनिर्वाह चालवत असतात. त्यात वनोपजातील लाकुड फाट्यावरही त्यांचा अधिकार असावा असे त्यांना वाटते. पण सरकारच्या या महत्त्वपूर्ण आर्थिक स्त्रोतापायी हा लाकुडफाटा आदिवास्यांच्या हक्कातुन वगळण्यात आला आहे. तसेच त्यांची आर्थिक परिस्थिती या त्यांना मिळत असणाऱ्या वनातील संसाधनाव्दारे ते दिवसागणीत अधिक प्रगत करत आहे व ती स्थिती अधिक प्रगत कशी करता येईल याकडे सरकारने लक्ष देणे गरजेचे आहे.

**प्रस्तावना :—**

आदिवासी हा समाज बहुतांशकरून अलिप्त अशा डोंगराळ भागात शहरीकरणापासून दूर तुरळक वस्ती करून राहतो. त्यांचे जिवनमानही त्यांच्या राहणीमानाच्या ठिकाणाशी जुळते असते. तसेच या प्रदेशात मिळत आलेल्या सोयी व साधनांव्दारे त्यांचा उदरनिर्वाह चालत असतो. डोंगराळ भागातील वनात मिळणाऱ्या संसाधनांवरच त्यांचे जीवनमान अवलंबून असते. देशाच्या विविध भागात हा आदिवासी समाज निवास करत असून उत्तर पूर्वेकडील बहुतांश राज्यात हा समाज मोठ्या प्रमाणात राहतो. तर महाराष्ट्राचा विचार केला असता ठाणे, धुळे, नाशिक, पालघर, पुणे, नंदुरबार, अहमदनगर, चंद्रपुर, भंडारा, सिंधुदुर्ग, गडचिरोली, अमरावती, यवतमाळ इत्यादी जिल्हूयात आदिवासी समाज मुख्यत: आढळतो. त्यात एकुण ४७ जमातींचा समावेश असून भिल्ल, कोरकू, पारधी, काटकरी, कोया, ठाकूर, कोलाम, हलबा, गोंड, कोळी इत्यादी जमातीचा महाराष्ट्रात प्रामुख्याने समावेश आहे.

**पार्श्वभूमी :—**

१८ व्या शतकापासुन आदिवास्यांच्या वनआधारित जिवनमानात बदल आढळून आले त्यात प्रामुख्याने इंग्रजकालिन परिस्थिती विशेष ठरते. वनहक्क कायदे, आदिवास्यांचे हक्क आणि सरकारला मिळत असलेली मिळकत यामुळे आदिवास्यांच्या जिवनामानात बदल घडून आले आणि ते त्यांना काहिस्या प्रमाणात स्विकाराहार्य नव्हते. याचे कारण की त्यांना त्या आपल्या डोंगराळ दुर्गम भागावर प्रचंड निष्ठा होती. त्यावरच त्यांचे जिवनमान अवलंबून होते. पण सरकारी कायद्यामुळे, वनहक्कामुळे आदिवास्यांचे हक्क संपुष्टात येवू लागले होते आणि हिच परिस्थिती आज देखील आहे.

वन अधिकार अधिनियम २००६ सुधारित २००८ व २०१२ नुसार ५० टक्के पेक्षा जास्त भूभाग जिथे जंगलाने व्याप्त आहे व १५ ते २० टक्के इतक्या भूभागावर मागास पध्दतीने केली जाणारी शेती आहे अशा ठिकाणी लोकांची उपजिवीका परंपरेने व यापुढेही वनावरच अवलंबून असणार आहे. अशा वननिवासी समाजांना वनहक्क मान्यता अधिनियम २००६ (अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वन निवासी अधिनियम) अंतर्गत सामूहिक वन हक्काच्या माध्यमातून वनाचे व्यक्तीगत व सामूहिक अधिकार दिले गेले आहे. त्यामधील महत्त्वाचे सामुहिक हक्क पुढील प्रमाणे :—

१)गावाच्या हद्दीतून किंवा हद्दबाहेरून जे गौण वनोपज परंपरेने गोळा केले जात आहे अशा वनोपजावरील मालकी हक्क गोळा करण्याचा, वापरण्याचा आणि विकण्याचा अधिकार.
२)कायद्याप्रमाणे गौण वनोपजात इमारती लाकूड वगळता इतर वनस्पतीजन्य उत्पादने बांबूकाड्या, बुंधे, वेल, टसर, रेशमाचे कोश, मध, मेण, लाख, राळ, तेंदू, औषधी वनस्पती, कंदमुळे या सर्वांचा समावेश होईल.
३)इतर सामुहिक उपयोगाचे अधिकार यांच्यात मासे व इतर जलाशयातील उत्पादन, चरई स्थायीक व फिरस्थी या सर्वांचा समावेश होईल.
४)वनसासियांचे इतर पारंपारिक हक्क मात्र शिकार करण्याचा हक्क सोडून
५)जैवविविधता गोळा करण्याचा ती वरील व पारंपारिक ज्ञानावर तसेच सांस्कृतिक वैविध्यावरील बौध्दीक संपत्तीचे अधिकार.
६)पूर्वपार संरक्षण – संवर्धन करीत असलेल्या सर्व सामुहिक संसाधनाचे संरक्षण, पुन:रूज्जीकरण व व्यवस्थापन करण्याचा अधिकार.

असे वरील अधिकार व हक्क वनकायद्याव्दारे स्थानिक आदिवास्यांना देण्यात आले आहे. याव्दारे त्यांचे आर्थिक जिवनमान कसे सुधारेल तसेच वनातून मिळणारे इतर साधने आणि जमिन कसण्याचे अधिकार याव्दारे त्यांचे जिवनमान कशा प्रकारे सुधारेल व वनोपजावरील साधनाव्दारे ते कशा प्रकारे नविन व्यवसाय व उत्पादन करू शकेल यावर भर दिला पाहिजे.

**आदिवास्यांच्या वनआधारीत जीवनाचे महत्त्व :–**

आदिवासी यांचे वनआधारीत जिवनमान त्यांचे उपजिवीकेचे साधन आहे. वनावरच त्यांची संपूर्ण भिस्त आहे. वनातून मिळणाऱ्या साधनातून ते उदरनिर्वाह चालवत. झूम शेती अथवा स्थलांतरीत शेती करण्याचे प्रमाण आढळते. वनहक्क कायद्याव्दारे शेती कसण्याचे अधिकार मिळाले आहे. त्यानुसार आदिवासी जंगल साफ करफन डोंगराच्या पायथ्याच्या ठिकाणी काहिश्या जमिनपट्टयांवर उदरनिर्वाहासाठी शेती करतात. ज्वारी, बाजरी, मका इत्यादी कडधान्यात्मक पिके घेतात. तसेच इतर वनोपसाचे साधने म्हणजेच लाकूडफाटा वगळता वनस्पतीजन्य उत्पादने, बांबूकाड्या, वेल, टसर, मध, लाख, तेंदू, मोहफुले, बिबाफुले, कंदमुळे, औषधी वनस्पती इ. चा समावेश होतो. याव्दारे ते आपला उदरनिर्वाह चालवत असतात. तसेच जिल्ह्यात आदिवासी बहूल भागात दूध उत्पादन होते. त्याचे प्रमाणही साधारण आहे. कारण मुबलक चारा त्या भागात असल्या कारणास्तव पशूपालन केले जाते. दुध उत्पादक जनावर सोबत इतरही जनावरे पाळल्या जातात. पाणी स्त्रोत असल्या कारणास्तव केले जाते. अशा प्रकारे प्राथमिक स्वरूपाचे उद्योग या ठिकाणी केल्या जातात.

आपले जिवनमान सुधरवणे व आर्थिक स्थैर्य प्राप्त करणे हे महत्वाचे उद्दिष्ट आदिवास्यांच्या वन आधारीत जीवनाविषयीची आहे. वनातुन, जंगलातुन मिळणारी जी साधन संपत्ती आहे त्यांच्या पुरेपुर वापर करून अधिक मिळकत कशी मिळवता येईल आणि कुठल्याही परिस्थितीत आपला उदरनिर्वाह कसा पूर्ण करता येईल ही या वनआधारीत जीवनविषयीची वनोपजातून मिळणाऱ्या संपत्तीची उद्दिष्ट होय. रोजगार निर्माण करणे तसेच रोजगाराच्या प्रमाणात अधिकाधिक वाढ करणे, ग्रामीण दुर्गम भागातील लोकांना काम देणे, कामाची सुरक्षा कशी प्राप्त होईल याकडे लक्ष देणे तसेच या दुर्बल घटकांचे सबलीकरण करणे हा यामागील उद्देश होय.

तसेच पर्यावरणात्मक बाबींची पूर्तता लक्षात घेवून पर्यावरण पूरक साधनांव्दारे या दुर्गम भागातील लोकांचे जीवनमान उंचावून पर्यावरणाचा समतोल राखणे व विकास करणे हाही यामागील उद्देश आहे. वने, प्राणी, पक्षी इत्यादी नैसर्गिक बाबी व उचल संपत्तीचा ऱ्हास न होउ देता आणि त्यांचाही विकास करणे हाही यामागील उद्देश आहे.

**आदिवास्यांच्या वनआधारीत जीवनाविषयीची वैशिष्ट्ये :–**

१) दुर्गम डोंगराळ आदिवासी बहुल भागातील लोकांना उपजीवीकेचे साधन उपलब्ध करून देत आहे.
२) वन आधारीत उत्पादनातुन व्यक्ती रोजगाराच्या सोयी उपलब्ध करून देणे व रोजगार निर्माण करून देत आहे.
३) निसर्गाचा समतोल राखुन योग्य त्या प्रकारे संवर्धन होत आहे.

ISSN : 2278-9308
July 2021

४) प्राणी, पक्षी, वृक्ष इत्यादी नैसर्गिक संपत्तीचे संरक्षण करण्यास मदत होत आहे.
५) भूजल स्त्रोतांची निगा राखणे व त्या आधारीत संपत्ती व रोजगार तसेच उदरनिर्वाहाची व्यवस्था लावण्यात येत आहे.
६) शेती व्यवसाय या प्रदेशातील स्थलांतरीत प्रकाराचा असून स्थानिक लोकांना या शेतीपासून मदत मिळत आहे.
७) चारा मुबलक प्रमाणात मिळत असून येथे पशुपालन व दुध उत्पादन मोठ्या प्रमाणात होण्यास मदत मिळत आहे.
८) वनोपजातून मिळणाऱ्या साधनाव्दारे तेथील व्यक्ती कला कसुरीच्या वस्तू बनवित आहे व आपल्या संस्कृतीचे दर्शन जगासमोर मांडत आहे.

वरील वैशिष्ट्ये आदिवास्यांचे जीवन वनआधारीत जीवनावर कशाप्रकारे अवलंबून आहे हे स्पष्ट करते.

**निष्कर्ष :—**

देशाच्या अर्थव्यवस्थेच्या प्रवाहापासून काहीसा दूर असा हा आदिवासी समाज आहे. त्याच्या जीवनमुल्यांस अनुसरून राहणारा आणि निसर्गावर प्रेम करणारा हा आदिवासी समाज आपल्या प्रदेशातच राहतो. दुर्गम डोंगराळ प्रदेशात त्यांची वस्ती असल्या कारणास्तव व साधनांची दळण वळण योग्य त्या प्रमाणात होत नसल्या कारणास्तव हा समाज देशाच्या मुख्य प्रवाहात आलेला नाही. वैद्यकिय सोयी, शिक्षण, सामाजिक सेवा इत्यादी अत्यावश्यक सेवांपासून ते दूर राहिलेले आहे. आदिवास्यांच्या वन आधारीत जीवनाच्या महत्त्वावरून असा निष्कर्ष निघतो की, त्यांचे सर्चस्व वनच आहे. शहरी बाजारपेठेपासुन तसेच ज्या ठिकाणी त्यांच्या संपत्तीला वाव आहे अशा ठिकाणापासून ते अलिप्त आहे. त्या कारणास्तव त्यांना योग्य तो मोबदला कसा मिळविता येईल व त्यांचे जीवनमान कसे सुधारता येईल याकडे प्रस्तुत विषयात लक्ष पुरविण्यात आले आहे व या अनुषंगाने हा विषय त्यांच्या रोजगारात व उपजिवीकेच्या साधनात तसेच त्यांच्या जीवनमानात सुधारणा आणु शकते.

**संदर्भ ग्रंथ :—**

१) गारे गोविंद, आदिवासी समस्या व बदलते संदर्भ, सुगावा प्रकाशन, पुणे—२०००.
२) देवगावकर शैलजा, वैदर्भीय आदिवासी, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
३) मांडवकर भाउ, आदीम, सेवा प्रकाशन, अमरावती.
४) आदिवासी जंगल हक्क कायदा, स.पा.रामसिंग गावीत, सुर्यवंशी निर्मळकुमार— २००६.
५) महाराष्ट्र आदिवासी विकास महामंडळ माहिती पुस्तिका.
६) योजना, लोकराज्य मासिक.
७) लोकमत, लोकसत्ता वृत्तपत्र.

# जात या घटकाचा सामाजिक संबधावर पडलेला प्रभाव

प्रा. विजय शामराव कांडलकर
सहा. प्रा. (राज्यशास्त्र विभाग)संताजी महाविद्यालय, नागपूर
vijay30kan@gmail.com

**सारांश :—**

जातीव्यवस्थेने मानवी जीवनाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतीक, राजकीय इ. अशा सर्वच क्षेत्राावर प्रभाव टाकतांनाच काही विकृतीनांही जन्म दिला आहे. जातीने मानवी व्यवहारांना प्रभावीत करीत व्यक्ती — व्यक्तीत पारस्पारीक संबध म्हणजे सामाजिक संबधावर सुध्दा विपरीत परिणाम घडवून आणला आहे. व्यक्ती व्यक्तीमधील ज्या पारंपारीक संबधातून, सामाजिक गतीशीलता, सामाजिक विकास व समाजिक परीवर्तन इ. बाबी घडुन येण्याऐवजी जातीतील नियमांच्या पालनामुळे व्यक्ती व्यक्तीत पारस्पारीक द्वेष, तीरस्कार, वैमनस्याची भावना निर्माण होण्यावर मदत झाली आहे. जातीच्या आधारे व्यक्तीव्यक्तीमध्ये उच्च—कनिष्ठ, स्पृश्य—अस्पृश्य, एक जात ही दुसऱ्या जातीना वेगळे माणन्याचा प्रकार इ. मुळे समाजात सामाजिक विषमतेची बिजे पेरली जातात. यातुनच जातीय विद्वेष व जातीय संघर्ष याची उत्पत्ती होत असते. या सर्वाची परिणीती म्हणजे व्यक्ती व्यक्ती मधील सामाजिक संबधात दुरावा निर्माण होऊन एकूणच सामाजिक वातावरण सुध्दा कलुशित होते.

**बिज शब्द :—**

समाजजीवन, सामाजिक संबध, विषमता, अपृश्यता, स्तरीकरण, जातीव्यवस्था, संस्कार, देवाणघेवाण, भेदभाव, परीवर्तन, मानवी मुल्य, सामाजिक विकास.

**प्रस्तावना :—**

भारतीय समाजाचे सखोल व साकल्याने अध्ययन केले असता असे दिसुन येते की, प्राचीन काळी भारतीय समाजात अस्तित्वात आलेली वर्णव्यवस्था व त्यानंतर निर्माण झालेली जातीव्यवस्था या दोन्ही संकल्पनांनी भारतीय समाजजीवणाला विशेष प्रभावीत केले आहे. विशेष करून जाती संस्थेमुळे भारतीय समाजाचे शेकडो जाती आणि उपजातीमध्ये विभाजन झालेले आढळुन येते. जाती व्यवस्था ही एक सामाजिक संस्था असून त्यास हिंदु धर्माची मान्यता असल्यामुळे जाती व्यवस्था शेकडो वर्षापासून टिकुन आहे. या जातीव्यवस्थेमुळेच भारतीय समाजजीवनाचे शेकडो जातीमध्ये विभाजन झालेले आहे. जातीचा दर्जा हा समान माणन्यात येत नसल्यामुळे जातीव्यवस्थेमुळे भारतीय समाजात विषमता निर्माण झाली. त्यातच जाती या जन्मावर आधारीत असल्यामुळे व्यक्तीचा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ दर्जा हा जन्मताच निश्चीत होत आला. त्याचा परिणाम म्हणजेच भारतीय समाज व त्याचे स्वरूप हे एक संघ दिसून येत नाही.

कु्रर, विघातक व अमानवी असलेली जाती व्यवस्था समाजाचे विघटन होण्यास कारणीभूत असल्यामुळे स्वातंत्र्यपुर्वकाळात अनेक समाजसुधारकांनी जातीची बंधने तोडण्यावर अधिक भर दिला. यात म.फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. जातीव्यवस्थेमुळे रोटीबेटी व्यवहारावर बंदी येऊन त्यामुळे जातीची बंधने अधिक तीव्र झाली. हे सर्व नष्ट करण्यासाठीच म्हणून या समाजसुधारकांनी पुनर्विवाह, आंतराजातीय विवाह इ. वर भर देऊन आपल्या क्रांतीकारी विचार व कार्याद्वारे जातीची बंधने तोडुन त्यात आमुलाग्र परिवर्तन करण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. समकालीन समाजात जातीबाहेर टाकण्याची प्रथा अस्तित्वात होती. त्यामुळे अनेक नव्या जाती निर्माण झाल्या ज्याचा परीणाम हा जातीची संख्या दिवसेदिवस वाढत जाऊन जाती—जातीमधील संघर्ष तीव्र होऊ लागले. त्यामुळे भारतीय समाजाचे विघटन घडन आले. परिणामी भारतीय समाजात राष्ट्रभक्ती आणि एकता कधी निर्माण होऊच शकली नाही. आजही हा प्रश्न तसाच कायम असून जाती या घटकाने सामाजीक संबधावर विशेष प्रभाव टाकलेला आहे.

जातीने जी पारंपारिक चौकट निर्माणकेली त्याकडे पाहता जात ही एक व्यापक तसेच विस्तारीत व्यवस्था आहे. या जातीव्यवस्थेला वर्णाश्रम धर्माचा आधार होता. वर्णव्यवस्था ही धर्मग्रंथावर आधारीत होती. एकुणच जात आणि धर्म यांना एक सुत्रातच बांधण्यात आले होते.

त्यामुळे व्यक्तीची भौतीक व्यवस्था आणि तीची जाणीव निर्धारीत करण्याचे कार्य जातीव्यवस्थेकडुनच पार पाडल्या गेले. अनेक विकृतींना जन्म घालणाऱ्या या जातीव्यवस्थेने समाजाचे विघटन करणाऱ्या अस्पृश्यतेची निर्मीती केली. याचा परीणाम म्हणजे श्रेष्ठ — कनिष्ठ असा भेद निर्माण होऊन परस्परात द्वेष निर्माण झाला. अस्पृश्य जातीच्या लोकावर अनेक अपात्रता लादण्यात आल्या. यात अस्पृश्यांना हिन मानल्या जाऊन त्यांना मूलभूत मानवी अधिकारापासुन वंचीत ठेवण्यात आले. त्यामुळेच डॉ. आंबेडकरांनी जातीव्यवस्थेला अमानवीय ठरवून ती अस्पृश्यांच्या प्रगतीला कशी घातक आहे. हे समजावून देण्याचा निरंतर प्रयास केला.

**जातीव्यवस्था :—**

भारतीय समाजाची पायाभूत व्यवस्था म्हणून जातीव्यवस्थेचा विचार केला जातो. जात ही एकप्रकारे स्तरीकरणाची व्यवस्था आहे. या स्तरीकरणात भारतीय समाजाचे वेगवेगळया जातीत विभाजन झालेले दिसते. या स्तरीकरणात व्यक्तीच्या गुण व कर्तृत्वाला महत्त्व नसते तर व्यक्तीची जात ही या स्तरीकरणाचा प्रमुख आधार असते. जात ही विशीष्ट जातीतच जन्माला आल्याने मिळत असल्यामुळे व्यक्तीचा जन्म ज्या जातीत झाला त्या जातीचा दर्जा व्यक्तीला प्राप्त होतो. यात विशेष बाब म्हणजे व्यक्ती ज्या जातीमध्ये जन्माला येतो ती जात बदलविता येत नसल्यामुळे व्यक्तीचा दर्जा सुध्दा बदलत नाही. म्हणजेच जातीवर आधारीत असलेले स्तरीकरण हे बंदीस्त स्वरूपाचे आहे.

अनेक समाजशास्त्रज्ञानी जातीव्यवस्थेचे समाज शास्त्रीय विश्लेषण केलेले आहे. यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, ''जात हा शब्द समान दर्जाचा नाही. जात असमानतेवर आधारीत आहे. एक जात दुसऱ्या जातीच्या तूलनेत उच्च किंवा कनिष्ठ आहे आणि मधल्या जाती या उच्च जातीपेक्षा कनिष्ठ व कनिष्ठ जातीपेक्षा उच्च आहेत. जाती पध्दत ही श्रेणी पध्दत असुन त्यात उच्च जातीला अग्रक्रम आणि कनिष्ठ जातीला इतरापेक्षा न्युनक्रम मिळतो.'' तसेच जातीची व्याख्या करतांना समाजशास्त्रज्ञ चार्लस कुलेम्हणतात की, ''जेव्हा वर्ग अनुवंशीकतेच्या तत्वावर आधारलेला असतो तेव्हा त्याला आपण जात म्हणू शकतो.'' तर डॉ. एस. व्ही केतकर म्हणतात की, ''जात हा एक सामाजिक समुह असुन त्याची दोन वैशिष्टये आहेत. १) यात विशीष्ट जातीतील सदस्यांच्या पोटी जन्मास आलेल्यांनाच त्या जातीचे सदस्यत्व प्राप्त होते. २) या सदस्यांना कठोर समाजिक नियमाद्वारे आपल्या समुदायाबरोबर विवाह करण्यास बंदी आहे''.

एकूणच स्तरीयकृत असलेल्या जातीव्यवस्थेत व्यक्तीला विशिष्ट असे सामाजिक नियम आखुन देण्यात आलेले असल्यामुळे त्या नियमाचे कठोर बंधन व्यक्तीवर होते. जातीवार व्यक्तीच्या वस्त्यांची निर्मीती, उच्च जातीद्वारे वापरले जाणारे मुख्य रस्ते आणि पाण्याचे साठे वापरावर निम्न जातीच्या लोकांना असलेली बंदी, प्रत्येक व्यक्तीला आपल्याच जातीचा व जातीशी संबधीत व्यवसााय करणे बंधनकारक, आपल्याच जातीतील जोडीदार विवाहाकरीता निवडण्याचे व्यक्तीवर असलेले बंधन, रोटीबेटी व्यवहारावर असलेली मर्यादा इ. मुळे समाजाला एकप्रकारे साचेबध्द स्वरूप प्राप्त झाले. ज्याचा परिणाम हा कनिष्ठ जातीतील लोकांच्या विकासाचे आणि गतीशिलतेचे सर्व मार्ग बंद होण्यावर झाला व व्यक्ती व्यक्तीमधील सामाजिक सबंधात एकप्रकारे दुरावा वाढण्यास मदत झाली.

जातीव्यवस्था म्हणजे लोकांचा जन्म, समुदाय आणि कार्याच्या आधारे त्यांचे वर्गीकरण होय. एकुणच जन्मसिध्द उच्च—निच्चतेची भावना ही जातीव्यवस्थेतून निर्माण झालेली मानसिक विकृती असून, समाजातील प्रत्येक व्यक्ती ही या मानसीकतेने प्रभावीत झालेली आहे.

**सामाजिक सबंधाचे स्वरूप :—**

मणुष्य हा समाजशिल प्राणी आहे. तसेच तो समाजातच राहणे पंसत करीत असतो. समाजाचा सदस्य या नात्याने अगदी दिवसाच्या सुरूवातीपासुन तर दिवसाच्या शेवटपर्यंत त्याचा दुसऱ्या व्यक्तीशी वा संबधीत सामाजिक घटना — घडामोडीशी प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष सबंध येत असतो. त्यातच व्यक्ती हा मुलत: स्वंयपुर्ण आणि स्वावलंबी जीवन व्यतीत करू शकत नाही तर तो सामाजिक संबधाच्या माध्यमातुनच आपल्या अडी—अडचणी सोडवीत असतो. सोबतच स्वत:च्या गरजांची सुध्दा पुर्तता करीत असतो. समाजातील व्यक्ती—व्यक्तीत वा परस्परात प्रस्तापीत होणाऱ्या या सबंधाला सामाजिक सबंध असे संबोधले जाते. व्यक्ती—व्यक्तीतील सामाजिक संबधातुनच

समाजाची चेतनाशक्ती व गतीशिलता प्रकट होत असते. हे सामाजिक सबंधच व्यक्ती—व्यक्तीमधील परस्पर सबंधाची विविध रूपे दर्शवितात.

समाज ही प्राचीन काळापासून अस्तित्वात असणारी संकल्पना असून व्यक्ती आणि व्यक्तीचे समुह यात परस्पर संबधाचे एक अतूट नाते निर्माण होते. समाजातील माणसामध्ये वर्षानूवर्षे समाजात राहील्यामुळेच कौंटुबिक, आर्थिक, राजकीय, भावनिक, धार्मिक, शैक्षणिक इ. प्रकारचे व्यवहार चालु असतात. समाजात जन्माला येणाऱ्या नवजात बालकांवर कुटुंबाच्या संस्काराबरोबरच हळुहळु शेजार —पाजाऱ्यांचे संस्कारही होत असतात. अशा रितीने कांलातराने ती व्यक्ती समाजातील अनेक व्यक्तीशी परिचीत होत असते आणि त्याचे परिवर्तन हे 'मानुस' या क्रियाशील सामाजिक प्राण्यामध्ये होते. अर्थातच कोणतीही व्यक्ती ही समाजाबाहेर राहु शकत नाही. व्यक्ती आणि इतर व्यक्ती यांच्यातील परस्पर सबंध म्हणजेच सामाजिक संबध होय. म्हणजेच एका व्यक्तीचा दुसऱ्या व्यक्तीशी संपर्क आला की, त्यांच्यामध्ये सामाजिक सबंध निर्माण होतात. हे सामाजिक सबंध अधिक दृढ होण्यासाठी परस्परातील संवाद व देवाण—घेवाण होणे तीतकेच गरजेचे असते.

सामाजिक संबध हे परिस्थिती सापेक्ष असतात. त्यात देशकालपरत्वेसुध्दा बदल दिसुन येतात. सामाजिक संबध हे समाज व्यवस्थेचा पायाभुत घटक होत. त्यातच सामाजिक सबंधाच्या माध्यमातूनच व्यक्ती आणि समाज वाटचाल करीत असतात. सामाजिक संबधाचे स्वरूप कसे आहे याचे ज्ञान सामाजिक क्रिया प्रक्रियामार्फत होत असते. ते कटु व ताणले गेले असतील तर ते स्पर्धा, संघर्ष, उठाव, भेदभाव यांच्या मार्फत सामाजिक विघटन घडवून आणतात. तेच सबंध सोहार्दपुर्ण असतील तर ते सहकार, सहभाग, एकजूट आणि आपूलकीची देवघेव यांद्वारे समाज जीवन सुरळीत चालु आहे याचे द्योतक ठरतात. समाजातील कायदे, रूढी, पध्दती यामध्ये व्यक्तीना बदल हवे असतील तर सामाजिक संबध बदलणााऱ्या साधनांचा, शक्तींचा आणि विचारांचा उपयोग करतात ज्यामुळे सामजिक परिवर्तन घडुन येते. म्हणजेच सामाजिक संबध हे सामाजिक परिवर्तनाशी निगडीत असतात. सामाजिक परिवर्तनाच्याप्रक्रियावरूनच सामाजिक संबधाचे स्वरूप ठरत असते.

**जातीचा सामाजिक सबंधावरील प्रभाव :—**

सामाजिक संबधाचा साामजिक समस्यांशी घनिष्ठ कार्यकारण सबंध असतो. भारतीय समाजामध्ये जाती व त्यामधून होणारा जातीभेद किंवा जातीय विषमता ही फार मोठी सामाजिक समस्या आहे. या जातीभेदातुनच जातीवाद, अस्पृश्यता, सामाजिक शोषण इ. अनेक समस्यांची निर्मिती झालेली आहे. या सर्वांमुळे समाजिक सबंधावर विपरीत परिणाम घडुन आलेला असुन त्यामुळे व्यक्ती आणि सामाजिक विकासामध्ये अनेक अडथळयाची निर्मीती झाली आहे. जातीचा सामाजिक संबधावरील प्रभाव पूढील मुद्याच्या आधारे विशद करता येईल.

**बंदीस्त स्वरूपाचे सामाजिक स्तरीकरण :—**

असमानतेवर आधारीत असलेल्या जाती या घटकांमुळे भारतीय समाजाचे वेगवेगळया जातीत व उपजातीत विभाजन झाले आहे. या विभाजनातून सामाजिक स्तरीकरण घडुन आले असले तरी ते जातीवर आधारीत असल्यामुळे बंदीस्त स्वरूपाचे आहे. हे स्तरीकरण व्यक्तीच्या गुण आणि कर्तुत्वाच्या आधारावर नसून ते व्यक्तीच्या जातीवर आधारलेले आहे. व्यक्तीचा जन्म हा ज्या जातीमध्ये होतो वा व्यक्ती ज्या जातीमध्ये जन्माला येते त्या जातीचा दर्जा व्यक्तीला प्राप्त होत असतो. यात महत्त्वपुर्ण बाब म्हणजे व्यक्तिला जात बदलविता येत नसल्यामुळे त्याच्या कर्तृत्वाला वा गुणाला विशेष वाव मिळत नाही.

**सामाजिक व धार्मिक वैमनस्य :—**

जातीव्यवस्थेनेच उच्च व कनिष्ठ या प्रवृत्तीला जन्म दिलेला आहे. उच्च व कनिष्ठ या आधारावर भेदभाव होऊन उच्च जातीला काही विशेष धार्मिक अधिकार बहाल करण्यात आले. त्यातच बहुसंख्याक असलेल्या कनिष्ठ जातीच्या लोकांना मात्र सामाजिक व धार्मिक अधीकारापासून वंचीत ठेवण्यात आले. हे अधिकार नाकारतांनाच या कनिष्ठ जातीतील लोकांवर सामाजिक तसेच धार्मिक अपात्रताही लादण्यात आल्या. ज्याचा परिणाम हा हिनत्वाच्या वागणुकीमुळे कनिष्ठ जातीतील लोकांत उच्च जातीतील लोकांविषयी वैमनस्याची भावना वाढीस लागण्यात झाला.

**मानवी मुल्यांचा ऱ्हास :—**

समाजातील प्रत्येक व्यक्तीला न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मानवी मुल्यांची उपलब्धता होत असेल तर समाजातील प्रत्येक व्यक्तीचा विकास साधला जाऊन पर्यायाने समाजाचा विकासही होण्यास मदत होत असते. मात्र जातीव्यवस्थेमुळे व त्यातुन निर्माण होत असलेल्या भेदभाव व विषमतेमुळे या सर्व मानवी मुल्यांचा ऱ्हास होत असतो. या ऱ्हासामुळे व्यक्तीच्या परस्पर संबधात वितृष्ट निर्माण होऊन परिणामी सामाजिक संबधही तनावपुर्ण होत असतात.

**सामाजिक विकासाला बाधा :—**

जातीभेदामुळे ज्याप्रमाणे व्यक्तिगत विकासावर परिणाम होतो त्याचप्रमाणे सामाजिक विकासही प्रभावीत होत असते. जाती नियमांच्या आधारावर व्यक्ती ज्या रूढी, विश्वास, प्रथा व परंपरा यांचे पालन करीत असतो त्यामुळे नवीन विचार व दृष्टिकोणाला तो फारसे महत्त्व देत नाही. परिणामी परीवर्तनाची प्रक्रिया जी सामाजिक विकासाकरीता अनिवार्य असते ती घडुन येत नाही. हे परिवर्तन होत नसल्यामुळे समाजातील क्रियाप्रक्रिया या प्रभावीत होत असतात ज्या सामाजिक संबधावर विपरीत परिणाम घडवून आणतात किबंहूना ते संबध ताणले जाऊन त्यात विघटन सुध्दा घडुन येण्याची शक्यता अधिक असते.

**उच्च जातीचे प्राबल्य :—**

जातीव्यवस्थेच्या माध्यमातून ज्या काही निती—नियमांची निर्मिती होत असते वा केली जाते. त्यातूनच केवळ उच्च व कनिष्ठ जातीच्या प्रगतीचा मार्ग अवरूध्द केला जातो. कनिष्ठ जाती या उच्च जातीचे बाहूले कसे होतील व ते शेवटपर्यंत गुलाम कसे राहतील याची बांधणी या नियमाद्वारे करण्यात आलेली असते. या नियमांचा कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जाती कडुन जेव्हा प्रतिकार करण्यात येतो तेव्हा यांच्यातील सामाजिक संबध हे तणावपुर्ण होत असतात.

**सामाजिक विषमतेची निर्मिती:—**

जातीच्या अतीरेकातुनच भेदभाव, अस्पृश्यता, असानता यांची निर्मिती होत असते. यात एक जात ही दुसऱ्या जातीला गौण लेखत असते. सोबतच यातून अनेक उपजाती वा पोटजातीचे निर्माण होऊन यात प्रत्येक जात ही इतरापेक्षा स्वत:ला वेगळी मानते. आज शहरी भागात जातीचे प्राबल्य हे कमी झालेले असले तरी मात्र ग्रामीण भागात याविषयक प्रचिती ही वारंवार येते. यातूनच समाजात सामाजिक विषमतेची बिजे पेरली जातात. सामाजिक विषमतेमुळे जातीय विरोध व संघर्ष निर्माण होऊन याचा सामाजिक संबधावर विपरीत परिणाम घडुन येतो. परिणामी सामाजिक संबधात सलोख्याऐवजी तणावपुर्ण स्थीती तयार होत असते.

**सामाजिक गतीशीलतेचा अभाव :—**

व्यक्तीला जन्माच्या आधारावरच जातीचे सदस्यत्व मिळत असते. त्यानुसारच तीचा समाजिक दर्जा सुध्दा ठरत असतो. आपल्या गुण व कौशल्याच्या आधारावर व्यक्तीला मीळालेला हा सामाजीक दर्जा कीतीही प्रयत्नाअंती बदलविता येत नाही. अशातच व्यक्तीच्या आवडी निवडी, विचार, व्यवसाय, स्वातंत्र्य यांना जाती व्यवस्थेतील निर्बंधामुळे कोणतेच महत्त्व उरत नही. सोबतच व्यक्तीला वारसा हक्काने व पंरपरेने मिळालेल्या व्यवसायातही बदल करता येत नसल्यामुळे सामाजिक गतीशिलता प्रभावीत होत असते. गतीशिलतेच्या या अभावामुळेच समाजाच्या कक्षा रूंदावत नाहीत व परिणामी प्राथमिक स्वरूपात असलेले समाजीक संबध हे विस्तारीत नाहीत तसेच ते दिर्घकाळा सुध्दा टिकत नाहीत.

**निष्कर्ष :—**

सामाजिक सबंध हे विकसीत होण्यासाठी त्या संबधात उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी किंबहुना ते दृढ व बळकट व सौहार्दपुर्ण होण्यासाठी ज्या वातावरणाची व परिस्थितीची आवश्यकता असते ती पोषक स्थिती जातीव्यवस्थेतील निर्मित निती—नियमामुळे वा बंधनामुळे उपलब्ध होत नाही. या ऐवजी जातीच्या आधारावर केला जाणारा भेदभाव, ऐकमेकाला उच्च व कनिष्ठ लेखण्याचा प्रकार, दुजाभाव व मिळणारी असमानतेची वागणुक यामुळे व्यक्ती व्यक्तीमध्ये व परस्परात वैमनस्य निर्माण होते. ज्यामुळे सामाजिक सबंध हे ताणले जाऊन त्यात संघर्ष निर्माण होण्याची शक्यता ही अधिक असते. शिवाय त्या संबधामध्ये एक प्रकारचा बंदीस्तपणा निर्माण होत

ISSN : 2278-9308
July 2021

असल्यामुळे सामाजिक परिवर्तनात सुध्दा अनेक अडथळयाची निर्मिती होते. एकूणच जात हा घटक सामाजिक संबधावर विशेष प्रभाव टाकत असतो व व्यक्ती –व्यक्तीत वैमनस्य व परस्परात संघर्षाची निर्मिती करून सामाजिक संबधाच्या विकासात बाधा निर्माण करण्याचे कार्य करीत असतो.

**संदर्भ ग्रंथ सुची :–**

१) प्रा. माने माणिक, १९९७, भारतातील समकालीन सामाजिक समस्या, विद्या प्रकाशन, नागपूर.
२) लोटे रा. ज., जुन २००९, भारतीय समाज आव्हाने आणि समस्या, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.
३) डॉ. कऱ्हाडे बि. एम.,जुन २०१३, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या,पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
४) खरात शंकराव, २००४, डॉ. बाबसाहेब आंबेडकर याचे सामाजिक विचार, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे.
५) जोशी एस. एल., २०१० भारतीय सामाजिक विचारक, रावत पब्लिकेशन, जयपुर.

ISSN : 2278-9308
July 2021

# संतुलीत आहार आणि आरोग्य

प्रा. डॉ. सुषमा वा. बोंडे
(सहयोगी प्राध्यापिका)
गृह—अर्थशास्त्र विभाग प्रमुख हुतात्मा राष्ट्रीय कला व विज्ञान महाविद्यालय, आष्टी, जि. वर्धा., sushamakharabe@gmail.com

अन्न हे शरीराचे पोषण करते तर चुकीच्या पद्धतीच्या अन्नामुळे शरीराचा नाशही होवू शकतो. म्हणून प्रत्येक व्यक्तिला अन्नाविषयी व पोषणाविषयी माहीती असणे आवश्यक आहे. जीवनाचा पाया आरोग्य असतो तर आरोग्याचा पाया आहार असतो.

औषधाशिवाय आरोग्य मिळविता येत नाही. ते टिकविता येत नाही. अशी ठाम समजूत सर्व सामान्यांमध्ये दृढ झाली आहे. म्हणूनच आज ज्या संख्येने निरनिराळे उद्योग धंदे व कारखाने सर्वत्र वाढत आहे. त्यापेक्षा कितीतरी अधिक पटीनी दवाखान्यांची संख्या वाढत आहे.

एकीकडे विज्ञान व तंत्रज्ञानात अभूतपुर्व प्रगती झालेल्या मानवाला त्यांच्या दैनंदिन अशक्शप्राय वाटणाऱ्या सुखसोयी आता सहज उपलब्ध झाल्या आहेत. तर सर्व सुखसोयीमुळे आजचा मानव अकाली वृद्ध होत आहे. पूर्वीच्या काळी पटकी, विषमज्वर, देवी, क्षय यासारख्या संसर्गजन्य रोग मानवजातीचे बळी होत होते. आता त्यांची जागा रक्तदाब, हृदयरोग, मधुमेह, कर्करोग या सारख्या रोगांनी घेतली आहे व माणसांचा संहार हा सुरुच आहे. ही एक भयानक वस्तुस्थिती आहे. आजच्या चुकीच्या आहार शैलीमुळे माणूस शारीरिक व मानसिक दृष्टया कमकुवत झालेला आहे. आरोग्य रक्षण व आरोग्य संवर्धनाच्या दृष्टीने योग्य आहाराचे स्थान अनन्यसाधारण आहे. याच महत्वाच्या बाबीकडे माणसाचे दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे सदोष आहार व अभक्ष्य पदार्थाच्या आहारात वापर करण्याचे प्रमाण बेसुमार वाढलेले आहे.

खावावयास मिळत नाही म्हणुन जितके आजार निर्माण होतात. त्यांच्यापेक्षा चुकीचे अयोग्य पदार्थ खाणे आणि प्रमाणापेक्षा अधिक खाणे यामुळे अधिक रोग निर्माण होत आहेत असे आढळून येत आहे. विकसीत देशात चाळीस वर्षावरील साठ टक्के जनता स्थूल (प्रमाणापेक्षा जास्त वजन) आहेत. एखादी व्यक्ती प्रमाणापेक्षा १० टक्के वजनाने जास्त असली तरी तिचे आठ टक्के आयुष्य कमी होते असे संख्याशास्त्र सांगते.

आयुर्वेदानुसार माणूस त्रिगुणात्मक असतो. तसेच आहारही त्रिगुणात्मक आढळून येतो. आहारावरुन माणसाचा स्वभाव ठरत असतो. सात्विक, तामसिक आणि राजस इ. तीन प्रकारचे आहार आयुर्वेदाने सांगितले आहे.

सात्विक आहारात गोड रसाळ फळे व भाज्यांच्या अधिक प्रमाणात समावेश होतो. जसे आंबा, संत्री, मोसंबी सर्व प्रकारच्या पालेभाज्या आणि दुध, दही, ताक, तुप व मध इत्यादी पदार्थांचा समावेश होतो.

तामसिक आहारात शिळे अन्न व मांसाहरी पदार्थांचा समावेश होतो.

उत्तम पोषणामुळे माणसाचे स्वास्थ चांगले राहते तर उत्तम आहारामुळे उत्तम पोषण घडून येते.

'उत्तम पोषण म्हणजे ज्या पोषणात आजारपण, क्रियाशिलता, हवामान व शरीरयष्टी यांचा विचार करुन आवश्यकतेप्रमाणे पोषक घटकांचे प्रमाण ठरविले जाते. त्याला उत्तम पोषण म्हणतात.'

शरीरात एकूण कलरीच्या ७० कॅलरी कर्बोदकापासून, २० टक्के कॅलरी स्निग्धपदार्थापासून तर १० कॅलरी प्रथिनापासून मिळावयास पाहीजे. आहारातून पूर्ण पोषक घटकांचा पुरवठा होण्यासाठी आहारात १५० ते १६० ग्रॅम तृणधान्ये, ५० ते ६० ग्रॅम डाळी व कडधान्ये, ३० ते ३५ ग्रॅम तेल व गळीत धान्य, प्रणिज पदार्थात दुध, दही व ताक २०० ते २५० ग्रॅम, गुळ व साखर ५० ते ६० ग्रॅम, कंद व फळभाज्या ६० ते ७० ग्रॅम, पालेभाज्या १२० ते १३० ग्रॅम व फळे ५० ते १०० ग्रॅम इतके असावेत.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

**आपण कच्चे अन्न का खावे ?**

आहारात ३० पदार्थ कच्च्या स्वरुपात असावे. जे कच्चे खाता येते ते उकडून खाऊ नये व जे उकडून खाता येते ते तळून खाऊ नये. अन्न शिजवितांना ३० ते ८५ टक्के पोषक घटक नाश पावतात. कच्च्या पदार्थामध्ये उच्च दर्जाची मद्रलउमे असतात. मद्रलउमे शरीरात घडून येणाऱ्या रासायनिक क्रियेत कॅटलिस्टचे (Catalyst) कार्य पार पाडतात. अन्न शिजविल्यामुळे एन्झाईमस् विकृत झाल्यामुळे जीवनतत्वांच्या कार्यासाठी प्रवृत्त करण्यात अडथळा निर्माण करतात. त्यामुळे जीवन सुखदायी बनण्यास सक्षम राहत नाही.

**फुड पिरॅमीड :**

असे म्हटले जाते की, "Prevention is better than cure"

पोषक आहारामुळे वेगवेगळया आजारापासून शरीराचे संरक्षण होते. समतोल आहारात एक पाच प्रकारचे अन्न समुह आढळून येतात.




संतुलित आहाराचे महत्व प्रत्येक अवस्थेतील व्यक्तिसाठी मग ती बालक असो वा किशोरावस्थेतील असो वा प्रौढवस्थेतील असो वा वृद्धावस्थेतील असो किंवा गर्भावस्थेची स्त्री साठी देखील सारखेच महत्वाचे असते. संतुलित आहार हा शारीरिक आरोग्यासाठी जसा आवश्यक आहे. तसाच मानसिक आहारासाठी देखील आवश्यक आहे.

शरीराच्या आवश्यकतेनुसार योग्य प्रमाणात संतुलित आहार घेताना वरील फुडपिरॅमीट मधील सर्व अन्नसमुहातील पदार्थाचा योग्य प्रमाणात समावेश करावा.

**कॅलरी** : व्यक्तीच्या क्रियाशिलतेवर कॅलरीचे प्रमाण अवलंबुन असते.

| क्रिया | पुरुष (५५ किलो) | स्त्री (४५ किलो) |
|---|---|---|
| कमी मेहनतीचे काम | २४०० कॅलरी | २००० कॅलरी |
| साधारण मेहनतीचे काम | २८०० कॅलरी | २३०० कॅलरी |
| जास्त मेहनतीचे काम | ३९०० कॅलरी | ३००० कॅलरी |
| गर्भावस्था (उत्तरार्ध) | ——— | २३०० कॅलरी |
| दुग्धसर्जन काल | ——— | २७०० कॅलरी |

जसे—जसे वय वाढते तसे—तसे कॅलरीच्या आवश्यकतेचे प्रमाण कमी होते. कारण क्रियाशिलता कमी होते आणि आहार चयापचय गतीही कमी होते. F.A.O. च्या शिफारशीनुसार प्रत्येक १० वर्ष वाढीकरीता ३ टक्के कॅलरी कमी कराव्या लागतात. ४५ वर्षानंतर ७.५ कॅलरी कमी कराव्या लागतात. तर वृद्धावस्थेत ७५ वर्षानंतर १० ने कॅलरी कमी कराव्या लागतात.

**प्रथिने** :प्रौढांकरिता प्रथिनांचे प्रमाण १ ग्रॅम प्रथिने प्रती १ किलोग्रॅम शारीरिक वजनासाठी प्रतिदिन सांगितले आहे. प्रथिनांच्या प्राप्तीसाठी आहारात तृणधान्ये, डाळी व कडधान्ये तसेच प्राणीज प्रथिनासाठी दुध व दुधाचे पदार्थ तसेच अंडी, मास व मासे समाविष्ट करावेत.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

**स्निग्धपदार्थ** : समतोल आहाराचे आयोजन करतांना स्निग्धाचे प्रमाण पुढीलप्रमाणे ठेवावे.

| | | | |
|---|---|---|---|
| प्रौढ | — | १५—२० | पूर्ण कॅलरीच्या |
| मुले | — | २०—३० | पूर्ण कॅलरीच्या |
| शिशु | — | ३०—४० | पूर्ण कॅलरीच्या |

एकूण आवश्यक कॅलरीपैकी वरील प्रमाणात कॅलरी स्निग्धापासून मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी आहारात तेल, तुप यासारख्या स्निग्धयुक्त पदार्थांचा समावेश करावा.

**जीवनसत्वे** : जीवनसत्वाच्या प्राप्तीसाठी आहारात ताज्या फळांचा व भाज्यांचा समावेश करावा. तसेच अंकुरीत धान्यांचा समावेश करावा.

| **जीवनसत्व** | **प्रमाण** |
|---|---|
| जीवनसत्व अ | ३०००—४००० [illegible] |
| जीवनसत्व ड | १०० [illegible] व<br>प्रौढाकरीता ४०० — ८०० [illegible]<br>गर्भावस्था दुग्धसर्जन काळातील माता आणि मुले |
| जीवनसत्व ब थायामीन | ०.५ मी.ग्रॅम / १००० कॅलरी |
| ब २ रिबो फ्लेवीन | ०.५५ मी.ग्रॅम /१००० कॅलरी |
| ब ३ नियासीन | ६.६० मी.ग्रॅम / १००० कॅलरी |
| फोलीक ॲसीड | १०० मी.ग्रॅम |
| जीवनसत्व ब १२ | १ मि. ग्रॅम |
| जीवनसत्व क | ५० मि.ग्रॅम (प्रौढ)<br>५०—८० मि.ग्रॅम (दुग्धसर्जनकाळ)<br>३०—५० मि.ग्रॅम (शिशु व मुले) |

**खनिज पदार्थ** :— खनिज पदार्थाच्या पुर्ततेसाठी भाज्या आणि फळांचा आहारात अनेक उपयोग करणे आवश्यक आहे.

| **खनिज द्रव्ये** | **दैनिक आवश्यकता** |
|---|---|
| कॅल्शियम | ४००—५०० मि.ग्रॅम (प्रौढ)<br>१००० मि.ग्रॅम (गर्भावस्था व दुग्धसर्जन काळ)<br>५००—६०० मि.ग्रॅम (शिशु)<br>४००—५०० मि.ग्रॅम (१ ते ९ वर्ष)<br>६००—७०० मि.ग्रॅम (१० ते १५ वर्ष)<br>५००—६०० मि.ग्रॅम (१६ ते १९ वर्ष) |
| लोह | २० मि.ग्रॅम (प्रौढ) ३० मि.ग्रॅम (स्त्रीयाकरीता)<br>४० मि.ग्रॅम (गर्भावस्था)<br>३० मि.ग्रॅम (दुग्धसर्जनकाळ) |
| आयोडीन | ०.०२ मि.ग्रॅम |

फळामधून व भाज्यामधून जीवनसत्व व खनिजाशिवाय अनेक प्रकारची ऑक्सिडंटस् प्राप्त होतात. त्यामुळे शरीराचे विविध आजारापासून संरक्षण होते.

फळे व भाज्या सुदृढ आरोग्याचा पाया समजल्या जातो. कारण फळे व भाज्यामध्ये कॅलरीचे प्रमाण कमी असून पोषक घटकांचे प्रमाण अधिक असते. म्हणजेच जीवनसत्वे, खनिजपदार्थ, अँटीऑक्सीडंटस्, फायटोकेमीकल्स आढळून येतात.

अँटीऑक्सीडंटस् जीवनसत्व अ, क आणि ई च्या मदतीने वय वाढविण्याची गती मंद करते. अँटीऑक्सीडंटस् मुळे कर्करोग, हृदयविकार, पक्षघात, मधुमेह यासारख्या दुर्धर रोगांपासून शरीराचे संरक्षण केले जाते.

सफरचंदामधील फ्लेवीनॉइड्स अँटीऑक्सीडेंटमुळे अस्थमा व मधुमेह होण्याचा संभव कमी होतो. तसेच दात व जीभेचे बॅक्टेरीयापासून संरक्षण होते.

जांभळातील अँथोसायमीन या अँटीऑक्सीडंटमुळे कर्करोगाची शक्यता कमी होते. द्राक्षातील रिझव्हरट्रॉल या अँटीऑक्सीडंटमुळे रक्तवाहीणीत जमणाऱ्या ब्लड क्लॉटस् कमी होऊन रक्तदाब

नियंत्रणात राहतो. आंब्यातील झियाझॅन्थीन या ल्युटीनमुळे दृष्टी चांगली राहते. पपईतील पेपेनमुळे त्वचेचे आरोग्य चांगले राहून त्यातील आम्लामुळे पचनशक्ती वाढते.

टोमॅटोमधील लायकोपीन आणि पोटॅट या अँटीऑक्सिडंटमुळे रक्तातील वाढलेली कोलेस्टेरॉलची पातळी कमी होते. पालकात जीवनसत्व के आणि अ, ब आणि ई असते. त्याचबरोबर फोलेटे, मॅग्नेशिअम, मॅग्नीज, कॅल्शीयम, लोह असल्यामुळे आर्थायटीस, आतडयाचा कर्करोग, हृदयरोग व हाडांच्या विकारापासून संरक्षण होते.

**आहारातून उत्तम आरोग्य यासाठी खालील गोष्टी लक्षात ठेवाव्या –**

1. जो आहार आपण घेतो तो आरोग्याशी निगडीत असावा.
2. सकाळी उठल्यानंतर जलपान, दुपारच्या जेवणानंतर ताक प्यावे व रात्री झोपताना दुध प्यावे.
3. आहारात ३० पदार्थ कच्च्या स्वरुपात असावे.
4. ऋतुनुसार मिळणारी फळे आहारातून उपयोगात आणावी.
5. फळे ही फक्त आजारी माणसासाठी नसून आजारी पडू नये म्हणून असतात.
6. आहारात २५–३० ग्रॅम अंकुरीत कडधान्य असावे.
7. आहार ५० टक्के घ्यावे. २५ टक्के पाण्यासाठी ठेवावे व २५ टक्के रिकामे ठेवावे.
8. आहारातुन तंतूमय पदार्थांना प्राधान्य द्यावे. फायबरमुळे लाळ निर्माण होण्यास मदत होते. तसेच आतडयांच्या स्नायुच्या आकुंचन व प्रसारणाला गती मिळते. त्यामुळे पचनक्रिया चांगली होते.
9. दोन आहारात ७–८ तासाचे अंतर ठेवावे.
10. नेहमी मिश्र आहार घ्यावा.

**संदर्भ ग्रंथ :**

१ .पोषण आणि आहारशास्त्र – लेखिका त्रिवेणी शा. फरकाडे व सुलभा सु. गोंगे
२ .आहार आणि पोषण – सौ. मिनाक्षी तारणेकर
३ .आरोग्य सहजीवन आणि आहार – डॉ. आर. तांबे
४ .आरोग्याची गुरुकिल्ली – लेखक – धनंजय गुंडे
५ .qqq-lsslJ'k-ys-Gi@qqq-qGKGf'kGoj-ysk

# जात, वर्ग व धर्माच्या पुढे महात्मा ज्योतीबा फुलेंचे कार्य

प्रा. रमेश एम. भगत
रा.सुं. बिडकर महाविद्यालय,हिंगणघाट

महात्मा ज्योतिबा फुले यांचा जन्म रत्नागिरी जिल्हयातील कटगुण येथे १८२७ मध्ये झाला. त्यांच्या वडीलांचे नांव गोविंदराव व आईचे नांव चिमाबाई होते. लहानपणापासून त्यांना शिक्षणाची आवड होती. त्यांचा फुले विक्रीचा व्यवसाय असल्यामुळे ते पुण्यात स्थाईक झाले. त्यांचा १३ व्या वर्षी सावित्रीबाईशी विवाह झाला. पाश्चात्य शिक्षणाचा प्रभाव त्यांच्यावर पडून त्यांना भारतीय समाजातील असलेल्या दृष्ट प्रथाबद्दल चिड होती. त्यामुळे त्यांचा कल समाजसुधारणेकडे गेला. त्यांनी जातिव्यवस्था विरोध करून शुद्र व अस्पृश्यांना त्याचे हक्क मिळाले पाहिजे याकरिता कार्य केले. त्याचप्रमाणे त्यांनी स्त्रियांची गुलामगिरीतून सुटका करण्याचेही कार्य केले. म्हणून महात्मा ज्योतिबा फुलेंनी केवळ आपले विचारच व्यक्त केले तर प्रत्यक्ष त्यांनी कार्य केलेले आहे. त्याकरिता त्यांनी शिक्षणाला महत्व दिले.

**महात्मा फुले यांचे शैक्षणीक कार्य**

मिशनरी द्वारा चालविलेल्या शाळेतून जोतिराव फुलेंनी शिक्षण घेतल्यामुळे त्यांच्यात जातिव्यवस्थेच्या विरोधात चिड निर्माण झाली. त्याचवेळी महात्मा फुले आपल्या ब्राम्हण मित्राच्या लग्नातील वरातीत सहभागी झाले असतांना ब्राम्हणांकडून शुद्र जातीतील मुलगा आमच्या वरातीत सहभागी होवू शकत नाही यामुळे त्यांचा एकप्रकारे अपमान झाला. तेव्हा महात्मा फुलेंना असे वाटू लागले कि, ब्राम्हणशाहीने शुद्रांना निरंतर अपमानित आणि हीन अवस्थेमध्ये ठेवलेले आहे. प्रचलित समाज व्यवस्थेमध्ये ऊँच—नीच हा भेद मजबूत होता. 'शूर प्रतापी व लढवय्या समाजाचा स्वाभीमान ठेचून काढण्यासाठी, त्यांच्यावर सूड उगविण्यासाठी आणि त्यांना कायमचे हीनदीन करून त्यांचा पुरता नि:पात करण्यासाठी ब्राम्हण वर्गाने त्यांना अतिशुद्र ठरवून शुद्रापासून तोडण्याचे कारस्थान केले. शुद्रही या कारस्थानाला बळी पडून आपल्या अतिशुद्र बांधवाचा दुस्सास करू लागले. परिणामी वर्णव्यवस्थेच्या चौकटीबाहेर अज्ञानी, परावलंब व अगतिक अस्पृष्याव्यवस्थेत ही पराक्रमी माणस खितपत पडली.' अशा व्यवस्थेला मूळातून उपडून फेकून दिले पाहिजे आणि या व्यवस्थेचे उच्चाटन केले पाहिजे असे त्यांना वाटत होते. परंतु खालच्या जातीतील लोकांना अज्ञानात ठेवल्यामुळे ते विचार करू शकत नाही. त्यामुळे हा वर्ग मानसिक गुलामगिरीत खितपत पडलेला आहे. अशा वर्गाला अज्ञानातून बाहेर काढून प्रकाशाकडे नेण्याकरीता शिक्षणाशिवाय दुसरा मार्ग नाही असे त्यांना वाटत होते. त्याकरीता खालच्या जातीतील वर्गाला शिक्षणाचे दरवाजे त्यांनी उघडे करण्याचे ठरविले. महात्मा ज्योतिबा फुलेंनी 'शेतकऱ्यांचा आसूड' या आपल्या ग्रंथामध्ये स्पष्टपणे विचार व्यक्त केलेले आहे. ते म्हणतात,

'विद्ये विना मती गेली, मती विना निती गेली, निती विना गती गेली, गती विना वित्त गेले, वित्त विना शुद्र खचले,एवढे अनर्थ एका अविज्ञेने केले.

त्याचप्रमाणे विषमतावादी व्यवस्थेमध्ये स्त्रियांना सुध्दा शिक्षणापासून वंचीत ठेवल्या गेले होते. त्यांनाही शिक्षणाचे दरवाजे उघडे करण्याचे कार्य त्यांनी चालविले. यामागे त्यांचा उद्देश सामाजिक समानता प्रस्थापित करण्याचा होता. म्हणजेच महात्मा ज्योतिबा फुले हे केवळ वरवर विचार करून समाज सुधारणा करण्यावर भर देणारे नव्हते. तर त्यांना आमुलाग्र बदल करावयाचा होता. यामागे त्यांचा मानवतावादी दुष्टिकोन होता.

**स्त्रि शिक्षणास प्रारंभ :—** भारतीय समाजात स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले. स्त्री ही अविश्वासी, दृष्ट, चंचल, अविचारी मानल्या जात होते. स्त्रिला शिक्षण दिल्यास तिला अवेळी वंध्यत्व येते असा समज पसरविला गेला. स्त्रि ही अबला असल्यामुळे शिक्षा प्राप्त केल्यास ती पाप करण्यास प्रवृत्त होईल, तीच्या बुध्दिने चालल्यास विनाश होईल, विद्याग्रहण केल्याने तीच्यात कपट, कुयुक्ती, छल येईल, ती शिक्षीत झाली तर तीच्यात आदर राहणार नाही. ती घरातील कर्त्यापुरूषांची सेवा करणार नाही त्यामुळे तिला शिक्षण न देता बालपणातच तिचे लग्न करून

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

दिल्यास ती धर्म आणि सद्गुण यांचे पालन करेल. त्यामुळे तीला कोणत्याही प्रकारचे अधिकार देता कामा नये अशाप्रकारची स्त्रियांच्या अधपतनाची व्यवस्था समाजात असतांना महात्मा फुलेंना या व्यवस्थेतून स्त्रियांना मुक्त करण्याकरीता शिक्षणाशिवाय दुसरा कोणताही पर्याय दिसत नव्हता.

ब्रिटिश काळात स्त्रि शिक्षणास सुरवात झालेली होती. कलकत्ता येथे १८१९ मध्ये अमरीकन मिशन द्वारे बालिका विद्यालय सुरू करण्यात आले. १८४० मध्ये पुण्यामध्ये व अहमदनगर येथे बालिका विद्यालय काढण्यात आले. परंतु स्कॉटिश ईसाई धर्मोपदेशकांकडून चालविण्यात येणाऱ्या या विद्यालयात केवळ १० मुलीं शिकत होत्या. पुण्यातल्या कट्टर पंथीयांनी मुलींच्या शिक्षणाला विरोध केल्यामुळे ते विद्यालय जास्त काळ राहिले नाही. तेव्हा स्वतंत्र पणे मुलींच्या शिक्षणाकरिता शाळेची सुरवात करणारे महात्मा ज्योतिबा फुले हे पहिले भारतीय ठरले. त्याकरिता महात्मा ज्योतिबा फुलेंनी ऑगष्ट १७४८ मध्ये बुधवार पेठ येथे भिडेच्या वाडयात मुलींची पहिली शाळा काढून स्त्रि शिक्षणास प्रारंभ केला. या शाळेत शिकणाऱ्या किती मुली होत्या. यापेक्षा धर्मांततेला छेद देवून हे कार्य आपल्या हातात घेणे हे अधिक महत्वाचे आहे. या शाळेत पठन, अंकगणित आणि व्याकरण इ. विषय शिकविल्या जात होते. त्याकरिता यशवंत परांजपे, सदाशिव गोविंद हाटे आणि सदाशिवराव गोवंडे या शाळेला अर्थसहाय्य देत होते. परंतु या वर्गाशी महात्मा फुलेंचा वैचारीक संघर्ष निर्माण झाल्याने आणि सनातनी लोकांनी विरोध केल्यामुळे लवकरच ही शाळा बंद पडली. परंतु हळूहळू मुलींची संख्या वाढत असल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी त्याच शाळेला ३ जुलै १८५१ मध्ये अण्णासाहेब चिपळूणकरांच्या वाडयात बुधवारपेठेतच शाळा काढली. महात्मा फुलेंना त्यांची पत्नी सावित्रीबाई फुले यांची या कार्यात महत्वाची साथ मिळाली. त्या मुलींना शिकविणाऱ्या पहिल्या शिक्षीका ठरल्या. त्यांच्या सनातनी लोकांनी अतोनात छळ केला, त्यांच्यावर दगड, शेण, फेकूण मारले, शिव्या दिल्या तरीही न डगमगता त्यांनी आपले कार्य चालूच ठेवले. त्यामुळे खऱ्या अर्थाने महात्मा फुलेंना त्यांची साथ मिळालेली दिसून येते. त्यानंतर १७ सप्टेंबर १८५१ मध्ये रास्ते पेठेत दुसरी मुलींची शाळा काढली. १५ मार्च १८५२ मध्ये वेताळपेठेत मुलींची तिसरी शाळा काढली. अशाप्रकारे महात्मा फुलेंनी स्त्री शिक्षणास चालना देवून स्त्रीयांना अंधारातून प्रकाशाकडे नेण्याचे कार्य केले. त्यांच्या या कार्यामुळे १६ नोव्हें. १८५२ मध्ये विश्रामबाग वाडयात ब्रिटिश सरकार तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.

**अस्पृश्यांच्या शिक्षणास प्रारंभ :—** ज्याप्रमाणे विषमतेच्या विरोधात महात्मा फुलेंनी समता प्रस्थापीत करण्याकरिता मुलींच्या शिक्षणाला महत्व दिले त्याचप्रमाणे अस्पृश्य समाजाला सुध्दा शिक्षण देणे गरजेचे आहे असे त्यांना वाटत होते. ब्रिटिश सरकारच्या काळात १९ जुलै १८५४ मध्ये चार्लस वूडने एक आज्ञापत्र शिक्षणाच्या संबंधी काढले. त्यामध्ये स्पष्ट म्हटल्या गेले की, 'कोणत्याही विद्यार्थ्याला जातीच्या आधारे सरकारी विद्यालय किंवा महाविद्यालयात प्रवेश नाकारू शकल्या जात नाही.' वूडचे हे आज्ञापत्र शिक्षणासंबंधीचे महत्वाचे आदेश मानल्या जाते. कारण शतकानुशतकापासून अस्पृश्य समाजाला शिक्षणा पासून वंचीत ठेवल्या गेले होते. वूडच्या या आदेशामुळे नोव्हे. १८५५ मध्ये अहमदनगर येथे अस्पृश्यांकरिता ब्रिटिश सरकारने एक विद्यालय स्थापन केले. अस्पृश्यांकरिता काढण्यात आलेले ते पहिले विद्यालय होते. त्यानंतर जून १८५६ मध्ये धारवाड सरकारने सरकारी माध्यमिक विद्यालयातील प्राध्यापकाने एक महार जातीतील विद्यार्थ्यास प्रवेश देण्यास नकार दिला. तेव्हा मुंबई सरकार आणि केन्द्र सरकार यांच्यात वाद होवून केंद्र सरकारने महार जातीतील विद्यार्थ्यांना बंगाल मध्ये सरकारी विद्यालयात प्रवेश दिल्या जाते असे म्हटले. आणि मुंबई सरकारला आदेश दिला कि, सरकारी खर्चातून चालणाऱ्या सर्व विद्यालयात जाती—पॉती—निरपेक्ष हा भेद न करता सर्व वर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा. परंतू असे असले तरी अस्पृश्य समाजाला सनातनी लोकांकडून होणाऱ्या विरोधामुळे आणि सरकारच्या असफल प्रयत्नामुळे अस्पृश्य समाज या शिक्षणापासून वंचित राहिला.

महात्मा ज्योतिबा फुलेंनी मात्र अस्पृश्य समाजाला शिक्षणापासून वंचीत ठेवता कामा नये याकरिता सातत्याने प्रयत्न चालविले. त्याकरिता महात्मा ज्योतिबा फुलेंनी ३ जुलै १८५१ मध्ये नाना पेठ येथे अस्पृश्य समाजातील महार—मांग जातीतील मुलांना शिक्षण देण्याकरिता शाळेची स्थापना केली. त्यामुळे महात्मा फुले अस्पृश्यांकरिता खाजगी शाळा काढणारे पहिले महापुरूष ठरले.पुण्यामध्ये व आजूबाजूच्या परिसरात महात्याम फुलेंनी जवळपास १८ शाळा काढल्या. त्या

शाळेतून स्त्रीयांना व अस्पृश्यांना शिक्षण देण्याचे कार्य चालविले. महात्मा फुलेंना या कार्यात त्यांचे सहयोगी ब्राम्हण मित्रांनी मदत केली. परंतु महात्मा फुले सामाजिक क्रांतीकारक होते. आणि त्यांचे सहयोग भूतदयावादी होते. या भूतदयावादी ब्राम्हण मित्रांनी केवळ दया करून अस्पृश्यांना शिक्षण देण्याचे ठरविले. महात्मा ज्योतिबा फुले मात्र अस्पृशांप्रति केवळ दया दाखवून शिक्षण देण्यास सहमत नव्हते. तर गरीब किसान आणि भूमिहीन खालच्या जातिंना त्यांचे जन्मसिध्द मानवीय अधिकार मिळवून देण्याकरिता ते निर्भतापूर्वक मैदानात उतरले. यावरून त्यांचे सहयोगी हे उदारमतवादी असल्याचे दिसत असले तरी महात्मा फुले हे मानवतावादी होते.

**हंटर आयोगासमोर साक्ष** :— सन १८८२ मध्ये ब्रिटिश सरकारने भारतातील शिक्षणाच्या संबंधी सुधारणा करण्याकरिता विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली हंटर कमिशन नियुक्त केले. या कमिशनने सार्वजनिक क्षेत्रातील प्रमुख व्यक्तींच्या भेटी घेवून त्यांच्याशी चर्चा करून आपला अहवाल सादर केला. या हंटर आयोगासमोर महात्मा ज्योतिबा फुलेंनी दिलेली साक्ष शैक्षणिक दृष्टया अत्यंत महत्वाची मानल्या जाते. सरकारने केवळ उच्चवर्गीय लोकांकरिताच शिक्षणाची सोय करून दिलेली आहे. शेतकरी वर्ग सरकारला जो लगान देतो त्यातून सरकारने उच्च वर्गिय लोकांच्या शिक्षणावर खर्च केला. परंतु खालच्या जातीतील लोकांपर्यत मात्र सरकारने कोणत्याही पध्दतीचे शिक्षण पोहचविले नाही. म्हणून ज्योतिबा फुले म्हणतात, 'मुंबई क्षेत्रातील प्राथमिक शिक्षण उपेक्षीत राहिलेले आहे. खेडयापाडयातील १० लाख मुले शिक्षणापासून वंचीत आहे. शेतकरी व कष्टकऱ्यांची मुले प्राथमिक शिक्षणापासून लाभ घेत नाही. काही थोडयांचीच मुले प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये जातात. परंतु त्यांनाही त्यांचे आई—वडील जास्त वेळ ठेवत नाही कारण त्यांच्याकडून जनावरांची रखवाली आणि शेतीची कामे करून घेतली जातात. त्यामुळे या शाळेत नियमितपणे मुलांना शिक्षण घेता आले पाहिजे या करिता सरकारने त्यांना छात्रवृत्ती किंवा इनामाची व्यवस्था करावी.' पुढे ज्योतिराव फुले म्हणतात, 'कि प्राथमिक शिक्षण अनिवार्य करणे गरजेचे आहे. त्याकरिता कमीतकमी बारा वर्षापर्यंत शिक्षण अनिवार्य करणे गरजेचे आहे.' त्याचबरोबर अस्पृश्य जातीच्या मुलांना जातीयतेमुळै उच्च जातीतील मुलांबरोबर शाळेत बसू दिल्या जात नाही. त्यामुळे सरकारने त्यांच्याकरिता वेगळे विद्यालय काढले असले तरी ते मोठया शहरात असल्यामुळे आणि त्या शाळेची संख्या कमी असल्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या बोटावर मोजण्या इतकी आहे. त्यामुळे सरकारने अस्पृश्य जातीतील लोकांच्या वस्तीमध्ये शिक्षणाकरिता शाळेची स्थापना करावी. शाळेतील शिक्षकांना योग्य ते वेतन देण्यात यावे.

**सत्यशोधक समाजाची स्थापना** : २४ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुलेंनी सत्यसोधक समाजाची स्थापना केली. या समाजाच्या माध्यमातून त्यांनी ब्राम्हणांच्या प्राबल्यावर विरोध केला. हिंदु समाजात अस्पृश्य, शुद्र मानल्या गेलेले ब्राम्हणेत्तर वर्ग, स्त्रिया आणि शेतकरी हे जोतिबांच्या दृष्टीने दलित वर्ग होते म्हणून त्यांना उन्नतीचे कार्य संघटितरीत्या करण्याच्या हेतूने जोतिबांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यांनी गुलामगिरी निर्माण करणा—या वैदिक साहित्याला म्हणजेच वेदाला विरोध केला. वेद हे ईश्वराने निर्माण केलेले नसून ते ब्राम्हणांनी निर्माण केलेले आहे. त्यामुळे जातीव्यवस्था निर्माण झाली. व या जातीव्यवस्थेमुळे समाजाची अधोगती झाली. म्हणून धनंजय किर म्हणतात, 'आधुनिक भारतामध्ये सामाजिक पुनर्घटनेसाठी चळवळ सुरू करणारी पहिली संस्था म्हणजे सत्यशोधक समाज होय. सत्यशोधक समाजाने सामाजिक गुलामगिरीविरूध्द आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली.'

ISSN : 2278-9308
July 2021

# महिला सुरक्षा व अधिकार -एक संवैधानिक अभ्यास

प्रा.राजेंद्र घोरपडे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख अरविंदबाबू देशमुख महाविद्यालय भारसिंगी,तह-नरखेड
जि-नागपूर

**सारांश**

भारत हा विभिन्न संस्कृती आणि धर्मांचा देश आहे. 15 व्या शतकातभारतात ब्रिटिशांच्या आगमनाने लोकांच्या जीवनात आणि वागण्यात मूलभूत बदल घडविला. या बदलामुळे भारताच्या कायदेशीर व्यवस्थेतही मोठे बदल घडले. वैदिक काळापासून व्यापक बदल घडवून आणणारा भारतीय समाज, ज्याने स्त्रियांचे अनेक हक्क व सार्वजनिक जीवनात महिलांचा सहभाग हरण केला. ब्रिटिशांनी भारतात आल्यानंतर परिस्थिती सुधारली आणि त्यांनी भारताच्या सामाजिक संरचनेत बरेच बदल केले. ब्रिटीश काळातील जेव्हा तत्कालीन गव्हर्नर जनरल विल्यम बेंटिक यांनी सती प्रथा रद्द केली तेव्हा भारताची हळूहळू सर्व क्षेत्रात महिलांचा समावेश साधण्याच्या उद्दीष्ट्याकडे वाटचाल सुरु झाली आणि त्या अनुषंगाने हे साध्य करण्यासाठी अनेक कायदे लागू केले गेले प्रस्तुत शोधपत्रात स्त्रियांचा घटनात्मक हक्क, सुरक्षा आणि त्यांचे समाजातील स्थान यावर चर्चा झाली आहे.

**प्रस्तावना**

वैदिक युगात नर मुलाला स्त्री मुलापेक्षा जास्त प्राधान्य देण्यात आले कारण लोक असा विश्वास करतात की मुले कुटुंबात अधिक योगदान देतात. आपल्या शारीरिक शक्ती, लढाऊ क्षमतेमुळे आणि लग्नानंतरही तो कुटूंबातच राहिल्यामुळे तो अनुकूल होता. मुलांकडे हे प्राधान्य पवित्र साहित्यात प्रतिबिंबित होते, त्यात अथर्ववेदही आहे ज्यात मुलाच्या जन्मासाठी संस्कार केले जात होते. याव्यतिरिक्त, ऋग्वेदात स्तोत्रे आहेत जी देवाच्या दिव्यरित्या उल्लेख करण्यासाठी आली होती, विधवांना अपवित्र म्हणून पाहिले जात होते, परंतु ऋग्वेदांनी त्यांच्या मूल्याची पुष्टी केली आहे. भारतातील मध्ययुगीन काळाची सुरुवात मुस्लिम शासनाच्या आगमनाने झाली, हा काळ जवळजवळ 500 वर्षे चालला होता. तथापि, रजिया सुलतान, नूरजहां आणि जहांआरा अशा त्या काळातील महिला होत्या ज्यांनी स्त्रि हक्कांच्या बाबतीत सक्रिय सहभाग घेतला, परंतु महिलांच्या स्थितीत फारसा बदल झाला नाही. मध्ययुगीन भारतीय समाजाची पुरुषप्रधान परंपरा हिंदी भाषेतील प्रसिद्ध कवी तुलसीदास यांच्या दोहोंमधून समजू शकते, ज्यांनी "घोर, गांवर, शूद्र आणि नारी, तू सब तदान के आदिरी" या शाब्दिक भाषेचा अर्थ म्हणजे प्राणी, अशिक्षित , अस्पृश्य व महिलांना शिक्षा झाली पाहिजे. त्यानंतर परिस्थिती बऱ्याच प्रमाणात बदलली आहे आणि या कायद्यात भारतीय कायदा आणि भारतीय न्यायालयांची फार महत्वाची भूमिका आहे. दैनंदिन जीवनात सहजतेने विविध भूमिका बजावून महिला समाजाची कणा बनली आहेत. कधी एक प्रेमळ मुलगी, कधी एक प्रेमळ आई, कधी एक सक्षम सहकारी, त्यांना अत्यंत कौशल्य आणि प्रेमळपणाने हाताळत आहे. तसेच, महिला सामाजिक असमानता, दडपशाही, आर्थिक अवलंबन आणि इतर सामाजिक अत्याचाराचा बळी आहेत. अनादी काळापासून, स्त्रियांवरील या निर्बंधांमुळे त्यांचे वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासात अडथळा निर्माण झाला आहे.

**लिंग असमानता**

लैंगिक भेदभावामुळे सर्व देश सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक असमानतेचे मूळ आहेत. पुरुषप्रधान भारतीय रचनेने स्त्रिया आणि पुरुषांच्या भूमिका असमानपणे परिभाषित केल्या आहेत. जेव्हा एखाद्या स्त्रीला संपत्ती किंवा मालमत्तेच्या रूपात आनंद आणि उत्पादनाचे साधन म्हणून पाहिले जाते तेव्हा लैंगिक शोषणाकडे कल अधिक तीव्र होतो. स्त्रियानि देखील कधी-कधी अनिच्छेने किंवा स्वेच्छेने जीवनाचे वास्तव म्हणून लिंगभेदाची परंपरा स्वीकारली आहेत. तथापि, आता परिस्थिती बदलत आहे. महिलांना त्यांच्या मानवी हक्कांची जाणीव होत आहे आणि त्याविरोधात आवाज उठविला जात आहे. महिला मानवाधिकारांचे उल्लंघन करण्याची प्रक्रिया महिला भ्रूणहत्येपासून सुरू होते. 1984 मध्ये जेव्हा भारतात भ्रूण चाचणी सुरू केली गेली तेव्हा 40000 भ्रूणहत्येची नोंद

ISSN : 2278-9308
July 2021

झाली. विसाव्या शतकाच्या सुरूवातीपासूनच, महिलांच्या जन्म दरांमध्ये निरंतर घट होत आहे. अशा प्रकारे, स्त्रियांच्या जीवनाचा मूलभूत अधिकार नाकारला जात आहे.

**महिला अधिकार**

मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी भारतीय राज्यघटनेत पुरेशा तरतुदी करण्यात आल्या आहेत. याव्यतिरिक्त, राष्ट्रीय मानवाधिकार आयोग मानवी हक्कांचे संरक्षण आणि प्रोत्साहन देण्यासाठी कार्य करीत आहे. समाजातील कोणत्याही व्यक्तीचे भेदभावपूर्ण वर्तन हे सामाजिक अन्यायाचे एक प्रकार आहे. जगण्यासाठी सामाजिक न्यायाची नितांत आवश्यकता आहे. जाती-धर्म-लिंगावर आधारित असमानता भारतीय समाजात दिसून येते. ही असमानता ही व्यक्तीच्या मानवाधिकारांचे उल्लंघन आहे. प्रत्येकास आदर आणि निर्भयपणे जगण्याचा मानवी हक्क आहे. हा अधिकार एखाद्या व्यक्तीच्या विकासासाठी आणि आनंदासाठी देखील आवश्यक आहे. मानवाधिकारांच्या सार्वत्रिक व्यवस्थेचे मुख्य उद्दीष्ट अशी परिस्थिती निर्माण करणे आहे की ज्यामध्ये व्यक्ती सर्व समाजात सन्मानाने जगू शकेल. मानवी हक्क प्रत्येक मानवामध्ये मूळचा असतो.

**महिला अधिकार आणि कायदे**

**➢'अंतर्गत तक्रारी समिती' ची स्थापना**

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या सूचनेनुसार 19 जून, 2014 रोजी महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभागाने शासन ठराव क्र.3, त्यानुसार, कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी प्रत्येक कार्यालयात 'अंतर्गत तक्रारी समिती' तयार करण्याचे निर्देश आहेत. निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी प्रत्येक कार्यालयात झाली पाहिजे.

**➢. "बेटी बचाओ-बेटी पढाओ" अभियान**

केंद्र सरकारच्या अभियाना अंतर्गत 21 फेब्रुवारी 2015 रोजी "मुलींचा जन्मदर कमी" असण्याऱ्या 100 जिल्ह्यांमध्ये "बेटी बचाओ-बेटी पढाओ" ही मोहीम सुरू केली गेली. त्यात महाराष्ट्रातील 16 जिल्हे समाविष्ट आहेत.

**➢'हुंडा प्रतिबंधक सल्लागार मंडळ'**

हुंडा निषेध कायदा 1961 नुसार 26 नोव्हेंबर हा दिवस 'हुंडा निषेध दिन' म्हणून पाळला जातो आणि हुंडा घेणे व देणे कायद्यानुसार गुन्हा ठरला आहे. प्रत्येक पोलिस ठाणे व जिल्ह्यात हुंडा प्रतिबंधक अधिकारी नियुक्त करण्यात आले असून या कायद्यांतर्गत तालुकास्तरीय समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. हे कायदे महिलांनी ओळखले पाहिजेत आणि हुंडा घेणाऱ्याविरुध्द तक्रार दाखल करावी. हुंडा म्हणजे लग्नात मुलीला दिलेली सर्व वस्तू, कपडे, रोकड, सोने इ.

**➢मेरी बेटी भाग्यश्री योजना**

महाराष्ट्र राज्यातील मुलींचे शिक्षण आणि आरोग्य सुधारण्यासाठी, त्यांच्या उज्वल भविष्यासाठी आर्थिक तरतूद करणे, स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी, मुलींच्या जन्माबद्दल समाजात सकारात्मक विचार आणणे, बालविवाह रोखणे आणि जन्म दर वाढविणे याकरिता , 01 जानेवारी 2014 पासून जन्मलेल्या मुलींसाठी सुकन्या योजना अमलात आणली आहे .

**➢विशाखा गाइड लाइन्स**

नोकरीच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ रोखण्यासाठी राज्यात विशाखा गाईड लाईन्सची अंमलबजावणी सुरु आहे. यासाठी राज्यभरात तक्रार निवारण समित्यांची स्थापना करण्यात आली असून महिला, मुली आणि मुलांच्या अवैध मानवी तस्करीस आळा घालण्यासाठी 'राज्य टास्क फोर्स' स्थापन करण्यात आले आहे.

**➢महिला वारसांची नावे नोंदविणे**

महिलांना पुरुषांना समान मालमत्ता हक्क देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी कायद्यात बदल केला आहे. या दुरुस्ती अंतर्गत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, 1966 च्या कलम 149अन्वये अनुक्रमे नोंदी बदलताना महिलांची नावे हक्कात नोंदविणे कायदेशीर आणि आवश्यक आहे.

➢दाव्याच्या पत्रासंबंधी

महिलांवर अनेकदा त्यांच्या उत्पन्नाचा दावा करण्यासाठी दबाव आणला जातो. अस्वीकरण कराराचे प्रमाणपत्र देताना, प्रमाणपत्र देणा्या अधिका-यास दुय्यम निबंधकांसह अशा नोंदींचे प्रमाणपत्र देण्यासह महिलेस तिच्या उत्पन्नाच्या हक्काबद्दल तरतूद करावी लागेल .

➢महिला हक्क समिती

सर्व सरकारी आणि सार्वजनिक कार्यालयांमध्ये महिला हक्कांविषयी जागरूकता वाढवायला हवी.त्याकरिता महिला हक्क समिती आवश्यक असणे अनिवार्य.

**महिला कायदेशीर हक्क**

महिलांना विनामूल्य कायदेशीर सल्ला घेण्याचा अधिकार आहे. महिलांना पोलिस ठाण्यात बोलावले जाऊ शकत नाही, अर्थातच पोलिसांनी त्या महिलेच्या घरी जाऊन तिची चौकशी केली पाहिजे. महिलेची तक्रार पोलिस नाकारू शकत नाहीत. सूर्यास्तानंतर महिलेस अटक करता येणार नाही. विनंती केल्यास महिलेचा प्रतिसाद गोपनीय ठेवता येतो. तिच्या परवानगीशिवाय महिलेची ओळख उघड करता येणार नाही.

- **बाल विवाह कायदा**

बाल विवाह कायदा 1929च्या कलम 3,4 आणि 5अन्वये कोणत्याही मुलीचे वय 18 वर्षे पूर्ण न करताच लग्न करणे दंडनीय गुन्हा आहे.

- **कलम 376/377**

एखाद्या स्त्रीला तिच्या संमतीशिवाय संभोग करणे हे भारतीय दंड संहितेच्या कलम 376 आणि 377 नुसार दंडनीय आहे.

- **कलम 496/497**

महिलांशी व्यभिचार करणे हा भारतीय दंड संहितेच्या कलम 496आणि 497अन्वये दंडनीय गुन्हा आहे.

- **कलम359/374**

तिच्या संमतीशिवाय महिलेचे अपहरण करणे हा भारतीय दंड संहितेच्या कलम 359आणि 374 अंतर्गत गुन्हा आहे.

- **कलम 354**

स्त्रीला लाज आणणारी कोणतीही गोष्ट करणे भारतीय दंड संहितेच्या कलम 354 अंतर्गत दंडनीय गुन्हा आहे.

- **कलम 304-बी**

लग्नाच्या सात वर्षांत एखाद्या महिलेचा संशयास्पद मृत्यू झाल्यास भारतीय दंड संहितेच्या कलम 304-बी अंतर्गत हुंडाबळीचा गुन्हा नोंदविला जाऊ शकतो.

- **कलम 498-ए**

विवाहित महिलेवर तिच्या नातेवाईकांनी अत्याचार करणे हा भारतीय दंड संहितेच्या कलम 498-अ अन्वये दंडनीय आहे.

**समारोप**

भारतीय समाजव्यवस्थेच्या इतिहासातील महिलांच्या स्थितीचा विश्लेषणात्मक अभ्यास असे दर्शवितो की महिलांची स्थिती बऱ्याच काळापासून विवादाचा विषय बनली आहे. सत्य हे आहे की भारतीय समाजातील स्त्रियांची स्थिती वेगवेगळ्या कालखंडात, भिन्न धर्मांमध्ये, वेगवेगळ्या वर्गांमध्ये, वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये, विभिन्न संस्कृतीत भिन्न-भिन्न आहे. महिला पुरुषांपेक्षा वेगळ्या आहेत, हा निसर्गाचा नियम आहे .भारतने 1994 मध्ये स्त्री भ्रूणहत्या प्रतिबंधक कायदा लागू केला. घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायदा 2005 मध्ये लागू झाला. परंतु हे उपाय फार प्रभावी असल्याचे दिसून येत नाही. कारण कायदे असूनही, त्यांची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेची मानसिकता पुरुषप्रधान आहे. समाजाची मानसिकता महत्वाची आहे. भारतात कठोर कायदे लागू करूनही ग्रामीण भागातील महिलांची स्थिती फारशी बदललेली नाही. या भागांत समानतेची संकल्पना अजूनही वाईट अवस्थेत आहे, परंतु भारतातील स्त्रियांचे घटते जन्म दर असे सूचित करते की आजही मुलगीपेक्षा मुलगा होण्याची तीव्र इच्छा वाढली आहे. कामाच्या ठिकाणीही महिलांच्या मानवी हक्कांचे सहज उल्लंघन केले जाते. स्त्रियांवरील शारीरिक आणि मानसिक अत्याचार, पुरुष व स्त्रियांना समान काम करण्यासाठी समान वेतन न दिल्याची प्रकरणे आहेत. पुरुषप्रधान व्यवस्था स्त्रियांसाठी अत्यंत धोकादायक आहे. महिलांना दुहेरी जखम सहन करावी लागत आहे. त्यांना गृहकाम

आणि बाहेरील कामे (नोकरी, व्यवसाय) करावे लागतात. कोणत्याही देशाची संस्कृती हि त्या देशातील स्त्री सन्मानावर अवलंबून असते. अशा परिस्थितीत आपण म्हणू शकतो काय की भारतीय संस्कृती श्रेष्ठ आहे? आपण पुराणमतवादी विचारसरणीतून, विषम मानसिकतेतून बाहेर पडून उदारमतवादी, समतावादी आणि विकासाभिमुख प्रगतीशील दृष्टीकोन स्वीकारण्याची गरज आहे. जेव्हा महिलांच्या मानवी हक्कांचे संरक्षण आणि पालन पोषण होईल तेव्हाच देश सामाजिक-आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या सक्षम होईल.

**संदर्भ सूची**


- अमर्त्य सेन – मिसीन्ग वूमन,ब्रिटीश मेडीकॅल जरनल (1992)
- bonjourplanetearth.blogspot.com.au
- KishwarMadhu, Where daughters are unwanted, Manushi,
- L.S, Vishwanathwomen Infanticide: The Colonial Experience, Economic and Political
- कृष्ण वल्लभ सिंघ – मानवाधिकार के आयाम दिल्ली पब्लीकेषण,
- प्रदीप त्रिपाठी भारतीय संविधान और मानवाधिकार राधा पब्लिकेशन दिल्ली 2006
- कृष्ण कुमार – भारतीय दलित और मानवाधिकार, बुक एनक्लेव , जयपूर 2002

# राष्ट्रीय,अंतर्राष्ट्रीयशिक्षा एवं सामाजिक समीकरण

डा मीना कुमारी /अनंत कथूरिया
Contact number : 9416109424 ,Email: kathuria.anant@gmail.com

**सारांश**

शिक्षा का तातपर्य एक व्यक्ति मे तर्क और विश्लेषण के द्वारा जीवन लक्ष्य प्राप्त करने की क्षमता को प्राकृतिक एवं स्थायी परिवर्तन से है। यह हमें अपने स्वयं के विचारों और विचारों की जांच करने की सुविधा प्रदान करता है और इसे विभिन्न रूपों में व्यक्त करने के लिए तैयार करता है। डॉ राधाकृष्णन ने शिक्षा को परिभाषित करते हुए कहा था कि, " शिक्षा व्यक्ति को और सामाजिक के सर्वतोन्मुखी विकास की सशक्त प्रक्रिया है। "

जहा समाज शिक्षा को प्रभावित करता है तो वही शिक्षा समाज के स्वरूप को निश्चित करती है , और उसकी सांस्कृतिक , धार्मिक , राजनीतिक एवं आर्थिक स्थिति को प्रभावित करती है। शिक्षा मानव समाज की आधारशिला है । वह समाज का निर्माण करती है , उसमें परिवर्तन करती है , और उसका विकास करती है। उच्च गुणवत्ता वाली शिक्षा का सार्वभौमीकरण संविधान द्वारा प्रदत्त अधिकार होने के बावजूद हासिल नहीं किया जा सका है। शिक्षा का अधिकार अधिनियम जिसे २००७ में तैयार और लागू किया गया था, ८ वीं कक्षा तक अनिवार्य प्राथमिक शिक्षा की गारंटी देता है। फिर भी गुणवत्तापूर्ण बुनियादी शिक्षा प्राप्त करने वालों में भारी असमानता है। इस के कई कारण है जैसे, भौगिलिक परिस्थिति , समाज का स्वरुप , जाती , धर्म संस्कृति, राजनैतिक इच्छाशक्ति , सामाजिक वगीकरण आदि , किन्तु मुखतय यह जाती , धर्म एवं सामाजिक वर्गीकरण से ज्यादा प्रभावित रहती है। यह लेख इन्ही समस्याओ को इंगित करता है।

डा मीना कुमारी,एसोसिएट प्रोफेसर,चौधरी देवी लाल विश्विद्यालय , सिरसा , हरियाणा
अनंत कथूरिया , शोधार्थी , चौधरी देवी लाल विश्विद्यालय , सिरसा , हरियाणा

**प्रस्तावना**

शिक्षा का तातपर्य एक व्यक्ति में तर्क और विश्लेषण के द्वारा जीवन लक्ष्य प्राप्त करने की क्षमता का प्राकृतिक एवं स्थायी परिवर्तन से है। यह हमें अपने स्वयं के विचारों और विचारों की जांच करने की सुविधा प्रदान करता है और इसे विभिन्न रूपों में व्यक्त करने के लिए तैयार करता है। शिक्षा एक क्रमिक प्रक्रिया है जो मानव जीवन और व्यवहार में सकारात्मक परिवर्तन लाती है। हम शिक्षा को ''अध्ययन के माध्यम से ज्ञान प्राप्त करने या निर्देशों या किसी अन्य व्यावहारिक प्रक्रिया के माध्यम से ज्ञान प्रदान करने की प्रक्रिया'' के रूप में भी परिभाषित कर सकते हैं।
विभिन्न समय पर विभिन्न देश के समाजशास्त्रियों, मनोवैज्ञानिकों व नीतिकारों ने शिक्षा के सम्बन्ध में अपने विचार दिए हैं। । डॉ राधाकृष्णन ने शिक्षा को परिभाषित करते हुए कहा था की, " शिक्षा व्यक्ति को और सामाजिक के सर्वतोन्मुखी विकास की सशक्त प्रक्रिया है। " , अन्य कई बुद्धिजीवियों के विचार भी उल्लेखनीय है जैसे

- शिक्षा से मेरा तात्पर्य बालक और मनुष्य के शरीर, मन तथा आत्मा के सर्वांगीण एवं सर्वोत्ष्ट विकास से है। (डॉ भीमराव अम्बेडकर)
- मनुष्य की अन्तर्निहित पूर्णता को अभिव्यक्त करना ही शिक्षा है। (डॉ लवी गौतम)
- शिक्षा व्यक्ति के समन्वित विकास की प्रक्रिया है। (तथागत बुद्ध)
- शिक्षा का अर्थ अन्त:शक्तियों का बाह्य जीवन से समन्वय स्थापित करना है। (हर्बट स्पैन्सर)
- शिक्षा मानव की सम्पूर्ण शक्तियों का प्राकृतिक, प्रगतिशील और सामंजस्यपूर्ण विकास है। (पेस्तालॉजी)
- शिक्षा बच्चे की बुनियादी आवश्यकताओं की पूर्ति का साधन है। ('सभी के लिए शिक्षा' पर विश्वव्यापी घोषणा, १९९०)

**'अंतर्राष्ट्रीय शिक्षा'**

'अंतर्राष्ट्रीय शिक्षा' का वास्तव में क्या अर्थ है? इसके बारे में सदा ही द्वंद्व रहा है, कई लोगों का मानना है कि यह व्यापक शिक्षा में एक नई रणनीतिक दिशा का प्रतीक है जहां यह परिप्रेक्ष्य को व्यापक बनाना है, विविध सम्बन्धो के द्वारा सीमाओं के पार नवाचार और विचारों को प्रोत्साहित करता है। वैश्विक परिप्रेक्ष्य के साथ सीखने से छात्रों को विभिन्न संस्कृतियों, जातीय समूहों, धर्मों और भाषाओं से अवगत कराया जा सकता है और इस प्रक्रिया से समाज को समृद्ध कर, सभी के लिए शैक्षणिक अनुभव को व्यापक बनाया जा सकता है। यह निश्चित रूप से, एक बहुसांस्कृतिक अधिगम के माहौल को भी स्थापित करती है, जो इसे छात्रों की सांस्कृतिक जागरूकता बढ़ाने और एक अलग पृष्ठभूमि से आने वालों की उनकी समझ और प्रशंसा को बढ़ावा देने के लिए आदर्श स्थापना बनती है।

**राष्ट्रीय शिक्षा**

राष्ट्रीय शिक्षा का तातपर्य समग्र शिक्षा से है, जिस का उद्देश्य राष्ट्रीय एकता विकसित करना, एक राष्ट्र के रूप में जीवित रहने की प्रवृत्ति को विकसित करना और हमारे देश के भविष्य में छात्रों के विश्वास को बढ़ावा देना है। यह अपनेपन और भावनात्मक जड़ता की भावना पैदा करने पर भी जोर देता है। यह बहुत महत्वपूर्ण है होता है की किसी देश के छात्र विकसित होने के बाद समाज में वापस योगदान दे सकें और भविष्य में देश, समाज के प्रति अपनेपन और स्वामित्व की भावना महसूस कर सकें। उन्हें विश्वास होना चाहिए कि वह क्षमता एवं कौशल अर्जित करने के पश्चात् आगामी जीवन में अपने कृत्यों से अपने देश के के लिए अपना सर्वश्रेष्ठ योगदान देंगे।

**शिक्षा एवं समाज**

एक और यदि यह बात सत्य है कि, समाज शिक्षा को प्रभावित करता है तो दूसरी और यह बात सत्य है कि, शिक्षा समाज के स्वरूप को निश्चित करती है , और उसकी सांस्कृतिक , धार्मिक , राजनीतिक एवं आर्थिक स्थिति को प्रभावित करती है। शिक्षा मानव समाज की आधारशिला है । वह समाज का निर्माण करती है , उसमें परिवर्तन करती है , और उसका विकास करती है।

उच्च गुणवत्ता वाली शिक्षा का सार्वभौमीकरण संविधान द्वारा प्रदत्त अधिकार होने के बावजूद हासिल नहीं किया जा सका है। शिक्षा का अधिकार अधिनियम जिसे २००७ में तैयार और लागू किया गया था, ८ वीं कक्षा तक अनिवार्य प्राथमिक शिक्षा की गारंटी देता है। फिर भी गुणवत्तापूर्ण बुनियादी शिक्षा प्राप्त करने वालों में भारी असमानता है। इस के कई कारण है जैसे, भौगिलिक परिस्थिति , समाज का स्वरुप , जाती , धर्म संस्कृति, राजनैतिक इच्छाशक्ति , सामाजिक वगीकरण आदि , किन्तु मुखतय यह जाती , धर्म एवं सामाजिक वर्गीकरण से ज्यादा प्रभावित रहती है।

**शिक्षा एवं जाती**

जाति व्यवस्था ७ ईस्वी के आसपास शुरू हुई, एक हिंदू मान्यता के आधार पर कि उनके वर्तमान जीवन में एक व्यक्ति की स्थिति उनके पिछले जीवन के पापों पर निर्भर है। इसलिए किसी की जाति जन्म के समय निर्धारित की जाती है। तथाकथित 'अछूत', या दलित, जाति व्यवस्था के नीचे भी मौजूद हैं। वे भारत की आबादी का लगभग १६: हिस्सा बनाते हैं। २००६ में भारतीय प्रधान मंत्री मनमोहन सिंह ने स्वीकार किया कि 'अस्पृश्यता' की भारतीय व्यवस्था रंगभेद के समानांतर थी, और यह कि सरकार द्वारा कानून में बदलाव के माध्यम से इसे समाप्त करने के प्रयासों के बावजूद, यह अभी भी भारत में मौजूद है। सरकार अपने बजट का लगभग एक तिहाई शिक्षा पर खर्च करती है, फिर भी एक व्यक्ति को मिलने वाली शिक्षा की गुणवत्ता में भारी असमानताएँ पाई जाती हैं। एक बच्चे की गुणवत्तापूर्ण शिक्षा तक पहुंच उनकी कक्षा और जाति द्वारा प्रतिबंधित है।

किन्तु बदलते परिपेक्ष के साथ समाज भी जाति अव्यवस्था के प्रति जागरूक हो गए है और सभ्य समाज में जातिवाद के विस्मरण और व्यक्तिगत और सामुदायिक दोनों स्तरों पर समानता की विचारधाराओं को महत्वपूर्ण रूप से शामिल किया जा रहा है। जाति शिक्षा, सम्मान

ISSN : 2278-9308
July 2021

और समानता की मात्रा निर्धारित नहीं करती है जिसका एक व्यक्ति हकदार है। आज छात्रों को, वर्ग, जाति और लिंग के बावजूद, जातिगत भेदभाव के खिलाफ इस आवाज को आत्मसात करना चाहिए ताकि अगली पीढ़ी एक समतावादी समाज का वादा कर सके।

यह सकारात्मक प्रभाव पिछले दशक में, शहरी भारत में सभी सामाजिक समूहों में शिक्षा के स्तर में वृद्धि से भी इंगित होता है, जहा ओबीसी से संबंधित लोगों का शिक्षा प्रतिरूप सामान्य वर्ग के समान है। अनुसूचित जाति और अनुसूचित जनजाति के बीच प्राथमिक स्कूली शिक्षा से परे शिक्षित युवाओं के अनुपात में भी तेज वृद्धि हुई है। उच्च शिक्षा के स्तर में कुछ वृद्धि लगातार केंद्र और राज्य सरकारों द्वारा सकारात्मक कार्रवाई का परिणाम हो सकती है जैसे उच्च शिक्षा संस्थानों में सीटों की एक निर्दिष्ट संख्या आरक्षित करना और कुछ जातियों के छात्रों के लिए कम प्रवेश सीमा।

भारतीय उच्च शिक्षा प्रणाली दुनिया की तीसरी सबसे बड़ी शिक्षा प्रणाली है। भारत की तुलना में अधिक व्यापक प्रणाली वाले एकमात्र देश संयुक्त राज्य अमेरिका और चीन हैं। संतुलित होता शैक्षिक जाती समीरण कई विषयों में समाज के ज्ञान आधार को विकसित करने में मदद करेगा और विकासशील विशेषज्ञों के माध्यम से राष्ट्र के विकास में योगदान देगा जो शिक्षा के स्तर को और विकसित करते ह। सभी जाती वर्गो से गुणवत्ता शिक्षक, अर्थशास्त्री, डॉक्टरों, वकीलों इसी के द्योतक है।

**शिक्षा एवं धर्म**

प्राचीन काल में धर्म मानव जीवन का मुख्य आधार था और मानव शिक्षा का प्रमुख स्रोत था। धन, अर्थ, कर्म और मोक्ष, (धर्म धन, सुख और मुक्ति) जीवन के प्रमुख उद्देश्य थे और ये शिक्षा के माध्यम से प्राप्त किए गए थे। वैदिक, ब्राह्मण और बुद्ध काल के दौरान धर्म शिक्षा का आधार था। इन कालों में धर्म (धर्म) का अर्थ इतना व्यापक था कि धर्म विहीन व्यक्ति को मृत मान लिया जाता था। धर्म सदाचार, नैतिकता, सामाजिकता और मानवता का एक महत्वपूर्ण स्रोत था। इन काल में धार्मिक पुस्तकों का अध्ययन, ध्यान और विचार में संलग्न होने और प्राप्त धार्मिक ज्ञान के अनुसार जीवन जीने का प्रयास किया गया था। धर्म का शिक्षा से पूर्ण संबंध था। वास्तव में, धार्मिक निकाय भी शैक्षणिक संस्थान थे। मध्यकाल में शैक्षणिक संस्थान (पाठशालाएं और मकतब) धार्मिक स्थलों (मंदिरों और मस्जिदों) से जुड़े हुए थे।

बुद्ध विहार और मठ (मठ) शिक्षा से निकटता से जुड़े थे। धार्मिक शिक्षा के माध्यम से नैतिकता को विकसित करने का प्रयास किया गया था। यह भी शिक्षा का एक उद्देश्य था। न केवल भारतीय परंपराओं में, बल्कि यूरोपीय परंपराओं में भी धर्म एक महत्वपूर्ण पहलू था। यूरोप में बच्चों की शिक्षा चर्च से संबंधित थी और उनके संरक्षण में दी जाती थी। भिक्षु और पुजारी आयोजक और शिक्षक थे। शिक्षा के क्षेत्र में विभिन्न धार्मिक संस्थाओं ने उत्कृष्ट योगदान दिया है। भारत में आर्य समाज सनातन धर्म, जैन धर्म और ईसाई मिशनरियों आदि के प्रयास प्रशंसनीय हैं। यूरोप और यू.एस.ए. में चर्च आज भी शिक्षा के संगठन में एक महत्वपूर्ण स्थान रखते हैं।

ईज्डीज्वरटन के शब्दों में दृ धर्म और शिक्षा वास्तविक मित्र है।दोनों का सम्बन्ध प्राकृतिक तथा भौतिक जगत के विरुद्ध आध्यात्मिकता से है।दोनों मानव को उसके वातावरण के सम्पर्क में नहीं, अपितु उसकी दासता से मुक्ति दिलाने का प्रयास करते हैं।शिक्षा मां के दृष्टिकोण को व्यापक बनती है।यह मानव के व्यवहार को उन नैतिक तथा आध्यात्मिक मूल्यों के अनुसार परिवर्तित करती है जिन्हें धर्म के अन्तर्गत महत्वपूर्ण स्थान दिया जाता है।इन मूल्यों के आभाव में मानव के स्वार्थी स्थान नहीं दिया गया तो हम उस महान शक्ति को खो बैठेंगे जो सामाजिक संगठन को दृढ बनाने के लिए परम आवशयक है।

१९वीं शताब्दी से धर्म निरपेक्ष शिक्षा की लहर साथ शिक्षा किसी अमुक धार्मिक सम्प्रदाय तक ही सीमित ना रहे इस पर बल दिया जाने लगा। अमेरिका में २०वीं शताब्दी के अन्तर्गत होने वाले धार्मिक स्कूल आन्दोलन, माध्यमिक शिक्षा आन्दोलन तथा चारित्रिक शिक्षा आन्दोलन के परिणामस्वरूप स्कूलों में सामान्य तथा उदार शिक्षा की व्यवस्था की गई।इससे शिक्षा के अन्तर्गत धार्मिक तटस्था की नीति को अमरीकी जनतंत्र के सिद्धांतों में सम्मलित कर लिया गया।

भारत तथा अन्य पूर्वी देशों में भी शिक्षा प्राचीनकाल से ही धार्मिक रही।मेक्डोनल का भी मत है कि भारतीय शिक्षा पर हजारों वर्ष पहले से ही धर्म की गहरी छाप रही है।उस युग में प्राय: धार्मिक व्यक्ति की शिक्षक हुआ करते थे, जो भावी पीढ़ी के मस्तिष्क में पवित्रता तथा नैतिकता की गहरी छाप लगा देते थे।बालक की शिक्षा को आरम्भ करने से पूर्व उपनयन संस्कार की पूर्ति करना, शिक्षा प्राप्त करते हुए समय—समय पर व्रत रखना, प्रात: तथा सायंकाल ईश्वर की महिमा का गुणगान करना एवं गुरु के घर में रहते हुए धार्मिक त्योहारों को मनाना आदि सभी बातें बालक के मस्तिष्क में पवित्रता तथा धार्मिकता की भावनाओं को विकसित करती थी तथा उसे आध्यात्मिक जगत की सत्यता का भी ज्ञान प्राप्त हो जाता था।इस प्रकार धार्मिक की देन है, परन्तु उसका मस्तिष्क, बुद्धि तथा आत्मा का सम्बन्ध उस आध्यात्मिक जगत से है जिनके नियमों के अनुसार उसके चरित्र का निर्माण होता है ।मुस्लिम काल में भी शिक्षा पूर्णरूपेण धार्मिक ही रही।प्रत्येक मस्जिद से लगे हुए सभी मकतबों में जहाँ एक ओर बालकों को कुरान की शिक्षा दी जाती थी वहाँ दूसरी ओर मदरसों के सम्पूर्ण पाठ्क्रम पर भी धर्म की ही छाप लगी हुई थी।

ब्रिटिश शासनकाल में अंग्रेजों ने धार्मिक तटस्था के सिद्धांत को अपनाया तथा औपचारिक एवं सामान्य शिक्षा की व्यवस्था की,चुकी भारतीय लोगों का पालन—पोषण धार्मिक परम्पराओं के अनुसार हुआ था, इसलिए धर्म तथा संस्कृति उनके जीवन का अंग बन गए थे।अत: उन्होंने अंग्रेजों द्वारा शिक्षा के प्रति धार्मिक तटस्थता की नीति को अपनाने का विरोध किया।परिणामस्वरूप चारों और सांप्रदायिक स्कूल खुलने लगे।लोगों को विश्वास हो गया कि धर्म विहीन शिक्षा बालकों के व्यक्तित्व का सर्वांगीण विकास नहीं कर सकती। अत: सन १८८२ के हन्टर कमीशन से लेकर पंजाब विश्वविधालय आयोग तक अंग्रेजी सरकार ने विभिन्न आयोगों तथा समितियों की नियुक्ति की जिन्होंने किसी न किसी रूप में शिक्षा को धार्मिक पुट देने के लिए अनके सुझाव प्रस्तुत किये।

वर्तमान में धार्मिक परिपेक्ष की सांख्यकी के अनुसार जैनियों में साक्षरता दर सबसे अधिक ८४.७: है, इसके बाद ईसाई (७४.३:), बौद्ध (७१.८:) और सिख (६७.५:) हैं। धार्मिक समुदाय और लिंग द्वारा शैक्षिक स्तर पर भारत की ह्यञ्घ की जनगणना से हाल ही में जारी आंकड़ों से पता चला है कि भारत में ४२ ७ : मुसलमान निरक्षर हैं। यह देश में किसी एक धार्मिक समुदाय के लिए सबसे अधिक निरक्षरता दर है, जबकि पूरी आबादी के लिए निरक्षरता दर एक साथ ३६.९: है। मुस्लिम एकमात्र ऐसा समुदाय है जिसकी निरक्षरता दर सभी समुदायों में राष्ट्रीय दर से अधिक है। हिंदुओं के लिए, यह आंकड़ा ३६.३: है, जो निरक्षर लोगों का दूसरा सबसे बड़ा अनुपात है। इन तथ्यों से ज्ञात होता है की धर्म शिक्षा एवं विकास में महत्वपूर्ण भूमिका रखता है।

**शिक्षा एवं वर्ग**

शिक्षा को सभी वर्ग गतिशीलता के मार्ग के रूप में देखते हैं और इसमें संपन्न वर्ग भी शामिल हैं। किसी देश की अर्थव्यवस्था को विकसित करने के लिए शिक्षा एक महत्वपूर्ण उपकरण है। एक साक्षर और अधिक महत्वपूर्ण बात यह है कि एक कुशल आबादी विकास प्रक्रिया को सुविधाजनक बनाएगी। गरीबी और असमानता को कम करने में शिक्षा सबसे शक्तिशाली उपकरणों में से एक है। यह एक महान तुल्यकारक है जो जीवन स्तर में सुधार करता है। यह भारत में सामाजिक और आर्थिक विकास के लिए महत्वपूर्ण है, विशेष रूप से भारत दुनिया में सबसे तेजी से बढ़ती अर्थव्यवस्थाओं में से एक है।

भारत में उच्च शिक्षा विशिष्टता के सिद्धांत पर आधारित है। इस क्षेत्र में शिक्षा के सार्वभौमीकरण के लिए कोई प्रयास नहीं किया जा रहा है, मुख्यत: क्योंकि यह एक विशेष क्षेत्र की विशेषज्ञता है। इस प्रवेश द्वार में प्रवेश एक प्रवेश परीक्षा के माध्यम से होता है और यह योग्यता पर निर्भर करता है। प्रवेश परीक्षा में प्रदर्शन इस प्रवेश द्वार के लिए पैमाना है। मेरिटोक्रेसी में न तो उस तरह के संसाधन शामिल होते हैं जिस तरह के संसाधनों तक छात्र की पहुंच होती है और न ही वह सांस्कृतिक और सामाजिक पूंजी जो उसने वर्षों से हासिल की है।

राष्ट्रीय सर्वेक्षण २०१४ के आंकड़ों का उपयोग जाति के अलावा वर्ग असमानता के चरित्र का पता लगाने के लिए किया जाता है। विभिन्न सामाजिक वर्गों के जाति—विभाजन से पता चलता है कि अधिक शिक्षित वर्गों में जातिगत असमानताएँ अधिक हैं। उच्च शिक्षा में नामांकन

प्रारंभिक शिक्षा की तुलना में अधिक सामाजिक असमानताओं को दर्शाता है। विभिन्न वर्गों के बीच मतभेद बताते हैं कि जहां जाति शैक्षिक असमानता का एक मजबूत कारक है, वहीं यह पर्याप्त नहीं है। निम्न वर्गों के भीतर उच्च वर्गों की तुलना में बहुत कम जाति भिन्नता है। जाति और वर्ग को सृजनात्मक प्रक्रियाओं के रूप में देखा जाना चाहिए, और उप—जाति नेटवर्क की अवधारणा और अनुभवजन्य जांच की जानी चाहिए ताकि शैक्षिक और सामाजिक असमानता में जाति और वर्ग की वास्तविक भूमिका को समझा जा सके।

भारत की शिक्षा प्रणाली पहुंच, पूर्णता और गुणवत्ता में घोर असमानताओं से ग्रस्त है। वर्ग, भाषाई पृष्ठभूमि, लिंग, जातीयता और जन्म स्थान सभी का भारत में बच्चों के शैक्षिक अनुभव पर प्रभाव पड़ता है। विभिन्न वर्गों के तुलनात्मक अध्ययन के अनुसार, भारत में, शैक्षिकअवधि अमीर परिवारों की लड़कियों के लिए ९.१ वर्ष की तुलना में, गरीब परिवारों की लड़कियों को शिक्षा प्राप्त करने की औसत संख्या शून्य है। इस का मुख्य कारक सरकारी भेदभाव भी है। जहां भारत की सरकार संदिग्ध गुणवत्ता के कई स्कूल चलाती है, वहीं कुछ ऐसे भी चलाती है जो उच्चतम स्तर के हैं। २०१४ – २०१५ में, सरकारी स्कूलों में १६,१५१ रुपये औसत खर्च है वही केंद्रीय विद्यालयों का औसत खर्चा २५,७२३ रुपये था। यह सुविधा का विभेदन सरकार के उन नौकरशाहों के लिए है जिन के बच्चे सरकार द्वारा संचालित स्कूलों में पढ़ते है, छात्रों के साथ कैसा व्यवहार किया यह माता—पिता का वर्ग निश्चित करता है। इसी प्रकार भौगोलिक स्तिथित और भाषा के अनुसार भी सरकारी बजट में विभेदन अक्सर देखने को मिलता है।

**निष्कर्ष**

शिक्षा सदा ही मानव विकास का उद्गम रहा है , विभिन्न समय पर विभिन्न प्रकार के अवरोध इस प्रक्रिया में दीखते रहे है। किसी अवरोध एवं समस्या का निवारण उस के अनावरण से ही प्रारम्भ होता है । वर्तमान परिपेक्ष में राष्ट्रिय एवं अंतर्राष्ट्रीय शिक्षा में जो विभिन्न अवरोध है उन का निवारण केवल सामाजिक इच्छाशक्ति , राजनैतिक प्रयास एवं सामाजिक चेतना के द्वारा ही सम्भव है। एक और यह प्रयास शैक्षिक जगत को विकसित करेंगे वही इन प्रयासों की प्रतिध्वनि सामाजिक उत्थान एवं राष्ट्रीय विकास के रूप में प्रदर्शित होगी।

**सन्दर्भ सूचि**


- https://www.shethepeople.tv/top-stories/opinion/caste-and-education/
- https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/statistics-new/ESG2016.pdf
- https://theprint.in/opinion/education-levels-of-sc-st-obc-rising-a-new-study-looks-at-caste-gap-in-jobs-income-too/606200/
- Aggarwala, Y. S. (1992). Educating scheduled castes. New Delhi: NIEPA. Sharda, B.D. (1991).
- Tribes Caste and Harijan Structure Inequalities and Mobility. Delhi: Ajanta Publication Babu M.R. and Chandrasekarayy, T. (2015).
- Education status and its impact on development of scheduled castes: an overview. International Journal of Multidisciplinary Research and Development, 2(1): 356-360.
- Bhuimali, A. (2007). Development of Schedule Caste. New Delhi: Serials Publications.
- Census of India, Office of the Registrar General & Census Commissioner, India, 2011.
- https://www.hindivibhag.com
- https://www.Bangalorebest.com
- Gupta, N.L.,Human Values in Education, Concept Publishing, New Delhi.
- Higher Education for Human Development, Association of Indian Universities, New Delhi.
- Annual report 2014-2015, Department of Higher Education, Ministry of Human Resource Development.
- https://www.censusindia.gov.in/2011census/population_enumeration.html

# एड्स : महाविद्यालयीन विद्यार्थिनींमधील जागरूकता आणि उपाययोजना

**प्राची बा. भांबुरकर**

विभाग प्रमुख, गृहअर्थशास्त्र विभाग मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती.

**डॉ. संगीता आ. जवंजाळ**

विभाग प्रमुख, गृहअर्थशास्त्र विभाग श्रीमती राधाबाई सारडा कला व वाणिज्य महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी.

**प्रस्तावना :—**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या (United Nations) एड्सच्या द्विवार्षिक अहवाल २००६ मध्ये असे नमूद केले की, २००५ च्या अंतापर्यंत भारतात ५७ लाख एड्सग्रस्त होते. जागतिक पातळीवर १८८१ मध्ये एड्स ने तोंड काढल्यावर भारतात एकूण २७००० ते ६८००० दरम्यान बळी घेतले करीता संयुक्त राष्ट्रसंघाचे एच.आय.व्ही./एड्स ला 'महामारी' असे संबोधिले आहे. भारताचे आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री डॉ. अंकुमणी रामदौस यांनी जुलै २००७ मध्ये दिलेल्या एका महत्त्वपूर्ण माहितीनुसार भारतात २.४७ दशलक्ष एड्स रूग्ण आहेत.

जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणात जनजागृती आणि एड्स विरोधी कार्य सुरू असतांनाही २००१ पर्यंत जवळजवळ नवीन ३८ टक्के रूग्णांची भर पडली आहे. २००१ ते २००३ च्या दरम्यान २.१ मिलियन लोकांना लागण झाल्याचे दिसून आले आहे. GAPअहवालामध्ये व्यक्ती हा केंद्रबिंदू ठेवून १९९५ पासून आपल्याला क्रांतीकारी पाऊले उचलून प्रबोधनावर अधिक भर देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

आधुनिक जिवनशैलीत चार्वाकाच्या तत्त्वज्ञानाचा अंतर्भाव झाल्यावर 'खा प्या आणि मजा करा' ही प्रवृत्ती वाढल्यामुळे माणसाचा निसर्गात आणि समाजातील हस्तक्षेप वाढत गेला केवळ मौज मजा म्हणून अनारोग्यकारक जिवनशैलीच्या दुष्परिणामातून भयंकर रोगाने जन्म घेतला, वैद्यकशास्त्र कितीही प्रगत झाले तरीही अशा भयानक आजारावर प्रतिबंधात्मक उपचार करण्यापेक्षा मुळात हा रोग होऊच नये म्हणून प्रयत्न सुरू झालेत.

भारतात एच.आय.व्ही. संसर्गित व्यक्तींची दररोज हजारोंनी वाढ होत असून एच.आय.व्ही. विषाणुंची बाधा शाळा, महाविद्यालयामधील विद्यार्थी, युवक—युवती, कामगार यांच्यामध्ये झपाट्याने पसरण्याचा धोका (WHO)ने सुचित केला आहे. एच.आय.व्ही. संसर्ग सर्वच वयोगटात दिसून येत असला तरी प्रामुख्याने तरूण पिढीवर एड्सने जबरदस्त आघात केला आहे. एड्सने बाधित झालेल्या एकूण रूग्णांपैकी सुमारे ७५ टक्के रूग्ण हे तरूण पिढीतील म्हणजेच १५—३० वर्षे वयोगटातील आहेत, या तरूण पिढीवर समाजाचे, राष्ट्राचे भवितव्य अवलंबून आहे, याच पिढीवर कुटुंब व्यवस्थेतील दोन महत्त्वाचे कार्ये म्हणजे अर्थोत्पादन व प्रजोत्पादन अवलंबून आहे. मतदान जागृती, रक्तदान, नेत्रदान, देहदान जागृती कार्यक्रमाप्रमाणे या विषयाचे जागृती कार्यक्रम राबविणे सहज शक्य नाही. पर्यायाने मुली आणि महिलांमध्ये एच.आय.व्ही. एड्सबद्दल अज्ञान कायम राहते. महाविद्यालयीन तरूणींमध्ये या विषयाची जागृती आहे कायध असल्यास कितपत आहे हे पाहण्याच्या दृष्टीने प्रस्तुत विषय हाती घेतला आहे.

**संशोधनाचे महत्त्व :—**

एच.आय.व्ही./एड्स हा रोग गरीब—श्रीमंत, पुरूष—स्त्री, ग्रामीण—शहरी असा भेद करीत नाही. त्यासाठी स्वत:वर नियंत्रण, सहकार्यासोबत एकनिष्ठता व आदर्श जीवनशैली इ. गोष्टींची आवश्यकता आहे. एच.आय.व्ही. संसर्ग झाल्यास रोगप्रतिकारकशक्ती नष्ट होते व व्यक्ती वेगवेगळ्या आजारांना बळी पडतो. एच.आय.व्ही. चे प्रमाण तरूणांमध्ये जास्त असल्याचे सद्यस्थितीत विविध अहवालातून निदर्शनास येत आहे. त्यावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शुद्ध आचरण ठेवणे, विविध छंद जोपासणे, मनावर संयम ठेवणे, विवाहबाह्य व विवाहपूर्व संबंध न ठेवणे, व्यसनापासून दूर राहणे, जीवनविषयक सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे, तरच तरूण तरूणींना एच.आय.व्ही. मुक्त जीवन जगता येईल अन्यथा त्याचे विदारक चित्र दिसेल.

याकरिता तरूण पिढीचे एच.आय.व्ही. पासून सरक्षण होणे व त्यावर विविध उपाय योजने ही काळाची गरज आहे.

**उद्दिष्ट्ये :—**

१) एच.आय.व्ही. / एड्स बाबत महाविद्यालयीन विद्यार्थिनींमधील जागरूकता जाणून घेणे.
२) समस्येच्या निराकरणासाठी उपाययोजना.

**वाडमयीन पुनरावलोकन :—**

जगभरात चिंतेचा विषय बनून राहिलेला एड्स या भयानक रोगावर जगभरात संशोधन सुरू आहे. एच.आय.व्ही. या विषाणूमुळे रोगप्रतिकार शक्ती नष्ट करून एच.आय.व्ही. बाधीत व्यक्तीस क्षयरोग, त्वचाविकार अशा संधीसाधु आजाराचा प्रादुर्भाव होत असल्याचे आढळते. या विषाणूला प्रतिबंध करणे आपल्याच हातात आहे. आपल्या मनावर ताबा ठेवणे महत्त्वाचे आहे. (धायगुड, २००५)

एच.आय.व्ही. च्या लागणीमध्ये सर्वात वरचा क्रमांक लैंगिक संबंधातून होणाऱ्या लागणीचा आहे. एकूण लागणीपैकी ८० ते ८५ टक्के लागण लैंगिक संबंधातून झालेली आढळते. यातीलही सुमारे ५० टक्के लागण ही २५ वर्षापर्यंतच्या मुलामुलींमध्ये आढळते. यासाठी सर्वांचे (विशेषत: वयात आलेल्या मुलामुलींचे) योग्यप्रकारे लैंगिक आरोग्य शिक्षण व्हायला हवे. (प्रयास आवृत्ती ५, २०१६)

**संशोधन पद्धती :—**

प्रस्तृत संशोधनात महाविद्यालयीन विद्यार्थिनीमधील जागरूकता व उपाययोजना करण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापिठाशी सलग्नीत असलेले मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती मधील ५० महाविद्यालयीन विद्यार्थिनींची संशोधनाकरिता निवड करण्यात आली. त्यांच्याकडून उद्दिष्टाला अनुसरून तयार केलेल्या प्रश्नावलीच्यामाध्यमातून माहिती संकलित केली. प्राप्त माहितीचे टक्केवारीद्वारा सांख्यिकीय विश्लेषण करून तालिकाबद्ध करण्यात आले व आलेखांचा वापर करून अर्थनिर्वचन करण्यात आले.

**सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन :—**

अध्ययनाकरिता निवडलेल्या ५० विद्यार्थिनींनी ७ प्रश्नांना दिलेले अभिप्राय टक्केवारीमध्ये खालील सारणीमध्ये दर्शविण्यात आलेले आहेत.

| अ. क्र. | विधान | सहमत | | असहमत | |
|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १. | एच.आय.व्ही./एड्स हा गंभीर आजार आहे. | ५० | १००.०० | ०० | ०.०० |
| २. | एच.आय.व्ही./एड्स संसर्गजन्य आजार आहे. | ३२ | ६४.०० | १८ | ३६.०० |
| ३. | एच.आय.व्ही./एड्सची लागण असुरक्षित लैंगीक संबंधामुळे होते. | ३५ | ७०.०० | १५ | ३०.०० |
| ४. | एच.आय.व्ही.बाधीत गर्भवती मातेपासून तिच्या होणाऱ्या बाळाला संसर्ग होतो. | ३७ | ७४.०० | १३ | २६.०० |
| ५. | दुषीत रक्त व रक्तघटकांव्दारे एच.आय. व्ही. ची लागण होऊ शकते. | ३० | ६०.०० | २० | ४०.०० |
| ६. | महाविद्यालयीन तरूण—तरूणींना एच. आय.व्ही./एड्स बाबत माहिती देणे गरजेचे आहे. | ५० | १००.०० | ०० | ०.०० |

ISSN : 2278-9308
July 2021

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७. | शासनाने विविध योजनेतून सेवाभावी संस्थेमार्फत विविध उपक्रम राबवून संपूर्ण माहिती जनतेपर्यंत पोहचविणे गरजेचे आहे. | ५० | १००.०० | ०० | ०.०० |

उपरोक्त सारणीवरून असे निदर्शनास येते की, सर्वच विद्यार्थिनींना एच.आय.व्ही./एड्स हा गंभीर आजार आहे यासंबंधी माहिती आहे. एच.आय.व्ही./एड्स हा संसर्गजन्य आजार आहे याबाबत ६४: विद्यार्थिनी सहमत असून ३६: विद्यार्थिनी असहमत आहेत. एच.आय.व्ही./एड्सची लागण असुरक्षित लैंगीक संबंधामुळे होते याला सर्वाधिक ७०: विद्यार्थिनींनी सहमती दर्शविली असून फक्त ३०: विद्यार्थिनीच असहमत असल्याचे दिसून येते. एच.आय.व्ही.बाधीत गर्भवती मातेपासून तिच्या होणाऱ्या बाळाला संसर्ग होतो याला ७४: विद्यार्थिनी सहमत असून फक्त २६: विद्यार्थिनीच असहमत आहेत. दुषीत रक्त व रक्तघटकांव्दारे एच.आय.व्ही. ची लागण होऊ शकते याची माहिती ६०: विद्यार्थिनींना असून ४०: विद्यार्थिनी याबाबत अनभिज्ञ असल्याचे आढळून आले. महाविद्यालयीन तरूण–तरूणींना एच.आय.व्ही./एड्स बाबत माहिती देणे तसेच शासनाने विविध योजनेतून सेवाभावी संस्थेमार्फत विविध उपक्रम राबवून संपूर्ण माहिती जनतेपर्यंत पोहचविणे गरजेचे आहे याबाबत सर्वच विद्यार्थिनी सहमत असल्याचे दिसून आले.

**निष्कर्ष :—**

सांख्यिकीय विश्लेषणावरून असे निदर्शनास आले की, शाळा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शास्त्रीय पद्धतीने लैंगिक शिक्षण देणे अनिवार्य आहे. एच.आय.व्ही./एड्स बाबतची जागरूकता निर्माण करण्यासाठी जनजागरण मोहिम आरोग्य शिक्षणाचा प्रसार युद्धपातळीवर राबविणे आवश्यक आहे.

एच.आय.व्ही./एड्स ही केवळ एक आरोग्याचीच समस्या राहिली नसून ती एक सामाजिक समस्या बनलेली आहे त्याचे घातक परिणाम तरूण पिढीवर होत आहेत त्यासाठी ह्या समस्येकडे दुर्लक्ष करून चालणार नाही विशेषत: तरूण पिढीमध्ये प्रतिबंधात्मक दृष्टिकोन निर्माण होणे गरजेचे आहे.

एच.आय.व्ही./एड्स हा गंभीर व संसर्गजन्य आजार असून असुरक्षित लैंगिक संबंधामुळे त्याचा संसर्ग होण्याचे हे एक प्रमुख कारण आहे परंतू विद्यार्थिनींमध्ये एच.आय.व्ही./एड्स बाबत अजुनही पुरेशी जाणीव आलेली नाही. विद्यार्थिनींना प्राथमिक स्वरूपाची माहिती असल्याचे निदर्शनास आले त्यांना अजुन सखोल ज्ञान देण्याची गरज येथे आहे कारण एच.आय.व्ही./एड्स ग्रस्तांमध्ये युवापिढीचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. कारण अज्ञान, अर्धवट चुकीची माहिती, जोखीम स्वीकारण्याची तयारी, अपूरे लैंगिक शिक्षण यामुळे युवापिढी अशा आजाराला बळी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शाळा महाविद्यालयातून एड्सविषयी माहिती देणारी पोर्स्टर्स पथनाटय, प्रदर्शनी, स्नेहसंमेलन, चर्चासत्र याद्वारे जागृती घडविल्या जाऊ शकते आणि या आजाराला आळा बसु शकते.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१.गोखले, भावना. निरामय जीवनासाठी पर्यायी उपचार पद्धती. योजना ४२(११) निती आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली २०१५.
२.प्रा. स्वाती वैद्य. 'महाविद्यालयीन विद्यार्थिनींमध्ये एच.आय.व्ही./एड्स संबंधी असलेली जागरूकता व प्रतिबंधाविषयी असलेल्या ज्ञानाचे अध्ययन', एम.फील. लघुशोध प्रबंध, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्ती विद्यापीठ, नाशिक, २००७—२००८.
३. STI and young girls. WHO Consolidated Guidelines 2013 to Prevent Treat HIV, 2014. access on http://www.who.org.
४.प्रयास २०१६, 'एच.आय.व्ही. विषयी हे आपल्याला माहिती हवे' एच.आय.व्ही. माहिती व सल्ला केंद्र, पुणे पृ.क्र. ११.

५.जागतिक आरोग्य संस्थेकडून एच.आय.व्ही. ग्रस्तांसाठी मार्गदर्शिका. आरोग्यवार्ता, दै. लोकसत्ता, दि. १ डिसेंबर २०१६.
६.कऱ्हाडे, बी.एम. शास्त्रीय संशोधन पद्धती. नागपूर: पिंपळापुरे ॲण्ड कंपनी, २०१२.
७.धायगुडे दत्तात्रय (२००५). एड्सवर विजय शक्य, महाराष्ट्र आरोग्य पत्रिका, पृ.क्र. २२.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# दलित साहित्य : चळवळ आणि विचार

प्रा. एम. डी. झलके
स्व. वसंतराव कोल्हटकर कला महाविद्यालय, रोहणा,जि. वर्धा

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये अस्पृश्य वर्गामध्ये सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या जागृती घडविण्याचे कार्य म. फुले, महर्षि वि.रा.शिंदे, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केले. हेच कार्य अस्पृश्य वर्गात जन्मलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जोमदारपणे व आत्माभिमानाची बैठक देवून सुरू केले. अस्पृश्य वर्गाची अस्मिता जागृत करण्याचे कार्य भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीपासून ते भारत स्वतंत्र झाल्यावर सुध्दा सुरूच ठेवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य वर्गाची सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या प्रगती व्हावी म्हणून मुंबई येथे 'पिपल्स एज्युकेशन सोसायटी' ची स्थापना केली आणि त्याचा परिणाम अस्पृश्य वर्गावर झाला. 'जनता', 'प्रबुध्द भारत', 'बहिष्कृत भारत' या नावांची वृत्तपत्रे सुरू करून त्यातून अस्पृश्य चळवळीचे काम केले. १९५० च्या सुमाराला पददलितांच्या वाङ्मयावर लेखन केले. १९५६ च्या बौध्द धर्म स्तिरानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराच्या पृष्टर्थ १९६०-६५ च्या सुमारास 'दलित साहित्य ' हा वेगळा वाङ्मय प्रवाह मराठी साहित्यात उदयास आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्पृश्योध्दाराच्या चळवळीच्या अनुषंगाने तिच्या प्रचारार्थ नव-नवे साहित्य निर्माण झाले. परंतु बाबासाहेबांची चळवळ सुरू होण्या अगोदर १९२० च्या जवळपास दलित समाजातील काही मंडळींनी आपल्या लेखणीद्वारे त्या वेळच्या सरकारला अस्पृश्य समाजाच्या दारूण अवस्थेची जाणीव करून देत होते. यात गोपाळबाबा वलंगकर, पंडित कोंडिराम व किसन फागो बनसोड ही लेखन करणारी मंडळी होती. 'जनता' या नियतकालीकातून दलित मन, दलित साहित्य दलितांच्या असहाय्यतेचे आणि जीवनाचे भेदक दर्शन घडविणाऱ्या कथा, स्फूटकथा, वैचारिक लेख, लघुनिबंध इ. प्रकारचे लेखन प्रसिध्द झाले. दलित समस्या व दलितांचे प्रश्न यांची चिकित्सा करणाऱ्या कथा व कविताही 'दलित सेवक' या वृत्तपत्रातून प्रसिध्द झाल्या. १९४०-४५ च्या अगोदरही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार व प्रेरणेतून दलितांची जाणीव व्यक्त करणारे लेख, कथा, कविता, लघुनिबंध या स्वरूपाचे लेखन होत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबईत १९४६ मध्ये 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना करून 'सिध्दार्थ कॉलेज' सुरू केले. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलित मुक्ती लढयाची चळवळ आकाराला येत होती. १९५० साली 'सिध्दार्थ साहित्य संघ' ही सुशिक्षितांची वाङ्मयीन संस्था उदयास आली. नंतर १६ जुलै १९५३ पासून महाराष्ट्र दलित साहित्य संघ नावाच्या संस्थेची स्थापना झाली. १२ सप्टेंबर १९५३ ला 'जनता' साप्ताहिकात 'दलित साहित्याचे समालोचन' हा आ.श्री. रणपिसे यांचा लेख प्रकाशित झाला. 'जयभिम' साप्ताहिकात 'दलित साहित्याची अनास्था' हा लेख २८ फेब्रुवारी १९५५ ला प्रकाशित झाला. तसेच 'प्रबुध्द भारत' च्या १ मार्च १९५८ च्या अंकात 'मराठी रंगभूमीवरील दलित वर्गीयांचा वारसा ', 'दलित समाज आणि मराठी कादंबरी', 'दलितांचे काव्यवाङ्मय', 'दलितांची शाहिरी', 'बौध्द वाङ्मय', 'दलितांचे वर्तमानपत्रे' इत्यादी लेख प्रकाशित झाले. धम्मचक्र प्रवर्तनानंतर 'महाराष्ट्र दलित साहित्य संघ' ही संस्था १२ मार्च १९६१ पासून 'महाराष्ट्र बौध्द साहित्य परिषद' म्हणून उदयाला आली. २ मार्च १९५८ साली मुंबईत ठरविण्यात आलेल्या 'महाराष्ट्र दलित साहित्य संघा' च्या संमेलनाच्या विशेषांकाचे कार्यकारी संपादक दा.ता. रूपवते यांनी संपादकीयात म्हटले होते.'' या विभिन्न समाजव्यवस्थे विरूध्द दलित समाजाने सातत्याने बंड उभारले पाहिजे. या बंडाचा इतिहास म्हणजे दलित साहित्य होय ''.

१९६० नंतर मराठी वाङ्मयात अनेक नवीन प्रवाह सुरू झाले होते. मराठी साहित्याच्या तत्कालीन स्वरूपाबद्दल असमाधानी असलेल्या तरूण लेखकांनी 'अनियतकालिकांची' (लिटल मॅगझीन) चळवळ प्रस्थापितांविरूध्द बंडाचा झेंडा घेवून उभी केली. अनियतकालिकांची चळवळ व दलित साहित्याची चळवळ या दोन्ही चळवळी प्रस्थवितांविरूध्द लढत होत्या. कालांतराने 'अनियतकालिकांची चळवळ' व्यक्तीवादी व व्यक्तिकेंद्रित झाली परंतु दलित साहित्य चळवळ' विषमताधिष्ठित समाजरचना व जातियतेवियध्द, हिंदू धर्मकांडाविरूध्द लढत राहिली. दलित चळवळीची व्यक्ती ही कधीच शत्रू बनली नाही. उलट इथल्या व्यवस्थेविरूध्द या साहित्य चळवळीचा लढा होता आणि तिला इथली व्यवस्था बदलून 'स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता', या तत्वावर समाज व्यवस्थेची पुनर्रचना करीत होती. त्यामुळे ती व्यक्तीगत स्वरूपाची न राहता तिला सामाजिकतेचे अधिष्ठान प्राप्त झाले व सामूहिकतेच्या जाणीवेतून तिची वाटचाल सुरूच आहे.

'दलित साहित्या' ची निर्मिती ही ग्रामीण साहित्याच्या उदयानंतर म्हणजे १९६० च्या आसपास झाली. 'अस्पृश्य म्हणून जन्माला आलेल्यांना दलित म्हणावे' असा विचार सुरवातीला रूजला. 'दलित साहित्य' म्हणून त्यांच्या प्रेरणांचा

स्वतंत्र विचार व्हायला लागला. यात दलितांविषयी. पिळल्या जाणाऱ्यांविषयी अन्यायाविरूध्द आपल्या लेखणीद्वारे वाचा फोडली. दलित साहित्यांचे बीज किंवा उगमस्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि त्यांची जीवनदृष्टी त्या अनुषंगाने त्यांनी केलेल्या चळवळी, नवे विचार आणि विज्ञानयुग यात आहे. त्यांची दलितांत आत्मतेज निर्माण करण्याची धडपड सनातनी प्रवृत्ती विरूध्द बंड करण्याची बेडर वृत्ती आणि दलितांची दुःखे वेशीवर टांगण्यासाठी व त्यांची अस्मिता जागृत करण्यासाठी वैचारिक स्वरूपाचे लेखन केले. सामाजिक क्रांती करू पाहणाऱ्या बाबासाहेबांकडे दलित साहित्याचे जनकत्व जाते हाच दलित साहित्याचा लक्षणिय विशेष आहे. हया विशेषातून दलित साहित्याच्या वैचारिकतेचे अनेक पैलू स्पष्ट होतात. सामाजिकता आणि विषमतेविरूध्द बंड उभारून एका नव्या विश्वाची निर्मिती करणे हे दलित साहित्याचे मुख्य वैशिष्टये आहे. या अनुषंगाने नकार, विद्रोह आणि विज्ञान निष्ठा हे दलित साहित्याची तत्वत्रयी ठरली आहे. बाबासाहेबांनी दलित समाजाची शिक्षणापासून वंचना, जीवनावश्यक गोष्टीचा अभाव, ज्ञानाचा अभाव अशा अभावपूर्ण जीवन जगणाऱ्या माणसांना हाक दिली आणि त्यांच्यातला माणूस जागा केला. मराठी वाचकाला आजपर्यंत अनभिज्ञ असलेले विश्व व अनुभव यांचे चित्रण विशेषतः दलित जीवनविषयक जाणिवेतून दलित जीवनाचे चित्रण करणाऱ्या प्रवाहाला दलित साहित्य म्हणून मान्यता मिळालेली आहे. अस्पृश्यता जन्माने लादली असल्यामुळे या वर्गातील लोकांच्या नशिबी दारिद्रय दुःख अवहेलना जन्मल्यापासून अटळ असल्यामुळे ज्या समाजव्यवस्थेने ही अस्पृश्यता निर्माण केली. त्या व्यवस्थेला नकार देणे, तिच्या विरूध्दाचा प्रक्षोभ प्रगट करणे ही दलित साहित्याच्या निर्मितीमागील सामाजिक स्वरूपाची प्रेरणा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे सामाजिक कार्य केले ते भूतदयावादी मानवतेच्या, दलितोध्दाराच्या भावनेतून केले नसून शुध्द बुध्दिवादी दृष्टीतून मानवी विचारांना आव्हान व आवाहन देवून केले आहे. माणसाला असणाऱ्या त्याच्या जन्मसिध्द हक्काच्या जाणिवेतून न्यायाच्या भूमिकेतून केले. अस्पृश्य दलितांमध्ये आत्मप्रतिष्ठा व स्वत्वाचे भान, अस्मिता आणि हक्काची जाणीव निर्माण केली. पिठयानूपिठया पासून चालत आलेल्या दलित बांधवांच्या कधीही न संपणाऱ्या हालअपेष्टा पाहून बाबासाहेब आंबेडकरांचे हृदय आईसारखे द्रवले. त्यांच्या आगंतिक अवस्थेची तीव्र जाणीव होवून बाबासाहेबांनी हिंदूधर्म-संस्कृतीशी, तिच्या प्रतिगामी सनातनतेशी व पाखंड पोथिनिष्ठ कर्मठवृत्तीशी वैर पत्करले आणि सामाजिक व राजकीय पातळीवरून दलित मुक्तीच्या संघर्षलढयाला प्राणपणाने सुरूवात केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, ''अस्पृश्यता हा आमच्या नरदेहावरील कलंक आहे आणि तो आमच्या आम्हीच धुवून काढला पाहिजे ...... . त्यासाठी आपल्याला संघर्ष करावा लागेल. अस्पृश्यता हा जातीभेदाचा आविष्कार असून जातिभेद, वर्णाश्रम, धर्मांची अत्यंत विकृत परिणती वा फलश्रृती आहे. जोपर्यंत जाती आहेत तोपर्यंत अस्पृश्यता ही राहणारच म्हणून अस्पृश्यता नष्ट करणे हे राष्ट्रकार्य आहे.'' त्यामुळे अस्पृश्यतेच्या आर्थिक, सामाजिक विषमतेच्या पिळवणूकीच्या चक्रातून पिळून निघालेली दलित जनता शतकांच्या आर्त जखमा विसरून आपल्या दुःखहर्त्या, मुक्तिदात्या नेत्याच्या आवाजाच्या दिशेने वेगाने झेपावली. खांदयाला खांदा देवून हक्कासाठी लढली. बाबासाहेबांनी अस्पृश्य समाजाची अस्मिता, स्वाभिमान, महत्वाकांक्षा जागृत केली. सामाजिक-शैक्षणिक जागृती घडवून परिवर्तनासाठी समाजमन तयार केले व संघर्षशील बनविले.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर १९५६ मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूरच्या दीक्षा भूमीवर बौध्द धर्माचा स्वीकार करून बहूजनांच्या खऱ्या धर्माची पुनर्स्थापना केली आणि प्रज्ञा, शील, करूणा, समता- स्वातंत्र्य- बंधुतेची सूत्रे देशाला दिली. समाजमुक्तीसाठी तथागत गौतम बुध्दाने 'अत्त दीप भव' म्हणजे 'स्वयंप्रकाशित बना' हा मंत्र दिला. त्याआधारे दलितांना- सर्वांना काळास अनुसरून 'शिका !संघर्ष करा ! आणि संघटित रहा !' हाच संपूर्ण मानव मुक्तीचा संदेश होय ! बुध्दं सरणं गच्छामि!' हा अन्वयार्थ यातच सामावलेला आहे.

संदर्भ ग्रंथ

१. दलित साहित्य - उद्‌गम आणि विकास - डॉ.योगेन्द्र मेश्राम
२. दलित कथा साहित्य - डॉ.प्रकाश पी. कुंभार
३. ग्रामीण-दलित साहित्यःचळवळ आणि समीक्षा - डॉ.मधुकर मोकाशी
४. दलित साहित्य वेदना आणि विद्रोह - भालचंद्र फडके

ISSN : 2278-9308
July 2021

# ''भारतीय राजकारणावर जाती धर्माचा प्रभाव''

डॉ. किशोर बी. कुडे
सहा. अधिव्याख्याता,फुले—आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली
मो.नं. : ९३७०३२२३१८ई—मेल : gojirikude@gmail.com

**सारांश**

आज भारतीय लोकशाहीमध्ये जाती धर्मांचा प्रभाव हा विषया अंतर्गत ''जाती—धर्माचा प्रभाव तसेच राजकारणामध्ये सहभागाचा अभ्यास आजतागायत राजकारणाविषयी समाजसुधारक व राजकीय तत्वज्ञान त्याचे मत ह्या विषयक अभ्यास या प्रकारचे उद्देश संशोधनामध्ये मांडण्यात आले.

राजकारणावर जातीधर्माचा प्रभाव दिसुन येतो. राजकारणामध्ये येण्याकरीता उच्च शिक्षीत लोकांची उदासीनता दिसुन येतात. तसेच राजकीय तत्वज्ञान, नितीमुल्य अवलोकन केल्या जात नाही याप्रकारे उपकल्पना मांडण्यात आल्या.

भारतीय राजकारणात धर्म जात यांचा आधार घेऊन राजकारण जय पराजय वर प्रभाव पडत असतो. प्रत्येक पक्षामध्ये यांचे प्राबल्य दिसुन येतात. काही पक्ष किंवा राजकारणी सुक्षित तरुणांना परंपरागत, राजेशाही सारखे राजकारणात सत्ता हस्तांतरण करीत आहे.

**प्रस्तावना**

**महात्मा गांधीजींचे राजकीय विचार**

'धर्म' हे महात्मा गांधींच्या राजकीय जीवनाचे जीवनवाहक होते. धर्म—धोरणावर राजकारण करणे याचा अर्थ गांधींना असा अधिकार नव्हता की, सत्ता धार्मिक अधिकाऱ्यांकडे सोपवावी किंवा एखाद्या राज्यास विशिष्ट धर्माचा उपदेशक बनवावे. सत्य, अहिंसा, प्रेम, सेवा इत्यादी धर्माच्या सार्वभौम नियमांचे राज्याने पालन केले पाहिजे, असा बापूंचा विश्वास होता. म्हणून राजकारण धर्मविरहित राहणे ही राज्याची आवश्यक दुष्कर्म आहे. त्यांच्या स्वतः च्या शब्दांत, ''जर मी राजकारणात भाग घेताना दिसत असेल तर एकच कारण म्हणजे सध्याचे राजकारण आपल्याला सापासारखे गुंडाळत आहे. मला सापाशी लढायचे आहे म्हणून मला राजकारणात धर्म आणायचा आहे.'' गांधींनी धर्माच्या रंगात रंगवून नैतिकतेवर आधारीत राजकारणाचा प्रयत्न केला. त्यांनी अलिप्तता, विघटन, बंडखोरी, कपट, नफा, विश्वासघात, फसवणूक इत्यादीसारख्या घाणेरड्या प्रवृत्तीचे निर्मूलन आणि राजकारणातील प्रेम, सहकार, यावर जोर दिला. अहिंसा आणि संबंध यासारख्या घटकांच्या वापरावर त्यांनी जास्तीत जास्त प्रकाश टाकला.

राजकारण या शब्दाला अत्यंत वाईट अर्थ प्राप्त झाला आहे. वास्तवात संघर्ष संपला. कायदे करणे, त्या कायद्याची अंमलबजावणी करणे. या दोन्ही प्रक्रियांवर योग्य नियंत्रण राजकारण म्हणजे, 'समाजाला सुनियंत्रित शांत व सामान्य जीवन जगण्यासाठी हवे ते राखून कायद्याच्या चौकटीत न्याय देणे.' या सर्व प्रक्रियेत जो व्यवहार चालतो त्यात सामान्य माणूस व शासनसत्ता यांच्यात दुवा म्हणून वावरणाऱ्या व्यक्तीची कृती उत्ती असते. म्हणून राजकारणात येणारी व्यक्ती बुद्धिमान विवेकी व न्यायबुद्धी असलेली असावी लागते. या व्यक्तीला सुसंस्कृत असे चरित्र आणि चारित्र्य असावे लागते.तसेच सर्व जाती, धर्म, पंथांचा क्षेत्राचा सहभाग असावा. न्याय, समता, बंधुत्व असावे.

**नेत्याचे नेतृत्वाचे गुण व नैतीकता**

कोणत्याही राजकीय पक्षाच्या बळकटीला तीन गोष्टी लागतात. पहिली गोष्ट पक्षाचा नेता एवढा मोठा असावा की तो कोणत्याही प्रतिपक्षांच्या नेत्यांशी समतुल्य ठरावा. दुसरी गोष्ट म्हणजे शिस्तबद्ध संघटना. तिसरी गोष्ट म्हणजे स्पष्टअसा कार्यक्रम. तसेच सर्व धर्म समभाव ही भावना असावी.

**लोकशाहीचे विकेंद्रीकरण**

भारतातील लोकशाही येथील ग्रामपंचायतीवर आधारली तर ती प्रगत होऊ शकणार नाही. ग्रामसंस्थांनी हा समाज जगविला आहे हे खरे आहे. परंतु त्यांनी आम्हाला कशाप्रकारे जगविले याचा विचार कोणीच करीत नाही. आम्ही जगत होतो, पण आमचे जगणे मृतवत होते. हा समाज या प्रदीर्घ काळात अगदी स्थितीशील राहिला. त्याची गतिशीलताच नष्ट झाली. आपल्या समाजाला ही कर्तृत्वशून्य अवस्था आली. त्याचे एक प्रमुख कारण आमची ग्रामसंस्था. आमची खेडी आर्थिक, सामाजिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होती. एका खेड्याचा दुसऱ्या खेड्याशी संबंध नव्हता. त्यामुळे विचारांची देवाणघेवाण करण्याचे मार्ग तर बंदच राहिले. आमच्या जातीभेदाचा खरा बालेकिल्ला कोणता असेल तर तो म्हणजे आमची ही मध्ययुगीन ग्रामराज्येच होत.

**जातीवादातुन बाहेर निघने**

गांधीवादात नवीन असं काही नाही. गांधीवाद हा रूसो, रस्किन,समाजाच्या जातिजमातीत, गटागटात, वर्गावर्गात जो दुरावा आहे. तो लोकशाहीच्या यशाला मारक ठरेल. कारण लोकशाहीत प्रत्येकाला—मग तो पीडित असो वा हक्क भोगणाऱ्या वर्गातील असो— मतदानाचा हक्क आहे. जे सत्ता, 'सवलती व हक्क भोगतात ते जर वंचित दलित समाजाला देशाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घ्यावयास तयार नसतील तर या दोन 'आहेरे' व 'नाहिरे' वर्गातील तणाव वाढतच जाईल व लोकशाही उध्वस्त होईल.

धर्मात भक्तिमार्ग हा मुक्तिमार्ग बनू शकतो. परंतु राजकारणात भक्तिमार्ग हा अपाताचा व पर्यायाने हकूमशाहीचा खात्रीदायक मार्ग होतो.

आम्हास राज्यपद्धती अशी पाहिजे की, ज्यात मतदानाचाच नव्हे तर माझ्या समाजाचे प्रतिनिधी विधिमंडळात पाठविण्याचा अधिकार असा पाहिजे. माझ्या प्रतिनिधींना त्याठिकाणी होणाऱ्या चर्चेतच नव्हे तर निर्णय करण्याच्या कार्यातसुद्धा अधिकार असला पाहिजे.

संयुक्त राज्यघटनेप्रमाणे हिंदुस्थानातील प्रत्येक राज्याला स्वायत्तता मिळणार! अशा प्रकारे या देशात राज्यांना स्वायत्तता दिली तर अप्रगत देशभर एकाच पातळीवर होणार नाही. अशी प्रगती व्हावी असे वाटत असेल तर मध्यवती सरकार ठरवील तेच एक धोरण सर्व राज्यांनी प्रमाण मानले पाहिजे. या दृष्टीने मी संयुक्त राज्यघटनेपेक्षा एकतंत्री राज्यघटना पसंत केली पाहिजे.

**द्वीपक्षीय पध्दतीचे महत्व**

एकपक्षीय पद्धती ही लोकराज्याला मारक आहे खरोखर एकपक्षीय लोकशाही म्हणजे लोकशाहीचा अस्तच होय. राज्ययंत्रणा चालविण्यासाठी पक्षांची गरज आहे. परंतु सरकारला जुलमी राजवटीपासून दूर ठेवण्यासाठी दोन पक्षाची आवश्यकता आहे. राज्यात दोन पक्ष असले तरच लोकशाही सरकार लोकशाही तत्वानुसार चालेल. हे दोन पक्ष म्हणजे सत्तारूढ पक्ष आणि विरोधी पक्ष

आज या देशात जी राजकीय परिस्थिती निर्माण झाली आहे तिजमुळे कोणस या एकाच पक्षास मुजरा करण्याची सवय लोकांना आहे. देशात लोकशाही आहे. परंतु या लोकशाहीने आपली बुद्धि चालविण्याचे स्थगित केले आहे. तिने आपले हातपाय एकाच पक्षाशी जखडून ठेवले आहेत. माझ्या गते हे मोठे दुखणे आहे. तो एक रोग आहे. मोठी दुर्दैवाची गोष्ट अशी की, हिंदी लोक परंपरेने बुद्धिवादी नसून अतिरिक्त श्रद्धाळू वृत्तीचे आहेत.हिंदी लोकांनी राजकीय प्रश्नावर आपली सर्व शक्ती केंद्रित करावी नि चुकीची गोष्ट आहे.

बहुमतामुळे राज्यकर्ता पक्ष भ्रष्ट बनतो. अनिर्बंध बहुमताने तो पूर्णपणे ब्रिटीश संसदेतील बहुसंख्या ही राजकीय बहुसंख्याच असते. परंतु भारतातील बहुसंख्या मात्र जातीय बहुसंख्या असते. ती राजकीय बहुसंख्या असत नाही. त्यामुळे भारतातील जातीय बहुसंख्या आपल्या मनाप्रमाणे राज्य करण्यास स्वतंत्र होईल आणि ती अल्पसंख्य जातीवर आपल्या मर्जीप्रमाणे राज्य करील. दुसऱ्या राष्ट्राचे प्रश्न सोडविणे व आपले स्वत:चे प्रश्न न सोडविणे हेच भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचे मुख्य सूत्र आहे.

**लोकशाहीचे तत्व**

लोकशाही म्हणजे प्रजासत्ताक किंवा संसदीय सरकार नव्हे. लोकशाही म्हणजे सहजीवनाने राहण्याची एक पद्धती होय.राज्यघटना कितीही चांगली वा वाईट असली तरी शेवटी ती चांगली

की वाईट ठरणे हे जे राज्यकर्ते तिचा वापर करतील त्यांच्यावर अवलंबून राहील. आपले सामाजिक आणि आर्थिक हेतु साध्य करताना घटनात्मक साधनांचाच मार्ग स्वीकारला पाहिजे. घटनाबाह्य मार्ग म्हणजे केवळ अराजकाचे व्याकरण होय. जनतेने आपल्या पक्षाचे मत राष्ट्रहिताच्यापेक्षा श्रेष्ठ मानले तर भारतीयांचे स्वातंत्र्य दुसऱ्यांदा धोक्यात येईल.

भारताने एकदा नाही अनेकदा आपले स्वातंर्त्य गमावले आहे ते आपल्याच ते लोकांनी विश्वासघात व दगा केल्यामुळे या इतिहासाची पुनरावृत्ती होईल काय? आम्हाला जुन्या बरोबरच आता निरनिराळ्या जातींच्या गटांच्या व परस्पर विरोधी असंख्य राजकीय पक्षांना तोंड द्यावयाचे आहे. देशाचे हित सर्वाआधी, व्यानंतर आपले जे काही असतील ते मतभेद, अशी भावना ठेवून आपण सर्वांनी आपले स्वातंत्र्याचं रक्षण करण्यासाठी दलितबंध घटनेत जी तरतूद केलेली आहे ती माझ्यामते सर्वस्वी अपुरी आहे.सांसदीय लोकशाहीने तीव्र खतपाणी घालून पल्लवित केले, परंतु समतेला मात्र तिने हजारो मैल दूर एखाद्या रखरखीत वाळवंटात तडफडत ठेवले. समतेचे महत्त्व ओळखण्यात सांसदीय लोकशाहीस अपयश आलेच. पण स्वातंत्र्य व समता यात समतेचा बळी घेतला आणि जगाच्या पाठीवर आपल्या विषमतारूपी हिडीस प्रजेला मोकळे रान करून दिले.

**परसंस्कृतीग्रहण ही भारतीय समाजात एक मोठी समस्या**

सृष्टीच्या निर्मितीपासूनच मनुष्य हा दुसऱ्या मनुष्याचे वा एक समूह दुसऱ्या समूहाचे काही तरी ग्रहण करीत असतो. शिकत असतो. सामान्य अर्थानुसार व्यक्ती वा समूह कुठल्याही वैशिष्ट्यंचा स्वीकार करतात आणि आपल्या जीवनात त्यां स्विकारतात. वाला परसंस्कृतीग्रहण असे म्हणतात.

जेव्हा समाजशास्त्राच्या दृष्टीने आपण पाहतो तर परसंस्कृतीग्रहण म्हणजे ''एका समूहाद्वारे दुसऱ्या समूहाची संस्कृती ग्रहण करणे होय.''परसंस्कृतीकरणाचा भारतीयांच्या संदर्भात अध्ययन केले गेले तेव्हा संस्कृती परिवर्तनाच्या रूपात संस्कृती विकास, संस्कृती विघटनाच्या रूपात सर्वात जास्त प्रभाव लोकांच्या संस्कृतीवर पडलेला आहे.

(१) एकदम आदिवासी अवस्थेत राहणारे लोक जे सभ्यतेपासून अतिशय दूर राहतात.

(२) असे लोक जे प्राचीन परंपरेला चिकटून आहेत. मात्र सभ्य समाजाचा प्रभाव त्यांच्यावरही पडतो.

(३) असे लोक ज्यांची प्राचीन संस्कृती, धर्म, सभ्यता इ. सभ्य समाजाजवळ आल्याने लुप्त झाल्या. ह्यांची संख्या अधिक

(४) असे लोक जे सभ्य समाज आल्यावर आपली सभ्यता आणि संस्कृती वाचवू पाहत आहेत. उदा. भिल्ल, नागा.. डॉ. एन. मजूमदार यांनी एल्विन यांचे वर्गीकरण चुकीचे मानून सांस्कृतिक विकासाच्या आधारे तीन वर्गात आपले वर्गीकरण केले आहे.

(५) हिंदू प्रभावारहित आदिम लोक ज्यांच्या संस्कृतीवर अजून आक्रमण झालेले नाही.

(६) असे लोक ज्यांनी हिंदू व्यवहारांना स्विकारून समता दर्शविली आहे. या जातींनी काही सांस्कृतिक उच्चता प्राप्त केली आहे. मात्र या लोकांना अजूनही बहिर्गत जातीचा दर्जा मिळालेला नाही.

(७) असे लोक ज्यांनी परसंस्कृतीग्रहण केले व ज्यांनी हिंदुत्व ग्रहण करून वा ख्रिश्चन धर्म ग्रहण केला असून त्या संस्कृतीपर्यंत, त्या स्तरावर ते पोहचले, जिथे हिंदु झाल्यामुळे शह, अस्पृश्य व्हावे लागले व ख्रिश्चन झाल्यामुळे आपल्या धर्माला लांच्छन लावले

**देशातील राजकीय वातावरण व जनता**

स्वातंत्र्योत्तर भारतातील राजकीय वातावरण विविध विचारसरणीने भरलेले आहे. हिन्दुत्ववादी, ब्राह्मणवादी, गांधीवादी, मार्क्सवादी, आंबेडकरवादी इत्यादी विचारधारांनी प्रेरित झालेले आहे. प्रामुख्याने दोन मुख्य विचारधारांनीच राजकीय जीवन प्रभावित आहे. एक हिन्दुत्ववादी ब्राह्मणवादी व दुसरी साधारणपणे सांप्रदायिक ब्राह्मणवादाला विरोध करणारी मार्क्सवादी, गांधीवादी विचाराधारा, या दोनपेक्षा तिसरा प्रवाह आंबेडकरवादी विचारधारेचा आहे.

सांप्रदायिक राजकीय शक्तीपासून समाज—देशाचे कसे नुकसान आहे हे सांगितले पाहिजे. त्यामुळे पक्ष लोकांपर्यंत जाईल आणि खरा मार्ग लोकांनाही लागेल. त्याकरिता कार्यक्षेत्र कसे वाढेल, याचा विचार झाला पाहिजे.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

**अस्पृश्यता निर्मूलन**

भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे. या देशात सर्व धर्मांचे लोक वास्तव्य करतात. भारताला खंडही म्हणतात पण त्याची अंतर्गत महानता खूपच कमकुवत दिसते. जर आपण या ऐक्य आणि विचित्रतेचे विश्लेषण केले तर हे कळेल की किती दयनीय परिस्थिती जपल्या आहेत आणि त्या दयनीय परिस्थिती जपल्या गेल्या आहेत आणि तरीही महान आहेत. या देशात केवळ बळकट परंतु असंख्य अशक्त असहाय लोक राहतात. जे सामर्थ्यवान किंवा सामर्थ्यवान असतात त्यांना सरळ डोळ्यांनीसुद्धा दिसत नाही, त्यांना अपमान आणि तिरस्कार दिसलाच पाहिजे, जे प्राचीन काळापासून आजपर्यंत फारसे बदल झाले नाही. आजचे लोक काही लोकांना अस्पृश्य किंवा गलिच्छ मानतात. या लोकांच्या अद्वितीय आणि अथक परिश्रमानंतर सामान्य लोक श्रीमंत किंवा बलवान होताच ते त्यांच्याकडे पडलेल्या डोळ्यांकडे पहात आहेत आणि त्यांना त्यांच्या समकक्षतेची जागा देखील देत नाहीत. या लोकांना अस्पृश्य म्हणतात पण त्यांना असे म्हणायला न्याय्य आहे काय? हे अंतर वाजवी आहे, कधीही नाही. ही विडंबना पूर्णपणे असत्य आणि निराधार आहे कारण अस्पृश्य असे म्हणतात की जे घडले किंवा स्पर्शही करू शकत नाही.

**विवेकानंदांचे सामाजिक—राजकिय विचार**

‘‘ज्या काळात ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचे वर्चस्व होते त्या वेळी शिक्षण आणि सांस्कृतिक प्रगती यांचे केंद्रीकरण झाले होते. त्याचप्रमाणे वैश्यांचे वर्चस्व म्हणजे संपत्तीचा संचय. वैश्यांचे सामर्थ्य आहे ते नाणे कबजात घेण्यामध्ये ज्या नाण्याच्या खणखणाटाने चारही जातींच्या (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र— विनय रॉय) लोकांच्या मनावर विलक्षण भुरळ पडते. वैश्याला नेहमी भीती वाटते की कदाचित आपल्याकडे असणारी ही एकमेव वस्तू ब्राह्मण फसवून आपल्याकडून हिरावून घेईल आणि कदाचित क्षत्रिय आपल्या श्रेष्ठ शस्त्रसामर्थ्याने ती गडप करेल. स्वसंरक्षणासाठी वैश्यांचे एक वर्ग म्हणून एकमत असते. वैश्याची पैशावर हुकमत असतेय इतरांना त्याचा वापर करायचा असेल तर जणू काही स्वत:च्या हातात चाबूक असल्याप्रमाणे तो त्यांच्याकडून अफाट व्याज वसूल करतो, इतरांच्या मनात दहशत निर्माण करण्याचे त्याचे ते प्रभावी शस्त्र असते. पैशाच्या जोरावर राज्यसत्तेला नेहमी दाबात ठेवण्यात तो व्यग्र असतो. स्वत: कडे जो संपत्तीचा ओघ येत असतो त्यात राज्यसत्तेचा कुठेही अडथळा येऊ नये म्हणून व्यापारी नेहमी डोळ्यांत तेल घालून असतो. पण हे सगळे असले तरी शासनकर्त्या वर्गाकडून सत्ता शूद्रवर्गाकडे जावी असे त्याला कधीही काडीमात्र वाटत नाही.

**राजकारणाच्या दोऱ्या विद्येशिवाय हाती येणार नाहीत**

शिक्षण व विद्या या गोष्टीशिवाय आपला उद्धार होणार नाही. मी माझ्या आयुष्यात अनेक कार्ये अंगिकारिली. राजकारणात माझा विशेष महत्त्वाचा काळ गेला. सध्या राजकारणाच्या दोऱ्या उच्चवर्णियांच्या हातात आहेत. त्या दोऱ्या तशाच हाती ठेवण्यासाठी उच्चवर्णियांची धडपड चाललेली आहे. उच्च प्रतीच्या महत्वाच्या जागा पटकाविण्यासाठी जी विद्या पाहिजे. ती अजून उच्चवर्णियांखेरीज इतरांना प्राप्त झालेली नाही. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी तीच.....' असे काही म्हटले जाते. त्याचप्रमाणे राजकारणाच्या दोऱ्या विद्येशिवाय आपल्या हाती येणार नाहीत. राजकीय सत्ता हाती यावी म्हणून अनेकांनी प्रयत्न चालविलेले आहेत पण त्यांना यश येत नाही. ह्या तफावतीचे अधिष्ठान हेच आहे. इंजिनियर, कलेक्टर वगैरे जागा फक्त उच्चवर्णियांनाच शिक्षणामुळे मिळतात.

**राष्ट्र कायदा औद्योगिक विश्लेषण**

जातीसाठी इंग्रजी कास्ट (जात) शब्द वापरणे आहे. हा पुर्तगाली भाषेचा कॅस्टा (सीमा) शब्द बनवणे, त्याचा अर्थ (जाती) नस्ल किंवा वर्ग (प्रकार) आहे. राष्ट्र शब्दाच्या उत्पत्तीचा पत्ता सन् १६६५ मध्ये ग्रेसिया—डी ओरेटा नाम विद्वान ने आपूर्ति. त्यानंतर फ्रान्सचा अब्बे दुब्बॉय ने प्रोटोटी संदर्भ घेतला. एक वेगळ्या प्रमाणानुसार देशाच्या शब्दांची उत्पत्ती लॅटिन शब्द कॅस्टसपासून मानी जाती आहे. लॅटिन शब्द कॅस्टसचा अर्थ वायूपेटी (शुद्धता) किंवा 'आनुवंशिकता' के निकट आहे. इतर एक प्रमाणानुसार जन्मजात जन्म (जन्म) शब्द देखील मानी गेले आहेत.

देशातील संबंधित अध्ययनात भारताच्या राष्ट्र कायद्याचे प्रमुख आधार आहेत. हे केवळ भारतीय लोकसंख्येत नसले तरी ही भारत सरकारची एक विशिष्ट आणि संपूर्ण स्वरूपाची (अत्यंत

स्वरुपाची) दृश्य आहे आणि ज्यायोगे एखाद्या विचाराधीन संपूर्ण हिंदु समाज आहे. प्रवत्नी केली, त्याप्रमाणे इतर ठिकाणी जात नव्हती. म्हणून भारतीय लोकसंख्या सांस्कृतिक दृष्टीकोनातून आणि अनूठी प्रशासन आहे. डेव्हिस मान्नाचे म्हणणे आहे की, ''राष्ट्र कायद्यानुसार जगातील सर्व ठिकाणी कृष्ण आणि सर्व धर्मांमुळे जवळजवळ प्रत्येक व्यक्तीचा त्रास होतो.'' जनगणना नुसार भारतीय मुसलमान मध्ये ९४ जात लोकांची संख्यादेखील झाली. अशा प्रकारच्या युरोपमधील अल्पसंख्याक आकडेवारीचे गट (अल्पसंख्यांक) जातीचे शब्द संबोधित केले जातात. यूरोपियन जिप्सिअन आणि न्यायाधीशांचे खालील लोकसभेचे सदस्य मानले जातात आणि त्यानुसार सामाजिक विषय (सामाजिक अंतर) तयार ठेवतात. अमेरिकेच्या प्रजातीच्या आधारावर निग्रो व्यक्तींचा खालील लोकांचा उल्लेख केला जातो आणि जन्मापासूनच ती एक अमेरिकन मुलाची होती, जी त्याला सहनशील ठेवते. ईसाईसर्स मधील धर्माच्या आधारावर कॅथोलिक आणि प्रोफेस्टेंट दोन प्रमुख वर्ग, सामान्य लोक समान प्रकारचे अनेक प्रकारचे नियंत्रण आणि सामाजिक लैंगिक वैशिष्ट्यंचे वैशिष्ट्र आहेत. या प्रकारच्या सामान्यत: आम्ही म्हणू शकतो की या कायद्यात काही गट जन्माच्या आधारावर असतात आणि इतर उच्च स्तरीय मानले जातात, त्या कायद्यानुसार आम्ही नागरिक आहोत.

**निष्कर्ष :**

१.१.भारतीय राजकारणामध्ये जाती धर्म भेदभाव दिसुन येतो.
२.२.सुशिक्षीताचा कल राजकारणामध्ये कल दिसुन येत नाही.
३.३.राजकारणामध्ये नैतीकतेचा ऱ्हास होत आहे.
४.४.भारतीय राजकारणामध्ये चांगल्या बाबीसोबत तडजोड करतांना दिसतात.
५.५.भारतीय राजकारणामध्ये जाती जाती मध्ये सुध्दा गट पडलेले दिसुन येतात.
६.६.समाजसुधारकाचे विचार मागे टाकलेले आहे.
७.७.राजकारणामध्ये जाती व पैशाचा प्रभाव दिसुन येतो.
८.८.वंश परंपरांगत राजकारण दिसुन येतात.

**सुचना :**

१. भारतीय राजकारणामध्ये सर्व जाती—धर्मातील जनतेचा सहभाग असणे आवश्यक आहे.
२.श्राजकारणामध्ये उच्च विद्या विभुषीत लोकांना सहभागी करुन घेणे आवश्यक आहे.
३.राजकारन्यानी भेदभाववदी राजकारण करु नये.
४.न्याय, समता, बंदुभाव व विकास या बाबीला प्राधान्य देणे आवश्यक आहे.
५.पुरोगामी विचार सरणींचा अनुकरण करणे गरजेचे आहे.
६.म्हान समाजसुधारक यांचे तत्वज्ञान अंमलात आणणे गरजेचे आहे.
७.सर्व मतांना प्राधान्य देणे गरजेचे आहे.
८.नैतीक मुल्यांचे जतन भारतीय राजकारणांमध्ये आकलन करणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**

१. डॉ. रंजन रवि, caste, politics and policy-making'', सुरेद्र पब्लिकेशन्स, नवी दिल्ली
२.सिंह सुनिल कुमार, ''जाति व्यवस्था : निरंतरता एवं परिवर्तन'', रावत पब्लिकेशन्स, जयपुर
३.सिंह. एन. के., ''भारत में दलित संघर्ष एवं सामाजिक न्याय'', प्रिज्म बुक्स, जयपुर
४.डॉ. प्रसाद उपेन्द्र, ''गांधीवादी समाजवाद'', नमन प्रकाशन, नई दिल्ली
५.प्रा. दिनेशचंद्र, ''महाराष्ट्राचे राजकारण'', श्री. वैभव प्रकाशन, नागपूर
६.वाघ विलास, ''रिपब्लिकन खासदारांकडून दलित जनतेच्या अपेक्षा'', भाग्यश्री मुद्रणालय, पुणे
७.डॉ. मिसाळ हनुमंत, ''महाराष्ट्रातील दलितांचे अंतरंग : मातंग समाजाचे समाजशास्त्रीय विश्लेषण'', जय गणेश ऑफसेट, पुणे
८.पाटलीपुत्र विजय, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तरुण विद्यार्थ्यांना मार्गदर्शन'', बुध्दिस्ट रिसर्च असोसिएशन फॉर सोशियो डेव्हलपमेंट, नागपूर
९.रॉय विनयकुमार, ''विवेकानंदांचे सामाजिक—राजकीय विचार'', लोकवाङ्मय गृह
१०. डॉ. आंबेडकर भिमराव रामजी, ''जातिभेद निर्मूलन'', राज प्रकाशन, यवतमाळ

ISSN : 2278-9308
July 2021

# "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीनिर्मुलन विषयक विचार"

**प्रा.डॉ. चंद्रकांत कांबळे**
वसुंधरा कॉलेज, सोलापूर
(८८८८८३८१९६),Kamblechandrakant49@gmail.com

डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे समाजशास्त्रीय योगदान निर्विवाद असून ते एक थोर समाजशास्त्रज्ञ होते.भारतीय समाजाच्या जडण घडणीसाठी बाबासाहेबांनी दिलेले योगदान अतुलनीय आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी भारतीय समाजाचा दोन दृष्टीकोनातून अभ्यास केला.त्यामध्ये पहिला दृष्टीकोन 'दलितवादी दृष्टीकोन' होय व समाजशास्त्रीय अध्ययनाचा दुसरा दृष्टीकोन म्हणजे 'सामाजिक मानवतावादी दृष्टीकोन' होता. पहिल्या दलितवादी दृष्टीकोनाचा अभ्यास आंबेडकरापूर्वी डेव्हिड हार्डीमेन या पाश्चमात्य विचारवंतानी भारतीय समाजाचा दलितवादी दृष्टीकोनातून अभ्यास केला होता पण आंबेडकरानी सखोल अभ्यास करुन सामाजिक मानवतावादी दृष्टीकोन समोर ठेवून स्वातंत्र्य,समता आणि बंधुत्व आणि सामाजिक न्याय यावर आंबेडकरांनी भर दिला. त्याशिवाय भारतीय समाजातील असमानता, अस्पृश्यता, जातीय व्यवस्था नष्ठ होऊ न दलिताना माणूस म्हणून जिवन जगण्याचा अधिकार प्राप्त होणार नाही, म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 'समाजशास्त्रज्ञ' रुपाने किंवा सामाजीक कार्यातून, भारतीय समाजातील ज्या-ज्या बाबीचा अभ्यास केला.

समाज हा केवळ मानवी जमावाचा नसून त्यामध्ये असलेल्या स्वास्थ्यपूर्ण मानवीय सामाजिक संबंधावर समाज आधारला आहे.सामाजिक संस्था स्वास्थ्यपूर्ण झाल्याशिवाय चांगल्या समाजाची उभारणी होवू शकत नाही. आणि यासाठी प्रत्येक समाजातील मानवाचे वैचारिक व मानसिक परिवर्तन घडून आले पाहिजे. जोपर्यंत सर्वांना समान संधी मिळत नाही तोपर्यंत खरे राष्ट्र निर्माण होवू शकत नाही असे ते म्हणत.डॉ.बाबासाहेबांच्या कल्पनेतील आदर्श समाज तो आहे ज्यामध्ये मानवी हक्काची जोपासना केली जाते तसेच स्वातंत्र्य समता व बंधूभाव या मुल्यांची जपणूक केली जाते तोच आदर्श समाज आहे असे बाबासाहेब म्हणतात.

भारतीय समाजव्यवस्थेचा पाया जातीव्यवस्था आहे आणि जातीव्यवस्थेचा पाया विषमता आहे.यामुळे भारतीय समाजाचे फार मोठे नुकसान झाले आहे. केवळ कनिष्ठ किंवा अस्पृश्य जातीत जन्म झाला आहे म्हणून त्याला सामाजिक, शैक्षणिक राजकीय अशा महत्वाच्या अधिकारापासून वंचित ठेवणे व त्यांच्यावर अन्यायकारक गुलामी व बंधने लादणे म्हणजे मानवतेला काळीमा पुसणारी अपमान जनक व निंदाजनक बाब आहे. या जातीव्यवस्थेमुळेच समाजात सवर्ण-असवर्ण दरी निर्माण झाली आहे. जोपर्यंत भारतातील जातीयता संपुष्टात येणार नाही तोपर्यंत खरी सामाजिक समता निर्माण होणार नाही यामताचे बाबासाहेब होते.जाती निर्मलनाच्या लढयासाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य वेचले आहे.मानवी हक्कासाठी त्यांनी प्रदीर्घ लढा देवून अस्पृश्याना गुलामीतून मुक्त केले आहे.

बाबासाहेबांचा जन्म हिंदू धर्मातील अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीत झाल्यामुळे त्यांना या जातिव्यवस्थेचे लहानपणापासून अनेक चटके बसले होते.त्यांना मिळालेले अनुभव अतिशय कडवट असल्यामुळेच त्यांनी जातिव्यवस्थेच्या विरोधात पेटून उठण्याचा निर्धार केला.सर्व मानव जात समान आहे.सर्वांनाच समानसंधी व समान अधिकार मिळाला पाहिजे."माणूस जन्मावरुन नाही तर गुणावरुन मोठा असतो."असा सिध्दांत त्यांनी मांडला.सामाजिक समता अस्पृश्यता नष्ट झाल्याशिवाय प्रस्थापित होवू शकणार नाही.बाबासाहेबांनी जातिव्यवस्थेच्या विरुध्द आपली सामाजिक-राजकीय चळवळ उभी केली.दलितामध्ये जागृती व प्रेरणा निर्माण करण्यासाठी त्यांना प्रवृत्त केले."हक्क भीक मागून मिळत नाही ते झगडूनच घ्यावे लागतात."असा त्यांनी दलितांना संदेश दिला.अगदी महाडच्या चवदार तळयाच्या सत्याग्रहापासून ते बौध्द धम्म स्वीकारण्यापर्यंतची बाबासाहेबांची भूमिका पाहिली तर त्यांनी मानवी हक्काची, समतेची व शांतीचीच कास धरली आहे हे स्पष्ट होते.

मानव म्हणून दलिताना सर्व अधिकार मिळावे त्यांना सन्मानाने जगता यावे व सामाजिक समता प्रस्थापित व्हावी हा हेतू होता आणि हे जातीनिर्मुलनाशिवाय शक्य नाही म्हणून बाबासाहेबानी जातिनिर्मुलनासाठी मोठी चळवळ उभी केली जातिनिर्मुलनाचे विचार मांडले त्यास आज पंच्याहत्तर वर्षे पुर्ण होतात. तरी सुध्दा हे विचार आपण अंगीकारले नाहीत ही शोकांतिका आहे, त्यांच्या विचाराची पुन्हा आठवण जागी करण्यासाठी हा लेख मी लिहिला आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे थोर सामाजिक विचारवंत होते.जाती निर्मुलनाच्या लढयासाठी त्यांनी आयुष्यवर लढा दिला आहे. हिंदू धर्मात प्रथमत: सुधारणा करण्याचा त्यांनी प्रयत्न केला परंतु हिंदूच्या मानसिकेत फारसा बदल होत नाही म्हणून त्यांनी बौध्द धर्माचा स्वीकार केला ज्यामध्ये कोणत्याच प्रकारची जातीयता किंवा असमता नाही बाबासाहेब म्हणतात की "बौध्द धर्मानेच जगाचा उध्दार होणार आहे तेव्हा जगानेच बौध्द धर्माचा स्वीकार करावा मग आपोआपच जातीव्यवस्था नष्ट होईल. बौध्द धर्माच्या आचरणामुळे सर्व जगच एकाच धाग्यात बांधले जाईल व सामाजिक समता येईल."

बाबासाहेब जातीनिर्मुलनासाठी अशा ठराविक बाबी मांडतात की ज्या जातीचे समुळच नष्ट करतील. समुहभोजन सामाजिक सांस्कृतिक अंतरजातीय विवाह यामुळे जातीची चौकटच संपुष्टात येईल. जातीचे निर्मुलन पूर्णपणे झाले तर पुन्हा या देशाला वैभव प्राप्त होईल.

- **ग्रंथ स्नेही**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणजे २० व्या शतकातील एक धगधगता क्रांतीकारक आवेश ! झपाटलेली शक्ती, अंधारातील दिपस्तंभ ! वंचित दलितांचा नायक,महानायक ! इतक्या आणि अनेक विशेषणांनी गौरविण्यात येणाऱ्या बाबासाहेबांचे कार्य ही तितकेच उत्तुंग, भव्य ठरले आहे.कारण डॉ.बाबासाहेबांनी एकाचवेळी विविध क्षेत्रांत उत्तुंग भरारी मारलेली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारताला आणि जगाला सुपरिचित आहेत ते मुख्यत्वे समाज क्रांतीकारक म्हणून त्यांचे राजकीय कर्तृत्व, त्यांची असामान्य बुध्दिमत्ता, गाढ व्यासंग हे त्यांच्या जीवनाचे अन्य पैलू ही दैदिप्यमान असल्यामुळे त्यांच्यावर अनेक जाणकारांनी प्रकाश टाकला आहे.

भारतीय परंपरेनुसार मानवाच्या जीवनामध्ये गुरु-शिष्य परंपरेला फार मोठे महत्व आहे.गुरु हा सच्चा मार्गदर्शक मानला जातो. म्हणूनच की काय डॉ.आंबेडकरांनी सुध्दा आपल्या जिवनामध्ये बुध्द, कबीर आणि ज्योतीबा फुले यांना गुरु मानले व यांच्या उच्च आदर्श विचारावर जीवन मार्गक्रम केले. तसेच स्नेही गुरु' या उक्तीप्रमाणे डॉ.बाबासाहेबांनी आपल्या जीवनामध्ये ग्रंथाना गुरु इतकेच किंबहुना त्याही पेक्षा जास्त महत्व देऊन 'हम मिट जायेंगे किताबों में ' या उक्तीप्रमाणे आपल्या जीवनामध्ये वाचन व लेखणाला महत्व दिलेले दिसून येते.

ते एक ठिकाणी ग्रंथासंबंधी म्हणतात, " माझ्या जीवनातील स्नेही सोबती मी तुम्हाला देत आहे.समाजाने बहिष्कृत केलेल्या माझ्यासारख्याला या थोर ग्रंथानीच जवळ केले.मला जगात त्यांच्या इतका परम स्नेही दुसरा कोणीही नाही.मला समाजाने दुर लाथडले.जगापासून मी दुर झालो.साऱ्यांनी मला दुर केले परंतु हया ग्रंथानी मला आसरा दिला.म्हणून एखादे पुस्तक दुसऱ्याला दयावचे म्हटले की, माझ्या अगदी जिवावर येते.पुस्तकांच्या सहवासात शांत आयुष्य वेचन्यासारखा दुसरा आनंद नाही.पुस्तके मला शिकवितात, नवी वाट दाखवितात म्हणून ती मला आनंदाचा लाभ करुन देतात."

तसं पाहिले तर पुस्तक वाचनाची आवड बाबासाहेबांना लहानपणापासूनच लागली पण आवड असूनही पुस्तक विकत घेण्याची ऐपत नसल्यामुळे त्यांची ग्रंथ खरेदीची इच्छा असून ही ती पूर्ण करता येत नव्हती. बाबासाहेबांचा पहिला हक्कांचा ग्रंथ म्हणजे'बुध्द चरित्र'हा ग्रंथ डॉ.बाबासाहेबांना एल्फिस्टन हायस्कूलचे प्राचार्य केळूसकर गुरुजींनी मॅट्रिकच्या परीक्षेत अस्पृश्य समाजातील पहिला विद्यार्थी उत्तीर्ण झाला म्हणून दिला गेला. परंतू या ग्रंथाचा बाबासाहेबांच्या मनावर एवढा परिणाम झाला की, १४ ऑक्टोबर १९५६ ला बाबासाहेब बुध्द धम्माकडे वळले.कारण हिंदू धर्मामध्ये भयानक विषमता आहे.तर बुध्द धम्माचा केंद्रबिंदू माणूस असून नैतिकता त्याचा पाया आहे.

बाबासाहेब राजर्षी शाहू महाराज व सयाजीराव गायकवाड यांच्या आर्थिक सहकार्याने उच्च शिक्षणासाठी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात एम.ए. व पीएच.डी.साठी तेथे गेले. तिथे गेल्यानंतर कोलंबिया विद्यापीठाच्या समृध्द ग्रंथालयाचा पुरेपुर फायदा घेण्यासाठी १८ ते २० तास अभ्यास करत असत.येथून सर्वोच्च पदवी प्राप्त करुन आल्यानंतर बाबासाहेब अर्थशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी लंडन विद्यापीठात लंडन स्कूल ऑफ इकॉनामिक्स येथूनही सर्वोच्च पदवी प्राप्त केली. तेथे ही त्यांना ब्रिटिश म्युझियमच्या समृध्द ग्रंथालयाचा पुरेपुर फायदा घेतला कारण कमी कालावधीत जास्त ज्ञान प्राप्त करावयाचे असेल तर सतत वाचन केले पाहिजे.

पुस्तकांशी जुळून राहिले पाहिजे या हेतूने बाबासाहेब सतत पुस्तके वाचत आणि वाचतच राहिले. पुस्तके वाचन्याबद्दल बाबासाहेब म्हणतात की," मी एकदा वाचवयास बसलो की, माझ्या साऱ्या शक्ती एकवटल्या जातात मी रात्रभर वाचत वा लिहित बसलो तरी मला थोडसा देखील थकवा येत नाही. अविश्रांत वाचनामुळे माझी स्मरणशक्ती एवढी तल्लक आणि प्रखर झाली आहे की, अमुक ग्रंथातील महत्वाचे लिखाण किंवा अमुक ग्रंथाच्या अमुक पानावर अमक्या ओळीत हे वाक्य किंवा हे अवतरण आहे हे मी अचूक सांगू शकतो."बाबासाहेबांच्या हया पुस्तक प्रेमापासून सुप्रसिध्द ब्रिटिश व्यंगचित्रकार सर डेव्हिड लो हयांना सुध्दा स्वतःला आवर घालता आला नाही. त्यांनी बाबासाहेबांचे काढलेले व्यंग्यचित्र हे अवतीभोवती पसरलेल्या पुस्तकांच्या ढिगाऱ्यात बाबासाहेब पुस्तक वाचत बसलेले आहेत.यावरुनच लक्षात येते की, खरच बाबासाहेबांना पुस्तके वाचन्याची किती आवड होती.ग्रंथाविषयी किती प्रेम होते.

बाबासाहेब देश-विदेशात जेथे कोठे गेले तेथून त्यांनी त्यांना आवडणारी नवी-जुनी पुस्तके खरेदी केली.हे करण्यासाठी त्यांना कधी पाणी पिऊन भूक भागवावी लागली तर कधी अर्धपोटी राहून तर कधी पोटाला चिमटा घेऊन परंतू ते पुस्तके मात्र खरेदी करीत असत. जगात बाबासाहेब एकमेव अद्वितीय व्यक्ती आहेत की, ज्यांनी पुस्तक प्रेमापोटी अमाप पैसाही खर्च केला आणि पुस्तकासाठी घरही बांधले.

डॉ.बाबासाहेब पुस्तकांना स्वतःच्या अपत्याप्रमाणे सांभाळत असत. म्हणूनच त्यांनी खास पुस्तकांसाठी मुंबईमध्ये राजगृह बांधले.ज्या राजगृहामध्ये सुमारे ४८००० ग्रंथ होते.हे ग्रंथ केवळ खरेदीच केले नाहीच तर संपूर्ण ग्रंथ वाचून ही काढले. या ग्रंथाची विशिष्ट पध्दतीने ठेवण व काळजी स्वतः बाबासाहेब घेत असत. त्यांच्या गैरहजेरीत ग्रंथालयातील जर एखादा ग्रंथ कोणी हलवला तर पटकन ते त्यांच्या लक्षात येत असत. तसेच बाबासाहेब दिल्ली व अन्य जा ठिकाणी जायचे व राहयचे त्या त्या वेळी त्यांच्या सोबत व त्या ठिकाणी पुस्तके असायची. एवढे ग्रंथावर प्रेम करणारा, पुस्तकाला अपत्याप्रमाणे सांभाळणारा व पुस्तकासाठी निवारा बांधणारा

या धर्तीवर बाबासाहेबा व्यतिरिक्त दुसरा कोणी शोधून ही सापडणार नाही.आज जी महाराष्ट्रामध्ये ग्रंथालयाची चळवळ व वाचन संस्कृतीची चळवळ चालू आहे.यात बाबासाहेबांचीच प्रेरणा आहे यात कुठलीच शंका नाही.

कारण आज देशाला उमजले आहे की, पुस्तकानेच मस्तक तंदुरुस्त होते.म्हणूनच की काय, आजही बाबासाहेबांच्या पदस्पर्शानी पावन झालेल्या दिक्षाभूमी, दैत्यभूमी आदी प्रत्येक ठिकाणी पुस्तक साहित्याची विक्रमी विक्री होते. ही विक्रमी विक्री एवढी आहे की, जगात असे एक ही उदाहरण आढळणार नाही की, दोन दिवसात करोडो रुपयांची ग्रंथसंपदा विकली जात असेल. हा एक व्रिक्रमच म्हणावा लागेल. एवढेच नव्हे तर संपूर्ण देशभरात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पुर्णाकृती प्रेरणादायी पुतळे हे त्यांच्या हातात संविधानरुपी ग्रंथ दाखविल्याशिवाय पूर्णच झालेले नाहीत.

- **जात आणि अस्पृश्यता निर्मुलनासंबंधीचे विचार:**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजातील जातीयव्यवस्थेचा सखोल अभ्यास केला. १९१६ मध्ये अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठामध्ये शिकत असताना मानवशास्त्र विभागात 'भारतीय समाजातील जाती' या विषयाचा शोधनिबंध सादर करुन भारतीय समाजातील जाती-व्यवस्थेचे विस्तृत, विदारक चित्र जागतिक पातळीवर मांडण्याचे काम त्यांनी केले. केतकरांच्या नंतर जातीविषयक सिध्दांत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला. पुढे 'ॲनिलेशन ऑफ कास्ट' या ग्रंथामध्ये डॉ.आंबेडकरांनी जातीविषयक दृष्टीकोन स्पष्टपणे मांडला.

एकंदरीत जाती-व्यवस्थेचा डॉ.आंबेडकरांनी समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केला. त्यांच्या मते, हिंदूधर्मातील सामाजिक विषमतेचे मूळ जातीव्यवस्थेत आहे.तेव्हा जातीप्रथेचे निर्मूलन व्हावे असे विचारही त्यांनी मांडले आणि कृतीही केली.जातीव्यवस्था नष्ठ करण्यासाठी त्यांनी आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन दिले.

धार्मिक गुलामगिरीचे शेवटचे लोक म्हणजे अस्पृश्यता आहे.हिंदु धर्माने केवळ जन्माच्या आधारवर श्रेष्ठ कनिष्ठता निर्माण करुन शुद्रांना अपमानजनक वागणुक दिली आहे.सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक हक्कापासुन वंचित ठेवून त्यांना जीवन जगण्याइतपत सुध्दा स्वातंत्र्य दिले आहे.

समाजात समता, बंधुता, आणि स्वातंत्र्य आल्याशिवाय खरी लोकशाही निर्माण होत नाही असा सिध्दांत बाबासाहेब मांडतात. त्यासाठी अस्पृष्यतेचे उच्चाटन करुन त्यांच्यावरील सर्व बंधने काढून टाकली पाहिजेत त्यासाठी सहभोजन सह शिक्षण, अंतर जातीयविवाह, सार्वजनिक ठिकाणी पाणी भरण्यासाठी मोकळीकता आणि स्पृश्यप्रमाणेच सर्व अधिकाराची गरज आहे असे बाबासाहेब व्यक्त करतात.

सामाजिक स्तरीकरण ही समाजशास्त्रातील महत्वाची संकल्पना आहे . जागातील प्रत्येक समाजात स्तरीकरण आढळून येते वर्ग किंवा वंशाच्या आधारे स्तरीकरण दिसून येते .

आंबेडकरांनी भारतीय सामाजीक स्तरीकरण व्यवस्थेवर प्रकाश टाकला . ते म्हणतात भारतीय समाजात हिंदू मध्ये निर्माण झालेले वर्ग हे वर्णावर आधारित आहे परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे .मात्र हे चारवर्ण अपरिवर्तणीय होते . चातूवर्णव्यवस्थेला वर्गीकरणाची व्यवस्था म्हणणे हे त्यांना मान्य नव्हते कारण या वर्णव्यवस्थेत जाणीपूर्वक निर्माण केलेले दंडसजा विषयक नियम अंतर्भूत होते . या वर्णव्यवस्थेची निर्मीती ही धार्मीक आधारावर झाली आणि म्हणून त्यांनी या व्यवस्थेला चुकीचे मानले कारण वर्णव्यवस्थेवर आधारित असलेले स्तरीकरण हे बंदिस्त स्तरीकरण असून ते व्यक्तिच्या समजाच्या विकासाला घातक आहे हे आंबेडकरांनी स्पष्ट केले.

जातीव्यवस्थेचे कडू फळ म्हणजे भारतीय समाजातील अस्पृश्यता होय. डॉ.आंबेडकरांनी अस्पृश्यतेचे सखोल अध्ययन केले. 'शुद्र मुळचे कोण ?Who were the Shudras ?' अस्पृश्य पूर्वी कोण होते ? व ते अस्पृश्य का बनले ? (Untouchable, who were they and why they become untouchable ? ) (१९४८) या ग्रंथातून त्यांनी आपल्या अस्पृश्यतेसंबंधी विचार मांडले आहेत. डॉ.आंबेडकरांनी हिंदूधर्म ग्रंथाचा सखोल अभ्यास केला व वर्णव्यवस्था अस्पृश्यतेस कशी जबाबदार ठरली याचे स्पष्टीकरण दिले. अभ्यासांती त्यांनी अस्पृश्यतेवर भयंकर टिका केल्या ; अस्पृश्यता निर्मूलनासाठी नाशिक येथील काळाराम मंदीर प्रवेश, महाड येथील चवदाळ तळयाचा सत्याग्रह केला.

या अर्थाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अस्पृश्यतेच्या अध्ययनाचा समाजशस्त्रीय दृष्टीकोन दिसुन येतो.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजाच्या राजकीय परिस्थितीचे देखील सखोल अध्ययन केले.भारतासाठी आवश्यक अशी शासनप्रणाली म्हणून 'लोकशाही' शासनप्रणालीचा त्यांनी उल्लेख केला.लोकशाहीवर त्यांची प्रचंड निष्ठा होती. विविधतेने नटलेल्या भारतीय समाजाला स्वातंत्र्य,समता,बंधुत्व व सामाजिक न्याय यावर आधारलेली संसदिय शासनप्रणाली तारु शकते, असे विचार त्यांनी मांडले. त्यांनी राज्यसमाजवादाचाही स्वीकार केला.

भारतासाठी 'एक व्यक्ती आणि एक मूल्य' चा स्वीकार त्यांनी केला.देशाच्या, समाजाच्या विकासासाठी 'संघराज्य' शासन व्यवस्था आवश्यक असल्याचे त्यांनी व्यक्त केले. भारतीय समाजामध्ये सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी अमुल्य अशी देणगी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अथक परीश्रम घेवून स्वतंत्र भारताची 'भारतीय राज्यघटना' निर्माण केली.

**● निष्कर्ष :**

डॉ.बी.आर.आंबेडकरांना लहान पणापासुनच समाजातील अनिष्ठ रुढी, परंपरा, चालिरीती, सामाजिक बंधनाचा सामना करावा लागल्यामुळे त्यांनी भारतीय समाजातील असमानतेचा अभ्यास शास्त्रीय पध्दतीने केला. त्यातून त्यांनी भारतीय समाजाचा दलिता विषयीचा दृष्टीकोन असा कसा आहे.त्यामुळे त्यांनी मानवतावादी दृष्टीकोनातून आंबेडकरांनी भारतीय समाजाचा अभ्यास केला.

त्याबरोबरच भारतीय समाजातील जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था,जातीतील उच्चनिच्चपणा, स्पृश्यअस्पृश्यतेची भावना, धर्माबाबतचे अध्ययन, स्त्रीयांसाठी सुधारणावादी कायदे, भारतीय समाजातील शिक्षण पध्दती, आर्थिक विकास, आर्थिक असमानता, राजकीय व्यवस्था इ. बाबीचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून व शास्त्रीय पध्दतीने डॉ.बी.आर.आंबेडकरांनी अध्ययन करुन भारतीय समाजातील असमानता नष्ठ करण्यासाठी प्रयत्न केले.स्वातंत्र्य चळवळीतून राष्ट्रवाद व समाजवाद जागा झाला परिणामी आदर्श समाजाची समता, बंधुता, न्याय, स्वातंत्र्यही मुल्ये समाजात रुजु लागली.

महाराष्ट्राच्या सामाजिक जडणघडणीसाठी जगन्नाथ शंकरशेठ, बाळशास्त्री जांभेकर लोकहितवादी, भाऊलाड, रानडे, रमाबाई, छत्रपती शाहू महाराज, सावित्रीबाई, महात्मा फुलें, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. चे योगदान राहिले आहे.अर्थातच समाजाच्या सिध्दांताला खरे स्वरुप प्राप्त करुन देण्याचे काम महाराष्ट्रातील विविध संत, समाजसुधारक, साहित्यीक विचारवंतानी केले आहे १९ व्या शतकात खऱ्या अर्थाने सामाजिक विचारांची पायाभरणी झाली आहे.

भारतातील एक महान समाजसुधारक म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकरांना ओळखले जाते. भारतातील दलितांचे कैवारी सामाजिक धार्मीक राजकिय व्यवस्थेवर कायम ठसा अमटविणारे एक कृतीशील विचारवंत ,भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, तळागाळातील लोकांच्या उध्दारासाठी धडपडणारा मानवतावादाचा पुरस्कर्ता यांचे विविध विषयावरील सखोल अध्येयन आणि मांडलेले सिध्दांत हे अत्यंत महत्वाचे आहे.भारतीय समाजव्यवस्थेतेमधील विविध घटकावर प्रकाश टाकण्याचे कार्य आंबेडकरांनी केले. डॉ आंबेडकर हे थोर भारतीय समाजशास्त्रज्ञ आहे हे त्यांच्या अध्यानावरुन लक्षात येते.

समाजशास्त्रला समुध्द करण्यासाठी त्यांचे विचार हे मोलाचे ठरले आहे त्यांच्या जातीउत्पतीचा सिध्दांत जातीनिर्मूलना संबंधीचे विचार धर्मासंबंधीचे अस्पृश्यता सबंधीचे विचार हे`महत्वाचे आहे डॉ आंबेडकरांचे समाजशास्त्राच्या विकासात महत्वाची भूमिका आहे हे विसरुन चालत नाही .

**● संदर्भग्रंथ**

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार उद्रेक - आसाराम सैदाणे, सुगाव प्रकाशन, ५६२, सदाशिव पेठ, चित्रशाळा बिल्डींग, पुणे ४११०३०.
२. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक व राजकीय कार्य - अॅड.एस.एन.बोडके, परिवर्तन प्रकाशन, प्रकाश नगर, लातूर
३. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अतिशय गाजलेली भाषणे - संकलन शालीक ग्राम गवळी, सुधीर प्रकाशन, गणेश नगर, बोरगांव (मेघे) वर्धा.
४. भीम पर्व - शां.श.रेगे - सुगावा प्रकाशन, ५६२, सदाशिव पेठ, चित्रशाळा बिल्डींग, पुणे.
५. डॉ. धनंजय किर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डिसेंबर २००६.
६.महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृती मंडळ संपादित : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गौरवग्रंथ-१९९३
७.दैनिक लोकमत :दिनांक २३ डिसेंबर २०१२
८.डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र -साधने : डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण, लेखन आणि भाषणे विभाग, महाराष्ट्र शासन, संपादित खंड १८ भाग-२, २००२
९.वसंत मून : डॉ. बाबासाहेब आंबेडकर,२००९

# जनजाती विकास की समस्यायें एवं संभावनायें

डॉ.अर्चना बी.जैन
अर्थशास्त्र विभाग प्रमुख न.मा.द.महाविद्यालय, गोंदिया.
Mob.No.7798153275 , Email ID-archanajain7798@gmail.com

**प्रस्तावना:—**

भारतीय जनजातियों के लोग भी भारतीय संघ के सदस्य है और इसीलिये उन्हें पृथक रखना संभव नही हुआ है। फलत: इन जनजातियों का, जिन्हें कि अब तक असभ्य अर्द्धसभ्य या जंगली कहा जाता था, संपर्क भारत के अन्य सभ्य समुदायों के साथ निरंतर बढता जा रहा है। इन दोनो की संस्कृति पूर्णत: अलग है और सभ्य समाज का दबाव इन अर्द्ध—सभ्य या जंगली लोगो पर वास्तव मे तीव्र है। सभ्य समाज की चमक—दमक भी जनजातीय लोगो को निरंतर अपनी और आकर्षित करती जा रही है। इन सबका परिणाम यह हुआ है कि सांस्कृतिक संपर्क या संस्कृतीकरण की अनेक गंभीर समस्याओं से घिरी भारत की जनजातियों का जीवन आज एक बहुत ही नाजूक अवस्था मे से होकर गुजर रहा है। अत: हमारे लिए भी इन समस्याओं को उचित रूप मे जान लेना आवश्यक होगा । चुकी प्राय ६ करोड ७७ लाख जनसंख्या वाली जनजातियों को पीचे छोडकर राष्ट्रीय उन्नति का सपना देखना भी अनुचित ही है। इस प्रकार कुछ प्रमुख समस्याओं का विवेचन— निम्मानुसार है।

**संशोधन पद्धती:—**

प्रस्तुत शोधनिबंध के लिये द्वितीय समंको का उपयोग किया गया है। विविध पुस्तको व लेखो का अध्ययन करके यह शोध पत्र तयार किया गया है।

**आर्थिक समस्या:—** जनजातीयॉ आर्थिक रूप से काफी अविकसित है। जैसे यह समस्या मुख्य रूप से इनके सामने मुंह बाए खडी है।

**१ं स्थानांतरित खेती संबंधी समस्या:—**

जनजातीयो का एक बडा भाग खेती पर आश्रितहै। यह खेती आदिकालीन ढंग से चली आ रही है। इनकी इस परंपरागत खेती से उनकी आवष्यकताओ की पूर्ति बडी मुश्किल से हो पाती है। उन्हीं पुराने बीजो के आधार पर उपज बहुत कम और घटिया स्तर की होती है। खेती के आधुनिक तरीका, साधनो एंव रासायनिक खादो से वे अभी लगभग अपरिचित है।परंपरागत फसलो को छोड आम वनवासी यो को बाग—बगीचे लगाने की जानकारी नगण्य है। वही आदिवासियों की खेती एवं बाग बगीचों की असफलता का एक बहुत बडा कारण जंगली जानवर भी है। अधिकांश जनजातियांवनों में निवास करती है। जहा वे उन्ही खाद्य पदार्थो का उत्पादन कर सकती है जिन्हे या तो जानवर ना पसंद करते हो या किसान सब कुछ छोड खेती की सुरक्षा के लिए मुस्तेद रहे। अत: किसान अपने खाने के लिए तो थोडा पैदा कर ही लेते है, लेकिन ऐसी स्थिती मे नही पहुंच पाते की कुछ आर्थिक लाभ कमा सके।

**२) भूमि व्यवस्था संबंधि समस्याएं:—**

आदिकालसे जनजातियॉ वनों में ही निवास करते आई है जहा उनका एकाधिकार होता था एवं बाहरी लोगों के लिए प्रभुत्व की बात तो दूर, संपर्क भी बिरले ही होता था ऐसी स्थिती मे भूमी पर इच्छा नुसार खेती किया करती थी। आज वनसंरक्षण कानून एवं वनों की सुरक्षा के लिए शासन की कठोर नीती ने उनकी इस स्वतंत्रता को छीन लिया है । अब वे अपनी इच्छानुसार न तो जंगलों काट ही सकते है, और न ऊन्हे खेती का रूप प्रदान कर सकते है। आदिवासियों की भूमि व्यवस्था के अंतर्गत दी गई भुमी पर खेती करने की इच्छा उनकी धार्मिक भावनाओं के कारण क्षीण हो जाती है,वे जमीन को जोतकर खेती करने से डरते है।

**३) वनों से संबंधित समस्याएं:—**

हमारे देश की एक नियोजीत वन नीती है जिसके कारण जनजातियों को वनोंमे स्वच्छंद विचरण मे बाधा उत्पन्न हुई है। प्राचीन समय मे वे वनो का उपभोग स्वतंत्रता पूर्वक करते थे।

तमाम जंगली वस्तुओं, पषुओं, पक्षियों, पेडों इत्यादी में वें स्वयं मालिक हुआ करते थे। लेकिन आज परिस्थितीयां बिलकुल बदल गई है। अक्सर वनकर्मचारीयों एवं आदिवासियों के मध्य जंगल से लकडी चुनने, पशुओं को मारने, कर्मचारियों द्वारा जंगल मे प्रवेश की रोक—टोक इत्यादी को लेकर तनाव पैदा हो जाता है। सदियोंसे वे जिनं वन्य वस्तूओं का अपनी इच्छानुसार उपभोग करते आये है। एकाएक उन पर सरकारी नियंत्रण लग गया है। ठेकेदारी प्रथा के द्वारा लकडी की निकासी शहरो की और होने लगी है जिससे भोले भाले लोगों का शोषण आम बात हो गई है। इनकी अज्ञानता का लाभ उठा जहॉ इनका शोषण किया जाता है वहीं इनके कठीण परिश्रम द्वारा प्राप्त लकडी शहर मे चली जाती है एवं इन्हे अपना मकान बनाने के लिए भी वनकर्मचारीयों एवं सरकार का मुह देखना पडता है।

**४)ऋणग्रस्तता की समस्या:—**

जनजातीयों मे पर्वो—त्यौव्हारों एवं अनेक रीतीरिवाजों के कारण काफी व्यय होता है। इसके अतिरिक्त इन आदिवासियों की साप्ताहिक हाट बाजार मे पहुंच होने लगी है जहाँ पहले तो जीवन की मौलिक आवश्यकताओं की वस्तूऐं बिका करती थी लेकीन अब भौतिक सुखों के साधन सिले—सिलाये कपडे, खिलौने, चमक— दमक के साजो—सामान इत्यादी की भरमार वहा देखने को मिलती है। इन चीजो के खरीदने से दिन का खर्च स्वभावत: आमदनी से अधिक होने लगा है। ऐसी स्थिती का लाभ कस्बों के महाजन व साहूकारें ने बहुत उठाया है। जनजातीय लोगों को जरा सी आवश्यकता होने पर ही महाजन उन्हे कर्ज देने से नही चुकता, जिसके फलस्वरूप उसी महाजन या साहूकार की जमीन पर आजीवन बेगारी करनी पडती है। ऋणग्रस्तता जनजातीय जीवन की बहुत बडी समस्या है।

**५)अर्थव्यवस्था संबंधी समस्याए:**—जन— जातियों के आर्थिक जीवन मे मुद्रा का उपयोग अत्याधिक बढ गया है। पहले जन — जातीयां मुद्रा रहित जीवन व्यतीत करती थीं अब मुद्रा सहित जीवन मे प्रवेश कर चुकी हैं। कई तरह की बाहरी चीजे लेकर लोग जनजातीय ग्रामों में प्रवेश करते हैं एंव चौगुने मूल्यों पर उन्हे बेचा जाता है। मुद्रा विनिमय के जरिये व्यापारी एक और तो इन्हे दुगने दामों में अपना सामान बेच जाते है और वनों से जनजातीय द्वारा इकटट्ठा किया गया सामान( मिट्टी के मोल) ले जाते है। इसके अतिरिक्त जो मादक वस्तूओं कें विक्रेताआओं कीं यहां घुसपैठ अत्यंत ही शोचनीय है।

**६) औद्योगिक श्रमिको की समस्याए** :— औद्योगिक केंद्रो मे काम करने वाली जनजातियों की दशा और भी सोचनीय है। ये मजदूर अपनी पुरी मजदूरी प्राप्त नही कर सकते क्योंकि मालिक और मजदूर के मध्य ठेकेदार बैठा होता है जो अपना कमिशन लेता है। इनके रहने के लिए मकानों की कोई व्यवस्था नही है, फलस्वरूप एक जनजातीय मजदूर काम छोडकर कब गॉव भाग जायेगा कहा नही जा सकता। ये मजदूर कही भी संघटित होकर काम करते नही देखे जाते जहॉ भी काम मिला उसे कर लेते है तथा मालिक की इच्छा या अपनी मर्जी पर बडी आसानी से काम छोड जाते है। अपने अधिकारों का इन्हे कोई ज्ञान नही होता।

**सांस्कृतिक समस्याए:**— जहा तक सांस्कृतिक समस्या का अर्थ है वहां जनजातीय संस्कृती का लुप्त होते जाना और उस पर बाहरी संस्कृतीयों के हावी हो जाने से है। अपने आस पास की जनसंख्या के संपर्क में आने से उनका सांस्कृतिक स्वरूप काफी परिवर्तित होता जा रहा है। संस्कृतिक समस्या के अंतर्गत निम्नलिखित समस्याए प्रमुख है।

**१) भाषा संबंधी समस्या:**—जनजातीयां अपनी आसपास की अन्य जातियों के संपर्क में बहुत तेजी से आ रही है जिसेसे उनमें द्विभाषी समस्या उत्पन्न होती जा रही है। यह लोग जिन जातियों के संपर्क मे आते है, अपने साथ — साथ है उनकी भाषा भी बोलने लगते है।

**२) सांस्कृतिक भिन्नता की समस्या:—**

जनजातीय लोगों की अन्य संस्कृतीयों के साथ संपर्क के कारण अन्य समस्याऍउत्पन्न हो गई है। ईसाई मिशनरीयों के कार्यकर्ताओं नें जनजातियों के बीच जाकर उन्हे आधुनिक सभ्यता की और आकर्षित करने की कोशिश की है। अपनी हीनता की भावना को समाप्त करने के लिए काफी लोग या तो ईसाई धर्म ग्रहण कर चुके है या अपने आपकों उनके रहन सहन मे ढालने की कोशिश कर रहे है। इसके अलावा बहुत से जनजातीय लोगो ने अपने आपको हिंदूओं तथा

विभिन्न जातीय विचारधाराओं के अंतर्गत लाकर खडा कर दिया है। चूंकि सब लोगो ने इन स्थितीयों को आत्मसात नही किया इसलिए एक जनजाति के लोगों में आपस मे ही भिन्नता उत्पन्न होने लगी है। इसका सबसे बडा परिणाम सामाजिक विघटन के रूप मे हुआ है क्योंकी ये लोग जिन जातीयों मे अपने आपको शामिल समझने लगे उनकी संस्कृती को पूरी तौरपर स्वीकार भी नही कर पाये और स्थिती एक समस्या के रूप में उत्पन्न हो गई ।

**३) धार्मिक समस्यऐ:—** भारतीय हिंदू भारतीय जनजातियों का प्राचीनतम पडोसी रहा है, उनके धार्मिक संस्कारों पर सबसे अधिक प्रभाव हिंदू धर्म काही पडा है। हिंदू देवी—देवताओं मे विश्वास के कारण उनके अपने संस्कारो में काफी परिवर्तन हुआ है। हिंदू धर्म से प्रभावित प्रमुख जनजातियां भिल्ल व गोंड है। पिछले लगभग ७०—७५ वर्षो से ईसाई धर्म का प्रचार भारतीय जनजातियों के बीच होता आया है जिससे अनेक लोग ईसाई धर्म ग्रहण कर चुके है।

**४) ललित कलाओं का —हास:—** बाहरी संस्कृतीयों के संपर्क से जनजातियों का बहुत बडा —हास ललित कलाओं के रूप मे हो रहा है। वन्य जातीयों मे लकडी व मिट्टी पर सुंदर नक्काशी का काम किया जाता था। लेकिन युवागृहो मे जहाॅ उन्हे कला की शिक्षा दी जाती थी वे धीरे—धीरे लुप्त होती जा रही है। अधिकांश जनजातियों में उच्च कोटी की नृत्यकला है जो आज विद्यमान है, बाहरी संस्कृतीयों के संपर्क से धीरे—धीरे गौण होती जा रही है।

**शिक्षा संबंधी समस्याऍ:—** अधिकांश जनजातीय गाव ऐसे है जिनकी साक्षरता शुन्य है। संपूर्ण जनजातीय जनसंख्या पाच करोड ३८ लाख मे पचास हजार भी साक्षर नही है। आज के कानूनी दांव—पेंचोंमे तो साक्षर भी ऊलझकर रह जाता है निरक्षर की बात हीक्या है। बाहरी व्यक्ती आसानी से उनका शोषण करते है और कभी कभार तो उन्हे अपनी जमीनो तक से हाथ धोना पडता है। किंतु यदि जनजातियों की निरक्षरता के कारण समस्याऍ बिकट है तो साक्षरता भी उनके लिये परेशानीयॉ ही लेकर आ रही है। इनके छोटे बच्चे भी घर के कामकाजी सदस्य होते है। छोटे बच्चो के पाठशाला जाने की स्थिति मे छोटे—मोटे काम जैसे पशुओंको चराना, खेत मे खाना पंहुचांना इत्यादी मे बाधा सी पडणे लगी है। दुसरी और पढलीखरहे युवकों का अपनी संस्कृती से ही दुराव होने लगा है। स्कूली शिक्षा प्राप्त करने से उन्हे अपनी सांस्कृतिक शिक्षा प्राप्त करने का समय ही नही मिल पाता। इस से उनके अपने लोग साहित्य पर भी प्रभाव पडता है। शिक्षा से जहॉ जनजातीयों में भी बेकारी बढने लगती है वही शिक्षित व अशिक्षित के बीच वर्ग संघर्ष भी खडा हो गया है।

इन स्थितियों के बावजूद आदिवासी शेत्रों में प्रायमरी तथा मिडिल स्कूल खोले गये है लेकिन भी अधिकांशत: कुछ बडे कस्बों में ही है। छात्रो को दूर दूर से चलकर पढणे आना पडता है। कुछ स्कूल सघन वन बस्तीयों मे भी है लेकिन वह ऐसी स्थिती मे है जहा कई—कई मिलो तक पैदल चल कर जाना पडता है। ऐसी स्थिती मे शिक्षक वहा जाने से कतराते है और हमेशा स्कूलों मे उपलब्ध नही रह सकते।

निकट निकट की वन बस्तीयों में शासन ने स्कुल खोले है। यद्यपी एक बस्ती के छात्रों को पढणे के लिए तीन चार किलोमीटर की बस्ती में ही जाना पडता है लेकिन जंगली जानवरों कें डर के कारण अक्सर माता—पिता उन्हे भेजना पसंद नही करते। तात्पर्य है कि जब तक शासन की जनजातिय क्षेत्र में शिक्षा की व्यापक निति नही बन जाती तब तक आदिवासी बच्चों का शहरी बच्चो के समान शिक्षित हो पाना बहुत दूर की बात है।

**सामाजिक समस्याए:—**

जब से जनजातियां सभ्य समाज के संपर्क मे आनी शुरू हुई उनकी सामाजिक समस्याए बडी है बढी ही है,इनमे से कुछ निम्नवर्णित है—

**१) बाल विवाह:—** पहीले आदिवासीयोंमे विवाह देर से हुवा करता था पर हिंदू समाज के संपर्क मे आने के कारण बालविवाह को प्रोत्साहन मिलने लगा है बाल विवाह हिंदू समाज मे अपनी ही सामाजिक समस्या रही है।

**२)कन्या मूल्य:—** पहिले जनजातियों मे विवाह के समय वस्तू के रूप मे एक कन्या मूल्य प्रदान किया जाता था किंतु जब से मुद्रा का चलन बडा है मुद्रा के रूप मे कन्या मूल्य मांगा जाता है जो अबाध गती से बढता जा रहा है। इससे विवाह करना एक मुश्किल कार्य बनता जा रहा है।

**३) युवागृहों का पतंन**:– जब से आदिवासीयों मे बाल–विवाह का प्रचलन बढा है तब से यह प्रथा युवागृहो को समाप्त करणे की दिशा मे दुर्भाग्य के रूप मे ही सामने आई है। ये युवागृह युवक और युवतियों के लिए शिक्षा केंद्र थे जीनमे जनजातीय संस्कृती का ज्ञान कराया जाता था। ईनके स्थान पर नये तरह की पाठशालाएं खोली जा रही है ईनकी आस्था नही है। युवागृहों की अवनती जनजातीय जीवन पर बहुत बुरे व हानिकारक परिणाम को सामने लाई है।

**४) वेश्यावृत्ति**:– भारत के लब लगभग सभी जनजाति या निर्धन है तथा योन संबंध मे भी सभ्य समाज जैसी कडाई नही है ऐसे लोग जो जनजातीय शेत्र मे व्यवसायिक या नोकरी के संबंध मे जाते रहते है अंशिक लालच देकर जनजातीय लडकियोंसे येऊन संपर्क स्थापित कर लेते है इससे वेश्यावृत्ति को बढावा मिलता है इसके अतिरिक्त औद्योगिक क्षेत्र मे काम करने वाले मजदूर घर से दूर रहने के कारण वेश्यावृत्ति जैसे काम मे बस जाते है वहा से वह अनेक रोग लाकर अपनी स्त्रियो मे पहिला देते है

**५)विवाह पूर्व यौन संबंध**:– जनजातियों मे योन संबंधों के बारे मे कडाई न होने के कारण अक्सर विवाह पूर्व ही योन संबंध प्रस्थापित होते रहते है विवाहित स्त्रिया भी अक्षर दुसरे पुरुषो के संपर्क मे आ जाती है यह एक गंभीर सामाजिक समस्या है।

**समस्याओं के समाधान हेतु किये गये प्रयास**

उपर्युक्त विवेचनसे स्पष्ट होता है की भारतीय जनजातियों का जीवन अनेक गंभीर समस्याओं का एक जटिल जाल है जिसमे फसकर जनजातीयों की भारत मे आज भी एक कष्टदायक परिस्थिती है अब तक की विवेचना से यह भी स्पष्ट होता है की जनजातीय समस्याओं का कारण बहुत कुछ तो उनका अपना ही पिछडा पण है और सेश कारण उनका बाहरी सभ्य समाज के साथ संस्कृतिक संपर्क है। यह सच है कि इन समस्याओं को सुलझाने के लिए केंद्र तथा राज्य सरकार द्वारा काफी प्रयत्न किये जा रहे है परंतु अभी बहुत कुछ करना सेश है। जनजातीय समस्याओं का निराकरण सफलतापूर्वक किया जा सकता है जबकि जनजातीय कल्याण की नीति को खूब समजे बुजकर बनाया जाये। जनजातियों को समस्या से मुक्त करणे उनके विकास के लिये उन्हे उनके हाल पर छोड दिया जाए ऐसी बात नही है पूरा भारतीय जनमानस उनकी दयनीय स्थिती को जानता है और यही कारण है कि सन १९५० के बाद से लगातार उन पर अरबो रुपये खर्चा किये गये परंतु इन योजनाओं के क्रियांन्वयन के बाद भी अपेक्षित विकास नही आया पत: आवश्यक आहे की उनकी समस्याओं को जड से समाप्त करने के उपाय ढूंढे जाने जनजातीय समस्याओं के समाधान के लिए सामाजिक समस्या एवं समाज सेवा से ओतप्रोत अनेक व्यक्तीयोंने कल्याणकारी कदम उठाये है उनके बीच शिक्षा स्वास्थ्य एवं सहायता के अनेक कार्यक्रम चलाये।

**समस्या के समाधान हेतु सुजाव**

१)आज आवश्यकता इस बात की है कि एक तरफ तो प्रशासन जनजातीय भावनाओं और आकांक्षा ओके प्रति उदार दृष्टिकोन अपनाये और दूसरी तरफ विकास योजनाओं को यथार्थवादी सामंजस्य पर आधारित और परिणामोन्मुख बनाया जाये ताकी जनजातीय कल्याण कोही जनजातीय विकास का लक्ष मानते हुए उनके जीवन मे परिवर्तन लाया जा सके।

२)वर्तमान विकास प्रक्रियाओं मे आदिवासयों को निर्वासन और निर्धनता की स्थिति मेलाया जा रहा है इसमे परिवर्तन लाना आवश्यक है इसलिये प्रत्येक वनविभाग, औद्योगिक परियोजना का यह उत्तरदायित्व होना चाहिये कि विस्थापित आदिवासियों को पुनर्स्थापित कीया जाये ताकी जनजातीय स्थिति को बिघडणे से बचाया जा सके।

३)बाहरी व्यापारी और वाणिज्य ऐजन्सीने लाभ से प्रेरित होकर आदिवासियों का सोशण करणा आरंभ कर दिया जिसके परिणाम स्वरूप एक तरफ तो आदिवासियों की हालत खराब हुई है तो दुसरी तरफ ऐजन्सीयों की छवी भी खराब हुई है ऐसे तत्व पर कडी निगरानी रखी जानी आवश्यक है। सरकारी सहकारी संघटना की सेवा यह दुरगामी आदिवासी क्षेत्र तक पहुचांने काभी प्रयत्न कीया जाना चाहिए सरकारी संस्थानो का प्रबंधन अधिकाधिक जनजातीय सदस्य को दिया जाना चाहिए।

ISSN : 2278-9308
July 2021

४) सरकारी अधिकारीओं को उनकी नियुक्ती से पहिले ऊन जनजातीय क्षेत्र की संस्कृति और भाषा का कुछ ज्ञान अवश्य किया जाना चाहिए ताकि वे उनकी समस्या को सून सके और कठीण इससे जनजातीय समुदायों के व्यक्ति और विकास परियोजना मे जुटे अधिकारीओं के बिच की दूरी कम करने और विश्वास जागृत करणे मे भी सहायता मिलेगी।
५) जनजातीय मे अंधविश्वाससो से और जादू टोने कि परंपराओं के कारण शिक्षा और सुधार का विरोध किया जाता है अत: उनके विकास के लिए उनके सोचने बिचारने के ढंग और जीवन पद्धती मे भी परिवर्तन लाना आवश्यक है ऐसी स्थिती मे जनजातियों के लिए शिक्षा का महत्व और भी बन जाता है। क्यों कि इससे उन्हे परंपरागत अंधविश्वासों से मुक्ती दिलाई जा सकती है और उनके आधुनिक परिवर्तन और विकास के लिये तयार किया जा सकता है।
शिक्षा के विस्तार के लिए रेडिओ और दूरदर्शन जैसे आधुनिक जनसंचार माध्यमोंका सहारा लिया जा सकता है ।
६) इसके साथ ही शिक्षित जनजातीय युवाओं को रोजगार उपलब्ध कराने का उत्तरदायित्व भी पूर्ण किया जाना चाहिए। तथा एक तरफ से जनजातीय समुदाय शिक्षा से विमुक्त होंगे वही दुसरी तरफ शिक्षित आदिवासी असंतुष्टो का नेतृत्व कर जनजातीय आक्रोश को राजनीतिक असंतोष और आक्रोश में परिवर्तित कर पृथकतावाद मे परीनित करेंगे और इससे राश्ट्रीय एकिकरण के लिये संकट उत्पन्न हो जायेगा। अत: शिक्षा को अधिक व्यवहारिक और क्रियान्मुख तथा जनजातीय समुदाय के जीवन से संबंध बना दिया जाये ताकी शिक्षित जनशक्ती का प्रयोग जनजातीय विकास को सही दिशा देणे मे किया जा सके साथही शिक्षा के माध्यम से अलगाववादी जनजातीय समुदाय को भी राष्ट्रीय मुख्य धारा मे सम्मिलित किया जा सकेगा।
७)शिक्षित जनजातीय नवयुवकों को वैज्ञानिक शिक्षा एवं प्रशिक्षण किया जाना चाहिए ताकि वे अपने समुदायों के लोगो के लिए संघर्ष कर सके तथा उन्हे दूर्व्यसनो तथा विविध प्रकार के सोशण से भी मुक्ती दिला सके। उन्ही के माध्यम से शिक्षा नवीन कृषी तकनीको, भूमी संरक्षण, वनसंरक्षण, औद्योगीकरण इत्यादी का प्रसार किया जाना चाहिये।
८) साथ ही उचित प्रकार से प्रशिक्षित व उदार सरकारी अधिकारीयों को ही जनजातीय क्षेत्रो मे नियुक्त किया जाना चाहिए क्यों की प्राय: जनजातीय क्षेत्रों मे शोषण और ज्यादतियों का मुख्य सरकारी अभिक्रम और कर्मचारीही रह जाते है। सरकारी एजेंन्सीयों पर कडी निगरानी, दुर्व्यवहार और शक्तियो के दुरुपयोग पर चौकशी और अधिकाधिक आदिवासियों का सहयोग, आदिवासी विकास के लिए आवश्यक है।

**भविष्य की संभावनायें:—**

संवैधानिक संरक्षण एक अच्छे एवं उपयोगिता ढांचे का काम करते है, किन्तु इसकी बारीकियों को भली प्रकार तय किया जाना आवश्यक है। ये बारीकिया किसी बहु प्रयोजनी सिद्धांत पर आधारित नही हो सकती। प्रत्येक क्षेत्र की अपनी विशिष्ट समस्या है, इन के कारणे भिन्न भिन्न है। अत: जनजातीय पुनर्निर्माण नीति के विभिन्न पक्ष मे अंतर होना लाजमी है। अंग्रेजो के शासन के दौरान यथास्थिती बनाये रखने की नितिका अनुसरण किया गया हटन एवं अन्यो ने अत्याधिक अलगाव या पूर्ण सात्मीकरण की निंदा की नवीन पुनरुत्थानवादी की नीति आपणाने पर या राष्ट्रीय संरक्षित क्षेत्र की उनकी योजना मे जनजातीय शेत्र मे किसी भी प्रकार का हस्तक्षेप न करणे एवम उनके नीर वर्तन रिव्हायवल की वकालत की गई इं दकियानूसी या पुनरूत्थानवादी विचार ओके विरुद्ध बम्बई के वरिष्ठ समाज शास्त्री घोरी येणे पूर्ण सात्मीकरण पर जोर दिया हो ने कहा कि जनजातियों को आदिम या मूलनिवासी कहना धमक बात है अपितु हे वास्तव मे पीछडे हिंदू थे और ईनकी सांस्कृतिक, आर्थिक व सामाजिक समस्याओं का समाधान हिंदू समाज के अंतर्गत इंनके पूर्ण आत्मसात होणे मे निहित है।

यहा संकेत जा सकता है कि घुर्ये ने अपने पक्ष को संभवता बडा बडा कर प्रस्तुत किया है जनजातीय लोगो की एक विशिष्ट संस्कृती होती है और किसी तरह की शक्ती पंच आहे का पूर्ण सात्मीकरण शायद नही हो सकता जनजातीय संस्कृतीओं के कोई अच्छे उपयोगी पक्ष होते है जिनका संरक्षण आवश्यक है। इन के लिए एक निति नियंत्रित एव सीमित सात्मीकरण की हो सकती है सीमित सात्मीकरण का अभिप्राय नक्की उपयोगी संस्था रीतिरिवाज व प्रचलन ओके

संरक्षण की आवश्यकता व वाचनीयता को स्विकारणा है चाहे ईन की उत्पत्ती एव लक्षण जनजातीयों पर सांस्कृतिक अधीग्रहण को भी बढावा दिया जाना चाहिए।

जहा एक तरफ गॉवों के यांत्रिकीकरण के प्रयास हो रहे है, वही साथ ही जनजातीय गॉवों के ग्रामीणी करण की कोशिश भी की जानी चाहिए ताकि अंतत: भारतीय जनता को ग्रामीण एवम नगरीय नामक दो मुख्य कोटीयों मे बाटा जा सके। केंद्र और राज्य सरकारो की वर्तमान नितियां अधिकांशत: सामाजिक कार्यकर्ताओं द्वारा निर्देशित होती रही है।

जनजातीय पुनर्वास की योजना भी समग्रा त्मक होनी चाहिये अर्थात सभी सांस्कृतिक सामाजिक आर्थिक एवम् राजनीतिक समस्या व के समाधान की व्यवस्था इस मे की जानी चाहिये।प्राथमिकता का निर्धारण इस ग्रुप मे किया जाना चाहिये की इन के परिणाम शिग्र प्राप्त किया जा सके जनजातियों के लिए एक अच्छे भविष्य के संयोजन की दिशा मे हमारा पहला कदम योजना के प्रति दिन का सहयोग प्राप्त करना होना चाहिये।ऐसा जनजातियों को बता कर भी किया जा सकता है कि उनके जीवन के भले के लिये ये योजनाये है न की जो ईनके पास है उसे समाप्त करने के लिये।

राज्य द्वारा योजना के प्रारंभिक कार्यो का श्री गणेश के जाने के पश्चात सामाजिक सुधारणा आर्थिक विकास यम यहा तक की बौद्धिक प्रगती की योजनाये बी शैलेशने हात मेली जा सकती है एक जटिल मानवीय समस्या है जिसके समाधान हेतू प्रशासक ओ सामाजिक कार्यकर्ता व और समाज वैज्ञानिक को को अपने साधन एक साथ जुटाकर कार्य करने होंगे।

**संदर्भ ग्रंथ**

१.भारत का जनजातीय जीवन –श्रीवास्तव प्रदीप
२.आदिवासी समाजाचे समाजशास्त्र– लोरे रा.ज.
३.आदिवासी विश्व– देवगांवकर शैलजा
४.भारतीय सामाजिक समस्याऐं– गुप्ता एम.एल.
५.भारतीय सामाजिक समस्या– पांडे तेजस्कर
६.आदिवासी सामाजिक समस्या –आगलावे प्रदीप
७.भारत का जनजाती जीवन– श्रीवास्तव प्रदीप.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जातीच्या निर्मितीचा सिद्धांत

डॉ. नलिनी ईश्वरदास बोरकर
समाजशास्त्र विभाग, कला व वाणिज्य पदवी महाविध्यालय, पेट्रोलपंप, जवाहरनगर,
जि. भंडारा मो.9518943527 ,email –rjbhagat1968@yahoo.co.in

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजव्यवस्थेचे अत्यंत सूक्ष्म अध्ययन केलेले आहे. ज्या भारतीय समाजव्यवस्थेने त्यांना सतत जातीयवादाचे चटके दिले,तीच व्यवस्था संपूर्ण बदलण्यासाठी आधी तिचा सांगोपांग अध्ययन करणे आवश्यक आहे, हे बाबासाहेब जाणून होते.बाबासाहेब हे एक महान समाजशास्त्रज्ञ होते. आजही सर्वसामान्य भारतीय माणसाला याची जाणीव नाही. कारण त्यांच्या समाजशास्त्रीय अध्ययनाला इतर समाजशास्त्रज्ञांनीअवाक्षराने सुद्धा प्रसिद्धी दिली नाही. परंतु 'कोंबडे झाकले म्हणजे सूर्य उगवण्याचा थांबत नाही' या म्हणीप्रमाणे एक तेजस्वी सूर्य म्हणून बाबासाहेबांनी समाजशास्त्राच्या योगदानाने आपले तेज सिद्ध केले.

भारतात समाजशास्त्राचा स्वतंत्र विभाग सुरु होण्यापूर्वीच अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात ९ मे १९१६ ला भरलेल्या डॉ.ए.ए.गोल्डनवायझर मानवविज्ञान परिषदेत 'एका २५ वर्षाच्या तरुण भारतीय समाजशास्त्रज्ञाने भाग घेतला होता. या तरुण भारतीय समाजशास्त्रज्ञाने त्या परिषदेत "भारतातील जातीची घडण, उत्पत्ती आणि विकास" हा संशोधनपर पेपर सादर केला होता. हा पेपर १९१७ च्या 'इंडियन एन्टीक्वेरी' मध्ये प्रसिद्ध झाला होता. हा तरुण भारतीय संशोधक म्हणजेच डॉ.बी.आर.आंबेडकर होत.

कोलंबिया विद्यापीठात डॉ.आंबेडकरांचा अनेक महान लेखक व विचारवंतांशी संपर्क आला व त्या सर्वांचे मार्गदर्शन पण त्यांना लाभले. अर्थशास्त्राचे प्राध्यापक सेलीगमनयांचा मार्क्सवादावरील ग्रंथ वाचून आंबेडकरांचा मार्क्सवादाशी प्रथम परीचय झाला. जॉन ड्युई हे लोकशाही तत्वज्ञानाचे अभ्यासक कोलंबिया विद्यापीठात डॉ. आंबेडकरांना भेटले. जॉन ड्युईचा गाढ प्रभाव डॉ. आंबेडकरांवर पडला होता. त्यामुळे आपल्या सर्व सिद्धांताना, विचारणा, आदर्शांना कृतीत उतरविण्याचा त्यांनी अखंड प्रयत्न केला. समाजशास्त्रज्ञ म्हणून देखील त्यांनी आपला प्रत्येक सिद्धांत व्यवहाराच्या कसोटीवर घासून-पुसून घेतलेला आहे. ड्युई च्या सामाजिक नैतिकतेचे दर्शन आंबेडकरांच्या धम्मविषयक तत्वज्ञानात अधिक स्पष्ट झालेले दिसते. डॉ. आंबेडकरांच्या मते, सामाजिक नीतिमत्तेच्या व्यापक पायावर उभी असलेली समाज व्यवस्था अधिक भक्कम आणि मजबूत स्वरुपात असते.

अनेक सामाजिक विषयावर डॉ. आंबेडकरांनी ग्रंथ लिहिले आहेत. त्या प्रत्येक ग्रंथात समाजशास्त्रीय संशोधनाचे निष्कर्ष मांडले आहेत. कोणतेही लेखन केवळ वरवरचे केलेले नसून, वस्तुनिष्ठ पद्धतीने संशोधनात्मक मार्गाचा अवलंब करून अनेक महत्वपूर्ण समाजशास्त्रीय सिद्धांत त्यांनी मांडलेत. त्यांच्या या ग्रंथ संपदेमुळे भारतीय भारतीय समाजशास्त्रीय संशोधनाला मौलिक असे योगदान प्राप्त झाले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक महान संशोधक होते.कोलंबिया, लंडन, बॉन या जगप्रसिद्ध विद्यापीठात त्यांनी अध्ययन केले. मोठमोठे शंशोधनपर ग्रंथ लिहिले. त्यामुळे त्यांच्या विचारांची वस्तुनिष्ठता आणि तार्किकता यांचा पदोपदी आपल्याला प्रत्यय येतो. सामाजिक विषयांच्या संदर्भात केवळ विचार मांडून ते थांबले नाहीत तर स्वतंत्र अश्या सिद्धांताची त्यांनी मांडणी केली. जातिव्यवस्थेचा सिद्धांत, अस्पृश्यतेचा सिद्धांत,धर्माचा सिद्धांत, सामाजीक परिवर्तनाचा सिद्धांत,सामाजिक मानवतावादाचा सिद्धांत इत्यादी अनेक सिद्धांतामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक थोर समाजशास्त्रज्ञ आहेत हे सिद्ध होते आणि त्यांच्या या विद्वत्तापूर्ण संशोधनपर ग्रंथांमुळे भारतीय समाजशास्त्राचे दालन समृद्ध झालेले आहे.

**जातीच्या उत्पत्तीचा सिद्धांत** :'भारतातील जातींची घडण, उत्पत्ती आणि विकास' या आपल्या संशोधनपर पेपर मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती कशा निर्माण झाल्यात? त्या का टिकून राहिल्या आहेत? या संबंधीचे मानवशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय विश्लेषण केले आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात , बहिर्विवाहावर अंतर्विवाहाचे वर्चस्व हेच खरे तत्व जातीच्या निर्मितीस कारणीभूत होते. (डॉ. प्रदीप आगलावे २९१४-१३१) ते पुढे म्हणतात,'जात हा एक स्वयं मर्यादित वर्ग होय.' जाती निर्मितीसाठी जातींतर्गत विवाह हेच व्यवछेदक लक्षण आहे. याच आधारावर त्यांनी जातीचा सिद्धांत मांडला आहे.

भारतीय समाजाचा अभ्यास करताना हे प्रकर्षाने आढळून येते कि, भारतात जाती किंवा समूहा अंतर्गत विवाह पद्धतीचे अत्यंत कठोर पद्धतीने पालन केले जाते. दुसऱ्या जातीच्या लोकांसोबत वैवाहिक संबंध ठेवले जात नाही. प्रत्येक जातीच्या प्रत्येक व्यक्तीने या नियमांचे काटेकोर पालन करावे अशी सक्ती आहे. त्यामुळे जातीची बंधने

हि अधिकच कठोर झालेली आहेत. अत्यंत प्राचीन काळापासून हि प्रथा चालत आलेली आहे. मग पूर्वी जातीबाह्य किंवा समूहबाह्य विवाह होत नव्हते का? प्राचीन काळी सामुहांतर्गत विवाहाची कोणतीच प्रथा अस्तित्वात नव्हती. जातीबाह्य विवाहाची पद्धती रूढ होती. परंतु कालौघात गटबाह्य विवाहाची प्रथा रुढ झाली. आधुनिक काळात रक्ताचे नातेवाईक सोडले तर विवाहासाठी कोणतेच बंधन पाळले जात नाही. एवढेच काय परंतु निसर्गाच्या पुढे जाऊन आज समलैंगिक विवाह सुद्धा होत आहेत. तरीही भारतीय समाजात मात्र अजूनही जाती बाहेर विवाह करण्याची मुभा नाही आणि संपूर्ण समाज मोठ्या आनंदाने किंवा जबरदस्तीने का होईना या प्रथेचे पालन करतो.

परंतु याच भारतात सगोत्र विवाह पद्धती रूढ नाही. एकाच गोत्रातील लोकांचा विवाह होऊ शकत नाही. ते नात्याने भाऊ बहिण समजले जातात. हा एक गटबाह्य विवाहाचाच प्रकार आहे.तरीही जातीजातीमध्ये गटांतर्गत विवाहाचे एवढे कठोर बंधन पाळले जाते याचे आश्चर्य आहे.

हिंदुधर्मातील जातींच्या निर्मितीच्या मुळाशी वंशशुद्धी किंवा रक्तशूद्धीचा सिद्धांत आहे, असे सांगण्यात येते. या सिद्धांताचा फोलपणा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवून दिला. जातीची निर्मिती कशी झाली. याचे विस्तृत विवेचन त्यांनी 'कास्ट इन इंडिया ' या पुस्कात केलेले आहे. प्रत्येक जात हा एक स्वतंत्र वंश आहे. ब्राम्हणांनी वंशशुद्धी राखली तरी मद्रासच्या काल्याकुटट ब्राम्हनात व पंजाबच्या श्वेतवर्णी ब्राम्हनात कोणतेच साम्य नाही. उलट मद्रास चे अस्पृश्य व ब्राम्हण हे वंशाने जास्त निकट आहेत. कोणत्याही समाजात सुदृढ व निकोप प्रजा निर्मितीकरिता न्याय संयोग मान्य झालेला आहे. परंतु जातीव्यवस्था हेही उदिष्ट साध्य होत नाही. योग्य व अनुरूप स्त्री- पुरुषांना एकत्र येण्यास जातीव्यवस्था प्रतिबंध करते ते निव्वळ भिन्न जातीमुळे, एवढेच नव्हे तर पोटजातींमध्ये सुद्धा विवाहास प्रतिबंध आहे. प्रजावृत्ती अशा बंधनामुळे कशी सध्या होईल? एकूण काय तर रक्तशुद्धता जातिव्यवस्थेमुळे राखता आली नाही. सबल प्रजावृत्तीचा सिद्धांत कुठेही व्यवहारात आणणे कठीण आहे आणि हा सिद्धांत पूर्वी आपल्या पूर्वजांना माहित होता होता असे समजणे चूक आहे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतपादन करतात.(प्रा. संजयकुमार कांबळे २०१८ -१७४,१७५)

डॉ. आंबेडकरांच्या मते, जर गटांतर्गत विवाह-पद्धती टिकवून ठेवायची असेल तर गटातल्या सर्व लोकांच्या विवाहविषयक गरजा गटातच भागविल्या गेल्या पाहिजेत त्यासाठी लग्नायोग्य स्त्री-पुरुषांची संख्या सारखी असली पाहिजे. जर का स्त्री-पुरुषांच्या संख्येत तफावत झाली तर ते गटाबाहेर विवाह करण्यास प्रवृत्त होतील. आणि हे जाती टिकवून ठेवू इच्छिणाऱ्या लोकांना मान्य नव्हते.म्हणजेच लग्नायोग्य स्त्री-पुरुषांच्या संखेत पडलेली तफावत भरून काढण्याची समस्या आणि जातीची समस्या अंतिमतः एकच होय. ही तफावत भरून काढण्यासाठी पुढील चार उपाय योजना करण्यात आल्या.

i) सतीप्रथा: जातींतर्गत विवाह पद्धतीच्या रक्षणासाठी विधवेला जबरदस्तीने सती जायला लावणे.

ii) विधवेच्या पुनर्विवाहास बंदी:विधवा झालेल्या स्त्रीने परत दुसरे लग्न केले तर एक विवाह योग्य पुरुष तिला लागेल म्हणून विधवा पुनर्विवाहास बंदी घालण्यात आली.

iii) विधुरांवर ब्रम्हचर्यावस्था:विधुर पुरुषांना लग्नायोग्य मुलीशी विवाह न करू देणे आणि त्यांच्यावर ब्रम्हचर्यावस्था लादणे.

iv) लग्नायोग्य नसलेल्या मुलींशी त्याचे लग्न लाऊन देणे:विधुरांचा विवाह लग्नायोग्य नसलेल्या मुलींशी लावून देणे, ज्यामुळे लग्नायोग्य स्त्री-पुरुषांच्या संख्येत तफावत होणार नाही.

वरील विवेचनावरून लक्षात येते कि, 'स्वगटाअंतर्गत विवाह पद्धतीचा गटबाह्य विवाहपद्धतीवर वरचष्मा असल्यामुळे भारतात जातीची निर्मिती झाली आहे. अशाकारे गटांतर्गत विवाह करण्याच्या रूढीने स्वगटाबाहेर लग्न करणाऱ्या रुढीवर मिळवलेला विजय म्हणजेच जाती निर्मिती होय.

**जातीची उत्पत्ती कशी झाली ? :** जातीच्या घडणीसंबंधीचे विश्लेषण केल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी जातीच्या उत्पत्तीचा सिद्धांत मांडला आहे. जातीची उत्पत्ती जातींतर्गत विवाहाशी संबंधित आहे. कारण जातींतर्गत विवाह हेच जातीचे एकमेव वैशिष्ट्य आहे.

डॉ. आंबेडकर यांच्या मते जगातील इतर समाजाप्रमाणे भारतीय समाज देखील पूर्वी वर्गव्यवस्थेवर आधारित होता.

i) ब्राम्हण - उपाध्यायांचा वर्ग

ii) क्षत्रिय - सैनिकांचा वर्ग

iii) वैश्य - व्यापाऱ्यांचा वर्ग

iv) शुद्र - शेतकरी व शेतमजुरांचा वर्ग

वर्ग व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे कि पात्रता मिळविलेल्या व्यक्तीला आपला वर्ग बदलता येतो. हिंदूंच्या इतिहासात काही ब्राम्हण वर्गाने सामाजिक संबंधांच्या बाबतीत स्वतःला बाकीच्या लोकांपासून विभक्त करून घेतले आणि श्रम विभाजनाच्या तत्वानुसार बाकीच्या जनतेची विभागणी झाली.सैनिकांमध्ये अशा प्रकारच्या पोटविभागास अनुकुलता नसल्यामुळे क्षत्रिय वर्गाचे विभाजन राज्यकर्ते आणि सैनिक या दोनच भागात होवू शकले. खरे तर हि एक स्वाभाविक क्रिया होती परंतु यात अस्वाभाविक काय होते तर या पोट वर्गानी वर्ग व्यवस्थेतील मुक्त प्रवेश गमावला. आणि ते स्वतःमध्येच स्वयमर्यादित वर्ग बनले आणि पुढे हे वर्ग जातींतर्गत विवाहाच्या कठोर पालनामुळे बंदिस्त अशा जातींमध्ये परावर्तीत झाले.

जाती कशा निर्माण झाल्या ? यावर सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ जी.एस. धुर्ये यांनी ,'Cast, class and Occupation,(1961)' या त्यांच्या ग्रंथात 'Origin of the cast system' या प्रकरणात जातीच्या उत्पत्ती बाबतचे विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते, 'भारतात आलेल्या आर्यांनी येथिल मुलनिवासिना अंकित केले. पण त्यांना आपल्या धार्मिक सामाजिक जीवनात सहभागी करून घेतले नाही. स्वतःला वांशिक व सांस्कृतिक दृष्ट्या श्रेष्ठ समजून इतरांना हिंनतेने वागविले. परंतु ज्या लोकांनी आर्यांचे स्वामित्व मान्य केले त्यांना शुद्र हा नवीन वेगळा वर्ग निर्माण करून त्यांचा आपल्या समाज रचनेच्या परिघातील एक भाग म्हणून स्वीकार केला." ते पुढे स्पष्ट करतात कि, आर्यांमधील ब्राम्हण हे आर्यांचे नैतिक मार्गदर्शक व कायदे तयार करणारे होते. हे ब्राम्हण आर्या पुढे जिथे जिथे गेले, तिथे तिथे त्यांनी अंतर्गत विवाहाचा नियम व जातीव्यावस्थेची इतर वैशिष्ट्ये नेली आणि तिथे त्यांनी व्यवसायावर आधारित वेगवेगळे समूह पाडून सर्वाना अंतर्गत विवाहाचा नियम पाळणे बंधनकारक केले. हे ब्राम्हणांनी का केले असावे तर अंतर्गत विवाह बंधनामुळे निरनिराळ्या गटांमध्ये रोटी-बेटी व्यवहारांवर बंधन आले. त्यामुळे आर्यांच्या रक्ताची शुद्धता अबाधित राहील असे त्यांना वाटत होते आणि त्यामुळे सर्वाना त्यांनी हे नियम काटेकोरपणे पाळायला लावले. त्यामुळे जाती व्यवस्था निर्माण होण्यास मदत झाली.(डॉ. प्रदीप आगलावे २०१९-२२ )

**जातींतर्गत विवाहाची कारणमीमांसा** :

**१) अनुकरण प्रवृत्ती** - ग्राबियल ट्रेड च्या अनुकरण प्रवृत्तीच्या नियमाशी डॉ. आंबेडकर सहमत आहेत. ग्राबियाल म्हणतो कि, अनुकरणाचा प्रवाह श्रेष्ठ दर्जाकडून कनिष्ठ दर्जाच्या लोकांकडे वाहतो. अनुकर अनुकरण वृत्तीचा विस्तार हा अंतराच्या प्रमाणात कमी-अधिक असतो. ब्राम्हणांनी जातींअतर्गत विवाहाची प्रथा स्वतःच्या जातीमध्ये सुरु केली आणि त्यांचे अनुकरण अब्राम्हण आणि इतर पोट विभागणी केली. ब्राम्हणांचा दर्जा समाजात श्रेष्ठ असल्याने त्यांच्या या कृतीचे अनुकरण इतरही कनिष्ठ दर्जाच्या लोकांनी केले आणि जातीची चौकट घट्ट झाली.

**२)एक यांत्रिक प्रक्रिया** - श्रेष्ठ वर्गातील लोकांनी प्रवेश बंद केल्यामुळे बाकीच्यांना जाती बहिष्कृत केल्यासारखे झाले. मग त्यांना नवीन जात बनविणे भाग पडले. हि एक यांत्रिक प्रक्रिया आहे. त्यात एका गटाने बाहेर काढले म्हणून बहिष्कृत गट आपला स्वयमं मर्यादित जातीचा गट बनवू लागला. अशाप्रकारे नव-नवीन वर्ग जातीच्या चौकटीत बंदिस्त होत गेले आणि विविध जातींची निर्मिती झाली.

**जातीचे विश्लेषण** :डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते,'हिंदू समाज म्हणजे जातींचे आगर किंवा घर आहे. हिंदू हे लोक नाहीत, तर ते जातीने तयार झालेल्या लोकांचा समूह आहे आणि हेच त्यांचे वैशिष्ट्य आहे.(डॉ. प्रदीप आगलावे २०१४- १३६)

जातीभेदामुळे हिंदू समाजाचे संघटन होऊ शकले नाही असा निष्कर्ष ते काढतात. संकटकाळी सर्व हिंदू एक होवून येतील अशी अपेक्षा त्यांच्याकडून करता येत नाही. जातिव्यवस्थेमुळे हिंदू भित्रा झालेला आहे. त्याच्यात धैर्य आणि सुज्ञपणा उरला नाही, असे मॉरीस यांनी हिंदूंचे वर्णन केलेले आहे. हिंदू सहनशील नाही, त्याच्यात प्रतिकार सामर्थ्य नाही, अन्याय अत्याचाराबाबत तो उदासीन असतो. स्वतः अन्याय व अपमान मुकाट्याने सहन करतो. जातीप्रथेने त्याला अपंग बनविले आहे. हिंदू समाज इतरांची सुधारणा करीत नाही. परंतु कुणी सुधारणा करू इच्छित असेल तर त्यालाही प्रतिबंध करतो याची दोन उदाहरणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिली आहेत.

ब्राम्हणांचे अनुकरण करून सोनार समाजाने स्वतःला दैवज्ञ म्हणणे आणि धोतराचा सोगा वर टाकणे तसेच 'नमस्कार' करणे, या प्रथांचे अनुकरण केले होते. परंतु ब्राम्हणांना हे अनुकरण रुचले नाही आणि पेशव्यांनी सोनारांना शिक्षा दिली. पठारे प्रभू हे विधवा विवाह करीत असत परंतु ब्राम्हणांचे अनुकरण करून त्यांनी अशा विवाहास प्रतिबंध घातला. मात्र पेशव्यांनी हि प्रथा मोडून काढली. (प्रा. संजयकुमार कांबळे २०१८ -१७७)

हिंदू समाजात सुधारणा का झाल्या नाहीत, त्याचे कारण सुद्धा जातीव्यवस्थेत दडलेले आहे.सुधारणा दडपून टाकण्याचे सर्वात मोठे शस्त्र म्हणजे जातीबाहिष्कार. जर एखाद्या व्यक्तीने जातीबाहेर जावून नियमांचे उल्लंघन केले तर त्याला जातीबहिष्कृत करा, असा सरळ सरळ मार्ग सुधारणेच्या आड येतो. महात्मा जोतीबा फुलेंवर सुद्धा त्यांनी दलितांना घरचा हौद मोकळा करून देताच त्यांच्या जातीतील समाजबांधवानी बहिष्कार टाकला होता. जातीव्यवस्थेची कीड हिंदूंच्या डोक्यात अत्यंत खोलवर बसलेली आहे. 'जातीकरिता हिंदू लोक देशाचाही नाश

करायला तयार होतात' हे आंबेडकरांचे विधान घटनेची पायमल्ली करून धर्माचे रान उठविणाऱ्या रुक्ष हिंदुना लागू पडते.

हिंदूंच्या सामाजिक संघटनेचे चातुर्वर्ण्य तत्व आहे. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र अशा चार वर्णावर आधारित हि समाज व्यवस्था आहे. प्राचीन काळी हिंदू समाजात हे चार वर्ण होते. पुढे त्या चार जाती झाल्या आणि आज त्यांच्या चाळीस हजार जाती झाल्या.

वर्णव्यवस्थेचे समर्थक एक मजेशीर तर्क देतात. तो म्हणजे त्रेवार्निक हे पालक असून शुद्र व अन्य हे त्यांचे पाल्य आहेत.त्यामुळे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांच्यावर जे कार्य सोपवले आहे ते त्यांनीच करावे आणि इतरांनी त्यांच्यात ढवळाढवळ करू नये. या तर्काबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काही प्रश्न उपस्थित केले कि, जर क्षत्रिय उद्या संरक्षण करण्यास असमर्थ ठरले तर शुद्रातीशुद्रानी काय करायचे? ब्राम्हणांनी उद्या विद्येचा बाजार मांडला, वैश्यांनी व्यापारात समाज व देशाची फसवणूक केली तर इतरांनी शांत बसायचे का? हे प्रश्न आजही जसेच्या तसेच आहेत. पालक समजले जाणारे ब्राम्हण,गुजराती,मारवाडी शाळा, महाविद्यालये काढतात आणि शुद्र, अस्पृश्य समाजाच्या मुलांना शिक्षण नाकारतात. काही जातींना लढवय्ये नाहीत, गुन्हेगार जाती असे शिक्के मारले आहेत. तेव्हा पालक असणारे क्षत्रिय त्यांना या पासून वाचवू शकत नाहीत. उदा. महारांना पेशवे सैन्यात भरती करीत नसत,हे म्हणून कि महारांमध्ये कुठले शौर्य, पण त्याच ५०० महारांनी पेशव्यांच्या मोठ्या फौजेला हरविले होते,भीमा कोरेगावच्या युद्धात आणि त्यांच्या शौर्याचे प्रतिक म्हणून आजही इंग्रजांनी बांधलेला विजयस्तंभ दिमाखात उभा आहे. अनेक भटक्या जातींना उचल्या,उपरा अशी गुन्हेगारी नावे आहेत. आजवरचा इतिहास हे सिद्ध करतो कि सवर्ण आणि शूद्रातिशूद्र यांचे संबंध मालक-चाकर, स्वामी-दास याच प्रकारचे राहिलेले आहेत. कोणताच पालक आपल्या पाल्यावर गुलामगिरी लादत नाही परंतु चातुर्वर्ण्य व्यवस्थेने शुद्रातीशुद्रांवर गुलामगिरी लादली आहे.

**समारोप** :डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीची समिक्षा करताना हे स्पष्ट केले आहे कि, जात हि केवळ सामाजिक व्यवस्था नाही तर ती आर्थिक, धार्मिक, राजकीय आणि सामाजिक व्यवस्था आहे. त्यामुळे जातीची समिक्षा करताना जातीव्यव्स्थेचे सर्व अंगांनी विश्लेषण करणे आवश्यक ठरते. डॉ. आंबेडकरांनी जातीची आर्थिक, राजकीय आणि सामाजिक दृष्टीकोनातून समिक्षा केलेली आहे.

आर्थिक व्यवस्था म्हणून जात हि एक हानिकारक व्यवस्था असल्याचे डॉ. आंबेडकर म्हणतात. जात हि एक राष्ट्र एकसंघ ठेवण्यास अपयशी ठरते म्हणून राज्यसंस्था म्हणून सुद्धा जात हानिकारक आहे.समाजातील कोलांची विभागणी उच्च-नीच अशा गटात करीत असल्यामुळे सामाजिक संस्था म्हणून सुद्धा जात अपयशी ठरते. अशा प्रकारे जात हि भारतीय समाजाला लागलेली एक कीड आहे. तिचे निर्मुलन हाच एकमेव मार्ग समाज सुधारणेसाठी आवश्यक असल्याचे मत डॉ. आंबेडकर मांडतात.

संदर्भ :

1. आगलावे प्रदीप,मुलभूत समाजशास्त्रीय विचार,साईनाथ प्रकाशन, नागपूर.
2. आगलावे प्रदीप,धम्मचक्र प्रवर्तनानंतरचे परिवर्तन,कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद.
3. कांबळे संजयकुमार,जातीअंताचे समाजशास्त्र,डायमंड पब्लीकेशन, पुणे.
4. चौडवाल शिवचरण,दलित चेतना का उदय एवं विकास,पाइंटर पब्लिशर्स,जयपूर.
5. थोरात सुखदेव, अनुवादक- विजयकुमार पंत,भारत मे दलित - सामान्य लक्ष कि खोज,रावत पब्लीकेशन्स, दिल्ली.